मत्स्य पुराण.

(व्यासकृत)

संस्कृत मूळ पुस्तक.

शुद्ध करून

प्राकृत टीके सहित

वे. शा. रा. रा. जनार्दनाचार्य वळे व अनंताचार्य-

अष्टपुत्रे वगैरे विद्वान् मंडळी कडून

 तयार करवून

तें

पुणें येथें

रावजी श्रीधर गोंधळेकर

याणीं

आपले जगद्धितेच्छु छापखान्यांत छापिलें.

भाग २रा.

शके १७९५ श्रीमुख नामसंवत्सरे फाल्गुन कृष्ण १० रोज भृगुवार.

तारिख १३ मार्च सन १८७४.

किंमत ७ रु. टपालखर्च ।॥-

मत्स्यपुराण.

अनुक्रमणिका.

भाग २ रा.

ह्या ग्रंथांत काय विषय आहे याचें थोडक्यांत ज्ञान होण्याक-रितां प्रत्येक अध्यायांतील सारांश घेऊन अमुक पृष्ठापासून अमुक पृष्ठापर्यंत अध्याय अमुक लिहून पुढें सारांश लिहिला आहे.

प्रस्तावना.

व्यासकृत अष्टादश पुराणांत बहुतकरून संपूर्ण विषय आहेत; परंतु
ग्रंथ संस्कृत भाषेंत असून त्यांचा फारसा कोंº संग्रह ही नाहीं. कितीएक ठिका
ीं कांहीं ग्रंथ आहेत परंतु कांहीं साद्यंत नसून कांहीं कायस्ती अक्षराचे व अशु
्व कित्येकांवर टीकाही नाहींत. असें असल्यामुळें त्यांचा उपयोग व्हावा तसा
ेत नाहीं, यामुळेंते ग्रंथ कांहीं दिवसानीं निरुपयोगी वस्तूप्रमाणें नाहींसे होती-
. प्रस्तुत काळीं श्रुति, स्मृति, पुराणें आदिकरून ग्रंथांचा अभ्यास करणारे लो
कालदेशवर्तमाना प्रमाणें उत्तरोत्तर कमी होत चालले आहेत; कारण जी विद्या संपादन
ी असतां तिज पासून द्रव्य मिळावें व विद्या करण्यास उत्तेजन येण्याचे मार्ग असा
तेही नाहींत. प्रस्तुतचे राजे यांची देशभाषा व लिपी (इंग्रेजी) शिकलें असतां रो
ार मिळून द्रव्य मिळतें यामुळें बहुत करून सर्व लोक इंग्रेजी विद्येचा अभ्यास करूं
ागले आहेत तेणें करून त्यांचे ग्रंथ व धर्म व क्रिया खऱ्या वाटून आपले धर्म खरे
ंवा खोटे या विषयीं लोकांस फारच शंका उत्पन्न होत चालल्या आहेत या विषयीं
लोकांस दोष देणें केवल रास्त आहे असेंही नाहीं; कारण ज्याचा रात्रंदिवस अभ्या
त त्याप्रमाणें बुद्धि होणें हे स्वाभाविक धर्मच होत. कितीएक लोक आलीकडील विद्वा
् म्हणविणारे असें म्हणतात कीं, दगडाचे देव करून पूजा केल्यांत काय लाभ. व
्या नाना प्रकारचीं व्रतें, दानें, जप, तर्पणें इत्यादिक स्वकर्मा बद्दल नाना प्रकारचे कुतर्
ाटून, यांत कांहीं नाहीं अशा लोकांस कल्पना उत्पन्न होत चालल्या आहेत. कारण
ाहिलें असतां असें दिसतें कीं, या लोकांस आपले ग्रंथ व त्या ग्रंथांची योग्यता व
ांचा उपयोग व धर्म संबंधीं नियम व त्यांचा विचार इकडे त्यांचें लक्ष्य नसल्यामुळें
परधर्मी लीन होतात. आपल्या ग्रंथांत कला कौशल्य, शिल्प, ज्योतिष, जारण,-
ारण, उच्चाटनादिक सिद्धि, मंत्रशास्त्र, वैद्यक, राजधर्म, आपत्कालचे धर्म, भक्ति, वैरा
्य, शृंगार, नीति, व कृत, त्रेत, द्वापार या युगांपासून प्रस्तुतचे कली पर्यंतचे धर्म व
तिहास व पुढें जल प्रलया पर्यंत होणारें भविष्य इत्यादिक नाना प्रकारचे आप-
ा ग्रंथांतून इतिहास असून ते प्रस्तुत लोकांस कळत नाहींत या मुळें आपल्या दे
ास अज्ञानी असें किती एक परराज्यांतील लोक म्हणावयास लागले आहेत. प-
कीं, इतर देशांतील लोक फारच अज्ञानी व रानटी होते, परंतु त्याणीं आमचेच
ग्रंथांचा संग्रह करून उद्योगानें व मेहेनतीनें त्यांतील कला कौशल्यादिक विषयां-

त्वा उपयोग करून या देशास उपयुक्त वस्तूंचा केवढा पुरवठा करीत आहेत इ
लक्ष्य पुरविलें असतां आमचे देशांतील लोकांचे डोळ्यावर अज्ञानाचें पड
ऊन स्वातंत्रपणाचे धंदे व रोजगार नसल्यामुळें पराधीन पणानें दुसऱ्याची नो
री करणें भाग पडतें. आतां आपल्या देशबांधवांस कांहीं तरीं सुख व्हावें आणि
आपले जुने ग्रंथ उपयोगांत येऊन लोकांस संपूर्ण विषय समजावे या उद्देशानें
पूर्वी व्यासकृत अष्टादश पुराणें संस्कृत मूळ शब्द लिहून त्याचे खालीं प्राकृत टी
याप्रमाणें छापावें असा मनांत विचार करून सन् १८६९ चे मार्च महिन्या पासून म
त्स्य पुराणास आरंभ करून पाक्षिक पुस्तक छापीत होतों त्याचा भाग २रा अध्य
१३१ पासून १८३ पर्यंत करून प्रत्येक अध्यायांतील सारांशपर अनुक्रमणिक
रून शुद्धिपत्रही केलें आहे. आतां या ग्रंथास मोठे मोठे सरदार व संस्था
क व या देशावर सार्वभौम पणानें राज्य करणारे इंग्रज सरकार यांणीं आप
पूर्ण आश्रय दिला पाहिजे म्हणजे वर्गणी दारांस सदरीं लिहिलेले ग्रंथ घेण्य
स फार सुलभ पडून ग्रंथावलोकनानें लोकांची ही सुधारणा होईल.

अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

भाग ४ रा. समाप्त.

सूतउवाच॥ अशीलेषुमदुष्टेषुदानवेषुदुरात्मसु॥ लोकेषू-
त्साद्यमानेषुतपोधनवनेषुच॥ १॥ सिंहनादैर्व्योमगानांते-
षुभीतेषुजंतुषु॥ त्रैलोक्येभयसंमूढेतमोंधत्वमुपागते
॥२॥ आदित्यावसवस्साध्याः पितरोमरुतांगणाः॥ भी-
ताः शरणमाजग्मुर्ब्रह्माणंप्रपितामहं॥३॥

अर्थ— नंतर सूत बोलला ऋषी हो असे ते त्रिपुरांतील दुरात्मे दानव क्रूरस्व भावानें अति दुष्ट होऊन त्यांनी सर्व लोक व तपच ज्यांचें धन अशा ऋषींची वनें यांचा उच्छेद केला असतां, आणि त्या तीन पुरांनीं आकाशमार्गे गमन करणारे त्या दैत्यांच्या सिंहनादानें प्राणिमात्र भ्याले. तसेंच त्यांच्या भयानें त्रैलोक्य (जसें जग अंधःकारानें अंधत्व पावतें) तसें अत्यंत मोह पावलें. त्याकाली बारा आदित्य, आठवसु, साध्यगण, पितर व एकूणपन्नास म-रुद्गण हे सर्वही भयभीत होत्साते जगाचे प्रपितामह ब्रह्मदेव यांस शर ण गेले.

तेनंस्वर्णोत्पलासीनंब्रह्माणंसमुपागताः॥ नेमुरूचुश्चस
हिताः पंचास्यंचतुराननं॥४॥

अर्थ— आणि ते देवगण, पूर्वी पंचवदन असून पुढें चतुर्मुख झालेला व स्वर्णाच्या कमलावर बसलेला अशा ब्रह्मदेवाजवळ जाऊन सर्वांनीं त्या स बरोबर नमस्कार करून विज्ञापना केली.

वरगुप्तास्तवैवेहदानवास्त्रिपुरालयाः॥ बाधंतेस्मान्य-
थाप्रेष्यननुशाधिततोनघ॥५॥

अर्थ— ती अशी कीं, ब्रह्मदेवा, त्रिपुरांतील दानव तुमचे वरानें निर्भय होत्साते येऊन आह्मांस बाधा करितात, यास्तव त्यांची पीडा जेणेकरून निश्चयानें दूर होईल असा आपण आह्मांस उपाय सांगावा.

मेघागमेयथाहंसामृगास्सिंहभयादिव॥ दानवानांभ
यात्तद्वद्भ्रमामःप्रपितामह॥६॥

अर्थ— हे ब्रह्मदेवा मेघ आले असतां, जसे हंस भितात, आणि हरिण जसे सिंहाच्या भयानें पळतात. तसे आह्मीं या दानवांच्या भीतीनें निश्च भ्रित फिरतों.

पुत्राणांनामधेयानि कलत्राणांतथैवच॥दानवैर्भ्रंश्यमा णानांविस्मृतानिततोनघ॥७॥

अर्थ—हे निष्पाप ब्रह्मदेवा, आमचे स्त्रिया व पुत्र यांस दानवांनीं पळविल्या मुळें आह्मांस त्यांचा नावाचीही विस्मृति झाली आहे.

देववेश्मप्रभंगाश्च आश्रमभ्रंशनानिच॥दानवैर्लोभ मोहांधैः क्रियंतेचभ्रमंतिच॥८॥

अर्थ—आणि विषयांचे लोभ व मोह यांनीं अंध झालेले ते दानव देवांचीं मंदिरें व ऋषींचे आश्रम यांचा नाश करीत सर्वत्र फिरत आहेत.

यदिनत्रायसेलोकंदानवैर्विद्रुतंद्रुतं॥धर्षणानेननिर्देवं निर्मनुष्याश्रमंजगत्॥९॥

अर्थ—तस्मात् हे देवा याप्रमाणें दानवांनीं मोठ्यावेगानें पळविलेल्यात्या लोकांस आपण जर रक्षिलें नाहीं तर त्यांच्या या उपद्रवानें जगांतील देव, मनुष्य व ऋषींचे आश्रम या सर्वांचा समूळ संहार होईल.

इत्येवंत्रिदशैरुक्तःपद्मयोनिःपितामहः॥सत्याहत्रिद शान्सेंद्रानिंदुतुल्याननःप्रभुः॥१०॥

अर्थ—असें देवांनीं भाषण केलें असतां, विष्णूच्या नाभिकमलापासून उत्पन्न झालेले, चंद्रसमानमुखानें शोभायमान, समर्थ सर्वांचे पितामह-असे ब्रह्मदेव त्या काळीं त्या इंद्रासहित सर्वदेवांस बोलूं लागले.

मयस्ययोवरोदत्तोमयामतिमतांवराः॥तस्यांतएष संप्रा प्तःपुरोक्तोमयासुराः॥११॥

अर्थ—कीं श्रेष्ठबुद्धिमंत देवहो म्या मयासुरास जो वर दिला आहे त्याचा म्यां पूर्वीं सांगितल्याप्रमाणें समाप्तीचा हा समयच प्राप्त झाला आहे.

तच्चतेषांमधिष्ठानंत्रिपुरंत्रिदशर्षभाः॥एकेषुपातमोक्षे णहंतव्यंनेषुवृष्टिभिः॥१२॥

अर्थ—देवश्रेष्ठ हो, दानवांचें राहाण्याचें स्थान त्रिपुर, दानवांसहवर्तमान एका बाणानेंच जाळावें; परंतु पुढें बहुत कितीही बाणांच्या वृष्टी केल्या तरी तें शेष राहिलेलें नाश पावणार नाहीं, असा माझा वर आहे.

भवतांचनपश्यामिकमप्यत्रसुरर्षभाः॥यस्त्वेकेम

हारेणपुरंहन्यात्सदानवं॥ १३॥

अर्थ— यास्तव देवहो एका बाणाच्या प्रहाराने दानवांसहित त्यात्रिपुराचा नाश करण्याविषयीं समर्थ असा तुह्मांत मी कोणासही पहात नाहीं.

त्रिपुरंनाल्पवीर्येणशक्यंहंतुंशरेणतु॥ एकंमुक्त्वाम-
हादेवंमहेशानंप्रजापतिं॥ १४॥

अर्थ— तेव्हां सर्व प्रजांचा स्वामी, मोठा ईश्वर अशा एका महादेवावांचून कोण अल्पपराक्रमी दानवांसह वर्तमान त्रिपुराचा नाश करण्याविषयीं समर्थ आहे.

तेयूयंयदिअन्येचक्रतुविध्वंसकंहरं॥ याचामःसहि-
तादेवंत्रिपुरंसहनिष्यति॥ १५॥

अर्थ— तस्मात् ते तुह्मीं, व आह्मीं व इतर देव असे सर्व आपण बरोबरच दक्षयज्ञाचा नाश करणाऱ्या महादेवास जर शरण जाऊन प्रार्थना करूं तर तो त्रिपुरासुराचा नाश करील.

कुतःपुराणांविष्कंभोयोजनानांशतंशतं॥ यथाचैक-
प्रहारेणहन्यतेवैभवेनतु॥ पुष्ययोगेनयुक्तानितानि
चैकक्षणेनतु॥ १६॥

अर्थ— त्या तीन पुरांचें परस्पर अंतर प्रत्येकीं शंभर योजनें केलें आहे; आणि तीं दैत्यांचीं तीनीं पुरें पुष्य नक्षत्राच्या योगावर केलीं आहेत, तेणेंकरून तीं एक क्षणमात्र एके ठिकाणीं असतात. तितक्यांतच शिवाच्याच हातून एक बाणाचे प्रहाराने त्यांचा नाश जसा होईल तसा इतरांचे हातून होणार नाहीं.

ततोदेवैश्चसंप्रोक्तोयास्यामइतिदुःखितैः॥ पितामहश्च
तैःसार्धंभवसंसदमागतः॥ १७॥

अर्थ— नंतर दुःखयुक्त इंद्रादिक देवांनीं शिवाकडे जाऊं असें भाषण केलें असतां ब्रह्मदेव त्या देवांसह वर्तमान कैलासांतील शिवाच्या सभेस आले

तंभवंभूतभव्येशंगिरिशंशूलपाणिनं॥ पश्यंतिचोम-
यासार्धंनंदिनाचमहात्मना॥ १८॥

अर्थ— त्या कालीं मागें झालेल्या व पुढें होणाऱ्या सर्वप्राणिमात्रांचे स्वामी

हिमालयपर्वतावर निद्रा करणारा व हातांत त्रिशूल धारण करणारा अशा शिवास पार्वती व महात्मानंदी यांसहवर्तमान त्या देवांनीं पाहिलें.

अग्निवर्णमजंदेवमग्निकुंडनिभेक्षणं॥अग्न्यादित्यसहस्त्राभमग्निवर्णविभूषितं॥१९॥चंद्रावयवलक्ष्माणंचंद्रसौम्यतराननं॥आगम्यतमजंदेवमथतंनीललोहितं॥२०॥स्तुवंतोवरदंशंभुंगोपतिंपार्वतीपतिं॥२१॥

अर्थ— आणि अग्निसारिख्यावर्णानें युक्त, स्वतःउत्पत्तिरहित, अग्निकुंडसमानजाज्वल्यनेत्र ज्याचे, हजारों अग्नि व सूर्य यां समान कांतीनें युक्त, अग्निसारिख्या देदीप्यमान तेजानें विशेषें करून सुशोभित, मस्तकीं अर्धचंद्रचिन्हानें शोभायमान, चंद्रासारिख्या अत्यंत सौम्यमुखानें युक्त, नीलवर्णमिश्रित आरक्तवर्णानें युक्त, जन्मरहित, वरदेणारा, वाणीचास्वामी व कल्याणाचें केवळस्थान अशा पार्वतीपति देवाधिदेवशिवाजवळ येऊन नंतर ते देव त्याची स्तुति करूं लागले.

देवाऊचुः॥नमोभगवतेशायरुद्रायवरदायच॥पशूनांपतयेनित्यमुग्रायचकपर्दिने॥२२॥

अर्थ— ती अशी कीं, देव ह्मणतात, भगवान्, कल्याणरूप, रुद्र, भक्तजनांस वर देणारा, जीवांचा स्वामी, दुष्टांस निरंतर उग्र व जटाजूटानें भूषित अशा शिवास आह्मी नमस्कार करितों.

महादेवायभीमायत्र्यंबकायचशांतये॥ईशानायभयघ्नायनमस्त्वंधकघातिने॥२३॥

अर्थ— दुष्टांस भयंकर, त्रिनेत्र, केवल शांतस्वरूप, सर्वविद्यांचा व भूतांचा स्वामी, सज्जनांचे भयाचा नाश करणारा व अंधकासुराचा नाश करणारा, अशा महादेवा तुह्मांस आमचा नमस्कार असो.

नीलग्रीवायभीमायवेधसेवेधसास्तुते॥कुमारशत्रुनिघ्नायकुमारजनकायच॥२४॥

अर्थ— नीलवर्णकंठज्याचा, दुर्जनांस भयंकर, विश्वउत्पन्न करणारा, ब्रह्मदेवानें स्तविलेला, कार्तिक स्वामीस उत्पन्न करून त्याकडून देवांच्या शत्रूंस मारणारा, अशा शिवास आह्मीं नमस्कार करितों.

विलोहितायधूम्राय वरायकथनायच॥ नित्यंनीलशि
खंडायशूलिनेदिव्यशायिने॥२५॥उरगायत्रिनेत्राय
हिरण्यवसुरेतसे॥ अचिंत्यायांबिकाभर्त्रेसर्वदेव
स्तुतायच॥२६॥ वृषध्वजायमुंडायजटिनेब्रह्मचारि
णे॥तप्यमानायसलिलेब्रह्मण्यायाजितायच॥२७॥
विश्वात्मनेविश्वसृजेविश्वमावृत्यतिष्ठते॥नमोस्तुदि
व्यरूपायप्रभवेदिव्यशंभवे॥२८॥

अर्थ—विशेषेंकरून आरक्त वर्ण असून धुरासारखा कृष्णवर्ण, साधूंस वर देणारा, खलांचा नाश करणारा, सर्वदां नीलवर्ण मयूरपिच्छें धारण करणारा; त्रिशूलानें शोभणारा, दिव्यशय्येवर निद्रा करणारा, सर्पांच्या भूषणांनीं अलंकृत, तीन नेत्रांनीं शोभायमान, ज्याच्या वीर्यापासून सोनें व रुपें हीं उत्पन्न होतात, ज्याचें माहात्म्य चिंतन करण्यास अशक्य, पार्वतीचा भर्ता, सर्वदेव ज्याची स्तुति करतात, नंदी ज्याच्या ध्वजावर आहे, सन्यास रूपानें ही संचार करणारा, कदाचित् जटाधारी, कचित् ब्रह्मचारिरूपानें वर्तणारा, उदकांत तप करणारा, ब्राह्मणांविषयीं अत्यंत दयालू, पराजय न पावणारा, विश्वाचा आत्मा, विश्व उत्पन्न करणारा, विश्वास आंत बाहेर व्यापून रहाणारा, दिव्य ज्याचें रूप व देवांचें कल्याण करणारा, प्रभु अशा शिवास आमचा नमस्कार असो.

अभिगम्यायकाम्यायस्तुत्यायार्च्यायसर्वदा॥ भक्तानुकं
पिनेनित्यंदिशतेयन्मनोगतं॥२९॥ इतिश्रीमत्स्यपुराणे
त्रिपुरदाहेमहेश्वरस्तवो नाम १३१ अध्यायः॥

अर्थ—शरण जाण्यास योग्य, सर्वांनीं आपले मनोरथ पूर्ण करून घेण्याचें स्थान, किंवा आत्मत्वानें इच्छिण्यास योग्य, निरंतर स्तुति व पूजा करण्यास योग्य, भक्तांविषयीं सर्वदा अत्यंत दयालू, अशा शिवास आह्मीं वंदितों. तस्मात् हे देवा, आपलें मनोगत काय असेल तें आह्मांस सांगावें. इतिश्री मत्स्यपुराणें त्रिपुरोपाख्यानें महेश्वरस्तवोनाम एकत्रिंशदुत्तर शततमोध्यायः

सूतउवाच॥ब्रह्माद्यैस्स्तूयमानस्तुदेवैर्देवोमहेश्वरः॥प्रजा
पतिमुवाचेदंदेवानांक्षमयंमहत्॥१॥

अर्थ– सूत बोलला, शौनकादिक ऋषी हो, याप्रमाणें ब्रह्मादिक देवांनीं महादेवाची स्तुति केली असतां तो शिव ब्रह्मदेवास बोलला कीं, देवांस महत् भय कोठें आहे.

भोदेवाःस्वागतंवोस्तुब्रूतयद्वोमनोगतं॥तावदेवप्रयच्छा
मिनास्त्यदेयंमयाहिवः॥२॥

अर्थ– असें ब्रह्मदेवाशीं भाषण करून शिव इंद्रादिदेवांस ह्मणतात देव हो तुमचें आगमन उत्तम असो; तुह्मीं आपलें मनोगत काय आहे तें मला सांगा, ह्मणजे मी तुमचें सर्व कार्य करितों. कारण म्या तुह्मांस न देणें असें कांहींच नाहीं.

युष्माकंनितरांशंवैकर्ताहंविबुधर्षभाः॥चरामिमहदत्युग्रं
यच्चापिपरमंतपः॥३॥

अर्थ– ह्मणून देवश्रेष्ठ हो मी तुमचें अवश्य कल्याण करणारा आहें, या तुमच्या कार्यासाठीं मी मोठें व अतिउग्रउत्कृष्टतप करितों.

विद्विष्टावोममद्विष्टाःकष्टाःकष्टपराक्रमाः॥तेषामभावःसं
पाद्योयुष्माकंभवएवच॥४॥

अर्थ– कारण सर्वसज्जनांस दुःख देण्याविषयीं पराक्रम करणारे ह्मणूनच प्राणिमात्रांस दुःखकारक, तुमचा विशेषेंकरून द्वेष करणारे जे दैत्य ते तुमच्या द्वेषामुळें माझेही द्वेषी आहेत. तेव्हां कोणत्यातरी उपायानें त्या असुरांचा नाश आणि तुमचा उदय हें कार्य मला अवश्य संपादन केलें पाहिजे.

एवमुक्तास्तुदेवेनप्रेम्णासब्रह्मकास्सुराः॥ ॥रुद्रमा
हुर्महाभागंभागार्हाःसर्वएवते॥५॥

अर्थ– असें शंकरानें भाषण केलें असतां ते ब्रह्मदेवसहित यज्ञभागाचे अधिकारी इंद्रआदिकरून ते सर्व देव महाभाग्यशाली शिवास प्रेमानें बोलतात.

भगवंस्तैस्तपस्तप्तंरौद्रंरौद्रपराक्रमैः॥असुरैर्वध्यमानाः
स्मवयंत्वांशरणंगताः॥६॥

अर्थ– कीं हे भगवन् शिवा भयंकर पराक्रमी त्या असुरानीं घोरतप केलें

आहे त्यामुळें आह्मीं त्यांपासून नाश पावतों ह्मणून तुह्मांस शरण आलों.

मयोनामदितेःपुत्रस्त्रिनेत्रकलहप्रियः॥ त्रिपुरंयेनतद्दु
र्गंकृतंपांडुरगोपुरं॥ ७॥

अर्थ—हे त्रिनयनें शिवा, शुभ्रवर्ण गोपुरांनीं सुशोभित अशीं तीन पुरें ज्यानें निर्माण केलीं तो दितीचा पुत्र मयासुर अत्यंत कलहप्रिय आहे.

तदाश्रित्यपुरंदुर्गंदानवावरनिर्भयाः॥ बाधंतेस्मान्महा
देवप्रेष्यमस्वामिनंयथा॥ ८॥

अर्थ—हे महादेवा ते मयासुरप्रभृति सर्व दानव त्या किल्ल्यासारख्या तीन पुरांचा आश्रय करून वराच्या योगानें निर्भय होत्साते (जसे अनाथ दूतास सर्व लोक पीडा देऊं शकतात, तसे ते आह्मांस बाधा करितात.

उद्यानानिचभग्नानिनंदनादीनियानिच॥ वराश्चाप्सर
सस्सर्वारंभाद्यादनुजैर्हृताः॥ ९॥

अर्थ—आणि त्या दानवांनीं आमचीं बागा व नंदनादिक वनें यांचा विध्वंस केला. तशाच त्यांनीं श्रेष्ठ अप्सरा व सर्व रंभादिक उत्तम स्त्रिया त्या हरण केल्या.

इंद्रस्यवाह्याश्चगजाःकुमुदांजनवामनाः॥ ऐरावता
द्यापहृतादेवतानांमहेश्वर॥ १०॥

अर्थ—हे महेश्वरा इंद्रादि देवांचे बसावयाचे कुमुद, अंजन, वामन व ऐरावत आदिकरून सर्व मोठमोठे हत्ती त्या दैत्यांनीं हरण केले.

येचेंद्ररथमुख्याश्चहरयोपहृतासुरैः॥ जाताश्चदान
वानांतेरथयोग्यास्तुरंगमाः॥ ११॥

अर्थ—आणि जे इंद्राच्या रथाचे मुख्य सिंह, दानवांनीं हरण केले ते सिंह त्यांच्या रथास योग्य असे घोडे झाले.

येरथायेगजाश्चैवयाःस्त्रियोवसुयच्चनः॥ तन्नोव्यप
हृतंदैत्यैस्संशयोजीवितेपुनः॥ १२॥

अर्थ—तसेंच रथ, गज, स्त्रिया व जें धन हें आमचें सर्वस्व त्या दैत्यांनीं हरण केलें. तेव्हां आतां आह्मांस आपलें वांचण्याविषयीं पुनः संशय वहुत

प्राप्त झाला आहे.

त्रिनेत्रएवमुक्तस्तुदेवैःशक्रपुरोगमैः॥उवाचदेवान्देवेशोवरदोवृषवाहनः॥१३॥

अर्थ– याप्रमाणे इंद्रप्रमुख देवांनी भाषण केलें असतां, देवांचा स्वामी, वर देणारा, नंदीवाहन असा तो त्रिनयन शिव त्या देवांस बोलतो.

व्यपगच्छतुवोदेवामहद्दानवजंभयं॥तदहंत्रिपुरंधक्ष्ये क्रियतांयद्ब्रवीमितत्॥१४॥

अर्थ– देव हो तुह्मांस दानवांपासून झालेलें मोठें भय नाश पावो. आतां मी तें त्रिपुर जाळितों. परंतु मी जें सांगतों तें तुह्मी अवश्य केलें पाहिजे.

यदीच्छथमयादग्धुंतत्पुरंसहदानवं॥रथमोपयिकं मह्यंसज्जयध्वंकिलास्यते॥१५॥दिग्वाससातथो-क्तास्तेसपितामहकाःसुराः॥तथेत्युक्त्वामहादेवंच क्रुस्तेरथमुत्तमं॥१६॥धरांकूबरकौतुद्वौरुद्रपार्श्वचरा वुभौ॥ अधिष्ठानंशिरोमेरोरक्षोमंदरएवच॥१७॥

अर्थ– देव हो त्या दानवांसहित तें त्रिपुर जाळावें असें तुह्मी इच्छीत असलां तर त्या त्रिपुरावर बाण टाकणारास मला युध्दाविषयी उपयोगी असा रथ सिध्द करून द्या असें त्या दिगंबर शिवानें भाषण केलें असतां ते ब्रह्मदेवसहित देव तथास्तु ह्मणून महादेवास उत्तम रथ करिते झाले,तो असा की, त्या पृथ्वीचा रथ करून त्या रथास घोडे बांधण्याचीं दोहीं बाजूस दोन लांकडें ते शिवाचे दोन पार्षद झाले, आणि मेरूचें शिखर रथांत बसण्याची जागा झाली, व मंदर पर्वत चाकें घालण्याचा मधील कणा झाला.

चक्रुश्चंद्रंचसूर्यंचचक्रेकांचनराजते॥कृष्णपक्षंशुक्ल पक्षंपक्षद्वयमपीश्वराः॥१८॥रथनेमिद्वयंचक्रुर्देवाब्रह्म पुरस्सराः॥आदिद्वयंपक्षयंत्रंयंत्रमेताश्चदेवताः॥१९॥ कंबलाश्वतराभ्यांचनागाभ्यांसमवेष्टितं॥

अर्थ– आणि त्या रथास चंद्र व सूर्य हे सोनें व रुपें यांची चक्रें झालीं. ब्रह्मदेवादि देवांनी कृष्ण व शुक्ल पक्षांच्या रथाच्या चाकांस धांवा केल्या. तशी च त्या ब्रह्मादि देवतांनी कंबल व अश्वतर या नागांनीं उत्तम प्रकारें वेष्टित

अशीं चंद्र, सूर्य, शुक्लपक्ष व कृष्णपक्ष हीं यंत्रें त्या रथास केलीं.

भार्गवश्चांगिराश्चैव बुधोंगारक एव च ॥ २० ॥ शनैश्चरस्तथा चात्र सर्वे ते देवसत्तमाः ॥ वरूथं गगनं चक्रुश्चारुरूपं रथस्य ते ॥ २१ ॥

अर्थ– त्याच प्रमाणें शुक्र, गुरु, बुध, मंगळ व शनि या देवानीं त्या रथास संरक्षणार्थ आकाशाचें सुंदर आवरण केलें.

कृतं द्विजिव्हनयनं त्रिवेणुं शातकौंभिकं ॥ मणिमुक्तेंद्रनीलैश्च वृतं त्वष्टमुखैः सुरैः ॥ २२ ॥

अर्थ– तसेंच दोन जिव्हा व नेत्र यांनीं युक्त अशा वासुकीस रत्नें, मोतीं व इंद्रनीलमणि यांनीं खचित असें सोन्याचें तीन वेळूंचें जूं बांधण्याचें मधील लांकूड देवांनीं मोठ्या हर्षानें केलें.

गंगा सिंधुः शतद्रूश्च चंद्रभागा सरस्वती ॥ वितस्ता च विपाशा च यमुना गंडकी तथा ॥ २३ ॥ सरस्वती देविका च तथा च शरयूरपि ॥ एतास्सरिद्वरास्सर्वा वेणुसंज्ञाः कृता रथे ॥ २४ ॥

अर्थ– आणि भागिरथी, सिंधुनदी, शतद्रू, चंद्रभागा, पूर्ववाहिनी सरस्वती, वितस्ता, विपाशा, यमुना, गंडकी, पश्चिमवाहिनीसरस्वती, देविका, शरयू, त्या सर्वश्रेष्ठ नद्या त्या रथावर देवांनीं वांशांचे स्थानीं केल्या.

धार्तराष्ट्राश्च ये नागास्ते च वेश्यात्मकाः कृताः ॥ वासुकेः कुलजा ये च ये च रैवतवंशजाः ॥ २५ ॥ ते सर्पा दर्पसंपूर्णाश्चापतूणेष्वनूनगाः ॥ अवतस्थुः शरा भूत्वा नानाजातिशुभाननाः ॥ २६ ॥

अर्थ– धृतराष्ट्रवंशांतील जे नाग ते रथाचीं सर्व यंत्रें बांधण्यास दोऱ्या केले, तसेंच वासुकिच्या कुलांतील व रैवत नागांच्या वंशांतील व जे बलाच्या गर्वानें उत्तमप्रकारें पूर्ण झालेले अनेक जातीचे उत्कृष्ट मुखानें सुशोभित नाग ते बाणासारखे पूर्ण वेगयुक्त बाण होऊन शिवाच्या त्या धनुष्यांत व भात्यांत राहिले.

सुरसा सरमा कद्रूर्विनता शुचिरेव च ॥ तृषा बुभुक्षा स-

वोग्रामृत्यस्सर्वशमस्तथा॥२७॥ब्रह्मवध्याचगोव-
ध्या बालवध्याः प्रजाभयाः॥ गदाभूत्वाशक्तयश्च त
दादेवरथेभ्ययुः॥२८॥

अर्थ– तशाच सुरसा, सरमा, कद्रू, विनता, शुचि, तृषा, क्षुधा, त्यास व उग्र देवता, तसाच सर्व नाशक मृत्यु, ब्रह्महत्या, गोहत्या, बालहत्या, व प्रजांस भयंकर इतर देवता त्या सर्वही गदा व शक्ति इत्यादिक आयुधें होऊन त्या शिवाचे रथावर येऊन राहिल्या.

युगंकृतयुगंचाथचातुर्होत्रप्रयोजकाः॥चतुर्वर्णा स
लीलाश्च बभूवुःस्वर्णकुंडलाः॥२९॥

अर्थ– आणि देवांनीं त्या रथास कृतयुगाचें जूं केलें; तसेच त्या युध्दयज्ञांत ते देव कर्णांत लीलेनें सुवर्णाचीं कुंडलें घालून चातुर्होत्र कर्म करण्याविषयीं होते, व ब्राह्मणादिक चार वर्ण झाले.

तद्युगंयुगसंकाशंरथशीर्षेप्रतिष्ठितं॥ धृतराष्ट्रेणना-
गेनबध्दंबलवतामहत्॥३०॥

अर्थ– तें जूं युगासारखें लांब असून रथावर मध्यभागीं जोडून देवांनीं त्यास महा बलाढ्य धृतराष्ट्र नामक नागानें पक्कें बांधलें होतें.

ऋग्वेदस्सामवेदश्चयजुर्वेदस्तथापरः॥वेदाश्चत्वारए
वैतेचत्वारस्तुरगाभवन्॥३१॥

अर्थ– आणि ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, व अथर्ववेद हे त्या शिवाच्या रथास चार घोडे झाले.

अन्नदानपुरोगाणियानिदानानिकानिचित्॥तान्यास
न्वाजिनांतेषांभूषणानिसहस्रशः॥३२॥

अर्थ– आणि अन्नदानप्रमुख जीं सर्व दानें तीं त्या शिवरथाचे घोड्यांचीं हजारों प्रकारचीं भूषणें झालीं.

पद्मद्वयंतक्षकश्च कर्कोटकधनंजयौ॥नागाबभूवुरे
वैतेहयानांवालबंधनाः॥३३॥

अर्थ– तसेच पद्ममहापद्म, तक्षक, कर्कोटक व धनंजय हे नाग त्या रथाच्या घोड्यांचे केंस बांधण्याच्या दोऱ्या झाले.

ओंकारप्रभवास्तावामंत्रयज्ञक्रतुक्रियाः॥ उपद्रवाःप्र
तीकाराःपशुबंधेष्टयस्तथा॥३४॥ यज्ञोपवाहान्येतानि
तस्मिन्लोकरथेशुभे॥ मणिमुक्ताप्रवालैस्तुभूषितानि
सहस्रशः॥३५॥

अर्थ– ओंकारापासून उत्पन्न झालेलीं स्तोत्रें, मंत्र, यज्ञ, क्रतु, अवांतर कर्में, उपद्रव व त्याचे प्रतीकार, पशुमारून करण्याच्या इष्टि, हीं सर्व त्या युध्दयज्ञांतील लोकमयरथास नवरत्नमणि, मोतीं व पोंवळीं यांनीं भूषित अशीं हजारों प्रकारचीं उपवाहनें झालीं.

प्रतोदोंकारएवासीतदग्रंचवषट्कृतं॥ सिनीवालीकुहू
राकातथाचानुमतीशुभा॥३६॥ योक्त्राण्यासंस्तुरंगा
णामपसर्पणविग्रहाः॥३७॥

अर्थ– आणि त्या रथाचे घोड्यांस मारण्याचा चाबूक ओंकारच झाला, व वषट्कार चाबुकाचें अग्र केलें; तशाच सिनीवाली, कुहू, राका, शुभकारक अनुमती त्या रथाचे घोड्यांस फिरण्याच्या दोऱ्या झाल्या.

कृष्णान्यथचपीतानिश्वेतमांजिष्ठकानिच॥ अवदाताः
पताकास्तुबभूवुःपवनेरिताः॥३८॥

अर्थ– तशाच कृष्णवर्ण, पिंवळीं, शुभ्र व मंजिष्ठाच्या रंगानें रंगविलेलीं तांबडीं या चार रंगांच्या वस्त्रांच्या स्वच्छ, वायूनें चंचल होणाऱ्या अशा बहुत पताका त्या रथावर होत्या.

ऋतुभिश्चकृतःषड्भिर्धनुस्संवत्सरोभवत्॥ अजरा
ज्याभवच्चापिसांबिकाधनुषोदृढा॥३९॥

अर्थ– सहा ऋतूंनीं गणलेला संवत्सर त्या रथांत धनुष्य झाला; आणि ती पार्वती देवी त्या धनुष्यास जरारहित व दृढ अशी दोरी झाली.

कालोहिभगवान्रुद्रस्तंचसंवत्सरंविदुः॥ तस्मादुमा
कालरात्रिर्धनुषोज्याजराभवत्॥४०॥

अर्थ– त्या भगवान् कालरुद्रशिवास लोक संवत्सर असें ह्मणतात तो शिव, धनुष्य झाला ह्मणून कालरात्री पार्वती त्या धनुष्यास जीर्णतारहित दृढ दोरी झाली.

सगर्भंत्रिपुरंयेन दग्धवान्सत्रिलोचनः ॥ सइषुर्विष्णु सोमाग्नित्रिदैवतमयोभवत् ॥ ४१ ॥

अर्थ– त्रिनयन शिवानें गर्भस्थानचे दानवांसह वर्तमान तें त्रिपुर ज्या बाणानें जाळलें, तो बाण विष्णु, चंद्र व अग्नि या तीन देवता मिळून झालेला होता.

आननंत्वग्निरभवच्छल्यंसोमस्तमोनुदः ॥ तेजसस्समवायोथचेषोस्तेजोरथांगधृत् ॥ ४२ ॥ तस्मिंश्चवीर्यवृद्ध्यर्थंवासुकिर्नागपार्थिवः ॥ तेजस्संवसनार्थंवैसुमोचातिविषोविषम् ॥ ४३ ॥

अर्थ– तो असा कीं अग्नि त्या बाणाचें मुख झाला होता, अंधकाराचा नाश करणारा चंद्र त्या बाणाचें अग्र झाला. केवळ तेजोमय सुदर्शनचक्रधारी विष्णू हे त्या बाणांत तेजोरूपानें राहिले. आणि त्या बाणांत तेज व पराक्रम यांची वृध्दि होण्यासाठीं नागांचा राजा अत्यंत विषयुक्त वासुकीनें आपलें विष त्या बाणांत सोडिलें.

कृत्वादेवारथंचापिदिव्यंदिव्यप्रभावतः ॥ लोकाधिपतिमभ्येत्यइदंवचनमब्रुवन् ॥ ४४ ॥

अर्थ– याप्रमाणें दिव्य शक्तीनें उत्तम सांग रथ सिध्द करून ते देव, सर्वलोकाधिपतिजे शिव त्यांसमीप येऊन त्यास हें पुढील भाषण बोलतात.

संस्कृतोयंरथोस्माभिस्तवदानवशत्रुजित् ॥ इदमापत्परित्राणंदेवान्सेंद्रपुरोगमान् ॥ ४५ ॥

अर्थ– तें असें कीं, दानवरूपी शत्रूंस जिंकणाऱ्या हे महादेवा, इंद्रप्रमुख देवांस आपत्कालांतून संरक्षण करण्यासाठीं आह्मी हा रथ तुह्मास उत्तमप्रकारें सिध्द करून दिला आहे.

तंमेरुशिखराकारंत्रैलोक्यरथमुत्तमं ॥ प्रशस्यदेवान्साध्वितिरथंपश्यतिशंकरः ॥ ४६ ॥

अर्थ– तेव्हां मेरुशिखराकार त्रैलोक्यमय उत्तम रथाची प्रशंसा करून देवांस ही तुह्मी हा रथ चांगला केला, असें बोलून शिव तो रथ पाहूं लागले

मुहुर्दृष्ट्वारथंसाधुसाध्वित्युक्त्वामुहुर्मुहुः ॥ उवाचसेंद्रा

नमरा नमराधिपतिःस्वयं॥४७॥

अर्थ– त्या रथास वारंवार पाहून पुनःपुनः हा रथ तुम्ही बहुतसुंदर केला असें बोलून स्वतः देवांचे अधिपति शिव, इंद्रसहित देवांस बोलतात.

यादृशोयंरथः कॢप्तोयुष्माभिर्मम सत्तमाः॥ ईदृशोरथ संपत्त्यार्यंताशीघ्रंविधीयतां॥४८॥

अर्थ– कीं श्रेष्ठ देव हो तुम्ही जसा हा रथ मला सिध्द करून दिला आहे तसा या रथसंपत्तीस योग्य असासारथीतुम्हीं मला शीघ्र द्यावा.

इत्युक्त्वा देवदेवेन देवाविध्दाइवेषुभिः॥ अवापुर्मह तींचिंतां कथंकार्यमितिब्रुवन्॥४९॥

अर्थ– असें देवाधिदेव शिवानें भाषण केलें असतां, संपूर्णदेव बाणानें ताडित झाल्यासारखे बहुत चिंताग्रस्त होऊन सारथी नसल्यामुळें कार्य कसें सिध्दीस जाईल असें बोलूं लागले.

महादेवस्यदेवोन्यः कोनामसदृशोभवेत्॥ मुक्त्वाच क्रायुधंदेवंसोपास्यइषुमाश्रितः॥५०॥

अर्थ– कीं चक्रायुधधारण करणाऱ्या विष्णूवांचून महादेवासमान कोण आहे. विष्णु तरी आपण उपासना केली तेव्हां बाणांत येऊन राहिला तो पुनःसारथी कसा होईल?

धुरियुक्ता इवोक्षाणो घट्टंतइवपर्वतैः॥ निश्वसंतस्सु रास्सर्वे कथमेतदितिब्रुवन्॥५१॥

अर्थ– धुरीस जोडलेले बैल पर्वतांशीं जसे टकरा देतात तसे ते शिवाच्या रथास लागलेले सर्व देव सारथि नसल्यामुळें श्वासोच्छ्वास टाकून आतां हें कार्य कसें होईल असें बोलूं लागले.

देवोदृश्यत देवांस्तु लोकनाथस्य धूर्गतान्॥ अहं सार थिरित्युक्त्वाजग्राहाश्वांस्ततोग्रजः॥५२॥

अर्थ– ते समयीं लोकनाथ शिवाच्या रथाच्या धुरीस लागलेल्या देवांस पाहून सर्वांचे अग्रज ब्रह्मदेव मी सारथी आहें असें म्हणून नंतर रथाच्या घोड्यांस ग्रहण करिते झाले.

ततोदेवैस्सगंधर्वैस्सिंहनादोमहान्कृतः॥ प्रतोदहस्तं

संप्रेक्ष्यब्रह्माणंसूततांगतं॥५३॥

अर्थ— नंतर ब्रह्मदेव हातांत चाबूक घेऊन सारथी झाले हें पाहून त्या गंधर्वांसहित देवांनीं महान् सिंहनाद केला.

भगवानपिविश्वेशोरथस्थेवैपितामहे॥सदृशःसूत-
इत्युक्त्वा चाररोहरथंहरः॥५४॥

अर्थ— तेव्हां जगाचे पितामह ब्रह्मदेव रथावरसारथी झाले असतां चराचर विश्वाचे स्वामी, भगवान् महादेवही हा सारथी मजसारखा आहे असें बोलून त्या रथावर बसले.

आरोहतिरथंदेवेत्यश्वाहरभरातुराः॥जानुभिःपति
ताभूमौरजोग्रासश्चग्रासितः॥५५॥

अर्थ— त्या कालीं शिव त्या रथांत आरोहण करीत असतां ते रथाचे अश्व शंकराच्या भारानें पीडित होऊन गुडघे टेंकून भूमीवर पडले, आणि धूळही त्यांच्या तोंडांत गेली.

देवोदृष्ट्वाथवेदांस्तानभीरुग्रहयान्भयात्॥उज्जहार
पितॄनार्तान्स्रु पुत्रइवदुःखितान्॥५६॥

अर्थ— नंतर निर्भय ब्रह्मदेवानीं वेदरूप त्या उग्र अश्वांस पाहून शिवाच्या भारासंबंधीं भयांतून उध्दार केला; यास दृष्टांत उत्तम पुत्र जसा आपले दुःखित पितरांचा नरकांतून उध्दार करितो तसें.

ततस्सिंहरवोभूयोबभूवरथभैरवः॥जयशब्दश्चदेवानां
संबभूवार्णवोपमः॥५७॥

अर्थ— नंतर देव मंडळींत सर्व शब्दांत भयंकर सिंहनाद, व समुद्रासारखा घोषयुक्त असा जयशब्द हे वारंवार उत्तम प्रकारें होऊं लागले.

तदोंकारमयंगृह्यप्रतोदंवरदःप्रभुः॥स्वयंभूःप्रययो
वाहाननुमंत्र्ययथाजवं॥५८॥

अर्थ— त्या कालीं वर देणारे समर्थ ब्रह्मदेव ओंकाराचा चाबूक हातांत घेऊन त्या रथाच्या घोड्यांस अभिमंत्रण करून त्यांच्या वेगानुसार त्या घोड्यांस चालवूं लागले.

ग्रसमानाइवाकाशंमुष्णंतइवमेदिनीं॥मुखेभ्यस्स

मृत्युः श्वासानुच्छ्वसंतइवोरगाः ॥ ५९ ॥

अर्थ--तें असें कीं, ते रथाचे अश्व आपल्या गतीनें आकाशास ग्रासिता त कीं काय अथवा पृथ्वीस चोरतात कीं काय? अशा वेगानें चालतांना सर्पजसे फूत्कार टाकितात तसे ते घोडे मुखांतून श्वासोच्छ्वास सोडीत होते.

स्वयंभुवाचोद्यमानाश्चोदितेनकपर्दिना ॥ व्रजंतिते श्वाजवनाः क्षयकालइवानिलाः ॥ ६० ॥

अर्थ—मस्तकीं जटाजूटानें शोभणाऱ्या शिवाच्या सांगण्यावरून ब्रह्मदेवानें चालविलेले ते रथाचे अश्व (जसे प्रलय कालचे वायू भयंकर वेगानें वाहातात तसे मोठ्या वेगानें चालले.

ध्वजोच्छ्रयविनिर्माणे ध्वजयष्टिमनुत्तमां ॥ आक्रम्यनंदीवृषभस्तस्थौतस्मिन्छिवेच्छया ॥ ६१ ॥

अर्थ— ध्वजाच्या उंचीचे अनुरोधानें केलेल्या त्या रथांतील ध्वजाच्या उत्तम काठीवर चढून नंदी शिवाच्या आज्ञेनें बसला.

भार्गवांगिरसौदेवौदंडहस्तौरविप्रभौ ॥ रथचक्रेतुरक्षेतेरुद्रस्यप्रियकांक्षिणौ ॥ ६२ ॥

अर्थ—आणि सूर्यसमान तेजस्वी, शिवाचें प्रिय करणारे शुक्र व बृहस्पति हे हातांत दंड घेऊन त्या रथाच्या चक्रांचें संरक्षण करीत होते.

शेषश्चभगवान्नागोअनंतोंतकरोरिणां ॥ शरहस्तो रथंपातिशयनंब्रह्मणस्तदा ॥ ६३ ॥

अर्थ— तसाच अनंत नामक भगवान्, नारायणाचें शयनस्थान, शत्रूंचा नाश करणारा असा शेषनामा नाग हातांत बाण घेऊन त्या शिवरथाचें संरक्षण करीत असे.

यमस्तूर्णंसमास्थायमहिषंचातिदारुणं ॥ द्रविणाधिपतिर्व्यालंसुराणामधिपोद्विपं ॥ ६४ ॥ अरक्षतमयूरं निकूजंतंकिन्नरंयथा ॥ गुहआस्थायवरदोगुगोप मरथंपितुः ॥ ६५ ॥

अर्थ—त्याचप्रमाणें यम अतिभयानक आपले महिष वहनावर बसून त्वरेनें तेथें आला; द्रव्याधिपति कुबेर सर्पावर बसून आला; देवांचा राजा

इंद्र, ऐरावत गजावर आरोहण करून आला; व कार्तीकस्वामी किन्नरासारखा शब्द करणाऱ्या मयूरावर बसून आला; आणि तो कार्तीकस्वामी त्या देवांसहवर्तमान आपले पित्याचा (शिवाच्या) युगासारख्या मोठ्या रथाचें रक्षण करूं लागला.

नंदीश्वरश्च भगवान् शूलमादाय दीप्तिमान्॥ पृष्ठतश्चापि पार्श्वाभ्यां लोकस्य क्षयकृद्यथा॥६६॥

अर्थ— आणि महातेजस्वी, प्रलयकालीं लोकांचा संहार करणाराशिव नंदीवर बसून हातांत त्रिशूळ घेऊन दुसऱ्या रूपानें त्या रथाचे मागून व दोहीं बाजूंस संरक्षणार्थ फिरत होता.

प्रमथाश्चाग्निवर्णाभाः साग्निज्वाला इवाचलाः॥ अनुजग्मू रथं शार्वं नक्रा इव महार्णवं॥६७॥

अर्थ— मकरी जशा महासमुद्रांत सर्वत्र सभोंवतीं फिरतात तसे अग्नीच्या ज्वालांनीं युक्त जे ज्वालामुखीपर्वत त्यासारखे अग्निसमान तेजस्वी असे सर्व प्रमथादिक शिवगण त्या शंकराच्या रथा सभोंवतीं मागून चालले.

भृगुर्भरद्वाजवसिष्ठगौतमाः क्रतुः पुलस्त्यः पुलहस्तपोधनाः॥ मरीचिरत्रिर्भगवानथांगिराः पराशरागस्त्यमुखा महर्षयः॥६८॥ हरमजितमजं प्रतुष्टुवुर्वचनविशेषैर्विचित्रभूषणैः॥ रथस्त्रिपुरे सकांचनाचलो व्रजति सपक्ष इवाद्रिरंबरे॥६९॥

अर्थ— नंतर भृगु, भरद्वाज, वसिष्ठ, गौतम, क्रतु, पुलस्त्य, पुलह, मरीचि अत्रि, भगवान् अंगिरा, पराशर, अगस्त्य इत्यादिक, तपच ज्यांचें धन असे हे मोठे ऋषि, विचित्र अलंकारयुक्त, विशेष वाक्यानीं जन्मरहित व पराभवन पावणारा अशा सदाशिवाची स्तुति करिते झाले. तेव्हां तो रथ आकाशमार्गे त्रिपुरावर चालला. याविषयीं दृष्टांत पंखांसहित मेरु पर्वत आकाशमार्गानें जसा नगरें आदिकरून गांवांवर त्यांच्या नाशार्थ जातो तसा.

करिगिरिरविमेघसन्निभास्सजलपयोदनिनादनादिनः॥ प्रमथगणाः परिवार्य देवगुप्तं रथममरापिय

युस्मदर्पयुक्ताः॥७०॥

अर्थ– आणि गज, पर्वत, सूर्य, मेघ यांसारिखे व सजल मेघांच्या गर्जनेस मान नाद करणारे असे शिवाचे पार्षद, प्रमथादिक गण व इतर देव हे सर्वही ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या आश्रयानें गर्वयुक्त होत्साते देवानीं रक्षण केलेल्या त्या रथास आसमंताद्भागीं वेष्टून युध्दभूमीस चालले.

मकरतिमितिमिंगिलावृतः प्रलयइवातिसमुध्द्तो र्णवः॥ व्रजतिरथवरोतिभास्वरो त्यशनिनिपातपयोदनिस्वनः॥७१॥ इतिश्रीमत्स्यपुराणेत्रिपुरदाहेरथप्रयाणोन्नाम १३२ अध्यायः॥ ६॥

अर्थ– तसेच सामान्यमत्स्य, शंभर योजनें विस्तीर्ण तिमिनामा मत्स्य व तिमिंगिलनामक मत्स्य यानीं व्याप्त असून प्रलयकालचा अति वृध्दिंगत भयंकर समुद्रासारखा महान् आणि अत्यंत तेजोमय व वज्राचा पात किंवा मेघ यांसमान घोषानें युक्त असा तो श्रेष्ठरथ त्या कालीं त्या त्रिपुरांवर चालला. ॥ इतिश्रीमत्स्यपुराणे त्रिपुरदाहे रथप्रयाणोनाम द्वात्रिंशत्युत्तरशततमो ध्यायः॥ १३२॥ ॥अध्यायः १३३ वा.॥

सूतउवाच॥ पूज्यमानेरथेतस्मिन्लोकेर्देवेरथेस्थिते॥ प्रमथेषुनदत्सूग्रंप्रवदत्सुचसाध्विति॥ १॥ ईश्वरस्वरघोषेणनर्दमानेमहावृषे॥ जयत्सुविप्रेषु तथागर्ज्जत्सुतुरगेषुच॥ २॥ रणांगणात्समुत्पत्य देवर्षिर्नारदः प्रभुः॥ कांत्याचंद्रोपमस्तूर्णंत्रिपुरं पुरमागतः॥३॥

अर्थ– सूत बोलला ऋषी हो सर्व लोकांनीं पूजित अशा त्या रथांत शिव बसले असतां त्यांचे प्रमथादिक पार्षदगण उग्रसिंहनाद करूं लागले. संपूर्णसाधु बहुत उत्तम असें ह्मणत होते; आणि महादेवाच्या स्वराचे घोषानें नंदी गर्जना करूं लागला; व ब्राह्मण जप करीत होते; तसेच रथाचे अश्व गर्जना करीत असतां त्या कालीं कांतीनें चंद्रासारिखा आल्हाददकारक, समर्थ, देवांचा ऋषी नारद अकस्मात् रणांगणांतून उड्डाण करून त्वरेनें त्रिपुरनामक पुरांत आला.

औत्पातिकंतुदैत्यानांत्रिपुरेवर्ततेध्रुवं॥नारदस्तत्रा
त्रभगवान्प्रादुर्भूतस्तपोधनः॥४॥

अर्थ— तेव्हां तपच ज्याचें धन असा भगवान् नारदऋषि एकाएकीं येऊन एथें प्रगट झाला; तस्मात् या त्रिपुरांतील दैत्यांवर कांहींतरी उत्पातानें भय निश्चयानें येणार असें त्या मयासुरानें जाणलें.

आगतंजलदाभासंसमेताःसर्वदानवाः॥उत्तस्थुर्ना
रदंदृष्ट्वाअभिवादनवादिनः॥५॥

अर्थ— तेसमयीं सजलमेघांसमान कांतीनें शोभायमान आलेल्या नारदास पाहून सर्वदानव उठले, आणि एकत्र जमून त्यांनीं आपापलेनामगोत्रांचा उच्चार करून त्या ऋषीस नमस्कार केले.

तमर्घ्येणचपाद्येनमधुपर्केणचेश्वराः॥नारदंपूजया
मासुर्ब्रह्माणमिववासवः॥६॥

अर्थ— नंतर इंद्रानें जशी ब्रह्मदेवाची पूजा केली तशी त्या समर्थ दानवानीं अर्घ्य, पाद्य, व मधुपर्क इत्यादिक उपचारांनीं नारदाची सांग पूजा केली.

तेषांसपूजांपूजार्हःप्रतिगृह्यतपोधनः॥नारदस्सु
खमासीनःकांचनेपरमासने॥७॥

अर्थ— तपच ज्याचें धन ह्मणून पूजा करण्यास योग्य असे ते नारद त्या दैत्यांची पूजा घेऊन सुवर्णाच्या उत्तमासनावर स्वस्थ बसले.

मयस्तुसुखमासीनेनारदेनारदोद्भवे॥यथार्हंदा
नवैस्सार्धमासीनोदानवाधिपः॥८॥

अर्थ— असे ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेले नारद सुखेंकरून आसनावर बसले असतां, नंतर सर्वदानवांचा राजा मयासुर सर्वदानवांसहवर्तमान योग्यतानुरूप आपापलें आसनांवर बसले.

आसीनंनारदंप्रेक्ष्यमयस्त्वथमहासुरः॥अब्रवीद्वच
नंतुष्टोहृष्टरोमाननेक्षणः॥९॥

अर्थ— नारद आसनावर बसले असें पाहून महान् मयासुर, हर्षानें रोमांच प्रफुल्लित मुख व नेत्र यांनीं युक्त होत्साता संतोषानें नारदासभाषण

बोलतो.

औत्पातिकं पुरेऽस्माकं यथा नान्यत्र कुत्रचित्॥ वर्तते वर्तमानज्ञ वद त्वं हि च नारद॥१०॥

अर्थ– कीं हे नारदा, सध्यां आमच्या त्रिपुरावर जसें उत्पाताचें लक्षण उत्पन्न झालें आहे तसें कोठेंही नाहीं. आपण सर्व वर्तमान जाणणारे आहांत, तेव्हां कोठें असेल तर आह्मांस सांगावें.

दृश्यन्ते भयदाः स्वप्ना भज्यन्ते च ध्वजाः परं॥ विना च वायुना केतुः पतते च रथाद्भुवि॥११॥

अर्थ– तें उत्पाताचें लक्षण असें कीं, रात्रीं भयंकर स्वप्नें दिसतात, तसेच रथाचे ध्वज भंगतात, व वायूवांचून रथाचा ध्वज भूमीवर पडतो.

अट्टालकाश्च नृत्यन्ते सपताकाः सगोपुराः॥ हिंस हिंसेति श्रूयन्ते गिरश्च भयदाः पुरे॥१२॥

अर्थ– आमच्या पुरांत गच्च्या व पताकांसहित गोपुरेंही हालतात; आणि मारामारा अशा भयंकर वाणी ऐकण्यांत येतात.

नाहं बिभेमि देवानां सेन्द्राणामपि नारद॥ मुक्त्वैकं वरदं स्थाणुं भक्ताभयकरं हरं॥१३॥

अर्थ– हे नारदा अत्यंत स्थिर व भक्तांस वर देऊन त्यांचें भय निवारण करणारा, अशा एका शिवावांचून इतर इंद्रसहित देवांस मी भीत नाहीं.

भगवन्नास्त्यविदितमुत्पातेषु तवानघ॥ अनागतमतीतं च भवाञ्जानाति तत्त्वतः॥१४॥

अर्थ– हे भगवन् निष्पाप नारदा, तुह्मी भूत व भविष्य हीं यथार्थ जाणतां; तस्मात् या उत्पातांविषयीं कारण तुह्मांस विदित नाहीं असें नाहीं.

तदेतन्नो भयस्थानमुत्पाताभिनिवेदितं॥ कथयस्व मुनिश्रेष्ठ प्रपन्नस्य तु नारद॥१५॥

अर्थ– यास्तव हे ऋषिश्रेष्ठ नारदा, शरणागतास मला या उत्पातानीं सूचविलेलें हें भयाचें स्थान कोणतें तें आह्मांस सांगा.

इत्युक्तो नारदस्तेन मयेनामयवर्जितः॥ नारद उवाच॥ शृणु दानव तत्त्वेन भवन्त्यौत्पातिका यथा॥१६॥

अर्थ– याप्रमाणें त्या मयासुरानें दोष रहित नारदास भाषण केलें असतां, ते नारद बोलले कीं, हे दनुपुत्रा हीं उत्पाताचीं चिन्हें जीं होतात त्यांचें कारण निश्चयानें श्रवण कर.

धर्मेतिधारणेधातुर्माहात्म्येचैवपठ्यते॥ धारणाच्च महत्वेनधर्मएषनिरुच्यते॥१७॥

अर्थ– धर्म शब्दांतील धृधातूचे धारण व माहात्म्य हे दोन अर्थ आहेत. तेव्हां सर्वजगास धारण करण्यानें व महत्वानें स्वधर्मास धर्म असें ह्मणतात.

सइष्टप्रापकोधर्मआचार्यैरुपदिश्यते॥ इतरश्चानिष्टफलआचार्यैर्नोपदिश्यते॥१८॥

अर्थ– जो सर्वांस हितकारक धर्म आहे त्याचा गुरुलोकांस उपदेश करितात, आणि जो दुःखकारक इतर धर्म आहे त्याचा गुरुलोकांस उपदेश करीत नाहींत.

उत्पथान्मार्गमागच्छेन्मार्गाच्चैवविमार्गतां॥ विनाशस्तस्यनिर्दिश्यइतिवेदविदोविदुः॥१९॥

अर्थ– स्वहितेच्छु पुरुषानें अमार्गांतून सन्मार्गांत यावें तसें न करितां, जो सन्मार्गांतून अधर्माचे मार्गांत जाईल त्याचा विशेषें करून नाश होईल असें वेदवेत्ते ऋषींचें मत आहे.

स स्वधर्मरथारूढःसहैभिर्मत्तदानवैः॥ अपकारिषुदेवानांकुरुषेत्वंसहायतां॥२०॥

अर्थ– हे मयसुरा तो तूं स्वधर्मरूप रथावर आरूढ असून या उन्मत्त दानवांसह वर्तमान अपकार करणाऱ्या देवांच्या शत्रूंस साह्य करितोस.

तदेतान्येवमादीनिउत्पातावेदितानिच॥ वैनाशिकानिदृश्यंतेदानवानांतथैवच॥२१॥

अर्थ– ह्मणून दुःस्वप्नादिक उत्पात सूचक दानवांचा नाश करणारीं हींचि न्हें दिसतात.

एषरुद्रस्समास्थायमहालोकमयंरथं॥ आयातित्रिपुरं हंतुंमयत्वामसुरानपि॥२२॥

अर्थ— हे मयासुरा हा कैलासवासी शंकर, लोकमयमहारथांत बसून आतां या तिन्ही पुरांसहित तुला व त्या असुरांस मारण्यासाठीं येत आहे.

सत्वंमहोजसंनित्यंप्रपद्यस्वमहेश्वरं॥ यास्यसेसहपु
त्रेणदानवैस्सहमानद॥२३॥

अर्थ— तस्मात् तूं महातेजस्वी सदाशिवास सर्वदां शरण जा, म्हणजे हे मयासुरा तूं पुत्र व हे सर्वदानव यांसह वर्तमान कल्याण पावशील.

इत्येवमावेद्यभयंदानवोपस्थितंमहत्॥ दानवानांपु
नर्देवोदेवेशापदमागतः॥२४॥

अर्थ— असें दानवांस उपस्थित झालेलें मोठें भय त्यांस सांगून पुनः नारद देवांचे स्थानास आला.

नारदेतुमुनौयातेमयोदानवनायकः॥ शूरसंमतमि
त्येवंदानवानाहदानवः॥ २५॥

अर्थ— तो नारद मुनि गेल्यावर तो दानवांचा राजा मयनामक दानव शूरांस मान्य असें भाषण त्या दानवांस बोलतो.

शूराःस्थजातपुत्राःस्थ कृतकृत्यास्थदानवाः॥युध्य
ध्वंदेवतैस्सार्धंकर्तव्यंचापिनोभयं॥२६॥

अर्थ— दानवहो तुह्मी शूर आहांत, तुह्मांस पुत्र झाले आहेत; आणि जन्मास येऊन जीं कृत्यें कर्तव्य आहेत तींहीं तुह्मीं केलीं; तस्मात् आतां भय न मानितां तुह्मीं देवाशीं युध्द करा.

जित्वावयंभविष्यामस्सर्वेमरसभासदः॥ देवांश्चसें
न्द्रकान्हत्वालोकान्भोक्ष्यामहेस्सराः॥२७॥

अर्थ— असुर हो इंद्रसहित देवांस जिंकून व त्यांस मारून सर्वही आपण देवसभेंत बसून दिव्य भोगांचा उपभोग करूं.

अट्टालकेषुचतथातिष्ठध्वंशस्त्रपाणयः॥ दंशितायु
ध्दसज्जाश्चतिष्ठध्वंप्रोद्यतायुधाः॥२८॥

अर्थ— दैत्य हो एतदर्थ तुह्मीं अंगांत कवचें घालून सिध्द होत्साते हातांत शस्त्रें घेऊन अवांतर आयुधें सज्ज करून पुरांच्या गरावर देवांशीं

युध्दार्थ उभे राहा.

पुराणित्रीणिचैतानियथास्थानेषुदानवाः॥ तिष्ठध्वं लंघनीयानिभविष्यंतिपुराणिच॥ २९॥

अर्थ– दानव हो हीं आपलीं तिन्ही पुरें जशा अंतरानें असावीं तशीं योग्य स्थानीं उभीं करा, ह्मणजे तीं शत्रूंस जिंकण्याविषयीं समर्थ होतील.

नभोगतास्तथाशूरादेवताविदिताहिवः॥ ताःप्रयत्नेनवार्याश्चविदार्याश्चैवसायकैः॥३०॥

अर्थ– कारण ते देव आकाशांत संचार करणारे तसेच शूरही कसेआहेत हें तुह्मांस विदितच आहे तस्मात् त्यांचे प्रयत्नानें निवारण करून बाणांनीं विदारणही करावें.

इतिदनुतनयान्मयस्तथोक्त्वासुरगणवारणवारणे वचांसि॥ युवतिजनविषण्णमानसंतत्त्रिपुरपुरंसहसाविवेशराजा॥३१॥

अर्थ– याप्रमाणें त्या दनुपुत्र दानवांस गजतुल्य पराक्रमी, देवगणांच्या पराजयाविषयीं भाषणें करून तो दानवांचा राजा मयासुर, तरुणस्त्रियांचे चित्तास खेद उत्पन्न करणारें अशा त्या त्रिपुरांत देवांशीं युध्द करण्यासाठीं अकस्मात् गेला.

अथरजतविशुध्दभावभावोभवमभिपूज्यदिगंबरंसुगीर्भिः॥ शरणमुपजगामदेवदेवंमदनांधकयज्ञदेहघातं॥ ३२॥

अर्थ– नंतर रुप्याच्या शुध्द रूपासमान शुध्दांतःकरणयुक्त मयासुर उत्तम वाणींनीं दिगंबर, देवाधिदेव, मदन, शत्रु अंधकासुर व दक्षयाग नाश करणारा अशा शिवाची पूजा करून तो त्यास शरण गेला.

मयमभयपदैषिणंप्रपन्नंनकिलबुबोधतृतीयदीप्तनेत्रः॥ तदभिमतमदात्ततःशशांकीसचकिलनिर्भयएवदानवोभूत्॥३३॥ इतिश्रीमत्स्यपुराणेत्रिपुरदाहेनारदगमनोन्नाम १३३अध्यायः॥

अर्थ—अशा अभय पदाची इच्छा करणारा मयासुर शरण आला असतांहीं त्याच्याच अपराधामुळें प्रज्वलित झालेल्या तृतीय नेत्रानें युक्त शिवास कांहीं कालपर्यंत त्याची दया आली नाहीं. परंतु क्रोध शांत झाल्यावर त्या चंद्रेश्वर शिवानें मयासुरास इष्ट वर दिला. तेणेंकरून तो दानव निर्भयच झाला. इतिश्री मत्स्यपुराणे त्रिपुरदाहे नारदगमनोन्नामत्रयस्त्रिंशदुत्तरशततमोध्यायः॥ १३३॥

अध्याय १३४ वा.

सूतउवाच॥ ततोरणेदेवबलंनारदोभ्यगमत्पुनः॥ आ
गत्यचैवत्रिपुरात्सभायामास्थितःस्वयं॥ १॥

अर्थ—सूत बोलला, ऋषी हो, नंतर नारद ऋषि स्वतः त्रिपुरांतून त्या रणभूमींत देवसैन्यांतील सभेंत पुनः येऊन बसले.

इलावृत मितिख्यातं तद्वर्षंविस्तृतायतं॥ यत्रयज्ञोबले
र्वृत्तोबलिर्यत्रचसंयतः॥ २ देवानांजन्मभूमिर्यात्रिषुलो
केषुविश्रुता॥ विवाहाःक्रतवश्चैवजातकर्मादिकाःक्रि-
याः॥ ३॥ देवानांयत्रवृत्तानिकन्यादानानियानिच॥ रेमे
नित्यंभवोयत्रसहायैःपार्षदैर्गणैः॥ ४॥ लोकपालास्स
दायत्रतस्थुर्मेरुगिरौयथा॥ मधुपिंगलनेत्रस्तुचंद्रा
वयवभूषणः॥ देवानामधिपंप्राहगणपांश्चमहेश्वरः॥ ५॥

अर्थ—ती युध्दभूमी ज्या खंडांत होती त्यास लोक इलावृत्त खंड म्हणतात. तें खंड विस्तृत असून लांब आहे. जेथें बलीचा यज्ञ झाला व त्यास जेथें वामनानें बांधिला आणि जी देवांची जन्मभूमि सर्व लोकांत प्रसिध्द आहे तशीं त्या देवांचीं लग्नें, यज्ञ व जातकर्मादिक शुभकर्में ही जेथें झालीं, त्याचप्रमाणें देवानीं कन्यादानें जेथें केलीं, शिव आपले पार्षदगणां सहवर्तमान जेथें निरंतर क्रीडा करतात, तसेच इंद्रादिक लोकपाल जेथें सर्वदां मेरुपर्वताप्रमाणें राहिले आहेत. अशा त्या इलावृत खंडांतील देव सैन्याच्या सभेंत मधासारख्या पिंगटवर्ण नेत्र व चंद्रकला यानीं शोभायमान महान् ईश्वर शिव त्या कालीं देवांचा राजा इंद्र व आपल्या प्रमथादि गणांतील मुख्य यांस बोलतात.

वासवैतद्दर्शणांतेत्रिपुरंप रिदृश्यते॥ विमानैश्चपता
काभिर्ध्वजैश्चसमलंकृतं॥ ६॥

अर्थ– कीं हे इंद्रा विमानें, पताका व ध्वज यानीं सुशोभित असें हें तु
झ्या शत्रूंचें त्रिपुर दिसत आहे.

इदंवृत्तमिदंख्यातंवन्हिवभ्दृशतापनं॥ एतेजनागि
रिप्रख्याः सकुंडलकिरीटिनः॥ ७॥ प्राकारगोपुरा
ट्टेषुकक्षांतेदानवास्थिताः॥ इमेच तोयदाभासाद्
भुजाविकृताननाः॥ ८॥ निर्गच्छंतिपुरोदैत्यास्सायु-
धाविजयैषिणः॥

अर्थ– आणि हें त्रिपुर वर्तुलाकार असून अग्नीसारखें लोकांस अ
त्यंत ताप देणारें आहे, आणि यांतील लोक पर्वताकार असून त्या
नीं मुगुट व कुंडलें धारण केलीं आहेत, तसेच ते पुराचा प्राकार, वे
शी, माड्या व खंदकांच्या बाजू यांवर ते दानव बसले आहेत. व सज
ल मेघासमान कृष्णवर्ण, भयंकर मुखांचे, विजयाची इच्छा करणारे दा
नव आयुधांसहवर्तमान पुरांतून बाहेर निघत आहेत.

सत्वंसुरशतैस्साध्र्दंससहायोवरायुधः॥ सहभ्दिर्मा
मकैर्भृत्यैर्व्यापादयमहासुरान्॥ १०॥

अर्थ– तस्मात् हे इंद्रा तूं श्रेष्ठ आयुधें घेऊन सैन्य, शेंकडों देव व प्रहार
सहन करणारे माझे हे प्रमथादिक पार्षदगण यांसहवर्तमान त्या मोठ्या
असुरांचा नाश कर.

अहंचरथवर्येणनिश्चलाचलवत्स्थितः॥ पुरःपुरस्य
रंध्रार्थीस्थास्यामिविजयायवः॥ ११॥

अर्थ– आणि मीही या श्रेष्ठरथानें निश्चल पर्वतासारखा त्या त्रिपुराचे
पुढें तुमच्या विजयार्थ त्यांचें छिद्र पाहात उभा राहीन.

यदातुपुष्ययोगेनएकत्वंस्थास्यतेपुरं॥ तदेतन्निर्द
हिष्यामिशरेणैकेनवासव ॥ १२॥

अर्थ– हे इंद्रा ज्या काळीं पुष्यनक्षत्राच्या योगानें तीं तिन्हीं पुरें एकत्रस्थ
ळीं येतील त्या काळीं मी एका बाणानें तत्क्षणीं तीं पुरें जाळीन.

इत्युक्तोवैभगवतारुद्रेणेहस्करेश्वर:॥ ययौतत्रिपुरं जेतुंतेनसैन्येनसंवृत:॥१३॥

अर्थ– असें भगवान् शिव बोलले असतां तो देवांचा राजा इंद्र, मोठ्या सैन्यासहवर्तमान त्या तिन्हीं पुरांतील असुरांस जिंकण्यासाठीं शिवाच्या आज्ञेवरून वेगानें चालला.

प्रक्रांतरथभीमैस्तैस्सदेवैःपार्षदांगणैः॥ कृतसिंहरवोपेतैरुद्रच्छद्भिरिवांबुदैः॥१४॥ तेननादेनत्रिपुराद्दानवायुध्दलालसाः॥उत्पत्यदुद्रुवुश्चेलुःसायुधाःखेगणेश्वरान्॥१५॥

अर्थ– तेव्हां चाललेल्या वेगयुक्त रथांनीं भयंकर असे त्या इंद्रादि देवां सहित ते शिवाचे पार्षदगण सिंहनाद करीत मेघांसारखे आकाशमार्गानें चालले त्या कालीं त्यांच्या त्या शब्दानें त्रिपुरांतील दानव युध्दाविषयीं प्रवृत्त होऊन आकाशांत उड्डाण करून त्या शिवगणांच्या मागें लागले, आणि त्यानीं त्यांस आयुधानीं कंपित केलें.

अन्येपयोधरारावाःपयोधरसमाबभुः॥ससिंहनादं बादित्रंवादयामासुरुध्दताः॥१६॥

अर्थ– आणि मेघासमान शब्द करणारे असून कांतीनेंही तसेच असे दुसरे उन्मत्त दानव सिंहनाद करीत नानाप्रकारचीं रणवाद्यें वाजवीत असतां शोभले.

देवानांसिंहनादश्चसर्वतूर्यरवोमहान्॥ ग्रस्तोभूदैत्यनादैश्चचंद्रस्तोयधरैरिव॥१७॥

अर्थ– तसाच इकडे देवांच्या सर्व वाद्यांचे शब्द सहित देवांचा सिंहनाद मोठा असूनही, जसा मेघानीं चंद्र आच्छादित होतो, तसा तो देवसैन्यांतील शब्द दैत्यांच्या नादानीं झांकून गेला.

चंद्रोदयात्समुध्दूतःपौर्णमासइवार्णवः॥ त्रिपुरंप्रभवत्तद्रूपंभीमरूपंमहासुरैः॥१८॥

अर्थ– पौर्णिमेस चंद्रोदयानें समुद्र जसा उत्तमप्रकारें वृध्दिंगत होतो तसें मोठ्या असुरानीं तें त्रिपुर महा भयंकर दिसूं लागलें.

प्राकारेषुपुरेतत्रगोपुरेष्वपिचापरे॥ अट्टालकान्समारुह्यकेचिच्चलितवादिनः॥ १९॥ स्वर्णमालाधराःशूराःप्रभासितकरांबराः॥ केचिन्नदंतिदनुजास्तोयमत्ताइवांबुदाः॥ २०॥

अर्थ— ते समयीं त्या त्रिपुरांतील दानव तटावर बसले, कोणी गच्चांवर चढून त्या गच्च्या हालतात असें बोलूं लागले, कोणी शूर गळ्यांत सुवर्णाच्या माळा घालून हातांत शस्त्र वस्त्रें धारण करून शोभत आहेत, व कोणी दानव जसे बहुत उदकानें पूर्ण झालेले मेघ शब्द करितात तसे ते गर्जना करूं लागले.

इतश्चेतश्चधावंतःकेचिदुध्दूतवाससः॥ किमेतदितिपप्रच्छुरन्योन्यंगृहमाश्रिताः॥ २१॥

अर्थ— आणि कोणी वायूनें अंगावरील वस्त्रें उडत असतां इकडून तिकडे धांवत परस्परांचे घरांत जाऊन हें काय अरिष्ट आलें असें एकमेकांस विचारूं लागले

किमेतन्नैवजानामिज्ञानमंतर्हितंहिमे॥ ज्ञास्यसेनंतरेणोतिकालोविस्तारतोमहान्॥ २२॥

अर्थ— हें काय प्राप्त झालें हें मी जाणत नाहीं. कारण या कालीं माझें ज्ञान आच्छादित झालें आहे, असें कोणी बोलला असतां त्यास दुसरा म्हणतो कीं, जो अखंड दंडायमान विस्तीर्ण महान् काल हाच सर्वांस कारण आहे हें तूं कांहीं वेळानें जाणशील.

सोप्यसौपृथ्वीसारंसिंहश्चरथमास्थितः॥ तिष्ठतेत्रिपुरंपीड्यदेहंव्याधिरिवोच्छ्रितः॥ २३॥

अर्थ— आणि या पृथ्वीच्या दृढ रथांत कोण सिंहासारखा शूर, जसा वाढलेला रोग देहास पीडा देऊन राहातो तसा हा आमच्या तिन्हीं पुरांस पीडा देत राहिला आहे.

यएषोस्तिसएषोस्तु कार्चिंतासंभ्रमेसति॥ एहिमायुधमादायक्रमेपृच्छाभविष्यति॥ २४॥

अर्थ— तस्मात् हा कोण असेल तो असो; मनांत खेद नसून हर्षानें त्वरा

केस्यावर चिंता काय आहे? माझें आयुध घेऊन लौकर ये; आतां मला विचारावयाचें काय आहे? विचार करण्याचें कांहीं राहिलें नाहीं.

इतिलेन्योन्यमाविध्दाउत्तरोत्तरभाषिणः॥आसाद्यप्र
च्छंतितदादानवास्त्रिपुरालयाः॥२५॥

अर्थ— असे ते संकटानें व्याप्त झालेले, परस्परांचे भाषणावर भाषणें करणारे तिन्ही पुरांतील रहिवासी दानव त्या कालीं एकमेकांस घेऊन मसलतीविषयीं प्रश्न करूं लागले.

तारकाक्षपुरेदैत्यास्तारकाक्षपुरस्सराः॥निर्गताःकु
पितास्तूर्णंबिलादिवमहोरगाः॥२६॥

अर्थ— नंतर तारकाक्षासुराचे पुरांतील तारकाक्ष प्रमुख दैत्य क्रोधानें युध्दार्थ निघाले; यास दृष्टांत, मोठे सर्प जसे बिळांतून बाहेर निघतात तसे:—

निर्ध्दावंतस्ततेदैत्याःप्रमथाधिपयूथपैः॥निरुध्दाग
जराजानोयथाकेसरियूथपैः॥२७॥

अर्थ— सिंह समुदायांचें रक्षण करणाऱ्या मोठ्या सिंहांनीं जसे मोठे हत्ती कोंडले जातात तसे त्या शिवाच्या पार्षदगणांतील प्रमुखांच्या समूहाचें रक्षण करणारांनीं त्या धांवणाऱ्या दैत्यांस कोंडिलें.

दर्पितानांततस्तेषांदर्पितानामिवाग्निनाम्॥रूपाणिज
ज्वलुस्तेषामग्नीनामिवधम्यतां॥२८॥

अर्थ— नंतर प्रदीप्त अग्नीसारखे गर्वयुक्त त्या देव दानवांचीं रूपें फुंकून पेटलेल्या अग्नीसारखीं जाज्वल्यमान दिसूं लागलीं.

ततोबृहंतिचापानिभीमनादानिसर्वशः॥नि कृष्य
जघ्नुरन्योन्यमिषुभिःप्राणभोजनैः॥२९॥

अर्थ— नंतर ते देव, दैत्य, भयंकर नादयुक्त, मोठमोठीं सर्व प्रकारचीं अपापलीं धनुष्यें ओढून प्राण हरण करणाऱ्या बाणांनीं परस्परांस प्रहार करूं लागले.

मार्जारमृगभीमास्यान्पार्षदान्विकृताननान्॥दृष्ट्वा
दृष्ट्वाहसन्नुच्चैर्दानवारूपसंपदा॥३०॥

अर्थ– त्या काली मांजरें व हरिण यांसारखे विक्राळ मुखाचे शिवाचे पार्षदगण पाहून ते दानव आपल्या रूप संपत्तीच्या गर्वानें त्या शिवगणां स हांसले.

बाहुभिः परियाकारैः कृष्यतांधनुषांशराः॥ भरवर्मे
षुविविशुस्तडागानीवपक्षिणः॥३१॥

अर्थ– नंतर परिघनामक आयुधासारिख्या भुजांनीं धनुष्यें आकर्षण करणाऱ्या त्या, देव,दैत्यांचे बाण परस्पर योध्यांचीं कवचें फोडून त्यांच्या आंगांत शिरले, यास दृष्टांत पक्षी जसे तळ्यांत शिरतात तसे.

मृताःस्थकनुयास्येथहनिष्यामोनिवर्तता॥ इत्येवंप
रुषाण्युक्त्वादानवाः पार्षदर्षभान्॥३२॥ बिभिदुस्सा
यकैस्तीक्ष्णैस्सूर्यपादाइवांबुदान्॥३२॥

अर्थ– नंतर दानव, शिवगणांतील प्रमुखांस बोलले कीं, आतां तुह्मी मेले न, कोठें जातां, आह्मी मारूं मागें फिरा, अशीं कठोर भाषणें बोलून त्या दानवांनीं शिवगणांस तीक्ष्ण बाणांनीं प्रहार केले. जसे सूर्य किरण मेघांस भेदून जातात तसे.

प्रमथाअपिसिंहाक्षाःसिंहविक्रांतविक्रमाः॥ खंडशै
लशिलावृक्षैर्बिभिदुर्दैत्यदानवान्॥३३॥

अर्थ– तसेच सिंहासारख्या नेत्रांचे व पराक्रमानें सिंहास जिंकणारे शिवाचे पार्षदगण पर्वतापासून पडलेल्या मोठ्या शिला व वृक्ष यांनीं बहुत दैत्यदानवांचा नाश करूं लागले.

अंबुदैराकुलमिवहंसाकुलमिवांबरं॥ दानवाकु
लमत्यर्थंतत्पुरंसकलंबभौ॥३४॥

अर्थ– मेघ व हंस यांनीं व्याप्त आकाश जसें शोभतें, तसें त्या कालीं दानवांनीं पूर्ण असें समग्र तें त्रिपुर अतिशयें शोभलें.

विकृष्टचापादैत्येंद्राःसृजंतिशरदुर्दिनं॥ इंद्रचापांकि
तोरस्काजलदाइवदुर्दिनं॥३५॥

अर्थ– आणि ते प्रमुख दैत्य धनुष्यांनें आकर्षण करून बाणांची उग्र वृष्टि करूं लागले. यास दृष्टांत, पर्जन्यकाळीं इंद्राच्या धनुष्यानें

चिन्हित मेघ, सूर्य दर्शन न होऊं देतां सारखी उदकाची वृष्टि करितात. तसे.

इषुभिस्ताड्यमानास्ते भूयोभूयो गणेश्वराः ॥ चक्रुस्ते देहनिर्यासं स्वर्णधातुमिवाचलाः ॥ ३६ ॥

अर्थ— तेव्हां ते शिवगण दानवांच्या बाणांनीं वारंवार ताडित झाले असतां जसे पर्वतांतून सुवर्णादि धातु निघतात तसे त्यांच्या देहांतून रक्ताचे प्रवाह चालले.

तथा वृक्षशिलावज्रशूलपट्टिपरश्वधैः ॥ चूर्ण्यंते भिहता दैत्याः काचाष्टंकहता इव ॥ ३७ ॥

अर्थ— तसेच देवांनीं मारलेल्या वृक्ष, पाषाण, वज्रें, त्रिशूळ, पट्टिशनामक आयुधें व कुऱ्हाडी इत्यादिक शस्त्रांनीं ताडित झालेल्या कित्येक दैत्यांचें चूर्ण झालें. यास दृष्टांत, दगड फोडण्याचे टांकीनें कांचा जशा फुटतात तसे.

चंद्रोदयात्समुध्दूतः पौर्णमास इवार्णवः ॥ त्रिपुरं प्रभवत्तद्भीमरूपैर्महासुरैः ॥ ३८ ॥

अर्थ— पूर्णिमेस चंद्रोदयानें पूर्ण भरती आलेला समुद्र जसा शोभतो तसे भयंकर रूपी त्या मोठ्या असुरांनीं तें त्रिपुर पूर्ण दिसूं लागलें.

तारकाख्यो जयत्येष इति दैत्या अघोषयन् ॥ जयतींद्रश्च रुद्रश्च इत्येवच गणेश्वराः ॥ ३९ ॥

अर्थ— त्या काळीं तारकासुर देवांस जिंकितो, असा त्रिपुरांतील दैत्य घोष करूं लागले. तसेच इकडे रुद्रगणांचे नायकही इंद्र व शंकर हेच दानवांस जिंकतात, अशी गर्जना करीत होते.

वारिता दारिता बाणैर्योधास्तस्मिन्बलोभये ॥ निःस्वनंतोंबुसमये जलगर्भा इवांबुदाः ॥ ४० ॥

अर्थ— पर्जन्यकाळीं उदकानें पूर्ण भरलेले मेघ जशी गर्जना करतात तसे त्या देव व दैत्य या उभय सैन्यांतील योध्दे बाणांनीं ताडित होऊन मागें सरत तरी ते सिंहनाद करीत होते.

करैश्छिन्नैः शिरोभिश्च ध्वजैश्छत्रैश्च पांडुरैः ॥ युध्दभू

मिर्भयवतीमांसशोणितपूरिता॥ ४१॥

अर्थ– ते समयीं तुटलेले हात, पाय, मस्तकें, शस्त्रध्वज, व छत्रें, मांस व रक्त यानीं पूर्ण झालेली ती युध्दभूमि महा भयंकर दिसूं लागली.

व्योम्निचोत्प्लुत्यसहसा तालमात्रंवरायुधैः॥ हताह ताःपतन्पूर्वदानवाः प्रमथास्तथा॥ ४२॥

अर्थ– त्या रणभूमींतील शिवगण व दानव हे अकस्मात आकाशां त ताडवृक्षाइतकें उंच उड्डाण करून परस्पर श्रेष्ठ आयुधानीं पूर्ण ता डित झाले असतां पूर्वी दानव पडले, तसेच मग शिवगणही पडले.

सिध्दाश्चाप्सरसश्चैवचारणाश्चनभोगताः॥ हतमहा रत्हषितास्साधुसाध्वितिचुक्रुशुः॥ ४३॥

अर्थ– तेव्हां युध्दाचा चमत्कार पाहाण्यासाठीं विमानांत बसून आ काशमार्गें आलेले सिध्द, चारण व अप्सरांचे समुदाय हे त्या वीरांचे प रस्परांस केलेले हतप्रहार पाहून हर्षानें, फार चांगलें, फार चांगलें असें बोलूं लागले.

अनाहतास्चवियतिदेवदुंदुभयस्तथा॥ नदंतोमेघशब्दे नसरमाइवरोषिताः॥ ४४॥

अर्थ– तशाच आकाशांत देवांच्या दुंदुभी ताडन केल्यावांचून मेघां च्या शब्दाप्रमाणें वाजूं लागल्या. यास दृष्टांत असा कीं, कुत्र्या रोषा नें जशा ओरडतात तसे.

तेतस्मिंस्त्रिपुरेदैत्यानद्यः सिंधुपताविव॥ विशंतिक्रुध्द वदनावल्मीकमिवपन्नगाः॥ ४५॥

अर्थ– नद्या जशा समुद्रांत प्रवेश करितात, सर्प जसे वारुळांत जाता त तसे ते दैत्य देवांपासून पराभव पावले असतां क्रोधयुक्त मुखें करू न त्या तिन्हीं पुरांत गेले.

तारकाक्षपुरेतस्मिन्सुराः शूराः समंततः॥ सशस्त्रा निपतंतिस्मसपक्षाइवभूधराः॥ ४६॥

अर्थ– तेव्हां ते शूर देव शस्त्रांसहित चोंहींकडून तारकासुराच्या पुराव र जाऊन पडूं लागले. ते असे कीं, पंखयुक्त पर्वत जसे गांवावर जाऊन

पडतात तसे.

योधयंतित्रिभागेनत्रिपुरेतुगणेश्वराः॥ विद्युन्माली मयश्चैवभग्नौचद्रुमवद्रणे॥४७॥

अर्थ—नंतर शिवगणांतील प्रमुख वीर त्या त्रिपुरांत जाऊन तिहींकडून युध्द करूं लागले. तेव्हां विद्युन्माली व मयासुर यांची जसे वृक्ष कुऱ्हाडीच्या प्रहारानें छिन्नभिन्न होतात, तशी त्यांच्या प्रहारानीं अवस्था झाली.

विद्युन्मालीसदैत्येंद्रोगिरींद्रसदृशद्युतिः॥ आदायपरिघंघोरंताडयामास नंदिनं॥४८॥

अर्थ—तथापि मेरुपर्वतासमान तेजस्वी दैत्यांचा राजा विद्युन्मालीयानें भयंकर परिघ घेऊन तो नंदीस मारिला.

सनंदीदानवेंद्रेणपरिघेणदृढाहतः॥ भ्रमतेमधुनाव्यक्तः पुरानारायणोयथा॥४९॥

अर्थ—असा त्या दानवराजविद्युन्मालीनेंनंदीस परिघाचा बळकट प्रहार केला असतां तेणेंकरून तो मूर्छित झाला याविषयीं एकदेशी दृष्टांत पूर्वी मधुदैत्यानें अचिंत्यमाहात्म्य नारायणास प्रहार केला तसें.

नंदीश्वरेगतेतत्रगणपाख्यातविक्रमाः॥दुद्रुवुर्जातसंरंभा विद्युन्मालिनमासुरं॥ घंटाकर्णःशंकुकर्णोमहाकालश्च पार्षदाः॥५१॥

अर्थ—तेव्हां नंदिकेश्वर गेला असतां तेथील प्रसिध्द पराक्रमी शिवगणांचें संरक्षण करणारे घंटाकर्ण, शंकुकर्ण व महाकाल हे पार्षद मोठ्या क्रोधानें विद्युन्मालिनामक असुरांचे अंगावर धांवले.

ततश्चसायकैस्सर्वान्गणपान्गणपाकृतीन्॥ भूयोभूयः सविव्याधगणेश्वरमहत्तमान्॥५२॥

अर्थ—या नंतर त्या विद्युन्मालि दैत्यानें गणांच्या नायकपणाचें चिन्हानें युक्त त्या गणांचे संरक्षण करणारे असून त्यांतील प्रमुखांपेक्षां मुख्य अशा त्या घंटाकर्णादिक सर्व पार्षदांस वारंवार बाणांनीं प्रहार केले.

भित्वाभित्वारुरावोच्चैर्नभस्यंबुधरोयथा॥ तस्यारंभि
तशब्देननंदीदिनकरप्रभः॥ संज्ञांलभ्यततस्तोपि
विद्युन्मालिनमाद्रवत्॥ ५३॥

अर्थ- असे त्यांस पुनःपुनः बाणांचे प्रहार करून आकाशांत मेघ जशी गर्जना करितो तसा तो विद्युन्माली दैत्य उच्चस्वरानें सिंहनाद करूं लागला. तेव्हां त्यानें आरंभलेल्या शब्दानें सूर्यसमान तेजस्वी नंदी जागृत होऊन तोही त्या विद्युन्मालीच्या अंगावर धांवला.

रुद्रदत्तंतदादीप्तंदीप्तानलसमप्रभं॥ वज्रंवज्रनिभां-
गस्यदानवस्यससर्जह॥ ५४॥

अर्थ- आणि त्या कालीं नंदीनें प्रज्वलित अग्नीसारखें कांतियुक्त शिवानीं दिलेलें जाज्वल्यमान असें वज्र वज्रासमान कठिण अंगाच्या त्या विद्युन्मालि दानवावर सोडिलें.

तन्नंदिभुजनिर्मुक्तंमुक्ताफलविभूषितं॥ पपातवक्ष-
सितदावज्रंदैत्यस्यभीषणं॥ ५५॥

अर्थ- ते समयीं मुक्ताफलानीं विशेषें करून शोभायुक्त तें भयंकर वज्र नंदिकेश्वराचे हातांतून स्फुरतांच त्या विद्युन्माली दैत्याच्या वक्षस्थलावर पडलें.

सवज्रनिहतोदैत्योवज्रसंहननोपमः॥ पपातवज्राभि
हतः शक्रेणाद्रिरिवाहतः॥ ५६॥

अर्थ- तेव्हां तो वज्रासमान दृढशरीरी विद्युन्माली दैत्य त्या वज्रानें ताडित झाला असतां तत्काळ मरण पावला, तो असा कीं, इंद्राच्या वज्रानें ताडित होऊन पर्वत जसा पडतो तसा.

दैत्येश्वरंविनिहतंनंदिनाकुलनंदिना॥ चुक्रुशुर्दानवाः
प्रेक्ष्यदुद्रुवुश्चगणाधिपाः॥ ५७॥

अर्थ- याप्रमाणें स्वकुलास समृध्दि करणाऱ्या नंदीनें दैत्यराज विद्युन्मालीस मारिलें असें पाहून ते सैन्याचे नायक दानव आक्रोश करून पळाले.

दुःखामर्षित रोषास्तेविद्युन्मालिनिपातिते॥ द्रुमशैल

महावृष्टिंपयोदास्ससृजुर्यथा ॥५८॥

अर्थः— असा तो विद्युन्माली दैत्य संग्रामांत पडला असतां ते दानव दुःखानें सहन करण्यास अशक्य अशा रोषानें व्याप्त होत्साते जसे मेघ पर्जन्य वृष्टी करितात तसे देवांवर वृक्ष व पर्वत यांची मोठी वृष्टी करूं लागले.

तेपीड्यमानागुरुभिर्गिरिभिस्त्वगणेश्वराः ॥ कर्तव्यंन विदुःकिंचिद्धर्ममाधार्मिकाइव ॥५९॥

अर्थः— तेव्हां त्या मोठ्या पर्वत व वृक्ष यानीं ते शिवगणांचे नायक पीडित झाले असतां त्यांस कांहीं एक कर्तव्य कार्य सुचेनासें झालें. यास दृष्टांत असा कीं अधर्मशील लोकांस योग्य कर्म जसें समजत नाहीं तसें.

ततोसुरवरः श्रीमांस्तारकाक्षः प्रतापवान् ॥ सतरूणांगिरीणांवैतुल्यरूपधरोबभौ ॥६०॥

अर्थः— नंतर असुरश्रेष्ठ प्रतापी व तेजस्वी असा तो तारकाक्षासुर, रूपानें वृक्षांसहित पर्वता सारखा शोभूं लागला.

भिन्नोत्तमांगागणपाभिन्नपादांकिताननाः॥ विरेजुर्भुजगामंत्रैर्वध्यमाणायथातथा॥ ६१॥

अर्थः— त्या कालीं मंत्रानें कुंठित केलेले सर्प जसे स्तब्ध राहातात तसे फुटलेलीं मस्तकें, पाय व मुखें यानीं युक्त ते शिवाचे गणांतील प्रमुख युद्धांत स्वस्थ राहिले.

मयेनमायावीर्येणवध्यमानागणेश्वराः ॥ भ्रमंतिबहुशब्दालाः पंजरेशकुनाइव ॥६२॥

अर्थः— आणि महामायावी मयासुरानें शिवगणांचे नायकांस ताडन केलें असतां ते आक्रोशयुक्त बहुत शब्द करीत रणभूमींत इतस्ततः भ्रमण करूं लागले. जसे पिंजऱ्यांतील पक्षी शब्द करीत फिरतात तसे.

तथासुरवरःश्रीमांस्तारकाक्षः प्रतापवान् ॥ ददाहचबलंसर्वंशुष्केंधनमिवानलः॥६३॥

अर्थः— तसाच असुर श्रेष्ठ, तेजस्वी व प्रतापी तारकाक्षासुर स्वपराक्रमानें जसा अग्नि शुष्क काष्ठें जाळितो तसा तो सर्व देवसैन्यास जा-

ऊं लागला.

तारकाक्षेणवार्यंतेशरवर्षैस्तदागणाः॥ मयेनमाया
निहतास्तारकाख्येणचेषुभिः॥ गणेशाविधुराजाता
जीर्णमूलायथाद्रुमाः॥ ६५॥

अर्थ:- आणि त्या काळीं मयासुराच्या मायेनें कुंठित झालेले देवगण नक्षत्रां समान नेत्रांनीं युक्त तारकासुराच्या बाणवृष्टीनीं मागें हटले. मग तारकासुराचे बाणांनीं देवसैन्यांतील वीर मूळें जीर्ण झाल्यानें वृक्ष जसे हीन बळ होतात तसे ते शक्तीनें क्षीण झाले.

भूयः संपततेचाग्निर्ग्रहान्ग्राहान्भुजंगमान्॥ गि
रींद्रांश्चहरीन्व्याघ्रान्वृक्षान्सृमरवर्णकान्॥ ६६॥
शरभानष्टपादांश्चआपः पवनमेवच॥ मयोमायाबले
नैषपातयत्येवशात्रुषु॥ ६७॥

अर्थ:- तसेंच पुनः असुरी मायेनें देवसैन्यावर अग्नि पडूं लागला, आणि मयासुर आपले शत्रु देव यांचे सैन्यावर पूतनादिक महाभयंकर ग्रह, नक्र, भुजंग, मोठे पर्वत, सिंह, व्याघ्र, मोठ मोठे वृक्ष, सृमर नामक मृगासारिखे पशु, आठ पायांचे शरभ, उदक व वायु यांची माया बळानें वृष्टी चालविली.

तेतारकाक्षेणमयेनमायया संमुह्यमानाविवशागणे
श्वराः॥ नशक्नुवंस्तेमनसापिचेष्टितुंयथेंद्रियार्थामुनि-
नाभिसंयताः॥ ६८॥

अर्थ:- याप्रमाणें तारकासुर व मयासुर यानीं मायेनें शिवगणांच्या नायकांस अत्यंत मोहित करून अगदी पराधीन केले असतां ते मनानेंही चेष्टा करण्यास समर्थ झाले नाहींत. यास दृष्टांत, ऋषीनें मनःपूर्वक टाकलेले विषय त्यास जिंकण्यास जसें समर्थ होत नाहींत तसे.

महाजलाग्न्यादिसकुंजरोरगैर्हरींद्रव्याघ्रर्क्षतरक्षुरा
क्षसैः॥ विबाध्यमानास्तमसाविमोहितास्समुद्रमध्ये
ष्विवगाधकांक्षिणः॥ ६९॥

अर्थ:- याप्रमाणें त्या दानवानीं मायेनें उत्पन्न केलेल्या मोठें प्रळया-

समान उदक, अग्नि, वायू, हत्ती, सर्प, मोठे सिंह, व्याघ्र, आस्वल, तरस व राक्षस यांचे योगानें पीडित झाले आणि त्यांत मायेच्या अंधकारानें तर अधिकच मोह पावले असतां, (समुद्राचे मध्यभागीं बुडत असतां, खाली तळास पाय लागण्याची इच्छा जशी करावी) तशी ते शिवगण त्या संकटांतून मुक्त होण्याची इच्छा करूं लागले.

समर्द्यमानेषुगणेश्वरेषुसंनर्दमानेषुसुरेतरेषु॥ततस्सुराणांप्रवराभिरक्षितुंरिपोर्बलंसंविविशुस्सहायुधाः ७०

अर्थ:- असें शिवगणांस पीडित करून ते दानव गर्जना करीत असतां, नंतर देवांतील प्रमुख वीर शिवगणांचें संरक्षण करण्या साठीं आयुधां सहित शत्रूंच्या सैन्यांत गेले.

यमोगदारुग्भोवरुणश्चभास्करस्तथाकुमारोमरकोटिसंयुतः॥स्वयंचशक्रः सितनागवाहनःकुलीशपाणिःसुरलोकपुंगवः॥७१॥सचोडुनाथस्ससुतोदिवाकरःससांतकस्त्र्यक्षपतिर्महाद्युतिः॥एतेरिपूणांप्रबलाभिरक्षितंतदाबलंसंविविशुर्मदोद्धताः॥७२॥

अर्थ:- ते असे कीं, गदा व रोग या अस्त्रांसहित यम, तेजस्वी वरुण, तसाच कोट्यावधी देवांसहित कार्तिकस्वामी, शुभ्र ऐरावत गजवाहना सहित, देवलोक श्रेष्ठ, वज्रायुध फक्त हस्तानें शोभणारा स्वतः इंद्र, नक्षत्रांचा स्वामी चंद्र, शनिसहवर्तमान सूर्य, मृत्युसहित महातेजस्वी त्रिनयन शिव हे वीरांचा मदानें युक्त होत्साते त्या शत्रूंच्या प्रबल वीरानीं रक्षिलेल्या सैन्यांत प्रवेश करिते झाले.

यथावनंदर्पितकुंजराधिपायथानभस्सांबुधरंदिवाकरः॥यथात्वसिंहैर्विजनेषुगोकुलंतथाबलंतत्रिदशैरभिद्रुतं॥७३॥

अर्थ:- जसे मदोन्मत्त हत्तींच्या कळपांचे राजे वनांतील वृक्षादिकांचा विध्वंस करितात; सूर्य जसा मेघयुक्त आकाशांतील अंधकारादिकांचा नाश करितो; व सिंह जसे अरण्यांत गायींच्या कळपास पळवितात. तसे त्या देवानीं दानवांचें सैन्य पळविलें.

कृतप्रहारातुरदीनदानवंततस्त्वभज्यंतबलंहिपार्ष-
दाः॥ स्त्वज्योतिषांज्योतिरिवोष्णवान्हरिर्यथातमोघो
रतरंनराणां ॥ विशांतयामासयथासदैवनिशाकरःसं-
चितशार्वरंतमः ॥ ७४॥

अर्थ- नंतर आकाशांतील नक्षत्रांस प्रकाशक उष्ण किरण युक्त सूर्य जसा लोकांच्या अतिभयंकर अंधकाराचा नाश करितो; तसाच चंद्र जसा रात्रीं जमलेल्या अंधकाराचा निरंतर नाश करितो; तसें देवांनीं केलेल्या प्रहारानीं मरणोन्मुखपणानें दीन झालेल्या दानवांचे सैन्यास शिवाचे पार्षदगण मारूं लागले.

ततोपकृष्टेचतमःप्रभावेअस्त्रप्रभावेचविवर्द्धमाने॥
दिग्लोकपालैर्गणनायकैश्चकृतोमहान्सिंहरवोमुहू
र्तम्॥ ७५॥

अर्थ- नंतर त्या दानवांच्या मायेचा अंधकार दूर झाल्यावर देवांच्या अस्त्रांचा प्रभाव अधिकच वाढला असतां, दिशांचे शिवादिक लोकपालांसहित शिवगणांच्या नायकानीं एक मुहूर्त (दोन घटिका पर्यंत) मोठा सिंहनाद केला.

संख्येविभग्नाविकराविपादाश्छिन्नोत्तमांगाः शरपूरि
तांगाः॥ देवेतरादेववरैर्विभिन्नास्सीदंतिपंकेषुयथागग-
जेंद्राः॥ ७६॥

अर्थ- आणि देवश्रेष्ठ शिवादिकानीं त्या युद्धांत हात, पाय व मस्तकें तुटलेले असून बाणानीं पूर्ण झालेल्या अंगानीं युक्त असे केलेले असुर (जसे चिखलांत सांपडलेले महागज दुःख पावतात) तसे दुःखित झाले.

वज्रेणभीमेनचवज्रपाणिश्शक्त्याचशक्त्याचमयूर
केतुः॥ दंडेनचोग्रेणचधर्मराजः पाशेनचोग्रेणचवारि
गोप्ता ॥ ७७॥ शूलेनकालेनचयक्षराजोवीर्येणतेजस्वि
तयासुकेशः॥ गणेश्वरास्तेस्करसन्निकाशाः पूर्णाकृतौ
सिक्तशिखिप्रकाशाः॥ उत्सादयंतेदनुपुत्रवृंदान्यथे

वइंद्राशानयः पतंत्यः ॥७९॥

अर्थः- तसेंच भयंकर वज्रसहित इंद्र, बलिष्ठ शक्तिनामक आयुध युक्त कार्तिकस्वामी, उग्रदंड धारण करणारा यमधर्म, भयंकर पाशयुक्त वरुण, पराक्रम, तेज व सुंदर केश यांनीं शोभायुक्त, शूलायुध व मृत्यु यांसहित यक्षराज कुबेर या देवां सहवर्तमान देवां सारिखे व पूर्णाहुतीनें प्रज्वलित प्रकाशमान अग्नी समान शिवगणांतील मुख्यानीं दानवसमुदायांचा (पडणाऱ्या इंद्राच्या वज्रा प्रमाणें) नाश चालविला.

मयस्कदेवान्परिरक्षितारसुमात्मजंदेववरंकुमारं॥
शरेणभित्वासहितारकाक्षंतंसतारकाक्षासुरमाबभा
षे॥८०॥

अर्थः- तेसमयीं मयासुर, देवांचें संरक्षण करणारा, पार्वती नंदन कार्तिकस्वामीस बाणानें प्रहार करून तारकापुत्रास तारकासुरास बोलतो.

कृत्वाप्रहारंप्रविशामिवीरंपुरंहिदैत्येंद्रबलेनयुक्तः॥
विश्रामभूर्जस्करमध्यवाप्यपुनः करिष्यामिरणंप्रपन्नैः
॥८१॥

अर्थः- तें असें कीं, हे दैत्यश्रेष्ठा तारकासुरा या देवसेनापतिवीरास प्रहार करून आतां मी सैन्यासहवर्तमान त्रिपुरांत जातों. कारण मी बहुत श्रमलों आहें; यास्तव शक्ति देणारी विश्रांती घेऊन पुनः ह्या आलेल्या देववीरांशीं युद्ध करीन.

वयंहिशस्त्रक्षतविक्षितांगाविशीर्णशस्त्रध्वजवर्म-
वाहाः॥जयैषिणस्तेजयकाशिनश्चगणेश्वरालोकव-
राधिपाश्च॥८२॥

अर्थः- असें कां ह्मणशील तर आमचीं अंगें शस्त्रांच्या क्षतानीं विशेषेकरून क्षीण झालीं आहेत; तशींच आपलीं शस्त्रें, ध्वज, कवचें व वाहनें हीं मोडिलीं आहेत; आणि जयाची इच्छा करणारे शिवगणांचे नंदिकेश्वरप्रभृति नायक व लोकश्रेष्ठांचे अधिपती ब्रह्मादिक-लोकपाल जयश्रीनें शोभित आहेत तस्मात् भस्कृत यांशीं युद्धप्रसं-

ग उपयोगी नाहीं.

मयस्यश्रुत्वादिवितारकाक्षोवचोभिकांक्षन्सततजोप
माक्षः॥ विवेशतूर्णंत्रिपुरंदितेस्सुतैःसुतैरदित्यासु-
धिरूढहर्षैः॥८३॥ ततस्सशंखानकभेरिभीमंससिंह
नादंहरसैन्यमावभौ॥ मयानुगंघोरगभीरगव्हरंयथा-
हिमाद्रेर्गजसिंहनादितं॥८४॥ ॥ इतिश्रीमत्स्य
पुराणेत्रिपुरदाहे १३४ अध्यायः॥ ॥

अर्थ- असें मयासुराचें भाषण ऐकून अंतरिक्षीं उभा राहिलेला, र-
क्तासारिख्या आरक्तवर्ण नेत्रानीं युक्त तो तारकासुर विश्रांतीच्या इ-
च्छेनें दितिपुत्र दैत्यांसहवर्तमान त्वरेनें त्रिपुरांत गेला. तेसमयीं यु-
द्धांत वृद्धिंगत, हर्षयुक्त, अदितिनंदन, इंद्रादि देवांसहित तें शिवाचें
सैन्य अनेक शंख, मृदंग, नौबदी व सिंहनाद यानीं भयंकर असें शो-
भलें; आणि तें मयासुराचें सैन्यही (गज व सिंह यांच्या नादानें
युक्त हिमालयपर्वताच्या भयंकर व खोल अशा गुहेसमान मोठें -
शोभलें. इतिश्रीमत्स्यपुराणे त्रिपुरदाहे चतुस्त्रिंशत्युत्तरशततमोऽ
ध्यायः॥ १३४॥

अध्याय १३५ वा.

सूतउवाच॥ मयः प्रहारंकृत्वातुमायावीदानवर्षभः॥
विवेशतूर्णंत्रिपुरमभ्रंनीलमिवांबरं॥१॥

अर्थ- सूत बोलला ऋषीहो दानवश्रेष्ठ, मायावी मयासुर आपले संके
ता प्रमाणें कार्तिकस्वामीस प्रहार करून (जसा कृष्णवर्ण मेघ आका-
शांत प्रवेश करितो) तसा तो त्वरेनें त्रिपुरांत गेला.

सदीर्घमुष्णांनिश्वस्यदानवान्वीक्ष्यमध्यगान्॥ द-
ध्यौलोकक्षयेप्राप्तेकालंकालइवापरः॥२॥

अर्थ- आणि तो मयासुर मोठ्यानें उष्णश्वास टाकून हे दानव मध्यम
आहेत असें जाणून स्वजनांचा नाश प्राप्त झाला असें जाणून स्वतः दु-
सरा काळच कीं, काय असा भयंकर असून त्या नाशकाळाच्या निवा-
रणा विषयीं चिंतन करूं लागला.

इंद्रोपिविष्णुतेयस्यस्थितोयुद्धेष्फुरग्रतः॥ सचापिनि-

धनंप्राप्तोविद्युन्मालीमहायशाः॥३॥

अर्थः- तें असें कीं, इंद्रही ज्याचे अग्रभागीं युद्धाच्या इच्छेनें उभें राहण्यास भितो; तोही महायशस्वी विद्युन्माली रणांगणीं मरण पावला; तस्मात् हें आश्चर्य आहे.

दुर्गंवैत्रिपुरस्यास्यनसमंविद्यतेपुरं॥तस्याप्येषोनयः प्राप्तोनदुर्गंकारणंक्वचित्॥४॥

अर्थः- दुःखानेंही प्रवेश होण्यास अशक्य असें या त्रिपुरा सारिखें पुर दुसरें कोठेंही नाहीं असें असून यावरही हा अनर्थ प्राप्त झाला आहे; तस्मात् संकट निवारणा विषयीं किल्ला कारण नाहीं.

कालस्यैववशेसर्वंदुर्गंदुर्गतरंचयत्॥कालेक्रुद्धेकथंकालात्त्राणंनोद्यभविष्यति॥५॥

अर्थः- तेव्हां जें लहान मोठे किल्ले आदिकरून सर्वही साधन,कालाच्याच स्वाधीन आहे; तो काळ क्रुद्ध झाला असतां, त्या पासून आज आपलें संरक्षण कसें होईल.

लोकेषुत्रिषुयत्किंचिद्बलंवैसर्वजंतुषु॥कालस्यतद्वशंसर्वमितिपैतामहोविधिः॥६॥

अर्थः- त्रैलोक्यांतील सर्व प्राणिमात्रांत जें कांहीं बल आहे, तें सर्वही कालाचे स्वाधीन आहे असा ब्रह्मदेवाचा निश्चय आहे.

अस्मिन्कःप्रभवोद्योगोह्यसंधार्येमितात्मनि॥लंघनेकःसमर्थःस्याद्दतेदेवंमहेश्वरं॥७॥

अर्थः- ज्याचा वेग सहन होणें अशक्य व अपरिमित अशा या त्रिपुरा विषयीं अभ्युदय होण्याचा उद्योग किमर्थ पाहिजे; तथापि हें त्रिपुर जिंकण्यास महादेवा वांचून कोणी समर्थ नाहीं.

बिभेमिनेंद्रादिद्वयमाद्वरुणान्नचवित्तपात्॥स्वामीन्वेषांतुदेवानांदुर्जयस्समहेश्वरः॥८॥

अर्थः- तेव्हां इंद्र यम वरुण व धनरक्षक कुबेर यांपासून मी भीत नाहीं; परंतु या देवांचा स्वामी महादेव तो जिंकण्यास अशक्य आहे.

ऐश्वर्यस्यफलंयत्तत्प्रभुत्वस्यचयत्फलं॥तदद्यद

शयिष्यामियावद्वीराःसमंततः॥९॥

अर्थ:- हे वीरहो आतां ऐश्वर्य व प्रभुत्व यांचें जें फल तें सर्व आज-मी तुह्मास दाखवितों.

वापीममृततोयेनपूर्णां स्त्र स्त्येवरौषधीः॥जीविष्यंति तदादैत्याःसंजीवनवरौषधैः॥१०॥

अर्थ:- तें असें कीं,मी श्रेष्ठ औषध युक्त अमृतसमान उदकानें पूर्ण भ रलेली विहीर उत्पन्न करितों; म्हणजे त्या औषध युक्त उदकानें मरण पावलेले दैत्य जिवंत होतील.

इतिसंचिंत्यबलवान्मयोमायाविनांवरः॥मायया ससृजेवापींरंभामिवपितामहः॥११॥

अर्थ:- असें चिंतन करून महाबलाढ्य व मायावि श्रेष्ठ मयासु-रानें आपले मायेकरून (जशी ब्रम्हदेवानें रंभा उत्पन्न केली;) तशी उत्कृष्ट विहीर निर्माण केली.

द्वियोजनायतांदीर्घांपूर्णयोजनविस्तृतां॥आरोह संक्रमवतींचित्ररूपांतथैवच॥१२॥इंदोःकिरणकल्पे नमृष्टेनामृतगंधिना॥पूर्णांपरमतोयेनगुणपूर्णामि-वांगनां॥१३॥ उत्पलैःकुमुदैःपद्मैर्वृतांकादंबकैस्त-था॥चंद्रभास्करवर्णाभैर्भीमैरावरणैर्वृतां॥१४॥ खगैर्मधुररावैश्चचारुचामीकरप्रभैः॥कामैषिभिरि वाकीर्णांजीवानामरणीमिव॥१५॥

अर्थ:- ती अशी कीं, दोन योजनें लांब व खोल असून एक योजन रुंद होती; चढण्याच्या पायऱ्यांनीं चमत्कारिक असे; तशीच चंद्रा चे किरणा समान शीतळ व अमृता सारिख्या स्वादानें युक्त उत्तम मधुर उदकानें पूर्ण, गुणवती स्त्री सारिखी सुशोभित दिसे आणि सूर्यविकासी व चंद्रविकासी कमलें, बदकें यानीं शोभायुक्त, तसेंच चंद्र व सूर्य यां सारिख्या कांतीनें शोभणाऱ्या, भयंकर भिंतीनीं यु-क्त, त्याच प्रमाणें सुंदर, सुवर्ण कांतीनें शोभायमान, मधुर शब्द क-रणाऱ्या पक्ष्यानीं नादित, (जीवांस अपेक्षित यज्ञपात्र अरणी सा-

रिखी कामिनी स्त्री जशी विषयि जनानीं वेष्टित असते तशी ती विहीर होती.

तांवापींसृज्यसमयोगंगामिवमहेश्वरः॥तस्यांप्रक्षे-
पयामासविद्युन्मालिनमादितः ॥१६॥

अर्थः- महेश्वरानें जशी गंगा उत्पन्न केली तशी मयासुरानें ती विहीर उ-त्पन्न करून तींत विद्युन्माली आदि करून मरण पावलेले दैत्यांस टां-किलें.

सवाप्यांमज्जितोदैत्योदेवशत्रुमहाबलः॥उत्तस्थावि-
धनैरिन्दुःसद्योहुतइवानलः १७

अर्थः- तेव्हां महा बलिष्ठ देवांचा शत्रु विद्युन्माली दैत्य त्या विहिरींत पड-तांच (जसा अग्नि समिधादिक इंधनानीं पेटतो) तसा तो उठला.

मयस्यचांजलिंकृत्वातारकाक्षोभिवादितः॥ विद्युन्मा-
लीतिवचनंमयमुत्थायचाब्रवीत् ॥१८॥

अर्थः- आणि त्या विद्युन्माली दैत्यानें उठतांच मयासुर व तारकासुर यां-स नमस्कार करून भाषण केलें.

क्वनंदीसहरुद्रेणवृतःप्रमथजंबुकैः॥युद्ध्यामोनंदिनं
पीड्यदयादेहेषुकाहिनः॥१९॥

अर्थः- तें असें कीं, कोल्ह्या सारिख्या प्रमथादि गणानीं युक्त, शिवा सहि-त नंदी कोठें आहे? आह्मांस देहाविषयीं दया नाहीं, तेव्हां आह्मीं नंदी-स पीडा देऊन युद्ध करूं.

अन्वास्यैवचरुद्रस्य भवामःप्रभविष्णवः॥तैर्वाविनि
हतायुद्धेभविष्यामोयमाशनाः॥२०॥

अर्थः- आणि शिवाचा आश्रय करून आह्मीं युद्धांत शत्रू जिंकण्या विषयीं अत्यंत समर्थ होऊं, नाहीं तर त्याचीं युद्धांत आह्मांस मारलें असतां आ-ह्मीं यमाचे अतिथी होऊं.

विद्युन्मालेर्निशम्यैतन्मयोवचनमूर्जितम्॥ तंपरि
ष्वज्यसाद्राक्षइदमाहमहासुरः॥२१॥

अर्थः- असें विद्युन्माली दैत्याचें अति बलिष्ठ वचन ऐकून त्या मोठ्या म-या सुरास प्रेमाश्रु येऊन त्यानें तारकासुरास आलिंगन देऊन भाष-

णास आरंभ केला.

विद्युन्मालिन्नमेराज्यमभिप्रेतन्नजीवितम् ॥त्वया-
विनामहाबाहोकिमन्येनमहासुर ॥२२॥

अर्थः-कीं, हे विद्युन्माली महा दैत्या, तुजवांचून मला राज्य व जीवित या-दोहोंचीही अपेक्षा नाहीं; तेव्हां इतरांची कथा काय आहे?

महामृतमयीवापील्येषामायाभिरीश्वर ॥स्रष्टादा-
नवदैत्यानां हतानांजीववर्द्धिनी २३

अर्थः-या साठीं हे समर्थ दानला मरण पावलेल्या दैत्यांस जीवनाची वृद्धि होण्या करितां म्या आपल्या मायेनें मोठी अमृताची विहीर उत्पन्न केली आ०

दिष्ट्यालांदैत्यपश्यामियमलोकादिहागतम् ॥दुर्ग-
ता वनयग्रस्तंभोक्ष्यामोद्यमहानिधिम् २४

अर्थः-हे दैत्या तूं यमलोकांतून पुनः येथें आलास हें मी भाग्यामुळें पाहतों. आतां या दुर्गतींत त्या अनर्थानें ग्रासलेल्या अमृतरूप महा-निधीचा आज उपभोग करूं.

दृष्ट्वादृष्ट्वाचतांवापींमाययामयनिर्मितां ॥हृष्टान-
नाक्षादैत्येंद्राइदंवचनमब्रुवन् २५

अर्थः-नंतर मयासुरानें आपले मायेनें निर्माण केलेली ती अमृताची वि-हीर वारंवार पाहून ते दैत्यश्रेष्ठ प्रफुल्लित नेत्र व मुख यानीं युक्त होत्साते हें पुढील भाषण बोलतात.

दानवायुध्यतेदानींप्रमथैः सहनिर्भयाः ॥मयेन
निर्मितावापीहतान्संजीवयिष्यति २६

अर्थः-दानवहो मरण पावलेल्यांस जिवंत करण्या साठीं अमृताची विहि र निर्माण केली आहे. तेव्हां आतां तुह्मीं निर्भय होत्साते शिवाच्या पार्षद गणाशीं युद्ध करा.

ततःक्षुब्धांबुधिनिभाभेरीसानुभयंकरी ॥वाद्यमाना
ननादोच्चैरौरवीसापुनःपुनः ॥२७॥

अर्थः-नंतर खवळलेल्या समुद्रा सारिखी भयंकर व पर्वत शिखरासमा न उंच अशी मृगचर्माची नौबद त्या असुरांनीं वाजविली असतां वारंवा-

र उच्च स्वरानें वाजूं लागली.

श्रुत्वाभेरिरवंघोरंमेघारभितसन्निभम् ॥ न्यपतन्न
सुरास्तूर्णंत्रिपुराद्युद्धलालसाः ॥ २८ ॥

अर्थ- ते समयीं मेघानीं आरंभलेल्या शब्दा समान भयंकर तो भेरीचा शब्द ऐकून ते सर्व असुर युद्धा विषयीं तत्पर होत्साते त्या तिन्हीं पुरांतून त्वरेनें बाहेर पडले.

लोहराजतसौवर्णैः कटकैर्मणिराजितैः ॥ आमुक्तैः
कुंडलैर्हारैर्मुकुटैरपिचोत्कटैः ॥ २९ ॥ धूमायितास्त्व-
चिरमाज्वलंतइवपावकाः ॥ आयुधानिसमादाय का-
शिनोदृढविक्रमाः ॥ ३० ॥ नृत्यमानाइवनटागर्जंतइ-
वतोयदाः ॥ करोच्छ्रयाइवगजाः सिंहाइवचनिर्भ-
याः ३१ ह्रदाइवचगंभीराः सूर्याइवप्रतापिताः ॥ द्रु-
माइवचदैत्येंद्रास्त्रासयंतोबलंमहत् ॥ ३२ ॥

अर्थ- ते असे कीं, रंगसभेंत नृत्य करणारे जसे नट, गर्जना करणारे जसे सजल मेघ, सोंड वर केलेले जसे हत्ती, निर्भय जसे सिंह, खोल जसे डोह, प्रलयकालचे जसे सूर्य, मोठ मोठे जसे वृक्ष तसें लोखंड रुपें व सोनें यांचीं रत्नखचित कडीं, कर्ण कुंडलें, हार, उत्कृष्ट मुकुट या भूषणानीं अलंकृत कवचें घातलेले, दृढ पराक्रमी, धुरासमान कृष्ण वर्ण असून सतत जाज्वल्यमान अग्नीसारखे प्रदीप्त असे ते श्रेष्ठ दैत्य हातांत आयुधें घेऊन मोठ्या देव सैन्यास त्रास देऊं लागले.

प्रमथाअपिसोत्साहागरुडोत्पातपातिनः ॥ युयुत्सवो
भिधावंतिदानवान्दानवारयः ॥ ३३ ॥

अर्थ- नंतर गरुडाच्या उड्डाणा समान गमन करणारे, दानवांचे शत्रु शिवाचे पार्षद गणही मनोत्साहयुक्त युद्धाच्या इच्छेनें त्या त्रिपुरांतील दानवांच्या अंगावर धांवले.

नंदीश्वरेणप्रमथास्तारकाक्षेणदानवाः ॥ चक्रुः संह-
त्यसंग्रामंचोद्यमानाबलेनच ॥ ३४ ॥

अर्थ- त्या कालीं नंदिकेश्वरानें आज्ञा दिलेले शिवाचे पार्षद गण व तार-

कासुरानें आज्ञा केलेले ते असुर हे दोघेही परस्पर मोठ्या निकरानें युद्ध करूं लागले.

तेसिभिश्चंद्रसंकाशैः शूलैश्चानलपिंगलैः ॥ बाणैश्च
दृढनिर्मुक्तैरभिजघ्नुः परस्परम् ॥ ३५ ॥

अर्थ:- तें असें कीं, ते देव, दैत्य, धार लावलेल्या चंद्रा सारख्या शुभ्र तरवारा, अग्नीसमान पिंगटवर्ण शूल, धनुष्य आकर्ण पर्यंत ओढून सोडलेले बाण इत्यादिक आयुधानीं एकमेकांस मारूं लागले.

शराणांसृज्यमानानामसीनांचनिपात्यतां ॥ रूपाण्या
सन्महोल्कानांपततीनामिवांबरात् ३६

अर्थ:- ते समयीं उभय सैन्यांतील वीरानीं परस्परांवर सोडलेले बाण टाकलेल्या तरवारी यांचीं रूपें आकाशांतून पडणाऱ्या मोठ्या विजां सारिखीं दिसत होतीं.

शक्तिभिर्भिन्नहृदयानिर्दयाहवपानिताः ॥ निरयेष्वि
वनिर्मग्नाः कूजंतेप्रमथासुराः ३७

अर्थ:- तेव्हां त्या शक्तिआदिकरून आयुधानीं हृदयें फुटून ज्यांत लेशमात्रही दया नाहीं अशा त्या संग्रामांत ते शिवगण व त्रिपुरांतील असुर घायाळ होऊन नरकांत पडलेल्या प्राण्यां सारिखे आक्रोश करूं लागले.

हेमकुंडलयुक्तानिकिरीटोत्कटवंतिच ॥ शिरांस्युर्व्यां-
पततिस्मगिरिकूटानिवात्यये ॥ ३८

अर्थ:- आणि सुवर्ण कुंडलानीं युक्त असून मुगुट घातलेलीं वीरांचीं मस्तकें प्रलय कालीं पर्वतांच्या शिखरां प्रमाणें त्या रणभूमीवर पडूं लागलीं.

परश्वधैः पट्टिशैश्चखड्गैश्चपरिघैस्तथा ॥ छिन्नाः
करिवराकारानिपेतुस्तेधरातले ॥ ३९

अर्थः तसेच ते महा गजा सारिखे उभय सैन्यांतील योद्धे, कुऱ्हाडी, पट्टिश, तरवारी, व परिघ, इत्यादिक आयुधानीं छिन्न भिन्न होऊन त्या रणभूमीवर पडले.

गर्जंतिसहसाहृष्टाः प्रमथाभीमगर्जनाः ॥ साधयं
त्यपरेसिद्धायुद्धगांधर्वमद्भुतम् ४०

अर्थ- तथापि ते शिवाचे पार्षदगण वीरश्रीनें हर्षयुक्त होत्साते अकस्मात् मध्येंच भयंकर गर्जना करीत. आणि ते समयीं त्या देवांचे वीरांची युद्धा-विषयीं उत्साह शक्ती दृद्धिंगत होण्या साठीं युद्धांतील वीरां वांचून कोणी इतर सिद्ध गण अद्भुत गायन करूं लागले.

बलवान्भासिप्रमथदर्पितोभासिदानव॥ इतिचोच्चा-
रयन्वाचंवारणारणधूर्गताः ४१

अर्थ- हे शिवगणा तूं मोठा प्रबल दिसतोस, हे दानवा तूं बलाच्या योगानें बहुत गर्वयुक्त जाहला आहेस असें बोलून रणभूमींतील अग्रेसर महा गजां सारिखे ते वीर परस्पराशीं युद्ध करीत होते.

परिघैराहताः केचिद्दानवैः शंकरानुगाः॥ वमंतेरुधिरं
वक्त्रैःस्वर्णधातुमिवाचलाः ४२

अर्थ- त्या काळीं दानवानीं शंकराचे किती एक पार्षद्गण परिघनामक आयुधानीं ताडित जाहले असतां पर्वतांतून बाहेर आलेल्या तस सुवर्ण-धातु सारिखे मुखांतून रक्त ओकूं लागले.

प्रमथैरपिनाराचैरसुराः सुरशात्रवः॥ द्रुमैश्चगिरिशृंगै
श्चगाढमेवाहवेहताः ४३

अर्थ- तसेच शिवगणानीं ही देवांचे शत्रु जे त्रिपुरवासी असुर ते नाराच नामक लोखंडी बाण, दृक्ष व पर्वत शिखरें यांच्या दृढ प्रहारानीं त्या युद्धांत बहुत मारिले.

सूदितानथतान्दैत्यानन्येदानवपुंगवाः॥ उत्क्षिप्यचि-
क्षिपुर्वाप्यांमयदानवनोदिताः ४४

अर्थ- नंतर त्रिपुरांतील इतर वरिष्ठ दानवानीं मयासुराच्या आज्ञे वरून युद्धांत मरण पावलेले दैत्य उचलून अमृताच्या विहिरींत टाकिले.

तेचापिभास्वरैर्देहैः स्वर्लोकइवामराः॥ उत्तस्थुर्वापी
मासाद्यसद्रूपाभरणांबराः ४५

अर्थ- तेव्हां ते दैत्य विहिरींत टाकतांच तत्काल स्वर्गलोकांतील देवा सारिखे देदीप्य मान दिव्य देहानें उत्तम रूप, अलंकार, वस्त्रें यानीं युक्त होत्साते पुनः उठले.

अथैके दानवाः प्राप्य वापीप्रक्षेपणादसून्॥ आस्फोट्य सिंहनादं च कृत्वा धावंस्तथासुराः ४६

अर्थ-नंतर त्यांतील कोणी दानव त्या अमृताचे विहिरींत टाकल्यानें जिवंत होऊन दंड ठोकून तसाच सिंहनाद करून ते असुर युद्धार्थ धांवले.

दानवाः प्रमथानेतान्प्रसर्पत किमास्यथ॥ हतानपि हि वो वापी पुनरुज्जीवयिष्यति॥ ४७

अर्थ-आणि ते दानव परस्परांस बोलत कीं, दानवहो शिवगणांच्या आंगावर जा. उगाच कां बसलांत तुह्मीं भिऊं नका. कारण तुह्मी मेलांत तरी तुह्मांस ही अमृताची विहीर पुनः वांचवीत आहे.

एवं श्रुत्वा शंकुकर्णो वचो ग्रग्रहसन्निभः॥ द्रुतमेवैत्य देवेशमिदं वचनमब्रवीत् ४८

अर्थ-असें ते दानवांचें भाषण श्रवण करून श्रेष्ठ ग्रह जो सूर्य त्यासमान अति तीक्ष्ण शंकुकर्ण नामा शिवगण मोठ्या त्वरेनें येऊन देवाधिदेव शिवास हें पुढील वचन बोलला.

सूदिताः सूदिता देव प्रमथैरसुराह्यमी॥ उत्तिष्ठंति पुनर्भीमाः सस्याइव जलोक्षिताः ४९

अर्थ-तें असें कीं, हे महादेवा आपल्या पार्षदगणानीं हे असुर मारिले तरी तें पाणी मिळालेल्या धान्या सारिखें भयंकर रूपी वारंवार उठतात.

अस्मिन्किल पुरे वापी पूर्णामृतरसांभसा॥ निहता निहता यत्र क्षिप्ता जीवंति दानवाः॥ ५०

अर्थ-याचें कारण असें आहे कीं, या त्रिपुरांत निश्चयें करून अमृतासमान रसयुक्त उदकानें पूर्ण भरलेली विहीर आहे. त्यामुळें पुनःपुनः मारलेले दानव त्या विहिरींत टाकले असतां जिवंत होतात.

इति विज्ञापयहेवं शंकुकर्णो महेश्वरं॥ अभवन्दानवबले उत्पाता वै सुदारुणाः॥ ५१

अर्थ-अशी शंकुकर्णानें महादेवास विज्ञापना केली. नंतर त्या दानवांच्यासैन्यांत अतिभयंकर उत्पात जाहले.

तारकाक्षःस्फभीमाक्षोदारितास्योहरिर्यथा ॥ अभ्यया-
वत्सुसंक्रुद्धोमहादेवरथंप्रति ५२

अर्थ- तदनंतर अत्यंत भयंकर नेत्र तारकासुर मोठ्या क्रोधानें सिंहासा-
रिखें तोंड पसरून शंकराच्या रथावर धांवला.

त्रिपुरेतुमहान्योरोभेरीशंखरवोबभौ ॥ दानवाभिःसृता
दृष्ट्वादेवदेवरथेसुरम् ॥५३॥ भूकंपश्चाभवत्तत्रगता
गोभूगतोभवत् ॥ दृष्ट्वाक्षोभमगाद्रुद्रःस्वयंभूश्चपि-
तामहः॥५४॥

अर्थ- त्या काळीं त्रिपुरांत दुंदुभि व शंख यांचा मोठा भयानक शब्द जा-
हला. आणि तारकासुर महादेवाच्या रथावर गेला हें पाहून त्रिपुरांतील
दानव युद्धार्थ निघाले, तेव्हां तेथें भूमिकंप जाहला तेणें करून शिवा
चा रथ भूमींत गेला, तें पाहून शंकर व ब्रह्मदेव यांच्या चित्तास क्षो
भ जाहला.

ताभ्यांदेववरिष्ठाभ्यामन्वितःसरथोत्तमः ॥ अनायत
नमासाद्यसीदत्तेगुणवानिव ॥५५॥

अर्थ- आणि ते देवांतील श्रेष्ठ ब्रह्मदेव व शिव यानीं युक्त असूनही तो-
उत्तम रथ आकाशांत प्राप्त होऊन आधार नसल्या मुळें स्थान रहित गु-
णवाना सारिखा संकटांत पडला.

धातुक्षयेदेहइवग्रीष्मेचाल्पमिवोदकं ॥ शैथिल्यंया-
तिसरथःस्नेहोविप्रकृतोयथा ॥५६॥

अर्थ- असा कीं, सप्तधातु क्षीण झाले असतां देह जसा म्लान होतो, ग्री-
ष्म ऋतूंत उदक जसें थोडें राहतें व स्नेह जसा दूर गेल्यानें न्यून होतो,
तसा तो रथ आकाश मार्गीं चालण्या विषयीं शिथिलपणा पावून खालीं
पडूं लागला.

रथादुत्त्यात्मभूर्वैसीदंतंतुरथोत्तमं ॥ उज्जहारमहा
प्राणोरथंत्रैलोक्यरूपिणम् ५७

अर्थ- ते समयीं महाबलाढ्य ब्रह्मदेवानें रथा खालीं उतरून त्या पडणा-
ऱ्या त्रैलोक्यरूप उत्तम रथास उचलून धरिलें.

तदाशराद्विनिष्पत्यपीतवासाजनार्दनः॥ वृषरूपंमह-
त्कृत्वारथंजग्राहदुर्धरम् ५८

अर्थ:- त्या काळीं दुर्जनांचा संहार करणारा पीतांबरधारी विष्णु, बाणांतून निघून मोठें वृषभ रूप धारण करून धारण करण्यास अशक्य अशा त्या रथास ग्रहण करिता जाहला.

सविषाणाभ्यांत्रैलोक्यंरथमेवमहारथः॥ प्रगृह्यो-
द्वहतेसज्जं कुलंकुलवहोयथा॥ ५९॥

अर्थ:- तो महारथी विष्णु आपले शिंगानीं सिद्ध केलेल्या त्रैलोक्यमय रथास ग्रहण करून (जसा कुळाचा निर्वाह करणारा पुरुष स्वकुलाचा निर्वाह करितो) तसा वाहूं लागला.

तारकाक्षोपिदैत्येंद्रोगिरींद्रइवपक्षवान्॥ अभ्यद्र-
वत्तदादेवंब्रह्माणंहतवांश्चसः ६०

अर्थ:- तेव्हां दैत्यांचा राजा तारकासुरही पंखयुक्त महापर्वता सारखा उड्डाण करून धांवला. आणि त्यानें ब्रह्मदेवास प्रहारही केला.

सतारकाक्षाभिहतः प्रतोदंन्यस्यकूबरे॥ विजज्वा-
लमुहुर्ब्रह्माश्वासंवक्त्रात्समक्षिरन्॥ ६१

अर्थ:- त्या तारकासुरानें प्रहार केला असतां जूं बांधण्याच्या उभ्या लांकडावर चाबूक ठेवून ब्रह्मदेव वारंवार मुखांतून श्वासोछ्वास टाकून रागानें अधिकच लाल झाले.

तत्रदैत्यैर्महानादोदानवैरपिभैरवः॥ तारकाक्षस्य
पूजार्थंकृतोजलधरोपमः॥ ६२॥

अर्थ:- तेव्हां त्रिपुरांतील दैत्य व दानव यानीं तारकासुराच्या सन्मानासाठीं मेघ गर्जने सारिखा महान् भयंकर सिंहनाद केला.

रथचरणंकरोथमहामृधेवृषभवपुर्ऋषभेंद्रपूजितः
दितितनयबलंविमर्द्यसर्वंत्रिपुरपुरंप्रविवेशकेशवः ६३

अर्थ:- नंतर त्या महासंग्रामांत नंदिकेश्वरानें पूजिलं असून वृषभरूप धारण करणारा विष्णु हातांत सुदर्शन चक्र घेऊन त्रिपुरांतील सर्व दैत्य सैन्याचें मर्दन करून त्या त्रिपुरांत प्रवेश करिता जाहला.

सजलजलदराजितांसमस्तांकुमुदवरोत्पलफुल्लपंक-
जाढ्याम्॥सुरगुरुरपिबत्पयोमृतंतद्रविरिवसंचि-
तशार्वरंतमोंधम्॥६४॥

अर्थ- आणि वरून सजल मेघानीं सुशोभित चंद्रविकासि श्रेष्ठ कमलें,सूर्यविकासि कमलें, व अवांतर जातींची प्रफुल्लित कमलें यानीं सर्वत्र व्याप्त अशा त्या विहीरींतील अमृतरूप उदक सर्व देव गुरु विष्णूनें तें संपूर्ण प्राशन केलें, यास दृष्टांत रात्रिसंबंधी सांचलेला गाढ अंधकार जसा सूर्य-हरण करितो तसें.

वापींपीत्वासुरेंद्राणां पीतवासाजनार्दनः॥नर्दमानो-
महाबाहुः प्रविवेशशरंततः॥६५॥

अर्थ- या प्रमाणें त्या असुर श्रेष्ठांच्या त्रिपुरांतील अमृत वापीचें निःशेष प्राशन करून भक्तजनांच्या संकट समयीं धांवणारा महाभुज,पीतांबरधारी विष्णु मोठ्यानें शब्द करीत पुनः त्या बाणांत पूर्ववत् येऊन प्रविष्ट जाला.

ततोसुराभीमगणेश्वरैर्हताःप्रहारसंवर्धितशोणिता
पगाः॥पराङ्मुखाभीममुखैःकृता रणेयथानयाभ्यु-
द्यततस्करैर्नरैः॥६६॥

अर्थ- नंतर शिवाचे भयंकर पार्षद गणांतील प्रमुखानीं बहुत असुर मारिले. तेव्हां शस्त्र प्रहारानीं त्या दैत्यांच्या अंगांतील रक्ताचे प्रवाहानीं दुर्लिंगत महा नद्या वाहूं लागल्या. आणि त्या भयंकर मुख शिवगणानीं रणांत दानवांस मागें फिरविलें. यास दृष्टांत निर्भय अशा नीतिमार्गांत उत्साहानें तत्पर मनुष्य जसे अन्यायी पुरुषांचा पराभव करितात तसें.

सतारकाक्षस्तडिमालिरेवचमयेनसार्धंप्रमथैरभि
द्रुताः॥पुरंपराहत्यनुतेशरार्दितायथाशरीरंपवनो
दयेगताः६७

अर्थ- तेव्हां तो तारकासुर व विद्युन्माली दैत्य हे मयासुरा सहित शिवगणांच्या बाणानीं पीडित होऊन त्यानीं पळविलें असतां युद्धांतून मागें फिरून आपल्या त्रिपुरांत गेले. यास दृष्टांत. शरीरांत वायु आला अ-

सतां त्याच्या अनुलक्षें करून जसे प्राण येतात तसे.

गणेश्वराभ्युद्यतदर्पकाशिनोमहेंद्रनंदीश्वरषण्मुखा-
युधि॥ विनेदुरुच्चैर्जहसुश्चदुर्मदाजयेमचंद्रादि दि
गीश्वरैःसह ६९

अर्थः- नंतर उदय पावलेल्या चित्ताच्या उत्साह शक्तीनें शोभणारे ते- इंद्र व नंदिकेश्वर प्रभृति शिवगण आतां आह्मीं चंद्रादिक लोकपालां सहित या युद्धांत जय पावूं असें युद्ध मदानें बोलून मोठ्यानें हसूं ला गले. इतिश्री मत्स्यपुराणे त्रिपुरदाहे पंचत्रिंश दुत्तर शततमोध्या १३५

अध्या १३६वा.

सूतउवाच॥ प्रमथैःसमरेभिन्नास्त्रैपुरास्तेसुरारयः॥
पुरंप्रविविशुर्भीताःप्रमथैर्भग्नगोपुरम् ॥ १ ॥

अर्थः- नंतर सूत बोलला ऋषीहो या प्रमाणें त्या संग्रामांत शिवगणा- नीं त्रिपुरवासी देवांचे शत्रु मयासुर प्रमुख दानव यांच्या अंगांचें वि दारण केलें असतां ते भयभीत होत्साते त्या शिवगणानीं मोडले- ल्या आपल्या त्रिपुरांत गेले.

शीर्णदंष्ट्रायथानागाभग्नशृंगायथावृषाः॥यथावि-
पक्षाःशकुनानद्यःक्षीणोदकायथा॥२॥मृतप्राया
स्तथादैत्यादैवतैर्विकृताननाः॥ बभूवुस्तेविमनसः
कथंकार्यमितिब्रुवन्॥३॥

अर्थः- आणि जसे विषाच्या दाढा पडलेले नाग तसेच शिंगें मोडलेले बैल जसे पंख तुटलेले पक्षी व नद्या जशा उष्णकाळीं क्षीण झाले- ले उदकानें युक्त असतात तसे ते दैत्य देवानीं युद्धांत मृतप्राय के- लें असतां म्लान वदन होत्साते मनांत खिन्न होऊन आतां कसें क- रावें असें बोलूं लागले.

अथतान्म्लानमनसस्तदातामरसाननः॥उवाच-
दैत्योदैत्यानांपरमाधिपतिर्मयः॥४॥

अर्थः- नंतर त्या काळीं कमलतुल्य मुखानें शोभणारा मुख्य राजा मयनामा दैत्य मनांत खिन्न झालेल्या त्या सर्व दैत्यांस बोलतो.

कृत्वायुद्धानिघोराणिप्रमथैःसहसामरैः॥तोषयित्वा-
तथायुद्धेप्रमथानमरैःसह॥५॥यूयंयत्प्रथमंदै-
त्याःपश्चाच्चबलपीडिताः॥प्रविष्टानगरंत्रासात्प्रम-
थैर्भृशमर्दिताः॥६॥

अर्थः- कीं दैत्यहो, तुह्मीं प्रथमतः इंद्रादि देवांसहित शिवगणांशीं बहुत घोर युद्धें करून देवांसह वर्तमान शिवाचे पार्षद गणांस संतुष्ट करून पश्चात् आतां त्या शिवगणानीं सैन्या सहित तुह्मीं अत्यंत पीडित-जाहला असतां त्रासानें आपल्या त्रिपुरांत आलांत.

अप्रियंक्रियतेव्यक्तंदैवैर्नास्त्यत्रसंशयः॥यत्रनाम-
महाभागाःप्रविशंतिगिरेर्वनम् ७

अर्थः- आतां या युद्धांत देवनिश्चयानें आपला पराजय करितात, यांत संदेह नाहीं; कारण कालगति अशी आहे कीं, महा भाग्यशाली पुरुषही दैवगतीनें गिरिकंदरीं अरण्यांत प्रवेश करितात.

अहोहिकालस्यबलमहोकालोहिदुर्जयः॥यत्रेदृशा-
स्यदुर्गस्यउपरोधोयमागतः॥८॥

अर्थः- तस्मात् कायहो हें कालाचें आश्चर्य कारक बल आहे, तेव्हां कालास जिंकणें अशक्य आहे. या विषयीं प्रत्यक्ष उदाहरण हेंच पहा कीं, इतरांस अगम्य अशाही या त्रिपुरास उपद्रव प्राप्त झाला.

मयेविवदमानेतुनर्दमानइवांबुदे॥बभूवुर्निष्प्रभादैत्या
ग्रहाइंदूदयेयथा॥९॥

अर्थः- असें मयासुरानें दानवांशीं बहुत प्रकारें भाषण करून मेघा सारिखी गर्जना केली असतां (जसे चंद्रोदय झाल्यावर संपूर्ण ग्रह निस्तेज दिसतात) तसे ते संपूर्ण दैत्य तेजोहीन दिसूं लागले.

वापीपालास्ततोभ्येत्यनभःकालइवांबुदाः॥मयमाहुर्थ
मप्रख्यंसांजलिप्रग्रहाःस्थिताः १०॥

अर्थः- नंतर पर्जन्यकालच्या सजल मेघां समान कृष्ण वर्ण असे त्या अमृत वापीचें रक्षण करणारे दूत येऊन ते यमा सारिख्या उग्र दंड करणाऱ्या मयासुरास हात जोडून विज्ञापना करूं लागले.

यासामृतरसागूढावापीवैनिर्मितात्वया॥ समाकुलो त्पलवनासमीनाकुलपंकजा ॥११॥ पीतासावृषरूपेण केनचिद्दैत्यनायक॥ वापीत्रासांप्रतंदृष्टामृतसंज्ञा इ- वांगना ॥१२॥

अर्थ– ती अशी कीं, हे दैत्यनायका, वर आसमंतान्भागीं कमल वनानीव्याप्त आणि आंत मत्स्य व कमलें यानीं सुशोभित असून अमृत रसानें पूर्ण अशी त्वां निर्माण केलेली जी विहीर ती कोणी बैलाचे रूपानें प्राशन केली, ती सांप्रत काली मरण पावलेल्या स्त्री सारिखी शुष्क अशी आह्मीं पाहिली.

वापीपालवचःश्रुत्वामयोसौदानवप्रभुः॥कष्टमित्य- सकृत्प्रोच्यदितिजानिदमब्रवीत् १३

अर्थः- असें विहिरीचें संरक्षण करणाऱ्या दूतांचें भाषण ऐकून दानवांचा राजा मयासुर हें काय दुःख प्राप्त झाहलें असें वारंवार बोलून दैत्यांस भाषण करितो.

मयामायाबलकृतावापीपीतास्त्वियंयदि॥ विनष्टास्म नसंदेहस्त्रिपुरंदानवागतम् १४

अर्थः- कीं, दानवहो म्या मायेच्या बलानें निर्माण केलेली ही अमृताची विहीर जर प्राशन केली तर आतां हें आपलें त्रिपुर गेलें तस्मात् आपण नाश पावूं.

निहतान्निहतान्दैत्यान्याजीवयतिदेवतैः॥ पीता वा यदिवावापीपीतावैपीतवाससा१५॥

अर्थः- कारण देवानीं दैत्यांस पुनःपुनः मारिलें तरी जी अमृताची विहीर त्यांस जिवंत करील होती ती जर प्राशन केली तर ती पीतांबरधारी विष्णूनेंच प्राशन केली यांत संशय नाहीं.

कोन्योमन्माययागुप्तांवापीममृतनोयिनीं॥पास्य ते विष्णुमजितंवर्जयित्वागदाधरम् १६ सुगुह्य मपिदैत्यानांनास्त्यस्याविदितंभुवि॥

अर्थः- कारण माझ्या असुरी मायेनें संरक्षित अमृतरूप उदकानें भर-

लेली विहीर कधींही कोणापासून पराभव न पावणारे गदाधर विष्णू वांचून प्राशन करण्यास कोण समर्थ आहे? कोणीही नाहीं; आणि-कितीही गुप्त ठेविली तरी दैत्यांचें कांहीं अत्यंत गुप्त असलें तरी तें विष्णूस विदीत नाहीं.

यत्रमदूरकौशल्यंविज्ञातंनवृतंबुधैः॥१७॥समोयं रुचिरोदेशोनिर्द्रुमोनिर्द्रुमाचलः॥लभेमंदूरतःकृत्वाबाधंतेस्मान्गणामराः१८॥

अर्थ:-तर त्या एका विष्णू वांचून ब्रह्मवरानीं प्राप्त जाहलेलें माझें उत्तम कौशल्य कोणासही ठाऊक नाहीं ह्मणूनच पूर्वीं असें कोणीही चतुरानीं मागितलेलें नाहीं. असें असून हा देश चांगला,समान, वृक्ष व वृक्षयुक्त पर्वत यानीं रहित आहे, ह्मणून येथें शिवगण,देव हे आपणांस बाधा करितात; या साठीं आपण येथून हितकारक अशा दूर देशीं जाऊं.

तेयूयंयदिमन्यध्वंसागरोपरिधिष्ठिताः॥ प्रमथानांमहावेगंसहामःश्वसनोपमम्॥१९॥

अर्थ:-या विषयीं जर सर्व तुह्मी संमत व्हाल तर त्या पुरां सहित आपण समुद्रावर जाऊन राहून शिवगणांचा वायू सारखा मोठा वेग-सहन करूं.

एतेषांचसमारंभास्तस्मिन्सागरसंप्लवे॥निरुत्साहाभविष्यंतिएतद्रथपथावृताः॥२०॥

अर्थ:- आणि त्या समुद्रावरील केवल तरण्याच्याच निराधार मार्गात या रथाची गति बंद जाहली असतां या देवगणांचे सर्व उद्योग व्यर्थ होतील.

क्रुध्यतांनिघ्नतांशत्रून्भीतानांचद्रविष्यतां॥साग रोंबरसंकाशःशरणंनोभविष्यति॥२१॥

अर्थ:-युद्ध करून शत्रूंस मारीत असतां भिऊन पळणारांस आह्मांस आकाशा सारिखा हा समुद्र आश्रयस्थान होईल.

इत्युक्त्वासमयोदैत्योदैत्यानामधिपस्तदा॥ त्रिपुरे-

णयर्योतूर्णंसागरंसिंधुबांधवम् ॥ २२॥

अर्थ- असें भाषण करून दैत्यांचा राजा तो मयासुर तत्काल त्या त्रिपुरांसहित त्वरेनें सिंधुनदीचा बांधव जो समुद्र त्यावर गेला.

सागरेजलगंभीरउत्पपातपुरंवरम् ॥ अवतस्थुः पुराण्येवगोपुराभरणानिच ॥ २३॥

अर्थ- या प्रमाणें तीं तिन्हीं पुरें गंभीर (खोल) उदकानें युक्त अशा समुद्रावर गेलीं. आणि गोपुरानीं शोभणारीं तीं पुरें तेथेंच राहिलीं.

अपक्रांतेतुत्रिपुरेत्रिपुरारिस्त्रिलोचनः ॥ पितामह मुवाचेदंवेदवादविशारदं ॥ २४॥

अर्थ- अशीं तीं तिन्हीं पुरें गेलीं असतां त्या त्रिपुराचे शत्रु त्रिनेत्र शिव त्या कालीं वेदविचारांत अत्यंत कुशल अशा ब्रह्मदेवांस प्रश्न करितात.

पितामहद्दंभीताभगवन्दानवाहिनः ॥ विपुलंसा गरंतेतुदानवाःसमुपाश्रिताः ॥ २५॥

अर्थ- हे भगवन् विश्वपितामहा त्रिपुरवासी दानव निश्चयें करून आपणास भिऊन त्यानीं जाऊन महा सागरांचा आश्रय केला.

यतएवहितेयातास्त्रिपुरेणतुदानवाः ॥ ततएव- रथंतूर्णंप्रापयस्वपितामह ॥ २६॥

अर्थ- कीं, हे ब्रह्मदेवा, ते दानव त्रिपुरां सहवर्तमान जेथें गेले तेथें आतां आपला हा रथ त्वरेनें न्यावा.

सिंहनादंततःकृत्वादेवादेवरथंचतम् ॥ परिवार्य ययुर्हृष्टाःसायुधाः पश्चिमोदधिं ॥ २७॥

अर्थ- असें शिवाचें भाषण श्रवण करून पश्चात् ते इंद्रादिक देव सिंहनाद करून त्या शिवरथासभोंवती वेष्टून आयुधां सहित मोठ्या हर्षानें पश्चिम समुद्रास चालले.

ततोमरामरगुरुंपरिवार्यभवंहरं ॥ नर्दयंतोययु स्तूर्णंसागरंदानवालयम् ॥ २८॥

अर्थ- नंतर असे ते देव देवांचे गुरु ऐश्वर्यप्रद शिवा बरोबर गर्ज-

ना करीत त्वरेनें दानवांचे राहण्यास आश्रय स्थान अशा पश्चिम समुद्रास पोंचले.

अथचारुपताकभूषितंपटहाडंबरशंखनादितम्॥त्रि
पुरमभिसमीक्ष्यदेवताविविधबलाननदुर्यथाघनाः२९

अर्थः- तदनंतर सुंदर पताकानीं सुशोभित रणवाद्यांचे ध्वनि हत्तीच्या गर्जना व शंखांचे शब्द यानीं नादित असें तें त्रिपुर पाहून अनेक प्रकारचे बलाढ्य देव मेघां सारिखे गर्जना करूं लागले.

असुरवरपुरेपिदारुणोजलधररावमृदंगगह्वरः
दनुतनयनिनादमिश्रितःप्रतिनिधिसंक्षुभितार्ण
वोपमः॥३०॥

अर्थः- तसाच त्या असुरश्रेष्ठ मयासुराचे त्रिपुरांतही दानवांचे शब्दानीं मिश्रित, सजल मेघांच्या शब्दा सारिखा भयंकर, गह्वरा सारखा लांब, अमावास्या व पूर्णिमा या तिथींस मोठ्या खवळलेल्या समुद्रा पेक्षां महान् असा मृदंगांचा शब्द जाहला.

अथभुवनपतिर्गतिःसुराणामरिमृगयांप्रददासुलब्धबुद्धिः॥त्रिदशगणपतिर्ह्युवाचशक्रंत्रिपुरगतं
सहसानिरीक्ष्यशत्रुं॥३१॥

अर्थः- नंतर भुवनाचा पति, देवांस परम गति, सर्वदेवगणांचा रक्षक, सर्वांस सुबुद्धि दाता अशा शिवानें देवांस हरिणा सारिख्या त्या शत्रूंची मृगये विषयीं (नाश करण्या विषयीं) सामर्थ्य दिलें आणि त्रिपुरांतील शत्रूंस एका एकीं पाहून शिव इंद्रास बोलतात.

त्रिदशगणपतेनिशामयेतत्त्रिपुरनिकेतनमुत्तमंसुरेंद्र॥यमवरुणकुबेरषण्मुखैस्त्वंसहगणैरपिहन्मितावदेव॥३२॥

अर्थः- कीं हे देवगण पालका, देवराजा इंद्रा, माझें भाषण श्रवण कर, तें असें कीं, हें त्रिपुरस्थान जरी सर्व प्रकारें बहुत उत्तम आहे तथापि यम, वरुण, कुबेर, व कार्तिक स्वामी इत्यादिक सेनापति वीरांसह वर्तमान आतांच मी त्या समग्र तिन्ही पुरांचा निश्चयानें संहार क-

रितों.

विहितपरबलाभिधानभूतंव्रजजलधेस्तयतःपु-
राणितस्थः॥सरथवरगतोभवःसमर्थोल्हदधिम-
गात्त्रिपुरंपुनर्निहंतुम् ३३॥

अर्थः- आणि हे इंद्रा, जेथें समुद्रावर तीं तिन्हीं पुरें आहेत तेथें तूं युद्धार्थ जा. असें बोलून त्या भूमिरूप महारथांत बसून समर्थ शिव, परसेन्याचे नाशा विषयीं समर्थ अशा त्रिपुराचा नाश करण्यासाठीं पुनः समुद्रावर जावयास निघाले.

इतिपरिगणयंतोदितेःसुताद्यवतस्थुर्लवणार्णवो
परिष्टात्॥अभिभवत्त्रिपुरंसदानवेंद्रंशरवर्षैर्मु-
सलैश्चवज्रमिश्रैः॥३४॥

अर्थः- तेव्हां शिव इंद्रास बोलले कीं, तूं बाण वृष्टि, मुसळें व वज्रें इत्यादिक शस्त्रांनीं सर्व दानवां सहित त्रिपुराचा पराभव कर. असें शिवाचें भाषण मनांत आणून अदितीचे पुत्र इंद्रादि देव युद्धार्थ सिद्ध होऊन क्षार समुद्रावर उभे राहिले.

अहमपिरथवर्यमास्थितःसुरवरवर्यभवेयपृष्ठ-
तः॥असुरवरवधार्थमुद्यतानांप्रतिविदधामिसु-
खायतेनघ॥३५॥

अर्थः- हे देवश्रेष्ठवर्या निष्पाप इंद्रा, मीही याउत्तम रथांत बसून त्रिपुरांतील मोठ्या असुरांच्या वधार्थ उद्युक्त झालेल्या तुमच्या सुखा करितां मागें राहून तुह्मांस साह्य करितों.

इतिभववचनप्रचोदितोदशशतनयनवपुःसमुद्य-
तः॥त्रिपुरपुरजिघांसयाहरिःप्रविकसितांबुजलो
चनोययौ॥३६॥ इतिश्रीमत्स्यपुराणेत्रिपुरकम-
णोनामषड्त्रिंशत्युत्तरशततमोध्यायः॥१३६॥ ७

अर्थः- अशा शिवाच्या आज्ञा वचनानें युद्धार्थ उद्युक्त जाहलेला, सहस्र नेत्रयुक्त, शरीरानें शोभणारा, इंद्र, प्रफुल्लित कमला समान नेत्र करून त्या त्रिपुरनामक तिन्हीं पुरांचा नाश करण्याच्या इच्छेनें

त्यांवर चालला. इतिश्रीमत्स्यपुराणे त्रिपुरक्रमणो नाम षट्त्रिंशदुत्तर तमोऽध्यायः ॥ १३६ ॥

अध्या १३७ वा.

सूतउवाच ॥ मघवातु निहंतुं तानसुरानमरेश्वरः ॥ लोकपालायमुस्सर्वे गणपालाश्चसर्वशः ॥ १ ॥

अर्थः— सूत बोलला ऋषी हो नंतर अमरांचा राजा इंद्र, त्रिपुरांतील असुरांस मारण्यासाठीं निघाला, तेव्हां सर्व लोकपाल व शिवगणांचें रक्षण करणारे नंदिकेश्वर प्रभृति सर्व मुख्य पार्षद हे इंद्राच्या अनुलक्षें करून युद्धार्थ चालले.

ईश्वरामोदितास्सर्वउत्पेतुश्चांबरेतदा ॥ खगतास्तविरेजुस्तेपक्षवंतइवाचलाः ॥ २ ॥

अर्थः— तेव्हां शिवानें अनुमोदन दिलेले इंद्रादिक सर्वही देवगण त्या कालीं, आकाशांत उडाले असतां, ते आकाशांत उड्डाण केलेल्या पंख युक्त पर्वतांसारिखे अतिशयें शोभूं लागले.

प्रययुस्तत्पुरंहंतुं शरीरमिवव्याधयः ॥ शंखवाडंबर- निर्घोषैः पणवान्पटहानपि ॥ नादयंतः पुरोदेवादृष्टा स्त्रिपुरवासिभिः ॥ ३ ॥

अर्थः— आणि (जसे रोग शरीराच्या नाशार्थ येतात) तसे ते देव त्रिपुराचा नाश करण्यासाठीं पुढें शंख व हत्ती यांचे शब्दां सहित, पणव व पटह हीं वाद्यें वाजवीत आपणांवर येत आहेत असें त्रिपुरवासि असुरानीं पाहिलें.

हरः प्राप्तइतीवोक्त्वाबलिनस्तेमहासुराः ॥ आजग्मुः परमंक्षोभमत्ययेष्विवसागराः ॥ ४ ॥

अर्थः— तेसमयी शिव आतां आपले संहारार्थ आला असें बोलून ते त्रिपुरांतील महा बलिष्ठ असुर प्रलय कालच्या समुद्रां सारखे अत्यंत क्षोभ पावले.

सुरतूर्यरवंश्रुत्वादानवाभीमदर्शनाः ॥ निनेदुर्वादयंतश्चनानावाद्यान्यनेकशः ॥ ५ ॥

अर्थ- तसाच देवांच्या वाद्यांचा शब्द ऐकून ते भयंकर रूपी दानव, आपलीं अनेक प्रकारचीं वाद्यें वाजवून सिंहनाद करूं लागले.

भूयोदीरितवीर्यास्तेपरस्परकृतागसः ॥ पूर्वदेवाश्च देवाश्चसूदयंतः परस्परं ॥ ६ ॥

अर्थ- नंतर वारंवार आपापले पराक्रमांची मोठी वर्णन करून ते परस्परांचे अपराध केलेले असुर व देव हे एकमेकांस मारूं लागले.

आक्रोशेपिसमप्रख्येतेषांदेहनिकृंतनं ॥ प्रवृत्तंयुद्धमतुलंप्रहारकृतनिस्वनं ॥ ७ ॥

अर्थ- आणि त्या रणभूमींत देव व असुर यांचा युद्धसंबंधी आक्रोश समान झाला असतां शस्त्रास्त्रांचे प्रहारानीं त्या देव दैत्यांचे देह - त्यांत तुटल्यानें अत्यंत दुःख युक्त शब्द होत आहेत असें तें देव, दानवांचें परस्पर तुमल युद्ध चाललें.

श्वसंतइवनागेंद्राभ्रमंतइवपक्षिणः ॥ गिरींद्राइवकंपंतोगर्जंतइवतोयदाः ॥ ८ ॥ जृंभंतइवशार्दूलाः प्रवांतइववायवः ॥ प्रवृद्धोर्मितरंगालाः क्षुभ्यंतइवसागराः ॥ ९ ॥

अर्थ- तें असें कीं, श्रेष्ठ नाग जसे श्वासोच्छ्वास टाकतात; पक्षी जसे भ्रमण करतात; महापर्वत जसे कांपतात च कीं, काय, मेघ जसे गर्जनाच करतात कीं, काय, व्याघ्र जसे जांभया देतात, वायू जसे जोरानें वाहतात; वृद्धिंगत झालेल्या लाटांनीं युक्त समुद्र जसे प्रलय कालीं क्षुब्ध होतात. तसे ते देव, दैत्य परस्परें युद्ध करूं लागले.

प्रमथाश्चमहाशूरादानवाश्चमहाबलाः ॥ युयुधुर्निश्चलाभूत्वावज्राइवमहाचलैः ॥ १० ॥

अर्थ- असे ते मोठे शूर शिवाचे पार्षदगण व महाबलाढ्य दानव हे - त्या संग्रामांत निश्चल (स्थिर) होऊन युद्ध करूं लागले यास दृष्टांत वज्रें जशीं मोठमोठ्या पर्वतांशीं झुंजतात. तसे.

कार्मुकाणांनिकृष्टानांबभूवुर्दारुणारवाः ॥ कालानुगानांमेघानांयथावियतिवायुना ॥ ११ ॥

अर्थ:- त्या युद्धांत देव, दैत्यानीं आकर्णपर्यंत ओढलेल्या धनुष्यांचे आकाशांत वायूच्या योगानें प्रलयकालच्या मेघगर्जनें सारखे मोठे भयंकर शब्द होऊं लागले.

आहुश्चयुद्धेमाभैषीः क्वयास्यसि मृतोस्यसि ॥ प्रहराश्च स्थितोस्म्यत्रएहिदर्शयपौरुषं ॥१२॥

अर्थ:- आणि ते देव, दानव परस्परांस बोलूं लागले कीं, अरे वीरा युद्धांत भिऊं नको; कोठें जातोस; आतां मेलास असें समज, मी येथें उभा आहें; जर तुझ्या अंगीं सामर्थ्य असेल तर मला प्रहार करून आपला पराक्रम दाखीव.

गृहाणछिंधिभिंधीतिखादमारयदारय ॥ इत्यन्योन्यमनूच्चार्यप्रययुर्यमसादनं ॥१३॥

अर्थ:- हें आयुधघे! आपले शत्रूंस छिन्न भिन्न करून भक्षण कर! मार! विदारण कर; असें परस्परांस बोलून ते दानव योद्धे मरण पावून यमाचे घरीं गेले.

खड्गापवर्जिताः केचित्केचिच्छिन्नाः परश्वधैः ॥ केचिन्मुद्गरचूर्णाश्चकेचिद्बाहुभिराहताः ॥ १४ ॥ पट्टिशैःसूदिताः केचित्केचिच्छूलविदारिताः ॥ दानवाःशरपुष्पाभास्सवनाइवपर्वताः ॥ निपतंत्यर्णवजले भीमनक्र तिमिंगिले ॥ १५ ॥

अर्थ:- ते असें कीं, कोणी तरवारीनें मरण पावले, कोणी कुऱ्हाडीनें शिरच्छेद पावले, कोणी मुद्गला खालीं चुरून गेले, कोणी भुजा च्याप्रहारानें मेले कोणी पट्टिश नामक आयुधानें व कोणी शूलानीं मृत्यु पावले, आणि वर्णानें दर्भांचे जातींतील मुंज नामक गवताचे पुष्पां सारखे व शरीरानें अरण्य सहित पर्वतां समान असे ते दानव, भयंकर मकरी व शंभरयोजनें विस्तीर्ण माशांस गिळणाऱ्या मोठ्या मत्स्यानीं व्याप्त अशाच्या समुद्रांत पडूं लागले.

व्यसुभिः सनिवत्सांगैः पतमानैः सुरेतरैः ॥ संबभूवार्णवे शब्दः सजलांबुदनिस्वनः ॥ १६ ॥

अर्थ- तेसमयीं अंगांत कवचें घातलेले असून गतप्राण होऊन पड-णाऱ्या त्या असुरांचे योगानें समुद्रांत सजल मेघांचे गर्जनेसारखा शब्द होऊंलागला.

तेनशब्देनमकरानक्रास्तिमितिमिंगिला:॥मत्तालो
हितगंधेनक्षोभयंतोमहार्णवं॥१७॥परस्परेणकल
हंकुर्वाणाभीममूर्तय:॥भ्रमंतेभक्षयंतश्चदानवानां
चलोहितं॥१८॥

अर्थ- तेव्हां त्या शब्दानें मासे, सुसरी तिमि (शंभरयोजने प्रमाणाचा मत्स्य) व त्यास गिळणारा जो तिमिंगिल इत्यादिक जलचर जंतू येऊन त्या रक्ताच्या वासानें उन्मत झाले; आणि ते भयंकर प्राणी समुद्रास खवळून परस्परांशीं युद्ध करीत त्या दानवांचें रुधिर पीत फिरूं लागले.

सरथान्सायुधान्साश्वान्सवस्त्राभरणावृतान्॥
जग्रसुस्तिमयोदैत्यान्द्रावयंतोजलेचरान्॥१९॥

अर्थ- आणि त्रिपुरांतून समुद्रांत पडलेल्या रथ, आयुधें, घोडे, वस्त्रें अलंकार यानीं युक्त अशा त्या दैत्यांस शत योजन प्रमाणाचे तिमिनामक मत्स्य इतर जलचरांस पळवून गिळूं लागले.

मृधंयथासुराणांचप्रमथानांप्रवर्तते॥अंबरेंभसि
चतथायुद्धंचक्रुर्जलेचरा:॥२०॥

अर्थ- नंतर दानव व शिवगण यांचें जसें युद्ध आकाशांत चाललें होतें तसें जलचर प्राणी ही समुद्राचे उदकांत युद्ध करूं लागले.

यथाभ्रमंतिप्रमथास्सदैत्यास्तथाभ्रमंतेतिमय:स
नक्रा:॥यथैवछिंदंतिपरस्परंतुतथैवक्रंदंतिविभि-
न्नदेहा:॥२१॥

अर्थ- तें असें कीं, जसे आकाशांत शिवगण व दैत्य भ्रमण करीत होते; तसे ते शतयोजन विस्तीर्ण मत्स्य व सुसरी इत्यादिक मोठे जलचर प्राणी फिरूं लागले; व देव, दैत्य जसे परस्परांस शस्त्रानें ताडित होते तसे तेही एकमेकांच्या देहांचें विदारण करून त्यांसारिखेच ओरडूं लागले.

व्रणाननैरंगरसंस्रवद्भिस्सुरासुरैर्नक्रतिमिंगिलैश्च॥
कृतोमुहूर्तेनसमुद्रदेशस्सरक्ततोयस्समुदीर्णतोयः॥२२

अर्थः- आणि क्षतें झालेल्या मुखानीं युक्त व ज्यांचे अंगांतून रक्तस्राव होत आहे; असे ते देव, दैत्य व सुसरी, तिमिंगिल नामक मत्स्य यानीं दोन घटिकेंत तो समुद्राचा प्रदेश रक्त मिश्रित उदकानें पूर्ण होऊन तुफान झाला.

पूर्वंमहांभोधरपर्वताभंद्वारंमहांतंत्रिपुरस्यशक्रः॥
निपीडयनस्थोमहताबलेनयुक्तोमराणांमहताबलेन
॥२३॥

अर्थः- नंतर मोठ्या सजल मेघासारख्या त्रिपुराचे पूर्वेकडील महा द्वारांत मोठ्या देवसैन्या सह वर्तमान महा बलाढ्य इंद्र त्या दानवांस पीडा देत राहिला.

तथोत्तरंसस्ततनुजोहरस्यबालार्कजांबूनदतुल्यवर्णः॥
स्कंदः पुरद्वारमथारुरोहवृद्धोस्तशृंगंप्रपतन्निवार्कः॥२४

अर्थः- तसाच बालसूर्य किंवा जांबूनद सुवर्ण यां समान तेजः पुंज; शिवाचा पुत्र कार्तिकस्वामी त्रिपुराचे उत्तरेकडील द्वारावर चढला. यास दृष्टांत सायंकालचा सूर्य जसा अस्ताचल पर्वताचे शिखरावर जातो; तसा.

यमश्चवित्ताधिपतिश्चदेवोदंडान्वितः पाशवरायुध-
श्च॥देवारिणस्तस्यपुरस्यद्वारं ताभ्यांतुतत्पश्चिमतो
निरुद्धं॥२५॥

अर्थः- आणि कालदंड नामक आयुध युक्त यम व श्रेष्ठ पाशायुध सहित कुबेर यानीं देव शत्रु मयासुराच्या त्रिपुराचें पश्चिम द्वार बंद केलें.

दक्षारिरुद्रस्तपनायुताभस्सभास्वतादेवरथेनदेवः॥
तद्दक्षिणद्वारमरेः पुरस्यरुद्ध्वावतस्थौभगवांस्त्रिने
त्रः॥२६॥

अर्थः- त्याच प्रमाणें दहा हजार सूर्यांसमान तेजोमय, दक्षप्रजापतीचे शत्रु त्रिनयन असे भगवान् शिव, महा तेजस्वी हर्ष दायक अशा रथानें जाऊन शत्रूच्या त्रिपुराचें दक्षिण द्वार बंद करून उभे राहिले.

तुंगानिवेश्मानिसगोपुराणि स्वर्णानिकैलासशशि प्रभाणि॥ प्रल्हादरूपाः प्रमथा वरुत्वाज्योतींषिमे घाइवचाश्मवर्षाः॥२७॥ उत्पाट्यचोत्पाट्यगृहाणिते षांसशैलमालासमवेदिकानि॥ प्रक्षिप्यप्रक्षिप्यसमु द्रमध्येकालांबुदाभाः प्रमथाविनेदुः॥२८॥

अर्थः— नंतर त्या त्रिपुरांतील उंच, सुवर्णाचीं, कैलास किंवा चंद्र यांसारखीं शुभ्र कांती युक्त, गोपुरांनीं सुशोभित अशीं दैत्यांचीं घरें आनंदकारकरूपी शिवगणानीं (जसे गारांची वृष्टी करणारे मेघ, चंद्र, सूर्यादिक-ज्योतिर्गणांस आच्छादित करितात.) तशीं तीं वेष्टिलीं; आणि त्या असुरांचीं पर्वताच्या माळा सारिख्या ओठ्यानीं युक्त तीं घरें वारंवार उपटून प्रलय कालचे मेघांसमान ते शिवगण समुद्राचे मध्यभागीं पुनः पुनः टाकून अतिशयें गर्जना करूं लागले.

रक्तानिचाशेषवनैर्युतानि साशोकखंडानिसकोकिलानि॥ गृहाणिहेनाथपितस्सुतेति कांतेति भ्रांतेतिप्रियेतिचापि॥ उत्पाट्यमानेषुगृहेषुनार्ये अनार्यशब्दान्विविधान्प्रचक्रुः॥२९॥

अर्थः— त्या युद्धांत सर्व पुष्पादि उपवनें व कोकिल पक्ष्यांसहित अशोक वृक्ष यानीं युक्त अशीं तीं त्रिपुरांतील घरें युद्ध करणाऱ्या वीरांच्या रक्तप्रवाहानीं आरक्त वर्ण झालीं. आणि शिवगण तीं घरें उपटूं लागले असतां, तेथील दैत्यस्त्रिया, हे नाथ, अरे बापा, हे पुत्रा, हे कांत, हे प्रिया भ्रांत कां झालास, असे अनेक प्रकारचे, अमर्याद शब्द बोलूं लागल्या.

कलत्रपुत्रक्षयप्राणनाशे तस्मिन्पुरेदुर्धर्षेप्रवृत्ते॥ महासुरास्सागरतुल्यवेगा गणेश्वराः कोपवृताः प्रतीयुः॥३०

अर्थः— त्या प्रसंगीं त्रिपुरांत आपला व स्त्री पुत्र यांच्या प्राणनाशाचा दुर्धर समय प्राप्त झाला असतां, समुद्रा समान वेगवंत ते महा दैत्य व देव गणांतील प्रमुख हे सर्वही क्रोधानें व्याप्त होऊन अधिकच युद्धार्थ आले.

परश्वधैस्तत्रशिलोपलैश्च त्रिशूलवज्रोत्तमकंपनैश्च॥

शरीरसद्मक्षपणंसुघोरंयुद्धंप्रवृत्तंदृढवैरबद्धं ॥ ३१ ॥

अर्थः— आणि तेथें कुऱ्हाडी, मोठमोठ्या शिळा, पाषाण, त्रिशूळ, वज्रें, उत्तम गोफणगुंडे; किंवा फिरवून मारण्याचीं आयुधें, यानीं उभयसैन्यांतील वीर परस्परांचे शरीरांचा व घरांचा नाश करूं लागले; असें तें दृढवैरयुक्त महाघोर युद्ध चाललें.

अन्योन्यमुद्दिश्य विमर्दतांच प्रधावतांचैव विनिघ्नतांच ॥ शब्दोबभूवामरदानवानांयुगांतकालेष्विव सागरांतः ॥ ३२ ॥

अर्थः— त्या संग्रामांत परस्परांस मारण्याच्या इच्छेनें धांवून मारणारे देव व दानव यांच्या प्रलय काळांतील समुद्रांचे शब्दा प्रमाणें भयंकर शब्द होऊं लागला.

मार्गाःपुरेलोहितकर्दमालाः स्वर्णेष्टकास्फाटिक भिन्नचित्राः ॥ कृतामुहूर्तेनसुरवेनगंतुं छिन्नोत्तमांगांघ्रिकराः करालाः ॥ ३३

अर्थः— तसेच त्या त्रिपुरांतील मार्ग रक्ताच्या चिखलानें व्याप्त झाले; आणि ते मार्ग घरें मोडल्या मुळें सोन्याच्या विटा व स्फटिकाचीं फुटलेलीं चित्रें यानीं युक्त असून तुटलेलीं मस्तकें, पाय व हात यानीं भयंकर असे शिवगणानीं दोन घटिकांत सुखानें जाण्या विषयीं अशक्य केले.

कोपावृताक्षः सतुतारकाख्यस्संरव्येसवृक्षस्सगिरिर्निलीनः ॥ तस्मिन्क्षणेद्वारवरंरिरक्षोरुद्रं भवेनाद्भुतविक्रमेण ॥ ३४ ॥

अर्थः— तेणें करून तो तारकासुर कोपानें नेत्र आरक्त करून वृक्षां खालीं आच्छादित पर्वता सारिखा त्या युद्धांत दडाला; त्या क्षणीं त्रिपुराचें रक्षण करणाऱ्या तारकासुराचें श्रेष्ठ द्वार अद्भुत पराक्रमी शिवानें बंद केलें.

सतत्रप्राकारगलांश्चभूतान्छातन्महानद्भुत वीर्यसत्वः नचारचासेंद्रियगर्वदमः पुराद्विनिष्क्रम्य

ररासघोरं ॥ ३५ ॥

अर्थ- तेव्हां महान् अद्भुत पराक्रम व बळयानीं युक्त असून प्राप्त झालेल्या इंद्रियांच्या गर्वानें पूर्ण असा तो तारकासुर त्रिपुराच्या कोटावर चढलेल्या शिवाच्या भूत गणांस मारीत पुरांतून बाहेर निघून भयंकार शब्द करून तेथें संचार करूं लागला.

ततस्सदैत्योत्तमपर्वताभो यथांजसा नाग इवाभिमत्तः ॥ निवारितो रुद्ररथंजिघृक्षुर्यथार्णवस्स प्रतिचातिवेलः ॥ ३६ ॥

अर्थ- नंतर उत्तम पर्वता समान कांति युक्त असून मदोन्मत्त हत्ती सारिखा तो तारकासुर शिवानें मागें फिरविला तरीं तो मागें न जातांना अनायासानें शिवाचा रथ धरण्याच्या इच्छेनें मर्यादा उल्लंघन केलेल्या समुद्रासारिखा चालला.

शेषस्सुधन्वा गिरिशाश्च देवश्चतुर्मुखो यस्स त्रिलोचनश्च ॥ ते तारकाक्षाभिगतागताजो क्षोभं यथा वायुवशात्समुद्राः ॥ ३७ ॥

अर्थ- तेव्हां सुंदर धनुष्य धारण केलेला शेष, त्रिनयन शिवासहित ब्रम्हदेव हे तारकासुराच्या सन्मुख युद्धा विषयीं आले; आणि वायूच्या योगानें जसे समुद्र खवळतात तसे ते क्षोभ पावले.

शेषो गिरीशः सपितामहेशश्चो क्षुभ्यमाणस्स रथेंबरस्थः ॥ बिभेदसंधीषु बलाभिपन्नः कूजन्निनादांश्च करोति घोरान् ॥ ३८ ॥

अर्थ- आणि शेष व ब्रम्हदेव यां सहित आकाश मार्गांतील रथांत बसलेले महा बलिष्ठ शिव अत्यंत क्षुब्ध होऊन तारकासुराच्या अंग संधीचा भेद करून भयंकर सिंहनाद करूं लागले.

एकंतु ऋग्वेदतुरंगमस्य पृष्ठेपदं न्यस्य वृषस्य चैकं ॥ तस्थौ भवस्सोद्यतबाणचापः पुरस्य तत्संगमनीक्षमाणः ॥ ३९ ॥

अर्थ- त्या युद्ध प्रसंगीं एकपाय ऋग्वेदरूपी अश्वाच्या पृष्ठावर व

र व एक पाय नंदीचे पाठीवर ठेवून हातांत सज्ज केलेले धनुष्य, बा
ण घेऊन शिव त्या तिन्हीं पुरांचा एकत्र समागम होण्याची मार्ग प्रती
क्षा करीत राहिले.

तदाभवपदन्यासाद्द्वयस्यवृषभस्यच ॥ पेतुस्तना
श्चदंताश्चपीडिताभ्यांत्रिशूलिना ॥ ४० ॥

अर्थ- त्या कालीं ते अश्व व नंदी यांचे स्तन व दांत हे त्या त्रिशूल-
धारी शिवाच्या पायांचे भारानें पीडित झाल्या मुळें पडले.

ततः प्रभृतिचाश्वानांस्तनादंतागवांतथा ॥ गूढा
स्समभवंस्तेनचादृश्यत्वमुपागताः ॥ ४१ ॥

अर्थ- त्या दिवसा पासून घोड्यांचे स्तन व गायींस दांत हे गुप्त-
असते झाले; म्हणून ते बाहेर दिसत नाहींत.

तारकाक्षस्सुभीमाक्षोरौद्ररक्तांतरेक्षणः ॥ रुद्रांति
केसंरुद्धोनंदिनाकुलनंदिना ॥ ४२ ॥

अर्थ- नंतर स्वकुलास आनंद देणाऱ्या नंदीनें अतिभयंकर आरक्त
नेत्रादिक इंद्रियानीं युक्त तारकासुर शिवाच्या समोर कोंडला.

परश्वधेनतीक्ष्णेनसनंदीदानवेश्वरं ॥ तक्षयामास
वैतक्षाचंदनंगंधदोयथा ॥ ४३ ॥

अर्थ- आणि नंदीनें तीक्ष्ण कुऱ्हाडीनें दानवराज तारकासुरास प्रहा
र केला तो असा कीं, गंध देणारा सुतार जसा चंदन वृक्षास तोडतो तसा.

परश्वधहतःशूरः शैलादिश्शरभोयथा ॥ दुद्रावख
ड्गंनिष्कृष्यतारकाक्षोगणेश्वरं ॥ ४४ ॥

अर्थ- असा त्या कुऱ्हाडीनें पर्वतादिक प्रदेशांवरील लढीसरा याना
वाऱ्या पशूसारिखा शूर तारकासूर ताडित झाला असतां तो तरवार
उपसून नंदीचे अंगावर धांवला.

यज्ञोपवीतमादायचिच्छेदचनिनादच ॥ ततः-
सिंहरवोघोरश्शंखशब्दश्चभैरवः ॥ गणेश्वरैःकृ
तस्तत्रतारकाक्षेनिषूदिते ॥ ४५ ॥

अर्थ- तेव्हां नंदीनें यज्ञोपवीत घेऊन तारकासुराचा शिर-

-च्छेद करून सिंहनाद केला; नंतर असा नंदीनें तारकासुर मारला असतां, शिवगणांतील प्रमुख घंटाकर्णादिकानीं भयंकर सिंहनाद व शंखांचे शब्द केले.

प्रमथारसितंश्रुत्वावादित्रस्वनमेवच॥ पार्श्वस्थःस महापार्श्वंविद्युन्मालिंमयोब्रवीत्॥४६॥

अर्थ:- या प्रमाणें शिवगणांतील गर्जना व वाद्यांचे शब्द ऐकून मयासुर आपले बाजूस बसलेला, मोठ्या कुशींचा अशा विद्युन्मालि दैत्यास बोलतो.

बहुवदनवतांकिमेषशब्दोनदतांश्रूयति भिन्नसागराभः॥ वदवचनंतडिमालिकिं किमेतद्गणपालायुयुधुर्युर्गजेंद्राः॥४७॥

अर्थ:- कीं, हे विद्युन्मालिन् सिंहनाद करणारांचा, बहुमुखी दुभंग झालेल्या समुद्रा साररवा काय हा भयंकर शब्द ऐकण्यांत येत असून हे दिग्गजां समान शिवगणांतील प्रमुख नंदिकेश्वर प्रभृति वीर येऊन युद्ध करितात तेव्हां हें काय आहे तें सांग.

इतिमयवचनांकुशार्दितस्तंतडिमाली रविरिवांशुमाली॥ रणशिरसिसमागतस्सुराणां निजगादेदमरिंदमोतिहर्षात्॥४८॥

अर्थ:- या प्रमाणें मयासुराच्या वचनरूप अंकुशानें पीडित झालेला असून किरणांचे माळेनें युक्त सूर्य, यासमान तेजस्वी, विद्युन्माली रणभूमीत आला आणि देवांचें कर्म अति हर्षानें शत्रूंस दमविणारा तो विद्युन्माली मयासुरास बोलतो.

यमवरुणमहेंद्ररुद्रवीर्यस्तवयशसोंनिधिर्धीरितारकाक्षः॥ सकलसमरशीर्षपर्वतेंद्रोयुध्वायस्तपतिहितारकोगणेंद्रैः४९.

अर्थ:- कीं, नक्षत्रां सारिख्या नेत्रानीं युक्त तारकासुर, यम, वरुण, इंद्र व रुद्र यां सारखा पराक्रमी व धैर्यवान् असून तुझ्या यशाचा केवल निधीच होता; आणि जो सर्व संग्राम भूमींत महा पर्वता प्रमाणें निश्चल पणें राहून शिवगणांतील प्रमुख नंदीकेश्वर प्रभृति वीरांशीं लढून शोभतो.

मृदितमुपनिशाम्यतारकाख्यंरविदीप्तानलभीषणा-

यतास्यं ॥ हृषितस कलनेत्ररोमसत्वाः प्रमथास्तोय मुचोयथानदंति ॥ ५० ॥

अर्थ- तो सूर्य व प्रज्वलित अग्नि यां सारख्या भयंकर व लांब अशाने त्रानीं युक्त तारकासुर मरण पावला हें ऐकून शिवगण हर्षपूर्ण सर्व नेत्र, रोमांच व प्राण यानीं युक्त होत्साते पर्जन्य वृष्टि करणाऱ्या मेघां सारिखे गर्जना करीत आहेत.

इतिसुहृदोवचनंनिशम्यतत्वं तडिमालेस्समयस्सु वर्णमाली ॥ रणशिरस्यसितांजनाचलाभोजगदेवा क्यमिदंनवेंदुमालि ॥ ५१ ॥

अर्थ- असें मित्रवर्य विद्युन्मालि दैत्याचें सत्य भाषण श्रवण करून अ त्यंत काळ्या काजळाचे पर्वता सारिख्या कांतीनें युक्त असून सुवर्णमाला धारण करणारा तो मयासुर त्या रणभूमींत नूतन चंद्रा समान मालेनें-शोभायमान अशा विद्युन्मालि दानवास हें पुढील वाक्य बोलतो.

विद्युन्मालिन्मनः कालः साधितुंत्यवहेलया ॥ करो मिविक्रमेणेतत्पुरंव्यसनवर्जितं ॥ ५२ ॥

अर्थ- तें असें कीं, हे विद्युन्मालिन् प्रस्तुत हा काल हे ळनेनें स्वहित-साधनास अनुकूल नाहीं यास्तव मी आतां हें त्रिपुर पराक्रमानेंच रक्षितो.

विद्युन्माली ततः क्रुद्धोमयश्चत्रिपुरेश्वरः ॥ गणान्ज घ्नतुर्दीर्घविष्ठाःसहितास्तैर्महासुरैः ॥ ५३ ॥

अर्थ- असें बोलून नंतर त्रिपुराचा राजा मयासुर व विद्युन्माली हे अ तिदीर्घ शरीरी दैत्य, तिन्हीं पुरांतील मोठ्या असुरां सह वर्तमान शिव गणांस मारूं लागले.

येनयेन ततोविद्युन्मालीयातिमयश्चसः ॥ तेनतेन पु रंशून्यंप्रमथोपप्लुतंकृतं ॥ ५४ ॥

अर्थ- आणि ते विद्युन्माली व मयासुर हे ज्याज्या मार्गानें जात, त्या त्या मार्गानें शिवगणानीं घेतलेलें पुरलें त्यांजपासून परत घेऊन त्यांस-त्या पुरांतून बाहेर घालवून देत.

अथयमवरुण मृदंगघोषैः पणवडिंडिमझ्यास्वनप्रघो

षैः॥सकरतलपुटैश्च सिंहनादैर्भवमभिपूज्यसुरावत स्थुः॥५५॥

अर्थ- नंतर यम व वरुण यांचे मृदंग,पणव नामक वाद्य, ढंवडीनांवाचें वाद्य, धनुष्याची दोरी, त्यांचे घोष तळ हातांचे शब्द (टाळ्या) व सिंहनाद याणीं शिवाची पूजा करून सर्व इंद्रादिक देव सिद्ध होऊन पुनः युद्धास उभे राहिले.

संपूज्यमानोदितिजैर्महात्मभिः सहस्त्ररश्मि प्रतिमोजसैर्विभुः॥अभिष्टुतःसत्यरतैस्तपोधनैर्यथास्तशृंगाभिगतोदिवाकरः॥५६॥ इतिश्रीमत्स्यपुराणेत्रिपुरदाहेसप्तत्रिंशत्युत्तरशततमोऽध्यायः१३७

अर्थ- या प्रमाणें सहस्त्र किरणयुक्त सूर्यासमान तेजस्वी, महात्मे अदितीचे पुत्र देवयानीं समर्थ शिवाची उत्तम प्रकारें पूजा केली. यास दृष्टांत सत्याविषयीं तत्पर, तपच ज्यांचें धन असे ऋषी अस्ताचल पर्वताचे शिखरावर गेलेल्या सूर्याची स्तुति करितात तशी. इतिश्री मत्स्यपुराणे त्रिपुरदाहे तारकाक्षवधोनाम सप्तत्रिंशदुत्तर शततमोऽध्यायः॥१३७॥

अ०१३८ वा.

सूतउवाच॥तारकाक्षे हते युद्धेउत्सार्यप्रमथान्मयः॥ उवाचदानवान्भूयोभूयस्स तुभयावृतान्॥१॥

अर्थ- सूत बोलला ऋषीहो युद्धांत तारकासुर मरण पावला असतां मयासुरानें शिवगणांस त्रिपुरांतून घालवून तो भय भीत झालेल्या दानवांस वारंवार बोलतो.

भोसुरेंद्राधुनासर्वेनिबो धध्वंप्रभाषितं॥यत्कर्त्तव्यं मयान्वैवयुष्माभिश्चमहाबलैः॥२॥

अर्थ- कीं, असुर श्रेष्ठहो या काळीं म्या व तुम्हीं सर्वांनीं जें कर्तव्य आहे त्या विषयीं तुम्हीं माझें भाषणश्रवण करा.

पुष्यंसमेष्यत्येकाले चंद्रश्चंद्रनिभाननाः॥यदैकंत्रिपुरंसर्वंक्षणमेकंभविष्यति॥३॥ कुरुध्वंनिर्भयाःकाले कोकिलाशंसितेनच॥सकालःपुष्ययोगस्यपुरः

स्यचमयाकृत:॥ ४॥

अर्थ:- तें असें कीं, चंद्र मुख दैत्यहो ज्या कालीं पुष्यनक्षत्रावर चंद्र येईल, तेव्हां तिन्हीं पुरें क्षणमात्र एकत्र होतील; त्यावेळेस तुम्हीं निर्भय होऊन युद्ध करा. कारण तो पुष्यनक्षत्र योगावर तिन्हीं पुरें एकत्र होण्याचा काल म्यां कोकिल पक्ष्यांचे सांगण्या वरून केला आहे.

कालेतस्मिन्पुरेयस्तत्संभावयतिसंहतिं॥ सएनंकारयेच्चूर्णबलिनैकेषुणासुर:॥ ५॥

अर्थ:- आणि दुसरें असें आहे कीं, त्याच पुष्य योगाचे कालावर या तिन्हीं पुरांचा क्षणमात्र झालेला संयोग ध्यानांत आणून जो देव या त्रिपुरांवर बलिष्ठ एक बाण मारील; तोच यापुरांचें चूर्ण करील.

योधांप्राणोबलं यच्चयाववोवैरितासुरा:॥ तत्कृत्वा-त्हृदयेनैवपालयध्वमिदंपुरं॥ ६॥

अर्थ:- तसेंच दैत्यहो, वीरांचा पराक्रम, बल व वैरभाव हे सर्व आपलें साधन लक्षांत आणून तुम्हीं या त्रिपुरानें संरक्षण करा.

महेश्वररथंत्र्यंबकंसर्वप्राणेनभीषणं॥ विमुखीकुर्वता-स्यर्थेयथानोत्सृजतेशरं॥ ७॥

अर्थ:- तें असें कीं, पुष्य योगावर हीं तिन्हीं पुरें एकत्र होतील त्यावेळेस शिवानीं यापुरांवर बाणनसोडावा या साठीं तुम्हीं सर्व प्रकारें पूर्ण शक्तीनें भयंकर शिवरथास अतिशयें मागें फिरवा.

ततएवंकृतेस्माभिस्त्रिपुरस्यापिरक्षणे॥ प्रतीक्षिष्यंतिविवशा: पुष्ययोगंदिवौकस:॥ ८॥

अर्थ:- असा आपण त्रिपुरांचे रक्षणाविषयीं प्रयत्न केलाअसतां तेदेव चिंताग्रस्त होऊन त्या पुष्य योगाची मार्ग प्रतीक्षा करतील.

निशम्यतन्मयस्यै वं दानवास्त्रिपुरालया:॥ मुहुस्सिंहरवंकृत्वामयमूचुर्यमोपमा:॥ ९॥

अर्थ:- असें तें मयासुरानें भाषण ऐकून तें त्रिपुरवासी यमासारखे भयंकर दानव वारंवार सिंव्हनाद करून मयासुरास बोलतात.

प्रयत्नेनवयंसर्वेकुर्मस्तव प्रभाषितं॥ तथाकुर्मोय

थारुद्रोनमोक्ष्यतिपुरेशरं॥१०॥

अर्थः– कीं, हे मयासुरा, शिव, या त्रिपुरांवर ज्या रीतीनें बाण सोडणार नाहींत या रीतीनें सर्व आम्हीं तुझ्या वचना प्रमाणें प्रयत्नानें या पुराचें संरक्षण करूं.

अद्ययास्यामः संग्रामेतद्रुद्रस्यजिघांसवः॥कथयंति दितेः पुत्राहृष्टाभिन्नतनूरुहाः॥११॥

अर्थः– आणि त्यासाठीं हे दितिपुत्र दैत्य हर्षानें रोमांचित तनु होत्साते शिवास मारण्याच्या इच्छेनें आजच त्या संग्रामांत जाऊं असें म्हणतात.

कल्पंस्थास्यतिवारवस्थं त्रिपुरंशाश्वतं ध्रुवं॥अदानवं वाभविता नारायणपदत्रयं॥१२॥

अर्थः– आणि यांत आपला जय झाला असतां हें त्रिपुर कल्प पर्यंत – आकांशांत निश्चयानें निरंतर राहील; किंवा आमचा पराजय झाला तर या त्रैलोक्यांत दानव नाहींसे होतील.

वयंनधर्मंहास्यामो यस्मिन्प्रोक्षति नोभवान्॥अदेव तमदेत्यंवा लोकंद्रक्ष्यंतिमानवाः॥१३॥

अर्थः– तसेंच तूं आम्हांस ज्या धर्मांत घालशील त्या धर्माचा आम्हीं त्याग करणार नाहीं. मग त्यांत देव अथवा दैत्य यांचा नाश होऊन जसा लोक होईल तसा मानव पहातील.

इतिसंमंत्र्यहृष्टास्तेपुरांतर्विबुधारयः॥प्रदोषेमुदिता भूत्वाचेरुर्मन्मथचारतां॥१४॥

अर्थः– असा उत्तम संकेत करून ते देवांचे शत्रु दानव हर्ष पावले; – आणि प्रदोष काळीं आनंदयुक्त होऊन त्यांनीं कामचेष्टा (विषयांतील क्रीडा) आरंभिली.

मुहुर्मुक्तोदयोभ्रांतउदयाग्रंमहामणिः॥तमांस्युत्सा र्यभगवांश्चंद्रोज्जृंभतिसोंबरं॥१५॥

अर्थः– त्यांतील भाषणादिक प्रकार तो असा कीं, महामण्या सारखा भगवान् चंद्र उदयाचल पर्वताचे शिखरावरून स्पष्ट उदयास येऊन सर्व आकाश प्रकाशित करितो.

कुमुदालंकृतेहंसोयथासरसिविस्तृते ॥ सिंहोयथाचोप विष्टोवैडूर्यशिखरेमहान् ॥ १६ ॥ विष्णोर्यथाचविस्तीर्णे हारश्चोरसिसंस्थितः ॥ तथावगाढेनभसिचंद्रोत्रिनय नोद्भवः ॥ आजतेभा जयन्लोकान्सृजन्ज्योत्स्नारसंब लात् ॥ १७ ॥

अर्थ:- चंद्रविकासि कमलानीं सुशोभित अशा मोठ्या विशाल सरोवरांत जसा हंस शोभतो; पांच मण्यांचे पर्वत शिखरावर महान् सिंह जसा दिस- तो. विष्णूच्या विस्तीर्ण वक्षस्थलावर हार जसा शोभतो; तसा हा अत्रिऋ षीच्या नेत्रा पासून उत्पन्न झालेला चंद्र वृधिंगत होणाऱ्या कलांचे बलानें कांतिरूप रस सोडून सर्व लोकांस प्रकाशित करित होत्साता स्वतः शोभतो

शीतांशावुदितेचंद्रेज्योत्स्नापूर्णेपुरेसुराः ॥ प्रदोषेल- लितंचक्रुर्गृहमात्मानमेवच ॥ १८ ॥

अर्थ:- असा शीतल किरण चंद्र उदय पावला असतां, ते असुर चांदण्या नें पूर्ण झालेल्या त्रिपुरांत प्रदोषकाळीं आपले देह व घरें यांस अलंकृत करूं लागले.

रथ्यासुराजमार्गेषुप्रासादेषुगृहेषुच ॥ दीपाश्चंपकपुष्पा भानाल्पस्नेहप्रदीपिताः ॥ तदामठेषुतेदीपाः स्नेहपूर्णाः प्रदीपिताः ॥ १९ ॥

अर्थ:- तें असें कीं, गल्ल्या, राजमार्ग, देवालयें, राजवाडे, अवांतर घरें, व मठ यांत त्याकाळीं अत्यंत प्रीतीनें तेलानें पूर्ण, चांफ्याच्या फुलां सारखे कां ति युक्त असे दीप त्यानीं त्रिपुरांत लावले.

गृहाणिवसुमंत्येषांसर्वरत्नमयानिच ॥ ज्वलतोदीप यन्दीपाञ्चंद्रोदयमिवग्रहाः ॥ २० ॥

अर्थ:- आणि ते दानव धनसंपन्न असून सर्व रत्न खचित अशा आप ले घरांत देदीप्यमान दीप लावून तीं घरें प्रकाशित करिते झाले. यासदृ ष्टांत गुरु,शुक्रादिक ग्रह चंद्रोदयानें जसे अधिक शोभतात तसे.

चंद्रांशुभिर्भासमानमंतर्दीपैस्सुदीपितं ॥ उपद्रवैः कु लमिवपीयतेत्रिपुरेतमः ॥ २१ ॥

अर्थ- या प्रमाणें चंद्र कांतीनें प्रकाशित असून आंतून दीपानीं उत्कृष्ट शोभायमान झालें असतां, त्रिपुरांतील अंधकार नष्ट झाला; या विषयीं दृष्टांत असा कीं जसा अनेक उपद्रवानीं कुलाचे नाश होतात तसें.

तस्मिन्पुरेवैतरुणप्रदोषेचंद्राट्टहासेतरुणप्रदोषे॥
रत्यर्थिनो वैदनुजागृहेषुसहांगनाभिस्सुचिरंविरेमुः॥२२॥

अर्थ- नंतर चंद्राच्या पूर्ण प्रकाशानें युक्त त्रिपुरांत वृद्धिंगत झालेल्या-विषय वासनेनें पूर्ण अशा पूर्वरात्रीं ते दानव विलासाचे इच्छेनें स्त्रियांबरोबर-आपापले घरीं चिरकाल रमूं लागले.

विनोदितायेतुवृषध्वजस्यपंचेषवस्तेमकरध्वजेन॥
तत्रासुरेष्वासुरपुंगवेषुस्वांगांगनाःस्वेदयुताबभूवुः२३

अर्थ- कारण पूर्वीं मदनानें जे आपले पांच बाण शिवास मारले होते, ते पांच बाण त्रिपुरांतील असुरश्रेष्ठांत येऊन राहिले; तेव्हां सुंदरांगीं त्या दैत्यस्त्रिया, कामोत्पत्तीनें घर्म बिंदुयुक्त अंगानीं शोभूं लागल्या.

कलप्रलापेषुचदानवीनांवीणाप्रलापेषुचमूर्च्छितास्तु॥मत्तप्रलापेषुचकोकिलानांसचापबाणोमदनोममंथ॥२४॥

अर्थ- त्या काळीं दानवस्त्रियांचीं मंजुळ भाषणें, विण्याचे मधुरस्वर, वसंत काळीं पुष्परस प्राशनानें उन्मत्त झालेल्या कोकिळ पक्ष्यांचे सुंदर शब्द हीं कामोद्दीपनाचीं साधनें चाललीं असतां तेणेकरून मुर्च्छित अशा दानवांस मदन आपले पांच बाणानीं मंथन करूं लागला.

तमांसिनैशानिद्रुतंनिहत्यज्योत्स्नावितानेनजगद्वितत्य॥रवैरोहिणींतांचप्रियांसमेत्यचंद्रप्रभाभिःकुरुतेधिराज्यं॥२५॥

अर्थ- ते समयीं आकाशांत चंद्रानें आपले किरणाचे मंडलानें रात्रिसंबंधी अंधकाराचा त्वरेनें नाश करून सर्व जगांत प्रकाश केला; आणि-तो चंद्र मुख्य प्रिय रोहिणी नामक पट्टराणी जवळ येऊन शीतल किरणानीं नक्षत्र मंडलीं राज्य करितो.

स्थित्वैवकांतस्यतुपादमूले काचिद्वरस्त्रीस्वकपोलमूले ॥ धत्तेविशोकंरुदतीकरोति तेनाननंस्वंसमलंकरोति २६

अर्थ- नंतर कोणी एक सुंदर स्त्री, पतीच्या पादमूलाशींच बसून आपले गाल त्याचे पायांवर ठेवून प्रेम कलहानें रुदन करीत होत्साती आपले भर्त्यास शोक रहित करिते; तेणें करून त्या रुदनांतील काजळ युक्त प्रेमाश्रूनीं तिचें मुख कमल सुशोभित दिसतें.

दृष्ट्वाननंमंडलदर्पणस्थंमहाप्रभामेमुखजेतिजल्वा॥
स्मृत्वावरांगीरमणेरितानि नेनेवभावेनरतीमवाप॥२७॥

अर्थ- तशीच कोणी एक सुंदरांगी स्त्री वर्तुलाकार आरशांत आपलें मुख पाहून काय माझ्या मुखाची मोठी शोभा आहे असें वारंवार बोलून पतीचीं एकांतांतील नर्म युक्त विनोद संबंधीं भाषणें स्मरून त्याच भावानें मनांत आनंद पावली.

रोमांचितेर्गात्रवरैर्युवभ्योरतानुरागाद्रमणेनचान्याः
॥स्वयंद्रुतंयांतिमथाभिभूताः क्षपायथाचार्कदिनाव-
साने॥२८॥

अर्थ- आणि कोणी स्त्री आपले रोमांच युक्त सुंदर अवयवानीं तरुण पुरुषाचे मनो रंजना साठीं त्याशीं रत झाली; व कामो द्दीपनानें इंद्रिय निग्रहा विषयीं पराभव पावलेल्या इतर स्त्रिया मोठीनें आपापले पती कडे त्वरेनें चालल्या; यास दृष्टांत सूर्य सहित दिवसाचे समाप्ती समयीं रात्र जशी येते तश्या.

पेपीयतेचातिरसानुविद्धाविमार्गितात्राचप्रियंप्रसन्ना
॥काचित्प्रियस्यातिचिरात्प्रसन्ना आसीत्प्रलापेषुचसं
प्रसन्ना॥२९॥

अर्थ- विषय रसानें व्याप्त झालेली कोणी एक स्त्री पतीनें बहुत शोध करून आणिली असतां ती पतीस प्रसन्न होऊन त्या सह वर्तमान कामो द्दीपक अशा प्रिय रसाचें वारंवार अतिशयें प्राशन करूं लागली. आणि कोणी स्त्री आपले पतीस बहुत कालानें प्रसन्न होऊन ती-सुप्रसन्न मनानें त्याशीं गोड गोड गोष्टी सांगू लागली.

गोशीर्षयुक्तैर्हरिचंदनैश्च पंकांकिताक्षीरधरासुरीणां॥
मनोज्ञरूपा रुचिराबभूवुः पूर्णामृतस्येवसुवर्णकुंभाः ३०

अर्थ- आणि गोरोचन मिश्रित हरिचंदन नामक चंदनाचे गंधानें काढलेल्या नानाप्रकारच्या चिन्हांनीं युक्त असून वर्णानें सुंदर व आकृतीनें वर्तुल असे त्रिपुरांतील असुर स्त्रियांचें दुग्ध पूर्ण स्तन अमृतानें भरलेल्या सुवर्ण कलशां सारखे शोभत होते.

क्षताधरोष्ठाद्रुतदोषरक्ता लक्षंतिदैत्यादयितासुरक्ताः॥ तंत्रीप्रलापास्त्रिपुरेषुरक्ताः स्त्रीणांप्रलापेषु पुनर्विरक्ताः॥३१॥

अर्थ- तसेंच स्त्रियांचे अधरोष्ठांस चुंबन समयीं ज्यानीं क्षतें केलीं आहेत, कारण काम, क्रोधादि दोषांनीं शीघ्र अतिशयें लंपट होणारे असे दैत्य त्रिपुरांत विणा आदींकरून तंतु वाद्यें वाजवील असतां, ते पुनः त्या स्त्रियांच्या मधुर भाषणा विषयीं अधिकच आसक्त झाले.

क्वचित्प्रवृत्तंमधुराभिगानंकामस्यबाणैःसुकृतंनिधानं॥ आपानभूमीषुसुखप्रमेयंगेयंप्रवृत्तंलयसाधयंति॥३२॥

अर्थ- नंतर त्रिपुरांत मदनाचे पंच बाणानीं केलेलें उत्तम स्थान असें मधुरगायन कोठें कोठें चाललें, आणि मद्यादिक रस प्राशन करण्याचे स्थळीं सुखानेंच जाणण्यास योग्य अशा चाललेल्या गायनास कोणी- सारंगी आदीकरून वाद्यें व सुरभरणा इत्यादिक साधनानीं साहाय्य करूं लागले.

गेयंप्रवृत्तं लयशोधयंतिकेचित्प्रियांतत्रचसाधयंति॥
केचित्प्रियांसंप्रतिबोधयंतिसंबुध्यसंबुध्यचरामयंति॥३३

अर्थ- नंतर त्या चाललेल्या गायनास कोणी गुणदोषाचा विचार करितात, कोणी तेथें स्त्रीस विषयार्थ अनुकूल करून घेतात, कोणी आपल्ये प्रियेस मोठा मान देऊन बोध करितात. व अशा आदरानें वारवार बोधकरून त्यांस तेथें क्रीडेंत रमवितात.

चूतप्रसूनप्रभवः सुगंधः स्तूर्धगतेवेत्रिपुरेबभूव॥सम

मरोनूपुरमेखलानांशब्दश्चसंबाधतिकोकिलानां॥३४

अर्थ- त्या काळीं आंब्याच्या फुलांचा सुगंध सूर्यास्त झाला असतां त्रिपुरांत पूर्ण व्याप्त झाला; आणि तेथील स्त्रियानीं धारण केलेल्या पैंजण, तोरड्या व कंबर पट्टा या अलंकारांचे वस्त्रें व पानें यांच्या शब्दासहित जो नाद तो कोकिळांस ही कामोद्दीपन करित होता.

प्रियावगूढादयितोपगू ढाकाचित्प्ररूढांगरुहापिनारी॥

सुचारुबाष्पांकुरपल्लवानांनवांबुसिक्ताइवभूमिरासीत्॥३५

अर्थ- तशीच कोणी एक समीप रक्षण केलेल्या प्रियेस पतीनें आलिंगन केलें असतां, ती स्त्री सुंदर प्रेमाश्रूनीं युक्त होत्साती कोमल अंकुर व पानें यानीं युक्त असून नवीन पर्जन्याचे उदकानें सिंचित झालेल्या भूमीसारखी शोभली.

शशांकपादैरुपशोभितेषुप्रासादवर्येषुवरांगनानां॥ माधुर्यभूतोभरणामहांतःस्वनाबभूवुर्मदनेषुतुल्याः॥३६

अर्थ- त्याच प्रमाणें त्रिपुरांत चंद्रकिरणानीं सुशोभित अशा देवालयें व राजमंदिरें यांत माधुर्यरूप अलंकार युक्त मोठे गंभीर मदन बाणा सारखे चित्तास मोह उत्पन्न करणारे असे सुंदर स्त्रियांचे मंजुळ शब्द होऊं लागले.

पानेनखिन्नोदयितातिवेलंकपोलमाघ्रासिचकिंममेदं॥ आरोहमेश्रोणिमिमांविशालांपीनोन्नतांकांचनमेखलाढ्यां॥३७॥

अर्थ- तेव्हां कोणी एक स्त्री मद्य पानानें घर्म युक्त होऊन त्यानें ती चिर काल श्रमल्यावर तिचा पती तिच्या गालांचा वास घेत असतां, ती स्त्री भर्त्यास बोलली कीं, तूं असा बालका सारिखा माझे गालांचा वास काय घेतं स; असें जर तुझे मनांत कांहीं आलें असेल तर सोन्याच्या कंबर पट्ट्यानें सुशोभित असून पुष्ट व उंच अशा या माझ्या विशाल कंबरे वर बैस.

रथ्यासुचंद्रोदयभासितासुसुरेंद्रमार्गेषुचविस्तृतेषु॥ दैत्यांगनासूर्ध्वगताविभांतितारायथाचंद्रमसोदिवांते॥ ॥३८॥

अर्थ:- आणि चंद्रोदयानें प्रकाशित असून देव राज इंद्राचे अमरावती नगरी सारखे विस्तीर्ण अशा त्रिपुरांतील राजमार्ग व गल्ल्या यांत दैत्यस मुदायांत त्यांच्या स्त्रिया दिवस गेल्यावर चंद्रास भोंवतीं नक्षत्रां सारख्या शोभत होत्या.

घंटाट्टहासेषुच चामरेषु प्रेंखासुचान्या मदलोलभावा-
त् ॥ संदोलयंते कलसंप्रहासाः प्रोवाच कांची गुणसूक्ष्म
नादा ॥ ३९ ॥ अम्लान माल्यान्वित सुंदरीणां पर्याय एव
षोस्ति नहर्षितानां ॥ शूयंति वाचः कलधौत कल्पा वापी
षुचान्ये कलहंस शब्दाः ॥ ४० ॥

अर्थ:- तसाच त्रिपुरांत घंटांचा अतिशयें शब्द होत असतां, व दासदा सीचवऱ्या वारीत असतां, कोणी इतर स्त्रिया विषय मदानें विलासा विषयीं लंपट होऊन विनोदयुक्त मंजुळ हास्य करीत झोंपाळ्यावर झोंकेघेत बसल्या; त्यांत कोणी स्त्री कंबर पट्ट्याच्या रावामुळें सूक्ष्म स्वरानें बोलली कीं, टवटवीत पुष्पमालानीं शोभा युक्त सुंदर स्त्रियांचा विलासांतील हा सर्व पर्याय आहे. अशा त्या हर्ष युक्त स्त्रियांच्या सुवर्ण व रुपें यां सारख्या स्वच्छ सुंदर वाणी, तसेच बदक पक्ष्यांचे मधुर शब्द हे ऐक ण्यांत येत आहेत.

कांचीकलापश्चसहांगरागः प्रेंखासुतद्वासकृताश्चभा
वाः ॥ छिंदंति तासामसुरांगनानां प्रियालयान्मन्मथ-
मार्गणानां ॥ ४१ ॥

अर्थ:- अशा त्रिपुरांतील मदनाचे बाण धारण करणाऱ्या असुरस्त्रि यांचे सुशोभित कंबरपट्टा, अंगास लावलेली केशरादिक सुगंध द्रव्यें व झोंपाळ्यावर बसून पुरुषांशीं केलेल्या क्रीडेंतील स्त्रियांचे भाव हे सर्व ही त्यांच्या प्रिय पतींचे मनास वेध करितात.

चित्रांबरश्चोद्धृतकेशपाशाः संदोल्यमानाः शशभासु
रीणां ॥ सुचारुवेषाभरणोरुपेतस्ताराग णैर्ज्योतिरि
वासचंद्रः ॥ ४२ ॥

अर्थ:- आणि चमत्कारिक पदरानें युक्त अति सुंदर वेष व सुवर्ण पुष्पा

दिक आभरणानीं युक्त अशा असुरांच्या सुंदर स्त्रियांचे वेणीच्या वर्तुळा कार उंच बुचडा लीलेनें झोंके घेत असतां खालीं वर होतानां शोभत असे; कसा त्यास दृष्टांत सभोंवतीं नक्षत्रगणानीं सुशोभित मध्यें पूर्ण प्रकाश युक्त पूर्ण चंद्र जसा असतो तसा.

संदोलनादुच्छ्वसितैश्छिन्नसूत्रैः काचीप्रभ्रष्टैर्मणिभि
र्विप्रकीर्णैः॥ दोलाप्रभूमिस्तैर्विचित्रा विभातिचंद्रस्य--
पार्श्वोपगतैर्विचित्रा॥ ४३॥

अर्थ- या प्रमाणे त्या दैत्यसुंदरी झोंके घेत असतां, त्यानें अस्ताव्यस्त होऊन तुटलेल्या माळा व कंबर पट्ट्यांतून पडून पसरलेले मणि यानीं झोंपाळ्या खालची आसमंताद्भूमी, चंद्राचे सभोंवतीं ज्या नक्षत्रानीं त्या स अशा अंतरिक्ष लोकां सारिखी शोभली.

सचंद्रिके सोपवने प्रदोषे रुतेषु वृंदेषु च कोकिलानां॥
शरव्ययं प्राप्य पुरे सुराणां प्रक्षीणबाणो मदनश्चचार॥ ४४

अर्थ- नंतर चंद्रप्रभेनें शोभायमान त्रिपुरांतील उपवनांत उत्तररात्रीं कोकिल पक्ष्यांचीं वृंदें शब्द करीत असतां, त्या असुरांस निद्रा लागल्यावर आपले पंच बाणांचें बल आतां यांवर चालत नाहीं असें पाहून क्षीण बल झालेल्या बाणां सहित तो मदन तेथें उगाच इतस्ततः संचार करूं लागला.

इतितत्रपुरेमरद्विषाणांसपदिहिपश्चिमकौमुदीन
दासीत्॥ रणशिरसिपराभविष्यतां वैभवतुरंगैः कृत
संक्षया अरीणां॥ ४५॥

अर्थ- असे ते त्रिपुरवासी असुर निद्रेंत असतां तत्काल मागली प्रहर रात्र राहिली; तेव्हां युद्धांत पराभव पावणाऱ्या शत्रूंचा प्रायशः संहार केलेले ते इंद्रादिक देव शिवरथाचे अश्वांसह वर्तमान रण भूमीवर आले.

चंद्रोथकुंदकुसुमाकरहारवर्णो ज्योत्स्नावितानरहि
तोभ्रसमानवर्णः॥ विच्छायतांहिसमुपेक्षनभातित
द्वद्राज्यक्षयेधनपतिश्चनरोविवर्णः॥ ४६॥

अर्थ- नंतर कुंद पुष्पांच्या केलेल्या हारा समान शुभ्र वर्ण असा चंद्र-प्रातःकाळ समयीं चांदण्याचे समुदायानें रहितअसा होऊन वर्णानें अभ्रा सारिखा झाला तेणें करून तो कांतीहीन होत्साता, शोभेनासा झाला. यास दृष्टांत द्रव्यवान् पुरुष असून तो भाग्य क्षय झाला असतां निस्तेज झाल्यानें जसा शोभत नाही तसा.

चंद्रप्रभामरुणसारथिनाभिभूय संतप्तकांचनरथांगसमानबिंबः॥ स्थित्वोदयाग्रमुकुटे बहुरेव सूर्यो भात्यंबरेतिमिरतोयबहांतरिष्यन्॥ ४७॥ ॥ इतिश्रीमत्स्यपुराणें त्रिपुरदाहेष्टत्रिंशत्युत्तरशततमोऽध्यायः १३८

अर्थ- तदनंतर आपले अरुण नामक सारथ्याकडून चंद्रप्रभेस दूर करून तप्त सुवर्णा समान तेजस्वी असून आकृतीनें चक्राकार वर्तुल बिंबानें युक्त महान् सूर्य अंधकार रूप उदकास वाहाणाऱ्या रात्री प्रत तरून उदयाचळ पर्वताच्या अग्रभागाचे शिखरावर येऊन आकाशांत शोभला. इति श्री मत्स्यपुराणें त्रिपुरदाहे अष्टत्रिंशदुत्तरशततमोध्यायः १३८

अध्याय १३९ वा.

सूतउवाच॥ उदितेतु सहस्रांशौ मेरौ भासाकरे रवौ॥ नदद्देवकुलं कृत्स्नं युगांत इवसागराः॥ १॥

अर्थ- सूत बोलला ऋषीहो नंतर तेजाची केवळ खाणच असा सहस्रकिरण सूर्य मेरुपर्वतावर उदय पावला असतां, सर्व देवांचें मंडळ प्रलय काळचा सागरा प्रमाणें शब्द करूं लागलें.

सहस्रनयनोदेवस्ततः शक्रः पुरंदरः॥ सवित्तदः सवरुणास्त्रिपुरं प्रययोहरः॥ २॥

अर्थ- त्यानंतर दैत्य पुरांचा नाश करणारा सहस्र नेत्र युक्त इंद्र, कुबेर व वरुण यां सहवर्तमान शंकर त्रिपुरावर युद्धास निघाले.

तेनानाविधरूपाश्च प्रमथातिप्रमाथिनः॥ ययुः सिंहरवैर्घोरैर्वादित्रनिनदैरपि॥ ३॥

अर्थ- तेव्हां अनेक प्रकारचीं रूपें धारण करणारे अति बलवत्तर शिवा

चे पार्षदगण भयंकर सिंह नाद व रणवाद्यांचेही शब्द करीत त्रिपुरावर चाल०

ततोवादितवादित्रैश्चातपत्रैर्महाद्रुमैः॥ बभूवतद्बलं-
दिव्यंवनंप्रचलितंयथा॥ ४॥

अर्थ- पश्चात् वाजणारीं वाद्यें व छत्रें यानीं तें देवांचें सैन्य हालणाऱ्या मोठ्या वृक्षानीं युक्त अशा वनासारिखें दिसत होतें.

तदापतंतंसंप्रेक्ष्यरौद्रंरुद्रबलंमहत्॥संक्षोभोदानवें
द्राणांसमुद्रप्रतिमोबभौ॥ ५॥

अर्थ- त्या काळीं शिवाचें तें मोठें भयंकर सैन्य पाहून त्रिपुर वासि दानवांतील प्रमुखांस समुद्रा समान मोठा क्षोभ झाला.

तेचासीन्पट्टिशान्छक्तीः शूलदंडपरश्वधान्॥ शरास
नानिवज्राणिगुरूणिमुसलानिच॥ ६॥प्रगृह्यकोपर-
क्ताक्षाःसपक्षाइवपर्वताः॥ निजघ्नुः पर्वतघ्नायघना
इवतपात्यये॥ ७॥

अर्थ- आणि ते दानव हातांत तरवारा, पट्टिश, बर्च्या, शूल, दंड कुऱ्हाडी, धनुष्यें वज्रें मोठमोठीं मुसळें हीं आयुधें घेऊन क्रोधानें नेत्र लाल करून पंख युक्त पर्वतां सारखे आकाश मार्गीं उडाले आणि पर्वताचे पंख-तोडणाऱ्या इंद्रास उष्ण काळाचे अंतीं पर्जन्य वृष्टी करणाऱ्या मेघां सारखे प्रहार करूं लागले.

सविद्युन्मालिनस्तेवैसमयादितिनंदनाः॥मोदमा-
नास्समासेदुर्देवदेवैःसुरारयः॥ ८॥

अर्थ- तसेंच ते देवांचे शत्रु दानव, विद्युन्माली व मयासुर यां सहवर्तमान हर्षानें देवांतील प्रमुख जे शंकरादिक देव त्यांशीं युद्धार्थ आले.

मर्तव्यकृतबुद्धीनांजयेचानिश्चितात्मनां॥अबला
नांचमृत्यासीदबलावयवाइव॥ ९॥

अर्थ- ते असे कीं, बल हीन झाल्यामुळें जया विषयीं संशय युक्त बुद्धि झाल्यानें मरणा विषयीं मनांत निश्चय केलेल्या त्या असुरांची सेना शक्ति क्षीण झालेल्या हस्त पादादिक अवयवांचे समुदाया सारखी दिसूं लागली.

विगर्जंत इवांभोदा अंभोदसदृशत्विषः ॥ प्रयुद्धायु-
द्धकुशलाः परस्परकृतागसः ॥ १० ॥ धूमायंतोज्वलद्भि
श्च आयुधैश्चंद्रवर्चसैः ॥ कोपाद्वायुद्धलुब्धाश्चकुट्टयं
ते परस्परं ॥ ११ ॥

अर्थ- आणि ते दानव, सजल मेघां समान कृष्णवर्ण असून त्यां सारि-
खीच गर्जना करीत होते; आणि ते परस्परांचे अपराध केल्यामुळें कोपा
नें युद्धास प्रवृत्त झालेले युद्ध कुशल ते अग्नि सारखे दैत्य चंद्रा सारख्या
लख लखीत तेजःपुंज आयुधानीं अतिशयें प्रहार करून परस्परांस मारूं
लागले.

वज्राहताः पतंत्यन्ये बाणैरन्ये विदारिताः ॥ अन्येवि
दारिताश्चक्रैः पतंतिस्फुटधेर्जले ॥ १२ ॥

अर्थ- तेव्हां कोणी वज्र प्रहारानें ताडित होत्साते कोणी बाणानीं विदा
रण पावून व कोणी चक्रानीं छिन्नभिन्न झालेले असे हे सर्वही समुद्रांचे
उदकांत पडूं लागले.

छिन्नस्रग्दामहाराश्च प्रमृष्टांबरभूषणाः ॥ तिमिनक्रग
णेचैव पतंतिप्रमथासुराः ॥ १३ ॥

अर्थ- आणि आंगावर उत्तम वस्त्र भूषणें धारण केलेले असून ज्यां
च्या गळ्यांतील माळा, गोफ व हार हे तुटलेले असे शिवगण व त्रिपुरवा
सी दानव ते शंभर योजनें विस्तीर्ण तिमिनामक मत्स्य व मकरी यांच्या
समुदायानें व्याप्त अशा समुद्रांत पडले.

गदानांमुसलानांचतोमराणांपरश्वधां ॥ वज्रशूल-
र्ष्टिपातानांपट्टिशानांचसर्वलः ॥ १४ ॥ गिरिशृंगोपला-
नांचप्रेरितानांप्रमन्युभिः ॥ सजवानांदानवानांसधू-
मानांरविविषां ॥ आयुधानांमहानोघः सागरेऽपेप
तत्यपि ॥ १५ ॥

अर्थ- याच प्रमाणें त्या संग्रामांत अतिशयें रोषानें युद्ध करणारे वेगवंत
व धूम्रसहित अग्नि किंवा सूर्य यां समान तेजस्वी दानवानीं मारले त्या ग
दा, मुसळें, तोमर, कुऱ्हाडी, वज्रें, शूल, तरवार, पट्टिश व पर्वत शिख

रांचे धोंडे इत्यादिक आयुधांचा समुदाय समुद्रांत पडत होता.

प्रवृद्धवेगैस्तैस्तत्रसुरासुरकरेरितैः॥ आयुधैस्त्र
स्तनक्षत्रः क्रियतेसंक्षयोमहान्॥१६॥

अर्थ- तसाच त्या युद्धांत रधिगत झालेल्या वेगानें युक्त अशा देव, दैत्यांचे हातून सुटलेल्या आयुधानीं नक्षत्रेंही ज्यारणांत त्रस्त झालीं असा ते परस्परें संहार कारक महान् युद्धप्रसंग करित होते.

क्षुद्राणांगजयोर्युद्धे यथाभवतिसंक्षयः॥ देवासु
रगणैस्तद्वत्तिमिनक्रक्षयोभवत्॥१७॥

अर्थ- महागजांचे परस्पर युद्धांत हरिणादिक लहान प्राण्यांचा जसा क्षय होतो, तसा या देव, दानवांचे युद्धानें शतयोजन विस्तीर्ण तिमिनामक मत्स्य व सुसरी इत्यादिक समुद्र वासि जलचर प्राण्यांचा नाश झाला.

विद्युन्मालीचवेगेनविद्युन्मालीइवांबुदः॥ विद्यु
न्मालघनोन्मादोनंदीश्वरमभिद्रुतः॥१८॥

अर्थ- अशा त्या युद्धप्रसंगीं विद्युल्लतानीं शोभणाऱ्या मेघा समान उंचस्वरानें गर्जना करणारा असून विजांचे माळानीं युक्त सजल मेघा सारिखा कृष्णावर्ण तो विद्युन्माली दैत्य मोठ्या वेगानें नंदीच्या आंगावर धावला.

सतंसमोरिवदनंप्रनदन्वदतांवरः॥ उवाचयुधिशै
लाद्दिंदानवोंबुधिनिस्वनः॥१९॥

अर्थ- आणि तो समुद्रा सारखा शब्द करणारा असून वक्त्यांत श्रेष्ठ विद्युन्माली दानव मोठी गर्जना करून सूर्य तुल्य मुखानें शोभणारा व कैलास पर्वता सारखा शुभ्र देही अशा नंदीस बोलतो.

युद्धाकांक्षीतुबलवान्विद्युन्माल्यहमागतः॥ य-
दिविदानींमेजीवन्मुच्यसेनंदिकेश्वर॥ नविद्यु-
न्मालिहननं वचोभिर्युधिदानवः॥२०॥

अर्थ- कीं, हे नंदिकेश्वरा, महाबलाढ्य असून युद्धाची इच्छा करणारा दनुपुत्र मी विद्युन्माली तुझ्यासीं युद्धार्थ आलों आहें; तर आतां तूं-

माझे हातून जिवंत सुटत नाहींस; व विद्युन्मालीस संग्रामांत मारणें हें केवळ सुख पांडिल्यानें तुला साध्य होणार नाहीं.

तमेववादिनंदैत्यंनंदीशस्तपतांवरः॥उवाचप्रह
रंस्तत्रवाद्यलंकारवद्वचः॥२१॥

अर्थ- असें भाषण करणाऱ्या त्या विद्युन्मालि दैत्यास तपस्विश्रेष्ठ-असून वादी असातो नंदी त्या दैत्यास प्रहार करून त्या प्रसंगीं अलंकार युक्त भाषण करतो.

दानवाधर्मकामानांनैषोवसरइत्युत॥शक्तोहंतुं
किमात्मानंजातिदोषाद्विबृंहसि॥२२॥

अर्थ- तें असेंकीं, हे दानवा अधर्मा विषयीं जे प्रश्न आहेत, त्यांस ज्याचा हा अवसर नाहीं; तस्मात् मी अधर्मशीलास तुला मारण्यास समर्थ आहें तरीं तूं आपले असुर जातीच्या दुष्टस्वभावानें किती आपली स्तुती करितोस.

यदितावन्मयापूर्वंहतोसिपशुवद्यथा॥इदानीं-
वाकथंनामनहिंस्येक्रतुदूषणं॥२३॥

अर्थ- या विषयीं दुसरें असें आहे कीं, पूर्वी म्या अधर्म कारणानेंच तुला ज्यारीतीनें पशू सारिखा मारिला, तेव्हां यज्ञांस दूषित करणारा अशा अधार्मिकास तुला आतां मी कसा न मारीन.

सागरंतरतेदोर्भ्यांपातयेद्यो दिवाकरं॥सोपिमां
शक्नुयान्नैवचक्षुर्भ्यांसमवीक्षितुं॥२४॥

अर्थ- आणि हे दानवा तूं असें निश्चित समज कीं, जो स्वबाहुबलानें सागरांत तरेल; किंवा जो सूर्यास खालीं पाडील, तोही मला-नुसत्या डोळ्यानीं देखील पाहाण्या विषयीं समर्थ नाहीं.

इत्येवंवादिनं तत्रनंदिनंतन्निभोबले॥बिभेदे
केषुणादैत्यःकरेणार्कइवांबुदं॥२५॥

अर्थ- असें भाषण करणाऱ्या नंदीस बलानें त्याचे बरोबरीचा तो विद्युन्माली दैत्य एका बाणानें त्या रणभूमींत प्रहार करिता झाला. यास दृष्टांत सूर्य जसा किरणानीं मेघांचा भेद करितो तसा.

वक्षसस्सशरस्तस्यपपौरुधिरमुत्तमं ॥ सूर्यस्त्वा-
त्मप्रभावेणनद्यर्णवजलंयथा ॥ २६ ॥

अर्थ- तेव्हां तो विद्युन्मालीचा बाण, त्या नंदिकेश्वराच्या वक्षस्थलाचें उत्तम रक्त प्राशन करिता झाला; त्यास दृष्टांत सूर्य आपले किरणानीं नद्या व समुद्र यांचें उदक जसें प्राशन करितो; तसें.

सतेनस्वप्रहारेणप्रथमंचातिरोषितः ॥ हस्तेनवृ
क्षमुत्पाट्य चिक्षेपगजराडिव ॥ २७ ॥

अर्थ- तेसमयीं त्या विद्युन्माली दैत्याचे दृढ बाणप्रहारानें तो नंदी अतिक्रोधयुक्त होत्सातां हातानें वृक्ष उपटून विद्युन्माळीस गजाप्रमाणें मारिता झाला.

वायुनुन्नस्सचतरुश्शीर्णपुष्पोमहारवः ॥ विद्युन्मा
लिशरैश्छिन्नः पपातपतगेशवत् ॥ २८ ॥

अर्थ- तो नंदीनें मारलेला वृक्ष, वायूनें कंपित झाल्यामुळें फुलें गळून मोठा शब्द करीत विद्युन्मालीवर आला असतां, त्यानें आपल्या बाणानीं तोडिला तेव्हां तो वृक्ष गरुडच खालीं पडतो कीं काय असा पडला.

वृक्षमालोक्यतंछिन्नंदानवेनवरेषुभिः ॥ रोषमा-
हारयत्तीव्रंनंदीश्वरस्स्वविग्रहः ॥ २९ ॥

अर्थ- असा विद्युन्मालीनें तो वृक्ष तीक्ष्ण बाणानीं तोडिला हें पाहून वज्रदेही नंदीस मोठा राग आला.

सोद्यम्यकरमारावेरविशक्रकरप्रभं ॥ दुद्राव हंतुं-
सक्रूरंमहिषंगजराडिव ॥ ३० ॥

अर्थ- आणि तो नंदी त्या रणांत सूर्य व इंद्र यांच्या हस्तासमान तेजस्वी आपला हात वरकरून (जसा गजेंद्र रेड्यावर धांवतो) तसा क्रूर अशा विद्युन्माली दानवास मारण्या साठीं धांवला.

तमापतंतंवेगेनवेगवान्प्रसभंबलात् ॥ विद्युन्माली
शरशतैः पूरयामासनंदिनं ॥ ३१ ॥

अर्थ- तेव्हां तो महावेगवान् विद्युन्माली दैत्य बलयुक्त वेगानें आपणावर येणाऱ्या त्या नंदिकेश्वरास शंभर बाणानीं मोठ्याबलात्कारानें

वेध करिता जाहाला.

शरकंटकितांगोवैशैलादिस्सोभवत्पुनः॥ अरेगृ-
त्यरथंतस्यमहतः प्रययौजवान्॥ ३२॥

अर्थ- ते समयीं नंदी पुनः बाणांनीं अंगास कांटे रोंवल्या प्रमाणें-व्याप्त झाला असतां, तो त्या विद्युन्मालीचा रथ घेऊन मोठ्या वेगानें गेला.

विलंबिताश्वोविशिरोभ्रमितश्चरणेरथः॥ पपा-
तमुनिशापेनसादित्योकरथोयथा॥ ३३॥

अर्थ- त्या काळीं त्या रथाचे अश्व लोंबून कळस खालीं पडला, आणि नंदिकेश्वर त्या रथास आपल्या पायां खालीं फिरवीत असतां, (सूर्या सहित सूर्याच्या रथा प्रमाणें) तो रथ विद्युन्माली दानवासह वर्तमान-ऋषीच्या शापानें पडला.

अंतरान्निर्गतश्चैवमायायासदितेस्सुतः॥ आज-
घानतदाशक्त्याशैलादिंसमवस्थितं॥ ३४॥

अर्थ- त्या वेळेस तो दितिपुत्र विद्युन्माली दैत्य आपल्या आसुरी मायेनें त्या रथांतून निघाला, आणि त्यानें अग्रभागीं उभा राहिलेल्या नंदिकेश्वरास शक्तीनें प्रहार केला.

तामेवतुविनिष्क्रम्यशक्तिंशोणितभूषितां॥ विद्यु-
न्मालिंसमुद्दिश्यचिक्षेपप्रमथाग्रणीः॥ ३५॥

अर्थ- तेव्हां शिवगणांतील मुख्य नंदीनें ती शक्ती आपले आंगांतून काढून रक्तानें भरलेली तशीच ती विद्युन्मालि दानवास मारिली.

तयाभिन्नतनुत्राणोविभिन्नहृदयस्त्वपि॥ विद्यु-
न्माल्यपतद्भूमौवज्राहतइवाचलः॥ ३६॥

अर्थ- त्या शक्तीनें विद्युन्मालि दैत्याचें कवच व हृदय फुटून तो (इंद्राच्या वज्रानें फुटलेल्या पर्वता सारिखा) भूमी वर पडला.

विद्युन्मालिनिनिहतेसिद्धचारणकिन्नराः॥ साधु
साध्वितिचोत्क्रांतेपूजयंतउमापतिं॥ ३७॥

अर्थ- असा तो विद्युन्माली दैत्य मरण पावला असतां, सिद्ध, चारण व किन्नर हे हें बहुत उत्तम झालें असें म्हणून ते पार्वती पती शि

याची पूजा करिते झाले.

नंदिनासादितेदैत्ये विद्युन्मालीहतेमयः ॥ ददाहप्रमथानीकंवनमग्निरिवोद्धतः ॥ ३८ ॥

अर्थ- या प्रमाणें नंदीनें युद्धार्थ आलेला विद्युन्माली दैत्य मारिला असतां, मयासुर शिवाचे पार्षदगणांचे सैन्यास (प्रज्वलित झालेला अग्नी अरण्यास जाळितो) तसा जाळूं लागला.

शूलनिर्दारितोरस्कागदाचूर्णितमस्तकाः ॥ इषुभिर्गाढविद्धाश्चपतंतिप्रमथार्णवे ॥ ३९ ॥

अर्थ- ते समयीं त्या मयासुराच्या शूलानें ज्यांचीं हृदयें फुटलीं, गदेनें ज्यांचीं मस्तकें चूर्णित झालीं; व ज्यांचीं आंगें बाणानीं ताडित झालीं असे ते शिवाचे पार्षदगण समुद्रांत पडूं लागले.

अथवज्रधरोयमोर्थदस्सचनंदीसचषण्मुखोगुहः ॥ मयमसुरवीरसंप्रवृत्तंविविधुःशस्त्रवरैर्हतारयः ॥ ४० ॥

अर्थ- नंतर वज्र धारण करणारा इंद्र, यम, द्रव्य देणारा कुबेर, नंदिकेश्वर, कार्तिकस्वामी, यांनीं तारकासुर व विद्युन्माली हे दैत्य मारिले असूनही त्या कालीं तो मयासुर असुरांतील वीरांसह वर्तमान युद्धास प्रवृत्त झाला असतां ते इंद्रादिदेव त्या मयासुरास मोठ्या शस्त्रांनीं ताडन करूं लागले.

नागंतुनागाधिपतेःशतास्संमयोविदार्येषुवरैर्यमं तूर्णं ॥ मयंचवित्ताधिपतिंचविश्वाररशासमन्तांबुदवत्तदानीं ॥ ४१ ॥

अर्थ- तेव्हां इंद्राचा ऐरावत, इंद्र, यम व धनपती कुबेर यांस त्वरेनें तीक्ष्ण बाणानीं प्रहार करून तो मयासुर उन्मत्त सजल मेघासारखा गर्जना करिता जाहला.

ततश्शरैःप्रमथगणेश्चदानवाद्दाहताश्चोत्तमवेगविक्रमाः ॥ भृशानुविद्धास्त्रिपुरंप्रवेशितायथाशिवश्चक्रधरेणसंयुगे ॥ ४२ ॥

अर्थ- नंतर शिवगणानीं उत्तमवेग व पराक्रम यानीं युक्त दानवांस बाणानीं बळकट प्रहारकेले असतां, ते त्या बाणानीं अत्यंत ताडित होऊन आपल्या त्रिपुरांत गेले. यास दृष्टांत बाणासुराचे युद्धप्रसंगीं कृष्णासीं युद्ध करून शिवपराजित झाला तसें.

ततस्तुशंखानकभेरिमर्दलास्ससिंहनादाद्दनुपुत्रभंगदाः॥ कपर्दिसैन्ये प्रबभुः समंततोनिपात्यमानायुधिवज्रसंन्निभाः॥ ४३॥

अर्थ- तदनंतर शंख, मृदंग, नौबद मृदंगासारिखें वाद्य यांच्या शब्दांसहित युद्धांत पडणाऱ्या वज्रासमान भयंकर दानवांचा नाश करणारे असे देवांचे सिंहनाद अतिशयें शिवाचे सैन्यांत चहूंकडे होऊं लागले.

अथदैत्यपुराभावेपुष्ययोगोबभूवह॥ बभूवचापिसंयुक्तं तद्योगेनपुरत्रयं॥ ४४॥

अर्थ- नंतर त्या दैत्यांचे त्रिपुरांचा विनाशकाळ प्राप्त झाला असतां त्या कालीं पुष्य नक्षत्राचा योग आला तेव्हां त्या योगानें तिन्हीं पुरें एकत्र झालीं.

ततोबाणंत्रिधादेवस्त्रिदैवतमयंहरः॥मुमोच त्रिपुरेतूर्णंत्रिनेत्रस्त्रिपदाधिपः॥ ४५॥

अर्थ- नंतर तत्क्षणीं अग्नि, चंद्र व विष्णु यातीन देवता मिळून झालेला म्हणुनच मूळ, मध्य व अग्र या तीनस्थानीं तीन प्रकारचा असा बाण त्रैलोक्याधिपती त्रिनयन महादेवानीं अतित्वरेनें त्यात्रिपुरांवर सोडिला.

तेनमुक्तेनबाणेनबाणपुष्पसमप्रभं॥ आकाशं स्वर्णसंकाशंकृतंसूर्येणरंजितं॥ ४६॥

अर्थ- त्या शिवानें सोडलेल्या बाणाच्या तेजानें काळ्या कोरांटीचे पुष्पा समान नीलवर्ण आकाश सूर्य किरणानीं प्रकाशित असून स्वर्णासारिखें पीतवर्ण दिसूं लागलें.

मुक्तात्रिदैवतमयंत्रिपुरेत्रिदशः शरं॥ धिग्धि

इमामितिचक्रंदकष्टंकष्टमितिब्रुवन् ॥ ४७ ॥

अर्थ— असा तीन दैवत स्वरूप बाण त्रिपुरांवर सोडून हें फार वाईट झा लें, फार वाईट झालें तस्मात् मला धिक्कार असो धिक्कार असो असें शिव मोठ्यानें आक्रोश करूं लागले.

वैधुर्यंदेवतंदृष्ट्वाशैलादिर्गजवक्रतः ॥ किमिदंत्विति पप्रच्छशूलपाणिंमहेश्वरं ॥ ४८

अर्थ— असें शिवाचें दुःखपाहून नंदिकेश्वर गजासमान मोठ्या त्वरेनें शिवा कडे गेला. आणि हस्तांत त्रिशूल धारण करणाऱ्या महादेवास हें काय? असें विचारूं लागला.

ततःशशांकतिलकः कपर्दीपरमार्तवत् ॥ उवाच नंदिनंभक्तः समयोद्यविनंक्ष्यति ॥ ४९ ॥

अर्थ— नंतर जटाजूटानें सुशोभित चंद्रशेखर शिव, मोठ्या दुःखानें नंदिकेश्वरास बोलले कीं, तो त्रिपुरांतील आपला भक्त मयासुर आतां मरण पावेल.

अथनंदीश्वरस्तूर्णंमनोमारुतवद्बली ॥ शरेत्रिपुरमायातित्रिपुरंप्रविवेशसः ॥ ५० ॥

अर्थ— असें शिवाचें वचन ऐकिल्यावर तत्क्षणीं महाबलाढ्य तो नंदिकेश्वर, शिवानीं टाकलेला बाण त्रिपुरांवर येत असतां, मोठ्या त्वरेनें त्या त्रिपुरांत गेला.

समयंप्रेक्ष्यगणपः प्राहकांचनसन्निभः ॥ विनाशस्त्रिपुरस्यास्य प्राप्तोमयसुदारुणः ॥ ५१ ॥

अर्थ— आणि सर्व शिवगणांचें पालन करणारा, कांचनासमान पीतवर्ण तो नंदिकेश्वर, मयासुरास पाहून त्यास बोलला कीं, हे मयासुरा प्रस्तुत या त्रिपुरांस अत्यंत भयंकर नाश प्राप्त झाला आहे.

अनेनैवगृहेणत्वमपक्रामब्रवीम्यहं ॥ श्रुत्वातन्नंदिवचनंदृढभक्तोमहेश्वरे ॥ तेनैवगृहमुख्येनत्रिपुरादपसर्पितः ॥ ५२ ॥

अर्थ— यास्तव मी सांगतों कीं, तूं आतां याच घरासहित बाहेर नीघ; तेव्हां

असें तें नंदीचें वचन ऐकून महादेवाचा दृढभक्त तो मयासुर त्रिपुरांतील त्या मुख्य गृहासहित तत्क्षणीं बाहेर निघाला.

सोपीषुः पत्रपुटवद्दग्ध्वातन्नगरत्रयं ॥ त्रिधाइवहुताशश्च सोमो नारायणस्तथा ॥ ५३ ॥

अर्थ- नंतर शिवानें सोडलेला बाण ही तें त्रिपुर पानांच्या द्रोण्या सारखें जाळून तो बाण, अग्नि, चंद्र व नारायण या तिघां समान अति विचित्र तेजोमय शोभला.

शरतेजः परीतानि पुराणिद्विजपुंगवाः ॥ दुष्पुत्रदोषाद्दह्यंनेकुलान्यूर्ध्वंयथातथा ॥ ५४ ॥

अर्थ- त्या कालीं ब्राम्हणश्रेष्ठ हो त्या बाण तेजानें तीं तिन्हीं पुरें व्याप्त होऊन चहूंकडून जळत होतीं; यास दृष्टांत दुष्ट पुत्राच्या योगानें जशीं पुढलीं कुलें नाश पावतात, तशीं.

मेरुकैलासकल्पानिमंदराग्रनिभानिच ॥ सकपाटगवाक्षानिबलिभिः शोभितानिच ॥ ५५ ॥ सप्रासादानिरम्याणिकूटागारोत्कटानिच ॥ सजलानिसमाख्यानिसावलोकनकानिच ॥ ५६ ॥ बहुध्वजपताकानिस्वर्णरौप्यमयानिच ॥ गृहाणितस्मिंस्त्रिपुरेदानवानामुपद्रवे ॥ ॥ दह्यंतेदहनाभानि दहनेनसहस्रशः ॥ ५७ ॥

अर्थ- ते समयीं त्या दानवांस प्राप्त झालेल्या उपद्रवांत त्या त्रिपुरांतील अग्नी सारखीं देदीप्यमान हजारों घरें त्या बाणाच्या अग्नीनें जळूं लागलीं; तीं घरें अशीं कीं, मेरु व कैलास यां सारखीं सोन्याचीं व रुप्याचीं असून मंदराचलपर्वताचे शिखरासारिखीं उंच होतीं, आणि त्या घरांस मोठ मोठे दरवाजे व खिडक्या होत्या; त्यांत बलिष्ठ दैत्य राहात होते, त्या घरांत देवालयें व राजमंदिरें बहुत असल्यानें तीं घरें अत्यंत रमणीय व शिखर युक्त घरांनीं हीं उत्कृष्ट दिसत; तशींच तीं घरें जल पूर्ण असून सर्व प्रकारें प्रसिद्ध व अवलोकनास योग्य होतीं; आणि तीं घरें सोनें व रुपें यांचीं असून त्यांत बहुत ध्वज व पताका बांधल्या होत्या.

प्रासादाग्रेषुरम्येषुवनेषूपवनेषुच ॥ वातायनगता श्चान्याश्चाकाशस्थतलेषुच ॥ ५८ ॥ रमणैरुपगूढा श्वरमंत्योरमणैःसह ॥ दह्यंतेदानवेंद्राणामग्निनाद्य पिताःस्त्रियः ॥ ५९ ॥

अर्थ- तेव्हां त्रिपुरांतील देवालयें व राजमंदिरें यांच्या रम्य गच्च्या, वनें, उपवनें, खिडक्या व तेथील कोठें कोठें उघड्या प्रदेशांवर त्या दानवांच्या-स्त्रिया, पतीनीं आलिंगित केल्या होत्सात्या, आपापले भर्त्यांशीं रमत अ-सतां त्या सुंदरीस्त्रियाही अग्नीनें जळूं लागल्या.

काचित्प्रियंपरित्यज्य अशक्तागंतुमन्यतः ॥ पुरःप्रि यस्यपंचत्वंगताग्निवदनेक्षयं ॥ ६० ॥

अर्थ- त्यांतील कोणी एक स्त्री त्या अग्नि बाधेंत पतीस सोडून अन्यत्र जाण्यास असमर्थ झाली असतां, ती पती पुढेंच अग्नीच्या ज्वाळेंत जाऊ न मृत्यु पावली.

उवाचशतप त्राक्षीसास्त्राक्षीवकृतांजलिः ॥ हव्यवा हनभार्याहंपरस्यपरतापन ॥ धर्मसाक्षीत्रिलोकस्य नमांस्प्रष्टुमिहार्हसि ॥ ६१ ॥

अर्थ- तशीच कोणीएक कमलनयनास्त्री अग्नीच्या भयानें नेत्रांतून-अश्रुपात आल्यासारख्या अवस्थेनें युक्त होत्साती हात जोडून अग्नी स म्हणाली कीं, देवांस भाग पोंचविणाऱ्या व शत्रूंस ताप देणाऱ्या हे अ ग्निदेवा तूं त्रैलोक्याच्या धर्माचा साक्षी आहेस; तस्मात् तूं मला परस्त्री स स्पर्श करण्यास योग्य नाहींस.

शायितंचमयादेव शिवयाचशिवप्रभ ॥ परेणप्रे हिमुक्तेदं गृहंचदयितंहिमे ॥ ६२ ॥

अर्थ- याच प्रमाणें दुसरी कोणी एक स्त्री अग्नीस बोलली कीं, हे दे वा म्या पतिव्रतेनें आपले प्रियपतीस शय्येवर निजविलें आहे; आणि तुझी प्रभा तर परम कल्याण कारक आहे; तस्मात् माझें हें घर सोडून तूं अन्य मार्गानें जा.

एकापुत्रमुपादायबालकंदानवांगना ॥ हुताशन

समीपस्थाइत्युवाचहुताशनं ॥ ६३ ॥

अर्थ:- आणि एक दानव स्त्री समीप अग्नि आला असतां आपला बालक (पांचवर्षांचा पुत्र) जवळ घेऊन अग्नीस बोलली.

बालोयंदुःखलब्धश्चमयापावकपुत्रकः ॥ नार्हस्येनमुपादातुंदयितंषण्मुखप्रिय ॥ ६४ ॥

अर्थ:- कीं, हे अग्निदेवा म्या हा बालक बहुप्रयासानें संपादन केला आहे; आणि तुला जसा कार्तिक स्वामी प्रिय आहे, तसा हा पुत्र मला प्रिय आहे; तस्मात् तूं या माझे प्रिय बालकास जाळण्या विषयीं योग्य नाहींस

काश्चित्प्रियान्परित्यज्यपीडितादानवांगनाः ॥ निपतंत्यर्णवजलेशिंजमानविभूषणाः ॥ ६५ ॥

अर्थ:- तशाच कोणी दानव स्त्रिया अग्नीच्या ज्वालानीं पीडित झाल्या-असतां आपापल्या पतीस सोडून समुद्राचे उदकांत उड्याटाकून पडूं-लागल्या; तेव्हां त्यांच्या आंगावरील भूषणांचा शब्द होऊं लागला.

तातपुत्रेतिमातेति मातुलेतिचविव्हलं ॥ चकंपुस्त्रिपुरेनार्यः पावकज्वालवेपिताः ॥ ६६ ॥

अर्थ:- ते समयीं त्रिपुरांतील दानवस्त्रिया अग्नीच्या ज्वालानीं पीडित होऊन हे ताता, हे पुत्रा, हे जननी, हे मातुला (मामा) अश्या हाका मारून विव्हल होत्सात्या थरथरां कांपूं लागल्या.

यथादहतिशैलाग्निःसांबुजंजलजाकरं ॥ तथा-स्त्रीवक्त्रपद्मानिचादहत्त्रिपुरेनलः ॥ ६७ ॥

अर्थ:- पर्वत संबंधी वडवाग्नी जसा सर्व कमलांसहित कमलभूमीस-जाळितो, तसा तो त्रिपुरांवरील अग्नि, दानवस्त्रियांचीं मुखकमलें-जाळूं लागला.

तुषारराशिःकमलाकराणांयथादहत्यंबुजकानिशीते ॥ तथैवसोग्निस्त्रिपुरांगनानांददाहवक्त्रेक्षणपंकजानि ॥ ६८ ॥

अर्थ:- तसेंच शीतकालांत बर्फ जसें कमलभूमींतील सर्व कमलांस जाळतें; तसाच तो शिवाचा बाणसंबंधी अग्नि त्रिपुरवासी दानवस्त्रियां-

ची मुख कमलें व नेत्र कमलें यांस जाळूं लागला.

शराग्निपातात्समभिद्रुतानां तत्रांगनानामतिकोमलानां ॥ बभूव कांचीगुणनूपुराणामाक्रंदितानां च रवो तिमिश्रः ॥ ६९ ॥

अर्थः– आणि त्या कालीं त्या बाणांतील अग्नीच्या वृष्टीनें भिऊन इतस्ततः धांवणाऱ्या त्रिपुरवासी अतिकोमल दानव स्त्रियांचे कंबर पट्टा व पैंजण इत्यादिक अलंकारांचा शब्द त्यांचे रुदनाच्या स्वरानें मिश्रित असा होऊं लागला.

दग्धार्धचंद्राणि सवेदिकानि विशीर्णहर्म्याणि सतोरणानि ॥ दग्धानि दग्धानि गृहाणि तत्र पतंति रक्षार्थमिवार्णवौघे ॥ ७० ॥

अर्थः– नंतर जळून अर्धचंद्राकार राहिलेलीं त्या श्रीमंत दानवांचीं रमणीय, सुंदर भूमी व तोरणें यानीं सुशोभित अशीं तीं त्रिपुरांतील घरें उत्तरोत्तर अधिक जळून जळून तेथें समुद्राचे ओघांत अग्नी पासून आपले रक्षणार्थच काय पडत आहेत अशीं तीं सर्व घरें समुद्रांत-पडूं लागलीं.

गृहैः पतद्भिर्ज्वलनावलीढैरासीत्समुद्रे सलिलं प्रतप्तं ॥ कुपुत्रदोषैः प्रहतानु विद्धं यथा कुलं याति धनान्वितस्य ॥ ७१ ॥

अर्थः– तेव्हां अग्नीनें जळून तीं घरें अशीं समुद्रांत पडत असतां, तेणें करून समुद्रांतील उदक अतिशयें तप्त झालें. यास दृष्टांत (कुपुत्रांचे दोषांनीं धनिकांचें कुल याळो कीं नाशपावून पश्चात् त्याच दोषानीं व्याप्त होऊन तें कुल दुर्गतींत जातें.)

गृहप्रतापैः क्वथितं समंतात्तदार्णवे तोयमुदीर्णवेगं ॥ वित्रासयामास तिमीन्सनक्रां स्तिमिंगिलांस्तत्क्वथितांस्तथान्यान् ॥ ७२ ॥

अर्थः– त्या कालीं त्रिपुरांतील पडलेल्या जळत घरांच्या तप्ततेनें आसमंतात् समुद्रानें उदक कढून उकळ्या फुटून वेगानें वर येऊं लागलें;

तेणें करून तिमि व त्यांस गिळणारे ते तिमिंगिल या जातीचे मत्स्य, मकर शीव इतर जलचर प्राणी ते सर्वही त्रास पावले.

सगोपुरोमंदरपादकल्पः प्राकारवर्यस्त्रिपुरेचसो
थ॥ तैरेवसार्द्धंभवनैः पपातशब्दंमहांतंजनय-
न्समुद्रे॥ ७३॥

अर्थ:— नंतर वेशीव गोपुरें यांसहित मंदर पर्वताचे पायथ्यासारखा त्रिपुराचा कोट तेथील घरांसहवर्तमान मोठा शब्द उत्पन्न करीत समुद्रांत पडला.

सहस्त्रशृंगैर्भवनैर्यदासीत्सहस्त्रशृंगः सइवाच
लेशः॥ नामावशेषंत्रिपुरंप्रजज्ञेहुताशनाहार
बलिप्रयुक्तं॥ ७४॥

अर्थ:— या प्रमाणें त्रिपुरांतील जेव्हां हजारों शिखरांचे पडलेल्या घरानीं तो समुद्र सहस्त्रावधी शिखर युक्त मोठ्या पर्वतासारखा शोभूं लागला, तेव्हां त्रिपुर शिवाच्या बाणाचे आहारास बली सारखें योजलें गेलें; यामुळें तें केवळ नामानें अवशेष राहिलें.

प्रदह्यमानेनपुरेणतेनजगत्सपातालदिवंप्रत
प्तं॥ दुःखंमहत्प्राप्यजलावमग्नंयस्मिन्महान्सौ
धवरोमयस्य॥ ७५॥

अर्थ:— ते समयीं जळालेल्या त्या त्रिपुरानें पाताळ व स्वर्ग यां सहित सर्व जग अतिशयें तप्त झालें; असें महत् दुःख पावून त्या दानवांसहवर्तमान समुद्रांत बुडालें; परंतु त्यांत एक मयासुराचेंमात्र श्रेष्ठराजमंदिर राहिलें.

तद्देवेशोवचः श्रुत्वाइंद्रोवज्रधरस्तदा॥ शशापतद्गृहं
चापिमयस्यादितिनंदनः॥ ७६॥

अर्थ:— तेव्हां असें तें भाषण ऐकून वज्रायुध धारण करणारा देवराज- अदितिनंदन इंद्र त्या मयासुराचें घरासही शाप देता जाहला.

असेव्यमप्रतिष्ठंचभयेनचसमावृतं॥ भविष्यतिम
यगृहं नित्यमेवयथानलः॥ ७७॥

अर्थ:— तो असा कीं, तें मयासुराचें घर रहाण्यास अयोग्य होईल; का

रण त्या घराची क्षणमात्रही एकत्र स्थिती होणार नाहीं व तें अग्नी सारखें भयानें व्याप्त होईल.

यस्ययस्यतुदेशस्यभविष्यतिपराभवः॥ द्रक्ष्यंति त्रिपुरखंडं तत्रदेनाशगाजनाः॥ तदेतदद्यापिगृहंमयस्यामयवर्जितं॥ ७८॥

अर्थ:- आणि ज्या ज्या देशास विपत्ती प्राप्त होणार असेल, त्या त्या देशांतील नाशपावणारे लोक हें त्रिपुरांतील खंडरूप मयासुरानें घर पहातील तें मयासुरानें घर अद्यापि उपद्रव रहित यथास्थित आहे.

ऋषयऊचुः॥ भगवन्समयोयेनगृहेणप्रपलायितः॥ तस्यनोगतिमाख्याहिमयस्यचमसोद्भव॥ ७९

अर्थ:- शौनकादिक ऋषि बोलले; हे सूता, तो मयासुर ज्या घरा सहित त्वरेनें पळाला त्या मयासुराची पुढें काय गती झाली ती आम्हास सांग.

सूतउवाच॥ दृश्यतेदृश्यतेयत्रध्रुवस्तत्रमयास्पदं॥ देवद्विड्मयश्चातःसतदाखिन्नमानसः॥ ततश्च्युतोन्यलोकेस्मिंस्त्राणार्थंवैचकारसः॥ ८०॥

अर्थ:- नंतर सूत बोलला ऋषीहो जेथें ध्रुव दिसतो, तेथें तें मयासुराचें गृह दिसतें; आणि तो मयासुर देवांचा द्वेषी झाल्यामुळें त्या काळीं इंद्राचे शापानें तें त्रिपुरांतील राहिलेलें घर राहाण्यास निरुपयुक्त झाल्यानें मनांत खिन्न झाला; नंतर तेथून निघून आपले रक्षणार्थ त्यानें एक स्थान केलें.

तत्रापिदेवताःसंतिआप्तोर्यामाःसुरोत्तमाः॥ नत्राशक्तंततोगंतुंतच्चैकंपुरमुत्तमं॥ ८१॥ शिवःस्रष्टागृहंप्रादान्मयंचैवगृहार्थिनं॥ विररामसहस्राक्षः पूजयामासचेश्वरं॥ पूज्यमानंचभूतेशांसर्वेतुष्टुवुरीश्वरं॥ ८२॥

अर्थ:- तेथेंही आप्तोर्यामनामक उत्तम देवता आहेत, त्यालोकीं आपणास स्थान नाहीं यामुळें तेथें जाण्यास असमर्थ होऊन घराची इच्छा करणाऱ्या मयासुरास शिवानें एक पुर व त्यांत उत्तम गृह निर्माण करून दिलें; तेव्हां इंद्र

नें मयासुराचा द्वेष सोडून शिवाची पूजा केली, नंतर सर्व देव, प्राणिमात्रांचा स्वामी इंद्रानें उत्तमप्रकारें पूजित अशा शिवाची स्तुती करूं लागले.

संपूज्यमानंत्रिदशैःसमीस्यगणेर्गणेशाधिपतिं-
तुमुख्यं॥हर्षाद्भवल्गुर्जहसुश्चदेवाजग्मुर्ननर्दुस्तु
विषक्तहस्ताः॥८३॥

अर्थ- याप्रमाणें देवगणानीं नंदिकेश्वर प्रभृतिगणनायकांचा मुख्य-अधिपती जो शिव त्याची पूजा केली हें पाहून ते देव हर्षानें परस्पर संभाषण करून एकमेकांचे हात धरून हसत गर्जना करीत स्वस्थानीं गेले.

पितामहंवंद्यततोमहेशंप्रगृह्यचापंप्रविसृज्यभू
तान्॥रथाच्चसंपत्यहरेषुदग्धंक्षिप्तंपुरंतन्मकरा
लये च॥८४

अर्थ- नंतर देवानीं ब्रम्हदेवास नमस्कार करून शिवास बरोबर घेऊन धनुष्य झालेली देवता व शिवगण यांस निरोप दिला, आणि त्यानीं रथांतून उतरून शिवाच्या बाणानें दग्ध झालेलें त्रिपुर समुद्रांत टाकलें.

यइमंरुद्रविजयंपठतेविजयावहं॥विजयंतस्यकु
र्त्येषुददातिवृषभध्वजः॥८५॥

अर्थ- जो कोणी या विजय कारक शिवाच्या विजयाचें पठण करितो त्यास शंकर सर्व कार्यांत जय देतो.

पितृणांवापिश्राद्धेषुयइमंश्रावयिष्यति॥अनंतं
तस्यपुण्यंस्यात्सर्वयज्ञफलप्रदं॥८६॥

अर्थ- तसेंच पितरांचे श्राद्धांत जो हें रुद्रविजयाचें आख्यान ब्राम्हणांस श्रवण करवितो त्यास त्या श्राद्धानें सर्व यज्ञांचें फल देणारें अनंत पुण्य प्राप्त होतें.

इदंस्वस्त्ययनंपुण्यमिदंपुंसवनंमहत्॥इदंश्रुत्वा
पठित्वाचयांतिरुद्रसलोकतां॥८७॥

अर्थ- हें आख्यान कल्याण दायक व पुण्य कारक असून वंशांत पुत्र होण्यास कारण आहे; आणि जे याचें श्रवण किंवा पठन करितात ते शिवाच्या लोकास जातात. इतिश्री मत्स्यपुराणें त्रिपुरोपाख्यानें त्रिपुरदा-

हो नाम एकोनचत्वारिंशदुत्तर शततमोध्यायः ॥ १३९ ॥

अध्याय १४० वा.

ऋषयऊचुः ॥ कथंगच्छत्यमावास्यांमासिमासि दिवंनृपः ॥ ऐलः पुरूरवाः सूत तर्पयेतकथं पितॄन् ॥ एतमिच्छामहेश्रोतुंप्रभावंतस्य धीमतः ॥ १

अर्थ- ऋषी बोलले कीं, हे सूता इल राजाचा पुत्र पुरूरवा नामक प्रसिद्ध राजा प्रतिमासीं अमावास्येस स्वर्गास कसा जातो; व तो तेथें पितरांस कसा तृप्त करितो; ह्या त्या बुद्धिमान् राजाचा प्रताप आम्हीं श्रवण करण्यांस इच्छितों.

सूतउवाच ॥ तस्यचाहंप्रवक्ष्यामिप्रभावंविस्तरेण तु ॥ ऐलस्य दिविसंयोगंसोमेनसहधीमता ॥ २ ॥ सोमाच्चैवामृतप्राप्तिः पितॄणांतर्पणंतथा ॥ सोम्याबर्हिषदः काव्या अग्निष्वात्तास्तथैवच ॥ ३ ॥

अर्थ- नंतर सूत बोलला ऋषीहो त्या पुरूरवा राजाचा स्वर्गलोकीं महाबुद्धिमान् चंद्राशीं समागम आणि त्यास चंद्रापासून अमृताची प्राप्ति तसेंच सौम्य, बर्हिषद; काव्य व तसेंच अग्निष्वात्त यानावांचे पितरांची तृप्ति तो पुरूरवा कशी करितो ह्या त्या राजाचा सर्व पराक्रम विस्तारानें मी तुम्हांस सांगतों.

यदाचंद्रश्चसूर्यश्चनक्षत्राणांसमागतौ ॥ अमावास्यांनिवसतएकस्मिन्रथमंडले ॥ ४ ॥ तदासगच्छतिद्रष्टुंदिवाकरनिशाकरौ ॥ अमावास्याममावास्यांमातामहपितामहौ ॥ ५ ॥

अर्थ- तें असें कीं, ज्याकालीं चंद्र व सूर्य हे एकराशीचे नक्षत्रांवर येतात, त्या अमावास्येस चंद्र व सूर्य यांची दोनीं रथमंडलें एका समांतर स्थानावर असतात; त्या कालीं प्रति अमावास्येस तो पुरूरवा राजा मातामह सूर्य व पितामह चंद्र यांस पहाण्या साठीं जातो.

अभिवाद्यतुतौतत्रकालापेक्षः सतिष्ठति ॥ प्रचस्कंदततः सोममर्चयित्वापरिश्रमात् ॥ ६ ॥ ऐलः

पुरूरवाविद्वान्मासिश्राद्धचिकीर्षया॥ ततःस दिविसोमंवैत्स्वपतस्थेपितॄनपि॥७॥

अर्थ- आणि त्या उभयतांस नमस्कार करून तो राजा तेथें श्राद्ध कालाची मार्ग प्रतीक्षा करीत राहातो; नंतर इल राजाचा पुत्र ज्ञानी पुरूरवा तो प्रतिमासांतील श्राद्ध करण्याच्या इच्छेनें चंद्रासमीप येतो आणि महा प्रयासानें त्याची पूजा करून पश्चात् त्या स्वर्गलोकांत चंद्र व पितर यांचें ही उपस्थान (स्तवन) करीत राहातो.

द्विलवंकुहुमात्रंचतावुभौतुनिधायसः॥ सिनीवालीप्रमाणाल्प कुहूमात्रव्रतोदये॥८॥ कुहूमात्रंपितॄनुद्दिश्यज्ञात्वाकुहुमुपासते॥ तमुपास्यततः- सोमंकलापेक्षीप्रतीक्षते॥९॥

अर्थ- नंतर ज्या अमावास्येंत चंद्र दिसतो त्या सिनीवाली नांवाचे अमावास्ये सारखी अल्प कालाच्या प्रमाणानें युक्त असून ज्या अमावास्येंत चंद्रदर्शन होत नाहीं त्या कुहु नामक अमावास्येस पितरांचे व्रताचा उदय काल प्राप्त झाला असतां, दोन लव परिमित कुहूचे कालांत चंद्र व पितर यांस आसनावर बसवून त्या पितरांच्या श्राद्धाचे उद्देशाचा तो दोन लवमात्र कुहूचा काल जाणून तो पुरूरवा राजा त्या कुहू अमावास्येस चंद्राची उपासना करून त्या पासून अमृत कला प्राप्त होण्याच्या अपेक्षेनें तेथें असतो.

स्वधामृतंतुसोमाद्वैवसंस्तेषांचतृप्तये॥ दशभिः पंचभिश्चैवस्वधामृतपरिस्रवैः॥ कृष्णपक्षभु- जांप्रीतिर्दुह्यतेपरमांशुभिः॥१०॥

अर्थ- आणि तेथें राहून चंद्रापासून पितरांस देण्याचें अमृत त्यांचे तृप्त्यर्थ मिळवून तो राजा पितरांचें अमृत स्रवणारे उत्कृष्ट पंधरा चंद्र किरणानीं कृष्ण पक्षांत भोजन करणारे पितरांची तृप्ती करितो.

सद्योभिक्षरता तेनसौम्येनमधुनाचसः॥ निवा- पेष्वथदत्तेषु पित्र्येणविधिनातुवै॥११॥ स्वधा- मृतेनसौम्येनतर्पयामासवैपितॄन्॥ सौम्याब-

हिंषदः काव्या अग्निष्वात्तास्तथैवच ॥ १२॥

अर्थ- ती अशी कीं, त्या चंद्रकिरणा पासून तत्काल स्त्रवणाऱ्या त्या अमृतानें पितरांस श्राद्धविधीनें दिलेल्या दानांत तो पुरूरवा राजा, सौम्य बर्हिषद्, काव्य तसेच अग्निष्वात इत्यादिकपितरांस चंद्र संबंधीं पितृयोग्य अमृतानें तृप्त करितो.

ऋतुरग्निःस्मृतोविप्रैर्ऋतुंसंवत्सरंविदुः॥ जज्ञिरेऋतवस्तस्मादृतुभ्योह्यार्त्तवाभवन्॥ १३॥

अर्थ- ब्राम्हण अग्नीस ऋतु असें म्हणतात आणि त्या ऋतु नामक अग्नीस संवत्सर असें ही म्हणतात. त्या अग्नी पासून जे झाले ते ऋतु हें नाम पावलें व त्या ऋतूपासून जे झालें त्यास आर्तव असें म्हणतात.

पितरोर्त्तवोर्द्धमासाविज्ञेयाऋतुसूनवः॥ पितामहास्तुऋतवोह्यमावास्याब्दसूनवः॥ प्रपितामहाःस्मृतादेवाः पंचाब्दाब्रम्हणस्सुताः॥ १४॥

अर्थ- अग्निपुत्र ऋतूनामक पितरांचे पुत्रजे आर्तव नामें प्रसिद्ध आहेत ते कृष्ण पक्षाचे अभिमानी आहेत यांस पितर असें म्हणतात; आणि संवत्सर नामक अग्निपुत्र अमावास्येचे अभिमानी ऋतु नामक पितर आहेत त्यांस पितामह म्हणतात; व ब्रम्हदेवाचे पुत्र जे पंचाब्द नामक देव त्यांस प्रपितामह म्हणतात.

सौम्याबर्हिषदःकाव्या अग्निष्वात्ताइतित्रिधा॥ गृहस्थायेतुयज्वानोहविर्यज्ञार्त्तवाश्चये॥ स्मृताबर्हिषदस्तेवैपुराणेनिश्चयंगताः॥ १५॥

अर्थ- बर्हिषद नामक सौम्य, काव्य व अग्निष्वात असे तीन प्रकारचे पितर आहेत; त्यांत गृहस्थाश्रमी असून देवांच्या उद्देशानें जे यज्ञ यागादिक कर्मे करणारे आर्तव नामक पितर त्यांस पुराणांत निश्चयें करून बर्हिषद म्हटलें आहे.

गृहमेधिनश्चयज्वानो अग्निष्वात्तार्त्तवाःस्मृताः॥ अष्टकापतयःकाव्याःपंचाब्दांस्तुनिबोधत॥ १६॥

अर्थ- आणि गृहस्थाश्रमी असून जे देव पितरांचें यजन करणारे जे ऋ

तु पुत्र पितर त्यांस अग्निष्वात्त असें म्हणतात, व अष्टकानामक पितृकन्येचे जे पति त्या पितरांस काव्य हें नाम प्रसिद्ध आहे. त्यानंतर पंचाब्द पितर कोणते ते ऐका.

तेषु संवत्सरो ह्यग्निः सूर्यस्तु परिवत्सरः ॥ सोमस्त्विडुत्सरश्चैव वायुश्चैवानुवत्सरः ॥ १७ ॥ रुद्रस्तु वत्सरस्तेषां पंचाब्दा ये युगात्मकाः ॥ कालेनाधिष्ठितस्तेषु चंद्रमाः स्रवते सुधां ॥ १८ ॥

अर्थ— ते असे कीं, संवत्सर नामक अग्नि, परिवत्सर नामक सूर्य, इड्वत्सर नांवाचा चंद्र, अनुवत्सर नांवाचा वायु व वत्सर नामक रुद्र यांचे जे युगांत समय पर्यंत रहाणारे पंचाब्द नामक पितर आहेत. त्यांस अमृत प्राप्त होण्याविषयीं कालरूपी परमेश्वरानें स्थापन केलेला चंद्रमा अमृतास स्रवतो.

एते स्मृता देवकृत्याः सोमपाश्चोष्मपाश्च ये ॥ तांस्तेन तर्पयामास यावदासीत्पुरूरवाः ॥ १९ ॥

अर्थ— हे पूर्वीं सांगितलेले पितर, देवांसारखीं कार्यें करणारे आहेत, आणि सोमप व उष्मप जे पितर आहेत, तेथें पुरूरवा राजा यावत्काल पर्यंत असतो तों पर्यंत त्या सर्व पितरांस त्या अमृतानें तृप्त करितो.

यस्मात्प्रसूयते सोमो मासि मासि विशेषतः ॥ ततः स्वधामृतं तद्वै पितॄणां सोमपायिनां ॥ एतत्तदमृतं सोममवाप मधु चैव हि ॥ २० ॥

अर्थ— प्रतिमहिन्यास चंद्र, सोमपान करणारे पितरांस विशेषें करून जे व्हां त्यांस देण्या योग्य अमृतास प्रसवतो; तस्मात् तें मधुर अमृत चंद्रास प्राप्त होतें हें सिद्ध झालें.

ततः पीतसुधं सोमं सूर्योऽसावेकरश्मिना ॥ आप्याययते सुषुम्णेन सोमं तु सोमपायिनं ॥ २१ ॥

अर्थ— नंतर पितरानीं अमृत प्राशन केलेल्या सोमपान करणाऱ्या चंद्रास सूर्य आपल्या सुषुम्नानामक एक किरणानें कला वाढवून पूर्ण करितो.

निःशेषा वै कलाः पूर्वा युगपद्व्यापयन्पुरा ॥ सुषुम्णा

प्यायमानस्यभागंभागमहःक्रमात् ॥२२॥ कलाः
क्षीयंतिकृष्णास्ताःशुक्लाह्याप्याययंतिच ॥ एवंसा
सूर्यवीर्येणचंद्रस्याप्यायिताततनुः ॥ २३॥

अर्थ- ते असें कीं, पुनः पहिल्या सारखें पूर्वीच्या कला पूर्ण करण्यासा ठीं सूर्य आपल्या सुषुम्णा नामक किरणानें कलानीं वृद्धि पावणाऱ्या चंद्रा चा एकेक भाग दिवसांच्या क्रमानें एक कालीं व्याप्त करित जातो, तेव्हां- कृष्ण वर्ण कला कमी होऊन शुभ्रवर्ण तेजस्वी कला वृद्धिंगत होतात, या प्रमाणें सूर्याचे तेजानें तें चंद्रमंडळ कलानीं पूर्ण होतें.

पौर्णमास्यांसदृश्येतशुक्लःसंपूर्णमंडलः ॥ एवमा
प्यायितःसोमःशुक्लपक्षेष्वहःक्रमात् ॥ देवैःपी
तसुधंसोमंपुरापश्चात्पिबेद्रविः ॥ २४॥

अर्थ- आणि तो शुभ्रवर्ण, संपूर्ण मंडलानें युक्त चंद्र, पौर्णिमेस दिस तो. असा चंद्र शुक्लपक्षांत दिवसांचे क्रमानें वृद्धिंगत होतो. त्याच प्रमाणें कृ ष्ण पक्षांत देवानीं पूर्वी अमृत प्राशन केलेल्या चंद्राचें अमृत पश्चात् सू र्य ही प्राशन करितो.

पीतंपंचदशाहंतुरश्मिनैकेनभास्करः ॥ आप्याय्य
त्सुषुम्णेनभागंभागमहःक्रमात् ॥ २५॥

अर्थ- नंतर अशा रीतीनें कृष्णपक्षीं पंधरा दिवस देवपितरानीं ज्याचें- अमृत प्राशन केलें अशा चंद्रास सूर्य आपले सुषुम्णा नांवाच्या एका कि रणानें चंद्राचे सोळा भाग दिवसांच्या क्रमानें पूर्ण करितो.

सुषुम्णाप्यायमानस्यशुक्लावर्द्धंतिवैकलाः ॥ तस्मा
द्ध्रसंतिवैकृष्णाःशुक्लाह्याप्याययंतिच ॥ २६॥

अर्थ- या प्रमाणें सुषुम्णा नामक सूर्य किरणानें वाढणाऱ्या चंद्राच्या शु भ्रवर्ण तेजोमय कला शुक्लपक्षांत वाढतात, तेव्हां कृष्णवर्ण कला कमी हो ऊन शुभ्र कला वाढतात.

एवमाप्याय्यतेसोमःक्षीयतेचपुनःपुनः ॥ समृ-
द्धिरेवंसोमस्यपक्षयोःशुक्लकृष्णयोः ॥ २७॥

अर्थ- असा पुनः पुनः चंद्र शुक्लपक्षांत वृद्धिंगत होतो, व कृष्णपक्षीं

एकेक कलेनें क्षीण होत जातो; अशी कलांची क्रमानें ऱ्हास व वृद्धी चंद्रास शुक्ल व कृष्ण या पक्षांत आहे.

इत्येषपितृमान्सोमः स्मृतस्तद्वत्सुधात्मकः॥ कांतः
पंचदशैः सार्धसुधामृतपरिस्रवैः॥ २८॥

अर्थः- असा हा चंद्र अमृत रूप व तसाच पितरांचा राजा आहे; आणि जरा व मृत्यु यांचा नाश करून दिव्य देह धारण करणाऱ्या अमृतास-स्रवणाऱ्या पंधरा कलांचे भागांसहित अति सुंदर आहे.

अतःपरंप्रवक्ष्यामि पर्वणांसंधयश्चयाः॥ यथा-
ग्रथ्नंतिपर्वाणि आवृत्तादिक्षुवेणुवत्॥ २९॥

अर्थः- यानंतर मी तुम्हास पर्वांच्या संधीसांगतों; त्या अशाकीं, जसे वेळू सर्व दिशांत सभोंवतीं व्याप्त आहेत; तशींही पर्वें परस्परें गुंफली आहेत.

तथाब्दमासाः पक्षाश्चशुक्लाः कृष्णास्तुवैस्मृताः॥
पौर्णमास्यास्तयोभेदोग्रंथयः संधयस्तथा॥ ३०॥

अर्थः- तसेच वर्ष, महिनें, शुक्ल व कृष्ण हे पक्ष, पूर्णिमेचा जो भेद तश्या-त्या पर्वांच्या गांठी व संधी सांगतों.

अर्धमासस्यपर्वाणि द्वितीयाप्रभृतीनिच॥ अग्न्या
धानक्रियायस्मान्नीयंतेपर्वसंधिषु॥ ३१॥

अर्थः- तशींच अग्निस्थापनादिक कर्में पर्वांचे संधींत होतात; यास्तव शुक्ल व कृष्ण या उभय पक्षांचीं द्वितीयादिक पर्वें सांगतों.

तस्मात्तुपर्वणोत्याद्यो प्रतिपद्यादिसंधिषु॥ साया
न्हेअनुमत्याश्चद्वौलवौकालउच्यते॥ लवौद्वावेव
राकायाः कालोज्ञेयोपराण्हिकः॥ ३२॥

अर्थः- पूर्णिमा व अमावास्या यांचे प्रथम भागीं व प्रतिपदेच्या पूर्व संधींत पर्वकाळ आहे; तो असाकीं; चतुर्दशी सह जी अनुमती नांवाची पूर्णिमा तिचा जो सायंकाळीं दोन लव* परिमित काळ तो पर्वकाळ आहे; तसाच पूर्ण चंद्रोदयानें युक्त जी राकानामक पूर्णिमा तिच्या अपराण्हांतीं

---

* पांच क्षणाची एक त्रुटी, पन्नास त्रुटीचा एक लव.

ल जो दोनच लव परिमित काल तो पर्वकाल जाणावा.

प्रकृतिः कृष्णपक्षस्यकालेतीतेपराण्हिके ॥ सायाऱ्हेप्रतिपद्येषसकालः पौर्णमासिकः ॥ ३४ ॥

अर्थ- अपराण्हकाळीं पूर्णिमा संपल्यावर सायंकाळीं प्रतिपदेचा जो काल त्यास पौर्णमासिक काल असें म्हणतात; ही कृष्णपक्ष व यज्ञ यागादि कर्में यांची प्रकृती (मूल) आहे.

व्यतीपातेस्थितेसूर्येलेखाद्दूर्ध्वंयुगांतरं ॥ युगांतरोदितेचैवचंद्रेलेखोपरिस्थिते ॥ ३५ ॥ पूर्णमासव्यतीपातौयदापश्येत्परस्परं ॥ तौतुवैप्रतिपद्यावत्तस्मिन्कालेव्यवस्थितौ ॥ ३६ ॥ तत्कालंसूर्यमुद्दिश्य दृष्ट्वासंख्यातुमर्हसि ॥ सचैवसत्क्रियाकालः षष्ठकालोभिधीयते ॥ ३७ ॥

अर्थ- मध्यरेषे पुढें व्यतीपातावर सूर्य असतां तो काल युगांतर* नामक पर्वकाळ जाणावा. आणि त्या काळीं चंद्रही उदय पावून मध्यरेषेवर आला असतां त्यानें तो पर्वकाळ अधिक पुण्यकारक जाणावा. जेव्हां अपराण्हकाल पर्यंत पूर्णिमा असून पुढें सायंकाळीं प्रतिपदा असते तेव्हां व्यतीपात आला असतां तो पर्वकाळ समजावा. तसेंच ते चंद्र, सूर्य प्रतिपदा लागे तों पर्यंत व्यतीपात युक्त अमावास्येस असतात त्या कालचा सूर्य पाहून त्या पासून गणना करावी; आणि तेथून जो सहावा काल येईल तो उत्तम कर्में करण्यास योग्य आहे असें समजावें.

पूर्णेंदुः पूर्णपक्षेतुरात्रिसंधिषुपूर्णिमा ॥ तस्मादाप्यायतेनक्तंपौर्णमास्यांनिशाकरः ॥ ३८ ॥

अर्थ- चंद्र, कलानीं पूर्ण होण्याचे शुक्लपक्षांत रात्रींच्या संधींत चंद्र कलेनें पूर्ण होत जातो तो पूर्णिमेचे रात्रीं पूर्ण होतो म्हणून त्या तिथीस पूर्णिमा म्हणतात.

---

* युग बदललें असतां तो जसा पर्वकाल होतो त्या सारखा हा पर्वकाल म्हणून यास युगांतर नामक पर्व काल म्हटलें.

यदान्योन्यवतीपाते पूर्णिमांप्रेक्षतेद्विवा ॥ चंद्रादि
त्योपराण्हेतुपूर्णत्वात्पूर्णिमास्मृता ॥ ३९ ॥

अर्थ- ज्याकाळीं चंद्र व सूर्य हे दोहींकडे समांतर रेषेवर असतां, ते दिवसासच मध्यान्हापर्यंत चतुर्दशी असून पुढें अपराण्ह काळांत लागलेल्या पूर्णिमेस पहातात तेव्हां चंद्र पूर्ण होतो म्हणून तिला पूर्णिमा म्हणतात. त्या दिवशीं व्यतीपात आला तर तें महापर्व होतें.

यस्मात्तामनुमन्यंतेपितरोदैवतैः सह ॥ तस्मादनु
मतिर्नामपूर्णत्वात् पूर्णिमास्मृता ॥ ४० ॥

अर्थ- आणि त्या चतुर्दशीयुक्त पूर्णिमेस देवांसहित पितर बहुत मानितात. म्हणून तिला अनुमति म्हणतात; व ती पूर्णचंद्राचे योगानें पूर्णिमा नामानें प्रसिद्ध आहे.

अत्यर्थंराजतेयस्मात्पौर्णमास्यां निशाकरः ॥ रं
जनाच्चैवचंद्रस्य राकेतिकवयो विदुः ॥ ४१ ॥

अर्थ- तसाच तो चंद्र पूर्णिमेस पूर्ण मंडलानें अतिशयें शोभतो; व तो आपल्या कांतीनें सर्व लोकांचें मनोरंजन करितो यास्तव तिला राका म्हणतात.

अमावसेतामृक्षेतुयदाचंद्रदिवाकरौ ॥ एकापंचद
शीरात्रिरमावास्याततः स्मृता ॥ ४२ ॥

अर्थ- ज्या समयीं चंद्र व सूर्य हे एक नक्षत्रावर बरोबर वास करितात म्हणून कृष्ण पक्षांतील ती पंधरावी तिथी अमावास्या या नावानें प्रसिद्ध झाली.

उद्दिश्यताममावास्यांयदादर्शसमागतौ ॥ अन्यो-
न्यंचंद्रसूर्यौतुदर्शनाद्दर्शउच्यते ॥ ४३ ॥

अर्थ- ज्या काळीं चंद्र व सूर्य हे एकत्र राहाण्याचे इच्छेनें परस्परें भेटीस जवळ येतात, त्या अमावास्येस चंद्रसूर्यांचे परस्पर दर्शना मुळें- दर्श असें म्हणतात.

द्वौद्वौलवावमावास्यांसकालःपर्वसंधिषु ॥ द्व्यक्ष
रः कुहुमात्रश्चपर्वकालस्तुकसस्मृतः ॥ ४४ ॥

अर्थ- अमावास्येचे दिवशीं अमावास्या व प्रतिपदा यांचे पर्वाच्या संधींत अमावास्येचें शेवटले दोन लव व प्रतिपदेंतील आरंभींचे दोन लव मिळून हा दोन अक्षरांचा जो कुहु नामक काल तो पर्वकाल जाणावा.

दृष्टचंद्रात्वमावास्यामध्यान्हप्रभृतीहवै॥ दिवातदूर्ध्वंरात्र्यांतुसूर्येमासेतुचंद्रमाः॥सूर्येणसहसोऽनृच्छेत्ततःप्रातस्तनात्तुवै॥ ४५॥

अर्थ- चंद्रदर्शन युक्त चतुर्दशी सहित मध्यान्हा पासून लागलेल्या अमावास्येस प्रातःकाल पासून दिवसास आणि तदुत्तर रात्रीं ही चंद्र एक सारखा सूर्याचे बरोबर गमन करतो.

समागम्यलवौद्वौतुमध्यान्हान्निपतन्रविः॥ प्रतिपच्छुक्लपक्षस्यचंद्रमाःसूर्यमंडलात्॥ ४६॥ निर्मुच्यमानयोमध्येतयोर्मंडलयोस्तवै॥ सतदान्वाहुतेःकालोदर्शस्यचवषट्क्रियाः॥ एतदृतुमुखंज्ञेयममावास्यांतुपार्वणं॥ ४७॥

अर्थ- नंतर दुसरे दिवशीं चंद्र, सूर्य हे बरोबर येऊन मध्यान्हा नंतर दोन लव परिमित काल पर्यंत सूर्य आपले गतीनें चालत असतां, तितके कालांत चंद्रमा सूर्य मंडला पासून पुढें जातो; अशीं तीं चंद्र सूर्य मंडलें-परस्पर गतीनें भिन्न होतात, तेव्हां त्या मंडलांच्या मध्यें अंतर पडलें असतां ती शुक्लपक्षाची प्रतिपदा होत्ये त्या कालीं दर्श स्थालिपाकादिक इष्टींच्या अन्वाधान होमाचा तो काल जाणावा. आणि दर्शाच्या वषट्कार युक्त क्रियांचाही हाच काल आहे. ऋतूसही आरंभ येथूनच होतो; व दर्शाचें पार्वण श्राद्ध अमावास्येंत करावें.

दिवापर्वत्वमावास्यांक्षीणेंदौधवलेतुवै॥ तस्माद्दिवात्वमावास्यांगृह्यतेयोदिवाकरः॥ ४८॥ कुहेतिकोकिलेनोक्तंयस्मात्कालात्समाप्यते॥ तत्कालसंज्ञितात्वेषाअमावास्याकुहूःस्मृता॥ ४९॥

अर्थ- सूर्य अमावास्येस दिवसासच पहातो म्हणून शुभ्र चंद्र कला क्षीण झाला असतां अमावास्येचें पर्व दिवसासच आहे; आणि

अमावास्या ज्याकाली समास झाली त्या वेळेस कोकिल पक्ष्यानें कुह असा शब्द केला त्यावरून शेवटल्या भागाचे अमावास्येस कुहू असें म्हणतात.

सिनीवालीप्रमाणांतुक्षीणशेषोनिशाकरः॥ अमावास्याविशत्यर्के सिनीवालीतदास्मृता॥५०॥

अर्थ.- आतां सिनीवाली अमावास्येचा प्रकार असाकीं, चवदा कला क्षीण होऊन राहिलेल्या पंधराव्या कलेनें युक्त चंद्र तो ज्या अमावास्येस सूर्याजवळ जातो त्या अमावास्येस सिनीवाली हें नांव आहे.

अनुमतिश्चराकाचसिनीवालीकुहूस्तथा॥ एतासांद्विलवः कालः कुहूमात्राकुहूः स्मृता॥५१॥

अर्थ.- एक कलाहीन चंद्रानें युक्त जी पूर्णिमा ती अनुमती, पूर्णचंद्रसहित पूर्णिमा ती राका चंद्रदर्शन युक्त जी चतुर्दशी सहित अमावास्या ती सिनीवाली व चंद्र दर्शन रहित शुद्ध अमावास्या ती कुहू यासर्व तिथींचा शेवटला दोन लव परिमित जो काल तो पर्वकाल आहे; त्यांत अमावास्येच्या पर्वकालास कुहू हें नाम आहे. म्हणून अमावास्येस कुहू म्हणतात.

इत्येषपर्वसंधीनांकालोवैद्विलवः स्मृतः॥ पर्वाणांतुल्यकालस्तुतुल्याहुतिवषट्क्रियाः॥५२॥

अर्थ.- असा हा त्या सांगितलेल्या पर्वांचा संधिकाल दोन लव परिमितच आहे; आणि अवांतर पर्वांचा पर्वकाल समान आहे व या पर्व प्रयुक्त इष्टींच्या आहुती व वषट्कार युक्त क्रिया ही प्रायः सारख्याच आहेत.

चंद्रसूर्यव्यतीपातेसमेवैपूर्णिमेउभे॥ प्रतिपत्प्रतिपन्नस्तुपर्वकालोद्विमात्रकः॥५३॥

अर्थ.- चतुर्दशीसह पूर्णिमेस चंद्र, सूर्य युक्त व्यतीपात आला अ-

+ आठ निमेषांची एक मात्रा.

सतां, ती पूर्णिमा व शद्धपूर्णिमा या दोन्हीही तिथी समान आहेत; आणि प्र तिपदा युक्त जो पूर्णिमेचा अंत्यभाग त्यांत जो दोनमात्रा परिमित काल तो पर्वकाल आहे.

कालः कुहू सिनीवाल्योः समुद्दो द्विलवस्मृतः॥ अ-
र्कनिर्मंडलेसोमेपर्वकालः कलाःस्मृताः॥५४॥

अर्थ- चतुर्दशी युक्त अमावास्या व शद्ध अमावास्या यांचा जो शेवटला-दोनलव परिमित काल तो श्रेष्ठ पर्वकाल जाणावा; आणि त्या शद्ध अमावा स्येचे दिवशीं चंद्र, सूर्य मंडलापुढें गेला असतां, तो चंद्र त्यावेळेस जितक्या कला पुढें जाईल तितक्या त्या कला पर्वकाळ जाणावा.

यस्मादापूर्यतेसोमः पंचदश्यांतुपूर्णिमा॥ दशभिः
पंचभिश्चैवकलाभिर्दिवसक्रमात्॥५५॥ तस्मात्पं
चदशेसोमेकलावैनास्तिषोडशी॥ तस्मात्सोमस्य
विप्रोक्तः पंचदश्यांमयाक्षयः॥५६॥

अर्थ- तसाच शक्लपक्षांत प्रतिदिवसाचे क्रमानें पंधरावे दिवशीं पं धरा कलानीं पूर्ण होतो म्हणून त्या तिथीस पूर्णिमा म्हणतात. तस्मा त् वाढणाऱ्या पंधरा कळानीं युक्त अशा चंद्रमंडळांत वाढणारी सोळा वी कळा नाहीं; हे शौनका यास्तव त्या अमावास्येस चंद्राच्या पंधरा वे कलेचा क्षय क्रमानें तुजला सांगितला.

इत्येतेपितरोदेवाः सोमपाः सोमवर्द्धनाः॥ आर्त्त
वाऋतवोथाब्दादेवास्तान्भावयंतिहि॥५७॥

अर्थ- असे हे देव व पितर कृष्णपक्षीं चंद्राच्या अमृतकलांचें प्राश न करून पुनः तेच शक्लपक्षीं चंद्राच्या कलांची वृद्धि करतात, याप्र माणें आर्तव, ऋतु व पंचाब्द इत्यादिक पितर व देव यांस त्या चंद्रक-ला संरक्षण करितात.

---

* येथें सोळावी कला चंद्रास नाहीं असें सांगितलें तथापि चंद्रास सोळावी क ला आहे अशा अन्य प्रमाणावरून याची व्यवस्था अशी कीं क्षय किंवा वृद्धी हीं पंधरात कलांची होत्ये आणि एक कला चंद्रास निरंतरची आहे तिचा वृद्धिक्षय नाहीं.

अतः परंप्रवक्ष्यामिपितॄन्श्राद्धभुजस्तथे॥ तेषांग तिंचसत्त्वंप्राप्तिंश्राद्धस्यचैववहि॥ ५८॥

अर्थ- यानंतर श्राद्ध भोजन करणारे जे पितर आहेत ते त्यांची गति त्यां चें यथार्थ माहात्म्य व त्यांस श्राद्धाची प्राप्ति कशी होत्ये हें सर्व सांगतों.

नमृतानांगतिःशक्याज्ञातुंवापुनरागतिः॥ तपसा हिप्रसिद्धेनकिंपुनर्मांसचक्षुषा॥ ५९॥

अर्थ- जे मरण पावले त्यांची परलोकची गति व त्यांचें पुनः स्वलोकीं आगमन हें मोठ्या तपानेंही जाणण्यास अशक्य आहे तेव्हां तें चर्मचक्षू नीं समजणें असाध्य असें पुनः काय सांगावें.

अत्रदेवान्पितॄंश्चैतेपितरोलौकिकाः स्मृताः॥ तेषां तेधर्मसामर्थ्यात्स्मृताःसायुज्यगाद्विजैः॥ ६०॥

अर्थ- आणि या लोकचे पितर आपल्या किंवा स्वकीय वंशांतील पुत्र पौ त्रादिकानीं केलेल्या धर्माचे सामर्थ्यानें या प्रसंगीं सांगितलेले देव व पि तर यांचे लोकास जातात; असें मोठे ऋषींचें मत आहे

यदिवाश्रमधर्मेणप्रज्ञानेषुव्यवस्थितान्॥ अन्येचा त्रप्रसीदंतिश्रद्धायुक्तेषुकर्मसु॥ ६१॥

अर्थ- तसेच कोणी अन्य पितर आहेत ते या लोकीं जे लोक आपले आ श्रम धर्मानुरूप आस्तिक्य बुद्धीनें श्राद्धादिकर्मांत व ज्ञानमार्गांत ही वर्तता त त्यांस प्रसन्न होतात.

ब्रम्हचर्येणतपसायज्ञेनप्रजयाक्षवि॥ श्राद्धेन वि द्ययाचैवचान्नदानेनसप्तधा॥ ६२॥ कर्मस्वेतेषुयेस क्तावर्तत्यादेहपातनात्॥ देवैस्तेपितृभिः सार्द्धमू ष्मपैःसोमपैस्तथा॥ स्वर्गतादिविमोदंतेपितृमंतउ पासते॥ ६३॥

अर्थ- अष्टांगै ब्रम्हचर्य, तप (स्वधर्माचरण) ब्रम्हयज्ञ, संतति, श्राद्ध,

---

* विषयांचें स्मरण, त्या संबंधीं भाषण, स्त्रियांशीं विनोदादिक व्यापार करणें, स्त्रियांकडे पाहाणें, त्यांशीं गुह्य भाषण करणें, त्याविषयीं संकेत करणें, त्याविषयीं प्रयत्न करणें व मै थुन करणें हीं मैथुनाचीं आठ ही अंगें वर्ज करणें हें अष्टांग ब्रम्हचर्य समजावें.

विद्या व अन्नदान या सात प्रकारचे कर्मांत या पृथ्वीवर आदेह पात पर्यंत त त्पर असून जे हीं कर्मे यथासांग करितात ते आपल्या पूर्वजां सहित स्वर्ग लोकीं जाऊन देव, उष्मप व सोमप हे पितर यां जवळ बसून त्यां सह वर्तमान स्वर्गांत आनंद पावतात.

प्रजावतां प्रसिद्धैषा उक्ता श्राद्धकृतां चवै॥ तेषां निवापे दत्तं हि तत्कुलीनैस्तु बांधवैः॥ ६४॥ मासश्राद्धं हि भुंजानास्तेप्येते सोमलौकिकाः॥ एते मनुष्याः पितरो मासश्राद्धभुजस्तु वै॥ ६५॥

अर्थ- अशी ही संततीवंत श्राद्ध करणारे पितरांची प्रसिद्ध गती सांगितली, त्यांच्या कुलांतील पुत्रादिक बांधवानीं पितरांस दिलेल्या मास प्रयुक्त दर्शश्राद्धाचें भोजन करणारे जे पितर चंद्र लोकीं आहेत ते अमावास्येच्या दर्शश्राद्धाचें भोजन करणारे मनुष्यांचे पितर आहेत.

तेभ्योपरे तु येत्वन्ये संकीर्णाः कर्मयोनिषु॥ भ्रष्टाश्चाश्रमधर्मेषु स्वधास्वाहाविवर्जिताः॥ ६६॥ भिन्ने देहे दुरापन्नाः प्रेतभूता यमक्षये॥ स्वकर्माण्यनुशोचंतो यातनास्थानमागताः॥ ६७॥ दीर्घाश्चैवातिशुष्काश्च श्मश्रुलाश्च विवाससः॥ क्षुत्पिपासाभिभूतास्ते विद्रवंति त्वितस्ततः॥ ६८॥

अर्थ- आणि त्यांहून जे इतर कर्म योनींत असून कांहीं आपलीं व कांहीं दुसऱ्यांचीं अशीं मिश्र कर्मे करणारे व कोणी दुसरे आपल्या आश्रम धर्मा विषयीं भ्रष्ट होऊन देव व पितर यांस हविर्भाग न दिल्या मुळें ते मृत्यु पावल्यावर यमधर्माचे लोकीं प्रेत देहानें यातना भोगण्याचे स्थानांत (नरकांत) जाऊन इह लोकीं आपण केलेल्या दुष्कर्मांचा शोक करीत अतिशयें दुःख भोगतात तें असें कीं, दीर्घ शरीरी असून अत्यंत शुष्क आणि मस्तक व मुख यांस्थानीं केशानीं व्याप्त वस्त्रहीन निरंतर क्षुधा व तृषा यानीं अतिशयें पीडित असे ते इतः स्ततः फिरतात.

सरित्सरस्तडागानि पुष्करिण्यश्च सर्वशः॥ परान्नान्यभिकांक्षंतः काल्यमाना इत स्ततः॥ ६९॥

स्थानेषुपात्यमानायेयातनास्थेषुतेषुवै॥ शाल्म-
ल्यांवैतरिण्यांचकुंभीपाकेइ वालुके॥७०॥ असि-
पत्रवनेचैवघात्यमानाः स्वकर्मभिः॥तत्रस्थानांतु
तेषांवैदुःखितानामशायिनां॥७१॥ तेषांलोकांत-
रस्थानांबांधवैर्नामगोत्रतः॥भूमावसव्यंदर्भेषु
दत्ताः पिंडास्त्रयस्तुवै॥ प्राप्तांस्ते तर्पयंत्येव प्रेत-
स्थानेष्वधिष्ठितान्॥ ७२॥

अर्थ- तसेच या लोकीं विचार नकरितां सर्वत्र परान्नाची जे इच्छा करितात ते त्या पापानें यम लोकीं नद्या, बांधलेलीं सरोवरें, स्वाभाविक न बांधलेलीं तळीं, पुष्करणी इत्यादिक सर्व स्थानांत इतस्ततः धांवत असतां, त्यांस यमदूतांनीं त्या यातना भोगण्याचे स्थानांत टाकल्यावर कोठें सांवरीने वृक्षांवर, कोठें वैतरणी* नदींत, किंवा कुंभिपाकांत अथवा तापलेल्या वाळूचे नरकांत व तरवारींच्या पानांचे वनांत असे ते त्या त्या स्थानीं स्वकर्मांनीं निद्राहि क्षणमात्र न येतां दुःखें भोगितात; अशा त्या यमलोकीं अनेक दुःखें भोगणाऱ्या पितरांस त्यांच्या बांधवानीं या लोकीं त्यांचे नामगोत्रांचा उच्चार करून भूमीवर दर्भ पसरून त्यांवर अपसव्यानें तीन पिंड द्यावे; म्हणजे ते पिंड तेथें यमलोकीं प्राप्त होऊन त्यांस तृप्त करितात.

अप्राप्तायातना स्थानंप्रभ्रष्टायेचपंचधा॥ पश्चाद्ये
स्थावरांतेवै भूतानीकेस्वकर्मभिः॥७३॥नानारू-
पासुजातीनांतिर्यग्योनिषुमूर्तिषु॥यदाहाराभवंत्ये
तेतासुतास्विहयोनिषु॥७४॥तस्मिंस्तस्मिंस्तदाहा
रेश्राद्धंदत्तंतुप्रीणयेत्॥कालेन्यायागतंपात्रे विधि-
नाप्रतिपादितं॥ प्राप्नुवंत्यन्नमादत्तंयत्र यत्रावति-
ष्ठति॥७५॥

अर्थ- तसेच नरकस्थानांत न जातां जे रूपरसादिक पंचविषयांचे आसक्तीनें मोक्षमार्गांतून भ्रष्ट होऊन देव, गंधर्व, पितर, मनुष्य व असुर यांतील

---

*हा नदी, रक्त, पू, विष्ठा, मूत्र इत्यादि अमंगल पदार्थांस वाहणारी आहे.

ल योनींत जाऊन पश्चात् स्वकर्मानुसार वृक्ष पाषाणादिक स्थावरापर्यंत पंच भूतांचे योनींत उत्पन्न होतात; त्यांत अनेक पशु पक्ष्यादि जातींत नाना प्रकारच्या शरीरानीं ते पितर उत्पन्न झाले असतां, त्यांचा जो आहार असेल तो आहार त्यांचे पुत्रादिकांनीं श्राद्ध केलें असतां तें त्या योनींत त्यांस पोंचवून तृप्त करितें तें असें कीं, श्राद्धाचे उक्तकाळीं न्यायानें मिळालेलें अन्न सत्पात्र ब्राम्हणास विधीनें दिलें तर तें अन्न ते पितर ज्या योनींत असतील तेथें त्या आहाराच्या रूपानें त्यांस प्राप्त होतें.

यथागोषुप्रनष्टासु वत्सो विंदति मातरं ॥ तथाश्राद्धेषु दृष्टांतो मंत्रः प्रापयते तु तं ॥ ७६ ॥

अर्थ- एकादी मालकाची गाय गायींचे कळपांत वगैरे चुकली असतां तिचें वांसरूं जसें तिला शोधून काढितें तसा श्राद्धांतील मंत्र ते पितर कोठें ही असले तरीं त्यांस तो भाग पोंचवितात.

एवंत्वविकलं श्राद्धं श्रद्धादत्तं मनुब्रवीत् ॥ सनत्कुमारः प्रोवाच पश्यन्दिव्येन चक्षुषा ॥ ७७ ॥ गतागतज्ञः प्रेतानां प्राप्तिं श्राद्धस्य चैव हि ॥ कृष्णपक्षस्त्वहस्तेषां शुक्लः स्वप्नाय शर्वरी ॥ ७८ ॥

अर्थ- असें भक्तिपूर्वक आस्तिक्य बुद्धीनें केलेलें श्राद्ध सांग होतें असें मनूचें वाक्य आहे आणि भूत भविष्य जाणणारा सनत्कुमार ही ज्ञानचक्षूनें पाहून याला कीं मरण पावलेल्या पितरांस याच रीतीनें श्राद्ध प्राप्त होतें- असेंच बोलला आहे त्या पितरांचा दिवस कृष्णपक्ष व त्यांस निद्रे विषयीं रात्र शुक्लपक्ष आहे.

इत्येते पितरो देवा देवाश्च पितरश्च वै ॥ अन्योन्यपितरो ह्येते देवाश्च पितरो दिवि ॥ ७९ ॥ एते तु पितरो देवा मनुष्याः पितरश्च ये ॥ पिता पितामहश्चैव तथैव प्रपितामहः ॥ ८० ॥ इत्येष विषयः प्रोक्तः पितॄणां सोमपायिनां ॥ एतत्पितृमहत्वं हि पुराणे निश्चयं गतं ॥ ८१ ॥

अर्थ- असे हे पितर देव आहेत व जे देव ते ही पितर आहेत तेव्हां ते स्वर्गी

तील देव व पितर परस्परांचे देव आणि पितर ही होतात; हे पितर देवजातीचे आहेत; तसेच या लोकीं मृत झालेले पिता, पितामह (आजा) व प्रपितामह (पणजा) इत्यादिक पितर ते मनुष्य जातीचे पितर जाणावे; असा हा सोमपान करणारे पितरांचा विषय म्यां तुला सांगितला पितरांचें असें माहात्म्य पुराणांत निश्चयें करून प्रसिद्ध आहे. तस्मात् या विषयीं संदेह नाहीं.

इत्येषसोमसूर्याभ्यामैलस्यचसमागमः॥ अ
वाप्तिःश्रद्धयाचैवपितृणांचैवतर्पणं॥८२॥ पर्वणां
चैवयःकालोयातनास्थानमेवच॥ समासात्कीर्ति
तस्तुभ्यं सर्गएषःसनातनः॥८३॥

अर्थ- या प्रमाणें चंद्र सूर्याशीं इळा पुत्र पुरूरवा राजाचा हा समागम पितरांस भक्तीनें श्राद्धाची प्राप्ति तेणें करून त्यांची तृप्ती पर्वाचा काल व यातना होण्याचें स्थान हा मूळ सृष्टिरचनेचा क्रम हें सर्व तुला संक्षेपानें सांगितलें.

वैरूप्यंयेनतत्सर्वं कथितंत्वेकदेशिकं॥ अशक्यंप
रिसंख्यातुंश्रद्धेयंभूतिमिच्छता॥ ८४॥ स्वायंभु
वस्यदेवस्यएषसर्गोमयेरितः॥ विस्तरेणानुपूर्व्या
च्चभूयःकिंकथयामिवः॥८५॥

अर्थ- तें असें कीं, जेणें करून हें सर्व चराचर अनेक प्रकारचें जग एकांशानें सांगितलें; कारण या विश्वाची सर्वांशानें गणना करण्यास कोणी समर्थ नाहीं; तस्मात् ज्यास ऐश्वर्याची इच्छा आहे त्यानें यावर विश्वास ठेवावा; असा हा स्वायंभुव मनूच्या सृष्टीचा विस्तार म्यां क्रमानें तुला सांगितला; आतां मी तुम्हास पुढें काय कथन करूं. इतिश्रीमत्स्यपुराणे मन्वंतरानुकीर्तने श्राद्धकीर्तनोनाम चत्वारिंशदुत्तर शततमोध्यायः॥१४०॥

अध्याय १४१ वा.

ऋषयऊचुः॥ चतुर्युगानियानिस्युःपूर्वेस्वायंभु
वेंतरे॥ एषांनिसर्गसंख्यांचश्रोतुमिच्छामविस्तरा
त्॥१॥

अर्थ- शौनकादिक ऋषी बोलले हे सूता प्रथम स्वायंभुव मन्वंतरांत कृत, त्रेता, द्वापार आणि कली या चार युगांचा स्वभाव व संख्या हें आम्हीं विस्तारानें श्रवण करण्यांस इच्छितों.

सूतउवाच॥ पृथिवीद्युप्रसंगेनमयातुप्रागुदाहृतं॥ एतच्चतुर्युगंत्वेवंतद्वक्ष्यामिनिबोधत॥ तत्प्रमाणंप्रसंख्यायविस्तराच्चैवकृत्स्नशः॥२॥

अर्थ- नंतर सूत बोलला ऋषी हो पूर्वी पृथ्वी व आकाशांतील चंद्र सूर्यादिक लोकांच्या वर्णनाचे प्रसंगानें पूर्वी ज्या कृतादिक चार युगें सांगितलीं त्यांचें सर्व प्रमाण मी गणना करून विस्तारानें सांगतों तें तुम्हीं ऐका.

लौकिकेनप्रमाणेननिष्पाद्याब्दंतुमानुषं॥ तेनापीहप्रसंख्यायवक्ष्यामितुचतुर्युगं॥३॥

अर्थ- तें असें कीं, मनुष्य लोकचे प्रमाणानें वर्षाचें मान साधून त्यानें-गणना करून चारी युगांचें प्रमाण सांगतों.

काष्ठानिमेषादशपंचचैवत्रिंशच्चकाष्ठांगणयेत्कलांतु॥ त्रिंशत्कलाश्चैवभवेन्मुहूर्तस्तैस्त्रिंशतारात्र्यहनीसमेते॥४॥

अर्थ- तें असें किं, पंधरा निमेषांची एककाष्ठा, तीस काष्ठांची एककला, तीस कलांचा एक मुहूर्त होतो त्या तीस मुहूर्तांत रात्र व दिवस हे दोन भाग क्रमानें एकापुढें एक सारखे आहेत

अहोरात्रेविभजतेसूर्योमानुषलौकिके॥ रात्रिः-स्वप्नायभूतानांचेष्टायैकर्मणामहः॥५॥

अर्थ- त्या मनुष्यलोकचे रात्र, दिवस यांचा विभाग सूर्य करितो त्याभागांत रात्र ही प्राण्यांस निद्रे साठीं कल्पिली व दिवस त्यांच्या स्वकर्मार्थ योजला आहे.

पित्र्येरात्र्यहनीमासःप्रविभागस्तयोःपुनः॥ कृष्णपक्षस्त्वहस्तेषांशुक्लःस्वप्नायशर्वरी॥६॥

अर्थ- अशा तीस अहोरात्रींचा एकमास होतो त्यांत पितरांचे रात्र व दिवस हे दोन भाग आहेत ते असेकीं, कृष्णपक्ष हा त्यांचा दिवस असून

शक्ल पक्षही त्यांस निद्रे करितां रात्र कल्पिली आहे.

त्रिंशद्येमानुषामासाः पैत्रोमासः सउच्यते॥ शता-
नित्रीणिमासानांषष्ट्याचाप्यधिकानितु॥ पैत्रः-
संवत्सरोह्येषमानुषेण विभाव्यते॥ ७॥

अर्थ- मनुष्यांचे मानानें जे तीस महिने तोपितरांचेमानानें एक महि
ना होतो मानवांच्या मानानें तीनशेंसाठ महिनें म्हणजे तें पितरांचें व-
र्ष होतें.

मानुषेणैवमानेनवर्षाणांयच्छतंभवेत्॥ पितॄणां
तानिवर्षाणिसंख्यातानितुत्रीणिवै॥ दशचाप्य
धिकामासाः पितृसंख्येहकीर्तिता॥ ८॥

अर्थ- तसेंच मनुष्यमानानें शंभर वर्षे झालीं म्हणजे ते पितरांचे-
तीनवर्षे चारमहिने होतात अशी पितरांचे मानाची संख्या येथें वर्णिली.

लौकिकेनप्रमाणेन अब्दोयोमानुषःस्मृतः॥ एत
द्दिव्यमहोरात्रमित्येषावैदिकीश्रुतिः॥ ९॥

अर्थ- मनुष्य लोकचे प्रमाणानें जें एक वर्ष होतें हा देवांची एक अहोरा
त्र आहे; अशी याविषयीं वेदश्रुति प्रमाण आहे.

दिव्येरात्र्यहनीवर्षप्रविभागस्तयोःपुनः॥ अह-
स्तत्रयदुदक्चैवरात्रिर्यादक्षिणायनं॥ एतेरात्र्य
हनीदिव्येप्रसंख्यातेतयोःपुनः॥ १०॥

अर्थ- या मनुष्यांचे वर्षांत पुनः देवांचे रात्र व दिवस हे भाग आहेत;
ते असे कीं, जें उत्तरायण तो दिवस व दक्षिणायन ती रात्र हे दोनभा
ग त्या वर्षाचे गणले आहेत.

त्रिंशद्यानितुवर्षाणिदिव्योमासस्तुसस्मृतः॥
मानुषाणांशतंयच्चदिव्यामासास्त्रयस्तुवै॥ त
थैवसहसंख्यातोदिव्यएषविधिःस्मृतः॥ ११॥

अर्थ- अशीं मनुष्यमानानें तीस वर्षे झालीं म्हणजे तो देवांचा ए
क महिना होतो या प्रमाणें मनुष्यांचीं शंभर वर्षे झालीं, असतांनें
देवांचे तीन महिने होतात असा हा देवमानाचा प्रकार मनुष्यमा

नाशीं गणलेला आहे.

त्रीणिवर्षशतान्येवंषष्टिर्वर्षस्तथैवच ॥ दिव्यःसंवत्सरो ह्येषमानुषेणप्रकीर्तितः ॥ १२ ॥

अर्थ— त्याच प्रमाणें मनुष्यमानानें तीनशें साठ वर्षांनीं स्वर्गांतील कांहीं देवांचें वर्ष होतें

त्रीणिवर्षसहस्राणिमानुषेणप्रमाणतः ॥ त्रिंशदन्यानिवर्षाणिस्मृतःसप्तर्षिवत्सरः ॥ १३ ॥

अर्थ— आणि मनुष्यमानानें तीन हजार तीस वर्षें झालीं म्हणजे तें प्रति मन्वंतराच्या सातऋषींचें वर्ष होतें.

नवयानिसहस्राणिवर्षाणांमानुषाणिच ॥ वर्षाणि नवतिश्चैवध्रुवसंवत्सरःस्मृतः ॥ १४ ॥

अर्थ— नर्शांच मानवांचीं नऊ हजार नवद वर्षें झालीं असतां, तो ध्रुवाचा संवत्सर होतो.

षट्त्रिंशत्तुसहस्राणिवर्षाणांमानुषाणिच ॥ षष्टिश्चैवसहस्राणि संख्यातानितुसंख्यया ॥ दिव्यंवर्षसहस्रंतुप्राहुःसंख्याविदोजनाः ॥ १५ ॥

अर्थ— मनुष्यांचे मानानें शाण्णव हजार वर्षें संख्येनें गणालीं म्हणजे तीं देवांच्या मानानें हजार वर्षें होतात, असें संख्या जाणणारे लोक बोलतात.

इत्येतदृषिभिर्गीतंदिव्ययासंख्ययाद्विजाः ॥ दिव्येनैवप्रमाणेनयुगसंख्याप्रकल्पिता ॥ १६ ॥

अर्थ— ऋषी हो असें हें कालमान देवांच्या संख्येने ऋषींनीं सांगितलें व त्याच देव मानानें चार युगांची संख्या कल्पिली आहे.

चत्वारिभारतेवर्षेयुगानिऋषयोब्रुवन् ॥ कृतंत्रेताद्वापरंचकलिश्चेवंचतुर्युगं ॥ १७ ॥

अर्थ— या भरत खंडांत चार युगें आहेत तीं अशीं कीं; कृत, त्रेता, द्वापार व कली हीं चार युगें आहेत.

पूर्वंकृतयुगंनामततस्त्रेताभिधीयते ॥ द्वापरंचकलिश्चैवयुगानिपरिकल्पयेत् ॥ १८ ॥

अर्थ- त्यांत कृतयुग प्रथम त्यानंतर त्रेतायुग पुढें द्वापार युग व शेवटीं-कलियुग अशीं चार युगें कल्पिलीं आहेत.

चत्वार्याहुः सहस्त्राणि वर्षाणां तत्कृतं युगं॥ तस्य-तावच्छती संध्या संध्यांशश्च तथाविधः॥१९॥

अर्थ- त्यांत तें कृतयुग चार हजार वर्षांचें आहे; त्याचा संधिकाल चार-शें वर्षें असून संध्यांश कालही तितकाच आहे.

इतरेषु ससंध्येषु ससंध्यांशेषु च त्रिषु॥ एकपादेन वर्तंते सहस्त्राणि शतानि च॥२०॥

अर्थ- आणि त्या कृतयुगाखेरीज संधिकाल व संध्यांश काल यांसहित त्रेता, द्वापर व कलि हीं युगें कृतयुगाचे मानापेक्षां उत्तरोत्तर एकाहून एक एकेक सहस्त्र संख्येने कमी आहेत; तसाच या तीन युगांचा संधिकाल व संध्यांश काल हेही कृतयुगाचे संधि,संध्यांश कालांपेक्षां उत्तरोत्तर प्रत्येकीं एक शत संख्येनें न्यून आहेत.

त्रेता त्रीणि सहस्त्राणि युगसंख्याविदो विदुः॥ तस्यापि त्रिशती संध्या संध्यांशः संध्यया समः॥२१॥

अर्थ- तें असें कीं; युग संख्येचे ज्ञाते त्रेतायुग तीन हजार वर्षें आहे असें जाणतात; आणि त्याचा संधिकाल तीनशें वर्षें असून संध्यांश काल ही तितकाच आहे.

द्वे सहस्त्रे द्वापरं तु संध्यांशौ तु चतुः शतं॥ सहस्त्रमेकं वर्षाणां कलिरेव प्रकीर्तितः॥ द्वे शते च तथान्ये च संध्यासंध्यांशयोः स्मृते॥२२॥

अर्थ- तसेंच द्वापर युग दोन हजार वर्षें आहे, त्याचा संधिकाल व संध्यांश काल मिळून चारशें वर्षें आहेत; आणि कलियुग एक हजार वर्षें आहे;-त्यांतील संधि व संध्यांश हे दोनी काल प्रत्येकीं शंभर वर्षें आहेत.

एषा द्वादशसाहस्त्री युगसंख्या तु संज्ञिता॥ कृतं त्रेता द्वापरं च कलिश्चेति चतुष्टयं॥ तत्र संवत्सराः सृष्टा मानुषास्तान्निबोधत॥२३॥

अर्थ- या प्रमाणें चार युगांचीं दहा हजार वर्षें व त्यांचे संधि,संध्यांश का

ल मिळून दोन हजार वर्षे अशीं हीं बारा सहस्त्र वर्षे मिळून चार युगांची संख्या आहे, त्या कृत, त्रेता, द्वापार व कलि या चार युगांचीं वर्षे मनुष्य मानानें जीं गणलीं आहेत तीं श्रवण करा.

नियुतानिदशद्वेचपंचचैवात्रसंख्यया ॥ अष्टाविंशत्सहस्त्राणिकृतंयुगमथोच्यते ॥ २४ ॥

अर्थ- तीं अशीं कीं, सतरालक्ष अठ्ठावीसहजार वर्षे कृतयुग आहे; यानंतर त्रेतायुगाचें प्रमाण सांगतों.

प्रयुतंतुतथापूर्णंद्वेचान्येनियुतेपुनः ॥ षण्णवतिसहस्त्राणिसंख्यातानिचसंख्यया ॥ त्रेतायुगस्यसंख्येषा मानुषेणतुसंज्ञिता ॥ २५ ॥

अर्थ- तें असें कीं, त्रेतायुगाचीं बारालक्ष शाण्णव हजार वर्षे आहेत ही या युगाची संख्या मनुष्य मानानें गणली आहे.

अष्टौशतसहस्त्राणिवर्षाणांमानुषाणितु ॥ चतुःषष्टिसहस्त्राणिवर्षाणांद्वापरंयुगं ॥ २६ ॥

अर्थ- मनुष्यांचीं आठ लक्ष चौसष्ट हजार वर्षे हें द्वापार युगाचें मान आहे.

चत्वारिनियुतानिस्युर्वर्षाणितुकलिर्युगं ॥ द्वात्रिंशच्चतथान्यानिसहस्त्राणितुसंख्यया ॥ एतत्कलियुगंप्रोक्तंमानुषेणप्रमाणतः ॥ २७ ॥

अर्थ- तशींच कलियुगाचीं चारलक्ष बत्तीस हजार वर्षे आहेत हें कलियुगाचें प्रमाण मनुष्यमानानें सांगितलें.

एषाचतुर्युगावस्थामानुषेण प्रकीर्तिता ॥ चतुर्युगस्यसंख्यातासंध्यासंध्यांशकैःसह ॥ २८ ॥

अर्थ- अशी ही कृतादि चार युगांच्या संख्येची स्थिती संधिव संध्यांश या कालांसहित वर्णिली आहे.

एषाचतुर्युगाख्यातुसाधिकात्वेकसप्ततिः ॥ कृतत्रेतादियुक्तासामनोरंतरमुच्यते ॥ २९ ॥

अर्थ- या कृतत्रेतादि चार युगांची एकचौकडी आहे; असे या चौकडीचे एकाहत्तर पर्यायांचे कालास मन्वंतर म्हणतात.

मन्वंतरस्यसंख्यातुमानुषेण निबोधत ॥ एकत्रिंश
त्तथाकोट्यः संख्याताः संख्ययाद्विजैः ॥ ३० ॥ तथा
शतसहस्राणिदशचान्यानिभागशः ॥ सहस्राणि
तुद्वात्रिंशच्छतान्यष्टाधिकानिच ॥ ३१ ॥ अशीति-
श्चैववर्षाणिमासाश्चैवाधिकास्तुषट् ॥ मन्वंतरस्य
संख्येषामानुषेणप्रकीर्तिता ॥ ३२ ॥

अर्थ- त्या मन्वंतराची संख्या मनुष्य मानानें ऐका ती अशीकीं, एकतीस कोटी, दहालक्ष बत्तीस हजार आठशें ऐंशी इतकीं वर्षे आणि सहा महिनें ही एकमन्वंतराची संख्या ऋषीनीं मनुष्य मानानें गणलेली वर्णिली आहे.

दिव्येनचप्रमाणेनप्रवक्ष्याम्यंतरंमनोः ॥ सहस्रा-
णांशतान्याहुः सर्वैवेपरिसंख्यया ॥ ३३ ॥ चत्वारिं
शत्सहस्राणिमनोरंतरमुच्यते ॥ मन्वंतरस्यकाल
स्तुयुगैःसहप्रकीर्तितः ॥ ३४ ॥

अर्थ- आतां देवांचे मानानें मन्वंतराचें प्रमाण सांगतों तें असें कीं, देवांच्या एकलक्षचाळीस हजार वर्षांत चार युगां सहित एक मन्वंतराचा काळ होतो.

एषाचतुर्युगाख्यातुसाधिकाह्येकसप्ततिः ॥ क्रमे
णपरिवृत्तासामनोरंतरमुच्यते ॥ ३५ ॥

अर्थ- तो असाकीं, या चार युगांची एकचौकडी तिचे क्रमानें असे एकाहत्तर पर्याय झाले म्हणजे त्या काळास एक मन्वंतर म्हणतात.

एतच्चतुर्दशगुणंकल्पमाहुस्तुतद्विदः ॥ ततस्तुप्र
लयः कृत्स्नः सतुसंप्रलयोमहान् ॥ ३६ ॥

अर्थ- अशीं चवदा मन्वंतरें झालीं असतां त्यास काळज्ञानी कल्प असें म्हणतात, त्यानंतर भूलोक, भुवर्लोक व स्वर्लोक या तीन लोकांचा प्रलय होतो.

कल्पप्रमाणोद्विगुणो यथाभवतिसंख्यया ॥ च
तुर्युगाख्याव्याख्याताकृतंत्रेतायुगंचमे ॥ ३७ ॥

अर्थ- या कल्पाचे प्रमाणानें जशा संख्ये वरून द्विगुणित काल होतो तो ब्रम्हदेवाचा अहोरात्र काल आहे; अशा गणनेनें सामान्यतः चारयुगें सांगून त्यांतील कृत व त्रेता या विषयीं कांहीं वर्णन केलें.

त्रेतासृष्टिंप्रवक्ष्यामिद्वापरंकलिमेवच॥युगपत्स
मवेतौद्वौद्विधावक्तुंनशक्यते॥ ३८॥क्रमागतंम
याप्येतत्तुभ्यंनोक्तंयुगद्वयं॥ऋषिवंशप्रसंगेनव्या
कुलत्वात्तथाक्रमात्॥३९॥

अर्थ- यानंतर त्रेतायुगांतील सृष्टि सांगतों; आणि द्वापर, कलि व ऋषिवंश हे दोन विषय सांगणें एक काळीं अशक्य असून युगवर्णनाचे क्रमानें द्वापर व कलि हीं दोन युगें सांगण्या विषयीं ओळीनें आलीं असून ही ऋषिवंश सांगण्याचे प्रसंगानें माझें चित्त व्याकुळ असल्या मुळें म्यां तीं सांगितलीं नाहींत.

नोक्तंत्रेतायुगेशेषंतद्वक्ष्यामिनिबोधत॥अथत्रे
तायुगस्यादौमनुःसप्तर्षयश्चये॥श्रौतस्मार्तंब्रु
वन्धर्मंब्रम्हणातुप्रचोदिताः॥ ४०॥

अर्थ- तसेंच त्रेतायुगांतील शेष म्या वर्णिलें नाहीं तें या पुढें सांगतों; तें असें कीं, त्रेतायुगाचे आरंभीं स्वायंभव मनु व सप्तर्षि यानीं ब्रम्हदेवांच्या आज्ञेवरून श्रौत व स्मार्त हीं कर्में सांगितलीं.

दाराग्निहोत्रसंबंधंऋग्यजुःसामसंहिताः॥इत्या
दिबहुलंश्रौतंधर्मंसप्तर्षयोब्रुवन्॥ ४१॥

अर्थ- आणि लग्नकरणें, अग्निहोत्र घेणें, तश्याच ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यासंहिता, इत्यादिक बहुत श्रौत धर्म सप्तर्षीनीं सांगितले आहेत.

परंपरागतंधर्मंस्मार्तत्वाचारलक्षणं॥वर्णाश्र-
माचारयुक्तंमनुःस्वायंभवोब्रवीत्॥ ४२॥

अर्थ- तसाच स्मृतींत सांगितलेल्या आचारानुसार ब्राम्हणादिक वर्ण व ब्रम्हचर्यादिक आश्रम यांचे धर्मानीं युक्त असा परंपरागत धर्म स्वायंभव मनूनें सांगितला आहे.

सत्येनब्रम्हचर्येणश्रुतेन तपसातथा ॥ तेषांक्रतस
तपसामार्षेणानुक्रमेणाह ॥ ४३ ॥ सप्तर्षीणांमनोश्चै
व आदौत्रेतायुगेततः ॥ अबुद्धिपूर्वकंतेनसकृत्पू
र्वकमेवच ॥ ४४ ॥ अभिवृत्तास्तेमंत्रादर्शनैस्ता
रकादिभिः ॥ आदिकल्पेतुदेवानांप्रादुर्भूतास्तेते
स्वयं ॥ ४५ ॥

अर्थ— नंतर त्रेतायुगाचे आरंभीं स्वायंभुव मनु व उत्तम तपस्वी सप्तर्षी यांस स्वभावसिद्ध सत्य, ब्रम्हचर्य, शास्त्र, तप व वेदोक्त आचाराचा अनुक्रम या साधनानें, आदिकल्पांत देवांस स्वतः तारकादिक रूपानीं प्रगट झाले जे मंत्र ते एकवार उपदेशानें त्यांस प्राप्त झाले.

प्रमाणेष्वथसिद्धानामन्येषांचप्रवर्तते ॥ मंत्रयो
गोव्यतीतेषुकल्पेष्वथसहस्रशः ॥ तेमंत्रावैपुन-
स्तेषांप्रतिमायामुपस्थिताः ॥ ४६ ॥

अर्थ— तदनंतर इतर सिद्धांस ते मंत्र वेदादिक प्रमाणांत प्राप्त होतात, आणि पुढें हजारों कल्प गेले असतां तेच मंत्र पुनः त्या वेदांत लीन होतात.

ऋचोयजूंषिसामानिमंत्राश्चाथर्वणास्तथे ॥ स
प्तर्षिभिश्चयेप्रोक्ताः स्मार्त्ततुमनुरब्रवीत् ॥ ४७ ॥

अर्थ— तसेच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वण वेदांतील मंत्र सप्तर्षींनीं सांगितले व स्वायंभुव मनूनें स्मृत्युक्त धर्म सांगितले.

त्रेतादौसंहतावेदाः केवलंधर्मसेतवः ॥ संरोधादा
युषश्चैवव्यस्यंतेद्वापरेचते ॥ ऋषयस्तपसावेदान-
होरात्रमधीयत ॥ ४८ ॥

अर्थ— आणि त्रेतायुगाचे आरंभीं धर्मास केवळ सेतूसारखे जे वेद होते; ते, आयुष्याच्या संकोचामुळें द्वापरयुगांत संक्षेपानें केले. त्या वेदांचें अध्ययन ऋषी आपल्यातपोबलानें निरंतर अहोरात्र (रात्रंदिवस) करितात.

अनादिनिधनादिव्याः पूर्वप्रोक्ताः स्वयंभुवा ॥

स्वधर्मसंवृताः सांगायथाधर्मंयुगेयुगे ॥ विक्रियं तेस्वधर्मंतुवेदवादाद्यथायुगं ॥ ४९ ॥

अर्थ- पूर्वी ब्रम्हदेवानें ज्यांस उत्पति नाश नाहींत असे ते स्वधर्मानें युक्त सांग वेद प्रतियुगीं त्या त्या युगधर्मानुसार त्या ऋषींस सांगितले. त्या प्रमाणें ते ऋषि आदिकरून सर्व सज्जन वेदांच्या विचारानें युगानुरूप स्वधर्माचरण विशेषें करून करितात.

आरंभयज्ञः क्षत्रस्यहविर्यज्ञाविशःस्मृताः ॥ परिचारयज्ञाः शूद्राश्चजपयज्ञाश्चब्राम्हणाः ॥ ५० ॥

अर्थ- धर्म संरक्षणार्थ किंवा साधूंचे रक्षणा साठीं युद्धा दिका विषयीं आरंभ करणें हाच यज्ञ क्षत्रियांस आहे; होम द्रव्यानीं यज्ञ करणें वैश्यांस विहित आहे; ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांची सेवा करणें- हे यज्ञ शूद्रांस आहेत; व जप करणें हा यज्ञ मुख्यत्वें ब्राम्हणास आहे.

ततः समुदितावर्णास्त्रेतायांधर्मशालिनः ॥ क्रियावंतः प्रजावंतः समृद्धाः सुखिनश्चवे ॥ ५१ ॥

अर्थ- नंतर त्रेतायुगांत समुदाय युक्त सर्व ब्राम्हणादिक वर्ण, धर्म शाली सत्क्रियावंत, उत्तम प्रजानीं युक्त, बहु धन, धान्यानीं संपन्न व सर्व प्रकारें पूर्ण सुखी असे आहेत.

ब्राम्हणेश्चविधीयंतेक्षत्रियाः क्षत्रियैर्विशः ॥ वैश्यान्च्छूद्रानुवर्ततेशूद्रान्परमनुग्रहात् ॥ ५२ ॥ शुभाः प्रकृतयस्तेषांधर्मावर्णाश्रमाश्रयाः ॥ संकल्पितेनमनसावाचावाहस्तकर्मणा ॥ त्रेतायुगेत्वविकलेकर्मारंभः प्रसिध्यति ॥ ५३ ॥

अर्थ- आणि त्या त्रेतायुगांत क्षत्रिय ब्राम्हणांच्या आश्रयानें वर्ततात; क्षत्रियांच्या योगानें वैश्य सिद्धी पावतात, शूद्र वैश्यांस अनुसरून असतात, ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हे तीन वर्ण शूद्रांवर त्यांच्या सेवा वृत्तीनें अत्यंत अनुग्रह करितात; आणि त्या सर्व वर्णांच्या प्रकृति शुभकारक असून त्यांचे वर्णाश्रम संबंधीं धर्म मंगल कारक चालतात व उत्तम संकल्प युक्त मन, वाणी व हस्त क्रिया या साधनानीं

त्या वर्णांच्या कर्मांचे आरंभ, कर्म सांग करणाऱ्या त्रेतायुगांत निश्चयें करून सिद्ध होतात.

आयूरूपंबलंमेधा आरोग्यंधर्मशीलता॥ सर्व- साधारणंह्येतदासीत्त्रेतायुगेतुवै॥ ५४॥

अर्थ:- आणि आयुष्य, रूप, बल, धारणा युक्त बुद्धि, आरोग्य व धर्मशीलता, हीं फलें त्रेतायुगांत सर्वांस होतीं.

वर्णाश्रमव्यवस्थानमेषांब्रम्हातथाकरोत्॥ संहि ताश्चतथामंत्रा आरोग्यंधर्मशीलता॥५५॥ संहि ताश्चतथामंत्राऋषिभिर्ब्रम्हणः सुतैः॥ यज्ञः प्रवर्तितश्चैवतदाह्येवतुदैवतैः॥५६॥ यामैःशु क्लैर्जयैश्चैवसर्वसाधनसंभृतैः॥ विश्वसृड्भिस्त थासार्धंदेवेंद्रेणामहौजसा॥ स्वायंभुवेंतरेदे वै- स्तेयज्ञाः प्राक्प्रवर्तिताः॥५७॥

अर्थ:- तशीच त्या कालीं त्या लोकांचे वर्ण व आश्रम अनेक संहिता व मंत्र, आरोग्य धर्म निष्ठा यांची व्यवस्था ब्रम्हदेवानीं केली; तसेंच अनेक संहिता व मंत्र व यज्ञ हे ब्रम्हपुत्र ऋषीनीं प्रवृत्त केले त्या कालीं देदीप्यमान असे याम, शुक्ल, जय व सर्व साधनानीं संपन्न असें विश्व उत्पन्न करणारे या नामांचे देवां सहवर्तमान महा तेजस्वी इंद्रानें पूर्वी स्वायंभुव मन्वंतरांत ते यज्ञ प्रवृत्त केले.

सत्यंजपस्तपोदानंपूर्वधर्मोयउच्यते॥ यदाधर्म- स्यह्रसतेशाखाधर्मस्यवर्धते॥५८॥ जायंतेच तदाशूराआयुष्मंतोमहाबलाः॥ न्यस्तदंडाम हायोगायज्वानोब्रम्हवादिनः॥५९॥ पद्मपत्रा यताक्षाश्चपृथुवक्त्राःसुसंहताः॥ सिंहोरस्का महासत्वामत्तमातंगगामिनः॥६०॥ महाधनु र्धराश्चैवत्रेतायांचक्रवर्तिनः॥ सर्वलक्षणपू र्णास्तेन्यग्रोधपरिमंडलाः॥६१॥

अर्थ:- त्या त्रेतायुगांत सत्य, जप, तप व दान हा जो प्रथम धर्म आहे;

त्याची शाखा कमी होऊन जेव्हां अधर्माची शाखा वाढते, तेव्हां त्रेतायुगांत-शूर, पूर्णायु, महाबलाढ्य, दुष्टांस दंड करणारे, महायोगी, यज्ञ करणारे, ब्रह्मवेत्ते, कमल पत्रासमान नेत्रानीं सुशोभित, सुंदर मुखानें युक्त, दृढशरीरी व सिंहासारख्या वक्षस्थलानें शोभणारे, मोठे धैर्यवंत, मत्तगजासारखे चालणारे, महाधनुर्धारी, सर्व उत्तम लक्षणानीं पूर्ण व वट वृक्षासारिखे सर्वांगीं पुष्ट असे सार्वभौम राजे होतात.

न्यग्रोधौतुस्मृतौबाहूव्यामोन्यग्रोधउच्यते॥ व्यामेन तूच्छ्रयोयस्यअतऊर्ध्वंतुदेहिनः॥ समुच्छ्रयपरीणाहोन्यग्रोधपरिमंडलः॥ ६२॥

अर्थ- बाहूंस न्यग्रोध हें नांव आहे, व मनुष्याचे वांवेसही न्यग्रोध असें म्हणतात. त्या वांवभर प्रायशः मनुष्यांची सर्व साधारण उंची असते; त्या पेक्षां ज्याचे देहाची उंची व तदनुसार त्याचा जो घेर असतो, त्या उंचीस व घेरास मिळून सर्व विस्तारास न्यग्रोध परिमंडल म्हणतात; हें प्रमाण सार्वभौम राजाच्या देहाचेंच असतें.

चक्रंरथोमणिर्भार्यानिधिरश्वोगजस्तथा॥ प्रोक्तानिसप्तरत्नानिपूर्वंस्वायंभुवेंतरे॥ ६३॥

अर्थ- १ सैन्य, २ रथ, ३ मणि, ४ भार्या, ५ निधि, ६ अश्व, ७ गज, हीं सात रत्नें पूर्वीं स्वायंभुव मन्वंतरांत प्रसिद्ध झालीं.

विष्णोरंशेनजायंतेपृथिव्यांचक्रवर्तिनः॥ मन्वंतरेषु सर्वेषुह्यतीतानागतेषुवै॥ ६४॥

अर्थ- मागें गेलेल्या व पुढें येणाऱ्या सर्व मन्वंतरांत पृथ्वीवर विष्णूच्या अंशानें युक्त असे सार्वभौम राजे होतात.

भूतभव्यानियानीहवर्तमानानियानिच॥ त्रेतायुगानितेष्वत्रजायंतेचक्रवर्तिनः॥ ६५॥

अर्थ- त्या चवदाही मन्वंतरांत मागें गेलेल्या, पुढें येणाऱ्या व प्रस्तुत चालू झालेल्या अशा सर्व त्रेतायुगांत या पृथ्वीवर चक्रवर्ती (सार्वभौम) राजे होत असतात.

भद्राणीमानितेषांचविभाव्यंतेमहीक्षितां॥ अस्य

द्भुतानिचत्वारिबलंधर्मस्सुखंधनं ॥ ६६ ॥

अर्थ- त्या सार्वभौम राजांचे अंगीं कल्याण कारक बल, धर्म, सुख व धन हीं च्यार अति अद्भुत ऐश्वर्यें असतात.

अन्योन्यस्याविरोधेनप्राप्यंतेनृपतेः समं ॥ अर्थो धर्मश्चकामश्चयशोविजयएवच ॥ ६७ ॥

अर्थ- तसेंच परस्परांचा विरोध न घडतां, अर्थ, धर्म, काम, यश व विजय हे सर्वही सार्वभौम राजांस एककालीं सर्वदा प्राप्त असतात.

ऐश्वर्येणाणिमाद्येनप्रभशक्तिबलान्विताः ॥ श्रुतेन तपसाचैवऋषींस्तेभिभवंतिहि ॥ ६८ ॥

अर्थ- आणि ते सार्वभौम राजे अणिमादिक आठप्रकारचें ऐश्वर्य, प्रभशक्ति व बल यानीं युक्त असतात; तसेंच शास्त्र व तप यानीं ते सामान्य ऋषीं पेक्षां अधिक असतात.

बलेनाभिभवंत्येतेतेनदानवमानवान् ॥ लक्षणै- श्चैवजायंतेशरीरस्थैरमानुषैः ॥ ६९ ॥

अर्थ- अशा या पूर्ण बलानें ते सार्वभौम राजे सर्व दानव व मानव यांचा पराभव करतात; आणि ते आपले देहांत देवांचे लक्षणांनीं युक्त असतात.

केशास्थिताललाटेनजिव्हाचपरिमार्जनी ॥ श्याम प्रभाश्चतुर्दंष्ट्राः श्रवसाश्चोर्ध्वरेतसः ॥ ७० ॥ आ- जानुबाहवश्चैव तालहस्तौ वृषाकृती ॥ परिणाह- प्रमाणाभ्यां सिंहस्कंधाश्चमेधिनः ॥ ७१ ॥ पादयो- श्चक्रमत्स्यौतुशंखपद्मेच हस्तयोः ॥ पंचाशीति- सहस्राणिजीवंतित्यजरामयाः ॥ ७२ ॥

अर्थ- त्या सार्वभौमराजांचे केश कपाळाचे दोहीं बाजूनीं कुटिल (कुरळ) असून त्यांची जिव्हा अत्यंत शुद्ध असते; तशीच त्यांची कांती सजल मेघा समान नील वर्ण असून त्यांस चार दाढा असतात; आणि ते उत्तम कीर्तीनें प्रख्यात असून ऋषी सारखे ऊर्ध्व रेते असतात ह्मणजे त्यांचें वीर्य त्यांच्या इच्छे प्रमाणें स्वाधीन असतें; तसेंच त्यांचे हात गुड-

त्या पर्यंत लांब असून ताड वृक्षास मानव इंद्रा सारख्या चिन्हानीं युक्त अस-
तात; त्यांचे स्कंध विशाळपणा व उंची वगैरे प्रमाण यानीं सिंहासारखे असून
ते राजे महा बुद्धिमंत असतात; आणि त्यांच्या पायांवर चक्र व मत्स्य असता
त; तशींच हातांवर शंख व पद्म हीं चिन्हें असतात; व ते पंचायशी हजार-
वर्षे जरा व रोग न होतां वांचतात.

असंगागतयस्तेषांचतस्त्रश्चक्रवर्तिनां॥ अंतरिक्षे
समुद्रेषुपातालेपर्वतेषुच॥७३॥

अर्थ- तशीच अंतरिक्ष (आकाश) सप्तसमुद्र, पाताळ व सर्व पर्वत
या चारी स्थानीं त्या सार्वभौम राजांची अकुंठित गति असते.

इज्यादानंतपः सत्यंत्रेताधर्मास्तवैस्मृताः॥ तदाप्रव
र्ततेधर्मोवर्णाश्रमविभागशः॥ मर्यादास्थापनार्थंच
दंडनीतिःप्रवर्तते॥७४॥

अर्थ- यज्ञ,दान,तप,सत्य हेधर्म त्रेतायुगांत वर्ण व आश्रम यांच्या अ-
धिकारानुरूप निरनिराळा चालतो, आणि त्या कालांत धर्ममर्यादेच्या-
स्थापनें साठीं दंडनीती हीं चालते.

हृष्टपुष्टाजनाःसर्वेअरोगाः पूर्णमानसाः॥ एकोवे
दश्चतुष्पादस्त्रेतायांतुविधिःस्मृतः॥ त्रीणिवर्षस
हस्राणिजीवंतेतत्रताःप्रजाः॥७५॥

अर्थ- पूर्वी कृतयुगांत एक वेद असून त्याचे त्रेतायुगांत चार भाग झाले;
आणि त्रेता युगांतील सर्व लोक हर्षयुक्त, पुष्ट, निरोगी, शांत वृत्ति असे-
असून त्या प्रजा तीन हजार वर्षे वांचतात.

पुत्रपौत्रसमाकीर्णाम्रियंतेचक्रमेणताः॥ एषत्रेतायु
गेभावस्त्रेतासंख्यांनिबोधत॥७६॥

अर्थ- तशाच त्या प्रजा बहुत पुत्र व पौत्र (नातु) यानीं युक्त होत्सात्या
क्रमानें मरण पावतात; अशी त्रेता युगांतील स्थिति असते आतां त्रेता-
युगाची संख्या ऐका.

त्रेतायुगस्वभावेनसंध्यापादेनवर्तते॥ संध्यापादःस्व
भावाच्चयोंशःपादेनतिष्ठति॥७७॥

अर्थ- कृतयुगापेक्षां त्रेतायुगाचे चतुर्थांश न्यून संख्ये सहित सर्व संख्येच्या मानानें त्रेतायुगाचा संधिकाल कृतयुगाचे संधिकाला पेक्षां एकचतुर्थांश कमी आहे; त्या संधिकालाचा चरण ही कृतयुगाच्या संधिकालाचे पादा पेक्षा एक चतुर्थांश कमी आहे. इतिश्री मत्स्य पुराणें मन्वंतरानुकीर्तनं नाम एकचत्वारिंशदुत्तर शततमोऽध्यायः ॥ १४१ ॥

अ० १४२ वा.

ऋषयऊचुः ॥ कथंत्रेतायुगमुखे यज्ञस्यासीत्प्रवर्तनं ॥
पूर्वेस्वायंभुवेसर्गेयथावत्प्रब्रवीहिनः ॥ १ ॥

अर्थ- शौनकादिक मुनि बोलले कीं, हे सूता पूर्वीं स्वायंभुव मन्वंतरांत त्रेतायुगाचे आरंभीं यज्ञकर्माची प्रवृत्ति कशी झाली; तें आम्हास यथास्थित सांग.

अंतर्हितायांसंध्यायांसार्द्धं कृतयुगेनहि ॥ काला
ख्यायांप्रवृत्तायांप्राप्तेत्रेतायुगेतथा ॥ २ ॥ औषधीषु
चजातासुप्रवृत्तेदृष्टिसर्जने ॥ प्रतिष्ठितायांवार्तायांग्रा
मेषुचपुरेषुच ॥ ३ ॥ वर्णाश्रमप्रतिष्ठानंकृत्वामंत्रैश्चतैः
पुनः ॥ संहितास्तुसुसंहृत्यकथंयज्ञः प्रवर्तितः ॥ ए-
तच्छ्रुत्वाब्रवीत्सूतः श्रूयतांतत्प्रचोदितं ॥ ४ ॥

अर्थ- आणि कृतयुगा सहवर्तमान त्रेतायुगाचा संधिकाल गेल्यावर त्रेतायुगाचा मुख्य काल प्राप्त झाल्यानंतर पर्जन्य वृष्टीनें पृथ्वीवर यज्ञोपयोगी अनेक औषधी उत्पन्न झाल्या असतां, तशीच गांवें व शहरें यांत लोकांच्या उपजीविकेची व्यवस्था झाली असतां, ओंकार रूपी वेदापासून ऋग्वेदादीक उत्तम संहिता करून त्यांच्या ज्या मंत्रानीं ब्राम्हणादिक वर्ण व ब्रम्हचर्यादिक आश्रम यांची व्यवस्था केली; त्याच मंत्रानीं यज्ञ कसा चालू केला; तें आम्हास सांग? असा ऋषीचा प्रश्न ऐकून सूतानें त्यांच्या प्रश्नाचें उत्तर सांगितलें; तें मत्स्यरूपी भगवान् ह्मणतात मनुराजा श्रवण कर.

सूतउवाच ॥ मंत्रान्वैयोजयित्वातुइहामुत्रचकर्मसु ॥
तथाविश्वभुगिंद्रस्तुयज्ञंप्रावर्तयत्प्रभुः ॥ ५ ॥

अर्थ- तें असें कीं, सूत बोलला ऋषी हो पूर्वीं त्रैलोक्य राज समर्थ इंद्र ऐ-

हिक व पारत्रिक या सर्व कर्मा विषयीं वेदमंत्रांची योजना करून लोकांत प्रथमतः यज्ञ कर्माची प्रवृत्ति करितां झाला.

देवतैस्सहसंहृत्यसर्वसाधनसंवृतः॥तस्याश्वमेधे विततेसमाजग्मुर्महर्षयः॥ ६॥

अर्थः— या प्रमाणें यज्ञाचे सर्व साधनानीं युक्त तो इंद्र, सर्व देवतांसहवर्तमान यज्ञ करीत असतां, त्या इंद्राचे विशाल यज्ञांत चोंहीकडून मोठ मोठे ऋषी आले.

यज्ञकर्मण्यथवर्तत्कर्मण्यग्रेतथर्त्विजः॥हूयमानेदेव होत्रेअग्नौबहुविधंहविः॥ ७॥संप्रतीतेषुदेवेषुसामगेषुचसुस्वरं॥परिक्रांतेषुलघुषु अध्वर्युपुरुषेषुच॥८ आलब्धेषुचमध्येतु तथापशुगणेषुवै॥आहूतेषुचदेवेषुयज्ञभाक्सुततस्तदा ॥ ९॥ यइंद्रियात्मकोदेवा यज्ञभागभुजस्तुते॥तान्यजंतितदादेवाः कल्पादिषुभवंतिये॥ १०॥

अर्थः— त्या कालीं सर्व ऋत्विज त्या श्रेष्ठ यज्ञ कर्मांत स्वकर्मा विषयीं प्रवृत्त असून होम करणारा अग्नींत अनेक प्रकारचे होम द्रव्यांचा देवांच्या उद्देशानें होम करीत असतां, तेथें देव आले; तेव्हां सामवेदानें गायन करणारे सुस्वरानें गायन करूं लागले; ते समयीं अध्वर्यूंच्या हाताखालचे त्वरा युक्त पुरुष पशूंस मारण्या विषयीं प्रवृत्त होऊन त्यानीं ते यज्ञाचे पशू मारले असतां, मन आदिकरून सर्व इंद्रियांस प्रेरणा करणारे जे देव आहेत ते यज्ञांतील भाग ग्रहण करणारे आहेत; ते देव नंतर त्या कालीं यज्ञार्थ बोलावून तेथें आले असतां; जे प्रति कल्पाचे आरंभीं इंद्राचे साहाय्य करणारे देव असतात; ते त्या देवांचें यजन करतात.

अध्वर्युप्रेषकालेतुव्युत्थितात्रृषयस्तथा॥महर्षयश्च तान्दृष्ट्वादीनान्पशुगणांस्तदा॥ विश्वभुजंतेत्वपृच्छन्कथंयज्ञविधिस्तव॥ ११॥

अर्थः— नंतर अध्वर्यूनें प्रेषोच्चार करण्याचे समयीं ते सर्व महर्षी उठले, आणि आर्त स्वरानें ओरडणाऱ्या त्या पशूंच्या समुदायास पाहून ते दयालु ऋ-

षी त्या काळीं त्रैलोक्यराज इंद्रास विचारूं लागले कीं, हे इंद्रा हा तुझे यज्ञाचा विधि कसा आहे.

अधर्मोबलवानेषहिंसाधर्मेप्सयातव ॥ नवःपशवः विधिस्त्विष्टस्तवयज्ञेसुरोत्तम ॥१२॥

अर्थ- हे देवोत्तमा इंद्रा या तुझ्या यज्ञांत धर्माच्या इच्छेनें ही दीन पशूंची हिंसा चालली आहे हा महा बलिष्ठ अधर्म आहे; तस्मात् पशु मारण्याचा हा विधि तुझे यज्ञांत आम्हास इष्ट नाहीं.

अधर्मोधर्मघातायप्रारब्धःपशुभिस्त्वया ॥ नायंधर्मोह्यधर्मोयंनहिंसाधर्मउच्यते ॥ आगमेनभवान्धर्मं प्रकरोतुयदीच्छति ॥१३॥

अर्थ- हे इंद्रा त्वां धर्माच्या नाशार्थ पशु मारून हा अधर्म आरंभला आहे. स हा कांहीं धर्म नव्हे; तर हा अधर्मच आहे; कारण शास्त्रांत हिंसेस धर्म असें म्हणत नाहींत. तस्मात् तूं धर्म करण्यास इच्छीत असशील तर वेदाचे प्रमाणानें धर्माचें आचरण कर.

विधिदृष्टेनयज्ञेनधर्मेणाव्यसनेनतु ॥ यज्ञबीजैःसुरश्रेष्ठत्रिवर्गपरिमोषितैः ॥१४

अर्थ- हे देव श्रेष्ठा ज्या धर्मांत इतरांस दुःख नाहीं अशा शास्त्र विधियुक्त यज्ञाचे विधीनें धर्म, अर्थ व काम यांचे साधनास कारण अशा यज्ञोपयोगी धान्यांचे बीजानीं यज्ञ कर.

एषयज्ञोमहानिंद्रस्वयंभुविहितःपुरा ॥ एवंविश्वभुगिंद्रस्तुऋषिभिस्तत्वदर्शिभिः ॥ उक्तोनप्रतिजग्राहमानमोहसमन्वितः ॥१५॥

अर्थ- हे इंद्रा हाच यज्ञ महान् श्रेष्ठ असें पूर्वीं ब्रम्हदेवानीं सांगितलें आहे; या प्रमाणें तत्व ज्ञानी ऋषीनीं सांगितलें, तरी तो त्रैलोक्यराज इंद्र, गर्व व अविचार यानीं युक्त होता; त्या मुळें त्यानें तें ऋषींचें मत मानिलें नाहीं.

तेषांविवादःसुमहान्जज्ञेइंद्रमहर्षिणां ॥ जंगमैःस्थावरैःकेनयष्टव्यमितिचोच्यते ॥१६॥

अर्थ- तेव्हां तेथें इंद्र व महर्षि यांचा मोठा विवाद उत्पन्न झाला; तो असा

की, जंगम (पशु) स्थावर (धान्यबीजें) यांत कोणते द्रव्यानें यज्ञकरा०

तेतुखिन्नाविवादेनशक्तायुक्तामहर्षयः॥ संधाय-
सममिंद्रेणपप्रच्छुः खचरंवसुं॥१७॥

अर्थ- नंतर ते ऋषि वाद शक्तीनें समर्थ असून ही ते त्यावादानें खिन्न (श्रमी) होऊन इंद्राशीं मध्यस्थाचे द्वारानें निर्णय करण्याचा संकेत करून त्या विषयीं उपरिचर वसुराजास विचारितात.

ऋषयऊचुः॥ महाप्राज्ञत्वयादृष्टः कथंयज्ञविधिर्नृ
प॥ औत्तानपादेप्रब्रूहिसंशयंनोतुदप्रभो॥१८॥

अर्थ- ऋषी बोलले उत्तानपाद वंशस्था, महा बुद्धिमंता, समर्था, उपरिचर-वसुराजा त्वां वेदशास्त्रांत यज्ञाचा विधि कसा पाहिला आहेस; तो सांगून आमचा संशय दूरकर.

सूतउवाच॥ श्रुत्वावाक्यंवसुस्तेषांमविचार्यबलाबलं
॥वेदशास्त्रमनुस्मृत्ययज्ञतत्वमुवाचह॥१९॥

अर्थ- इकडे सूत बोलला शौनकादिक ऋषीहो असें तें ऋषींचें वाक्य ऐकून त्यांच्या प्रश्नाचे बलाबलांचा पूर्ण विचार न करितां वेद व शास्त्र यांचें स्मरण करून तो उपरिचर वसु त्यांस बोलूं लागला.

यथोपनीतैर्यष्टव्यमितिहोवाचपार्थिवः॥ यष्टव्यंप
शुभिर्मेध्यैरथमूलफलैरपि॥२०॥

अर्थ- तो राजा बोलला कीं, मुंज झालेल्या ब्राम्हणानीं जसा अवश्य यज्ञकरावा; तसेंच शुद्ध पशु किंवा फळें व मुळें यानीं यज्ञ करावा.

हिंसास्वभावोयज्ञस्यइतिमेदर्शनागमः॥तथैतेभा
वितामंत्राहिंसालिंगामहर्षिभिः॥२१॥ दीर्घेणतप-
सायुक्तैस्तारकादिनिदर्शिभिः॥तत्प्रमाणंमयाचोक्तं
तस्मात्क्षमितुमर्हथ॥२२॥

अर्थ- ऋषीहो हिंसा हा यज्ञाचा स्वभावच आहे; असें माझ्या पहाण्यांत आहे; तसेंच यज्ञाचे मंत्रांत ही पशु हिंसा करण्याचीच लिंगें आहेत; असें दीर्घतप करणारे असून सर्व नक्षत्रां दिकांस ज्ञान दृष्टीनें प्रत्यक्ष पहाणारे ऋषी जाणतात; या प्रमाणावरून म्यां सांगितलें; तस्मात् आतां तुम्हीं या वादाप-

स्तून शांत होण्यास योग्य आहांत.

यदिप्रमाणंस्वान्येवमंत्रवाक्यानिवोद्विजाः॥ तथा
प्रवर्ततांयज्ञोह्यन्यथामानृतंवचः॥ २३॥

अर्थ- ब्राम्हण हो आपली वेद वाक्यें जर तुम्हास प्रमाण आहेत; तर जसें वेद वाक्यांचें प्रमाण आहे; तसा तुम्हीं यज्ञ प्रवृत्त करावा; परंतु अन्यथा भाषण न करावें.

एवंकृतोत्तरास्तेतुयुंज्यात्मानंततोधिया॥ अवश्यंभा
विनंदृष्ट्वातमधोह्यशापंस्तदा॥ २४॥

अर्थ- असें त्या मध्यस्थ उपरिचर वसुराजानें उत्तर केल्यावर त्या ऋषी नीं ध्यान योगानें पुढें अवश्य होणारें तें भविष्य जाणून त्या काळीं त्याउपरिचर वसु राजास तूं खालीं पड असा शाप दिला.

इत्युक्तमात्रोनृपतिः प्रविवेशरसातलं॥ ऊर्ध्वचारीनृपो
भूत्वारसातलचरोभवत्॥ २५॥

अर्थ- नंतर तो राजा पूर्वी असा आकाश मार्गांत संचार करित असून असें ऋषीचे मुखांतून शापवज्र निघतांच त्यानें तोराजा रसातळांत प्रवेश करिता झाला.

वसुधातलचारीतुतेनवाक्येनसोभवत्॥ धर्माणांसं-
शयच्छेताराजावसुरधोगतः॥ २६॥

अर्थ- वसुराजा धर्मांचे विचारांत संशयछेद करणारा असून तो ऋषीं-च्या शाप वाक्यानें खालीं जाऊन भूतलावर संचार करूं लागला.

तस्मान्नवाच्योह्येकेनबहुज्ञेनापिसंशयः॥ बहुधार-
स्यधर्मस्यसूक्ष्मा दुरनुगागतिः॥ २७॥

अर्थ- तस्मात् बहुत ज्ञान असलें तरीं त्या एकट्यानेंच एकाद्या संशय ग्रस्त विषयाचें निर्णयात्मक उत्तर सांगूनये; कारण बहुत मार्गांनीं चालणा-ऱ्या धर्माची गति सूक्ष्म असल्यामुळें ती समजण्यास अति गहन आहे.

तस्मान्ननिश्चयाद्वक्तुं धर्मः शक्योहिकेनचित्॥ देवा
नृषीनुपादायस्वायंभुवमृतेमनुं॥ २८॥

अर्थ- तस्मात् देव व ऋषि यांस ग्रहण करून एका स्वायंभुव मनू वांचून

धर्मांच्या निर्णया विषयीं सांगण्यास कोणीही समर्थ नाहीं.

तस्मान्नहिंसायज्ञेस्याद्यदुक्तमृषिभिः पुरा॥ ऋषिकोटिसहस्त्राणिस्वैस्तपोभिर्दिवंगताः॥ २९

अर्थ- यास्तव पूर्वी सर्व ऋषीनीं यज्ञांत हिंसा नकरावी असें सांगितलें आहे; ह्मणून यज्ञांत हिंसा करूंनये नंतर कोट्यावधि ते ऋषि तेथून आपले तपोबळानें स्वर्गासगेले.

तस्मान्नहिंसायज्ञंचप्रशंसंतिमहर्षयः॥ उंच्छोमूलंफलंशाकमुदपात्रंतपोधनाः॥ ३०॥ एतद्दत्वाविभवतः स्वर्गलोके प्रतिष्ठिताः॥ अद्रोहश्चाप्यलोभश्चदमोभूतदयाशमः॥ ३१॥ ब्रम्हचर्यंतपःशौचमनुक्रोशंक्षमाधृतिः॥ सनातनस्यधर्मस्यमूलमेवदुरासदं॥ ३२

अर्थ- तस्मात् महर्षि, हिंसायुक्त यज्ञाची प्रशंसा करीत नाहींत; आणि तप च ज्यांचे धन असे ते ऋषि उंच्छ वृत्तीनें संपादन केलेलें धान्य, मूल, फल, शाक (भाज्या), उदक, पात्र, हे पदार्थ आपले वैभवानुसार देऊन स्वर्गलोकांत गेले. तसेंच भूत मात्राचाही द्रोह नकरणें, कोणतेही वस्तूचा लोभ न सणें, सर्व इंद्रियांचा निग्रह करणें, प्राणिमात्रांची दया करणें, शांति, अष्टांगब्रम्हचर्य, स्वधर्माचें शास्त्रानुसार आचरण, प्राणायामानें अंतः करण शुद्धि व मृत्तिकादिकाजीं बाह्य हस्तपादादिक अवयवांची शुद्धि, परदुःखानें दुखित होणें, दुसऱ्याची क्षमाकरणें, कशाहिविपत्ति समयीं धैर्यधरणें, ह्या सर्वही गोष्टी अनादि धर्माचें मूल साधन असून घडण्यास मोठें दुर्घट आहे.

द्रव्यमंत्रात्मकोयज्ञस्तपश्चसमतात्मकं॥ यज्ञैश्चदेवानाप्नोतिवैराजंतपसापुनः॥ ३३॥ ब्रम्हणः कर्मसंन्यासाद्वैराग्यात्प्रकृतेर्लयं॥ ज्ञानात्प्राप्नोतिकैवल्यंपंचैतागतयः स्मृताः॥ ३४॥

अर्थ- समिधा, चरु, घृत, इत्यादिक द्रव्यें व मंत्र या साधनानीं यज्ञ सिद्ध होतो; सुख, दुःखादिक द्वंद्व सहना विषयीं किंवा आपल्या वरून इतरांवर सुख, दुःखादिका विषयीं सर्वत्र समदृष्टी करणें हेंतपाचें मुख्य स्वरूप आहे; हे प्राणी यज्ञानीं देवांस प्राप्त होतात. आणि तपानें देवलोकांत जाऊन तेथून पुढें

सत्यलोकास जातो. तसेंच सर्वकर्मांचे संन्यासानें ब्रम्हाचे सलोकतेस जातो; वैराग्यानें प्रकृतीच्या बंधांतून मुक्त होतो; आणि ब्रम्हज्ञानानें विदेहकैवल्यास जातो; अशाया पांच गति जीवांस प्राप्त होणाऱ्या त्या वेदशास्त्रांत प्रसिद्ध आहेत.

एवंविवादःसुमहान्यज्ञस्यासीत्प्रवर्त्तने॥ऋषीणांदेवतानांचपूर्वेस्वायंभुवेंतरे॥३५॥

अर्थ- या प्रमाणें पूर्वी स्वायंभु व मन्वंतरांत यज्ञ करण्याचे आरंभीं ऋषी व देव यांचा महान् विवाद झाला.

ततस्तेऋषयोदृष्ट्वाहृतंधर्मंबलेनतु॥वसोर्वाक्यमनादृत्यजग्मुस्तेवैयथागतं॥३६

अर्थ- नंतर देवानीं आपले बलानें धर्म हरण केला असें पाहून ते सर्व ऋषी उपरिचर वसुराजाचें वाक्य नमानतां, जसे आले तसे गेले.

गतेषुऋषिसंघेषुदेवायज्ञमवाप्नुयुः॥श्रूयंतेहितपःसिद्धाब्रह्मक्षत्रादयोनृपाः॥३७॥

अर्थ- असे ते ऋषींचे समुदाय गेल्यावर देवांस यज्ञभाग प्राप्त झाला; आणि ब्राम्हण व क्षत्रिय इत्यादिक राजे तपानें सिद्ध झाले असें ऐकण्यांत आहे.

प्रियव्रतोत्तानपादौध्रुवोमेधातिथिर्वसुः॥सुधामा-विरजाश्चैवशंखपाद्राजसस्तथा॥३८॥प्राचीनबर्हिःपर्ज्जन्योहविर्धानादयोनृपाः॥एतेचान्येचबहवस्तेतपोभिर्दिवंगताः॥३९॥

अर्थ- तें असेंकीं; प्रियव्रत, उत्तानपाद, ध्रुव, मेधातिथि, वसु, सुधामा, विरज, शंखपाद्, राजस, प्राचीनबर्हि, पर्जन्य व हविर्धान इत्यादिक राजे व याहून ही इतर बहुत राजे तपानें स्वर्गास गेले.

राजर्षयोमहात्मानोयेषांकीर्तिःप्रतिष्ठिता॥तस्माद्विशिष्यतेयज्ञात्तपःसर्वैस्तुकारणैः॥४०॥

अर्थ- तशीच ज्या राजांची कीर्ति स्वर्गास गेल्यावर ही या लोकांत प्रसिद्ध होऊन राहिली आहे, ते हे महात्मे राजर्षी तपानेंच सिद्धि पावले; यावरून सर्व कारणानीं यज्ञापेक्षां तपच श्रेष्ठ आहे.

ब्रम्हणातपसासृष्टंजगद्विश्वमिदंपुरा ॥ तस्मान्नाप्नोतितद्यज्ञात्तपोमूलमिदंस्मृतं ॥ ४१ ॥ यज्ञप्रवर्तनंह्येवमासीत्स्वायंभुवेंतरे ॥ तदाप्रभृतियज्ञोयंयुगैःसार्द्धंप्रवर्तितः ॥ ४२ ॥ इतिश्रीमत्स्यपुराणेमन्वंतरानुकल्पेदेवर्षिसंवादे द्विचत्वारिंशदुत्तरशततमोऽध्यायः १४२

अर्थ.- आणि पूर्वी ब्रम्हदेवानें हें चराचर विश्व तपोबलानेंच उत्पन्न केलें. तस्मात् तपानें जें प्राप्त होतें तें यज्ञानें प्राप्त होत नाहीं; तेव्हां सर्व सिद्धीस मूलकारण तपच आहे; असें हें तप पूर्वी अनादि कालापासून चालू आहे, आणि या प्रमाणें यज्ञाची प्रवृत्ति तर स्वायंभुव मन्वंतरांत झाली. नंतर तेव्हांपासून पुढील युगांत यज्ञ करण्याची प्रवृत्ति चालू झाली. इतिश्री मत्स्यपुराणें मन्वंतरानु कल्पे देवर्षि संवादोनाम द्विचत्वारिंशदुत्तरशततमोऽध्यायः १४२.

अध्या० १४३वा.

सूतउवाच ॥ अतऊर्ध्वंप्रवक्ष्यामिद्वापरस्यविधिंपुनः ॥ तत्रत्रेतायुगेक्षीणेद्वापरंप्रतिपद्यते ॥ १ ॥

अर्थ.- नंतर सूत बोलला ऋषीहो मी आपुढें तुम्हास पुनः द्वापार युगाचा प्रकार सांगतों; तो असा कीं, तें चालू त्रेतायुग समाप्त होत आलें असतां, द्वापारयुग लागतें.

द्वापरादौप्रजानांतुसिद्धिस्त्रेतायुगेतुया ॥ परिवृत्तेयुगेतस्मिंस्ततःसावैप्रणश्यति ॥ २ ॥

अर्थ.- तेव्हां तें द्वापार युग लागलें असतां, त्या द्वापार युगाचे आरंभीच त्या लोकांची त्रेतायुगांतील तपानें प्राप्त झालेली सिद्धि नाश पावते.

ततःप्रवर्तितेतासांप्रजानांद्वापरेपुनः ॥ लोभोधृतिर्वणिग्युद्धंतत्वानामविनिश्चयः ॥ ३ ॥ प्रध्वंसश्चैववर्णानांकर्मणांतुविपर्ययः ॥ याञ्चावधःपरोदंडोमानोदर्पोक्षमाबलं ॥ ४ ॥ तथारजस्तमोभूयःप्रवृत्तेद्वापरेपुनः ॥ आद्येकृतेनाधर्मोस्ति सत्रेतायांप्रवर्तितः ॥ ५

अर्थ.- असें तें त्रेतायुगानंतर द्वापारयुग लागलें असतां, त्या द्वापार युगांतील प्रजांस लोभ, धैर्य नसणें, कांहीं सत्य व कांहीं असत्य यानीं मिश्रित व्यापार,

अधर्मयुक्त युद्ध, तत्वांचा यथार्थ निश्चय न होणें, ब्राम्हणादिक वर्णांचा नाश, तसाच कर्मांचा विपर्यास, यात्रा करणें, वध करणें हाच श्रेष्ठ दंड, मतिष्ठा, अहंकार, क्षमानकरणें, बलहीन असणें, तसेंच रजोगुण व तमोगुण, इत्यादिक हे दोष द्वापार युग लागलें असतां लोकांचे अंगीं प्रगट होतात; आणिप्रथम कृत युगांत मुळींच अधर्मनसतो; परंतु तो त्रेतायुगांत यत्किंचित् प्रवृत्त होतो.

द्वापरेव्याकुलोभूत्वाप्रणश्यतिकलौपुनः॥वर्णानांद्वापरेधर्माःसंकीर्यंतेतथाश्रमाः॥६॥द्वैधमुत्पद्यतेचैवयुगेतस्मिन्श्रुतिस्मृतौ॥द्विधाश्रुतिःस्मृतिश्चैवनिश्चयोनाधिगम्यते॥७॥

अर्थ- नंतर तो धर्म द्वापार युगांत व्याकुल होऊन पुढें कलियुगांत तर अगदींच नाश पावतो, द्वापार युगांत ब्राम्हणादि वर्णांचे धर्म निरनिराळे असून ते परस्परें मिश्रित होतात; तसेंच आश्रम ही एकमेकांत मिसळतात, आणि द्वापार युगांत श्रुति व स्मृति यांत सर्वत्र दोन प्रकार उत्पन्न होतात; पूर्वीं श्रुति व स्मृति त्यांचा एकपाठ असून त्यांतही दोन दोन प्रकारचे पाठ झाले; या मुळें त्यांतील कोणता पाठ खरा या विषयीं निश्चय होत नाहीं.

अनिश्चयावगमनाद्धर्मतत्वंनविद्यते॥धर्मतत्वेह्यविज्ञातेमतिभेदस्तुजायते॥८॥

अर्थ- या प्रमाणें त्या वेद व स्मृति यांचे पाठाविषयीं संशय आला असतां, धर्माच्या तत्वाचा लोप होतो; तेणें करून धर्म तत्वाविषयीं अज्ञान उत्पन्न झाल्यानें लोकांच्या मतीस भ्रंश होतो.

परस्परंविभिन्नास्तेदृष्टीनांविभ्रमेणतु॥अतोदृष्टिविभिन्नैस्तैःकृतमत्याकुलंत्विदं॥९॥

अर्थ- त्या योगानें ज्ञानाविषयींच्या भ्रांतीनें सर्व लोकांचें परस्परें मत भिन्न होतें; अशा ज्ञानास भेद करणाऱ्या त्या द्वापार युगांतील दोषानीं सर्वजग व वेदशास्त्रादिक हें अतिशयें व्याकुल होतें.

एकोवेदश्चतुष्पादःसंहृत्यतुपुनःपुनः॥संक्षेपादायुषश्चैवव्यस्यतेद्वापरेष्विह॥१०॥

अर्थ- तसाच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, व अथर्वण वेद या चार चरणांचा-

मिळून एक महान् वेद पूर्वी असून पुढें द्वापारादि युगांत लोकांचें आयुष्य कमी झाल्यामुळें वारंवार त्या वेदाचे भाग उत्तरोत्तर कमी केलेजातात.

वेदश्चैकश्चतुर्धातुव्यस्यतेद्वापरादिषु ॥ ऋषिपुत्रैः पुनर्वेदाभिद्यंतेदृष्टिविभ्रमैः ॥ ११ ॥

अर्थ- पूर्वी एक वेद असून तो द्वापारादि युगांत ऋग्वेदादिक चार प्रकारानीं केला जातो, आणि त्यांलही पुनः अनेक ऋषि पुत्रानीं आपापले ज्ञानानुसार त्यांचे विभाग केले.

तेतुब्राम्हणविन्यासैः स्वरक्रमविपर्ययैः ॥ संह्रताऋग्यजुः साम्नांसंहितास्तैर्महर्षिभिः ॥ १२ ॥ सामान्याद्वैकृताच्चैवदृष्टिभिन्नैः क्वचित्क्वचित् ॥ ब्राम्हणंकल्पसूत्राणिभाष्यविद्यास्तथैवच ॥ १३ ॥

अर्थ- ते वेद ब्राम्हणानीं भिन्न भिन्न केल्यामुळें स्वर व क्रम यांचे व्यत्यासानें अस्ताव्यस्त झाले असतां, मोठ्या ऋषीनीं ऋग्वेद, यजुर्वेद, तसाच सामवेद ह्या त्या वेदांच्या संक्षेपानें लहान संहिता केल्या; तशाच त्या ऋषीनीं आपापले ज्ञानानुसार कांहीं एक सामान्यतः ब्राम्हणादिक संहिता, क्रम आदिकरून विकृति, कल्पसूत्रें व भाष्य इत्यादिक अनेक विद्या निर्माण केल्या.

अन्येतुप्रस्थितास्तान्वैकेचित्तान्प्रत्यवस्थिताः ॥ द्वापरेषुप्रवर्तंतेभिन्नार्थैस्तैः स्वदर्शनैः ॥ १४ ॥

अर्थ- तेव्हां कोणी इतर जनानीं त्या वेदादिक विद्यांचा आश्रय केला; असतां, कोणी शिष्य त्यांच्या आश्रयानें राहिले; असे द्वापार युगांत अनेक लोक आपापल्या ज्ञानानुसार निरनिराळे वेदांचे अर्थ करून त्या प्रमाणें यज्ञादिकर्मांत वर्ततात.

एकमाध्वर्यवंपूर्वमासीद्द्वैधंतुतत्पुनः ॥ सामान्यविपरीतार्थैः कृतंशास्त्राकुलंत्विदं ॥ १५ ॥

अर्थ- याच रीतीनें पूर्वी अध्वर्यूचें कर्म एक असून तें पुढें दोन प्रकारचें झालें; आणि तेंही सामान्य व विपरीत अशा अनेक शास्त्रार्थीनीं व्याप्त झालें.

आध्वर्यवंचप्रस्थानैर्बहुधाव्याकुलीकृतं ॥ तथैवाथ

वेणांसाम्नांविकल्पैःस्वस्थसंक्षयैः॥१६॥व्याकुलो द्वापरेष्वर्थः क्रियतेभिन्नदर्शनैः॥ द्वापरेसन्निवृत्तेते वेदानश्यंतिवैकलौ॥१७॥

अर्थ- मग तसेंच अथर्वणवेद व सामवेद यां संबंधि अध्वर्यूचें कर्म आपला नाश करणारें अशा मानसिक विकल्पयुक्त शास्त्रार्थांनीं बहुत प्रकारें व्याकुल केलें; कारण द्वापार युगांत लोकांनीं आपापले निरनिराळ्या ज्ञानानीं यथार्थ शास्त्रार्थ व्याकुल केलाजातो; नंतर तें द्वापारयुग समाप्त झालें असतां, ते वेद सर्वथा नाहींसे होतात.

तेषांविपर्ययोत्पन्ना भवंतिद्वापरेपुनः॥ अदृष्टिर्मरणं चैवतथैवव्याध्युपद्रवाः॥१८॥वाङ्मनः कर्मभिर्दुःखैर्निर्वेदोजायतेततः॥ निर्वेदाज्जायतेतेषांदुःखमोक्षविचारणा॥१९॥

अर्थ- नंतर अशा त्या द्वापार युगांतील लोकांस त्यांच्या त्या वेदांचे व्युत्क्रमानें अज्ञान किंवा क्रूरदृष्टि, अकालमृत्यु, तसेंच व्याधिव तापत्रय संबंधि नानाप्रकारचे उपद्रव हे प्राप्त होतात; पश्चात् कायिक, वाचिक, व मानसिक इत्यादिक पाप कर्मांचे दुःखानीं या मानवांस वैराग्य होतें; त्या वैराग्यानें त्यांस आपण जन्ममरणांचे दुःखांतून मुक्त व्हावें असा विचार होतो.

विचारणायांवैराग्यंवैराग्याद्दोषदर्शनं॥दोषाणांदर्शनाच्चैवज्ञानोत्पत्तिस्तुजायते॥२०॥

अर्थ- त्या मोक्षाविषयींच्या विचारानें तें वैराग्य दृढ होतें; पश्चात् त्या वैराग्यानें सर्व विषयांवर दोष दृष्टि होत्ये; त्या दोषांचे अवलोकनानें या जीवांस ज्ञानें उत्पन्न होतें.

तेषांमेधाविनांपूर्वंमर्त्येस्वायंभुवेंतरे॥उत्पत्स्यंतीह शास्त्राणांद्वापरेपरिपंथिनः॥२१॥

अर्थ- तेव्हां पूर्वी स्वायंभुव मन्वंतरांत मनुष्य लोकीं त्या बुद्धिमंत लोकांचे शास्त्रीय ज्ञानास प्रतिबंध करणारे ग्रंथ पुनः द्वापार युगांत उत्पन्न होतात.

आयुर्वेदविकल्पाश्च अंगानांज्योतिषस्यच॥अर्थशा

स्त्रविकल्पाश्चहेतुशास्त्रविकल्पनं॥प्रक्रियाकल्पसूत्राणां भाष्यविद्याविकल्पनं॥स्मृतिशास्त्रप्रभेदाश्चप्रस्थानानिपृथक्पृथक्॥२३॥द्वापरेष्वभिवर्त्तंतेमतिभेदास्तथानृणां॥मनसाकर्मणावाचाकृच्छ्राद्वार्त्ताप्रसिध्यति॥२४॥

अर्थ- तें असें कीं, आयुर्वेद (वैद्यशास्त्र), शिक्षा, व्याकरणादिक वेदांचीं अंगें, ज्योतिष, अर्थशास्त्र, हेतूनें प्रवृत्त झालेलें नास्तिकशास्त्र, कल्पसूत्रांची प्रक्रिया, अनेक प्रकारच्या भाष्य विद्या, नाना प्रकारच्या स्मृति व अनेकसूत्रादिक प्रस्थानें, इत्यादिक अनेक शास्त्रांचे भेद द्वापार युगांत होतात तेणें करून त्या युगांतील मनुष्यांचे बुद्धीस भ्रंश होऊन त्यांचें झालेलें ज्ञान नष्ट होतें; आणि मन, कर्म व वाणी या साधनानीं मोठ्या कष्टानें त्यांची जीविका चालत्ये, व मोक्षाचें साधन नसेंच रहातें.

द्वापरेसर्वभूतानांकालःक्लेशपरःस्मृतः॥लोभोधृतिर्वणिग्युद्धंतत्वानामविनिश्चयः॥२५॥वेदशास्त्रप्रणयनंवर्णानांसंकरस्तथा॥वर्णाश्रमपरिध्वंसः कामद्वेषौतथैवच॥२६॥पूर्णंवर्षसहस्रेद्वेपरमायुस्तदानृणां॥निःशेषेद्वापरेतस्मिंस्तस्यसंध्यातुपादतः॥२७॥

अर्थ- आणि द्वापारयुगांत सर्व प्राणिमात्रांस क्लेशकारक काल असतो; तसेच लोभ, धैर्य नसणें, सत्य व अनृत या दोहोनीं मिश्रित व्यापार, युद्ध, तत्वांविषयीं निश्चय नसणें, वेद व शास्त्रें यांच्या शाखोप शाखा भेदानें संकोच किंवा विपरीत अर्थ करणें, ब्राम्हणादिक वर्णांचा परस्परें संकर, तसेच ब्राम्हण प्रमुखवर्ण, व ब्रम्हचर्या दिक आश्रम यांचा नाश, विषयां विषयीं इच्छा, द्वेष, हे दोष द्वापारयुगांतील लोकांस असून पूर्ण दोन हजार वर्षें आयुष्य असतें; वतें द्वापारयुग संपत आलें असतां, त्याचा संधिकाल त्रेतायुगाच्या संधिकालापेक्षां चतुर्थांशानें कमी आहे.

गुणहीनास्तुतिष्ठंतिधर्मस्यद्वापरस्यतु॥तथैवसंध्यापादेनअंशस्तस्यांप्रतिष्ठितः॥२८॥

अर्थ- तशाच द्वापार युगाच्या धर्मानें त्यांतील प्रजा त्रेतायुगापेक्षा गुणानीं

हीन असतात; व तसाच द्वापार युगाचे संधिकालांत मुख्य द्वापारांतील धर्मांच्या चतुर्थांशानें धर्म चालतो.

द्वापरस्यतुपर्येषापुष्यस्यचनिबोधत॥ द्वापरस्यांशशेषे
तुप्रतिपत्तिः कलेरथ ॥२९॥

अर्थ- अशी ही द्वापार युगाची स्थिति सांगितली. आतां कलियुगाची स्थिति ऐका. ती अशी कीं, द्वापाराचा शेवटला संधिकाल राहिला असतां, त्याकालापासून कलियुग प्राप्त होतें.

हिंसास्तेयानृतंमायादंभश्चैवतपस्विनां॥ एतेस्वभावाःपुष्य
स्यसाधयंतिचताः प्रजाः॥३०॥

अर्थ- हिंसा, चोरी, असत्य, कपट, तपश्चर्या करणारांस दंभ (ढोंग), हे स्वभाव कलीचे आहेत; तेव्हां कलियुगांतील प्रजाचे आंगीं हे स्वभाव असतात.

एषधर्मः स्मृतः कृत्स्नोधर्मश्चपरिहीयते॥ मनसाकर्मणा
वाचावार्ताःसिध्यंतिवानवा ॥३१॥

अर्थ- हाच संपूर्ण धर्म कलींत असतो; यानें यथार्थ धर्म नाश पावतो. आणि कलियुगांतील लोकांचे उपजीविकेचे व्यापार मन, कर्म व वाणी या साधनानीं सिद्धीस जातात किंवा जात नाहींत.

कलिः प्रमारकोरोगः सततंचापिक्षुद्भयं॥ अनावृष्टि
भयंचैवदेशानांचविपर्ययः॥३२॥ नप्रमाणेस्थितिर्व्ह
स्तिपुष्ये घोरेयुगेकलौ॥ गर्भस्थोम्रियतेकश्चिद्यौव
नस्थस्तथापरः॥३४॥ स्थाविर्येमध्यकौमारेम्रियंतेच
कलौप्रजाः॥ अल्पतेजोबलाःपापामहाकोपाह्यधा-
र्मिकाः॥३५॥ अनृतव्रतलुब्धाश्चपुष्येचैवप्रजाःस्थि
ताः॥

अर्थ- आणि या कलियुगाची स्वरूप स्थिति अशी आहे कीं, कलि हा सर्वांस मारणारा केवळ रोगच आहे; तो असा कीं, या युगांत निरंतर क्षुधेचें भय असतें; कारण अनावृष्टीचे (पर्जन्य न पडण्याचे) भयानें देशांचा विपर्यास होतो; त्यामुळें लोकांची प्रमाणिकपणावर स्थिति नसते; तसेच या युगांत कोणी गर्भांतच मरण पावतात, कोणी तारुण्यांत मरतात; कोणी वृद्धावस्थेंत, किंवा

कोणी बालवयांतच अशाया कालातील प्रजा मृत्यु पावतात; त्याच प्रमाणें अल्पं तेजस्वी, बलहीन, पापी, महाकोपिष्ट, अधर्मनिष्ठ, असत्य हेंच ज्यांचें व्रत, विषयां विषयीं अतिशयें लोभी अशा प्रजा त्या घोर कलियुगांत होतात.

दुरिष्टैर्दुरधीतैश्चदुराचारैर्दुरागमैः ॥३६॥ विप्राणांकर्मदोषैस्तैः प्रजानांजायतेभयं ॥ हिंसामानस्तथेर्ष्याचक्रोधो-सूयाक्षमाधृतिः ॥३७॥ पुष्येभवंतिजंतूनांलोभोमोह-श्चसर्वशः ॥ संक्षोभोजायतेत्यर्थंकलिमासाद्यवैयुगं ॥३८॥

अर्थ- तसेंच कलियुगांत दोषयुक्त यज्ञादि कर्में, सदोष अध्ययनें, दुराचार, दुष्ट आगमादिक शास्त्रें, इत्यादिक ब्राम्हणांचे कर्म दोषानीं सर्वलोकांस भय होतें; आणि हिंसा, अहंकार, ईर्ष्या, क्रोध, असूया (गुणांवर दोषबुद्धि) क्षमा नकरणें, धैर्य नसणें, लोभ, सर्व प्रकारचा मोह व अत्यंत क्षोभ इत्यादिक सर्व दोष कलियुग प्राप्त झालें असतां, सर्वांचे अंगीं उत्पन्न होतात.

नाधीयंतेतथावेदान्यजंतेवैद्विजातयः ॥ उत्सीदंतितथावैववैश्यैःसार्द्धंतुक्षत्रियाः ॥३९॥ शूद्राणांमंत्रयोनिस्तुसंबंधोब्राम्हणैः सह ॥ भवतीहकलौतस्मिन्छयनासनभोजनैः ॥४०॥

अर्थ- कलियुगांत ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हे वेदाध्ययन व यज्ञ यागादि कर्में करीत नाहींत, कलींत क्षत्रिय व वैश्य हे नाश पावतात, शूद्र जातींत वेदमंत्रानें संस्कार चालतात; तसाच त्या कलियुगीं शयन, आसन व भोजन इत्यादिकर्मीनीं ब्राम्हणाशीं शूद्रांचा संबंध होतो.

राजानः शूद्रभूयिष्ठाः पाखंडानांप्रवृत्तयः ॥ काषायिणश्चनिष्कच्छास्तथाकापालिनश्चह ॥ ४१ ॥ येचान्येदेवव्रतिनस्तथायेधर्मदूषकाः ॥ दिव्यवृत्ताश्चयेकेचिद्वृत्त्यर्थंश्रुतिलिंगिनः ॥ ४२ ॥ एवंविधाश्चयेकेचिद्भवंतीहकलौयुगे ॥ अधीयतेतदावेदान्शूद्राधर्मार्थकोविदाः ॥ ४३ ॥

अर्थ- तसेंच कलियुगीं पाखंड धर्म प्रवृत्त करणारे शूद्र प्रभृति बहुत राजे होतात; आणि कोणी काषाय (तांबडीं) वस्त्रें धारण करणारे, कोणी कच्छहीं

न, कोणी कापालिक, कोणी देवांचीं अनेक व्रतें करणारे, कोणी वेदोक्त धर्मास दूषण देणारे व उपजीविकेसाठीं वेदोक्त दीक्षेनें उत्तम आचरण करणारे, असे जे कलियुगीं शूद्र होतात; ते धर्म व अर्थ याविषयीं चतुर असून वेदाध्ययन करितात—

यजंतिह्यश्वमेधैस्तु राजानः शूद्रयोनयः॥ स्त्रीबालगोवधं कृत्वा हत्वा चैव परस्परं॥४४॥ उपद्रुत्य तथान्योन्यं साधयंति तदा प्रजाः॥

अर्थ— कलियुगांत शूद्र जातीचे राजे अश्वमेध यज्ञ करतात; आणि त्या काळांतील प्रजा, परस्परें स्त्रिया, बाल व गायी यांस मारून व एकमेकांचा वध करून तसेंच परस्परांचें सर्वस्व हरण करून आपला स्वार्थ साधितात.

दुःखप्रचुरताल्पायुर्देशोत्सादः सरोगता॥४५॥ अधर्माभिनिवृत्तत्वं तमोवृत्तं कलौ स्मृतं॥ भ्रूणहत्या प्रजानां च तथा ह्येवं प्रवर्तते॥४६॥

अर्थ— आणि या युगांत दुःख बहुत असून लोक अल्पायु असतात; तसेंच देश उच्छिन्न होतात, रोग होणें, अधर्माविषयीं प्रवृत्ति असणें, अज्ञानपूर्वक सर्व कर्मांचें आचरण, भ्रूणहत्या (गर्भहत्या करणें) हें आचरण कलियुगांत चालतें.

तस्मादायुर्बलं रूपं प्रहीयंते कलौ युगे॥ दुःखेनाभिप्लुतानां च परमायुः शतं नृणां॥४७॥

अर्थ— त्यामुळें कलियुगांत आयुष्य, बल, रूप हीं कमी होतात; आणि अनेक दुःखानीं व्याप्त अशा या कलींतील लोकांचें पूर्ण आयुष्य शंभर वर्षे असतें.

भूत्वा च न भवंतीह वेदाः कलियुगेऽखिलाः॥ उत्सीदंते तथा यज्ञाः केवलं धर्महेतवः॥४८॥

अर्थ— वेद कलियुगांत असून ते सर्व कलीचे अंतीं नाहींसे होतात; तसेंच केवल धर्मास कारण असे सर्व यज्ञही उच्छिन्न होतात.

एषा कलियुगावस्था संध्यांशौ तु निबोधत॥ युगे युगे तु हीयंते त्रीस्त्रीन्पादांश्च सिद्धयः॥४९॥ युगस्वभावाः संध्यास्तु अवतिष्ठंति पादतः॥ संध्यास्वभावाः

स्वांशेषुपादेनैवावतस्थिरे ॥ ५० ॥

अर्थ- अशी कलियुगाची स्थिति आहे; आतां या युगाचे संधि व संध्यांश या-कालांची ही स्थिति ऐका, ती अशीकीं, प्रति युगांत तीन तीन अंश सिद्धि कमी होतात. त्या त्या युगांचे स्वभाव संधिकालांत चतुर्थांश असतात, त्या संधिकालांतील स्वभाव याचे चतुर्थांशानें संध्यांश कालांत असतात.

एवंसंध्यांशकेकालेसंप्राप्तेतुयुगांतिके ॥ तेषामधर्मिणांशास्ताभृगूणांचकुलेस्थितः ॥ ५१ ॥ गोत्रेणवैचंद्रमसेनाम्नाप्रमतिरुच्यते ॥ कलिसंध्यांशभागेषुमनोःस्वायंभुवेंतरे ॥ ५२ ॥ समास्त्रिंशत्तुसंपूर्णाःपर्यटन्वैवसुंधरां ॥ अस्त्रकर्मासवैसेनांहस्त्यश्वरथसंकुलां ॥ ५३ ॥ प्रगृहीतायुधैर्विप्रैः शतशोथसहस्रशः ॥ सतदातैः परिवृत्तोम्लेच्छान्सर्वान्निजघ्निवान् ॥ ५४ ॥

अर्थ- या प्रमाणें कलियुगाचा संध्यांशकाल प्राप्त झाला असतां, त्या अधर्मिष्ठ लोकांस शासन करणारा, चंद्राचे गोत्रानें भृगूंच्या कुलांत कोणी एक प्रमति या नामानें प्रसिद्ध पुरुष होईल, तो अस्त्र कर्मांत निपूण असून स्वायंभुव मन्वंतरांतील कलियुगाचे संध्यांश कालाच्या भागांत पृथ्वीवर हत्ती, अश्व व रथ यानीं व्याप्त अशा सेनेसहित पूर्ण तीस वर्षे पर्यंत फिरत होत्साता तो प्रमति, हातांत आयुधें धारण केलेले शेकडों, हजारों, ब्राम्हणांस समागमें घेऊन त्याकाळीं सर्व यवनांस मारील.

सहत्वासर्वशश्चैवराजानःशूद्रयोनयः ॥ पाखंडान्सतदासर्वान्निःशेषानकरोत्प्रभुः ॥ ५५ ॥

अर्थ- आणि ते समयीं त्या समर्थ प्रमतीनें सर्व शूद्र जातीचे राजे मारून संपूर्ण पाखंडी लोकांसही मारिलें.

अधार्मिकाश्चयेकेचित्तान्सर्वान्हंतिसर्वशः ॥ औदीच्यान्मध्यदेशांश्चपार्वतीयांस्तथैवच ॥ ५६ ॥ प्राच्याम्प्रतीच्यांश्चतथाविंध्यपृष्ठापरांतिकान् ॥ तथैवदाक्षिणात्यांश्चद्रविडान्सिंहलैःसह ॥ ५७ ॥ गांधारान्पा

रदांश्चैवपल्हवान्यवनान्शकान् ॥ तुषारान्बर्बशान्श्वे-
तान्पुलिंदान्बर्बरान्खसान् ॥ ५८ ॥ लंपकानांध्रकांश्चा
पिचोरजातींस्तथैवच ॥ प्रवृत्तचक्रोबलवान्शूद्राणा
मंतकृद्बभौ ॥ ५९ ॥

अर्थ- तसाच तो प्रमति पृथ्वीवर जे अधर्मनिष्ठ आहेत त्या सर्वांस मारितो, ते असे कीं, कोणी उत्तर दिशेस रहाणारे, कोणी मध्यदेशांतले, तसेच कोणी पर्वतांवर वास करणारे, पूर्वेकडील व पश्चिमेकडील देशांत रहाणारे, विंध्य पर्वताचे पृष्ठभागावरील देशांत वास करणारे, तसेच दक्षिण देशांतील, द्रविड देशांतले, सिंहलद्वीपांत रहाणारे, गांधार व पारद या देशांत रहाणारे, पल्हव, यवन, शक, तुषार, बर्बश, शस्त्र अंगाचे, पुलिंद, बर्बर, खस, लंपक, आंध्रक व चोरांच्या जातीचे जे आहेत, या सर्व दुष्ट शूद्रादिकांचा नाश करणारा तो महा बलाढ्य प्रमति आपलें ब्राम्हणादिक चतुरंग सैन्य पृथ्वीवर पसरून शोभतो.

विद्राव्यसर्वभूतानिचचारवसुधामिमां ॥ मानवस्य
तुवंशेतुनृदेवस्येहजज्ञिवान् ॥ ६० ॥

अर्थ- असा हा प्रमति, या काळीं मनुष्य राज मनूचे वंशांत उत्पन्न होऊन सर्व दुष्ट प्राणि मात्रांस पळवून या पृथ्वीवर संचार करितो.

पूर्वजन्मनिविष्णुश्चप्रमतिर्नामवीर्यवान् ॥ स्वतः सर्वे
चंद्रमसः पूर्वकलियुगेप्रभुः ॥ ६१ ॥ द्वात्रिंशेभ्युदिते
वर्षेप्रक्रांतोविंशतिंसमाः ॥ निजघ्नेसर्वभूतानिमा
नुषाण्येवसर्वशः ॥ ६२ ॥

अर्थ- हाच प्रमति विष्णूचा अवतार असून त्यानें पूर्वजन्मीं चंद्राचे वंशांत पूर्वीच्या कलिंत स्वतः अवतार घेतला, नंतर महा पराक्रमी समर्थ तो प्रमती बत्तिसावें वर्ष लागलें असतां, तेव्हां पासून आरंभ करून पुढें वीस वर्षें पर्यंत मनुष्यांतील दुष्ट प्राणि मात्रांस मारीत होता.

कृत्वाबीजावशिष्टांतांपृथ्वींक्रूरेणकर्मणा ॥ परस्प
रनिमित्तेनकालेनाकस्मिकेनच ॥ ६३ ॥ संस्थितास-
हसायासेसेनाप्रमतिनासह ॥ गंगायमुनयोर्मध्ये

सिद्धिंप्राप्तासमाधिना॥ ६४ ॥

अर्थ- आणि अशा युद्धाच्या क्रूर कर्मानें पृथ्वीवर केवल बीजें मात्र राहिलीं असतां, नंतर या अकस्मात् प्राप्त झालेल्या कलि कालानें परस्पर निमित्त क कलहाचे आयासानें श्रमलेली ती सेना प्रमती सहवर्तमान गंगा व यमुना यांचे मध्यभागीं एकाएकीं उत्तम प्रकारें बसून समाधीनें मोक्ष सिद्धीस पावली.

ततस्तेषुप्रनष्टेषुसंध्यांशेक्रूरकर्मस॥ उत्साद्यपार्थिवान्सर्वान्तेष्वनीतेषुवैतदा॥ ६५॥

अर्थ- नंतर त्या कलियुगाच्या संधिकालांत ते क्रूर कर्मे करणारे दुष्टलोक नाश पावले असतां, सर्व दुष्ट राजांचा संहार करून ते प्रमतीचे सैन्यांतील योद्धे गेले.

ततः संध्यांशकेकालेसंप्राप्तेचयुगांतके॥ स्थितास्वल्पावशिष्टासुप्रजास्विहक्वचित्क्वचित्॥ ६६॥ स्वाप्रदानास्तदातेवैलोभाविष्टास्तुवृंदशः॥ उपहिंसंतिचान्योन्यंप्रलुंपंतिपरस्परं॥ ६७॥

अर्थ- त्या नंतर कलियुगाचा शेवटला संध्यांश काल प्राप्त झाला असतां, पृथ्वीवर कोठें कोठें अल्प प्रजा राहिल्या असतां ते लोक लोभाविष्ट होऊन आपलें धन दुसऱ्यास न देतां, जमाव करून एकमेकांस मारून परस्परांचे धनादिक पदार्थ हरण करितात.

अराजकेयुगांशेतुसंक्षयेसमुपस्थिते ॥ प्रजास्तावैतदासर्वाःपरस्परभयार्दिताः॥ ६८॥ व्याकुलास्ताःपरावृत्तास्त्यज्यदेवगृहाणितु॥ स्वान्स्वान्प्राणानवेक्षंतोनिष्कारुण्यात्सुदुःखिताः॥ ६९॥ नष्टेश्रौतस्मृतेधर्मेकामक्रोधवशानुगाः॥ निर्मर्यादानिरानंदानिःस्नेहनिरपत्रपाः॥ ७०॥ नष्टेधर्मेप्रतिहतान्ह्रस्वकाःपंचविंशकाः॥ हित्वादारांश्चपुत्रांश्चविषादव्याकुलप्रजाः॥ ७१॥ अनावृष्टिहतास्तेवैवार्त्तामुत्सृज्यदुःखिताः॥ चीरकृष्णाजिनधरानिःक्रुद्धानिष्परिग्रहाः॥ ७२॥ वर्णाश्रमपरिभ्रष्टाःसंकरंघोरमास्थि

ताः॥एवंकष्टमनुप्राप्ताह्यल्पशेषाः प्रजास्ततः॥७३॥जंतवश्चक्षुधाविष्टादुःखान्निर्वेदमागमन्॥

अर्थ- या प्रमाणें कलियुगाचे अंतीं अराजक झाल्यामुळें सर्व प्रकारें नाश प्राप्त झाला असतां, त्या कालीं सर्व लोक परस्परांचे भयानें पीडित होऊन व्याकुळ होतात; तेणें करून त्या अन्योन्य विरोधापासून मागें फिरून आपलीं देव व घरें यांस सोडून आपले प्राणांवर दृष्टी ठेवून ते क्रूर कर्मानें अत्यंत दुःखित होतात; आणि त्यांचा श्रौत व स्मार्त (वेद व स्मृती यांनीं विहित) असा धर्म नाहींसा झाल्यानें ते लोक काम व क्रोध यांचे स्वाधीन होऊन अमर्याद, आनंद व स्नेह यांनीं रहित व निर्लज्ज असे होतात; तेव्हां धर्म लोप झाला असतां, त्यायोगानें ते सर्वत्र पराभव पावून देहानें लहान होतात; व त्यांचें आयुष्य ही पूर्ण पंचवीसव र्षांचें होतें. नंतर ते लोक आपले स्त्रिया व पुत्र यांस सोडून खेदानें व्याकुल होत्साते पर्जन्याच्याही अनावृष्टीमुळें नाश पावून आपला उपजीविकेचा व्यापार सोडून अत्यंत दुःखित झाल्यावर वल्कलें व कृष्णाजिनें धारण करून क्रोधरहित होत्साते कोणतीही वस्तु जवळ न बाळगतां ते लोक वर्ण व आश्रम यांतून भ्रष्ट होऊन भयंकर जाति संकराचा आश्रय करितात; या प्रमाणें दुःखें भोगून थोड्या राहिलेल्या त्या प्राणिमात्र प्रजा क्षुधेनें व्याप्त होऊन त्या दुःखानें ते अतिशयें खेद पावतात.

संश्रयंतिचदेशांस्तांश्चक्रवत्परिवर्तनाः॥७४॥ततः प्रजास्तताः सर्वामांसाहाराभवंतिहि॥मृगान्वराहान्वृषभान्येचान्येवनचारिणः॥७५॥भक्ष्यांश्चैवाप्यभक्ष्यांश्चसर्वांस्तान्भक्षयंतिताः॥

अर्थ- नंतर ते लोक चक्रासारखे त्या त्या अनेक देशांचा आश्रय करितात; आणि त्या सर्व प्रजा हरिण, डुकर, बैल, व दुसरे वनचर पशू त्यांस भक्ष्याभक्ष्य विचार न करितां, त्यांचे मांसांचा आहार करितात.

समुद्रंसंश्रितायास्तुनदींश्चैवप्रजास्तताः॥७६॥तेपिमत्स्यान्हरंतीह आहारार्थंचसर्वशः॥

अर्थ- तसेंच त्यांत जे लोक समुद्र किंवा नद्या यांचा आश्रय करितात, ते आपले भक्षणार्थ सर्वप्रकारच्या मत्स्यांस आणितात.

अभक्ष्याहारदोषेण एकवर्णगताः प्रजाः ॥ ७७ ॥ यथा कृतयुगे पूर्वमेकवर्णमभूत्किल ॥ तथा कलियुगस्यांते शूद्रीभूताः प्रजास्तथा ॥ ७८ ॥

अर्थ- अशा त्या अभक्ष्य पदार्थांच्या आहाराचे दोषानें त्या सर्व प्रजा वर्णसंकरानें एकजातींत येतात, जसे पूर्वी कृतयुगांत शूद्र एक वर्णाचे लोक होते, तसे कलियुगाच्या अंतीं सर्व लोक एका शूद्रजातींत जातात.

एवंवर्षशतं पूर्णं दिव्यं तेषां न्यवर्तत ॥ षट्त्रिंशच्च सहस्राणि मानुषाणि तु तानि वै ॥ ७९ ॥

अर्थ- अशी देवांचीं पूर्ण शंभर वर्षे पर्यंत त्यांची स्थिति असत्ये; म्हणजे देवांच्या शंभर वर्षांचे मानानें तीं मनुष्यांचीं छत्तीस हजार वर्षे होतात.

अथ दीर्घेण कालेन पक्षिणः पशवस्तथा ॥ मत्स्याश्चैव हताः सर्वैः क्षुधाविष्टैश्च सर्वशः ॥ ८० ॥

अर्थ- नंतर बहुकालनें ते लोक क्षुधेनें व्याप्त झाले; असतां, ते, सर्वप्रकारचे पक्षी, पशु व मत्स्य यांस मारून भक्षण करितात.

निःशेषेष्वथ सर्वेषु मत्स्यपक्षिपशुष्वथ ॥ संध्यांशे प्रतिपन्ने तु निःशेषास्तु तदा कृताः ॥ ८१ ॥

अर्थ- या प्रमाणें त्या लोकांनीं कलियुगाचे संधिकालांत सर्व मत्स्य, पक्षि व पशु हे समग्र संपवीतु आणल्यावर संध्यांशकाल लागला असतां त्यानीं ते सर्व मत्स्यादिक भक्षून समाप्त केले जातात.

ततः प्रजास्तु संभूय कंदमूलमथो खनन् ॥ फलमूलाशनाः सर्वे अनिकेतास्तथैव च ॥ ८२ ॥ वल्कलान्यथ वासांसि अधःशय्याश्च सर्वशः ॥ परिग्रहो न तेष्वस्ति धनशुद्धिमवाप्नुयुः ॥ ८३ ॥ एवं क्षयं गमिष्यंति ह्यल्पशिष्टाः प्रजास्तदा ॥ तासामल्पावशिष्टानामाहाराद्वृद्धिरिष्यते ॥ ८४ ॥

अर्थ- नंतर त्या सर्व प्रजा जागोजागीं जमून कंदमूलें खणूं लागतात; आणि ते फलमूलादिक पदार्थ भक्षून ते सर्व लोक घरें नसून वृक्षांच्या सालांचीच वस्त्रे पांघरून शय्ये वांचून भूमीवरच निद्रा करितात; त्यांचे जवळ द्र-

आदिक कांहीं एक वस्तूंचा संग्रह नसतो; या मुळें द्रव्य मूलक जे दोष आहेत. त्यां पासून ते शुद्ध होतात; अशा त्या कलियुगाचे अंतिंच्या प्रजा नाश पावून अवशिष्ट थोड्या राहतात; त्या कालीं त्या थोड्या राहिलेल्या प्रजा केवळ आह्या रानेंच वाटतात.

एवंवर्षशतंदिव्यंसंध्यांशस्तस्यवर्त्तते॥ ततोवर्षसह स्त्रांतेअल्पशिष्टाःस्त्रियःस्मृताः॥८५॥ मिथुनानि तुताःसर्वाह्यन्योन्यंसंप्रजज्ञिरे॥

अर्थ- अशा देवांचे शंभर वर्षे पर्यंत कलियुगाचा संध्यांश काल असतो; पुढें हजार वर्षांनंतर त्या थोड्या राहिलेल्या सर्व प्रजां पासून परस्पर संयोगानें कन्या व पुत्र अशीं जुळीं होतात.

ततस्तास्तुम्रियंतेवैपूर्वोत्पन्नाःप्रजास्तुयाः॥८६॥ जातमात्रेष्वपत्येषुततःकृतमवर्तत॥

अर्थ- नंतर त्या झालेल्या अपत्यांत पूर्वी झालेलीं मुलें तत्काल मरणपावतात; आणि पुढें कांहीं कालानें कृतयुग लागतें.

यथास्वर्गेशरीराणिनरकेचैवदेहिनां॥८७॥उपभोगसमर्थानि एवंकृतयुगादिषु॥ एवंकृतस्यसंतानःकलेश्चैवक्षयस्तथा॥८८॥

अर्थ- स्वर्गांत किंवा नरकांत प्राणि मात्रांचीं शरीरें जशीं सुख अथवा दुःख यांचे उपभोगा विषयीं समर्थ असतात; तशीच या कृतादि युगांतही प्राणिमात्रांचीं शरीरें सुख व दुःख भोगण्या विषयीं समर्थ असतात; याप्रमाणें कृतयुगांत जसा प्रजा वृद्धी व सुख यांचा विस्तार होतो तसा कलींत प्रजांचा सर्व प्रकारें क्षय होतो.

विचारणात्तुनिर्वेदःसाम्यावस्थात्मना तथा॥ ततश्चैवात्मसंबोधःसंबोधाद्धर्मशीलता॥८९॥ कलिशिष्टेषुतेष्वेवंजायंते पूर्ववत्प्रजाः॥

अर्थ- सुख दुःखादिकां विषयीं साम्यावस्था युक्त चित्तानें विचार झाला असतां, त्या पासून विषयांवर वैराग्य होतें; तेणें करून आत्म्याचें उत्तम ज्ञान होतें; त्या आत्मज्ञानानें धर्मशीलता प्राप्त होते. या प्रमाणें हे वैराग्यादि

क प्रकार त्या कलींच्या अंतीं राहिलेल्या लोकांच्या अंगीं प्राप्त होऊन कालधर्मानें त्या प्रजा पूर्ववत् होतात.

भाविनोर्थस्यच बलात्ततः कृतमवर्तत ॥ ९० ॥ अतीतानागतानिस्युर्यानिमन्वंतरेष्विह ॥ एतेयुगस्वभावास्तु मयोक्तास्तुसमासतः ॥ ९१ ॥ विस्तरेणानुपूर्व्याच्चनमस्कृत्यस्वयंभुवे ॥

अर्थ- कलीचे अंतीं भविष्यार्थाच्या बलानें हे सर्व धर्म त्या कालच्या प्रजांचे अंगीं प्राप्त झाले; नंतर कृतयुगाची प्रवृत्ती झाली; अशी प्रतिमन्वंतरांत जी मागें गेलेलीं व पुढें येणारीं सर्व कृतादिक चारी युगें आहेत; त्यांचे म्या हे सर्व स्वभाव कांहीं संक्षेपानें व कांहीं विस्तारानें असे आरंभीं ब्रम्हदेवांस नमस्कार करून तुम्हास क्रमानें सांगितले.

प्रवृत्तेतुततस्तस्मिन्पुनः कृतयुगेतुवै ॥ ९२ ॥ उत्पन्नाः कलिशिष्टेषुप्रजाः कार्त्तयुगास्तथा ॥ तिष्ठंतिचेहयेसिद्धा अदृष्टाविहरंतिच ॥ ९३ ॥ सहसप्तर्षिभिर्येतुतत्र येचव्यवस्थिताः ॥ ब्रह्मक्षत्रविशः शूद्राबीजार्थेय इहस्मृताः ॥ ९४ ॥

अर्थ- नंतर पुनः असें कृतयुग लागलें असतां, कलियुगांतील राहिलेल्या लोकांपासून कृतयुगांतील प्रजा उत्पन्न झाल्या; आणि जे सिद्ध दृष्टीस पडत नसून पृथ्वीवर क्रीडा करितात व जे सप्तर्षी बरोबर त्यांच्या लोकीं राहिलेले असतात; तसेच ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे पुनः कृतयुगीं ब्राम्हणादि वर्णाच्या प्रवृत्तीसाठीं बीजांचे उत्पत्ती करितां जे या लोकीं राहिले आहेत ते प्रस्तुत कृतयुगांत उत्पन्न झालेल्या लोकांसारखेच दिसतात.

तेषांसप्तर्षयोधर्मकथयंतीहतेषुच ॥ ९५ ॥ वर्णाश्रमाचारयुतंश्रौत स्मार्तविधानतः ॥

अर्थ- त्या कृतयुगांतील लोकांस त्या त्या मन्वंतरांतील सप्तर्षी श्रौत व स्मार्त या दोन विधानानीं ब्राम्हणादिक वर्ण व ब्रम्हचर्यादिक आश्रम यांच्या विधीनें युक्त अशा धर्माचा उपदेश करितात.

एवंतेषुक्रियावत्सु प्रवर्त्ततीहवैकृते ॥ ९६ ॥ श्रौतस्मा

तेस्थितानांतुधर्मेसप्तर्षिदर्शिते॥तेतुधर्मव्यवस्थार्थं
तिष्ठंतीहकृतेयुगे॥९७॥मन्वंतराधिकारेषुतिष्ठंतिऋ
षयस्तुते॥

अर्थ- या प्रमाणें श्रौत व स्मार्त धर्मांत वर्तणारांचे वर्णाश्रमाचार युक्त त्यामा र्गांतील सप्तर्षीनीं दर्शविलेल्या धर्मांत कृतयुगांतील लोक वर्ततात आणि त्या कालांत ते सप्तर्षीही त्या धर्माच्या व्यवस्थेसाठीं प्रति मन्वंतरांत धर्मोपदेशाचे अधिकारावर रहातात.

यथादावप्रदग्धेषुतृणेष्वेवापनक्षितौ॥९८॥वनानां-
प्रथमंवृष्ट्यातेषांमूलेषुसंभवः॥एवंयुगाद्युगानांवै सं
तानस्तुपरस्परं॥९९॥प्रवर्ततेह्यविच्छेदाद्यावन्म
तरक्षयः॥

अर्थ- अरण्यांत दावाग्नी लागला असतां, तो गवतास मात्र जाळितो, परंतु त्यां त्या मूळा पर्यंत पृथ्वींत जात नाहीं; पुढें त्या वनांत प्रथम पर्जन्य वृष्टीनें त्या- राहिले त्या मूळा पासून गवत उत्पन्न होतें, असेंच एका युगा पासून दुसऱ्या युगांत परस्पर संयोगा पासून सृष्टीचा विस्तार होतो; याप्रमाणें ही सृष्टी खंड न पडतां मन्वंतराचे क्षया पर्यंत चालते.

सुखमायुर्बलंरूपंधर्मार्थौकामएवच॥१००॥युगेष्वे
तानिहीयंतेत्रयःपादाःक्रमेणतु॥

अर्थ- आणि सुख, आयुष्य, बळ, रूप, धर्म, अर्थ व काम हे या कृतादि युगां- त प्रतियुगास एकचरण या क्रमानें कलियुग पर्यंत प्रत्येकीं सर्व तीन अंशानीं कमी होतात.

इत्येष प्रतिसंधिर्वः कीर्तितस्तुमयाद्विजाः॥१०१॥-
चतुर्युगाणांसर्वेषामेतदेवप्रसाधनं॥

अर्थ- ब्राम्हण हो म्या तुम्हास असा हा युगांचा परस्परें संधि सांगितला;- अशी हीच चारी युगांतील सर्वांची सिद्ध स्थिति आहे.

एषाञ्चतुर्युगाणांतुगणितात्ह्येकसप्ततिः॥१०२॥क्रमे-
णपरिवृत्तास्तामनोरंतरमुच्यते॥

अर्थ- या चार युगांची एकचौकडी होते अशाक्रमानें एकाहत्तर चौकड्या

झाल्या म्हणजे तें एक मन्वंतर होतें.

युगाख्यास्कृतुसर्वास्कभवतीह यदाचयन् ॥१०३॥ तदे
वचतदन्यास्कपुनस्तद्वैयथाक्रमं ॥

अर्थ:- या प्रमाणें एक मन्वंतरांतील सर्व कृतादियुगांत ज्या कालीं जसें जें हो तें त्याच प्रमाणें इतर सर्व मन्वंतरांतील युगांतही त्या कालीं तें तसेंच होतें.

सर्गेसर्गेयथाभेदाल्यकृत्पद्यंतेतथैवच ॥१०४॥ चतुर्दश
कृतावंतोज्ञेयामन्वंतरेष्विह ॥ आसुरीयातुधानीचपै
शाचीयक्षराक्षसी ॥१०५॥ युगेयुगे तदाकालेप्रजाजा
यंतिताःशृणु ॥ यथाकल्पंयुगैःसार्धं भवंतेतुल्यल
क्षणाः ॥ इत्येतल्लक्षणंप्रोक्तंयुगानांवैयथाक्रमं ॥१०६

अर्थ:- आणि ब्रम्हांडाचे प्रति आदिसृष्टींत तत्वादिकांचे जसे भेद उत्पन्न होतात; तसेच चवदा मन्वंतरांतील सृष्टींत ही तितकेच भेद उत्पन्न होतात व असुर, यातुधान, पिशाच, यक्ष व राक्षस इत्यादिक जातींच्या प्रजा प्रतियुगीं त्या त्या कालीं कशा उत्पन्न होतात तें ऐक १ त्या अशा कीं, त्या त्या कल्पानुसार प्रति युगीं यथा पूर्व समान लक्षणानीं युक्त प्रजा उत्पन्न होतात; असें हें युगांचें सर्व लक्षण यथा क्रमानें सांगितलें.

मन्वंतराणांपरिवर्त्तनानिचिरप्रवृत्तानियुगस्वभावात्॥
क्षणंनसंतिष्ठतिजीवलोकःक्षयोदयाभ्यांपरिवर्तमा-
नः॥१०७॥

अर्थ:- या प्रमाणें चतुर्दश मन्वंतरांच्या वारंवार युगांच्या स्वभावानें चक्राकार आवृत्ति महा प्रलया पर्यंत चिरकाल होत असतात; त्या कालाचे योगानें हें जीव जन्म मरणांच्या प्रवाहा मुळें क्षणमात्र ही एक स्थळीं रहात नाहींत.

एतेयुगस्वभावावःपरिक्रांतायथाक्रमं ॥ मन्वंतराणि
यान्यस्मिन्कल्पेवक्ष्यामितानिच ॥१०८॥ इतिश्री
मत्स्यपुराणेमन्वंतरानुकीर्तनोनामत्रिचत्वारिंशदु
त्तरशततमोऽध्यायः॥१४३॥

अर्थ:- हे युगांचे स्वभाव कालाच्या क्रमानें प्राप्त होऊन परस्परांच्या धर्मा चें आकर्षण करितात, हें तुम्हास सांगितलें. आतां कल्पांत जीं मन्वंतरें होता

तर्नी सांगतां. इतिश्री मत्स्य पुराणें मन्वंतरानु कीर्तनो नाम त्रिचाळारिंश दु त्तर शत तमोऽध्याय: १४३

अध्याय १४४ वा.

सूतउवाच ॥ मन्वंतराणियानिस्युः कल्पेकल्पेचतु र्दश ॥ व्यतीतानागतानिस्युर्यानिमन्वंतरेष्विह ॥ १ विस्तरेणानुपूर्व्याच्चस्थितिंवक्ष्येयुगेयुगे ॥

अर्थ- सूत बोलला ऋषी हो दर कल्पांत जीं चवदा मन्वंतरें होत असून त्या मन्वंतरांत जीं मागें गेलेलीं व पुढें येणारीं युगें असतात. त्या प्रत्येक युगांती ल स्थिति विस्तारानें क्रमें करून सांगतों.

तस्मिन्युगेचसंभूतिर्यासांयावच्चजीवितं ॥ २ ॥ युग- मात्रंतुजीवंतिन्यूनंतस्याद्वयेनच ॥ चतुर्दशसुतावंतो ज्ञेयामवंतरेष्विह ॥ ३ ॥

अर्थ- त्या त्या युगांतील प्रजांची उत्पत्ति व त्यांतील ज्यांचें जितके काल- पर्यंत जीवित म्हणजे वांचणें असतें, त्यांत कोणी युगपर्यंत वांचतात व- कोणी त्या पेक्षां अर्धमानानें कमी वांचतात, असेंचवदा ही मन्वंतरांत ते ति तकेंच वांचतात असें जाणावें.

मनुष्याणांपशूनांचपक्षिणांस्थावरैः सह ॥ तेषामायु रुपक्रांतंयुगधर्मेषुसर्वशः ॥ ४ ॥

अर्थ- मनुष्य, पशु, पक्षी, व वृक्ष पाषाणादिक यांचें आयुष्य युग धर्मानुसा र सर्व प्रकारें सांगण्याचा उपक्रम करतों.

तथैवायुः परिक्रांतं युगधर्मेषुसर्वशः ॥ अस्थितिंच कलौदृष्ट्वाभूतानांमानुषे तथा ॥ ५ ॥ परमायुः शतं- त्वेतन्मानुषाणांकलौस्मृतं ॥

अर्थ- तसेंच पूर्वींच्या कृतादि युग धर्मांतील सर्वप्रकारचें आयुष्य गेलें आणि कलियुगांत मनुष्य लोकीं, प्राण्यांची स्थिति चंचल पाहून त्यांचें पू- र्ण आयुष्य कलींत शंभर वर्षें झालें.

देवासुरमनुष्याश्चयक्षगंधर्वराक्षसाः ॥ ६ ॥ परिणा होच्छ्रयेतुल्याजायंतेहकृतेयुगे ॥

अर्थ— आणि देव, असुर, मनुष्य, यक्ष, गंधर्व व राक्षस हे सर्वही कृतयुगांत उत्पन्न झाले असतां; त्यांचे देहाची विस्तार व उंची समानच असते.

षण्णवत्यंगुलोत्सेधोअष्टानांदेवयोनिनां ॥ ७ ॥ नवांगुलप्रमाणेननिष्पन्नेन तथाष्टकं ॥ एतत्स्वाभाविकंतेषांप्रमाणमधिकुर्वतां ॥ ८ ॥

अर्थ— तशाच ज्या आठ देवयोनी आहेत; त्यांची उंची शाण्णव अंगुलें असून बाहात्तर अंगुलें घेर असतो; हें त्यांच्या देहाचें स्वभावसिद्ध प्रमाण आहे.

मनुष्यावर्तमानास्तुयुगसंध्यांशकेष्विह ॥ देवासुरप्रमाणंतुसप्तसप्तांगुलंक्रमात् ॥ ९ ॥ चतुराशीतिकैश्चैवकलिजैरंगुलैः स्मृतं ॥

अर्थ— तसेच पृथ्वीवर युगाचे संध्यांश कालांत जे मनुष्य असतात; त्यांच्या देहाचें प्रमाण, आणि सामान्य इतर देव व असुर यांच्या देहाचें प्रमाण कलींतील मनुष्यांच्या अंगुलानीं एकुण पन्नास अंगुलें घेर व चवऱ्यायशी अंगुलें उंच असें असतें:—

आपादतलमस्तकोनवतालोभवेत्तुयः ॥ १० ॥ संख्याजानुबाहुश्चदैवतैरभिपूज्यते ॥

अर्थ— आणि तळपाया पासून मस्तक पर्यंत नऊताडांचे प्रमाणानें उंच असून जो आजानु बाहु (गुडघ्यास लागणाऱ्या लांब हातानीं युक्त) असा असतो तो देवांसही मान्य होतो.

गवांचहस्तिनांचैवमहिषस्थावरात्मनां ॥ ११ ॥ क्रमेणैतेनविज्ञेयेन्हासवृद्धीयुगेयुगे ॥

अर्थ— तशाच गायी, हत्ती, म्हशी व वृक्षपाषाणादिक यांची युग धर्मानुसार ऱ्हास किंवा वृद्धी हीं सांगितल्या प्रमाणें क्रमानें जाणावी.

षट्सप्तत्यंगुलोत्सेधः पशूनाककुदोभवेत् ॥ १२ ॥ अंगुलानामष्टशतमुत्सेधोहस्तिनांस्मृतः ॥ अंगुलानांसहस्त्रंतुद्विचत्वारिंशदंगुलं ॥ १३ ॥ शतार्धमंगुलानांतुउत्सेधः शाखिनांपरः ॥ मानुषस्यशरीरस्यसंनिवेशस्तुयादृशः ॥ १४ ॥ तल्लक्षणंतुदेवानांद

श्चतेन्वयदर्शनात् ॥ बुध्यातिशयसंयुक्तोदेवानांका
यउच्यते ॥१५॥

अर्थ- गायी, बैल, वगैरे पशूंची पायां पासून पाठीवरच्या कोळ्या पर्यंत शा
हात्तर अंगुळें उंची असत्ये; हत्तीची उंची एकशे आठ अंगुळें असत्ये तशी वृक्षां
ची पूर्ण उंची एकहज्जार ब्याण्णव अंगुळें असत्ये; आणि मनुष्यांचे शरीराची-
जशी रचना आहे तशीच आकृती देवांचे देहाची असून त्यांमध्यें बुद्धि ज्ञान
इत्यादिक लक्षणें मात्र अतिशयें अधिक असतात.

तथानातिशयश्चैव मानुषः कायउच्यते ॥ इत्येवहिप-
रिक्रांता भावायेदिव्यमानुषाः ॥१६॥ पशूनांपक्षिणां
नैवस्थावराणांच सर्वशः ॥ गावोजाश्वाश्चविज्ञेयाह
स्तिनः पक्षिणोमृगाः ॥१७॥ उपयुक्ताः क्रियास्वेते-
यज्ञियास्त्विहसर्वशः ॥ यथाक्रमोपभोगाश्चदेवा
नांपशुमूर्तयः ॥१८॥ तेषांरूपानुरूपेश्च प्रमाणेः
स्थिरजंगमाः ॥ मनोज्ञेस्तत्रतेभोगेः सुखिनो ह्युप
पेदिरे ॥१९॥

अर्थ- तसाच मनुष्यांचा देह असून देवांसारिखा अधिक गुणानीं युक्त
नसतो; असे देव किंवा मनुष्य, पशु, पक्षी, वृक्ष पाषाणादिक, हे सर्व प्रकार
चे पदार्थ सांगितले; आतां गायी, बोकड, घोडे, हत्ती, पक्षि, हरिण हे जे
यज्ञादि क्रियांत उपयोगी पशू आहेत; ते यथाक्रमानें उपभोग योग्य देवां
च्या पशु त्या मूर्ति आहेत; या पश्वादिकांच्या रूपा समान रूपवंत असून आ
कृतीच्या प्रमाणानें ही त्यां सारिखेच असणारे असे इतर पशु व वृक्षादिक-
ही आपल्या त्या यज्ञ योग्य सुंदर देहामुळें त्या यज्ञानें उत्तमस्वर्ग लोकीं ते-
थील सुंदर भोगानीं सुखी झाले.

अथसंतः प्रवक्ष्यामिसाधूनथत तश्चवै ॥ ब्राम्हणाः
श्रुतिशब्दाश्चदेवानांपशुमूर्तयः ॥२०॥ संयुज्यब्रम्ह
णात्यंतस्तेनसंतः प्रचक्षते ॥ सामान्येषुचधर्मेषु तथा
वैशेषिकेषुच ॥२१॥ ब्रम्हसत्रविशोयुक्ताःश्रौत
स्मार्तेन कर्मणा ॥ वर्णाश्रमेषुयुक्तस्यसुखोदर्कस्य

स्वर्गतो ॥२२॥ श्रौतस्मार्तोहियो धर्मोज्ञान धर्मः स-
उच्यते ॥ दिव्यानांसाधनात्साधुर्ब्रम्हचारीगुरोर्हि-
तः ॥२३॥ कारणात्साधनाच्चैव गृहस्थः साधुरुच्यते ॥

अर्थ— यानंतर संत कोण तें सांगून साधू सांगतो; तें असें कीं, निरंतर वेदाध्ययन करणारे असून यज्ञयागादिक कर्में करून सर्वदां देवांच्या स्वाधीन रहाणारे व प्राणायामादिक साधनानीं अंतःकरण ब्रम्हाशीं संयुक्त करून ध्यानादिक करणारे असे जे ब्राम्हण त्यांस संत म्हणतात; सामान्य व विशेष अशा धर्मांत जे ब्राम्हण क्षत्रिय व वैश्य हे श्रौत स्मार्त विधीनें युक्त असतात त्यांसही संत म्हणावें; ब्राम्हणादिक वर्ण व ब्रम्हचर्यादिक आश्रम यांत युक्त असून स्वर्ग गतीत भावि अत्यंत सुख कारक असा जो श्रौत, स्मार्त धर्म त्यास ज्ञानधर्म म्हणतात; उत्तम लोक प्राप्तीचीं साधन कर्में करणारा किंवा देवांचा प्रसाद संपादन करण्या साठीं साधन करणारा, गुरूचें हितसाधना विषयीं तत्पर ब्रम्हचारी व सर्व आश्रमांस साधन या कारणानें गृहस्थाश्रमी हे सर्व साधू जाणावे.

तपसश्चतथारण्येसाधुर्वैखानसः स्मृतः ॥२४॥ य-
तमानोयतिःसाधुः स्मृतोयोगस्यसाधनात् ॥ धर्मो
धर्मगतिः प्रोक्तः शब्दोह्येष क्रियात्मकः ॥२५॥ कु
शलाकुशलौचैवधर्माधर्मौब्रवीत्प्रभुः ॥

अर्थ— तसाच वैखानस नामक आगमोक्त मार्गानें अरण्यांत तप करणारा व योग साधना विषयीं प्रयत्न करणारा संन्यासी हे साधू समजावे. आणि धर्म हा अधःपातापासून उद्धरून उत्तम गति देतो, सत्क्रिया करणें हा धर्म शब्दाचा अर्थ आहे; यावरून पुण्य कर्म म्हणजे धर्म व अधर्म म्हणजे पापे असें जगत्प्रभु ईश्वर बोलला आहे.

अथदेवाश्चपितरऋषयश्चैवमानुषाः ॥२६॥ अयंध
र्मोह्ययंनेतिब्रुवतेमौनमूर्त्तिना ॥

अर्थ— नंतर ब्रम्हादिक देव, पितर, ऋषि व पुण्यश्लोक मानव हे सर्वही पूर्ण मनन करून सत्कर्मास धर्म व दुष्कर्मास अधर्म असें म्हणतात.

धर्मेतिधारणेधातुर्महत्वेचैवमुच्यते ॥ २७ ॥ आधारणे-

महत्त्वेवाधर्मः सतुनिरुच्यते ॥ तत्रेष्टप्रापकोधर्मआचा
र्यैरुपदिश्यते ॥ २८ ॥ अधर्मश्चानिष्टफल आचार्यैर्नोप
दिश्यते ॥

अर्थ- कारण धर्म शब्दांतील धृ धातूचे धारण व महत्त्व हे दोन अर्थ आहेत; त्यावरून धर्म शब्द धारण करणें व महत्त्व या दोन अर्थीं वर्ततो, त्यांत जो सुखका रक धर्म आहे; त्याचा उपदेश,गुरु,सज्जनांस करतात; व जो दुःखकारक अधर्म- आहे तो ते गुरु लोकांस सांगत नाहींत.

वृद्धाश्चालोलुपाश्चैव आत्मवंतोह्यदांभिकाः ॥ २९ ॥
सम्यग्विनीतामृदवस्तानाचार्यान्प्रचक्षते ॥ धर्मज्ञै
र्विहितो धर्मः श्रौतस्मार्तो द्विजातिभिः ॥ ३० ॥ दाराग्नि
होत्रसंबंधमिज्याश्रौतस्यलक्षणं ॥

अर्थ- ते धर्मोपदेशक गुरु असे कीं, वय, ज्ञानवत पयानीं वृद्ध, द्रव्यादिकां विषयीं लोभ रहित, विवेकी, जितेंद्रिय, दंभ वर्जित, उत्तम विनय संपन्न व अत्यंत दयाशील असे जे असतात त्यांसच शास्त्रांत गुरुपदवी आहे; अ- शा धर्मज्ञ ब्राम्हणानीं सांगितलेलें जें श्रौत,स्मार्त कर्म त्यास धर्म म्हणतात; त्यांत लग्न करणें, अग्निहोत्र घेणें, यज्ञयागादिकर्मे करणें हें श्रौत धर्माचें स्व रूप जाणावें.

स्मार्तोवर्णाश्रमाचारोयमैश्चनियमैर्युतः ॥ ३१ ॥ पूर्वे-
भ्योवेदयित्वेह श्रौतंसप्तर्षयोब्रुवन् ॥

अर्थ- आणि यम व नियम यानीं युक्त असा ब्राम्हणादिक वर्ण व ब्रम्हचर्या दिक आश्रम यांचा स्मृत्युक्त जो आचार आहे; तो स्मार्त धर्म समजावा; त्यां त पूर्वज ब्रम्हादिकां पासून वेदांचे प्रमाणानीं जाणून सप्तर्षीनीं मन्वंतरांतील लोकांस श्रौत धर्म सांगितला.

ऋचोयजूंषिसामानि ब्रम्हणोंगानिवैश्रुतिः ॥ ३२ ॥ म
न्वंतरस्यातीतस्य स्मृत्वातन्मनुरब्रवीत् ॥ तस्मात्
स्मार्तः स्मृतोधर्मोवर्णाश्रमविभागशः ॥ ३३ ॥

अर्थ- तसाच ऋग्वेद यजुर्वेद व साम वेद हीं वेदांचीं अंगें आहेत; म्हणून त्यांस श्रुति हें नाम आहे; त्या श्रुतींच्या अर्थाचें स्मरण करून गेलेल्या म-

थम मन्वंतराच्या स्वायंभुव मनूनें जे धर्म, वर्ण व आश्रम यांच्या विभागानें सांगितले त्यांस स्मार्त धर्म म्हणावें.

एवंवैद्विविधोधर्मः शिष्टाचारः सउच्यते ॥ शिषेर्द्धातो श्चनिष्ठांताच्छिष्टशब्दंप्रचक्षते ॥ ३४ ॥

अर्थ:- तस्मात् शिष्टांच्या परंपरा संप्रदायाचे आचारानें प्राप्त झालेला श्रौत व स्मार्त असा हा दोनप्रकारचा धर्म आहे. शिष्टाचारास प्रामाण्याचें कारण असें आहे कीं, शिष् हा धातू महत्वार्थी आहे; त्या शिष् धातूहून क्त प्रत्यय होऊन शिष्ट हा शब्द सिद्ध झाला आहे; तेव्हां शिष्ट शब्दाचा अर्थ श्रेष्ठ असा आहे; यावरून शिष्टाचारास प्रामाण्य आहे.

मन्वंतरेषुयेशिष्टाइहतिष्ठंति धार्मिकाः ॥ मनुःसप्तर्षयश्चैवलोकसंतानकारिणः ॥ ३५ ॥ तिष्ठंतीहचधर्मार्थंताञ्छिष्टान्संप्रचक्षते ॥

अर्थ:- सर्व मन्वंतरांत जे धार्मिक शिष्ट पृथ्वीवर रहातात; ते असे कीं, प्रतिमन्वंतरीं लोक सृष्टीचा विस्तार करणारे मनु व सप्तर्षी हे धर्म व्यवस्थापनार्थ येथें भूलोकीं असतात. त्यांस शिष्ट म्हणतात.

तैःशिष्टैश्चलितो धर्मस्थाप्यतेवैयुगेयुगे ॥ ३६ ॥ त्रयी वार्तादंडनीतिः प्रजावर्णाश्रमेप्सया ॥ शिष्टैराचर्यते यस्मात्पुनश्चैवमनुक्षये ॥ ३७ ॥ पूर्वैःपूर्वैर्मतत्वाच्च शिष्टाचारःसशाश्वतः ॥

अर्थ:- ते शिष्ट पृथ्वीवरील धर्म अस्ताव्यस्त झाला असतां तो प्रतियुगीं पूर्ववत् स्थापन करतात; वेदविहित धर्म, अर्थ, काम, उपजीविकेची उक्त वृत्ति, दंडनीति हे धर्म प्रजांचे वर्ण व आश्रम यांच्या रक्षणासाठीं मन्वंतर संबंधी प्रलयानंतर पुनः मनू व सप्तर्षी आदीकरून शिष्ट आचरितात असा धर्म यांचेही पूर्वजांनीं स्वीकारिला आहे; म्हणून हा अनादि शिष्टाचार प्रमाण आहे हें सिद्ध झालें.

दानंसत्यंतपोलोकोविद्येज्यापूजनंदमः ॥ ३८ ॥ अष्टौ तानिचरित्राणि शिष्टाचारस्यलक्षणं ॥

अर्थ:- १ दान, २ सत्य, ३ तप, ४ ज्ञान, ५ विद्या, ६ यज्ञ, ७ पूजा व ८ इंद्रियनिग्रह, हें आठ प्रकारचें आचरण करणें हें शिष्टांच्या आचारानें लक्षण आहे.

शिष्टायस्माच्चरंत्येनंमनुःसप्तर्षयश्चह॥३९॥मन्वंतरे
षुसर्वेषुशिष्टाचारस्ततःस्मृतः॥

अर्थ- सर्व मन्वंतरांतील मनु व सप्तर्षि हे या पूर्वोक्त धर्माचें आचरण करतात म्हणून त्यास शिष्टाचार असें म्हणतात.

निज्ञेयः श्रवणात्छ्रौतः स्मरणात्स्मार्त्तउच्यते॥४०॥
इज्यावेदात्मकःश्रौतः स्मार्तोवर्णाश्रमात्मकः॥

अर्थ- वेद श्रुतीनीं जो धर्म विहित आहे तो श्रौत धर्म व जो वेदार्थाचें स्मरणानें मनु प्रभृतीनीं सांगितलेला धर्म तो स्मार्त धर्म असें जाणावें; त्यांत यज्ञ, याग व वेदाध्ययन हा श्रौत धर्म आणि वर्ण व आश्रम यांचे आचारानीं युक्त जो धर्म तो स्मार्त धर्म असें समजावें.

प्रत्यंगानिप्रवक्ष्यामिधर्मस्येहतुलक्षणं॥४१॥दृष्टा
नुभूतमर्थंचयःपृष्टोनविगूहते॥यथाभूतप्रवादस्तु
इत्येतद्धर्मलक्षणं॥४२॥

अर्थ- आणि धर्म स्वरूपाचीं उपांगें व लक्षणें ही सांगतों तें असें कीं, प्रश्न केला असतां, दृष्ट व अनुभवलेला या अर्थास आच्छादन न करितां जो लोक मर्यादा सारिखा स्पष्ट रीतीनें यथाशास्त्र सांगितला जातो; तो धर्म समजावा हें धर्माचें लक्षण आहे.

ब्रम्हचर्यंतपोमौनंनिराहारत्वमेवच॥इत्येतत्तपसोरू
पंसुघोरंतुदुरासदं॥४३॥

अर्थ- तसेंच ब्रम्हचर्य, तप, मौन, व कांहीं भक्षण न करणें हें तपाचें अति भयंकर रूप असल्यामुळें तें प्राप्त होण्यास अशक्य आहे.

पशूनांद्रव्यहविषामृक्सामयजुषांतथा॥ऋत्विजां
दक्षिणायाश्चसंयोगोयज्ञउच्यते॥४४॥

अर्थ- आणि यज्ञांतील लोकड आदिकरून पशु, दर्भ, समिधादिद्रव्यें, घृतादिक होम योग्य पदार्थ, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद यांचे मंत्र, ऋत्विज व दक्षिणा या सर्वांचा जो परस्परें संयोग होतो त्यास यज्ञ म्हणावें.

आत्मवत्सर्वभूतेषुयोहितायशुभायच॥वर्ततेसं
ततंह्यष्टः क्रियाश्रेष्ठादयास्मृता॥४५॥

अर्थ- तसाच जो मनुष्य हर्षयुक्त होत्साता आपल्या सारिखा सर्व प्राणिमा त्रांचें हित व शुभ कार्य यां विषयीं निरंतर वर्ततो त्याचें तें दयायुक्त श्रेष्ठ कर्म जाणावें.

आक्रुष्टोभिहतोयस्तुनाक्रोशेत्प्रहरेदपि॥ अदुष्टो
वाङ्मनःकायैस्तितिक्षुःसाक्षमास्मृता॥४६॥

अर्थ- कोणी एकाद्यास रडण्याजोगें दुःख दिलें, किंवा कोणी ताडन केलें तरीं जो रुदन करीत नाहीं व दुसऱ्यास मारीत नाहीं; आणि तसाच स्वतः वाणी, मन व देह यानींही विकार न पावतां सहन करतो त्यास तितिक्षु (सहनशील) म्हणावें; हें क्षमेचें यथार्थ स्वरूप आहे.

स्वामिना रक्ष्यमाणानांमुत्सृष्टानांचसंभ्रमे॥ परस्वा
नामनादानमलोभइतिसंज्ञितः॥४७॥

अर्थ- कोणी मालकानें रक्षण केलेलीं अथवा हर्षयुक्त त्वरेनें मोकळी टाकलेलीं अशा परधनाचा अपहार न करणें यास निर्लोभता असें म्हणतात.

मैथुनस्यासमाचारोजल्पनाच्चिंतनात्तथा॥ निवृत्ति
ब्रम्हचर्यंचतदेतच्छमलक्षणं॥४८॥

अर्थ- तसेंच मैथुनाचें कृत्य वाचेनें व चिंतनानें हीनकरितां विषयां पासून मनाची निवृत्ति होऊन निरंतर ब्रम्हचर्यानें वर्तणें हें शमाचें लक्षण जाणा.

आत्मार्थेवापरार्थेवाइंद्रियाणीहयस्यवै॥ विषयेन-
प्रवर्तंतेदमस्यैतत्तुलक्षणं॥४९॥

अर्थ- त्याच प्रमाणें आपल्यासाठीं किंवा दुसऱ्या करितां ज्यांचीं मन आदि करून अकराही इंद्रियें विषयांवर जात नाहींत त्यास दम म्हणावें.

पंचात्मकेयोविषयेकारणेचाष्टलक्षणे॥ नक्रुध्येतप्र
तिहतःसजितात्माभविष्यति॥५०॥

अर्थ- आणि रूप, रस, गंध, स्पर्श, व शब्द या पांच प्रकारच्या विषयां विषयीं व त्याचे उपभोगा विषयीं कारण जें श्रवण कीर्तनादिक आठ प्रकारचें मैथुन त्या विषयीं पराभव पावला तरीं जो क्रोधयुक्त होत नाहीं त्यास जितेंद्रिय म्हणतात.

यद्यदिष्टतमंद्रव्यंन्यायेनैवागतंचयत्॥ तत्तद्गुणव

तेदेयमित्येतद्दानलक्षणम् ॥ ५१ ॥

अर्थ— जें जें अतिशयें प्रिय असून न्यायानें संपादन केलेलें द्रव्य असेल तेंतें शम, दम, मूल, दया, अहिंसा इत्यादि गुणयुक्त पात्रास द्यावें हें दानाचें उत्तम-लक्षण आहे.

श्रुतिस्मृतिभ्यांविहितोधर्मोवर्णाश्रमात्मकः ॥ शिष्टाचा रप्रवृद्धश्चधर्मोयंसाधुसंमतः ॥ ५२ ॥

अर्थ— श्रुति व स्मृति यानीं सांगितलेला असून शिष्टाचाराचे परंपरेनें प्राप्त झालेला जो वर्ण व आश्रम या संबंधी धर्म आहे तोच साधूंस मान्य आहे.

अप्रद्वेष्योह्यनिष्टेषुइष्टंवैनाभिनंदति ॥ प्रीतितापवि षादानांविनिवृत्तिर्विरक्तता ॥ ५३ ॥

अर्थ— दुःखें प्राप्त झालीं तरी त्यांचा द्वेष न करणें, आणि सुख प्राप्त झालें असतां त्याचे योगानें संतोष न मानणें तसेंच हर्ष, संताप व खेद या दोषांची मनांतून सर्वथा निवृत्ति असणें यास वैराग्य म्हणावें.

संन्यासः कर्मणांन्यासः कृतानामकृतेः सह ॥ कुशला कुशलाभ्यांतुप्रहाणंन्यासउच्यते ॥ ५४ ॥

अर्थ— पुण्य व पाप या कर्मांतून मुक्त होणें यास न्यास म्हणतात. आणि त्याप्र माणें पूर्वी केलेलीं न केलेलीं व पुढें कर्तव्य अशीं जीं कर्में आहेत त्या सर्वांचा त्याग करणें हें संन्यासाचें स्वरूप आहे.

अव्यक्तादिविशेषांतविकारेस्मिन्निवर्त्तते ॥ चेतनाचेत नंज्ञात्वाज्ञानेज्ञानी सउच्यते ॥ ५५ ॥

अर्थ— अव्यक्त तत्व आदिकरून यावत् परमाणु विशेष सहित विकार युक्त ब्रम्हांडांतील सर्व चेतन व अचेतन वस्तु जाणून या विषयीं जो निवृत्त हो-तो त्याचें हें ज्ञान दृढ राहिलें असतां त्यास ज्ञानी म्हणतात.

प्रत्यंगानितुधर्मस्यचेत्येतल्लक्षणंस्मृतं ॥ ऋषिभिर्द्ध र्मतत्त्वज्ञैः पूर्वस्वायंभुवेंतरे ॥ ५६ ॥

अर्थ— अशीं हीं धर्माचीं उपांगें व धर्माचें स्वरूप लक्षण धर्माचें तत्व जाणणा ऱ्या ऋषींनीं पूर्वी स्वायंभुव मन्वंतरांत सांगितलें.

अत्रवोवर्णयिष्यामिविधिंमन्वंतरस्यतु ॥ तथैवचातु

होत्रस्यचातुर्वर्णस्यचैवहि ॥ ५७ ॥

अर्थ- आतां तुम्हास मन्वंतर, चातुर्होत्र(चवघे मिळून होम करण्याचें कर्म), व ब्राम्हणादिक चारवर्ण या सर्वांचा प्रकार सांगतो.

प्रतिमन्वंतरंचैवश्रुतिरन्याविधीयते ॥ ऋचोयजूंषिसामानियथावत्प्रतिदैवतं ॥ ५८ ॥ विधिस्तोत्रंतथाहोत्रंपूर्ववत्संप्रवर्तते ॥ द्रव्यस्तोत्रंगुणस्तोत्रंकर्मस्तोत्रंतथैवच ॥ ५९ ॥ तथैवाभिजनस्तोत्रंस्तोत्रमेवंचतुर्विधं ॥

अर्थ- प्रति मन्वंतरांत ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे यथा पूर्व असून प्रत्येक देवतेस यज्ञांत वेदमंत्र निराळा असतो; आणि कर्माचा विधि देवतादिकांचीं स्तोत्रें व होमाचें कर्म हीं पूर्ववत् चालतात तसेंच यज्ञांतील पशु आदिकरून होमद्रव्यांची स्तुति, त्यांच्या गुणांची स्तुति, यज्ञांतील कर्मांचें स्तोत्र व ऋत्विजांदिकांच्या सत्कुलांचें स्तोत्र अशी यज्ञांत चार प्रकारची स्तुति आहे.

मन्वंतरेषुसर्वेषुयथाभेदाभवंतिहि ॥ ६० ॥ प्रवर्तयंति तेषांवैब्रम्हस्तोत्रंपुनःपुनः ॥

अर्थ- त्याच प्रमाणें सर्व मन्वंतरांत जसजसे हे वेदमंत्र भिन्न होतात आणि तसतसे त्या मंत्रानीं वारंवार यज्ञांत ब्रम्हाचें स्तवन करितात.

एवंमंत्रगुणानांतुसमुत्पत्तिश्चतुर्विधा ॥ ६१ ॥ अथर्व ऋग्यजुःसाम्नांवेदेष्विहपृथक्पृथक् ॥

अर्थ- अशीं अनंत वेदराशींत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्व वेद या चार प्रकारच्या मंत्ररूप गुणांची निरनिराळी उत्पत्ति झाली.

ऋषीणांतप्यतांतेषांतपःपरमदुश्चरं ॥ ६२ ॥ मंत्राः प्रादुर्भवंत्यादौपूर्वमन्वंतरस्यह ॥

अर्थ- प्रत्येक मन्वंतराचे ते ते ऋषी अति दुर्घट तप करीत असतां, त्यांस प्रथम स्वायंभुमन्वंतराचे आरंभीं ते ते वेदमंत्र प्रगट होतात.

असंतोषाद्भयाद्दुःखान्मोहाच्छोकाच्च पंचधा ॥ ६३ ॥ ऋषीणांतारकायेनलक्षणेनयदृच्छया ॥

अर्थ- आणि १ असंतोष, २ भय, ३ दुःख, ४ मोह, व ५ शोक, या पांच दोषांतून ते वेद मंत्र इश्वरेच्छेनें ज्या लक्षणानें तारक व्हावे; तसे ते त्या ऋषींस

तारक झाले.

ऋषीणांयादृशत्वंहि तद्वक्ष्यामीह लक्षणं ॥ ६४ ॥ अ-
तीतानागतानांच पंचधात्वार्षकं स्मृतं ॥

अर्थ- आतां सर्व ऋषींचें जसें लक्षण आहे तें सांगतों; तें असें कीं, मागें झालेले व पुढें होणारे या समग्र ऋषींचें पांच प्रकारचें स्वरूप आहे.

तथाऋषीणांवक्ष्यामि आर्षस्येह समुद्भवं ॥ ६५ ॥ गु-
णसाम्येनवर्त्ततेसर्वसंप्रलयेतदा ॥

अर्थ- आणि ऋषींच्या वेदोक्त कर्मांची उत्पत्ती सांगतों ती अशी कीं, पूर्वी सर्व ब्रम्हांडाचा रजोगुणाच्या अभावानें महा प्रलय झाला असतां त्याकालीं चेतन व अचेतन हे सर्वही ब्रम्हस्वरूपीं लीन होते.

अविभागेनवेदानामनिर्देश्यतमोमये ॥ ६६ ॥ अबु-
द्धिपूर्वकंतद्वैचेतनार्थंप्रवर्तते ॥

अर्थ- ते समयीं अतिशयित तमोमय (अज्ञानरूप) स्थितींत वेदांचा विभाग नसल्यामुळें तें वेदोक्त कर्म विचार केल्यावांचून ज्ञानार्थ प्रवृत्त झालें.

तेनार्षंबुद्धिपूर्वंतु चेतनेनाप्यधिष्ठितं ॥ ६७ ॥ प्रवर्तते
तथातेतुयथामत्स्योदकावुभौ ॥

अर्थ- नंतर (मत्स्याच्या योगानें उदक पहिल्यापेक्षां जसें अधिक हालतें) तसें तें वेदविहित कर्म चेतनाचे आश्रयानें ज्ञान पूर्वक चालतें.

चेतनाधिकृतंसर्वंप्रावर्तत गुणात्मकं ॥ कार्यकारणभा
वेनतथातस्य प्रवर्तते ॥ ६८ ॥

अर्थ- तस्मात् त्रिगुणात्मक विश्व ज्ञान व कर्म हें सर्वही चेतनाच्या आधारानें स्वकार्याविषयीं प्रवृत्त होतें (कुंभार, चाक, काठी, इत्यादि कारणांनीं जशीं घटादिक कार्यें होतात.) तसें हें जग ब्रम्हरूप मूळ कारणाचे योगानें कार्यरूप चराचर विश्व उत्पन्न होतें.

विषयोविषयित्वंचतदाह्यर्थपदात्मकौ ॥ कालेनप्राप
णीयेनभेदाश्चकारणात्मकाः ॥ ६९ ॥ सांसिद्धिकास्त-
दावृत्ताः क्रमेणमहदादयः ॥ महतोसावहंकारस्तस्मा
द्भूतेंद्रियाणिच ॥ ७० ॥ भूतभेदाश्चभूतेभ्योजज्ञिरेतु

परस्परम् ॥ संसिद्धिकारणं कार्यं सद्य एव विवर्तते ॥ ७१

अर्थ- जसें अर्थरूप विषय ज्या पदाच्या आश्रयानें असतो ते रामकृष्णादि शब्द अर्थरूप विषयाचे संबंधानें विषयी हें नाम पावले आहेत; तसें जड पदार्थ हे विषय व यांचे आश्रय चेतन हे विषयी आहेत. सृष्ट्यादिकांच्या प्राप्तीस कारण जो काल त्याचे योगानें सृष्टीच्या सिद्धीस कारण जीं महत्तत्वादिक तत्वें आहेत तीं क्रमानें उत्पन्न झालीं; तीं अशीं कीं, प्रथमतः महत्तत्व झालें, त्यापासून अहंकार, त्यापासून पंचमहाभूतें, मनासहित पंच कर्मेंद्रियें व पंच ज्ञानेंद्रियें मिळून अकरा इंद्रियें झालीं. पुढें त्या पंचमहाभूतांपासून त्यांचे परस्पर-संयोगानें अनेक भिन्न प्राण्यांच्या जाती उत्पन्न झाल्या; त्यांचे अंगीं स्वभाव सिद्ध सर्व कार्यही तत्काल उत्पन्न होतें.

यथोल्मुकात्तु विटपा एककालाद्भवंति हि ॥ तथा प्रवृत्ताः क्षेत्रज्ञाः कालेनैकेन कारणात् ॥ ७२ ॥

अर्थ- (जळत लांकडापासून अनेक ठिणग्या जश्या एका कालीं उत्पन्न होतात.) तसे एका कालरूप कारणानें अनेक जीव एक समयावच्छेदें करून उत्पन्न होतात.

यथांधकारे खद्योतः सहसा संप्रदृश्यते ॥ तथा निरुद्धोऽप्यव्यक्तः खद्योत इव सज्वलन् ॥ ७३ ॥

अर्थ- जसा अंधकारांत सूर्य अथवा चंद्र एकाएकीं दिसतो, तसा सर्वत्र अलिप्त असून अव्यक्त स्वभाव असा परमात्मा जगाचे आंत, बाहेर आपले माहात्म्यानें चंद्र किंवा सूर्य यां सारखा प्रकाशमान आहे.

स महात्मा शरीरस्थस्तत्रैवेह प्रवर्त्तते ॥ महतस्तमसः पारे वैलक्षण्याद्विभाव्यते ॥ ७४ ॥

अर्थ- जगत्कारण महा प्रकृतीहून हीपर असून सर्वदा जो लोकोत्तर महिम्यानें विराजमान आहे; तो महात्मा भगवान् ब्रम्हांडांत ब्रम्हादि सर्व जीवांचे शरीरांत रहातो.

तत्रैव संस्थितो विद्वान्तपसांत इति श्रुतं ॥ बुद्धिर्विवर्धतस्तस्य प्रादुर्भूता चतुर्विधा ॥ ७५ ॥

अर्थ- तपानें युक्त जो ज्ञानी जीव आहे तो प्रलय कालीं त्या परमात्म्याचे

च ठिकाणीं रहातो. नंतर पुनः सृष्टिकालीं त्या वृद्धि पावणाऱ्या जीवाची बुद्धि चार प्रकारानीं प्रगट होत्ये.

ज्ञानंवैराग्यमैश्वर्यंधर्मश्चेतिचतुष्टयं॥सांसिद्धिकान्यथैतानिअप्रतीतानितस्यवै॥७६॥

अर्थः— तें असें कीं, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य व धर्म हीं त्याचीं स्वभाव सिद्ध असून त्यास अज्ञात होतीं; तीं त्याचे अंगीं तपानें प्रगट होतात.

महात्मनःशरीरस्थचैतन्यात्सिद्धिरुच्यते॥पुरिशेतेयतःपूर्वंक्षेत्रज्ञानंतथापिच॥७७॥पुरेशयनात्पुरुषःक्षेत्रज्ञानात्क्षेत्रज्ञउच्यते॥यस्माद्धर्मात्प्रसूतेहितस्माद्वैधार्मिकस्तुसः॥७८॥

अर्थः— आणि त्या महा ज्ञानी जीवाची सर्व सिद्धि त्याच्या स्वरूप ज्ञानानेंच त्यास प्राप्त होत्ये. तसाच तो जीव देहपुरींत रहातो म्हणून त्यास पुरुष म्हणतात व शरीर क्षेत्राचे ज्ञानानें त्यास क्षेत्रज्ञ हें हि नाम आहे. त्याच प्रमाणें हा जीव धर्मा पासून उत्पन्न होतो; त्यामुळें त्यास धार्मिक म्हणतात.

सांसिद्धिकेशरीरेचबुध्याव्यक्तस्तुचेतनः॥एवंविवृतःक्षेत्रज्ञःक्षेत्रंह्यनभिसंधितः॥७९॥

अर्थः— ह्या प्रकृती पासून निर्माण झालेल्या शरीरांत हा जीव बुद्धीच्या योगानें प्राप्त होतो; अथवा या देहांत ज्ञानाचे योगानें परमात्मा जीवांस प्रगट होतो; या प्रमाणें जीव, ईश्वर, व देहरूप क्षेत्र यांचें निःसंशय व्याख्यान सांगितलें.

निवृत्तिसमकालेतुपुराणंतद्चेतनं॥क्षेत्रज्ञेनपरिज्ञातंभोग्योयंविषयोमम॥८०॥

अर्थः— त्या जीव गणांत जो या ब्रम्हांड क्षेत्राचा ज्ञाता जीव आहे; त्यानें उत्पन्न होतांच तत्कालीं शब्दरूप जड पुराण हें आपल्या ज्ञानास कारण भूत विषय आहे असें जाणलें.

ऋषिर्हिंसागतौधातुर्विद्यासत्यंतपःश्रुतं॥एषसन्निचयोयस्माद्ब्रम्हणस्तुततस्त्वृषिः॥८१॥

अर्थः— ऋषि धातु, हिंसा न करणें, या अर्थी आहे; यस्मात् अहिंसा धर्मानें वर्तणाराचे अंगीं ब्रम्हसंबंधी विद्या, सत्य, तप व शास्त्र या गुणांचा समुदाय

असतो; तेणेंकरून तोऋषि पदवीचा अधिकारी होतो.

निवृत्तिसमकालाच्च बुध्याव्यक्तऋषिस्त्वयं॥ऋषतेप रमंयस्मात्परमर्षिस्ततः स्मृतः॥८२॥

अर्थ- तो ऋषि, आपले उत्पत्ति काळा पासून लोकांत ज्ञानानें प्रसिद्ध होतो; म्हणून त्यास ऋषि म्हणतात; व तो परब्रम्हास जाणतो यास्तव त्यास परमर्षि असेंहि नाम प्रसिद्ध आहे.

गत्यर्थादृषतेर्धातोर्नामनिर्वृत्तिकारणं॥ यस्मादेष स्वयंभूतस्तस्माच्चऋषितामता॥८३॥

अर्थ- आणि ज्या धातूंच्या,गति,अर्थ आहे त्यांस ज्ञान हाहि अर्थ आहे; तेव्हां ऋषि धातु गति रूप अर्थी आहे; तस्मात् त्या सज्ञान हाहि अर्थ आहे; या कारणावरून जो ज्ञानानें स्वयं प्रकाश आहे; त्यास ज्ञान पूर्वक कर्म करणेंया ऋषि धर्मामुळें ऋषि हें पद योग्य आहे.

सेश्वराः स्वयमुद्भूता ब्रह्मणो मानसाः स्रुताः॥ निवर्तमानैस्तैर्बुध्यामहोन्यरिगतः परः॥८४॥

अर्थ- ब्रम्हदेवांचे मानस पुत्र स्वयं प्रकाश ज्ञानी व ईश्वरा समान समर्थ आहेत आणि ते ज्ञानाविषयीं तत्पर असून त्यानीं आपले ज्ञानानें महान् परमेश्वर वश केला.

यस्माद्दृशा परत्वेन सहतस्मान्महर्षयः॥ ईश्वराणां स्रुतास्तेषां मानसाश्चौरसाश्चवै॥८५॥

अर्थ- ते ऋषि ज्ञानाच्या पूर्णतेनें लोकांत प्रकाशित असतात म्हणून त्यांस महर्षि असें म्हणतात; त्या समर्थ ऋषींसही बहुत मानस व औरस असे पुत्र आहेत.

ऋषिस्तस्मात्परत्वेनभूतादिर्ऋषयस्ततः॥ऋषि पुत्राऋषीकास्तु मैथुनाद्गर्भसंभवाः॥८६॥

अर्थ- सर्व प्राणिमात्रांस उत्पन्न करणारा ब्रम्हदेव, ज्ञानानें पूर्ण आहे ह्मणून त्यास मुख्यत्वें ऋषि पदवी आहे; आणि त्या पासून झालेले जे सनकादिक तेहि ऋषीच आहेत; व त्या ऋषींस मैथुनानें गर्भद्वारा उत्पन्न झाले जे पुत्र ते आपल्या ज्ञान संपत्तीचा लोकांस उपदेश करितात.

परत्वेनऋषंतेवैभूतादीनृषिकास्ततः॥ ऋषिकाणां सुतायेतुविज्ञेयाऋषिपुत्रकाः ॥८७॥

अर्थ:- ते ऋषिपुत्र आपले पूर्ण ज्ञानानें प्राणिमात्रांस उत्पन्न करणारास ब्रम्ह, शिवादिकांस जाणतात ह्मणून ही त्यांस ऋषिक म्हणतात; त्या ऋषिकांचे जे पुत्र त्यांस ऋषिपुत्रक म्हणतात.

श्रुत्वाऋषंपरत्वेनश्रुतास्तस्माच्छ्रुतर्षयः॥ अव्यक्तात्मा महात्मावाहंकारात्मातथैवच॥८८॥ भूतात्माचेंद्रियात्माच तेषांतज्ज्ञानमुच्यते॥ इत्येवमृषिजातिस्तु पंचधानामविश्रुता॥८९॥

अर्थ:- ते सर्वही ऋषि तपादि साधनानें उपनिषदादिक ग्रंथांपासून ज्ञानाचें श्रवण करितात म्हणून त्यांस श्रुतर्षि असेंही म्हणतात आणि अव्यक्त तत्व, महत्तत्व, अहंकार, पंच महाभूतें, मनसहित अकरा इंद्रियें या सर्वांचा आत्मा असें जें परमेश्वरास जाणणें त्यास ज्ञान म्हणावें. अशा त्या पांच प्रकारच्या ब्रह्मज्ञानानें ऋषींची जाती पांच प्रकारची आहे.

भृगुर्मरीचिरत्रिश्च अंगिराः पुलहः क्रतुः॥ मनुर्दक्षो वसिष्ठश्चपुलस्त्यश्चापितेदश॥९०॥ ब्रम्हणो मानसाह्येतेउत्पन्नाःस्वयमीश्वराः॥ परत्वेनर्षयोयस्मान्मतास्तस्मान्महर्षयः॥९१॥

अर्थ:- त्यांत १भृगु, २मरीचि, ३अत्रि, ४अंगिरा, ५पुलह, ६क्रतु, ७मनु, ८दक्ष, ९वसिष्ठ, व१० पुलस्त्य, हे दहा ब्रम्हदेवाचे मानसपुत्र असून स्वतः उत्पन्न ज्ञानी व समर्थ आहेत, हे ऋषि ज्ञानानें पूर्ण आहेत ह्मणून त्यांस महर्षी ह्मणतात.

ईश्वराणांसुतास्त्वेषामृषयस्तान्निबोधत॥ काव्यो बृहस्पतिश्चैवकश्यपश्च्यवनस्तथा॥९२॥ उचथ्यो- वामदेवश्च अगस्त्यः कौशिकस्तथा॥ कर्दमोवालखिल्याश्चविश्रवाःशक्तिवर्धनः॥९३॥ इत्येतेऋषयः प्रोक्तास्तपसाऋषितांगताः॥ तेषांपुत्रानृषीकांस्तु गर्भोत्पन्नान्निबोधत॥९४॥

अर्थ- आतां त्या ब्रह्मदेवाच्या समर्थ मानस पुत्रांचे पुत्र जे ऋषि आहेत, ते असे कीं, शुक्र, बृहस्पति, कश्यप, च्यवन, उचथ्य, वामदेव, अगस्त्य, कौशिक, कर्दम सर्व वालखिल्य शक्तीची वृद्धी करणारा विश्रवा ऋषि हे सर्व ही तपश्चर्येनें ऋषि पदवी पावले; त्यांजपासून गर्भातून उत्पन्न झालेले जे पुत्र त्यांस लोकांत ऋषीक म्हणतात. त्यांची नांमें श्रवण करा.

वत्सरोनग्नहूश्चैव भरद्वाजश्चवीर्यवान्॥ ऋषिर्दीर्घतमाचैवबृहदूक्षाः शरद्वतः॥९५॥ वाजिश्रवाःस्वचिंतश्चशावश्चसपराशरः॥ शृंगीचशंखपाच्चैवराजावैश्रवणस्तथा॥९६॥ इत्येते ऋषिकाः सर्वेसत्येन ऋषितांगताः॥ ईश्वराऋषयश्चैवऋषीकायेचविश्रुताः ९७॥ एवंमंत्रकृतःसर्वेकृत्स्नशश्चनिबोधत॥

अर्थ- ते असे कीं, वत्सर नग्नहू, महा तेजस्वी भरद्वाज, दीर्घतमा ऋषि, मोठ्या वक्षस्थळाचा शरद्वत, वाजिश्रवा, स्वचिंत, शाव, पराशर, शृंगी, शंखपान्, वैश्रवणराजा लोकांत ऋषिक नामानें प्रसिद्ध असे हे सर्व सत्यानें ऋषींचा अधिकार पावले; तेव्हां हे समर्थ ऋषि व त्यांचे पुत्र ऋषिक ते सर्व ही मंत्र वेत्ते प्रसिद्ध आहेत; त्यांचे सर्व भेद ऐका.

भृगुःकाश्यपःप्राचेतादधीचोह्यात्मवानपि॥९८॥ ऊर्वोथजमदग्निश्चवेदःसारस्वतस्तथा॥ आर्ष्टिषेणश्च्यवनश्चपीतहव्यःसवेधसः॥९९॥ वैन्यःपृथुर्दिवोदासोब्रम्हवान्गृत्सशौनकौ॥ एकोनविंशतिह्येते भृगवोमंत्रकृत्तमाः॥१००॥

अर्थ- ते असे कीं, भृगु, काश्यप, प्राचेता, आत्मवान्, दधीचि, ऊर्व, जमदग्नि, वेद, सारस्वत, आर्ष्टिषेण, च्यवन, पीतहव्य, वेधस, वैन्य, पृथु, दिवोदास, ब्रम्हवान्, गृत्समद व शौनक, हे भृगु कुलोत्पन्न एकोणीसही ऋषी मोठे मंत्र वेत्ते आहेत.

अंगिराश्चैवत्रितश्चभरद्वाजोथलक्ष्मणः॥ कृतवाचस्तथागर्गःस्मृतिसंकृतिरेवच॥१०१॥ गुरुवीतश्चमांधाता अंबरीषस्तथैवच॥ युवनाश्वःपुरुकुत्सःस्वश्र

वस्तसदस्यवान् ॥ १०२॥ अजमीढोस्वहार्यश्वउ्त्कलः कविरेवच ॥ पृषदश्वो विरूपश्च काव्यश्चैवाथमुद्गलः ॥१०३॥ उतथ्यश्च शारद्वांश्च तथावाजिश्रवा अपि ॥ अपस्योषः रुचित्तिश्च वामदेवस्तथैवच ॥१०४॥ ऋषिजोबृहच्छुल्कश्च ऋषिर्दीर्घतमा अपि ॥ कक्षीवांश्च त्रयस्त्रिंशत्स्मृताह्यंगिरसांवराः ॥१०५॥ एतेमंत्रकृतः सर्वे काश्यपांस्तु निबोधत ॥

अर्थ- तसेच अंगिरा, त्रित, भरद्वाज, लक्ष्मण, कृतवाच, गर्ग, स्मृति, संकृति, गुरुवीत, मांधाता, अंबरीष, युवनाश्व, पुरुकुत्स, स्वश्रव, सदस्यवान्, अजमीढ, अस्वहार्य, उत्कल, कवि, पृषदश्व, विरूप, काव्य, मुद्गल, उतथ्य, शारद्वान्, वाजिश्रवा, अपस्योष, रुचित्ति, वामदेव, ऋषिज, बृहच्छुल्क, दीर्घतमा व कक्षीवान् हे तेहेतीस आंगिरस गोत्रांत श्रेष्ठ असून सर्वही वेद येते आहेत. या पुढें कश्यप गोत्रांतील ऋषि ऐका.

कश्यपः सहवत्सारो नैध्रुवो नित्यएवच ॥ १०६॥ असितोदेवलश्चैव षडेते ब्रह्मवादिनः ॥

अर्थ- ते असे कीं, काश्यप, वत्सार, नैध्रुव, नित्य, असित व देवल हे सहा ब्रह्मवेत्ते आहेत.

अत्रिरर्धस्वनश्चैव शावास्योथगविष्ठिरः ॥ १०७॥ कर्णकश्च ऋषिः सिद्धस्तथा पूर्वातिथिश्चयः ॥१०८ इत्येतेत्वत्रयः प्रोक्ता मंत्रकृत्षण्महर्षयः ॥

अर्थ- आणि अत्रि, अर्धस्वन, शावास्य, गविष्ठिर, कर्णक, सिद्ध असा पूर्वातिथि हे अत्रि गोत्रांतील सहा महर्षि वेद वेत्ते आहेत.

वसिष्ठश्चैव शक्तिश्च तृतीयश्च पराशरः ॥ १०९॥ ततस्तु इंद्रप्रतिमः पंचमस्तु भरद्वसुः ॥ षष्ठस्तु मित्रावरुणः सप्तमः कुंडिनस्तथा ॥ ११०॥ इत्येते सप्त विज्ञेया वासिष्ठा ब्रम्हवादिनः ॥

अर्थ- तसेच वसिष्ठ, शक्ति, पराशर, इंद्रप्रतिम, भरद्वसु, मित्रावरुण, कुंडिन, हे सात ऋषि वसिष्ठाच्या वंशांतले असून निरंतर ब्रम्हविचार करणा

रे आहेत.

विश्वामित्रश्च गाधेयो देवरातस्तथाबलः ॥ १११ ॥ तथा विद्वान्मधुच्छंदा ऋषिश्चान्योघमर्षणः ॥ अष्टकोलोहितश्चैव भृतकीलश्च मांबुधिः ॥ ११२ ॥ देवश्रवा देवरतः पुराणश्च धनंजयः ॥ शिशिरश्च महातेजाः शालंकायन एव च ॥ ११३ ॥ त्रयोदशैते विज्ञेया ब्रह्मिष्ठाः कौशिकावराः ॥

अर्थ- गाधिपुत्र विश्वामित्र, बलवान् देवरात, ज्ञानी मधुच्छंदा, अघमर्षण, अष्टक, लोहित, भृतकील, मांबुधि, देवश्रवा, देवरत पुरातन, धनंजय, शिशिरव महातेजस्वी शालंकायन हे कौशिक गोत्रांतील तेरा श्रेष्ठ ऋषि ब्रम्हनिष्ठ आहेत.

अगस्त्योथ दृढद्युम्नो इंद्रबाहुस्तथैव च ॥ ११४ ॥ ब्रह्मिष्ठागस्तयोह्येते त्रयः परमकीर्त्तयः ॥

अर्थ- अगस्त्य दृढद्युम्न व इंद्रबाहु हे अगस्त्य कुलांतील तीन ऋषि ब्रम्हनिष्ठ असून उत्तम कीर्तिमंत आहेत.

मनुर्वैवस्वतश्चैव ऐलो राजा पुरूरवाः ॥ ११५ ॥ क्षत्रियाणां वरौ ह्येतौ विज्ञेयौ मंत्रवादिनौ ॥

अर्थ- वैवस्वतमनु व इलराजाचा पुत्र राजा पुरूरवा हे दोघे क्षत्रियांत श्रेष्ठ असून मंत्र वेत्ते आहेत.

भलंदकश्च वासाश्वः संकीलश्चैव ते त्रयः ॥ ११६ ॥ एते मंत्रकृतो ज्ञेया वैश्यानां प्रवराः सदा ॥

अर्थ- तसेच भलंदक, वासाश्व व संकील हे तिघेही वैश्यांत श्रेष्ठ असून मंत्रज्ञानी आहेत.

इति द्विनवतिः प्रोक्ता मंत्रा येश्च बहिष्कृताः ॥ ११७ ॥ ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्या ऋषिपुत्रान्निबोधत ॥ ऋषीकाणां सुताह्येते ऋषिपुत्राः श्रुतर्षयः ॥ ११८ ॥ इति श्रीमत्स्यपुराणे मन्वंतरकल्पवर्णनो नाम चतुश्चत्वारिंशदुत्तरैकशततोध्यायः ॥ १४४ ॥

अर्थ- असे हे ब्याण्णव ऋषि सांगितले यांनीं वेदांतील मंत्र बाहेर प्रगट केले;

त्यांत कांहीं ब्राम्हण, कोणी क्षत्रिय व कांहीं वैश्य आहेत; त्यांत जे ऋषि आहेत; त्यांस श्रुतर्षि म्हणतात; व त्यांवांचून जे इतर आहेत ते ऋषीकांचे पुत्र आहेत. इतिश्री मत्स्य पुराणे मन्वतर कल्प वर्णनं नाम चतुश्चत्वारिंश दुत्तर शततमो ध्यायः

अध्याय १४५वा.

ऋषयऊचुः॥ कथंमत्स्येन कथितस्तारकस्यवधोमहान्॥ कस्मिन्काले विनिर्वृत्ता कथेयं सूतनंदन॥१॥

अर्थ— शौनकादिक ऋषि बोलले हे सूत पुत्रा तारकासुराचा मोठा वध मत्स्य रूपी भगवंतानें वैवस्वत मनूस कसा सांगितला; व ही तारकासुराच्या वधाची कथा कोणते समयीं झाली तें आम्हांस कथन कर.

त्वन्मुखक्षीर सिंधूत्थाकथेयममृतात्मिका॥ कर्णाभ्यांपिबतांतृप्तिरस्माकंनप्रजायते॥२॥ इदंमुनेसमाख्याहि महाबुद्धेमनोगतं॥

अर्थ— हे सूता तुझ्या मुखरूप क्षीर समुद्रा पासून निघालेली ही अमृत रूप कथा आम्हीं कर्ण द्वारा वारंवार प्राशन करीत असून ही आमची तृप्ती होत नाहीं; तस्मात् हे मुने तूं महा बुद्धिमान् आहेस; म्हणून हें आमचें मनोगत आम्हास कथन कर.

सूतउवाच॥ पृष्टस्तु मनुनादेवो मत्स्यरूपी जनार्दनः॥३॥ कथंशरवनेजातोदेवः षड्वदनोविभो॥ एतत्तुवचनंश्रुत्वापार्थिवस्यामितौजसः॥४॥ उवाचभगवान्प्रीतोब्रम्हसूनुर्महामतिं॥

अर्थ— नंतर सूत बोलला ऋषीहो या तारकासुराचे वधाची कथा मत्स्यरूपी जनार्दनास विचारिली कीं, हे प्रभो सहा मुखानीं युक्त असा कार्तिक स्वामी, मुंज नामक दर्भाचे वनांत उत्पन्न कसा झाला. हा अपरिमित तेजस्वि मनुराजाचा प्रश्न ऐकून ब्रम्हदेवाचा पिता भगवान् मत्स्यरूपी देव महाबुद्धिमान् मनूस तारकासुराच्या वधाचें चरित्र सांगतो.

मत्स्यउवाच॥ वज्रांगोनामदैत्योभूत्तस्यपुत्रस्तु तारकः॥५॥ सुरानुद्वासयामासपुरेभ्यः समहाबलः॥ ततस्ते ब्रम्हणो भ्याशं जग्मुर्भयनिपीडिताः॥६॥

अर्थ- तें असें कीं, मत्स्य भगवान् बोलले हे मनुराजा पूर्वी वज्रांगनामें कोणी एक प्रसिद्ध दैत्य होता; त्याचा पुत्र तारकासुर तो महा बलाढ्य असल्यामुळें त्यानें सर्व इंद्रादि देवांस आपापले पुरांतून घालवून दिलें तेव्हां ते देव तारकासुराच्या भयानें पीडित हो त्साते ते ब्रह्मदेवास शरण गेले.

भीतांश्च त्रिदशान्दृष्ट्वा ब्रह्मा तेषामुवाच ह ॥ संत्यज्य-
ध्वं भयं देवाः शंकरस्यात्मजः शिशुः ॥ ७ ॥ तुहिनाचल
दौहित्रस्तं हनिष्यति दानवं ॥

अर्थ- त्या काळीं ब्रम्हदेवानीं असे ते देव भयभीत झाले आहेत असें पाहूनते त्यांस बोलले कीं, देव हो तुम्ही भयाचा त्याग करा कारण शंकराचा पुत्र असून जो हिमालयाच्या कन्येस (पार्वतीस) पुत्र होईल तो या तारकासुरास मारील.

ततः काले तु कस्मिंश्चिद्दृष्ट्वा वै शैलजां शिवः ॥ ८ ॥ स्वरे
तो वन्हिवदने व्यसृजत्कारणांतरे ॥

अर्थ- नंतर कोणे एके समयीं पार्वतीस पाहून शिवानें आपलें वीर्य कांहीं-कारणानें अग्नीचे मुखांत सोडिलें.

तत्प्राप्तं वन्हिवदने रेतो देवानतर्पयत् ॥ ९ ॥ विदार्य ज
ठराण्येषां अजीर्णं निर्गतं मुने ॥

अर्थ- तेव्हां हे मुने अग्नीचे मुखांत प्राप्त झालेलें शिवाचें वीर्य अग्नि हा देवांचें मुख आहे. त्यामुळें तें देवांस प्राप्त होऊन त्यांची तृप्ती झाली; मग तें शिववीर्य त्यांचे उदरांत पचन न झाल्यामुळें त्यांचीं पोटें विदारण करून बाहेर निघालें.

पतितं तत्सरिद्वरां तस्यास्तु शरकानने ॥ १० ॥ तस्मा-
त्तु स समुद्भूतो गुहो दिनकरप्रभः ॥

अर्थ- तें शिववीर्य गंगेंत पडून मग तें त्या भागीरथीनें आपले प्रवाहांतून तीरावरचे लव्हाळ्याचे वनांत टाकिलें त्यापासून सूर्य समान तेजस्वी कार्त्तिक स्वामी उत्पन्न झाला.

सप्तसप्त दिवसो बालो निजघ्ने तारकासुरं ॥ ११ ॥ एवं-
श्रुत्वा ततो वाक्यं तमूचुर्ऋषिसत्तमाः ॥

अर्थ- त्या बालकानें आपले सातवे दिवशींच तारकासुरास मारिलें ;- असें सूताचें भाषण ऐकून शौनकादिक श्रेष्ठ ऋषि त्यास बोलतात.

ऋषयऊचुः॥ अत्याश्चर्यवतीरम्याकथेयंपाप-
नाशिनी॥१२॥ विस्तरेणहिनोब्रूहियाथातथ्येनशृ
ण्वतां॥

अर्थ- ऋषि प्रश्न करितात कीं, हे सूता ही कथा सुंदर व अति आश्चर्य-युक्त असून पापांचा नाश करणारी आहे; तस्मात् ही कथा यथास्थित श्रवण करणारांस, आम्हांस विस्तारानें सांग.

वज्रांगोनामदैत्येंद्रः कस्यवंशोद्भवःपुरा॥१३॥त
स्याभूत्तारकःपुत्रःसुरप्रमथनोबली॥ निर्मितः
कोवधेचाभूत्तस्यदैत्येश्वरस्यतु॥१४॥ गुहजन्म
तुकात्स्न्येंन अस्माकंब्रूहिमानद॥

अर्थ- ती अशी कीं, हे सूता पूर्वी वज्रांग नामक श्रेष्ठ दैत्य कोणाच्या वंशांत उत्पन्न झाला? आणि त्या वज्रांगास इंद्रादि सर्व देवांचा अतिशयें नाश करणारा महा बलाढ्य तारकासुर नामें पुत्र झाला. त्या दैत्यराज तारकासुराचे वधाविषयीं देवांनं कोण निर्माण झाला? व कार्तिक स्वामीचा ही जन्म कसा जाहला हें आम्हांस सर्व सांगंत सांग.

सूतउवाच॥ मानसोब्रम्हणःपुत्रोदक्षोनामप्रजाप-
तिः॥१५॥ षष्टिंसोजनयत्कन्यावैरिण्यामेवनःश्रुतं॥

अर्थ- नंतर सूत बोलला कीं, ऋषीहो ब्रम्हदेवाचा मानस पुत्र दक्षनामक प्रजापति होता; त्यानें वैरिणी नांवाच्या स्वस्त्री पासून साठ कन्या उत्पन्न केल्या असें म्यां ऐकिलें आहे.

ददौसदशधर्माय कश्यपायत्रयोदश॥१६॥ सप्तविं
शतिसोमायचतस्रोरिष्टनेमये॥ द्वेवैबाहुकपुत्राय
द्वेचान्येंगिरसेतथा॥१७॥ द्वेकृशाश्वायविदुषेप्र-
जापतिसुतःप्रभुः॥ अदितिर्दितिर्दनुर्विश्वाह्य-
रिष्टासुरसातथा॥१८॥ सुरभिर्विनताचैवताम्रा
क्रोधवशाइरा॥कद्रूर्मुनिश्चलोकस्यमातरोगोषु

मातरः ॥१९॥

अर्थ- पुढें ब्रह्मपुत्र समर्थ दक्षानें त्यांतील दहा कन्या धर्मास दिल्या, तेरा कश्यपास दिल्या; सत्तावीस चंद्रास दिल्या, आणि च्यार अरिष्टनेमीस दिल्या, दोन बाहुकाच्या पुत्रास दिल्या; तशाच दोन अंगिरा ऋषीस दिल्या, दोन कन्या ज्ञानसंपन्न कृशाश्वास दिल्या; त्यांतील १ अदिति, २ दिति, ३ दनु, ४ विश्वा, ५ अरिष्टा, ६ सुरसा, ७ सुरभि, ८ विनता, ९ ताम्रा, १० क्रोधवशा, ११ इरा, १२ कद्रू, व १३ मुनि त्या तेरा लोकमाता स्वर्गलोकांत असतात.

तासांसकाशाल्लोकानांजंगमस्थावरात्मनां॥ जन्मनानाप्रकाराणांनाभ्योन्येदेहिनःस्मृताः॥ २०॥

अर्थ- त्या लोकमातांपासून अनेक प्रकारचे मनुष्य पशु पक्ष्यादिक व वृक्ष पाषाणादिक यांची उत्पत्ति झाली आहे; तशीच इतर ही प्रायशः सर्व प्राणिमात्रांची उत्पत्ति झाली आहे.

देवेंद्रोपेंद्रपूषाद्याः सर्वेतेदितिजामताः॥ दितेःसकाशाल्लोकास्तु हिरण्यकशिपादयः॥ २१॥

अर्थ- देव, इंद्र, व पूषा (सूर्य) इत्यादिक सर्व देवगण अदिती पासून उत्पन्न झाले; तसेच हिरण्य कशिपू आदिकरून दैत्य लोक दिती पासून उत्पन्न जाहले.

दानवाश्चदनोःपुत्रागावश्चसुरभीसुताः॥पक्षिणोविनतापुत्रागरुडप्रमुखाःस्मृताः॥ २२॥

अर्थ- दनु नामक स्त्रीस दानव पुत्र झाले, सुरभीस गायी जाहल्या; गरुड प्रभृति पक्षी विनतेस झाले.

नागाःकद्रूसुताज्ञेयाःशेषाश्चान्येपिजंतवः॥ त्रैलोक्यनाथंशक्रंतुसर्वामरगणप्रभुं॥ २३॥ हिरण्यकशिपुश्चक्रेनी त्वाराज्यंमहाबलः॥

अर्थ- आणि कद्रूस शेषादिक नाग व इतर सर्प जाति प्राणी उत्पन्न जाहले; पुढें कांहीं कालांतरानें त्रैलोक्याचा राजा असून सर्व देवगणांचा ही नाथ अशा इंद्रास जिंकून महा बलाढ्य हिरण्य कशिपू त्रैलोक्याचें राज्य करूं लागला.

ततः केनापिकालेन हिरण्यकशिपादयः ॥ २४ ॥ निहताविष्णुनासंख्येशेषाश्चेंद्रेणदानवाः ॥

अर्थ- नंतर कांहीं कालांतरानें विष्णूनें युद्धांत हिरण्य कशिपु आदि करून, दैत्य मारिले; आणि बाकीचे राहिलेले दानव इंद्रानें मारिले.

ततोनिहतपुत्राभूद्दितिर्वरमयाचत ॥ २५ ॥ भर्त्तारं कश्यपं देवं पुत्रमन्यं महाबलं ॥ समरेशक्रहंतारं सतस्याअददात्प्रभुः ॥ २६ ॥

अर्थ- तदनंतर असे दितीचे पुत्र मृत झाले असतां दितीनें आपले पतीस अति तेजस्वी कश्यपास दुसरा महा बलिष्ठ असून युद्धांत इंद्रास मारण्याविषयीं समर्थ असा पुत्र होण्या विषयीं वर मागितला; तेव्हां कश्यपानें तुला तसाच पुत्र होईल असा दितीस वर दिला.

नियमेवर्तहेदेविसहस्रं शुचिमानसा ॥ वर्षाणांलप्स्यसेपुत्रमित्युक्त्वा सातथाकरोत् ॥ २७ ॥

अर्थ- परंतु कश्यपानें तिला आज्ञा केली कीं, हे स्त्रिये तूं एक सहस्र वर्षें पर्यंत शुद्ध मनानें म्या सांगितल्या प्रमाणें नियमांत वाग म्हणजे तेणें करून तुला असा पराक्रमी पुत्र होईल असें सांगितलें असतां दितीनें तें व्रत कश्यपाचे आज्ञे प्रमाणें केलें.

वर्तंत्या नियमेनस्याःसहस्राक्षः समाहितः ॥ उपासामाचरत्तस्याःसाचैनमन्वमन्यत ॥ २८ ॥

अर्थ- या प्रमाणें ती दिती त्या व्रताचे नियमांत वर्तत असतां, सहस्र नेत्र युक्त-इंद्र, सावधान चित्तानें तिची सेवा करूं लागला; तेव्हां तिनेंही त्यास सेवे विषयीं अनुमोदन दिलें.

दशात्सरशेषस्यसहस्रस्यतदादितिः ॥ उवाचशक्रं सुप्रीता वरदा तपसि स्थिता ॥ २९ ॥

अर्थ- नंतर एक सहस्र वर्षें पूर्ण होण्यास दहा वर्षें कमी असतां त्या काळीं ती दिति तपश्चर्येंत तत्पर असून अतिशये संतुष्ट होऊन इंद्रास वरदेत होत्साती बोलूं लागली.

दितिरुवाच ॥ पुत्रोत्तीर्णव्रतां प्रायः विद्धिमांपाक-

शासन ॥ भविष्यतिचतेभ्राता तेनसार्धमिमांश्रियं ॥३०॥ भुंक्ष्ववत्सयथाकामं त्रैलोक्यंहतकंटकं ॥

अर्थः– दिति बोलली कीं, पाक दैत्यास शासन करणाऱ्या हे इंद्रा माझें हें पुत्र होण्या विषयीं चें व्रत बहुत करून समाप्त होत आलें आहे असें जाण; ते व्हां आतां मला जो पुत्र होईल तो तुझा बंधुच होईल; तस्मात् हे वत्सा त्या सहवर्तमान तूं या त्रैलोक्याच्या निष्कंटक राज्य संपत्तीचा उपभोग कर.

इत्युक्त्वानिद्रयाविष्टाचरणाक्रांतमूर्धजा ॥३१॥ स्वयंसुष्वापानियताभाविनोर्थस्यगौरवात् ॥

अर्थः– असें इंद्राशीं भाषण करून दिती निद्रेनें व्याप्त झाली असतां केश मोकळे पायां पर्यंत लागलेले असून दिति ती पुढें होणाऱ्या भविष्याच्या प्राबल्यामुळें निद्रेचे नियम न रक्षितां तशीच निजली.

तत्तुरंध्रंसमासाद्यजठरंपाकशासनः ॥३२॥ चकारसप्तधागर्भंकुलिशेनतुदेवराट् ॥

अर्थः– ते समयीं तें छिद्र (संधि) सापडतांच पाकनामक दैत्यास मारणारा देवांचा राजा इंद्र दितीचे उदरांत प्रवेश करून वज्रानें त्या गर्भाचे सात तुकडे करिता जाहला.

एकैकंतुपुनःखंडंचकारमघवाततः ॥३३॥ सप्तधासप्तधाकोपात्प्रबुध्यततोदितिः

अर्थः– नंतर इंद्रानें त्या सात तुकड्यांतील एकेक तुकड्याचे कोपानें पुनः सात सात तुकडे केले. पश्चात् दिति जागी झाली.

विबुध्योवाचमाशक्रघातयेथाः प्रजांमम ॥३४॥ तच्छ्रुत्वानिर्गतःशक्रः स्थित्वाप्रांजलिरग्रतः ॥ उवाच वाक्यंसंत्रस्तोमातुर्वैवदनेरितं ॥३५॥

अर्थः– आणितें इंद्राचें कर्म जाणून दिती त्यास म्हणाली की, हे इंद्रा तूं माझ्या प्रजेस मारूं नको; तें दितीचे मुखांतील भाषण ऐकून इंद्र तिच्या उदरांतून बाहेर निघून भयभीत होत्साता हात जोडून दितीचे अग्रभागीं उभा राहिला; आणि त्या सापत्न मातेस नम्रतेनें बोलतो.

शक्र उवाच ॥ दिवास्वप्नपरामातः पादाक्रांतशिरो–

रुद्दा ॥ ससससभिरेवालस्तवगर्भः कृतोमया ॥३६॥

अर्थ- इंद्र बोलला कीं, हे मातः केशमोकळे पायां पर्यंत लागलेले असून तूं दिवसास निद्रा केलीस; तेव्हां म्यां तुझे उदरांत जाऊन गर्भाचे सात तुकडे करून पुनः त्याचे प्रत्येकीं सात तुकडे केले.

एकोनपंचाशत्कृताभागावज्रेण तेकृताः ॥ दास्यामि तेषांस्थानानिदिविदेवतपूजिते ॥ ३७॥

अर्थ- ते जे म्यां वज्रानें एकूण पन्नास भाग केले ते पुत्र झाले आहेत; त्यांस मीं देवानीं पूज्य अशा स्वर्गांत उत्तम स्थानें देतों.

इत्युक्त्वासातदादेवीसैव मस्त्वित्यभाषत ॥ पुनश्चदेवी भर्तारमुवाचासितलोचना ॥३८॥

अर्थ- असें इंद्रानें विनय पूर्वक सत्य भाषण केलें असतां, दिति इंद्रास तथास्तु म्हणाली; आणि इंद्र स्वर्गास गेल्यावर मग ती कृष्णवर्ण नेत्र शोभेनें युक्त दिति पुनः आपले भर्त्यास कश्यपास प्रार्थना करूं लागली.

पुत्रंप्रजापतेदेहिशक्रजेतारमूर्जितं ॥ योनास्त्रशस्त्रैर्वध्यत्वंगच्छेत्रिदिववासिनां ॥ ३९॥

अर्थ- ती अशी कीं, हे प्रजानाथ कश्यपा इंद्रास जिंकणारा असून स्वर्गवासि सर्वदेवांचे शस्त्रास्त्रानीं मृत्यु न पावेल असा प्रतापी पुत्र आपण मला द्यावा.

इत्युक्तः सतथोवाचतांपत्नीमतिदुःखितां ॥ दशवर्षसहस्राणि तपः कृत्वातुलप्स्यसे ॥ ४०॥

अर्थ- असें तिचें भाषण ऐकून तो कश्यप ऋषीही अत्यंत दुःखित अशा स्वपत्नीस दितीस परम संकटानें बोलला कीं, हे प्रिये तूं दहा हजार वर्षे पुत्रार्थ तपकर म्हणजे तेणें करून तुला आपले मनो रथा प्रमाणें पुत्र होईल.

वज्रसारमयैरंगैरच्छेद्यैरायसैर्दृढैः ॥ वज्रांगोनामपुत्रस्ते भवितापुत्रवत्सले ॥ ४१॥

अर्थ- तो असा कीं, वज्र समान बलयुक्त लोखंडा सारख्या दृढ व अभेद्य (छिन्न भिन्न न होणारीं) अशा अंगानीं युक्त असा वज्रांग नामक पुत्र हे पुत्र वत्सले दिति तुला होईल.

सातुलब्धवरा देवीजगामतपसेवनं ॥ दशवर्षसह-

स्त्राणिसातपोघोरमाचरत् ॥ ४२ ॥

अर्थ- असा कश्यपा पासून वर मिळाला असतां, ती दिती तप करण्या विषयीं वनांत गेली, आणि तिणें तेथें दहा हजार वर्षे घोर तप केलें.

तपसोंते भगवतीजनयामास दुर्जयं ॥ पुत्रमप्रतिकर्माणमजेयंवज्रदुश्छिदं ॥ ४३ ॥

अर्थ- नंतर तपश्चर्येच्या अंतीं ती ऐश्वर्यवती दिति कष्टानें पराजित होण्यास अशक्य, अप्रतिम पराक्रमी, वज्रानें ही अभेद्य अंगानें युक्त अशा पुत्रास प्रसवली.

सजातस्तत्रएवाभूत्सर्वशस्त्रास्त्रपारगः ॥ उवाच मातरंभक्त्यामातःकिंकरवाण्यहं ॥ ४४ ॥

अर्थ- तो वज्रांग नामा दैत्य उत्पन्न होतांच सर्व शस्त्रें व अस्त्रें यांत पारंगत झाला. तेव्हां तो भक्तीनें दितीस बोलला कीं, हे मातः आतां मी तुझें काय कार्य करूं.

तमुवाच ततोहृष्टादितिर्दैत्याधिपंचसा ॥ बहवोमेहताः पुत्राः सहस्त्राक्षेणपुत्रक ॥ ४५ ॥

अर्थ- तेव्हां ती दिती हर्षानें त्या दैत्यराज वज्रांग नामक पुत्रास बोलली कीं, हे पुत्रा तुझ्या पूर्वी झालेले माझे बहुत पुत्र इंद्रानें मारिले.

तेषांत्वंप्रतिकर्तुंवैगच्छशक्रवधायच ॥ बाढमित्येवतामुक्त्वाजगामत्रिदिवंबली ॥ ४६ ॥

अर्थ- यास्तव तूं त्या दैत्यांचे ऋणांतून मुक्त होण्या साठीं इंद्राच्या वधार्थ गमन कर अशी मातोश्रीची आज्ञा होतांच हें कार्य आज्ञे प्रमाणें अवश्य करतो असें दितीस सांगून तो महा बलाढ्य वज्रांग दैत्य स्वर्ग लोकास गेला.

बध्वाततः सहस्त्राक्षंपाशेनामोघवर्चसा ॥ मातुरंतिकमागच्छद्व्याघ्रःक्षुद्रमृगंयथा ॥ ४७ ॥

अर्थ- नंतर आपल्या अमोघ तेजोमय पाशानें इंद्रास बांधून तो वज्रांग दैत्य दिती जवळ आला, यास दृष्टांत (व्याघ्र जसा क्षुद्र हरिणास सहज धरून आणितो,) तसें इंद्रास आणिलें.

एतस्मिन्नंतरेब्रम्हाकश्यपश्चमहातपाः ॥ आगतो

तत्रयत्रास्तांमातापुत्रावभीतकौ ॥ ४८ ॥

अर्थ- तों इतक्यांत ब्रम्हदेव व महा तपस्वी कश्यप हे दोघेही ते माता, पुत्र-(दिती व वज्रांग) हे जेथें निर्भय पणें होते तेथें आले.

दृष्ट्वातुतमुवाचेदंब्रह्माकश्यपएवच ॥ मुंचैनंपुत्रदेवेंद्रंकिमनेनप्रयोजनं ॥ ४९ ॥

अर्थ- आणि ब्रह्मदेव व कश्यप हे उभयतां त्या वज्रांग दैत्यास पाहून बोलले कीं, हे वत्सा वज्रांगा या देवराज इंद्रास सोड; कारण याशीं तुला काय प्रयोजन आहे.

अपमानोवधःप्रोक्तःपुत्रसंभावितस्यच ॥ अस्मद्वाक्येनयोमुक्तोविधितंमृतमेवच ॥ ५० ॥

अर्थ- तसेंच मुला दुसरी गोष्ट अशी आहे कीं, जो संभावित आहे; त्यास-अपमान हा वधासमानच आहे; आणि त्यांतून अपमान झाल्यावर आमच्या वचनानें जो आमचे समक्ष सुटला तो मृतप्रायच झाला, असें तूं समज.

परस्यगौरवान्मुक्तःशत्रूणांभारमावहेत् ॥ जीवन्नेवमृतोवत्सदिवसेदिवसेसतु ॥ ५१ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो दुसऱ्याच्या वचनावरून सुटला त्याचे मस्तकावर शत्रूंचा भार रहातो; आणि तो लोकांत जिवंत असून निरंतर मेल्यासारिखाच असतो

महतांवशमायातेवैरंनैवास्तिवैरिणि ॥ एतच्छ्रुत्वातुवज्रांगःप्रणतोवाक्यमब्रवीत् ॥ ५२ ॥

अर्थ- हे वत्सा वज्रांगा शत्रू मोठ्याचे स्वाधीन झाला असतां मग त्या शत्रूच्या ठिकाणीं वैरभाव असत नाहीं तस्मात् तूं आतां इंद्रा विषयीं निग्रहाची बुद्धि करूं नको; हें ब्रम्हदेवाचें वाक्य ऐकून तत्काल तो वज्रांग दैत्य हातजोडून नम्र होत्साता ब्रम्हदेवास वाक्य बोलतो.

नमेकृत्यमनेनास्तिमातुराज्ञाकृतामया ॥ त्वंसुरासुरनाथोवैममचप्रपितामहः ॥ ५३ ॥

अर्थ- तें असें कीं, हे स्वामिन् ब्रम्हदेवा मला इंद्राशीं कांहीं एक प्रयोजन नाहीं परंतु म्यां केवळ मातेच्या आज्ञेस्तव पाशानें बांधून यास आणिलें;

आणि तुम्हीतर देव दैत्यांचे ज्ञाय असून माझे साक्षात् पितामह आहांत.

करिष्येत्वद्वचोदेवएषमुक्तःशतक्रतुः॥ तपसेमेर
तिर्देवनिर्विघ्नंचैवमेभवेत्॥ ५४॥ त्वत्प्रसादेनभग
वन् नित्युक्त्वा विरराम सः॥ तस्मिंस्तूष्णींस्थिते दै
त्ये प्रोवाचेदं पितामहः ॥ ५५॥

अर्थ- तस्मात् हे देवा तुमचें वचन मी मान्य करितों तुमचे आज्ञे प्रमाणें हा शंभर अश्वमेध यज्ञ केलेला इंद्र सोडून दिला; आतां मला तपा विषयीं प्रीति असो व तें माझें तप हे भगवन् आपले अनुग्रहानें निर्विघ्न प्रकारानें सिद्धीस जावो असें विज्ञापना वाक्य बोलून तो वज्रांग दैत्य स्वस्थ राहिला असा तो दैत्य उगाच स्वस्थ राहिल्याकर सर्वांचे पितामह भगवान् ब्रम्हदेव त्यास हें पुढील भाषण बोलतात.

ब्रम्होवाच॥ तपस्त्वंक्रूरमापन्नो अस्मच्छासनसं-
स्थितः॥ अनया चित्तशुद्ध्या ते पर्याप्तं जन्मनः फ-
लं ॥ ५६॥

अर्थ- ब्रम्हदेव बोलले हे वत्सा वज्रांगा तूं आमची आज्ञा उत्तम रीतीनें मान्य करून कठिण तपश्चर्या करण्या विषयीं प्रवृत्त झालाच आहेस; तस्मात् या अंतःकरण शुद्धीनें तुझें जन्म सफळ ज्ञाहलें.

इत्युक्त्वा पद्मजः कन्यां ससर्जायतलोचनां॥ ता-
मस्मै प्रददौ देवः पत्न्यर्थं पद्मसंभवः॥ ५७॥

अर्थ- असें भाषण करून विष्णूचे नाभिकमलांतून उत्पन्न झालेले ब्रम्हदेवानीं हरिणासमान आकर्ण नयनानीं सुशोभित अशी एक सुंदर कन्या उत्पन्न करून ती कन्या कमलोद्भव ब्रह्मदेवानीं त्या वज्रांग दैत्यास पत्नी करण्यासाठीं दिली.

वरांगेतिचनामास्याः कृत्वायातः पितामहः ॥ व-
ज्रांगोपितया सार्द्धं जगाम तपसे वनं॥ ५८॥

अर्थ- आणि त्या कन्येचें वरांगा असें नाम ठेवून ब्रह्मदेव आपले सत्यलोकास गेले; नंतर तो वज्रांग दैत्य ही त्या वरांगा नांवाच्या स्वपत्नी सहवर्तमान तपश्चर्या करण्या साठीं अरण्यांत गेला.

ऊर्ध्वबाहुः सदैत्येंद्रोऽचरदब्दसहस्त्रकं॥ कालंक-
मलपत्राक्षः शुद्धबुद्धिर्महातपाः॥ ५९॥

अर्थ- नंतर दैत्यश्रेष्ठ, कमल पत्रा सारख्या नेत्रानीं शोभायमान, शुद्ध बुद्धीनें युक्त असा तो वज्रांग दैत्य एक सहस्त्र वर्षे परिमित काल पर्यंत बाहु वरकरून मोठी तपश्चर्या करूं लागला.

तावच्चावाङ्मुखः कालं तावत्पंचाग्निमध्यगः॥ निराहारोघोरतपास्तपोराशिरजायत॥ ६०॥

अर्थ- तें असें कीं, एक हजार वर्षे परिमित त्या कालांतच चोंही बाजूस चार अग्नि व वर पांचवा सूर्य या पांच अग्नींचे मध्य भागीं खालीं तोंड करून उभा राहून कांहीं एक भक्षण न करितां घोरतप करून तो वज्रांग दैत्य केवल तपाचा राशीच अग्निसमान तेजःपुंज दिसूं लागला.

ततः सोंतर्जलेचक्रे कालंवर्षसहस्त्रकं॥ जलांतरं प्रविष्टस्य तस्यपत्नीमहाव्रता॥ ६१॥ तस्यैवतीरे-सरसस्तप्यंतीमौनमास्थिता॥ निराहारातपोघोरंप्रविवेशमहाद्युतिः॥ ६२॥

अर्थ- नंतर कांहीं कालांतरानें तो वज्रांग दैत्य एक हजार वर्षे परिमित-काल पर्यंत उदकांत राहून तप करूं लागला; तेव्हां जलांत प्रविष्ट झालेल्या त्या दैत्याची मोठीं व्रतें करणारी महा तेजस्वि नी अशी ती वरांगी नामक पत्नी मौन व्रत धारण करून कांहीं एक भक्षण न करितां तपश्चर्येच्या इच्छेनें अति दुर्घट तप करूं लागली.

तस्यांतपसिवर्तंत्यामिंद्रश्चक्रेविभीषिकां॥ भूत्वातुमर्कटस्तत्रतदाश्रमपदंमहान्॥ ६३॥ चक्रेविलो-लंनिःशेषंतुंबीघटकरंडकं॥

अर्थ- अशी ती वज्रांग पत्नी वरांगी तप करीत असतां, इंद्रानें तिला-भय प्रदर्शन केलें; तें असें कीं, तिच्या आश्रम स्थानांत आपण मोठा वानर होऊन तो आश्रम हालविला; तसेच सर्व वृक्ष हालवून त्यांचीं पत्रें पुष्पें व फलें नाहींशीं केलीं; व भोंपळ्याचे तुंबे, करंडे वगैरे संपूर्ण पात्रें नाहींशीं केलीं.

ततस्तु मेषरूपेण कंपं तस्याकरोन्महान् ॥ ६४॥ त
तो भुजंगरूपेण बध्वा चचरणद्वयं ॥ अपकृष्य ततो
दूरं भ्रमंस्तस्यामहीमिमां ॥ ६५॥

अर्थ- नंतर इंद्रानें मेंढ्याचें रूप धारण करून त्या वरांगीस मोठा कंपउत्पन्न केला; पश्चात् त्यानें भुजंग रूपें करून तिचे पाय बांधून तिला दूर नेऊन त्या अरण्य भूमी वर बहुत फिरविलें.

तपोबलाढ्यासा तस्य नवध्यत्वंजगामह ॥ ततो
गोमायुरूपेणतस्यादूषयदाश्रमं ॥ ६६॥

अर्थ- तथापि ती वरांगी तपोबलानें संपन्न होती, म्हणून इंद्राचे हातून मरण पावली नाहीं. तेव्हां मग इंद्रानें कोल्ह्याचें रूप धरून तिचा आश्रम मल, मूत्रादिकानीं दूषित केला.

ततस्तु मेघरूपेण तस्याः क्लेदयदाश्रमं ॥ भीषिका
भिरनेकाभिस्तां क्लिश्यन् पाकशासनः ॥ ६७॥ विर
रामयदानैवं वज्रांग महिषी तदा ॥ शैलस्यदुष्टतां
मत्वा शापं दातुंव्यवस्थिता ॥ ६८॥

अर्थ- नंतर त्यानें मेघाचे रूपानें तिचा सर्व आश्रम भिजविला; अशा अनेक भय प्रदर्शनानीं वरांगीस क्लेश देत असतां तो इंद्र जेव्हां विरामपावेना; तेव्हां ती वज्रांग दैत्याची पट्टराणी वरांगी त्या पर्वताचाच दोष मानून ती त्या पर्वतास शापदेण्या विषयीं उद्युक्त झाली.

सशापाभिमुखां दृष्ट्वा शैलः पुरुषविग्रहः ॥ उवाचतां
वरारोहां वरांगीं भीरुचेतनः ॥ ६९॥

अर्थ- ते समयीं ती दैत्यस्त्री वरांगी आपणास शाप देण्या विषयीं सिद्ध झाली आहे, असें पाहून तो पर्वत भयभीत होत्साता पुरुष रूपानें येऊन तिजला बोलतो.

नाहं वरांगने दुष्टः सेव्योहं सर्वदेहिनां ॥ विभ्रमंतु क
रोत्येषरुषितः पाकशासनः ॥ ७०॥

अर्थ- कीं, हे तपस्विनी श्रेष्ठ स्त्रिये मी दुष्ट नाहीं; मी पर्वत सर्व प्राणिमात्रांस रहाण्या विषयीं योग्य आहें; मज पासून कोणासही दुःख होणार नाहीं

तर हा इंद्र रुष्ट होऊन तुझे नित्रास भीति उत्पन्न करीत आहे

एतस्मिन्नंतरेजातः कालोवर्षसहस्रिकः॥ तस्मिन्
गतेतु भगवान् काले कमलसंभवः॥ तुष्टः प्रोवाचव-
ज्रांगतमागम्यजलाश्रयं ॥७१॥

अर्थ- तों इतक्या संधींत एक सहस्र वर्ष परिमित काळ जाहला; तो एक हजार वर्षे काल गेला असतां; विष्णूच्या नाभि कमळापासून उत्पन्न झालेला भगवान् ब्रम्हदेव तेथें येऊन त्या पर्वता वरील सरोवराचे उदकांत तपकरणाऱ्या वज्रांग दैत्यास प्रसन्न होऊन त्यास बोलतो.

ब्रह्मोवाच॥ ददामिसर्वकामांस्तेउत्तिष्ठदितिनंदन॥-
एवमुक्तस्तदोत्थायदैत्येंद्रस्तपसांनिधिः॥उवाचप्रां
जलिर्वाक्यंसर्वलोकपितामहं॥७२॥

अर्थ- ब्रम्हदेव बोलला कीं, हे दितिपुत्रा वज्रांगा ऊठ मी तुला सर्वकाम देतों; असें ब्रम्हवाक्य ऐकून त्याकाळीं तपाचा केवळ निधीच असा तो दैत्यश्रेष्ठ वज्रांग उठून हात जोडून सर्व चराचर लोकांच्या पितामहास (त्या ब्रम्हदेवास) भाषण करितो.

वज्रांगउवाच॥ आसुरोमास्तुमेभावः संतुलोका-
ममाक्षयाः॥ तपस्येवरतिर्मेस्तुशरीरस्यास्तुवर्तनं७३

अर्थ- वज्रांग बोलला कीं, हे स्वामिन् ब्रम्हदेवा हा असुर जातीचा स्वभाव मला नसो; माझे लोक अक्षय्य असोत आणि माझी तपश्चर्ये विषयींच प्रीति असून माझा देहही तसाच तपाविषयींच अनुकूल तेनें वर्तो.

एवमस्त्वितितंदेवोजगामस्वकमालयं॥ वज्रांगोपि
समाप्तेतुतपसिस्थिरसंयमः॥७४॥ आहारमिच्छ
न्भार्यास्वांनददर्शाश्रमेस्वके॥

अर्थ- असा त्यानें वर मागितला असतां, त्यास असेंच असो असें बोलून ब्रह्मदेव आपले सत्य लोकास गेले; पश्चात् वज्रांग दैत्य ही तें तप समाप्त झालें असतां, पुनः ब्रह्मवचनें तपाविषयींच अंतःकरणाचें स्थैर्य पावून बहुकाल पर्यंत निरशन घडल्यामुळें कांहीं भक्षणाची इच्छा करून स्वस्त्रीस पाहूं लागला; परंतु ती त्यास आपले आश्रमांत दृष्टीस पडेना.

क्षुधाविष्टःसशैलस्यगहनंप्रविवेशह॥७५॥आ-
दातुंफलमूलानिसचतस्मिन्व्यलोकयत्॥

अर्थ:- तेव्हां तो वज्रांग दैत्य क्षुधेनें व्याप्त होऊन त्या पर्वताच्या घोर अरण्यांत भक्षणार्थ फळें वमुळें आणण्यासाठीं गेला; असतां त्यानें तेथें आपले भार्येस पाहिलें.

रुदंतींतांप्रियांदीनांतनुप्रच्छादिताननां॥७६॥तां
विलोक्यसदैत्येंद्रःप्रोवाचपरिसांत्वयन्॥

अर्थ:- तों ती आपली प्रियस्त्री दीन होऊन रुदन करीत असून जिचें मुख झाकून लहान झालें आहे अशा त्या पत्नीस पाहून तो दैत्यराज वज्रांग दैत्य तिचें समाधान करीत होत्साता तिला भाषण करितो.

वज्रांगउवाच॥केनतेपकृतंभीरुयमलोकंयियासु-
ना॥७७॥कंवाकामंप्रयच्छामिशीघ्रंमेब्रूहिमानिनि
॥ इतिश्रीमत्स्यपुराणेतारकासुरोपाख्याने पंचच
त्वारिंशदुत्तरशततमोऽध्यायः॥१४५॥

अर्थ:- वज्रांग बोलला कीं, हे भयभीतस्त्रिये कोणी यमलोकास जाणाऱ्यानें तुला अपकार केला; तें मला सांग? किंवा मी तुझा कोणता मनोरथ पूर्ण करूं तें हे सुंदरी मला सांग? इतिश्री मत्स्यपुराणे वज्रांगोत्पत्तिर्नाम पंचचत्वारिंशदुत्तर शततमोऽध्यायः १४५.

अध्याय १४६ वा प्रारं०

वरांग्युवाच॥त्रासितास्म्यपविद्धास्मिताडितापीडि
तापिच॥रौद्रेणदेवराजेननष्टनाथेवभूरिशः॥१॥

अर्थ:- तेव्हां ती वरांगी आपले पतीस (वज्रांगास) बोलली कीं, हे प्राणनाथा तूं तपश्चर्येंत असतां देवराज इंद्रानें अनेक भयंकर रूपानीं मला अनाथ स्त्री प्रमाणें बहुत प्रकारें त्रास दिला! तसेंच ओढिलें! ताडन केलें! व मला नाना प्रकारची पीडा ही केली.

दुःखपारमपश्यंतीप्राणांस्त्यक्तुंव्यवस्थिता॥पुत्रं
मेतारकंदेहिदुःखशोकमहार्णवात्॥२॥

अर्थ:- आणि या अपार दुःखाची समाप्ती माझे दृष्टीस पडेना; यास्तव मी

आतां प्राण त्याग करण्या विषयीं उद्युक्त झाल्यें आहें; तर त्यां वांचावें अशी तुला इच्छा असल्यास या सर्व दुःख शोकादिकांचे महा समुद्रांतून माझा उद्धार करणारा असा पुत्र तूं मला दे.

एवमुक्तः सदैत्येंद्रः कोपव्याकुललोचनः ॥ शक्तोपिदेवराजस्य प्रतिकर्तुंमहासुरः ॥ ३ ॥ तपः कर्तुंपुनर्दैत्यो व्यवस्यत महाबलः ॥

अर्थ- असें वरांगीनें भाषण ऐकून तो दैत्यराज वज्रांग दैत्य, कोपानें आपले नेत्र व्याकुल करून देवराज इंद्रास उलट अपकार करण्या विषयीं तो मोठा असुर समर्थ असून तो महा बलाढ्य वज्रांग दैत्य तदर्थंच पुनः तप करण्या विषयीं निश्चयानें प्रवृत्त झाला.

ज्ञात्वातुतस्यसंकल्पंब्रह्माक्रूरतरंपुनः ॥ ४ ॥ आजगामतदा तत्र यत्रासौ दितिनंदनः ॥ उवाच तस्मै भगवान्प्रभक्रमधुरयागिरा ॥ ५ ॥

अर्थ- त्या कालीं त्या वज्रांग दैत्याचा इंद्राच्या निग्रहा विषयीं अतिक्रूर असा संकल्प जाणून ब्रम्हदेव, तो दिति पुत्र वज्रांगासुर जेथें होता तेथें आले. आणि ते सर्वांचे प्रभु भगवान् मधुर वाणीनें त्या दैत्यास ह्मणतात.

ब्रम्होवाच ॥ किमर्थंपुत्रभूयस्त्वंनियमंक्रूरमिच्छसि ॥ आहाराभिमुखोदैत्यस्तन्नोब्रूहिमहाव्रत ॥ ६ ॥

अर्थ- ब्रम्हदेव बोलले कीं, हे मुला वज्रांगा तूं पुनः क्रूर नियम करण्याची इच्छा किमर्थ करितोस; कारण एकवार बहुत नियम करून तप केल्याचे फलाचा उपभोग करण्या विषयीं तूं योग्य असून हे दितिपुत्रा तूं पुनः एवढें मोठें दुष्कर तप करण्यास प्रवृत्त झालास याचें कारण काय आहे तें आह्मास सांग?

यावदब्दसहस्त्रेणनिराहारस्ययत्फलं ॥ क्षणेनैकेन तल्लुब्ध्वात्यक्ताहारमुपस्थितं ॥ ७ ॥

अर्थ- हे वत्सा एक हजार वर्षे पर्यंत कांहींएक भक्षण न करितां निरशनें केल्यानें प्राप्त होणारें जें फल तें मी तुला एक क्षणांत पूर्वीं दिलें असून त्याचा त्याग करणें युक्तच आहे.

त्यागोह्यप्राप्तकामानांकामेभ्योनतथागुरुः॥यथा-
प्राप्तंपरित्यज्यकामंकमललोचन॥८॥

अर्थ- कारण कमलनयना हे वज्रांगा प्राप्त झालेल्या विषयांचा त्याग करण्या पेक्षां अप्राप्त विषयांचा त्याग करणें हें कांहीं अधिक नाहीं; तर प्राप्त-विषयांचाच त्याग करण्यांतच विशेष आहे; तथापि प्राप्त फलाचा त्याग कि मर्थ करितोस.

श्रुत्वेतद्ब्रह्मणोवाक्यंदैत्यःप्रांजलिरब्रवीत्॥ चितयं स्तपसायुक्तोह्यदिब्रह्ममुखेरितं॥९॥

अर्थ- असें ब्रम्हदेवाचें वाक्य ऐकून तो महा तपस्वी वज्रांग दैत्य ब्रह्मदेवांच्या मुखांतून निघालेल्या भाषणाचें मनांत चिंतन करीत होत्साता त्यास बोलतो.

वज्रांगउवाच॥उत्थितेनमयादृष्टासमाधानात्तदा-
ज्ञया॥महिषीभीषितादीनारुदंतीशाखिनस्तले१०

अर्थ- वज्रांग बोलला कीं, हे ब्रम्हदेवा, तुमच्या आज्ञेनें समाधान पावून त्यां तपश्चर्येतून उठून आपल्या स्त्रीस पाहिलें; तों ती माझी पट्टाभिषिक्त पत्नी भयानें दीन होत्साती रुदन करीत एकवृक्षाखालीं बसली होती.

सामयोक्तातुतन्वंगीदूयमानेनचेतसा॥किमेवंवर्तसेभीरुवदत्वंकिंचिकीर्षसि॥११॥

अर्थ- तेव्हां त्यां तिला विचारिलें कीं, हे भयभीत स्त्रिये तूं दुःखित अंतःकरणानें कृशांगी अशी कशानें झालीस; आणि तुझे मनांत काय कर्तव्य आहे तें मला सांग?

इत्युक्तासामयादेवप्रोवाच स्खलिताक्षरं॥वाक्यं-
वाचस्पतेभीतातन्वंगीहेतुसंहितं॥१२॥

अर्थ- हे देवा असें त्या तिजला विचारिलें असतां, ती भयभीत झालेली कोमलांगी माझी स्त्री कारण सहित मुखांतून अक्षरें अडखळत येत असून तसेंच धैर्य धरून हळू हळू सांगूं लागली.

वराङ्ग्युवाच॥त्रासितास्म्यपविद्धास्मिकर्षितापी-
डितास्मिच॥रौद्रेणदेवराजेन नष्टनाथेवभूरिशः॥१३

अर्थ- वरांगी बोलली कीं, देवराज इंद्रानें अनेक भयंकर रूपानीं एकाद्यै अनाथ स्त्री सारिखा मला त्रास दिला! मला बांधून ओढिलें! व नानाप्रकारें पीडा ही दिली.

दुःखस्यांतमपश्यंती प्राणांस्त्यक्तुंव्यवस्थिता ॥ पुत्रमेतारकंदेहिह्यस्माद्दुःखमहार्णवात् ॥ १४ ॥

अर्थ- आणि या दुःखाची समाप्ति माझे दृष्टीस पडत नाहीं; तस्मात् आतां या दुःखाचे महा समुद्रांतून तारण्यास समर्थ असा पुत्र मला दे; नाहीं तर मी निश्चयें प्राण त्याग करिल्यें.

एवमुक्तस्तसंक्षुब्धस्तस्याः पुत्रार्थमुद्यतः ॥ तपोघोरंकरिष्यामिजयायत्रिदिवौकसां ॥ १५ ॥

अर्थ- असें माझ्या पत्नीनें भाषण केलें असतां, तिला पुत्र होऊन त्यापासून स्वर्गवासी देवांचा पराजय होण्या साठीं मी घोर तप करण्याविषयीं उद्युक्त झालों आहें.

एतच्छ्रुत्वावचोदेवः पद्मगर्भोद्भवस्तदा ॥ उवाचदैत्यराजानंप्रसन्नश्चतुराननः ॥ १६ ॥

अर्थ- हे वज्रांगाचें वचन श्रवण करून विष्णूच्या नाभि कमलाचे गर्भांतून उत्पन्न झालेला चार मुखांचा ब्रह्मदेव प्रसन्न होऊन त्या कालीं त्या दैत्यराज वज्रांगास बोलूं लागला.

ब्रह्मोवाच ॥ अलंतेतपसावत्समाक्लेशेदुस्तरेविश ॥ पुत्रस्तेतारकोनामभविष्यतिमहाबलः ॥ १७ ॥ देवसीमंतिनीकांतधम्मिल्लस्यविमोक्षणः ॥

अर्थ- ब्रम्हदेव बोलला कीं, हे वत्सा वज्रांगा आतां हें तप पुरे! कारण आतां तूं या दुस्तर क्लेशांत पडूनको! तर तुला तारक या नामानें प्रसिद्ध व महाबलाढ्य असा पुत्र होईल; आणि तो युद्धांत देवांस जिंकून त्यांच्या स्त्रियांचें धैर्य जाऊन त्यांचे सुंदर बुचडे सुटतील; असा तो पराक्रम करील.

इत्युक्तोदैत्यनाथस्तुप्रणिपत्यपितामहं ॥ आगत्यानंदयामासमहिषींहर्षिताननः ॥

अर्थ- असा ब्रह्मदेवानें वर दिला असतां, तो दैत्यांचा नाथ वज्रांग सर्व पितामह-

ब्रम्हदेवास नमस्कार करून हर्षानें प्रफुल्लित वदन होत्साता आश्रमांत येऊन आपल्ये पट्टाभिषिक्त स्त्रीस पुत्रा विषयीं मिळालेला वर सांगून त्यानें तिला आनंदयुक्त केलें.

तौदंपतीकृतार्थौतुजग्मतुःस्वाश्रमंमुदा॥१९॥ वज्रांगेनाहितंगर्भंवरांगावरवर्णिनी॥पूर्णवर्षसहस्त्रंचदधारोदरएवहि॥२०॥

अर्थ- असे ते वरांगा व वज्रांग हे उभयतां स्त्री पुरुष त्या ब्रह्मवरानें कृतार्थ होऊन हर्षानें आपले आश्रमांत आले; आणि वज्रांगानें स्थापन केलेला गर्भ ती पतिव्रता वरांगी पूर्ण एक सहस्त्र वर्षें पर्यंत तो गर्भ आपले उदरांतच धारण करिती झाली.

ततोवर्षसहस्त्रांतेवरांगीसुषुवेसुतं॥जायमानेतुदैत्येंद्रेतस्मिन्लोकभयंकरे॥२१॥चचालसकलापृथ्वीसमुद्राश्चचकंपिरे॥

अर्थ- नंतर एक हजार वर्षांचे अंतीं ती वरांगी पुत्रास प्रसवली; तेव्हां तो दैत्यराज सर्व लोकांस भयंकर असा तारकासुर जन्मला त्या कालीं संपूर्ण पृथ्वी कंपित झाली, व सर्व समुद्र ही अत्यंत क्षोभ पावले.

चेलुर्महीधराःसर्वेववुर्वाताश्चभीषणाः॥२२॥जेपुर्जप्यंमुनिवरानेदुर्व्यालमृगाअपि॥

अर्थ- आणि समग्र पृथ्वीचें धारण करणारे पर्वत थरथरां कांपले! वायू भयंकर वाहूं लागला! सर्वऋषि भयभीत होत्साते गायत्री प्रमुख मंत्रांचा जप करूं लागले! आणि सर्प व हरिणादिक अरण्यांतील सकल पशु भयानें शब्द करूं लागले.

चंद्रसूर्याजहुःकांतिंसनीहारादिशोभवन्॥२३॥जातेमहासुरेतस्मिन्सर्वेचापिमहासुराः॥आजग्मुर्हर्षितास्तत्रतथाचासुरयोषितः॥२४॥

अर्थ- ते समयीं चंद्र व द्वादशादित्य यांचें तेज मंद झालें, तत्पश्चात सर्व दिशाही धुक्यानें व्याप्त जाहल्या; असा तो महान् तारकासुर उत्पन्न जाहला तेव्हां सर्व मोठमोठे असुर हर्षयुक्त होत्साते तेथें आले; त्याच प्रमाणें समग्र

असुरांच्या स्त्रिया ही आनंदानें तेथें आल्या.

जग्मुर्हर्षसमाविष्टा ननृतुश्चासुरांगनाः॥ ततोम
होत्सवोजातो दानवानां द्विजोत्तमाः॥२५॥

अर्थ- अशा त्या सर्व असुर स्त्रिया हर्षयुक्त होत्सात्या वज्रांग दैत्याचे घरीं येऊन आनंदानें नृत्य करूं लागल्या; ऋषी हो नंतर त्या दैत्याचे घरीं पुत्रोत्सव झाल्यामुळें सर्व दानवांस परमानंद जाहला.

विषण्णमनसोदेवाः समहेंद्रास्तदाभवन्॥ वरांगीस्व
सुतंदृष्ट्वा हर्षेणापूरितातदा॥२६॥ बहुमेनेन देवेंद्र
विजयंतुतदैवसा॥

अर्थ- आणि त्या कालीं इंद्रा सहित संपूर्ण हीदेव मनांत खिन्न जाहले; आणि ते समयीं वज्रांगपत्नी (वरांगी) आपले पुत्रास पाहून अत्यंत हर्षानें पूर्ण झाली व तिणें त्याच कालीं स्वपुत्राचे हातून इंद्राचा पराजय होणें हें लेशमात्र ही कठिण मानिलें नाहीं.

जातमात्रस्तुदैत्येंद्रस्तारकश्चंडविक्रमः॥२७॥अ
भिषिक्तोसुरैः सर्वैः कुजंभमहिषादिभिः॥ सर्वासु
रमहाराज्येपृथिवीतुलनक्षमैः॥२८॥

अर्थ- नंतर पृथ्वीची तुलना करण्या विषयीं समर्थ अशा कुजंभ व महिषासुर प्रभृति सर्व प्रमुख असुरानीं जन्मतांच जो उग्र पराक्रमी दैत्यश्रेष्ठ तारकासुर त्यास संपूर्ण असुरांच्या सार्वभौम राज्यावर अभिषेक करून स्थापन केला.

सतुप्राप्यमहाराज्यंतारकोमुनिसत्तमाः॥उवाचदा
नवश्रेष्ठान्युक्तियुक्तमिदंवचः॥२९॥ ॥इतिश्रीमत्स्य
पुराणेतारकासुरोपाख्याने षट्चत्वारिंशदुत्तरशत
तमोऽध्यायः॥१४६॥

अर्थ- ऋषिश्रेष्ठ हो तारकासुर असें महत् राज्य प्राप्त झाल्यावर महिषासुरादिक श्रेष्ठ दानवांस तो दैत्य अनेक युक्तीनीं युक्त असें भाषण बोलतो.

इतिश्री मत्स्य पुराणें तारकोत्पत्तिर्नाम षट्चत्वारिंशदुत्तर शततमोऽध्यायः१४६

अध्याय १४७ वा.

तारकउवाच॥ शृणुध्वमसुराः सर्वे वाक्यंममम्हाब

ला:॥ श्रेयसेक्रियतांबुद्धिः सर्वैः कृत्यस्यसंविधौ॥१॥

अर्थ- तारकासुर बोलला कीं, महाबलाढ्य समग्र असुरहो माझें वाक्य-श्रवण करा; तें असें कीं, तुह्मीं सर्वांनीं कोणतेही कृत्याच्या करण्यांत कल्याणार्थ बुद्धि धारण करा.

वंशक्षयकरादेवाः सर्वेषामेवदानवाः॥ अस्माकंजातिधर्मोवैविरूढंवैरमक्षयं॥ २॥

अर्थ- दानव हो देव आपल्याच सर्व वंशाचा क्षय करणारे आहेत; तसाच-आमचाही जाति धर्म असा आहे कीं, निरंतर देवांशीं विशेषें करून अवश्य वैर करावें.

वयमद्यगमिष्यामः सुराणांनिग्रहायतु ॥ स्वबाहुबलमाश्रित्यसर्वएवमसंशयः॥ ३॥

अर्थ- तस्मात् आज सर्व आपण स्व बाहु बलाचा आश्रय करून देवांचा-निग्रह करण्या साठीं निश्चयानें जाऊं.

किंतुनातपसायुक्तोमन्येहंसुरसंगमं॥ अहमादौकरिष्यामितपोघोरंदितेसुताः॥ ४॥

अर्थ- परंतु तप केल्यावांचून मीं देवांशीं युद्धार्थ जाण्याची इच्छा करीत नाहीं; यास्तव दैत्यहो पूर्वीं मीं घोर तप करीन.

ततः सुरान् विजेष्यामोभोक्ष्यामोथजगत्त्रयं॥ स्थिरोपायोहिपुरुषः स्थिरश्रीरपिजायते॥ ५॥ रक्षितुंनैवशक्नोतिचपलश्चपलाः श्रियः॥

अर्थ- नंतर आपण देवांस जिंकून त्रैलोक्याचा उपभोग करूं; कारण जो-पुरुष स्थिर उपायानें चालतो; त्याचीच संपत्ति स्थिर होत्ये; आणि जो चपल आहे; तो चंचल संपत्तीचें रक्षण करण्या विषयीं समर्थ होत नाहीं.

तच्छ्रुत्वादानवाः सर्वेवाक्यंतस्यासुरस्यतु॥ ६॥ साधुसाध्वित्यवोचंस्तेतत्रदैत्याः सविस्मयाः॥

अर्थ- ते समयीं तें तारकासुराचें भाषण ऐकून ते सर्व दानव (दैत्य) विस्मित होत्साते तेथें परस्परांत फार चांगलें असें वारंवार बोलूं लागले.

सोगच्छत्पारियात्रस्यगिरेः कंदरमुत्तमं॥ ७॥ सर्वर्तु

कुसुमाकीर्णनानौषधिविदीपितं ॥ नानाधातुरसस्रा
वचित्रंनानागुहागृहं ॥ ८ ॥ गहनैःसर्वतोगूढंचित्रक
ल्पद्रुमाश्रयं ॥ अनेकाकारबहुलंपृथकूपक्षिकुलाकु-
लं ॥ ९ ॥ नानाप्रस्रवणोपेतंनानाविधजलाशयं ॥
प्राप्यतत्कंदरंदैत्यश्चचारविपुलंतपः ॥ १० ॥

अर्थ- नंतर तो तारकासुर पारियात्र पर्वताचे उत्तम गुहेंत गेला. ती गुहा अशी कीं, ज्या गुहेंत सर्व ऋतूंतील पुष्पें आसमंतात् सर्व प्रदेशीं पूर्ण असून अनेक औषधींचे तेजानें ती गुहा प्रकाशमान आहे; आणि सुवर्णादिक धातूंच्या रसांचे पाझरानीं ती गुहा चित्र विचित्र दिसत असून तींत लहान गुहे सारिखीं घरें आहेत; त्यात प्रमाणें ती गुहा सर्वत्र कठिण स्थानानीं झांकलेली असून चमत्कारिक कल्प वृक्षानीं सुशोभित आहे; तसेंच अनेक आकृतींच्या बहुत निरनिराळ्या जातींचे पक्षिकुळानीं व्याप्त, नाना प्रकारचे झऱ्यानीं युक्त व अनेक प्रकारच्या पुष्करिणी आदि करून जलाशयानीं शोभायमान अशा गुहेंत जाऊन तो दैत्य बहुत तप करीत राहिला.

निराहारःपंचतपापत्रभुग्वारिभोजनः ॥ शतंशतंस
मानांतुतपांस्येतानिसोकरोत् ॥ ११ ॥

अर्थ- तें असें कीं, चोंहों बाजूस चार अग्नि व वर पांचवा सूर्य या प्रमाणें पंचाग्नि साधन करीत असतां कांहीं काळ पानें भक्षून, कांहीं काल केवल उदकच पिऊन व कांहीं काळ निराहार अशा एकेक नियमानें तो तारकासुर तप करूं लागला.

ततःस्वदेहादुत्कृत्यकर्षंकर्षंदिनेदिने ॥ मांसस्याग्नौ
जुहावासौततोनिर्मांसतांगतः ॥ १२ ॥

अर्थ- नंतर प्रति दिवशीं आपल्या देहांतून एकेक तोळा मांस काढून त्याचा अग्नींत होम करून त्या योगानें त्या दैत्याचे देहांतील मांस अगदींच नाहींसें झालें.

तस्मिन्निर्मांसतांयातेतपोराशित्वमागते ॥ जज्व-
लुःसर्वभूतानितेजसातस्यसर्वतः ॥ १३ ॥

अर्थ- असा तो तारकासुर मांस रहित होऊन केवल तपश्चर्येचा राशि-

झाल्यानें अग्नी सारखा देदीप्य मान झाला असतां त्याचे तेजानें सर्वत्र-प्राणी जळूं लागले.

उद्विग्नाश्चसुराः सर्वेतपसातस्यभीषिताः॥ एतस्मिन्नंतरेब्रम्हा परमंतोषमागतः ॥१४॥

अर्थ- तसेच त्याच्या तपानें सर्व इंद्रादि देव मनांत उद्विग्न होऊन भयभीत जाहले; इतक्यांत ब्रम्हदेव त्या तारकासुराचे तपानें अतिशयें संतुष्ट झाला.

तारकस्यवरंदातुंजगामत्रिदशालयात्॥ प्राप्यतंशैलराजानंसगिरेःकंदरस्थितं॥१५॥उवाचतारकंदेवोगिरामधुरयातुनः॥

अर्थ- आणि ब्रम्हदेव त्या तारकासुरास वर देण्या विषयीं देवांच्या स्वर्गलोकांतून आला; तो त्या पारियात्र नामक महापर्वतावर येऊन त्या पर्वताच्या गुहेंत बसलेल्या त्या तारकासुरास मधुर वाणीनें बोलूं लागला.

ब्रह्मोवाच॥ पुत्रालंतपसातेस्तिनास्त्यसाध्यंतवाधुना॥१६॥ वरंवृणीष्वरुचिरंयत्तेमनसिवर्तते॥

अर्थ- ब्रह्मदेव बोलला कीं, हे वत्सा तारकासुरा हें तुझें तप पुरे; कारण तुला आतां असाध्य असें कांहीं राहिलें नाहीं. तस्मात् तुझे मनांत जें इच्छित असेल तो तूं यथेच्छ वर माग.

इत्युक्तस्तारकोदैत्यःप्रणम्यात्मभवं विभुं॥१७॥उवाचप्रांजलिर्भूत्वाप्रणतः पृथुविक्रमः॥

अर्थ- असें ब्रह्मदेवानें भाषण केलें असतां महापराक्रमी तो तारकासुर विष्णूपासून उत्पन्न झालेल्या समर्थ ब्रह्मदेवास साष्टांग नमस्कार करून नम्र होत्साता भाषण करितो.

तारकउवाच॥देवभूतमनोवासवेत्सिजंतुविचेष्टितं॥१८॥ कृतप्रतिकृताकांक्षीजिगीषुःप्रायशोजनः॥

अर्थ- तारकासुर बोलतो कीं, प्राणि मात्रांचे मनांत वास करणाऱ्या देवा तूं सर्व प्राण्यांचें मनोगत जाणतोस तर सर्व प्राणी असे आहेत कीं, कोणी आपणावर-उपकार किंवा अपकार केला असतां त्या उपकार करणावर उपकार करणें अथवा अपकार करणारावर अपकार करणें असें करून लोकांस जिंकून सर्वांत महत्व-

मिळवावें अशी इच्छा करणारेच लोक प्रायः बहुत आहेत.

वयंचजातिधर्मेणकृतवैराः सहामरैः॥१९॥तैश्चनिः-
शेषितादैत्याः क्रूरैः संत्यज्य धर्मितां॥

अर्थ— आणि आम्ही तर जाति स्वभावानें देवांशीं मुळां पासूनच वैर करणारे आहोंत, म्हणून त्या देवानीं धार्मिक पणा सोडून क्रूरबुद्धीनें आमचे सर्व दैत्य मारिले.

तेषामहंसमुध्दर्त्ताभवेयामितिमेमतिः॥२०॥अवध्यं
सर्वभूतानामस्त्राणांचमहौजसां॥स्यामहंपरमोत्द्वे-
षवरोममत्द्दिस्थितः॥२१॥एतन्मेदेहिदेवेशनान्यो-
मेराचतेवरः॥

अर्थ— तेव्हां त्या दैत्यांचा संकटांतून उद्धार करावा, असें माझ्या अंतःकरणांत आहे; एतदर्थ देवादिक सर्व भूतें व त्यांचीं महा तेजोमय अस्त्रें यानीं माझा वध न व्हावा हाच माझे मनांत वर मागावयाचा आहे; तस्मात् हे देव राजा हाच वर मला द्यावा. याशिवाय अन्यवर मला रुचत नाहीं.

तमुवाचततोदैत्यंविरिंचिःसुरनायकः॥२२॥नयु-
ज्यंतेविनामृत्युंदेहिनोदैत्यसत्तम॥

अर्थ— असा तारकासुरानें वर मागितल्यावर त्यास देव नायक ब्रह्मदेव बोलले कीं, हे दैत्यश्रेष्ठा प्राणिमात्रांस मृत्यु वांचून इतर वर युक्त नाहीं.

यतस्ततोपिवरयमृत्युंयस्मान्नशंकसे॥२३॥ततः
संचिंत्यदैत्येंद्रः शिशौर्वैसप्तवासरात्॥ वव्रेमहासुरो
मृत्युमवलेपनमोहितः॥२४॥

अर्थ— यास्तव ज्या पासून तुला मृत्यु भयाची शंका प्राप्त होणार नाहीं असा वर माग असें ब्रम्हदेवाचें वचन ऐकून तो दैत्यश्रेष्ठ तारकासुर उत्तम विचार करून गर्वानें मोहित होत्साता सातदिवसांच्या मुला पासून मला मृत्यु प्राप्त होवो. असा वर मागता झाला.

ब्रह्माचास्मैवरंदत्वायत्किंचिन्मनसेप्सितं॥जगामत्रि
दिवंदेवोदैत्योपिस्वकमालयं॥२५॥

अर्थ— या प्रमाणें ब्रम्हदेव तारकासुराचे मनांत जें इच्छित होतें तो वर त्यास देऊन सत्य लोकास गेले व तसाच तो तारकासुरही आपल्या घरीं गेला.

उत्तीर्णतपसस्तं तु दैत्यं दैत्येश्वरास्तथा॥ परिवव्रुः सहस्रासं दिवि देवगणा यथा॥ २६॥

अर्थ— त्या कालीं तपश्चर्येपासून कृतकार्य होऊन आलेल्या त्या तारकासुराचे आसमंतात् भागीं येऊन बसले; यास दृष्टांत स्वर्गांत जसे सर्व देवगण इंद्राच्या सभोंवतीं वेष्टन करून बसतात; तसे बसले

तस्मिन्महति राज्यस्थे तारके दैत्यनंदने॥ ऋतवो मूर्तिमंतश्च स्वकालगुणबृंहिताः॥२७॥

अर्थ— नंतर तो वज्रांग दैत्याचा पुत्र तारकासुर त्या मोठ्या दैत्य राज्यावर बसला असतां मूर्तिमंत वसंतादिक सर्व ऋतु आपापले कालांचे गुणानीं प्रगट असते झाले.

अभवन् किंकरास्तस्य लोकपालाश्च सर्वशः॥ कांतिर्द्युतिर्धृतिर्मेधाः श्रीरवेक्ष्य च दानवं॥ २८॥ परिवव्रुर्गुणाकीर्णा निश्छिद्राः सर्व एव हि॥

अर्थ— आणि सर्व लोकपाल त्या तारकासुराची सेवा करूं लागले तसेंच कांति द्युति(तेज) धैर्य धारणा युक्त बुद्धि व संपत्ति यांच्या देवता तारकासुरास पाहून आपापले गुणानीं युक्त होत्सात्या पूर्णतेनें त्या सर्वही असुराचे सान्निधानीं येऊन राहिल्या.

कालागरुविलिप्तांगं महामुकुटभूषणं॥२९॥ रुचिरांगदनद्धांगं महासिंहासने स्थितं॥ वीजयंत्यप्सरः श्रेष्ठाः भृशं मुंचंति नैव ताः॥३०॥

अर्थ— त्याचप्रमाणें कृष्णागरु चंदनाची उटी लावलेली असून मोठा मुगुट व अवांतर कर्णकुंडलादिक भूषणें यानीं शोभायुक्त सुंदर बाहुभूषणानीं सुशोभित व महासिंहासनावर बसलेला अशा त्या तारकासुरास श्रेष्ठ अप्सरा येऊन त्यास न सोडितां वारा घालीत राहिल्या.

चंद्रार्कौ दीपमार्गेषु व्यजनेषु च मारुतः॥ कृतांतोऽग्रेसरस्तस्य बभूवुर्मुनिसत्तमाः॥ ३१॥

अर्थ— आणि ऋषिश्रेष्ठहो चंद्र सूर्य हे तारकासुराच्या घरीं दीपांचे स्थानीं वर्तत होते; तसाच वायु विंझण्याचे जागीं वर्तू लागला. व यम धर्म त्याचे अ-

ग्रभागीं दूता सारखा चालत असे.

एवंप्रयाति कालेतु वितते तारकासुरः॥ बभाषे सचि
वान्दैत्यः प्रभूतवरदर्पितः॥ ३२॥

अर्थ- असा बहुत दीर्घ काल गेला असतां, तो दितीचा नातु तारकासु-र ब्रह्मदेवाच्या मोठ्या वरानें गर्वयुक्त होऊन आपल्या प्रधानास बोलूं लागला.

तारक उवाच॥ राज्येन कारणं किंमेलब्ध्वाक्रम्य त्रिवि-
ष्टपं॥ अनिर्याप्य सुरैर्वैरं काशांतिर्हृदये मम॥ ३३॥

अर्थ- तारकासुर बोलला कीं, दैत्य हो स्वर्गानें राज्य घेतल्या वांचून या केवल आपले राज्याशीं काय मला कर्तव्य आहे; कारण देवांशीं जें वैर आहे; तें त्यांस जिंकून न घालवितां मीं आपले मनांत शांति धारण केली ही काय उपयोगी आहे.

भुंजतेद्यापि यज्ञांशानमरा नाक एवहि॥ विष्णुः श्रि
यंनजहति तिष्ठते च गतभ्रमः॥ ३४॥

अर्थ- पहा कीं, सर्व देव स्वर्गांतच राहून अद्यापितें यज्ञांतील भाग ग्रहण करून त्यांचा उपभोग करितात; आणि विष्णूही लक्ष्मीचा त्यागन करितां भ्रम रहित होत्साता स्वस्थ रहातो.

स्वस्थाभिः स्वर्गनारीभिः पीड्यंते मरवल्लभाः॥ सो-
त्पलामदिरामोदादिविक्रीडायनेषु च॥ ३५॥

अर्थ- तशाच स्वर्गांतील देवांगना स्वस्थांतःकरणानें कमल पुष्पांचे सुगंध युक्त मद्य प्राशनानें आनंद पावलेल्या आपले प्रिय पतींस देवांस स्वर्गलोकांतील अनेक क्रीडा स्थानांत आलिंगनादिक विलासानीं पीडा करितात.

लब्ध्वा जन्म नयः कश्चिद्यदयेत्पौरुषंनरः॥ जन्म
तस्य वृथाभूतमजन्मा तु विशिष्यते॥ ३६॥

अर्थ- आणि दुसरें असें आहे कीं, जन्मास येऊन जो पुरुष पराक्रमा विषयीं प्रयत्न करील नाहीं त्याचें जन्म व्यर्थ गेलें; व त्या पेक्षां तो जन्मास आला नसता तरी बरें होतें असें समजावें.

मातापितृभ्यां नकरोति कामान् बंधूनशोकान् नकरो
तियोवा॥ कीर्तिं हि वानार्जयते हिमाभां पुमान्सजातो
पिमृतो मतं मे॥ ३७॥

अर्थ- तसाच जो पुरुष जन्मास येऊन माता पितरांचे मनोरथ पूर्ण करित नाहीं; त्याच प्रमाणें जो आपले बांधवांचे शोक दूर करीत नाहीं; व जो बर्फा सारिखी शुद्ध निर्मळ सत्कीर्ति संपादन करीत नाहीं, तो पुरुष जन्मास आला असून मृतप्रायच जाणावा असें माझें मत आहे.

तस्मात्जयायामरपुंगवानां त्रैलोक्यलक्ष्मीहरणाय शीघ्रं॥ संयोज्यतांमे रथमष्टचक्रं बलंचमे दुर्जयदैत्यचक्रं॥ ध्वजंचमेकांचनपट्टनद्धं छत्रंचमे मौक्तिकजालबद्धं ॥३८॥

अर्थ- तस्मात् देव श्रेष्ठ इंद्रादिक देवांचा पराजय करून त्यां पासून त्रैलोक्याच्या राज्य लक्ष्मीचें हरण करण्या साठीं दैत्य हो मोठ्या त्वरेनें माझा आठ चाकांचा रथ सिद्ध करा; तसेंच कष्टानें ही जिंकण्यास अशक्य अशा महा बलिष्ठ दैत्य समुदायांचें चतुरंग सैन्य सिद्ध करा; आणि सोनेरी पट्ट वस्त्रानें वेष्टित असा रथाचा ध्वज सिद्ध करावा; व मोत्यांच्या जाळ्यांनीं युक्त असें माझें श्वेतच्छत्र सिद्ध करावें.

तारकस्यवचः श्रुत्वाग्रसनोनामदानवः॥ सेनानीर्दैत्यराजस्य तथाचक्रे बलान्वितः॥३९॥

अर्थ- असें दैत्यराज तारकासुराचें आज्ञा वचन ऐकून त्याचा सेनापति महा बलाढ्य ग्रसन नामक दानव त्या आज्ञे प्रमाणें सर्व रथ व सैन्यादिक यांची सर्व सिद्धता करिता जाहला.

आहत्यभेरींगंभीरांदैत्यानाहूयसत्वरः॥ तुरगाणांसहस्रेणचक्राष्टकविभूषितं॥४०॥ शुक्लांबरपरिष्कारंचतुर्योजनविस्तृतं॥ नानाक्रीडागृहयुतंगीतवाद्यमनोहरं॥४१॥ विमानमिवदेवस्यसुरभर्तुःशतक्रतोः॥

अर्थ- ती अशी कीं, त्या सेनापति ग्रसन दानवानें मोठी नौबद वाजवून त्वरेनें सर्व दैत्यांस बोलावून त्याजकडून तारकासुराचा रथ सिद्ध करविला तो असा कीं, त्या रथास आठ चाकें शोभत असून एक हजार घोडे लाविले होते त्यावर शोभाय मान शुभ्र वस्त्रें आच्छादनार्थ घातलीं आ

णि गायन व वाद्यें यांनीं सुशोभित अशा क्रीडा करण्याचें अनेक मंदिरा-नीं युक्त असून चार योजनें (सोळा कोश) विशाळ, (शंभर अश्वमेध-यज्ञ करणाऱ्या देवराज इंद्राचे विमाना सारखा सुंदर) असा रथ त्या सेनापतीनें सिद्ध केला.

दशकोटीश्वरादैत्या दैत्यास्तेचंडविक्रमाः ॥ ४२॥ तेषा
मग्रेसरोजंभः कुजंभोनंतरस्ततः॥ महिषः कुंजरोमेघः
कालनेमिर्निमिस्तथा ॥ ४३॥ मथनोजंभकः शुंभोदै
त्येंद्रादशनायकाः॥

अर्थः- आणि त्या तारकासुराचे सैन्यांत दहा कोटी सैन्याचा एकनायक असे प्रचंड पराक्रमी दहा श्रेष्ठ दैत्य त्या सेन्यांत प्रमुख योद्धे होते ते असे कीं, त्या-सर्वां मध्यें १ जंभासुर अग्रेसर होता, त्याचे मागें २ कुजंभ, तसाच ३ महिषासुर, ४ कुंजर, ५ मेघ, ६ कालनेमि, ७ निमि, ८ मथन, ९ जंभक, व १० शुंभ हे दहा मोठे सरदार होते.

अन्येपिशतशस्तस्यपृथिवीदलनक्षमाः ॥ ४४॥ दै-
त्येंद्रागिरिवर्ष्माणः संतिचंडपराक्रमाः ॥नानायुधप्र
हरणानानाशस्त्रास्त्र पारगाः ॥ ४५॥

अर्थः- तसेच पृथिवीचा नाश करण्या विषयीं एकेकटे समर्थ असून पर्वत-प्राय शरीरी, महापराक्रमी असे इतर ही शेंकडों श्रेष्ठ दैत्य त्या तारकासुराचे सेन्यांत होते, ते अनेक आयुधानीं युद्ध करण्यांत कुशल असून सर्व शस्त्रें व अस्त्रें यांत पारंगत झाले होते.

तारकस्याभवत्केतू रौद्रः कनकभूषणः ॥केतुनामकरे
णापिसेनानीर्ग्रसनोरिहा ॥ ४६॥

अर्थः- त्या सैन्यांत तारकासुराचा ध्वज सुवर्णानें भूषित असून भयंकर होता; आणि मत्स्य ध्वजरथांत शत्रूंचा संहार करणारा सेनापति ग्रसन नामा-दानव शोभत होता.

पैशाचंयस्यवदनं जंभस्यासीदयोमयं ॥ खरंविधूत
लांगूलं कुजंभस्याभवद्ध्वजे ॥ ४७॥

अर्थः- त्याच प्रमाणें जंभासुराच्या ध्वजास लोखंडाचें पिशाचाकार मुख हो

नें, आणि कुजंभ दैत्याचे ध्वजावर चंचल पुच्छयुक्त गर्दभाचें चिन्ह होतें.

महिषस्यतुगोमायुंकेतौहैमंतदाभवत्॥ ध्वांक्षंध्वजे तुशुंभस्यकृष्णायोमयमुच्छ्रितं॥ ४८॥

अर्थ- तसेंच त्याकाळीं महिषासुराच्या ध्वजास सोन्याच्या कोल्ह्याचें चिन्ह होतें; व शुंभ दैत्याचे ध्वजास पोलादी कावळ्याचें उंच चिन्ह केलेलें असे.

अनेकाकारविन्यासाश्चान्येषांतुध्वजास्तथा॥ शतेन शीघ्रवेगानांव्याघ्राणांहेममालिनां॥ ४९॥ ग्रसनस्य-रथोयुक्तोकिंकिणीजालमालिनां॥ शतेनापिचसिंहानांरथोजंभस्यदुर्जयः॥ ५०

अर्थ- आणि त्या सैन्यांत या वांचून इतर दैत्य योध्यांचे रथांवर अनेक आकृतींच्या चिन्हांचे ध्वज होते; तसेच सुवर्णाच्या माळानीं युक्त असून शीघ्र वेगानें चालणारे अशा शंभर व्याघ्रानीं युक्त असा ग्रसन नामक सेनापतीचा रथ आहे; व लहान घंटांच्या घोंसाच्या माळा गळ्यांत घातलेले शंभर सिंहानीं युक्त असा दुःखानें ही जिंकण्यास अशक्य असा जंभासुराचा रथ असे.

कुंजभस्यरथोयुक्तःपिशाचवदनैःखरैः॥ रथस्तुमहिषस्योष्ट्रैर्गजस्यतुतुरंगमैः॥ ५१॥

अर्थ- कुजंभ दैत्याचे रथास पिशाचाचे मुखा समान मुखानीं युक्त असे- गर्दभ असत; आणि महिषासुराच्या रथास उंट होते; व कुंजर नामक दैत्याच्या रथास घोडे लावले होते.

मेघस्यद्वीपिभिर्भीमैः कुंजरैःकालनेमिनः॥ पर्वताभैःसमारूढोनिमिर्मत्तैर्महागजैः॥ ५२॥

अर्थ- मेघनामक दैत्याच्या रथास भयंकर व्याघ्र होते; कालनेमीचे रथास उग्र हत्ती लावले होते व पर्वता सारख्या मदोन्मत्त महागजानीं युक्त अशा रथांत निमि नामा दैत्य बसला असे.

चतुर्दंतैर्गंधवद्भिः शिक्षितैर्मेघभैरवैः॥ शतहस्तायतैःकृष्णोतुरंगेहेमभूषणैः॥ ५३॥ सितचामरजालेनशोभितेदक्षिणांदिशं॥ सितचंदनचार्वंगोनानापुष्पस्रजोज्वलः॥ ५४॥ मथनोनामदैत्येंद्रः-

पाशहस्तोव्यराज्यत॥

अर्थ— आणि सुगंध युक्त असून मेघां सारिखे भयंकर, सुवर्णाच्या अलंकारानीं भूषित, त्वरित गतीनें चालणारे असून सुशिक्षित, अशा चतुर्दंत (चार दांतांचे) हत्तीनीं युक्त शंभर हात लांब कृष्णवर्ण, व शुभ्र चवऱ्यांचे समुदायानीं सुशोभित अशा रथांत बसलेला, शुभ्र चंदन युक्त सुंदर अंगानें शोभायमान, अनेक प्रकारच्या पुष्पमालानीं देदीप्यमान असा मथन नामक श्रेष्ठ दैत्य हातांत पाश घेऊन सैन्याचे दक्षिण दिशेच्या बाजूस शोभत होता.

जंभकः किंकिणीजालमालमुष्ट्रंसमास्थितः॥५५॥
कालशुक्लमहामेषमारूढः शुंभदानवः॥

अर्थ— तसाच लहान घांटांचे घोसाच्या माळानीं युक्त अशा उंटावर जंभकासुर बसला होता; आणि कृष्ण वर्ण शुंभ नामा दानव शुभ्र वर्ण मोठ्या मेंढ्यावर बसला होता.

अन्येपिदानवावीरानानावाहनगामिनः॥५६॥ प्रचंडचित्रकर्माणः कुंडलोष्णीषभूषणाः॥ नानाविधोत्तरासंगा नानामाल्यविभूषणाः॥५७॥ नानासुगंधिगंधाढ्यानानाबंदिजनस्तुताः॥ नानावाद्यपरिष्पंदाश्चाग्रेसरमहारथाः॥५८॥ नानाशौर्यकथासक्तास्तस्मिन्सैन्येमहासुराः॥

अर्थ— तसेच इतर ही दानव वीर त्या सैन्यांत बहुत होते; ते असे कीं, अनेक वाहनानीं गमन करणारे चित्र विचित्र प्रचंड पराक्रमादिक कर्मे करणारे, कर्ण कुंडलें व पागोटीं यानीं भूषित, नाना प्रकारचीं अंगवस्त्रें धारण केलेले, अनेक प्रकारचीं पुष्पें व भूषणें यानीं शोभायमान, अनेक सुगंधि पदार्थांच्या सुवासानें युक्त, बहुत स्तुति करणारे लोकांनीं स्तुति केलेले अनेक वाद्यांचे वाजण्यानें चालणारे, नानाप्रकारच्या शूरत्वाच्या कथां विषयीं तत्पर, असे त्या सैन्यांत अग्रेसर, महारथी, मोठे असुर बहुत होते.

तद्बलंदैत्यसिंहस्यभीमरूपंव्यजायत॥५९॥ प्रमत्तचंडमातंगतुरगंरथसंकुलं॥ प्रतस्थेमरयुद्धाय बहुपत्तिपताकिनं॥६०॥

अर्थ- आणि अतिशयें मदोन्मत्त, महा कोपिष्ठ हत्ती व घोडे यानीं युक्त असून बहुत पायदळ व मोठमोठ्या ध्वजांचे रथ यानीं व्याप्त असें तें दैत्य श्रेष्ठ तारकासुराचें सैन्य देवांशीं युद्धार्थ निघालें. तें अत्यंत भयंकर दिसत होतें.

एतस्मिन्नंतरेवायुर्देवदूतोंबरालये ॥ दृष्ट्वासदानवबलंजगामेंद्रस्यशासितुं ॥ ६१॥

अर्थ- तों इतक्यांत त्याकालीं आकाशांत देवांचा दूत वायु नें दानवाचें सैन्य पाहून तें वर्तमान इंद्रास सांगण्यासाठीं गेला.

सगत्वातुसभांदिव्यांमहेंद्रस्यमहात्मनः॥शशंसमध्येदेवानांतत्कार्यसमुपस्थितं॥ ६२॥

अर्थ- तो महा धैर्यवंत इंद्राचे उत्तम सभेस जाऊन तो उपस्थित झालेला दैत्यांचाउद्योग सर्व देवां मध्यें सांगता झाला.

तच्छ्रुत्वादेवराजस्तु निमीलितविलोचनः॥बृहस्पतिमुवाचेदं वाक्यंकालेमहाभुजः॥ ६३॥

अर्थ- ते समयीं तें वर्तमान ऐकून महाबाहु देवराज इंद्र डोळे झांकून बृहस्पतीस हें पुढील वाक्य बोलतो.

इंद्रउवाच ॥ संप्राप्नोतिविमर्दोयंदेवानांदानवैःसह ॥कार्यंकिमत्रतद्ब्रूहिनीत्युपायसमन्वितं॥ ६४॥

अर्थ- इंद्र बोलला कीं, हे गुरो देवांचा दानवां सहवर्तमान हा संग्राम प्राप्त झाला आहे, तेव्हां या कालीं याविषयीं काय करावें हें नीतीचे उपायां सहित मला सांगावें.

एतच्छ्रुत्वातुवचनंमहेंद्रस्यगिरांपतिः॥इत्युवाचमहाभागोबृहस्पतिरुदारधीः॥ ६५॥

अर्थ- हें इंद्राचें भाषण श्रवण करून महा भाग्यशाली, उदार बुद्धिमान् बृहस्पति बोलतो.

सामपूर्वास्मृतानीतिश्चतुरंगांपताकिनीं॥ जिगीषतांसुरश्रेष्ठस्थितिरेषासनातनी ॥ ६६॥

अर्थ- हे देव श्रेष्ठ इंद्रा नीति, साम पूर्वक आहे आणि शत्रूस जिंकणारानीं चतुरंग सेना सिद्ध करावी ही नीतीची अनादि स्थिति उत्तम आहे.

सामभेदस्तथादानं दंडश्चांगचतुष्टयं ॥ नीतौक्रमाद्देश
कालरिपुयोग्यक्रमादिदं ॥ ६७ ॥

अर्थ— त्या नीतीचा प्रकार असा आहे कीं, साम, भेद, दान व दंड हे चार भेद नीतींत क्रमानें आहेत. आणि देश व काळ हे शत्रूची योग्यता जाणून योजावे.

सामदैत्येषुनैवास्तियतस्तेलब्धसंश्रयाः ॥ जातिध
र्मेणवाभेद्यादानंप्राप्तश्रियेचकिं ॥ ६८ ॥

अर्थ— आतां हे सामादिक उपाय दैत्यांत ही असतील, तेव्हां तेथें, आपल्याच सामानें काय उपयोग होईल. अशी आपणच इंद्राचे मनांतील शंका घेऊन बृहस्पति म्हणतो कीं, दैत्यांत सामतर मुळींच नाहीं कारण भरूतन त्यांस ब्रम्हदेवांचा वर मिळालेल्या तारकासुराचा आश्रय मिळाला आहे; आणि स्वभावसिद्ध त्यांच्या ऐकमत्यामुळें त्यांजवर फितुरीचा उपाय चालू शकणार नाहीं. व भरूतन त्यांस संपत्ति प्राप्त झाली आहे; तेव्हां त्यांस दान करून तरी उपयोग काय होणार.

एकोभ्युपायोदंडोत्र भवतांयदिरोचते ॥ दुर्जनेषुकृतं
साममहद्यातिच वंध्यतां ॥ ६९ ॥

अर्थ— तस्मात् दैत्यांस जिंकण्याविषयीं तुम्हास रुचेल तर दंडावांचून दुसरा उपाय नाहीं कारण दुर्जनाशीं सामाचा उपाय योजला तरी तो सर्वथा व्यर्थच होतो.

भयादितिव्यवस्यंतिक्रूराः साम महात्मनां ॥ ऋजु
तामार्यबुद्धित्वंदयानीतिव्यतिक्रमं ॥ ७० ॥ मन्यंतेदु
र्जनानित्यंसामचापिभयोदयात् ॥

अर्थ— आणि महात्मे पुरुषानीं क्रूराशीं साम केलें असतां, ते क्रूर लोक हें साम यानीं भयामुळें केलें असें मानितात. तसेंच सरळपणा, संभावित बुद्धि, दया व नीति यांचें उल्लंघन न करणें हें सर्वही या साधुलोकांनीं भयप्राप्त झाल्या मुळें आरंभिलें आहे असें मानितात.

तस्माद्दुर्जनमाक्रांतुंश्रेयान्पौरुषसंश्रयः ॥ ७१ ॥ आ
क्रांतेतुक्रियायुक्तासतामेतन्महाव्रतं ॥

अर्थ- तस्मात् दुर्जनास जिंकण्या विषयीं पराक्रमाचा आश्रय करणें हेंच क-ल्याण कारक आहे; आणि तो दुर्जन आपलेस्वाधीन झाल्यावर मग त्याशीं सा-मादिक करणें युक्त आहे हेंच साधूंचें मुख्य व्रत आहे.

दुर्जनः सज्जनत्वाय कल्पते न कदाचन ॥ ७२ ॥ सज्ज-नोपि स्वभावस्य त्यागं वांच्छेत्कदाचन ॥

अर्थ- आणि दुसरें असें आहे कीं, जो दुर्जन आहे तो कधींही सज्जनाचे स्व भावांत येत नाहीं, तसाच सज्जन ही आपले उत्तम स्वभावाचा त्याग कदापि-इच्छित नाहीं.

एवंमेबुद्ध्यते बुद्धि र्भवंतोत्रव्यवस्यतां ॥ ७३ ॥ एव मुक्तः सहस्त्राक्ष एवमेवेत्युवाचतं ॥ कर्तव्यतां समं वि-त्य प्रोवाचामरसंसदि ॥ ७४ ॥

अर्थ- बृहस्पति म्हणतो कीं माझ्या बुद्धीस असें भासत आहे; व देव हो तु म्ही ही या विषयीं विचारानें निश्चय करावा असें बृहस्पतीचें भाषण ऐकून इंद्र त्याकाळीं हेंच तुमचें मत युक्त आहे असें बृहस्पतीस बोलला आणि त्या प्रमा णें कर्तव्य कार्याचा विचार करून तो इंद्र त्या देव सभेंत बोलतो.

इंद्र उवाच ॥ सावधानेन मे वाचं शृणुध्वं नाकवासिनः ॥ भवंतो यज्ञभोक्तारस्तुष्टात्मानोतिसात्विकाः ॥ ७५

अर्थ- इंद्र बोलला कीं, स्वर्गवासी देव हो सावधान चित्तानें माझें वचन श्रवण करा; तें असें कीं, तुह्मी देव यज्ञभोक्ते असून अति सात्विक ह्मणूनच संतुष्ट-अंतः करणाचे आहांत.

स्वेमहिम्नि स्थिता नित्यं जगतः परिपालकाः ॥ भवत श्चानिमित्तेन बाधंते दानवेश्वराः ॥ ७६ ॥

अर्थ- आणि तुम्हीं स्वयं प्रकाश महिम्याचे ठिकाणीं राहिला आहांत तेणें क रून सर्व चराचर विश्वाचें पालन करणारे आहांत; असें असून हे दानवांचे रा जे निष्कारण तुम्हांस पीडा करितात.

तेषां सामादिनैवास्ति दंड एव विधीयतां ॥ क्रियतां स मरोद्योगः सैन्यं संयुज्यतां मम ॥ ७७ ॥

अर्थ- देव हो तस्मात् अशा दुष्टांशीं सामादिक सौम्य उपाय उपयोगीच ना

होंन; तर त्यास दंडच करावा; या साठीं आतां युद्धाचे उद्योगार्थ माझें सैन्य-सिद्ध करावें

आद्रियंतांचशस्त्राणि पूज्यंतामस्त्रदेवताः॥ वाहनानिचयानानिचयोजयंतुसहामराः॥७८॥

अर्थ- देव हो आदरानें शस्त्रें घ्या! अस्त्रांच्या देवतांचे पूजन करा! नंतर अश्वादिक वाहनें व रथादिक यानें हीं बरोबर सिद्ध करा.

यमंसेनापतिंकृत्वा शीघ्रमेवं दिवौकसः॥ इत्युक्ताः समनह्यंत देवानां येप्रधानतः॥७९॥

अर्थ- स्वर्गवासी देवहो यम धर्मास मोठ्या त्वरेनें आपला सेनापति करून युद्धास सिद्ध व्हा असें इंद्रानें सांगतांच देवांतील मुख्य वीर युद्धा विषयीं सिद्ध जाहले

वाजिनामयुतेनाजौ हेम घंटा परिष्कृतं॥ नानाश्चर्यगुणोपेतं संप्राप्तं सर्वदैवतैः॥८०॥ रथंमातलिनाकृष्टंदेवराजस्यदुर्जयं॥

अर्थ- नंतर त्या संग्रामा विषयीं दहा हजार घोड्यानीं युक्त असून सुवर्णाच्या घंटानीं भूषित, अनेक आश्चर्य कारक गुणानीं युक्त व दुःखानें ही पराजय करण्या विषयीं अशक्य असा मातलि नामक सारथीनें सिद्ध केलेला इंद्राचा रथ आलेला सर्व देवतानीं पाहिला.

यमोमहिषमास्थाय सेनाग्रेसमवर्त्तत॥ ८१॥ चंडकिंकर वृंदेन सर्वतः परिवारितः॥

अर्थ- तसाच अत्यंत क्रोधयुक्त दूतांचे समुदायानें आसमंतात् सर्वत्र वेष्टित यम धर्म महिषावर बसून त्या सेनेच्या अग्र भागीं उभा राहिला.

कल्पकालोद्भूतज्वालापूरितांबरलोचनः॥ ८२॥ हुताशनः छागरूढः शक्तिहस्तोव्यवस्थितः॥

अर्थ- कल्पांत समयांतील वृद्धिंगत ज्वाला पूर्ण नेत्रानीं युक्त अग्नि हातांत शक्ति नामक आयुध घेऊन बोकडावर बसून सैन्यांत उभा राहिला.

पवनोंकुशपाणिस्तु विस्तारितमहाजवः॥ ८३॥ भुजगेंद्रसमारूढोजलेशोभगवान्स्वयं॥

अर्थ— आणि लोकपाल वायु हातांत अंकुश घेऊन आपला मोठा वेग प्रगट करून उभा राहिला; व भगवान् वरुण महासर्पावर बसून स्वतः आला.

नरयुक्तरथे देवो राक्षसेशो वियच्चरः ॥ ८४ ॥ तीक्ष्णखड्गयुतो भीमः समरे समवस्थितः ॥

अर्थ— तसाच राक्षसांचा राजा लोकपाल भयंकर निर्ऋति देव हस्तांत तीक्ष्ण खड्ग धारण करून त्या रणांगणीं नरयुक्त रथांत बसून आकाशांत संचार करीत राहिला.

महासिंहरवो देवो धनाध्यक्षो गदायुधः ॥ ८५ ॥ चंद्रादित्यावश्विनौ च चतुरंगबलान्वितौ ॥

अर्थ— त्याच प्रमाणें महा सिंहासमान शब्द करणारा, सर्व धनांचा अध्यक्ष कुबेर हस्तांत गदा धारण करून युद्धाविषयीं सिद्ध झाला, आणि चंद्र, सूर्य व अश्विनी कुमार हे चतुरंग सैन्या सहित तेथें युद्धार्थ आले.

राजभिः सहितास्तस्थुर्गंधर्वा हेमभूषणाः ॥ ८६ ॥ हेमपीठोत्तरासंगाश्चित्रवर्मरथायुधाः ॥

अर्थ— तसेच गंधर्वही सुवर्णाचीं भूषणें सोनेरी अंगवस्त्रें, चित्र विचित्र कवचें व आयुधें धारण करून आपले नायकां सहवर्तमान रथांत सुवर्णाचे आसनांवर बसले होते.

नाकपृष्ठशिखंडास्तु वैडूर्यमकरध्वजाः ॥ जपारक्तोत्तरासंगा राक्षसा रक्तमूर्धजाः ॥ गृध्रध्वजा महावीर्या निर्मलायोविभूषणाः ॥ ८८ ॥ मुसलासिगदाहस्ता रथे चोष्णीषदंशिताः ॥ महामेघरवा नागा भीमोल्काशनिहेतयः ॥ ८९ ॥

अर्थ— आतां दैत्य सैन्याचें वर्णन करितात; तें असें कीं, त्या असुरांचे रथांस पाचेचे मकराकार ध्वज असून त्यांचीं अग्रें स्वर्गलोकास लागलेलीं होतीं त्याचीं अंगवस्त्रें जास्वंदीचे फुलां सारिखीं आरक्त वर्ण असून त्यांच्या मस्तकाचे केश ही तांबडे होते कितीएक रथांवर गीध पक्ष्यांच्या चिन्हाचे ध्वज होते त्यानीं स्वच्छ लोखंडाचीं भूषणें घातलीं होतीं; तशींच त्यानीं हातांत मुसळें तरवारा, गदा व भयंकर अग्नीच्या ज्वाळे समान तीक्ष्ण व वज्रा सारिखीं

कठिण अशीं शस्त्रें धारण केलेले असे ते महा पराक्रमी राक्षस आपाप ले रथांत बसले होते आणि त्या सैन्यांत मोठ्या मेघा समान शब्द करणारे हत्ती होते.

यस्याः कृष्णांबरभृतो भीमबाणधनुर्धराः ॥ ताम्रोलूक ध्वजारौद्राहेमरत्नविभूषणाः ९०॥

अर्थ— तसेच त्या दैत्य सैन्यांत कृष्णवर्ण वस्त्रें धारण केलेले, सुवर्ण व रत्नें यांचे भूषणानीं सुशोभित असे ते भयंकर यक्ष भयानक धनुष्यें व बाण हातांत घेऊन तांब्याचे दिवाभीत पक्ष्यांचे चिन्हांच्या ध्वजानीं युक्त अशा रथांत बसले होते.

द्वीपिचर्मोत्तरासंगं निशाचरबलंबभौ ॥ गार्धपत्रध्वजप्रायमस्थिभूषणभूषितं ॥ ९१॥ मुसलायुधदुष्प्रेक्ष्यंनाना प्राणिमहारवं ॥

अर्थ— आणि त्या सैन्यांतील वीर व्याघ्रांचीं चर्में पांघरले असून गीध पक्ष्यांचे पंख युक्त ध्वज त्यांचे रथास होते तशीच त्या योद्ध्यांनीं मणि किंवा हाडें यांचीं भूषणें अंगावर धारण केलीं होतीं तसेंच मुसळ आदिकरून आयुधानीं इतरांस पाहण्या विषयीं अशक्य व अनेक जातींच्या क्रूर प्राण्यांचे शब्दानीं युक्त असें तें असुरांचें सैन्य शोभत होतें.

किन्नराः श्वेतवसनाः सितपत्रिपताकिनः ॥ ९२॥ मत्तेभवाहन प्रायास्तीक्ष्णतोमरहेतयः॥

अर्थ— तसेच देवसैन्यांत शुभ्र वस्त्रें धारण केलेले, व शुभ्रवर्ण ध्वजयुक्त रथांत बसलेले आणि बहुत करून मदोन्मत्त हत्तींवर किती एक बसलेले, व तीक्ष्ण तोमरादिक आयुधें धारण केलेले असे बहुत किन्नर गण होते.

मुक्ताजालपरिष्कारो हंसोरजतनिर्मितः॥ ९३॥ केतुर्जलाधिनाथस्य भीमधूमध्वजानलः॥

अर्थ— आणि मोत्यांचे जाळीनें अलंकृत असून रुप्याचे हंसानें युक्त असा धुराचे ध्वजानें प्रज्वलित भयंकर अग्नी सारखा ध्वज जल स्वामी वरुणाचा होता.

पद्मरागमहारत्नविटपंधनदस्यतु॥ ९४॥ ध्वजंस

मुच्छ्रितंभातिगंतुकाममिवांबरं॥

अर्थ:- पद्मराग नामक महारत्नाचे घोंसानीं युक्त ध्वज कुबेराचे रथास होता; तो आकाशांत जाण्याचीच इच्छा करीत आहे; कीं काय असा उंच शोभत होता.

वृकेणकाष्ठलोहेनयमस्यासीन्महाध्वजः॥९५॥ राक्षसेशस्यकेतोर्वैप्रेतस्यमुखमाबभौ॥

अर्थ:- तसाच काष्ठ व लोखंड यांनीं निर्माण केलेला मोठा ध्वज यम धर्माचा होता; व राक्षसांचे राजाचा निर्ऋतीचा ध्वज पिशाचमुखाच्या चिन्हानें युक्त असा शोभत होता.

हेमसिंहध्वजौदेवौ चंद्रार्कावमितद्युती॥९६॥कुंभेनरत्नचित्रेणकेतुरश्विनयोरभूत्॥

अर्थ:- आणि अपरिमित तेजोमय चंद्र व सूर्य याचे रथांस सोन्याच्या सिंहाचीं चिन्हें होतीं; व अश्विनी कुमारांचे रथांस रत्नखचित चिन्हानें चमत्कारिक सुंदर शोभा दिसत होती.

हेममातंगरचितं चित्ररत्नपरिष्कृतं॥९७॥ध्वजं शतक्रतोरासीत्सितचामरमंडितं॥

अर्थ:- तसाच विचित्र रत्नखचित सुवर्णाचे मातंगा (हत्ती) च्या चिन्हानें सुशोभित असून शुभ्र वर्ण चवऱ्यानीं शोभायमान असा ध्वज इंद्राचे रथावर होता.

सनागयक्षगंधर्वमहोरगनिशाचरा॥९८॥सेनासा देवराजस्यदुर्जयाभुवनत्रये॥कोटयस्तास्त्रयस्त्रिंशद्देवदेवनिकायिनां॥९९॥

अर्थ:- हत्ती, यक्ष, गंधर्व, महासर्प व राक्षस यांनीं युक्त ती देवराज इंद्राची सेना त्रिभुवनांत दुःखानेंही जिंकण्यास अशक्य असून त्या देव समुदायांची सेना देवांकडे तेहेतीस कोटी होती.

हिमाचलाभेसितकर्णचामरे सुवर्णपद्मामलसुंदरस्रजि॥ कृताभिरागोज्वलकुंकुमांकुरे कपोललीलालिकदंबसंकुले॥१००॥स्थितस्तदैरावतना

मकुंजरेमहाबलश्चित्रविभूषणांबरः॥ विशालव स्त्रांशुवितानभूषितःप्रकीर्णकेयुरभुजाग्रमंडलः॥ सहस्रदृक्बंदिसहस्रसंस्तुतः स्त्रिविष्टपेशोभतपा कशासनः॥१०१॥

अर्थ- त्या देवांच्या सेनेंत हिमालय पर्वतासमान शुभ्र कांतियुक्त, तसेच शुभ्र चवऱ्या सारख्या कानानीं सुशोभित शुद्ध सुवर्ण कमलांच्या सुंदर मालेनें भूषित जो दिव्य केंशर लाविल्या मुळें त्या रंगानें अतिशयें शोभत आहे; ज्याचे गालांवर गंडस्थला पासून स्त्रवणाऱ्या मदाचे सुगंधाच्या लोभास्तव लीलेनें भ्रमरांचे समुदाय बसल्यानें चमत्कारिक शोभा दिसत आहे; अशाल्या ऐरावत नामक हत्तीवर महाबलिष्ठ इंद्र त्या संग्राम कालीं बसला होता; तो असा कीं, ज्यानें चित्र विचित्र वस्त्रें व भूषणें धारण केलीं होतीं त्या वस्त्रांच्या किरणांचे मंडलानें भूषित, कडिं, तोडे इत्यादिक अनेक बाहुभूषणानीं ज्याचे भुजांचीं मंडलाकार गोंडस अग्रें सुशोभित दिसत आहेत व हज़ारों बंदिजन (स्तुतिपाठक) ज्याची स्तुति करीत आहेत असा तो पाक दैत्यास मारणारा सहस्र नयन इंद्र युद्धार्थ निघते समयीं त्या स्वर्ग लोकांत अतिशयें शोभला.

तुरंगमातंगबलौघसंकुला सितातपत्रध्वजराजिशालिनी॥ चमूस्त्वसादुर्जयपत्रिसंतता विभातिनानायुधयोधदुस्तरा॥१०२॥ इतिश्रीमत्स्यपुराणेतारकोपाख्यानेंसप्तचत्वारिंशदुत्तरशततमोध्यायः॥१४७॥

अर्थ- आणि घोडे, हत्ती, यांचे सैन्याच्या समूहानें व्याप्त तशी श्वेत-छत्र व शुभ्रवर्ण ध्वज यांचे पंक्तीनीं शोभायुक्त असून कष्टानें ही जिंकण्यास अशक्य अशा तीक्ष्ण बाणानीं पूर्ण व अनेक आयुधानीं युद्ध करणाऱ्या वीरानीं अतिदुस्तर अशी ती देवसेना त्या कालीं शोभत होती. इतिश्री मत्स्यपुराणे देवासुर संग्रामे बलयोजनो नाम सप्तचत्वारिंशदुत्तर शततमोऽध्यायः १४७

अध्याय १४८ वा.

सूतउवाच॥ सुरासुराणांसम्मर्दस्तस्मिन्नत्यंतदारुणे॥ तुमुलोतिमहानासीत्सेनयोरुभयोरपि॥१॥

अर्थ— सूतबोलला ऋषीहो नंतर ते इंद्रादिदेव व तारकासुर प्रभृति अ सुर यांचे दोन्ही सैन्यांचें त्या अतिभयंकर रणांगणीं मोठ्या गर्दीनें युद्ध- चाललें.

गर्जतांदेवदैत्यानांशंखभेरीरवेणच ॥ तुर्याणांचे
वनिर्घोषैर्मातंगानांचबृंहितैः ॥ २ ॥ ह्रेषतांहयवृं
दानांरथनेमिस्वनेनच ॥ ज्याघोषेणचशूराणां तु
मुलोतिमहानभूत् ॥ ३ ॥

अर्थ— तें असें कीं, शंख, नौबदी यांचे शब्द, तसेच अनेक रणवाद्यांचे घोष हत्तींच्या गर्जना, आणि अश्व समुदायाचें हिंसणें, रथचक्रांचे शब्द व- धनुष्यांच्या दोरीचे टणत्कार यांसहवर्तमान गर्जना करणाऱ्या त्या देवदैत्यां चा गर्दीनें महान् युद्ध प्रसंग चालला.

समासाद्योभयेसेनेपरस्परजयैषिणां ॥ रोषेणाति
परीतानांत्यक्तजीवितचेतसां ॥ ४ ॥ समासाद्यतु
तेन्योन्यंप्रक्रमेणविलोमतः ॥

अर्थ— तो असा कीं, रोषानें अत्यंत व्याप्त होऊन मनःपूर्वक प्राण त्यागावि षयीं उद्युक्त झालेले असून परस्परांचा पराजय करण्याची इच्छा करणा- रे अशा देव दैत्यांचीं दोन्ही सैन्यें आरंभीं समोरा समोर येऊन परस्परें यु द्ध करूं लागलीं.

रथेनासक्तपादातोरथेनचतुरंगमः ॥ ५ ॥ हस्तीप
दातिसंयुक्तोरथिनानक्वचिद्रथी ॥ मातंगेनापरोह
स्तीतुरगैर्बहुभिर्गजः ॥ ६ ॥ पदातिरेकोबहुभिर्ग
जैर्मत्तैश्चयुज्यते ॥

अर्थ— तें असें कीं, पायदळांतील योद्धे रथांत बसून युद्धकरणारांशीं यु- द्ध करूं लागले; तसेच रथांतील वीरांशीं घोडे स्वार युद्ध करीत होते; हत्ती वरचे स्वार पायदळांशीं लढूं लागले; कोठें कोठें रथ्यांशीं रथी युद्ध करीत होते; हत्तीवरचे स्वार हत्तीवरचे स्वारांशीं युद्ध करूं लागले एकेक हत्तीव रचे स्वार बहुत घोडे स्वारांशीं लढत होते; तसाच क्वचित् क्वचित् पायद ळांतील एकेकटे शूर बहुत मदोन्मत्त हत्तीवरचे स्वारांशीं युद्ध करीत होते.

ततः प्रासाशनिगदाभिंदिपालपरश्वधैः ॥७॥ श
क्तिभिः पट्टिशैः शूलैर्मुद्गरैः कडपैर्गडैः ॥ चक्रैश्चशं
कुभिश्चैवतोमरैरंकुशैः शितैः ॥८॥ कर्णिकालीकना
राचवत्सदंतार्धचंद्रकैः ॥ भल्लैश्चशतपत्रैश्चशुकतुं
डैश्चनिर्मलैः ॥ ९ ॥ वृष्टिरत्यद्भुताकारागगनेसमदृ
श्यत ॥

अर्थ:- नंतर प्रास नामक आयुधें, वज्रें, गदा, गोफणगुंडे, कुऱ्हाडी, बर्च्या, प
ट्टिश नामक आयुधें, शूल, मुद्गल, कडाबिणी, गड नामक आयुधें, चक्रें, शंकुनां
वाचीं आयुधें, गुरगूज नावाचें शस्त्र, तीक्ष्ण अंकुश हीं शस्त्रें आणि कर्णि
का, कठोर नाराच नामक बाण, वत्सदंत, अर्धचंद्रक, भल्ल, शतपत्र धारे-
चे राघूच्या तोंडाचे बाण, या बाणानीं वृष्टी आकाशांत अद्भुत दिसती झाली.

संप्रच्छाद्यदिशः सर्वास्तमोमयमिवाकरोत् ॥१०॥
नप्राज्ञायततेन्योन्यं तस्मिंस्तमसिसंकुले ॥

अर्थ:- तेव्हां त्या बाणशस्त्रादिकांच्या वृष्टीनें सर्व दिशा आच्छादित झा
ल्या असतां सर्वत्र अंधकारमय झाल्यामुळें त्या दाट अंधकारांत ते देव, दै
त्य परस्परांस जाणीना तसे झाले.

अलक्ष्यंविसृजंतस्ते हेतिसंघातमुद्धतं ॥११॥ प
तितंसेनयोर्मध्येनिरीक्षंतेपरस्परं ॥

अर्थ:- त्या काळीं ते देव, दैत्य एकमेकांस पाहिल्यावांचून मोठमोठ्या शस्त्रां
चा समुदाय परस्परांवर टाकूं लागले असतां ते उभय सेनेंतील वीर दोनी
सैन्यांचे मध्यभागीं तीं पडलेलीं शस्त्रें मात्र पाहते झाले.

ततोध्वजैर्भुजैश्छत्रैः शिरोभिश्चसकुंडलैः ॥१२॥
गजैस्तुरंगैःपादातैःपतद्भिःपतितैरपि ॥ आकाश
सरसोभ्रष्टैःपंकजैरिवभूस्तृता ॥१३॥

अर्थ:- नंतर रथांचे ध्वज, शूरांचे भुज महावीरांचे मस्तकावरील छत्रें,
वीरांचींच कर्णकुंडलांसहित तुटलेलीं मस्तकें, मरण पावलेले हत्ती, घोडे,
नसेंच पडलेले व पडणारे पायदळांतील वीर यानीं (आकाश हेंच कोणी
एक सरोवर त्या पासून पडलेल्या कमळानीं जशी पृथ्वी शोभते) तशी

ती रणभूमी शोभली.

भग्नदंताभिन्नकुंभाश्छिन्नदीर्घमहाकराः ॥ गजाः शै
लनिभाः पेतुर्धरण्यां रुधिरस्रवाः ॥ १४ ॥

अर्थ- तसेच देवासुरांच्या त्या संग्रामांत पर्वतप्राय शरीरी मोठ मोठे हत्ती; धरणीवर (पृथ्वीवर) पडले; ते असे कीं, कोणत्या हत्तीचे दांत पडून गंडस्थळें फुटलीं आहेत, व कित्येक हत्तींच्या मोठ्या जाड असून लांब अशा सोंडा तुटल्या असून त्यांचे अंगांतून रक्त वहात होतें.

भग्नेषादंडचक्राक्षारथाश्चशकलीकृताः ॥ पेतुश्चाक
लतांयातास्तुरंगाश्चसहस्रशः ॥ १५ ॥

अर्थ- आणि त्या रण भूमींतील त्या योध्यांचे रथ मोडून पडले. ते असे कीं, त्या रथांचे दांडे चाकें व कणे यांचे फुटून तुकडे झाले आणि सहस्रावधी घोडेही मरून पडले.

ततोसृक्कर्दमदुस्तारापृथिवीसमजायत ॥ नद्यश्चरु
धिरावर्ताहर्षदाः पिशिताशिनां ॥ ॥ वेतालक्री-
डमभवत्तत्संकुलरणाजिरं ॥ १६ ॥ इतिश्रीमत्स्य
पुराणेतारकासुरोपाख्यानेदेवासुरयुद्धे अष्टचत्वा
रिंशदुत्तरशततमोऽध्यायः ॥ १४८ ॥

अर्थ- नंतर त्या युद्ध भूमींत रक्ताचा डोह झाल्यामुळें ती भूमी योध्यांसहीं चालण्या विषयीं अशक्य झाली; आणि तेथें रक्ताच्या भोंवऱ्यानीं युक्त मांस भक्षण करणाऱ्या राक्षस पिशाच्या दिकांस हर्ष देणाऱ्या अश्या मोठ्या नद्या वाहूं लागल्या; तेणे करून तें युद्ध भूमीचें स्थान वेताळा दिक गणांस क्रीडायोग्य स्थान झाल्यामुळें तें रणभूमीचें स्थळ वेताला दिक सर्व भूत गणांनीं व्याप्त झालें. इतिश्री मत्स्य पुराणे तारको पाख्यानें देवासुर संग्रामे अष्टचत्वारिश दुत्तर शत तमोऽध्यायः ॥ १४८ ॥

अध्याय १४९ वा.

सूतउवाच ॥ अथग्रसनमालोक्य यमः क्रोधविमू
र्छितः ॥ ववर्षशरवर्षेण विशेषेणाग्निवर्चसा ॥ १ ॥

अर्थ- सूत बोलला ऋषी हो नंतर तारकासुराचा सेनापति ग्रसन नामक-

दानव यास पाहून यम क्रोधायमान होत्साता अग्नी सारख्या तेजस्वी ती क्ष्ण बाणांच्या मोठ्या वृष्टीनें आच्छादन करिता झाला.

सविद्धोबहुभिर्बाणैर्ग्रसनोतिपराक्रमः॥ कृतप्र तिकृताकांक्षीधनुरानम्यभैरवं॥२॥शतैःपंचभिर त्युग्रैःशराणांयममर्दयन्॥

अर्थ- तेव्हां अत्यंत पराक्रमी दैत्य सेनापति ग्रसन. त्या बहुत बाणा नीं ताडिला जाहला असतां, शत्रूनें केलेल्या अपकाराचा प्रतीकार कर ण्याचे इच्छेनें तो आपलें भयंकर धनुष्य वांकवून अति उग्र पांचशें बा णानीं देवांचे सेनापतीस(यमास) प्रहार करिता जाहला.

सविचिंत्ययमो बाणान् ग्रसनस्यातिपौरुषम्॥३ बाणवृष्टिभिरुग्राभिर्यमोग्रसनमर्दयन्॥

अर्थ- त्या काळीं त्या ग्रसन दैत्याचे बाण व महा पराक्रम यांचें मनन क रून यम तीक्ष्ण बाणांच्या बहुत वृष्टीनीं ग्रसन दानवास पीडा करिता जाहला.

कृतांतशरवृष्टिंतांवियतिप्रतिसर्पिणीं॥४॥चि च्छेदशरवर्षेणग्रसनोदानवेश्वरः॥

अर्थ- तेसमयीं यमानें केलेली बाणवृष्टि आकाशांतून येत असतां तो दानवांचा सेनापति ग्रसनासुर आपल्या बाण वृष्टीनें त्या बाणवृष्टी नें छेदन करिता जाहला.

विफलांतांसमालोक्ययमस्तांशरसंततिं॥५॥ सविचिंत्यशरव्रातंग्रसनस्यरथंप्रति॥ चिक्षेप- मुद्गरंघोरंतरसातस्यचांतकः॥६॥

अर्थ- ती आपली बाणवृष्टी व्यर्थझाली असें पाहून यमानें मनांत विचार करून त्या ग्रसन सेनापतीचे रथावर बहुत बाणांची वृष्टि करू न त्यास जोरानें भयंकर एक मुद्गर मारिला..

सतंमुद्गरमायांतमुत्प्लुत्यगगनस्थितं॥ जग्राह- वामहस्तेनयाम्यंदानवनंदनः॥ ७॥

अर्थ- तेव्हां तो मुद्गर येत असतां दानव पुत्र ग्रसनानें उड्डाण करून

तो यमाचा मुद्गर वरचे वरच आकाशांत डाव्या हातानें धरिला.

तमेवमुद्गरंगृह्ययमस्यमहिषंरुषा॥पातयामासवेगेनसपपातमहीतले॥८॥

अर्थ- आणि तोच मुद्गर घेऊन त्या ग्रसनानें मोठ्या क्रोधें करून वेगानें यमाचे महिष वाहनास मारिला त्या प्रहारानें तत्क्षणीं तो महिष (रेडा) पृथ्वीतलावर पडला.

उत्प्लुत्याथयमस्तस्मान्महिषान्निष्पतिष्यतः॥प्रासेन ताडयामासग्रसनंवदनेदृढं॥९॥

अर्थ- नंतर यमानें तें महिष वाहन पडत असतां, त्यावरून आकाश मार्गांत उड्डाण करून प्रास नामक आयुधानें ग्रसनास तोंडावर बळकट प्रहार केला.

सतुप्रासप्रहारेणमूर्च्छितोन्यपतद्भुवि॥ग्रसनंपतितंदृष्ट्वाजंभोभीमपराक्रमः॥१०॥यमस्यभिंडिपालेनप्रहारमकरोद्धृदि॥

अर्थ- त्या प्रासाचे प्रहारानें तो सेनापति ग्रसन नामा दानव मूर्च्छा येऊन भूमीवर पडला असें पाहून भयंकर पराक्रमी जंभासुर गोफण गुंड्यानें यमाचे हृदयावर ताडन करिता झाला.

यमस्तेनप्रहारेणसुस्रावरुधिरंमुखात्॥११॥कृतांतमर्दितंदृष्ट्वागदापाणिर्धनाधिपः॥वृतोयक्षायुतशतैर्जंभंप्रत्यभ्ययौरुषा॥१२॥

अर्थ- त्या गोफण गुंड्याचे प्रहारानें तो यम मुखांतून रक्त ओकूं लागला. असें जंभासुरानें यमास व्यथित (पीडित) केलें असें पाहून धनाचा स्वामी कुबेर हातांत गदा घेऊन कोट्यावधि यक्षा सहित मोठ्या रागानें जंभासुराचे अंगावर आला.

जंभोरुषातमायांतंदानवानीकसंवृतः॥उवाचमाद्रोवाक्यंतुयथास्निग्धेनभाषितं॥१३॥

अर्थ- तेव्हां दानवांचे सैन्या सहित जंभासुर, रोषानें येणाऱ्या त्या कुबेरास मोठ्या चातुर्यानें मित्रासारखें मधुर भाषण करूं लागला.

ग्रसनोलब्धसंज्ञोथयमस्यप्राहिणोद्गदां॥मणिहे
मपरिष्कारांगुर्वीमरिविमर्दिनीं॥१४॥

अर्थ- तों इतक्यांत ग्रसन सेनापति मूर्च्छा जाऊन सावध होतांच त्यानें यमास गदा मारिली; त्या गदेस नवरत्नादि मणि व सुवर्ण यानीं शोभाकेलेली असून ती मोठी असल्यामुळें शत्रूंचा विशेषें करून नाश करणारी होती.

तामप्रतर्क्यांसंप्रेक्ष्यगदांमहिषवाहनः॥गदायाः
प्रतिघातार्थंजगद्दलनभैरवं॥१५॥दंडंमुमोचकोपे
नज्वालामालासमाकुलं॥

अर्थ- ती तर्कन चालण्या सारखी विलक्षण गदा पाहून महिष वाहनावर बसणारा यम त्या गदेच्या नाशार्थ सर्व जगाचे नाशाविषयीं समर्थ असून अग्नी सारख्या ज्वालांच्या माळानीं युक्त असा दंड मोठ्या कोपानें त्या गदेवर टाकता जाहला.

सगदांवियतिप्राप्यररासांबुधरोयथा॥१६॥संघ
इमभवत्ताभ्यांशैलाभ्यामिवदुःसहं॥

अर्थ- तेव्हांतो यमाचा कालदंड आकाशांत ग्रसनानें सोडलेल्या गदे अचळ आकाशांत येऊन मेघा सारखी गर्जना करूं लागला. आणि पश्चात् गदा व दंड यांचा (दोन पर्वतां प्रमाणें लोकांस सहन होण्या विषयीं अशक्य) असें परस्परें घर्षण चाललें.

ताभ्यांनिष्पेषनिर्ह्रादजडीकृतदिगंतरं॥१७॥जग
द्व्याकुलतांयातंप्रलयागमशंकया॥

अर्थ- ते समयीं ते गदा व दंड यांचें परस्परें आकाशांत घर्षण चाललें त्यांच्या शब्दानें सर्व दिशांचे प्रांत भाग धुंद झाले. आणि त्या भयंकर शब्दामुळें आतां यानें प्रलयच होतो कीं काय या शंकेनें सर्व जग व्याकुळ जाहलें.

क्षणात्प्रशांतनिर्ह्रादंज्वलदुल्कासमाचितं॥१८॥
निष्पेषेणतयोर्भीममभूद्गगनगोचरं॥

अर्थ- नंतर कांहीं क्षण मात्रानें गदा व दंड यांचा शब्द शांत होऊन

जाज्वल्यमान ज्वालानीं युक्त असें त्या आयुधांच्या घर्षणापासून उत्पन्न झालेलें महा भयंकर तेज आकाशांत दिसूं लागलें.

निहत्याथगदांदंडस्ततोग्रसनमूर्धनि ॥ १९ ॥ हृ-
त्वाश्रियमिवानर्थोदुर्वृत्तस्यापनद्दद ॥

अर्थ- नंतर तो यमाचा काल दंड गदेचा पराभव करून पश्चात् त्या ग्रसन सेनापतीचे मस्तकावर मोठ्या वेगानें जाऊन पडला; त्यास दृष्टांत दुर्वृत्त पुरुषाची संपत्ति हरण करून त्यावर जसा महान् अनर्थ येऊन पडतो तसा.

सतुतेनप्रहारेणदृष्ट्वासतिमिरादिशः ॥ २० ॥ प-
पातभूमौनिःसंज्ञोभूमिरेणुविभूषितः ॥

अर्थ- तेव्हां तो सेनापति ग्रसन दानव त्या यमदंडाच्या प्रहारानें बहुत व्यथा पावून सर्व दिशा अंधकार मय पाहून मूर्च्छित होत्साता भूमीवर पडला. त्यामुळें त्याचे अंगास पृथ्वीचे रजःकण बहुत लागले, तेणें करून तो वीर श्रीनें शोभूं लागला.

ततोहाहारवोघोरः सेनयोरुभयोरभूत् ॥ २१ ॥-
ततोमुहूर्तमात्रेणग्रसनःप्राप्यचेतनां ॥ अपश्य-
त्स्वांतनुंध्वस्तां विलोलाभरणांबरां ॥ २२ ॥

अर्थ- नंतर त्या देव दैत्य यांच्या उभय सैन्यांत मोठा भयंकर हा हाः कार झाला असतां मग दोन घटिकानीं मूर्च्छा जाऊन त्या ग्रसन सेनापतीस शुद्धि आली, तेव्हां त्यानें आपलें शरीर पाहिलें; तों आपण रथाखालीं पडलों असून आपले अंगावरील वस्त्रें व भूषणें अस्ताव्यस्त झालीं आहेत.

सचापिचिंतयामासकृतेप्रतिकृतिक्रियां ॥ मद्वि-
धेनस्तनिपुंसिप्रभोःपरिभवादयात् ॥ २३ ॥ मय्या
श्रितानिसैन्यानिजितेमयिविनाशिता ॥ असंभावि
तएवास्तमनः स्वच्छंदचेष्टितः ॥ २४ ॥ नतुव्यर्थश
तोदृष्टसंभावितधनोनरः ॥

अर्थ- नंतर तो सेनापति ग्रसन दानव ही आपणास यमानें अपकार केला. त्याचा प्रतिकार यमावर करण्यासाठीं मनांत चिंतन करूं लागला,

कीं, मजसारिखा महापराक्रमी पुरुष असून ही माझा पराभव झाला. याचें कारण असें कीं, माझा यजमान जो तारकासुर त्याचा पराजय कालआला म्हणूनच माझा पराभव झाला, अन्यथा होणार नाहीं. असो परंतु आतां मी असा पराजित जाहलों असतां हीं माझा आश्रय केलेलीं सर्व सैन्यें नाश पावतील; एतदर्थ मनाच्या स्वच्छंदानें होणाऱ्या पराजयाची संभावना ही मला अंतःकरणांत प्राप्त नव्होवो; कारण व्यर्थ कितीही शेंकडों वेळ केवळ वाणीनें द्रव्य लाभाच्या गोष्टी बोलल्या आणि मनांत जर दरिद्राचे डोहळे आले; तर त्या नुसत्या बोलण्यानें कांहीं धन मिळण्याची संभावना मनुष्यास होत नाहीं; तस्मात् या युद्धांत पराभवाची गोष्ट ही माझे मनांत नयेवो.

एवंसंचिंत्यवेगेनसमुत्तस्थौमहाबलः॥२५॥मुद्गरंकालदंडाभंगृहीत्वागिरिसंन्निभः॥ग्रसनोघोरसंकल्पःसंदष्टोष्ठपुटच्छदः॥२६॥रथेनत्वरितोगच्छन्नासससादांतकंरणे॥

अर्थ- असें चिंतन करून महा बलाढ्य तो सेनापति पर्वतप्राय शरीरी ग्रसन दानव मोठ्या वेगानें उठला; आणि काल दंडासारखा आपला घोर मुद्गर हातांत घेऊन दांत ओंठ चावून तो असुर क्रूर संकल्पानें रथांत बसून अतित्वरेनें त्या रण भूमींत यमाचे अंगावर चालला.

समासाद्ययमंयुद्धेग्रसनोभ्राम्यमुद्गरं॥२७॥वेगेनमहतारौद्रंचिक्षेपयममूर्धनि॥

अर्थ- तो ग्रसन सेनापति त्या युद्धभूमींत यमाजवळ येऊन त्यानें हातांतील तो भयंकर मुद्गर गरगरां फिरवून मोठ्या वेगानें यमाचे मस्तकावर टाकला.

विलोक्यमुद्गरंदीप्तंयमःसंभ्रांतलोचनः॥२८॥वंचयामासदुर्धर्षंमुद्गरंसमहाबलः॥

अर्थ- तेव्हां त्या देदीप्यमान मुद्गरास पाहतांच तत्क्षणीं यमाचे नेत्र दिपले आणि त्या महा बलिष्ठ यमानें तो ग्रसनासुरानें टाकलेला दुर्धर मुद्गर चुकविला.

तस्मिन्नपसृते दूरं चंडानां भीमकर्मणां ॥ २९ ॥ या
म्यानां किंकराणां तु सहस्रं निष्पिपेष ह ॥

अर्थ- तो यम त्या मुद्गरास चुकविण्या साठीं दूर गेला असतां त्या संधीं
त ग्रसन दानवानें अत्यंत कोपिष्ठ असून क्रूर कर्म करणारे अशा सहस्र
यम दूतांस व्यथित केलें.

ततस्तान्निहतान्दृष्ट्वा घोरां किंकरवाहिनीं ॥ ३०
अगमत्परमं क्षोभं नाना प्रहरणोद्यतः ॥

अर्थ- नंतर यमानें आपल्या दूतांची उग्र सेना असून ही ती त्या ग्र-
सनानें पीडित केली असें पाहून अनेक आयुधानीं युद्धा विषयीं उद्य-
क्त तो यम अत्यंत क्षोभ पावला.

ग्रसनस्तु समालोक्य तां किंकरमयीं चमूं ॥ ३१ ॥
मेने यमसहस्राणि सृष्टानि यममायया ॥

अर्थ- आणि यमानें आपल्या दूतानीं युक्त अशी मोठी सेना उत्प-
न्न केली. तेव्हां ती सेना पाहून तो ग्रसन असें समजला कीं, यमानें आ
पल्या मायेनें हे हजारों यम निर्माण केले आहेत.

निग्राह्य ग्रसनः सेनां विसृजन्नस्त्रवृष्टयः ॥ ३२ ॥
कल्पांतघोरसंकाशो बभूव क्रोधमूर्च्छितः ॥

अर्थ- नंतर ग्रसनसेनापति, कल्पांत समयींच्या भयंकर प्रलयाग्नी सा
रखा क्रोधानें मूर्च्छित होत्साता त्या यम सेनेस मागें फिरवून अस्त्रांची
वृष्टि करूं लागला.

कांश्चिद्बिभेद शूलेन कांश्चिद्बाणैरजिह्मगैः ॥ ३३
कांश्चित्पिपेष गदया कांश्च मुद्गरवृष्टिभिः ॥

अर्थ- आणि ग्रसनासुर कोणास शूलानें छिन्नभिन्न करूं लागला.
कित्येकांस समोर जाणाऱ्या बाणानीं मारूं लागला; किती एकांचें गदेनें
चूर्ण करिता जाहला; व कोणा एकांचें मुद्गलांच्या वृष्टीनीं चूर्ण करूं ला
गला.

केचित्प्रासप्रहारैश्च दारुणैस्ताडितास्तदा ॥ ३४ ॥
अपरे बहुशस्तस्य लब्धबाहुमंडले ॥

अर्थ- तसेच त्या काळीं ग्रसन दानवाचे प्रास नामक आयुधांच्या कठिण प्रहारानीं देवांचे सैन्यांतील कोणी योद्धे पीडित झाले; आणि दुसरे कितीएक वीर बहुत प्रकारानीं त्या ग्रसन दैत्याच्या बाहूंचे घेरांत सांपडून लोळूं लागले.

शिलाभिरपरेजघ्नुर्द्रुमैरन्यैर्महोच्छ्रयैः॥ ३५॥ तस्यापरे तुगात्रेषुदशनैरपिदंशयन्॥

अर्थ- त्या काळीं देव सैन्यांतील इतर कोणी शूर त्या ग्रसन दानवांस मोठ मोठ्या शिळानीं मारूं लागले; कोणी त्यास मोठ्या उंच वृक्षांनीं मारूं लागले; व दुसरे कोणी योद्धे दांतानीं त्या ग्रसन सेनापतीच्या अंगास चावूं लागले.

अपरेमुष्टिभिः पृष्ठंकिंकराःप्रहरंतिच॥ ३६॥ अभिद्रुतस्तथाघोरैर्ग्रसनः क्रोधमूर्च्छितः॥ उत्सज्यगात्रंभूपृष्ठेनिष्पिपेषसहस्रशः॥ ३७॥

अर्थ- आणि दुसरे यम दूत मुष्टि प्रहारानीं त्या ग्रसना सुरास प्रहार करूं लागले; असा तो सेनापति ग्रसन दानव त्या उग्र यम दूतानीं मागें हटविला असतां त्यानें आपलें अंग भूतलावर टाकून त्या खालीं हजारों यम दूतांचें चूर्ण केलें.

कांश्चिदुत्थायमुष्टीभिर्जघ्नेकिंकरसंश्रयान्॥ स तुकिंकरयुद्धेनग्रसनःश्रममासवान्॥ ३८॥

अर्थ- पश्चात् त्यानें उठून किती एक त्या यम दूतांतील प्रमुख दूतांस मुष्टि प्रहारानें मारिलें; ते समयीं त्या दूतांशीं युद्ध केल्यानें तो ग्रसन सेनापती बहुत श्रम पावला.

तमालोक्ययमः श्रांतंनिहतांचस्ववाहिनीं॥ आजगामसमुद्यम्यदंडमहिषवाहनः॥ ३९॥

अर्थ- असा तो ग्रसन दानव आपली बहुत सेना मारून दमला असें पाहून महिष वाहनावर बसणारा तो यम आपला काल दंड हातांत उचलून धरून त्या ग्रसना सुराचे अंगावर आला.

ग्रसनस्तसमायांतमाजघ्नेगदयोरसि॥ अचिंत-

खिलातत्कमेंग्रसनस्यांतकोरिहा ॥ ४० ॥ जघ्नेरथस्य
मूर्धन्यान्व्याघ्रान्दंडेनकोपनः ॥

अर्थः— जेव्हां ग्रसन दैत्यानें आपले अंगावर येणाऱ्या त्या यमाचे वक्षस्थळावर गदेनें प्रहार केला तथापि त्या गदा प्रहाराची गणना न करितां शत्रूंचा संहार करणाऱ्या यमानें त्या ग्रसना सुराच्या रथाचे व्याघ्रांस क्रोधेंकरून आपले काल दंडानें प्रहार केला.

सरथोदंडमथितैर्व्याघ्रैरर्धैर्विकृष्यते ॥ ४१ ॥ संशयः पुरुषस्येवचित्तंदैत्यस्यतद्रथं ॥

अर्थः— तेव्हां यमाच्या त्या काल दंडानें ग्रसन सेना पतीच्या रथाचे वाघ अर्धे तुटले असतां तसेच ते अर्ध शरीरी वाघ तो रथ ओढूं लागले; ते समयीं त्या दैत्याचें त्या रथा विषयीं चित्त (पुरुषाच्या संशया सारखें) झालें.

समुत्सृज्यरथंदैत्यः पदातिर्धरणींगतः ॥ ४२ ॥ यमं भुजाभ्यामादाययोधयामासदानवः ॥

अर्थः— त्यामुळें तो ग्रसन दैत्य त्यारथास सोडून पृथ्वीवर पायांनीं चालला आणि तो दानव आपले भुजांनीं यमास धरून त्याशीं युद्ध करूं लागला.

यमोपिशस्त्राण्युत्सृज्यबाहुयुद्धेष्ववर्तत ॥ ४३ ॥ ग्रसनः कटिवस्त्रेणतु यमंगृह्यबलोद्धतः ॥ भ्रामयामासवेगेनप्रचित्तमिवसंभ्रमन् ॥ ४४ ॥

अर्थः— त्या कालीं सर्व शस्त्रें टाकून यमही त्याबरोबर बाहुयुद्ध करूं लागला; असतां तो बलानें उन्मत्त ग्रसना सुर आपले कंबरेच्या वस्त्रानें यमास बांधून मोठ्या वेगानें त्यास फिरवूं लागला; यास दृष्टांत कांहीं पित्त किंवा भय इत्यादि विकारांनीं मनुष्याचें चित्त जसें भ्रमण पावतें तसें.

यमोपिकंठेविष्टभ्यदैत्यंबाहुयुगेनतु ॥ वेगेनभ्रामयामाससमुत्क्षिप्यमहीतलात् ॥ ४५ ॥

अर्थः— तसाच यमही आपल्या दोहीं भुजानीं त्या ग्रसन सेना पतीस गळ्याशीं धरून त्यास भूमी वरून उचलून मोठ्या वेगानें फिरवूं लागला.

ततोमुष्टिभिराजघ्नतुरन्योन्यंपरस्परं ॥ दैत्येंद्रस्याति

कायत्वात्ततः श्रांतभज्जोयमः ॥ ४६ ॥

अर्थ- नंतर ते देवांचा सेनापति यम व दैत्यांचा सेनापति ग्रसनासुर हे परस्परें पीडा देत होत्साते एकमेकांस मुष्टिप्रहार करूं लागले असतां त्या दैत्य सेनापती ग्रसन दानवाचें शरीर अतिशयें मोठें होतें त्यामुळें कांहीं वेळानें यमाचे हात थकले.

स्कंधे निधाय दैत्यस्य मुखं विश्रांतिमैच्छत ॥ तमालक्ष्य ततो दैत्यः श्रांतमंतकमोजसा ॥ ४७ ॥ निष्पिपेष महीपृष्ठे बहुशः पार्ष्णिपाणिभिः ॥ यावद्यमस्य वदनात्सुस्राव रुधिरं बहु ॥ ४८ ॥

अर्थ- तेव्हां यम त्या ग्रसन दैत्याचे स्कांद्यावर आपलें मुख ठेवून विश्रांती घेण्याची इच्छा करूं लागला असतां त्या दैत्यानें यम दमला असें पाहून मोठ्या बलानें यमास भूमीवर पाडिलें आणि त्याचे मुखांतून बहुत रक्त ओकून जाई तों पर्यंत ग्रसनासुरानें आपले मनगटानीं त्या यमास पृथ्वीवर नाना प्रकारें घोळसलें.

निर्जीवितं यमं दृष्ट्वा ततः संत्यज्य दानवः ॥ जयं प्राप्यो धतं दैत्यो नादमुक्त्वा महास्वनः ॥ ४९ ॥ स्वयं सैन्यं समासाद्य तस्थौ गिरिरिवाचलः ॥

अर्थ- नंतर यम अगदीं मूर्छित झाला असें पाहून त्यास सोडून तो मोठा शब्द करणारा ग्रसन दानव जय पावून महान् सिंहनाद करून आपले सैन्यांत जाऊन पर्वता सारिखा उभा राहिला.

धनाधिपस्य जंभेन सायकैर्मर्मभेदिभिः ॥ ५० ॥ दिशो वरुद्धाः क्रुद्धेन सैन्यं चास्य निकृंतितं ॥

अर्थ- आणि त्याच प्रमाणें जंभासुरानें महा क्रोधें करून शरीराचे सर्व मर्मांचा भेद करणाऱ्या बाणानीं धनाधिपति कुबेराच्या चाल करण्याच्या सर्व दिशा बंद करून त्याचें बहुत सैन्य मारिलें.

ततः क्रोधपरीतस्तु धनेशो जंभदानवं ॥ ५१ ॥ हृदि विव्याध बाणानां सहस्रेणाग्निवर्चसां ॥

अर्थ- नंतर तो द्रव्याधिपति कुबेर कोपानें व्याप्त होऊन त्यानें अग्निस

मान तेजोमय अशा एक सहस्र बाणानीं त्या जंभ दानवाचे हृदयास ताड-
न केलें.

सारथिंचशतेनाजौध्वजंदशभिरेवच ॥ ५२ ॥ हस्तौ
चपंचसप्तत्यामार्गणैर्दशभिर्धनुः ॥ मार्गणैर्बर्हिप
त्रांकैस्तैलधौतैरजिह्मगैः ॥ ५३ ॥ सिंहमेकेनतंती
क्ष्णैर्विव्याधदशभिःशरैः ॥

अर्थ:- आणि त्या लोकपाल कुबेरानें त्या संग्रामांत शंभर बाणानीं जंभा
सुराचे सारथ्यास, दहा बाणानीं ध्वजास, तसेंच पंचाहात्तर बाणानीं जं
भ दानवाचे हातांस, आणि दहा बाणानीं त्याच्या धनुष्यास, मोरांच्या पि
सान्यानीं युक्त व तेलानें साहाणेवर घांसलेले असून आकृतीनें सरळ-
अशा तीक्ष्ण एकेक बाणानें रथाचे सिंहास तसेंच दहा बाणानीं त्या जंभासु
रास असे कुबेरानें त्या सर्वांस प्रहार केले.

जंभस्तत्कर्मतद्दृष्ट्वाधनेशस्यातिदुष्करम् ॥ ५४ ॥ हृ
दिधैर्यंसमालंब्यकिंचित्संत्रस्तमानसः ॥ जग्राहनि
शितान्बाणान्शत्रुमर्मविभेदिनः ॥ ५५ ॥

अर्थ:- तेव्हां इतरांस सहन करण्यास अशक्य असें तें कुबेराचें अघटित
कृत्य पाहून तो जंभासुर मनांत किंचित् उद्विग्न जाहला तथापि मनांत
धैर्य धरून त्यानें शत्रूच्या अंग संधींचें अतिशयें विदारण करणारे अ-
से तीक्ष्ण बाण हातांत घेतले.

आकर्णाकृष्टचापस्तु जंभः क्रोधपरिप्लुतः ॥ विव्या
धधनदंतीक्ष्णैःशरैर्वक्षसिदानवः ॥ ५६ ॥

अर्थ:- आणि त्या जंभासुरानें मोठ्या क्रोधाचे आवेशानें आपले धनु-
ष्याची दोरी आकर्ण पर्यंत ओढून त्या कुबेराच्या वक्षस्थळास त्या तीक्ष्ण बा
णानीं प्रहार केला.

सारथिंचास्यबाणेनदृढेनाभ्यहनद्धृदि ॥ चिच्छेद
ज्यामथैकेनतैलधौतेनदानवः ॥ ५७ ॥

अर्थ:- मग जंभ दानवानें कुबेराच्या सारथ्याचे हृदयावर एका कठोर बा-
णानें ताडन करून तेलानें साहाणेवर घांसलेल्या एक बाणानें त्याच्या-

धनु ष्याची दोरी तोडली.

ततस्तु निशितैर्बाणैर्दारुणैर्मर्मभेदिभिः ॥ वि-
व्याध रसि वित्तेशं दशभिः क्रूरकर्मभिः ॥ ५८ ॥

अर्थ:- नंतर शरीराचे मर्म स्थानांचा भेद करण्याचें क्रूर कर्म करणारे-अशा भयंकर कठिण तीक्ष्ण दहा बाणानीं त्या जंभासुरानें धनस्वामी कुबेराचे वक्षस्थळास ताडन केलें.

मोहं परमतो गच्छन् दृढविद्धो हि वित्तपः ॥ सक्षणा
द्धैर्यमालंब्य धनुराकृष्य भैरवं ॥ ५९ ॥ किरन्बाण
सहस्राणि निशितानि धनाधिपः ॥ दिशः खं विदि-
शो भूमी रनीकान्यसुरस्य च ॥ ६० ॥ पूरयामास वे
गेन संच्छाद्य रविमंडलं ॥

अर्थ:- त्या दहा बाणानीं तो कुबेर अतिशयें ताडित झाला असतां अत्यंत व्यथा पावला; तथापि त्याणें एक क्षण मात्रानें धैर्य धरून आपलें भयंकर धनुष्य आकर्ण पर्यंत ओढून हजारों तीक्ष्ण बाणांची मोठ्या वेगानें वृष्टि केली; तेव्हां त्या बाण वृष्टीनें पूर्वादिक मुख्य दिशा व आग्नेय आदि करून अवांतर कोण दिशा, आकाश, पृथ्वी व त्या जंभासुराचीं सर्व सैन्यें या सर्वांस व्यापून टाकलें; त्याकाळीं त्या बाण वृष्टीनें सूर्य मंडल ही अगदीं आच्छादित जाहलें.

जंभोपि शरमेकैकं शरैर्बहुभिराहवे ॥ ६१ ॥ चिच्छे-
द लघुसंधानो धनेशस्यातिपौरुषात् ॥

अर्थ:- ते समयीं त्या युद्धांत कुबेराच्या बाण वृष्टींतील प्रत्येक बाणावर बहुत बाण टाकून जंभासुरानें अति त्वरेनें धनुष्यास बाण लावून महापराक्रमानें ती सर्व बाण वृष्टी तोडून टाकली.

ततो धनेशः संक्रुद्धो दानवेंद्रस्य कर्मणा ॥ ६२ ॥ व्य
धमत्तस्य सैन्यानि नानासायकवृष्टिभिः ॥

अर्थ:- नंतर त्या दानव श्रेष्ठ जंभासुराच्या कर्मानें धन पति कुबेर अत्यंत क्रोधायमान होत्साता अनेक बाणांच्या वृष्टीनीं त्या जंभासुराच्या सैन्यांचा नाश करिता जाहला.

तद्दृष्ट्वा दुष्कृतं कर्म धनाध्यक्षस्य दानवः ॥ ६३ ॥ गृहीत्वा मुद्गरं भीममायसं हेमभूषितं ॥ धनदानुचरान्यक्षान्निष्पिपेष सहस्रशः ॥ ६४ ॥

अर्थ- तेव्हां द्रव्याध्यक्ष कुबेरानें तें दुष्कर कर्म पाहून तो जंभ दानव सुवर्णभूषित लोखंडी भयंकर मुद्गल नावाचें आयुध हातांत घेऊन त्यानें कुबेराच्या हजारों सेवक यक्षांचें चूर्ण करूं लागला.

ते वध्यमाना दैत्येन मुंचंतो भैरवान् रवान् ॥ रथं धनपतेः सर्वे परिवार्य व्यवस्थिताः ॥ ६५ ॥

अर्थ- असे ते यक्ष त्या जंभ दैत्यापासून वध पावत असतां, आक्रोशानें भयंकर शब्द करीत ते सर्वही येऊन कुबेराच्या रथासभोंवतीं वेष्टून उभे राहिले.

दृष्ट्वा तानर्दितान् देवः शूलं जग्राह दारुणं ॥ तेन दैत्यसहस्राणि सूदयामास सत्वरः ॥ ६६ ॥

अर्थ- तेव्हां असे ते जंभासुरानें आपले यक्षगण पीडित केले असें पाहून कुबेरानें हातांत शूल नामक आयुध घेऊन त्या शूलानें जंभासुराच्या सैन्यांतील हजारों दैत्य बहुत त्वरेनें मारिले.

क्षीयमाणेषु दैत्येषु दानवः क्रोधमूर्च्छितः ॥ जग्राह परशुं दैत्यो मर्दनं देवविद्विषां ॥ ६७ ॥

अर्थ- असे ते त्या कुबेरानें आपले बहुत दैत्य मारिले असतां, तो जंभ दानव क्रोधानें अतिशयें व्याप्त झाला; आणि त्यानें दैत्यांचा द्वेष करणाऱ्या देवांचा नाश करणारा परशु (कुऱ्हाड) हातांत घेतली.

स तेन सितधारेण धनभर्तुर्महारथं ॥ चिच्छेद तिलशो दैत्यो त्वाखुः स्निग्धमिवांबरं ॥ ६८ ॥

अर्थ- आणि त्या तीक्ष्ण धारेच्या कुऱ्हाडीनें द्रव्याधिपति कुबेराच्या मोठ्या रथाचे त्या जंभासुरानें (जसा उंदिर तूप किंवा तेल इत्यादिक पदार्थांनीं भिजलेल्या मृदु वस्त्राचे तुकडे करितो) तसे त्या रथाचे तिळासारखे तुकडे केले.

पदातिरथ वित्तेशो गदामादाय भैरवीं ॥ महाहववि

मर्देषुदृप्तशत्रुविनाशिनीं ॥ ६९ ॥ अभ्युष्यांसर्वभूता नांबहुवर्षगणार्चितां ॥ नानाचंदनदिग्धांगांदिव्यपु ष्पविवासितां ॥ ७० ॥ निर्मलायोमयींगुर्वीमिमोघां- हेमभूषणां॥ निक्षेपमूर्ध्निसंक्रुध्दोजंभस्यतुधना- धिपः ॥ ७१ ॥

अर्थः- ते समयीं धनाध्यक्ष कुबेरानें आपली भयंकर गदा मोठ्या रोषानें जंभासुराचे मस्तकावर टाकिली, ती गदा अशी कीं, महा संग्रामांतील मोठमोठ्या युद्धांचे प्रसंगीं पराक्रमाचे गर्वानें उन्मत्त झालेल्या शत्रूंचा नाश- करण्या विषयीं ती गदा समर्थ होती म्हणूनच ती सर्व प्राणिमात्रांस स- हन करण्यास अशक्य असे, आणि कुबेर तरीं यान कारणावरून त्याग- देची बहुत वर्ष पर्यंत पूजा करित होता; त्या पूजेंतील नाना प्रकारचीं उत्त- म गंधें त्या गदेस लागल्यानें ती गदा सुशोभित दिसत होती तशीच ती ग- दा स्वर्गांतील कल्पवृक्षादिक अनेक दिव्य पुष्पांचे सुगंधानें युक्त असे; अ- शी ती गदा स्वच्छ पोलादाची व मोठी असून तिला सोन्याचे बहुत अलंका- र केलेले होते; आणि ही गदा व्यर्थ न जाता निश्चयें करून शत्रूंचा संहार करणारी असे.

आयांतींतांसमालोक्यतडित्संघातमंडितां॥ दैत्यो- गदाभिघातार्थंशस्त्रवृष्टिंमुमोचह ॥ ७२ ॥

अर्थः- तेव्हां विजांचे समुदायानें युक्त अशी ती जाज्वल्यमान गदा आप णावर येत आहे, असें पाहून तो जंभासुर दैत्य त्या गदेच्या नाशार्थ ति जवर बहुत शस्त्रांची वृष्टि करिता जाहला.

चक्राणिकोणपःप्रासान्भुशुंडीपट्टिशानपि ॥ हे मकेयूरनद्धाभ्यांबाहुभ्यांचंडविक्रमः ॥ ७३ ॥

अर्थः- ती अशीकीं, बाजुबंद आदिकरून घातलेल्या बाहुभूषणानीं सु- शोभित असून प्रचंड पराक्रमी त्या जंभासुरानें आपणावर येणाऱ्या- त्या गदेवर अनेक चक्रें, तशींच प्रासनामक शस्त्रें, भुशुंडी व पट्टिश नां- वाचीं शस्त्रें, इत्यादिक बहुत शस्त्रें टाकिलीं.

व्यर्थीकृत्यतुतान्सर्वानायुधान्दैत्यवक्षसि ॥ प

स्फुरंतीपपातोग्रा महोल्केवाद्रिकंदरे॥ ७४॥

अर्थ- तथापि ती सर्व आयुधें व्यर्थ करून ती देदीप्यमान उग्र गदा- (जशी मोठी वीज पर्वताच्या गुहेवर पडते) तशी ती जंभास्कराचे वक्ष स्थलावर पडली.

गदायाभिहतोगाढंपपातरथकूबरे॥ स्रोतोभिश्चा स्यरुधिरंसुस्रावगतचेतसः॥ ७५॥

अर्थ- तेव्हां त्या गदेनें जंभास्कर ताडिता झाला असतां, तो रथाचा घोडा बांधण्याचे लांकडावर पडला; आणि त्याच्या मुखादिक सर्व इंद्रियांतून रक्त वाहूं लागलें; व त्यास मूर्छानाही आली.

जंभंतुनिहतंमत्वाकुजंभोभैरवस्वनः॥ धनाधिप- स्यसंक्रुद्धोवाक्येनातीवकोपिनः॥ ७६॥ चक्रेबाणम यंजालंदिक्षुयक्षाधिपस्यतु॥

अर्थ- त्याकाळीं तो जंभास्कर मरण पावला असें मानून भयंकर शब्द करणारा कुजंभ दैत्य कुबेराचे भाषणानें अत्यंत क्रुद्ध जाहला आणि त्यानें यक्षराज कुबेरावर चोहीं कडून बाण वृष्टी करून त्याचे आसमं तात् सर्वत्र बाणांचें जाळें केलें.

चिच्छेदबाणजालंतदर्धचंद्रैःशितैस्ततः॥ ७७॥ मुमोचशरवृष्टिंतुतस्ययक्षाधिपोबली॥

अर्थ- नंतर यक्षराज, बलिष्ठ कुबेरानें आपल्या अर्धचंद्राकार बाणानीं तें कुजंभ दैत्यानें टाकलेल्या बाणांचें जाळें तत्काल तोडून त्यानें कुजंभास्करावर बहुत बाणांची वृष्टी केली.

सतंदैत्यःशरव्रातंचिच्छेदनिशितैःशरैः॥ ७८॥ व्य र्थीकृतांतुतांदृष्ट्वाशरवृष्टिंधनाधिपः॥ शक्तिंजग्रा- हदुर्धर्षांहेमघंटाट्टहासिनीं॥ ७९॥ बाहुनारत्नकेयूर कांतिसंतानहासिना॥ सतांनिरूप्यवेगेनकुजंभा- यमुमोचह॥ ८०॥ साकुजंभस्यहृदयंदारयामास दारुणा॥ वित्तेशःस्वल्पसत्वस्यपुरुषस्यातिभावि ता ॥ ८१॥ अथास्यहृदयंभित्वाजगामधरणी

तलं ॥

अर्थ— नंतर कुजंभास्करानें आपले तीक्ष्ण बाणानीं कुबेरानें टाकलेले सर्व बाण तोडले असतां कुजंभ दैत्यानें आपल्या बाणांची वृष्टी व्यर्थ केली असें पाहून स्वतः सर्व द्रव्य निधींचा अधिपति असून अल्प धनवान् पुरुषास संपत्ती देऊन वादविणारा कुबेर रत्न खचित बाजु बंदांच्या कांतिसमुदायानें अतिशयें शोभायुक्त अशा स्वहस्तानें सोन्याच्या घंटांच्या अति घोषानें युक्त असून शत्रूंस सहन करण्या विषयीं अशक्य अशी शक्ति घेऊन ती त्या कुजंभ दैत्यावर लक्ष्य धरून मोठ्या वेगानें त्यास मारिली; ती भयंकर शक्ति त्या कुजंभास्कराचें हृदय फोडून पारगेली; ती पाठीतून बाहेर निघून पृथ्वीवर पडली.

ततोमुहूर्तादस्वस्थोदानवोदारुणाकृतिः ॥८२॥ जग्राहपट्टिशंदैत्यः प्रांशंशितशिलीमुखं ॥

अर्थ— त्या शक्तीनें तो दानव दोन घटिका पर्यंत मूर्च्छित झाला; नंतर त्या भयंकर आकृतीं युक्त जंभास्करानें ज्यास बहुत तीक्ष्ण बाण लावलेले होते असा पट्टिश हातांत घेतला.

सतेनपट्टिशेनाजौधनदस्यस्तनांतरं ॥८३॥ वाक्येनतीक्ष्णारूपेणमर्मांतरविसर्पिणा ॥ निर्बिभेदाभिजातस्यहृदयंदुर्जनोयथा ॥८४॥

अर्थ— आणि त्या कुजंभ दानवानें त्या पट्टिश नामक शस्त्राचा कुबेराच्या दोन्ही स्तनांचे मध्यभागीं वक्षस्थलावर प्रहार केला यास दृष्टांत जसा कोणी दुर्जन आपले मर्मभेद करणाऱ्या तीक्ष्ण भाषणानें सज्जनानें हृदय फोडतो; तसें.

तेनपट्टिशघातेनधनेशः परिमूर्च्छितः ॥ निपपातरथोपस्थेजर्जरोधूर्वहोयथा ॥८५॥

अर्थ— तेव्हां त्या पट्टिशाचे प्रहारानें तो धनाधिपति कुबेर मूर्च्छित होऊन (रथाची धुरी वाहाणाऱ्या जर जर झालेल्या घोड्या सारखा) रथाचे खालीं पडला.

तथागतंतुतंदृष्ट्वाधनेशंनरवाहनं ॥ खड्गास्त्रोनि

र्ऋतिर्देवो निशाचरबलानुगः॥ ८६॥ अभिदुद्राव वेगेन कुजंभं भीमविक्रमं॥

अर्थ- त्या प्रमाणें पालखींत बसणारा तो धनाध्यक्ष कुबेर मूर्च्छागत झाला असें पाहून निरंतर हातांत खड्गास्त्र (तरवार) धारण करणारा नैर्ऋत्य दिशेचा लोकपाल निर्ऋति देव आपल्या राक्षसांचे सैन्या सहवर्तमान मोठ्या वेगानें भयंकर पराक्रम करणाऱ्या त्या कुजंभ दैत्याचे अंगावर चालून गेला.

अथदृष्ट्वातुदुर्धर्षंकुजंभोराक्षसेश्वरं॥ ८७॥ चोदयामाससैन्यानिराक्षसेंद्रवधंप्रति॥

अर्थ- नंतर कुजंभ दानवानें इतरांस ज्याचा वेग सहन करणें अशक्य अशा राक्षसाधिपतीस निर्ऋतीस पाहून त्यानें त्या निर्ऋतीचे वधार्थ बहुत सैन्यें पाठविलीं.

सदृष्ट्वाचोदितांसेनांभल्लनानास्त्रभीषणां॥ ८८॥ रथादाप्लुत्यवेगेनभूषणद्युतिभास्वरः॥ खड्गेनकमलानीवविकोशेनांबरत्विषा॥ ८९॥ चिच्छेदरिपुवक्त्राणिविचित्राणिसमंततः॥

अर्थ- तेव्हां भल्लनांवाचे बाण व अनेक शस्त्रास्त्रें यानीं अति भयंकर असें कुजंभासुरानें पाठविलेलें सैन्य पाहून नाना प्रकारचे अलंकारांच्या तेजानें देदीप्यमान, तो लोकपाल निर्ऋति, आपले रथांतून उतरून वेगानें त्या शत्रूंच्या सैन्यावर जाऊन आकाशा सारख्या अनेक रंगांच्या लखलखीत नागव्या तरवारीनें (कमला प्रमाणें) शत्रूंचीं विचित्र मुखें आसमंतात् भागीं तोडून पाडिलीं.

तिर्यक्पृष्ठमधश्चोर्ध्वंदीर्घबाहुर्महासिना॥ ९०॥ संदष्टौष्ठपुटाटोपभ्रुकुटीविकटाननः॥ प्रचंडकोपरक्ताक्षोन्यकृंतद्दानवान्रणे॥ ९१॥

अर्थ- आणि त्याच प्रमाणें राक्षसराज त्या अजानुबाहु निर्ऋतीनें ओंठ चावून भोंवयाची आकृति वांकडी व मुख भयंकर करून अत्यंत क्रोधानें नेत्र आरक्त झालेले असून त्यानें आपल्या तरवारीनें त्या र-

णांत बहुत दानवांस मारिलें तें असें कीं, किती एक दानवास जानव्या सारखें मध्यें निरकस तोडलें; कित्येकांस पाठीत वार करून मारलें; तसेच कोणांस कंबरेखालीं तोडिलें; व किती एकांस शिरच्छेद करून मारिलें.

ततोनिःशेषितप्रायां विलोक्यस्वामनीकिनीं ॥ मुक्त्वाकुजंभोधनदं राक्षसेंद्रमभिद्रवत् ॥ ९२ ॥

अर्थ– नंतर आपली सर्व सेना बहुत करून निर्ऋतीनें मारिली असें पाहून तो कुजंभासुर कुबेरास सोडून त्या राक्षसपति निर्ऋतिवर शेषानें धांवला.

लब्धसंज्ञोथजंभस्तु धनाध्यक्षपदानुगान् ॥ जीवग्राहान्सजग्राहबध्वापाशैःसहस्रशः ॥ ९३ ॥

अर्थ– नंतर जंभासुराची मूर्च्छा जाऊन त्यास शुद्धि प्राप्त झाली असतां, तो लोकांचा जीव घेणारे कुबेराचे अनुयायी जे हजारों यक्ष त्यांस पाशानें बांधून ठेविता जाहला.

मूर्तिमंतितुरत्नानिविविधानिचदानवाः ॥ वाहनानिचदिव्यानि विमानानि सहस्रशः ॥ ९४ ॥

अर्थ– तसेच ते जंभासुराचे सेवक दानव त्या कुबेराकडील नाना प्रकारच्या नवरत्नांच्या पुतळ्या, सहस्रावधि उत्तम वाहनें व विमानें, यांचें हरण करूं लागले.

धनेशोलब्धसंज्ञोथतामवस्थांविलोक्यतु ॥ निश्वसन्दीर्घमुष्णांचरोषात्ताम्रविलोचनः ॥ ९५ ॥ ध्यात्वास्त्रं गारुडं दिव्यंबाणंसंधाय कार्मुके ॥ मुमोचदानवानीके तंबाणंशत्रुदारणं ॥ ९६ ॥

अर्थ– नंतर तो धनस्वामी कुबेर मूर्च्छा जाऊन स्मृतीवर आला असतां, शत्रूनें केलेली ती आपली अव्यवस्था पाहून मोठमोठे उष्ण श्वासोच्छ्वास टाकीत होत्साता रोषानें नेत्र लाल करून त्यानें गरुडास्त्राच्या मंत्राचा जप केला. आणि शत्रूंचें विदारण करणारा उत्तम बाण धनुष्यास लावून तो बाण दानवांच्या सेन्यावर टाकला.

प्रथमंकार्मुकात्तस्यनिश्चेरु र्धूमराजयः॥ अनंतरं स्फुलिंगानांकोटयोदीप्तवर्चसां॥ ९७॥

अर्थ- तेव्हां त्या कुबेराच्या धनुष्या पासून सुटलेल्या बाणांतून प्रथमतः अतिशयें धुराचे लोटावर लोट निघाले; आणि मग जाज्वल्यमान तेजोमय असे कोटिशः निरवारे निघूं लागले.

ततोज्वालाकुलंव्योमचकारास्त्रंसमंततः॥ ततःक्रमेणदुर्वारंनानारूपंतदाभवत्॥ ९८॥

अर्थ- नंतर त्या गरुडास्त्रानें त्या रणभूमींत आसमंताद्भागीं सर्वत्र-आकाश,ज्वालांच्या समुदायानीं व्याप्त केलें; आणि मग निवारण करण्यास अशक्य असें तें अस्त्र कांहीं वेळानें त्या काळीं क्रमानें अनेक रूप दिसूं लागलें.

अमूर्तश्चाभवल्लोकोत्यंधकारसमावृतः॥ ततोंतरिक्षेशंसंतितेजस्तेतुपरिष्कृतं॥ ९९॥

अर्थ- आणि त्या अस्त्राचे तेजानें सर्वांचे डोळे दिपून त्यांच्या नेत्रापुढें अंधारी आल्यामुळें कांहीं काल पर्यंत कोणी परस्परांचे दृष्टीस पडेनातसे झाले; पश्चात् कांहीं वेळानें उभय सैन्यांतील ते वीर अंतरिक्षांत अनेक रूपानें शोभणाऱ्या त्या अस्त्राचे तेजाची महती वर्णन करूं लागले.

कुजंभस्तत्समालोच्य दानवोतिपराक्रमः॥ अभिदुद्राववेगेनपदातिर्धनदंनदन्॥ १००॥

अर्थ- ते समयीं अत्यंत पराक्रमी कुजंभनामा दानव तें सर्व कुबेराचें कृत्य विचार पूर्वक पाहून तो असुर सिंहनाद करीत मोठ्या वेगानें पायांनींच कुबेरावर धांवला.

अथाभिमुखमायांतंदैत्यंदृष्ट्वाधनाधिपः॥ बभूवसंभ्रमाविष्टः पलायनपरायणः॥ १०१॥

अर्थ- नंतर आपल्या सन्मुख तो कुजंभ दैत्य येतो असें पाहून तो धनस्वामी कुबेर मोठ्या भय युक्त त्वरेनें पलायन करूं लागला.

ततः पलायतस्तस्यमुकुटंरत्नमंडितं॥ अपातभूतलेदीप्तंरविबिंबमिवांबरात्॥ १०२॥

अर्थः– असा तो कुबेर आपले प्राणरक्षणार्थ भयानें पळत असतां, त्याचा रत्न खचित तेजोमय मुगुट (आकाशांतून सूर्य बिंबच पडलें किं काय?) असा तो भूमीवर पडला.

शूराणामभिजातानांभर्तर्यपसृतेरणात्॥ भर्तुःसंग्रामशिरसिमुक्तंतद्भूषणाग्रतः॥१०३॥इतिव्यवस्यदुर्धर्षानानाशस्त्रास्त्रपाणयः॥ युयुत्सवस्थिता यक्षामुकुटंपरिवार्यतं॥१०४॥

अर्थः– असा कुलीनशूरांत श्रेष्ठ तो कुबेर युद्ध सोडून गेला असतां, त्याचे सेवक यक्ष त्या रणभूमींत आपले स्वामीचा पडलेला मुगुट त्यास न योग्य आहे असा मनांत निश्चय करून त्या मुगुटाजवळ आले; आणि ते महापराक्रमी यक्ष अनेक शस्त्रास्त्रें हातांत घेऊन त्या दैत्यांस घेऊन देण्यासाठीं युद्ध करण्याचे इच्छेनें त्या मुगुटास भोंवतीं वेढा घालून उभे राहिले.

अभिमानधनावीराधनदस्यपदानुगाः॥ तानमर्षाच्चसंप्रेक्ष्यदानवाश्चंडपौरुषाः॥१०५॥ भृशुंडींभैरवाकारांगृहीत्वाशैलगौरवां॥ रक्षिणोमुगुटस्याथनिष्पिपेषनिशाचरान्॥१०६॥

अर्थः– अभिमानच ज्यांचें धन असे शूर ते कुबेराचे सेवक यक्ष त्यामुगुटाचे सभोंवतीं आपणास घेण्याविषयीं प्रतिबंधार्थ उभे राहिले आहेत असें पाहून प्रचंड पराक्रमी ते दानव मोठ्या रोषानें भयंकर आकृतीचें पर्वतप्राय मोठें भृशुंडी नांवाचें आयुध हातांत घेऊन त्यानीं त्या शस्त्रानें त्या पडलेल्या मुगुटाचें रक्षण करणाऱ्या त्या यक्षांचें चूर्ण केलें.

तान्प्रमथ्याथदनुजोमुकुटंतत्स्वकेरथे॥ समारोप्यामररिपुर्जित्वाधनदमाहवे॥१०७॥ धनानिरत्नानिचमूर्तिमंति तथानिधानानिशरीरिणश्च॥आदाय सर्वाणिजगामदेत्योजंभः स्वसैन्यंदनुजेंद्रसिंहः॥ धनाधिपोवैविविकीर्णमूर्धजोजगामदीनःस्मरभर्तुरंतिकं॥१०८॥

अर्थः– याप्रमाणें त्या कुबेराचे यक्षांस मारून व युद्धांत कुबेरास

जिंकून देवांचा शत्रु तो दनुपुत्र जंभासुर तो कुबेराचा मुगुट आपले स्थानं ठेवून तशींच कुबेराचीं बहुत द्रव्यें, रत्नाच्या पुतळ्या, कितीएक धनांचे निधि, व बहुत जिवंत प्रमुख सरदार या सर्वांस घेऊन दानव कुलांतील सिंहासारिखा श्रेष्ठ तो जंभासुरदैत्य आपले सैन्यांत गेला; आणि धनाधिपति कुबेर मस्तकाचे केश अस्ताव्यस्त झाले असून मोठ्या दैन्यानें देवराज इंद्रासमीप गेला.

कुजंभे नाथसंसक्तोरजनीचरनंदनः॥ मायामघोरा माश्रित्यतामसींराक्षसेश्वरः॥१०९॥ मोहयामासदैत्येंद्रंजगत्कृत्वातमोमयं॥

अर्थ- इकडे कुजंभासुराशीं युद्ध करणारा रक्षानामक कश्यपपत्नीचा पुत्र असून राक्षसांचा अधिपति जो नैर्ऋत्य दिशेचा लोकपाल निर्ऋति त्यानें अर्थत जाणारी असून तमो गुणा पासून उत्पन्न झालेली अशा राक्षसी मायेचा आश्रय करून त्या मायेनें सर्व जगत भोमय करून त्या दैत्यश्रेष्ठ कुजंभासुरास मोहित केलें.

ततोविफलनेत्राणिदानवानांबलानितु॥११०॥नशेकुश्चलितुंतत्रपदादपिपदंतदा॥

अर्थ- नंतर निर्ऋतीनें उत्पन्न केलेल्या त्या मायेनें दानवांचे सैन्यांतील सर्वांच्या नेत्रांस दिसेनासें झालें; तेव्हां त्या सैन्यांतील असुरांस एका पाउलापुढें पाऊल ही उचलून ठेववेनासें जाहलें.

सततोनानास्त्रवर्षेणदानवानांमहाचमूं॥१११॥जघानघननीहारतिमिरातुरवाहनां॥

अर्थ- नंतर त्या निर्ऋतिदेवानें त्या दाट धुक्यासारख्या अंधकारानें पीडित झालेली अश्वगजादि वाहन युक्त दानवांची मोठी सेना अनेक अस्त्रांच्या वृष्टीनें मारिली.

वध्यमानेषुदैत्येषुकुजंभेमूढचेतसि॥ ११२॥ महिषोदानवेंद्रस्तुकल्पांताभोदसन्निभः॥ अस्त्रंचकारसावित्रमुल्कासंघातमंडितं॥११३॥

अर्थ- असे ते दैत्य निर्ऋतीनें मारून कुजंभासुरास मोहित केलें असतां, कल्पांत समयींचे प्रलय मेघा समान दानव श्रेष्ठमहिषासुर त्या काळीं वि-

जांचे समुदायानें युक्त असें सूर्यास्त्र निऋतीवर सोडिता जाहला.

विजृंभत्यथसावित्रेपरमास्त्रेप्रतापिनि ॥ प्रणाशम
गमत्तीव्रंतमोघोरमनंतरं ॥११४॥

अर्थ- नंतर महाप्रतापी तें उत्तम सूर्यास्त्र अतिशयें प्रकाशित झालें असतां, तत्क्षणीं तो तीक्ष्ण भयंकर गाढ अंधकार नाश पावला.

ततोस्त्रंविस्फुलिंगांकंतमः कृत्स्नंव्यनाशयत् ॥ प्रफु-
ल्लारुणपद्माभंशरदीवामलंसरः ॥११५॥

अर्थ- आणि मग बहुतअग्नि कणयुक्त त्या सूर्यास्त्रानें त्या राक्षसी मायेच्या सर्व अंधकाराचा नाश केला असतां; त्या सूर्यास्त्राच्या प्रकाशानें तें युद्धभूमीचें स्थल प्रफुल्लित झालेल्या तांबड्या कमलांचे कांतीनें युक्त, शरदृतूंतील स्वच्छ उदकाचे सरोवरा सारखें शोभूं लागलें.

ततस्तमसिसंभ्रांतादैत्येंद्राः प्राप्तचक्षुषः ॥ चक्रुः क्रूरे
णमनसादेवानीकैःसहाद्भुतं ॥११६॥ शस्त्रैरमर्षा-
न्निर्मुक्तै र्भुजंगास्त्रंविनोदितं ॥ अथादायधनुर्घोर
मिषूंश्चाशीविषोपमान् ॥११७॥ कुजंभोधाव तक्षि
प्रंरक्षोराजबलंप्रति ॥

अर्थ- ते असुर सैन्यांतील श्रेष्ठदैत्य पूर्वीं मायेकरून निर्ऋतीनें उत्पन्न केलेल्या अंधकारांत भ्रांत झाले असून पश्चात् त्या सूर्यास्त्रानें तो अंधकार नाश पावला असतां, त्या सर्व असुरांस दिसूं लागलें असतां ते दैत्य अत्यंत क्रूर मनानें देवांचे सैन्यासह वर्तमान क्रोधें करून अनेक शस्त्रें टाकून अद्भुत युद्ध करूं लागले; नंतर कुजंभासुरानें हातांत घोर धनुष्य घेऊन भुजंगास्त्राचा प्रयोग केला; तेव्हां त्या पासून सर्पासारखे बाण निघूं लागले; आणि तो कुजंभ दानव मोठ्या त्वरेनें राक्षस राज निर्ऋतीचे सैन्यावर धांवला.

राक्षसेंद्रस्तमायांतंविलोक्यसपदानुगः ॥११८॥ वि
व्याधनिशितैर्बाणैः क्रूराशीविषभीषणैः ॥

अर्थ- तेव्हां तो कुजंभदैत्य आपणावर येत आहे; असें पाहून राक्षसांचा राजा निर्ऋती देव आपले राक्षसांचे सैन्या सहित त्या कुजंभासुरावर गेला, आणि त्यानें अत्यंत क्रूर सर्पासमान अतिभयंकर तीक्ष्णबाणानीं कुजंभ-

दैत्यास ताडन केलें.

तदादानंचसंधानंनमोक्षश्चापिलक्ष्यते॥११९॥वि
च्छेदास्यशरव्रातान्स्वशरैरतिलाघवात्॥

अर्थ- त्या कालीं त्यानिर्ऋतीचे बाण घेणें, धनुष्यास तो बाण लावणें व बाण सोडणें हें कांहींच सर्व वीर पहात असून त्यांच्या लक्षांत ही येईना; अशा आपल्या त्या बाणानीं अतिशयें त्वरेनें कुजंभासुराच्या बाणांचे समुदाय तोडून खालीं पाडिले.

ध्वजंपरमतीक्ष्णेनचित्रकर्मामरद्विषः॥१२०॥सार-
थिंचास्यभल्लेनरथनीडादपातयत्॥

अर्थ- तसाच विचित्र पराक्रमी तो निर्ऋती देव अत्यंत तीक्ष्ण बाणानें कुजंभदानवाचे रथाचा ध्वज तोडून एका भल्लनामक बाणानें त्याच्या सारथ्यास रथाखालीं पाडिता जाहला.

कुजंभःकर्मतद्दृष्ट्वारात्रसेंद्रस्यसंयुगे॥१२१॥रोष
रक्तेक्षणयुतोरथादाप्लुत्यदानवः॥खड्गंजग्राहवेगेन
शरदंबरनिर्मलं॥१२२॥चर्मचोदयरवंडेंदुदशकेनवि
भूषितं॥अभ्यद्रवद्रणेदैत्योरक्षोधिपतिमोजसा॥
॥१२३॥

अर्थ- ते समयीं त्या कुजंभदैत्यानें राक्षसाधिपति निर्ऋति देवाचें युद्धांतील तें अद्भुत कर्म पाहून मोठ्या रोषानें आरक्त नयन करून रथाखालीं उडी टाकिली; आणि त्यानें शरदृतूंतील स्वच्छ आकाशासमान लखलखीत तरवार व उदय पावलेल्या अर्धचंद्रासारख्या दहा अर्धचंद्राकृति चिन्हांनीं सुशोभित अशी ढाल हातांत घेतली, व तसाच तो त्या रणभूमींत वेगानें राक्षसराज निर्ऋतीवर धांवला.

तंरक्षोधिपतिःप्राप्तंमुद्गरेणाहनद्धृदि॥सतुतेनप्र-
हारेणक्षीणःसंभ्रांतमानसः॥१२४॥तस्थावचेष्टो
दनुजोयथाधीरोधराधरः॥

अर्थ- असा तो कुजंभासुर ढाल तरवार घेऊन आपणावर आला, असें पाहून राक्षसेश्वर निर्ऋतिदेवानें त्या दैत्याचे हृदयावर मुद्गलानें प्रहार-

केला; तेव्हां त्या महारानें तो दानव मनांत अत्यंत व्यथा पावून ग्लान झाला; त्यामुळें तो कुजंभासुर (पृथ्वीचें धारण करणाऱ्या अचल पर्वता सारिखा) चलन वलन रहित होऊन राहिला.

समुहूर्तंसमाश्वस्तोदानवेंद्रोतिदुर्जयः॥१२५॥रथमारुह्यजग्राहरक्षोवामकरेणतु॥

अर्थः– आणि जिंकण्या विषयीं अति कठीण तो दानवश्रेष्ठ कुजंभासुर न साच दोन घटिका पर्यंत विश्रांति घेऊन ग्लानी जातांच त्या निर्ऋतीचे रथावर चढला; आणि त्यानें निर्ऋतीस डाव्या हातानें धरिलें.

केशेषुनिर्ऋतिंदैत्योजानुनाक्रम्यधिष्ठितं॥१२६॥ ततःखड्गेनचशिरश्छेत्तुमैच्छदमर्षणः॥

अर्थः– नंतर तो कुजंभदैत्य आपले गुडघ्यानीं निर्ऋतिदेवास दाबून धरून रोषानें त्याचा तरवारीनें शिरच्छेद करण्या विषयीं उद्युक्त झाला.

तस्मिन्नंतरेदेवोवरुणोपांपतिर्द्रुतं॥१२७॥पाशेनदानवेंद्रस्यबबंधचभुजद्वयं॥

अर्थः– तो त्या संधींत सर्व उदकांचा स्वामी वरुण देवानें ती निर्ऋतीची अवस्था पाहून आपले पाशानीं मोठ्या त्वरेनें त्या दानवश्रेष्ठ कुजंभासुराचे दोन्ही भुज बांधले.

ततोबद्धभुजंदैत्यंविफलीकृतपौरुषं॥१२८॥ताडयामासगदयादयामुत्सृज्यपाशधृक्॥

अर्थः– नंतर हात बांधल्यानें त्याचा सर्व पराक्रम व्यर्थ जाहला; अशा त्या कुजंभदैत्यास पाश धारण करणाऱ्या वरुणानें मनांत दयान धरितां गदेनें ताडन केलें.

सतुतेनप्रहारेणस्रोतोभिःक्षतजंवमन्॥१२९॥दधाररूपंमेघस्यविद्युन्मालालतावृतं॥

अर्थः– तेव्हां त्या गदाप्रहारानें तो कुजंभासुर मुखादिक इंद्रियांचे द्वारानीं रक्त ओकूं लागला; असतां, त्या कालीं त्या दैत्यानें रूप, विजांचे समुदायानें युक्त मेघां सारखें दिसूं लागलें.

तदवस्थागतंदृष्ट्वा कुजंभंमहिषासुरः॥१३०॥त्या

वक्त्रवदनेगाधेग्रस्तुमैच्छत्सुरावुभौ ॥ निर्ऋतिंवरु-
णंचैवतीक्ष्णादंष्ट्रोत्कटाननः ॥ १३१ ॥

अर्थः तेसमर्थी अशीती कुजंभासुराची दशा झालेली पाहून तो तीक्ष्णदा- ढांयुक्त भयंकर मुखाचा महिषासुर आपलें अतिखोल मुख पसरून त्या मुखांत निर्ऋति व वरुण या दोन्हीदेवांस गिळण्याच्या इच्छेनें त्यांचे अं गावर धांवला.

तावभिप्रायमालक्ष्यतस्यदैत्यस्यदूषितं ॥ त्यक्त्वा
रथपथंभीतौमहिषस्यातिरंहसा ॥ १३२ ॥

अर्थ- तेव्हां ते निर्ऋति व वरुण हे देव त्या महिषासुराचा दुष्ट अभिप्रा य जाणून महिषासुराच्या अत्यंत वेगानें भयभीत होऊन त्यांनीं त्याच्या रथाचा मार्ग सोडिला.

भृशंद्रुतौजवाद्दिग्भ्यामुभाभ्यांभयविह्वलौ ॥ जगा
मनिर्ऋतिः क्षिप्रंशरणंपाकशासनं ॥ १३३ ॥

अर्थ- आणि ते निर्ऋति व वरुण हे दोघेही त्या महिषासुराच्या भयानें व्याकुल होऊन शीघ्र वेगानें दोन दिशांनीं पळाले; त्यांत निर्ऋति मोठ्यात्व रेनें इंद्रास शरण गेला.

क्रुद्धस्तुमहिषोदैत्योवरुणंसमभिद्रुतः ॥ तमंतकमु
खासक्तमालोक्यहिमवद्द्युतिः ॥ १३४ ॥ चक्रेसोमा
स्त्रनिसृष्टंहिमसंघातकंटकं ॥

अर्थ- पश्चात् असा क्रोधायमान झालेला तो महिषासुर वरुणाचे अंगा वर धांवला; आणि त्यास तो दैत्य गिळूं लागला; असतां त्या मृत्युरूप महि षासुराचे तोंडांत सांपडलेल्या वरुणास पाहून शीतकांति युक्त चंद्रानें आ पलें सोमास्त्र सोडून त्या पासून कांट्यांच्या टोंचण्या सारखा अतिशयें थं डीचा समुदाय उत्पन्न केला.

वायव्यंचास्त्रमतुलंचंद्रश्चक्रेद्वितीयकं ॥ १३५ ॥ वा
युनातेनचंद्रेणसंशुष्केणहिमेनच ॥ व्यथितादान
वाः सर्वेशीतोच्छिन्नाविपौरुषाः ॥ १३६ ॥ नशेकु-
श्चलितुंपद्भ्यांनास्त्राण्यादातुमेवच ॥

अर्थ.- नंतर चंद्रानें त्या असुरांवर दुसरें अद्भुत वायव्यास्त्र सोडिलें; तेव्हां त्या वायुसहित थंडीच्या तीक्ष्ण कडाक्यानें ते सर्व दानव अत्यंत व्यथित जाहले असतां त्यांचा पराक्रम सर्वथा व्यर्थ झाला; त्यामुळें ते सर्व असुर पाय हालविणें अथवा हातानें शस्त्र घेणें या विषयीं ही असमर्थ झाले.

महाहिमनिपातेन शस्त्रैश्चंद्रप्रचोदितैः ॥ १३७ ॥ गा-
त्राण्यसुरसैन्यानामदह्यंतसमंततः ॥

अर्थ.- या प्रमाणें त्या मोठ्या थंडीच्या कडाक्यानें व चंद्रानें मारलेल्या दुसऱ्या शस्त्रानीं तारकासुराच्या सैन्यांतील सर्व असुरांचीं सर्वांगें चोहीं कडून जळूं लागलीं.

महिषोनिष्प्रयत्नस्तु शीतेनाकंपिताननः ॥ १३८ ॥ ब
ाहोवालंब्य पाणिभ्यामुपविष्टोह्यधोमुखः ॥

अर्थ.- तसाच तो महापराक्रमी असूनहीं महिषासुर त्या अस्त्रा संबंधी थंडीच्या वेगानें युद्धाविषयींच्या सर्व प्रकारच्या प्रयत्नानें रहित होऊन त्याचें तोंड थरथरां कांपूं लागलें असतां, तो दैत्य आपले दोन्ही हात उराशीं लावून खालीं गुडघ्यांत तोंड घालून बसला.

सर्वेतेनिष्प्रतीकारादैत्याश्चंद्रमसाजिताः ॥ १३९ ॥
रणेच्छांदूरतस्त्यक्त्वातस्थुस्तेजिवितार्थिनः ॥

अर्थ.- आणि वायव्यास्त्र सहित त्या हिमास्त्रावर प्रतीकार करण्याविषयीं असमर्थ असे सर्व दैत्य चंद्रानें जिंकले असतां ते युद्ध करण्याची इच्छा दूर टाकून आपले प्राण वांचविण्याच्या इच्छेनें जागच्या जागीं तेथेंच उभेराहिले.

तत्राब्रवीत्कालनेमिर्दैत्यान्कोपेनदीपितः ॥ १४० ॥
भोभोश्शृंगारिणः शूराः सर्वेशस्त्रास्त्रपारगाः ॥

अर्थ.- त्या कालीं दैत्यांचे सैन्यांतील महावीर कालनेमिदैत्य अत्यंत क्रोधानें व्याप्त होऊन त्या सर्व सैन्यांतील प्रमुख योद्ध्यांस बोलला कीं, दैत्य हो तुम्ही सर्वही विलासी असून शूर व संपूर्ण शस्त्रें व अस्त्रें यांत पारंगत आहांत.

एकैकोपिजगत्सर्वंशक्तस्तुलयितुंभुजैः ॥ १४१ ॥ ए

कैकोपिक्षमोग्रस्तंजगत्सर्वंचराचरं ॥

अर्थ- त्याच प्रमाणें तुम्हीं एकेकरेही आपले भुजांनीं सर्वजग हालवि ण्याविषयीं समर्थ आहांत; आणि तुम्हीं एकेकरेही सर्वचराचर जग ग्रास ण्यास समर्थ आहांत.

एकैकस्यापिपर्याप्तानसर्वेपिदिवौकसः ॥ १४२ ॥ कलांपूरयितुंयत्नात्षोडशीमतिविक्रमाः ॥

अर्थ- तसेंच सर्वही स्वर्गवासी देव अत्यंत पराक्रमी असूनही ते मो- ठ्या यत्नानें ही तुमच्या एकेकस्याच्याही सोळाव्या कळेचीं बरोबरी करण्या- स समर्थ नाहींत.

किंप्रयाताश्चतिष्ठध्वंसमरेमरनिर्जिताः ॥ १४३ ॥ नयुक्तमेतच्छूराणांविशेषाद्दैत्यजन्मनां ॥

अर्थ- असें असून तुम्हीं त्या संग्रामांत देवांपासून पराजयपावून माघारे जातां हें काय? तस्मात् तुह्मीं ह्या देवांशीं युद्धार्थ उभेरहा; कारण युद्ध सोडू- न पळणें शूरांस उचित नाहीं, आणि त्यांतून तुह्मीं दैत्य कुळांत जन्मले आ हांत; तेव्हां तुम्हासनर युद्धांतून पलायन करणें ही गोष्ट विशेषें करून अनु चित आहे.

राजाचांतरितोस्माकंतारकोलोकमारकः ॥ १४४ ॥ विरतानांरणादस्मात्क्रुद्धः प्राणान्हरिष्यति ॥

अर्थ- आणि लोकांस निर्दयपणें मारणारा आपला राजा तारकासुर ये थून बहुत अंतरावर लांब आहे तर आपण या रणांतून मागें फिरलों अ- सतां तो तारकासुर अत्यंत क्रुद्ध होऊन आपले प्राण हरण करील.

शीतेननष्टश्रुतयोभ्रष्टवाक्पाटवास्तथा ॥ १४५ ॥ मूकास्तदाभवन्दैत्यारणद्दशनपंक्तयः ॥

अर्थ- तसेंच ते सर्व दैत्य तेसमयीं त्या थंडीच्या योगानें कानानीं बहिरे होऊन त्यांस वाचेनेंही नीट स्पष्ट बोलतां येईनासें झालें; व त्या थंडीनें त्या असुरांच्या दंतपंक्ती वाजूं लागल्या; तेणें करून ते अगदीं मुक्या सारखे झा ले.

तान्दृष्ट्वानष्टचेतस्कान्दैत्यान्शीतेनसादितान् ॥

१४६॥ मत्वाकालक्षमं कार्यंकालेमिर्महासुरः॥

अर्थ- असेते दैत्य त्या थंडीनें पीडित जाहल्यामुळें त्यांचे चित्तास कांहीं एक-इति कर्तव्यता सुचे नासें झालें हें पाहून तो महान् असुर कालनेमि त्या आपत्कालीं आपलें कार्य करण्या विषयीं समर्थ असा एक उपाय मनांत योजून करिता जाहला.

आश्रित्यदानवींमायांवितत्यस्वंमहावपुः॥१४७॥
पूरयामासगगनंदिशोविदिशएवच॥

अर्थ- तो असाकीं, त्या कालनेमि दानवानें आपल्यां दानवी मायेचा आश्रय करून आपलें शरीर असें मोठें वाढविलें कीं, त्या देहानें पूर्वादिक मुख्य चारदिशा व अवांतर आग्नेयादि कोणदिशा या सर्व व्यापून गेल्या.

निर्ममेदानवेंद्रेशोशरीरेभास्करायुतं॥१४८॥ दिश
श्चमाययाचंडैःपूरयामासपावकैः॥

अर्थ- आणि त्या दानवश्रेष्ठ कालनेमीनें वृद्धिंगत केलेल्या आपले शरीरावर मायेनें दहा हजार सूर्य उत्पन्न केले; तसेच मायेनें सर्व दश दिशा प्रज्वलित अग्नीनीं व्याप्त केल्या.

ततोज्वालाकुलंसर्वंत्रैलोक्यमभवत्क्षणात्॥१४९
॥तेनज्वालासमूहेनहिमांशुरगमच्छमं॥

अर्थ- तेव्हां तेणें करून क्षणमात्रांत सर्व त्रैलोक्य अग्नीच्या ज्वालानीं-व्याप्त जाहलें असतां, त्या ज्वालांचे समुदायानें चंद्राचें तें हिमास्त्र शांत-जाहलें.

ततःक्रमेणविभ्रष्टशीतदुर्दिनमाबभौ॥१५०॥त
द्बलंदानवेंद्राणांमाययाकालनेमिनः॥

अर्थ- मंतर कालनेमि दानवाच्या त्या मायेनें क्रमानें ती चंद्राच्या अस्त्रापासून उत्पन्न झालेली शीत (थंडी) व धुकें हीं नाहींशीं जाहलीं असतां मोठमोठ्या श्रेष्ठ दानवांचें तें सैन्य शोभूं लागलें.

तं दृष्ट्वादानवानीकंलब्धसंज्ञंदिवाकरः॥१५१॥उ
वाचारुणमुद्भ्रांतकोपाल्लोकैकलोचनः॥

अर्थ- असें तें दानवांचें सैन्य मन आदिकरून इंद्रियांचे शक्तीनें युक्त-

जाहलें असतां तें पाहून सर्वलोकांचा केवळ एकनेत्र रूप सूर्य आपले अरुण नामक सारथ्यास अत्यंत कोपानें बोलतो.

दिवाकरउवाच ॥ नयारुणरथंशीघ्रंकालनेमिरथो-
यतः॥ १५२॥ विमर्दस्तत्रविषमोभविताश्शूरसंक्ष-
यः ॥

अर्थ.– कीं, हे अरुणासारथे, जेथें कालनेमिचा रथ आहे, तेथें माझारथ त्वरेनें ने; कारण शूरांचा अत्यंत क्षय होणारा असा भयंकर युद्धप्रसंग आज त्या कालनेमीशीं मला कर्तव्य आहे.

एषोजितःशशांकोत्रतद्बलंबलमाश्रितं ॥१५३॥इ
त्युक्तश्चोदयामासरथंगरुडपूर्वजः ॥

अर्थ.– पहाकीं, हें असुरानें सैन्य त्या कालनेमीच्या पराक्रमाचा आश्रय करून जय पावलें आणि या चंद्राचा सर्व पराक्रम व्यर्थ होऊन तो पराजित झाला आहे असें सूर्याचें आज्ञा वचन ऐकतांन गरुडाचा ज्येष्ठबंधु अरुण नामक सारथी तो सूर्याचा रथ कालनेमी कडे चालवूं लागला.

प्रयत्नविधृतैरश्वैःसितचामरमालिभिः ॥१५४॥
जगद्दीपोथभगवान्जग्राहविततंधनुः॥

अर्थ.– आणि त्या अरुणा सारथ्यानें शुभ्रचवऱ्या व सुवर्णादिक अनेक माला यानीं सुशोभित असून प्रयत्नानें विशेषें करून धरलेले अशा घोड्यानीं युक्त अशा त्या रथांत सर्वजगास प्रकाश करणारा भगवान् सूर्य बसून त्यानें हातांत मोठें विशाल धनुष्य घेतलें.

शरौचद्वौमहाभागोदिव्यावाशीविषद्युती ॥१५५॥
संचारास्त्रेणसंधायबाणमेकंससर्जसः॥

अर्थ.-- आणि त्या महाभाग्यशाली सूर्यानें नागासारखे तेजस्वी असे दिव्य दोन बाण घेऊन त्यांतील एक बाण संचारास्त्राचे मंत्रानें अभिमंत्रण करून तो बाण धनुष्यास लावून त्यानें देव व दैत्य यांचे दोन्ही सैन्यांवर सोडला.

द्वितीयमिंद्रजालेनयोजितंप्रभुमोचह ॥१५६॥ सं-
चारास्त्रेणरूपाणांक्षणाच्चक्रेविपर्ययम्॥

अर्थ- तसाच दुसरा बाण इंद्र जालास्त्राचे मंत्रानें अभिमंत्रण करून कालनेमीऱ्या सैन्यावर टाकला; तेव्हां त्या संचारास्त्राच्या प्रयोगानें देव व असुर यांचे उभय सैन्यांतील योध्यांचीं रूपें क्षणमात्रांत पालटलीं

देवानांदानवंरूपंदानवानांच दैविकं ॥१५७॥ मत्वा-
सुरान्स्वकानेवजघ्नेघोरास्त्रलाघवात्॥ कालनेमी
रुषाविष्टः कृतांतइवसंक्षये ॥१५८॥

अर्थ- तीं अशीं कीं, देवांस दानवांचेंरूप प्राप्त जाहलें, व दानवांचें रूप देवांसारखें दिसूं लागलें; तेव्हां आपल्या दानवांस हे देव आहेत; असें मानून तो कालनेमी (प्रलय कालाच्या संहार करणाऱ्या रुद्रा सारखा) क्रोधाविष्ट होऊन त्यानें भयंकर अस्त्राच्या प्रयोगानें त्या असुरांस त्वरेनें मारण्यास आरंभ केला.

कांश्चित्खड्गेनतीक्ष्णेनकांश्चिन्नाराचवृष्टिभिः॥ कां
श्चिद्गदाभिर्घोराभिः कांश्चित्घोरैःपरश्वधैः॥१५९

अर्थ- तो असा कीं, कितीएक दैत्यांस तीक्ष्ण तरवारीनें मारूं लागला, कित्येक असुरांस पोलादी अग्रांचे बाणानीं मारूं लागला; तसेच कांहीं एक दानवांचें त्या कालनेमिदैत्यानें भयंकर गदेखालीं चूर्ण केलें व कोणा एकांचे तीक्ष्ण कुऱ्हाडीनें शिरच्छेद केले.

शिरांसिकेषांचिदपातयच्चभुजान्रथान्सारथीं-
श्चोग्रवेगः॥ कांश्चित्पिपेषाथरथस्यवेगात्कांश्चि
त्क्रुधाचोद्यतमुष्टिपातैः॥१६०॥

अर्थ- आणि उग्र वेगयुक्त तो कालनेमी असुर त्या रणभूमींतील आपलेच सैन्यांत किती एक दानवांचीं मस्तकें व हात तोडून खालीं पाडूं लागला. तसेंच कित्येक दैत्यांचे रथ व सारथी यांस ताडन करून भूमीवर पाडूं लागला, त्या प्रमाणें, वेग युक्त आपले रथा खालीं कितीएक पायदळांतील शूरांचें चूर्ण करूं लागला; त्या कालनेमि दैत्यानें क्रोधें करून आपले मुष्टि प्रहारानें कितीएक असुरांस ताडन केलें.

रणेविनिहतान्दृष्ट्वानेमिःस्वान्दानवाधिपः॥ रूपंस्वं
नप्रपद्यंतत्वसुराःसुरधर्षिताः॥१६१॥

अर्थ:- नंतर कांहीं कालानें कितीएक दानवांचा राजा नेमि नामक असुर-त्या रणांत आपले बहुत दानव कालनेमीनें मारले असून ते देवांच्या संचारास्त्रानें देवांनें रूप पावले असतां पुनः त्या दैत्यांस आपलें असुर रूप प्राप्त होईना असें जाहलें.

कालनेमीरुषाविष्टस्तेषांरूपंनबुद्धवान्॥ नेमिदै-
त्यस्तुतान्दृष्ट्वाकालनेमिमुवाचह॥१६२॥

अर्थ:- तथापि ते समयीं कालनेमिदैत्य क्रोधानें व्यासजाला होता; त्यामुळें त्यानें स्वकीय असुरांचें ते देवांच्या अस्त्रानें बदललेलें रूप जाणलेंनाहीं; परंतु त्या नेमिदैत्यानें त्या सर्व असुरांचें पालटलेलें रूप ओळखून तो कालनेमीस बोलतो.

अहंनेमिःसुरोनैवकालनेमेविदस्वमाम्॥ भवतामो
हितेनाजौ निहताभूरिविक्रमाः॥१६३॥ दैत्यानांदश
लक्षाणि दुर्जयानांसुरैरिह॥

अर्थ:- कीं, हे कालनेमिदैत्या, मी नेमिनामा दानव आहें; देवतर सर्वथा नव्हे; तूं मला हा नेमिदैत्य आहें असें समज; कारण या संग्रामांत त्वां देवांच्या अस्त्रानें मोह पावून देवांसही जिंकण्याविषयीं अशक्य असे महा पराक्रमी दहा लक्ष दैत्य मारिले.

सर्वास्त्रवारणंमुंचब्राह्ममस्त्रंत्वरान्वितः॥१६४॥स
तेनबोधितोदैत्यः संभ्रमाकुलचेतनः॥ योजयामास
बाणंहिब्रह्मास्त्रविहितेनतु॥१६५॥मुमोचचापिदैत्ये
द्रःसस्वयंसुरकंटकः॥

अर्थ:- तस्मात् हे कालनेमे तूं आतां सर्व अस्त्रांचें निवारण करणारें ब्रह्मास्त्र त्वरेनें सोड असा त्या नेमिनामक असुरानें बोध केला असतां, त्या दैत्यश्रेष्ठ कालनेमिदानवानें त्वरायुक्त अंतःकरणें करून ब्रह्मास्त्राच्या मंत्रानें अभिमंत्रित केलेला बाण धनुष्यास लावून देवांस कांट्यासारखें दुःख देणाऱ्या त्या कालनेमीनें तो बाण सोडला.

ततोस्त्रतेजसाव्याप्तंत्रैलोक्यंसचराचरं॥१६६॥दे-
वानांचाभवत्सैन्यंसर्वमेवभयान्वितं॥

अर्थ:- तेव्हां त्या ब्रह्मास्त्राच्या तेजानें सर्वचराचर त्रैलोक्य व्याप्त जाहलें, तेणें करून देवांचें सर्वही सैन्य भयानें व्याकुल जाहलें.

संचरास्त्रंचसंशांतंस्वयमायोधनेबभौ ॥ १६७ ॥ तस्मिन्प्रतिहतेत्वास्त्रे भ्रष्टतेजादिवाकरः ॥ महेंद्रजालमाश्रित्यचक्रेस्वांकोटिशस्तनुं ॥ १६८ ॥

अर्थ:- आणि तें ब्रह्मास्त्र त्या संग्रामभूमींत स्वकीयतेजानें शोभूं लागलें; तेव्हां पूर्वीचें सूर्यानें सोडलेलें संचारास्त्र स्वयें आपल्या आपच शांतजाहलें; असतांतें अस्त्र कुंठित झाल्यामुळें सूर्य निस्तेज जाहला, आणि त्या सूर्यानें मोठ्या इंद्रजाल मायेचा आश्रय करून त्या मायेनें आपणासारखे कोटिशः सूर्य निर्माण केले.

विस्फूर्जत्करसंपातसमाक्रांतजगत्त्रयं ॥ ततापदानवानीकंगतमज्जौघशोणितं ॥ १६९ ॥

अर्थ:- तेणें करून त्या सूर्यांचे अतितीक्ष्ण किरणांच्या जमून पडलेल्या तेजानें जगत्त्रय व्याप्त झालें असतां, तें दानवांचें सैन्य असें तप्त झालें कीं, त्यांचे अंगांतील सर्व मज्जा नामक धातू व रक्त हीं अगदीं शुष्क होऊन गेलीं.

ततश्चावर्षदनलंसमंतादतिसंहतं ॥ चक्षूंषिदानवेंद्राणांचकारांधानिचप्रभुः ॥ १७० ॥

अर्थ:- नंतर तो समर्थ सूर्य, मायेनें उत्पन्न केलेल्या त्या कोटिशः सूर्यांचे किरणांतून अत्यंत दाट अग्नीची वृष्टी करूं लागला; तेव्हां त्या अग्नीच्या वृष्टीमुळें त्या असुरदानवांच्याही नेत्रांस दिसेनासें झालें.

गजानामगलन्मेदुः पेतुश्चाप्यरवाभुवि ॥ तुरगानिश्वसंतश्चघर्मार्तारथिनोपिच ॥ १७१ ॥

अर्थ:- आणि त्या सूर्यकिरणांचे तप्ततेनें हत्तींच्या अंगांतील सर्व मेद गळून ते हत्ती शब्द न करितां भूमीवर पडले; तसेच घोडे व रथांत बसणारे हे सर्वही त्या सूर्यकिरणांचे उष्णानें पीडित होऊन श्वासोच्छ्वास टाकीत राहिले.

इतश्चेतश्चसलिलंप्रार्थयंतस्तृषातुराः ॥ पच्छाय विटपांश्चैवगिरीणांगह्वराणिच ॥ १७२ ॥

अर्थ:- नंतर ते दानव सैन्यांतील योद्धे सूर्य किरणांच्या तापामुळें तृषाक्रांत जाहले असतां, ते उदकाच्या अत्यंत इच्छेनें जेथें बहुत च्छायांच्या शाखानीं युक्त असे वृक्ष व पर्वताच्या गुहा इत्यादिक स्थानीं हलःहलः धांवूं लागले.

दावाग्निः प्रज्वलंश्चैव घोरार्चिर्दग्धपादपः ॥ तोयार्थिनः पुरोदृष्टा तोयं कल्लोलमालितं ॥ १७३ ॥ पुरस्थितमपिप्राप्तुं न शेकुरवमर्दिताः ॥

अर्थ:- ते समयीं त्या सूर्य किरणां पासून उत्पन्न झालेल्या प्रज्वलित दावाग्नीनें आपल्या भयंकर ज्वालानीं ते असुर ज्याज्या वृक्षां खालीं छायेसाठीं गेले होते ते सर्व वृक्ष जाळिले; आणि उदक प्राशन करण्याची इच्छा करणारे ते दैत्य बहुत लाटानीं युक्त जल अग्रभागीं पाहूनही ते दैत्य त्या दावाग्नीनें पीडित जाहल्यामुळें पुढलें जवळनें तें पाणी प्राशन करण्यास समर्थ झाले नाहींत.

अप्राप्य सलिलं भूमौ व्यात्तास्या गतचेतसः ॥ १७४ ॥ तत्र तत्र व्यदृश्यंत मृता दैत्येश्वरा भुवि ॥

अर्थ:- तेव्हां तें उदक पिण्यास न मिळाल्या मुळें, ते बुद्धिनाश पावलेले मोठे मोठे दैत्य तोंडें पसरून भूमीवर पडून जागच्याजागीं तेथेंच मरण पावलेले दिसूं लागले.

रथे गजाश्च पतिता स्फुरगाश्च समापिताः ॥ १७५ ॥ स्थिता वमंतो धावंतो गलद्रक्तवसासृजः ॥

अर्थ:- त्याच प्रमाणें मोठे हत्ती रथावर पडले असतां, ते रथ चूर्ण होऊन त्यांचे घोडे मरण पावले; आणि किती एक हत्ती, घोडे त्या वणव्याच्या अग्नीनें व्यथा पावून जागचे जागीं उभे राहून ओकूं लागले; किती एकांचीं अंगें त्या अग्नीनें जळाल्या मुळें ते अंगांतून रक्त व चर्बी गळत असून तसेच धांवूं लागले.

दानवानां सहस्त्राणि व्यदृश्यंत मृतानि तु ॥ १७६ ॥ संक्षये दानवेंद्राणां तस्मिन्महति वर्तिते ॥ प्रकोपो च्छूनताम्राक्षः कालनेमी रुषातुरः ॥ १७७ ॥ अभवत्क

त्यमेघाभः स्फुरद्भूरिशतह्रदः॥ गंभीरास्फोटनिन्हादजगत्भृदयघट्टकः॥ १७८॥ प्रच्छाद्यगगनाभोगंरविमायांव्यनाशयत्॥

अर्थ- असे हजारों दानव मृत्यु पावलेले त्या रणभूमींत दृष्टी पडूं लागले, याप्रमाणें दानवश्रेष्ठांचा महान्‌संहार झाला असतां तो पाहून कालनेमि दैत्य अत्यंत कोपानें आरक्त नेत्र वटारून आपल्ये दानवी मायेनें देदीप्यमान मोठ मोठ्या शेंकडों पाणी भरण्याचे कोठ्यांनीं युक्त असून आपल्या गंभीर गर्जनेनें सर्व जगाचें ह्रदय कंपित करणारा असा क्रोधायमान प्रळय मेघासारखा मेघ झाला; आणि त्या असुरानें आकाशाचा सर्व प्रदेश व्यापून सूर्याच्या त्या मायेचा समूल नाश केला.

शीतंववर्षसलिलंदानवेंद्रबलंप्रति॥ १७९॥ दैत्यास्तांवृष्टिमासाद्यसमाश्वस्तास्ततः क्रमात्॥

अर्थ- तो असा कीं, तो कालनमी दानव त्या मेघरूपानें आपले मोठमोठ्या दानवांचे सैन्यावर गार पाण्याची वृष्टि करूं लागला असतां त्या उदकाचे वृष्टीनें सूर्य किरणानीं झालेल्या तापाची शांति होतांच ते दैत्य क्रमानें हळू हळू स्वस्थ जाहले.

बीजांकुराइवाम्लानाः प्राप्यवृष्टिंधरातले॥ १८०॥ ततः समेघरूपीतुकालनेमिर्महासुरः॥ शस्त्रवृष्टिंववर्षोग्रांदेवानीकेषुदुर्जयः॥ १८१॥

अर्थ- ते असे कीं, जसे धान्यादि बीजांचे अंकुर पूर्वी उन्हानें शुष्क झालेअसून त्यांवर पर्जन्य वृष्टि झाल्यानें ते अंकुर जसे टवटवीत होतात तसे ते सर्व दानव त्या मेघरूपी कालनेमीनें आपले सैन्यावर पर्जन्य वृष्टी केल्यावर स्वस्थ जाले, नंतर अतिपराक्रमी त्या महादैत्य कालनेमीनें देवांच्या सैन्यावर तीक्ष्ण शस्त्रांची वृष्टि केली:

तयावृष्ट्याबाध्यमानादैत्येंद्राणांमहौजसां॥ गतिंकांचनपश्यंतोगावः शीतार्दिताइव॥ १८२॥

अर्थ- तेव्हां त्या कालनेमिप्रभृति महा दैत्यांच्या त्या शस्त्रास्त्रांच्या वृष्टीनें देव पीडित झाले असतां, गायी थंडीच्या कडाक्यानें व्यथित जाहल्या अस-

तां त्यांची जशी अवस्था होते, तसें त्या देवगणांस आतां या शत्रूंचे शस्त्र प्रहारानें आपली गती काय होईल; किंवा आपण यांतून कसे मुक्त होऊं हें कांहींच समजेनासें झालें.

परस्परंव्यलीयंतपृष्ठेषुव्यस्त्रपाणयः॥ स्वेषुबाधेव्य लीयंतगजेषुतुरगेषुच॥ १८३॥

अर्थः- आणि ते देव आपणांवर शत्रूंचे शस्त्रांची बाधा प्राप्त झाली असतां, हातांतील शस्त्रें टाकून परस्परांचे मागें दडूं लागले; तसेच कांहीं देव आपापले हत्ती व घोडे यांचे आड दडले.

रथेषुत्वमराश्चस्तास्तत्र तत्रनिलिल्यिरे॥ अपरेकुं चितेर्गात्रैःस्वहस्तपिहिताननाः॥ १८४॥

अर्थः- त्याच प्रमाणें किती एक देव आपापले रथांत लपून राहिले; व कोणी इतर देव आपलीं सर्व अंगें पोटाशीं आखडून घेऊन हातानीं तोंड झांकून जागचे जागीं बसले.

इतश्चेतश्चसंभ्रांताबभ्रमुर्वैदिशोदश॥ एवंविधेतु संग्रामेतुमुलेदेवसंक्षये॥ १८५॥ दृश्यंतेपतिताभू मौशस्त्रभिन्नांगसंधयः॥

अर्थः- तसेच कोणी देव भयानें अत्यंत अव्यवस्थित चित्त झाल्यामुळें इकडून तिकडे अशा रीतीनें दश दिशांस धांवूं लागले; अशा त्या देवदैत्यांचे संग्रामांत देवांचा अतिशयें संहार चालला असतां, त्या रणभूमींत दैत्यांचे शस्त्रानीं देवांच्या अंगांचे सांधे फुटून ते बहुत देव पडलेले दिसूं लागले.

विभुजाभिन्नमूर्धानस्तथाछिन्नोरुजानवः॥ १८६ विपर्यस्तरथासंगानिष्पिष्टध्वजपंक्तयः॥

अर्थः- त्याच प्रमाणें किती एक देवांचे भुज तुटले होते, किती एकांचीं मस्तकें फुटलीं, तशींच कित्येक देवांचे दैत्यांच्या शस्त्रानीं मांड्या व गुढघे तुटले; व किती एकांच्या रथांचीं चक्रादिक अंगें अस्ताव्यस्त होऊन त्यांच्या अनेक ध्वजांचें चूर्ण झालें.

निर्भिन्नांगैस्तुरंगैस्तुगजैश्चाचलसन्निभैः॥ १८७ ॥ स्खलरक्तन्हदेर्भूमिर्विकृताः विकृताबभौ॥

अर्थ- आणि त्या देवदैत्यांचे युद्धांत फुटलेल्या अंगांचे घोडे व पर्वतप्राय शरीरी हत्ती यांचे अंगांतून वाहणाऱ्या रक्तांच्या डोहानीं पृथ्वी स्वतः मुळची विकारयुक्त नसून ती रणभूमी विकारयुक्त दिसूं लागली.

एवमाजौबलीदैत्यः कालनेमिर्महासुरः ॥१८८॥ ज
घ्नेमुहूर्तमात्रेणगंधर्वाणांदशायुतं ॥

अर्थ- या प्रमाणें बलिष्ठ असुरश्रेष्ठ कालनेमि दैत्यानें त्या युद्धांत तत्काळ दोन घटिकांत एक लक्ष गंधर्व मारिले.

यक्षाणांपंचलक्षाणिरक्षसामयुतानिषट् ॥१८९॥
त्रीणिलक्षाणिजघ्नेसकिन्नराणांतरस्विनो ॥

अर्थ- आणि त्या कालनेमीनें पांच लक्ष यक्ष, राक्षसांचें साठ हजार सैन्य व महा वेगवंत तीन लक्ष किन्नर गण यांस मारिलें.

जघ्नेपिशाचमुख्यानांसप्तलक्षाणिनिर्भयः॥१९०॥
इतरेषामसंख्याताः सुरजातिनिकायिनां॥जघ्ने
सकोटीः संक्रुद्धश्चित्रास्त्रैरस्त्रकोविदः॥१९१॥

अर्थ- तसेच त्या निर्भय कालनेमीनें देवांकडील सात लक्ष प्रमुख पिशाच मारिले, आणि सर्व अस्त्रांत निपुण अशा त्या कालनेमीनें चित्रविचित्र अनेक अस्त्रानीं अत्यंत क्रोधें करून देवजातीच्या समुदायांतील याहून इतर जातीचें तर असंख्यात देव मारिले.

एवंपरिभवेभीमेतदात्वमरसंक्षये॥संक्रुद्धावश्वि
नौदेवौचित्रास्त्रकवचोज्वलौ ॥१९२॥

अर्थ- असा दैत्यांपासून देवांस अत्यंत संहाररूप भयंकर पराभवाचा समय प्राप्त झाला असतां, त्या कालीं चित्र विचित्र अस्त्रें व कवचें यानीं सुशोभित ते सूर्य पुत्र अश्विनी कुमार देव त्या कालनेमि असुरावर अत्यंत क्रुद्ध जाहले.

जघ्नतुः समरेदैत्यंकृतांतानलसन्निभं॥तमासा
द्यरणेघोरमेकैकः षष्टिभिः शरैः॥१९३॥ जघ्नेमर्म
सुतीक्ष्णाग्रैरसुरंभीमदर्शनम् ॥

अर्थ- आणि ते अश्विनी कुमार युद्धांत प्रलयाग्नी समान उग्र कालनेमि

दैत्यास मारूं लागले; तें असें कीं, ते दोघेही अश्विनीकुमार त्या रणभूमींत उग्र कालनेमी जवळ घेऊन त्या प्रत्येक देवानीं तीक्ष्ण अग्रयुक्त साठबाणानीं त्या भयंकर रूप असुराचे सर्व मर्म स्थानांवर ताडन केलें.

ताभ्यांबाणप्रहारैःसकिंचिदायस्तचेतनः॥१९४॥
जग्राहच्चक्रमष्टारंतैलधौतंरणांतकं॥

अर्थ:- तेव्हां त्या अश्विनीकुमारानीं केलेल्या बाणांचे प्रहारानीं त्या कालनेमीचे मनास किंचित् दुःख झालें तरी तसेंच त्यानें धैर्य धरून तेलानें साहाणेवर घासलेलें, रणांत मृत्यू सारखें भयंकर असें आठ अरांचें चक्र हातांत घेतलें.

तेनचक्रेणसोश्विभ्यांचिच्छेदरथकूबरं॥१९५॥
जग्राहाथधनुर्दैत्यःशरांश्वाशीविषोपमान्॥ ववर्षभिषजोर्मूर्ध्निसंछाद्याकाशगोचरं॥१९६॥

अर्थ:- आणि कालनेमीनें त्या चक्रानें, घोडे जोडलेले रथाचें लांकूड तोडलें; मग त्या दैत्यानें धनुष्य घेऊन त्यास सर्पा समान अति उग्र बहुत बाण लाऊन त्या देव वैद्य अश्विनीकुमारांचे मस्तकावर अशी त्या बाणांची अति वृष्टी केली कीं, त्या बाण वृष्टीनें त्यांचे मस्तकावरील आकाश आच्छादित जाहलें.

तावप्यस्त्रैश्चिच्छिदतुःशितैस्तेदैत्यसायकान्॥ तच्च कर्मतयोर्दृष्ट्वाविस्मितःकोपमाविशत्॥१९७॥

अर्थ:- तेसमयीं त्या अश्विनीकुमारानींही आपले तीक्ष्ण शस्त्रानीं ते कालनेमीचे सर्व बाण तोडले; तेव्हां अश्विनीकुमारांचें तें अद्भुत पराक्रमाचें कृत्य पाहून त्या कालनेमीस विस्मय होऊन बहुत क्रोधही आला.

महतासनुकोपेनसर्वायोमयसादनं॥ जग्राहमुद्गरंभीमंकालदंडविभीषणं॥१९८॥

अर्थ:- आणि त्या कालनेमीनें मोठ्या क्रोधाच्या आवेशामुळें सर्व पोलादी शस्त्रांचेंही चूर्ण करणारा असून यमाच्या कालदंडा समान भयंकर असा अति उग्र मुद्गल हातांत घेतला.

सनतोभ्राम्यवेगेनचिक्षेपाश्विरथंप्रति॥ तंतुमुद्गरमा-

यांतमालोक्यांबरगोचरौ ॥१९९॥ स्यन्त्कारथौतुतौ
वेगादाप्लुतौतरसाश्विनौ ॥

अर्थः- नंतर कालनेमीनें तो मुद्गल वेगानें गरगर फिरवून अश्विनी कुमारांचे रथावर टाकला असतां तो मुद्गल आपले रथांवर येतो असें पाहून ते अश्विनीकुमार शीघ्र वेगानें आपले रथांतून वर आकाश मार्गी उडाले.

तौरथौसतुनिष्पिष्यमुद्गरोऽचलसन्निभः ॥२००॥ दा
रयामासधरणींहेमजालपरिष्कृतः ॥

अर्थः- पश्चात् सुवर्णाचे जाळीनें भूषित असून पर्वतासमान महान् तो मुद्गल त्या रथांवर पडतांच त्या रथांचें चूर्ण होऊन भूमीचेंही विदारण जाहलें.

तस्यकर्माश्विनौदृष्ट्वाभिषजौचित्रयोधिनौ ॥२०१
वज्रास्त्रंतुप्रकुर्वातेदानवेंद्रनिवारणं ॥

अर्थः- असें कालनेमीचें तें कर्म पाहून चित्र विचित्र युद्ध करणारे देवांचे वैद्य ते अश्विनीकुमार त्या दानवश्रेष्ठ कालनेमीचें निवारण करण्या विषयीं वज्रास्त्राचा प्रयोग करिते झाले.

ततोवज्रमयंवर्षप्रावर्तदतिदारुणं ॥२०२॥ घोरव
ज्रप्रहारैस्तदैत्येंद्रःसपरिष्कृतः ॥

अर्थः- नंतर त्या वज्रास्त्रानें वज्रांची अतिभयंकर वृष्टि चालली; तेव्हां त्या वज्रांचे कठोर प्रहारानीं तो दैत्यश्रेष्ठ कालनेमि असुर चोहीकडून व्यथित झाला.

रथोध्वजोधनुश्चक्रंकवचंचापिकांचनं ॥२०३॥
क्षणेनतिलशोजातंसर्वसैन्यस्यपश्यतः ॥

अर्थः- आणि त्या कालनेमि दानवाचा रथ, ध्वज, धनुष्य, चक्र व सोन्याचें कवच या सर्वांचेंही एक क्षणमात्र कालांत सर्व सैन्य पहात असतां तिळां सारखें चूर्ण झालें.

तदृष्ट्वादुष्करंकर्मसोश्विभ्यांभीमविक्रमः ॥२०४॥
नारायणास्त्रंबलवान्मुमोचरणमूर्धनि ॥

अर्थ:- असें तें अश्विनीकुमारानीं केलेलें दुष्कर कर्म पाहून बलिष्ठ भयंकर पराक्रमी कालनेमीनें त्या रणभूमींत त्या वज्रास्त्रावर नारायणास्त्राचा प्रयोग केला.

वज्रास्त्रंशमयामासदानवेंद्रोस्त्रतेजसा ॥ २०५॥
तस्मिन्प्रशांतेवज्रास्त्रेकालनेमिरनंतरं॥ जीवग्राहंग्राहयितुमश्विनौतुप्रचक्रमे ॥ २०६॥

अर्थ:- आणि त्या दानवश्रेष्ठ कालनेमीनें त्या नारायणास्त्राच्या तेजेंकरून तें वज्रास्त्र शमविलें; असें तें वज्रास्त्र शांत झालें असतां, मग तो कालनेमि त्या अश्विनीकुमारांस जीवंत धरण्या विषयीं प्रवृत्त झाला.

तावश्विनौरणाद्भीतौसहस्ताक्षरथंप्रति ॥ प्रयातौ वेपमानौतुपदाशस्त्रविवर्जितौ ॥ २०७॥

अर्थ:- तेसमयीं अश्विनीकुमार त्या कालनेमीशीं युद्ध करण्या पासून भयभीत होऊन कांपत कांपत हातांत शस्त्र नसून तसेच ते पायानीं धांवत इंद्राचे रथा जवळ आले.

तयोरनुगतोदैत्यः कालनेमिर्महाबलः॥ प्राप्येंद्रस्य रथंक्रूरोदैत्यानीकपदानुगः॥२०८॥

अर्थ:- तो त्या अश्विनीकुमारांच्या मागें लागलेला बलाढ्य तो कालनेमी दैत्य, ज्याचे मागून दैत्यांचीं बहुत सैन्यें चालतात असा तो क्रूर असुर इंद्राच्या रथाजवळ येऊन उभा राहिला.

तंदृष्ट्वासर्वभूतानिवित्रेसुर्विह्वलानितु ॥ दृष्ट्वादैत्यस्यतत्क्रौर्यंसर्वभूतानिमेनिरे ॥२०९॥ पराजयंमहेंद्रस्यसर्वलोकक्षयावहं॥

अर्थ:- त्या कालीं त्या कालनेमीस पाहून देव सैन्यांतील सर्व प्राणिमात्र विह्वल होत्साते त्रास पावले; आणि देव सैन्यांतील सर्व भूतानीं त्या दैत्याचें तें क्रूरत्व अवलोकन करून असें मानलें कीं, आतां या कालनेमीशीं युद्ध करण्यांत इंद्राचा पराजय होऊन सर्व लोकांचा संहार होईल.

चेलुः शिखरिणोसुरव्याः पेतुरुल्कानभस्तलात्॥२१०
जगर्जुर्जलदादिक्षु धुधूताश्चमहार्णवाः

अर्थ:- आणि ते समयीं मेरु आदिकरून सर्व मुख्य महापर्वत भयानें हाल
ले; आकाशांतून विजा पडल्या; तसेच सर्व दिशांत मेघ गर्जना करूं लाग-
ले; व संपूर्ण समुद्र क्षुब्ध होत्साते आपली मर्यादा उल्लंघन करून आली
कडे आले.

तांभूतविकृतिंदृष्ट्वाभगवान्गरुडध्वजः॥२१०॥व्यबु
ध्यताहिपर्यंकेयोगनिद्रांविहायतु॥लक्ष्मीकरयुगाज
स्रलालितांघ्रिसरोरुहः॥२११॥शरदंबरनीलाब्ज-
कांतदेहच्छविर्विभुः॥कौस्तुभोद्भासितोरस्कोकांतके
यूरभास्वरः॥२१२॥

अर्थ:- अशी त्याकाळीं कालनेमि दैत्याचे भयानें प्राणिमात्रांस विकार
युक्त अवस्था प्राप्त झालेली जाणून गरुडध्वज भगवान् विष्णु आपले
शेषरूप पर्यंका (पलंगा) वर योग निद्रेचा त्याग करून जागृत जाहला;
त्या विष्णूचें ऐश्वर्य वर्णितात; तें असें कीं, साक्षांत लक्ष्मी आपल्या कोम-
ल हस्त कमलानीं ज्याचीं चरणारविंदें निरंतर रगडीत आहे; आ-
णि शरदृतूंतील स्वच्छ निरभ्र आकाशा समान निळ्या कमला सारख्या नील
वर्ण सुंदर स्वरूप कांतीनें सुशोभित असून ज्याचे वक्षस्थळीं कौस्तुभम-
णी उत्कृष्ट शोभत असून ज्याचे भुजांत रम्य बाजुबंद शोभत आहेत.

विमृश्यसुरसंक्षोभंवैनतेयंसमाव्हयत्॥आहूतेव
स्थितेतस्मिन्नागावस्थितवर्ष्मणि॥२१३॥दिव्यनाना
स्त्रतीक्ष्णार्चिरारुह्यागात्सुरान्स्वयं॥

अर्थ:- आणि त्या विष्णूनें दैत्याचे भयानें देव गडबडले आहेत; असें जा-
णून तेसमयीं गरुडास बोलाविलें; तों विष्णूनें बोलावतांच तत्क्षणीं गरु-
ड येऊन हात जोडून पुढें उभा राहिला असतां, तत्काल अनेक दिव्य अस्त्रां
समान तीक्ष्ण तेजोमयरूपी तो भगवान् विष्णु, अनेक नागानीं युक्त देहानें
शोभणाऱ्या त्या गरुडावर आरोहण करून स्वतः देवसेन्यांत त्वरेनें आला.

तत्रापश्यत्तदेवेंद्रमभिद्रुतमभिप्लुतैः॥२१४॥दानवेंद्रै
र्नवांभोदसच्छायैःपौरुषोत्कटैः॥प्रयात्वापुरुषैर्घो
रैरप्राग्र्यैर्धनशालिभिः॥२१५॥परित्राणायशक्र

तंसुक्षेत्रेकर्मनिर्मलं॥

अर्थ:- तो तेथें बलाच्या योगानें उत्पन्न झालेले, नूतन सजल मेघा सारखे कृष्णवर्ण असून पराक्रमाच्या गर्वानें अति उन्मत्त अशा त्या दानव श्रेष्ठानीं इंद्रास पळविलें आहे असें विष्णूनें पाहिलें; यास दृष्टांत धनिक असून कामक्रोधादिकानीं लोक भयंकर अशा अभाग्यवंत पुरुषानीं आपले रक्षणार्थ पुण्य क्षेत्रांत जाऊन अहंकारपूर्वक त्वरेनें केलेल्या उत्तम कर्मा सारखें.

अथापश्यंतदैतेयावियतिज्योतिमंडलं॥ २१६॥ स्फुरंतमुदयाद्रिस्थंसूर्यमुष्णत्विषाइव॥

अर्थ:- नंतर त्या दैत्यानीं आकाशांत उदयाचल पर्वतावरील उष्ण कांतियुक्त तेजोमय सूर्य मंडला सारिख्या देदीप्यमान विष्णूस पाहिलें.

प्रभावंज्ञातुमिच्छंतोदानवास्तस्यतेजसः॥ २१७॥ गरुत्मंतमपश्यंतकल्पांतानलसन्निभं॥

अर्थ:- आणि विष्णूच्या तेजाचा प्रताप जाणण्याची इच्छा करणाऱ्या त्या दानवानीं कल्पांत समयांतील प्रलयकारक अग्नी सारख्या त्या विष्णु वाहन गरुडास पाहिलें.

तमास्थितंचमेघौघद्युतिमक्षयमच्युतं॥ २१८॥ तमालोक्यासुरेंद्रास्तु हर्षसंपूर्णमानसाः॥

अर्थ:- आणि त्या गरुडावर बसलेल्या सजल मेघांच्या समुदाया समान नील कांतीनें सुशोभित असून त्रिकालीं नाशरहित, अखंड ऐश्वर्य पूर्ण अशा विष्णूस पाहून असुर श्रेष्ठांचे अंतः करणांत अत्यंत हर्ष जाहला.

अयंवैदेवसर्वस्वंजितेस्मिन्निर्जिताः सुराः॥ २१९॥ अयंसदैत्यचक्राणांकृतांतः केशवोरिहा॥

अर्थ:- कारण विष्णूचा सर्व प्रकारें देवांस आश्रय असून हाच सर्व दैत्यांचे सैन्यांचा संहार करणारा आहे; तस्मात् देवांचे शत्रूंस आह्मांस मारणाऱ्या या विष्णूस जिंकले असतां अर्थात् सर्व देव तत्काल जिंकल्या सारखेच आहेत.

एनमाश्रित्यलोकेषुयज्ञभागभुजोमराः॥२२०॥
इत्युक्त्वादानवाः सर्वेपरिवार्यसमंततः॥निजघ्नुर्वि
विधैरस्त्रैस्तेनमायांतमाहवे॥२२१॥

अर्थ:- आणि हे सर्व देव या विष्णूच्याच आश्रय करून संपूर्ण लोकांत यज्ञांतील भाग ग्रहण करितात; असें बोलून ते समग्र दानव चोहीकडून विष्णूचे सभोंवतीं आसमंतात्भागीं येऊन अनेक प्रकारच्या अस्त्रांनीं त्या संग्रामांत आलेल्या त्या विष्णूस अतिशयें प्रहार करूं लागले.

कालनेमिप्रभृतयोदशदैत्यामहारथाः॥षष्ट्याविव्या
धबाणानांकालनेमिर्जनार्दनं॥२२२॥

अर्थ:- त्या असुर सैन्यांतील कालनेमि प्रभृति दहा महारथी दैत्यापैकीं कालनेमीनें दुष्ट जनांचा संहार करणाऱ्या त्या विष्णूस साठ बाण मारले.

निमिः शतेनबाणानांमथनोशीतिभिः शरैः॥ जंभक
श्चैवसमत्याशंभोदशभिरेवच॥२२३॥

अर्थ:- तसेच निमीनें विष्णूस शंभर बाण मारले; मथन नामक दानवानें विष्णूस ऐशीं बाणानीं ताडन केलें; जंभासुरानें सत्तर बाणानीं विष्णूस प्रहार केला; व शंभ दैत्यानें विष्णूस दहा बाण मारले.

शेषादैत्येश्वराः सर्वेविष्णुमेकैकशः शरैः॥ दशभि
श्चैवयत्तास्तेजघ्नुः सगरुडंरणे॥२२४॥

अर्थ:- आणि बाकीच्या सर्व श्रेष्ठ दैत्यानीं युद्धाविषयीं सिद्ध होऊन त्या रणांत प्रत्येकानें गरुडा सहित विष्णूस दहा दहा बाण मारले.

तेषामसृष्यतत्कर्मविष्णुर्दानवसूदनः॥एकैकंदान
वंजघ्नेषड्भिः षड्भिरजिम्हगैः॥२२५॥

अर्थ:- असें त्या दानवांचें तें कर्म सहन नकरून त्या दानवांचा संहार करणाऱ्या त्या विष्णूनें प्रत्येक दानवांस समोर जाणाऱ्या सहा सहा सरळ बाणानीं ताडन केलें.

आकर्णकृष्टैर्भूयश्चकालनेमिस्त्रिभिः शरैः॥ वि-

ष्णुंविव्याधहृदयेक्रोधाद्रक्तविलोचनः ॥२२६॥

अर्थः- नंतर पुनः कालनेमि दैत्यानें क्रोधामुळें नेत्र आरक्त करून आकर्ण पर्यंत धनुष्याची दोरी ओढून तीन बाणानीं विष्णूचे हृदयास प्रहार केला.

तस्याशोभंतनेबाणाहृदयेतप्तकांचनाः ॥ मयूरवानीवदीप्तानिकौस्तुभस्यस्फुटत्विषः ॥२२७॥

अर्थः- तेव्हां ते कालनेमीचे बाण त्या विष्णूचे हृदयावर तापलेल्या सुवर्णा सारखे शोभूं लागले; किंवा स्पष्ट कांतियुक्त कंठांतील कौस्तुभ मण्याच्या किरणा सारिखे शोभूं लागले.

तैर्बाणैः किंचिदायस्तोहरिर्जग्राहमुद्गरं ॥ सततंभ्राम्यवेगेनदानवायव्यसर्जयत् ॥२२८॥

अर्थः- त्या बाणानीं विष्णूस किंचित् आयास झाल्या सारखें दिसलें पश्चात् विष्णूनें हातांत मुद्गल घेऊन तो वेगानें फिरवून त्या कालनेमि दानवास मारला.

दानवेंद्रस्तमप्राप्तंवियत्येवशितैः शरैः ॥ चिच्छेदतिलशः क्रुद्धोदर्शयन्पाणिलाघवं ॥२२९॥

अर्थः- तो मुद्गल आपणावर आला नाहीं; तोंच दानव श्रेष्ठ कालनेमि असुर आपलें हस्त कोशल्य दर्शवीत होत्साता मोठ्या क्रोधानें मध्येंच आकाशांत त्या मुद्गलाचे तिळा सारखे तुकडे करिता जाहला.

ततोविष्णुः प्रकुपितः प्रासंजग्राहभैरवं ॥ तेनदैत्यस्यहृदयंताडयामासगाढतः ॥२३०॥

अर्थः- तेणें करून विष्णु अत्यंत क्रोधायमान होत्साता त्यानें हातांत प्रास नामक भयंकर आयुध घेऊन त्या शस्त्रानें कालनेमीचे हृदयास अत्यंत बळकट प्रहार केला.

क्षणेनलब्धसंज्ञस्तुकालनेमिर्महासुरः ॥ शक्तिंजग्राहतीक्ष्णाग्रांहेमघंटाट्टहासिनीं ॥२३१॥

अर्थः- त्या प्रासानें कालनेमीस मूर्च्छा आली; ती मूर्च्छा जाऊन क्षणमात्रानें शुद्धी आल्यावर त्या कालनेमि महादानवानें तीक्ष्णा-

त्या घंटांचे महानादानें युक्त असून तीक्ष्ण अग्राची अशी शक्ति हा तांत घेतली.

तयावामभुजंविष्णोर्बिभेददितिनंदनः॥भिन्नः
शक्त्याभुजस्तस्यस्रुतशोणितआबभौ॥२३२॥
पद्मरागमयेनेवकेयूरेणविभूषितः॥

अर्थ- आणि त्या कालनेमि दैत्यानें विष्णूच्या डाव्या भुजास त्या शक्तीचा प्रहार केला; तेव्हां त्या शक्तीच्या प्रहारानें विष्णूचा बाहु छिन्न भिन्न होऊन त्यांतून रक्त प्रवाह चालला असें दिसूं लागलें असतां तो भुज पद्मराग मणियुक्त बाजुबंद घातल्या सारखा शोभूं लागला.

ततोविष्णुः प्रकुपितोजग्राहविपुलंधनुः॥२३३॥
सप्तदशाचनाराचांस्तीक्ष्णान्मर्मविभेदिनः॥दैत्य
स्यहृदयंषड्भिर्विव्याधचत्रिभिःशरैः॥२३४॥

अर्थ- तेणेंकरून अतिशयें क्रोध येऊन त्यानें हातांत मोठें धनुष्य घेतलें; आणि अंग संधींचें विदारण करणारे नाराच नामक पोलादी तीक्ष्ण बाण धनुष्यास लाऊन त्यांतील नऊ बाण कालनेमीचे हृदयास मारले.

चतुर्भिः सारथिंचास्यध्वजंचैकेनपत्रिणा॥ द्वाभ्यां
ज्याधनुषीचापिभुजंसव्यंचपत्रिणा॥२३५॥

अर्थ- आणि चार बाण सारथ्यास मारले; एक बाण रथाचे ध्वजावर टाकला; धनुष्य व त्याची दोरी यां प्रत्येकार एकेक बाण टाकला; व डाव्या भुजास एका बाणानें प्रहार केला.

सविद्धोहृदयेगाढंदैत्योहरिशिलीमुखैः॥स्रुत
रक्तारुणप्रांशुः पीडाकुलितमानसः॥२३६॥चकं
पेमारुतेनेवनोदितः किंशुकद्रुमः॥

अर्थ- तेव्हां विष्णूच्या त्या बाणानीं तो कालनेमि दैत्य वक्षस्थळांत अत्यंत ताडित जाहला असतां, हृदयांतून चाललेल्या रक्त प्रवाहानें त्याचें पांघरलेलें वस्त्र आरक्तवर्ण होऊन तो दैत्य त्या बाणांचे प्रहाराच्या पीडेनें अंतःकरणांत बहुत व्याकुळ होऊन (महावायूनें अतिकंपाय

मान झालेल्या वरून तांबड्या फुलांनीं युक्त पळस वृक्षासारखा) तो कालनेमि असुर थरथरां कांपूं लागला.

नमाकंपितमालक्ष्यगदांजग्राहकेशवः ॥२३७॥ तांच
वेगेनचिक्षेपकालनेमिरथंप्रति ॥

अर्थः- असा तो कालनेमि दैत्य कांपत आहे; हें पाहून विष्णूनें हातांत गदा घेऊन ती वेगानें कालनेमीचे रथावर टाकली.

सापपातशिरस्यग्राविपुलाकालनेमिनः ॥२३८॥
संचूर्णितोत्तमांगस्तुनिष्पिष्टमुकुटोसुरः ॥ स्रुतर
क्तौघरंध्रस्तुस्रुतधातुरिवाचलः ॥२३९॥ प्रपतत्स्वे
रथेभग्नेविसंज्ञःशिष्टजीवितः ॥

अर्थः- तेव्हां ती विष्णूची मोठी उग्र गदा त्या कालनेमीच्या मस्तकावर पडली असतां, त्या गदेनें त्या दैत्याच्या मुकुटासहित मस्तकाचें चूर्ण झालें; आणि त्या असुराच्या मुखादिक सर्व इंद्रियांचे द्वारांतून रक्ताचे प्रवाह वाहूं लागले; तेणें करून तो दानव (पर्वतांतून गैरिकादिक धातू वाहूं लागले असतां पर्वत जसा शोभतो) तसा तो कालनेमि दैत्य दिसत असून त्या गदेनें आपला रथ मोडला असतां, देहांत प्राण राहिला असून मूर्छा आल्या मुळें तो दैत्य भूमीवर पडला.

पतितस्यरथोपस्थेदानवस्याच्युतोरिहा ॥२४०॥ स्मि
तपूर्वमुवाचेदंवाक्यंचक्रायुधःप्रभुः ॥

अर्थः- असा रथाखालीं पडलेल्या त्या कालनेमि दानवास, शत्रूंचा नाश करणारा, अखंड पूर्णैश्वर्य युक्त, सुदर्शन चक्रायुध धारण करणारा, समर्थ भगवान् विष्णु मंदहास्य करून बोलला.

गच्छासुरविमुक्तोसिसांप्रतंजीवनिर्भयः ॥२४१॥
ततःस्वल्पेनकालेनअहमेवतवांतकः ॥

अर्थः- कीं, हे असुरा म्या या कालीं तुला सोडलें; तस्मात् सांप्रत कालीं जा; आणि निर्भयपणें वांच; नंतर थोड्याच कालानें मीच तुला मारीन.

एतच्छ्रुत्वावचस्तस्यसारथिःकालनेमिनः ॥२४२॥
अपवाह्यरथंदूरमनयत्कालनेमिनः ॥ ॥इतिश्रीम-

त्स्यपुराणेदेवासुरसंग्रामेकालनेमिपराजयोनाम एकोनपंचाशदुत्तरशततमोध्यायः॥१४९॥ ॥

अर्थ:- असें विष्णूचें तें भाषण ऐकून त्या कालनेमीच्या सारथ्यानें त्याचा रथ रणांतून मागें फिरवून दूर नेला. इतिश्री मत्स्यपुराणे देवासुर संग्रामे कालनेमि पराजयोनाम एकोन पंचाशदुत्तर शततमोध्यायः॥१४९॥

अध्याय १५० वा.

सूतउवाच॥ तंदृष्ट्वादानवाः क्रुद्धाश्चेरुः स्वैस्वैर्बलैर्वृताः॥ सरघाइवमाक्षीकहरणेसर्वतोदिशं॥१॥

अर्थ:- सूत बोलला ऋषीहो नंतर त्या विष्णूस पाहून सर्व दानव क्रुद्ध जाहले; आणि (मधमाशा मध हरण करणारांवर चोहीकडून दंश करण्या विषयीं जशा येतात) तसे ते सर्व असुर आपले सैन्या सह्वर्तमान सर्व दिशांनी विष्णूच्या सभोंवतीं संचार करूं लागले.

कृष्णचामरजालाढ्येस्वधाविरचितांकुरे॥ चित्रपंचपताकेतुप्रभिन्नकरटामुखे॥२॥ पर्वताभेगजेभीमेमदस्राविणिदुर्धरे॥ आरुह्याजौनिमिर्दैत्योहरिंप्रत्युद्ययौबली॥३॥

अर्थ:- ते समयीं कृष्णवर्ण चवऱ्या व मोत्यांच्या जाळीनें शोभायमान, ज्याच्या सोंडेवर चुन्यानें पानें काढिली आहेत; ज्यावर चित्र विचित्र पांच पताका शोभत असून अत्यंत मदस्राव युक्त गंडस्थळानें शोभायुक्त मुख ज्याचें, पर्वताकार भयंकर, मदोन्मत्त, ज्याचा वेग सहनकरणें परम कठीण अशा महा गजावर बसून निमिनामा महा बलिष्ठ दैत्य त्या रणांत गरुड वाहन हरीवर धांवून आला.

तस्यासन्दानवारौद्रागजस्यपदरक्षिणः॥ सप्तविंशतिसाहस्राः किरीटकवचोज्वलाः॥४॥

अर्थ:- त्या निमि दैत्याच्या हत्तीच्या पायांस रक्षण करणारे सत्तावीस हजार भयंकर दानव होते; त्यांचे अंगावरील मुगुट व कवचें अत्यंत देदीप्यमान होतीं.

अश्वारूढश्चमथनोजंभकश्चोष्ट्रवाहनः॥ शंभो-

पिविपुलंमेषंसमारुह्याव्रजद्रणं ॥ ५ ॥

अर्थ:- आणि मथनासुर घोड्यावर बसून विष्णूशीं युद्धार्थ आला; जंभासुर उंटावर बसून विष्णूवर आला; व शंभ दैत्यही मोठ्या मेंढ्यावर बसून विष्णूशीं युद्धास आला.

अपरेदानवेंद्रास्तुयत्तानानास्त्रपाणयः ॥ आजघ्नुः समरेक्रुद्धाविष्णुमक्लिष्टकारिणं ॥ ६ ॥

अर्थ:- तसेच अनेक शस्त्रें हातांत घेऊन युद्धाविषयीं सिद्ध झालेले इतरही मोठे दानव त्या रणांत क्रुद्ध होऊन अनायासानें सर्व कार्यें करणाऱ्या त्या विष्णूस आयुधानीं प्रहार करूं लागले.

परिघेणनिमिर्दैत्योमथनोमुद्गरेणतु ॥ शंभः शूलेन तीक्ष्णेनप्रासेनग्रसनस्तथा ॥ ७ ॥ चक्रेणमहिषः क्रुद्धोजंभः शक्त्यामहारणे ॥ जघ्नुर्नारायणंसर्वेशेषास्तीक्ष्णैश्चमार्गणैः ॥ ८ ॥

अर्थ:- ते असे कीं निमिदैत्यानें परिघ नामक आयुधानें विष्णूस प्रहार केला; मथन दानवानें विष्णूस मुद्गलानें ताडन केलें; शंभ दानवानें तीक्ष्ण शूलानें विष्णूस प्रहार केला; ग्रसनासुरानें विष्णूस प्रास नांवाच्या शस्त्रानें ताडन केलें; तसेच महिषासुरानें क्रुद्ध होऊन चक्रानें विष्णूस ताडन केलें; जंभासुरानें त्या महारणांत शक्तीनें विष्णूस ताडन केलें; त्याच प्रमाणें इतरही मोठमोठ्या सर्व दानवानीं आपापले तीक्ष्ण बाणानीं त्या गरुडवाहन नारायणास प्रहार केले.

तान्यस्त्राणिप्रयुक्तानिशरीरंविविशुर्हरेः ॥ गुरूक्तान्युपदिष्टान्वैसच्छिष्यस्यश्रुतानिव ॥ ९ ॥

अर्थ:- तेव्हां तीं सर्व दैत्यानीं मारलेलीं शस्त्रें विष्णूचे देहांत शिरलीं, यास दृष्टांत, गुरूनें उपदेश करून सांगितलेले वेदार्थ जसे उत्तम शिष्याचे कर्णद्वारा मनांत भरतात, तसीं.

असंभ्रांतोरणेविष्णुरथजग्राहकार्मुकं ॥ शरांश्चाशीविषाकारांस्तैलधौतानजिह्मगान् ॥ १० ॥

अर्थ:- नंतर नित्य भ्रांतिरहित, अखंडज्ञानी विष्णु त्या रणांत धनुष्य

व तेलानें सहाणेवर घांसलेले, समोर जाणारे, सरळ, सर्प समान अति-तीक्ष्ण असून आकृतीनेंही सर्पाकारच असे बाण हातांत घेतले.

ततोभिसंध्य दैत्यांस्तानाकर्णाकृष्टकार्मुकः ॥ अभ्य
द्रवद्रणेक्रुद्धोदैत्यानीकेतुपौरुषात् ॥ ११ ॥

अर्थ.- पश्चात् ते बाण धनुष्यास लाऊन धनुष्याची दोरी आकर्ण पर्यंत ओढून ते बाण दैत्यांस मारण्या साठीं भगवान् विष्णु क्रोधायमान होत्सातां महा पराक्रम युक्त वेगानें त्या रणभूमींतील दैत्यांचे सैन्यावर धांवला.

निमिंविव्याधविंशत्याबाणानामग्निवर्चसां ॥ मथनं
दशभिर्बाणैः शंभंपंचभिरेवच ॥ १२ ॥

अर्थ.- आणि अग्नि समान तेजोमय वीस बाणानीं विष्णूनें निमिदैत्यास ताडन केलें; तसेंच दहा बाणानीं मथनासुरास व पांच बाणानीं शंभ दैत्यास प्रहार केला.

एकेनमहिषंक्रुद्धोविव्याधोरसिपत्रिणा ॥ जंभंद्वाद
शभिस्तीक्ष्णैः सर्वांश्चैकेकशोष्टभिः ॥ १३ ॥

अर्थ.- त्याच प्रमाणें विष्णूनें क्रोधें करून एका बाणानें महिषासुराचे वक्षस्थळास ताडन केलें; आणि बारा तीक्ष्ण बाणानीं जंभासुरास प्रहार करून इतर सर्व दैत्यांस प्रत्येकीं आठ बाण मारले.

तस्यतल्लाघवंदृष्वादानवाः क्रोधमूर्छिताः ॥ नर्दमा
नाः प्रयत्नेनचक्रुरत्यद्भुतंरणं ॥ १४ ॥

अर्थ.- असें तें विष्णूचें युद्धांतील हस्त कौशल्य पाहून सर्व दानव क्रोधानें व्याप्त होत्साते शब्द करीत प्रयत्नानें ते अति अद्भुत युद्ध करूं लाग०

चिच्छेदाथधनुर्विष्णोर्निमिर्भल्लेनदानवः ॥ संध्यमा
नंशरंहस्ते चिच्छेदमहिषासुरः ॥ १५ ॥

अर्थ.- तें असें कीं, नंतर निमि दानवानें एक भल्ल नामक बाण मारून विष्णूचें धनुष्य तोडलें; आणि महिषासुरानें विष्णु आपले धनुष्यास बाण लावीत असतां, तितक्यांत तो बाण हातांत असतांच तोडिला.

पीडयामासगरुडं जंभस्तीक्ष्णैस्तसायकैः ॥ भु
जंतस्याहनद्धादशंभोभूधरसन्निभः ॥ १६ ॥

अर्थ:- तसेंच जंभासुरानें आपल्या तीक्ष्ण बाणानीं गरुडासहित विष्णू-स ताडन केलें; व पर्वताकार शंभु दानवानें विष्णूच्या भुजास अतिशयें बळकट प्रहार केला.

छिन्नेधनुषिगोविंदोगदांजग्राहभीषणां॥तांप्राहि-
णोत्सवेगेनमथनायमहाहवे॥१७॥

अर्थ:- असेंतें आपलें धनुष्य तुटलें असतां, विष्णूनें एक भयंकर गदा हातांत घेऊन ती महावेगानें त्या मोठ्या संग्रामांत मथनासुरास मारली.

तामप्राप्तांनिमिर्बाणैश्चिच्छेदतिलशोरणे॥तांना
शमागतांदृष्ट्वाहीनाग्रेप्रार्थनामिव॥१८॥ जग्राह
मुद्गरंघोरंदिव्यरत्नपरिष्कृतं॥तंमुमोचाथवेगेन
निमिमुद्दिश्यदानवं॥१९॥

अर्थ:- ती विष्णूची गदा आपणावर आली नाहीं; तोंच निमिदैत्यानें आपले बाणानीं त्या गदेचे त्या रणांत तिळासारखे तुकडे केले. तेव्हां विष्णूनें ती निमिदैत्यावर टाकलेली आपली गदा (अतिकृपण पुरुषापुढें केलेल्या याचने सारखी) नाश पावून व्यर्थ झाली असें पाहून त्यानें दिव्य रत्नानीं सुशोभित असा भयंकर एक मुद्गल हातांत घेऊन तो मुद्गल मोठ्या वेगानें निमिदानवास मारला.

तमायांतंवियत्येवत्रयोदैत्यान्यवारयन्॥गदयाजं
भदैत्यस्तुग्रसनःपट्टिशेनतु॥२०॥शक्त्याचमहि
षोदैत्यःस्वपक्षजयकांक्षया॥

अर्थ:- असा तो विष्णूचा मुद्गल येत असतां, तीन दैत्यानीं त्या मुद्गलाचें आकाशा मध्येंच निवारण केलें; तें असें कीं, जंभदैत्यानें त्या मुद्गलावर गदा टाकली; असुर सेनापति ग्रसन दानवानें त्यावर पट्टिश नांवाचें शस्त्र टाकलें; व महिषासुरानें मुद्गलावर आपले पक्षाचा जय व्हावा या इच्छेनें शक्ति टाकली.

निराकृतंतमालोक्यदुर्जनेप्रणयंयथा॥२१॥ जग्राह
शक्तिंसुग्राग्रामष्टघंटोत्कटस्वनां॥जंभायतांससु

द्विश्यप्राहिणोद्रणभीषणः॥२२॥

अर्थः- या प्रमाणें त्या तीन दैत्यानीं आपले सुहृलाचें (दुर्जनास केलेल्या प्रार्थना सारखें) निराकरण केलेलें पाहून रणभयंकर विष्णूनें, आठ घंटांच्या उत्कृष्ट शब्दानें नादित अशी तीक्ष्ण अग्राची शक्ति घेऊन तीजंभासुरास मारली.

तामंबरस्थांजग्राहगजोदानवनंदनः॥गृहीतांतां समालोक्यशिक्षामिवविवेकिभिः॥२३॥ द्वंभार सहंसारमन्यदादायकार्मुकं॥रौद्रास्त्रमभिसंधा यतस्मिन्बाणंमुमोचह॥२४॥

अर्थः- ती शक्ति आकाश मार्गें येत असतां, दानव पुत्र गजासुरानें ती शक्ति वरच्यावर धरली; यास दृष्टांत विवेकी पुरुष गुरूनें केलेली शिक्षा जशी वरच्यावर शीघ्र ग्रहण करितात तशी; त्या शक्तीची गजदानवानें केलेली अवस्था पाहून विष्णूनें दुसरें भार सहन करणारे मोठें धनुष्य घेऊन पाशुपतास्त्रानें एक बाण अभिमंत्रित करून तो बाण धनुष्यास लावून असुरांच्या त्या सैन्यावर सोडिला.

ततोऽस्त्रतेजसासर्वंव्याप्तंलोकंचराचरं॥ततोबाणमयंसर्वमाकाशंसमदृश्यत॥२५॥

अर्थः- तेव्हां त्या पाशुपतास्त्राचें तेजानें सर्व चराचर जग व्याप्त केलें; आणि त्या पासून असंख्यात बाण निघून त्या बाणानीं आकाशव्याप्त जाहलेलें दिसूं लागलें.

भूर्दिशोविदिशश्चैवबाणजालमयाबभुः॥दृष्ट्वा तदस्त्रमाहात्म्यंसेनानीर्ग्रसनोसुरः॥२६॥ब्राम्ह मस्त्रंचकारासौसर्वास्त्रविनिवारणं॥तेनतत्प्रश मंयातंरौद्रास्त्रंलोकघस्मरं॥२७॥

अर्थः- आणि त्या पाशुपतास्त्रा पासून निघालेल्या बाणांचे योगानें भूमि, पूर्वादिक चार दिशा, आग्नेयी आदिकरून कोण दिशा, व वरची ऊर्ध्व दिशा, व खालची अधर दिशा, या सर्वही बाणांचे जाळ्यानें व्याप्त जाहल्या सारख्या शोभूं लागल्या; ते समयीं तो पाशुपतास्त्राचा प्रताप

पाहून सेनापति ग्रसनासुरानें सर्वही अस्त्रांचे निवारण करणारें ब्रम्हा-स्त्र त्या अस्त्रावर सोडलें; तेणें करून सर्व लोकांस ग्रासणारें तें पाशुपता-स्त्र शांत जाहलें.

अस्त्रेप्रतिहतेतस्मिन्विष्णुर्दानवसूदनः॥कालदं-
डास्त्रमकरोत्सर्वलोकभयंकरं ॥२८॥

अर्थः- असें तें पाशुपतास्त्र ब्रम्हास्त्रानें कुंठित झालें असतां दानवांचा संहार करणाऱ्या विष्णूनें सर्व लोकांस भयंकर अशा कालदंडास्त्राचा प्रयोग केला.

संधीयमानेतस्मिंस्तुमारुतः परुषोववौ॥चकंपेच
महीदेवीदैत्याभिन्नधियोभवन्॥२९॥

अर्थः- आणि विष्णूनें तें कालदंडास्त्र सोडलें असतां, त्या पासून मोठा भयंकर, वज्रा सारखा कठोर वायु वाहूं लागला; तेणें करून भूमि देवी कांपूं लागली; व दैत्यांची बुद्धि भयानें फाटून गेली.

तदस्त्रमुग्रंदृष्ट्वातुदानवायुद्धदुर्मदाः॥चक्रुरस्त्रा-
णिदिव्यानिनानारूपाणिसंयुगे॥३०॥

अर्थः- तथापि युद्धा विषयीं मदोन्मत्त असे ते दानव, तें उग्र कालदंडास्त्र पाहून त्यानीं त्या रणांत अनेक प्रकारचीं उत्तम अस्त्रें त्या कालदंडास्त्रावर टाकिलीं.

नारायणास्त्रंग्रसनोगृहीत्वाचक्रंनिमिः स्वास्त्रवरं
मुमोच॥एकैकमस्त्रंचचकारजंभस्तत्कालदंडास्त्र
निवारणाय॥३१॥

अर्थः- तीं अशीं कीं, ग्रसन सेनापतीनें नारायणास्त्र त्या कालदंडास्त्रावर टाकिलें; तसेंच निमीनें आपलें अस्त्र श्रेष्ठ चक्रास्त्र त्या कालदंडावर टाकिलें; व जंभासुरादिक दानवानीं त्या अस्त्रांचे निवारणार्थ एकेक अस्त्र टाकलें.

यावन्नसंधानदशांप्रयातिदैत्येश्वरास्त्रानिवार-
णाय॥तावत्क्षणेनैवजघानकोटीर्दैत्येश्वराणांसग
जान्सहाश्वान्॥३२॥

अर्थः- तरीं त्या दैत्यश्रेष्ठांची अस्त्रें जों काल पर्यंत त्या कालदंडास्त्राचें नि-

वारण करण्याचें साधन दृशेस योग्य जाहलीं नाहींत तों काल पर्यंत एक क्षणमात्रांत त्या अस्त्रानें गज व अश्व यांसहित त्या महा दैत्यांच्या अनेक कोटि मारिल्या.

अनंतरंशांतम भूत्तदस्त्रं दैत्यास्त्रयोगेनतुकाल-
दंडं ॥ शांतंतदालोक्यहरिः स्वशस्त्रं स्वविक्रमेम-
न्युपरीतमूर्तिः ॥ ३३ ॥

अर्थः- नंतर त्या दैत्यांचे अनेक अस्त्रांच्या योगानें तें कालदंडास्त्रही शांत जाहलें; असें आपलें तें कालदंडास्त्र शांत जाहलें असें पाहून आपले पराक्रम करण्या विषयीं क्रोधानें तो भक्तांचीं दुःखें हरण करणारा विष्णु उग्रमूर्ति जाहला.

जग्राहचक्रंतपनायुताभमुग्रारमात्मानमिवद्वितीयं
॥ चिक्षेपसेनापतयेभिसंध्यकंठस्थलंवज्रकठोरमु-
ग्रम् ॥ ३४ ॥

अर्थः- आणि दहा सहस्र सूर्यासमान तेजःपुंज व भयंकर अरानीं युक्त असून आपणा सारखेंच केवळ दुसरें अप्रतिम वस्तु असें विष्णूनें आपलें सुदर्शन चक्र हातांत घेऊन त्या सेनापति ग्रसन दानवाचे वज्रा सारख्या कठोर कंठास लक्षून त्यावर तें चक्र मारलें.

चक्रंतदाकाशगतंविलोक्यसर्वात्मनादैत्यवराः स्व
वीर्यैः ॥ नाशक्नुवन्वारयितुंप्रचंडंदैवंयथाकर्मसु
धाप्रपन्नं ॥ ३५ ॥

अर्थः- ते समयीं आकाश मार्गें येणारें तें चक्र पाहून असुर सैन्यांतील ते श्रेष्ठ दैत्य सर्व प्रकारें आपल्या पराक्रमानीं त्या सुदर्शन चक्राचें निवारण करण्या विषयीं समर्थ जाहले नाहीत; यास दृष्टांत जसें व्यर्थ कर्माचा आश्रय करणाऱ्या पुरुषास स्वपराक्रमानें प्रबळ दैवाचें उल्लंघन करणें अशक्य आहे; तसें.

तमप्रतर्क्यंजनयन्नजय्यंचक्रंपपातग्रसनस्यकंठे
॥ द्विधातुकृत्वाग्रसनस्यकंठंतद्रक्तधारारुणघोर
नाभि ॥ जगामभूयोपिजनार्दनस्यपाणिंप्रदृप्ता

नलतुल्यदीप्ति ॥३६॥ इतिश्रीमत्स्यपुराणेदेवासुर
संग्रामेग्रसनवधोनामपंचाशदुत्तरशततमोध्यायः॥

अर्थः—असें सर्वथा जिंकण्यासही अशक्य तें सुदर्शन चक्र त्या सर्व असुरांस उद्भुत भय उत्पन्न करीत होत्सातें; त्या ग्रसनदैत्याच्या कंठावर पडलें; आणि त्या दानवाच्या गळ्याचे दोन भाग करून त्या रक्ताच्या धारानीं त्या चक्राचा मध्यभाग आरक्त वर्ण, भयंकर जाहला असून अत्यंत प्रदीप्त ज्वालानीं दशदिंगत झालेल्या अग्निसमान तेजोमय असें तें सुदर्शनचक्र पुनः जाऊन भक्तजनांचे संकट समयीं धांवणाऱ्या त्या विष्णूच्या अभयहस्त कमलांत राहिलें. इतिश्रीमत्स्यपुराणे तारकोपाख्याने टीकायां ग्रसनवधोनाम पंचाशदुत्तर शततमोध्यायः ॥१५०॥

अध्याय १५१ वा.

सूतउवाच ॥ तस्मिन्विनिहतेदैत्येग्रसनेलोकनाय
के ॥ निर्मर्यादमयुध्यंतहरिणासहदानवाः ॥१॥

अर्थः— सूत बोलला शौनकादिक ऋषीहो! असुर लोकांचा सेनापति तो ग्रसनदैत्य मरण पावला असतां, ते सर्व दानव विष्णूशीं अमर्याद तुमुल युद्ध करूं लागले.

पट्टिशैर्मुसलैः पाशैर्गदाभिः कुशलैरपि ॥ तीक्ष्णाग्र
नैश्चनाराचैश्चक्रैः शक्तिभिरेवच ॥२॥

अर्थः— ते असें कीं, पट्टिश नामक आयुधें, मुसळें, पाश, (फांस) गदा, वज्रें, तीक्ष्ण अग्रांचे नाराच बाण, चक्रें व शक्ति नांवाचें शस्त्र इत्यादिक आयुधानीं विष्णूस प्रहार करूं लागले.

तानस्त्रान्दानवैर्मुक्तान्चित्रयोधीजनार्दनः ॥ एकै
कंशतशश्चक्रेबाणैरग्निशिखोपमैः ॥३॥

अर्थः— तेव्हां चित्र विचित्र युद्ध करणाऱ्या त्या विष्णूनें अग्नीच्या ज्वालां सारख्या आपले बाणानीं त्या दानवानीं टाकलेल्या सर्व शस्त्रांचे प्रत्येकीं शतावधि तुकडे केले.

ततः क्षीणायुधप्रायाःदानवास्त्रांतचेतसः ॥ अस्त्रा
ण्यादातुमभवन्नसमर्थायदारणे ॥४॥

अर्थः- नंतर प्रायः आयुधें क्षीण झाल्या मुळें ते दानव चित्तांत भ्रांत होऊन ज्या काळीं त्या रणांत अस्त्रें घेण्या विषयीं असमर्थ झाले.

तदामृतैर्गजैरश्वैर्जनार्दनमपोथयन्॥ समंतात्कोटिशोदैत्याः सर्वतः प्रत्ययोधयन्॥ ५॥

अर्थः- त्याकाळीं विष्णूच्या सभोंवतीं चोंहीकडून कोटिशः दैत्य येऊन त्यांनीं मरण पावलेले गज व अश्व यानीं विष्णूस प्रहार करून युद्ध करण्यास आरंभ केला.

बहुरूपत्वावपुर्विष्णुः किंचिच्छ्रांतभुजोभवत्॥ उवाचचगरुत्मंतंतस्मिन्सुतुमुलेरणे॥ ६॥

अर्थः- तेव्हां विष्णूनें आपलीं बहुत रूपें करून भुजांस विश्रांति दिली आणि त्या अत्यंत तुमुल रणांत विष्णु गरुडास बोलला.

गरुत्मन्कच्चिदश्रांतस्त्वमस्मिन्नपिसांप्रतं॥ यद्यश्रांतोसितद्याहिमथनस्यरथंप्रति॥ ७॥ श्रांतोस्यथमुहूर्तंत्वंरणादपसृतोभव॥

अर्थः- कीं, हे गरुडा तूं यारणांत सांप्रतकाळीं श्रम पावला नाहींस कीं, जर श्रमी जाहला नसलास तर मथन दैत्याचे रथावर चल आणि जर दमला असलास तर मग एक मुहूर्तमात्र (दोन घटिकापर्यंत) विश्रांती करितां युद्धांतून दूर हो.

इत्युक्तोगरुडस्तेनविष्णुनाप्रभविष्णुना॥ ८॥ आससादरणेदैत्यंमथनंघोरदर्शनं॥

अर्थः- असें महापराक्रमशालि विष्णूनें भाषण केलें असतां, तो गरुड रणांत भयंकर स्वरूपी त्या मथन दैत्याचे अग्रभागीं आला.

दैत्यस्त्वभिमुखंदृष्ट्वाशंखचक्रगदाधरं॥ ९॥ जघानभिंदिपालेनशितबाणेनवक्षसि॥

अर्थः- ते समयीं त्या मथन दैत्यानें आपले सन्मुख शंख, चक्र व गदा इत्यादिक आयुधें धारण करणाऱ्या गरुडारूढ विष्णूस पाहून गोफीण व तीक्ष्ण बाणानीं विष्णूच्या वक्षस्थळास ताडन केलें.

तत्प्रहारमचिंत्यैवविष्णुस्तस्मिन्महाहवे॥ १०॥

जघानपंचभिर्बाणैर्मार्जितैश्चशिलाशितैः॥

अर्थः- तथापि त्या महाराची गणना नच करितां, त्या महा संग्रामांत विष्णूनें शिळेवर घांसलेले तीक्ष्ण पांच बाण त्या मथन दैत्यास मारले.

पुनर्दशभिराकृष्टैस्तंनताडस्तनांतरे॥११॥ विद्धो मर्मस्रुदैत्येंद्रोहरिबाणैरकंपत॥

अर्थः- आणि पुनः विष्णूनें दहा बाण आकर्णपर्यंत ओढून त्या मथन दानवाचे स्तनांच्या मध्यभागीं ते बाण मारले; तेव्हां तो दैत्य हरीच्या त्या बाणानीं मर्मस्थानीं ताडित जाहला असतां, कांपूं लागला.

स मुहूर्तंसमाश्वास्यजग्राहपरिघंतदा॥१२॥ जघ्ने जनार्दनंचापिपरिघेणाग्निवर्चसा॥

अर्थः- त्या कालीं त्या मथन दैत्यानें दोन घटिकापर्यंत विश्रांति घेऊन मग त्यानें हातांत परिघ घेतला; आणि त्या अग्निसमान परिघानें विष्णु असुरांचा संहार करणारा असूनही त्यास प्रहार केला.

विष्णुस्तेनप्रहारेणकिंचिदाघूर्णितोभवत्॥१३॥ ततः क्रोधविवृत्ताक्षोगदां जग्राहमाधवः॥

अर्थः- तेव्हां त्या परिघाचे प्रहारानें विष्णु किंचित् गुंगल्या सारखा जाहला; पश्चात् त्या लक्ष्मीकांत विष्णूनें क्रोधेंकरून नेत्र वटारून हातांत गदा घेतली.

मथनंसरथंरोषान्निष्पिपेषाथरोषितः॥१४॥ सपपाता थदैत्येंद्रः क्षयकालेचलोयथा॥

अर्थः- आणि त्या क्रोध पावलेल्या विष्णूनें मोठ्या रोषानें रथासहवर्तमान त्या मथन दैत्याचें चूर्ण केलें; ते समयीं तो महादैत्य प्रलयकालीं पडणाऱ्या पर्वता सारखा त्या रणभूमीवर पडला.

तस्मिन्निपतितेभूमौदानवेवीर्यशालिनि॥१५॥ अव सादंययुर्दैत्याः कर्दमेकरिणोयथा॥

अर्थः- या प्रमाणें तो पराक्रमशालि मथन दानव त्या रणभूमींत पडला असतां, ते असुर सैन्यांतील सर्व दैत्य, चिखलांत पडलेल्या ह-

तीसारखे संकटांत पडले.

ततस्तेषुविपन्नेषुदानवेष्वतिमानिषु ॥१६॥ कोप
रक्तनयानाममहिषोदानवेश्वरःप्रत्यद्रवोहरिंरौ
द्रः स्वबाहुबलमास्थितः ॥१७॥

अर्थः- असे ते अतिमानी दानव विपत्तींत पडले असतां, त्यांतील दानव श्रेष्ठ, भयंकर; असा जो महिषासुर तो क्रोधानें आरक्तवर्ण होत्साता, आपले बाहुबलाच्याच आश्रयानें विष्णूच्या अंगावर युद्धार्थ आला.

तीक्ष्णधारेणशूलेनमहिषोहरिमर्दयन् ॥ शक्त्या
चगरुडंवीरोमहिषोप्यहनद्धृदि ॥१८॥

अर्थः- आणि महिषासुरानें तीक्ष्णधारेच्या शूलानें विष्णूस प्रहार करून त्या वीरानें गरुडाचे हृदयावर शक्ति मारली.

ततोव्यादत्तवदनंमहाचलगुहानिभं ॥ ग्रस्तुमै-
च्छद्रणेदैत्यः सगरुत्मंतमच्युतं ॥१९॥

अर्थः- नंतर तो महिषासुर त्या रणांत आपलें महापर्वताच्या मोठ्या गुहे सारखें तोंड पसरून गरुडा सहवर्तमान त्या विष्णूस गिळण्याची इच्छा करूं लागला.

अथाच्युतोपिविज्ञायदानवस्यचिकीर्षितं ॥ वदनं
पूरयामासदिव्यैरस्त्रैर्महाबलः ॥२०॥

अर्थः- तेसमयीं महिषासुराचा तो कर्तव्य अभिप्राय जाणून पश्चात् तत्काल, महाबलाढ्य विष्णूनें दिव्य अस्त्रांच्या योगानें त्याचें मुख भरून टाकिलें.

महिषस्याथसस्रृजेबाणौघंगरुडध्वजः ॥ पिधा
यवदनंदिव्यैर्दिव्यास्त्रपरिमंत्रितैः ॥२१॥

अर्थः- तें असें कीं, तत्क्षणीं मग गरुडध्वज विष्णूनें आपल्या धनुष्या पासून बाणांचा समुदाय सोडला आणि ते बाण दिव्य अस्त्रानीं अभिमंत्रित करून त्या उत्तम बाणानीं विष्णूनें महिषासुराचे तोंड बंद केलें.

सतैर्बाणैरभिहतोमहिषोचलसन्निभः ॥

परिवर्तितकायोधःपपातनममारच ॥२२॥

अर्थः- तेव्हां तो पर्वतासमान शरीरी महिषासुर, त्या बाणानीं ताडित जाहला असतां, त्या बाणानीं त्याचा देह व्याप्त होऊन तो दैत्य खालीं उताणा पडला; परंतु मरण पावला नाहीं.

महिषंपतितंदृष्ट्वाभूमौप्रोवाचकेशवः ॥ महिषासुरमत्तस्त्वंवधंनास्त्रैरिहार्हसि ॥२३॥

अर्थः- असा महिषासुर भूमीवर पडलेला पाहून ब्रह्म शिवांचाही नियंता तो विष्णु त्यास बोलला कीं, हे महिषासुरा तूं मजपासून या अस्त्रानीं वधास योग्य नाहींस.

योषिद्वध्यःपुरोक्तोसिसाक्षात्कमलयोनिना ॥ उत्तिष्ठजीवितंरक्षगच्छास्मात् संगराद्द्रुतं ॥२४॥

अर्थः- कारण हे महिषासुरा तुझा वध स्त्रीच्या हातून होणार असें पूर्वी साक्षात् ब्रम्हदेवानें सांगितलें आहे; तस्मात् तूं ऊठ! आपला प्राण वांचीव! आणि या युद्धांतून लवकर जा.

तस्मिन्पराङ्मुखेदैत्येमहिषेशुंभदानवः ॥ संदष्टोष्ठपुटःकोपाद्भ्रूकुटीकुटिलाननः ॥२५॥ निर्मथ्यपाणिनापाणिंधनुरादायभैरवं ॥ सज्जंचकारसधनुःशरांश्चाशीविषोपमान् ॥२६॥

अर्थः- नंतर तो महिषासुर त्या युद्धांतून मागें फिरला असें पाहून शुंभदानव रोषानें दातानीं ओठ बहुत चावून तसेंच तोंड व भोंवया वांकड्या करून दोनी हात परस्परे चोळून त्यानें हातांत भयंकर धनुष्य घेतलें; आणि तें सज्ज करून त्यानें त्या धनुष्यास सर्पा सारखे कठोर बाण लाविले.

सचित्रयोधीदृढमुष्टिपातस्ततस्तुविष्णुंगरुडंचदैत्यः ॥ बाणैर्ज्वलद्वह्निशिखानिकाशैःक्षिसेरसंख्यैःपरिघातहीनैः ॥२७॥

अर्थः- आणि चित्र विचित्र युद्ध करणाऱ्या त्या शुंभ दैत्यानें आपल्या बळकट मुठीच्या जोरानें धनुष्याची दोरी आकर्णपर्यंत ओढून चोहीं

कडून न तुटणारे असून अग्नीच्या ज्वाले सारखे देदीप्यमान अशा असंख्यात सोडलेल्या बाणानीं विष्णु व गरुड यांस प्रहार केला.

विष्णुश्च दैत्येंद्रशराहतोपि भृशुंडिमादाय कृतां तुल्यां ॥ तयास्त्र शुंड्या च पिपेष मेषं शुंभस्य पत्रं धरणीधराभं ॥२८॥

अर्थः- तेव्हां त्या दैत्यश्रेष्ठ शुंभ दानवाच्या बाणानीं विष्णु ताडित जाहला असूनही त्या विष्णूनें केवळ काळा सारखें भयंकर भृशुंडी नामक आयुध घेऊन त्या शस्त्रानें शुंभदैत्याचें वाहन पर्वताकार शरीरी मेढा याचें चूर्ण केलें.

तस्मादवाप्लुत्य हताच्च मेषाद्भूमौ पदातिः स तु दैत्यनाथः ॥ ततो महीस्थस्य हरिः शरौघान्मुमोच कालानल तुल्यभासः ॥२९॥

अर्थः- तेसमयीं तो दैत्यनायक शुंभदानव त्या मृत्यु पावलेल्या मेढ्या वरून खालीं उडी टाकून भूमीवरून पायानींच विष्णूचे अंगावर चालला असतां, पश्चात् तो गरुडवाहन हरि, पृथ्वीवरूनच युद्ध करणाऱ्या त्या शुंभ दानवास प्रलयकालच्या अग्नीसमान तेजोमय तीक्ष्ण बाणांचे समुदाय मारूं लागला.

शरैस्त्रिभिस्तस्य भुजं बिभेद षड्भिश्च शीर्षं दशभिश्च केतुं ॥ विष्णुर्विकृष्टैः श्रवणावसानं दैत्यस्य विव्याध विवृत्तनेत्रः ॥३०॥

अर्थः- आणि विष्णूनें अति क्रोधेंकरून नेत्र वटारून बहुत बाण धनुष्यास लावले; मग तें धनुष्य आकर्णपर्यंत ओढून त्यांतील तीन बाणानीं शुंभ दानवाच्या भुजांचें विदारण केलें; सहा बाणानीं त्याचें मस्तक फोडलें; तसाच दहा बाणानीं रथाचा ध्वज तोडला.

स तेन विद्धो व्यथितो बभूव दैत्येश्वरो विस्रुतशोणितोघः ॥ ततोस्य किंचिच्चलितस्य धैर्यादुवाच शंखांबुजशार्ङ्गपाणिः ॥३१॥

अर्थः- त्याकाळीं तो दैत्यश्रेष्ठ शुंभदानव त्या विष्णूच्या बाणांचे, प्र-

हारानें ताडित जाहल्यामुळें व्यथा पावून त्याच्या मुखादिक अवयवांतून रक्ताच्या धारा चालल्या; तेणेंकरून तो असुर धैर्यापासून किंचित् चलित जाहला असतां, हस्तांत शंख, कमल व शार्ङ्ग धनुष्य धारण करणारा तो भगवान् विष्णु, त्या दैत्यास बोलूं लागला.

कुमारिवध्योसिरणंविमुंचशंभासुरस्वल्पतरैरहोभिः॥ वधन्नमत्तोर्हसिचेहमूढरथैवकिंयुद्धसमुत्सुकोसि॥३२॥

अर्थः- कीं, हे शंभासुरा थोड्याच दिवसानीं दुर्गादेवीच्या हातून तुझा वध होणार आहे; मजपासून तूं वधमात्र पावणार नाहीस; परंतु निश्चयें करून पराजित होशील; तस्मात् तूं आतां युद्धाविषयीं व्यर्थ किमर्थ अतिशयें उत्सुक होतोस तर संग्राम सोडून जा.

शंभोवचोविष्णुमुखान्निशाम्यनिमिश्चनिष्पेष्टुमियेषविष्णुं॥ गदामथोद्यम्यनिमिःप्रचंडांजघानगात्रेगरुडंशिरस्तः॥३३॥

अर्थः- असें विष्णूच्या मुखांतून निघालेलें भाषण ऐकून शंभदैत्य उगाच राहिला; परंतु निमिदैत्य क्रोधायमान होत्साता गदा उचलून चूर्ण करण्याच्या इच्छेनें विष्णूचे अंगावर आला; आणि त्यानें ती महा प्रचंड गदा गरुडाचे मस्तकावर मारिली.

जंभोपिविष्णुंपरिघेणमूर्ध्निप्रकृष्टरत्नौघविचित्रभासा॥ तौदानवाभ्यांविषमैःप्रहारैर्निपेतुरुर्व्यांघनपावकाभौ॥३४॥

अर्थः- तसाच जंभासुरानेंही उत्कृष्ट रत्नांचे समुदायानें विचित्र कांतियुक्त परिघाचा विष्णूस प्रहार केला; तेसमयीं निमि व जंभ या दोन्ही दैत्यांचे त्या तीक्ष्ण प्रहारानीं सजल मेघासारिखा नीलवर्ण कांतियुक्त विष्णु व अग्निसमान आरक्तवर्ण गरुड हे दोघेही पृथ्वीवर पडले.

तत्कर्मदृष्ट्वादितिजास्तुसर्वेजगर्जुरुच्चैःकृतसिंहनादाः॥धनूंषिचास्फोट्यखुराभिघातैर्व्यदारय

न्भूमिमपिप्रचंडाः॥ वासांसिचैवादुधुवुःपरेतुद
ध्मुश्चशंखानकगोमुखौघान्॥३५॥

अर्थः- तेव्हां निमिदैत्य व जंभासुर यांचें तें कर्म पाहून त्या असुरांचे सैन्यांतील सर्व दैत्य सिंहनाद करून गर्जना करूं लागले; आणि आपापले धनुष्याच्या दोरीचा टणत्कार करून ते प्रचंड दानव धनुष्यांचे टोंकानीं भूमीचें विदारण करूं लागले; तसेच इतर कोणी दैत्य जयप्राप्तीचे हर्षानें आपलीं वस्त्रें हालवूं लागले; व कोणी दुसरे असुर शंख भेरी व गोमुखाकार वाद्यहीं वाद्यें वाजवूं लागले.

अथसंज्ञामवाप्याशुगरुडोपिसकेशवः॥ परा
ङ्मुखोरणात्तस्मात्पलायतमहाजवः॥३६॥
इतिश्रीमत्स्यपुराणेदेवासुरसंग्रामेएकपंचाश
दुत्तरशततमोध्यायः॥१५१॥

अर्थः- नंतर विष्णुसहित गरुडानें मूर्च्छा जाऊन शुद्धि आल्या सारखें दाखवून तत्काल त्या रणांतून मागें फिरून मोठ्या वेगानें शीघ्र पलायन केलें. इतिश्री मत्स्यपुराणे तारकोपाख्यानें टीकायां एकपंचाशदुत्तरशततमोध्यायः १५१

अध्याय १५२ वा.

सूतउवाच॥ ॥ तमालोक्यपलायंतंविभ्रष्ट
ध्वजकार्मुकं॥ हरिंदेवःसहस्राक्षोमेनेभग्नंदु
राहवे॥१॥

अर्थः- सूत बोलला ऋषीहो त्याकालीं विष्णु आपलें धनुष्य तुटलें असतां गरुडासहवर्तमान पलायन करीत आहे असें पाहून सहस्रनेत्र इंद्रानें असें मानिलें कीं, या दुस्तर संग्रामांत विष्णु पराभव पावला.

दैत्यांश्चमुदितान्दृष्ट्वाकर्तव्यंनाध्यगाच्छत॥
अथायान्निकटेविष्णोःसुरेशःपाकशासनः २

अर्थः- आणि असुर सेन्यांतील ते सर्व दैत्य हर्ष पावले आहेत असें पाहून इंद्रास कांहीं एक कर्तव्य उपाय सुचेनासे होऊन मग

तो पाक दैत्याचें शासन करणारा देवराज इंद्र, विष्णूकडे आला.

उवाचचैनंमधुरंप्रोत्साहपरिबृंहकं ॥ किमेभिः
क्रीडसेदेवदानवैर्दुष्टमानसैः ॥ ३ ॥

अर्थः- आणि इंद्र, विष्णूस युद्धाविषयीं प्रोत्साहन वृद्धिकारक, मधुर वाक्य बोलतो; कीं, हे देवा तूं या दुष्टचित्त दानवांशींही कार्य उगीच व्यर्थ क्रीडा करतोस.

दुर्जनैर्लब्धरंध्रस्यपुरुषस्यकुतः क्रियाः ॥ शक्ते
नोपेक्षितोनीचोमन्यतेबलमात्मनः ॥ ४ ॥

अर्थः- तशीच नीतीही अशी आहे कीं, पुरुषाचें छिद्र दुर्जनास सापडल्यावर मग त्या पुरुषाचे उद्योग सफल कोठून होतील; आणि बलवंतानें नीचाची उपेक्षा केली असतां, तो नीच आपणास बलिष्ठता मानतो.

तस्मान्ननीचंमतिमान्दुर्गहीनंहिसंत्यजेत् ॥ अ
थाग्रेसरसंपत्यारथिनोजयमाप्नुयुः ॥ ५ ॥

अर्थः- तस्मात् बुद्धिमंतानें आपले नीच शत्रूंस किल्याचा आश्रय नसला तथापि त्यांस सोडूं नये; त्याच प्रमाणें सर्व रथी सेनापतीचे उत्तम आश्रयानें संग्रामांत जय पावतात.

कस्तेसखाभवच्चाग्रेहिरण्याक्षवधेविभो ॥ हि
रण्यकशिपुर्दैत्योवीर्यशालीमदोद्धतः ॥ ६ ॥ त्वां
प्राप्यापश्यदस्फूरोविषमंस्मृतिविभ्रमं ॥

अर्थः- परंतु ही गोष्ट इतरांची आहे; कारण पूर्वी हे प्रभो तुला हिरण्याक्षाचे वधा विषयीं कोण साह्य होता; तसाच पराक्रमशाली, वीर्यमदानें उन्मत्त जाहलेला हिरण्यकशिपु दैत्य तुला पहातांच तुझ्या अद्भुत स्वरूप दर्शनाच्या भीतेनें स्मरणाचा विलक्षण विपर्यास पावून नाश पावला.

पूर्वेप्यतिबलायेचदैत्येंद्राः स्फुरविद्विषः ॥ ७ ॥
विनाशमागताः प्राप्यशलभाइवपावकं ॥

अर्थः- तसेच देवांचा बहुत द्वेष करणारे अतिबलिष्ठ पुरातन

अनेक महा दैत्य तुझ्या अग्रभागीं येऊन (अग्नीच्या समीपभागीं आलेल्या पतंगा सारखे) मरण पावले.

युगेयुगेचदैत्यानांत्वमेवांतकरोहरे॥८॥तथैवाद्येहमग्नानांभवविष्णोसुराश्रयः॥

अर्थः- आणि हे देवाधिदेवा नारायणा! प्रतियुगीं तूंच या दैत्यांचा संहार करून भक्तांचीं संकटें दूर करीत असून आम्हा देवांस आश्रयही आहेस; तस्मात् प्रस्तुत आम्ही या असुरांशीं युद्ध करण्यांच्या संकटांत पडलो आहोत; यास्तव तूंच आतां आम्हांस आश्रय दे!

एवमुक्तस्ततोविष्णुर्व्यवर्धतमहाभुजः॥९॥ऋध्यापरमयायुक्तः सर्वभूताश्रयोरिहा॥

अर्थः- असें इंद्रानें भाषण केलें असतां, पश्चात् परम दिव्य ऐश्वर्यानें युक्त असून सर्व भूतांस आश्रय, व शत्रूंचा नाश करणारा महाभुज विष्णु त्या कालीं आपले स्वरूपानें वाढला.

अथोवाचसहस्राक्षंकालक्षममधोक्षजः॥१०॥दैत्येंद्राः स्वैर्वधोपायैः शक्याहंतुंहिनान्यतः॥

अर्थः- नंतर विष्णु, सहस्त्रनयन इंद्रास तत्काल योग्य असें भाषण बोलला कीं, हे इंद्रा हे महापराक्रमी दैत्य त्यांच्या त्यांच्या ईश्वरानें योजलेल्या वधांचे उपायानींच मारण्यास योग्य आहेत; त्यावांचून ते दैत्य अन्यथा दुसऱ्या रीतीनें मृत्यु पावणार नाहींत.

दुर्जयस्तारकोदैत्योमुक्त्वासप्तदिनंशिशुं॥११॥कश्चित्स्त्रीवध्यतांप्राप्तोवधेन्यस्यकुमारिका॥

अर्थः- ते असे कीं, हा तारकासुर दैत्य महापराक्रमानेंही जिंकण्यास अशक्य आहे; तसाच कोणी दैत्य स्त्रीचे हातून, वध पावणारा आहे; दुसऱ्या कोणी दैत्याचे वधाविषयीं कुमारिका नेमली आहे.

जंभस्तुवध्यतांप्राप्तोदानवः क्रूरविक्रमः॥१२॥तस्माद्वीर्येणदिव्येनजहिजंभंजगद्गुरं॥

अर्थः- परंतु ह्या भयंकर पराक्रमी जंभदानवाचा प्रस्तुत वध-काल प्राप्त झाहला आहे; तस्मात् उत्तम पराक्रमानें जगांतील महाबलिष्ठ या जंभासुरास मार.

अवध्यः सर्वभूतानांत्वांविनासतुदानवः ॥ १३
॥ मयागुप्तोरणेजंभंजगत्कंटकमुद्धर ॥

अर्थः- हे इंद्रा हा जंभासुर तुजवांचून प्राणिमात्रांत कोणाचे-ही हातून वधास योग्य नाहीं; तस्मात् तूं माझे रक्षणानें युक्त होत्साता जगास कांट्या समान दुःखदायक अशा या जंभासु-राचा वध कर.

ततंहेकुंठवचः श्रुत्वासहस्राक्षोमरारिहा ॥ १४
॥ समादिशत्सुरान्सर्वान्सैन्यस्यरचनांप्रति ॥

अर्थः- असें तें विष्णूचें भाषण ऐकून देवांचे शत्रू जे असुर यां-स मारणाऱ्या सहस्रनयन इंद्रानें त्याकाळीं सर्व देवांस आपले सैन्याच्या रचने विषयीं आज्ञा केली.

यत्सारंसर्वलोकेषुवीर्यस्यतपसोपिच ॥ १५ ॥
तदेकादशरुद्रांस्तुचकाराग्रेसरान्हरिः ॥

अर्थः- जे समर्यी सर्व लोकांतील पराक्रम व तप यांचें केवळ सारभूत अशा एकादशरुद्रांस विष्णूनें सर्व सैन्याचे अग्रभा-गीं योजले.

व्यालभोगांगसन्नद्धाबलिनोनीलकंधराः ॥
१६ ॥ चंद्रलेखनचूडालामंडितासुशिखंडिनः
॥ शूलज्वालीभिषंगाढ्याभुजमंडलभैरवाः
॥ १७ ॥ पिंगोत्तुंगजटाजूटाः सिंहचर्मानुषंगि
नः ॥ कपालीशादयोरुद्राविद्रावितमहासुराः
॥ १८ ॥

अर्थः- ते रुद्र असेकीं, वासुकी आदिकरून नागभूषणानीं सुशोभित असून स्वतः महाबलिष्ठ, नीलकंठ, आणि मस्तकीं धारण केलेल्या भूषणरूप अर्धचंद्राच्या कांतीनें शोभायमान

स्तकींच्या मयूरपिच्छांनीं युक्त, त्रिशूलाचे तेजानें इतरांचे पराजया विषयीं समर्थ, उग्रभुजांचे धैर्यानें भयंकर, मस्तकीं पिंगट-वर्ण जटाजूटानें शोभायुक्त, सिंहचर्माचे भात्यानीं युक्त असे कपाली नामक रुद्रादिक अकरारुद्र मोठ्या असुरांस युद्धांत पळविणारे होते.

कपालीपिंगलोभीमोविरूपाक्षोविलोहितः॥
अजेशः शासनः शास्ताशंभुःखंडोध्रुवस्तथा
॥१९॥एतेएकादशानंतबलारुद्राः प्रभाविनः॥

अर्थः- ते असे कीं, १ कपाली, २ पिंगल, ३ भीम, ४ विरूपाक्ष, ५ विलोहित, ६ अजेश, ७ शासन, ८ शास्ता, ९ शंभु, १० खंड, ११ ध्रुव हे अकरा रुद्र अपरिमित बलिष्ठ असल्यामुळें महाप्रतापी होते.

पालयंतोबलस्याग्रेदारयंतश्चदानवान्॥२०
॥आप्याययंतस्त्रिदशान्गर्जंतइवचांबुदाः॥

अर्थः- ते अकरा रुद्र आपले देवसैन्याचे रक्षण करीत सेनेच्या अग्रभागीं उभे राहून दानवांचें विदारण करीत होते; आणि देवांची युद्धा विषयीं उत्साह शक्ति वृद्धिंगत करून सजल मेघासमान गर्जना करीत असत.

हिमाचलाभेमहतिकांचनांबुरुहस्त्रजि॥२१॥
प्रचलच्चामरेहेमघंटासंघातमंडिते॥ऐरावतेच
तुर्दंतेमातंगेचलसंस्थिते॥२२॥महामदजल-
स्त्रावेकामरूपेशतक्रतुः॥तस्थौहिमगिरेः शृं-
गेभानुमानिवदीप्तिमान्॥२३॥

अर्थः- त्याकाळीं हिमालय पर्वता समान शुभ्र कांतीनें युक्त असून ज्याचे गळ्यांत सुवर्ण कमलांच्या माला शोभत असत; तशींच ज्याचे अंगावर सेवक चवऱ्या वारीत आहेत; सोन्याच्या घंटांचे समुदायानीं जो सुशोभित असून अत्युत्तम सुगंधयुक्त मदजलाचा स्त्राव ज्याचे गंडस्थलांतून निरंतर होत आहे; त्याच प-

माणें जो यथेच्छ (इच्छानुसार) कामरूपें धारण करणारा व जो पर्वतप्राय शरीरानें स्थिरपणें उभा राहणारा अशा त्या ऐरावत नामक चतुर्दंत (चारदांतांचा) महागजावर शंभर अश्वमेध यज्ञ करणारा तो इंद्र बसला; तो (जसा शक्र हिमालय पर्वताचे शिखरावरील तेजोमय सूर्यासारखा) शोभला.

तस्यारक्षत्पदं सव्यं मारुतोमितविक्रमः ॥ ज्र
गोपापरमग्निस्तु ज्वालापूरितदिङ्मुखः ॥२४॥

अर्थः- अपरिमित पराक्रमी वायु त्या ऐरावतगजाच्या डाव्या पायाचें रक्षण करीत होता; व ज्यानें आपल्या ज्वालानीं दिशांचीं मुखें व्याप्त केलीं आहेत अशा अग्नीनें त्या ऐरावताच्या उजवे पायाचें रक्षण चालविलें.

पृष्ठरक्षोभवद्विष्णुः ससैन्यस्य शतक्रतोः ॥ आ
दित्यावसवो विश्वे मरुतश्चाश्विनावपि ॥२५॥ गं
धर्वा राक्षसा यक्षाः सकिन्नरमहोरगाः ॥ नाना-
विधायुधाश्चित्रा दधाना हेमभूषणाः ॥२६॥ को
टिशः कोटिशः कृत्वा वृंदं चिन्होपलक्षितं ॥ वि-
श्रावयंतः स्वां कीर्तिं बंदिवृंदपुरः सराः ॥ चेरुर्दैत्य
वधे हृष्टाः सहेंद्राः सुरजातयः ॥२७॥

अर्थः- तसाच विष्णु, सैन्यासहित इंद्राचा पृष्ठरक्षक जाहला; आणि बारा आदित्य, आठ वसु, विश्वेदेव, मरुद्गण, अश्विनीकुमार, गंधर्व, निर्ऋति लोकपालाचे सेवक राक्षस, कुबेराचे यक्षगण, किन्नर, शेषादिक महानाग, हे चित्र विचित्र युद्ध करणारे, अनेक प्रकारचीं आयुधें व सुवर्णाचीं भूषणें धारण करणारे वीर आपापले निरनिराळ्या गणांचे प्रत्येकीं पृथक् चिन्हानीं युक्त असे समुदाय करून पुढें चालणाऱ्या अनेक बंदिजनांचे मुखांतून आपली कीर्ति श्रवण करीत इंद्रासहित सर्व देव जातीचे गण हर्षानें दैत्यांचे वधाविषयीं त्या रणभूमींत संचार करूं लागले.

शतक्रतोरमरनिकायपालितापताकिनीगजश

नवाजिनादिता ॥ सितातपत्रध्वजपटकोटिमं
डिताबभूवसादितिसुतशोकवर्धिनी ॥ २८ ॥

अर्थः- अशा देवांचे समुदायानीं सुरक्षित असून शेंकडों हत्ती व घोडे यांचे शब्दांच्या गर्जनेनें युक्त; आणि शुभ्र छत्रें व कोट्यावधि ध्वजांच्या वस्त्रांचे फरारे यानीं सुशोभित तो इंद्राची सेना पाहून त्या संग्रामांतील सर्व दैत्यांचे मनांत शोकाची वृद्धि जाहली.

आयांतीमवलोक्याथसुरसेनांगजासुरः ॥ ग
जरूपीमहांभोदसंघातोभातिभैरवः ॥ २९ ॥

अर्थः- नंतर ती देवसेना असुरांचे सैन्यावर येत आहे; असें पाहून हत्तीचे आकृतीचा भयंकर गजासुर त्या दैत्यांचे सैन्यांत मोठ्या मेघाच्या समुदायासारखा शोभला.

परश्वधायुधोदैत्योदंशितोष्ठकसंपुटः ॥ मम
र्दचरणेदेवांश्चिक्षेपान्यान्करेणतु ॥ ३० ॥

अर्थः- मग तो गजासुर दैत्य हातांत परशु घेऊन दांतानीं ओंठ चावून आपले पायांखालीं देवांचें मर्दन करून त्यांचे इतरगणांसही हातानें ताडन करूं लागला.

परान्परशुनाजघ्नेदैत्यंद्रोरौद्रविक्रमः ॥ तस्य
पातयतः सेनांयक्षगंधर्वकिन्नराः ॥ ३१ ॥ मुमु
चुः संहताः सर्वेचित्रशस्त्रास्त्रसंहतिं ॥

अर्थः- आणि भयंकर पराक्रमी असा तो गजदैत्य दुसऱ्यांस परशूनें मारूं लागला; असा तो असुर देवसैन्याचा संहार करीत असतां, यक्ष, गंधर्व व किन्नर हे सर्व एकत्र मिळून चित्र विचित्र शस्त्रास्त्रांची त्या गजदानवावर वृष्टि करूं लागले.

पाशान्परश्वधांश्चक्रान्भिंदिपालान्समुद्ग
रान् ॥ ३२ ॥ कुंतान्प्रासानसींस्तीक्ष्णान्मुद्गरां
श्चापिदुःसहान् ॥ तान्सर्वान्सोग्रसद्दैत्यः कव
लानिवयूथपः ॥ ३३ ॥

अर्थ:- तेव्हां त्या यक्षादिकानीं टाकलेलीं पाश, कुऱ्हाड, चक्रें, मुद्गलसहित भिंदिपाल, कुंत, प्रास, तीक्ष्णधारेच्या तरवारी व सहनकरण्यास अशक्य असे मुद्गलही सर्व शस्त्रें त्या गजासुर दैत्यानें (जसा हत्तींच्या समुदायांचें रक्षण करणारा महागज, ग्रासांचें भक्षण करितो) तशीं गिळून टाकलीं.

कोपास्फालितदीर्घाग्रकरास्फोटेनपातयन्॥
विचचाररणेदेवान्दुष्प्रेक्ष्योगजदानवः॥३४॥

अर्थ:- आणि क्रोधानें कंपायमान हस्ताच्या अग्राचे ताडनानें देवसैन्यांतील वीरांस पाडीत असतां, पहाण्यासही अशक्य असा तो उग्ररूपी गजदानव त्या रणभूमींत संचार करूं लागला.

यस्मिन्यस्मिन्निपततिसुरवृंदेगजासुरः॥त
स्मिन्तस्मिन्महाशब्दोहाहाकारकृतोभवत्
॥३५॥

अर्थ:- आणि तो गजासुर देवसैन्याचे समुदायावर जेथें जेथें जाऊन पडे तेथें तेथें हाहाकार युक्त मोठा भयंकर शब्द होऊं लागला.

अथविद्रवमाणंतद्बलंप्रेक्ष्यसमंततः॥रुद्राःप
रस्परंप्रोचुरहंकारोत्थितार्चिषः॥३६॥

अर्थ:- नंतर असें त्या गजासुरानें आपलें सैन्य चोहीकडे पळविलेलें पाहून अहंकारापासून उत्पन्न जाहलेल्या क्रोधाग्नीच्या ज्वालानीं युक्त ते एकादशरुद्र परस्परें बोलूं लागले.

भोभोगृण्हीतदैत्येंद्रंमर्दतेनंहताश्रयं॥कर्षते
नंशितैःशूलैर्भंजितेनंत्वमर्मसु॥३७॥

अर्थ:- कीं, अहो अहो या दैत्यश्रेष्ठ गजासुरास धरा; आणि याचे आश्रय मरण पावले आहेत; तस्मात् आतां याचें तुम्हीं मर्दन करा! व आपले तीक्ष्ण शूलानीं या दानवास ओढून याचे सर्वांगीं मर्मस्थानीं प्रहार करा.

कपालीवाक्यमाकर्ण्यशूलंशितशिखामुखं॥

संमार्ज्यवामहस्तेनसंरंभविवृतेक्षणः॥३८॥
अधावन्भृकुटीवक्रोदैत्येंद्राभिमुखोरणे॥

अर्थः- असें तें भाषण श्रवण करून कपाली नामा रुद्र तीक्ष्ण अग्रयुक्त शूल, डाव्या हातानें पुसून लख लखीत करून रोषानें डोळे वटारून तश्याच भोंवयाही वांकड्या करून रणांत त्या दैत्यश्रेष्ठ गजासुराचे अंगावर धांवला.

दृढेनमुष्टिबंधेनशूलंविष्टभ्यनिर्मलं॥३९॥ज
घानकुंभदेशेतुकपालीगजदानवं॥

अर्थः- आणि बळकट मुठीनें स्वच्छ शूल घेऊन त्या कपाली नामक रुद्रानें गजदानवाचे गंडस्थळावर त्या शूलाचा प्रहार केला.

ततोदशापितेरुद्रानिर्मलायोमयैरणे॥४०॥ज
घ्नुः शूलैश्चदैत्येंद्रं शैलवर्ष्माणमाहवे॥

अर्थः- नंतर ते दहाही रुद्र त्या रणांत पोलादी तीक्ष्ण शूलानीं, पर्वतप्राय शरीरी त्या दैत्यश्रेष्ठ गजासुरास मारूं लागले.

स्रुतशोणितरंध्रस्तुशितशूलमुखादितः॥४१॥
बभौकृष्णाच्छविर्दैत्यः शारदीवामलंसरः॥

अर्थः- तेव्हां त्या एकादशरुद्रांच्या तीक्ष्ण शूलाचे अग्रानीं गजदानव पीडित जाहला असतां, त्याच्या शरीराचे मुखादि सर्व छिद्रांतून रक्ताचे पाझर चालले; आणि तो गजदैत्य (शरदृतूंतील स्वच्छ सरोवरासारखा) कृष्णवर्ण दिसूं लागला.

प्रोत्फुल्लारुणनीलाब्जसंघातः सर्वतोदिशं॥
४२॥भस्मशुभ्रतनुच्छायैरुद्रैर्हंसैरिवावृतः॥

अर्थः- आणि सरोवरांतील प्रफुल्लित झालेल्या कांहीं आरक्तवर्ण असून कांहीं नीलवर्ण अशा कमलांचा समुदाय सभोंवती बसलेल्या हंसानीं जसा शोभतो. तसा तो गजासुर स्वतः कृष्णवर्ण असून अंगांतून चाललेल्या रक्त प्रवाहानें तांबडा दिसत आहे; व सभोंवतीं भस्मासारिख्या देहाचे शुभ्र कांतीनें हंसासमान शो-

भणाऱ्या त्या अकरा रुद्रानीं वेष्टित असा तो गजदैत्य शोभूं लागला.

उपस्थितार्तिर्दैत्योथ प्रचलत्कर्णपल्लवः ॥ ४३ ॥ शंभुंबि
भेददशनैर्नाभिदेशेगजासुरः

अर्थ— या प्रमाणें त्या गजासुरास पीडा प्राप्त होऊन त्याच्या कानांचे चापे हालत असूनही तो दैत्य तसाच शंभुनामक रुद्राच्या नाभीस चावला.

दृष्ट्वासक्तंतुरुद्राभ्यांनवरुद्रास्ततोद्भुतम् ॥ ततस्तुर्विवि
धैः शस्त्रैः शरीरममरद्विषः

अर्थ— असा तो गजासुर दोन रुद्रांशीं अद्भुत युद्ध करीत आहे असें पाहून पश्चात् ते नऊ रुद्र आपले नाना प्रकारच्या अनेक शस्त्रांनीं देवांचा द्वेष करणाऱ्या दैत्याचें शरीर तोडूं लागले.

निर्भयाबलिनोयुद्धेरणभूमौव्यवस्थिताः ॥ ४४ ॥ मृतं
महिषमासाद्यवनेगोमायवोयथा ॥ कपालिनोपरित्यज्य
गतश्चासुरपुंगवः ॥ ४५ ॥

अर्थ— आणि ते निर्भय असून महाबलाढ्य असे ते एकादशरुद्र गजासुराचे सभोंवती येऊन त्या रणभूमींत उभे राहिले होते, ते असे कीं, मृत्यु पावलेल्या रेड्याचे आसमंतात् जसे कोल्हे जमतात तसा तो असुर श्रेष्ठ गजदानव त्या शंभु व कपाली या दोन रुद्रांस सोडून त्या नऊ रुद्रांकडे गेला.

वेगेनकुपितोदैत्योनवरुद्रानुपाद्रवत् ॥ ममर्दचरणाघा
तैर्दंतैश्चापिकरेणच ॥ ४६ ॥

अर्थ— नंतर तो गजासुर क्रोधानें नऊ रुद्रांवर धांवला. आणि त्यानें आपले पाय, दांत, व हात यांचे प्रहारानीं त्या नऊ रुद्रांचें मर्दन चालविलें.

सतेस्तुमुलयुद्धेनश्रममासादितोयदा ॥ तदाकपालीज
ग्राहकरंतस्यामरद्विषः ॥ ४७ ॥

अर्थ— पश्चात् तो गजासुर त्या नव रुद्रांशीं तुमुल युद्ध करून ज्या कालीं श्रमला त्या कालीं कपाली नांवाचे रुद्रानें देवांचा द्वेष करणारा जो गजदैत्य त्याचा हात धरिला.

भ्रामयामासवेगेनत्वतीवचगजासुरम् ॥ दृष्ट्वाश्रमा
तुरंदैत्यंकिंचित्स्फुरितजीवितम् ॥ ४८ ॥ निरुत्साहं

रणेतस्मिन्गतयुद्धोत्सवोश्रमम्॥ततःपतत एवास्यच
र्मचोत्कृत्यभैरवम्॥४९॥स्रवत्सर्वांगरक्तौघंचकारां
बरमात्मनः॥

अर्थ- आणि त्या कपाली रुद्रानें गजासुरास अतिशयें मोठ्या वेगानें गरगरां फिरविलें, तेणें करून तो दैत्य बहुत श्रमानें मरणोन्मुख जाहला असून आंत किंचित् जीवित मात्र शेष राहिलें होतें. तसेंच त्याचे युद्धा विषयीं उत्साह व उद्योग हे गेल्यानें तो अत्यंत खिन्न जाहला. नंतर त्या रणभूमींत पडलेल्या गजासुराचें भयंकर चर्म काढून सर्वांगीं गळणाऱ्या रक्ताचे ओघानें युक्त तें गजासुराचें चर्म आपलें वस्त्र केलें.

दृष्ट्वाविनिहतंदैत्यंदानवेंद्रामहाबलाः॥५०॥वित्रेसुर्दु
द्रुवुर्जग्मुर्निपेतुश्चसहस्रशः॥

अर्थ- या प्रमाणें तो दैत्य गजासुर मरण पावला असतां महा बलाढ्य ते श्रेष्ठदानव बहुत त्रास पावले, कोणी पळाले, कोणी युद्ध सोडून भुवींच गेले; व कोणी हजारों योद्धे भीतीनें तेथेंच पडले.

दृष्ट्वाकपालिनोरूपंगजचर्मांबरावृतम्॥५१॥दिक्षुभू
मौतमेवोग्ररुद्रंदैत्याव्यलोकयन्॥

अर्थ- नंतर तें असें गजासुराचें चर्म पांघरलेलें कपाली रुद्राचें रूप पाहून त्या असुर सैन्यांतील सर्व दैत्यांस भयानें भूमीवर सर्व दिशांत तेंच उग्ररूप दिसूं लागलें.

एवंविलुलितेतस्मिन्दानवेंद्रेमहाबले॥५२॥द्विपाधि
रूढोदैत्येंद्रोहतदुंदुभिनाततः॥कल्पांतांबुधराभेनदुर्ध
रेणापिदानवः॥५३॥निमिरभ्यपतत्तूर्णंसुरसैन्यानि
लोडयन्॥ ॥

अर्थ- या प्रमाणें महाबलाढ्य तो दानवश्रेष्ठ गजासुर मरण पावला असतां हत्तीवर बसलेला दैत्यश्रेष्ठ निमिदानव युद्धसमयीं वाजणाऱ्या दुंदुभीच्या प्रलयमेघासमान भयंकर शब्दानें युद्धाविषयीं आलेल्या आवेशानें तो असुर देवांचे सैन्यावर त्वरेनें जाऊन त्यांचें मर्दन करूं लागला.

यांयांनिमिगजोयाति दिशांतांसवाहनाः॥५४॥संत्य-

ज्यदुद्रुवुर्देवाभयात्तस्यिक्तहेतवः॥

अर्थ- ते समयीं तो निमिदैत्याचा गज ज्या ज्या दिशेस जात असे, त्या त्या दिशेचे देव आपलीं आयुधें टाकून भयभीत होत्साते आपापल्या वाहनांसहित पळूंलागले.

गंधेनसुरमातंगाडुद्रुवुस्तस्यहस्तिनः॥५५॥ पलायिते षुसैन्येषुसुराणांपाकशासनः॥ तस्थौदिक्पालकैःसा धर्मएभिः केशवेनच॥५६॥

अर्थ- तसेंच त्या निमिदानवाच्या हत्तीचे अंगसंबंधी उग्रवासानें देवांचे हत्तीही पळाले; तेव्हां अशीं तीं देवांचीं सैन्यें पळालीं असतांही पाकनामक दैत्यास मारणारा इंद्र, अष्टदिशांचे लोकपाल व विष्णु यांसहवर्तमान तसाच धैर्यानें उभा राहिला.

संप्राप्तोनिमिमातंगोयावच्छक्रगजंप्रति॥तावच्छक्र- गजोयातोमुक्तानादंसभैरवम्॥५७॥

अर्थ- नंतर त्या निमिदैत्याचा हस्ति इंद्राच्या ऐरावत गजासन्मुख येतांच तो इंद्राचा हत्ति महान् भयंकर शब्द करून पळाला.

ध्रियमाणोपियत्नेननस्वकैरवतिष्ठति॥ पलायितेगजे तस्मिन्नारूढःपाकशासनः॥५८॥ विपरीतमुखो युद्ध्यद्दानवेंद्रबलंप्रति॥

अर्थ- त्या काळीं त्या ऐरावत गजास, त्याचे स्वकीय इंद्रादिकांनीं बहुत प्रयत्नानें धरिलें तथापि तो हत्ती उभा राहिना, तेव्हां तो इंद्र आपला ऐरावत पळत असतां तसाच त्यावर मागें तोंड करून बसून निमिदानवाचे सैन्याशीं युद्ध करूं लागला.

शतक्रतुस्तुवज्रेणनिमिंवक्षस्यताडयत्॥५९॥गदया दंतिनश्चास्यगंडदेशेहनद्दृढं॥

अर्थ- आणि शंभर अश्वमेध यज्ञ करणारा इंद्र आपल्या वज्रानें निमिदैत्याचे वक्षस्थलास ताडन करिता जाहला. व त्यानें निमीच्या हत्तीचे गंडस्थलावर गदेचा बळकट प्रहार केला.

तत्प्रहारमचिंत्यैवनिमिर्निर्भयपौरुषः॥६०॥ ऐरावणंक टीदेशेमुद्गरेणाभ्यताडयत्॥

अर्थ- तरी त्या इंद्रानें केलेल्या वज्रप्रहाराची गणना नच करितां तो निर्भय पराक्रमी निमिदानव यानें इंद्राच्या ऐरावताच्या कंबरेवर मुद्गल मारिला.

सहतोमुद्गरेणाथशक्रकुंजरआहवे ॥ ६१ ॥ जगामपश्चा-
च्चरणैर्धरणींभूधराकृतिः ॥

अर्थ- तेव्हां त्या मुद्गलाच्या प्रहारानें इंद्राचा ऐरावत ताडित जाहला असतां त्या पर्वतप्राय शरीरी इंद्राच्या गजानें आपले मागील पाय त्या संग्राम भूमीवर टेकले.

लाघवान्क्षिप्रमुत्थायततोमरमहागजः ॥ ६२ ॥ रणाद
पससर्पाशुभीषितोनिमिहस्तिना ॥

अर्थ- पश्चात् तो इंद्राचा महागज आपले देहाच्या हलकेपणामुळें त्वरनें उठून तत्क्षणीं तो ऐरावत त्या निमिदानवाच्या हत्तीस भिऊन रणांतून शीघ्र मागें फिरला.

ततोवायुर्ववौरूक्षोबहुशर्करपांसुलः ॥ ६३ ॥ संमुखोनि
मिमातंगोजवनाचलकंपनः ॥ स्रुतरक्तोबभौशैलोघ
नचारुह्रदोयथा ॥ ६४ ॥

अर्थ- नंतर बहुत वाळू व धूळ यानीं मिश्रित असून रुक्ष असा वायु वाहूं लागला. आणि निमि दैत्याचा हत्ति इंद्रासमोर येऊन उभाराहिला. तो अंगावरील रक्तप्रवाहानें गैरिकादिक धातूनीं आरक्तवर्ण असून केवल वेगानें चालणाऱ्या पर्वता समान शोभला- किंवा जलपूर्ण सुंदर कृष्णवर्ण डोह सूर्य किरणांनीं आरक्तवर्ण वर आलेल्या मेघानीं जसा शोभतो तसा निमिदैत्याचा हत्ति शोभूं लागला.

धनेशोपिगदांगुर्वींतस्यदानवहस्तिनः ॥ चिक्षेपवेगाद्दै-
त्येंद्रेनिपपातास्यमूर्धनि ॥ ६५ ॥

अर्थ- तेव्हां मेघाधिपति इंद्रानें निमिदानवाचे हत्तीस मोठी गदा मारिली- आणि वेगानें त्या दैत्यश्रेष्ठ निमीवरही टाकिली. ती गदा त्याचे गजाच्या मस्तकावर पडली.

गजोगदानिपातेनसतेनपरिमूर्च्छितः ॥ दंतैर्भित्वाध
रांवेगात्पपाताचलसंन्निभः ॥ ६६ ॥

अर्थ- त्या गदेच्या प्रहारानें तो निमीचा हत्ती अत्यंत मूर्छित होत्साता वेगानें

पर्वता सारखा पृथ्वीवर पडला असतां त्याचे दांतानीं भूमीचें विदारण जाहलें.

पतितेतुगजेतस्मिन्सिंहनादोमहानभूत्॥सर्वतःसु रसैन्यानांगजबृंहितबृंहितेः॥६७॥हेषारवेणचाश्वा नांगुणास्फोटैश्चधन्विनाम्॥

अर्थ:- असा तो निमि दैत्याचा गज पृथ्वीवर पडला असतां देवांचे सैन्यांत सर्वत्र हत्तींच्या गर्जना, घोड्यांचें हिंसणें व धनुर्धारी योध्यांचे धनुष्याच्या दोर्‍यांचे टणत्कार शब्द यांसहित वीरांचा महान् सिंहनाद जाहला.

गजंतंनिहतंदृष्ट्वानिमिश्चापिपराङ्मुखः॥६८॥श्रु त्वाचसिंहनादंचसुराणामतिकोपनः॥जंभोजज्वा लकोपेनपीताज्यइवपावकः॥६९॥

अर्थ:- ते समयीं निमिदैत्य आपला हत्ती मरण पावला असें पाहून युद्धांतून मागें फिरला. व देवांचा सिंहनाद जाहला; हें ऐकून अति कोपिष्ट जंभासुर तुपाच्या आहुतीनीं पेटलेल्या अग्नी सारिखा क्रोधानें लाल जाहला.

ससुरान्कोपरक्ताक्षोधनुष्यारोप्यसायकम्॥तिष्ठते त्यब्रवीत्तावत्सारथिंचाप्यचोदयत्॥७०॥

अर्थ:- आणि तो जंभदानव रोषानें डोळे लाल करून धनुष्यास बाण लावून इंद्रादि देवांस युद्धास उभे रहा असें बोलून आपल्या सारथ्यास त्यांचे सन्मुख रथ नेण्या विषयीं आज्ञा करिता जाहला.

वेगेनचलतस्तस्यतद्रथस्याभवद्द्युतिः॥यथादित्य सहस्रस्याभ्युदितस्योदयाचले॥७१॥

अर्थ:- नंतर त्या जंभासुराचा रथ वेगानें चालला असतां त्या रथाची कांति उदयाचल पर्वतावर उदय पावलेल्या सहस्र सूर्यांचे तेजासमान सर्वांस दिसली.

पताकिनारथेनासौकिंकिणीजालमालिना॥शशिशु भ्रातपत्रेणसतेनस्यंदनेनतु॥७२॥घट्टयन्सुरसैन्या नांहृदयंसमदृश्यत॥

अर्थ:- त्या काली अनेक पताका, घुंगुरूंचे घोंसांच्या माळा व चंद्रासारख्या शुभ्रकांतीनें युक्त श्वेतछत्र यानीं सुशोभित अशा रथानें तो जंभासुर त्या रणभूमींत संचार करीत देवांच्या सैन्यांतील वीरांचें अंतःकरण विदारणाच करी-

त आहे कीं काय असें दिसलें.

तमायांतमभिप्रेक्ष्यधनुष्याहितसायकम् ॥ ७३ ॥ शत
क्रतुरदीनात्माहृदमाधत्तकार्मुकम् ॥

अर्थः- नंतर असा तो जंभासुर धनुष्यास बाण लावून येत आहे असें पाहून धैर्यवान् इंद्र तत्क्षणीं आपले हातांत दृढधनुष्य ग्रहण करिता झाला.

बाणंचतैलधौताग्रमर्धचंद्रमजिह्मगम् ॥ ७४ ॥ तेनास्य
सशरंचापंरणेचिच्छेदवृत्रहा ॥

अर्थः- आणि तेलानें साहणेवर घांसलेल्या अग्रानें युक्त असून वक्रगतीनें जाणारा असा अर्धचंद्राकार बाण धनुष्यास लावून त्या रणांत इंद्रानें त्या बाणें करून जंभासुराचें बाणसहित धनुष्य तोडलें.

क्षिप्रंसंत्यज्यतच्चापंजंभोदानवनंदनः ॥ ७५ ॥ अन्यत्
कार्मुकमादायवेगवद्भारसाधनम् ॥ शरांश्चाशीविषा
कारांस्तैलधौतानजिह्मगान् ॥ ७६ ॥ शक्रंविव्याधदशा-
भिर्जत्रुदेशेतुपत्रिभिः ॥ हृदयेचत्रिभिश्चापिद्वाभ्यांच
स्कंधयोर्द्वयोः ॥ ७७ ॥

अर्थः- तेव्हां दानवपुत्र जंभासुरानें तें तुटलेलें धनुष्य टाकून दुसरें बाणास वेग येण्यास योग्य असून भार सहन करणारें धनुष्य घेतलें. आणि त्या धनुष्यास तेलानें साहणेवर घांसलेले असून वक्रगतीनें जाणारे असे सर्पाकार बाण लाऊन त्यानें इंद्रास खवाट्यावर दहा बाण मारिले. तीन बाणांनीं हृदयावर प्रहार केला. व प्रत्येक खांद्यास दोन बाणानीं ताडन केलें.

शक्रोपिदानवेंद्रायबाणजालमपीदृशम् ॥ अप्राप्ता-
न्दानवेंद्रस्तुशरान्शक्रभुजेरितान् ॥ ७८ ॥ चिच्छेदद
शधाकाशेशरैरग्निशिखोपमैः ॥

अर्थः- मग इंद्रानेंही त्या दानव श्रेष्ठ जंभासुरावर तशीच बाण समुदायाची वृष्टि केली असतां ते इंद्राचे हातांतून सुटलेले बाण आपणावर आले नाहींत तोंच त्या दानवराज जंभासुरानें अग्नीच्या ज्वाले सारिख्या आपले बाणानीं त्या इंद्राच्या बाणांचे प्रत्येकीं दहा तुकडे मध्येंच आकाशांत करून भूमीवर पाडिले.

ततस्तुशरजालेनदेवेंद्रोदानवेश्वरम् ॥७९॥ आच्छादय
तयत्नेनवर्षास्विवघनैर्नभः॥

अर्थ- नंतर देवराज इंद्रानें बहुत बाण सोडून त्या बाणांचे समूहानें जंभ दानवास झांकून टाकिलें. यास दृष्टांत असे पर्जन्यकालांत मेघ आकाशांस व्याप्त करितात तसें.

दैत्योपिबाणजालंतद्व्यधमत्सायकैःशितैः॥८०॥यथा-
वायुर्घनोटोपंपरिवार्यदिशोमुखे ॥

अर्थ- ते समयीं जंभासुरानेंही आपल्या तीक्ष्ण बाणानीं त्या इंद्राच्या बाणांचें जाळें दूर केलें. या विषयीं दृष्टांत, जसा वायु दिशेच्या मुखावरील मेघांचें अवडंबर दूर करितो तसें.

शक्रोथक्रोधसंरंभान्नविशेषयतेयदा॥ ८१ ॥दानवेंद्रं
स्तदाचक्रेगंधर्वास्त्रंमहाद्भुतम्॥

अर्थ- नंतर जंभासुर जेव्हां आपला कांहीं एक विशेष पराक्रम चालूं देई-ना तेव्हां इंद्रानें त्या दानवराज जंभासुरावर मोठें अद्भुत गंधर्वास्त्र सोडिलें.

ततोस्यतेजसाव्याप्तमभूद्गमनगोचरं॥८२॥गंधर्वन
गरैश्चापिनानाप्राकारतोरणैः॥अंचद्भिरद्भुताकारैरस्त्र
वृष्टिःसमंततः॥८३॥

अर्थ- त्या कालीं गंधर्वास्त्रा पासून उत्पन्न झालेल्या तेजानें दैत्यांचें सैन्य व्याप्त जाहलें असतां तें सैन्य पळूं लागलें. तरी वरून त्या असुर सैन्यावर त्या गंधर्वास्त्रानें उत्पन्न झालेल्या अनेक प्रकारचे तट व तोरणें यानीं युक्त अशा आकाश मार्गे चालणाऱ्या विचित्र आकारानें सुशोभित गंधर्व नगरा पासून आसमंतात्भागीं सर्वत्र शस्त्रांची वृष्टि होऊं लागली.

अथास्त्रवृष्ट्यादैत्यानांहन्यमानामहाचमूः॥जंभंश-
रणमागच्छदप्रमेयपराक्रमम्॥ ८४॥

अर्थ- तेव्हां त्या शस्त्रास्त्रांच्या वृष्टीनें दैत्यांची मोठी सेना व्यथित होऊन ती अपरिमित पराक्रमी जंभासुरास शरण गेली.

व्याकुलोपिस्वयंदैत्यःसहस्राक्षस्त्रपीडितः॥स्मरन्
साधुसमाचारंभीतत्राणपरोभवत्॥८५॥

अर्थ- त्या वेळेस तो जंभासुर दैत्य सहस्रनयन इंद्राच्या त्या गंधर्वास्त्रानें स्वतः पीडित जाहल्यामुळें व्याकुळ जाहला असूनही लोकांच्या उत्तम समाचाराचें स्मरण करून त्या भयभीत जाहलेल्या दैत्यांचें रक्षण करण्याविषयीं उद्युक्त जाहला.

अथास्त्रंमौसलंनाममुमोच दितिनंदनः॥ ततोयोमुस
लैःसर्वमभवत्पूरितंजगत्॥८६॥

अर्थ- आणि नंतर त्या दितिपुत्र जंभासुरानें त्या गंधर्वास्त्रावर मौसल नामक अस्त्र सोडिलें असतां, त्या अस्त्राचे योगानें सर्व चराचर जग लोखंडी मुसळांनीं व्याप्त जाहलें.

एकप्रहारकरणैरप्रधृष्यैःसमंततः॥गंधर्वनगरंतेषुगं
धर्वास्त्रविनिर्मितान्॥८७॥

अर्थ- तीं मुसळें अशीं कीं, त्या मुसळांचा एकही प्रहार सहन होणें अशक्य अशा त्या सर्वत्र व्याप्त जाहलेल्या मुसळांनीं त्या इंद्राच्या गंधर्वास्त्रानें उत्पन्न झालेलें गंधर्वनगर व त्यांतील गंधर्व यांचा नाश जाहला.

गांधर्वमस्त्रंसंधायसुरसैन्येषुचापरं॥ एकैकेनप्रहा
रेणगजानश्वान्महारथान्॥८८॥ रथाश्वान्सोहनत्
क्षिप्रंशतशोथसहस्रशः॥

अर्थ- नंतर जंभासुरानें देवांचे सैन्यावर दुसऱ्या गंधर्वास्त्राचा प्रयोग करून त्या अस्त्रापासून निर्माण झालेल्या मुसळांच्या एकेक प्रहारानें देवांच्या सैन्यांतील हत्ती, घोडे, महारथी, रथाचे घोडे किंवा रथासहित घोडे इत्यादिकांस शेंकडों अथवा सहस्रावधि यांस मारिलें.

ततःसुराधिपस्त्वाष्ट्रमस्त्रंचसमुदीरयन्॥८९॥संध्य
मानेततस्त्वाष्ट्रेनिश्चेरुःपावकार्चिषः॥

अर्थ- नंतर देवराज इंद्रानें विश्वकर्म्याचें अस्त्र सोडलें असतां त्यापासून अग्नीच्या ज्वाला चालल्या.

ततोयंत्रमयान्दिव्यानायुधान्दुष्प्रधर्षिणः॥९०॥तैर्यं
त्रैरभवद्व्द्व्यमंतरिक्षेवितानकम्॥

अर्थ- पश्चात् त्या अस्त्रापासून दुर्धर उत्तम यंत्रस्वरूप आयुधें उत्पन्न

होऊन त्या आयुधांनें वर आकाशांत छतच बांधलें गेलें.

वितानकेन तेनाथ प्रथमं मौसले गते ॥ ९१ ॥ शैलास्त्रं मुमुचे जंभो यंत्रसंघात ताडनं ॥

अर्थ- ते समयीं त्या यंत्र स्वरूप शस्त्रांच्या छतानें प्रथमतः गंधर्वास्त्याच्या मुसळांची वृष्टी बंद झाली असतां, जंभदानवानें यंत्र समुदायाचे छतास फोडणाऱ्या पर्वतास्त्राचा प्रयोग केला.

व्यामप्रमाणैरुपलैस्ततो वर्षमवर्तत ॥ ९२ ॥ त्वाष्ट्रस्य निर्मितान्याशु यंत्राणि तदनंतरं ॥ तेनोपलनिपाते न गतानि तिलशस्ततः ॥ ९३ ॥

अर्थ- तेव्हां त्या पर्वतास्त्रा पासून एकवांव लांब या प्रमाणाच्या पाषाणांची वृष्टि होऊं लागली. तेणें करून त्या दगडांच्या वृष्टीनें विश्वकर्मास्त्रानें निर्माण झालेल्या यंत्ररूप आयुधांचे तिळासारखे तुकडे जाहले.

यंत्राणि तिलशः कृत्वा शैलास्त्रं परिमूर्धसु ॥ निपपातातिवेगेन दारयत्पृथिवीं ततः ॥ ९४ ॥

अर्थ- अशा त्या यंत्ररूप शस्त्रांचे ति ळा समान चूर्ण करून त्या पर्वतास्त्राचे दगड देव सैन्यांतील योध्याचे मस्तकावर सर्वत्र आसमंताद्भागीं पडूं लागले, तेव्हां त्या पाषाणांच्या वृष्टीचे अंतीं वेगानें रणभूमीचें विदारण होऊं लागलें.

ततो वज्रास्त्रमकरोत्सहस्राक्षः पुरंदरः ॥ तदोपल महाहर्षं व्यशीर्यत समंततः ॥ ९५ ॥

अर्थ- त्या काळीं सहस्रनयनानें त्या पर्वतास्त्रावर वज्रास्त्र सोडलें; तेव्हां त्या वज्रांचे प्रहारानीं सर्व दगडांचें चूर्ण जाहलें.

ततः प्रशांते शैलास्त्रे जंभो भूधरसंन्निभः ॥ ऐषीकमस्त्रमकरोदभीतोतिपराक्रमः ॥ ९६ ॥

अर्थ- असें तें पर्वतास्त्र शांत झालें असतां पर्वताकार शरीरी तो महा पराक्रमी जंभासुर निर्भय चित्तानें त्या वज्रास्त्रावर ऐषीकनामक अस्त्राचा प्रयोग करिता जाहला.

ऐषीकेनागमन्नाशं वज्रास्त्रं शक्रवल्लभं ॥ विजृंभ

ऱ्यथचैषीके परमास्त्रेतिदुर्धरे ॥ ९७ ॥ जज्वलुर्देवसै-
न्यानिसस्यंदनगजानितु ॥

अर्थ- तेव्हां त्या ऐषीक नांवाच्या अस्त्रानें तें इंद्रप्रिय वज्रास्त्र नाश पावलें; मग या प्रमाणें तें अति दुर्धर उत्तम ऐषिकास्त्र प्रगट जाहलें असतां, रथ व गज इत्यादिकांसहवर्तमान देवांचीं सैन्यें जळूं लागलीं.

दह्यमानेष्वनीकेषु तेजसास्करसत्तमः ॥ ९८ ॥ आग्नेय
मस्त्रमकरोद्बलवान् पाकशासनः ॥

अर्थ- अशीं तीं देवांचीं सर्व सैन्यें त्या ऐषिकास्त्राचे तेजानें जळूं लागलीं असतां, पाक दैत्याचें शासन करणाऱ्या, देवश्रेष्ठ, बलाढ्य इंद्रानें त्या ऐषीकास्त्रावर आग्नेयास्त्राचा प्रयोग केला.

तेनास्त्रेण तदस्त्रेंद्रमग्रसत्तदनंतरं ॥ ९९ ॥ तस्मिन्प्र
तिहते चास्त्रे पावकास्त्रं व्यजृंभत ॥

अर्थ- तेणें करून त्या आग्नेयास्त्रानें तें अस्त्रश्रेष्ठ ऐषीकास्त्र तत्काल ग्रासिलें; आणि मग तें आग्नेयास्त्रच असुरांचे सैन्यांत व्याप्त झालें.

जज्वालकायंजंभस्य सरथंचससारथिं ॥ १०० ॥ ततः
प्रतिहतःसोथदैत्येंद्रः प्रतिभानवान् ॥ वारुणास्त्रंमु-
मोचाथशमनंपावकार्चिषां ॥ १०१ ॥

अर्थ- तेव्हां त्या आग्नेयास्त्राच्या ज्वालानीं रथ व सारथी यां सहवर्तमान जंभासुराचा देह जळूं लागला, असा त्या अस्त्रानें जंभासुर कुंठित झाला असतां, त्या बुद्धिमान् दैत्यश्रेष्ठानें अग्नीच्या ज्वालांस शमविणारें वारुणास्त्र सोडिलें.

ततोजलधरैर्व्योमस्फुरद्विद्युल्लताकुलैः ॥ गंभीरमु
रजध्वानैरापूरितमिवांबरं ॥ १०२ ॥

अर्थ- ते समयीं त्या पासून देदीप्यमान विद्युल्लतानीं युक्त अशा सजल मेघानीं आकाश व्याप्त जाहलें; यास दृष्टांत असा कीं, "जसें गंभीरनादयुक्त मृदंगांचे शब्दानीं आकाश व्याप्त होतें तसें."

करींद्रकरतुल्याभिर्जलधाराभिरंबरं ॥ पतंतीभिर्ज
गत्सर्वं क्षणेनापूरितंबभौ ॥ १०३ ॥

अर्थ:— आणि महागजाच्या सोंडेसमान पडणाऱ्या मोठ्या जलधारांनीं क्षण मात्र काळांत आकाश व सर्व जग पूर्ण भरून शोभलें.

शांतमाग्नेयमस्त्रंतत्प्रविलोक्यसुराधिपः॥ वायव्य
मस्त्रमकरोन्मेघसंघातनाशनं॥१०४॥

अर्थ:— तेव्हां तें आग्नेयास्त्र शांत जाहलें असें पाहून इंद्रानें मेघांचे समुदायांचा नाश करण्याविषयीं समर्थ असें वायव्य नामक अस्त्र सोडलें

वायव्यास्त्रबलेनाथनिर्धूतेमेघमंडले॥बभूवविम
लंव्योमनीलोत्पलदलप्रभं॥१०५॥

अर्थ:— त्या वायव्यास्त्राचे बलानें सर्व मेघमंडळ दूर झाल्यानंतर तें आकाश नीलवर्ण कमलाच्या पाकळीसारखें स्वच्छ जाहलें.

वायुनाचातिघोरेणकंपितास्तेतुदानवाः॥नशेकुस्त
त्रतेस्थातुंरणेतिबलिनोपिये॥१०६॥

अर्थ:— आणि त्या वायव्यास्त्राच्या भयंकर वायूनें ते दानव थरथरां कांपूं लागले; त्यामुळें सर्व मोठमोठे असुर अत्यंत बलिष्ठ असून ही ते त्या रणभूमींत उभे रहाण्यास ही सामर्थ्य हीन जाहले.

तदाजंभोभवच्छैलोदशयोजनविस्तृतः॥मारुतप्र
तिघातार्थंदानवानांभयापहः॥१०७॥मुक्तनानायु
धोदग्रतेजोभिज्वलितद्रुमः॥

अर्थ:— तेव्हां त्या वायूचा प्रतिबंध करून दानवांचे भयाच्या निवारणार्थ तो जंभासुर दहा योजनें (चाळीस कोस) चौरस, चौरस, विस्तीर्ण असा महापर्वत जाहला त्यावर देवानीं टाकलेल्या अनेक शस्त्रांच्या उत्तम तेजानें देदीप्यमान अशा वृक्षानीं तो शोभूं लागला.

ततःप्रशमितेवायौदैत्येंद्रेपर्वताकृतौ॥१०८॥महा
शनींवज्रमयींमुमोचाशुशतक्रतुः॥

अर्थ:— नंतर तो दैत्यश्रेष्ठ जंभासुर असा पर्वताकार जाहल्यानें वायव्यास्त्रसंबंधीं वायू शांत झाल्यावर इंद्रानें मोठा संहार करणारी बहुत वज्रांनीं युक्त अशी माया त्वरेनें त्या जंभदैत्यावर सोडली.

तयाशन्यापतितयादैत्यस्याचलरूपिणः॥१०९॥

कंदराणिव्यशीर्यंतसमंतान्निर्झराणितु॥

अर्थ- तेव्हां मायेनें पर्वतरूप जाहलेल्या त्या जंभ दैत्यावर पडलेल्या त्या व ज्यांच्या मायेनें त्या पर्वताचे सभोंवतींच्या गुहा व झरे यांचा नाश जाहला.

ततःसादानवेंद्रस्यशैलमायान्यवर्तत॥११०॥ निवृत्त शैलमायोथदानवेंद्रोमदोत्कटः॥ बभूवकुंजरोभीमो महाशैलसमाकृतिः॥१११॥

अर्थ- पश्चात् इंद्राच्या त्या वज्रामायेनें दानव श्रेष्ठ जंभासुराची ती पर्वत माया नाश पावल्यावर तो मदोन्मत्त दानव राज जंभ दैत्य, आकृतीनें मोठ्या पर्वता सारखा भयंकर हत्ती जाहला.

सममर्दसुरानीकंदंतैश्चाप्यहनत्सुरान्॥ बभंजपृष्ठ तःकांश्चित्करेणावेष्ट्यदानवः॥११२॥

अर्थ- आणि तो हत्ती आपले पायांखालीं देवसैन्याचा संहार करूं लागला; तसाच दांतानीं देवांस मारूं लागला व तो जंभ दानव आपल्या सोंडेनें कित्येकांस वेष्टून धरून पाठींत मोडूं लागला.

ततःक्षपयतस्तस्यसुरसैन्यानिवृत्रहा॥ अस्त्रंत्रैलो-क्यदुर्धर्षंनारसिंहंमुमोचह॥११३॥

अर्थ- या प्रमाणें तो जंभासुर देवसैन्याचा संहार करीत असतां, वृत्रासुरास मारणारा इंद्र त्या कालीं त्रैलोक्यास सहन करण्या विषयीं अशक्य असें नारसिंहास्त्र त्या गजरूपी जंभासुरावर सोडिता जाहला.

ततःसिंहसहस्राणिनिश्चेरुर्मंत्रतेजसः॥कृष्णादंष्ट्रा ट्टहासानिक्रकचाभनखानिच॥११४॥

अर्थ- तेव्हां त्या नारसिंहास्त्राच्या मंत्राचे तेजानें हजारों सिंह प्रगट जाहले; त्यांच्या दाढा कृष्ण वर्ण असून ते मोठ्यानें दाढा पसरून गर्जना करूं लागले; व त्यांचीं नखें करवता सारखीं तीक्ष्णधारेनें युक्त होतीं.

तैर्विपाटितगात्रोसौगजमायांव्यपोथयत्॥ ततश्चा शीविषोघोरोभवत्फणाशताकुलः॥११५॥ विषनि श्वासनिर्दग्धंसुरसैन्यंमहारथः॥

अर्थ- मग त्या सिंहानीं त्या गजरूप जंभासुराच्या सर्व अंगांचें विदारण.

केलें; तेव्हां अर्थात् त्या गजमायेचा त्या नारसिंहास्त्रानें नाश जाहला; नंतर तो महारथी जंभ दैत्य आपल्या आसुरी मायेनें शंभर फणानीं युक्त असा महान् क्रूर सर्प झाला; ते समयीं त्याच्या विषयुक्त श्वासानीं देवांचें सर्व सैन्य जळूं लागलें.

ततोस्त्रं गारुडं चक्रे शक्रश्चारुभुजस्तदा ॥ ११६ ॥ ततो गरुत्मंतस्तस्मात्सहस्राणि विनिर्ययुः ॥

अर्थ- तेव्हां पश्चात् सुंदर भुजानीं सुशोभित इंद्रानें त्या सर्परूप जंभासुरावर गरुडास्त्र सोडिलें; त्या पासून हजारों गरुड निघाले.

तैर्गरुत्मभिरासाद्य जंभं भुजगरूपिणं ॥ ११७ ॥ कृतं तु खंडशो दैत्यं सास्य माया व्यनश्यत ॥

अर्थ- आणि त्या गरुडानीं त्या सर्परूपी जंभासुरा जवळ येऊन त्या दैत्याचे तुकडे केले. तेव्हां ती त्याची सर्पमाया नाश पावली.

प्रनष्टायां तु मायायां ततो जंभो महासुरः ॥ ११८ ॥ चकार रूपमतुलं चंद्रादित्यपथानुगं ॥

अर्थ- अशी ती सर्पमाया नाश पावल्यावर तो जंभ नामक महान् असुर आपलें रूप मोठें वाढवून उभा राहिला; तेव्हां तें त्याचें रूप चंद्र व सूर्य यांचे मार्गांत जाऊन पोंचलें.

विवृत्तवदनो ग्रस्तुमियेष सुरपुंगवान् ॥ ११९ ॥ ततोऽस्य विविशुर्वक्त्रं समहारथकुंजराः ॥

अर्थ- आणि तो जंभासुर आपलें तोंड मोठें पसरून त्या देवांतील इंद्रादिक मुख्य मंडळीस गिळण्यासाठीं आला; तेव्हां देवांचे सैन्यांतील मोठ मोठे महारथी हत्ती सहवर्तमान जंभ दैत्याच्या त्या पसरलेल्या मोठ्या तोंडांत गेले.

सुरसेना विशद् भीमं पातालोत्तानतालुकं ॥ १२० ॥ सैन्येषु ग्रस्यमानेषु दानवेन बलीयसा ॥ शक्रो दैन्यं समापन्नः श्रांतबाहुः सवाहनः ॥ १२१ ॥

अर्थ- पश्चात् देवांची ती सेना, अति उंच असून विस्तीर्ण टाळूनें युक्त अशा जंभासुराच्या त्या मुखांत गेली; अशीं तीं देवांचीं च तुरंगसैन्यें त्या महा-

बलिष्ठ जंभ दानवानें गिळलीं असतां, इंद्रास आपले फार श्रमल्या मुळें ऐराव त गजा सहित अति दैन्य प्राप्त जाहलें.

कर्तव्यतांनाध्यगच्छत्प्रोवाचेदंजनार्दनं॥ किमनंतर मत्रास्ति कर्तव्यस्यावशेषितं॥ १२२ ॥यदाश्रित्यघ टामोस्यदानवस्ययुयुत्सवः॥

अर्थ- आणि त्या कालीं काय उपाय करावा हें इंद्रास कांही एक समजेना; तेव्हां तो विष्णूशीं भाषण करूं लागला कीं, या युद्धांत आम्हीं इतउत्तर को णता कर्तव्य उपाय राहिला आहे; कीं ज्या उपायाचा आश्रय करून युद्धा ची इच्छा करणारे आह्मीं या जंभदानवाशीं युद्ध करूं.

ततोहरिरुवाचेदंवज्रायुधमुदारधीः॥ १२३॥नसां प्रतंरणस्त्याज्यस्त्वयाकातरभैरवः॥

अर्थ- नंतर उदारबुद्धि विष्णु, वज्रायुध धारण करणाऱ्या इंद्रास बोलला कीं, हे इंद्रा भिणाऱ्या लोकांस अति भयंकर असाह्य युद्ध प्रसंग सांप्रत- कालीं तूं सोडूं नको.

वर्धस्वाशुमहामायांपुरंदररिपुंप्रति॥ १२४॥ मयैष- लक्षितोदैत्योधिष्ठितःप्राप्तपौरुषः॥ माशक्रमोह- मागच्छक्षिप्रमस्त्रंस्मरप्रभो॥ १२५॥

अर्थ- हे इंद्रा तूं आपली मोठी देवमाया लवकर या जंभनामक शत्रूवर- घाल; कारण हा जंभ दैत्य पराक्रम पावला असून संग्रामांत उभाराहि- ला असा म्या पाहिला आहे; यास्तव हे समर्थ इंद्रा सांप्रत तूं मोह पावूं नको; आणि आपणास संकट समयीं तारणाऱ्या अस्त्राचें शीघ्र स्मरण कर.

ततःशक्रःप्रकुपितोदानवंप्रतिदेवराट्॥ नारायणा स्त्रंप्रयतोमुमोचासुरवक्षसि॥ १२६॥

अर्थ- नंतर देवराज इंद्र त्या जंभ दानवावर अत्यंत क्रोधायमान जाहला; आणि त्यानें महा प्रयासें करून त्या जंभासुराच्या वक्षस्थलावर नाराय- णास्त्र सोडिलें.

एतस्मिन्नंतरेदैत्योविवृतास्योग्रसत्क्षणात्॥ त्रीणि लक्षाणिगंधर्वकिन्नरोरगराक्षसान्॥ १२७॥

अर्थ- तों इतक्यांत त्या जंभ दैत्यानें तोंड पसरून गंधर्व, किन्नर, सर्प व राक्षस हे सर्व मिळून तीन लक्ष देवांचें सैन्य क्षणमात्रांत गिळून टाकिलें.

ततोनारायणास्त्रं तत्पपातासुरवक्षसि ॥ महास्त्रभिन्नहृदयः सुस्त्रावरुधिरंचसः ॥ १२८ ॥

अर्थ- मग तें नारायणास्त्र त्या जंभासुराच्या हृदयावर पडलें असतां त्या मोठ्या अस्त्राच्या प्रहारानें जंभ दैत्याचें उरस्थल फुटून त्यांतून बहुत रक्ताचा प्रवाह वाहूं लागला.

रणागारमिवोद्गारं तस्या जासुरनंदनः ॥ तदस्त्रतेजसातस्यरूपंदैत्यस्यनाशितं ॥ १२९ ॥

अर्थ- आणि असुरांस आनंद देणाऱ्या त्या जंभदानवाचें तें मायावी मोठें रूप त्या नारायणास्त्राच्या तेजानें नाश पावलें; त्या मुळें त्यानें "जसा टेंकरद्यावा तसा" त्या रणांगणाचा त्याग केला.

ततएवांतर्दधेदैत्यो वियत्यनुपलक्षितः ॥ गगनस्थः सदैत्येंद्रः शस्त्रासनमतींद्रियं ॥ १३० ॥ मुमोचसुरसैन्यानांसंहारेकारणंपरं ॥

अर्थ- नंतर लागलीच तो जंभ दैत्य गुप्त जाहला; आणि तो दैत्यश्रेष्ठ गुप्तरूपानें आकाशांत राहून त्या देवांचे सैन्यांचा संहार होण्या विषयीं योग्य कारण असून नेत्रांस न दिसणाऱ्या अशा शस्त्रांची वृष्टि देवसेनेवर करूं लागला.

प्रासान्परश्वधांश्चक्रान्बाणान्वज्रान्समुद्गरान् ॥ १३१ कुठारान्सहखड्गैश्च भिंडिपालानयोगुडान् ॥ ववर्षदानवोरौद्रोह्यवध्यानक्षयानपि ॥ १३२ ॥

अर्थ- तीं शस्त्रें अशीं कीं, प्रास, कुऱ्हाडी, चक्रें, बाण, वज्रें, मुद्गल, तरवारीसहित कुऱ्हाडी, गोफण गुंडे, व लोखंडी गोफण गुंडे इत्यादिक नाश न पावतां सफल होणारीं अशीं अनेक शस्त्रें तो क्रूर जंभदानव त्या देवसैन्यावर अदृश्य रूपानें टाकूं लागला.

तैरस्त्रैर्दानवैर्मुक्तैर्देवानीकेषुभीषणैः ॥ बाहुभिर्धरणिः पूर्णा शिरोभिश्चसकुंडलैः ॥ १३३ ॥

अर्थ— ते समयीं जंभासुरादिक त्या भयंकर दानवांनीं देवांचे सैन्यावर बहुत शस्त्रें टाकिलीं तेणें करून ती रणभूमी हात व कुंडल सहित मस्तकें यानीं पूर्ण भरून गेली.

ऊरुभिर्गजहस्ताभैः करींद्रैर्वाचलोपमैः॥ भग्नेषादंड चक्राक्षैरथैः सारथिभिः सह॥१३४॥

अर्थ— त्याच प्रमाणें हत्तीच्या सोंडेसारख्या मांड्या देहानें पर्वता समान मोठ मोठे गज, रथाचा मोडलेला पुढील जूं बांधण्याचा सरळ उभा दांडा, चाकें, कणा व सारथी यां सहित रथ यानीं ती संग्राम भूमी व्याप्त जाहली.

दुःसंचाराभवत्पृथ्वी मांसशोणितकर्दमा॥रुधिरो घन्हदावर्ता शवराशि शिलोच्चयैः॥१३५॥

अर्थ— आणि त्या दानवांचे शस्त्र प्रहारानीं मांस व रक्त यांचा चिखल रक्ताचे ओघांचा डोह त्यांतील भोंवरे, व पर्वत प्राय प्रेतांच्या राशी यानीं ती युद्ध भूमी संचार करण्यास कठिण जाहली.

कबंधनृत्यसंकुले स्रवद्बसास्त्रकर्दमे॥ जगत्त्रयोपसं हृतौसमेसमस्तदेहिनां॥१३६॥ सृगालगृध्रवाय साः परंप्रमोदमादधुः॥

अर्थ— नंतर त्या रणभूमींत चोहींकडे कबंध (धडें) नाचूं लागलीं आणि योद्धे व अश्व, गजादिक वाहनें यांचे अंगांतून गळालेल्या चर्बीव रक्त यांचा जेथें चिखल जाहला आहे अशा जगत्रयाचा संहार झालेल्यास्थलांत सर्व प्राण्यांची सारखी अवस्था जाहली असतां तेथें कोल्हे, गीधपक्षी व कावळे इत्यादिक पशु व पक्षी यांस परमानंद जाहला.

क्वचिद्विकृष्टलोचनः शवस्यरौति वायसः॥१३७॥ विकृष्टपीवरांत्रकाः प्रयांति जंबुकाः क्वचित्॥

अर्थ— तसेंच त्या रणभूमींतील क्वचित् स्थलीं कावळा प्रेताचे डोळे बाहेर काढून ओरडत होता; आणि कोठें कोठें कोल्हे मरण पावलेले वीर व गजादिक वाहनें यांचीं लठ आंतडीं बाहेर काढून इतस्ततः धांवूं लागले.

क्वचित्स्थितोतिभीषणः स्वतुंडनिहितोरसः॥ १३८॥ मृतस्यमांसमादायश्वजातयश्चसंस्थिताः॥

अर्थः— त्या प्रमाणें कांहीं जागीं अति भयंकर गीध पक्षी मृत्यु पावलेल्या कोणी-एक वीराचे उराचा तुकडा आपले तोंडांत धरून बसला असे; तसेच मरण पावले ल्या योध्यांचें मांस घेऊन अनेकजातीचे कुत्रे तथें बसले होते.

क्वचिद्वृकोगजास्त्रजंपपौनिलीयतांत्रतः॥१३९॥क्वचि
त्तुरंगमंडलीविकृष्यतेश्वजातिभिः॥

अर्थः— आणि क्वचित् स्थळीं त्या संग्राम भूमींत लांडगा हत्तीचें रक्त प्राशन क रून त्याच्या आंतड्याचे आड दडाला; व कोठें कोठें बहुत जातीचे श्वान (कुत्रे) घोड्यांचे समुदायांस ओढीत असत.

क्वचित्पिशाचजातकैःप्रपीतशोणितासवैः॥१४०
स्वकामिनीयुतैर्द्रुतंप्रमोदमत्तसंभ्रमैः॥प्रयैतदा
नयाननंखुरोयमस्तुमेप्रियः॥१४१॥करोयमब्ज
सन्निभोममास्तुकर्णपूरकः॥

अर्थः— तसेंच त्या युद्धभूमींत कांहींजागीं अनेकजातीचीं पिशाचें आप-ल्या स्त्रियां सहवर्तमान रक्त व मद्य यांचें प्राशन करून त्या आनंदानें उन्म त्त झालीं, आणि हर्षयुक्त स्वरेनें तीं पिशाचें बोलूं लागलीं कीं, शवाचें हें-मुख मला आणून दे, तसाच हा बैलाचा खुर मला प्रिय आहे ह्मणून तो मला असो व मृत वीराचा कमला सारखा हा हात मला कर्ण भूषणार्थ पा हिजे.

सरोषमीक्षतेपरावपांविनाप्रियंतदा॥१४२॥पराप्रि
याह्यवापयत्सृतोष्णशोणितासवं॥

अर्थः— तशीच कोणी एकपिशाचस्त्री आपल्या पती जवळ चर्बी नाहीं असें पाहून तीत्या कालीं रोषानें पतीकडे पाहूं लागली; कारण दुसऱ्या कोणी एके प्रिय स्त्री साठीं तिच्या पतीनें उष्ण उष्ण रक्त व मद्य धरून तिला दिलें.

विकृष्यशावचर्मतत्प्रबद्धसांद्रपल्लवं॥१४३॥चका
रयक्षकामिनीतरुंकुठारपाटितं॥

अर्थः— तसेंच कोणी एके यक्षाचे स्त्रीनें प्रेताचें कातडें काढून तें चर्म कु-ऱ्हाडीनें तोडलेल्या दाट पानांच्या वृक्षांस बांधलें.

गजस्यदंतमास्त्रजंप्रगृह्यकुंभसंपुटं॥विपाट्यमौक्ति

कंपरंप्रियाप्रसादमिच्छते॥

अर्थ- त्याच प्रमाणें हत्तीचा दांत व रक्त घेऊन त्याचें गंडस्थळ फोडून त्यां तील उत्तम मौक्तिकें काढून ते सर्व पदार्थ यक्ष, राक्षस व पिशाच हे आप त्या स्त्रियांस देऊन त्यांस प्रसन्न करीत होते.

समांसशोणितासवंपपुश्चयक्षराक्षसाः॥१५५॥मृ
ताश्वकेशवासितंरसंप्रगृह्यपाणिना॥ प्रियाविमु
क्तजीवितंसमानयासृगासवं॥१५६॥

अर्थ- तसेच त्या रणभूमींत यक्ष व राक्षस हे मांस सहित रक्त व मद्य यांचें प्राशन करीत होते; आणि कोणी एक स्त्री आपले पतीस ह्मणाली कीं, हे प्राण प्रिया मरण पावलेल्या घोड्याचे केशांच्या वासानें युक्त असें जिवंत वीराचें रक्त व मद्य हे रस आपले हातानें मला आण.

नपथ्यतांप्रयातिमेगतंश्मशानगोचरं॥नरस्यतज्ज
हात्यसौप्रशस्यकिन्नराननं॥१५७॥

अर्थ- तशीच कोणी एक स्त्री किन्नराच्या मुखाची प्रशंसा करून बोल- ली कीं, स्मशानांतील प्रेताचें मांस,रक्तादिक माझे पथ्यास पडत नाहीं; अ सें बोलून तिणें मनुष्याचे शवाचा त्याग केला.

सनागएषनोभयंदधातिमुक्तजीवितः॥तदाननं-
स्यशक्यतेमयातदेकयाननं॥१५८॥इतिप्रियाय
वल्लभावदंतियक्षयोषितः॥

अर्थ- आणि तो मरून पडलेला हत्ती आम्हांस भय उत्पन्न करितो या- स्तव मी एकटी त्या भयंकर हत्तीचें मुख आणूं शकत नाही; असें त्या यक्षा -च्या प्रियस्त्रिया आपापले भर्त्यांस बोलत होत्या.

परेकपालपाणयः पिशाचयक्षराक्षसाः॥१५९॥वदं
तिदेहिमेममममातिभक्ष्यचारिणः॥

अर्थ- त्याच प्रमाणें दुसरे पिशाच,यक्ष व राक्षस हे अतिभक्षण करणारे हो- ते; ते आपले हातांत मरण पावलेल्या योध्यांचीं कपालें घेऊन मला दे मला दे असें बोलूं लागले.

परेवतीर्यशोणितापगासुधौतमूर्तयः॥१५०॥पि-

स्तृन्प्रतर्प्यदेवताःसमर्चयंतिचामिषैः ॥

अर्थ:- तसेच दुसरे कोणी तेराक्षसादिक गण रक्ताच्या नद्यांत डलरून स्नानें करून त्या रक्तानेंच आपल्या पितरांचें तर्पण करूं लागले; व मासानीं देवांची उत्तम प्रकारें पूजा करीत होते.

गजोडुपेरूसंस्थितास्तरंतिशोणितंन्हदं ॥ १५१ ॥
इतिप्रगाढसंकटेरूरासुरेरूसंगरे ॥ भयंसमुज्झ्य-
दुर्जयाभटास्फुटंतिमानिनः ॥ १५२ ॥

अर्थ:- आणि किती एक पिशाच यक्ष व राक्षस इत्यादिक अनेक गण हत्तीची नौका करून त्या रणभूमींतील रक्ताच्या डोहांत तरूं लागले; अशा अतिशयें दुःखकारक संकट युक्त त्या देव दैत्याच्या मोठ्यासंग्रामांत दानवां पासून उत्पन्न झालेल्या त्या भयाचा त्याग करून देव सैन्यांतील मानकरी असून प्रयासानें ही जिंकण्यास अशक्य असे महावीर मोठ्या सिंह नादें करून गर्जना करूं लागले.

ततः शक्रोधनेशश्चवरुणः पवनोनलः ॥ यमोपिनि
र्ऋतिश्चापि दिव्यास्त्राणिमहबलाः ॥ १५३ ॥ आका
शेमुमुचुः सर्वेदानवानभिसंध्यते ॥

अर्थ:- नंतर इंद्र, धनाध्यक्ष कुबेर, वरुण, वायु, अग्नि,यमवनिर्ऋती हे सर्व महा बलाढ्य लोकपाल आपापलीं दिव्यअस्त्रें त्या जंभासुर प्रमुख दानवां वर योजून आकाशांत सोडिते जाहले.

अस्त्राणिव्यर्थतांजग्मुर्देवानांदानवान्प्रति ॥ १५४ ॥
संरंभेणाप्ययुध्यंतसंहतास्तुमुलेनच

अर्थ:- परंतु तीं मुख्यत्वें जंभ दानवावर टाकलेलीं देवांचीं सर्व अस्त्रें व्यर्थ झालीं असतां ते इंद्रादिक देव सर्व मिळून अत्यंत कोपानें बहुत युद्ध करूं लागले.

गतिंनविविदुश्चापिभ्रांतादैत्यस्यदेवताः ॥ १५५ ॥
दैत्यास्त्रभिन्नसर्वांगात्यक्तिंचित्करतांगताः ॥ पर
स्परंव्यलीयंतगावःशीतार्दिताइव ॥ १५६ ॥

अर्थ:- तथापित्या जंभ दैत्याची गती समजेना त्यामुळें ते इंद्रादिकसम

ग्र देव श्रमले; आणि त्या दैत्यांच्या अस्त्रांचे प्रहारानीं देवांचीं सर्वांगें छि-न्नभिन्न झालीं; यामुळें त्यांचे हातून दैत्यांचा यत् किंचित्ही नाश होईना सें झालें तेव्हां "जशा गायी थंडीनें पीडित होऊन एका जागीं स्तब्ध राहता त तसे." हे सर्व इंद्रादिक देव कुंठित होत्साते परस्पराच्या आश्रयानें जा-गचे जागीं उगाच राहिले

तदवस्थान्हरिर्दृष्ट्वादेवाञ्शक्रमुवाचह॥ब्रह्मास्त्रं-
स्मरदेवेंद्रयस्यावध्योनविद्यते॥ विष्णुनाचोदितः
शक्रःसस्मारास्त्रंमहौजसं॥१५७॥

अर्थ:- त्या कालीं देवांची अशी अवस्था झालेली पाहून भक्तांचीं दुःखें हरण करणारा विष्णु इंद्रास बोलला कीं, हे देवराज इंद्रा तूं या संकट समयीं ब्र-ह्मास्त्राचें स्मरण कर; कारण त्या ब्रम्हास्त्रानें मरण न पावणारा असा त्रै-लोक्यांत कोणीच नाहीं; असें विष्णूनें सांगितलें असतां, इंद्रानें महाते-जोमय अशा ब्रह्मास्त्राचें स्मरण केलें.

संपूजितंनित्यमरातिनाशनंसमाहितंबाणममित्र
घातने॥ धनुष्यजय्ये विनियोज्यबुद्धिमा नभू
त्ततोमंत्रसमाधिमानसः॥१५८॥

अर्थ:- आणि तो बुद्धिमान् इंद्र आपले अजिंक शत्रुनाशक धनुष्यावर दैत्य, दानवादिक शत्रूंचा संहार करण्या मुळें नित्य उत्तम प्रकारें पूजित असा बाण स्थापन करून पश्चात् त्या बाणाचें अभिमंत्रण करण्या सा ठीं एकाग्र चित्तानें ब्रह्मास्त्राच्या मंत्राचें चिंतन करूं लागला.

समंत्रमुच्चार्यततांतराशयोवधायदैत्यस्यधिया
भिसंध्यतु॥ विकृष्यकर्णांतमकुंठदीधितिंमुमोच
वीस्यांबरमार्गमुन्मुखः॥१५९॥

अर्थ:- नंतर इंद्रानें स्वस्थ अंतःकरणें करून त्या ब्रम्हास्त्राचे मंत्राचा जप केला, आणि त्या जंभ दैत्याचे वधार्थ एकाग्र बुद्धीनें त्या जंभासुराव र लक्ष्य धरिलें; नंतर अकुंठित तेजोमय बाण आकर्ण पर्यंत ओढून इंद्रा नें आकाश मार्गाकडे सन्मुख दृष्टी करून तो बाण सोडला.

अथासुरः प्रेक्ष्यमहास्त्रमाहितं विहायमायामव

नोव्यतिष्ठत॥ प्रवेपमानेन मुखेन शुष्यता बलेन गात्रेणच संभ्रमाकुलः॥१६०॥

अर्थ- तेव्हां मग तो जंभासुर इंद्रानें ब्रह्मास्त्राचा प्रयोग करून सोडलेला-बाण पाहतांच आपली माया आवरून भूमीवर येऊन अतिशयें कांपत उभा राहिला; त्यावेळेस त्याचें तोंड सुकलें असून तो जंभदानव आपले शक्ति-सहित शरीरानें काय करावें अशा भययुक्त त्वरेनें व्याकुल जाहला.

ततस्तु तस्यास्त्रवराभिमंत्रितः शरोर्धचंद्रप्रतिमो महारणे॥ पुरंदरस्यासन बंधुतां गतो नवार्कबिंबवपुषा विडंबयन्॥१६१॥

अर्थ- नंतर ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रित केलेला असून त्या इंद्राच्या धनुष्यानें केवळ बंधुला सारखें साहाय्य करणारा तो अर्धचंद्राकार बाण आपले-तेजोमय आकृतीनें उदय पावलेल्या सूर्य बिंबासारखा शोभत त्या मोठ्या संग्रामांत जंभासुरावर गेला.

किरीटकोटिस्फुटकांतिसंकटं सुगंधिनानाकुसुमाधिवासितं॥ प्रकीर्णधूमज्वलनाभमूर्धजंपपात जंभस्य शिरः सकुंडलं॥१६२॥

अर्थ- तेव्हां त्या बाणानें जंभासुराचें कर्ण कुंडल सहित मस्तक तुटून-रणभूमींत पडलें; तें मस्तक मुकुटाच्या उत्कृष्ट स्पष्ट कांतीनें युक्त असून अनेक प्रकारच्या सुगंधि पुष्पांचे सुवासानें व्याप्त असे; आणि त्याम स्तका वरील केंश, रंगानें धुरासहित अग्नि सारखे असून ते चोंहीकडे पसरलेले होते.

तस्मिन्विनिहते जंभे दानवेंद्राः पराङ्मुखाः॥ ततस्ते भग्नसंकल्पाः प्रययुर्यत्र तारकः॥१६३॥

अर्थ- नंतर असा तो जंभासुर मरण पावला असतां त्या असुर सैन्यांतील मोठमोठे दानव आपला जय मिळविण्याचा संकल्प भ्रष्ट झाल्यामुळें युद्ध सोडून मार्गे फिरून जेथें तारकासुर होता तेथें ते त्याजकडे गेले.

तांस्तु त्रस्तान्समालोक्य श्रुत्वारोषमगात्परं॥ सजंभं दानवेंद्रं तु सुरैरणमुखे हतं॥१६४॥

अर्थ- तेव्हां त्या त्रास पावलेल्या दानवांस पाहून व त्यांचे मुखानें रणभू मींत देवानीं दानवश्रेष्ठ जंभासुरास मारिलें हें वर्तमान श्रवण करून त्या तारका सुरास पराकाष्ठेचा रोष आला.

सावलेपंससरंभंसगर्वसपराक्रमं ॥ साविष्कारम-
नाकारं तारको भावमाविशत् ॥ १६५॥

अर्थ- आणि त्या वेळेस तारकासुराची स्थिती अशी जाहली कीं, त्यानें मनांतील उन्मत्ततेसहित क्रोधानें गर्वयुक्त पराक्रम करण्याचा भाव प्रगट केला असा त्या तारकासुराचे मनांत आलेला अभिप्राय सर्वांचे दृष्टोत्प तीस आला.

सज्जेत्रंरथमास्थायसहस्रेणगरुत्मतां ॥ सकोपा
द्दानवेंद्राणांसुरैरणमुखेगतः ॥ १६६॥

अर्थ- नंतर तो तारकासुर गरुडपक्ष्यां समान वेगवंत अशा हजार घोड्यांच्या, नियमानें जय प्राप्त होणाऱ्या रथांत बसून त्या श्रेष्ठ दानवांचे कोपामुळें देवांशीं युद्ध करण्या साठीं रणभूमीचे तोंडावर गेला.

सर्वायुधपरिष्कारः सर्वास्त्रपरिरक्षितः ॥ त्रैलोक्यऋ-
द्धिसंपन्नः सुविस्तृतमहाननः ॥ १६७॥ रणायाभ्यय
त्तूर्णंसैन्येनमहतावृतः ॥

अर्थ- आणि सर्व आयुधानीं संपन्न असून सर्व अस्त्रानीं चहूं कडून रक्षण केलेला, त्रैलोक्य संबंधी समृद्धीनें युक्त व मोठ्या विशाल मुखानें युक्त असा तो तारकासुर मोठ्या सैन्या सह वर्तमान त्वरेनें युद्धार्थ संग्रामभूमीस आला.

जंभास्त्रक्षतसर्वांगंत्यक्तैरावतदंतिनं ॥ १६८ ॥ सज्जंमा
तलिनागुप्तंरथमिंद्रस्यतेजसा ॥ तप्तहेमपरिष्कारंमहा-
रत्नसमन्वितं ॥ १६९ ॥ चतुर्योजनविस्तीर्णंसिद्धसंघपरिष्कृ
तं ॥ गंधर्वकिन्नरोद्गीतमप्सरोनृत्यसंकुलं ॥ १७० ॥ सर्वायु
धसंबाधं विचित्ररचनोज्वलं ॥ तंरथंदेवराजस्यपरि-
वार्यसमंततः ॥ १७१ ॥ दंशिता लोकपालास्तु तस्थुः स
गरुडध्वजाः ॥

अर्थ- ते समयीं पूर्वीच्या जंभासुराचे शस्त्रास्त्रानीं सर्वांगीं क्षतें जाहल्यामु-

ळें इंद्र ऐरावत गजाचा त्यागकरून मातली सारथीनें सिद्ध केलेल्या रथांत बसला, तो रथ इंद्राच्याच सामर्थ्यें करून मातलीनें संरक्षण केला होता; आणि तो रथ तापलेल्या सुवर्णा सारख्या लालसोन्यानें अलंकृत असून मोठमोठ्या रत्नानीं खचित असे तसाच तो रथ चार योजनें (सोळा कोस.) विशाल असून देव योनींतील सिद्ध गणांचे समुदायानीं सभोंवतीं वेष्टित होता; त्याच प्रमाणें त्या रथांत सर्वत्र गंधर्व व किन्नर यांचें उंच स्वरांवर गायन चाललें असून पुढें अप्सरांचें नृत्यही होत असे व त्या रथांत सर्व आयुधें असल्यामुळें त्या रथास शत्रूंच्या शस्त्रास्त्रांनींबाधा होणारी नसून चित्र विचित्र रचनेनें विलक्षण उत्कृष्ट शोभा होती अशा त्या देवराज इंद्राचे रथाच्या आसमंताद्भागीं विष्णूसहित सर्व शिवादिक लोक पाल अंगांत कवचें धारून युद्धार्थ सिद्ध होऊन उभे राहिले होते.

ततश्चचालवसुधाततोरुक्षोमरुद्ववौ॥१७२॥ततोबुंधयउद्भूतास्ततोनष्टारविप्रभा॥

अर्थ— नंतर पृथ्वी हालूं लागली; तदुत्तर कठोर वायू वाहूं लागला; पश्चात् समुद्र खवळून तुफान जाहलें, मग सूर्याची कांती ही त्या कालीं मंद दिसूं लागली.

ततस्तमः समुद्भूतंततोदृश्यंततारकाः॥१७३॥ततोजज्वलुरस्त्राणिततोकंपतवाहिनी॥

अर्थ— त्यानंतर अंधकार उत्पन्न जाहला; तेव्हां दिवसासच नक्षत्रें दिसूं लागलीं; तदनंतर सर्व शस्त्रास्त्रें जागचे जागीं प्रज्वलित जाहलीं; त्यामुळें सर्व चतुरंग सैन्य थरथरां कांपूं लागलें.

एकतस्तारकोदैत्यः सुरसंघास्तुचैकतः॥१७४॥लोकावसादमेकत्र जगत्पालनमेकतः॥

अर्थ— त्या कालीं असें झालें कीं, सर्व असुरांसह वर्तमान तारकासुर दैत्य एकीकडे झाला; व सर्व देवांचे समुदाय एकीकडे झाले; तेव्हां दैत्यांचे योगानें लोकांचा नाश एकीकडे व देवांचे योगानें जगाचें संरक्षण एकीकडे असें त्या प्रसंगीं दिसूं लागलें.

चराचराणिभूतानिसुरासुरविभेदतः॥१७५॥तद्विधाप्येकतांयातंददृशुःप्रेक्षकाइव॥

अर्थ- तेसमयीं देव व असुर या जातींचे सर्व चराचर प्राणी दोन प्रकारचे अ सून ही ते एकत्र तेथें येऊन "चमत्कार पाहाणारा सारिखे" पाहूं लागले.

यद्वस्तु किंचिल्लोकेषु त्रिषु सत्तास्वरूपकं॥ तत्त्वत्राद्दृ-
श्यदखिलं खिलीभूतविभूतिकं॥१७६॥

अर्थ- त्या काळीं त्रैलोक्यांत जें विद्यमान वस्तु होतें तें त्या तारकासुरा चे संग्रामा विषयीं जमले त्या समुदाया पुढें ऐश्वर्यानें कमीच असें दिसत होतें.

अस्त्राणि तेजांसि धनानि धैर्यं सेनाबलं वीर्यपरा-
क्रमौच॥ सत्त्वौजसां तन्निक रं बभूव सुरासुराणां
तपसो बलेन॥१७७॥

अर्थ- नंतर वीर्यातिशय युक्त महा बलिष्ठ ते देव व असुर यांस तपोब लानें अस्त्रें, तेज, धनें, धैर्य, सैन्य, शक्ति, मनाची उत्साह शक्ती व पराक्रम या सर्व युद्धोप योगी साधन सामग्रीचा समुदाय प्राप्त असता जाहला.

अथाभिमुखमायांतं नवभिर्नतपर्वभिः॥ बाणैरनल
कल्पाग्रैर्बिभिदुस्तारकं हृदि॥१७८॥

अर्थ- नंतर देवानीं आपले सन्मुख येणाऱ्या त्या तारकासुराचे हृद्यास अ ग्नी साररव्या तीक्ष्ण अग्रांचे असून पेऱ्यांत वांकविलेले अशा नऊ बाणानीं प्रहा र केला.

स तानचिंत्य दैत्येंद्रः सुरबाणान् गतान्हृदि॥ नवभि
र्नवभिर्बाणैः सुरान् विव्याध दानवः॥१७९॥

अर्थ- त्या आपले वक्षस्थळांत गेलेल्या देवांच्या बाणांची गणना न क रतां त्या दैत्य श्रेष्ठ तारकासुर दानवानें देवांस प्रत्येकीं नऊनऊ बाणानीं ता डन केलें.

जगद्धरण संभूतैः शल्यैरिव पुरः सरैः॥ ततोच्छि
न्नं शरव्रातं संग्रामे मुमुचुः सुराः॥१८०॥

अर्थ- नंतर सर्व जगाचे नाशार्थच केवळ उत्पन्न झालेले असून "दुःख कारक शल्या सारिखे" युद्धार्थ पुढें उभे राहिलेल्या त्या तारकासुरादिक असुरां सहवर्तमान चाललेल्या त्या संग्रामांत सर्व देवांनीं त्या दैत्यांवर ए

क सारखी बाण समुदायांची अखंड वृष्टी केली.

अनंतरंच कांताना मश्रुपातमिवानिशं ॥ तद्ग्रामं वि
यत्येव नाशयामास दानवः ॥ १८१ ॥ शरैर्यथा कुचरि
तैः प्रख्यातंपरमागतं ॥ सुनिर्मलंक्रमायातं कुपुत्रः
स्वंमहा कुलं ॥ १८२ ॥

अर्थ— पश्चात् स्त्रियांचे नेत्रांतून अहोरात्र चाललेल्या अश्रुपाता सारखी ती देवांची बाणवृष्टी आपणावर आली नाहीं तोंच तारकासुरानें आपले बाणानीं त्या बाणवृष्टीचा नाश केला; यास दृष्टांत "जसा कुपुत्र आपल्या कुत्सित आचरणानीं परंपरेच्याक्रमानें उत्तम प्रख्यातीस आलेल्या आपल्या अति पवित्र मोठ्या कुलाचा नाश करितो तसा."

ततो निवार्य तद्बाणजालं सुरभुजेरितं ॥ बाणैर्व्योमदि
शः पृथ्वीं पूरयामास दानवः ॥ १८३ ॥

अर्थ— असें देवांच्या हातचें आलेलें तें बाण जाळ निवारण करून मग त्या तारका सुरानें आपले बाणानीं आकाश दशदिशा व पृथ्वी हीं सर्व स्थलें व्याप्त केलीं.

चिच्छेद पुंखदेशेषु स्वकेस्थानेचलाघवात् ॥ बाणजा
लैः सुतीक्ष्णाग्रैः कंकबर्हिणवाजितैः ॥ १८४ ॥ कर्णांत
कृष्टैर्विमलैः सुवर्णरजतोज्वलैः ॥ शास्त्रार्थैः संशय
प्रासान्यथार्थान्वे विकल्पितैः ॥ १८५ ॥

अर्थ— आणि त्या तारक दैत्यानें त्वरा करून सोनें व रुपें यानीं तेजःपुंज कंक पक्षी व मोरें यांच्या पंखाचे पिसान्यानीं सुशोभित अति तीक्ष्ण अग्रानीं युक्त व लख लखीत अशा आकर्ण पर्यंत ओढलेल्या आपले बाणानीं देवांचे बाण पिसान्याचे ठिकाणीं जागचे जागीं तोडले; यास दृष्टांत "जसे पंडितानीं शास्त्रार्थाचे कल्पनेनें अनेक विकल्प केले असतां इतर अज्ञजनांचे मनांत वास्तविक शास्त्रार्थां विषयीं ही संशय प्राप्त होतो तसे."

ततः शतेन बाणानां शक्रं विव्याध दानवः ॥ नारायणंच-
सप्तत्या नवत्याच हुताशनं ॥ १८६ ॥

अर्थ— नंतर तारकासुरानें शंभर बाणानीं इंद्रास ताडन केलें; आणि त्या-

नें नारायणास सत्तर बाण मारिले; व अग्नीस नव्वद बाणानीं प्रहार केला.

दशभिर्मारुतंमूर्ध्नि यमंदशभिरेवच ॥ धनदंचैवसमस्या वरुणंच तथाष्टभिः ॥१८७॥

अर्थ- तसेच त्यानें दहा बाण वायूच्या मस्तकावर मारले; यमासही दहा बाणानीं ताडन केलें; आणि कुबेरास सत्तर व वरुणास आठ असे त्या तारकासुरानें बाण मारले.

विंशत्यानिर्ऋतिंदैत्यः पुनश्चाष्टभिरेवच ॥ विव्याध पुनरेकैकंदशभिर्दशभिः शरैः ॥ १८८॥

अर्थ- नंतर तो तारक दैत्य, निर्ऋतीस वीस बाण मारून पुनः आठ बाणानीं निर्ऋतीसच प्रहार करिता जाहला; आणि पुनश्च त्यानें सर्व देवांस प्रत्येकीं दहा-दहा बाण मारले.

तथाच मातलिंदैत्यो विव्याधत्रिभिराशुगैः ॥गरुडंदशभिश्चैवसविव्याधपतत्रिभिः ॥१८९॥

अर्थ- त्याच प्रमाणें तारकासुरानें शीघ्र जाणारे वेग युक्त तीन बाण इंद्र सारथी जो मातलि त्यास मारिले; आणि त्यानें विष्णुवाहन गरुडास दहा बाणानीं प्रहार केला.

पुनश्चदैत्योदेवानां तिलशोनत पर्वभिः ॥चकार वर्मजातानि चिच्छेदच धनूंषिंतु ॥ ततो विकवचादेवा विशानुष्काः शरैः कृताः ॥१९०॥

अर्थ- मग पुनः त्या तारक दैत्यानें वांकविलेल्या पेऱ्याचे आपल्या बाणानीं देवांच्या कवचाच्या समुदायांचे तिळा सारखे तुकडे केले; तशींच त्यांचीं धनुष्यें ही तोडलीं. तेव्हां त्या तारकासुराचे बाणानीं देवांचीं कवचें व धनुष्यें हीं- अगदीं अशीं तुटून गेलीं

अथान्यानिचापानि तस्मिन्सरोषा रणेलोकपालागृहीत्वासमंतात् ॥ शरैरक्षयैर्दानवेंद्रंततस्क तदा दानवोमर्षसंरक्तनेत्रः ॥१९१॥

अर्थ- नंतर त्या संग्रामांत इंद्रादिक लोकपालानीं दुसरीं धनुष्यें घेतलीं आणि त्यानीं मोठ्या रोषानें चोहीं कडून त्या दानव राज तारकासुरास नतुटणाऱ्या

बाणानीं ताडन केलें; तेव्हां मग तारकासुरानें क्रोधेंकरून डोळे लाल केले.

शरानग्निकल्पान्ववर्षामराणां ततोबाणमादायकल्पानलाभं ॥ जघानोरसिक्षिप्रमिंद्रं सुबाहुं महेंद्रोप्यकंपद्रथोपस्थएव ॥१९२॥

अर्थ- आणि त्या तारकदैत्यानें देवांवर अग्निसमान तीक्ष्ण बाणांची वृष्टी केली. पश्चात् त्यानें प्रळयाग्नी सारखा बाण घेऊन तो बाण उत्तम भुजांनीं शोभणाऱ्या इंद्राचे वक्षस्थळांत त्वरेनें मारला; तेणेंकरून तो इंद्र रथाचे पुढील भागांत कंपित होऊन पडला.

विलोक्यांतरिक्षेसहस्त्रार्कबिंबं पुनर्दानवो विष्णुमुद्भूतवीर्यं ॥ शराभ्यांजघानांसमूलेसलीलं ततः केशवस्यापतच्छार्ङ्गमग्रे ॥१९३॥

अर्थ- पुढें लागलीच आकाशांत सहस्त्र सूर्यबिंबा समान तेजस्वी असून अद्भुत उत्कृष्ट पराक्रमी अशा विष्णूस पाहून तारकासुरानें सहज त्याचे बाहुच्याचे मूळास दोन बाणानीं प्रहार केला. तेव्हां त्या विष्णूचें शार्ङ्ग नामक धनुष्य अग्रभागीं खालीं पडलें.

ततः स्तारकः प्रेतनाथं पृषत्कैर्वसुं तस्यसव्ये स्मरन्स्वद्रभावं ॥ शरैरग्निकल्पैर्जलेशस्यकायं रणेशोषयद्दुर्जयोदैत्यराजः ॥१९४॥

अर्थ- नंतर सर्वथा अजिंक तो तारकासुर बाणानींयमास ताडन करिता झाला; तसेंच त्यादैत्यानें यमाचें डावे आंगचे वसूस त्याचा क्षुद्रभाव स्मरून पहुन बाणमारले आणि त्यानें अग्नी सारखे प्रज्वलीत बाण मारून त्यायुद्धांत वरुणाचा देह शुष्क केला.

शरैरग्निकल्पैश्चकाराशुदैत्यस्तथाराक्षसान्भीतभीतान् दिशासु ॥ पृषत्कैश्वरूक्षैर्विकारप्रयुक्तंचकारानिलंलीलयेवासुरेशः ॥१९५॥

अर्थ- नंतर त्या तारकदैत्यानें अग्नि समान तीक्ष्ण बाणानीं प्रहारकरून देवसैन्यांतील भयभीत जाहलेल्या राक्षसांस त्वरेनें दशदिशांस पळविलें; तसेंच सर्व असुरांचा राजा तारकासुर आपले कठोर बाणानीं ताडन-

करून सहजच वायूस तत्काल व्यथायुक्त करिता जाहला.

क्षणाल्लब्धचित्ताः स्वयंविष्णुशक्रानलाद्याः सुसंहत्य तीक्ष्णैः पृषत्कैः ॥ प्रचक्रुःप्रचंडेन दैत्येन सार्द्धं महासंगरं संगरग्रासकल्पं ॥ १९६ ॥

अर्थ— तदनंतर विष्णु, इंद्र व अग्नि इत्यादिक सर्व देव स्वतः क्षणमात्रांत स्वस्थ चित्त होऊन त्याणीं आपले तीक्ष्ण बाण त्या प्रचंड तारक दैत्यास मारून-त्याशीं सर्व संग्रामापेक्षां मोठा असा युद्धप्रसंग चालविला.

अथानम्यचापं हरिस्तीक्ष्णबाणैर्हनत्सारथिं दैत्यराजस्य हृद्यं ॥ ध्वजं धूमकेतुः किरीटं महेंद्रो धनेशो धनुः कांचनानर्घ्यरत्नं ॥ यमो बाहुदंडं रथांगानि वायुर्निशाचारिणामीश्वरस्यापिवर्म ॥ १९७ ॥

अर्थ— नंतर विष्णूनें आपलें धनुष्य वांकवून तीक्ष्ण बाणानी त्या दैत्यराज तारकासुराचा प्रियसारथी मारला; आणि त्या दैत्याच्या रथाचा ध्वज धूमकेतूनें तोडला; तसाच त्याचा मुगुट इंद्रानें पाडला कुबेरानें त्याचें सोन्याच्या पाठीचें धनुष्य तोडलें त्याच प्रमाणें यमानें त्या तारक दैत्याचे बाहूस प्रहार केला. वायूनें त्याच्या रथाचीं चाकें मोडलीं व तसेंच वायूनें त्या राक्षसेश्वर तारकासुराचे आंगांतील कवच ही फोडलें.

दृष्ट्वातद्युद्धममरैरकृत्रिमपराक्रमं ॥ दैत्यनाथः कृतंसंख्ये स्वबाहुयुगबांधवः ॥ १९८ ॥ मुमोचमुद्गरंभीमंसहस्राक्षायसंगरे ॥

अर्थ— असें देवानीं त्या रणांत कृत्रिम रहित पराक्रमानें केलेलें तें युद्ध पाहून आपले दोन बाहूंच्या बलाच्याच साहाय्यावर युद्ध करणारा तो दैत्यराज तारकासुर त्या संग्रामांत सहस्रनयन इंद्रास भयंकर मुद्गल मारिता जाहला.

दृष्ट्वामुद्गरमायांतमनिवार्यमथांबरे ॥ १९९ ॥ रथादाप्लुत्यधरणीमगमत्पाकशासनः ॥

अर्थ— नंतर सर्वथा निवारण करण्या विषयीं अशक्य असा तो तारकासुराचा मुद्गल आकाश मार्गें येत आहे असें पाहून पाक दैत्यास मारणारा तो इंद्र रथांतून उडी मारून पृथ्वीवर आला.

मुद्गरोपिरथोपस्थेपपातपरुषस्वनः॥२००॥सरथंचूर्णयामासनममारचमातलिः॥

अर्थ:- पश्चात् तो मुद्गलही भयंकर शब्द करीत येऊन इंद्राच्या रथाचे पुढल्या भागावर पडून रथाचें चूर्ण झालें परंतु त्यावरील सारथी मातली मात्र दैव वशात मरण पावला नाहीं.

गृहीत्वापट्टिशंदैत्योजघानोरसिकेशवं २०१स्कंधेगरुत्मतःसोपिनिषसादविचेतनः॥

अर्थ:- मग तारक दैत्यानें पट्टिशनावाचें शस्त्र घेऊन विष्णूचे उरांत मारलें; तेणें करून तो विष्णूही मूर्च्छितासारखा होऊन गरुडाच्या खांद्यावर तेथल्या तेथेंच पडला.

खड्गेनराक्षसेंद्रश्चचकर्तनरवाहनं॥२०२॥यमंचपातयामासभूमौदैत्योभुशुंडिना॥

अर्थ:- तसेंच त्या राक्षस नायक तारकासुरानें आपल्या तरवारीनें म्यान्यांत बसणाऱ्या उत्तर दिशाधिपति कुबेराचें अंग छिन्न भिन्न केलें; आणि त्या दैत्यानें भुशुंडी नामक आयुधाचा प्रहार करून यमास भूमीवर पाडिलें.

वन्हिंचभिंदिपालेनताडयामासमूर्धनि॥२०३॥वायुंचदोर्भ्यामुत्क्षिप्यपातयामासभूतले॥

अर्थ:- त्याच प्रमाणें तारकासुरानें गोफण गुंड्याचा अग्नीचे मस्तकावर प्रहार केला आणि त्यानें आपले हातानीं वायूस उचलून पृथ्वीवर पाडिलें.

जलेशंचधनुष्कोट्याकुट्टयामासकोपनः॥२०४॥ततोदेवनिकायानामेकेकंसमरेततः॥जघानास्त्रैरसंख्येयैर्दैत्येंद्रोमितविक्रमः॥२०५॥

अर्थ:- तसाच तो अतिकोपिष्ठ तारकासुर धनुष्याचे टोकानें उदकाध्यक्ष वरुणास ताडन करिता जाहला नंतर अपरिमित पराक्रमी त्या दैत्यराजानें त्यासंग्रामांत सर्व देवांच्या समुदायांत प्रत्येक देवास असंख्यात शस्त्रास्त्रांचे प्रहार केले.

लब्धसंज्ञःक्षणाद्विष्णुश्चक्रंजग्राहदुर्धरं॥दानवेंद्रवसासिक्तं पिशिताशनकोन्मुखं॥२०६॥

अर्थ- नंतर क्षणमात्रांत विष्णूनें सावध जाहल्या सारखें दाखवून आपलें इनशंस, सर्वथा धारण करण्यास अशक्य असें सुदर्शनचक्र हातांत घेतलें. त्याचक्रास मोठमोठ्या दानवांचे ह्रदयांतील चर्बी लागली; असून मांसभक्षण करणाऱ्या दैत्यांचे शिरच्छेदाविषयीं निरंतर उद्युक्त असें तें चक्र आहे.

मुमोचदानवेंद्रस्यह्रदंवक्षसिकेशवः॥ पपातचक्रंदैत्यस्य ह्रदयेभास्करद्युति॥ २०७॥ व्यशीर्यततनः कायेनीलोत्पलमिवाश्मनि॥

अर्थ- आणि विष्णूनें तें चक्र त्यादानवराज तारकासुराचे वक्षस्थलावर मोठ्यानें मारलें; तेव्हां अनेक सूर्यसमान तेजोमय तें चक्र त्या तारक दैत्याच्या ह्रदयावर पडलें परंतु तें सुदर्शन "काळें कमळ दगडावर पडल्या सारखें" त्याचे शरीरावर पडून व्यर्थ जाहलें.

ततोवज्रंमहेंद्रस्तुप्रमुमोचार्चितंचिरं॥ २०८॥ यस्मिन्जयाशाशक्रस्य दानवेंद्ररणेत्वभूत्॥

अर्थ- नंतर इंद्रानें बहुकाळ मान्य असें आपलें वज्र तारकासुरावर टाकलें; कारण इंद्रास दानवश्रेष्ठ तारकदैत्या सहवर्तमान चाललेल्या त्या संग्रामांत वज्रापासून जय प्राप्त होण्याची आशा होती.

तारकस्यसुसंप्राप्यशरीरंशौर्यशालिनः२०९ व्यशीर्यत विकीर्णार्चिःशतधाखंडतांगतं॥

अर्थ- तें इंद्राचें वज्र पराक्रमशाली तारकासुराचे शरीरावर पडतांच त्याचें किरण निस्तेज होऊन त्या वज्राचे शेंकडों तुकडे जाहले.

विनाशमगमन्मुक्तंवायुनासुरवक्षसि॥ २१०॥ ज्वलितंज्वलनाभासमंकुशंकुलिशंयथा॥

अर्थ- मग वायूनें त्या तारकदैत्याचे वक्षस्थलावर अग्नी सारख्या कांतीनें देदीप्यमान अंकुश मारला परंतु तोही "इंद्राच्या वज्रासारखाच" व्यर्थ गेला.

विनाशमागतंदृष्ट्वावायुश्चांकुशमाहवे॥ २११॥ रुद्रः शैलेंद्रमुत्पाट्यपुष्पितद्रुमकंदरं॥ निक्षेपदान-

वेंद्रायपंचयोजनविस्तृतं ॥२१२॥

अर्थः- असा तो आपला अंकुश व्यर्थ गेला हें पाहून वायूनें त्या रणांत मोठ्या क्रोधानें पांच कोसांचा विस्तीर्ण असा एक मोठा पर्वत उपटून त्या दानवराज तारकासुरास मारला; त्या पर्वतावर बहुत पुष्पांनीं युक्त वृक्ष असून मोठमोठ्या गुहा ही होत्या.

महीधरंतमायांतंदैत्यः स्मितमुखस्तदा ॥ जग्राहवा महस्तेनशैलंकंदुकलीलया ॥२१३॥

अर्थः- तेसमयीं तो पर्वत आपणावर येत आहे असें पाहून तारकासुरानें हास्य करून तोपर्वत डाव्या हातानें चेंडूसारखा धरिला.

ततोदंडंसमुद्यम्यकृतांतःक्रोधमूर्च्छितः ॥ दैत्येंद्रंमूर्ध्निविक्षेपभ्राम्यवेगेनदुर्जयः ॥ २१४॥ सोसुरस्यापतन्मूर्ध्निदैत्यस्तंचनबुबुधवान् ॥

अर्थः- पश्चात् यमानें क्रोधयुक्त होऊन आपला कालदंड उचलून वेगानें गरगरां फिरवून त्या दैत्येश्वर तारकासुराचे मस्तकावर मारला; तो दुर्धर कालदंड त्या असुराच्या शिरावर पडला तथापि त्या दैत्यास तो दंडाचा प्रहार समजलाही नाहीं.

कल्पांतदहनाभोख्यामजय्यांज्वलनस्ततः ॥२१५॥ शक्तिंविक्षेपदुर्धर्षींदानवेंद्रायसंयुगे ॥ नवाशिरीषमालेव सास्यवक्षस्यराजत ॥२१६॥

अर्थः- नंतर प्रलय कालच्या अग्निसमान तेजोमय असून सर्व प्रकारें जिंकण्यास अशक्य अशी दुर्धर शक्ती अग्नीनें त्या रणांत दानवराज तारकासुरास मारिली; ती शक्ती त्याचे वक्षस्थलावर शिरस वृक्षाचे पुष्पांच्या नवीन मालेसारखी पडली त्यामुळें त्यास कांहींच व्यथा जाहली नाहीं.

ततःखड्गंसमाकृष्यकोशादाकाशनिर्मलं ॥ भासितासितदिग्भागंलोकपालोपिनिर्ऋतिः ॥२१७॥ चिक्षेपदानवेंद्रायतस्यमूर्ध्निपपातच ॥ पतितश्चागमत्खड्गःसशीघ्रंशतखंडतां ॥२१८॥

अर्थः- तदुत्तर निर्ऋतिलोकपालानें आपले म्या नांतून आकाशा सारखी ल

रव खरीन तरवार काढली; तिचे तेजानें दिशांचे अंधकार युक्त भागांत ही प्रकाश पडला; ती तरवार त्यानें दानवराज तारकासुरास मारली; ती त्याचे मस्तकावर पडली; तों तात्काळ त्या तरवारीचे शेंकडों तुकडे जाहले.

जलेशस्तूग्रदुर्धर्षं विषपावकभैरवं॥ मुमोचपाशंदैत्यस्यभुजबंधाभिलाषकः॥ २१९

अर्थ- पश्चात् सर्व उदकाध्यक्ष वरुणानें विषरूप अग्नीनें भयंकर व अत्यंत दुर्धर असा नागपाश त्या तारकासुराचे हात बांधण्याचे इच्छेनें त्याजवर टाकला.

सदैत्यभुजमासाद्यसर्पः सद्योव्यपद्यत॥ स्फुटितक्रूरविक्रूरदशनाहिमहाहनुः ॥२२०॥

अर्थ- तेव्हां तो सर्प तारकदैत्याचे हातावर येतांच तत्क्षणीं अति विपत्ती पावला, ती अशीकीं, त्याच्या मोठ्या दाढेंतील तीक्ष्ण व अत्यंत तीक्ष्ण असे सर्व ही विषदंत पडले.

ततोश्विनौसमरुतः ससाध्याः समहोरगाः॥ यक्षराक्षसगंधर्वा दिव्यनानास्त्रपाणयः॥२२१॥ जघ्नुर्दैत्येश्वरंसर्वेसंभूयसुमहाबलाः॥

अर्थ- नंतर अश्विनीकुमार, एकुणपन्नास मरुद्गण, साध्यगण, शेष वं वासुकी आदिकरून महा सर्प, यक्ष, राक्षस व गंधर्व हे अति महाबलिष्ठ सर्व वीर एकत्र जमून ते आपलीं नाना प्रकारचीं अस्त्रें हातांत घेऊन तीं अस्त्रें त्या दैत्य राज तारकासुरास मारिते जाहले.

नचास्त्राण्यस्यसज्जंत ग्रात्रेवज्राचलोपमे॥ २२२॥ ततोरथादवप्लुत्य तारकोदानवाधिपः॥ जघानकोटिशोदेवान्करपार्ष्णिभिरेवच ॥२२३॥

अर्थ- परंतु तीं सर्वही अस्त्रें त्या तारक दैत्याचे "वज्र पर्वतासारख्या" कठिण शरीरांत तिळमात्र ही शिरलीं नाहींत; मग तो दानवाधिपति तारकासुर रथांतून खालीं उतरून कोटिशः देवांस मनगटानें ताडन करूं लागला.

हतशेषानि सैन्यानि देवानां विप्रदुद्रुवुः॥ दिशोभीता

निसंत्यज्यरणोपकरणानितु ॥२२४॥

अर्थ- तेव्हां त्या युद्धांत किती एकवीर मरण पावून शेष राहिलेलीं देवांचीं सैन्यें भयभीत होत्सातीं युद्धोपयोगी शस्त्रादि सर्व साहित्यें टाकून दश दिशांस पळूं लागलीं.

लोकपालांस्ततोदैत्योबबंधेंद्रमुखान्रणे ॥ सकेशवान्दृढैःपाशैःपशुमारःपशूनिव ॥२२५॥

अर्थ- नंतर त्यारणांत त्या तारक दैत्यानें आपले दृढपाशानीं विष्णुसहित इंद्रादि लोकपालांस बांधलें यास दृष्टांत " जसा फांसेपारधी हरिणादि पशूंस बांधतो तसा."

सभूयोरथमास्थायजगामस्वकमालयं ॥ सिद्धगंधर्व संघुष्टविपुलाचलमस्तकं ॥२२६॥

अर्थ- आणि पुनः रथांत बसून तो तारकासुर त्या रणांत सिद्ध व गंधर्व यांचे गायनानें नादित अशा विपुलाचल पर्वताचे शिखरावरील आपले घरीं गेला.

स्तूयमानोदितिसुतैरप्सरोभिर्विनोदितः ॥ त्रैलोक्य लक्ष्मीस्तद्देशेप्राविशत्स्वपुरंयथा ॥२२७॥

अर्थ- तेथें सर्व दैत्य त्याची स्तुती करीत असून अप्सरा अनेक प्रकारें त्याचा विनोद करीत होत्या; आणि त्रैलोक्यांतील संपूर्ण लक्ष्मी त्या तारकासुराचे देशांत प्रविष्ट जाहली; यास दृष्टांत " जशी लक्ष्मी आपले वैकुंठ पुरांत आहे तशी."

निषसादासनेपद्मरागरत्नविनिर्मिते ॥ ततः किन्नर गंधर्वनागनारीविनोदितैः ॥ क्षणंविनोद्यमानस्तुप्रच लन्मणिकुंडलः ॥२२८॥ इतिश्रीमत्स्यपुराणेदेवासुरसंग्रामेतारकजयलाभोनाम द्विपंचाशदुत्तरशत तमोध्यायः ॥१५२॥

अर्थ- आणि तेथें आपले मंदिरांत पद्मराग रत्नांच्या केलेल्या आसनावर तो तारकासुर बसला असतां मग त्या कालीं त्याचे कानांतील नवरत्नादिमणि युक्त कुंडलें हालत असून किन्नर, गंधर्व व नाग कन्या यांचे विनोदानीं

क्षणमात्र रमत असे. इतिश्री मत्स्यपुराणे देवासुर संग्रामें तारकजय ज्ञामो- नाम द्विपंचाशदुत्तर शततमो ध्यायः ॥ १५२॥

अध्याय १५३वा.

सूतउवाच ॥ प्रादुरासीत्प्रतीहारः शुभ्रनीलांशुकां- बरः ॥ सजानुभ्यांमहींगत्वापिहितास्यः स्वपाणिना १ ॥ उवाचानाविलंवाक्यमल्पाक्षरपरिस्फुटं ॥ दैत्ये- द्रमर्कवृंदानांबिभ्रंतंभास्वरंवपुः ॥ २॥

अर्थः-सूत बोलला ऋषीहो नंतर त्या तारकासुराचा कोणी एक द्वारपाल त्याकडे आला तो दूत शुभ्र वस्त्र नेसलेला असून निळें वस्त्र पांघरला होता मग तो दूत भूमीवर गुडघे टेंकून तोंडास हात लावून बहुत सूर्यांचे समुदायासारखें तेजोमय शरीर धारण करणाऱ्या त्या दैत्यराज तारकासुरास स्वच्छ वाक्य बोलला त्या वाक्यांत अक्षरें अल्प असून तीं सर्व स्पष्ट होतीं.

कालनेमिःसुरान्बद्धांश्चादायद्वारितिष्ठति ॥ सविज्ञा पयतिस्थेयंक्वबंदिभिरितिप्रभो ॥ ३॥

अर्थः- कीं, हे राजा कालनेमी असुर बांधलेल्या सर्व देवांस घेऊन द्वारांत उभा आहे तो विज्ञापना करितो कीं, या बंदि देवानीं कोठें राहावें.

तन्निशम्याब्रवीद्दैत्यःप्रतीहारस्यभाषितं ॥ यथेष्टंस्थी यतामेभिर्गृहंमेभुवनत्रयं ॥ ४॥ केवलंपाशबंधेनवि मुक्तैरविलंबितं ॥

अर्थः- ते समयीं तें द्वारपाळानें भाषण ऐकून तारक दैत्य बोलला कीं, सर्व त्रिभुवन माझें घरच आहे तस्मात् त्या देवांस पाशांचे बंधांतून लौकर मुक्त करा; आणि त्याणीं यथेच्छ पाहिजे तेथें रहावें.

एवंकृतेततोदेवादूयमानेनचेतसा ॥ ५॥ जग्मुर्जगद्गुरुं द्रष्टुंशरणंकमलोद्भवं ॥

अर्थः- नंतर तारकासुराचे आज्ञे प्रमाणें देवांस बंधना पासून मुक्त केलें असतां ते देव त्या तारकासुराचे संकटांतून मुक्त होण्या साठीं विष्णूच्या ना

भिकमलांतून उत्पन्न जाहलेल्या जगद्गुरु ब्रम्हदेवास रक्षणस्थान मनांत-आणून ते ब्रह्मदेवास पहाण्या साठीं गेले.

निवेदितास्तेशक्राद्याः शिरोभिर्धरणींगताः ॥ तुष्टुवुः स्पष्टवर्णार्थैर्वचोभिः कमलासनम् ॥ ६॥

अर्थ.– त्याकालीं द्वारपालानें ब्रह्मदेवास इंद्रादिक देव आले आहेत असें निवेदन केल्यावर ते देव ब्रह्मदेवाचे अग्रभागीं जाऊन त्यानीं मस्तकें भूमीवर ठेवून ब्रह्मदेवास नमस्कार केला; आणि स्पष्ट वर्ण व उत्तम अर्थ यानीं युक्त अशा वाक्यानीं ते इंद्रादिक देव ब्रह्मदेवाची स्तुति करूं लागले.

देवाऊचुः॥ त्वंमोंकारोस्यंकुरायप्रसूतोविश्वस्यात्मानंतभेदस्यपूर्वं॥ संभूतस्यानंतरंसत्वमूर्तेसंहारेच्छो स्तेनमोरुद्रमूर्ते॥ ७॥

अर्थ.– ती अशी कीं, देव म्हणतात हे ब्रह्मदेवा तूं ओंकार स्वरूप आहेस; आणि पूर्वीं तूं अनंत भेदयुक्त चराचर विश्वाच्या उत्पत्ती साठीं प्रगट जाहला स; नंतर उत्पन्न झालेल्या सर्व जगाचे पालनार्थ तूं सत्व मूर्ती झाला आहेस व पुढें प्रलय कालीं तूंच या सर्व जगाचा संहार करण्याच्या इच्छेनें या ब्रह्मांडाचा, रुद्रमूर्ती धारण करून नाश करितोस तस्मात् हे देवा आह्मीं तुला नमस्कार करितों.

व्यक्तिंनीत्वात्वंवपुःस्वंमहिम्नातस्मादंडात्स्वाभिधानादचिंत्यः॥ द्यावापृथिव्योरूर्ध्वखंडावराभ्यांत्वंडादस्मात्त्वंविभागंकरोषि॥ ८॥

अर्थ.– तसेंच हे ब्रह्मदेवा तूं अचिंत्य शक्ति आहेस; ह्मणून आपलें नाम युक्त ब्रह्मांडाहून निराळा देह स्वमहात्म्यानें प्रगट करितोस; आणि या ब्रम्हांडांतही सप्तस्वर्ग हा वरचा अर्धभाग व पृथ्वी पासून सप्त पाताळ पर्यंत खालचा अर्धाभाग असे तूंच या ब्रह्मांडाचे दोन विभाग करितोस.

व्यक्तंमेरौयज्ज्ञनायुस्तवाभूदेवंविद्यस्त्वत्प्रणीतश्च कास्ति॥ व्यक्तंदेवाजन्मनःशाश्वतस्यद्यौस्तेमूर्धालोचनेचंद्रसूर्यौ॥ ९॥

अर्थ.– हे देवा सर्व जनांच्या आयुष्याचें परिमाण करणारा जो सूर्य मेरु

पर्वतावरून प्रदक्षिणा करीत आहे; तो निश्चयें करून तुमचाच आहे; आणि तुमच्याच आज्ञेनें तो मेरूवर असून सर्व लोकांस प्रकाशकरितो असें आह्मीं जाणतों; त्याच प्रमाणें हे देवा तुला जन्म नसल्यामुळें तूं नित्य विकार रहित स्वरूपानें राहिला आहेस आणि सप्तस्वर्ग तुझा मस्तक असून चंद्र व सूर्य हे तुझे नेत्र आहेत.

व्यालाः केशाः श्रोत्ररंध्रादिशस्ते पादौ भूमिर्नाभिरंध्रेसमुद्राः॥मायाकारः कारणस्त्वंप्रसिद्धोवेदैःशांतोज्योतिषात्वं विमुक्तः॥१०॥

अर्थ- तसेच हे देवा, सर्प हे तुझे केश आहेत; सर्व दिशा तुझे कर्ण आहेत; भूमीही तुझे पाय आहेत; तुझ्या नाभीचे छिद्रांत सर्व समुद्र आहेत; तसेंच सर्व माया कार्यें उत्पन्न करणारा आहेस; अशा मायेच्या सर्व कार्यास मुख्य कारण वेदांत तूंच प्रसिद्ध असून शांत आहेस तुला विकार नाहीं असें वेदानींच सांगितलें आहे; आणि तूं स्वयं प्रकाश आहेस ह्मणून तुला चंद्र व सूर्य इत्यादिकांचे तेजाची अपेक्षा नाहीं.

वेदार्थेषु त्वां विवृण्वंति बुध्दा हृत्पद्मांतःसन्निविष्टंपुराणं॥त्वामात्मानंलब्धयोगागृणंति सांख्यैर्यास्ताः सप्तसूक्ष्माः प्रणीताः॥११॥

अर्थ- ह्मणूनच सिद्धयोगी वेदांचे अर्थांत तुला जाणून बहुत वर्णितात आणि त्याच प्रमाणें ते योगी आपले हृदय कमलांत उत्तम प्रकारें राहणारा पुराणपुरुष व सर्वांचा आत्मा असा जो तूं तुला निरंतर स्तवितात; त्याच अर्थानें युक्त अशा सात सूक्ष्म विद्या सांख्यमत प्रवर्तक ऋषीनीं लोकांत प्रगट केल्या आहेत.

तासांहेतुर्याष्टमीचापिगीतातस्यांतस्यांगीयसेवेत्वमेतं॥दृष्ट्वामूर्तिस्थूलसूक्ष्मांचकारदेवैर्भावाःकारणैः केश्चिदुक्ताः॥१२॥

अर्थ- त्या सात सूक्ष्म विद्यांचा अर्थ प्रकाशित करणारी जी आठवीगीता आहे, त्या गीतेंत प्रतिपदीं निर्णयानें तुझेंच वर्णन केलें आहे, आणि जगाच्या उत्पत्तीस कारणीभूत कांही एक देवानीं निवेदन केलेले जे महत्तत्वादिक प-

दार्थ ते पाहून तूं आपली मूर्ति स्थूल व सूक्ष्म अशी करिता झाहलास.

संभूतास्ते त्वत्त एवादिसर्गे भूयस्तांस्तां वासनां ते भ्रुये युः ॥ त्वत्संकल्पेनांतमायातिगूढः कालो मेयो ध्वस्तसंख्याविकल्पः ॥ १३ ॥

अर्थ— तेच महत्तत्त्वादिक पदार्थ सृष्टीचे आरंभीं तुजपासूनच उत्पन्न जाहले; नंतर पुनः प्रलय कालीं ते महत्तत्त्वादिक पदार्थ त्याच्या आपापल्या वासनामय सूक्ष्म प्रकृतींत लीन होतात; अशा या सृष्टी, स्थिति, लयादिकांस कारण जो काळ तो तुझ्या संकल्पानेंच समाप्तीस येतो. याकाळाची गति अति सूक्ष्म असल्यामुळें त्याचें ज्ञान इतरांस होणें अशक्य असून त्याकाळाची क्षणादि सर्व अवयव संख्या तुझे संकल्पानें प्रलय काळीं नाश पावते.

भावाभावव्यक्तिसंहारहेतुस्त्वं सोनंतस्तस्य कर्त्तासि चात्मन् ॥ येन्ये सूक्ष्माः संति तेभ्योभिगीतः स्थूलाभावाश्चावृतारश्च तेषां ॥ १४ ॥

अर्थ— तसेंच महत्तत्त्वादिक जे विद्यमान पदार्थ व नाशादिक अभाव यांचीउत्पत्ति किंवा संहार यां विषयीं कारण जो अपरिमित अखंड दंडायमान महाकाल त्याचाही प्रवर्तक हे परमात्मन् ब्रह्मदेवा तूंच आहेस; आणि या पेक्षांहीं जे सूक्ष्म जीव आहेत; त्याहूनही उत्तमत्वें करून वेदशास्त्र पुराणांत तूं वर्णिला आहेस; व जे महत्तत्त्वादिक स्थूल पदार्थ आहेत, ते जीवांस आवरण करणारे आहेत.

तेभ्यः स्थूलैस्तैः पुराणैः प्रतीतो भूतं भव्यं चैव समुद्भूतिभाजां ॥ भावे भावे भावितं त्वा युनक्ति युक्तं युक्तं व्यक्तिभावान्निरस्य ॥ इत्थं देवो भक्तिभाजां शरण्यस्त्राता गोप्ता नो भवानंतमूर्तिः ॥ १५ ॥

अर्थ— त्यांहून ही मोठीं जी ब्रह्मांडाचीं पृथिव्यादिक दहा आवरणें आहेत त्यांचें प्रतिपादन करणाऱ्या पुराणांवरून तुझें ज्ञान लोकांस होतें; तें असें कीं, भूत, भविष्य व वर्तमान असे जे उत्पन्न होणारे प्राणी त्यांचे स्थिति व संहार यां विषयीं उत्पन्न झालेल्या सर्व व्यक्ति मात्रांचा निषेध करून युक्ति पूर्वक विचारानें सर्वत्र मुख्य कारण तुलाच मानतात; असा तूं अनंतमूर्ते-

देव, शरणांगत भक्तांचा दयाळु, रक्षण करणारा आहेस; तस्मात् तूं या संक ट समयीं आमचें रक्षण करण्या विषयीं उद्युक्त हो.

विरिंचिममरास्तत्वाब्रह्माणमविकारिणं॥ तस्थुर्म-
नोभिरिशार्थसंप्रासिप्रार्थनास्ततः॥ १६॥

अर्थ— अशा अविकारी विश्वरचना करणाऱ्या ब्रह्मदेवाची स्तुति करून त्या पासून आपला मनोरथ पूर्ण होण्या साठीं सर्व इंद्रादिक देव प्रार्थना-करीत ब्रह्मदेवाचे अग्रभागीं उभेराहिले.

एवंस्तुतो विरिंचिस्तुप्रसादं परमंगतः॥ अमरान्वर
देनाह वामहस्तेननिर्दिशन्॥ १७॥

अर्थ— अशी देवांनी स्तुति केली असतां, ब्रम्हदेव उत्कृष्ट प्रसन्न जाहले आणि वर देण्याच्या वाम हस्तानें देवांस सूचवीत होत्साता बोलूं लागले:

ब्रह्मोवाच॥ नारीयाःभर्तृकाःकस्मात् तनुस्तेत्यक्तभू
षणा॥ नराजते तथाशक्र म्लानवक्त्रशिरोरुहा॥ १८

अर्थ— कीं हे इंद्रा, "जशी पतिव्रता स्त्री आपला पति मरण पावलेला ऐकतांच अकस्मात् तत्क्षणीं अंगावरील सर्व भूषणांचा त्याग करिते; आणि त्या वैधव्य दुःखानें तिचें मुख व केंश यावरील शोभा जाऊन म्लानता आली असतां ती स्त्री सुंदर रूपवती असूनही शोभत नाहीं तसें" तुझें शरीर म्लान झाल्यामुळें शोभत नाहीं.

हुताशनविमुक्तोपिनधूमेनविराजसे॥ भस्मनेवप्रति
च्छन्नोदग्धदावश्चिरोषितः॥ १९॥

अर्थ— हे अग्ने "जसा अरण्यांतील दावाग्नि अरण्य जाळून पुढें बहुत दिवस राहिल्यावर तो धूम रहित जाहला तरीं भस्मानें आच्छादित असल्यामुळें शोभत नाहीं तसा." तूं निस्तेज पणामुळें शोभत नाहींस.

यमामयमयेनैवशरीरेत्वं विराजसे॥ दंडस्यालंबने
नेवत्वंकुब्रस्तपदेपदे॥ २०॥

अर्थ— हे यमा तुला विशेष दुःख जाहलें नसून दंड हातांत घेऊन चालण्या मुळें तूं पदोपदीं शोभत नाहींस. "जसा कोणी एकादा शरीर रोगग्र

स्त जाहलें असतां हातांत काठी घेत त्यामुळें तो मनुष्य शोभत नाहीं तसा."

रजनीचरनाथापिकिंभीतइवभाषसे॥राक्षसेंद्रस्त्वरातिक्षतोयथा॥२१॥

अर्थ- हे निर्ऋते तूं रात्रीं संचार करणाऱ्या राक्षसांचा नाथ असून अशा भयभीता सारखें भाषण काय करितोस, आणि हे राक्षस राजनिर्ऋते तूं सर्व दुःखांचा नाश करणारा असून तुला शत्रूं पासून अतिदुःख जाहलें हें मोठें आश्चर्यच आहे.

तनुस्ते वरुणो शुष्कापरीतस्येववन्हिना॥विमुक्तरुधिरंपाशंफणिभिःप्रविलोकयन्॥२२॥

अर्थ- हे वरुणा, "जसें एकाद्याचें शरीर चोहींकडून अग्नीनें करपून जावें तसा" तुझा देह अत्यंत शुष्क कशानें झाला; याचें एक कारण मला असें वाटतें कीं, तुझे नाग पाशांतील सर्पांनीं रक्त ओकलेलें पाहून तुझी अशी अवस्था जाहली असावी.

वायोभवान्विचेतस्कस्त्वंस्निग्धैरिवनिर्जितः॥किंत्वंबिभेषिधनदसंन्यस्यैवकुबेरतां॥२३॥

अर्थ- हे वायो, "जसा शरीरांतील वायूचा विकार घृतादिक स्निग्ध पदार्थांनीं जिंकला जातो तसा" तूं शत्रूं पासून पराभव पावल्यामुळें अगदीं खिन्न दिसत आहेस, तसेंच हे धनदेणाऱ्या उदार कुबेरा आपली श्रीमंती सोडून तूं असा गरिबासारखा भितोस काय?

रुद्रास्त्रिशूलिनः संतोवदध्वंबहुशूलतां॥भवंतःकेनतस्मिंस्तेजस्तभवतामपि॥२४॥

अर्थ- त्याच प्रमाणें एकादश रुद्र हो तुह्मी त्रिशूल धारण करणारे आहांत परंतु आतां शत्रूंचे शस्त्रप्रहारानीं तुमचे देहांस शूळ उत्पन्न जाहला आहे तस्मात् आपणास बहुशूली असें ह्मणावें आणि तुह्मीं महावीर असून ही तुमचें तेज कोणी कमी केलें.

अकिंचित्करतांयातः करस्तेनविभासते॥अलंनीलोत्पलाभेनचक्रेणमधुसूदन॥२५॥

अर्थ- तसेंच हे मधुसूदना तुझे हातून कांहीं एक पराक्रम होत नाहीं; ते

ह्मं आतां तुझा हात शोभत नाहीं; आणि निळ्या कमळा समान ह्या तुझ्या कोमळ सुदर्शनचक्राची ही प्रौढी पुरे.

किंत्वयानुदरालीन भुवनप्रविलोकनं॥ क्रियतेऽस्ति मिताक्षेण भवताविश्वतोमुख॥ २६॥

अर्थ— हे विश्वतोमुख विष्णो तूं दयार्द्र दृष्टीनें आपले सूक्ष्म उदरांतील ब्रह्मांडास अतिशयें काय पहातोस?

एवमुक्ताः सुरास्तेन ब्रह्मणा ब्रह्ममूर्तिना॥ वाचांप्रधान भूतत्वान्मारुतंतमचोदयन्॥ २७॥

अर्थ— असें केवळ ब्रह्ममूर्ति ब्रह्मदेवानें भाषण केल्यावर ते सर्व देव वाणीच्या अभिमानी देवतांत मुख्य अशा वायूस आपलें सर्व वर्तमान ब्रह्मदेवास सांगण्या विषयीं सूचविते जाहले.

अथविष्णुमुखैर्देवैः श्वसनः प्रतिबोधितः॥ चतुर्मुखं तदाप्राहचराचरगुरुं विभुं॥ २८॥

अर्थ— नंतर असा विष्णुप्रमुख देवांनीं आपल्या विज्ञापनेंविषयीं वायूस बोध केला असतां तो वायू त्याकाळीं चराचर विश्वाचे गुरू असून सर्व कार्याविषयीं समर्थ अशा त्या व्यापक ब्रह्मदेवास बोलतो.

नतुवेत्सिचराचरभूतगतं भवभावमतीवमहानुच्छ्रितः प्रभवः॥ पुनरर्थिवचोविस्तृतः श्रवणोपमकौतुकभावकृतः॥ २९॥

अर्थ— कीं, हे ब्रम्हदेवा तूं सर्वचराचर प्राणिमात्रांतील उत्पत्तीचें स्वरूप जाणीत नाहींस, तें असें कीं, असुर कुळांत ऐश्वर्याचा महान् उद्भव झाला असून तो ऐकल्या प्रमाणें आश्चर्य कारक असा पुनः ह्या कार्यार्थी देवांच्या सांगण्या वरून सविस्तर समजण्यांत येत आहे.

त्वमनंतकरोषिजगद्भवतांसचराचरगर्भविभिन्नगुणां॥ अमरासुरमेनदशोमपित्व यितुल्य महोजनकोसियतः॥ पितुरस्तितथापिमनो विकृतिः सगुणो विगुणोबलवान्बलः॥ ३०॥

अर्थ— तेव्हां या जगाचा सृष्टिकर्ता कोणी दुसरा असेल असें कदाचित् ह्य

णावें तर हे अचिंत्य माहात्म्य युक्त ब्रह्मदेवा तूंच गर्भापासून अनेक भिन्नगुणा-न्नीं युक्त अशीच्चराचर प्राणिमात्रांची सृष्टी करितोस; तस्मात् तूं सर्वांस उत्प-न्न करणारा आहेस, यास्तव देव व असुर इत्यादिक हें सर्व विश्व तुला समा न आहे, तथापि पित्यास आपल्या प्रजेच्या विषम स्थितीनें मनांत विकार-होतो असें लोकांत दृष्ट आहे; परंतु हे विकार तुला नाहींत, कारण तुला सगु-णह्मणावें तर तूं निर्गुण आहेस, अशक्त ह्मणावें तर बलवान् आहेस, तेव्हां तुला कांहींच ह्मणतां येत नाहीं.

भवतोवरलाभनिवृत्तभयः कुलिशांगसूनोदितिजो
निबलः॥ सचराचरनिर्मथने किमिति कितवस्त्कृतो
विहितोभवता॥ ३१॥

अर्थः— असो परंतु हे देवा तुझ्याच वरप्रदानानें निर्भय झाला असून अ-ति बलिष्ठ कपटी व अन्यायी असा वज्रांग दैत्याचा पुत्र तारकासुर हा चरा-चर सर्व जगाचे नाशा विषयीं तुह्मीं किमर्थ उत्पन्न केला.

किलदेव त्वया स्थितये जगतां महदद्भुत चित्र विचित्र
गुणाः॥ अपितुष्टिकृतः श्रुतकामफला विहिता हि
जनायक देवगणाः॥ ३२॥

अर्थः— हे देवा मोठे अद्भुत असून चित्र विचित्र गुणानीं संपन्न, सर्व स-ज्जनांचा संतोष करणारे, इच्छित फलें देऊन भक्तांचे मनोरथ पूर्ण करणा रे असे ब्राह्मणांतील प्रमुख ऋषि व देव यांचे समुदाय तुह्मीं प्राणि मात्रां च्या संरक्षणार्थ उत्पन्न केले हें तुमचें मोठें स्तुत्य कृत्य आहे.

अपिनाकमभूत्किलयज्ञभुजां भवतो विनियोगव-
शात्सततं॥ अपदस्थ्यविमानगणांसकृतो दितिजेन
महामरुभूमिसमः॥ ३३॥

अर्थः— तसेंच हे देवा पूर्वी तुझ्या केलेल्या नियमा प्रमाणें स्वर्गलोक यज्ञ भाग ग्रहण करणाऱ्या देवांच्या विमानानीं व्याप्त असे, परंतु वर्तमान कालीं तारकासुरानें तीं देवांचीं विमानें हरण करून तो स्वर्गलोक मोठ्या मारवाड देशांतील भूमी सारखा शून्य केला आहे.

कृतवानसि सर्वगुणातिशयं यमशेषमहीधरराजन-

या ॥ समभिंगितभावविधिःसचमेरुगिरिर्गगनेन स
दोऽञ्छ्रयतां हिगतः ॥ ३४ ॥

अर्थ— आणि हे ब्रह्मदेवा सर्व गुणांचे उत्कर्षानें युक्त असल्या मुळें सर्व पर्वतांत तुह्मी मेरूस राजपदवी दिली; तो मेरु पर्वत सर्वांच्या मनांतील अभिप्राया प्रमाणें सर्व रम्य रचनानीं सुशोभित असून निरंतर गगनासारखा उंच गेला आहे.

अधिवासविहारविधावुचितोदितिजेनपविक्षतशृं
गतटः ॥ परिलुंठितरत्नगुहानिवहोबहुदैत्यसमा
श्रयतांगमितः ॥ ३५ ॥

अर्थ— तसेंच पूर्वीं इंद्रानें पर्वतांचे पंख तोडले; तेव्हां इंद्राच्या वज्रानें मेरूच्या शिखराचे तट पडलेले असून ही तो मेरु पर्वत निरंतर वास करून क्रीडा करण्या विषयीं बहुत योग्य आहे, आणि त्या पर्वतांतील अनेक गुहांत सर्वत्र रत्नें लोळत आहेत; असा तो उत्तम पर्वत देवांचें क्रीडास्थान असून विद्यमान कालीं तारकासुराचे प्राबल्यामुळें बहुत दैत्यांच्या स्थितीचे उपसर्गानें व्याप्त जाहला आहे.

सुरराजसतस्यभयेनगतंव्यदधादशरीरइतोपिरथा
॥ उपयोग्यतयाविवृतंसुचिरंविमलद्युतिपूरितदि-
ग्वदनं ॥ ३६

अर्थ— हे देवराज ब्रह्मदेवा, तारकासुरानें प्राबल्य झाल्यावर त्याच्या भयानें मदन ही त्याचे संतोषार्थ मेरु पर्वतावर गेला परंतु त्याचें जाणें तेथें व्यर्थ जाहलें; कारण त्या मेरुसंबंधी सर्व दिशांचे प्रांत भाग देवांचे उपयोगार्थ निरंतर उत्कृष्ट विस्तार युक्त सर्व शोभानीं पूर्ण आहेत.

भवतेवविनिर्मितमादियुगेसुरहेतिसमूहमनुत्थमि
दं ॥ दितिजस्यशरीरमवाप्यगतंशतधामतिभेदमिवा
ल्पमनाः ॥ ३७ ॥

अर्थ— हे देवा असा हा मेरुपर्वत आदि युगाचे आरंभीं तुह्मींच निर्माण केला आहे; पूर्वीं या पर्वतावर असुरांनीं कितीही आयुधांचे समुदाय टाकले असतां तीं शस्त्रें पुनः उपयोगी पडत नसत; हा पर्वत असा असून ही—

तों या तारकासुराचे अंगस्पर्शानें शतशः खंडित जाहला आहे; यासदृष्टांत "अल्पबुद्धि मानवाचें मन बुद्धीच्या अनेक तरंगानीं नाश पावतें तसें."

आसारधूलिध्वस्तांगा द्वारस्थास्थकदर्थिनः॥ लब्ध प्रवेशाः कृच्छ्रेणवयंतस्यामरद्विषः॥ ३८॥ सभायाम मरादेवनिकृष्टेष्पुपवेशिताः॥ वेत्रहस्तैरजल्पंतस्ततो पहसितास्कृतेः॥ ३९॥

अर्थ– हे ब्रह्मदेवा त्या असुर सैन्याच्या धुळीनें आमचीं सर्वांगें मलिन जाहलीं आहेत, असें आम्हीं अत्यंत दीन होऊन त्या तारकासुराच्या द्वारांतच बहुकाल पर्यंत उभे होतों. पश्चात् महा प्रयासानें आम्ही त्या देव द्वेषी तारक दैत्याच्या सभेंत गेलों; तेथें ही त्याचे दूतानीं आम्हास निकृष्ट स्थानीं बसविलें; आणि राजकीय चिन्हाच्या काठ्या हातांत घेणाऱ्या भालदारानीं आम्हांस दाबून मुकाट्यानें बसविलें; व त्याणीं तेथें आमचा उपहास ही बहुत केला.

महार्याः सिद्धसर्वार्था भवंतः स्वल्पभाषिणः॥ चाटुयु क्तमथो कर्म त्वमरा बहुभाषत॥ ४०॥

अर्थ– तो असा कीं, देवहो तुह्मी मोठे श्रेष्ठ असून तुमची सर्व कार्यें हीं सिद्धजाहलीं आहेत. आणि तुम्हीं परिमित भाषण करणारे आहांत; तथापि आतां तुम्हीं तारकासुराचे संतोषार्थ प्रिय वाक्य युक्त असें कांहीं कर्म बहुकाल पर्यंत बोलून दाखवा.

सभयंदैत्यसिंहस्यनशक्रस्यतुसंस्थिताः॥ वदंतेतिच दैत्यस्यप्रेष्यैर्विहसिताबहु॥ ४१॥

अर्थ– त्या वेळेस आम्हीं त्या दैत्यसिंह तारकासुराचें भय मानीत होतों, तसें पूर्वी इंद्राच्याही भयांत वागत नव्हतों; आणि देवहो तुम्हीं राजाचे संतोषार्थ कांहीं तरीं चमत्कारिक भाषण करा असा त्या तारक दैत्याचे दूतानीं आमचा बहुत उपहास केला.

ऋतवोमूर्तिमंतस्तमुपासंतेत्र्यहर्निशं॥ कृतापराधसंत्रा संनत्यजंतिकदाचन॥ ४२॥

अर्थ– तसेच तेथें मूर्तिमंत सर्व ऋतु तारकासुराची अहोरात्र सेवा करितात; आणि त्या सेवेंत त्यांचे हातून कांहीं अपराध पडला असतां त्या अपराध संबं

थि त्या दैत्याचें भय त्यांचे मनांतून कधींही जात नाहीं.

तंत्रीत्रयलयोपेतं सिद्धगंधर्वकिन्नरैः॥ स्वरागमुपधानि स्यं गीयते तस्य वेश्मसु॥ ४३॥

अर्थ— याच प्रमाणें देव जातींतील सिद्धगण, गंधर्व व किन्नर हे त्या तारकासुरांचे घरांत वीणा आदि करून तीन तंतुवाद्यांचे स्वरांचा लय मिळवून आरंभापासून उत्तम राग युक्त नित्य गायन करितात.

हंता कृतोपकरणो मित्राणि गुरुलाघवैः॥ शरणागतसंत्यागी त्यक्तसत्यपरिश्रयः॥ ४४॥

अर्थ— आणि त्या गायनांत दीर्घ किंवा ऱ्हस्व इत्यादिक स्वरांस यथास्थित साह्य कदाचित् न घडल्या मुळें त्या गंधर्वादिकांचें साह्य करणारांस तो तारकासुर तत्क्षणीं ताडन करितो, बरें त्यांत कोणी शरण गेला तरीं त्याची क्षमा करीत नाहीं; व त्या दैत्यानें सत्याचा आश्रय तर मुळींच टाकला आहे.

इति निःशेषमथवा निःशेषं वै न शक्यते॥ तस्याविनयमाख्यातुं त्वमेव तत्र परायणं॥ ४५॥

अर्थ— या प्रमाणें संपूर्ण अथवा न्यून असा त्याचा अन्याय सांगण्या विषयीं त्याचे भया मुळें कोणी समर्थ नाहीं, अशा त्या तारकासुराच्या महत्संकटांतून हे ब्रह्मदेवा तुह्मीच मुक्त करणारे आहांत.

इत्युक्तः स्वात्मभूर्देवः सुरैर्दैत्य विचेष्टिते॥ सुरानुवाच भगवांस्ततः स्मितमुखांबुजः॥ ४६॥

अर्थ— असा देवानीं त्या तारक दैत्याचा अनीतियुक्त सर्व वृत्तांत संक्षेपानें निवेदन केल्यावर स्वयंभू भगवान् ब्रह्मदेव किंचित् हास्यमुख करून त्या देवांस बोलतात.

ब्रह्मोवाच॥ अवध्यस्तारको दैत्यः सर्वैरपि सुरासुरैः॥ यस्य वध्यः स नाद्यापि जातस्त्रिभुवने पुमान्॥ ४७॥

अर्थ— कीं हे देवहो तो तारकासुर, सर्व देव व असुर यांस अवध्य आहे; आणि त्या तारक दैत्यास मारणारा पुरुष अद्यापि त्रिभुवनांत उत्पन्न जाहला नाहीं

मयास वरदानेन छंदयित्वा निवारितः॥ तपसः सांप्रतं राजा त्रैलोक्य दहनात्मकात्॥ ४८॥

अर्थ:- कारण तो दैत्यराज तारकासुर पूर्वी तप करीत होता, त्याच्या तपानें त्रैलोक्य जळूं लागलें; तेव्हां म्यां त्यास वरदानानें संतुष्ट करून त्या उग्र तपश्चर्येतून उठविलें; तो सांप्रत काळीं सर्व असुरांचा राजा जाहला आहे.

सचवव्रेवधंदैत्यः शिशुतः ससवासवात्॥ ससस-
दिवसो बालः शंकराद्योभविष्यति॥ ४९॥ तारकस्य
निहंतास भास्कराभोभविष्यति॥ सांप्रतंचाप्यप-
त्नीकः शंकरोभगवान्प्रभुः॥ ५०॥

अर्थ:- त्या तारक दैत्यानें आपला मृत्यु सात दिवसांच्या बालकापासून व्हावा असा वर मागितला. तो या तारकासुरास मारण्याविषयीं समर्थ असा बालक कैलासपती शंकरापासून जो होईल, तो सूर्यसमान तेजस्वी शिवपुत्र त्या तारकासुरास मारील; परंतु महदैश्वर्ययुक्त समर्थ महादेवास सांप्रत काळीं स्त्री नाहीं.

यच्चाहमुक्तवान्यस्यात्युतानकरतासदा॥ उत्तानोवरदः
पाणिरेषदेव्याःसदैवतु॥ ५१॥

अर्थ:- आणि पूर्वीं मी असें बोललों आहें कीं, जिचा हात निरंतर उताणा असेल; तिला अजिंक वीर पुत्र होईल आणि त्या देवीचा तो हात सर्वदा उताणा असून वर देणारा असावा.

हिमाचलस्यदुहितासातुदेवीभविष्यति॥ तस्याःस
काशाद्यःशर्वस्त्वरण्यांपावकोयथा॥ ५२॥ जनयि-
ष्यतितंप्राप्य तारकोभिभविष्यति॥

अर्थ:- या लक्षणानें युक्त जी कन्या हिमालयास पुढें होणार आहे; ती देवी अशी होईल, तिजपासून शिव ज्या पुत्रास उत्पन्न करील; "तो पुत्र अरणींत (यज्ञपात्रांत) उत्पन्न जाहलेल्या अग्नी सारखा महातेजस्वी होईल; तो पुत्र संग्रामांत प्राप्त जाहला असतां तारकासुर पराभव पावेल.

मयाप्युपायःसकृतोयथैवंहिभविष्यति॥ ५३॥-
शापश्चाप्यस्य विभवो विनश्येत्तदनंतरं॥ स्तोकका-
लंप्रतीक्षध्वंनि विशंकेनचेतसा॥ ५४॥

अर्थ:- या प्रमाणें होणारा हाच म्यां उपाय योजला आहे; नंतर या तार-

कासुरानें राहिलेलें सर्व ऐश्वर्य ही नाश पावेल; परंतु तावत्काल पर्यंत तु
ह्मीं निर्भय अंतःकरणानें या प्रसंगाची मार्ग प्रतीक्षा करावी.

इत्युक्तास्त्रिदशास्तेन साक्षात्कमलजन्मना ॥ ज-
ग्मुस्तं प्रणिपत्येशं यथायोगं दिवौकसः ॥ ५५ ॥

अर्थः— असें साक्षात् ब्रह्मदेवानें स्वमुखें करून भाषण केलें असतां ते स
र्व देव यथा योग्यतानुसार ब्रह्मदेवास नमस्कार करून स्वस्थानीं गेले.

ततोगतेषु देवेषु ब्रह्मा लोकपितामहः ॥ निशां सस्मा
र भगवान्स्वतनोः पूर्वसंभवां ॥ ५६ ॥

अर्थः— असे ते देव गेल्यानंतर सर्व लोकांचा पितामह भगवान् ब्रह्मदे
व आपले देहापासून उत्पन्न जाहलेल्या कालरात्रीच्या अभिमानी देव
तेचें स्मरण करिता जाहला.

ततो भगवती रात्रिरुपतस्थे पितामहं ॥ तां विविक्ते
समालोक्य ब्रह्मोवाच विभावरीं ॥ ५७ ॥

अर्थः— तेव्हां ती भगवती रात्री येऊन हात जोडून स्तुती करीत ब्रह्मदेवा-
चे अग्रभागीं उभी राहिली ते समयीं ब्रह्मदेव त्या रात्रीस, पाहून एकांतीं
तिच्याशीं भाषण करूं लागले.

ब्रह्मोवाच ॥ विभावरि महत्कार्यं विबुधानामुपस्थि
तं ॥ तत्कर्तव्यं त्वया देवि शृणु कार्यस्य निश्चयं ॥ ५८ ॥

अर्थः— कीं, हे रात्रि या कालीं देवांचें महत्कार्य उपस्थित जाहलें आहे, हे दे
वि तें देवकार्य त्वां अवश्य करावें; या साठीं तूं त्या कार्याच्या स्वरूपाचा निश्चय
ऐक.

तारको नाम दैत्येंद्रः सुरकेतुरनिर्जितः ॥ तस्याभावाय-
भगवान्जनयिष्यति चेश्वरः ॥ ५९ ॥ सुतं स भविता त-
स्य तारकस्यांतकारकः ॥

अर्थः— तें असें कीं, देवांचा शत्रु दैत्यांचा राजा असा अजिंक तारकासुर पृ
थ्वीवर उत्पन्न जाहला आहे, त्याच्या नाशार्थ भगवान् शंकर पुत्र उत्पन्न
करितील; तो शिव पुत्र त्या तारकासुरास मारील.

शंकरस्याभवत्पत्नी सती दक्षसुता तु या ॥ ६० ॥ साप्र

ताकुपितादेवीकस्मिंश्चित्कारणांतरे ॥ भविताहिमशै लस्यदुहितालोकभावनी ॥ ६१ ॥

अर्थ:— परंतु पूर्वी जी दक्षाची कन्या सतीनामें महादेवाची पत्नी होती; ती- देवी कांहीं एक कार्याचे प्रसंगीं कांहीं कारणानें क्रुद्ध होऊन मरण पावली; ती पुनः पुढें हिमालयाची कन्या होऊन लोकांचें संरक्षण करील.

विरहेणहरस्तस्यामत्वाशून्यंजगत्त्रयं ॥ तपस्यन्हि मशैलस्यकंदरे सिद्धसेविते ॥ ६२ ॥ प्रतीक्षमाणस्त- ज्जन्मकंचित्कालंनिवत्स्यति ॥

अर्थ:— तेव्हां तिच्या विरहानें जगत्त्रय शून्य मानून शंकर त्या आपल्या स्त्री च्या जन्माची मार्ग प्रतिक्षा करीत ऋषि आदि करून सिद्धानीं युक्त अशा हि मालय पर्वताच्या गुहेंत तप करीत कांहीं काल पर्यंत राहील.

तयोःस्फुतसतपसोर्भवितायोमहाबलः ॥ ६३ ॥ सभवि ष्यतिदैत्यस्यतारकस्यविनाशकः ॥

अर्थ:— तशीच ती हिमालयाची कन्या पार्वती ही शिवाचे प्राप्त्यर्थ तप करील- मग उत्तम तप करणाऱ्या त्या शिव, पार्वतींचा जो महाबलाढ्य पुत्र होईल; तो- त्या तारकासुराचा नाश करील.

जातमात्रातुसादेवीस्वल्पसंज्ञानभामिनी ॥ ६४ ॥ विरहो त्कंठितागाढंहरसंगमलालसा ॥

अर्थ:— ती पार्वती जन्म होतांच पूर्वजन्मांतील स्वल्प ज्ञान असल्या मुळें पतिवि रहानें उत्कंठा युक्त होऊन त्या सदाशिवाचे समागमा विषयीं अत्यंत उत्सुक होईल.

तयोःस्फुतसतपसोःसंयोगःस्याच्छुभानने ॥ ६५ ॥ ततः स्ताभ्यांतुजनितःस्वल्पोवाक्कलहोभवेत् ॥

अर्थ:— नंतर उत्कृष्ट तप करणाऱ्या त्या शिवपार्वतींचा समागम होईल; हे सुं दर वदने कालरात्रि पुढें कांहीं कारणा वरून त्या शिव पार्वतींचा परस्परें भाषणांत मात्र किंचित् प्रेम कलह होईल.

ततोपिसंशयोभूयस्तारकंप्रतिदृश्यते ॥ ६६ ॥ तयोःसं- युक्तयोस्तस्मात्सुरतासक्तिकारणे ॥ विघ्नस्त्वयाविधात- व्योयाताभ्यांतथाशृणु ॥ ६७ ॥

अर्थ– त्याही कारणानें तारकासुरास मारणारा पुत्र पार्वतीस होण्या विषयीं पुनः संशय आला असतां रति करण्यार्थ एकत्र झालेल्या शिवपार्वतींचे सुरत सुखाच्या आसक्तीचे कारणा विषयीं तूं विघ्न करण्याचा प्रकार ऐक:

गर्भस्थानेचतन्मातुः स्वेनरूपेणरंजय ॥ ततोविहाय शर्वस्तांविश्रांतोनर्मपूर्वकं ॥ ६८ ॥ भर्त्सयिष्यतितांदे वींततःसाकुपितासती ॥ प्रयास्यतितपश्चर्तुंततस्मा त्तपसेपुनः ॥ ६९ ॥

अर्थ– तो असा कीं, हे कालरात्रि तारकासुरास मारण्या विषयीं समर्थ अशा होणाऱ्या पुत्राची माता जी पार्वती तिच्या गर्भस्थानीं तूं आपले रूपानें तृप्ति कर; ह्मणजे शिव, तिला सोडून रतिसुखाचा विराम करून विनोदानें तिची निर्भर्त्सना करील, तेणें करून मग ती पार्वती रुष्ट होत्साती पुनः तप करण्या साठीं तेथून अन्य स्थळीं जाईल.

जनयिष्यतियंशर्वादमितद्युतिमंडितं ॥ सभविष्य तिहंतावैसुरारीणामसंशयं ॥ ७० ॥ त्वयापिदानवा देवि हंतव्यालोकदुर्जयाः ॥

अर्थ– नंतर ती पार्वती शिवा पासून राहिलेल्या ज्या अपरिमित कांतीनें सुशोभित गर्भास प्रसवेल, तो पुत्र देवांच्या सर्व शत्रूंस निःसंशय मारील; तसेच हे देवि त्वां हि लोकांस अजिंक असे मोठमोठे दानवांस मारावें.

यावच्चनसतीदेहसंक्रांतगुणसंचया ॥ ७१ ॥ तत्संग मेनतावत्त्वंदैत्यान्हंतुंनशक्ष्यसे ॥

अर्थ– हे कालरात्रि तूं आपल्या गुणसमुदाया सहित पार्वतीचे देहांत जों पर्यंत प्रविष्ट झाली नाहींस तों पर्यंतच तूं स्वातंत्र्यानें दैत्यांस मारण्या विषयीं समर्थ होशील; आणि पार्वतीच्या देहांत प्रवेश केल्यावर तूं स्वतंत्रपणानें दैत्य मारण्यास समर्थ होणार नाहींस.

एवंकृतेतपस्तस्याःसृष्टिसंहारकारिणी ॥ ७२ ॥ स- मासनियमादेवीयदाचोमाभविष्यति ॥ तदास्वमे वतद्रूपंशैलजाप्रतिपत्स्यते ॥ ७३ ॥

अर्थ– या प्रमाणें त्वां मेना नामक हिमालय भार्येच्या गर्भांतच पार्वतीचे

देहांत प्रवेश केला असतां, ती पार्वती जगाच्या सृष्टि व संहार यां विषयीं समर्थ होईल; पुढें जन्म जाहल्या नंतर ती पार्वती तप करून त्या तपाचे नियम समाप्त केल्या वर ज्या कालीं शिवाची पत्नी होईल; त्या कालीं ती आपले पूर्व जन्मा सारखेंच मुख्य रूप पावेल.

तनुस्तवापिसहजासैकानंशाभविष्यति॥रूपांशेनतु-
संयुक्ताखमुमायांभविष्यसि॥७४॥

अर्थ.— आणि हे कालरात्री पश्चात् तुझें मूलरूप एकानंशा या नामानें लोकांत प्रसिद्ध होईल; आणि तूं रूपाचे अंशानें युक्त होत्साती पार्वतीच्या देहांत रहाशील.

एकानंशेतिलोकस्त्वांवरदेपूजयिष्यति॥भेदैर्बहुविधाका
रैःसर्वगाकामसाधिनी॥७५॥

अर्थ.— त्या प्रमाणें हे वरदेणाऱ्ये देवी एकानंशा या नामानें सर्व लोक तुझी पूजा करितील; आणि तूं बहुत प्रकारचे भिन्न रूपानीं सर्वत्र व्याप्त असून सर्वांचे मनोरथ पूर्ण करणारी आहेस.

ओंकारवक्त्रागायत्रीत्वमितिब्रह्मवादिभिः॥आक्रांतिरू
र्जिताकाराराजभिश्चमहाभुजे॥७६॥

अर्थ.— ती अशी कीं, ब्रह्मज्ञानी ब्राह्मण तूं ओंकार रूप गायत्री अशी तुझी उपासना करितात; आणि महा पराक्रमी राजे अति बलिष्ठ आकार युक्त आक्रमण शक्ति या भावानें तुला भजतात.

त्वंभूरितिविशांमाताशूद्रैःशैवीतिपूजिता॥क्षांतिर्मुनी
नामक्षोभ्यादयानियमिनामिति॥७७॥

अर्थ.— आणि तूं पृथ्वीच्या रूपानें वैश्यांची माता आहेस, तसेंच शूद्र शैवी या नामानें तुझी पूजा करितात; मुनिजनांत क्षोभ नपावणारी शांति हें तुझें रूप आहे, व नियम युक्त व्रतें करणारांत दया हें रूप तुझें आहे.

त्वंमहोपायसंदोहानीतिर्नयविसर्पिणां॥ परिच्छित्ति
स्त्वमर्थानांत्वमहीप्राणिहृच्छया॥७८॥

अर्थ.— नीति मार्गानें चालणारांत तूंच मोठ्या उपायांनीं पूर्ण अशी नीति असून सर्व द्रव्यांचा विभाग करणारी आहेस व प्राणि मात्रांचे चित्तास इच्छित अशी भूमी तूंच आहेस.

त्वंमुक्तिः सर्वभूतानां त्वंगतिः सर्वदेहिनां ॥ त्वंचकीर्ति मतांकीर्तिस्त्वंमूर्तिः सर्वदेहिनां ॥ ७९ ॥

अर्थ— सर्व जीवांस मुक्ति देणारी तूंच असून संपूर्ण देहधारी प्राणि मात्रांस तूंच गति आहेस; यशस्वी लोकांची कीर्ति तूंच असून सर्व देही यांची मूर्ति तूंच आहेस.

रतिस्त्वंरक्तचित्तानांप्रीतिस्त्वं हृष्टदर्शिनां ॥ त्वंकांतिः कृतभूषाणां त्वंशांतिर्दुःखकर्मणां ॥ ८० ॥

अर्थ— ज्यांचें चित्त सर्वदां रममाण असतें त्यांत रतिरूपानें तुझें सान्निध्य असतें. जे निरंतर संतुष्ट मनानें असतात त्यांत तूं प्रीतिरूपानें असत्येस; जे अलंकारानीं भूषित आहेत त्यांत कांतिरूपानें तूंच आहेस. व तूंच दुःखकारक कर्मांची शांति करणारी आहेस.

त्वंभ्रांतिः सर्वबोधानां त्वंगतिः क्रतुयाजिनां ॥ जलधीनांमहावेला त्वंचलीला विलासिनां ॥ ८१ ॥

अर्थ— सर्व बोधांत भ्रांति होणें हें रूप तुझें असून यज्ञ करणारांस तूं उत्तम गति देत्येस. सर्व समुद्रांस मोठ्या मर्यादा रूपानें तूंच आहेस; व विलासी लोकांत क्रीडा रूपानें तुझें सन्निधान आहे.

संभूतिस्त्वंपदार्थानां स्थितिस्त्वंलोकपालिनी ॥ त्वं-कालरात्रिर्निःशेषभुवनावलिनाशिनी ॥ ८२ ॥

अर्थ— आणि सर्व पदार्थांस उत्पन्न करणारी तूं असून लोकांचें संरक्षण तूंच करित्येस; तसाच हे कालरात्रि सर्व चतुर्दश भुवनांचा नाशही तूंच करित्येस.

प्रियकंठग्रहानंददायिनीत्वंविभावरी ॥ इत्यनेकविधैर्देवि रूपैर्लोके त्वमर्चिता ॥ ८३ ॥

अर्थ— तशाच हे कालरात्रि सर्व स्त्रियांस आपल्या पतींच्या कंठाचे आलिंगनानें आनंद देणारी तूंच आहेस; हे देवी सर्वलोक अशा अनेक प्रकारच्या रूपानीं सर्वत्र तुझें पूजन करितात.

येत्वांस्तोष्यंतिवरदे पूजयिष्यंतिवापिये ॥ तेसर्वकामानाप्स्यंति नियतानात्रसंशयः ॥ ८४ ॥

अर्थ— आणि हे वर देणाऱ्ये देवी या किंवा इतर स्तोत्रांनीं जे तुझी स्तुति किंवा पूजा करितील; त्यांचे सर्व मनोरथ निःसंशय पूर्ण होतील यांत संदेह नाहीं.

इत्युक्त्वातुनिशादेवी तथेत्युक्त्वा कृतांजलिः॥ जगाम
त्वरितातूर्णंगृहंहिमगिरेः परं॥ ८५ ॥

अर्थः- असें ब्रह्मदेवानीं भाषण केलें असतां ती कालरात्री देवी हात जोडून ब्रह्मदेवास तथास्तु असें बोलून हिमालय पर्वताचे उत्तम मंदिरीं अति शीघ्र त्वरेनें गेली.

तत्रासीनांमहाहर्म्येरत्नभित्तिसमाश्रयां॥ ददर्शमेनांसा
पांडुच्छविवक्त्रसरोरुहां॥ ८६ ॥ किंचित्छ्यामसुखोदग्र-
स्तनभारावनामितां॥ महौषधिगणाबद्धमंत्रराजनि-
षेवितां॥ ८७॥ उद्बद्धकनकोन्नद्धजीवरक्षामहोरगां॥

अर्थः- त्या हिमालयाचे मोठ्या मंदिरांत त्या कालरात्रीनें रत्नखचित भिंतीशीं बसलेल्या मेना नामक हिमालयाच्या स्त्रीस पाहिलें; तिच्या कमला सारिख्या मुखावर किंचित् शुभ्रवर्ण कांतीनें शोभा असून किंचित् कृष्ण वर्ण अग्रयुक्त उंच स्तनांचे भारानें ती मेना नम्र झाली होती; तशाच मोठ्या औषधींच्या समुदायानें सभोंवती बांधलेल्या महा मंत्राच्या पेट्या अंगावर बांधल्या असून त्या हिमालय पर्वता वरील जीवांच्या संरक्षणार्थ तिणें मोठमोठे सर्प आपले देहा वरील सुवर्णाचे अलंकारांत बांधून टाकले होते.

मणिदीपगणज्योतिर्महालोकप्रकाशिते॥ ८८॥ प्रकी-
र्णबहुसिद्धार्थेमनोजपरिवारके॥ शुचित्यंशुकसंछन्न
भूशय्यास्तरणोज्वले॥ ८९॥ धूपामोदमनोरम्येस-
ज्जसर्वोपयोगिके॥ ततः क्रमेणदिवसेगतेदूरंविभा
वरी॥ ९०॥ व्यजृंभतसुखोदर्केततोमेनामहागृहे॥

अर्थः- आणि ती कालरात्री दिवस क्रमानें अस्तास गेल्यावर मेनेच्या अत्यंत सुख कारक मोठ्या पवित्र मंदिरांत येऊन सर्वत्र संचार करूं लागली; तों त्या घरांत रत्न दीपांचे समुदायांच्या कांती संबंधी मोठा प्रकाश आसमंतात चोंहीकडे पडला होता; तसेच त्या मंदिरांत बहुत सिद्ध पदार्थ सर्वत्र ठेवलेले होते; तेथें मदनाच्या व संतादिक परिवारांचें कामोद्दीपन करणारे सर्व पदार्थ सिद्ध असत तसेंच वरून मच्छर दाणी वगैरे वस्त्रांनीं आच्छादित असून खालच्या व भूमी वरील शय्येवर उत्तम सुशोभित प-

लंगपोस घातले आहेत. त्याच प्रमाणें तें घर अनेक प्रकारच्या धूपांच्या सु-गंधानें मनास अत्यंत आनंद कारक असून सर्व उपयोगि पदार्थांनीं संपन्न होतें.

प्रसुप्तप्रायपुरुषे निद्राभूतोपचारिके ॥ ९१ ॥ स्फुटा-
लोकेशशभृतिभ्रांतिरात्रिविहंगमे ॥ रजनीचरभू
तानांसंघैरावृतचत्वरे ॥ ९२ ॥ गाढकंठग्रहालग्नसु
भगेषुजनेततः ॥ किंचिदाकुलतांप्राप्तेमेनानेत्रांबु
जद्वये ॥ ९३ ॥ आविवेशासुखेरात्रिः सुचिरस्फुटसं
गमा ॥

अर्थ— ते समयीं तेथील पुरुषांस निद्रा लागली असून दासीही तश्याच निद्रेनें व्याप्त जाहल्या आहेत; तसाच त्या मंदिरांत रत्नादीक दीपांचा मोठा-स्पष्ट प्रकाश पडला असून चंद्राच्या भ्रमणामुळें चांदण्यांचे आश्रयानें रात्री संचार करणारे पक्षी तेथें बसले होते; आणि त्या घराचे अंगणांत रात्री संचार करणाऱ्या राक्षसांदिकांचे समुदाय बसले होते; तश्याच तेथील सुंदरी स्त्रियांनीं आपले पतीचे कंठास दृढ आलिंगन करून शयन केलें आहे. व त्या मंदिरांत सुंदर बालकें आपआपले माता पितरांचे गळ्यास दृढ आलिंगन करून निजलीं आहेत; तसेंच मेना नामक हिमालय पत्नीचे नेत्र निद्रेनें व्याप्त जाहले होते त्या वेळेस बहु कालानें येणारी ती कालरात्री त्या मेनेच्या मुखांत शिरली.

जन्मदायाजगन्मातुः क्रमेणजठरांतरे ॥ ९४ ॥ आवि
वेशांतरंजन्म मन्यमानाक्षपातुवै ॥ अरंजयच्चविंदे
व्यागुहारण्येविभावरी ॥ ९५ ॥

अर्थ— पश्चात् ती कालरात्री आपलें तें एक मधलें जन्म मानून जगज्जननी पार्वतीस जन्म देणाऱ्या त्या मेनेच्या उदरांत क्रमानें शिरली आणि तिणें हिमालय पर्वताचे गुहें नील अरण्यांत मेनेची कांति अतिशयें शोभविली.

ततोजगत्पतिप्राप्ताहेतुर्हिमगिरिप्रिया ॥ ब्राह्मेमुहू
र्तेसुभगेव्यसूयतगुहारणिं ॥ ९६ ॥

अर्थ— नंतर चराचर सर्व जगांत अति बलिष्ठ कार्तिक स्वामी चे जन्मास

पार्वतीचे द्वारानें कारण ती मेना नामक हिमालयाची प्रियपत्नी ब्राह्मनावाच्यास. मुहूर्तावर अग्नि समान महा तेजस्वि कार्तिक स्वामीच्या मातेस अरणि (यज्ञपात्र) सारख्या पार्वतीस प्रसवली; यास दृष्टांत " जसें यज्ञोपयोगि अश्वत्थादि वृक्षां पासून जाहलेल्या काष्ठांच्या अरणीनामक यज्ञपात्रां पासून अग्नि उत्पन्न होतो तसें."

तस्यांतुजायमानायांजंतवस्थाणुजंगमाः॥ अभवन्सुखिनःसर्वे सर्वलोकनिवासिनः॥ ९७॥

अर्थ — अशी ती पार्वती जन्मली असतां सर्व लोकांतील स्थाणु (वृक्ष, पाषाणादिक) व जंगम (मनुष्य, पशु, पक्ष्यादिक) हे सर्व प्राणिमात्र ही सुखी जाहले.

नारकाणामपितदासुखंस्वर्गसमंमहत्॥ अभवत्क्रूरसत्वानांचेतः शांतंचदेहिनां॥ ९८॥

अर्थ — त्या पार्वतीच्या जन्मकाली नरकांतील प्राणिमात्रांसही स्वर्गांतील सुखा समान महत् सुख जाहलें; व सिंह व्याघ्रादिक क्रूर प्राण्यांचें ही चित्त अति शांत जाहलें.

ज्योतिषामपितेजस्त्वमभवत्सुरतोन्नता॥ वनाश्रिताश्चौषधयः स्वादुवंतिफलानिच॥ ९९॥

अर्थ — चंद्र, सूर्य, अग्नि, गुरु शुक्र इत्यादिक तेजोमय ज्योतिर्गणांचें तेज वृद्धिंगत झालें; इंद्रादिक देवांचें चित्त दैन्य जाऊन हर्षयुक्त जाहलें; सर्व अरण्यांतील औषधी पत्र, पुष्प फलानीं सुशोभित जाहल्या; व संपूर्ण फळें मधुर रसानें युक्त झालीं.

गंधवंतिचमाल्यानिविमलंनभोभवत्॥ मारुतश्चसुखस्पर्शोदिशश्चसुमनोहराः॥ १००॥

अर्थ — तशींच सर्व पुष्पें ही सुगंध युक्त जाहलीं आकाश ही निरभ्र होऊन-गुरु शुक्रादिक ग्रहांसहित चंद्राच्या कांतीनें स्वच्छ झालें. वायू मंद व सुगंध असून शीतळ असा वाहूं लागला. त्या मुळें त्याचा स्पर्श सर्वांस सुख कारक जाहला, व सर्व दिशाही अति रमणीय दिसूं लागल्या

तेनचोद्भूतफलितपरिपाकगुणोज्वलाः॥ अभवत्पृथिवीदेवीशालिमालाकुलापिच॥ १०१॥

अर्थः— असा तो वायू वाहूं लागला तेव्हां त्याचे योगानें सर्व दिशांतील वृक्ष, औषधी व वनस्पति यांस पत्र, पुष्प, फळें परिपक्क दशेस येऊन ते वनस्पति आदिक रूळआपापले गुणानीं सर्वत्र प्रफुल्लित झाल्यामुळें त्या सर्व दिशा शोभायुक्त दिसत होत्या, व सर्व पृथ्वी साळींच्या क्षेत्रानीं सुशोभित जाहली.

तपांसि दीर्घचीर्णानि मुनीनां भावितात्मनां ॥ तस्मिन्गतानि साफल्यं काले निर्मलचेतसां ॥ १०२ ॥

अर्थः— तशींच महात्मे ऋषीनीं पवित्र अंतःकरणानें बहुकालपर्यंत केलेलीं तपश्चर्यादि साधनें पार्वतीच्या त्या जन्मकाळीं सफल जाहलीं.

विस्मृतानि च शस्त्राणि प्रादुर्भावं प्रपेदिरे ॥ प्रभावस्तीर्थमुख्यानां तदा पुण्यतमोऽभवत् ॥ १०३ ॥

अर्थः— आणि देवादिक वीरांस तारकासुराचे भयानें पूर्वी ज्या शस्त्रास्त्रांचें विस्मरण जाहलें होतें त्या सर्व शस्त्रास्त्रांचें स्मरण देवांस त्या पार्वतीचे जन्मकाळीं झालें व गंगादिक महातीर्थांचा प्रताप त्या काळीं अतिशयित पुण्यकारक जाहला.

अंतरिक्षे सुराश्चासन् विमानेषु सहस्रशः ॥ समहेंद्रहरिब्रह्मवायुवन्हिपुरोगमाः ॥ १०४ ॥

अर्थः— तसेच इंद्र, विष्णु, ब्रह्मदेव, वायु व अग्नि यांसहवर्तमान सर्व देव हजारों विमानांत बसून त्या पार्वतीच्या जन्मकाळीं हिमालय पर्वता वरील आकाशांत येऊन तो पार्वतीचे जन्मकाळचा उत्सव पहाण्यासाठीं येऊन राहिले.

पुष्पवृष्टिं प्रमुमुचुस्तस्मिंस्तु हिमभूधरे ॥ जगुर्गंधर्वमुख्याश्च ननृतुश्चाप्सरोगणाः ॥ १०५ ॥

अर्थः— आणि पार्वतीचा जन्म होतांच ते सर्व देव हिमालय पर्वतावर कल्पवृक्षादिकांच्या दिव्य पुष्पांची बहुत वृष्टि करूं लागले; तसेच श्रेष्ठ गंधर्व गायन करिते जाहले, व अप्सरांचे समुदाय त्या आनंदानें त्या हिमालयावर नृत्य करित होते.

मेरुप्रभृतयश्चापि मूर्तिमंतो महाबलाः ॥ तस्मिन्महोत्सवे प्रासे दिव्यप्रभृतपाणयः ॥ १०६ ॥ सरितः सा

गराश्चैव समाजग्मुश्च सर्वशः ॥

अर्थः— ते समयीं मेरु आदिकरून मूर्तिमंत महा बलाढ्य सर्वपर्वत, समुद्र व नद्या हे सर्व ही सर्व प्रकारच्या भेटि हातांत घेऊन त्या पार्वतीच्या जन्माचे मोठ्या उत्सवाचे प्रसंगीं आले.

हिमशैलो भवल्लोके तथा सर्वैश्चराचरैः ॥ १०६ ॥ सेव्यश्चाप्यभिगम्यश्च सश्रेयांश्चाचलोत्तमः ॥ अनुभूयोत्सवं देवा जग्मुः स्वानालयान्मुदा ॥ १०७ ॥

अर्थः— आणि तो हिमालय पर्वत त्या पार्वतीचे जन्म दिवसा पासून सर्व पर्वतांत श्रेष्ठ होऊन परम कल्याण कारक जाहला त्या मुळें सर्व चराचर प्राणी देवादिक येऊन तेथें राहिले. मग ते देव त्या पार्वतीच्या जन्माचा मोठा उत्सव अनुभवून हर्षानें आपापले स्थानास गेले.

देवगंधर्वनागेंद्रशैलशीलावनीगुणैः ॥ हिमशैलसुतादेवीस्वयंपूर्विकयाततः ॥ १०८ ॥ क्रमेण वृद्धिमानिताल्लक्ष्मीवानलसैर्बुधैः ॥

अर्थः— ते समयीं देव, गंधर्व, शेषादिक नागराज, मेरु पर्वत व पृथिवी या सर्वांनीं आपापले स्वभाव व अनेक गुण यांचे योगानें मी पूर्वी अशा आग्रहानें क्रमें करून त्या पार्वतीस वृद्धिंगत केलें "जसे ज्ञानी पुरुष त्वरेनें अनेक उद्योग करून संपत्तीनें संपादन करिता ततसें."

क्रमेण रूपसौभाग्यप्रबोधैर्भुवनत्रयं ॥ १०९ ॥ अजयद्भूषयच्चापि निःसाधारैर्नगात्मजा ॥

अर्थः— पश्चात् हिमालयाची कन्या ती पार्वती आपलें रूप, सौभाग्य व ज्ञान इत्यादिक अद्भुत अनेक गुणानीं त्रैलोक्यास क्रमानें जिंकून सुशोभित ही करिती जाहली.

एतस्मिन्नंतरे शक्रो नारदं देवसंमतं ॥ ११० ॥ देवर्षिमथ सस्मार कार्यसाधनसत्वरं ॥

अर्थः— तों इतक्यांत देवराज इंद्रानें देवांचा ऋषि जो नारद याचें स्मरण केलें; कारण तो नारद देव कार्याचे साधना विषयीं त्वरा करणारा ह्मणूनच देवांस सर्व कार्यांत संमत आहे.

स्मृतिंशक्रस्यविज्ञायजातांतुभगवांस्तदा ॥ १११ ॥ आ-
जगाममुदायुक्तो महेंद्रस्यनिवेशनं ॥

अर्थ— त्या काळीं मोठ्या ऐश्वर्यानें युक्त तो नारद मुनि इंद्रास आपले स्मरण झालें जाणून मोठ्या हर्षानें इंद्राच्या मंदिरास आला.

तंसदृष्ट्वासहस्राक्षः समुत्थाय महासनात् ॥ ११२ ॥
यथार्हेणतुपाद्येन पूजयामासवासवः ॥

अर्थ— तेव्हां त्या नारद ऋषीस पाहतांच इंद्र आपले आसनावरून उठला; आणि त्या नारदाच्या पूजेस योग्य अशा पाद्यादिक उत्तम उपचारानीं इंद्रानें नारदाची पूजा केली.

शक्रप्रणीतांतां पूजां प्रतिगृह्ययथाविधि ॥ ११३ ॥ नार
दः कुशलंदेवमपृच्छत्पाकशासनं ॥

अर्थ— त्यावेळेस इंद्रानें यथाविधि केलेली पूजा स्वीकारून नारद मुनीनें पाक दैत्यास मारणाऱ्या इंद्रास कुशल (क्षेम) विषयीं प्रश्न केला.

पृष्टेचकुशलेसक्तः प्रोवाच वचनंप्रभुः ॥ ११४ ॥ इंद्रउ
वाच ॥ कुशलस्यांकुरेतावत्संभूते भुवनत्रये ॥ तत्फ
लोद्भवसंपत्तौ त्वंप्रवातंद्रितोमुने ॥ ११५ ॥

अर्थ— असा नारदानें इंद्रास कुशल प्रश्न केला असतां, तो देवांचा प्रभु इंद्र-आपल्या हिता विषयीं आसक्त बुद्धीनें विचारतो कीं, आमच्या देवां दिकांचे हितार्चा अंकुर त्रैलोक्यांत सांप्रत कालीं उत्पन्न झाला आहे; तस्मात् त्या अंकुरा पासून फलरूप संपत्ति आह्मास प्राप्त होण्या विषयीं हे नारदा तूं आलस्य न करितां बरेंनें उद्योग कर.

वेत्सिन्चैतत्समस्तंत्वंतथापिपरिचोदकः ॥ निर्वृतिंपर
मांयातिनिवेद्यार्थंसुहृज्जने ॥ ११६ ॥

अर्थ— आतां यद्यपि तूं हें आमचें सर्व कार्य जाणत आहेस तथापि स्वकार्य निवेदन करणारे लोक आपलें कार्य स्वकीय मित्र जनांस सांगितल्यानें अतिशयें सुख पावतात.

तद्यथाशैलजादेवीयोगंयायात्पिनाकिना ॥ शीघ्रंतदु-
द्यमः सर्वैरस्मत्पक्षे विधीयतां ॥ ११७ ॥

अर्थः— तें असें कीं, हिमालयाची कन्या जी पार्वती देवी तिचा विवाह पिनाकपाणि शिवाशीं ज्या रीतीनें होईल; तश्या रीतीनें आमच्या पक्षास साहाय्य करणारानीं सर्वांनीं या कार्या विषयीं त्वरेनें उद्योग करावा.

अवगम्यार्थमखिलंतत आमंत्र्यनारदः॥ शक्रंजगाम भगवान्हिमशैल निवेशनं॥११८॥

अर्थः— असें तें इंद्राचें सर्व कार्य समजून तो महान् ऐश्वर्य वान् नारद त्या इंद्रास विचारून तेथून हिमालयाचे घरीं गेला.

तत्रद्वारेसविप्रेंद्रश्चित्रवेत्रलताकुले॥ वंदितोहिमशैलेन निर्गतेनपुरोमुनिः

अर्थः— ते समयीं त्या हिमालयानें चमत्कारिक वेतावरील वेलीनीं वेष्टित अशा आपले घराच्या द्वारांत पुढें सामोरें येऊन त्या नारदास साष्टांग नमस्कार केला.

सहप्रविश्यभवनं भूवोभूषणतांगतं॥ निवेदितेस्वयंहैमेहिमशैलेनविस्तृते॥१२०॥ महासनेमुनिवरोनिषसादातुलद्युतिः॥ यथार्हंचार्घ्यं पाद्यंचशैलस्तस्मैन्यवेदयत्॥१२१॥

अर्थः— आणि त्या हिमालयानें नारदास हातीं धरून सर्व पृथ्वीस भूषणरूप अशा आपले घरांत त्यास नेऊन हिमालयानें स्वतः नारदास सुवर्णाचें विशाल आसन दिलें. तेव्हां अपरिमित तेजस्वी मुनिश्रेष्ठ नारदऋषि त्या मोठ्या आसनावर बसला; मग त्याच्या योग्यतानुसार हिमालयानें अर्घ्य, पाद्यादिक षोडशोपचारानीं नारदाची पूजा केली.

मुनिस्तुप्रतिजग्राह तमर्घं विधिवत्तदा॥ गृहीतार्घंमुनिवरमपृच्छच्छ्लक्ष्णयागिरा॥१२२॥ कुशलंतपसः शैलः शनैःस्फुल्लाननांबुजः॥ मुनिरप्यद्रिराजानमपृच्छत्कुशलं तदा॥१२३॥

अर्थः— ते समयीं हिमालयानें केलेली यथाविधि ती पूजा नारद ऋषीनें स्वीकारिली; पश्चात् हिमालयानें पूजा ग्रहण केलेल्या मुनिश्रेष्ठ नारदास सुंदर वाणीनें तपानें क्षेम मर्यादेनें विचारिलें. नंतर प्रफुल्लित कमळासारख्या मुखानें सुशोभित ना

रद मुनीनें ही त्या पर्वत राज हिमालयास क्षेम समाचाराविषयीं प्रश्न केला.

नारद उवाच ॥ अहोवतारिताः सर्वेसन्निवेशोमहागिरे॥
पृथुत्वंमनसातुल्यंकंदराणां तथाचल॥ १२४॥

अर्थ:— नंतर नारद ह्मणतात कीं, हे महा पर्वता तुझ्या या प्रदेशावर संपूर्ण हे देवादिक येऊन राहिले आहेत; आणि हे हिमालया तुझ्या त्या गुहा जशा पाहिजेत तश्या मनासारख्या मोठ्या आहेत.

गुरुत्वंतेगुणोघानांस्थावरादतिरिच्यते॥ प्रसन्नताचतो यस्यमनसोप्यधिकाचते॥ १२५॥

अर्थ:— तसेंच सर्व पर्वतां पेक्षां तुझे ठिकाणीं बहुत गुण असून ते सर्व प्रकारें उत्कृष्ट पणानें अधिक आहेत; व तुजवरील उदक मनाच्या इच्छे पेक्षांही अधिक मधुर आहे.

नलक्षयामः शैलेंद्रशिष्यते कंदरोदरात्॥ नचलक्ष्मीतथा स्वर्गेकुत्राधिकतयास्थिता॥ १२६॥

अर्थ:— त्याच प्रमाणें हे पर्वत श्रेष्ठा तुझ्या गुहांतील संपत्ती हून अधिक शोभा कोठें आहे असें स्वर्गांत ही आमच्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

नानातपोभिर्मुनिभिः ज्वलनार्कसमप्रभैः॥ पावनैःपावितोनित्यंत्वत्कंदरसमाश्रितैः॥ १२७॥

अर्थ:— तसेंच अग्नि व सूर्य यां समान महा तेजस्वी असून अनेक प्रकारच्या तपश्चर्या करणारे पतित पावन मोठ मोठे ऋषि तुझ्या गुहांच्या आश्रयानें सर्वदां वास करितात. तेणें करून तूं अति पवित्र जाहला आहेस.

अवमत्यविमानानिस्वर्गवासविरागिणः॥ पितुर्गृहइवासन्तादेवगंधर्वकिन्नराः॥ १२८॥

अर्थ:— आणि स्वर्गलोकीं वास करणारे देव, गंधर्व व किन्नर हे स्वर्गांत रहाण्याविषयीं उदासीन होऊन आपल्या विमानांचा त्याग करून " पित्याच्या घरासारखें तुला मानून " तुजवर येऊन राहतात.

अहोधन्योसिशैलेंद्रयस्यतेकंदरंहरः॥ अध्यास्तेलोकनाथोपिसमाधानपरायणः॥ १२९॥

अर्थ:— तसाच हे पर्वत श्रेष्ठा हिमालया शंकर सर्व लोकांचा नाथ असून ही तो

समाधान युक्त चित्तानें तुझ्या गुहेंत वास करितो हें केवढें आश्चर्य आहे; तस्मात् तूं यावरून अति धन्य आहेस.

इत्युक्तवतिदेवर्षौनारदेसादरंगिरा॥ हिमशैलस्यमहिषी मेनामुनिदिदृक्षया ॥१३०॥ अनुयातादुहित्रातुस्वल्पा लिपरिचारिका॥ लज्जाप्रणयनम्रांगीप्रविवेशानिवेशनं ॥१३१॥

अर्थ— असें देवांचा ऋषि नारद सत्कार युक्त वाणीनें हिमालयाशीं बोलत असतां त्याची पट्टाभिषिक्त (राज्याभिषेकाची अधिकारिणी) मेना या नांवाची स्त्री नारदमुनीस पहाण्याच्या इच्छेनें आली. त्यावेळेस तिच्या मागून तिची कन्या आली आणि समागमें दासी व सख्याही थोड्याच होत्या; तसेंच तिणें आपलें अंग नम्र केलें होतें; अशी ती मेना हिमालयाच्या मंदिरांत शिरली.

तत्रस्थितोमुनिवरः शैलेनसहितोवशी॥ दृष्ट्वातुतेज- सोराशिंमुनिंशैलप्रियानता॥१३२॥ ववंदेगूढवदनापा- णिपद्मकृतांजलिः

अर्थ— तों तेथें ऋषिश्रेष्ठ मन आदि इंद्रियें स्वाधीन वर्तविणारा नारदमुनि हिमालयासहवर्तमान बसला होता; त्या तेजःपुंज नारदास अवलोकन करून हिमालयाची प्रिय पत्नी ती मेना त्याकाळीं आपलें मुख वस्त्रानें झांकून कमळासारखे कोमल हात जोडून त्या ऋषीस नमस्कार करिती जाहली.

तांविलोक्यमहाभागोमहर्षिरमितद्युतिः॥१३३॥आ शीर्भिरमृतोद्गाररूपाभिस्तांव्यवर्धयन्॥

अर्थ— ते समयीं अपरिमित तेजस्वी, महा भाग्यशाली तो महान् ऋषि त्या मेनेस पाहून अमृताचेच केवळ उद्गारासमान परम हितकारक आशीर्वाद तिला देता जाहला.

ततोविस्मितचित्तातुहिमवद्गिरिपुत्रिका॥१३४॥उदैक्ष न्नारदंदेवीमुनिमद्भुतरूपिणं॥

अर्थ— नंतर हिमालयाची कन्या ती पार्वती देवी अंतःकरणांत विस्मित होऊन त्या अद्भुत रूप नारदमुनीस आश्चर्यानें अवलोकन करूं लागली.

एहिवत्सेतिचाप्युक्ताऋषिणास्निग्धयागिरा॥१३५॥

कंठेगृहीत्वापितरमुत्संगे समुपाविशत्॥

अर्थः— तेव्हां नारद ऋषीनें त्या पार्वतीस हे वत्से (मुली) इकडे ये असें मधुर वाणीनें बोलाविलें असून ही ती पार्वती त्वरेनें हिमालयाकडे जाऊन त्यास गळ्यामिठी घालून त्याच्या मांडीवर बसली.

उवाच मातातांदेवीमभिवंदयपुत्रिके॥१३६॥ भगवंतं ततो धन्यंपतिमाप्स्यसि संमतं॥

अर्थः— त्या काळीं पार्वतीची माता मेना पार्वतीला बोलली कीं, हे वत्से या ऐश्वर्य संपन्न समर्थ नारदास नमस्कार कर; ह्मणजे तेणें करून तुला महा भाग्यवान् प्रिय पति प्राप्त होईल.

इत्युक्तातु ततोमात्रावस्त्रांतपिहितानना॥१३७॥ किंचित्कंपितमूर्धातुवाक्यंनोवाचकिंचन॥

अर्थः— असें मातोश्रीनें सांगितलें असतां त्या पार्वतीनें आपलें मुख वस्त्राचे पदराखालीं झांकून किंचित् मस्तक हालविलें; त्या वरून मी नमस्कार करीत नाहीं; असें आईस सूचवून कांही एक भाषण न करितां स्वस्थ बसली.

ततः पुनरुवाचेदं वाक्यंमातासुतांतदा॥ १३८॥ वत्सेवंदस्वदेवर्षिंततोदास्यामितेशुभं॥ रत्नक्रीडनकंरम्यंस्थापितंयच्चिरंमया॥१३९॥

अर्थः— नंतर त्या काळीं पार्वतीची माता मेना पुनः पार्वतीस भाषण बोलली कीं, मुली तूं या देवऋषि नारदास नमस्कार कर. ह्मणजे मीं आपल्या जवळ बहुकाल ठेवलेलें रत्नखचित रमणीय एक उत्तम खेळणें तुला देईन.

इत्युक्तातु ततोवेगादुद्धृत्यचरणौतदा॥ ववंदेमूर्ध्निसंधायकरपंकजकुड्मलं॥१४०॥

अर्थः— असें मातेनें भाषण केलें असतां त्या काळीं पार्वती वेगानें पाय उचलून नारदाजवळ गेली; आणि तिणें नारदाचे चरण आपल्या मस्तकावर घेऊन— आपले हात कमळाच्या कळी सारखे जोडून नारदास नमस्कार केला.

कृतेतुवंदनेतस्यामातासखिमुखेनतु॥ चोदयामासशनकैस्तस्याःसौभाग्यशंसिनां॥ १४१॥ शरीरलक्षणानांतु विज्ञानायतुकौतुकात्॥ स्त्रीस्वभावाद्दुहितुश्चं

तांह्रदिसमुद्वहन् ॥१४२॥ ज्ञात्वातदिंगितंशैलोमहि-
ष्याह्रदयेनतु ॥ अनुद्गीर्णोक्षतिर्मेनेरम्यमेतदुपस्थि
तम् ॥१४३॥

अर्थ.— असा पार्वतीनें नारदास नमस्कार केल्यावर तिची माता मेना स्त्री स्वभावा मुळें आपल्या सखीच्या मुखानें हळूच विचारूं लागली ती अशीकीं, माझ्या या कन्येच्या अंगावर सौभाग्य सूचक उत्तम लक्षणें कशीं जीं आहेत; त्यांचें मला ज्ञान होण्या विषयीं बहुत उत्कंठा आहे; ही कन्येची चिंता हिमालयाचे अंतकरणांत होती. आणि ही कन्येची चिंता आपल्या राज्याधिकारिणी जी मुख्य स्त्री येना तिला आहे असें हिमालयानें त्या मेनेचें मनोगत तिच्या कांहीं लक्षणावरूनच आपले बुद्धीनें जाणलें होतें; तथापि त्यानें त्या विषयीं कोणापाशीं ही भाषण न करितां त्याची मनांत ही क्षिती मानली नाहीं; परंतु ही गोष्ट नारदा जवळ निघाली आहे हें पाहून या विषयास हा प्रसंग चांगला आला आहे. असा त्यानें संतोष मानला.

चोदितःशैलमहिषीसख्यामुनिवरस्तदा ॥ स्मिताननोम
हाभागोवाक्यंप्रोवाचनारदः ॥१४४॥

अर्थ.— त्या काळीं हिमालयाच्या मेना नामक पट्टराणीच्या सखीनें पार्वतीच्या लक्षणां विषयीं असा मुनिश्रेष्ठ नारदास प्रश्न केला असतां तो महाभाग्यशाली नारद हास्य वदन करून भाषण करूं लागला.

नजातोस्याःपतिर्भद्रेलक्षणैश्चविवर्जिता ॥ उत्तानह
स्तासततंचरणेव्यभिचारिभिः ॥१४५॥ स्वच्छायया
भविष्येयंकिमन्यद्बहुभाष्यते ॥

अर्थ.— कीं, हे कल्याणरूपे या पार्वतीचा पति प्रस्तुत कोणी उत्पन्न न जाहला नाहीं आणि या कन्येचा हात निरंतर उताणा असून इचे पाय ही आपल्या छायेस लागून नाहींत; तस्मात् ही ईश्वरी संकल्पा प्रमाणेंच कोणाची पत्नी होणार असेल ती असो याहून अधिक काय बोलावें.

श्रुत्वैतत्संभ्रमाविष्टोध्वस्तधैर्योमहाबलः ॥१४६॥ ना
रदंप्रत्युवाचाथसाश्रुकंठोमहागिरिः ॥

अर्थ.— असें हें नारदानें भाषण ऐकून तो महा बलाढ्य हिमालय खिन्न,

तेच्या वेगानें व्याप्त जाहल्यामुळें त्यानें अगदीं धैर्य गेलें. आणि त्या पर्वतश्रेष्ठाचा कंठ दुःखानें दाटून आला व नेत्र अश्रूनीं भरून आले असून तसाच तो हिमालय नारदास-बोलतो.

हिमवानुवाच ॥ संसारस्यातिदोषस्य दुर्विज्ञेया गतिर्यतः ॥ १४७ ॥ सृष्ट्यांचावश्यभाविन्यां केनाप्यतिशयात्मना ॥ कर्त्रा प्रणीता मर्यादा स्थिता संसारिणामियं १४८

अर्थ— कीं, हे नारदमुने अत्यंत दोषयुक्त या संसाराची गति जाणण्यास अशक्य आहे कारण नियमें करून होणाऱ्या या चराचर सृष्टींत या जगाचा कोणी एक सर्व शक्तिमान् नियंता जो ईश्वर त्या स्वतंत्र मुख्य कर्त्यानें या संसारी प्राण्यांची मर्यादा स्थापन केली आहे. ह्मणून सर्वांस या मर्यादेचें उल्लंघन करणें अशक्य आहे.

योजायते हि यद्बीजो जनितुः सत्वसार्थकः ॥ जनिताचापि जातस्य न कश्चिदिति यत्स्फुटं ॥ १४९ ॥

अर्थ— आणि जो ज्याच्या वीर्यापासून होतो तो त्या पित्यानें सार्थक करीत नाही; तसाच कोणताही पिता आपणापासून उत्पन्न झालेल्या प्रजांचें कल्याण करीत नाहीं, हें अनुभवानें स्पष्ट दिसत आहे.

स्वकर्मणैव जायंते विविधा भूतजातयः ॥ अंडजोद्वंडजाज्जातः पुनर्जायेत मानवः ॥ १५० ॥

अर्थ— तस्मात् सर्व प्राणिमात्र जाति आपापले कर्मानेंच वारंवार अनेक प्रकारच्या योनींत उत्पन्न होतात त्या अश्याकीं, अंडापासून उत्पन्न होणारे पक्षि आदिकरून प्राणि त्या अंडज पक्ष्यादिक स्वजातीय प्राण्यांपासून होऊन पुनः ते जीव मनुष्य योनींत उत्पन्न होतात.

मानुषाच्च सरीसृप्यां मनुष्यत्वेन जायते ॥ तत्रापि जातो श्रेष्ठायां धर्मस्योत्कर्षणेन तु ॥ १५१ ॥

अर्थ— तसाच मनुष्यापासून नागिणीचे उदरीं मनुष्य रूपानें उत्पन्न होतो त्यांत तो जर उत्तम धार्मिक असेल तर तो " अर्जुनापासून उलूपी नागकन्येस झालेल्या बभ्रुवाहनासारखा " श्रेष्ठ जातींत उत्पन्न होतो.

अपुत्रजन्मिनः शेषाः प्राणिनः समवस्थिताः ॥ मनु

जास्तत्रजायंतेयतोनगृहधर्मिणः॥१५२॥

अर्थ— याहून इतर जे सामान्य पुण्यवंत प्राणी मनुष्यजातींत उत्पन्न जाहले असून पोटीं पुत्रसंतान झाल्यावांचून राहिले त्यानीं पूर्वजन्मीं गृहस्थाश्रमसंबंधी धर्म केले नव्हते असें जाणावें.

क्रमेणाश्रमसंप्राप्तिर्ब्रह्मचारिव्रतादनु॥ तस्यकर्तुर्नियोगेनसंसारोयेनवर्धितः॥१५३॥

अर्थ— आणि जगत्कर्ता जो ईश्वर त्याच्या आज्ञेनें क्रमें करून ब्रह्मचर्यादिक आश्रमांचे ग्रहणानें हा संसार वृद्धिंगत जाहला आहे.

संसारस्यकुतोवृद्धिः सर्वेस्युर्यदिनिग्रहाः॥ अतः कर्त्रातुशास्त्रेषुसुतलाभः प्रशंसितः॥१५४॥

अर्थ— बरें हा ग्रहस्थाश्रम न करण्याविषयीं जर सर्व लोक अति निग्रह करतील; तर संसाराची वृद्धी कशी होईल; याच कारणावरून परमेश्वरानें सर्व शास्त्रांत पुत्र लाभाची प्रशंसा वर्णिली.

प्राणिनांमोहनार्थायनरकत्राणसंश्रयात्॥ स्त्रियाविरहितासृष्टिर्जंतूनांनोपपद्यते॥१५५॥

अर्थ— त्याच प्रमाणें सृष्टीच्या वृद्धी साठींच पुत्राचे योगानें नरकापासून संरक्षण होतें असें पुत्र उत्पन्न करण्याविषयीं सर्वांचा विश्वास बसण्याकरितां सांगितलें; आणि मनुष्यादिकांची सृष्टी तरीं स्त्रियांवांचून होणार नाहीं ह्मणून स्त्रीजाती उत्पन्न करून ग्रहस्थाश्रमाची ही धन्यता शास्त्रांत सांगितली.

स्त्रीजातिस्तुप्रकृत्यैवकृपणादैन्यभाषिणी॥ शास्त्रालोचनसामर्थ्यमुज्झितंतास्तुवेधसा॥१५६॥

अर्थ— तशीच स्त्रियांची जाति तर मुळींच स्वभावतः सर्वांस कृपापात्र असून दैन्ययुक्त भाषण करणारी असल्ये आणि ब्रह्मदेवानें स्त्रीजातींत शास्त्र विचार करण्याचें सामर्थ्य ठेवलें नाहीं.

शास्त्रेषूक्तमसंदिग्धंबहुवारंमहाफलं॥ दशपुत्रसमाकन्यायानस्याच्छीलवर्जिता॥१५७॥

अर्थ— तसेंच अनेक शास्त्रांत निश्चयानें बहुवार महा फलदायक अशी ए

क गोष्ट सांगितली आहे कीं, जी उत्तम शील संपन्न कन्या आहे ती योग्यतेनें दहा पुत्रां समान आहे.

वाक्यमेतत्फलकृष्टं पुंसिग्लानिकरंपरं॥ कन्याहि कृपणाशोच्या पितुर्दुःखविवर्धिनी॥१५८॥ यापिस्यात् पूर्णसर्वाढ्या पतिपुत्रधनादिभिः॥ किंपुनर्दुर्भगाहीनापतिपुत्रधनादिभिः॥१५९॥

अर्थ— असें जें वाक्य आहे तें वाक्य व्यर्थ(निष्फळ)असून पुरुषास अतिखिन्नता देणारें आहे; कारण कन्याही यावज्जन्म पराधीन असून अनेक शोकांचें केवल स्थानच आहे; यामुळें ती स्वजन्मा पासून पित्यास दुःखांची वृद्धी करणारी आहे. ही गोष्ट जातिमात्र कन्यांस लागू आहे; ती अशी कीं, जी कन्या-पति, पुत्र व धनादिक सर्व अनुकूल पूर्ण ऐश्वर्यानें संपन्न आहे ती ही पित्यास अशा दुःखास कारण होत्ये; तेव्हां मग जी कन्या पति, पुत्र व धनादिक-ऐश्वर्यानें हीन आहे ती दुःखास कारण होत्ये यांत काय आश्चर्य सांगावें.

त्वंचोक्तवान्सुतायामेशरीरेदोषसंग्रहं॥ अहोमुह्यामिशुष्यामिग्लामिसीदामिनारद॥१६०॥

अर्थ— अहो नारद मुने तुह्मी माझ्या कन्येच्या शरीरांत बहुत दोष आहेत, असें सांगितलें तेणे करून मी अतिशयें मोह पावलों; शुष्क जाहलों यामुळें माझे चित्तास अत्यंत खेद जाहला आहे व या योगानें मला अति दुःख जाहलें आहे.

अयुक्तमथवक्तव्यमप्राप्यमपिसांप्रतं॥ अनुग्रहेणमेछिंधिदुःखंकन्याश्रयंमुने॥१६१॥

अर्थ— तस्मात् हे नारदमुने सांप्रत कालीं आह्मांस अयोग्य असल्यामुळें एकादें स्थल प्राप्त होण्यास अशक्य असलें तरीं तें सांगून आमचें कन्यासंबंधी दुःख दूर करावें.

परिच्छिन्नेप्यसंदिग्धेमनःपरिभवाश्रयं॥ तृष्णामुष्णातिनिष्णातफललोभाश्रयाशुभा॥१६२॥

अर्थ— कारण आपल्या एकाद्या निश्चित कार्याचा नाश जाहला तरीं फलाचा लोभ धरण्या विषयीं परम निष्णात ह्मणूनच निंद्य जी तृष्णा (अतिलो

भ युक्त इच्छा) ती मनाचा पराभव झाला तरी त्यास ओटिले.

स्त्रीणांहिपरमंजन्मकुलानामुभयात्मनां॥ इहामुत्रसुखायोक्तं सत्पतिप्राप्तिसंज्ञितं॥१६३॥

अर्थ:— आणि स्त्रियांचें जन्मतर उत्कृष्ट असून त्या कन्येस उत्तम पति प्राप्तजाहला असतां मातापितर व पति या दोनी कुळांस इहलोकीं व परलोकीं सुखवास कारण होतें असें शास्त्रांत सांगितलें आहे.

दुर्लभः सत्पतिः स्त्रीणांविगुणोपिपतिः किल॥नप्राप्यतेविनापुण्यैः पतिर्नार्याः कदाचन॥१६४॥

अर्थ:— तसेंच दुसरें असें आहे कीं, स्त्रीला गुणहीन पतीही पुंण्या वांचून कदापि प्राप्त होत नाहीं, तेव्हां गुणवान् उत्तम पति दुर्लभ आहे हें काय सांगावें.

यतोनिःसाधनोधर्मः परिमाणोज्झितारतिः॥धनंजीवितपर्यापंपतेर्नार्याःप्रतिष्ठितं॥१६५॥

अर्थ:— कारणसाधना वांचून प्राप्त होण्यास अशक्य धर्म, अपरिमित क्रीडादिक सुख व या जन्म पर्यंत आपल्या जीविकेचें धन या सर्वही गोष्टी स्त्रियांस पतीपासूनच प्राप्त होतात.

निर्धनोदुर्भगोमूर्खः सर्वलक्षणवर्जितः॥दैवतंपरमंनार्याः पतिरुक्तः सदैवहि॥१६६॥

अर्थ:— कारण दरिद्री, भाग्यहीन व मूर्ख किंवा सर्व उत्तम लक्षणानीं हीन असा जरी पति असला तथापि तोस्त्रियांस सर्वदा श्रेष्ठ दैवतरूप आहे असें जाणावें ह्मणून स्त्रीला पतिसेवेनें सर्व धर्मादिक पुरुषार्थांचें सुख प्राप्त होतें.

त्वयाचोक्तंहिदेवर्षेनजातोस्याः पतिः किल॥ एतद्दौर्भाग्यमतुलमसंख्यंगुरुदुःसहं॥१६७॥

अर्थ:— असें असून हे देवमुने नारदा तुम्हीं सांगितलें कीं, या पार्वतीचा पती अद्यापि उत्पन्नच जाहला नाहीं, तेव्हां हें मोठेंच अत्यंत अपरिमित ह्मणूनच सहन होण्यास अशक्य असें अद्भुत अभाग्य मजला आलें आहे.

चराचरेभूतसर्गेयदद्यापिचनोमुने॥नसजातइतिब्रूषे तेनमेव्याकुलंमनः॥१६८॥

अर्थ:— आणि या चराचर संपूर्ण देवां दिकांच्या सृष्टींत अद्यापि या पार्वतीचा

पति उत्पन्न जाहला नाहीं असें बोलतोस या मुळें माझें मन अत्यंत व्याकुळ झालें आहे.

मनुष्यदेवजातीनांशुभाशुभनिवेदकं॥ लक्षणंहस्तपा
दादौविहितैर्लक्षणैः किल॥१६९॥ सेयमुत्तानहस्तेति
त्वयोक्तामुनिपुंगव॥

अर्थ:— तसेंच मनुष्य व देव इत्यादिक सर्व जातींत शुभ अथवा अशुभ यांचें सूचक चिन्ह असतें त्यांनच हात व पाय इत्यादिकांचे चिन्हानींही पार्वती युक्त आहे. त्या प्रमाणें हे मुनिश्रेष्ठा ही पार्वती उताण्या हातानें युक्त आहे असें तुह्मीं सांगितलें आहे.

उत्तानहस्तताप्रोक्ता यावतामेवनित्यदा॥१७०॥ शुभो
दयानांधन्यानांनकदाचित्प्रयच्छतां॥

अर्थ:— उदयास आलेल्या महाभाग्यानें युक्त व धन्य असून कधीही इतरांस न देणारे असेजे पुरुष असतात त्यांचाच हात निरंतर उताणा असतो.

स्वच्छाययास्याश्चरणौत्वयोक्तौव्यभिचारिणौ॥१७१
तत्रापिश्रेयसांह्याशामुनेनुप्रतिभातिनः॥

अर्थ:— आणि हे नारदा या पार्वतीचे पाय आपल्या छायेस सोडून आहेत; असें त्वां सांगितलें तथापि आह्मास कल्याणा विषयींची आशा वाटतच आहे.

शरीरलक्षणाश्चान्येपृथक्फलनिवेदिनः॥१७२॥
सौभाग्यधनपुत्रायुःपतिलाभानुशंसनं॥ तैश्चसर्वै
र्विहीनेयंत्वमात्थमुनिपुंगव॥१७३॥

अर्थ:— तशींच दुसरीं ही निरनिराळीं फळें सूचविणारीं देहाचीं लक्षणें जीं शास्त्रांत सांगितलीं आहेत; ह्यां वरून सौभाग्य, धन, पुत्र, आयुष्य, पति व अनेक प्रकारचे लाभ यांचीं सूचना होत्ये; हे मुनि श्रेष्ठा तुह्मीं त्यांत सर्व लक्षणानींही पार्वती हीन आहे; असें सांगितलें.

त्वंमेसर्वंविजानासिसत्यवागसिचाप्यतः॥ पृच्छामि
मुनिशार्दूलत्वदयंदार्यतीवमे॥१७४॥

अर्थ:— तसेंच हे ऋषि सिंहा तूं माझें सर्व मनोगत दुःख जाणतोस; आणि तूं सत्यभाषण करणारा आहेस; ह्मणून मी आपलें दुःख परिहारार्थ तुला विनंती करितों कीं, मी मनांत या दुःखानें अत्यंत खिन्न जाहलों; या मुळें मा

ह्में मन अगदीं फाटल्यासारखें झालें आहे.

इत्युक्त्वा विरतः शैलो महादुःखविचारणात् ॥ श्रुत्वेतद
खिलं तस्मात्स्वैलराजमुखांबुजात् ॥ १७५ ॥ स्मितपूर्व-
मुवाचेदं नारदो देवचोदितः ॥

अर्थ — असें भाषण करून हिमालय त्या दुःखाच्या विचारा पासून निवृत्त हो ऊन स्वस्थ बसला. हें सर्व भाषण त्या पर्वतराज हिमालयाने मुखा पासून ऐकून देवांच्या आज्ञे वरून आलेला तो नारद किंचित् हास्य करून हें पुढील भाषण-बोलतो.

नारदउवाच ॥ हर्षस्थानेपि महति त्वया दुःखं निरूप्य-
ते ॥ १७६ ॥ अपरिच्छिन्नवाक्यार्थमोहं यासि महागिरे ॥

अर्थ — कीं, हे महापर्वता हिमालया या मोठ्या हर्षाचे स्थानरूप भाषणांत ही दुःख आहे, असें तूं प्रतिपादन करितोस या वरून मला वाटतें कीं, भाषणांतील गहन अर्थाच्या विचारा विषयीं तूं मोह पावतोस.

इमां शृणु गिरं मत्तो रहस्यपरिनिष्ठितां ॥ १७७ ॥ समाहि
तो महाशैल मयोक्तस्य विचारणे ॥

अर्थ — तर आतां हे महापर्वता तूं मजपासून तात्पर्ययुक्त असें भाषण श्रवण कर, आणि माझ्या भाषणांतील अर्थाचे विचारा विषयीं स्वस्थ चित्त हो.

नजातोस्याः पतिर्देव्या यन्मयोक्तं महाबल ॥ १७८ ॥ न
स जातो महादेवो भूतभव्यभवोद्भवः ॥ शरण्यः शाश्वतः
शास्ता शंकरः परमेश्वरः ॥ १७९ ॥

अर्थ — हे महाबला हिमालया या पार्वती देवीचा पति उत्पन्न जाहला नाहीं, असें जें मी बोललों त्याचें तात्पर्य असें कीं, या पार्वतीचा पति होणारा जो आहे तो महादेव शिव निरंतर आहेत ह्मणून तो अद्यापि उत्पन्न झाला नाहीं हें माझ्या भाषणाचें तात्पर्य आहे. तो महादेव असा आहे कीं, भूतकालीं होतेते वर्तमान कालीं विद्यमान असणारे व भविष्य काळीं उत्पन्न होणारे या सर्वांस तो शिव उत्पन्न करणारा आहे; सर्वांस शरण जाण्या विषयीं तो योग्य आहे त्याचा कालत्रयीं नाश होत नाहीं तो सर्वांस शासन करणारा असून तो सर्वांचें कल्याण करणारा उत्कृष्ट ईश्वर आहे.

ब्रह्मविष्ण्विंद्रमुनयो जन्ममृत्युजरार्दिताः ॥ तस्यैनेपर
मेशस्य सर्वे क्रीडनकागिरे ॥ १८० ॥

अर्थ- आणि ब्रह्मदेव, विष्णु, इंद्र व ऋषि हे जन्म, मृत्यु व जरा यानीं पीडित आहेत; तस्मात् हे हिमालया हे सर्व देवादिक चराचर प्राणी त्या परमेश्वर शिवाचे क्रीडा करण्याचे साधन पदार्थां सारखे आहेत.

आस्ते ब्रह्मा तदिच्छातः संभूतो भुवनप्रभुः ॥ विष्णुर्यु
गेयुगे जातो नानाजातिर्महातनुः ॥ १८१ ॥

अर्थ- ब्रह्मदेव तरी शिवाच्या इच्छेनेंच सर्व चवदा भुवनांचा प्रभु जाहला आहे तसाच विष्णु ही प्रतियुगीं त्याच्याच आज्ञेवरून नाना जातींत मोठ्या देहानें उत्पन्न जाहला आहे.

मन्यसे मायया जातं विष्णुं चापि युगे युगे ॥ आत्मनो न-
विनाशोऽस्ति स्थावरांतेपि भूधर ॥ १८२ ॥

अर्थ- तसेंच विष्णु आपल्या मायेनें प्रायशः अवतार घेत असतो असें तूं हि जाणतोस त्याचप्रमाणें चराचर प्राण्यांचा नाश झाला तरीं त्यांतील आत्म्याचा नाश होत नाहीं.

संसारे जायमानस्य म्रियमाणस्य देहिनः ॥ नश्यते देह
एवात्र नात्मनो नाश उच्यते ॥ १८३ ॥

अर्थ- संसारांत जन्मास येणारे व मृत्यु पावणारे जे प्राणी त्यांच्या देहाचा मात्र नाश होतो; परंतु त्यांतील आत्म्याचा नाश होत नाहीं.

ब्रह्मादिस्थावरांतोयं संसारो यः प्रकीर्तितः ॥ स जन्ममृ
त्युदुःखार्तो ह्यवशः परिवर्तते ॥ १८४ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ब्रह्मदेवा पासून आरंभ करून वृक्ष, पाषाणां पर्यंत जें सर्व चराचर जग आहे; तें जग जन्ममरण संबंधीं अनेक दुःखानीं पीडित होत्सातें ईश्वरेच्छेच्या स्वाधीन होऊन वारंवार रहाट गाड्ग्या सारखें चालतें.

महादेवोऽचलः स्थाणुर्न जातो जनको जरः ॥ भविष्यति
पतिः सोऽस्या जगन्नाथो निरामयः ॥ १८५ ॥

अर्थ- असो आतां या पार्वतीस कैलासाधिपति शिव पति प्राप्त होईल; तो महान् देव असून कशानेंही चंचलन होणारा ह्मणूनच अति स्थिर आहे;-

तो उत्पन्न जाहला नाहीं; ह्मणूनच त्यास कोणी पिता नाहीं; त्यास जरा नाहीं; तो च सर्व जगाचा नाथ आहे; त्यावरून त्यास रोगादिक दोष नाहींत हें सिद्ध जाहलें.

यदुक्तंचमयादेवीलक्षणैर्वर्जितातव ॥ शृणुतस्यापिवाक्यस्यसम्यक्कुलेनविचारणं ॥ १८६ ॥

अर्थः– हे हिमालया तुझी कन्या ही पार्वती देवी लक्षणानीं हीन आहे; असें जें मी आरंभीं बोललों त्या वाक्याचाही तूं उत्तम प्रकारानें अभिप्राय श्रवण कर.

लक्षणंदैविकोत्यंकः शरीरावयवाश्रयः ॥ सर्वायुर्धनसौभाग्य परिमाणप्रकाशकः ॥ १८७ ॥

अर्थः– सर्वांचे शरीरावरील देवानीं निर्माण केलेल्या चिन्हास लक्षण ह्मणतात; त्या लक्षणावरून सर्वांचें आयुष्य, धन, सौभाग्य इत्यादिक सर्व विषयांच्या परिमितीचें ज्ञान होतें.

अनंतस्याप्रमेयस्यसौभाग्यस्यास्यभूधर ॥ नैवांको लक्षणाकारःशरीरेसंविधीयते ॥ १८८ ॥

अर्थः– हे हिमालया परिमित ऐश्वर्यादिकांचीं चिन्हें शरीरावर असतात; परंतु अपार ह्मणूनच अपरिमित अशा लोकोत्तर उत्तम भाग्याचें अमुक-आकार युक्त चिन्ह शरीरावर असत नाहीं.

अतोस्यालक्षणंगात्रेशैलनास्तिमहामते ॥ यत्राहमुक्तवानस्याह्युत्तानकरतांसदा ॥ १८९ ॥ उत्तानोवरदःपाणिरेषदेव्याःसदैवतु ॥ सुरासुरमुनिव्रातवरदेयंभविष्यति ॥ १९० ॥

अर्थः– ह्मणून या पार्वतीच्या अंगावर कोणतेंही लक्षण नाहीं; तसेंच हे महाबुद्धिमंता हिमालया मी पूर्वी तुला सांगितलें होतें कीं, या पार्वतीचा हात निरंतर उताणा आहे; तर याचें तात्पर्य असें आहे कीं, जो हात वर देण्याचा आहे; तो सर्वदां उताणाच असतो या वरून इचा हात सर्वकाळ असा उताणा आहे तस्मात् ही देवी, सर्व देव, दैत्य व ऋषींचे समुदाय यां सर्वांस वर देणारी होईल.

यथाप्रोक्तं तदापादौ स्वच्छायाव्यभिचारिणौ॥ अस्याः
शृणु ममात्रापि वाग्युक्तिं शैलसत्तम॥१९१॥

अर्थ- हे पर्वत श्रेष्ठा हिमालया, त्याच प्रमाणें लक्षणांचे प्रश्न समयीं मी बोललों होतों कीं, या कन्येचे पाय आपल्या छायेस सोडून आहेत. या वाक्यांतील अर्था च्या योजने विषयीं माझी युक्ति श्रवण कर.

चरणौ पद्मसंकाशावस्याः स्वच्छनखोज्वलौ॥ सुरा
सुराणां नमतां किरीटमणि कांतिभिः॥१९२॥ विचि
त्रवर्णैर्भासंतौ स्वच्छायाप्रति बिंबितौ॥ भार्याजग
द्गुरोर्ह्येषावृषांकस्य महीधर॥१९३॥

अर्थ- तसेच हे पार्वतीचे चरण कमला समान कोमल असून स्वच्छन खानीं शोभायमान आहेत; आणि सर्व देव व दैत्य गुप्त रूपानें येऊन हिला नमस्कार करतात; तेव्हां त्यांचे मुकुटांच्या अनेक रत्नांच्या कांतीचे ज्या ज्या विचित्र रंगानीं इचे पाय जेव्हां शोभतात तेव्हां हे चरण त्या त्या रंगानीं आपल्या छायेंनदुरून प्रति बिंबि त होतात; अशी ही तुझी कन्या देवां दिकांस वंद्य आहे. तस्मात् हे हिमालया ही पार्वती सर्व जगाचा गुरु असून ज्याच्या रथाचे ध्वजस्तंभीं नंदी असतो त्या कैलासवासी शिवाचीही निश्चयें करून भार्या होईल.

जननी लोकधर्मस्य संभूता भूतभावनी॥ शिवेयं पाव
नायैव त्वत्क्षेत्रे पावकद्युतिः॥१९४॥

अर्थ- हे हिमालया तुझ्या मेनानामक भार्येच्या उदरीं ही कन्या पार्वती तुला पवित्र करण्यासाठीं जन्मली ही सर्व लोकांच्या धर्माची जननी आहे; ह्म- णूनच ही सर्व प्राणि मात्रांचें संरक्षण करिल; व सर्वांचें कल्याण करणारी असून इची कांति अग्नीसारखी आहे.

तद्यथाशीघ्रमेवैषा योगं यायात् पिनाकिना॥ तथा विधे
यं विधिवत्त्वया शैलेंद्रसत्तम॥१९५॥

अर्थ- तस्मात् हे श्रेष्ठ पर्वतराजा हिमालया ही पार्वती जशी त्वरेनें पिनाक पाणि शिवाशीं समागम पावेल तसें तूं एथा शास्त्र विधीनें आचरण कर.

अत्यंतं हि महत्कार्यं देवानां हिमभूधर॥ ॥सूतउवा

च ॥ ॥एवंश्रुत्वातुशैलेंद्रोनारदात्सर्वमेवहि॥१९६॥-
आत्मानंसपुनर्जातंमेनेमेनापतिस्तदा॥

अर्थ:— कारण हे हिमालया पार्वतीचा शिवाशीं शीघ्र संयोग जाहला असतां त्या न देवांचें एक अतिशयें महत् कार्य होणारें आहे; सूतबोलतो ऋषींहो असें नारदाच्या मुखानें तें देवकार्य संबंधि सर्ववर्तमान श्रवण करून त्या कालीं पर्वत श्रेष्ठ मेनापति हिमालयानें आपला पुनर्जन्म जाहला असें मानिलें कारण आपण या कन्येच्या संकटांतून आज मुक्त जाहलों.

नमस्कृत्यवृषांकायतदादेवायधीमते॥१९७॥उवाच-
सोपिसंहृष्टोनारदंतुहिमाचलः॥

अर्थ:— आणि त्या कालीं हिमालयानें ध्वजस्तंभीं वृषभ चिन्हानें युक्त अशा बुद्धिमान् महादेवास नमस्कार करून तो अतिहर्षानें नारदास बोलूं लागला.

हिमवानुवाच॥दुस्तरान्नरकान्घोरादुद्धृतोस्मित्वयामु
ने॥१९८॥पातालादहमुत्थृत्यसप्तलोकाधिपःकृतः॥

अर्थ:— कीं, अहो नारदमुने महा प्रयासानींही पार पडण्यास अशक्य अशा घोर नरकांतून तुम्हीं आज माझा उद्धार केला. "जसें एकाद्याला पातालांतून काढून त्यास सात लोकांचें आधिपत्य (राज्य) द्यावें तसें."

हिमाचलोस्मिविख्यातस्त्वयामुनिवराधुना॥१९९॥
हिमाचलेचलगुणांप्रापितोस्मिसमुन्नतिं॥

अर्थ:— तसाच हे मुनिश्रेष्ठानारदा या कालीं मी तुझ्या योगानें सर्वत्र प्रसिद्धीस आलों; आणि अति शीतानें व्याप्त अशा या माझ्या पर्वतावर सर्व पर्वतां पेक्षां पर्वत संबंधीं गुणांची अधिक संपत्ति तुमच्या अनुग्रहानें प्राप्त झाली आहे.

आनंददिवसाहारिहृदयंमेधुनामुने॥२००॥नाध्य
वस्यतिकृत्यानांप्रविभागविचारणं॥यद्विवाचामधी
शःस्यांत्वद्गुणानांविचारणे॥२०१॥

अर्थ:— आणि हे नारदमुने तुमच्या योगानें या कालीं आनंद युक्त चित्तानें मला हे दिवस चालले आहेत; अशा तुमचे उत्तम लोकोपकारी बहुत कृत्य कृत्यांतील अनेक प्रकारच्या भागांचे विचारा विषयीं निश्चय करण्या-

तें माझें सामर्थ्य नाहीं; कारण सामान्य बुद्धिमंतास ही गोष्ट असाध्य आहे; तेव्हां मी जर वाचस्पति बृहस्पति असतों; तर मी तुझे गुणांचा विचार करण्यास समर्थ जाहलों असतों.

भवद्विधानांनियतममोघंदर्शनंमुने॥ नवास्मान्प्रतिचापल्यंव्यक्तंममममहामुने॥ २०२॥

अर्थ.— हे नारदा तुह्मां सारख्या सत्पुरुषांचें दर्शन सदां सफलच होतें, आणि हे महामुने आह्मीं पर्वत स्वभावतः अचल (स्थिर) आहों; याम्तुळें आह्मास चंचलपणा विदित नाहीं; परंतु आह्मा विषयीं भाषणा दिकांत तुमचें जें चंचलत्व तें आज माझ्या स्पष्ट अनुभवास आलें.

भवद्भिरेवकृत्योहंनिवासायात्मरूपिणां॥ मुनीनांदेवतानांचस्वयंकर्तापिकल्मषं॥२०३॥

अर्थ.— तसाच हे मुने मी स्वतः पापिष्ठ असून ही आत्मनिष्ठ जे ऋषि व देव यांचा माझ्या या पर्वतावर वास होण्या साठीं तुह्मींच मला योग्य केलें.

तथापिवस्तुन्येकस्मिन्नाज्ञामेसंप्रदीयतां॥ इत्युक्तवतिशैलेंद्रेसतदाहर्षनिर्भरे॥ २०४॥ तथाचनारदोवाक्यंकृतंसर्वमितिप्रभो॥

अर्थ.— असे सर्व मोठ मोठे देव व ऋषि हे या पर्वतावर जरी रहातात; तथापि आपण मला कोणते तरीं एका वस्तू विषयीं मला पार्वतीस देण्याची आज्ञा द्यावी. असें तो पर्वतश्रेष्ठ हिमालय अत्यंत हर्षानें त्या कालीं भाषण करीत असतां त्यास नारद ऋषि बोलले कीं, हे पर्वतराज हिमालया तुझें हें सर्व कार्य सिद्धच आहे असें समज.

सुरकार्येयएवार्थस्तवापिसुमहत्तरः॥ २०५॥ इत्युक्त्वानारदः शीघ्रंजगामत्रिदिवंप्रति॥

अर्थ.— तें असें कीं, सांप्रत कालींच देव कार्याचा जो प्रसंग उपस्थित जाहला आहे त्यांत तुझाही अतिशयें मोठा कार्यभाग अवश्य सिद्ध होणार आहे; असें बोलून नारदमुनि त्वरेनें स्वर्ग लोकास गेले.

सगत्वाशक्रभवनममरंसंददर्शह॥ २०६॥ ततोभिरूपेसमुनिरुपविष्टोमहासने॥ पृष्टः शक्रेण प्रोवा-

चहिमजासंश्रयांकथां ॥२०७॥

अर्थ— ते इंद्राचें मंदिरास जाऊन तेथें त्या इंद्र देवास पहाते जाहले; नंतर इं- द्रानें त्या नारदास योग्य आसन दिल्यावर ते नारदमुनि त्या मोठ्या आसनाव र बसले; ते समयीं इंद्रानें नारदास प्रश्न केला असतां नारदानें हिमालयक न्या जी पार्वती तिचा शिवाशीं संयोग होण्या विषयींचें पूर्व संकेतित वर्तमा न इंद्रास सांगितलें.

नारदउवाच ॥ समूह्यद्यत्तुकर्तव्यंतन्मयाकृतमेवहि ॥
किंतुपंचशरस्यैवसमयोयमुपस्थितः ॥ २०८ ॥

अर्थ— नंतर नारद बोलले कीं, हे इंद्रा सर्वांनीं मिळून उत्तम तर्कानें जें का र्य करावयाचें तें सर्व म्यां सिद्ध केलेंच आहे तर त्या कार्या साठीं आतां मोह नादिक पंच बाणयुक्त मदनानें साहाय्य करण्याचा हा समय आला आहे.

इत्युक्तोदेवराजस्तुमुनिनाकार्यदर्शिना ॥ चूतांकुरा-
स्त्रंसस्मारभगवान्पाकशासनः ॥ २०९ ॥

अर्थ— असें कार्याचें स्वरूप जाणणाऱ्या त्या नारद मुनीनें भाषण केलें अस तां पाक नामक दैत्याचा नाश करणाऱ्या ऐश्वर्ययुक्त देवराज इंद्रानें त्याकालीं आ म्रवृक्षाचे कोमल अंकुर रूप अस्त्र धारण करणाऱ्या मदनाचें स्मरण केलें.

संस्मृतस्तु तदाक्षिप्रंसहस्राक्षेणधीमता ॥ उपतस्थेरति
युतःसविलासोझषध्वजः ॥२१०॥

अर्थ— या प्रमाणें सहस्र नयन बुद्धिमान् इंद्रानें मदनाचें स्मरण केलें असतां तो मत्स्य ध्वज विलासी मदन आपल्या रति नामक स्त्री सहवर्तमान येऊन इंद्रा चे अग्रभागीं उभा राहिला.

प्रादुर्भूतंतुतंदृष्ट्वाशक्रः प्रोवाचसादरं ॥ ॥ शक्रउवाच ॥
उपदेशेनबहुना किंत्वां प्रतिवदे प्रियं ॥ २११ ॥

अर्थ— ते समयीं प्रगट जाहलेल्या त्या मदनास पाहून इंद्र आदरानें त्यास- बोलला कीं, हे मदना मी आपलें प्रिय तुला बहुत उपदेशानें काय सांगूं.

मनोभवासितेनत्वंवेत्सिभूतमनोगतं ॥ तद्ध्यर्थकमेव
त्वंकुरुनाकसदांप्रियं ॥२१२॥

अर्थ— कारण हे मदना तूं सर्वांच्या मनांत वास करणारा आहेस; यामुळें तूं

सर्व प्राणि मात्रांचें मनो गत जाणतोस तस्मात् तूं स्वर्ग वासी देवांचें यथार्थ प्रिय च संपादन कर.

शंकरं योजयक्षिप्रं गिरिपुत्र्या मनोभव ॥ संयुतो मधुना चैव ऋतुराजेन दुर्जय ॥२१३॥

अर्थ- तें असें कीं, हे मदना तूं शंकराचा योग पार्वतीशीं होईल असें त्वरेनें हें कार्य कर; आणि तूं जरीं इतरांस जिंकला जाणार नाहींस तथापि आपले साहाय्यार्थ ऋतु श्रेष्ठ वसंतास समागमें घेऊन जा.

इत्युक्तो मदनस्तेन शक्रेण स्वार्थ सिद्धये ॥ ॥ काम उवाच ॥ ॥ अनया देवसामग्र्या मुनिदानव भी मया ॥ २१४ दुःसाध्यः शंकरो देवः किन्नवेत्सि जगत्प्रभो ॥

अर्थ- असें इंद्रानें आपलें कार्य सिध्यर्थ भाषण केलें असतां मदन बोलला कीं, हे त्रैलोक्य राज इंद्रा ऋषि व दानव यांस मान भयंकर अशा या सामग्रीनें सर्वांचें कल्याण करणारा महादेव साध्य होणें अशक्य आहे हें तूं जाणत नाहींस काय?

तस्य देवस्य वेत्थ त्वं करणं तु यदव्ययं ॥२१५॥ प्रायः प्रसादः कोपोपि सर्वो हि महतां महान् ॥

अर्थ- आणि त्या शिवाचें कोणतेंही असाध्य करणें तूं जाणत आहेस, तसाच त्या देवाचा प्रसाद किंवा कोप हें त्या थोरांचें सर्वच मोठें आहे.

सर्वोपभोगसारा हि सुंदर्यः स्वर्गसंभवाः ॥ २१६॥ अध्याश्रितं च यत्सौख्यं भवता नष्ट चेष्टितं ॥ प्रमादादथ विभ्रश्येदीशं प्रति विचिंत्यतां ॥ २१७॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे इंद्रा सर्व उपभोगां विषयीं श्रेष्ठ अशाया सुंदरी स्वर्गातील अप्सरा आदिकरून जें सौख्य तुला प्रलय काल पर्यंत प्राप्त जाहलें आहे हें इत उत्तर ईश्वर जे शिव त्यांशीं प्रमाद केला असतां सर्व नाश पावेल याचा तूं विचार कर.

प्रागेव चेह दृश्यंते भूतानां कार्यसंभवाः ॥ विशेषं कांक्षतां शक्र सामान्याद्भ्रंशनं फलं ॥ २१८॥

अर्थ- कारण हें या लोकांत तरीं प्राणि मात्रांस पूर्वीं ज्या सामान्य कार्यी

पासून प्राप्त झालेलीं फलें दिसतात तीं त्यांतील अधिक इच्छा करणारांच्या अ ति तृष्णेनें सामान्य फलें ही नाश पावतात.

श्रुत्वैतद्वचनं शक्रस्तमुवाचामरैर्युतः॥ ॥शक्रउवाच॥॥
वयंप्रमाणास्तेऽत्ररतिकांतनसंशयः॥२१९॥

अर्थ- हें मदनाचें भाषण श्रवण करून सर्व देवां सहित इंद्र मदनास ह्मणाला कीं, हे रतिपते मदना या कार्या विषयीं आह्मी तुला प्रमाण आहोंत यांत संशय नाहीं तेव्हां यांतील विचाराचें तुला प्रयोजन काय?

संदेशेनविनाशक्तिरपकारस्यनेष्यते॥ कस्यचिच्चक्व-
चिद्दृष्टंसामर्थ्यंनतुसर्वतः॥२२०॥

अर्थ- कारण कोणत्याही दूतास आज्ञेवांचून दुसऱ्यांवर अपकार करण्याची शक्ति नसते आणि क्वचित् आज्ञेवरून सामर्थ्य असलेंतरीं जें एकाद्याचेच अंगीं लोकांत दिसत आहे; तें तरीं सर्व प्रकारें नसतें तर अल्पच असतें तेव्हां हें संकट तुजवर नाहीं.

इत्युक्तःप्रययौकामःसखायंमधुमाश्रितः॥रतियु-
क्तोजगामाशुप्रस्थंतुहिमभूभृतः॥२२१॥

अर्थ- असें इंद्रानें भाषण केल्यावर तो रति सहित मदन वसंत नामक मित्रास बरोबर घेऊन त्वरेनें हिमालय पर्वताचे शिखरावर गेला.

सतुतत्राकरोच्चिंतांकार्यस्योपायपूर्विकां॥महार्थाये
हिनिष्कंपामनस्तेषांसुदुर्जयं॥२२२॥

अर्थ- आणि तो मदन तेथें त्या कार्यसाधनाचे उपाया विषयीं पूर्वी विचार करूं लागला कीं, जे महत् कार्या विषयीं आसक्त असतात ते कोणत्या कारणानें कंपित होत नाहींत; या मुळें कितीही युक्ती केल्या तरी त्यांचें मन जिंकण्यास अशक्य असतें.

तदादावेवसंक्षोभ्यनियतंस्वजयोभवेत्॥ संसिद्धिंप्रा
प्नुयुश्चैवपूर्वेसंशोध्यमानसं॥२२३॥

अर्थ- यास्तव आरंभींच शिवाचे मनास विषय संबंधानें उत्तम क्षोभ उत्पन्न करावा; ह्मणजे तेणें करून आपला जय नियमें करून चांगला होईल, ह्मणूनच सर्व पुरातन लोक मनास उत्कृष्ट शुद्धी नें जिंकूनच मोक्षादिक परम

सिद्धीस पावले.

कथंचविविधैर्भावैर्द्वेषानुगमनंविना ॥ क्रोधः क्रूरतरासंगद्रावणेर्ष्यांमहासखीं ॥ २२४ ॥ चापल्यमूर्ध्निविध्वस्तधैर्याधारांमहाबलां ॥ तामस्यविनियोक्ष्यामिमनसोविकृतिंपरां ॥ २२५ ॥

अर्थ.- तस्मात् शिवाच्या मनांत क्रोध उत्पन्न केल्यावांचून त्याचें अंतःकरण तपांतून भ्रष्ट होणार नाहीं; बरें तो क्रोधतरीं अनेक प्रकारच्या भावानीं द्वेषउत्पन्न झाल्या वांचून मनांत येत नाहीं; तसेच ते द्वेष उत्पन्न करणारे नाना प्रकारचे भावही मनास विकार जाहल्या वांचून उत्पन्न होत नाहींत; यास्तव आतां मी याशिवाचे मनास मोठी विकृति उत्पन्न करितों; ती अशी कीं, अति कठिण वैराग्याच्या नाशा विषयीं ईर्ष्या करणारी असून ती माझें साहाय्य करणारी मोठी सखी आहे; आणि चंचल पणाचे मस्तकावर स्थापन केलेल्या धैर्याच्या आधाराचा नाश करण्या विषयीं महाबलाढ्य आहे.

पिधायधैर्यद्वाराणिसंतोषमपकृष्यच ॥ अवगंतुंहिमांतत्रनकश्चिदतिपंडितः ॥ २२६ ॥

अर्थ.- मग मी शिवाचीं मन आदिकरून धैर्याचीं द्वारें बंद करून अंतःकरणांतील समाधान वृत्तीला हरण करीन असें केलें असतां कोणी कितीही अत्यंत ज्ञानी असला तरी तो मला जाणण्यास समर्थ होत नाहीं.

विकल्पमात्रावस्थानेवैरूप्यंमनसोभवेत् ॥ पश्चान्मूलक्रियारंभगंभीरावर्तदुस्तरः ॥ २२७ ॥ हरिष्यामिहरस्याहंतपस्तस्यस्थिरात्मनः ॥ इंद्रियग्राममारम्यरम्यसाधनसंविधिः ॥ २२८ ॥

अर्थ.- नंतर त्या मनाच्या विकृतीनें मनांत अनेक विकल्प उत्पन्न झाल्यानें शिवाच्या मनास नाना प्रकारचे विक्षेप येतील पश्चात् त्या क्रोधाचा नाश करणाऱ्या मोहनादिक क्रिया उत्पन्न करून त्यांच्या खोल भोंवऱ्यानीं दुर्धर अशा रमणीय कामोद्दीपन करणाऱ्या मंजुल शब्दादिक साधन सामग्रीच्या रचनेनें शिवाच्या मन आदि सर्व इंद्रियांस मोहित करून मी स्थिर बुद्धियुक्त शिवाचें तप हरण करीन.

चिंतयित्वेतिमदनोऽभूतभर्तुस्तदाश्रमं॥ जगामजगती-
सारंसरलद्रुमवेदिकं॥ २२९॥

अर्थ:- असें चिंतन करून तो मदन चराचर विश्वनाथ शिवाच्या त्या आश्रमास गेला; तो आश्रम सर्व पृथ्वींत श्रेष्ठ असून तेथील ओट्यांवर सर्व सरळ वृक्ष होते.

शांतसत्वसमाकीर्णमचलप्राणसंकुलं॥ नानापुष्पल
ताजालंगगनस्थगणेश्वरं॥ २३०॥

अर्थ:- आणि तो आश्रम सर्वत्र शांत प्राण्यानीं व्याप्त असून धैर्यवंत-प्राण्यांनीं ही युक्त असे; त्या आश्रमांत अनेक प्रकारच्या पुष्पांच्या वेलींचे समुदाय असून प्रमथादिक गणांचे नायक सभोंवतीं आकाशांत संचार करीत आहेत.

निर्व्यग्रवृषभाध्युष्टनीलशाद्वलसानुकं॥ तत्रापश्य
त्त्रिनेत्रस्यरम्यंकंचिद्द्वितीयकं॥ २३१॥

अर्थ:- तसाच त्या आश्रमांतील पर्वत संबंधि शिखरावर अग्राशींनील वर्ण असून खालीं हिरवें अशा कोंवळ्या गवतांचे हिरव्यागार प्रदेशावर नंदी स्वस्थ चित्तानें बसला होता अशा त्या आश्रमांत मदनानें त्रिनयन-शिवाचें साहाय्य करणारा कोणी एक दुसरा सुंदर पुरुष पाहिला.

वीरकंलोकवीरेशमीशानसदृशद्युतिं॥ यक्षकुंकुमकिंज
ल्कपुंजपिंगजटासटं॥ २३२॥

अर्थ:- तो वीरभद्र लोकांतील सर्व वीरांत श्रेष्ठ असून कांतीनें शिवासारखा शोभत होता; आणि कापूर, कृष्णागरु, केशर, कस्तुरी, व चंदन या सुगंधी सर्व पदार्थांचे एकत्र मिश्रित केलेल्या गंधांच्या रजांचे समुदायानें त्या वीरभद्राच्या निरनिराळ्या सर्व जटा पिंगटवर्ण जाहल्या होत्या.

वेत्रपाणिनमव्यग्रमुग्रभोगींद्रभूषणं॥ ततोनिमीलितो
न्निद्रपद्मपत्राभलोचनं॥ २३३॥

अर्थ:- तशीच त्या वीरभद्राचे हातांत राजचिन्ह युक्त वेताची काठी असून त्याचें चित्त व्यग्र नव्हतें. त्यानें महा भयंकर श्रेष्ठ नागांचीं भूषणें अंगावर धारण केलीं होतीं नंतर मदन शिवाजवळ येऊन लागला तो शिव असा-

कीं; त्याचे नेत्र किंचित् मिटलेले असून उमललेल्या कमलाऱ्याचा कळी समान-आकृती व कांती यानीं सुशोभित दिसत आहेत.

प्रेक्षमाणमृजुस्थानस्थितनासाग्रलोचनं ॥ अवस्तर
ससिंहेंद्रचर्मलंबोत्तरीयकं ॥ २३४॥

अर्थ- त्याच प्रमाणें तो शंकर आपले सरळ नासिकेवर नेत्र लाऊन एकाग्रदृष्टीनें अवलोकन करीत होता; आणि तरसव मोठे सिंह यांचीं चर्में लांब आंगवस्त्रासारिखीं त्या शिवाचे कानां वरून लोंबलेलीं शोभत आहेत.

श्रवणाहिफलन्मुक्तनिःश्वासानलपिंगलं ॥ प्रेंखत्कपा
लपर्यंततुंबिलंबिजटाचयं ॥ २३५॥

अर्थ- तसेच कानांवर धारण केलेल्या सर्पांच्या अग्नि समान श्वासोच्छ्वासानीं शिवाची अंगकांती पिंगटवर्ण जाहली आहे. आणि त्या शिवाच्या जटांचे समुदायास सभोंवतीं "वेलीस लागलेल्या भोपळ्यां सारखीं" मनुष्याचीं लोंबलेलीं चंचल मस्तकें शोभत आहेत.

कृतवासुकिपर्यंकनाभिमूलनिवेशितं ॥ ब्रह्मांजलि-
स्थपुच्छाग्रनिबद्धोरगभूषणं ॥ २३६॥

अर्थ- आणि तो शिव वासुकीरूप पर्यंकावर निद्रा केलेला असून संपुष्टाकार जोडलेल्या त्याच्या हातांत पुच्छांचीं अग्रें बांधलेले नाग, भूषणां सारखे शोभत होते.

ददर्शशंकरंकामः क्रमप्रासांतिकंशनैः ॥ ततोभ्रमरझं
कारमालंबिद्रुमसानुकं ॥ २३७॥

अर्थ- तो मदन क्रमानें हळूहळू शिवाचे समीप आला नंतर भ्रमरांचे गुंजारवांनीं नादित अशा वृक्षयुक्त शिखरावर त्या मदनानें शिवास पाहिलें.

प्रविष्टःकर्णरंध्रेणभवस्यमदनोमनः ॥ शंकरस्तमथाक
र्ण्यमधुरंमदनाश्रयं ॥ २३८॥ सस्मारदक्षदुहितांदयितां
रक्तमानसः ॥

अर्थ- आणि तो मदन कानाचे छिद्रांतून शिवाच्या मनांत शिरला; तेव्हां मदन संबंधि तें मधुर गायन श्रवण करून शिवास प्रेमयुक्त मनानें पुरातन प्रिय दक्ष कन्येचें स्मरण जाहलें.

ततः सा तस्य शनकैस्तिरोभूयातिनिर्मला ॥ २३९ ॥
समाधिभावनातस्थौ लक्ष्यप्रत्यक्षरूपिणी ॥

अर्थ- ते सर्व पूर्वी जी दक्षकन्या शिवाची पत्नी होती; तीच पुनः या जन्मीं हि मालयाची कन्या जाहली ती अति निर्मल तेजःपुंज रूपवती पार्वती हळूच त्या शिवाजवळ येऊन एका वृक्षाचे आड बाजूस उभी राहिली तिचें रूप समाधिकालीं शिवाचे मनांत जसें आलें होतें तसेंच त्या पार्वतीचें रूप त्या कालीं प्रत्यक्ष दिसत होतें.

ततस्तन्मयतां यातः प्रत्यूहपिहिताशयः ॥ २४० ॥ वशित्वेन बुबोधेशो विकृतिं मदनात्मिकां ॥

अर्थ- नंतर तपश्चर्येस विघ्न करणाऱ्या मदनानें अंतःकरण मोहित केल्यामुळें तो शिव त्या पार्वती विषयीं अत्यंत आसक्त जाहला; तथापि त्या स्वतंत्र शिवानें सर्व इंद्रियें स्वाधीन असल्यामुळें मदनानें आपल्या मनास उत्पन्न केलेली विषय संबंधीनी विकृति जाणली.

ईषत्कोपसमाविष्टो धैर्यमालंब्य धूर्जटिः ॥ २४१ ॥ निरासे मदनस्थित्या योगमायासमावृतः ॥

अर्थ- आणि शिवास किंचित् कोप आला तरी सर्वथा कोपाच्या स्वाधीन न होतां धैर्य धरून त्यानें आपल्या मनांतून मदनास बाहेर काढण्या साठीं आपली योगमाया प्रगट केली.

स तया मायया विष्टो जज्वाल मदनस्ततः ॥ २४२ ॥ इच्छाशरीरो दुर्जेयो रोषदोषमहाश्रयः ॥

अर्थ- तेव्हां मदन शिवाच्या त्या योगमायेनें व्याप्त झाला असतां, तो कामरूपी व क्रोधरूप दोषास महान् आश्रय असल्यामुळें जिंकण्यास परम कठीण असून ही त्या योगमायेच्या तेजानें जळूं लागला.

हृदयान्निर्गतः सोऽथ वासनाव्यसनात्मकः ॥ २४३ ॥ बहिस्थलं समालंब्य द्रष्टापतस्थौ झषध्वजः ॥ अनुयातो थवद्ध्येन मित्रेण मधुना सह ॥ २४४ ॥

अर्थ- नंतर केवळ विषय वासनेनें दुःखकारक मदन शिवाच्या हृदयांतून-निघाला आणि तो मकरध्वज बाहेरच्या स्थलाचा आश्रय करून समीप भा-

गीं उभा राहिला; पश्चात् मागून त्याचा प्रियमित्र वसंत ही त्या बरोबर आला.

सहकारतरौहृस्थामृदुमारुतनिर्धुतं ॥ स्तबकंमदनोरम्यंहरवक्षसिसत्वरं ॥ २४५ ॥ मुमोचमोहनंनाममार्गणंमकरध्वजः ॥

अर्थ- नंतर समीप भागीं मदनानें एका आम्रवृक्षावर मंदवायूनें हालणारा एक कोमल पल्लव युक्त सुंदर मोहोराचा झुपका पाहिला; आणि तोच सर्वांस मोहित करण्या मुळें मोहन या नामानें प्रसिद्ध असातो बाण मदनानें शिवास मोहित करण्या साठीं त्याचे वक्षस्थळावर मारण्याच्या उद्देशानें सोडला.

शिवस्यहृदयेशुद्धेनाशशालीमहाशरः ॥ २४६ ॥ पपातपरुषप्रांशुःपुष्पबाणोविमोहनः

अर्थ- तेव्हां विशेषें करून मोह उत्पन्न करणारा असून कामोद्दीपनानें मनास क्षुब्ध करणाऱ्या तेजानें युक्त व तपश्चर्येचा भंग करण्या विषयीं समर्थ असा तो मदनाचा महान् बाण येऊन शिवाच्या पवित्र हृदयावर पडला.

ततःकरणासंदेहोविध्वस्तहृदयेभवः ॥ २४७ ॥ बभूवभूधरौपम्यधैर्योपिमदनोन्मुखः ॥

अर्थ- त्या कालीं त्या बाणानें शिव,हृदय स्थानीं ताडित जाहला असतां, तो पर्वता सारखा धैर्यवान् असूनही त्या वेळेस मदनाचे स्वाधीन होत्साता पुढें त्या मोहाच्या निवारणार्थ कांहीं एकउपाय करण्या विषयीं मनांत संदेहानें युक्त-जाहला.

ततःप्रभुत्वाद्भावानांसंक्षोभंसमपद्यत ॥ २४८ ॥ बाह्यंबहुसमासाद्यप्रत्यूहप्रसवात्मकं ॥

अर्थ- नंतर तो शिव सर्वचराचर वस्तूंचा प्रभू असून तपोभंगार्थ विघ्नउत्पन्न करणाऱ्या मदनाचें तें बाहेरील बहुत मनोविकार संबंधीं विघ्नजाळ अनुभवून मनांत अत्यंत क्षुब्ध जाहला.

ततःकोपानलोद्भूतघोरहुंकारभीषणे ॥ २४९ ॥ बभूववदनेनेत्रंतृतीयमनलाकुलं ॥ रुद्रस्यरौद्रवपुषोजगत्संहारभैरवं ॥ २५० ॥

अर्थ- तेणें करून भयंकर शरीरी त्या शिवास महान् क्रोध आला; तेव्हां

त्या क्रोधाग्नी पासून उत्पन्न झालेल्या उग्र हुंकारानीं भयंकर मुखावरील ति-सरा नेत्र अग्नीनें व्याप्त जाहला; तो सर्व जगाचा प्रलयकालीं संहार करण्या विषयीं समर्थ असा भयंकर आहे.

तदंतिकस्थेमदनेव्यस्फारयतधूर्जटिः॥ तंनेत्रविस्फु लिंगेनक्रोशतांनाकवासिनां॥२५१॥ गमितोभस्मसा त्तूर्णंकंदर्पःकामिदर्पकः॥

अर्थ- तेव्हां शिवानें तो आपला तृतीयनेत्र समीपभागीं उभा राहिलेल्या-त्या मदनावर रोषानें वटारिला; आणि त्या शिवानें आपल्या नेत्रांतील उड-णाऱ्या ठिणग्यांसहित प्रज्वलित अग्नीनें त्या मदनास तत्काल जाळून भस्म के-लें; तो मदन विषयीं जनांस अतिशयें गर्व उत्पन्न करणारा आहे; आणि त्या मदनास शिवानें जेव्हां जाळिलें; तेव्हां स्वर्गवासी सर्वदेव आक्रोशानें रुदन करीत होते.

सतुतंभस्मसात्कृत्वाहरनेत्रोद्भवोनलः॥२५२॥व्यजृं भतजगत्दग्धुंज्वालाहुंकारघस्मरः॥

अर्थ- नंतर शिवाच्या तृतीयनेत्रा पासून उत्पन्नजाहलेला असून ज्वालां च्या वेगानें सर्वांचें भक्षण करणारा तो भयंकर अग्नि त्या कालीं सर्वजगास जाळण्या विषयीं आसमंतात् सर्वत्र व्याप्त जाहला.

ततोभवोजगद्धेतोर्व्यभजज्जातवेदसं॥२५३॥सहका रेमधौचंद्रसुमनःसुपरेष्वपि॥ भृंगेषुकोकिलास्येषुविभागे नस्मरानलं॥२५४॥

अर्थ- तेव्हांमग जगाच्या संरक्षणा साठीं शिवानें मदनास जाळल्यावर त्या म दन युक्त झालेल्या अग्नीने अनेक विभाग करून ते निरनिराळे स्थलीं स्थापन के ले ते असे कीं, आम्रवृक्ष, वसंतऋतु, चंद्र, इतर सुगंध युक्त पुष्पें, भ्रमर, कोकि-ल पक्ष्यांचे मुख यास्थानांत त्या मदन युक्त अग्नीचे विभाग प्रत्येक स्थानीं एकेक असे शिवानें लोक कल्याणार्थ स्थापन केले.

सबाह्यांतरविद्धेनहरेणस्मरमार्गणः॥ रागस्नेहसमि द्धांतर्धावन्तीव्रहुताशनः॥२५५॥ विभक्तलोकसंक्षो भकरोदुर्वारजृंभितः॥ संप्राप्यस्नेहसंपृक्तंकामिनांह

दयंकिल॥२५६॥ज्वलत्यहर्निशंभीमोदुश्चिकित्स्यसुखात्मकः॥

अर्थ— या प्रमाणें मदनानें शिवास सबाह्याभ्यंतर वेध केला असतां शिवानें क्रोधें करून मदन जाळला; तो कामोद्दीपन करणाऱ्या बाणानें युक्त मदन सहित तीक्ष्ण अग्नि प्रीति पूर्वक स्नेहानें अतिशयें वृद्धिंगत होऊन सर्व प्राणिमात्रांचे अंतःकरणांत धांवतो; असा तो मदन युक्त अग्नि निरनिराळ्या सर्व लोकांचे मनास अत्यंत क्षोभ उत्पन्न करीत असून त्यांत विषया सक्त स्त्री पुरुषांच्या तर विषय संबंधी प्रीती युक्त मनांत तो भयंकर मदनाग्नि येऊन तेथें दुर्निवार स्वरूपानें वाढून त्या कामि जनांस रात्रंदिवस संतापच देतो;- आणि विषय संबंधानें मनांत जाहलेल्या या मदनाच्या तापाचें निवारण सर्वांस विचारानें ही होण्यास अशक्य आहे.

विलोक्यहरहुंकारज्वालाभस्मकृतंस्मरं॥२५७॥विललापरतिः क्रूरंबंधुनामधुनासह॥

अर्थ— या प्रमाणें शिवाचे हुंकारां पासून उत्पन्न झालेल्या अग्नीच्या ज्वालांनीं मदनाचें भस्म जाहलेलें पाहून त्याची पत्नी रति आपला बंधु जो वसंत त्यासहित त्या कालीं मदना विषयीं मोह्यानें विलाप करूं लागली.

ततोविलप्यबहुशोमधुनापरिसांत्विता॥२५८॥जगामशरणंदेवमिंदुमौलिंत्रिलोचनं॥

अर्थ— असें बहुत प्रकारें विलाप करून मग वसंतानें रतीचें सांत्वन केल्यावर ती मदन भार्या चंद्र शेखर असून त्रिनयन अशा शिवास शरण गेली.

भृंगानुयातांसंगृह्यपुष्पितांसहकारजां॥२५९॥लतांपवित्रकस्थानेपाणौपरभृतांसखीं॥निबध्यतुजटाजूटंकुटिलैरलकैरतिः॥२६०॥उध्धूल्यगात्रंशुभ्रेणस्पष्टेनस्मरभस्मना॥जानुभ्यामवनींगत्वाप्रोवाचेंदुविभूषणं॥२६१॥

अर्थ— ती अशी कीं, त्या कालीं रतीनें हातांत पवित्रकाचे जागीं आम्र वृक्षाची कोमळ पल्लव युक्त एक शाखा घेतली होती त्या शाखेस मोहोर आलेला होता; त्या सुगंधानें तिच्या मागून भ्रमर मधुर गुंजारव शब्द करीत येत आ-

हेत आणि ती शाखा कोकिलपक्ष्यांस अति प्रिय आहे तसाच त्या रतीनें आपल्या जटारूप कुरळ केशांचा बुचडा बांधला होता; तसेंच तिणें आपले सर्वांगास मदनाचे चितेंतील शुभ्र असून प्रिय असें भस्म धारण केलें होतें अशी ती मदनप्रियारति आपले गुडघे भूमीवर टेंकून नम्र होत्साती मस्तकीं चंद्रभूषणानें सुशोभित सदाशिवाची स्तुति करूं लागली.

रतिरुवाच ॥ नमः शिवायास्तु निरामयाय नमः शिवायास्तु मनोमयाय ॥ नमः शिवायास्तु सुरार्चिताय तुभ्यं सदा भक्तकृपापराय ॥ २६२ ॥

अर्थ- कीं, हे भवरोग रहित शिवा तुला माझा नमस्कार असो; तसाच मी मनांत स्वामित्वानें वास करणारास तुजला नमस्कार करितें; कारण सर्व देव तुझी पूजा करितात तस्मात् हे शिवा तूं असा भक्तांवर कृपा करण्या विषयीं- अत्यंत तत्पर आहेस ह्मणून मी तुजकारणें प्रणाम करितें.

नमो भवायास्तु भवोद्भवाय नमोस्तु ते ध्वस्तमनोभवाय ॥ नमोस्तु ते गूढ महाव्रताय नमोस्तु मायागहनाश्रयाय ॥ २६३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे सुखदायका शिवा तूं सर्वजगाच्या उत्पत्तीस कारण असून या मदनाचा नाश केला. आणि तुझें तपश्चर्या रूप महाव्रत अति गुप्त असूनही तूंच मायेस आश्रय असून तिला तुझे स्वरूपीं प्रवेश करणें अशक्य- आहे; यास्तव हे देवाधिदेवा मी तुजला वारंवार वंदितें.

नमोस्तु शर्वाय नमः शिवाय नमोस्तु सिद्धाय पुरातनाय ॥ नमोस्तु कालाय नमः कलाय नमोस्तु ते ज्ञान वरप्रदाय ॥ २६४ ॥

अर्थ- तसेंच हे देवा तुला माझें नमन असो; कारण तूं अंधकासुरादिक दुष्ट दैत्यांचा नाश करून सर्व सज्जनांचें कल्याण करीत आहेस तूं अणिमादिक सर्व योगेश्वर्य सिद्धींनीं पूर्ण असून पुरातन पुरुष आहेस तूं सर्वजगाचा- संहार करणारा काळ स्वरूप असून सर्वांस प्रियही आहेस आणि मुमुक्षु (मोक्षार्थी) जनांस तूं मोक्षोपयोगि ज्ञान देतोस व इतर सकाम भक्तांसही तूं वर देऊन त्यांचे मनोरथ यथेच्छ पूर्ण करितोस तस्मात् हे देवा तुझे चरण कमलांस मी

पुनःपुनः वंदन करितों.

नमोस्तु ते कालकलातिगाय नमो निसर्गामलभूषणाय ॥ नमोस्त्वमेयांधकमर्दकाय नमः शरण्याय नमो गुणाय ॥ २६५ ॥

अर्थ:- आणि हे देवा तूं काल संबंधि क्षण, लवादिक सर्व अंशांच्या गणनेचें अतिक्रमण करून स्वस्वरूपीं रममाण असून स्वरूप सिद्ध दिव्य स्वच्छ तेजोमय भूषणांनीं अलंकृत आहेस; तसेंच तुझे स्वरूप महात्म्याचा कोणासही अंत नसून त्वां लोकोपद्रव कारक अंधकासुराचा संहार केला; तशीच सत्व, रज व तम या मायेच्या तिन्ही गुणांची बाधा तुजला नाहीं ह्मणूनच संकट समयीं सर्वांनीं शरण येण्यास योग्य, परम दयाळू तूंच आहेस; तस्मात् मी निरंतर तुला नम्र जाहलेंं आहें.

नमोस्तु ते भीमगणानुगाय नमोस्तु नानाभुवनादिकर्त्रे ॥ नमोस्तु नानाजगतां विधात्रे नमोस्तु ते चित्रफलप्रयोक्त्रे ॥ २६६ ॥

अर्थ:- हे शिवा तूं भयंकर प्रमथादि गणांचा स्वामी असून अनेक भुवनांचा आदिकर्त्ता आहेस; तसाच तूं नाना प्रकारच्या चराचर जगांस उत्पन्न करून त्यांस त्यांच्या कर्मानुसार चित्र विचित्र फल देतोस तस्मात् अशा देवास तुला माझे वारंवार नमस्कार असोत.

सर्वावसाने ह्यविनाशनेत्रे नमोस्तु चित्राध्वरभागभोक्त्रे ॥ नमोस्तु भक्ताभिमतप्रदात्रे नमः सदा ते भवसंगहर्त्रे ॥ २६७

अर्थ:- प्रलय कालीं सर्वांचा नाश जाहला तरीं तुझें ज्ञान नाश पावत नाहीं, तसाच तूं चित्र विचित्र सर्व यज्ञांतील भाग ग्रहण करितोस, आणि तूं भक्तांस इच्छित फल देत असून भक्तांचे मनांतील संसार संबंधि सर्व संग निरंतर दूर करितोस; यास्तव हे देवा मी तुला पुनःपुनः नमस्कार करितों.

अनंतरूपाय सदैव तुभ्यमसह्यकोपाय नमोस्तु तुभ्यं ॥ शशांकचिन्हाय सदैव तुभ्यममेयमानाय नमः स्तुताय ॥ २६८ ॥

अर्थ:- आणि हे अनंतरूप शिवा तुजकारणें माझे निरंतर नमस्कार अ-

सोत; तसाच तुझा कोप सहन करण्यास अशक्य आहे; ह्मणून मी तुझे चरण वंदितों; तूं निरंतर मस्तकीं चंद्र भूषणानें शोभत आहेस; व तुझ्या स्वरूपाचा अंत नाहीं यास्तव सर्व वेद निरंतर तुझी स्तुति करित आहेत.

वृषेंद्रयानाय पुरांतकाय नमः प्रसिद्धाय महौषधाय॥ नमोस्तु भक्त्याभिमतप्रदाय नमोस्तु सर्वार्तिहराय तुभ्यं॥२६९॥

अर्थ- हे शिवा तूं वृषभश्रेष्ठ नंदीवर आरोहण करून सर्वत्र गमन करितोस; तूंच त्रिपुरासुराचा संहार केला आहेस; आणि या जगांत तूं महौषधरूपानें प्रसिद्ध आहेस; व सर्वांची पीडा दूर करून तूं सज्जनांस त्यांच्या भक्तीनें च इष्ट फल देत आहेस या साठीं मीं तुजला निरंतर नमस्कार करीत आहें.

चराचराचारविचारवर्यमाचार्यमुत्प्रेक्षितभूतसर्गं॥ त्वामिंदुमौलिं शरणं प्रपन्ना प्रिया प्रमेयं महतां महेशं ॥२७०॥

अर्थ- त्याच प्रमाणें जगांतील चराचर प्राणिमात्रांचे आचारांच्या विचारा विषयीं तूंच श्रेष्ठ गुरु आहेस ह्मणूनच तूं सर्व चराचर प्राणि मात्रांच्या सृष्टीस अत्युत्तम प्रकारें जाणतोस; आणि संपूर्ण प्रिय वस्तूंपेक्षां अधिक प्रिय आहेस किंवा पार्वतीला ही तुझ्या अपरिमित माहात्म्यानें ज्ञान नाहीं; व तूं समग्र श्रेष्ठ देव व ऋषि यांचाही महान् ईश्वर आहेस यास्तव हे शिवा तुजला चंद्रशेखरास अनन्य भावानें शरण आल्यें आहें.

प्रयच्छमे कामयशः समृद्धिं पुनः प्रभो जीवतु कामदेवः ॥ प्रियं विना त्वां प्रियजीवितेषु त्वत्तो परः को भुवनेष्विहास्ति॥२७१॥

अर्थ- हे प्रभो शिवा तुझ्या कृपेनें हा माझा प्रिय कामदेव पुनः जिवंत होवो आणि त्याचे योगानें मला कांति व सत्कीर्ति यांची समृद्धि प्राप्त होवो कारण चतुर्दश भुवनांतील सर्वलोकांस आपल्या जीविता समान दुसरी वस्तु प्रिय नाहीं असें असून ही त्या सर्व भुवनांत तरी सकल प्रीतीस मूळ कारण जो तूं-त्या वांचून दुसरा प्रिय कोण आहे; तस्मात् तूंच माझें हें प्रियसुख मला देण्यास योग्य आहेस.

प्रभुः प्रियायाः प्रसवः प्रियाणां प्रणीतपर्यायपरा
परार्थः॥ त्वमेवमेको भुवनस्यनाथो दयालुरुन्मूलित
भक्तभीतिः॥ २७२॥

अर्थ- हे देवा तूं पुढें होणाऱ्या पार्वती नामक प्रिय पत्नीचा प्रभु आहेस; त-
साच तूं भक्तांस प्रियपदार्थ देणारा असून सर्वांस पर्यायानें उत्तम, मध्यम व-
कनिष्ठ हे समग्र विषय देतोस तस्मात् असा तूं सर्व भुवनांचा एकच दयालु
नाथ आहेस ह्मणूनच तूं भक्तांच्या भीतीचा समूळ नाश करितोस.

इत्थंस्तुतः शंकरईड्यईशो वृषाकपिर्मन्मथकांतया-
तु॥ तुतोषदोषाकरखंडधारीउवाचचैनांमधुरंनिरीक्ष्य
॥ २७३॥

अर्थ- अशी त्या रतिनामक मदन भार्येनें स्तुति केली असतां तो स्तुति क
रण्यास योग्य असून सर्वांचा स्वामी भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारा व आपले
मस्तकीं अर्धचंद्र धारण करणारा जगद्धितेच्छु शंकर परम संतुष्ट होत्साता
कृपा दृष्टीनें त्या रतीस पाहून मधुर वाणीनें तिजला बोलूं लागला.

शंकरउवाच॥ भवितेतिचकामोयंकालात्कांतो चिराद
पि॥ अनंग इतिलोकेषुसविख्यातिंगमिष्यति॥ २७४

अर्थ- कीं, हे मदनप्रिये रति तुझा हा पति मदन अल्प कालानेंच उत्पन्न होऊ
न तो या माझे नेत्राग्नीनें दग्ध जाहल्याचे कारणानें लोकांत अनंग या नामानें
प्रसिद्ध होईल.

इत्युक्ताशिरसावंद्यगिरिशंकामवल्लभा॥ जगामोपव
नंरम्यंरतिस्तु हिमभूभृतः॥ २७५॥

अर्थ- असें शिवानें भाषण केल्यावर ती मदनाची प्रियपत्नी रति कैलास पर्व
तावर निद्रा करणाऱ्या शिवास मस्तकानें वंदन करून त्या हिमालय पर्वता
वरील एका रमणीय अशा एक सुंदर उपवनांत गेली.

रुरोदचापिबहुशोदीनारम्येस्थलेतुसा॥ मरणव्यव
सायात्तुनिवृत्ताsसाहराज्ञया॥ २७६॥

अर्थ- आणि त्या रम्य उपवनांत ती रति मदनाचें स्मरण झाल्यामुळें त्या-
च्या वियोग संबंधि दुःखानें बहुत विलाप युक्त रुदन करून शिवाच्या आज्ञे

वरून समाधान पावली, आणि मरणाचे उद्योगांतून मागें फिरून मदनाच्या प्रा प्यर्थ तेथें तप करीत राहिली.

अथनारदवाक्येनचोदितोहिमभूधरः॥ कृतामरणसंस्कारांकृतकौतुकमंगलां॥२७७॥ स्वर्गपुष्पकृतापीडां-शुभ्रचीनांशुकांबरां॥ सखीभ्यांसंयुतांशैलोगृहीत्वा स्वसुतांततः॥२७८॥ जगामशुभयोगेनतदासंपूर्ण मानसः॥

अर्थ- नंतर इकडे नारदाच्या आज्ञेवरून पार्वतीला शिवास देण्या विषयीं उद्युक्त जाहलेल्या हिमालयानें आरंभीं आनंदानें पार्वतीस मंगल स्नान घातलें; आणि तिज कडून भूषणें घालवून तिला पुण्याहवाचनादिक संस्कार करविले; तसेंच तिच्या हातांत लग्न कंकण बांधून स्वर्गांतील कल्पवृक्षादिकांचीं दिव्य पुष्पें आणून तीं पार्वतीच्या मस्तकावरील केशांत व वेणींत गुंफलीं, नंतर तिला शुभ्र असून विचित्र अशीं वस्त्रे परिधान करविलीं अशा त्या पार्वतीस मागमें तिच्या दोन सख्या घेऊन त्या आपल्या कन्ये सहवर्तमान तो हिमालय अंतः करणांत कृत कृत्यता मानीत होत्साता पश्चात् शुभ मुहूर्तावर त्याकाळीं शिवाकडे जाण्या साठीं स्वस्थाना पासून निघाला.

सकाननान्युपाक्रम्य वनान्युपवनानिच॥२७९॥ ददर्शरुदतींनारीमप्रतर्क्यमहोजसं॥

अर्थ- तो हिमालय आपले स्थलांतून निघाला, तो मार्गानें बहुत वनें व उपवनें यांचें उल्लंघन करून एके प्रदेशीं आला; तों तेथें त्यानें एक परम सुंदरी स्त्री रुदन करीत बसली आहे असें पाहिलें त्या स्त्रीचें रूप इतकें महातेजः पुंज होतें कीं, त्यावर कोणाचा तर्क हीचालणें अशक्य आहे.

रूपेणासदृशींलोकेरम्येषुवनसानुषु॥२८०॥ कौतुकेनपरामृश्यतांदृष्ट्वारुदतींगिरिः॥ उपसर्प्य ततस्तस्या निकटेसोभ्यगच्छत॥२८१॥

अर्थ- अशी ती रति सर्वलोकांत रूपानें अत्युत्तम असून त्या वनांतील रमणीय पर्वत शिखरावर बसली होती तेव्हां अशी ही स्त्री येथें रुदन करीत कोण बसली आहे असा मनांत विचार करून तो हिमालय त्यास्त्रीस कृपायुक्त दृष्टीनें पाहून तिच्या

समीप गेला.

हिमवानुवाच ॥ कासिकस्यासि कल्याणि किमर्थंचापि रोदिषि ॥ नैतदल्पंमहासत्वेकारणं लोकसुंदरि ॥ २८२

अर्थ:- आणि तो हिमालय त्या स्त्रीला विचारितो कीं, हे कल्याण रूपे सर्व लोक सुंदरी तूं जातीनें कोण व कोणाची स्त्री आहेस; आणि तूं किमर्थ रुदन करित्येस? तसेंच तूं आपले आकृतीवरून मोठी धैर्य युक्त आहेस असें मला वाटतें; तस्मात् हें तुझें रडण्याचें कारण तरी सामान्य नसेल तर मोठें असेल असें मी मानतों.

सातस्यवचनंश्रुत्वाउवाचमधुनासह ॥ रुदतीशोकजननंश्वसतीदैन्यवर्धनं ॥ २८३ ॥

अर्थ:- हें त्या हिमालयाचें भाषण श्रवण करून ती रति देवी हिमालयाशीं बोलल्ये; त्या वेळेस ती अशी रडत होती कीं, तिच्या त्या रडण्यानें इतर लोकांच्या ही मनांत खेद उत्पन्न होत असे; आणि तिच्या दुःख मूलक श्वासोच्छ्वासानीं लोकांचे मनांत ही अति दैन्य वृद्धिंगत होत असे.

रतिरुवाच ॥ कामस्यदयितांभार्यांरतिंमांविद्धिसुव्रत ॥ गिरावस्मिन्महाभाग गिरिशास्तपसिस्थितः ॥ २८४

अर्थ:- ते समयीं ती रति बोलली कीं, हे उत्तम व्रत निष्ठा हिमालया मी मदनाची प्रिय भार्या रति आहें असें जाण आणि हे महाभाग्य वंता या तुझेच पर्वतावर कैलास वासी शंकर मोठें ब्रह्मचर्य तप करीत राहिले आहेत

तेनप्रत्यूहदुष्टेनविस्फार्यालोक्यलोचनं ॥ दग्धोसोझषकेतुस्तु ममकांतोतिवल्लभः ॥ २८५ ॥

अर्थ:- त्या शिवास मत्स्यध्वज मदनानें तपश्चर्येंत विघ्न केलें असतां शिवानें आपला प्रलय कारक तृतीय नेत्र उघडून क्रोध दृष्टीनें मदनाकडे पाहिलें तेव्हां त्या नेत्रांतून निघालेल्या अग्नीनें माझा अति प्रिय सुंदर पति मदन जळाला.

अहंतुशरणंयाता तंदेवंभयविह्वला ॥ स्तुत्वाथसंस्तुत्यानतोमांगिरिशोब्रवीत् ॥ २८६ ॥

अर्थ:- तेव्हां मी पति वियोगाच्या त्या दुःखानें अत्यंत व्याकुळ होऊन त्या

महादेवास शरण गेल्यें, आणि ह्या उत्तम स्तुतीनें शंकराचें स्तवन केलें असतां पश्चात् तो कैलास पर्वतावर निद्रा करणारा शिव प्रसन्न होऊन त्या काळीं मला बोलला.

तुष्टोहं कामदयिते कामोयं ते भविष्यति ॥ त्वत्स्तुतिं चाप्यधीयानो नरो भक्त्या मदाश्रयः ॥ २८७ ॥ लप्स्यते कांक्षितं कामं निवर्त्य मरणादितः ॥

अर्थ- कीं, हे मदनप्रिये हा तुझा पति मदन तुला शीघ्र प्राप्त होऊन तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. आणि जो मानव भक्तीनें माझा आश्रय करून त्वां केलेल्या या स्तुतीचें पठन करील तो आपल्या स्त्री पुत्रादि कांस मरणादिक दुःखां तून सोडवून इच्छित पूर्ण सुख पावेल.

प्रतीक्ष्य ती च तद्वाक्यमाशावेशादिभिर्त्विहं ॥ २८८ ॥ शरीरं परिरक्षिष्ये कंचित्कालं महाद्युते ॥

अर्थ- अशा त्या शिवाच्या वरप्रदान वाक्याच्या फलप्राप्तीची मार्ग प्रतीक्षा करीत मी आशाविष्ट होऊन कांहीं काल पर्यंत शरीर रक्षून येथें राहिल्यें आहें.

इत्युक्त स्तु तदा रत्याशैलः संभ्रमभीषितः ॥ २८९ ॥ पाणावादाय हि सुतां गंतुमैच्छत्स्वकं पुरं ॥

अर्थ- असें रतीनें भाषण केलें असतां, त्या काळीं तो हिमालय त्या शिवाचे क्रोधावरून भयभीत होत्साता आपल्या पार्वती नामक कन्येस हातीं धरून त्वरेनें आपले पुरास जाण्या साठीं निघाला.

भाविनोवश्य भावित्वाद्भवित्री भूतभाविनी ॥ २९० ॥ लज्जमाना सखिमुखैरुवाच पितरं गिरिं ॥

अर्थ- ते समयीं पुढें अवश्य होणाऱ्या भविष्याचे बलानें ती शिवाचीच पत्नी होणारी असून सर्व भूतांनें रक्षण करणारी पार्वती लज्जित होत्साती आपल्या सखींच्या द्वारानें पिता जो हिमालय पर्वत त्यास बोलली.

शैलदुहितोवाच ॥ दुर्भाग्येन शरीरेण किंममानेन कारणं ॥ २९१ ॥ कथंच तादृशं प्राप्तुं सुखं मे सपतिर्भवेत् ॥

अर्थ- कीं जर शिव मला पति प्राप्त होणार नाहीं तर या भाग्यहीन शरीराचें मला काय प्रयोजन आहे; तस्मात् मला पूर्व जन्मा सारखें त्या शिवाच्या समागमानें सुख प्राप्त होण्यासाठीं तो शंकर मला पति कसा प्राप्त होईल.

तपोभिः प्राप्यतेभीष्टंनासाध्यंहितपस्यतः॥२९२॥दुर्भ गत्वंवृथालोकोवहतेसतिसाधने॥जीवितात्दुर्भगाच्छ्रे यो मरणंत्वतपस्यतः॥२९३॥

अर्थ- तर या विषयीं असें आहे कीं, तपानेंच सर्वांचे मनोरथ पूर्ण होतात; तप केल्यावर कोणतेंही सुख प्राप्त होण्यास दुर्लभ नाहीं; तस्मात् हे सर्वलोक सुख प्राप्तीचें साधन तप असून तें तप न करितां व्यर्थ दुःख भोगितात. तेव्हां तपश्चर्या न करणारास असल्या भाग्यहीन वांचण्या पेक्षां मरणच श्रेयस्कर जाणावें.

भविष्यामिनसंदेहो नियमैः शोषये तनुं॥ तपसिभ्रष्टसंदेहे उद्यमोर्थ जिगीषया॥२९४॥ साहंतपःकरिष्यामि यदहं प्राप्यदुर्लभा॥

अर्थ- यास्तव मी सांप्रत काळीं ब्रह्मचर्यादिनियमानीं शरीराचें शोषण करीन; कारण स्वार्थसिद्धीच्या इच्छेनें निश्चित कार्य करणाऱ्या तपाविषयींच ज्ञानी लोकांचा उद्योग प्रसिद्ध आहे ह्मणून मी तपच करीन आणि तेणें करून दुर्लभ शिवप्राप्तीसही योग्य पात्र होईन यांत संदेह नाहीं.

इत्युक्तः शैलराजस्तु दुहित्रा स्नेहविक्लवः॥२९५॥ उवाचवाचाशैलेंद्रो स्नेहगद्गदवर्णया॥

अर्थ- असें आपल्ये कन्येनें भाषण केलें असतां तो पर्वतराज हिमालय स्नेहपाशामुळें मनांत विकल होऊन गद्गदाक्षर युक्त वाणीनें त्या पार्वतीस बोलतो.

हिमवानुवाच॥उमेतिचपलेपुत्रिनक्षमंतावकंवपुः॥ २९६॥ततः सचिंतयाविष्टो दुहितांप्रशशंसच॥

अर्थ- कीं, तपानेंच सर्व सिद्धि प्राप्त होतात; हें वाक्य सत्य आहे. परंतु हे मुली उमे तूं अत्यंत चपळ आहेस यामुळें तुझें शरीर तपश्चर्ये विषयीं समर्थ नाहीं; तरीं तुझी अल्पबुद्धी असून हा निश्चय जाहला; हें बहुत उत्तम आहे अशी त्या हिमालयानें स्वकन्येची बहुत प्रशंसाही केली. परंतु पार्वतीचे हातून तपाची सिद्धी कशी होईल. या शंकेनें तो हिमालय मनांत चिंताक्रांत जाहला.

ततोंतरिक्षेदिव्याचागभूद्भुवनभूतले ॥२९७॥उमेति
चपलेपुत्रित्वयोक्तातनयाततः॥ उमेतिनामतेनास्या
सुवनेषुभविष्यति॥२९८॥

अर्थ— तों इतक्यांत पश्चात् तत्क्षणीं सर्व भुवनांतील यापृथ्वीवर अंतरिक्षांत दिव्य आकाश वाणी जाहली कीं, हे हिमालया त्वां या पार्वतीस असें भाषण केलें कीं, मुली तूं माझी स्थिर स्वभाव पर्वताची कन्या अस्ून अति चंचल कारणा वरून मला तर्कानें तूं लक्ष्मी सारखी आहेस. या अभिप्रायानें तूं तिला उमे असें संबोधन दिलेंस यास्तव सर्व भुवनांत इचें उमा हें नाम प्रसिद्ध होईल.

सिद्धिंचमूर्तिमत्येषासाधयिष्यतिचिंतितां॥इतिश्रु
त्वातुवचनमाकाशात्काशपांडुरः॥२९९॥अनुज्ञाय
सुतांशैलोजगामाशुस्वमंदिरं॥

अर्थ— आणि ही मूर्तिमंत पार्वती देवी सर्व लोकांच्या संपूर्ण चिंतित मनोरथांची सिद्धी करील तेव्हां हिला स्वतः आपले कार्य सिद्धी विषयीं संदेह काय? असें आकाशांतून देव वाणीचें भाषण ऐकून कांतियुक्त शुभ्र वर्ण सुशोभित तो हिमालय, पार्वतीस तपाविषयीं आज्ञा देऊन त्वरेनें आपले मंदिरास गेला.

सूतउवाच॥शैलजापियर्योशैलमगम्यमपिदैवतैः॥
३००॥सखीभ्यामनुयातातुनियतानगराजजा॥शृंगं
हिमवतःपुण्यंनानाधातुविभूषितं॥३०१॥

अर्थ— सूत बोलला ऋषीहो मग इकडे ती पर्वत राज हिमालयाची कन्या पार्वती आपल्या दोन सख्यां सहवर्तमान देवतांसही जाण्या विषयीं अगम्य अशा त्या हिमालय पर्वताच्या पुण्य कारक शिखरावर एकांतीं निश्चय युक्त मनानें तप करण्या साठीं गेली, तें पर्वत शिखर सुवर्णादिक अनेक धातूंनीं सुशोभित होतें.

दिव्यपुष्पलताकीर्णंसिद्धगंधर्वसेवितं॥नानामृगग
णाकीर्णंभ्रमरोद्घुष्टपादपं॥३०२॥

अर्थ— आणि त्या शिखरावर आसमंतात् दिव्य उत्तम सुगंध पुष्पांच्या ब

हुन वेली असून देवयोनींतील सिद्ध व गंधर्व हे तेथें रहात होते तसेच त्या शिखरावर चहूंकडे हरिणांचे कळप संचार करीत असत; व तेथील सर्व वृक्षांवर भ्रमर उंच स्वरानें मंजुळ गुंजारव शब्द करीत असत.

दिव्यप्रस्रवणोपेतं दीर्घिकाभिरलंकृतं॥ नानापक्षिगणाकीर्णं चक्रवाकोपशोभितं॥ ३०३॥

अर्थ- त्याच प्रमाणें तेथें सर्वत्र उत्तम झरे वहात असत; तशाच जागोजागीं त्या स्थलीं मोठमोठ्या विहिरी शोभत होत्या; आणि चमत्कारिक अनेक पक्ष्यांचे समुदायानीं तें हिमाचलाचें शिखर व्याप्त होतें; व तेथें चक्रवाक पक्षी ही तसेच सर्वत्र शोभत होते.

जलजस्थलजैः पुष्पैः प्रोत्फुल्लैरुपशोभितं॥ चित्रकंदरसंस्थानं गुहागृहमनोहरं॥ ३०४॥

अर्थ- तसेंच तें शिखर उदकांत व स्थलांत उत्पन्न होणाऱ्या कमलादिक अनेक प्रफुल्लित पुष्पांनीं सुशोभित होतें; आणि विचित्र गुहांच्या उत्तम स्थितीनें युक्त असून तें शिखर त्या गुहांतील सुंदर घरांनीं रमणीय दिसत असे.

विहंगसंघसंघुष्टं कल्पपादपसंकटं॥ तत्रापश्यन्महाशाखं शाखिनं हरितच्छदं॥ ३०५॥

अर्थ- आणि तें पर्वत शिखर नाना प्रकारच्या पक्ष्यांचे समुदायानीं निरंतर नादित असून बहुत कल्पवृक्षानीं व्याप्त होतें; अशा त्या शिखरावर पार्वतीनें एक वृक्ष पाहिला. त्या वृक्षास मोठ मोठ्या फांद्या असून त्याचीं पानें हिरवीं गार होतीं.

सर्वर्तुकुसुमोपेतं मनोरथशतोज्वलं॥ नानापुष्पसमाकीर्णं नानाविधफलान्वितं॥ ३०६॥

अर्थ- तशींच त्या महा वृक्षास सर्व ही ऋतूंत सारखीं फुलें येत असून तो लोकांचे शतशः मनोरथ पूर्ण करण्या मुळें मोठ्या कीर्तीनें प्रसिद्ध होता; आणि अनेक पुष्पांनीं सर्वत्र व्याप्त असून तो वृक्ष सर्वदा बहुत फलानीं युक्त असे.

न तं सूर्यस्य रुचिभिर्भिन्नसंहत पल्लवं॥ तत्रांबरा-

णिसंत्यज्यभूषणानिवशैलजा ॥ ३०७ ॥ संवीताव-
ल्कलैर्दिव्यैर्दर्भनिर्मितमेखला ॥ त्रिःस्नात पाटलाहा
राबभूवशरदांशतं ॥ ३०८ ॥

अर्थ- तो वृक्ष तस्याच त्या वृक्षान्च्या सर्व फांद्या फळांचे भारानें नम्र झाल्या असून सूर्य किरणानीं त्याचीं पानें निरनिराळीं दिसत असत; अशा त्या वृक्षासमीप येऊन पार्वतीनें आपल्या संपूर्ण वस्त्र भूषणांचा त्याग करून त्या वृक्षांचीं उत्तम वल्कलें नेसून दर्भाची मेखला ब्रह्मचारी या सारखी कंबरेस बांधली. आणि त्रिकाल स्नान करून तिणें पाडळीच्या वेलाचीं पुष्पें भक्षून शंभर वर्षे पर्यंत तप केलें.

शतमेकेनशीर्णेन पर्णेनावर्त्तयत्तदा ॥ निराहाराशतं
साभूत्सानानातपसांनिधिः ॥ ३०९ ॥

अर्थ- नंतर वृक्षाचें एक पिकलेलें गळून पडलेलें पान खाऊन शंभर वर्षे तपकेलें; पुढें कांहीं एक आहार न करितां तिणें शंभर वर्षे तपश्चर्या केली; तेव्हां याक्रमानें ती पार्वती अनेक तपांची स्थान भूत केवळ निधीच जाहली.

ततउद्वेजिताः सर्वेप्राणिनस्तत्तपोग्निना ॥ ततः स
स्मारभगवान्मुनीन्सप्तशतक्रतुः ॥ ३१० ॥

अर्थ- ते समयीं पार्वतीच्या त्या तपश्चर्यारूप अग्नीनें सर्व प्राणिमात्र भयभीत जाहले; असतां त्रैलोक्य संबंधि ऐश्वर्यानें युक्त इंद्रानें सप्तऋषींनें स्मरण केलें.

तेसमागम्यमुनयः सर्वेसमुदितास्ततः ॥ पूजिता
श्चमहेंद्रेणपप्रच्छुस्तं प्रयोजनं ॥ ३११ ॥

अर्थ- त्या कालीं ते सप्तर्षि सर्वही एकत्र मिळून इंद्राचे लोकीं आले; तेव्हां इंद्रानें त्या मुनींची पूजा केल्यावर ते ऋषी इंद्रास आपलें स्मरण झाल्याचें कारण विचारूं लागले.

किमर्थंतुसुरश्रेष्ठसंस्मृतास्तवयंत्वया ॥ शक्रः प्रो
वाचशृण्वंतुभगवंतः प्रयोजनं ॥ ३१२ ॥

अर्थ- कीं हे देवराज इंद्रा त्वां आमचें किमर्थ स्मरण केलें असें ऋषी

नीं विचारिलें असतां, इंद्र बोलला कीं, समर्थ ऋषीहो मला तुमचें स्मरण जाहल्याचें कारण ऐका.

हिमाचलेतपोघोरंतप्यतेभूधरात्मजा॥ तस्याश्च भिमतंकामंभवंतः कर्तुमर्हथ॥ ३१३॥

अर्थ- तें असें कीं, हिमालयाची कन्या पार्वती त्याच हिमाचल पर्वताव र घोरतप करीत आहे या साठीं तुम्हीं तिचा इच्छित मनोरथ पूर्ण करण्यास योग्य आहांत.

ततः समापतन्देव्या जगदर्थंत्वरान्विताः॥ तथेत्युक्त्वातुशैलेंद्रं सिद्धसंघातसेवितं॥ ३१४॥

अर्थ- असें इंद्राचें भाषण ऐकल्यावर तत्क्षणीं ते सप्त ऋषी त्या पार्वती पासून जगाचें हित होण्या साठीं इंद्रास तथास्तु ह्मणून सिद्धांचे समुदाया नीं युक्त अशा हिमालय पर्वतावर त्वरेनें अकस्मात् आकाशमार्गें आले.

ऊचुरागत्यमुनयस्तामथोमधुराक्षरं॥ पुत्रिकिंतेव्यवसितः कामः कमललोचने॥ ३१५॥

अर्थ- आणि ते मुनि पार्वतीचे आश्रमांत येऊन तिला मधुर वाणीनें बोलले कीं, हे कमल नयने मुली तूं आपले मनांत कोणत्या कार्या विषयीं निश्चय करून हें उग्र तप करीत आहेस.

तानुवाचततोदेवीसलज्जाचित्रवाङ्मुखी॥ तपस्यतोमहाभागाः प्राप्यमौनंभवादृशान्॥ ३१६॥ वंदनायनियुक्ताधीः पावयत्यविकल्पितं॥

अर्थ- मग ते समयीं पार्वती लज्जा युक्त होत्साती चमत्कारिक वाणीनें त्या सप्त ऋषींस बोलली कीं, महा भाग्यवंत ऋषीहो तुह्मा सारखे महा तपस्वी ऋषी घरीं आले असतां मौन धारण करून तुह्मास नमस्कार करण्या विषयीं योजलेली बुद्धि सर्व लोकांस निश्चयानें पवित्र करित्ये.

प्रश्नोन्मुखत्वाद्भवतांयुक्तमासनमादितः॥ ३१७॥ उपविष्टाः श्रमोन्मुक्तास्ततः प्रक्ष्यथमामतः॥

अर्थ- असो आतां आपण मला प्रश्न करण्या विषयीं आलां आहांत तेव्हां या कालीं आरंभीं तुह्मांस आसन देणें युक्त आहे; आणि असे तुह्मीं

आसनावर बसून श्रमांतून मुक्त झाल्यावर आपण मला यथेच्छ प्रश्न करा.

इत्युक्त्वासात तश्चक्रे कृतासनपरिग्रहान्॥ ३१८॥ सा-
तुनान्विधिवत्पूज्यान्पूजयित्वाविधानतः॥ उवाचादि-
त्यसकाशान्मुनीन्सप्तसती शनैः॥ ३१९॥

अर्थ:- असें भाषण करून पार्वतीनें त्या सात ऋषींस आसनें दिलीं, पश्चा-
त् आसनांवर बसलेल्या त्या पूज्य ऋषींची यथाविधि पूजा करून ती पार्वती-
सूर्या सारख्या त्या सात ऋषींस हळूच मर्यादेनें बोलूं लागली.

त्यक्त्वाव्रतात्मकंमौनं मौनंजग्राह ह्रीमयं॥ भावंतस्या
स्तमौनांतं तस्याः सप्तर्षयोयथा॥ ३२०॥ गौरवाधीन
तांप्राप्ताः पप्रच्छुस्तांपुनस्तथा॥

अर्थ:- त्या वेळेस तपांतील व्रत संबंधि मौनाचा त्याग करून तिणें लज्जा
युक्त मौन धारण केलें तेव्हां ते सप्तर्षि आपल्या आगमन काला पासून त्या पा
र्वतीचा नमस्कारादिक मौन विसर्जनांत शब्द मनोभाव पाहून तसेंच तिणें-
केलेल्या गौरवानें जसे ते सप्तर्षी पार्वतीच्या स्वाधीन झाले तश्या रीतीनें त्या
मुनींनीं तिला पुनः कांहीं प्रश्न केले.

सापिगौरवगर्भेणमनसाचारुहासिनी॥ ३२१॥ मुनी
न्शांतकथालापान्प्रोवाचप्रोझ्यवाग्यमम्॥

अर्थ:- ते समयीं ती सुंदर हास्य मुखी पार्वती ही आपलें वाणी संबंधी मौ
न सोडून, परस्परें लौकिक वार्तेच्या भाषणा पासून निवृत्त जाहलेल्या त्या ऋ
षींस गौरव युक्त मनानें बोलूं लागली.

भगवंतो विजानंति प्राणिनां मानसं हितं॥ ३२२॥ मनो-
वागभिरत्यर्थंकंदर्प्यंते हि देहिनः॥

अर्थ:- कीं, ऋषी हो तुह्मीं त्रिकाल ज्ञानाचे ऐश्वर्यानें समर्थ असल्या मुळें सर्व
प्राणि मात्रांच्या मनांतील हित जाणतां; तेव्हां या लोकांत पहा कीं, किती एक प्रा
णी आपल्या मन व वाणी इत्यादिक इंद्रियांनीं सुख होण्या साठीं निरंतर तर-
मळ मात्र करितात.

केचित्तुनिपुणास्तत्र घटंतेविबुधोद्यमैः॥ ३२३॥ उपायै
र्दुर्लभान्भावान्प्राप्नुवंति त्यनंद्रिताः॥

अर्थ- आणि त्यांत जे कोणी चतुर आहेत; ते त्या विषयीं अनेक दैविक उपायांनीं निरंतर आलस्य रहित होऊन प्रयत्न करितात; तेणें करून तीं स्वरूपें दुर्लभ असून ही त्या उद्योगी पुरुषांस प्राप्त होतात.

अपरेतु परिच्छिन्ना नानाकारात्मकपक्रमाः॥ ३२४॥ देहांतरार्थमारंभमापतंति हितप्रदं॥

अर्थ- तसेच त्यांहून इतर जे कोणी अल्प प्राणी आहेत ते आत्मस्वरूपार्थ अनेक प्रकारच्या उद्योगां विषयीं उपक्रम करून जन्म जन्मांतरीं स्वरूप होण्यासाठीं प्रयत्न करितात.

ममत्वाकाशसंभूतपुष्पदामविभूषितं॥ ३२५॥ वंध्यासुतंप्राप्तुकामा मनः प्रसरते मुहुः॥

अर्थ- तसेंच माझेंही मन वारंवार दुर्लभ अर्था विषयीं धांवत आहे. त्यास दृष्टांत "जशी एकादी स्त्री वंध्या असून ती आकाशास आलेल्या फुलांच्या मालानीं सुशोभित असा पुत्र आपणास होण्याची इच्छा करिते तसें"

अहं किल भवं देवं पतिं प्राप्तुं समुद्यता॥ ३२६॥ प्रकृत्येव दुराधर्ष तपस्यंतं तु संप्रति॥

अर्थ- तें असें कीं, प्राणिमात्रांस उत्पन्न करून त्यांस ऐश्वर्य देणारा देव जो शिव तो पति मला प्राप्त व्हावा एतदर्थ मी तपश्चर्ये विषयीं उद्युक्त झाहल्यें आहें. आणि तो शंकर मुळींच स्वभावानें दुर्धर असून त्यांत सांप्रत काळीं तर ब्रह्मचर्य व्रत धारण करून तप करीत आहे.

सुरासुरैरनिर्णीतपरमार्थक्रियाश्रयं॥ ३२७॥ सांप्रतं चापि निर्दग्धमदनं वीतरागिणं॥ कथमाराधयेदीशं मादृशीतादृशं शिवं॥ ३२८॥

अर्थ- आणि देव व असुर यानीं निर्णय पूर्वक न जाणलेल्या ज्या परमार्थरूप क्रिया त्यांस तो शिव आश्रय भूत असून सांप्रत काळीं त्यानें मदनासही जाळून वैराग्याचा अंगिकार केला आहे; असा जो सर्वेश्वर शंकर त्यानें आराधन मजसारिख्या अल्प मति स्त्रीस कसें घडेल.

इत्युक्त्वा मुनयस्तेतु स्थिरतां मनसस्ततः॥ ज्ञातुमस्या वचः प्रोचुः प्रक्रमात्प्रकृतार्थकं॥ ३२९॥

अर्थ- असें पार्वतीनें भाषण केलें असतां मग ते सप्तऋषी त्या पार्वती च्या मनाची शिवा विषयीं स्थिरता जाणण्या साठीं उपक्रमानें प्रकृत (चालू) विषयास उपयुक्त असें भाषण करूं लागले.

मुनय ऊचुः ॥ द्विविधं तु सुखं तावत्पुत्रि लोकेषु भाष्यते ॥ शरीरस्यास्य संभोगे श्चेतसश्चापि निर्वृतिः ॥ ३३०

अर्थ- कीं, मुलि या लोकांत काय तें पूर्ण सुख दोन प्रकारचेंच आहे; यांत अनेक उत्तम भोगानीं देहास सुख होतें आणि दुसरें शांति आदिकरून मनास सुख होतें.

प्रकृत्या स तु दिग्वासा भीमः पितृवनेशयः ॥ कपाली भिक्षुको नग्नो विरूपाक्षो स्थिरक्रियः ॥ ३३१ ॥

अर्थ- आणि हा महादेव तर मुळा पासून दिगंबर असून स्वभावानें ही महा भयंकर आहे; तसाच सर्वदां स्मशानांत निद्रा करितो हातांत नरक पाल घेऊन भिक्षा वृत्तीनें कालक्रमण करितो; निरंतर नग्न असतो व त्याचे नेत्र भयंकर असून त्याचें एकही कर्म स्थिर नाहीं.

प्रमत्तोन्मत्तकाकारो बीभत्सकृतसंग्रहः ॥ यतिनानेनकः स्वार्थो मूर्त्तानर्थेन कांक्षितः ॥ ३३२ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें तो शिव अतिशयें असावध किंवा उन्मत्त यांच्या सारख्या आकृतीनें वर्तत असून त्यानें आपले जवळ पिशाचादिक बिभत्स लोकांचा संग्रह केला आहे; असा निरंतर संन्यास वृत्तीनें वागणारा जो गृहस्थाश्रमास विरुद्ध केवळ मूर्तिमान् अनर्थ रूपी सदाशिव त्याच्या समागमानें प्रपंचांत मुलि पार्वती त्वां कोणता स्वार्थ मानला आहेस.

यदि त्वस्य शरीरस्य भोगमिच्छसि सांप्रतं ॥ तत्कथं ते महादेवात् भयभाजो जुगुप्सितात् ॥ ३३३ ॥ स्रवद्रक्तवसाभ्यक्तकपालकृतभूषणात् ॥ श्वसदुग्रभुजंगेंद्रकृतभूषणभीषणात् ॥ ३३४ ॥ स्मशानवासिनो रौद्रप्रमथानुगतात्सति ॥

अर्थ- हे पार्वति आतां कदाचित् तूं या शिवाच्या शरीराचे संगानें सुखाची

इच्छा करीत असलीस तर हे पतिव्रते त्या महादेवा पासून ह्या तुझ्या सुखाचा मनोरथ कसा पूर्ण होईल कारण तो शिव स्वरूपतः भयंकर असल्या मुळें वि षय सुखा विषयी निंद्य आहे आणि त्याणें निरंतर नरकपालांची माळा धारण केली असल्ये त्यांतून रक्त व चर्बी हीं नेहेमीं गळत असतात; तसे विषयुक्त फु त्कार टाकणाऱ्या उग्र महा भुजंगांच्या धारण केलेल्या भूषणानीं तो शिव अति भयंकर दिसत आहे. त्याच प्रमाणें तो शिव निरंतर स्मशानांत वास करीत- असतो व त्या शिवा बरोबर अत्यंत क्रूर प्रमथादिक गण संचार करीत अस तात.

सुरेंद्रमुकुटव्रातनिघृष्टचरणोरिहा ॥ ३३५ ॥ हरिर स्ति जगद्धाता श्रीकांतोनंतमूर्तिमान् ॥ नाथोयज्ञभु जामस्ति तथेंद्रः पाकशासनः ॥ ३३६ ॥

अर्थ- यास्तव हे पार्वती जो देवांच्या सर्व शत्रूंस मारून सर्व भक्तांचीं दुःखें दूर क रणारा आहे. आणि तो विष्णु सर्व यज्ञांचें फल ग्रहण करणाऱ्या सकल देवांचा स्वामी असून समग्र चराचर जगाचें पालन व पोषण करितो तसाच तो वि ष्णु साक्षात् जगज्जननी जी महा लक्ष्मी तिचाही नाथ आहे; ह्मणून सर्वही श्रेष्ठ देव विष्णूचे चरणावर मस्तक ठेवितात तेव्हां त्या सर्व देवांच्या मुकुटांचें त्याचे पायांस घर्षण होत असतें असा तो विष्णु अनंत मूर्ति आहे. ह्मणूनच त्याच्या महात्म्याचा कोणासही अंत नाहीं त्याच प्रमाणें पाक दैत्याचें शासन करणारा इंद्रही देवांचा महान् राजा आहे.

देवतानां निधिश्चास्ति ज्वलन सर्वकामकृत् ॥ वायुरस्ति जगद्धाताद्यः प्राणाः सर्वदेहिनां ॥ ३३७ ॥

अर्थ- आणि अग्नि सर्व देवांच्या रहाण्याचें स्थान असून सर्वांचे द्रव्य ला भादिक मनोरथ पूर्ण करतो; व या जगाचें धारण करणारा वायु सर्व प्रा णि मात्रांस वांचवितो.

तथावैश्रवणो राजा सर्वार्थमतिमान्विभुः ॥ एभ्य एकतमं कस्मात् नत्वं संप्राप्तुमिच्छसि ॥ ३३८ ॥

अर्थ- तसाच धनाधिपति कुबेर सर्व कार्यां विषयीं अति बुद्धि चातुर्या नें युक्त असून उत्तर दिशेचा समर्थ अधिपति आहे. तेव्हां हे पार्वती तूं

यांतून कोणा एकास ही कां इच्छित नाहींस.

उत्तानदेहसंप्राप्यासत्वंनमनसेप्सितं॥ एवमेतत्त वाप्यत्रप्रभवोनाकसंपदां॥३३९॥

अर्थः— आणि निरंतर स्मशानादिक स्थलांत उताण्या देहानें निजणाऱ्या त्या महा देवाचे समागमा पासून तुला यथेच्छ सुख होणार नाहीं हें शिवाच्या संगाचें फल असें आहे. आणि तुझ्या या हिमालया वर नर स्वर्गसंपत्तीचे मक्ष रहात आहेत.

अस्मिन्नेहपरत्रापिकल्याणप्राप्तयस्तव॥ पितुरेवाक्षितसर्वसुरेभ्योयन्नविद्यते॥३४०॥

अर्थः— तसेंच दुसरें असें आहे कीं, जें ऐश्वर्य देवांस ही प्राप्त नाहीं तें तुझ्या पित्यास (हिमालयास) अनुकूल आहे. आणि या शिवाचे घरीं तुला उभय लोकांतील कोणत्याही कल्याणांची प्राप्ती होणार नाहीं.

अतस्तत्प्राप्तये क्लेशःसवाप्यत्राफलस्तव॥ प्रायेण प्रार्थितोभद्रेसुस्वल्पोत्यतिदुर्लभः॥३४१॥

अर्थः— यास्तव त्या महा देवाच्या प्राप्त्यर्थ तुझा हा सर्व प्रयास सुखा विषयीं निष्फलच आहे. आणि हे कल्याणरूपे तुझी ही शिवा विषयीं प्रार्थना अतिशयें क्षुद्र असून त्याच्या वैराग्या मुळें सर्वथा प्रायशः दुर्लभ ही दिसत आहे.

अस्यतेविधियोगस्यधाताकर्तात्रचैवहि॥ सूतउवाच॥ इत्युक्त्वा सातुकुपितामुनिवर्येषुशैलजा॥३४२॥ उवाचकोपरक्ताक्षीस्फुरद्भिर्दशनच्छदैः॥

अर्थः— तस्मात् आतां या तुझ्या विवाह विधीची सिद्धि करण्या विषयीं ब्रह्मदेवच समर्थ आहे, असें त्या सप्त ऋषींनीं भाषण केलें असतां ती हिमालय कन्या पार्वती त्या श्रेष्ठ ऋषीं वर अत्यंत क्रुद्ध जाहली. आणि कोपानें तिचे नेत्र आरक्त जाहले. तसेंच ओंठ स्फुरण पावूं लागले अशी ती पार्वती त्या कालीं त्या ऋषींस बोलली.

देव्युवाच॥ असद्ग्रहस्यकाप्रीति र्व्यसनस्यकयंत्रणा॥३४३॥ विपरीतार्थबोद्धारःसत्पथेकेनयो

जिताः॥

अर्थ- कीं, ऋषीहो ज्याचे अंतःकरणांत दुराग्रह उत्पन्न जाहला त्याच्या प्रीतीचा विचार तो काय? आणि मग त्याच्या दुःखाची समाप्ती ती कोठें होणार. हें असो परंतु असा विपरित अर्थाचा उपदेश लोकांस करण्या विषयीं सन्मार्गांत तुह्मास कोणी योजिलें.

एवंमांवेत्थदुष्प्रज्ञांह्यस्थानासद्गृहप्रियां॥ ३४४॥ नमां प्रतिविचारोस्तियत्रेहासद्गृहाविती॥

अर्थ- तस्मात् ऋषीहो मी मंदबुद्धि आहें असें तुह्मी जाणावें ह्मणूनच अयोग्य स्थाना विषयीं माझे अंतःकरणांत शिवा विषयींच प्रीतीचा हा दुराग्रह उत्पन्न जाहला आहे. आणि दुसरें असें आहे कीं, अनुचित इच्छा व अहंता ममतादिक दुराग्रह हे दोष ज्या पासून गेले आहेत त्या शिवा विषयीं किमपि विचार करण्याचें मला कारण नाहीं.

प्रजापतिसमाः सर्वेभवंतः सर्वदर्शिनः॥ ३४५॥ नूनं नवेत्थतंदेवं शाश्वतंजगतः प्रभुं॥

अर्थ- तसेच तुह्मीं सर्वही ब्रह्मदेवा समान सर्वज्ञ असून सकलचराचर जगाचा प्रभुजो अविनाशी देव शिव त्यास तुह्मी जाणतच नाहीं काय?

अजमीशानमव्यक्तममेयमहिमोदयं॥ ३४६॥ आस्तांतत्धर्मसद्भावसंबोधस्तावदद्भुतः॥

अर्थ- आणि त्या शिवास जन्म नसून तो सर्व जीवांचा स्वामी आहे तसाच तो शिव स्वतः ऐश्वर्यादिकानें लोकांत प्रसिद्ध नसून आपले भक्तांस अपार ऐश्वर्य देतो त्या शिवाच्या औदार्यादिक धर्म संबंधि उत्तमस्थितीचा अद्भुत बोध आतां पुरे.

विदर्यन्नहरिब्रह्मप्रमुखाहिसुरेश्वराः॥ ३४७॥ यत्तस्यविभवात्स्वोत्थंभुवनेषुविजृंभितं॥ प्रकटंसर्वभूतानां तदप्यत्रनवेत्थकिं॥ ३४८॥

अर्थ- कारण विष्णु व ब्रह्म देव इत्यादिक श्रेष्ठ देव त्या शिवास जाणत नाहींत कीं काय? अशा त्या शिवाचे स्वकीय वैभवा पासून उत्पन्न जाहलले आश्चर्यकारक महात्म्य सर्व भुवनांत अतिशयें पसरलें आहे असें सर्व भूतां

त प्रगट रूपानें राहिलेलें शिवाचें माहात्म्य तुह्मी जाणत नाहीं काय?

कस्यैतद्गगनंमूर्तिः कस्याग्निः कस्यमारुतः॥ कस्यभूः कस्यवरुणः कश्चंद्रार्कविलोचनः॥३४९॥

अर्थ- तसेंच हें आकाश कोणाचें रहाण्याचें स्थान आहे. आणि अग्नि, वायु, पृथ्वी व वरुण हीं कोणाचीं प्रतिमे सारखीं स्थानें आहेत. तसे हे चंद्र, सूर्य कोणाचे नेत्र आहेत.

कस्यार्चयंति लोकेषु लिंगं भक्त्या सुरासुराः॥ यंब्रुवंतीश्वरंदेवाविधींद्राद्यामहर्षयः॥३५०॥ प्रभावंप्रभवं चैवतेषामपिनवेत्सिकिं॥

अर्थ- त्याच प्रमाणें सर्व लोकांत देव व असुर हे सर्वही भक्तीनें कोणाच्या लिंगाची पूजा करितात; तसेच ब्रह्मदेव व इंद्र इत्यादिक देव व नारदादिक सर्व महर्षी हे ज्या शिवास ईश्वर असें म्हणतात त्या समग्र देव व ऋषि यांचाही प्रताप व ऐश्वर्य हें तूं जाणत नाहींस काय?

अदितिः कस्य मातेयंकस्माज्जातो जनार्दनः॥३५१॥ अदितेः कश्यपाज्जातांदेवानारायणादयः॥

अर्थ- आणि अदिति ही कोणाची माता आहे; व विष्णु कोणा पासून उत्पन्न जाहला; तसेच कश्यप ऋषी पासून अदितीला नारायणादिक देव झाले.

मरीचेः कश्यपः पुत्रोह्यदितिर्दक्षपुत्रिका॥३५२॥ मरीचिश्चापिदक्षश्च पुत्रौतौ ब्रह्मणः किल॥

अर्थ- कश्यप हा मरीचि ऋषीचा पुत्र असून अदितीही दक्षाची कन्या आहे; आणि मरीची व दक्ष हे ब्रह्मदेवाचेच पुत्र आहेत.

ब्रह्माहिरण्मयात्खंडाद्दिव्यसिद्धिविभूतिकात्॥३५३॥ कस्यप्रादुरभूत्ध्यानात्प्रक्षुब्धाः प्राकृतांशकाः॥

अर्थ- तसाच सुवर्णमय अंडा पासून ब्रह्मदेव उत्पन्न झाला; या ब्रह्मांडांत दिव्य अणिमादिक अनेक सिद्धि व बहुत विभूतिही आहेत. आणि कोणाच्या इच्छेनें प्रकृतीचे सर्व अंश उत्पन्न होऊन ते अतिशयें क्षुब्ध जाहले.

प्रकृतौतुतृतीयायांमधुद्विड्जननक्रिया॥३५४॥ जातासर्जषड्वर्गान्बुद्धिपूर्वान्स्वकर्मजान्॥

अर्थ- तसेंच मधुदैत्याचा द्वेष करणाऱ्या विष्णूपासून तिसऱ्या तमोगुणमय प्रकृतींत सर्व जीव उत्पन्न होण्याच्या क्रियेस आरंभ जाहला; पुढें त्या क्रियेनें जी वांच्या स्वकर्मानुसार, त्यांच्या बुद्धींत उत्पन्न होणारे काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर यांस उत्पन्न केलें.

अजातकोभवद्देधाब्रह्मणोव्यक्तजन्मनः॥३५५॥यः
स्वयोगेनसंक्षोभ्यप्राकृतंकृतवानिदं॥

अर्थ- सर्वांची उत्पत्ती ज्या पासून स्पष्ट रीतीनें झालेली दिसत नाहीं; त्या ब्रह्मा पासून ब्रह्मदेव उत्पन्न जाहला. मग त्या ब्रह्मदेवानें आपले योगानें प्रकृतीस क्षुब्ध (उद्विग्न) करून त्या पासून हें सर्व चराचर जग उत्पन्न केलें.

ब्रह्मणः सिद्धसर्वार्थमैश्वर्यलोककर्तृतां॥३५६॥वि
दुर्विष्ण्वादयोयच्चस्वमहिम्नासदैवहि॥

अर्थ- त्या ब्रह्मदेवास सर्व प्रकारचें सिद्ध ऐश्वर्य व सर्व लोकांचें कर्तृत्व ही आहे आणि विष्णु आदिकरून सर्व देव आपापले महात्म्यानुरूप निरंतर जें जाणतात.

कृत्वान्यंदेहमन्यादृक्ताहृक्कृत्वापुनर्हरिः॥३५७॥
कुरुतेजगतःकृत्यमुत्तमाधममध्यमं॥

अर्थ- त्या प्रमाणें विष्णु, प्रकृति व जीव या इतरांस अवलोकन करून ब्रह्मांड विग्रह व प्रत्येक जीवांचे भिन्न देह उत्पन्न करितो आणि तोच विष्णु पुनः तसेंच पूर्ववत् या चराचर जगाचें उत्तम, मध्यम व कनिष्ठ असें तीन प्रकारचें कृत्य वारंवार करितो.

एवमेवहिसंसारोयोजन्मरणात्मकः॥३५८॥कर्मण
श्चफलंह्येतत्नानारूपसमुद्भवं॥

अर्थ- असाहा जन्म व मरणमय संसार, कर्माचें फल असून या संसारांत जीवांस प्रतिजन्मींही त्या त्या कर्मानुसार बाल्यादिक अनेक रूपें प्राप्त होतात.

अथनारायणोदेवःस्वकांछायांसमाश्रयत्॥३५९॥
तत्प्रेरितःप्रकुरुतेजन्मनानाप्रकारकं॥

अर्थ- नंतर तो देव नारायण आपल्या छायारूप मायेचा आश्रय करून तिला प्रेरणा करून या जगाची अनेक प्रकारें उत्पत्ति करितो.

सापिकर्मणएवोक्ता प्रेरणी विवशात्मनां॥३६०॥य-
थोन्मादादिदुष्टस्यमतिरेवहिसा भवेत्॥

अर्थ-ती मायाही विषयासक्त पुरुषांच्या कर्मासच प्रेरणा करीत असते. ती-अशी कीं, "जशी उन्मादादिक दोषयुक्त पुरुषाची ती विपरीत बुद्धीच त्यास वर्तविते नशी" ती माया त्या जीवांस कर्मा विषयीं प्रेरणा करिते.

इष्टान्येवयथार्थानि विपरीतानिमन्यते॥३६१॥लोक
स्यव्यवहारेषुसृष्टेषु सहतेसदा॥

अर्थ-त्या मायेच्याच योगानें हे जीव स्वहित कारक यथार्थ कर्मे असून ती विपरीत अहित कारक आहेत असें मानतात. आणि मायेनें उत्पन्न जाहलेल्या लोकांच्या नाना प्रकारचे व्यवहारांत अनेक संकटें सर्व काल सहन करतात.

धर्माधर्म फलावाप्तो विष्णुरेवनिबोधितः॥३६२॥अ-
थानादित्वमस्यास्तिसामान्यात्तुत्तदात्मना॥

अर्थ-लोकांस धर्म व अधर्म यांचें फल प्राप्त होण्या विषयीं शास्त्रांत विष्णूचें च मुख्यत्वें स्वामित्व प्रतिपादन केलें आहे. कारण सर्व साधारण प्रकारानें सर्वांस फल देण्याचे स्वरूपानें विष्णूस अनादित्व आहे.

नत्वस्यजीवितंदीर्घंदृष्टंदेहेतुकुत्रचित्॥३६३॥भव
द्भिर्यस्यनोदृष्टमंतमग्रमथापिवा॥

अर्थ-तसेंच ह्या देवगणाच्या देहा विषयीं चिरकाल जीवित कोठेंही दिसत नाहीं, आणि तुम्हीं ज्याची उत्पत्ती व अंत पाहिला नाहीं त्यास तुमच्या दृष्टीनें अनादित्व आहे.

देहिनांधर्मएवैषक्वचिज्जायेत्क्वचिन्म्रियेत्॥३६४॥
क्वचिद्गर्भगतोनश्येत्क्वचिज्जीवेज्जरामयः॥

अर्थ-परंतु जे देही आहेत त्यांचा स्वभाव सिद्ध हा धर्मच आहे कीं, तो प्राणी केव्हां उत्पन्न होतो, केव्हां मरण पावतो, कदाचित गर्भांतच असतां नाश पावतो; आणि क्वचित् जरा व रोग यानीं युक्त असून वांचतो.

क्वचित्समाः शतंजीवेत्क्वचिद्बाल्ये विपद्यते॥३६५॥
शतायुः पुरुषोयस्तुसोनंतः स्वल्पजन्मनः॥

अर्थ-तसाच कोणी शंभर वर्षें पर्यंत वांचतो व कोणी बालवयांतच मृत्यु-

पावतो आणि जो पुरुष शंभर वर्षे वांचतो, तो अल्पायूंच्या दृष्टीनें अमर दिसतो.

जीवितोनम्रियत्यग्रेतस्मात्सोमरउच्यते ॥ ३६६ ॥ अ
दृष्टजन्मनिधनात्येवं विष्ण्वाद्योमताः ॥

अर्थ- तस्मात् जो पुरुष जिवंत असून पुढें अल्प कालांत मरण पावत नाहीं; ह्मणून त्यास लोकांत अमर असें ह्मणतात. तर या प्रमाणें विष्णु आदिकरून देवांचें जन्म व मरण हें लोकांच्या दृष्टीनें दिसत नाहीं. यास्तव ते देव अमरत्वें करून लोकांत मान्य आहेत.

एतत्संशुद्धमैश्वर्यंसंसारेकोलभेदिह ॥ ३६७ ॥ तत्रक्ष
यादियोगात्तुनानाश्चर्यस्वरूपिणि ॥

अर्थ- तेव्हां क्षया दिकांचे योगानें अनेक आश्चर्य रूप अशा या संसारांत जन्म मरण रहित असें अत्यंत शुद्ध ऐश्वर्य कोण पावेल.

तस्माद्विश्वरान्सर्वान्मलिनान्स्वल्पभूतिकान् ॥
३६८ ॥ नाहंभद्राः किलेच्छामिऋतेशर्वात्पिनाकिनः ॥

अर्थ- तस्मात् कल्याण कारक ऋषी हो मी पिनाक धनुष्य धारण करणाऱ्या त्या एका शिवा वांचून इतर अति अल्प ऐश्वर्यानें युक्त असून जन्मादि दोषानीं व्याप्त अशा स्वर्गवासी देवांस निश्चयें करून इच्छित नाहीं.

स्थितंचतारतम्येनप्राणिनांपरमंत्विदं ॥ ३६९ ॥ धीब
लैश्वर्यकार्यादिप्रमाणंमहतांमहत् ॥

अर्थ- कारण बुद्धि, बल, ऐश्वर्य व कार्य इत्यादिकांचें प्रमाण "जसें सर्व साधारण प्राणिमात्रांत तारतम्यानें त्यांच्या योग्यतानुरूप कोठें न्यून व कोठें अधिक आहे तसें." हेंच या मोठ मोठ्या देवांत ही त्यांच्या योग्यतानुसार एकापेक्षां एकाचें ऐश्वर्य मोठें आहे.

यस्मान्नकिंचिदपरंसर्वंयस्मात्प्रवर्तते ॥ ३७० ॥ य
स्यैश्वर्यमनाद्यंतंतमहंशरणंगता ॥

अर्थ- तर ज्या पेक्षां दुसरें तत्वश्रेष्ठ नाहीं; आणि ज्या पासून सर्व जगाचें कार्य चालू होतें; असें उत्पत्ति नाश रहित ज्याचें ऐश्वर्य आहे, त्या देवास मी शरण प्राप्त झाल्यें आहें.

एषमेव्यवसायश्चदीर्घोतिविपरीतकः ॥ ३७१ ॥ याल

वातिष्ठतेवाथमुनयोमद्विधायकाः॥

अर्थ- तेव्हां ह्यामाझा निश्चित उद्योग बहुकाळापासून असून अत्यंत विपरीत ही आहे; तस्मात् मला बोध करणारे ऋषीहो तुह्मी आतां जा किंवा रहा.

एवंनिशम्यवचनंदेव्यामुनिवरास्तदा॥३७२॥आनंदाश्रुपरीतास्ताःसस्वजुस्तांतपस्विनीं॥ऊचुश्चपरमप्रीताःशैलजांमधुरंवचः॥३७३॥

अर्थ- असें त्या पार्वतीचें भाषण श्रवण करून ते मुनिश्रेष्ठ सप्तऋषि त्या काळीं आनंदाश्रूनीं युक्त होत्साते त्या तपस्विनी पार्वतीस आलिंगन करून अत्यंत संतुष्ट जाहले आणि ते ऋषि पार्वतीस मधुर वाणीनें बोलतात.

ऋषयऊचुः॥ अत्यद्भुतास्यहोदेविज्ञानमूर्तिरिवामला॥प्रसादयतिनोभावंभवभावप्रतिश्रयात्॥३७४॥

अर्थ- कीं, हे पार्वती तूं केवल अनुभव ज्ञानाची अति अद्भुत निर्मल मूर्तिच आहेस तेणें करून शिवावरील आपले दृढ भक्तीनें आमच्या चित्तास प्रसन्न करित्येस.

नतुविद्मोवयंतस्यदेवस्यैश्वर्यमद्भुतं॥त्वन्निश्चयस्यदृढतांवेत्तुंवयमिहागताः॥३७५॥

अर्थ- हे पार्वती त्या महादेवाचें असें अद्भुत ऐश्वर्य आह्मी जाणत नाहीं असें नाहीं, परंतु त्या शिवा विषयीं तुझ्या भक्तियुक्त निश्चयाची दृढता समजण्यासाठीं आह्मीं येथें आलों.

अचिरादेवतन्वंगिकामस्तेयंभविष्यति॥क्वादित्यस्यप्रभायातिरत्नेभ्यःक्वद्युतिःपृथक्॥३७६॥

अर्थ- तर आतां हे पार्वती त्वां ज्या इच्छेनें आपलें अंग तपानें कृश केलें आहेस, तो तुझा मनोरथ त्वरितच पूर्ण होईल; कारण सूर्याची कांति त्यास सोडून कोठें जाती तसेंच रत्नाचें तेज त्याहून निराळें कोठें असतें.

क्वार्थोवर्णालिकाव्यक्तःकथंत्वंगिरिशंविना॥यामोनेकाभ्युपायेनतमभ्यर्थयितुंवयं॥३७७॥

अर्थ- आणि अर्थ हा वर्णांची पंक्ती सोडून कोठें स्पष्ट दिसतो तशीच तूं शिवा वांचून कशी रहाशील; तेव्हां सांप्रत कालीं आह्मीं अनेक उपायानीं

तुझा शिवानें अंगिकार करावा.या साठीं त्याची प्रार्थना करावयास आलों.

असाकमपिवैषोर्थःसुतरांहृदिवर्तते॥ अतस्त्वमेव साबुद्धिर्यतोनीतिस्त्वमेवहि॥ ३७८॥

अर्थ- कारण ही गोष्ट आमच्याही अंतःकरणांत बहुत इष्ट आहे. तस्मात् सर्व नीति व बुद्धी यांची देवता तूंच आहेस.

अतोनिःसंशयंकार्यंशंकरोपिविधास्यति॥ इत्युक्ताः पूजितायातामुनयोगिरिकन्यया॥ ३७९॥

अर्थ- ह्मणूनच शंकरही या कार्याचा निःसंशय स्वीकार करील; असें ऋषींनीं भाषण केलें असतां त्या पार्वतीस परमानंद जाहला. आणि तिणें त्यांची पूजा केल्यावर ते मुनि त्वरेनें गेले.

प्रययुर्गिरिशंद्रष्टुंप्रस्थंहिमवतोमहत्॥ गंगांबुप्लाविता त्मानंपिंगबद्धजटासटं॥ ३८०॥

अर्थ- ते सप्तऋषि सदाशिवास अवलोकन करण्या साठीं त्याच हिमालय पर्वताच्या एका मोठ्या शिखरावर गेले; तों तेथें शिव बसला होता तो असा कीं, मस्तकीं पिंगट वर्ण जटांचा बुचडा बांधलेला असून त्यांतून भागीरथीचा प्रवाह सर्वांगा वरून चालला आहे.

भृंगानुयातपाणिस्थमंदारकुसुमस्रजं॥ गिरेःसंप्रा प्यतेप्रस्थंददृशुः शंकराश्रमं॥ ३८१॥

अर्थ- आणि ज्यांचे सुगंधानें भ्रमर एकसारखे मागून येत आहेत, त्या मंदार पुष्पांची माला त्या शिवाचे हातांत शोभत आहे ; असा तो शंकर जेथें बसला होता त्या शिखरावर येऊन सप्तर्षींनीं तेथें महादेवाचा आश्रम पाहिला.

प्रशांताशेषसत्वौघंनवस्तिमितकाननं॥ निःशब्दास्रो मसलिलप्रपातंसर्वतोदिशं॥ ३८२॥

अर्थ- तो असाकीं, त्या महादेवाच्या आश्रमांत सर्व शांत प्राण्यांचेच समुदाय सर्वत्र संचार करीत होते; आणि त्या आश्रमाचे आसमंतात् भागीं नवीन असून आर्द्र अशा तृण वृक्षादिक संपत्तीनें युक्त अरण्यें शोभत होतीं; तसेंच तेथें चोहीकडे अष्ट दिशांस कठोर शब्द न होतां स्थिर गतीनें चाललेल्या उदकांचे झरे कड्या

वरून वाहात होते.

तत्रापश्यंस्ततो द्वारि वीरकं वेत्रपाणिनं ॥ सप्त ते मुनयः पूज्या विनीताः कार्यगौरवात् ॥ ३८३ ॥

अर्थ- त्या आश्रमाचे द्वारांत त्या सात ऋषींनीं राजकीय चिन्हाची काठी हातांत घेऊन उभा राहिलेल्या वीरभद्रास पाहिलें; आणि ते लोक पूज्य मुनि आपल्या-कार्याचे गौरवास्तव त्या वीरभद्रास अत्यंत नम्र जाहले.

ऊचुर्मधुरभाषिण्या वाचा ते वाग्मिनां वराः ॥ द्रष्टुं वयमिहायाताः शरण्यं गणनायकं ॥ ३८४ ॥

अर्थ- आणि युक्तीनें भाषण करण्या विषयीं अतिशयें चतुर वक्त्यांत श्रेष्ठ असे ते सप्तर्षि मधुरवर्णयुक्त वाणीनें त्या वीरभद्रास बोलले कीं, आह्मीं, सर्व देवगणांचे नायक असून सर्व शरणांगतांचें रक्षण करण्या विषयीं परम योग्य अशा शिवाचें दर्शनार्थ आलों आहों.

त्रिलोचनं विजानीहि सुरकार्यप्रचोदिताः ॥ त्वमेव नो गतिस्त्वं यथा कालातिक्रमः ॥ ३८५ ॥

अर्थ- त्या त्रिनयन शिवाकडे आह्मीं देवकार्यार्थ इंद्राच्या आज्ञेवरून आलों; परंतु या कार्याविषयीं तूं आह्मास द्वार आहेस, तस्मात् जसें आतां इष्ट कालाचें अतिक्रमण होणार नाहीं, तसें या आमचे कार्यावर तूं लक्ष्य दे.

सत्कारितेषप्रायेण प्रतीहारमयः प्रभः ॥ इत्युक्तो मुनिभिः सोथ गौरवात्तानुवाच सः ॥ ३८६ ॥

अर्थ- असें त्या ऋषींनीं बहु सत्कारयुक्त वाणीनें वीरभद्रास भाषण केलें असतां पश्चात् तो द्वारपालरूपी वीरभद्र मोठ्या आदरानें त्या ऋषींस बोलतो.

समन्वास्यापरां संध्यां स्नातुं मंदाकिनीजले ॥ क्षणेन भविता विप्रास्तत्र द्रक्ष्यथ शूलिनं ॥ ३८७ ॥

अर्थ- ऋषी हो आतां दुसरी संध्या करून शिव क्षणमात्र कालानें भागीरथीच्या उदकांत स्नान करण्यासाठीं येईल तेव्हां तुह्मीं त्रिशूलधारी शिवास तेथें अवलोकन करा.

इत्युक्ता मुनयस्तस्थुस्ते तत्कालप्रतीक्षिणः ॥ गंभीरांबुधरप्रावृट् तृषिताश्चातकायथा ॥ ३८८

अर्थ- असें वीरभद्रानें भाषण केलें असतां ते सप्तऋषि त्या शिवाच्या दर्शन काळाची मार्गप्रतीक्षा करीत बसले; "जसे पर्जन्य कालीं अत्यंत तृषाक्रांत जाहलेले चातक पक्षी बहुत उदक धारण करणाऱ्या मेघांची मार्गप्रतीक्षा करितात, तसे."

ततःक्षणेननिष्पन्नसमाधानक्रियाविधिः॥ वीरासनंबिभेदेशोमृगचर्मनिवासितं॥ ३८९

अर्थ- नंतर क्षण मात्रानें तो शिव समाधान युक्त एकाग्र चित्तानें नियमित संध्यादि कर्मे करून कृष्णाजिना वरील आपलें वीरासन मोडिता जाहला.

ततोविनीतोजानुभ्यामवलंब्यमहीस्थितिं॥ उवाचवीरकोदेवंप्रणामैकसमाश्रयः॥ ३९०॥

अर्थ- तेव्हां वीरभद्र नम्र होत्साता गुडघे भूमीवर टेकून शिवास नमस्कार करून बोलतो.

संप्राप्तामुनयःसप्तत्वांद्रष्टुंदीप्ततेजसः॥ विभोसमादिशद्रष्टुमवगंतुमिहार्हसि॥ ३९१॥

अर्थ- कीं हे प्रभो देदीप्यमान महा तेजस्वी सात ऋषि तुझ्या दर्शनार्थ आले आहेत; त्यांस तूं आपले दर्शना विषयीं आज्ञा देऊन येथें आश्रमाचे द्वारांत येण्यास योग्य आहेस.

इत्युक्तोधूर्जटिस्तेनवीरकेणमहात्मना॥ भ्रूभंगसंज्ञयातेषांप्रवेशाज्ञांददौतदा॥ ३९२॥

अर्थ- असें त्या महा बुद्धिमान् वीरभद्रानें भाषण केलें असतां, त्या कालीं शिवानें आपल्या भोंवयीच्या संकेतानें त्या ऋषींस आश्रमांत येण्या विषयीं आज्ञा दिली.

मूर्धकंपेनतान्सर्वान्वीरकोपिमहामुनीन्॥ आजुहावाविदूरस्थान्दर्शनायपिनाकिनः॥ ३९३

अर्थ- तेव्हां त्या वीरभद्रानें ही आपलें मस्तक हालवून समीप प्रदेशीं उभे राहिलेल्या त्या मोठ्या सप्तऋषींस शिवाचे दर्शनार्थ बोलाविलें.

त्वराबद्धार्धचूडास्तेलंबमानाजिनांबराः॥ विविशुर्वेदिकांसिद्धांगिरिशस्यविभूतिभिः॥ ३९४॥

अर्थ- त्याकाळींते सात मुनि त्वरेनें आपल्या शिखा अर्ध्याच बांधून अंगावरील कृष्णाजिनें वस्त्रें तशींच खालीं लोंबत असून ते सप्तऋषी सर्व ऐश्वर्यानीं पूर्ण अशा शिवाचे आश्रमां तील तपास बसण्याच्या ओल्या समीप गेले.

बद्धपाणिपुटाक्षिप्तनाकपुष्पोत्करास्ततः॥ पिनाकिपादयुगलं यथानाकनिवासिनः॥ ३९५॥

अर्थ- आणि "जसे स्वर्गवासी देव शिव दर्शनास येतात तसे;" ते मुनि त्या वेळेस आपले अंजलि पुट जोडून त्या ओंजळींत स्वर्गांतील दिव्य अनेक पुष्पें भरून घेतलेलीं असून तीं त्यानीं शिवाचे चरणीं समर्पण करून नमस्कार केला.

ततः स्निग्धेक्षिताः शांता मुनयः शूलपाणिना॥ मन्मथारिं ततोत्दृष्टाः सम्यक् तुष्टुवुरादृताः॥ ३९६॥

अर्थ- मग त्या त्रिशूलपाणि शिवानें आपल्या दयार्द्र दृष्टीनें अवलोकन केलेले ते शांत सर्व मुनि हर्षयुक्त होत्साते उत्तम भक्ति पूर्वक आदरानें शिवास प्रसन्न करण्यासाठीं त्याची स्तुति करूं लागले; कारण त्यानें क्रोध आल्या मुळें मदन, देव कार्यार्थ आला असून ही त्यास जाळून दृढ वैराग्यानें तप आरंभिलें होतें.

मुनयऊचुः॥ अहो कृतार्था वयमेव सांप्रतं सुरेश्वरो यत्र पुरो भविष्यति॥ भवत्प्रसादामलवारिसेकतः फलेन काचित्तपसा नियुज्यते॥ ३९७॥

अर्थ- ती अशी कीं, अहो आह्मीच सांप्रत कालीं कृतार्थ जाहलों कारण हे शंकरा तूं सर्व देवांचा ईश्वर असून ही त्वां आज आह्मास प्रत्यक्ष दर्शन दिलें; असा तूं दीना विषयीं परम दयाळू आहेस ह्मणून आतां आमची एवढीच प्रार्थना आहे कीं, तुझ्या प्रसाद संबंधी शुद्ध उदकाच्या अभिषेका पासून फल प्राप्त होण्याचे इच्छेनें कोणी एक कन्या अत्यंत तपो निधीच जाहली आहे.

जयत्यसौधन्यतरो हिमाचलस्तदाश्रयं यस्य सुतातपस्यति॥ सदैत्यराजोपि महाफलोदयो विमूलिताशेषसुरो हितारकः॥ ३९८॥

अर्थ- ती हिमालयाची कन्या पार्वती या पर्वतावर तप करीत आहे; या कारणानें हा हिमाचल पर्वत पृथ्वींतील सर्व पर्वतांत अतिशयें धन्य होत्साता श्रेष्ठत्वें करून वर्ततो; तसाच प्रस्तुत सर्व दैत्यांचा राजा तारकासुर ही मोठ्या तपाचे फलानें अति उत्कर्ष पावून त्यानें सर्व देवांस स्वराज्यावरून सर्वथा पदच्युत केलें.

त्वदीयमंशंप्रविलोक्यकल्मषात्स्वकंशरीरंपरिमोक्ष्यते ह्ययः॥ सधन्यधीर्लोकपिताचतुर्मुखोहरिश्चयत्संभ्रमवन्हिदीपितः॥ ३९९॥

अर्थ- तो तारकासुर तुझ्यासाक्षात् अंशभूत पुत्रास पाहून तत्काल पापापासून उत्पन्न जाहलेल्याआपले शरीराचा त्याग करील; तो तारकासुर इतका महा बुद्धिमान् आहे कीं, त्याच्या भयरूप अग्नीच्या तेजानें सर्व लोकांस उत्पन्न करणारा ब्रह्मदेव व विष्णु हेहि चकित झाले आहेत.

त्वदंघ्रियुग्मंहृदयेनबिभ्रतोमहाभितापप्रशमैकहेतुकं॥ त्वमेवचैको विविधकृतक्रियः किलेतिवाचा विधुरैर्विभाष्यते॥ ४००॥

अर्थ- तसेंच सर्व जीवानीं तुझीं चरण कमलें भक्ति पूर्वक अंतःकरणानें सर्वदां हृदयांत धारण केलीं असतां, सर्व महा तापत्रयाचा नाश होतो. कारण तूं या चराचर जगाच्या सृष्टि, स्थिति व प्रलय इत्यादिक अनेक प्रकारच्या क्रिया करणारा आहेस; असें वेदवेत्ते बृहस्पति प्रभृति सर्व ज्ञानी निश्चयें करून बोलतात.

अथाद्यएकस्त्वमवैषिनान्यथाजगत्तथानिर्घृणतां त्वं स्पृशेत्॥ नवेत्सिवादुःखमिदंभवात्मकंविहन्यतेनेरखलुसर्वनिष्क्रिया॥ ४०१॥

अर्थ- आणि तूं सर्वांचा आद्य पुरुष आहेस या मुळें तूं या सर्व चराचर जगास जाणतोस; यांत कांहीं एक अन्यथा नाहीं असें असून जर तूं या जगाचें जन्म मरण संबंधि दुःख न जाणशील तर तुझी ही तपश्चर्यादिक सर्व क्रिया व्यर्थ होऊन तुजकडे निर्दयत्व येईल.

उपेक्षसेचेज्जगतामुपद्रवंदयामयत्वंतवकेनकथ्यते॥ स्वयोगमायामहिमागुहाश्रयंनविद्यते निर्मलभूतिगौरवं॥ ४०२॥

अर्थ- नसाच तूं जर या जगाच्या उपद्रवाची उपेक्षा करून यावर लक्ष्य न दे-शील तर तूं परम दयाळू आहेस; असें तुझें पवित्र यश कोण वर्णन करील; - आणि आपल्या योगमायेच्या महिमारूप गुहेस आश्रय जो तूं तुझे ठिकाणीं मोठें निर्मळ ऐश्वर्य नाहीं असें होईल.

वयंचतेधन्यतराः शरीरिणांयदीदृशंत्वां प्रविलोकयाम हे ॥ अदर्शनंतेनमनोरथोयथा प्रयातिसाफल्य नयाम- नोगतं ॥ ४०३

अर्थ- नसेच आह्मीं या काळीं सर्व प्राणिमात्रांत अतिशयें धन्य जाहलों; कारण तुझें दर्शन दुर्लभ असून आह्मीं तुजला अवलोकन करीत आहों. या तुझ्या दर्शनानें सर्वांचा मनोरथ जसा सफळ होईल,

जगद्विधानेकविधौजगन्मुखेकरिष्यष्यसेनोबलभिच्च रावयं ॥ विनेमुरित्थंमुनयोविसृज्यतांगिरंगिरीशश्रुति भूमिसन्निधौ ॥ उत्कृष्टकेदारइवावनीतलेसुबीजमष्टिं सुफलायकर्षकाः ॥ ४०४

अर्थ- या रीतीनें जगाच्या समृद्धिचे मुख्य विधी विषयीं प्रवृत्त जाहलेल्या-जगांतील प्रमुख देवगणांवर हे देवा तूं आपलें शुद्ध कृपायुक्त मनोगत ठेवतोस; ह्मणून आह्मीं देवकार्यार्थ इंद्रानें पाठविल्यावरून तुजकडे आलों; असें शिवाचे कर्णहीच कांहीं एक भूमि तिचे सन्निधानीं त्या ऋषीनीं भाषण करून त्या वाणीचें विसर्जन करून शिवास साष्टांग नमस्कार केला. यास दृष्टांत "जसे शेतकरी लोक उत्तम धान्यादिक पदार्थ उत्पन्न होण्यासाठीं कोणतेंही उत्कृष्ट बीज उत्तम नांगरलेल्या क्षेत्रांत पेरतात; तसे." ते ऋषी शिवास त्या देवकार्याविषयीं प्रार्थना करून स्वस्थ राहिले.

तेषांश्रुत्वाततोरम्यां प्रक्रमोपक्रमक्रियां ॥ वाचंवाच स्पतिरिवप्रोवाचस्मितसुंदरः ॥ ४०५ ॥

अर्थ- या प्रमाणें आरंभा पासून अनुक्रम युक्त त्या सप्तऋषींची वाणी श्रवण करून तो महादेव हास्य वदनें करून बृहस्पति सारखें भाषण करूं

---

* या श्लोकांतील **मनोगतं** या पदाचा संबंध येथें नसून पुढील श्लोकांत आहे.

लागला.

शर्वउवाच ॥ जानेलोकविधानस्य कन्यासत्कार्यमुत्त
मं ॥ जाताप्रालेयशैलस्य संकेतकनिरूपणाः ॥ ४०६

अर्थ:- कीं, देव कार्याच्या संकेताचें निरूपण करणारे ऋषीहो हिमालया स कन्या जाहली; हें सर्व लोकांच्या वृद्धि विषयीं उत्तम कार्य झालेलें मीं - जाणतों.

सत्यमुत्कंठिताः सर्वेदेवकार्यार्थमुद्यताः ॥ तेषांत्वरं-
तिचेतासि किंतुकार्यंविवक्षितं ॥ ४०७ ॥

अर्थः- आणि तुह्मी ऋषी आदिकरून सर्व सज्जन देव कार्यार्थ निश्चयें करून उत्कंठित जाहले आहेत त्यामुळें त्यांच्या अंतःकरणास बहुत त्वरा जाहली आहे परंतु त्यांत कांहीं एक कार्याची अपेक्षा आहे.

लोकयात्रानुगंतव्या विशेषेण विचक्षणैः ॥ सेवंतेतेय
तो धर्मं तत्प्रामाण्यात्परे स्थिताः ॥ ४०८ ॥

अर्थ:- ती अशी कीं, जे महाज्ञानी पुरुष आहेत त्यानीं विशेषें करून लोक रीतीचें अनुसरण शास्त्रमार्गानुसार ठेवावें; कारण ते महाजन ध- र्माचेंच आचरण करितात; ह्मणून इतर सर्वलोक त्या महात्मे लोकांच्या आ चरणावरच प्रामाण्य बुद्धी ठेवून वर्ततात.

इत्युक्ता मुनयो जग्मुस्त्वरितास्तु हिमाचलं ॥ तत्रते
पूजितास्तेन हिमशैलेन सादरं ॥ ४०९ ॥ ऊचुर्मुनिव-
राः प्रीताः स्वल्पवर्णत्वरान्विताः ॥

अर्थ:- असें शिवानें भाषण केलें असतां ते सप्त ऋषि त्वरेनें हिमाल- य पर्वतावर आले ते समयीं हिमालयानें त्या मुनींची सादर भक्तियुक्त अं- तःकरणानें पूजा केली. तेव्हां ते ऋषि संतुष्ट होत्साते हर्षपूर्वक त्वरेनें प- रिमित अक्षरयुक्त भाषण करतात.

मुनयऊचुः ॥ देवोदुहितरंसाक्षात्पिनाकी नवमार्ग
ते ॥ ४१० ॥ तच्छीघ्रंपावयात्मानमाहुत्येवानलार्प-
णात् ॥

अर्थः- कीं, हे हिमालया पिनाक धनुष्य धारण करणारा साक्षात् म-

हा देव तुझ्या कन्येच्या अंगिकाराची मार्गप्रतीक्षा करीत आहे तस्मात् " जसे-लोक अग्नीस आहुती अर्पण करून कृतार्थ होतात, तसा" तूं या कालीं आपली कन्या पार्वती शिवास समर्पण करून पवित्र हो.

कार्यमेतच्चदेवानांसुचिरंपरिवर्तते ॥ ४११ ॥ जगदुद्धर-
णायैषक्रियतांवैसमुद्यमः ॥

अर्थ- आणि या देव कार्याची बहु कालां पासून यत्ना चालली आहे, ते-व्हां हे हिमालया तूं जगाच्या उद्धारार्थ आतां पार्वती शिवास देण्याचा हा उत्तम उद्योग निश्चयें करून कर.

इत्युक्तस्तैस्तदाशैलोहर्षाविष्टोवदन्मुनीन् ॥ ४१२ ॥ अ-
समर्थोभवद्वक्तुमुत्तरंप्रार्थयन्छिवं ॥

अर्थ- असें ऋषींनीं भाषण केलें असतां त्या कालीं हिमालयास अत्यंत हर्ष जाहला, आणि तो त्यासप्तऋषींशीं संभाषण करण्या विषयीं उद्युक्त जाहला; परंतु तो कांहीं एक उत्तर देण्यास समर्थ जाहला नाहीं तेव्हां त्यानें आपल्या कन्येचा अंगिकार करण्या साठीं केवल मनानें मात्र शिवाची प्रार्थना केली.

ततोमेनामुनीन्वंद्यप्रोवाचस्नेहविक्लवा ॥ ४१३ ॥ दुहि-
तुस्तान्मुनींश्चैवचरणाश्रयमर्थवित् ॥

अर्थ- तंतर मेना नामक हिमालय पत्नी आपल्या कन्येच्या स्नेह पाशामुळें मनांत विव्हल झाली आणि ती सर्व शास्त्रार्थ जाणणारी होती, त्यामुळें तिणें त्या सप्तऋषींचे चरणावर मस्तक ठेवून नमस्कार केला; आणि ती मेना त्या ऋषींस विज्ञापना करूं लागली.

मेनोवाच ॥ यदर्थंदुहितुर्जन्मनेच्छंत्यपिमहाफलं ॥ ४१४
तदेवोपस्थितंसर्वंप्रक्रमेणैवसांप्रतं ॥

अर्थ- कीं, ऋषी हो महात्मे लोक हा कन्येचा जन्म महा फलदायक असूनही ज्या कारणा मुळें जो कन्येचा जन्म आपले उदरीं इच्छित नाहींत तोच सर्व प्रसंग सांप्रत कालीं क्रमानेंच आह्मास प्राप्त जाहला आहे.

कुलजन्मवयोरूपविभूत्यर्धियुतोपियः ॥ ४१५ ॥ वर
स्तस्यापिचाहूयसतादेयात्वयाचतः ॥

अर्थ- आणि महत्कुल, उत्तम जन्म, अल्पवय, सुंदर रूप व पूर्ण ऐश्वर्य या गु

गानीं युक्त असून ही जो वर याचना न करील, त्यास बोलावून आपली कन्या द्या वी; ही गोष्ट सर्वांस संमत आहे.

तत्समस्ततपोघोरंकथंपुत्रीप्रयास्यति॥ ४१६॥ पुत्री
वाक्याद्यदत्रास्तिविधेयंतद्विधीयतां॥

अर्थ- तेव्हां संपत्ती आदी करून कांही एक ऐश्वर्य नसून निरंतर सर्व प्रकारें घोर तप करणाऱ्या त्या शिवाकडे ही पार्वती कशी जाईल; तस्मात् या विषयीं आतां पार्वतीचे मनांत जसें असेल तसेंच या प्रसंगीं तिच्या वचना सारखें करावें.

इत्युक्त्वामुनयस्तेतुप्रिययाहिमभूभृतः॥ ४१७॥ ऊचुः
पुनरुदारार्थंनारीचित्तप्रसादकं॥

अर्थ- असें त्या हिमालय पत्नीचें भाषण ऐकून ते सप्तऋषी पुनः त्या मेनेस बोलूं लागले; त्या संभाषणांत उदार अर्थ असल्यामुळें तें भाषण स्त्रियांचे चित्तास परम संतोष कारक होतें.

मुनयऊचुः॥ ऐश्वर्यमवगच्छस्वशंकरस्यसुरासुरैः॥
४१८॥ आराध्यमानपादाब्जयुगलस्यसुनिर्वृतेः॥

अर्थ- तें असें कीं, हे हिमालय प्रिये ज्या शिवाच्या चरण कमल युग्मानें आराधन केल्यामुळें देव व असुर हे सर्व ही उत्तम सुख पावले आहेत, यावरून तूं त्या शंकराचें ऐश्वर्य कसें आहे तें जाण.

यस्योपयोगियद्रूपंसाचतत्प्राप्तयेचिरं॥ ४१९॥ घोरं
तपस्यतेबालातेनरूपेणनिर्वृतिः॥

अर्थ- आणि तुझी ही कन्या पार्वती बाल्यावस्थेंत असून त्या शिवाच्या प्राप्त्यर्थ बहुकाल उग्रतप करीत आहे; तेव्हां परस्पर तिला जसें रूप आनंदकारक आहे, तसें शिवानें उग्र तापस रूप या कालीं धारण केलें आहे; याप्रमाणें तो शंकर आपलें रूप ज्या कालीं ज्याचे उपयोगीं जसें असतें तसें तो महादेव आपलें रूप त्यास दर्शवितो.

यस्तद्व्रतानिदिव्यानिनयिष्यतिसमापनं॥ ४२०॥ न
त्रसावहितातावत्तस्यालेवभविष्यति॥

अर्थ- तसेंच दुसरें कारण असें आहे कीं, या पार्वतीनीं ब्रह्मचर्यादिक उत्तम व्रतें हिजा अंगीकार करून जो पूर्ण करील त्याच शंकरा विषयीं ही पार्वती-

निश्चल सावधान चित्तानें आसक्त आहे तस्मात् ही त्या शिवाचीच भार्या होईल यांत संदेह नाहीं.

इत्युक्त्वागिरिणासार्धं तेययुयत्रशैलजा॥ ४२१॥ जितार्कज्वलनज्वाला तपस्तेजोमयीत्युमा॥

अर्थ- असें भाषण करून त्या मेनेचें समाधान जाहल्यावर ते सप्तऋषी त्या हिमालयासहवर्तमान पार्वतीजेथें तप करीत होती त्या आश्रमांत गेले; तेव्हां तेथें त्यांनीं पार्वतीस पाहिलें, तों ती पार्वती तपाचे प्रभावामुळें आपल्या तेजःपुंज देहानें सूर्य व अग्नि यां पेक्षां अधिक शोभत होती.

प्रोचुस्तांमुनयः स्निग्धंसन्मान्यपथमागतं॥ ४२२॥ रम्यंप्रियंमनोहारि मारूपंतपसादह॥

अर्थ- आणि ते सप्त ऋषी त्या पार्वतीस स्नेहयुक्त अंतःकरणानें बोलले कीं, हे पार्वती सर्व साधूंच्या मान्य मार्गानें आलेलें असून अत्यंत रमणीय ह्मणूनच सर्वांस प्रेमास्पद व वैराग्य संपन्न शिवाच्याही मनास आकर्षण करणारें असें हें आपलें रूप इतः पर तपश्चर्येनें जाळूं नको.

प्रातस्तेशंकरः पाणिमेषपुत्रिगृहीष्यति॥ ४२३॥ वयमर्थितवंतस्ते पितरंपूर्वमागताः॥

अर्थ- कारण हे कन्येपार्वति उद्यां प्रातःकालीं शंकर तुझें पाणि ग्रहण करील आणि या विषयीं आह्मीं पूर्वीच तुझ्याघरीं येऊन तुला शिवास देण्या साठीं तुझ्या पित्याची प्रार्थना केली आहे.

पित्रासहगृहंगच्छवयंयामः स्वमंदिरं॥ ४२४॥ इत्युक्तातपसः सत्यं फलमस्तीति चिंत्यसा॥ त्वरमाणाययौवेश्म पितुर्दिव्यार्थशोभितं॥ ४२५॥

अर्थ- तस्मात् तूं आतां पित्या बरोबर आपल्या घरीं जा, आह्मीं स्वकीय आश्रमास जातों, असें त्या ऋषींनीं भाषण केलें असतां त्या मुनींच्या वचना वरून हें माझ्या तपाचें सत्य फल आहे असें मानून ती पार्वती त्वरेनें आपल्या पित्याचे मंदिरास गेली त्या मंदिरांत स्वर्गांतील संपत्ती समान सर्व पदार्थ शोभत होते.

सातत्ररजनीमेनेवर्षायुतसमांसती॥ हरदर्शनसंजा

तमहोकंगाहिमाद्रिजा ॥ ४२६ ॥

अर्थ— ते दिवशीं ती हिमालय कन्या पार्वती शंकराचे दर्शना विषयीं अत्यंत उत्सुक जाहली होती त्यामुळें तिणें तीरात्र दहा हजार वर्ष परिमित कालासमान मोठी मानली.

ततोमुहूर्तेब्राह्मेतुतस्याश्चक्रुः सुरस्त्रियः ॥ नानामंगलसंदोहान्यथावत्क्रमपूर्वकं ॥ ४२७ ॥ दिव्यमंडनमंगानां मंदिरेबहुमंगले ॥

अर्थ— नंतर ब्राह्म नामक मुहूर्तीं (पांहाटेची चार अथवा पांच घटिका रात्र राहिली असतां ते समयीं) अनेक देवांच्या स्त्रिया बहु मंगल कारक उत्सव युक्त अशा त्या हिमालयाच्या मंदिरांत आल्या, आणि त्यांनीं पार्वतीस मंगल स्नान (अभ्यंगस्नान) घालून तिचें कोमल कमला सारिखें मुख जेणें करून अपूर्व शोभेनें युक्त होईल तशारितीनें त्या देव स्त्रियांनीं भूषणादिक अनेक मंगल कारक पदार्थांनीं सुशोभित केलें; तसेंच त्यांनीं पार्वतीचे सर्वांगास दिव्य अलंकार घालून तिचें रूप अत्यंत शोभायुक्त केलें.

उपासतगिरिंमूर्ताऋतवः सार्वकामिकाः ॥ ४२८ ॥ वायवोवारिदाश्चासन् संमार्जनविधौगिरेः ॥

अर्थ— तसेच सर्व विषय पूर्ण करणारे मूर्तिमंत वसंतादिक सहा ऋतु आपापल्या पत्र, पुष्प, फलादिक सर्व संपत्ती सहित त्या हिमालय पर्वतावर प्रगट होऊन राहिले; आणि प्रवह नामक आदिकरून वायूच्या सकल देवता व संपूर्ण मेघ हे त्या हिमालयावर सडासंमार्जन करण्या विषयीं प्रवृत्त जाहले.

हर्म्येषुश्रीः स्वयंदेवीकृतनानाप्रसाधना ॥ ४२९ ॥ कांतिः सर्वेषुभावेषुऋद्धिश्चाभवदाकुला ॥

अर्थ— त्याच प्रमाणें साक्षात् लक्ष्मीदेवी स्वतः त्या कालीं पार्वतीच्या मंगल कार्यार्थ त्या पर्वतावर हिमालयाच्या सर्व मोठमोठ्या मुख्य मंदिरांत नाना प्रकारच्या अलंकारादिक सर्व सुशोभित विचित्र पदार्थांनीं पूर्ण वास करिती जाहली. आणि संपूर्ण पदार्थांत कांति व समृद्धि त्या पूर्ण होऊन राहिल्या.

चिंतामणिप्रभृतयोरत्नाः शैलंसमंततः ॥ ४३० ॥ उपतस्थुर्नगाश्चापिकल्पकामसहाद्रुमाः ॥

अर्थ- तसेच मरू आदी करून सर्व मूर्तिमंत पर्वत पार्वतीच्या मंगल कार्यासाठीं तेथें येऊन सेवेंत तत्पर असते जाहले; आणि सर्व इच्छित मनोरथ पूर्ण करणारे चिंतामणि आदिकरून संपूर्ण रत्नें व मोठे कल्पवृक्ष त्या हिमाचलावर सर्वत्र आसमंताद्भागीं प्रगट होऊन शोभूं लागले.

ओषध्योमूर्तिमत्यश्चदिव्यौषधिसमन्विताः॥ ४३१॥
रसाश्चधातवश्चैवसर्वेशैलस्यकिंकराः॥ किंकरास्त-
स्यशैलस्यअग्राश्चात्रानुवर्तिनः॥ ४३२॥

अर्थ- त्या काळीं स्वर्गातील औषधी सहित पृथ्वींतील सर्व मूर्तिमंत औषधींच्या देवता, अमृतादिक संपूर्ण रस सुवर्णादिक समस्त धातु हे समग्र त्या हिमालयाचे अग्रभागीं सेवकां सारखे पार्वतीच्या मंगल कार्यार्थ वर्तूं लागले. तेव्हां त्या हिमालयाचे निरंतरचे सेवक तर अनेक कार्यांत चित्त लावून सर्वदा त्याच्या आज्ञेनुसार सेवेंत अत्यंत तत्पर जाहले.

नद्यःसमुद्रानिखिलाःस्थावरंजंगमंचयत्॥ तत्सर्वं
हिमशैलस्यमहिमानमवर्धयत्॥ ४३३॥

अर्थ- यात प्रमाणें सर्व नद्या समुद्र, स्थावर (वृक्ष पाषाणादिक) व जंगम (यावत् मनुष्य पशु पक्ष्यादिक) हे समग्रही त्या पार्वतीच्या लग्नसमारंभ काळीं हिमालयाचा सर्वप्रकारें महिमा वृद्धिंगत करिते जाहले.

अभावन्मुनयोनागायक्षगंधर्वकिन्नराः॥ शंकरस्या
पिविबुधागंधमादनपर्वते॥ ४३४॥ सर्वेमंडनसंभा
रास्तस्थुर्निर्मलमूर्तयः॥

अर्थ- तसेच इकडे नारदादिक मुनि, वासुकी प्रमुख नाग, यक्ष, गंधर्व, किन्नर व ब्रह्मादिक देव हे सर्वही पवित्र मूर्ति असून ते गंधमादन पर्वतावर शिवाच्या विवाह समारंभासाठीं येऊन स्वतः त्या शंकरास अनेक प्रकारचे अलंकार होऊन राहिले.

शार्वस्यापिजटाजूटेचंद्रखंडंपितामहः॥ ४३५॥ बबं
धप्रणयोदारविस्फारितविलोचनः॥

अर्थ- तसाच शंकरावरील उदार प्रेमामुळें प्रफुल्लित नेत्रयुक्त ब्रह्मदेवानें शिवाचे जटाजूटांत भूषणार्थ अर्धचंद्र बांधला.

कपालमालां विपुलां चामुंडा मूर्ध्न्यबंधत ॥ ४३६ ॥ उवाच चापि वचनं पुत्रं जनय शंकर ॥

अर्थ:- तशीच चामुंडा देवीनें शिवाच्या मस्तकास मोठी रुंडमाळा बांधली; आणि ती शिवास आशीर्वाद वचन बोलली कीं, हे शंकरा आतां तूं पुत्र उत्पन्न करून सर्व लोकांचें कल्याण कर.

यो दैत्येंद्रकुलं हत्वा मां रक्तेस्तर्पयिष्यति ॥ ४३७ ॥ सौरिर्ज्वलच्छिरोरत्नमुकुटं चानलोल्बणं ॥ फणिजगाभरणं गृह्य सज्जं शंभोः पुरोभवत् ॥ ४३८ ॥

अर्थ:- तो पुत्र असा कीं, जो पुत्र जाहला असतां तो सर्व दैत्यांत श्रेष्ठ तारकासुरास कुळासहित मारून त्याच्या रक्तानें मला तृप्त करील. नंतर सूर्यपुत्र शनि देदीप्यमान मस्तकभूषण रत्नानें सुशोभित मुगुट व अग्नीसारखें तीक्ष्ण तेजोमय सर्पांचें शिरोभूषण हे अलंकार घेऊन तो शिवाच्या अग्रभागीं उभा राहिला.

शक्रो गजाजिनं तस्य वसाभ्यक्ताग्रपल्लवं ॥ दध्रे सरससंस्विद्य द्विस्तीर्णमुखपंकजं ॥ ४३९ ॥

अर्थ:- तसाच इंद्र, शिवास पांघरण्यासाठीं स्वतें एक गजचर्म आपले हातांत घेऊन उभा राहिला; तें हत्तीचें चर्म आर्द्र (ओलें) असून त्या गजचर्मांतील मुखकमल विस्तीर्ण होतें आणि त्या चर्माच्या दोहीं बाजूंचे शेवटील पदरांतून चर्बी गळत होती.

वायुश्च विपुलं तीक्ष्णाशृंगं हिमगिरिप्रभं ॥ वृषं विभूषयामास हरयानं महौजसं ॥ ४४० ॥

अर्थ:- त्याच प्रमाणें लोकपाल वायु, नंदी नामक वृषभरूप मोठ्या शिववहनास अलंकार वस्त्रादिकानीं अत्यंत सुशोभित करिता जाहला; तो नंदी-देहानें हिमालय पर्वता समान शुभ्रवर्ण असून त्याचीं शिंगें अति तीक्ष्ण होतीं; व तो नंदी महातेजस्वी होता.

त्रिनेत्रनयनानां तस्याः शंभोः सूर्यानलेंदवः ॥ स्वांद्यु तिं लोकनाथस्य जगतः कर्मसाक्षिणः ॥ ४४१ ॥

अर्थ:- तसेंच शिवाच्या तीन नेत्रांस रहाणारे सूर्य, अग्नि व चंद्र हे तिघे ही

चराचर जगाच्या कर्मांचा केवळ साक्षी म्हणूनच सर्वजगाचा स्वामी असा-
जो शंकर त्याचे नयनांत आपली कांति प्रगट करिते जाहले.

चिताभस्मसमाधाय कपालेरजतप्रभं ॥ मनुजास्थि
मयींमालामाबबंधच्चपाणिना ॥ ४४२ ॥

अर्थ- नंतर शिवानें आपले कपाळास रुप्या सारिखें शुभ्रवर्ण चिताभ-
स्म लाविलें. आणि मनुष्यांच्या अस्थींची माळा स्वहस्तानें मस्तकास बां-
धिली.

प्रेताधिपः पुरोद्वारेसगदः समवर्तत ॥ नानाकारम
हारत्नभूषणंधनदाहृतं ॥ ४४३ ॥

अर्थ- तसाच यमधर्मराज ह्यातांत गदा घेऊन शिवाचे नगरद्वारांत उभा रा
हिला. आणि अनेक आकृतीच्या मोठमोठ्या नवरत्नानीं खचित असें एक
उत्तम भूषण धनाध्यक्ष कुबेरानें आणून शिवास दिलें.

विहायोदग्रसर्पेंद्र कटकेन स्वपाणिना ॥ कर्णोत्तंसंच-
कारेशोवासुकिंतक्षकंस्वयं ॥ ४४४ ॥

अर्थ- तेव्हां त्या कुबेरानें आणलेल्या कर्णभूषणांचा त्याग करून त्यास
र्वेश्वर शंकरानें मोठमोठ्या श्रेष्ठ नागांच्या कड्यानीं सुशोभित स्वहस्तानें वासु
कि व तक्षक यांचीं कर्णभूषणें दोन्हीं कानांत धारण केलीं.

जलाधीशाहृतांस्थास्नुप्रसूनांवेष्टितांपृथक् ॥ तत
स्तेगणाधीशाविनयात्तत्रवीरकं ॥ ४४५ ॥ प्रोचुर्व्य
ग्राकृतेत्वन्नोसमावेदयशूलिने ॥

अर्थ- तशीच सर्व उदकाध्यक्ष वरुणानें भिन्न जातींचीं असून म्लान न-
होणाऱ्या प्रफुल्लित उत्तम पुष्पांची गुंफलेली एकमाळा आणिली. नंतर ते
सर्व देवगणांचे स्वामी लोकपालादिक श्रेष्ठ देव अत्यंत नम्रतेनें त्याकाळीं
तेथें वीरभद्रास बोलले कीं, हे वीरभद्रा तुझें चित्त शिवाच्या मंगळ कार्यामुळें अ
नेक कृत्यांत आसक्त आहे. तथापि आह्मीं त्या विवाह कार्या साठींच आलों
आहों. असें तूं त्रिशूलधारी शिवास निवेदन कर.

निष्पन्नाभरणंदेवंप्रसाध्येशंप्रसाधनः ॥ ४४६ ॥
सप्तवारिधयस्तस्थुः कर्तुंदर्पणविभ्रमं ॥

अर्थ- तें देवांचें भाषण श्रवण करून उत्तम कार्यसाधक वीरभद्र, सर्व अलंकारानीं सुशोभित अशा महादेवाजवळ जाऊन त्यास ह्मणाला कीं, हे शंकरा तुझी आपली स्वरूप शोभा आरशांत अवलोकन करण्या साठीं सप्त समुद्र येऊन उभे आहेत.

ततो विलोकितात्मानं महांबुधिजलोदरे॥ ४४७॥ धरामालिंग्य जानुभ्यां स्थाणुं प्रोवाच केशवः॥ शोभसे देवरूपेण जगदानंददायिना॥ ४४८॥

अर्थ- हें वीरभद्राचें वचन ऐकून शिवानें आपली स्वरूप शोभा त्या मोठमोठ्या सात समुद्रांच्या उदकांत पाहिली. नंतर विष्णु आपले गुडघे भूमीवर टेंकून त्या शंकरास बोलला कीं, हे महादेवा तूं सर्व जगास आनंद देणाऱ्या या रूपानें अतिशयें शोभत आहेस.

मातरः प्रेरयाकामवधूं वैधव्य चिन्हितां॥ कालोयमिति चालक्ष्य प्रकारेंगितसंज्ञया॥ ४४९॥

अर्थ- कीं, हे शंकरा मदनाची भार्या रति तुझ्या नेत्र संबंधि अग्नीनें मदन दग्ध जाहला. यामुळें ती वैधव्य चिन्हानें युक्त जाहली आहे यास्तव हा काल त्या रतीचें समाधान करण्या विषयीं योग्य आहे; असें जाणून तूं आपले मनांतील कांहीं एक प्रकारच्या किंचित् हस्तादिकाच्या सूचनेनें ब्राह्मी आदिकरून लोकमातांस रतीच्या समाधानार्थ तिजकडे पाठीव.

ततस्ताश्चोदिता देवमूचुः प्रहसिताननाः॥ रतिः पुरस्तव प्राप्ता नाभाति मदनोज्झिता॥ ४५०॥

अर्थ- नंतर शिवानें त्या लोकमातांस रतीकडे जाण्या विषयीं आज्ञा केली असतां त्या लोकमाता हास्य वदन करून महादेवास बोलल्या कीं, हे शंकरा रति तुझे अग्रभागीं आली आहे परंतु ती मदनाच्या वियोगा मुळें सांप्रत कालीं शोभत नाहीं.

ततस्तां सन्निवार्यैह वामहस्ताग्रसंज्ञया॥ प्रयाणे गिरिजावक्त्रदर्शनोत्सुकमानसः॥ ४५१॥

अर्थ- असें तें लोकमातांचें भाषण श्रवण करून शिवानें मग आपल्या त्या हिमालय पर्वतास जाण्याच्या वेळेस डाव्या हाताचे बोटानीं त्या रतीचें

उत्तम प्रकारें विचारण करून रतीस बोलला मी या कालीं पार्वतीनें मुख कमळ-
अवलोकन करण्या साठीं उत्कंठायुक्त जाहलों आहें.

ततोहरो हिमगिरिकंदराकृतिंसमुन्नतंमृदुगतिभिः
प्रचोदयन्॥ महावृषंगण तुमुलाहिते क्षणं स भूधरा
नशानिश्वप्रकंपयन्॥ ४५२॥

अर्थ- नंतर तो शंकर आपल्या वृषभश्रेष्ठ नंदीस सुख कारक अनेक रीती-
च्या मंद गतीनीं चालण्या विषयीं प्रेरणा करूं लागला; त्या कालीं तो नंदी आ-
पल्या नशाही मंदगतीनें मार्गातील पर्वतांस "इंद्राच्या वज्रा प्रमाणें" अति
शयें कांपवीत होत्सातां मार्गानें चालला; त्या नंदीची आकृति हिमालय पर्व
ताच्या गुहे समान शुभ्रवर्ण असून अत्यंत उंच होती; आणि त्यावेळेस सर्व प्र
मथादिक शिवगण बहुत गर्जना करीत असून ते मार्गांतून चालतांना नंदीक
डे एक सारखे पहात होते.

ततोहरिर्द्रुतपदपङ्क्तिपुरःसरः श्रमात्द्रुमनिकरेषु
विश्रमन्॥ धरारजः शबलितभूषणोब्रवीत्प्रयात-
माकुरुतपथोस्यसंकटं॥ ४५३॥

अर्थ- पश्चात् त्वरित गमन करणारा गरुड वाहन विष्णु मार्ग संबंधि श्रम
जाहल्या मुळें वृक्षांचे समुदायांत विश्रांति घेऊन सर्व देव गणांस बोललाकीं,
देवहो तुह्मीं सावकाश चलावें मार्गांत दाटी करूंनका; त्या वेळेस विष्णूच्या स-
र्वांगावरील किरीट कुंडलादिक सर्व अलंकारांस भूमीचे रजः कण लागून तीं-
भूषणें धुळीनें व्याप्त जाहलीं होतीं.

प्रभोःपुनः प्रथमनियोगमूर्जयन्सतोब्रवीद्भ्रुकुटि
मुखोपिवीरकः॥ वियच्चरावियतिकिमस्तिकौतुकंप्र
यातनो धरणिधराः विदूरतः॥ ४५४॥

अर्थ- आणि कैलासपति शंकराचा अंशभूत असून वक्र भोंवया युक्त
मुखानें सुशोभित वीरभद्र त्या शिवाची प्रथम आज्ञा प्रसिद्ध करीत होत्सा
ता बोलला कीं, देव हो तुह्मीं जरी आकाश मार्गें संचार करणारे आहांत तरीं
हिमालया पेक्षां स्वर्ग लोकांत अधिक सुंदर वस्तु काय आहे? तस्मात्
तुह्मीं आतां आमच्या मागून त्या पर्वता समीप चलावें.

महार्णवाः कुरुत शिलोपमंपयः स्मरद्विषागमन महातिकर्दमान् ॥ गणेश्वराश्च पलतद्यानगम्यतांस्मरेश्वरैः स्थिरमतिभिश्चगम्यतां ॥ ४५५ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें महासमुद्र हो तुह्मी आपलें उदक देवांस जाण्या येण्या साठीं शिळे सारिखें घट्ट करावें; आणि देवांचा द्वेष करणाऱ्या असुरांस त्यांचें जाणें येणें नव्हावें यासाठीं तेंच तुमचें पाणी महा घोर चिखला सारखें कठिण होण्यांत यावें. तसेंच प्रथमादि गण नायक हो तुह्मीं मार्गांत अतित्वरेनें चालू नये व श्रेष्ठ देवानीं स्थिर अंतः करणानें चालावें; अशी तुह्मा सर्व देवगणांस शिवाची आज्ञा आहे.

नभृंगिणास्वतनुमवेक्ष्यनीयते पिनाकिनः पृथुमुखमंडमग्रतः ॥ वृथायमप्रकटितदंतकोटरंत्वमायुधंवहसि विहायपंजरं ॥ ४५६ ॥

अर्थ- तसेंच वीरभद्र बोलला कीं, हा नंदी आपले शरीराकडे न पाहतां महा विशाल मुखानें युक्त असें नर कपाल, पिनाक धनुर्धारी शिवाचे अग्रभागीं नेतो; तस्मात् हे यमा, दांत बाहेर काढलेले असून वृक्षाच्या ढोली सारखे मुखवट्याच्या आकृतीचें, खालच्या पांजऱ्यानें रहित असें आयुध तूं व्यर्थ धारण करितोस.

पदंनयद्रथतुरगैः पुरद्विषाप्रमुच्यतेबहुतरमातृसंकुलं ॥ अमीस्मराः पृथगनुयायिभिर्वृताः पदातयो द्विगुणपथान्हरप्रियाः ॥ ४५७ ॥ स्ववाहनैः पवनविधूतचामरैश्चलध्वजैर्व्रजतविहारशालिभिः ॥

अर्थ- नंतर तो जाण्याचा मार्ग शिवाचे पार्षदांतील मातृका नामक बहुत पिशाच गणानीं अतिशयें व्याप्त जाहल्या मुळें त्रिपुराचा नाश करणाऱ्या शंकरास रथ व अश्व यां सहवर्तमान चालण्या विषयीं अशक्य जाहला असतां, वीर भद्रानें त्या मातृका गणांस आज्ञा केली कीं, अहो शिवप्रिय मातृका गणहो हे सर्व देव वायूनें विशेषें करून हालणाऱ्या चवऱ्या हातांत घेतलेले आपापले निरनिराळे सेवकांनीं वेष्टित होत्साते चंचल ध्वजानीं युक्त असून अनेक प्रकारच्या गतीनीं शोभणाऱ्या स्वकीय रथ गज व अश्व

इत्यादिक वाहनां सहित चालले आहेत; त्यांस मार्गांत चालण्यास अडचण न होण्या साठीं तुह्मी पायांनीं चालणारे आहांत. तेव्हां तुह्मीं मार्गाचे दोन्ही बाजूनीं चालावें.

स्मराः स्वकं किमिति न राग मूर्जितं विचार्यते नियत लयत्रयानुगं ॥ ४५८ ॥ न किन्नरै रभिभवितुं हि शक्यते विभूषण प्रचयसमुद्भवो ध्वनिः ॥

अर्थ- असें मातृका गणांस सांगून वीरभद्र देवांस बोलतो कीं, देव हो किन्नर गण आपल्या उत्तम रागांचे गायनाचा विचार कां चालवील नाहीत त्या रागांत नियमानें गायन, नृत्य व वाद्यें यांच्या अवसानाची समाप्ती बरोबर होत्ये; कारण अंगावरील अलंकारांचे समुदायांचा ध्वनि, गायनांचा पराभव करण्या विषयीं समर्थ होण्या सारखा मोठा नाहीं.

स्वजातिकाः किमिति न षड्जमध्यम प्रथुस्वरं बहुतरमत्र वस्यते ॥ ४५९ ॥ न तानतानतनतनतांगताः पृथक्तयासमयकृताविभिन्नता ॥

अर्थ- देव हो तुह्मीं आपल्या जातीचे षड्ज (शेवटला "सा") व मध्यम (चवथा "मा") इत्यादिक बहुत प्रकारचे तीव्र कोमल असे सर्व स्वर ज्यांत आहेत तें महाश्रेष्ठगायन या प्रसंगीं मार्गक्रमणार्थ कां करीत नाहीं. तसेच त्या गायनांत निरनिराळ्या अनेक संकेतानीं रचलेले तान्, तान्, तन, तन, इत्यादिक भिन्न भिन्न शब्द असतात. तें हि गायन तुह्मीं या वेळेस कां करित नाहीं.

विशंकिताभवदतिभेदशीलिनः प्रयांत्यमीद्रुतपदमेव गौडकाः ॥ ४६० ॥ विसंहताः किमिति न षाड्वादयः स्वगीतकैर्ललितपदप्रयोगजैः ॥

अर्थ- तसेच गौडक नांवांचे गण प्रकृतिसिद्ध अत्यंत भिन्न स्वभावानें युक्त असून मनांत निःशंक होत्साते त्वरित गतीनेंच गमन करीत आहेत; आणि हे गौडक सुंदर पदांचे प्रयोगानीं युक्त अशा आपल्या गायनाचे निबंधानीं षाड्वादिक स्वर परस्परें मिश्र न होऊं देतां कां गायन करीत नाहींत.

प्रभोः पुरो भवति हि यस्य चास्तं समुद्धतार्थमिति त

त्मनीयते ॥ ४६१॥ अमीपृथग्विरचितरम्यरासकं-
विलासिनोबहुगमकस्वभावकं॥ प्रयुंजतेगिरिशाय
शो विसारिणं प्रकीर्णकं बहुतरनागजातयः॥ ४६२

अर्थ- कारण ज्याचें कर्म प्रभूच्या अग्रभागीं सांग पूर्ण होतें तेंच कर्म त्या स उत्तम रीतीनें सर्व मोक्षादिक उत्कृष्ट पुरुषार्थ प्राप्तीस कारण होतें ह्मणूनच हे बहुत जातीचे नाग विस्तार पावल्या मुळें सर्वत्र व्याप्त जाहलेलें असें या शिवाचें पवित्र यश गायन करितात तें शंकराचें यश नारदादिक महा कवी- नीं रमणीय रासक्रीडादिक निबंधानीं अनेक प्रकारें विशेषें करून रचले लें आहे. तेणें करून तें यश विलासी जनांस बहुत रीतीच्या भावांचे व- र्णनानें युक्त आहे.

अमीकथंककुभिकथाः प्रतिक्षणं ध्वनंतिते विवि
धवधूविमिश्रिताः॥ नजातयो ध्वनिमुरजासमीरि
तान्मूर्छिताः किमिति चमूर्च्छनात्मिकाः॥ ४६३

अर्थ- तसेच हे इतर देव गण अनेक स्त्रियां सह वर्तमान आपाप- ल्या दिशेंत असून प्रतिक्षणीं शिवाच्या उत्तमकथा कसे गात आहेत, प रंतु ते उत्कृष्ट ध्वनी युक्त मृदंगावर जाति यानांवाचे स्वर कां गायन करीत नाहींत; व गायनांतील सप्तस्वरांच्या एकवीस मूर्च्छना कां गात नाहींत.

श्रुति प्रियक्रमगति भेदसाधनं तनादिकं किमिति
नतुंबरेरितं॥ नहन्यते बहुविधवाद्यडंबरं प्रकीर्ण
वीणामुरजादिनामयत्॥ ४६४॥

अर्थ- त्याच प्रमाणें कर्णांस अति प्रिय अशा क्रम युक्त भिन्नगती वाज विण्याचें साधन ततु वाद्यादि वाद्यें हा तुंबरु गंधर्व या गायन काळीं कां- वाजवीत नाहीं. आणि या गायन समयीं विशाळ वीणा व मृदंग इत्या दिक नामानीं प्रसिद्ध अनेक प्रकारचीं वाद्यें गायनास साहाय्य करणा रे हे गंधर्व कां वाजवीत नाहींत.

इतीरितेगिरिमवधानशालिनः स्फुरासुराः सपदि
तुवीरकाज्ञया॥ प्रियामिताः प्रययुरनी वहर्षिता-
श्वराचरं जगदखिलंध्यपूरयन्॥ ४६५॥

अर्थ- असें त्या वीरभद्रानें भाषण केलें असतां सर्व अवधानें राखणारे ते संपूर्ण देव व असुर हे तत्क्षणीं वीरभद्राच्या आज्ञेनें नेमलेल्या संकेतानुसार अत्यंत हर्षयुक्त होत्साते हिमालय पर्वताकडे चालले; ते समयीं त्या सर्वांच्या कोलाहल शब्दानें समग्र चराचर विश्व व्याप्त जाहलें.

इति स्तनत्ककुभि रसन्महार्णवे स्तनत्घने विदलितशैलकंदरे॥ जगत्यभूत्तुमुलइवाकुलीकृतः पिनाकिना त्वरितगतेन भूधरः॥ ४६६॥

अर्थ- असें त्या शब्दानें सर्व दिशा, मोठे सप्त समुद्र, मेघमंडल व सकल पर्वतांच्या गुहा यां सहित अतिशयें नादित जाहलेल्या सर्व जगांत तो हिमालय पर्वत शिवांच्या त्या त्वरित गमनानें अत्यंत व्याप्त जाहल्यासारखा सर्वांस भासत होता.

परिज्वलत्कनकसहस्रतोरणं क्वचिन्मिलन्मरकतवेश्मवेदिकं॥ क्वचित्क्वचिद्विमलवैडूर्यभूमिकं क्वचित्स्फुरज्जलधररम्यनिर्झरं॥ ४६७॥

अर्थ- त्या हिमालय पर्वतावर आसमंतात् भागीं लखलखीत सुवर्णाचीं हजारों तोरणें बांधलेलीं असून क्वचित्स्थलीं परस्परें मिळालेल्या पाचेच्या मण्यांचीं घरें व ओटे शोभत होते; तशाच तेथें कोठें कोठें तेजस्वी वैडूर्य मण्यांच्या भूमी शोभत होत्या; व कांहीं जागीं पर्जन्य वृष्टी करणाऱ्या मेघांचे योगानें रमणीय झऱ्यांचे प्रवाह वाहात होते.

चलध्वजप्रवरसहस्रमंडितं सुरद्रुमस्तबकविकीर्णचत्वरं॥ सितासितारुणरुचिधातुवर्णकं श्रियोज्वलंप्रविततमार्गगोपुरं॥ ४६८॥

अर्थ- तसेंच त्या हिमालयावर उत्तम सुशोभित चंचल ध्वज दिसत होते आणि पारिजातादिक देवांच्या वृक्षांचीं कोमल पानें व फुलांच्या कळ्या यांचे गुंफलेले झुबके चवाट्याचे मार्गावर पसरलेले असून त्या पर्वतावरील मार्ग शुभ्र, नील, व आरक्त या वर्णांच्या धातूंचे रंगानीं विचित्र शोभायुक्त दिसत होते. तसाच तो हिमालय सर्व रत्नें व सुवर्णादिक धातुया सर्व संपत्तीनीं सुशोभित दिसत होता. व महा विशाल मार्ग, गोपुरें

व वेशी यानीं तो पर्वत अतिशयें रम्य दिसत असे:

विजृंभिताप्रतिमध्वनिवारिदंसुगंधिभिःपुरपवनैर्मनोहरं॥ हरोमहागिरिनगरंसमासदत्क्षणादिवमवरसुरासुरस्तुतः॥ ४६९॥

अर्थ- अशा त्या पर्वतावरील हिमालयाचे मोठ्या नगरांत त्याकाळीं शंकर एक क्षणासमान कालांतच काय? अशा शीघ्रगतीनें आला. त्यावेळेस सर्व देव व असुर हे शिवाची स्तुति करीत होते; त्या हिमालयाचे पुरावर विशेषें करून चहूंकडे अप्रतिम गर्जना करणारे सजल मेघ पसरले असून तें नगर मंद सुगंध वाहाणाऱ्या वायूनीं अत्यंत सुंदर होतें.

तंप्रविशंतमगात्प्रविलोक्यव्याकुलतांनगरंगिरिभर्तुः॥ व्यग्रपुरंध्रिजनंजवियानंधावितमार्गजनाकुलरथ्यं॥ ४७०॥

अर्थ- नंतर तो कैलासपती शिव, त्या पर्वताधिपति हिमालयाचे नगरांत प्रवेश करीत असतां, तेथील पती व पुत्र यानीं युक्त पतिव्रता-स्त्रिया व इतर सर्वजन त्या महादेवाच्या दर्शनार्थ व्यग्रतेनें मार्गांतून वेगानें धांवत आले; तेव्हां त्या पुरांतील सर्व मार्ग लोकांच्या समुदायानीं व्याप्त झाले; आणि ते संपूर्ण लोक सदाशिवास पाहून त्याचे रूपानें मनांत अत्यंत मोहित झाले.

हर्म्यगवाक्षगतामरनारीलोचननीलसरोरुहमालं॥ सुप्रकटासमदृश्यतकाचित्स्वाभरणांशुवितानविगूढा॥ ४७१॥

अर्थ- आणि ते समयीं शिवास अवलोकन करण्यासाठीं महाधनिकांचे मंदिरांतील झरोक्याशीं आलेल्या देवस्त्रियांचे नेत्र हे नीलवर्ण कमलांच्या ओळीसारखे दिसूं लागले; तशीच त्याकाळीं कोणी एक स्त्री त्या झरोक्यांतून उत्तम रीतीनें स्पष्ट दिसली; ती आपले सर्वांगावरील अलंकारांचे किरण समुदायानें अतिशयें झांकलेली होती.

काप्यखिलीकृतमंडनभूषात्यक्तसखीप्रणयाहरमैक्षत्॥ काचिदुवाचकलंगतमानाकातरतां

सखिमाकुरुमूढे ॥ ४७२॥

अर्थ- याच प्रमाणें पूर्ण शोभार्थ सर्व अलंकारादिक धारण केले- ली कोणी एक स्त्री आपल्या सखी वरील प्रीति व विश्वास यांचा त्या- ग करून अति उत्कंठेनें शिवास यथेच्छ अवलोकन करूं लागली; त शीच दुसरी कोणी एक स्त्री सदाशिवाचें सौंदर्य पाहून निरभिमान हो त्साती मधुर वाणीनें बोलली कीं, हे सखि तूं अशी अज्ञाना सारखी शिवा वांचून इतर विषयांचे मोहानें अंतःकरणांत व्याकुल होऊं नको.

दग्धमनोभवएषपिनाकीकामयतेस्वयमेवविहर्तुं॥ काचिदपिस्वयमेवपतंतीप्राहपरांविरहस्खलितां- गीं॥ ४७३

अर्थ- तंतर दुसरीही कोणी एक स्त्री शिव दर्शनार्थ आली असतां ती स्वतः त इतर कोणी एक पति विरहानें सर्वांगीं चंचल जाहलेल्या स्त्रीस बोलली कीं, मनांत उत्पन्न होणारा मदन ज्यानें जाळिला तो हा पिनाक धनु ष्य धारण करणारा शिव आपण स्वयेंच त्या पार्वतीशीं क्रीडा करण्या वि षयीं इच्छित आहे, एतदर्थ हा येथें आला आहे.

मात्चपलेमदनव्यतिषंगांशांकरजंस्खलनेनवदत्वं ॥कापिकृतव्यवधानमदृष्टायुक्तिवशाद्विरिशोत्थय मूचे॥ ४७४॥

अर्थ- तशीच अन्य कोणी एक स्त्री वस्त्रादिकाच्या पडद्या आड उभी राहू न युक्तीनें आपल्या सखीस बोलली कीं, हे चपल सखि हा निश्चयें करून शंकरच आहे तस्मात् यानें मदनाचा देह जाळिला हें भाषण तूं संशयानें बोलूं नको.

एषसयज्ञसहस्रमखाद्यानाकसदामधिपाःस्वय मुक्तेः॥ नामभिरिंदुजटंनिजसेवाप्राप्तिफलायन तास्तघटंते॥ ४७५॥

अर्थ- आणि जो कैलासवासी शंकर तोच हा सांप्रत या हिमालय पर्वता वर आला आहे, या विषयीं प्रमाण हेंच कीं, हजारों यज्ञ करणारे इंद्रादि- क सर्व देव स्वर्गवासि देवगणांचे आधिपती असून ही हे आपणास से-

वेचें फल प्राप्त होण्या साठीं स्वतः उच्चारण केलेल्या अनेक शिव नामा नीं चंद्र मौलि शंकरास प्रयत्नानें नमस्कार करीत आहेत.

एषनन्वेषसएषयदग्रेघर्मपरीततनुःशशिमौली ॥ धावतिवज्रधरोमरराजो मार्गममुं विदुतीकरणा य ॥ ४७६॥

अर्थ- तस्मात् हा महादेव नव्हे काय ? तर हा निश्चयें करून सदाशिव च आहे यांत संदेह नाहीं ह्मणूनच याचे मस्तकीं भूषण रूपचंद्र शोभत आ हे आणि ह्या त्रिनयन सांबाची तनु मार्ग संबंधी श्रमा मुळें घर्म बिंदूनीं व्या प्त जाहली आहे. यास्तव वज्रधारी देवराज इंद्र या शिवास मार्ग प्रशस्त करून देण्या साठीं शंकराचे अग्रभागीं धांवत आहे.

एषसपद्मभवोयमुपेत्य प्रांशुजटामृगचर्मनिगूढः ॥ सप्रणयंकरघट्टितचक्रं किंचिदुवाचमितंश्रुति मूले ॥ ४७७॥

अर्थ- तसाच विष्णूच्या नाभि कमला पासून उत्पन्न झालेला हा ब्रह्म देव अत्यंत तेजोमय किरण युक्त जटा व पांघरलेलें मृग चर्म (कृष्णाजिन) यानीं वेष्टित होत्साता विष्णू जवळ येऊन हातांत सुदर्शन चक्र धारण कर णाऱ्या त्या विष्णूचे कानांत प्रेमानें किंचित् परिमित भाषण बोलला.

एवमभूत्सुरनारिकुलानां चित्तविसंष्ठुलता गुरुरागा त् ॥ शंकरसंश्रयणाद्गिरिजाया जन्मफलंपरमं ति तिचोचुः ॥ ४७८॥

अर्थ- या प्रमाणें शंकरास अवलोकन करून त्या शिवा विषयींच्या अति प्रीतीनें सर्व देवांगनांच्या समुदायांचें चित्त स्तब्ध जाहलें तेव्हां त्या देव स्त्रिया परस्परें असें बोलूं लागल्या कीं, या महा देवाच्या उत्तम चरणा श्रयानें ह्या पार्वतीच्या जन्माचें परम साफल्य होईल.

ततो हिमगिरेर्वेश्म विश्वकर्मनिवेदितं ॥ महानील मयस्तंभं ज्वलत्कांचनकुट्टिमं ॥ ४७९॥

अर्थ- नंतर विश्व कर्म्यानें शंकरास हिमालयाचें मुख्य मंदिर दाख विलें त्या मंदिरांत मोठमोठे नील मण्यांचे स्तंभ (खांब) असून-

लख लखीत सुवर्ण खचित भूमीनें तें मंदिरशोभत होतें.

मुक्ताजालपरिष्कारंज्वलितौषधिदीपितं॥क्रीडोद्यान
सहस्राढ्यंकांचनाबद्धदीर्घिकं॥४८०॥

अर्थ– तसेंच तें हिमालयाचें गृह; मौक्तिकांच्या जाळ्या व झालरी यानीं सुशोभित असून देदीप्यमान् औषधीनीं प्रकाशित होतें; आणि त्यांत हजारों-क्रीडावनें असून तेथें सुवर्णानें बांधलेल्या अनेक विहिरी होत्या.

महेंद्रप्रमुखाः सर्वे सुराद्दष्ट्वा तदद्भुतं॥नेत्राणिसफ
लान्यद्य मनोभिरितितेदधुः॥ ४८१॥

अर्थ– असें तें हिमालयाचें गृह चमत्कारिक अवलोकन करून इंद्रादिक सर्व देव आपले नेत्र आज सफल जाहले असें चित्तांत मानिते जाहले.

निमर्दकीर्णकेयूराहरिणाद्वारिरोधिताः॥कथंचित्प्र-
मुखास्तत्र विविशुर्नाकवासिनः॥४८२॥

अर्थ– त्या काळीं दाटीनें अस्ताव्यस्त झालेल्या बाहुभूषणानीं युक्त देव; विष्णूनें दारावर अडवून धरिले; त्यांत जे स्वर्गवासी प्रमुख देव होते; ते मात्र महा प्रयासानें त्या मंदिरांत गेले.

प्रणतेनाचलेंद्रेणपूजितोथचतुर्मुखः॥चकारविधि
नासर्वंविधिमंत्रपुरःसरं॥४८३॥

अर्थ– नंतर, अति विनयानें नम्र होऊन पर्वत श्रेष्ठ हिमालयानें पुरोहित-कृत्या विषयीं ब्रह्म देवाची पूजा केली असतां, ब्रह्म देवानें विधि व मंत्र यांनीं युक्त असें तें विवाह संबंधि सर्व कृत्य केलें.

शर्वेणपाणिग्रहणमग्निसाक्षिकमक्षतं॥दातामही
भृतांनाथो होतादेवश्चतुर्मुखः॥ ४८४॥

अर्थ– पश्चात् शिवानें पार्वतीचें पाणिग्रहण अग्नीच्या साक्षीनें यथा विधि केलें. शिवास कन्यादान करणारा पर्वत राज हिमालय असून होम करणारा ब्रह्मदेव होता.

वरः पशुपतिःसाक्षात्कन्याविश्वारणिस्तथा॥चराच-
राणि भूतानि सुरासुरवराणि च॥ ४८५॥ तत्राप्येतेनि
यमतो ह्यभवन्व्यग्रमूर्तयः॥

अर्थ— तसेंच साक्षात् सर्व भूतांचा पति, शंकर त्या लग्न समारंभांत वर अ-
सून चराचर जगाच्या उत्पत्तीस कारण जी पार्वती ती कन्या होती; आणिच-
राचर प्राणिमात्र, देव व असुर यांतील प्रमुख हे सर्वही त्या शिवाच्या लग्न
समारंभांत नियमानें आपापले कार्यांत आसक्त होते.

मुमोचाभिनवान्सर्वान् सस्यशालीन्रसौषधीः ॥ ४८६
व्यग्रा तु पृथिवी देवी सर्वभावमनोरमा ॥

अर्थ— आणि त्या समारंभांत सर्वप्रकारें सुंदर पृथ्वी देवी ही व्यग्र चित्त
होत्साती तांदुळ आदिकरून सर्व नवीन धान्यें घृतादिक अनेक रस व औ
षधि हे पदार्थ देती जाहली.

गृहीत्वा वरुणः सर्वरत्नान्याभरणानि च ॥ ४८७ ॥ पु-
ण्यानि च पवित्राणि नानारत्नमयानि तु ॥ तस्थौ स्वाभ
रणो देवो हर्षदः सर्वदेहिनां ॥ ४८८ ॥

अर्थ— तसाच सर्व प्राण्यांस हर्ष देणारा असून उत्तम अलंकारानीं सुशो
भित वरुण पवित्र ह्मणून पुण्य कारक अनेक रत्न खचित आभरणें व के
वळ ही सर्व रत्नें घेऊन शिवाचे अग्रभागीं उभा राहिला.

धनदश्चापि दिव्यानि हैमान्याभरणानि च ॥ जातरू-
पविचित्राणि प्रयतः समुपस्थितः ॥ ४८९ ॥

अर्थ— त्याच प्रमाणें सुंदर आकृतीनें विचित्र अशीं दिव्य सुवर्णाचीं भू
षणें प्रयत्नानें ग्रहण करून कुबेरही सिद्ध होऊन तेथें शंकरा समीप उ-
भा राहिला.

वायुर्ववौ सुसुरभिः सुखसंस्पर्शनो विभुः ॥ छत्रमिं
दुकरोदारं सुसितं च शतक्रतुः ॥ ४९० ॥ जग्राह सुदि
तः स्रग्वी बाहुभिर्बहुभूषणैः ॥

अर्थ— तसाच तेसमयीं सर्व व्यापक स्पर्शानें सुख कारक असा मंद
सुगंध वायू वाहूं लागला, आणि चंद्रा समान शीतल किरणानीं युक्त-
उत्तम श्वेत छत्र इंद्रानें हर्षयुक्त होऊन बहुत भूषणांनीं सुशोभित अ-
शा हातानीं धरिलें त्या वेळेस त्याच्या गळ्यांत माळ शोभत होती.

जगुर्गंधर्वमुख्याश्च ननृतुश्चाप्सरोगणाः ॥ ४९१ ॥ वा

दयंतोतिमधुरंजगुर्गंधर्वकिन्नराः॥

अर्थ- त्या विवाह समयीं गंधर्व प्रमुख गायन करीत असून अप्सरांचे-समुदाय नृत्य करूं लागले. आणि गंधर्व व किन्नर नाना प्रकारचीं वाद्यें-वाजवीत असून गायन करिते जाहले.

मूर्ताश्चऋतवस्तत्रजगुश्चननृतुश्चवै॥४९२॥च-
पलाश्चगणास्तस्थुर्लोलयंतोहिमाचलं॥

अर्थ- तसेंच त्या लग्नसमारंभांत वसंत प्रमुख सहाऋतु गायन करीत नाचूं लागले. आणि शिवाचे सर्व गण चपल असून तेही त्या गायन सहित नृत्यानें मोहित होऊन ते स्तब्ध राहिले असतां त्यांचा स्थिरपणा पाहून हिमालयानें मान डोलविली.

उत्तिष्ठन्क्रमशश्चात्रविश्वभुग्भगनेत्रहा॥४९३॥
चकारोद्वाहिकंकृत्यंपत्न्यासहयथोचितं॥

अर्थ- नंतर भगनामा आदित्याचे नेत्रांचा नाश करणाऱ्या शिवानें उठून पत्नी सहवर्तमान यथाशास्त्र रीतीनें क्रमें करून विवाह संबंधि सर्व कर्म केलें.

दत्तार्घोगिरिराजेनसुरवृंदैर्विनोदितः॥४९४॥अ-
वसत्तांक्षपांतत्रपत्न्यासहपुरांतकः॥

अर्थ- मग पर्वत राज हिमालयानें शिवास अर्घ्य दिल्यावर देव समुदायांच्या विनोदानीं रममाण होत्साता तो त्रिपुरांतक शंकर आपल्या पत्नी सहित त्या रात्रीं तेथें राहिला.

ततोगंधर्वगीतेननृत्येनाप्सरसामपि॥४९५॥स्तु-
तिभिर्देवदैत्यानांविबुधोविबुधाधिपः॥आमंत्र्यहि-
मशैलेंद्रंप्रभातेचोमयासह॥जगाममंदिरगिरिंवा-
युवेगेनशृंगिणा॥४९६॥

अर्थ- पश्चात् गंधर्वांचें गायन अप्सरांचे नृत्य व देव दैत्यांनीं केलेल्या-अनेक स्तुति यानीं ती रात्र तेथें क्रमून प्रातःकाल झाला असतां सर्व देवांचा राजा तो महादेव पर्वतश्रेष्ठ हिमालयाची आज्ञा घेऊन नंदीवर-बसला आणि वायु समान शीघ्र वेगानें मंदराचल पर्वतास गेला.

ततोगते भगवति नीललोहिते सहोमयारतिमलभ-
न्भूधरः ॥ सबांधवो भवति च कस्य नो मनो विव्हलं
च जगति हि कन्यका पितुः ॥ ४९७ ॥

अर्थ- असा तो कंठस्थानीं नीलवर्ण असून सर्वांगीं आरक्त वर्ण भगवान् शंकर पार्वतीसह वर्तमान गेला असतां सर्व बांधवां सहित हिमालयाचें अंतःकरण समाधान पावलें नाहीं. कारण कन्येचा वियोग जाहला असतां तिच्या पित्याचें चित्त व्याकुल होणार नाहीं असा जगांत कोण आहे ?

ज्वलन्मणिस्फटिकहाटकोत्कटं स्फुरद्द्युतिस्फटि
कगोपुरं पुरं ॥ हरो गिरो चिरमनुकल्पितं तदा विस
र्जितामरनिवहो विशत्स्वकं ॥ ४९८ ॥

अर्थ- नंतर तेजोमय रत्नमणि स्फटिक व सुवर्ण यानीं सर्वत्र सुशोभित असून स्पष्ट कांतियुक्त स्फटिकांच्या गोपुरांनीं अलंकृत अशा आपले मंदरगिरीवरील पुरातन निर्माण केलेल्या पुरांत त्या कालीं शंकर सर्व देवगणांस निरोप देऊन आपण प्रवेश करिता- जाहला.

ततोमासहितो देवो विजहार भगाक्षिहा ॥ पुरोद्या
नेषु रम्येषु विविक्तेषु वनेषु च ॥ ४९९ ॥ स्मरक्तहृद-
यो देव्या मकरांकपुरःसरः ॥

अर्थ- मग ते समयीं भग नामक आदित्याच्या नेत्रांचा नाश करणारा शिव, प्रीतियुक्त अंतःकरणानें पार्वती देवी सहवर्तमान त्या पुरांतील रमणीय बागांत व एकांत वनांत मदनाच्या अनेक लीलानीं क्रीडा करूं लागला.

ततो बहुतिथे काले सुतकामा गिरेः सुता ॥ ५०० ॥
सखीभिः सहिता क्रीडां चक्रे कृत्रिमपुत्रकैः ॥

अर्थ- पश्चात् असा बहुकाळ गेला असतां पुत्राची इच्छा करणारी पार्वती आपल्या सख्यां सहवर्तमान केलेल्या पुत्रांच्या बाहुल्यांनीं खेळूं लागली.

कदाचिद्गंधतैलेन गात्रमभ्यज्य शैलजा ५०१ चूर्णैरुद्वर्तयामास मलिनांतरितां तनुं ॥

अर्थ- नंतर एके समयीं पार्वतीनें आपले अंगास सुगंध तेल लावून पडदणी घेतलेल्या त्या अंगास सुवासिक चूर्णाचें उटणें लाविलें.

तदुद्वर्तनकं गृह्य नरं चक्रे गजाननं ॥ ५०२ ॥ पुत्रकं क्रीडती देवी तं चाक्षिपयदंभसि ॥ जान्हव्यास्तु शिवा सख्यास्ततः सोभूद्बृहत्वपुः ॥ ५०३ ॥

अर्थ- तेव्हां त्या आपले देहाची मळी घेऊन पार्वतीनें त्या मळीचा एक पुरुष केला. त्यास हत्तीचें मुख असून खालची आकृती पुरुषा सारखी होती; आणि तिणें त्या पुत्राकार बाहुलीशीं क्रीडा करून त्यास आपली सखी जी भागीरथी तिच्या उदकांत टाकलें; असतां तो बालक मोठ्या देहानें युक्त जाहला.

कायेनातिविशालेन जगदापूरयत्तदा ॥ पुत्रेत्युवाच तं देवी पुत्रेत्यूचे च जान्हवी ॥ ५०४ ॥

अर्थ- ते समयीं त्या बालकानें आपल्या अति विशाल देहानें सर्व जग व्याप्त केलें; तेव्हां पार्वती व भागीरथी यानीं त्यास हे पुत्रा असें भाषण केलें.

गांगेय इति देवैस्तु पूजितोभूद्गजाननः ॥ विनायकाधिपत्यं च ददावस्य पितामहः ॥ ५०५ ॥

अर्थ- नंतर देवानीं हा गंगापुत्र अशा बुद्धीनें त्या गजाननाची पूजा केली; आणि ब्रह्मदेवानें त्यास विनायक नामक गणांचें आधिपत्य दिलें.

पुनः सा क्रीडनं चक्रे पुत्रार्थं वरवर्णिनी ॥ मनोज्ञमंकुरं रूढमशोकस्य शुभानना ॥ ५०६ ॥ वर्धयामास तं चापि कृतसंस्कारमंगला ॥ बृहस्पतिमुखैर्विप्रैर्दिवस्पतिपुरोगमैः ॥ ५०७ ॥

अर्थ- पुनः ती पार्वती पुत्र संपादनार्थ क्रीडा करूं लागली. ती अशी कीं, कल्याण मुखी पार्वती बृहस्पति प्रमुख ब्राह्मण व इंद्रादिक देव यां सह वर्तमान संस्कारार्थ पुण्याहवाचन रूप मंगल करून अशोक वृक्षाचा उत्पन्न झालेला एक सुंदर अंकुर वाढवूं लागली.

ततोदेवैश्चमुनिभिः प्रोक्तादेवीत्विदंवचः॥ भवानिभ
वतीभव्यासंभूतालोकभूतये॥ ५०८॥

अर्थ- नंतर देव व मुनि यानीं त्या पार्वतीस असें भाषण केलें कीं, हे शिवप्रिये पार्वति तूं स्वतः कल्याण रूप असून लोकहितार्थ उत्पन्न झाली आहेस.

प्रायः सुतफलोलोकः पुत्रपौत्रेश्चलभ्यते॥ अपुत्रा-
श्चप्रजाः प्रायोदृश्यंतेदैवहेतवः॥ ५०९॥

अर्थ- पुत्रोत्पतीच्यायोगानें प्राप्त होणारा लोक केवल पुत्रानींच मिळतो असें नाहीं; तर त्यास पौत्र (नातू) हीं कारण आहेत आणि लोकांत तर प्रायशः प्रजा दैव योगानें पुत्रहीन दिसत आहेत; तेव्हां त्यांस पौत्र कोठून असेल.

अधुनादर्शितेमार्गे मर्यादांकर्तुमर्हसि॥ फलंकिंभवि
तादेविकल्पितैस्तरुपुत्रकैः॥ ५१०॥

अर्थ- हे देवि या काळीं त्वां दर्शविलेल्या वृक्ष वाढविण्याच्या मार्गाविषयीं कांहीं एक मर्यादा करण्या विषयीं योग्य आहेस; ती अशी कीं, वृक्षास पुत्रस्थानीं कल्पून वाढविलें असतां काय फल होतें?

इत्युक्ता हर्षपूर्णांगी प्रोवाचोमाशुभांगिरं॥ देव्युवाच
॥ एवंनिरुदकेदेशे यःकूपंकारयेद्बुधः॥ ५११॥ बिंदौ
बिंदौचतोयस्य वसेत्संवत्सरंदिवि॥

अर्थ- असा त्या देव ऋषीनीं प्रश्न केला असतां ती पार्वती पूर्ण संतुष्ट होत्साती लोक हितकारक हें पुढील भाषण बोलली कीं, जो ज्ञाता निर्जल-देशांत उदका साठीं आड खणील; तो त्या कूपांतील पाण्याच्या प्रतिबिंदूस एक वर्ष या संख्येनें तें पाणी आहे तों पर्यंत स्वर्गांत वास करील.

दशकूपसमावापी दशवापीसमोन्हृदः॥ ५१२॥ दश-
न्हृदसमः पुत्रो दशपुत्रसमोद्रुमः॥ एषैवममर्यादा
नियतालोकभाविनी॥ ५१३॥

अर्थ- या प्रमाणें दहा आड बांधण्याचें फल एक विहीर करण्यांत आहे; तसेंच दहा विहिरींचें पुण्य एका डोहांत आहे; दहा डोहांच्या स्थानीं

एकपुत्र व दहा पुत्रांसमान एक वृक्ष जाणावा.

इत्युक्तास्ते नतोविप्राबृहस्पतिपुरोगमाः॥ जग्मुःस्व
मंदिराण्येवभवानींवंद्यसादरं॥ ५१४॥

अर्थ- असें तिचें भाषण ऐकून ते बृहस्पति प्रभृति ब्राह्मण पार्वतीस आदर पूर्वक नमस्कार करून आपापल्या मंदिरासच गेले.

गतेषु तेषुदेवोपि शंकरः पर्वतात्मजां॥पाणिना लंब
मानेनशनैःप्रावेशयच्छुभां॥ ५१५॥ चित्तप्रसाद-
जननं प्रासाद मनुगोपुरं॥

अर्थ- असे ते सर्व देव व ऋषि गेल्यावर महादेवानें हात लांब करून त्या मंगलरूप पार्वतीस हळूच आपले मंदिरांत नेलें तें मंदिर चित्तास परमानंद देणारें असून त्यास बाहेरून उत्तम द्वारें शोभत होतीं.

लंबमौक्तिकदामानंमालिकाकुलवेदिकं॥ ५१६॥ नि
र्धौतकलधौतंच क्रीडागृहमनोरमं॥ प्रकीर्णकुसुमो
द्दाममत्तालिकुलकूजितं॥ ५१७॥ किन्नरोद्गीतसंगी
तगृहांतरितभित्तिकं॥सुगंधिधूपसंघातं मनःप्रा-
र्थ्यमलक्षितं॥ ५१८॥ क्रीडन्मयूरनारीभिर्वृतंवेत
तवादिभिः॥ हंससंघातसंघुष्टंस्फाटिकस्तंभवेदिकं
॥ ५१९॥ अनारतमतिप्रीत्याबहुशः किन्नराकुलं॥

अर्थ- आणि तें मंदिर असें कीं, मौक्तिकांच्या लांब झालरीनीं युक्त असून त्यांतील ओटे मौक्तिकादिकांच्या माळानीं वेष्टित होते; आणि तें मंदिर शुद्ध सोनें व रुपें यानीं रचित होतें; तसेंच तें मंदिर अनेक प्रकारच्या क्रीडा गृहानीं अति रमणीय दिसत असे, त्याच प्रमाणें तेथें चहूंकडे पडलेल्या सुगंध पुष्पांच्या सुवासानें व रस सेवनानें उन्मत्त झालेल्या भ्रमरांचे समुदायांच्या शब्दानीं ते गृह नादित जाहलें होतें; तसेंच किन्नरांच्या उंच स्वरा वरील गायनानें त्या मंदिरांतील भिंती नादयुक्त झालेल्या असत; तसेंच सुवासिक धूप व दीप यांचे समुदायानीं तें घर सुशोभित असे; ह्मणून तें मंदिर आपणास प्राप्त होण्या साठीं सर्वानीं मनःपूर्वक प्रार्थना करण्यास योग्य होतें; आणि हें मंदिर महा पुण्या वां-

चून इतरांस दृष्टी पडण्या विषयीं अशक्य, क्रीडा करणाऱ्या मोरांच्या स्त्रिया व सारंगी आदी करून तंतुवाद्यें वाजविणार यानीं तें शिवमंदिर युक्त असे; त्याच प्रमाणें हंस समुदायांच्या शब्दांच्या घोषानें युक्त असून स्फटिकांचे खांब व ओटे यानीं तें शिवाचें गृह सुशोभित होतें; व तें शिव मंदिर अकुंठित अत्यंत प्रीतीनें बहुत प्रकारें किन्नरानीं व्याप्त होतें.

शुकैर्यत्राभिहन्यंतेपद्मरागविनिर्मिताः॥५२०॥भित्तयोदाडिमभ्रांत्याप्रतिबिंबितमौक्तिकाः॥तत्रास्य क्रीडयादेवोविहर्तुमुपचक्रमे॥५२१॥

अर्थ- अशा त्या मंदिरांत तांबड्या कमला सारख्या आरक्त वर्ण माणिकांच्या भिंतींत झालरीच्या मोत्यांचें प्रति बिंब पडलें होतें; त्या भिंतीवर दाळिंबाच्या भ्रांतीनें राघू आपल्या चोंचीचे प्रहार करीत असत; त्यास्थानीं शंकर पार्वतीशीं फांशानीं क्रीडा करूं लागला.

स्वच्छेंद्रनीलभूभागेक्रीडनेयत्रधिष्ठितौ॥वपुः सहायतांप्राप्तौ विनोदरसनिर्वृतौ॥५२२॥एवंप्रक्रीडतोस्तत्र देवीशंकरयोस्तदा॥प्रादुर्भवन्महाशब्दस्तद्गृहोदरगोचरः॥५२३॥

अर्थ- त्या काळीं ते पार्वतीशंकर इंद्रनील मण्यानीं खचित अशा त्या पृथ्वीच्या भागावर ज्यास्थळीं खेळत बसले होते; तेथें ते उभयतां परस्परांचे देहास सहाय्य होऊन ते पार्वतीशंकर अशीं अतिशयें क्रीडा करीत असतां, ते समयीं तेथें अकस्मात् महान् शब्द झाला; तो त्या शिवमंदिरांत ऐकण्यास आला.

तच्छ्रुत्वा कौतुकाद्देवी किमेतदितिशंकरं॥पप्रच्छतं शुभा तनुर्हरं विस्मयपूर्वकं॥५२४॥

अर्थ- तेव्हां तो ध्वनि आश्चर्यानें श्रवण करून मंगल कारक तनूनें शोभणारी ती पार्वती त्या कल्याण कारक शिवास विस्मयानें प्रश्न करूं लागली कीं, हें ऐकण्यांत काय येत आहे?

उवाचदेवींनैतत्ते दृष्टपूर्वंसुविस्मिते॥एतेगणेशाः-

क्रीडंतेशैलेस्मिन्‌मत्प्रियाःसदा ५२५॥

अर्थः- नंतर महादेव पार्वतीस बोलले कीं, हे विस्मय युक्त पार्वति हें प्रकरण अद्यापि तुझ्या दृष्टीस पडलें नव्हतें; हे प्रमथादिगणांचे नायक मला प्रिय असल्या मुळें ते या मंदर पर्वतावर निरंतर यथेच्छ क्रीडा करीत आहेत.

तपसाब्रह्मचर्येणनियमैः क्षेत्रसेवनैः॥यैरहंतोषितः पूर्वंत एतेमनुजोत्तमाः॥५२६॥मत्समीपमनुप्राप्तामत्प्रियाः शुभानने॥

अर्थः- हे कल्याण मुखि, तप, ब्रह्मचर्य, अनेक नियम, क्षेत्रसंबंधि यात्रा व वास या कर्मानीं पूर्वी मनुष्य जन्मांत माझें आराधन केलें. ते हे मजसमीप आलेआहेत; व मला अतिप्रिय आहेत.

कामरूपामहोत्साहामहारूपगुणान्विताः॥५२७॥ कर्मभिर्विस्मयंतेषां मयामिबलशालिनां॥

अर्थः- ह्मणून हे माझे सर्वगण कामरूपी असून मोठ्या उत्साह शक्तीनें युक्त आहेत; तसेंच मोठें रूप व गुण यानीं संपन्न आहेत; त्या महा बलाढ्य गणांचा अद्भुत कृत्यानीं मलाही विस्मय होतो, तेथें तुला आश्चर्य वाटतें यांत काय अधिक आहे?

सामरस्यास्यजगतः सृष्टिसंहरणक्षमाः॥५२८॥ब्रह्मविष्ण्वींद्रगंधर्वैः सकिन्नरमहोरगैः॥ विवर्जितोप्यहं नित्यंनैभिर्विरहितोरमे॥५२९॥

अर्थः- आणि हे माझे गण देवसहित या जगाचे सृष्टि व प्रलय याविषयीं समर्थ आहेत. तसेंच ब्रह्मदेव, विष्णु, इंद्र, गंधर्व, किन्नर व मोठमोठे नाग या वांचून मी सर्वदा रमतों; परंतु या गणां विरहित मी क्षणमात्र ही रमत नाहीं.

त्वद्यामेचारुसर्वांगास्तएतेक्रीडतेगिरौ॥इत्युक्तातु-तलोदेवीत्वत्कालद्विस्मयाकुला॥५३०॥ गवाक्षांतरमासाद्य प्रेक्षतेविस्मितानना॥

अर्थः- हे देवी, हे गण मला अति प्रिय असून सर्वांगीं सुंदर आहेत; ह्मणून हे या पर्वतावर क्रीडा करितात; असें शिवानें भाषण केल्यावर ती-

पार्वतीच्या ध्वनि संबंधि भयाचा त्याग करून तशीच विस्मित अंतःकरणानें खिडकींत येऊन त्या गणांस पाहूं लागली; त्यावेळेस तिचें मुख तें आश्चर्य पाहण्याच्या इच्छेनें प्रफुल्लित जाहलें होतें.

यावंतस्ते कृशादीर्घा ह्रस्वास्थूलामहोदराः ॥५३१॥ व्याघ्रेभवदनाः केचित्केचिन्मेषाजरूपिणः॥ अनेकप्राणिरूपाश्च ज्वालास्याः कृष्णपिंगलाः॥५३२॥ सौम्या भीमाः स्मितमुखाः कृष्णपिंगजटासटाः॥ नानाविहंगवदना नानाविधमृगाननाः॥ ५३३॥ कौशेयचर्मवसना नग्नाश्चान्ये विरूपिणः॥ गोकर्णा गजकर्णाश्च बहुवक्त्रेक्षणोदराः॥ ५३४॥ बहुपादा बहुभुजा दिव्यनानास्त्रपाणयः॥ अनेककुसुमापीडा नानाव्यालविभूषणाः॥ ५३५॥ वृत्ताननायुधधरा नानाकवचभूषणाः॥ विचित्रवाहनारूढा दिव्यरूपा वियच्चराः॥ ५३६॥ वीणावाद्यरवा घुष्टा नानास्थानकनर्तकाः॥ गणेशांस्तांस्तथादृष्ट्वा देवी प्रोवाच शंकरं॥ ५३७॥

अर्थ- तों तिणें ते ज्ञितके शिवगण पाहिले; ते असे कीं, कोणी कृश व कोणी उंच व कोणी ठेंगणे, तसेच किती एक अंगानें जाड; किती एकांचीं पोटें मोठीं, ५३१ तशीच त्या गणांत कित्येकांचीं तोंडें व्याघ्र व हत्तीयां सारखीं होतीं; आणि किती एकांचीं रूपें मेंढे व बोकड यांसारखीं; तसेच त्यांत यांहून इतर प्राण्यांच्या आकृती समान देहानें युक्त असे कांहीं गण होते; कित्येकांचे मुखांतून अग्नीच्या ज्वाला चालल्या होत्या; किती एक कृष्णवर्ण व किती एक पिंगटवर्ण. ५३२ त्याच प्रमाणें कांहीं सौम्य कोणी भयंकर किती एक हास्यमुख, आणि किती एकांच्या जटा कृष्णवर्ण व पिंगटवर्ण व कोणाच्या निरनिराळ्या होत्या व कोणाच्या एकत्र झालेल्या होत्या; त्यांत कोणी अनेक पक्ष्यां समान मुखाच्या आकृतीनें युक्त व कोणी नाना प्रकारच्या हरिणादिक श्वापदां सारख्या मुखानीं युक्त. ५३३ तसेच त्यांत कांहीं गणानीं रेशमी वस्त्रें परिधान केलीं व किती एकांनीं व्या-

म; हरिण व गज इत्यादिक अरण्य पशूंचीं चर्में परिधान केलीं होतीं; आणि कितीक त्या गणांत नग्न व दुसरे विचित्र रूपी असे व किती कांचेकान गायी सारखे व कोणांचे कर्ण हत्ती सारखे होते; तशींच कांहीं गणांस बहुत मुखें, नेत्र व पोटें होतीं. ५३४ तसेच त्यांत कोणांस बहुत पाय व बहुत भुज असून कित्येकांच्या हातांत अनेक दिव्य शस्त्रास्त्रें शोभत असत; त्याच प्रमाणें कोणी शिवगण अनेक प्रकारच्या पुष्पांचे मुगुट मस्तकीं धारण केलेले असून अनेक सर्पांचीं भूषणें धारण केलीं होतीं; ५३५ व त्यांत कोणी वर्तुलाकार मुखांचीं आयुधें घेतलेलीं असून त्यानीं अनेक प्रकारचीं कवचें व भूषणें धारण केलेलीं होतीं; व विचित्र वाहनांवर बसले असून दिव्य रूपें धारण करून आकाश मार्गे संचार करीत आहेत ५३६ त्या गणांत कोणी वीणा आदिकरून अनेक वाद्यांचे शब्दांचा घोष चालविला आहे व कोणी अनेक स्थानीं नृत्य करीत आहेत असे ते सर्व गणांचे नायक पाहून पार्वती शंकरास बोलले. ५३७

देव्युवाच॥ गणेशाः कतिसंख्याताः किंनामानः किमात्मकाः॥ एकैकशो मम ब्रूहि धिष्ठिता ये पृथक् पृथक्॥५३८॥

अर्थ- कीं, हे महादेवा, हे सर्व गणांचे नायक निरनिराळे जे दिसत आहेत त्यांची संख्या, नामें व स्वभाव हे प्रत्येकाचे भिन्न भिन्न मला सांग?

शंकर उवाच॥ कोटिसंख्यात्व्यसंख्याता नानाविख्यात पौरुषाः॥ जगदापूरितं सर्वैरेभिर्भीमै महाबलैः॥५३९

अर्थ- ते समयीं शंकर बोलले कीं, हे देवि या गणांची संख्या नंदिकेश्वरादिक कोटींनीं मात्र आहे; परंतु यांची प्रत्येकीं पृथक् संख्या नाहीं ह्मणून हे गण असंख्यात असून हे अनेक पराक्रमानीं लोकांत प्रख्यात आहेत; आणि महा बलिष्ठ व उग्र अशा या सर्व गणानीं जग व्याप्त केलें आहे.

सिद्धक्षेत्रेषु रथ्यासु जीर्णोद्यानेषु वेश्मसु॥ दानवानां शरीरेषु बालेषून्मत्तकेषु च॥५४०॥ एते विशंति मुदिता नानाहार विहारिणः॥

अर्थ:- त्याच प्रमाणें सिद्ध क्षेत्रें, मार्ग, जीर्ण जाहलेल्या बागा वज्रुनीं-घरें, दानवांचीं शरीरें, बाल व उन्मत्त या इतक्या स्थानीं अनेक प्रकारें आहार व क्रीडा करणारे हे गण हर्षयुक्त होत्साते प्रवेश करतात.

ऊष्मपाः फेनपाश्चैव धूमपा मधुपायिनः॥ ५४१॥
रक्तपाः सर्वभक्षाश्च वायुपाल्बुभोजनाः॥ गेयनृ
त्योपहाराश्च नानावाद्यरवप्रियाः॥ ५४२॥ नत्वेषां
वै अनंतत्वाद्गुणान्वक्तुं हि शक्यते॥

अर्थ:- आणि त्यांतील कोणी गण उष्मा प्राशन करणारे व कोणी फेंस तसेच कोणी धूम्र आणि किती एक मद्य. ५४१ त्याच प्रमाणें कांहीं गण रक्त; कांहीं सर्व पदार्थ; किती एक वायु, व कित्येक उदक प्राशनच करणारे असे होते; किती एक गण गायन व नृत्य यांवरच संतुष्ट होणारे व कोणी अनेक वाद्यांचे शब्दांवरच समाधान पावणारे. ५४२ असे हे गण असंख्यात आहेत; यास्तव या गणांचे गुण सांगण्या विषयीं मी समर्थ नाहीं.

देव्युवाच॥ मार्गत्वगुत्तरासंगः शुद्धांगो मुंजमेखली
॥ ५४३॥ वामस्थेन च शिक्येन चपलो रंजिताननः॥
मृगदंष्ट्रोत्पलानां स्रग्दामो मधुराकृतिः॥ ५४४
पाषाणशकलोत्तानकांस्य तालप्रवर्तकः॥ असौ
गणेश्वरो देव किन्नामा किन्नरानुगः॥ ५४५॥ य एष
गणगीतेषु दत्तकर्णो मुहुर्मुहुः॥

अर्थ:- असें शिवाचें भाषण ऐकून पार्वती बोलली कीं, हे देवा स्वतः देहानें पवित्र व ज्यानें कमरेस मुंज नामक दर्भाची मेखला (दोरी), आणि आपले अंगावर कृष्णाजिन परिधान केलें आहे. ५४३ ज्याचे वामभागीं शिंकें, जो चपल व ज्याचें मुख सुंदर आणि ज्याच्या दाढा हरिणा सारिख्या कोमल; तशाच ज्याच्या गळ्यांत कमळांच्या माळांचा गोफ ज्याची आकृति सुंदर दिसत आहे. ५४४ तशींच पाषाणांचीं दोन शकलें हातांत घेऊन कांशाचे उताणे टाळ या रीतीनें वाजवावे ही लोकांत प्रवृत्ती करण्या साठीं तीं शकलें वाजवीत आहे; आणि ज्याचे पृष्ठभागीं बहुत किन्नर गा-

यन करीत चालत आहेत. ५४५ त्या गणांच्या गायनांकडे कान देऊन जो तीं गीतें वारंवार श्रवण करीत आहे; तो हा सर्व गणांचा स्वामी असावा; असें मला भासतें; तस्मात् याचें नाम काय आहे?

शर्वउवाच ॥ सएषवीरकोदेविसदामत्हृदयप्रियः॥-
५४६॥ नानाश्चर्यगुणाधारोगणेश्वरगणार्चितः॥

अर्थ:- नंतर शंकर बोलले हे देवि पार्वति तूं ज्याविषयीं प्रश्न केलास तो हा, वीरक या नांवानें प्रसिद्ध आहे; आणि याचे ठिकाणीं अनेक आश्चर्य कारक गुण आहेत व गणांचे सर्व नायक त्याची पूजा करितात; हा निरंतर माझ्या अंतःकरणास प्रिय आहे.

देव्युवाच ॥ ईदृशस्यसुतस्यास्तिममोत्कंठापुरांतक॥
५४७॥ कदाहमीदृशंपुत्रंद्रक्ष्याम्यानंददायिनं॥

अर्थ:- त्या काळीं पार्वती बोलली हे त्रिपुरांतका देवा असल्या गुणाढ्य पुत्राची उत्कंठा मला बहुत आहे; यास्तव अशा आनंद दायक पुत्रास कधीं अवलोकन करीन.

शर्वउवाच॥ एषएवसुतस्तेस्तुनयनानंदहेतुकः॥५४८
त्वयामात्राकृतार्थस्तुवीरकोपिसुमध्यमे॥

अर्थ:- ते समयीं शिव बोलला कीं, हे सुंदर कटि पार्वती, नेत्रांस आनंदकारक असा हा वीरकच तुला पुत्र असो; ह्मणजे तेणें करून हा वीरकही मातृस्थानापन्न जी तूं तुझ्या योगानें कृतार्थ होईल.

इत्युक्ताप्रेषयामासविजयांहर्षणोत्सुका॥५४९॥ वी
रकानयनायाशुदुहिताहिमभूभृतः॥

अर्थ:- असें शिवानें भाषण करतांच हर्षानें उत्सुक झालेली हिमालय कन्या पार्वती त्या वीरकास आणण्या विषयीं आपल्या विजया नामक सखीस त्वरेनें पाठविती जाहली.

साप्ररुह्यत्वरायुक्ताप्रासादादंबरस्पृशः॥५५०॥ वि
जयोवाचगणपंगणमध्येप्रवर्तिता॥

अर्थ:- तेव्हां ती विजया त्या गगन चुंबित मंदिरांतून त्वरेनें उतरून शिवगणांत जाऊन त्या गणनायक वीरकास बोलली.

विजयोवाच॥ एहिवीरकचापल्यात्त्वयादेवःप्रकोपितः ॥५५१॥ किमुत्तरंवदत्यर्थेनृत्यरंगेतुशैलजा॥

अर्थः- हे वीरक तूं चापल्यानें महादेवास राग आणला आहेस, तस्मात् तूं इकडे ये आणि या तुझ्या नृत्य रंगरूप कार्याविषयीं तुला पार्वती काय उत्तर बोलत आहे तें तूं श्रवण कर.

इत्युक्तस्त्यक्तपाषाणशकलोमार्जिताननः॥ ५५२॥ आहूतस्तनयोद्भूतमूलप्रस्तावशंसकः॥ देव्याःसमीपमागच्छज्जययानुगतःशनैः॥ ५५३॥

अर्थः- असें त्या विजयेनें भाषण करून बोलाविलें असतां तो प्रसिद्ध मूल कथा सांगणारा वीरक आपले हातांतील तीं पाषाणांचीं शकलें टाकून तोंड पुसून हळू त्या विजयेच्या मागून पार्वती समीप आला.

प्रासादशिखरात्फुल्लरक्तांबुजविभद्युतिः॥ तंदृष्ट्वाप्रस्नुतानल्पस्वादुक्षीरपयोधरा ॥ गिरिजोवाचसस्नेहंगिरामधुरवर्णया॥ ५५४॥

अर्थः- ते समयीं त्या मंदिराच्या गच्चीवरून प्रफुल्लित आरक्त वर्ण कमला समान कांतीनें शोभणाऱ्या पार्वतीनें त्या वीरकास पाहून पुत्र स्नेहामुळें तिचे स्तन बहुत व मधुर अशा दुधानें पूर्ण होऊन तें दूध त्यांतून स्रवूं लागलें, तेव्हां ती प्रेम पूर्वक मधुर अक्षर युक्त वाणीनें बोलूं लागली.

अथगद्यानि ॥ उमोवाच ॥ एह्येहियातोसिमेपुत्रतांदेवदेवेनदत्तोधुनावीरक॥ ५५५॥ इत्येवमंकेनिधायाथतंपर्यष्वजत्कपोलेकलवादिनं॥ ५५६॥

अर्थः- हे वीरक इकडेये इकडेये, कारण देवाधिदेव शंकरानें तुलापुत्रकेलें करून मला दिलें आहे; तस्मात् तूं माझा पुत्र झाला आहेस असें भाषण-करून पार्वतीनें त्या मधुर भाषण करणाऱ्या वीरकास आपल्या मांडीवर बसवून त्याच्या गालाचें चुंबन केलें.

मूर्ध्न्युपाघ्रायसंमार्ज्यगात्राणिभूषयामासदिव्यैः स्वयंभूषणैः किंकिणीमेखलानूपुरैर्माणिक्यकेयूरहारोरुमूलगुणैः॥५५७॥

अर्थ- आणि पार्वतीनें त्याच्या मस्तकाचें अवघ्राण करून त्याचीं हस्त पादादिक सर्वांगें स्वच्छ करून लहान घागऱ्यांचा करगोटा, पैंजण, माणि कांचीं बाहुभूषणें व हार आणि कंबरेचे दागिने, इत्यादिक उत्तम अलंकारांनीं पार्वतीनें स्वतः त्या वीरकास सुशोभित केलें.

कामलैः पल्लवैश्चित्रितैश्चारुभिर्दिव्यमंत्रोद्भवैस्तस्य शुभैस्ततो भूरिभिश्चाकरोन्मिश्रसिद्धार्थकैरंगरक्षाविधिः॥ ५५८॥ एवमादायचोवाचकृत्वासंमूर्ध्निगोरोचनांपत्रभंगोज्ज्वलैः॥ ५५९॥

अर्थ- तसेंच चित्रविचित्र, सुंदर व कोमल असे असून दिव्य मंत्रापासून उत्पन्न झालेले वृक्षांचे पल्लव यानीं मिश्रित असून त्यांपेक्षांही अधिक शुभकारक अश्या पांढऱ्या मोहोऱ्यांनीं ती पार्वती त्या वीरकाच्या सर्व अंगास रक्षा बंधन करिती जाहली, आणि त्याच्या कपाळावर गोरोचनानें पानांचे लखलखीत वेल काढून पार्वती त्यास जवळ घेऊन बोलली.

गच्छगच्छाधुनाक्रीडसार्धंगणैरप्रमत्तोवसंश्चात्रजीर्णशैनैर्व्यालमालाकुलाः शैलसानुद्रुमर्दंतिभिर्भिन्नसाराःपरेसंगिनः॥ ५६०॥

अर्थ- हे पुत्रा जा जा आणि या कालीं तूं या गणांसहवर्तमान क्रीडा कर, तसाच तूं हळु हळू आपल्या वर्तणुकींत कांहीं एक छिद्र न ठेवतां सावधपणानें रहा; कारण हे इतर सर्व गण ही येथें सर्पांच्या समुदायानीं भयभीत आहेत, आणि पर्वत व त्याचेच शिखरावरील झाडींतील मोठ मोठ्या हत्तींच्या वेगानें या गणांचें धैर्य नष्ट जाहलें आहे.

जान्हवीयंजलंस्रुब्धतोयाकुलंकूलंमाविशेथाबहुव्याघ्रदुष्टेवने॥ ५६१॥

अर्थ- तसेंच हे बालका तूं या भागीरथीच्या उदकांत जाऊं नको, कारण हें गंगेचें नीर तिच्या भयंकर जलानें व्याप्त आहे; आणि बहुत व्याघ्रां मुळें जाण्या विषयीं दूषित झालेल्या अशाया आसमंताद्भागच्या अरण्यांत ही जाऊं नको.

वत्सासंख्येषु दुर्गागणेशेष्वेतस्मिन् वीरके पुत्रभावो
पतुष्टांतःकरणा तिष्ठतु ॥ ५६२ ॥

अर्थ- हे वत्सा या असंख्य गणनायकांत वीरक जो तूं त्या तुजवर दुर्गादे
वी, पुत्र भावानें अंतःकरणांत निरंतर संतुष्ट असो.

स्वस्य पितृजनप्रार्थितं भव्यमायाति भाविन्य सोभ
व्यता ॥ ५६३ ॥

अर्थ- कारण आपल्या मातापितरादिक श्रेष्ठ स्वजनानीं प्रार्थना केलेलें
कल्याण बाळकांस प्राप्त होतें; तस्मात् हें कल्याण भावनेनेंच प्राप्त होणा
रें आहे.

सोपि निवृत्य सर्वगणैः सस्मयमाह बालत्वलीलार-
साविष्टधीः ॥ ५६४ ॥

अर्थ- असें पार्वतीचें भाषण ऐकून तो वीरक तेथून मागें फिरून आप
ले गणांत पूर्वस्थानीं आला; आणि तो बाळत्व संबंधि लीलांच्या रसाम-
ध्यें आसक्त होऊन विस्मयानें त्या सर्व गणां बरोबर बोलता जाहला.

एष मात्रा स्वयं मे कृतभूषणोत्र एष पटः पटलैर्बिंदु
भिः सिंदुवारस्य पुष्पैरियं मालतीमिश्रिता मालिका
मे शिरस्याहिता ॥ ५६५ ॥

अर्थ- हा माझा देह माता जी पार्वती तिणें स्वतः अलंकारानीं सुशोभि
त केला; तसाच तिणें हा माझा शेला विस्तीर्ण बिंदूनीं अलंकृत केला;
तशीच मालती पुष्पानीं मिश्रित निर्गुंडीच्या फुलांची माळ माझे मस्तकीं
स्थापन केली.

कोयमातोद्यधारी गणस्तस्य दास्यामि हस्तादिदं क्री
डनं ॥ ५६६ ॥

अर्थ- तसाच वाद्य धारण करणारा गण कोण आहे; त्यास मी आप-
ल्या हातांतलें हें खेळणें देईन.

दक्षिणात्पश्चिमं पश्चिमादुत्तरमुत्तरात्पूर्वमध्येत्य-
सख्या सुता प्रेक्षती तं गवाक्षांतराद्वीरकं शैलपुत्री-
बहिः क्रीडनं यज्जगन्मातुरेष चित्तभ्रमः ॥ ५६७ ॥

अर्थ- असें तो वीरक भाषण करीत आहे; तों इतक्यांत ती पार्वती आपल्या-सखी सहवर्तमान दक्षिणे कडून पश्चिम, पश्चिमे कडून उत्तर व उत्तरे कडून पूर्व अशा रीतीनें खिडकींत येऊन बाहेर क्रीडा करणाऱ्या त्या वीरकास पाहूं लागली; हा जगन्मातेच्या चित्तास पुत्र मोहानें भ्रम जाहला आहे.

पुत्रलुब्धोजनस्तत्रकोमोहमायातिनस्वल्पचेताजडो-
मांसविण्मूत्रसंघातदेहः॥५६८॥

अर्थ- असा पार्वतीस ही मोह झाला; तेव्हां पुत्रा विषयीं लोभासक्त कोण होणार नाहीं; हा सर्व लोक मांस, विष्ठा व मूत्र इत्यादिक समुदायरूप देहानें युक्त असून क्षुद्र अंतःकरणाचा व मूर्ख आहे.

द्रष्टुमभ्यंतरंनाकवासेश्वरेरिंदुमौलिंप्रविष्टेषुकस्तांत
रं॥५६९

अर्थ- अशा या मोहांत आसक्त असल्या मुळें स्वर्गवास करणारांत जे श्रेष्ठ आहेत. तेही तृणांत राहणाऱ्या देवतांत श्रेष्ठ जो चंद्रमौळी शंकर त्यास जाणण्या विषयीं समर्थ नाहींत.

वाहनास्यावरोहा गणास्तैर्युतोलोकपालास्त्रमूर्त्ते-
स्त्वयंखड्गो विखड्गकरोनिर्ममः कृतांतः कस्यकेनाह
तोब्रूतमौनेभवंतोस्त्रदंडेन किंदुस्पृहाः॥५७०॥

अर्थ- तसेंच या मोहामुळें वाहनानीं गमन करणारे व पांयांनीं चालणारे-या गणांनीं युक्त असून सर्व लोकपालांच्या अस्त्रांची केवल मूर्तीच आहे; आणि हातांत तलवार नसतां केवळ खड्गा समान निर्दय असा हा मृत्यु कोणाचा कोणी दूर केला; तें सांगा; कारण तुह्मीं ऋषिकर्मांत निरंतर आसक्त आहांत; तेव्हां तुह्मास त्या मृत्यूचें भय नाहीं. ह्मणून तुह्मास त्या मृत्यूवर अस्त्र दंडानें वाईट इच्छा नाहीं.

भीममूर्त्याननेनास्तिकृत्यंगिरौय एषोस्त्रज्ञेनकिंव
ध्यते॥५७१॥

अर्थ- आणि तुह्मास या पर्वतावर भयंकर मूर्ति व मुख यानीं युक्त जो मृत्यु त्या विषयीं कांहीं कर्तव्य नाहीं; कारण तुह्मी सर्वदां ऋषिकर्मांत तत्पर असल्या मुळें निर्भय आहांत; व हा मृत्यु जो अस्त्रज्ञ त्याचे हातून मार-

ला जातो काय?

माकृथालोकपालानुगचित्ततारएवमेवेत दिस्यूचुरस्मै
तदादेवताः॥ ५७२॥

अर्थ- तस्मात् लोकपालनाथ जो शिव त्यावर निरंतर चित्त ठेवणें व्यर्थ नाहीं; असें देवता त्याकाळीं वीरकास बोलल्या.

देवदेवानुगंवीरकंलक्ष्मणाप्राहदेवीवनंपर्वतानिझे
राण्यग्निदेव्यान्यथोमूलपानिझेरांभोनिपातेषुनिम
ज्जत॥ ५७३॥

अर्थ- नंतर देवाधिदेव शंकराचा सेवक जो वीरक त्यास कोणी एक लक्षणा नामक देवी बोलली कीं, प्राण्यानें रक्षण करणारें गणहो येथील हें वन, पर्वत व झरे यासर्वांची देवता अग्नि आहे; तस्मात् या झऱ्यांचें उदक जेथें पडत आहे; त्यांत तुह्मीं स्नान करा.

पुष्पजालावनद्धेषुधामस्वपिशेतप्रोत्तुंगनानाद्रिकुंजे
ष्वनुगर्जतु हेमारुतास्फोटसंक्षेपणान्कामत॥ ५७४

अर्थ- त्याच प्रमाणें फुलांच्या समुदायानीं व्याप्त अशा स्थानांत तुह्मीं शयन करा; अतिशयें उंच अशा पर्वता वरील वेलींनीं वगैरे वेष्टित प्रदेशांत गर्जना करा; व उष्णादि विकार संबंधानें शरीरास येणाऱ्या फोडांचा नाश करणाऱ्या वायूंची इच्छा करा.

कांचनोत्तुंगशृंगावरोहक्षितौ हेमरेणूत्करासंगधृतिं रवे
चराणांवनाधायिनिरम्ये बहुरूपसंपत्प्रकरेगणान्वा
सितंमंदरकंदरेसुंदरमंदारपुष्पप्रवालांबुजे सिद्धना-
रीभिरापीतरूपामृतंविस्तृतैर्नेत्रपात्रैरनुन्मेषिभिर्वी
रकंशैलपुत्री निमेषांतरादस्मरत्पुत्रगृध्नी विनोदार्थि
नी॥ ५७५॥

अर्थ- नंतर त्या मंदर पर्वत संबंधि गुहेंत सुवर्णाच्या उंच शिखरा खालच्या वन भूमीवर तो वीरक क्रीडा करीत होता; तें वन असें कीं, देवांच्याही वनास शोभेनें पुष्ट करणारें असें रम्य असून बहुत संपत्तीच्या समुदायानें युक्त होतें; आणि त्या वनांत सुंदर मंदार वृक्षांचीं फुलें, कोमल पल्लव व कमळें

असत; तेथें क्रीडा करणारा तो वीरक असावा, ज्याची देह कांती सोन्या त्या रजांचे समुदाया पेक्षां अधिक असून ज्याच्या मागें बहुत गण ही आहेत; व देव योनींतील सिद्धांच्या स्त्रिया आपल्या विशाल नेत्र रूप पात्रांनीं डोळे न झांकतां त्या वीरकाचें रूप हेंच कांहीं एक अमृत त्याचें-प्राशन करीत होत्या; अशा त्या वीरक पुत्राची इच्छा करणाऱ्या पार्वतीस त्या पुत्राची क्रीडा पहाण्या साठीं पुनः क्षणमात्र कालानें त्या वीरकाचें स्मरण झालें.

सोपिताद्दक्क्षणावाप्तपुण्योदयोयोपिजन्मांतरस्यात्म-
जत्वंगतः॥५७६॥

अर्थ- तसाच तो वीरक ही जन्मांतरीय पुण्यानें पार्वतीचा पुत्र होऊन त्या पुण्योदयानेंच अशा मोठ्या आनंदानें युक्त झाला आहे.

क्रीडतस्तस्यतृप्तिः कथंजायते योपिभाविजगद्वेधसा
तेजसः कल्पितः प्रतिक्षणंदिव्यगीतक्षणोनृत्यलोलो
गणेशैःस्वप्रणत्यक्षणःसिंहनादाकुलेगंडशैले स्फुरद्र
त्नजाले बृहत्सालताले क्षणे फुल्लनानातमाला लिकाले
क्षणंवृक्षमूले विलोलोमराले क्षणे स्वल्पपंकेजले पंक
जाढ्ये क्षणं मातुरंकेशुभे निष्कलंके ॥५७७॥

अर्थ- आणि उत्पन्न होणाऱ्या जगाच्या ब्रह्मदेवानें स्वकीय तेजापासून निर्माण केलेला जो हा पार्वती पुत्र वीरक प्रतिक्षणीं उत्तम गायनानें आनंद युक्त होत्साता गणांतील प्रमुखांसह वर्तमान नृत्या विषयीं ही तत्पर होत असे; आणि तो वीरक इतरांनीं आपणांस नमस्कार केल्यानें हर्ष मानणारा नसून सिंह नादानें युक्त, जेथें रत्न समुदाय उत्पन्न होत आहेत; तसेच सभोंवतीं मोठ मोठे साल, ताल वृक्ष व नाना प्रकारचे प्रफुल्लित तमाल वृक्षांच्या पंक्ती यानीं सुशोभित, अशा पर्वता पासून पडलेल्या महा पाषाणा वर क्षणमात्र, क्षणमात्र वृक्षांच्या मूलावर तसेंच कदाचित् तिरीं बसलेल्या हंसानीं शोभायमान असून अति अल्पकर्दम व कमलें यानीं युक्त उदकांत व क्षणभर माताजी पार्वती तिच्या निर्दोष शुभ कारक मांडीवर तो वीरक क्रीडा करीत असतां त्याची तृ-

सी कशी होईल.

परिक्रीडते बाललीला विहारी गणेशाधिपो देवतानंद-
कारी ॥ निकुंजेषु विद्याधरैर्गीतशीलः पिनाकीवली
ला विलासैः सलीलः ॥ ५७८

अर्थः- या प्रमाणें गणनायकांचा स्वामी असून सर्व देवतांस आनंद देणारा, विद्याधरानीं स्तुत्य स्वभावानें युक्त बालका सारख्या सर्व क्रीडा अनायासानें करणारा असा तो वीरक "लीलेनें विलास करणारा असून लीला विग्रह धारी शिवा सारखा" लतादिकानीं वेष्टित भूमि प्रदेशांत आसमंताद्भागीं क्रीडा करीत होता.

प्रकाश्य भुवनाभोगी ततो दिनकरे गते ॥ देशांतरं तदा
पश्चाद्दूरमस्तावनीधरं ॥ ५७९ ॥

अर्थः- नंतर सूर्य, लोकांस प्रकाश करून पश्चात् दूर देशांतरीं अस्ताचलास गेला असतां त्या कालीं हा वीरक सर्व भुवनांचें रक्षण करतो.

उदयास्ते पुरोभावी यो हि चास्तेवनीधरः ॥ मित्रत्वम
स्य संदृष्टं हृदये परिचिंत्यतां ॥ ५८० ॥

अर्थः- तसाच हा वीरक सूर्याचे उदय व अस्त या दोन्ही कालीं उदय व अस्त यांच्या प्रतिबंधार्थ येणाऱ्या साडे तीन कोटी मंदेह नामक राक्षसांचा नाश करितो; ह्मणून लोकांनीं सूर्या सारखेंच या वीरकाचें ही मित्रत्व मनांत अत्यंत दृढतेनें चिंतन करावें.

नित्यमाराधितः श्रीमान् पृथुमूलः समुन्नतः ॥ नाक
रोत्सेवितुं मेरुरुपहारं पतिष्यतः ॥ ५८१ ॥

अर्थः- आणि निरंतर ऋषि प्रभृति महाजनानीं सेवित असून सर्व संपत्तीनीं युक्त, ज्याचें मूल मोठें, सर्व पर्वतां पेक्षां अति उंच असा मेरु पर्वत ही सूर्या सह वर्तमान आकाशांत गमन करणाऱ्या वीरकाच्या पूजेचें ग्रहण करण्या विषयीं मन लोभयुक्त केलें नाहीं.

पतिष्ये साव्यवस्थेति संश्रयेणाखिलं बुधः ॥ दिनां
तानुगतो भानुः स्वजनत्वमपूरयत् ॥ ५८२ ॥

अर्थः- त्याच प्रमाणें तो ज्ञानी सूर्य आपल्या गतीची अव्यवस्था न हो-

ण्या साठीं सर्व प्रकारें वीरकाच्या उत्तम आश्रयानें यत्न करीन; अशा भावानें उदया पासून दिवसाच्या अंतीं अस्ताचलास गेलेला भानुवीरकानें स्वजनत्व पूर्ण करिता जाहला.

संध्याबद्धांजलिपुटामुनयोभिमुखारविं॥ याचंत्यां-
गमनंशीघ्रंनिवार्यात्मनिभाविनां॥ ५८३॥ व्यजृंभद
थलोकेस्मिन् क्रमाद्वैभावरंतमः॥ कुटिलस्येव हृदये
कालुष्यंदूषयन्मनः॥ ५८४॥

अर्थ- तेसमयीं संध्याकाळीं सर्व मुनि अंजली पुट जोडून सूर्याच्या सन्मुख उभे राहिले; आणि त्या वेळेस पार्वती मनांतील गर्व सोडून सूर्यास अस्तास जाण्या विषयीं प्रार्थना करीत असतां, तत्काल मग लोकांत रात्रि संबंधि अंधकार क्रमानें प्रगट झाला; यास दृष्टांत " जसें कुटिलाच्या हृदयांत कालुष्य मनास दूषित करितें तसें ".

ज्वलत्फणिफणारत्नदीपोद्योतितभित्तिके॥ शयनंश
शिसंघातशभ्रवरस्रोत्तरच्छदं॥ ५८५॥ नानारत्न-
द्युतिलसच्छक्रचापविडंबकं॥ रत्नकिंकिणिकाजा
लंलंबमुक्ताकलापकं॥ ५८६॥ कमनीयचलल्लोल
वितानाच्छदितांबरं॥ मंदिरेमंदसंचारः शनैर्गिरि
सुतायुतः॥ ५८७॥ तस्थौगिरिसुताबाहुलतामी
लितकंधरः॥ शशिमौलिसितज्योत्स्नांशुनिपूरित
गोचरः॥ ५८८॥

अर्थ- तेव्हां नागांच्या फणांतील दैदीप्यमान रत्नरूप दीपांच्या प्रकाशानें युक्त भिंतींच्या मंदिरांत मंदगतीनें संचार करणारा असून मस्तकीं धारण केलेल्या चंद्राच्या शभ्र कांतीनें सर्व पदार्थ शभ्र केले करून पूर्ण करणारा व पार्वतीनें गळ्यास मिठी घातलेला असा शिव त्या पार्वती सहवर्तमान आपल्या शयनावर हळूच बसला. तें शयन असेंकीं, चंद्रांच्या समुदाया-सारख्या अति शभ्र कांति युक्त पलंग पोसानें शोभणारें असून अनेक रत्नांच्या कांतीनें दैदीप्यमान इंद्र धनुष्या सारखें दिसत होतें; आणि त्या अंथरुणास बहुत रत्नांच्या लहान घंटा असून वर मोत्यांच्या झालरी ला-

वळेल्या होत्या; व त्या शेजेच्यावरचे भागीं सुंदर असून चंचल होणाऱ्या-प्रिय चांदव्यानें आकाश आच्छादित झालें होतें.

गिरिजाप्यसितापांगीनीलोत्पलदलच्छविः॥ विभावर्याचसंपृक्ताबभूवातितमोमयी॥ तामुवाचततोदेवः क्रीडाकेलिकलायुतं॥ ५८९॥

अर्थ- तशीच नीलवर्ण कमलाच्या दळासमान कांतियुक्त असून कृष्णवर्ण नेत्र कटाक्षानीं शोभणारी ती पार्वती रात्रीचा स्पर्श झाला तेणें करून; अति कृष्णवर्ण जाहली अशा पार्वतीस त्याकाळीं महादेव क्रीडासंबंधि विनोदरूप थट्टेनें भाषण करूं लागला. इतिश्री मत्स्यपुराणें तारकोपाख्यानें कुमार संभवे त्रिपंचाशदुत्तर शततमोऽध्यायः १५३

अध्याय १५४ वा.

शर्वउवाच॥ शरीरेममतन्वंगिसितेभास्यसितद्युतिः॥ भुजंगीवासिताशुद्धासंश्लिष्टाचंदनेतरौ॥ १॥

अर्थ- कीं, हे सूक्ष्मांगि पार्वती "जशी कृष्णकाळी नागीण शुभ्रचंदन वृक्षावर शोभते तशी" तूं माझे शुभ्र देहावर कृष्णवर्ण कांतीनें युक्त अशी दिसतेस.

चंद्रातपेनसंपृक्तारुचिरांबरयातथा॥ रजनीवासितेपक्षेदृष्टिदोषंददासिमे॥ २॥

अर्थ- तशीच उत्तम आकाशांत उत्पन्न झालेली रात्र स्वतः कृष्णवर्ण-असून ती शुक्लपक्षांत चंद्राच्या तेजानें युक्त होऊन जशी दिसते; तशी तूं माझा दृष्टीस पडतेस.

इत्युक्तागिरिजातेनमुक्तकंठापिनाकिना॥ उवाचकोपरक्ताक्षीभ्रृकुटीकुटिलानना॥ ३॥

अर्थ- असें पिनाक धनुर्धारी शिवानीं भाषण केलें असतां क्रोधें करून-लाल जिचे नेत्र आणि भोंवया वक्र आहेत ज्या मुखाचे ठायीं अशी पार्वती आपला कंठ मोकळा करून शिवाशीं भाषण करिती जाहली.

देव्युवाच॥ स्वकृतेनजनः सर्वोजाड्येनपरिभूयते॥ अवश्यमर्थात्प्राप्नोतिखंडनंशशिमंडन॥ ४॥

अर्थ- कीं, हे चंद्रशेखराशिवा, सर्व लोक स्वकर्मानें प्राप्त झालेल्या मूर्ख त्यामुळें पराभव पावतो आणि अर्थातच अवश्य नाश पावतो.

तपोभिर्दीर्घचरितैर्यश्च प्रार्थितवत्यहं ॥ तस्यामे नियत स्त्वेष त्ववमानः पदेपदे ॥ ५ ॥

अर्थ- यावरून मी पूर्वी बहुकाल पर्यंत मोठमोठीं तपें करून तूं पतिप्राप्त होण्या विषयीं प्रार्थना केली असून तुझ्या पासून माझा पदोपदीं विनाकारण निश्चयें करून असा अपमान होत आहे.

नैवास्मि कुटिला शर्व विषमा नैव धूर्जटे ॥ सविषस्त्वं गतः रव्यातिं व्यक्तं दोषाकराश्रयात् ॥ ६ ॥

अर्थ- हे शंकरा मी कुटिल व विषम ही नाहीं; आणि दोषाकर जो चंद्र त्याच्या-संबंधानें निश्चयें करून तूं मात्र विषयुक्त अशा प्रसिद्धीस प्राप्त जाहला आहेस.

नाहं पूष्णोपि दशना नेत्रे चास्मि भगस्य हि ॥ आदित्यश्च विजानाति भगवान्द्वादशात्मकः ॥ ७ ॥

अर्थ- मी पूषा नामक आदित्याचे दांत व भग नांवाच्या आदित्याचे नेत्र ही नव्हे; आणि माझी वास्तवीक स्थिति द्वादश रूपी भगवान् आदित्य यथार्थ जाणत आहे.

मूर्ध्नि शूलं जनयसि स्वैर्दोषैर्मामधिक्षिपन् ॥ यस्त्वं मामाह कृष्णेति महाकालेति विश्रुतः ॥ ८ ॥

अर्थ- आणि आपले दोष मजवर स्थापून माझी निंदा करीत होत्साता माझे मस्तकीं, शूळ उत्पन्न करितोस; तें असें कीं, तूं महाकाल (मोठा कृष्णवर्ण) या नामानें प्रसिद्ध असून मला काळी ह्मणतोस.

यास्याम्यहं परित्यक्तुमात्मानं तपसा गिरिं ॥ जीवंत्या नास्ति मे कृत्यं धूर्तेन परिभूतया ॥ ९ ॥

अर्थ- यास्तव आतां मी तपानें देहत्याग करून हिमालया कडे जाईन; कारण अशा वंचकाच्या योगानें पराभव पावून जिवंत रहाण्यांत मला कांहीं एक कर्तव्य नाहीं.

निशम्य तस्या वचनं कोपतीक्ष्णाक्षरं भवः ॥ उवाचाधिक संभ्रांतः प्रणयेनेंदुमौलिना ॥ १० ॥

अर्थ- असें पार्वतीचें क्रोधपूर्वक तीक्ष्ण अक्षरानीं युक्त वचन ऐकून पार्व ती संबधि प्रीतीनें आपलें चंद्रयुक्त मस्तक अधिक हालवून तो शंकर बो लूं लागला.

शर्वउवाच॥ अगात्मजासिगिरिजेनाहंनिंदापरस्तव॥
त्वद्भक्तिबुध्याकृतवांस्तवाहंनामसंश्रयं॥११॥

अर्थ- कीं, हे पार्वती तूं खरी हिमालय पर्वताची कन्या आहेस; मी तुझी निंदा-करणारा नव्हे; कारण तुझी भक्ति पाहून त्याच बुद्धीनें म्या तुझें पाणि ग्रहण केलें.

विकल्पः स्वस्थचित्तेपिगिरिजेनैवकल्पना॥यद्येवंकु-
पिताभीरुत्वंतवाहंनवैपुनः॥१२॥नर्मवादीभविष्या-
मिजहिकोपंशुचिस्मिते॥ शिरसाप्रणतश्चाहंरचित
स्तेमयांजलिः॥१३॥

अर्थ- हे गिरिजे, तुझा स्वस्थ अंतःकरणांत ही असा विकल्प उत्पन्न जाहला तर ही विकल्प कल्पना मुळींच नयावी असें असतां जर तुला राग आला-तर हे मित्रे मी पुनः तुला विनोदाचें भाषण करणार नाहीं; तस्मात् हे सुं दर हास्यवदने आतां तूं कोपाचा त्याग कर. कारण मी तुला मस्तकानें नम्र-झालों, म्या तुला हातही जोडले, आणि आतां तुझ्याशीं खरें बोलेन.

स्नेहेनाप्यवमानेननिंदितेनेतिविक्रियां॥तस्मान्न-
जातुरुष्टस्यनर्मस्पृष्टोजनःकिल॥१४॥

अर्थ- तस्मात् स्नेहानें ही अवमानानें किंवा निंदेनें थट्टा केली असतां अंतः करणांत क्रोध उत्पन्न होतो तर जो रुष्ट झाला असेल; तो जन इतरांच्या वि नोदाचें सहन करीत नाहीं.

अनेकैःस्वादुभिर्देवीदेवेनप्रतिबोधिता॥कोपंतीव्रंन-
तत्याजसतीमर्माणिघट्टिता॥१५

अर्थ- अशा अनेक मधुर भाषणानीं शिवानें पार्वतीचें समाधान केलें त थापि ती साध्वी पार्वती मर्म स्थानीं व्यथित झाली; या मुळें तिच्या मनां तील तो तीक्ष्ण क्रोध जाईना.

अवष्टब्धमथास्फाल्यवासःशंकरपाणिना॥ विपर्य
स्तालकावेगाद्यातुमैच्छतशैलजा॥१६॥

अर्थ- तेव्हां ती पार्वती शिवानें धरलेलें आपलें वस्त्र ओढून केश अस्ताव्यस्त झाले असून तशीच वेगानें जाण्याची इच्छा करूं लागली.

तस्याव्रजंत्याः कोपेनपुनराहपुरांतकः ॥ सत्यंसर्वैरव
यवैःकृतासिसदृशीपितुः ॥ १७ ॥

अर्थ- तेसमयीं त्रिपुरांतक शिव, कोपानें जाण्या विषयीं उद्युक्त झालेल्या पार्वतीस पुनः बोलला कीं, हे प्रिये, तूं सर्व अंगानीं आपल्या पित्या सारखीच कन्या सत्य आहेस.

हिमाचलस्यशृंगैस्तैर्मेघजालाकुलैर्नभः ॥ तथादुरवगा
ह्यंभ्योहृदयेभ्यस्तवाशयः ॥ १८ ॥ काठिन्यांकस्त्वम-
स्मभ्यंवनेभ्योबहुधागता ॥

अर्थ- आणि "जसें मेघसमुदायानीं व्याप्त अशा हिमालयपर्वताचे शिखरावरील आकाश जाणण्यास गहन आहे तसें." अतिकठोर हृदयापेक्षां ही तुझें अंतःकरण अत्यंत कठिण आहे यामुळेंच तूं पूर्वीं ही आह्मा पासून बहुवार वनांत गेलीस.

कुटिलत्वंचवर्त्मभ्योदुःसेव्यत्वंहिमादपि ॥ १९ ॥ संक्रां-
तिंसर्वदैवेतितन्वंगिहिमशैलराट् ॥

अर्थ- तसें तुझा अंगीं मार्गापेक्षां अधिक कुटिलत्व आहे, आणि बर्फाहून ही तुझें मन धरणें कठिण आहे; ह्मणूनच हे सूक्ष्मांगि पार्वती, पर्वतराज हिमालय निरंतर तुझा शोध करण्या साठीं अरण्यांत येतो.

इत्युक्तासापुनःप्राहगिरिशंशैलजातदा ॥ २० ॥ कोपकं-
पितमूर्धाचप्रस्फुरद्दशनच्छदा ॥

अर्थ- असें शिवाचें भाषण ऐकून कोपानें कंपित आहे मस्तकजीचें व स्फुरण पावत आहेत ओष्ठ जीचे अशी पार्वती पुनः शिवाशीं भाषण करिती जाहली.

उमोवाच ॥ मासर्वान्दोषदानेन निंदान्यान्गुणिनोजना-
न् ॥ २१ ॥ तवापिदुष्टसंपर्कात्संक्रांतंसर्वमेवहि ॥

अर्थ- कीं हे प्रभो इतर सर्व गुणिजनांस दोष देऊन व्यर्थ त्यांची निंदा करूं नको, तुलाच दुष्टांच्या संबंधानें हे सर्व दोष प्राप्त जाहले आहेत.

त्यालेभ्योधिकजिह्मत्वं भस्मनास्नेहबंधनं ॥ २२ ॥ त्व-
त्कालुष्यंशशांकात्तुदुर्बोधित्वंवृषादपि ॥

अर्थ- तें असें कीं, सर्पांपासून तुला अधिक कुटिलत्व मात्र जाहलें आ[illegible],
नसेंच भस्माच्या योगानें लोकांत विश्वास दाखवितोस; आणि चंद्रामुळें तुझ्या
अंतःकरणास कालुष्य (गंभीरपणा) व नंदीच्या संगतीनें मनास दुर्बोधत्व (गं
भीरपणा) मात्र झाला आहे.

तथाबहुकिमुक्तेन अलंवाचाश्रमेणते ॥ २३ ॥ स्मशानवा
सान्निर्भीत्वं नग्नत्वान्नतवत्रपा ॥ निर्घृणत्वंकपालित्वाद्
याते विगताचिरं ॥ २४ ॥

अर्थ- असो तुझ्या बरोबर फार बोलून उपयोग काय आहे? तस्मात् आतां या
वाचेनें श्रम करणें पुरे; स्मशानांत वास करण्यानें तूं निर्भय झाला आहेस; नग्न
पणामुळें तुला लज्जा नाहीं; नरकपाल धारण करण्यामुळें तुला निर्दयत्व मात्र
होऊन तुझ्या नर मनांतील दया चिरकाल गेली आहे.

इत्युक्त्वा मंदिरात्तस्मान्निर्जगाम हिमाद्रिजा ॥ तस्यां
व्रजंत्यां देवेशगणैः किलकिलाध्वनिः ॥ २५ ॥

अर्थ- असें भाषण करून पार्वती त्या मंदिरांतून बाहेर निघून चालली अ
सतां त्या कालीं शिवगणानीं किलकिला शब्द केला.

क्वमातर्गच्छसित्युक्त्वा रुदंतो धाविताः पुनः ॥ विष्टभ्यच-
रणौ देव्या वीरको बाष्पगद्गदं ॥ २६ ॥ प्रोवाचमातः किंते
तत्ध्क्यासिकुपितांतरा ॥

अर्थ- आणि हे मातः आह्मास सोडून तूं कोठें जातेस; असें बोलून ते गण
पुनः तिच्या मागें धांवले; त्यांत पुत्रत्वें करून अंगिकार केलेला वीरक नेत्रांतू
न अश्रुपात टाकीत पार्वती जवळ आला आणि तिचे चरण धरून गहिवरानें
कंठ दाटून आल्यामुळें गद्गदा स्वर युक्त वाणीनें पार्वतीस बोलला कीं, हे मातः
तूं कोपयुक्त अंतःकरणानें कोठें चाललीस?

अहं त्वामनुयास्यामि व्रजंतीं स्नेहवर्जितां ॥ २७ ॥ सोहं-
पतिष्ये शिखरात्तपोनिष्ठे त्वयोज्झितः ॥

अर्थ- आणि तूं मज वरील प्रेम सोडून चाललीस तर मी आतां तुझ्या मागें

येईन; व तूं तपश्चर्ये विषयीं निष्ठा धारण करून माझा त्याग करशील; तर मी या पर्वत शिखरा वरून उडी टाकून प्राण त्याग करीन.

उन्नाम्यवदनंदेवीदक्षिणेनतुपाणिना॥२८॥उवाचवी
रकंमातामाशोकंपुत्रभावय॥

अर्थ- असें वीरकाचें वाक्य ऐकून पार्वती आपल्या उजव्या हातानें वीरकाचें-मुख वर करून त्यास माता पार्वती बोलली कीं, हे पुत्रा मी जातें या विषयीं तूं शोक करूं नको.

शैलाग्रात्पतितुंनैवनचागंतुंमयासह॥२९॥युक्तंतेपुत्रव
क्ष्यामियेनकार्येणतच्छृणु॥

अर्थ- आणि तूं पर्वताच्या शिखरा वरून पडण्या विषयीं व मज बरोबर ही येण्यास योग्य नाहींस; कारण हे पुत्रा मी ज्या कार्या साठीं जातें त्याचा योग्य हेतू ऐक.

कृष्णेत्युक्ताहरेणाहंनिंदिताचाप्यनिंदिता॥३०॥साहं
तपःकरिष्यामियेनगौरीत्वमाप्नुयां॥

अर्थ- तें असें कीं, मी निंद्य नसून तूं कृष्णवर्ण आहेस अशी शिवानें माझी निंदा केली; यास्तव ज्या तपानें गोरवर्ण मला प्राप्त होईल; तें तप मी अरण्यांत-जाऊन करीन.

एषस्त्रीलंपटोदेवोयातायामय्यनंतरं॥३१॥द्वाररक्षा
त्वयाकार्यानित्यंरंध्रान्ववेक्षिणा॥

अर्थ- आणि हा महादेव अत्यंत स्त्रीलंपट आहे; ह्मणून मी वनांत गेल्यें-असतां तूं निरंतर छिद्रावर लक्ष ठेवून द्वाराचें रक्षण कर.

यथानकाचित्प्रविशेद्योषिदत्रहरांतिकं॥३२॥दृष्ट्वापर
स्त्रियश्चात्रवदेथाममपुत्रक॥

अर्थ- तें असें कीं, ज्यारीतीनें कोणीही स्त्री येथें शंकरा जवळ येणार नाहीं; अशा रीतीनें रक्षण कर आणि येथें परस्त्रिया तुझ्या दृष्टीस पडल्या नर तूं मला तें वर्तमान कळीव.

शीघ्रमेवकरिष्यामियथायुक्तमनंतरं॥३३॥एवमस्त्वि
तिदेवींसवीरकःप्राहसांप्रतं॥

अर्थ- ह्मणजे मी त्याविषयीं जें यथा युक्त करणें तें नंतर करीन असें तें मातेनें

भाषण ऐकून तो वीरक पार्वती देवीस तथास्तु असें बोलला.

मातुराज्ञामृताल्हादप्लाविनांगो गतज्वरः ॥ ३५ ॥ जगाम कक्ष्यांसंद्रष्टुं प्रणिपत्यचमातरं ॥

अर्थ- आणि त्या मातेच्या आज्ञारूप अमृताच्या आनंदानें भिजलें आहे अंग ज्याचें, व गेलें आहे मातृवियोग दुःख ज्याचें असा तो वीरक मातेस नमस्कार करून छिद्र पाहण्या करितां द्वारांत गेला. इति श्री मत्स्यपुराणे तारकोपाख्यानें कुमार संभवे देव्यास्तपोवन गमनं नाम चतुः पंचाशदुत्तर शततमोध्यायः १५४

अध्याय १५५ वा.

सूतउवाच ॥ देवींसापश्यदायांतीं सतींमातुर्विभूषितां ॥ कुसुमामोदिनीनामतस्यशैलस्यदेवता ॥ १ ॥

अर्थ- सूत बोलले ऋषी हो, त्या काळीं ती पार्वती वनांत चालली तों तिणें त्या प्रदेशांत येणारी व आपल्या मेनानामक मातेपेक्षां सुशोभित अशी पाहिली; ती अतिसाध्वी असून त्या पर्वताची देवता होती; तिचें नाम कुसुमामोदिनी असें होतें.

सापिदृष्ट्वागिरिसुतांस्नेहविक्लवमानसा ॥ क्वपुत्रिगच्छसीत्यक्वेशालिंग्योवाचदेवता ॥ २ ॥

अर्थ- तसेंच पार्वतीस पाहून स्नेहार्द्र अंतःकरण युक्त ती कुसुमामोदिनी नामक देवता पार्वतीस आलिंगन करून हे मुलि तूं कोठें जात्येस; असें तिला बोलली.

साचास्यैसर्वमाचख्यौशंकरात्कोपकारणं ॥ पुनश्चोवाचगिरिजादेवतांमातृसंमतां ॥ ३ ॥

अर्थ- तेव्हां पार्वतीनें आपल्यास वनांत येण्याविषयीं कारण शंकरा पासून जो आपणास क्रोध प्राप्त जाहला असें सर्व सांगितलें. आणि पुनः ती पार्वती आपल्या मातेस मान्य अशा त्या कुसुमामोदिनी नामक देवतेस बोलत्ये.

उमोवाच ॥ नित्यंशैलाधिराजस्यदेवतात्वमनिंदिते ॥ सर्वतः सन्निधानंतेममचातीववत्सला ॥ ४ ॥

अर्थ- कीं, हे अनिंद्य देवते तूं या पर्वतराजाची देवता आहेस; तेव्हां येथें सर्वत्र

तुझें सान्निध्य असून मजविषयीं तुला अत्यंत दया आहे.

अतस्त्वतेप्रवक्ष्यामियद्विधेयंतदाधिया॥अन्यस्त्री संप्रवेशस्तुत्वयारक्ष्यःप्रयत्नतः॥५॥रहस्यत्रप्रयत्ने नचेतसासततंगिरौ॥पिनाकिनःप्रविष्टायांवक्तव्यंमेत्व यानघे॥६॥ततोहंसंविधास्यामियत्कृत्यंतदनंतरं॥इ त्युक्तासातथेत्युक्काजगामस्वगिरिंशुभं॥७॥

अर्थ- ह्मणून मी आपलें बुद्धिपूर्वक कर्तव्य जें कार्य तें तुला सांगतें; तें असें कीं, इतर स्त्रिया या एकांतीं शिवमंदिरांत प्रवेश करतील; त्या विषयीं तूं मनःपूर्वक प्रयत्नें करून निरंतर या पर्वतावर संरक्षण कर; आणि हे निष्पापे या शिवाच्या पर्वतावर कोणी स्त्री आली असतां तें वर्तमान त्वां मला सांगावें; ह्मणजे त्याविषयीं जें मला कर्तव्य आहे; तें मी मग करीन; असें पार्वतीचें भाषण ऐकून तिला तथास्तु असें ह्मणून ती कुसुमामोदिनी देवी आपल्या शुभकारक त्या मंदरपर्वतावर गेली.

उमापिपितुरुद्यानंजगामाद्रिसुताद्रुतं॥अंतरिक्षं समाविश्यमेघमालामिवप्रभा॥८॥ततोविभूषणान्यस्य स्यवृक्षवल्कलधारिणी॥ग्रीष्मेपंचाग्निसंतप्तावर्षासु चजलोषिता॥९॥वन्याहारानिराहाराशुष्कास्थंडिल शायिनी॥एवंसाधयतीतत्रतपसासंव्यवस्थिता॥१०॥

अर्थ- तशीच हिमालयकन्या उमाही आपल्या पित्याच्या पर्वतावरील एकाबागेंत " जशी सूर्य व चंद्र यांची प्रभा आकाशांतील मेघांचे समुदायांत जाते;" तशी त्वरेनें गेली; नंतर तिणें सर्व अलंकारांचा त्याग करून वृक्षाचीं वल्कलें परिधान केलीं; आणि ग्रीष्मऋतूंत पंचाग्निसाधन करणें, पर्जकाळीं उदकांत रहाणें, कांहीं काळ वनांतील कंद, मूल, फलें, यांचा आहार करणें, पश्चात् कांहींच आहार नकरणें व अग्नीच्या स्थंडिला समीप निद्रा करणें या क्रमानें ती पार्वती आपला देह शुष्क करून तपानें स्वार्थसाधन करीत तेथें राहिली.

ज्ञात्वातुतांगिरिसुतांदैत्यस्तत्रांतरेवशी॥अंधकस्यसु तोदृप्तःपितुर्वधमनुस्मरन्॥११॥देवान्सर्वान्विजित्या

जोबकत्रातारणोत्कटः॥आडिर्नामांतरप्रेप्सुःसततं चंद्रमौलिनः॥१२॥आजगामामररिपुःपुरंत्रिपुरघातिनः॥

अर्थ:- त्या काळीं ती पार्वती तप करीत आहे; हें जाणून त्या संधींत अंधकासुराचा गर्विष्ठ अजितेंद्रिय पुत्र आडिनामक दैत्य आपल्या पित्याचा वध शिवानें केलेला स्मरत असून सर्वदा चंद्रशेखर शंकराचें छिद्र पहात होता; तो बकासुराच्या साहाय्यानें रणांत सर्व देवांस जिंकून उन्मत्त झालेला देवांचा शत्रु आडिदैत्य त्या त्रिपुरासुराचा नाश करणाऱ्या महादेवाच्या पुरास आला.

सतत्रागत्यददृशेवीरकंद्वार्यवस्थितं॥१३॥विचिंत्यासीद्वरंदत्तंसपुरापद्मजन्मना॥हतेतदांधकेदैत्येगिरिशेनामरद्विषि॥१४॥आडिश्चकारविपुलंतपःपरमदारुणम्॥

अर्थ:- आणि त्या आडिदैत्यानें तेथें येऊन शिवमंदिराच्या द्वारांत उभा राहिलेल्या वीरकास पाहिलें; ते समयीं तो आडिदैत्य पूर्वी ब्रह्मदेवानें आपणास दिलेल्या वराचें चिंतन करून कांहीं विचार करूं लागला. तो वर मिळण्याचा प्रकार असा कीं, पूर्वी शिवानें देवांचा द्वेष करणारा अंधकासुर मारला असतां, त्याचा पुत्र हा आडिनामा दैत्य अति उग्र बहुत तप करीत होता.

तमागत्याब्रवीद्ब्रह्मातपसापरितोषितः॥१५॥किमाडिदानवश्रेष्ठतपसाप्राप्तुमिच्छसि॥

अर्थ:- त्या दैत्या जवळ येऊन ब्रह्मदेव बोलला कीं, हे दानवश्रेष्ठा आडिदैत्या तुझ्या तपानें मी संतुष्ट जाहलों; तस्मात् आतां तूं तपानें काय प्राप्त होण्या विषयीं इच्छितोस.?

ब्रह्माणमाहदैत्यस्तुनिर्मृत्युत्वमहंवृणे॥१६॥ब्रह्मोवाच॥नकश्चिच्चविनामृत्युंनरोदानवविद्यते॥यतस्ततोपिदैत्येंद्रमृत्युः प्राप्यः शरीरिणा॥१७॥

अर्थ:- असें ब्रह्मदेवानें विचारिलें असतां आडिदैत्य ब्रह्मदेवास बोलला कीं, मला मृत्यु नसावा हा वर मी मागतों; तेव्हां ब्रह्मदेव त्यास बोलले कीं हे दानवा कोणी ही नर मृत्यु वांचून असत नाहीं; तस्मात हे दैत्यश्रेष्ठा जो देही आहे त्या-

स मृत्यु अवश्य प्राप्त होणारच आहे;

इत्युक्तोदैत्यसिंहस्तुप्रोवाचांबुजसंभवं॥ रूपस्यपरिव तोंमेयदास्यात्पद्मसंभव ॥१८॥ तदामृत्युर्ममभवेदन्यथा त्वमरोत्यहं॥ इत्युक्तस्तुतदोवाचतुष्टः कमलसंभवः॥१९

अर्थः- असें ब्रह्मदेवानीं भाषण केलें असतां तो दैत्यसिंह ब्रह्मदेवास बोलला कीं, हे ब्रह्मदेवा माझें रूप जेव्हां भिन्न होईल; तेव्हां मला मृत्यु प्राप्त व्हावा; नाहीं तर हें माझें रूप जों पर्यंत आहे तों पर्यंत मी अमरच असेन; असें दैत्याचें भाषण ऐकून त्या कालीं ब्रह्मदेव संतुष्ट होऊन त्यास बोलतात.

यदाद्वितीयोरूपस्यविवर्तस्तेभविष्यति॥ तदातेभविता मृत्युरन्यथानभविष्यति ॥२०॥

अर्थः- कीं हे दैत्या ज्या कालीं देह बदलून तूं दुसरा देह धारण करशील; तर त्या वेळेस तुला मृत्यु प्राप्त होईल; या वांचून अन्यरीतीनें तुला मृत्यु येणार नाहीं.

इत्युक्तोमरतांमेनेदैत्यसूनुर्महाबलः॥ तस्मिन्कालेतु संस्मृत्यतद्वधोपायमात्मनः॥२१॥ परिहर्तुंदृष्टिपथंवीर कस्याभवत्तदा॥ भुजंगरूपीरंध्रेणप्रविवेशाद्दशः पथं॥ २२॥ परित्यज्यगणेशस्यदानवोसोसुदुर्जयः॥ अलक्षितो गणेशेनप्रविष्टोथपुरांतकं॥२३॥

अर्थः- असें ब्रह्मदेवानें भाषण केलें असतां, तो अंधकासुराचा पुत्र महाबलाढ्य आडिदैत्य, आपणास अमरत्व मानीत होता; परंतु त्यानें त्या कालीं रूपांतर करणें हेंच आपल्या वधास कारण आहे असें मनांत आणून वीरक द्वारपालानें आपणास न पहावें या साठीं भुजंगरूप धारण करून त्या गणनायक वीरकाच्या दृष्टीचा मार्ग चुकवून तो अत्यंत दुर्जयदानव त्या शिवमंदिरात एकाछिद्रानें शिरला; तो गणनाथ वीरकाच्या दृष्टीस न पडतां तत्काल त्रिपुरनाशक शंकरा जवळ आला.

भुजंगरूपंसंत्यज्यबभूवाथमहासुरः॥ उमारूपीछ लयितुंगिरिशंमूढचेतनः॥२४॥

अर्थः- आणि भुजंगरूप टाकून मग तत्क्षणीं तो मूढबुद्धि महान् असुर म-

हादेवास छळण्या साठीं पार्वतीचें रूप धारण करिता जाहला.

कृत्वामायांततोरूपमप्रतर्क्यमनोहरं॥सर्वावयवसंपूर्णसर्वाभिज्ञानसंवृतं॥२५॥

अर्थः- नंतर आपली आसुरीमाया प्रगट करून कोणाचा तर्कही चालण्या विषयीं अशक्य असून सर्व नेत्रादिक अवयवानीं उत्तम रीतीनें पूर्ण व सर्व चातुर्यादिक भावानीं संपन्न असें अतिसुंदररूप प्रगट केलें.

कृत्वामुखांतरेदंतान्दैत्योवज्रोपमान्दृढान्॥तीक्ष्णाग्रान्बुद्धिमोहेनगिरिशंहंतुमुद्यतः॥२६॥

अर्थः- आणि तो आडिदैत्य आपले मुखांत वज्रासमान कठोर असून तीक्ष्ण अग्रानीं युक्त असे दांत मुखांत आच्छादन करून मूढबुद्धीनें शंकरास मारण्या विषयीं उद्युक्त जाहला.

कृत्वोमारूपसंस्थानंगतोदैत्योहरांतिकं॥पापोरम्याकृतिश्चित्रभूषणांबरभूषितः॥२७॥

अर्थः- अशी पार्वती सारिखी आपल्या रूपाची रचना करून तो पापरूपी दैत्य रमणीय आकृति, भूषणें व वस्त्रें यानीं सुशोभित होत्साता शिवाच्या समीप आला.

तंदृष्ट्वागिरिशस्तुष्टस्तदालिंग्यमहासुरं॥मन्यमानोगिरिसुतांसर्वैरवयवांतरैः॥२८॥

अर्थः- तें समयीं त्या महादैत्यास पाहून शंकर मनांत संतुष्ट जाहले; आणि शिवानें त्यास आलिंगन करून सर्व हस्त पादादिक अवयवांच्या भेदानीं ही पार्वतीच आहे असें मानणारे शंकर.

अपृच्छन्साधुतेभावोगिरिपुत्रिनकृत्रिमः॥यात्वंमदाशयंज्ञात्वाप्राप्तेहवरवर्णिनि॥२९॥

अर्थः- प्रश्न करिते जाहले हे पार्वति तुझें क्षेम आहेना? तसाच तुझा मनोभाव निष्कृत्रिम आहे; ह्मणूनच हे पतिव्रते तूं माझा अभिप्राय जाणून येथें आलीस.

त्वयाविरहितंशून्यंमन्यमानोजगत्त्रयं॥प्राप्ताप्रसन्नवदनायुक्तमेवंविधंत्वयि॥३०॥

अर्थ:- हे पार्वती मी तुजवांचून हें जगत्रय शून्य मानीत होतों; यास्तव तूं स्र्प्रसन्न मुखानें मजसमीप प्राप्त जाहलीस हें तुला युक्तच आहे.

इत्युक्तोदानवेंद्रस्तु तदाभाषत्स्मयंश्छनैः॥ नचाबु-
ध्यदभिज्ञानंप्रायस्त्रिपुरघातिनः॥३१॥

अर्थः- असें शिवाचें भाषण ऐकून त्या वेळेस तो पार्वती रूपधारी दानव श्रेष्ठ त्या त्रिपुरनाशक शिवाचें ज्ञान बहुत करून न जाणतां आश्चर्यानें हळूच बोलतो.

देव्युवाच॥ यातास्म्यहं तपश्चर्तुं वनंत्वायतवातुल-
म्॥ रतिश्चतत्रमेनाभूत्ततः प्राप्तात्वदंतिकं॥३२॥

अर्थः- हे प्रभो मी तुला अतिप्रिय होण्यासाठीं तपश्चर्या करावी या हेतूनें वनांत गेल्यें होत्यें; परंतु तेथें माझें चित्त समाधान पावेना ह्मणून मी तुजसमीप आल्यें.

इत्युक्तः शंकरः शंकांकांचित्प्राप्यावधारयत्॥ हृद-
येनसमाधायदेवःप्रहसिताननः॥३३॥

अर्थः- असें तें भाषण ऐकून शंकराचे मनांत कांहीं शंका आली असतां, महादेव हास्य वदन होत्साते मन स्वस्थ करून एकाग्र चित्तानें त्या रूत्याच्या निर्णया विषयीं विचार करूं लागले.

कुपितामयितन्वंगीप्रकृत्याचदृढव्रता॥ अप्राप्तका
मासंप्राप्ता किमेतत्संशयोमम॥३४॥

अर्थः- ही सूक्ष्मांगी पार्वती स्वभावतः निश्चय पूर्वक व्रतें करणारी असून मजवर रुष्ट होऊन तप करण्या साठीं गेली; ती मनांतील संकल्प पूर्ण झाल्यावांचून कशी परत आली; याविषयीं मला महान् संशय आहे

इतिचिंत्यहरस्तस्या अभिज्ञानंविधारयन्॥ नापश्य-
द्वामपार्श्वेतुतदंगेपद्मलक्षणं॥३५॥ लोमावर्तंतुरचि
तं ततोदेवः पिनाकधृक्॥ अबुध्यद्दानवीमायामाकारं
गूहयंस्ततः॥३६॥ मेढ्रे वज्रास्त्रमादायदानवंतमशा
तयत्॥ अबुध्यद्वीरकोनेवदानवेंद्रं निषूदितं॥३७॥

अर्थः- असें चिंतन करून शंकर त्या स्त्रीचें यथार्थ ज्ञान होण्यासाठीं विचा

र करीत असतां तिच्या थामांगीं (डाव्या कुशीवर) कमल व केंशांचा भोंवरा हीं चिन्हें शिवाचे दृष्टीस पडलीं नाहींत; तेव्हां त्या पिनाक धनुर्धारी महादेवानें ती दानवी माया जाणून आपण जाणल्याचा आकार न दाखवितां अकस्मात् वज्रास्त्र घेऊन त्या असुराचा शिश्न स्थानीं प्रहार करून त्या अडिनामक दानवास मारिलें; हें द्वारपाल वीरकास बाहेर समजलें नाहीं.

हरेणासूदितंदृष्ट्वास्त्रीरूपंदानवेश्वरं॥ अपरिच्छिन्न
तत्वार्थाशैलपुत्र्यैन्यवेदयत्॥ ३८॥ दूतेनमारुतेनाशु
गामिनानगदेवता॥

अर्थ- नंतर शिवानें तो स्त्रीरूप धारण करून आलेला आडि नामा दैत्य मारलेला पाहून अगाध ज्ञान युक्त त्या पर्वताची जी कुसुमा मोदिनी नामक देवता होती तिणें शीघ्र गमन करणाऱ्या वायुनामक दूताचे द्वारानें तें वर्तमान पार्वतीस कळविलें.

श्रुत्वावायुमुखाद्देवीक्रोधरक्तविलोचना॥ ३९॥ अशा-
पद्वीरकंपुत्रंहृदयेनविदूयता॥

अर्थ- त्याकाळीं दूताच्या मुखांतून तें वाक्य ऐकून पार्वतीचे नेत्र क्रोधें करून लाल झाले; आणि तिणें चित्तास दुःख झाल्यामुळें त्या वीरक नामक पुत्रास शाप दिला. इतिश्री मत्स्य पुराणे तारकोपाख्यानें आडिदैत्य वधो नाम पंच पंचाशदुत्तर शततमोऽध्यायः॥ १५५.

अध्याय १५६ वा.

देव्युवाच॥ मातरंमांपरित्यज्ययस्मात्त्वंस्नेहविक्लवा-
त्॥ विहितावसरःस्त्रीणांशंकरस्यरहोविधौ॥१॥ त
स्मात्तेपुरुषारूक्षाजडाहृदयवर्जिता॥ गणेशक्षारसदृ
शीशिलामाताभविष्यति॥ २॥

अर्थ- तो असा कीं, हे गणनायक वीरका, माझा मातेचा त्याग करून शंकराच्या एकांत प्रसंगांत इतर स्त्रियांस तूं स्नेह विव्हल अंतःकरणानें प्रवेशाविषयीं अवकाश दिलास यास्तव कठोर, रूक्ष, अचेतन, ह्मणूनच अंतःकरण रहित व लवणादिक क्षार पदार्थासारिखी अशी शिला रूप माता तुला होईल.

निमित्तमेतद्विख्यातंवीरकस्यशिलोदये॥ सोभवत्क्र
मेणैवविचित्राख्यानसंश्रयः॥ ३॥

अर्थ- असें हें कारण त्या वीरकाच्या शिळेपासून जन्म होण्या विषयीं प्रसिद्ध आहे; नंतर तो वीरक त्या शापा प्रमाणें क्रमें करून शिळेपासून उत्पन्न जाहला; हें त्या वीरकाच्या जन्माचें आख्यान विचित्र आहे.

एवमुत्सृष्टशापाया गिरिपुत्र्यास्त्वनंतरं ॥ निर्जगाममु-
खात्क्रोधः सिंहरूपी महाबलः ॥ ४ ॥

अर्थ- नंतर अशा शाप देणाऱ्या पार्वतीच्या मुखांतून त्या काळीं महा बला-ढ्य सिंहाच्या रूपानें क्रोध बाहेर पडला.

सतु सिंहः करालास्यो जटाजटिलकंधरः ॥ प्रोद्धूतलं
बलांगूलो दंष्ट्रोत्कटमुखांतरः ॥ ५ ॥ व्यात्तास्योल्लल-
ज्जिव्हः क्षामकुक्षिः शिरादिषु ॥ तस्याश्च वर्तितुं देवी
व्यवस्यत सती तदा ॥ ६ ॥

अर्थ- तो सिंह मुखानें भयंकर असून त्याची मान जटानीं युक्त होती; तसेंच त्याचें पुच्छ लांब असून अतिशयें हालत होतें; आणि तो सिंह दाढांचे योगानें-अत्यंत भयंकर मुखाच्या आंत भागानीं युक्त असून त्याचें तोंड पसरलेलें व-जिव्हा हालत होती; तश्यांच त्याच्या कुशी बारीक असून शिर आदिकरून ही त्याचे अवयव कृश होते; अशा त्या सिंहास आपल्या वाहनत्वें करून शीघ्र वर्तविण्या साठीं त्या साध्वी पार्वतीनें मनांत आणलें.

ज्ञात्वा मनोगतं तस्या भगवांश्चतुराननः ॥ आजगामा
श्रमपदं संपदामाश्रयं तदा ॥ ७ ॥ आगम्योवाच देवेशो
गिरिजां स्पष्टया गिरा ॥

अर्थ- ते समयीं असें तें पार्वतीचें मनोगत जाणून भगवान् चतुर्मुख ब्रह्मदेव, सर्व संपत्तीनें आश्रय स्थान अशा त्या पार्वतीच्या आश्रमास आले, आणि तेथें पार्वतीजवळ येऊन ते देवाधिदेव ब्रह्मदेव स्पष्ट वाणीनें तिला बोलते जाहले.

ब्रह्मोवाच ॥ किं पुत्रि प्राप्तुकामासि किमलभ्यं ददामि
ते ॥ ८ ॥ विरम्यतामतिक्लेशात्तपसोस्मान्मदाज्ञया ॥

अर्थ- हे मुली, तुला काय प्राप्त होण्याची इच्छा आहे? तुला कांहीं एक दुर्लभ नाहीं; कारण तुला जें इच्छित असेल तें मी तुला देतों; तस्मात् आतां तूं

माझा आज्ञेनें या तपाचे क्लेशांतून निवृत्त हो.

तच्छ्रुत्वोवाचगिरिजागुरुंगौरवगर्भितं ॥९॥ वाक्यंवा-
चाचिरोद्गीर्णवर्णनिर्णीतवांछितं ॥

अर्थः- ते ब्रह्मदेवाचें वाक्य ऐकून ती पार्वती त्या जगद्गुरु ब्रह्मदेवास गौरव युक्त वाणीनें भाषण करूं लागली; त्या वाक्यांत बहुकालानें उच्चारण केलेल्या वर्णांनीं तिणें आपलें निश्चित वांछित स्पष्ट केलें.

देव्युवाच ॥ तपसादुष्करेणास्यः पतिर्लेभेशंकरोमया ॥१०
समांश्यामलवर्णेतिबहुशः प्रोक्तवान्भवः ॥

अर्थः- इतरांस असाध्य अशा दुर्घट तपानें म्या शंकर पति मिळविला असतां तो शिव मला बहुवार तूं कृष्णवर्ण आहेस असें बोलला.

स्याम हं कांचनाकारावाल्लभ्येनचसंयुता ॥११॥ भर्तुर्भू-
तपतेरंगमेकतोनिर्विशेंकवत् ॥

अर्थः- या स्तव आतां मी जेणें करून शिवास प्रिय होण्या साठीं सुवर्णा समान वर्णानें युक्त होऊन त्यानंतर भूत पति शिवाच्या अर्धांगीं आपले चिन्हासहित प्रवेश करीन.

तस्यास्तद्भाषितंश्रुत्वाप्रोवाचकमलासनः ॥१२॥ एवंभ-
वत्वंभूयश्चभर्तृदेहार्धधारिणी ॥

अर्थः- असें पार्वतीचें वचन श्रवण करून कमलासन ब्रह्मदेव बोललेकीं, हे-पार्वती तूं आपल्या मनोरथा प्रमाणें सुवर्ण वर्णानें युक्त होत्साती पतीच्या देहाच्या अर्धभाग धारण करणारी हो.

ततस्तस्याजभृंगांगंफुल्लनीलोत्पलत्वचं ॥१३॥ त्वचा-
साचाभवद्दीप्तायंदाहस्ताविलोचना ॥ नानाभरणपूर्णां
गी पीतकौशेयधारिणी ॥१४॥

अर्थः- असें ब्रह्मदेवाचें वरप्रदान झाल्यावर पार्वतीनें प्रफुल्लित नीलवर्ण कमळा सारख्या त्वचेनें युक्त तें भ्रमरा समान कृष्णवर्ण अंग टाकिलें; तेव्हां त्या पार्वतीची त्वचा देदीप्यमान जाहली; आणि तिच्या हस्तांत पंश असून तिचे नेत्र विशेषें करून शोभत होते; तसेंच तिचें अंग अनेक आभरणानीं पूर्ण शोभा युक्त असून तिणें पिंवळा पीतांबर धारण केला होता.

तामब्रवीत्ततोब्रह्मादेवींनीलांबुजत्विषं॥ निशेभूधर-
जादेहसंपर्कात्त्वंममाज्ञया॥१५॥संप्राप्ताकृतकृत्यत्व-
मेकानंशापुराह्यसि॥

अर्थ- आणि पार्वतीनें आपली कृष्णवर्ण टाकलेली नील कमला समान कांति रूप त्वचेनें शोभणाऱ्या त्या देवीस ब्रह्मदेव बोलले हे महाकालरात्रीदेवी तूं पूर्वी एकानंशा या नामानें प्रसिद्ध असून माझ्या आज्ञेनें पार्वतीच्या देहांत राहिलीस तेणें करून कृतार्थ जाहलीस.

यएषसिंहःप्रोद्भूतोदेव्याःक्रोधाद्वरानने॥१६॥सतेस्तु
वाहनंदेविकेतौचास्तुमहाबलः॥

अर्थ- तसाच हे सुंदर वदने देवि पार्वतीच्या क्रोधापासून जो हा सिंह प्रगट झाला आहे तो महाबलाढ्य तुझें वाहन होऊन ध्वजावरही असो.

गच्छविंध्याचलंतत्रसुरकार्यंकरिष्यसि॥१७॥पंचा-
लोनामयक्षोयंयक्षलक्षपदानुगः॥दत्तस्तेकिंकरोदे-
विमयामायाशतैर्युतः॥१८॥

अर्थ- हे कालरात्रि देवि आतां तूं विंध्याचल पर्वतावर जा. तेथें देवांचें कार्य करशील; आणि लक्ष यक्षांचा नायक असून शेंकडों माया जाणणारा हा पंचाल नामक यक्ष म्या तुझ्या दास्यार्थ दिला आहे.

इत्युक्ताकौशिकीदेवीविंध्यशैलंजगामह॥उमापिप्रा
प्तसंकल्पाजगामगिरिशांतिकं॥१९॥

अर्थ- असें ब्रह्मदेवानीं भाषण केलें असतां, ती कौशिकी देवी विंध्यपर्वतास गेली; तशीच ती पार्वती ही आपल्या संकल्पानुरूप फल प्राप्त झालें असतां शिवाजवळ आली.

प्रविशंतीतितांद्वारिह्यपकृष्यसमाहितः॥रुरोधवीर
कोदेवींहेमवेत्रलताधरः॥२०॥

अर्थ- आणि ती पार्वती शिवमंदिराच्या द्वारांत प्रवेश करीत असतां, सावध चित्त असून हातांत सुवर्ण वेताची छडी धारण करणारा द्वारपाल वीरक; पार्वतीचा पदर ओढून निजभुवनांत जाण्यास प्रतिबंध करिता जाहला.

तामुवाचचकोपेनरूपात्तुव्यभिचारिणीं॥प्रयोजनंन-

तेस्तीह गच्छयावन्न मेत्स्यसि॥ २१॥

अर्थ— ती पार्वती असून तिचें रूपांतर झाल्यामुळें तो वीरक त्या पार्वतीस न ओळखतां क्रोधानें बोलला कीं, हे स्त्रिये तुझें येथें येण्याचें कांही एक कारण नाहीं; तस्मात् तूं आतां म्या मारिलें नाही तों पर्यंत लौकर येथून जा.

दैत्यारूपधरोदैत्योदेववंचयितुमिह॥ प्रविष्टोनचदृष्टोसौसवेदेवेन घातितः॥२२॥

अर्थ— कारण पूर्वी कोणी एक दैत्य असेंच पार्वतीचें रूप धारण करून महादेवाची वंचना करण्या साठीं येथें आला होता; तो आंत गेलेला म्या पाहिला नाहीं; मग त्यास शिवानें मारिलें.

घातितेचाहमाज्ञप्तोनीलकंठेनकोपिना॥ द्वारेषुनावधानंतेयस्मात् पश्यामिवैततः॥२३॥ भविष्यसिनमद्वास्थोवर्षपूगान्यनेकशः॥ अतस्तेत्रनदास्यामिप्रवेशंगम्यतांद्रुतं॥२४॥

अर्थ— या प्रमाणें तो दैत्य मारल्यावर रुष्ट झालेल्या त्या शंकरानें मला आज्ञा केली कीं, तुझा द्वार रक्षणा विषयीं सावध पणा दिसत नाहीं; तेव्हां असा असावधपणा करशील तर तूं बहु वर्षें पर्यंत माझा द्वारपाल होणार नाहींस; यास्तव मी तुला शिव मंदिरांत प्रवेशा विषयीं अवकाश देणार नाहीं, तस्मात् तूं आतां येथून लौकर जा. इतिश्री मत्स्यपुराणें तारको पाख्यानें वीरकशापो नाम षट् पंचा शदुत्तर शततमो ध्यायः॥१५६.

अध्याय १५७वा.

वीरकउवाच॥ एवमुक्त्वा गिरिसुतामातामेस्नेहवत्सला॥ प्रवेशंलभतेनान्यानारीकमललोचने॥१॥

अर्थ— असें भाषण करून पुनः वीरक त्या पार्वतीस बोलला कीं, हे कमल नयन स्त्रिये मजवर पुत्र स्नेहानें दया करणारी हिमालय कन्या असून जीमाता पार्वती आहे तिजवांचून इतर स्त्रियांना येथें प्रवेश होत नाहीं.

इत्युक्तातु तदादेवी चिंतयामासचेतसा॥ नसानारीति दैत्योसौवायुर्मेसाम भाषत॥२॥

अर्थ— असें वीरकानें भाषण ऐकून त्याकाली पार्वती मनांत विचार करूं-

लागली कीं, जी स्त्री शंकराचे मंदिरांत आली होती असें वायूनें मला सांगितलें परंतु ती स्त्री नसून तो स्त्री रूप धारण केलेला दैत्य होता.

वृथैववीरकः शप्तोमयाक्रोधपरीतया ॥ अकार्यंक्रियते मूढैः प्रायः क्रोधसमीरितैः ॥ ३॥

अर्थ- तस्मात् म्या क्रोधाच्या स्वाधीन होऊन वीरकास व्यर्थ शाप दिला; तेव्हां जे क्रोधाच्या स्वाधीन होतात ते मूढ बुद्धीनें जें करूंनये तेंहि बहुत करून करतात;

क्रोधेननश्यतेकीर्तिः क्रोधोहंतिस्थिरांश्रियं ॥ अपरिच्छिन्नतत्वार्था पुत्रंशापितवत्यहं ॥ ४ ॥

अर्थ- आणि क्रोधानें कीर्ती नाश पावते; क्रोध स्थिर संपत्तीचा नाश करितो; ह्मणून मी अपरिमित यथार्थ ज्ञानानें पूर्ण असून क्रोधानें व्याप्त जाहल्यें यामुळें म्या पुत्रास वृथा शाप दिला.

विपरीतार्थबुद्धीनां सुलभो विपदोदयः ॥ संचिंत्यैव मुवाचेदं वीरकं प्रतिशैलजा ॥ ५ ॥ लज्जासज्जविकारेण वदनेनांबुजत्विषा ॥

अर्थ- विपरीत अर्थानें ज्यांची बुद्धि युक्त झाली आहे; त्यास बहूंकडून विपत्ती प्राप्त होतात; असें स्वस्थ मनानें चिंतन करून पार्वती लज्जा प्रयुक्त विकारानें युक्त जाहलेल्या कमळा समान तेजस्वि मुखानें हे पुढील वाक्य बोलली.

देव्युवाच ॥ अहंवीरकतेमातामातेस्तुमनसोभ्रमः ॥ ६ शंकरस्यास्मिदयिता सुता तु हिनभूभृतः ॥

अर्थ- हे वीरका, मी, हिमाळ्याची कन्या असून शंकराची पत्नी आहें; तस्मात् मी तुझी माता आहें; यास्तव मज विषयीं तुझ्या चित्तास भ्रांति नसो.

ममगात्रछविभ्रांत्यामाशंकां पुत्रभावय ॥ ७ ॥ तुष्टेनगौरतादत्ता ममेयंपद्मजन्मना ॥

अर्थ- हे पुत्रा माझ्या अंगकांतीच्या भ्रांतीनें तूं मनांत शंका मानूं नको; कारण ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन माझा कृष्णवर्ण घालवून मला हा गौरवर्ण दिला आहे.

मयाशप्तोस्यविदिते वृत्तांते दैत्यनिर्मिते ॥ ८॥ ज्ञात्वा-
नारीप्रवेशंतु शंकरे रहसि स्थिते ॥

अर्थ– आणि शंकर एकांतीं बसले असतां दैत्यानें निर्माण केलेला वृत्तांत न जाणून कोणी स्त्रीनें येथें शिव मंदिरांत प्रवेश केला असें समजून त्यातु-ला व्यर्थ शाप दिला.

ननिवर्तयितुं शक्यः शापः किंतु ब्रवीमि ते ॥ ९॥ शी-
घ्रमेष्यसि मानुष्यात्तु सत्वं कामसमन्वितः ॥ शिरसातु
ततो वंद्य मातरं पूर्णमानसः ॥ उवाचार्चित पूर्णेंदुद्युति
च हिमशैलजां ॥ १०॥

अर्थ– परंतु तो शाप आतां मागें फिरविण्यास अशक्य आहे; तर त्या विषयीं मी तुला इतकाच उश्शाप देत्यें कीं, तूं या शापानें प्राप्त झालेल्या मनुष्य जन्मापासून लौकरच पूर्ण मनोरथ होत्साता पुनः माझ्या जवळ येशील; असें पार्वतीचें वाक्य ऐकून तो वीरक मनांत समाधान पावला आणि त्यानें मातेस मस्तकानें नमस्कार करून सर्वलोकांनीं पूजित पूर्ण चंद्रा समान कांतियुक्त अशा त्या पार्वतीची स्तुती करण्यास आरंभ केला.

वीरक उवाच ॥ नतसुरासुरमौलिमिलन्मणि प्रचयकां-
तिकरालनखांकिते ॥ नगसुते शरणागत वत्सले तव नतो
स्मि नतार्त्ति विनाशिनि ॥ ११॥

अर्थ– ती अशी कीं, हे पार्वती सर्व देव व असुर हे निरंतर तुला नमस्कार करीत असतात तेणें करून त्या देवादिकांच्या मस्तक संबंधि मुगुटांतील रत्नादि मण्यांचे समुदायांच्या कांतीनें तुझीं नखें आरक्त तेजानें व्याप्त दिसत आहेत; आणि तूं शरण आलेल्या भक्तां विषयीं अत्यंत दयाळु असून त्या नम्र झालेल्या भक्तांच्या पीडेचा नाश करितेस, यास्तव मी तुला नमस्कार करितों.

तपनमंडलमंडितकंधरे पृथुसुवर्णसुवर्णनगद्युते
॥ विषभुजंगनिषंगविभूषिते गिरिसुते भवतीमहमा
श्रये ॥ १२॥

अर्थ– तसेंच हे पार्वती तुझा कंठ सूर्यमंडळा समान तेजानें सुशोभित दिस-
असून तुझी अंग कांती मोठ्या उंच उत्तम वर्ण युक्त सुवर्णाच्या मेरुपर्वता सार-

रवी आहे; आणि सविष भुजंगांनीं युक्त जो शिव त्यासही तूं शोभवितेस अशा अद्भुत माहात्म्यानें पूर्ण दे वि तुझा मी आश्रय करितों

जगतिकप्रणताभिमतंददो झटिति सिद्धनुते भवतीयथा ॥ जगति कांचन वांछति शंकरो भुवनधृत्तनये भवतीयथा ॥१३॥

अर्थ- आणि हे पार्वती, या चराचर जगांत जे मस्तकानें तुला नमस्कार करितात त्यांचे मनोरथ तूं त्वरेनें पूर्ण करितेस, ह्मणूनच सर्व देवादिक सिद्ध निरंतर तुझी स्तुति करीत आहेत; असा तुझा अचिंत्य महिमा आहे; याच कारणावरून शंकर ही जशी तुझी इच्छा करितो; तशी इतरांची करीत नाहीं.

विमलयोग विनिर्मितदुर्जयस्वतनुतुल्य महेश्वरमंडले ॥ विदलितांधकबांधवसंहतिः सुरवरैः प्रथमं त्वमभिष्टुता ॥१४॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे पार्वति, महादेवाचें हें मंडळ त्वां आपल्या पवित्र योग सामर्थ्यानें निर्माण केल्यामुळें तें इतरांस जिंकण्या विषयीं अशक्य असून तुझ्या देहा सारखें अति तेजस्वी आहे; आणि अंधकासुराच्या सर्व बांधव समुदायांचा नाश करणारी तूंच आहेस; ह्मणून सर्व श्रेष्ठ देव प्रथमतः सर्वकार्य सिद्धी विषयीं तुझीच स्तुती करितात.

सितसटापटलोद्धतकंधराभरमहामृगराजरथास्थिता ॥ विमलशक्तिमुखानलपिंगलायतभुजौघविपिष्टमहासुरा ॥१५॥

अर्थ- हे पार्वति, तूं शुभ्र जटांच्या समुदायानें उंच मानेच्या पुष्टतेनें सुशोभित महा सिंह युक्त रथांत बसतेस; आणि स्वच्छ शक्तीच्या मुख संबंधि अग्नीनें पिंगट वर्ण झालेल्या आपल्या लंबायमान भुजांच्या समुदायानें त्वां मोठमोठ्या असुरांचें चूर्ण केलें आहे.

निगदिता भुवनैरिति चंडिका जननि शुंभनिशुंभनिषूदनी ॥ प्रणतचिंतितदानवदानवप्रमथने करतिस्तरसा भुवि ॥१६॥

अर्थ- तसेंच हे जगज्जननि त्वां लोक कल्याणार्थ क्रोधानें शुंभ व निशुंभ या रा-

नवांचा नाश केला तेणें करून सर्व भुवनांतील लोक तुला चंडिका असें ह्मणतात; तशीच तूं पृथ्वीवर आपल्या नम्र भक्तांचे चिंतित मनोरथ पूर्ण करणारी असून जगाचा नाश करणाऱ्या दानवांचा बलात्कारानें अतिशयें संहार करण्या विषयीं उद्युक्त आहेस.

वियतिवायुपथेज्वलनोज्वलेवनितलेतवदेविचयद्वपुः॥ तदजितेप्रतिमेप्रणमाम्यहंभुवनभाविनितेभववल्लभे॥ १७॥

अर्थ- हे शंकर प्रिये पार्वति तूं सर्वगुणानीं अप्रतिम आहेस ह्मणूनच अजिंक व अग्नी सारखी देदीप्यमान असून सर्व भुवनांचें संरक्षण करितेस, तस्मात् वायुमार्ग आकाश व पृथ्वीतल यांतील तुझ्या सर्व व्यापक रूपास मी नमस्कार करितो.

जलधयोललितोध्दतवीचयोहुतवहद्युतयश्चराचरं॥ फणासहस्रभृतश्चभुजंगमास्त्वदभिधास्यतिमय्यभयंकराः॥ १८॥

अर्थ- तसेच सुंदर उंच लाटांयुक्त समुद्र, अग्नीच्या ज्वाला व हजारों फणा धारण करणारे नाग इत्यादिक चराचर जग हे सर्वही अतिप्रीतीनें तुझें नाम संकीर्तन करणारा जो मी त्यास ला भय उत्पन्न करीत नाहींत.

भगवतिस्थिरभक्तजनाश्रयेप्रतिगतोभवतीचरणाश्रयं॥ करणजातमिहास्तुममाचलंनुतिलवाप्तिफलाशयहेतुतः॥ प्रशममेहिममात्मजवत्सलेनमोस्तुतेदेविजगत्त्रयाश्रये॥ १९॥

अर्थ- हे पूर्णैश्वर्य युक्त पार्वति तूंच स्थिर चित्तानें भक्ति करणाऱ्या जनांस आश्रय आहेस; ह्मणून म्या तुझ्या चरणांचा आश्रय केला आहे; तशींच माझीं मन आदीकरून सर्व इंद्रियें तुझ्या स्तुति संबंधि लेशाच्या प्राप्तिरूप फलाच्याच इच्छेनें तुझे ठिकाणीं स्थिर राहोत; आणि हे देवि तूं जगत्रयास आश्रय असून पुत्र जो मी मजविषयीं तर अत्यंत दयाळु आहेस; तस्मात् तूं आतां मजविषयीं आलेल्या क्रोधाचा त्याग करून शांत हो; एतदर्थ मी तुजला नमस्कार करितो.

सूतउवाच ॥ प्रसन्नातु ततो देवी वीरकस्येतिसंस्तुता ॥
प्रविवेश शुभं भर्तुर्भवनं भूधरात्मजा ॥ २० ॥

अर्थ-- सूत बोलले ऋषीहो अशा त्या स्तुतीनें ती पार्वती देवी वीरकास प्रसन्न होऊन आपला पती जो शिव त्याच्या उत्तम मंदिरांत गेली.

द्वारस्थो वीरको देवान् हर दर्शनकांक्षिणः ॥ व्यसर्जयत्स्वकान्येव गृहाण्यादरपूर्वकः ॥ २१ ॥

अर्थ-- नंतर त्या वीरक द्वारपालानें शिव दर्शनाच्या इच्छेनें आलेल्या देवांस आपापले घरीं जाण्या विषयींच आदरानें निरोप दिला.

नास्त्यत्रावसरो देवा देव्या सह वृषाकपिः ॥ निभृतः क्रीडतीत्युक्ता ययुस्तेच यथागतं ॥ २२ ॥

अर्थ-- तो असा कीं, देवहो सांप्रत कालीं शंकर पार्वतीसहवर्तमान अति निर्भरानें क्रीडा करीत आहेत तस्मात् या कालीं तुह्मास दर्शन घडण्याचा हा समय नाहीं; असें वीरकानें भाषण केलें असतां ते सर्व देव जसे आले तसे परत गेले.

गतेवर्षसहस्रेतु देवास्त्वरितमानसाः ॥ ज्वलनं चोदयामासुर्ज्ञातुं शंकरचेष्टितं ॥ २३ ॥

अर्थ-- पश्चात् सहस्र वर्षें गेल्यावर शिवास पुत्र होऊन त्याचे हातून तारकासुराचा वध होण्या विषयीं देवांच्या अंतःकरणास त्वरा झाल्या मुळें देवांनीं शंकरा कडील वर्तमान समजण्यासाठीं अग्नीस पाठविलें.

प्रविश्य जालरंध्रेण शुकरूपी हुताशनः ॥ ददर्श शयने शर्वं रतं गिरिजया सह ॥ २४ ॥

अर्थ-- तेव्हां तो अग्नि राघूच्या रूपानें जाळीचे छिद्रांतून शिवमंदिरांत प्रवेश करून त्यानें तेथें शयनावर पार्वती सहवर्तमान क्रीडा करणाऱ्या शिवास पाहिलें.

ददर्श तं च देवेशो हुताशं शुकरूपिणं ॥ तमुवाच महादेवः किंचित्कोपसमन्वितः ॥ २५ ॥

अर्थ-- तसेंच देवाधिदेव शंकरानींही त्या शुकरूपी अग्नीस पाहिलें; - आणि ते महादेव किंचित् रुष्ट होऊन अग्नीस बोलले.

यस्मात्तु वह्निकृतो विघ्नस्तस्मात्त्वय्युपपद्यते ॥ इत्युक्तः प्रांजलिर्वह्निरपिबद्वीर्यमाहितं ॥ २६ ॥

अर्थ- कीं, हे अग्ने त्वां आमच्या रतीस विघ्न केलें तस्मात् आतां हें माझें अमोघ वीर्य तुलाच प्राप्त होईल; असें भाषण करून शिवानें स्थापन केलेलें वीर्य अग्नीनें अंजलिपुट करून प्राशन केलें

तेनापूर्यत तान्देवांस्तत्तत्कायविभेदनः ॥ विपाद्य जठरं तेषां वीर्यं माहेश्वरं ततः ॥ २७ ॥ निष्क्रांतं तन्महेमाभं विततेशांकराश्रमे ॥ तस्मिन्सरो महज्जातं विमलं बहुयोजनं ॥ २८ ॥ प्रोत्फुल्लहेमकमलं नानाविहगनादितं ॥

अर्थ- नंतर अग्नीनें तें शिववीर्य देवांचे मुखांत घातलें तें तापलेल्या सुवर्णासारखें वीर्य त्या देवांचें उदर फोडून बाहेर निघून शंकराच्या त्या विशाल आश्रमांत पडलें; तेव्हां तेथें बहु योजनें परिमित मोठें असून प्रफुल्लित उत्तम कमलांनीं सुशोभित व अनेक पक्ष्यांचे शब्दांनीं नादयुक्त असें स्वच्छ सरोवर झालें.

तच्छ्रुत्वा तु ततो देवी हेमद्रुममहाजलं ॥ २९ ॥ तत्र कृत्वा जलक्रीडां तदब्जकृतशेखरा ॥ उपविष्टा ततस्तस्य तीरे देवी सखीयुता ॥ ३० ॥ पातुकामा च तत्तोयं स्वादु निर्मलपंकजं ॥

अर्थ- नंतर सुवर्ण वृक्ष सहित असून मोठ्या उदकानें युक्त असें नूतन उत्पन्न झालेलें सरोवर श्रवण करून पार्वती तेथें येऊन जलक्रीडा करून तिणें तेथील कमलें आपल्या वेणींत घातलीं; आणि ती पार्वती आपल्या बहुत सख्यांसह वर्तमान त्या सरोवराच्या तिरीं निर्मल कमलयुक्त तें मधुर उदक प्राशन करण्याच्या इच्छेनें बसली.

अपश्यन्कृत्तिकाः स्नाताः षडर्कद्युतिसन्निभाः ॥ ३१ ॥ पद्मपत्रे तु तद्वारि गृहीत्वोपस्थिता गृहं ॥

अर्थ- तों इतक्यांत तेथें कृत्तिकांनीं येऊन स्नान करतांच सहा सूर्यासारखें तेजोमय आकृतीनें युक्त असें तें उदक पाहिलें; तेव्हां ते जल कमल पत्रांत घेऊन त्या कृत्तिका स्वगृहीं येऊं लागल्या.

हर्षादुवाचपश्यामिपद्मपत्रेस्थितंपयः ॥३२॥ ततस्ताऊ
चुरखिलं कृत्तिकाहिमशैलजां ॥

अर्थ- ते समयीं हर्षानें पार्वती त्या कृत्तिकांस ह्मणाली कीं; तुह्मांजवळ कमल पत्रांत उदक कसें आहे तें पाहूं ? नंतर कृत्तिका त्या उदकसंबंधि सर्व वर्तमान पार्वतीस सांगतात.

कृत्तिकाऊचुः॥दास्यामोयदितेगर्भः संभूतोयोभवि-
ष्यति ॥३३॥ सोस्माकमपिपुत्रः स्यादस्मन्नाम्नाचव
र्ततां॥ भवेल्लोकेषुविख्यातः सर्वेष्वपिशुभानने॥३४

अर्थ- कीं, हे मंगलवदने पार्वति हा गर्भ आह्मीं तुला देऊं; परंतु या पासून पुढें जो पुत्र उत्पन्न होईल; तो आमचा ही पुत्र होऊन सर्व लोकांत आमच्यानामानें प्रसिद्ध होवो.

इत्युक्तोवाचगिरिजाकथंमङ्गात्रसंभवः॥सर्वैरवय-
वैर्युक्तोभवतीभ्यः सुतोभवेत्॥ ३५॥

अर्थ- असें कृत्तिकानीं भाषण केल्यावर पार्वती ह्मणाली कीं, सर्वांगानीं-युक्त असून माझ्या देहा पासून उत्पन्न झालेला हा बालक तुमचा पुत्र कसा होईल ?

ततस्तांकृत्तिकाऊचुर्विधास्यामोस्यैववयं॥ उत्तमान्यु
त्तमांगानियद्येवंतुभविष्यति॥३६॥

अर्थ- नंतर त्या कृत्तिका पार्वतीस बोलल्या हे देवि जर हा आमचा पुत्र होईल तर याचीं सर्व अंगें आह्मीं ज्या रीतीनें उत्तमोत्तम होतील अशीं करूं.

उक्तावैशैलजाप्राह भवत्वेवमनिंदिताः॥ ततस्ताहर्षसं
पूर्णाः पद्मपत्रस्थितंपयः॥३७॥ तस्यैददुस्तयाचापि-
तत्पीतंक्रमशोजलं ॥

अर्थ- असें कृत्तिकानीं भाषण केलें असतां पार्वती त्यांस ह्मणाली कीं, पवित्र स्त्रियानों तुह्मीं जसें ह्मणतां तसेंच असो, असें पार्वती बोलल्यावर त्या कृत्तिकांनीं हर्षयुक्त चित्तानें कमल पत्रांतील तें उदक पार्वतीस दिलें; तेव्हां पार्वतीनें ही तें जल क्रमानें प्राशन केलें.

पीतेतुसलिलेतस्मिंस्ततस्तस्मिन्सरोवरे॥३८॥ विपा

रयदेव्याश्चततोदक्षिणांकुक्षिमुद्गतः॥ निश्चक्रामाद्भुतोबालः सर्वलोकविभासकः॥३९॥ प्रभाकरप्रभाकारः प्रकाशकनकप्रभः॥ गृहीतनिर्मलोदग्रशक्तिश्शूलः षडाननः॥४०॥ दीप्तोमारयितुंदैत्यान्कुत्सितान्कनकच्छविः॥ एतस्मात्कारणादेवः कुमारश्चापिसोभवन्॥४१॥

अर्थ— असें तें उदक प्राशन केलें असतां, तो गर्भ पार्वतीची उजवी कुशि फाडून त्या सरसेवर तीरांच उदयास आलेल्या सूर्या सारखा बाहेर निघाला, तो अद्भुत बालक सूर्य समान आपल्या तेजानें सर्वलोकांस प्रकाशित करणारा असून देदीप्यमान सुवर्णा सारख्या कांतीनें युक्त होता; आणि त्या पार्वती नंदनानें आपले हातांत लखलखीत व श्रेष्ठ अशी शक्ति, शूल इत्यादिक आयुधें ग्रहण केली होतीं; असा तो सुवर्ण कांतीनें शोभायमान असून सहा मुखानीं युक्त कार्तिक स्वामी, तारकासुर प्रभृति दुष्ट दैत्यांस मारण्या साठीं उत्पन्न जाहला; तो देव या कुत्सित दैत्यांस मारणारा याच अर्थावरून कुमार नामानें प्रसिद्ध जाहला. इतिश्री मत्स्य पुराणे तारकोपाख्यानें कुमार संभवो नाम सप्त पंचाशदुत्तर शततमोध्यायः॥१५७॥

अध्याय १५८ वा.

सूतउवाच॥ वामंविदार्यनिष्क्रांतः सुतोदेव्याःपुनः-शिशुः॥स्कंदाच्चवदनेवन्हेः शुक्रात्सुवदनोरिहा॥१

अर्थ— सूत बोलले ऋषीहो नंतर पार्वतीची डावी कुशी फाडून पुनः दुसरा बालक निघाला; तो पुत्र, शिवाचें वीर्य अग्नीच्या मुखांत गळालें; ह्मणून तो उत्तममुखानें सुशोभित असून शत्रूंस मारणारा असा झाला.

कृत्तिकामेलनादेवशाखाभिः सविशेषतः॥ शाखाभिधाः समाख्याताः षट्सुवक्त्रेषुविस्तृताः॥२॥ यतस्ततो विशाखोसौख्यातोलोकेषुषण्मुखः॥ स्कंदोविशाखःषड्वक्त्रोकार्तिकेयश्चविश्रुतः॥३॥

अर्थ— तसेंच लव्हाळ्यां वर पडलेल्या त्या गर्भाच्या हस्तपादादिक अवयवांचें विशेषें करून कृत्तिकानींच मीलन केलें; तेव्हां त्या गर्भाचे सहा मुखांत वेदां-

त्या विस्तीर्ण शाखा होत्या ह्मणून तो सहा मुखांचा कार्तिक स्वामी सर्व लोकांत विशाख या नामानें प्रसिद्ध आहे ; आणि स्कंद, विशाख, षड्वक्र, कार्तिकेय, या नामानीं तो शिव पुत्र प्रसिद्ध जाहला.

चैत्रस्य बहुले पक्षे पंचदश्यां महाबलौ ॥ संभूतावर्क सदृशौ विशाले शरकानने ॥ ४ ॥

अर्थ— असे ते सूर्या समान तेजस्वी महाबलाढ्य दोन पुत्र पार्वतीचे उदरीं फाल्गुनी अमावास्येस लव्हाळ्यांचे विशाल वनांत उत्पन्न झाले.

चैत्रस्यैव सिते पक्षे पंचम्यां पाकशासनः ॥ बालकाभ्यां च कोरेकं मत्वाचामर भूतये ॥ ५ ॥

अर्थ— नंतर चैत्र मासाच्याच शुक्ल पक्षांतील पंचमीस इंद्रानें त्या दोन बालकांतील एकास देवांच्या संपत्तीच्या आधिपत्या विषयीं मान्य केला.

तस्यामेव ततः षष्ठ्यामभिषिक्तो गुहः प्रभुः ॥ सर्वैरमरसंघातैर्ब्रह्मेंद्रोपेंद्र भास्करैः ॥ ६ ॥ गंधमाल्यैः शुभैर्धूपैस्तथा क्रीडनकैरपि ॥ छत्रैश्चामरजालैश्च भूषणैश्च विलेपनैः ॥ ७ ॥ अभ्यर्चितो विधानेन यथावत्षण्मुखः प्रभुः ॥

अर्थ— मग दुसरे दिवशीं त्याच चैत्र शुद्ध षष्ठीस ब्रह्मदेव, इंद्र, उपेंद्र (विष्णु) व सूर्य इत्यादिक देवांचे समुदायानीं त्या कार्तीक स्वामीस अभिषेक केला; आणि त्या देवांनीं उत्तम गंध, पुष्पें, धूप, तसेंच क्रीडा साधन अनेक पदार्थ, बहुत छत्रें, चामरांचे समुदाय, नाना प्रकारचीं भूषणें व अष्टगंधादिकांच्या उट्या इत्यादिक उपचारानीं यथा सांग विधीनें त्या समर्थ कार्तिक स्वामीची पूजा केली.

स नामसौदद्दौ शक्रो देवसेनेति विश्रुतां ॥ ८ ॥ पत्न्यर्थं देवदेवस्य ददौ विष्णुस्तदायुधान् ॥

अर्थ— पश्चात् इंद्रानें देवसेना नामक प्रसिद्ध कन्या कार्तिक स्वामीस भार्या करण्या साठीं दिली ; त्या कालीं विष्णूनें त्या देवाधिदेव कार्तिक स्वामीस बहुत आयुधें दिलीं.

यक्षाणां दश लक्षाणि ददावस्मै धनाधिपः ॥ ९ ॥ ददौ

हुताशनस्तेजो ददौवायुश्चवाहनं ॥ ददौक्रीडनकंत्व
ष्टाककुटंकामरूपिणं ॥१०॥

अर्थः- तसेंच धनाध्यक्ष कुबेरानें त्यास दहालक्ष यक्ष दिले; तसेंच अग्नी
नें तेज दिलें व वायूनें वाहन मयूर दिला. व विश्वकर्म्यानें क्रीडार्थ एक का
मरूपी कुक्कुट (कोंबडा) दिला.

एवंसुरास्तुतेसर्वेपरिवारमनुत्तमं ॥ ददुर्मुदितचेतस-
स्काः स्कंदायादित्यवर्चसे ॥११॥

अर्थः- या प्रमाणें ते सर्व देवगण अंतःकरणांत हर्षयुक्त होऊन त्यानीं आप
पला सैन्यादिक उत्तम परिवार सूर्या समान तेजस्वि कार्तिक स्वामीस दिला.

जानुभ्यामवनौस्थित्वासुरसंघास्तमस्तुवन् ॥ स्तोत्रे
णानेनवरदंषण्मुखंमुख्यशः सुराः ॥१२॥

अर्थः- आणि ते देवांचे समूह व त्यांतील मुख्य देव हे सर्वही भूमीवर गुडघे
टेंकून पुढील या स्तोत्रानें त्या वर देणाऱ्या कार्तिक स्वामीची स्तुति करूं ला
गले.

देवाऊचुः ॥ नमः कुमारायमहाप्रभायस्कंदायचस्कं
दितदानवाय ॥ नवार्कविद्युद्युतयेनमोस्तुनमोस्तु
तेषण्मुखकामरूप ॥१३॥

अर्थः- ती अशी कीं, हे दुष्ट संहारका तूं उदयास आलेला सूर्य किंवा विद्यु
ल्लता यां सारख्या कांतीनें महा तेजस्वी असून सर्व दानवांचा नाश करणारा-
आहेस; ह्मणून तुझें स्कंद हें नाम यथार्थ आहे; तस्मात् आह्मीं तुला नम-
स्कार करितो; आणि तुजला सहा मुखें असून तूं कामरूपी आहेस; तु-
ला आमचे वारंवार नमस्कार असो.

विनद्धनानाभरणायभर्त्रेनमोरणेदारुणदारुणाय
॥ नमोस्तुतेर्कप्रतिमप्रभायनमोस्तुगुह्यायगुहाय
तुभ्यं ॥१४॥

अर्थः- हे पार्वती नंदना तूं आपले अंगावर अनेक प्रकारचीं आभरणें बां
धलीं असून सर्वदेवगणांचें संरक्षण करणारा आहेस; आणि संग्रामांत
जे भयंकर दानव त्यांस ही भय प्रद आहेस; तसाच तूं सूर्या सारख्या कां-

तीनें युक्त असून तुझें माहात्म्य अति गुह्य आहे; व तूं देवादिक व त्यांची सेना यांचें-रक्षण करितोस ह्मणून तुला गुह ह्मणतात; तुला आमचे पुनः पुनः नमस्कार असोत.

नमोस्तु त्रैलोक्यभयापहाय नमोस्तु ते बालकृपापराय॥ नमो विशालामललोचनाय नमो विशाखाय महाव्रताय १५

अर्थ— हे शंकरात्मजा तूं त्रैलोक्यांतील सज्जनांच्या भयाचा नाश करणारा असून सर्व बालांवर कृपा करणारा आहेस, किंवा तूं बाल असून कृपेनें आमचें रक्षण करितोस; आणि तुझे नेत्र विशाल व स्वच्छ आहेत; तुझा जन्म विशाखा नक्षत्रावर झाला ह्मणून तुला विशाख ह्मणतात; व तुझें ब्रह्मचर्य व्रत मोठें आहे यास्तव आह्मीं तुला बहुवार नमस्कार करितों.

नमो नमस्तेस्तु मनोहराय नमो नमस्तेस्तु रणोत्कटाय ॥ नमो मयूरोज्ज्वलवाहनाय नमोस्तु केयूरधराय तुभ्यं ॥१६॥

अर्थ— हे कृत्तिकातनया तूं रूपानें अतिसुंदर असून युद्धाविषयीं अत्युत्कृष्ट पराक्रमी आहेस; आणि तुझें मयूर वाहन महातेजस्वी असून तुझे भुजांत उत्तम बाहुभूषणें शोभत आहेत अशा देवास तुला आमचे वारंवार नमस्कार असोत.

नमो धृतोदग्रपताकिने नमो नमः प्रभावप्रणताय तेस्तु ॥ नमो नमस्ते वरवीर्यशालिने क्रियापराणां भव भव्यमूर्तये॥१७॥

अर्थ— हे पार्वतीनंदना तुझे सैन्यांत बहुत पताका धारण करणारे लोक असून सर्ववीर प्रतापामुळें तुला नम्र आहेत असा तूं उत्तम पराक्रमानें शोभतोस आणि या संसारांत जे कर्मनिष्ठ जन आहेत त्यांस तुझी मूर्ती कल्याणदायक आहे, तस्मात् तुला आमचे वारंवार नमस्कार असोत.

क्रियापरा यज्ञपतिं च स्तुत्वा विरेमुरेवं त्वमराधिपाद्याः ॥ एवं तदा षड्वदनं तु सेंद्रा मुदा स्तुतुष्टश्च गुहस्तु तस्तान्॥ निरीक्ष्य नेत्रैरमलैः सुरेशान् शत्रून् हनिष्यामि गतज्वराः स्थ॥१८॥

अर्थ— या प्रमाणें यज्ञादि कर्मांतील प्रमुख इंद्रसहित जे देवगणांचे अधिपती ते यज्ञाचें रक्षण करणाऱ्या त्या कार्तिक स्वामीची अशी स्तुती करून स्वस्थ राहिले.

त्या काळीं तो कार्तिक स्वामी हर्षानें संतुष्ट होत्साता आपल्या निर्मल नेत्रांनीं त्या देवांस पाहून बोलला कीं, देवहो मी तुमच्या शत्रूंस लौकरच मारीन; तस्मात् आतां तुह्मीं मनांतील दुःखाचा त्याग करून स्वस्थचित्त व्हा.

कुमार उवाच ॥ कंवः कामंप्रयच्छामि देवताभूतनिर्वृताः ॥ यद्यप्यसाध्यंत्द्यंवो त्दृदये चिंतितंपरं ॥ १९ ॥

अर्थ- असें बोलून तो कुमार देवांस प्रश्न करितो कीं, देवहो तुह्मीं आपले मनांत उत्तम प्रिंयचलें करून जो मनोरथ चिंतन केला आहे तो असाध्य असलातरीं मी तुमचा कोणता मनोरथ पूर्ण करूं तें तुह्मीं हर्षानें मलासांगा?

इत्युक्तास्तुसुरास्तेनस्तुत्वाप्रणतमौलयः ॥ सर्व एवम हात्मानंगुहंतद्गतमानसाः ॥ २० ॥ दैत्येंद्रस्तारकोनामस र्वामरकुलांतकृत् ॥ बलवान्दुर्जयोदुष्टोदुराचारोतिको पनः ॥ २१ ॥ तमेवजहित्द्योर्थ एषोस्माकंभयापहः ॥

अर्थ- असें त्यानें भाषण केलें असतां स्तुतिकरून नम्र मस्तक केलेले देव त्या महा बुद्धिमान् कार्तिक स्वामीचे ठीकाणीं मन ठेवून विनंती करितात कीं, हे देव-भयनाशका, तारकासुर जो दैत्यांचा राजा तो इतरांनीं जिंकण्यास अशक्य असा बलाढ्य असून दुष्ट, दुराचारी व अतिकोपिष्ट आहे, ह्मणूनच तो समग्र देव कुलांचा नाश करण्या विषयीं प्रवृत्त झाला आहे; त्यास आपण मारावा हेंच कार्य आह्मास प्रिय आहे.

एवमुक्तस्तथेत्युक्त्वासर्वामरपदानुगः ॥ २२ ॥ जगामज गतांनाथस्तूयमानोमरेश्वरैः ॥ तारकस्यवधार्थायजग तः कंटकस्यवै ॥ २३ ॥

अर्थ- असें देव बोलले असतां तथास्तु ह्मणून जगाचा नाथ कार्तिकस्वामी, स्तुति करणाऱ्या श्रेष्ठ देवांसहितलोकांस कांट्या सारखें दुःख देणाऱ्या तारकासुराच्या वधार्थच निघाला.

ततश्चप्रेषयामासशक्रोलब्धसमाश्रयः ॥ दूतंदानव सिंहस्यपरुषाक्षरवादिनं ॥ २४

अर्थ- नंतर इंद्रानें कार्तिक स्वामीचा आश्रय मिळाल्यामुळें कठोर अक्षर युक्त भाषण करणारा दूत, दानव श्रेष्ठ तारकासुराकडे पाठविला.

सतुगत्वाब्रवीद्दैत्यंनिर्भयोभीमदर्शनः॥ दूतउवाच॥
शक्रस्त्वामाह देवेशो दैत्यकेतो दिवस्पतिः॥२५॥तार
कासुरतच्छ्रुत्वाघटशक्त्यायथेच्छया॥

अर्थ- तेव्हां रूपानें भयंकर असून स्वतः निर्भय तो इंद्र दूत जाऊन तारकासुरास ह्मणाला, हे दैत्यश्रेष्ठा तारकासुरा, स्वर्ग पालक देवराज इंद्र तुजला जें बोलला आहे तें ऐकून तूं आपल्या शक्त्यनुसार स्वहितार्थ यथेच्छ प्रयत्न कर.

यज्जगद्दलनादाप्तंकिल्बिषंदानवत्वया॥२६॥तस्या
हंशासकस्तेद्यराजास्मिभुवनत्रये॥

अर्थ- आणि हे दानवा त्वां आज पर्यंत जगाचा संहार करून जें पाप संपादन केलें त्यानें या कालीं मी तुला शासन करतों; कारण मीच या त्रिभुवनाचा राजा आहें.

श्रुत्वेतद्दूतवचनंकोपसंरक्तलोचनः॥२७॥उवाचदूतं
दुष्टात्मानष्टप्रायविभूतिकः॥

अर्थ- असें तें दूताचें भाषण ऐकून तारकासुराचे नेत्र क्रोधानें लाल झाले आणि तो दुष्टबुद्धि दैत्य आपली संपत्ती नष्ट होण्याचा समय आल्या मुळें त्या इंद्रदूतास बोलतो.

तारकउवाच॥ दृष्टंतेपौरुषं शक्ररणेषुशतशोमया॥२८
निस्त्रपत्वान्नतेलज्जा विद्यतेशक्रदुर्मते॥

अर्थ- कीं, हे इंद्रा, शेंकडों युद्ध प्रसंगांत म्या तुझा पराक्रम पाहिला असें असून तुझी मति दुष्ट व तूं निर्लज्ज आहेस ह्मणून तुला कोणत्याही भाषणा विषयीं लज्जा नाहीं.

एवमुक्तेगतेदूतेचिंतयामासदानवः॥२९॥नालब्ध
संश्रयःशक्रोवक्तुमेवंहिचार्हति॥ जितःसशक्रोनो-
कस्माज्जायतेसंश्रयाश्रयः॥३०॥

अर्थ- असें तारकासुराचें भाषण ऐकून तो दूत गेल्यावर तो दानव मनांत विचार करूं लागला कीं, इंद्रास उत्तम आश्रय मिळाल्या वांचून तो असें बोलणार नाहीं; व तो इंद्र आह्मीं जरी पूर्वी जिंकला आहे, तरी त्यास अकस्मात् उत्कृष्ट आश्रय कशावरून मिळाला नसेल.

निमित्तानिच दुष्टानि सोपश्यद्दुष्टचेष्टितः॥ पांसुवर्ष मसृक्पातंगगनादवनीतले॥३१॥

अर्थ- नंतर तो दुर्बुद्धि तारकासुर अनेक दुश्चिन्हें पाहूं लागला; तीं अशीं कीं; धुरळ्याची व रक्ताची वृष्टि आकाशांतून पृथ्वीवर होऊं लागली.

भुजनेत्रप्रकंपंच वक्त्रशोषं मनोभ्रमं॥ स्वकांतावक्त्र पद्मानांम्लानतांच व्यलोकयत्॥३२॥

अर्थ- याच प्रमाणें तारकासुर आपलाच डावा भुज व नेत्र यांचें स्फुरण, मुख शोष, मनास भ्रांती व आपल्या स्त्रियांचे मुखकमलांवर म्लानता हीं चिन्हें पाहूं लागला.

दुष्टांश्च प्राणिनोरौद्रान्सोपश्यद्दुष्टवेदिनः॥ तदचिं त्यैव दितिजोन्यस्तचिंतोभवत्क्षणात्॥३३॥

अर्थ- तसेच स्वतः दुष्ट व भयंकर असून अशुभसूचक असे प्राणी तारकासुराच्या दृष्टीस पडूं लागले, तरीं या दुर्लक्षणांची गणना न करितां तो दैत्य एका क्षणांत सर्व चिंतेचा त्याग करून धैर्यानें स्वस्थचित्त जाहला.

यावद्गजघटाघंटारणत्काररवोत्करां॥ तद्वत्तुरगसंघातक्षुण्णभूरेणुपिंजरां॥३४॥ चंचलस्यंदनोदग्र ध्वजराजिविराजितां॥ विमानैश्चाद्भुताकारैश्चलिता मरचामरैः॥३५॥ तांभूषणनिबद्धांच किन्नरोद्गीत नादितां॥ नानानाकतरूत्फुल्लकुसुमापीडधारिणीं॥ ३६॥ विकोशास्त्रपरिष्कारां वर्मनिर्मलदर्शनां॥ बं द्यद्धुष्टस्तुतिरवांनानावाद्यनिनादितां॥३७॥ से नांनाकसदांदैत्यः प्रासादस्थोव्यलोकयत्॥

अर्थ- नंतर त्या तारकासुरानें आपले मंदिरावरून स्वर्गवासी देवांची सेना पाहिली; ती अशी कीं, सर्व हत्तींच्या पाठीवरील घंटांच्या खणखणीत शब्दांनीं उत्तम नादयुक्त असून तशीच अश्वसमुदायांचे पायांनीं चूर्ण झालेल्या पृथ्वीच्या रजःकणांनीं पीतवर्ण झाली होती; आणि चंचल रथांवरील उंच ध्वजांच्या पंक्ति, अद्भुत आकृतीचीं विमानें, सेवकानीं देवांवर वारलेल्या चंवऱ्या यानीं ती देवसेना शोभत होती. त्याच प्रमाणें त्या सैन्यांतील वीरानीं अनेक भूषणें-

धारण केलीं असून स्वर्गांतील नाना प्रकारच्या वृक्ष संबंधि पुष्पांचे मुगुट घातले होते; त्या सैन्यांतील योद्ध्यांच्या अंगांत निर्मल कवचें दिसत असून त्यांचीं खड्ग आदिकरून शस्त्रांवर म्यान नसल्यामुळें तीं उघडीं शोभत असत; व त्या सेनेंत किन्नरांचें उंच स्वरावर गायन चाललें असून स्तुतिकरणारे लोकांनीं केलेल्या उत्तम घोषयुक्त स्तुतींचे शब्द व अनेक वाद्यांचे ध्वनि यानीं ती सेना नाद युक्त जाहली होती.

चिंतयामाससतदा किंचिदुद्भ्रांतमानसः॥३८॥ अपूर्वः कोभवेद्योध्दायोमयानविनिर्जितः॥

अर्थ— आणि त्या कालीं तो तारकासुर मनांत किंचित् अस्वस्थ होऊन विचार करतो कीं, म्या न जिंकलेला आसा हा कोण अद्भुत योद्धा आला आहे.

ततश्चिंताकुलोदैत्यः शुश्रावकटुकाक्षरं॥ ३९॥ सिद्धबंदिभिरुद्घुष्टमिदंहृदयदारणं॥

अर्थ— नंतर त्या चिंतेनें व्याकुळ झालेल्या तारक दैत्यानें हें पुढील वाक्य ऐकिलें तें, देवसैन्यांतील सिद्धगण व स्तुतिकरणारे बंदिजन यानीं उंचस्वरावर गायलेलें असून अप्रिय अक्षरानीं युक्त ह्मणूनच त्याच्या हृदयाचें विदारण करणारें होतें.

अथगाथा॥ जय अतुलशक्तिदीधितिपिंजर॥ भुजदंडचंडरणरभस॥ सुरवदकुमुदकाननविकासनेंदो॥ कुमारजयदितिजकुलमहोदधिवडवानल॥ ४०

अर्थ— हे शिवकुमारा तुझ्या हातांतील उत्तम शक्तीच्या कांतीनें तुझे भुज पीतवर्ण दिसत असून तुझा वेगही संग्रामांत मोठा आहे; तसेच सर्व लोकांस सुख देणारे सज्जन, हींच कोणी एक कमल वनें, त्यांस प्रफुल्लित करण्या विषयीं तूं चंद्रासारखा व दैत्य कुलरूप महासमुद्राचें शोषणा विषयीं तूं वडवानळा समान असा आहेस यास्तव तुझा निरंतर जय असो.

षण्मुखमधुररवमयूररथ॥ सुरमुकुटकोटिघट्टितचरणनखांकुरमहासन॥ जयललितचूडाकलापनवविमलदल॥ कमलकांतदैत्यवंशदुःसहदावानल॥ ४१॥

अर्थ— हे षडानना, मधुर शब्द करणारा मयूर तुझें वाहन असून देव तुला न-

मस्कार करण्या साठीं येतात; तेव्हां नवीन कोमल अंकुरा सारख्या तुझ्याचरणांचे मोठ्या सिंहासनास त्या देवांच्या मुगुटांचीं अग्रें घांसतात. आणि तुझ्या शिखेचा घेर सुंदर असून तूं नवीनस्वच्छ पाकळ्यांच्या कमला समान रमणीय व दैत्य हेच कोणी एक वेळू यांच्या नाशा विषयीं अनिवार दावाग्नि सारखा आहेस; तस्मात् सर्वदा तुला जय प्राप्ती असो.

जयविशाखविभोजयसकललोकतारक॥ स्कंदजयगौरिनंदनघंटाप्रिय॥ प्रियविशाखविभोधृतपताकप्रकीर्णपटल॥ कनकभूषणभास्करदिनकरच्छाय॥ ४२॥

अर्थ- हे पार्वती नंदना समर्था कार्तिक स्वामिन्, तूं विशाख नामानें प्रसिद्ध असून सर्व लोकांस संकटांतून तारणारा आहेस; तसेंच विशाखा नक्षत्र व घंटा तुला प्रिय आहेत; त्वां हातांत पताक धारण केली असून सेवक तुजवर अनेक चामरें वारीत आहेत; व तूं स्वतः कांतीनें सूर्यासारखा असून सुवर्ण भूषणानीं शोभतोस; तेव्हां तुला अखंड जय प्राप्त आहेच.

जयजनितसंभ्रमलीलालूनाखिलाराते॥ जयसकललोकतारकदितिजासुरवरतारकांतक॥ स्कंदजयबालसप्तवासर॥ जयभुवनावलिशोकविनाशन॥ ४३

अर्थ- हे शंकर कुमार स्कंदा तूं सात दिवसांचा बालक असून सर्व भुवनांतील लोकांच्या दुःखांचा समूळ नाश करून त्यांस संसारांत तारणारा आहेस; आणि तूं स्वभाव सिद्ध प्रगट केलेल्या त्वरायुक्त पराक्रम लीलेनें संपूर्ण शत्रूंचा नाश करणारा आहेस; ह्मणून असुर श्रेष्ठ तारक दैत्यास मारणारा तूंच आहेस; तस्मात् तुझी सर्वोत्कर्षानें निरंतर स्थिति असो. इतिश्री मत्स्यपुराणे तारकोपाख्यानें देवसेना दर्शनं नाम अष्टपंचाशदुत्तरशततमो ध्यायः १५८

अध्याय १५९ वा.

सूतउवाच॥ श्रुत्वेतत्तारकः सर्वमुद्घुष्टं देवबंदिभिः॥ सस्मारब्रह्मणोवाक्यंवधंबालादुपस्थितं॥ १॥

अर्थ- सूत बोलले ऋषीहो देवांची स्तुती करणाऱ्यागणानीं उंच स्वरावर वर्णन केलेलें घोष युक्त तें सर्व वाक्य ऐकून त्या कालीं बालका पासून तु-

ह्मा वध होईल त्या ब्रह्मदेवाच्या वचनाचें तारकासुरास स्मरण झालें.

स्मृत्वा धर्मं त्यवर्मांगः पदातिरपरानुगः॥ मंदिरान्नि
र्जगामाशु शोकग्रस्तेन चेतसा॥ २॥

अर्थ— आणि तो तारकासुर युद्ध संबंधि धर्मास स्मरून अंगांत कवच न घालतां शोकग्रस्त अंतःकरणानें आपल्या संरक्षणाचा भार कोणत्याही सेवकावर न ठेवतां मंदिरांतून पायानींच त्वरेनें युद्धार्थ बाहेर निघाला.

कालनेमिमुखा दैत्याः संरंभाक्रांतचेतसः॥ योधाधा
वत गृण्हीत योजयध्वं वरूथिनीं॥ ३॥

अर्थ— ते समयीं कालनेमि आदिकरून सर्व दैत्य क्रोधावेशानें अस्वस्थचित्त होऊन बोलूं लागले कीं, वीरहो आपली सेना सिद्ध करून देवांवर चालून जाऊन त्यांस धरा.

कुमारं तारको दृष्ट्वा बभाषे भीषणाकृतिः॥ किं बाल
योद्धुकामोसि क्रीडकंदुकलीलया॥ ४॥

अर्थ— नंतर भयंकर आकृतीनें युक्त तारकासुर, बालरूप कार्तिकस्वामीस पाहून बोलला कीं, हे बालका तूं युद्धाची इच्छा किमर्थ करितोस, तर तूं सांप्रत चेंडूनीं क्रीडा कर.

त्वयान दानवादृष्टा यत्संगर बिभीषकाः॥ बालत्वा
दथवा ते बुद्धिरेवं स्वल्पार्थदर्शिनी॥ ५॥

अर्थ— कारण मुला त्वां अद्यापि संग्रामांत भयंकर दानव पाहिले नाहींस; आणि तुझी बुद्धी बालत्वामुळें अल्प आहे; ह्मणून तूं असा आम्याशीं युद्धास प्रवृत्त झाला आहेस.

कुमारोपि तमग्रस्थं बभाषे हर्षयन् सुरान्॥ श्रृणु ता
रक शास्त्रार्थस्तव चैव निरूप्यते॥ ६॥ शास्त्रैरर्था न
दृश्यंते समये निर्भयैर्भटैः॥

अर्थ— नंतर तो कुमार ही देवांस हर्षवीत होत्साता पुढें उभा राहिलेल्या त्या दैत्यास बोलतो कीं, हे तारकासुरा मी तुला एक शास्त्रार्थ सांगतों तो तूं ऐक; जे वीर आहेत ते निर्भय कालांत आपल्या स्वार्थाचा उपाय शास्त्रोक्त साधनानें पहात नाहींत.

शिशुत्वंमावमंस्थामेशिशुःकालभुजंगमः॥ ७॥ दुः
प्रेक्ष्योभास्करोबालस्तथाहंदुर्जयःशिशुः॥ अल्पा
क्षरोनमंत्रःकिंसुस्फुरोदैत्यदृश्यते॥ ८॥

अर्थ— आणि मी बालक आहें ह्मणून तूं मला युद्धाविषयीं अमान्य करूं नको; कारण लहान कृष्ण सर्पाचा पराक्रम कसा असतो, उदयास आलेल्या बालसूर्याकडे त्याकाळीं लोकांस एकसारखें पहावत नाहीं त्याच प्रमाणें थोड्या अक्षरांचा मंत्र नव्हे कीं काय? तो मंत्र लहान असला तरी ज्ञाते लोक त्यास हा उत्तम जाज्वल्यमान मंत्र असें मानतात; तसा मी बाल असलों तरीं तुला दुर्जयच आहें.

कुमारेप्रोक्तवत्येवंदैत्यश्चिक्षेपमुद्गरं॥ कुमारस्तंनि
रस्याथवज्रेणामोघवर्चसा॥ ९॥

अर्थ— असें कार्तिकस्वामी भाषण करीत असतां त्यास तारकासुरानें मुद्गल मारला; तेव्हां त्या कुमारानें आपल्या सफल तेजोमय वज्रानें त्या मुद्गलाचें निवारण केलें.

ततश्चिक्षेपदैत्येंद्रोभिंदिपालमयोमयं॥ करेणतं
चजग्राहकार्तिकेयोमरारिहा॥ १०॥

अर्थ— नंतर दैत्यराज तारकासुरानें लोखंडी गोफीण त्या कुमारास मारली ते समयीं देवांच्या शत्रूंचा नाश करणाऱ्या कार्तिकस्वामीनें ती गोफीण हातानें धरली

गदांमुमोचदैत्यायषण्मुखोपिखरस्वनां॥ तयाह
तस्तोदैत्यश्चकंपेचलराडिव॥ ११॥

अर्थ— पश्चात् कुमारानें ही तीक्ष्ण शब्द करणारी गदा तारकासुरास मारली; त्यावेळेस तो दैत्य त्या गदा प्रहारानें ताडितांच " जसा महापर्वत कंपित होतो तसा " थरथरां कांपूं लागला.

मेनेचदुर्जयंदैत्यस्तदाषड्वदनंरणे॥ चिंतयामास
बुध्यावैप्राप्तःकालोनसंशयः॥ १२॥

अर्थ— आणि त्या कालीं रणांत हा कार्तिकस्वामी आपणास अजिंक आहे असें तारकासुरास वाटून तो बुद्धीनें विचार करितो कीं आतां आप

णास हा मृत्यु आला यांत संशय नाहीं.

कुपितं तु तमालोक्य कालनेमिपुरोगमाः॥ सर्वे दैत्येश्च राजघ्नः कुमारं रणदारुणं॥१३॥

अर्थ- नंतर कालनेमि प्रभृति सर्व श्रेष्ठ दैत्यांनीं युद्धाविषयीं भयंकर असून क्रुद्ध झालेल्या त्या कुमारास पाहून आपल्या शस्त्रास्त्रांदिकांचे प्रहार केले.

सतैः प्रहारैरस्पृष्टो व्यथाक्लेशो महाद्युतिः॥ रणशौंडास्ततो दैत्येंद्राः पुनः प्रासैः शिलीमुखैः॥१४॥ कुमारं सामरं जघ्नु र्बलिनो देवकंटकाः॥

अर्थ- तरी तो कार्तिकस्वामीं महा तेजस्वी असल्यामुळें त्या शस्त्रांच्या प्रहाराच्या व्यथेचा स्पर्शही त्यास झाला नाहीं; तेव्हां त्या दानवांचा सर्व प्रयास व्यर्थ जाहला असतां, संग्रामांत कुशल असून देवांस कांट्या सारखें दुःख देणारे व बलिष्ठ असे ते श्रेष्ठ दैत्य पुनः प्रास नांवाचीं आयुधें व बाण यानीं सर्व देवां सहित कुमारास प्रहार करूं लागले.

कुमारस्य व्यथा नाभूद्दैत्यास्त्रनिहतस्य तु॥१५॥ प्राणांतकरणो जातो देवानां दानवाहवः॥

अर्थ- तथापि त्या दैत्यांच्या अस्त्रांचे ताडनानें कुमारास लेशमात्र ही पीडा झाली नाहीं असा तो दानवांचा संग्राम देवांस प्राणांत दुःख देणारा चालला

देवान्निपीडितान्दृष्ट्वा कुमारः कोपमाविशत्॥१६॥ ततोऽस्त्रैर्वारयामास दानवानामनीकिनीं॥

अर्थ- ते समयीं देव असे अत्यंत पीडित झाले; हें पाहून कार्तिक स्वामीस क्रोध आला, तेव्हां त्यानें अनेक अस्त्रांनीं दानवांचें सैन्य मागें फिरविलें.

तैरस्त्रैर्निष्प्रतीकारैस्ताडिताः सुरकंटकाः॥१७॥ कालनेमिमुखाः सर्वे रणादासन्पराङ्मुखाः॥

अर्थ- त्या वेळेस इतरांचा उलट उपाय न चालणाऱ्या अशा कुमाराच्या त्या अस्त्रांनीं देवांस दुःख देणारे कालनेमि प्रमुख सर्व दानव ताडिते झाले-असतां, ते रणांतून मागें फिरले.

विद्रुतेष्वथ दैत्येषु हतेषु च समंततः॥१८॥ ततः क्रुद्धो महादैत्यस्तारको सुरनायकः॥ जग्राह च गदां दि

व्यांहेमजालपरिष्कृतां ॥ १९ ॥ जघ्नेकुमारंगदायानि
ष्टसकनकांगदः ॥ शरैर्मयूरंचित्रैश्चचकारविमुखंर
णे ॥ २० ॥

अर्थ- याप्रमाणें ते दैत्य पळाले व त्यांतील किती एक आसमंताद्भागीं म रून पडले असतां सर्व असुरांचा नाथ अति तप्त सुवर्णाच्या बाहुभूषणा- नीं भूषित तारक नामा महादैत्य क्रुद्ध झाला; आणि त्यानें सोन्याच्या जा- ळीनें सुशोभित एक उत्तम गदा हातांत घेतली; आणि त्या गदेनें कुमारास प्रहार केला; व विचित्र बाणानीं त्याच्या मयूर वाहनास ताडन करून र- णांत मागें फिरविलें.

दृष्ट्वापराङ्मुखंदेवोमुक्तरक्तंस्ववाहनं ॥ जग्राहशक्तिं
विमलांरणेकनकभूषणां ॥ २१ ॥ बाहुनाहेमकेयूररु
चिरेणषडाननः ॥

अर्थ- तेव्हां आपल्या वाहनांचे अंगांतील रक्त निघून तें युद्धांतून मागें फि- रलें; हें पाहून त्या सहा मुखानीं शोभणाऱ्या कुमारदेवानें सोन्याच्या बाजूबं दानीं सुंदर दिसणाऱ्या आपल्या हातांत सुवर्णानें सुशोभित लखलखी- त शक्ति घेतली.

ततोजवान्महासेनस्तारकंदानवाधिपं ॥ २२ ॥ तिष्ठ
तिष्ठसुदुर्बुद्धेजीवलोकंविलोकय ॥

अर्थ- नंतर कार्तिकस्वामी वेगानें दानवराज तारकासुरास बोलतो कीं, हे अतिदुष्टबुद्धे उभारहा उभारहा, आणि हा जीवांचा लोक आतां पाहून घे.

हतोस्यद्यमयाशक्त्यास्मरशस्त्रंसुशिक्षितं ॥ २३ ॥
इत्युक्त्वाचततःशक्तिंमुमोचदितिजंप्रति ॥

अर्थ- कारण म्या या शक्तीनें आज तुला मारलेंच असें समज; तस्मात् आ- तां तूं आपल्या सुशिक्षित शस्त्रानें स्मरण कर; असें भाषण करून नंतर कु मारानें ती शक्ति तारकासुरास मारली.

साकुमारभुजोत्सृष्टातप्तकेयूरखानुगा ॥ २४ ॥ बि-
भेददैत्यहृदयंवज्रशैलेंद्रकर्कशं ॥

अर्थ- तेव्हां कुमाराच्या हातांतून ती शक्ति सुटली त्यावेळेस त्याच्या बा-

हु भूषणांचा शब्द झाला अशा त्या मोठ्या शक्तीनें त्या दैत्यावर जाऊन वज्र किंवा महा पर्वत यां सारखें कठोर अशा त्याच्या हृदयाचें विदारण केलें.

गतासुः स पपातोर्व्यां प्रलये भूधरो यथा ॥२५॥ विकीर्णमुकुटोष्णीषो विस्रस्ताखिलभूषणः ॥

अर्थ- तेव्हां "जसा प्रलय कालीं पर्वत पडतो तसा" तो तारकासुर गत प्राण होऊन पृथ्वीवर पडला; ते समयीं त्याच्या मस्तकींचा मुगुट फुटला व अंगावरील सर्व अलंकार तुटून खालीं पडले.

तस्मिन्विनिहते दैत्ये त्रिदशानां महोत्सवे ॥२६॥ नाभूत्कश्चित्तदा दुःखी नरकेष्वपि पापकृत् ॥

अर्थ- या प्रमाणें तो तारकासुर मरण पावला असतां देवांस महान् आनंद झाला; त्या उत्सवाचे समयीं नरकांतील कोणी एक पाप करणारा प्राणी ही दुःखी असा राहिला नाहीं; तर त्या दैत्याच्या वधानें सर्व ही हर्षन्न पावले.

स्तुवंतः षण्मुखं देवाः क्रीडतश्चांगनायुताः ॥२७॥ जग्मुः स्वानेव भवनान् भूरिधामान उत्सुकाः ॥

अर्थ- आणि ते महा तेजस्वी देव कार्तिक स्वामीची स्तुति करून उत्कंठित होत्साते आपल्या स्त्रियां सहवर्तमान क्रीडा करीत आपापले घरींच गेले.

ददुश्चापि वरं सर्वे देवाः स्कंदमुखं प्रति ॥२८॥ तुष्टाः संप्राप्तसर्वेच्छाः सह सिद्धैस्तपोधनैः ॥

अर्थ- तसेंच सिद्धगण व तपोधन ऋषि यां सहित सर्व देवांचे मनोरथ पूर्ण झाले असतां त्यानीं संतुष्ट होऊन कार्तिक स्वामीच्या समस्त वर दिले.

देवा ऊचुः ॥ यः पठेत्स्कंदसंबद्धां कथां मर्त्यो महामतिः ॥२९॥ शृणुयाच्छ्रावयेद्वापि स भवेत् कीर्तिमान्नरः ॥

अर्थ- ते असे कीं, जो महा बुद्धिमान् मानव कार्तिक स्वामीच्या महात्म्यानें रचित ही कथा स्वतः श्रवण करील किंवा इतरांस करवील; तो नर कीर्तिमान् होईल.

बह्वायुः सुभगः श्रीमान् कांतिमान् शुभदर्शनः ॥ ३० ॥ भूतेभ्यो निर्भयश्चापि सर्वदुःखविवर्जितः ॥

अर्थ- आणि तो पुरुष दीर्घायु, उत्तम भाग्यवान्, श्रीमान्, तेजस्वी, उत्कृ

-ष्ट रूपवान्, प्राणिमात्रां पासून निर्भय व सर्व दुःख रहित असा होतो.

संध्यामुपास्य वै पूर्वां स्कंदस्य चरितं पठेत् ॥ ३१ ॥ समु-
क्तः किल्बिषैः सर्वैर्महाधनपतिर्भवेत् ॥

अर्थ- तसेंच जो मनुष्य प्रातःसंध्या करून कार्तिक स्वामीचें हें चरित्र पठन करील तो सर्व पातकांतून मुक्त होऊन महान् धनाढ्य होतो.

बालानां व्याधिजुष्टानां राजद्वारं च सेवतां ॥ ३२ ॥ इदं
तत्परमं दिव्यं सर्वदा सर्वकामदं ॥ तनुक्षयेच सायु-
ज्यं षण्मुखस्य व्रजेन्नरः ॥ ३३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें व्याधिग्रस्त झालेले बालक व राजद्वारांत सेवा करणारे लोक यांस हें कार्तिक स्वामीचें आख्यान निरंतर सर्व मनोरथ पूर्ण करणारें आहे; आणि या चरित्राचें पठन किंवा श्रवण जो करील तो देहपातानंतर कार्तिकस्वामीच्या लोकास जाईल. इतिश्री मत्स्यपुराणें तारकोपाख्यानें तारकवधोनाम एकोनषष्ट्युत्तर शततमोध्यायः ॥ १५९ ॥

अध्याय १६० वा.

ऋषय ऊचुः ॥ इदानीं श्रोतुमिच्छामो हिरण्यकशिपो-
र्वधं ॥ नरसिंहस्य माहात्म्यं तथापापविनाशनं ॥ १ ॥

अर्थ- नंतर ऋषि प्रश्न करतात कीं, हे सूता आह्मीं या कालीं हिरण्यकशिपु दैत्याचा वध श्रवण करण्या विषयीं इच्छितों; कारण त्या आख्यानांत नारसिंहाचें पाप नाशकरणारें माहात्म्य वर्णिलें आहे.

सूत उवाच ॥ पुरा कृतयुगे विप्रा हिरण्यकशिपुः प्रभुः
॥ दैत्यानामादिपुरुषश्चकार समहत्तपः ॥ २ ॥

अर्थ- तेव्हां सूत बोलतात कीं, ऋषीहो पूर्वी कृतयुगीं दैत्यांचा आदिपुरुष जो हिरण्यकशिपु राजा होता; त्यानें मोठें तप केलें.

दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च ॥ जलवासी स
मभवत् स्नानमौनधृतव्रतः ॥ ३ ॥

अर्थ- तें असें कीं, तो दैत्य स्नान करून मौन व्रतानें अकरा हजार वर्षे उदकांत राहिला होता.

ततः शमदमाभ्यां च ब्रह्मचर्येण चैव हि ॥ ब्रह्मा प्रीतो-

भवत्तस्य तपसा नियमेन च ॥ ४॥

अर्थ- नंतर त्याच्या त्या शमदम युक्त ब्रह्मचर्य व्रत व नियम युक्त अवांतर तप यानीं ब्रह्मदेव त्यास प्रसन्न जाहले.

ततः स्वयंभूर्भगवान् स्वयमागम्य तत्रह ॥ विमानेनार्कवर्णेन हंसयुक्तेन भास्वता ॥ ५॥

अर्थ- तेव्हां भगवान् ब्रह्मदेव, आपल्या सूर्यासारख्या दैदीप्यमान तेजोमय हंसयुक्त विमानांत बसून हिरण्य कशिपु जेथें तप करीत होता तेथें आले.

आदित्यैर्वसुभिः साध्यैर्मरुद्भिर्दैवतैस्तथा ॥ रुद्रैर्विश्वसहायैश्च यक्षराक्षसपन्नगैः ॥ ६ ॥ दिग्भिश्चैव-विदिग्भिश्चनदीभिःसागरैस्तथा ॥ नक्षत्रैश्च मुहूर्तैश्चखेचरैश्चमहाग्रहैः ॥ ७॥ देवैर्ब्रह्मर्षिभिःसार्धं सिद्धैःसप्तर्षिभिस्तथा ॥ राजर्षिभिःपुण्यकृद्भिर्गंधर्वाप्सरसांगणैः ॥८॥ चराचरगुरुः श्रीमान् वृतःसर्वैर्दिवौकसैः ॥ ब्रह्माब्रह्मविदांश्रेष्ठोदैत्यंवचनमब्रवीत् ॥ ९॥

अर्थ- त्या कालीं त्याजबरोबर मंडळी होती ती; बारा आदित्य, अष्टवसु, साध्यगण, एकुणपन्नास मरुद्गण, इतर दैवतें, जगाचें सहाय करणारे अकरा रुद्र, यक्ष, राक्षस, सर्प, पूर्वादिक दिशांच्या अभिमानी देवता, तशाच आग्नेयी, आदिकरून कोण दिशांच्या देवता, मूर्तिमंत नद्या, समुद्र, अश्विनी आदिकरून सर्व नक्षत्रें, मुहूर्त, आकाशांत संचार करणारे चंद्र सूर्यादिक मोठे ग्रह, कित्येक देव, वसिष्ठादिक ब्रह्मर्षि, सिद्धगण, मन्वंतर संबंधि धर्मोपदेशक सप्तऋषि, विश्वामित्र प्रभृति पुण्यवंत राजर्षि, गंधर्व व अप्सरा यांचे समुदाय, व यांहून इतर स्वर्गवासी सर्व देव यांसहित, सर्व संपत्तीनीं युक्त असून संपूर्ण ब्रह्मवेत्त्यांत श्रेष्ठ असे चराचर विश्वाचे गुरु ब्रह्मदेव त्या हिरण्य कशिपूस बोलले:

प्रीतोस्मि तव भक्तस्य तपसानेन सुव्रत ॥ वरं वरय भद्रं ते यथेष्टं काममाप्नुहि ॥ १० ॥

अर्थ- कीं, हे उत्तम व्रतनिष्ठा तुझ्या भक्तियुक्त तपानें मी संतुष्ट झालों तुझें

कल्याण असो; तस्मात् तूं आतां वर मागून आपल्या मनोरथा प्रमाणें यथेच्छ फल पाव.

हिरण्यकशिपुरुवाच ॥ नदेवासुरगंधर्वा नयक्षोरगराक्षसाः ॥ नमानुषाः पिशाचावा हन्युर्मांदेवसत्तम ॥ ११

अर्थ- ते समयीं हिरण्य कशिपु बोलला कीं, हे देव श्रेष्ठा, देव, असुर, गंधर्व, यक्ष, नाग, राक्षस, मानव व पिशाच यांचे हातून मला मृत्यु नसावा.

ऋषयोवानमां शापैः शपेयुः प्रपितामह ॥ यदिमे भगवान् प्रीतो वरएष वृतोमया ॥ १२॥ नचास्त्रेणनशस्त्रेण गिरिणा पादपेनच ॥ नशुष्केण नचार्द्रेण नदिवाननिशाथवा ॥ १३॥

अर्थ- हे प्रपितामहा आपण मला प्रसन्न झालां आहांत; तर सर्व ऋषींचे शाप मजवर न चालावे; तसेंच अस्त्रें, शस्त्रें, पर्वत, वृक्ष, शुष्क झालेले व ओले यांज पासून दिवसा व रात्रीं मला मृत्यु नसावा; हाची वर मागतों.

भवेयमहमेवार्कः सोमो वायुर्हुताशनः ॥ सलिलंचांतरिक्षंचनक्षत्राणि दिशोदश ॥ १४॥ अहंक्रोधश्चकामश्चवरुणोवासवोयमः ॥ धनदश्च धनाध्यक्षोयक्षः किंपुरुषाधिपः ॥ १५॥

अर्थ- त्याच प्रमाणें सूर्य, चंद्र, वायु, अग्नि, उदक, अंतरिक्ष, नक्षत्रें, दश दिशा, क्रोध, काम, वरुण, इंद्र, यम व धनाचा अध्यक्ष असून यक्ष व किन्नर यांचा राजा असा सर्वरूपी मी होऊन सर्व कार्यें माझ्या सत्तेनें चालावीं.

ब्रह्मोवाच ॥ एते दिव्या वरास्तात मया दत्तास्तवाद्भुताः ॥ सर्वान् कामान् सदा वत्स प्राप्स्यसे त्वं नसंशयः ॥ १६॥

अर्थ- तेसमयीं ब्रह्मदेव बोलले कीं, हे बाप्पा, म्या तुला अद्भुत दिव्य वर दिले आहेत; तस्मात् हे वत्सा तुला आतां मनोरथानुरूप सर्व विषय प्राप्त होतील; यांत संशय नाहीं.

एवमुक्त्वा स भगवान् जगामाकाश एवहि ॥ वैराजं ब्रह्मसदनं ब्रह्मर्षिगणसेवितं ॥ १७॥

अर्थ- असें भाषण करून भगवान् ब्रह्मदेव, ब्रह्मर्षिगणानीं सेविल अशा आकाशांतील आपल्या सत्य लोकास गेले.

ततोदेवाश्चनागाश्च गंधर्वाऋषिभिःसह॥ वरप्रदा
नंश्रुत्वैवपितामहमुपस्थिताः॥१८॥

अर्थ- नंतर देव, नाग, गंधर्व, व ऋषि हे सर्वही हिरण्यकशिपूस दिलले ते वर ऐकतांच ब्रह्मदेवा जवळ आले.

देवाऊचुः॥ वरप्रदानाद्भगवन्वधिष्यतिसनोसुरः॥
तत्प्रसीदाशुभगवन्वधोप्यस्यविचिंत्यतां॥१९॥

अर्थ- आणि ते देव बोलले कीं, हे भगवन् तुमच्या वरप्रदानानें तो हिरण्य कशिपु प्रबल व अवध्य होऊन आह्मास मारील; तस्मात् हे ब्रह्मदेवा आपण प्रसन्न होऊन त्याच्या वधाचा उपाय योजावा.

भगवन्सर्वभूतानामादिकर्तास्वयंप्रभुः॥ स्त्रष्टात्वं
हव्यकव्यानामव्यक्तप्रकृतिर्बुधः॥२०॥

अर्थ- कारण हे भगवन् तूंच सर्व भूतांची उत्पत्ति करणारा असून त्याचा स्वतः प्रभु आहेस; आणि तुझा स्वभाव लोकांस स्पष्ट दिसत नसून तूं देव व पितर यांचें भक्ष्य उत्पन्न करणारा असा सर्वज्ञ आहेस.

सर्वलोकहितंवाक्यंश्रुत्वादेवः प्रजापतिः॥ आश्वास
यामाससुरान्सुशीतैर्वचनांबुभिः॥२१॥

अर्थ- असें नें सर्वलोक हितकारक वाक्य ऐकून ब्रह्मदेवांनीं शीतल उदकासारख्या आपल्या आल्हादकारक वचनानीं त्या देवांस आश्वासन दिलें.

अवश्यंत्रिदशास्तेनप्राप्तव्यं तपसः फलं ॥ तपसों-
तेस्यभगवान्वधंविष्णुःकरिष्यति॥२२॥

अर्थ- तें असें कीं, देवहो हिरण्य कशिपूनें केलेल्या तपाचें फल ईश्वराचे नियमा प्रमाणें अवश्य भोगलें पाहिजे; नंतर त्या तपाच्या पुण्याचे अंतीं भगवान् विष्णु या दैत्याचा संहार करितील.

तच्छ्रुत्वा विबुधावाक्यंसर्वेपंकजजन्मनः॥ स्वानि-
स्थानानिदिव्यानिविप्राजग्मुर्मुदान्विताः॥२३॥

अर्थ- सूत ह्मणतो, शौनकादिक ब्राह्मण हो. तें ब्रह्मदेवानें वाक्य ऐकून स-

र्व देव हर्षयुक्त होत्साते उत्तम स्वस्थानांस गेले.

लब्धमात्रे वरेचाथ सर्वाः सोबाधत प्रजाः ॥ हिरण्यक
शिपुर्दैत्यो वरदानेन दर्पितः ॥ २४ ॥

अर्थ- तंतर ब्रह्मदेवाचा वर प्राप्त जाहला असतां त्या वरप्रदानानें हिरण्य कशिपु दैत्य उन्मत्त होऊन सर्वलोकांस पीडा देऊं लागला.

आश्रमेषु महाभागान् समुनीन् शंसितव्रतान् ॥ स-
त्यधर्मपरान् दांतान् धर्षयामास दानवः ॥ २५ ॥

अर्थ- तो अशी कीं, ग्रामादिकांचा त्याग करून वनांतील आश्रमांत राहणारे महा भाग्यशाली, उत्तम व्रतनिष्ठ, सत्य व धर्म यां विषयीं तत्पर व इंद्रिय निग्रहानें युक्त अशा ऋषींस तो दानव उपद्रव करीत असे.

देवांस्त्रिभुवनस्थांश्च पराजित्य महासुरः ॥ त्रैलो-
क्यं वशमानीय स्वर्गे वसति दानवः ॥ २६ ॥

अर्थ- आणि तो महान् दैत्य त्रिभुवनांतील सर्व देवांस जिंकून त्रैलोक्य आपल्या सत्तेंत आणून स्वर्गांत राहिला.

यदा वरमदोत्सिक्तश्चोदितः कालधर्मतः ॥ यज्ञिया
नकरोद्दैत्यानयज्ञियाश्च देवताः ॥ २७ ॥

अर्थ- तंतर ज्या कालीं तो दैत्य त्या वरांच्या मदानें उन्मत्त असून मृत्युकालानें ओढला, तेव्हां त्यानें यज्ञांतील भाग ग्रहण करणाऱ्या देवांचा तो अधिकार काढून त्यावर दैत्य अधिकारी योजिले.

तदादित्याश्च साध्याश्च विश्वेच वसवस्तथा ॥ सेंद्रा दे
वगणा यक्षाः सिद्धद्विज महर्षयः ॥ २८ ॥ शरण्यं श
रणं विष्णुमुपतस्थुर्महाबलं ॥ देवदेवं यज्ञमयं वा-
सुदेवं सनातनं ॥ २९ ॥

अर्थ- त्या कालीं द्वादशादित्य, साध्यगण, विश्वेदेव, अष्टवसु, एकादशरुद्र यांहून इतर देवगण, यक्ष, सिद्धगण, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व मोठे मोठे ऋषि हे सर्व हीं महा बलाढ्य, देवाधिदेव, यज्ञांतील मुख्य, सर्व भूतांचें आश्रय स्थान, अनादि व शरणागतां विषयीं दयालु अशा विष्णूस शरण गेले.

देवा ऊचुः ॥ नारायण महाभाग देवास्त्वां शरणं गताः
॥ त्रायस्व जहि दैत्येंद्रं हिरण्यकशिपुं प्रभो ॥ ३० ॥

अर्थ- आणि ते सर्व देव विष्णूची प्रार्थना करितात कीं, हे महा भाग्य दायका नारायणा आह्मीं देव तुला शरण आलों; तस्मात् हे प्रभो आतां त्या दैत्याधिपति हिरण्यकशिपूस मारून आमचें संरक्षण कर.

त्वं हि नः परमो धाता त्वं हि नः परमो गुरुः ॥ त्वं हि नः
परमो देवो ब्रह्मादीनां सुरोत्तम ॥ ३१ ॥

अर्थ- कारण हे देवोत्तमा तूंच आह्मा ब्रह्यादिकांचा पोषण कर्ता असून परम गुरु व उत्कृष्ट देवही आहेस.

विष्णुरुवाच ॥ भयं त्यजध्वममरा अभयं वो ददाम्यहं
॥ तथैव त्रिदिवं देवाः प्रतिपद्यत माचिरं ॥ ३२ ॥

अर्थ- अशी प्रार्थना ऐकून विष्णु बोलले कीं, देव हो तुह्मी भिऊनका, मी तुह्मास अभय देतों; तुह्मी लौकरच आपल्या स्वर्गास प्राप्त व्हाल.

एषोहं सगणं दैत्यं वरदानेन दर्पितं ॥ अवध्यममरेंद्रा
णां दानवेंद्रं निहन्म्यहं ॥ ३३ ॥

अर्थ- कारण ब्रह्मदेवाच्या वरप्रदानानें उन्मत्त झाल्यामुळे श्रेष्ठ देवांस ही अवध्य अशा त्या दानवराज हिरण्यकशिपु दैत्यास, त्याच्यागणां सहित मी याच काळीं मारतों.

एवमुक्त्वा तु भगवान् विसृज्य त्रिदशेश्वरान् ॥ वधं
संकल्पयामास हिरण्यकशिपोः प्रभुः ॥ ३४ ॥

अर्थ- असें भाषण करून समर्थ नारायणानें त्या देवांस निरोप देऊन हिरण्यकशिपूच्या वधाचा निश्चय केला.

सहायं च महाबाहुरोंकारं गृह्य सत्वरं ॥ अथोंकारस
हायस्तु भगवान् विष्णुरव्ययः ॥ ३५ ॥ हिरण्यक
शिपुस्थानं जगाम हरिरीश्वरः ॥ तेजसा भास्करा-
कारः शशी कान्त्येव चापरः ॥ ३६ ॥ नरस्य कृत्वार्धत
नुं सिंहस्यार्धतनुं तथा ॥ नारसिंहेन वपुषा पाणिं
संस्पृश्य पाणिना ॥ ३७ ॥

अर्थ- आणि अविनाशी, महाभुज, भक्तांचीं दुःखें हरण करणारा ईश्वर भगवान् विष्णु, ते जानें सूर्यासारखा असून कांतीनें केवळ दुसरा आल्हादकारक चंद्रच किं काय! असा तो देव आपला अर्धा देह नराकार व अर्धा देह सिंहाकृति करून आपले साहाय्यार्थ प्रणवाच्या देवतेस बरोबर घेऊन त्या सहवर्तमान नारसिंह रूपानें आपलाच एक हात दुसऱ्या हातानें धरून त्वरेनें हिरण्यकशिपूच्या स्थानास गेला.

ततोपश्यतविस्तीर्णां दिव्यांरम्यांमनोरमां॥स
र्वकामयुतांशुभ्रां हिरण्यकशिपोःसभां॥३८॥

अर्थ- ते समयीं नारसिंहानें विशाल, उत्तम, रमणीय ह्मणूनच मनास रमविणारी, सर्व विषयांनीं युक्त व शुभ्र अशी हिरण्यकशिपूची सभा पाहिली.

विस्तीर्णांयोजनशतंशतमध्यर्धमायतां॥वैहाय
सींकामगमांपंचयोजनविस्तृतां॥३९॥जराशोक
क्लमापेतांनिष्प्रकंपांशिवांसुखां॥वेश्महर्म्यवतीं
रम्यां ज्वलंतीमिवतेजसा॥४०॥अंतःसलिलसं
युक्तांविहितांविश्वकर्मणा॥दिव्यरत्नमयैर्वृक्षैः
फलपुष्पप्रदैर्युतां॥४१॥नीलपीतसितश्यामैःकृ
ष्णैर्लोहितकैरपि॥अवतानैस्तथागुल्मैर्मंजरीश
तधारिभिः॥४२॥सिताभ्रघनसंकाशाप्लवंतीव
व्यदृश्यत॥

अर्थ- ती अशी कीं, शंभर योजनें रुंद असून दीडशें योजनें लांब, आकाशांत बहुत उंच गेलेली, यथेच्छ पाहिजे तिकडे जाणारी व त्यांतील पांच योजनें भाग स्त्रियांदिकांस बसण्यासाठीं चहूं कडून आच्छादित केलेला अशी ती सभा होती; त्या सभेंत बसणाऱ्या लोकांस जरा, शोक, ग्लानि, व कंप हे विकार होत नसून तेथें अनेक मंगलें व सुखें निरंतर होत असत; आणि त्या सभेंत सामान्य व मोठीं धनिकांचीं घरें असून तेजानें देदीप्यमान व रम्य, आंत सर्वत्र उदकानें युक्त अशी विश्वकर्म्यानें निर्माण केली होती; तसेंच तेथें फळ, पुष्पें देणारे उत्तम रत्न युक्त वृक्ष शोभत अ-

सत; त्याच प्रमाणें निळे, पिंवळे, शुभ्र, सांवळे, काळे व तांबडे या रंगाचे पडदे त्या सभेंत सभोंवती लावलेले होते; तशींच त्या सभेंत शेंकडों मंजरीनीं युक्त अशीं अनेक झाडपें होतीं; आणि शुभ्र व कृष्ण वर्ण मेघयुक्त आकाशा सारखी ती सभा चालतच आहे कीं काय अशी दिसत असे.

रश्मिवतीभास्वराचदिव्यगंधमनोरमा॥४३॥सु
सुखानचदुःखासानशीतानचघर्मदा॥नक्षुत्पि-
पासेग्लानिंवाप्राप्यतांप्राप्नुवंतिते॥४४॥

अर्थ- तशीच ती सभा किरणानीं चकचकीत दिसत असून उत्तम सुगंधानें सर्वांच्या मनास रमवून दुःख दूर करून अति सुख देणारी होती; आणि त्या सभेंत जांणाऱ्यालो कांस अति शीत, बहु ऊष्ण, क्षुधा, तृषा, व ग्लानता हे विकार होत नसत.

नानारूपैरुपकृतांविचित्रैरतिभास्वरैः॥स्तंभैर्न
विधृतासावैशाश्वतीचाक्षपासदा॥४५॥

अर्थ- तसेच विचित्र अत्यंत तेजोमय आकारानीं ती सभा युक्त असून त्या सभेंत मध्यभागीं बहुत स्तंभ नसून ती सभा नाशरहित होती; आणि तेथें सर्वदा रात्र नसे.

अतिचंद्रंचसूर्यंचशिखिनंचस्वयंप्रभा॥दीप्यते-
नाकपृष्ठेसाभासयंतीवभास्करं॥४६॥

अर्थ- कारण चंद्र, सूर्य व अग्नी यां पेक्षां ती सभा स्वतः अति तेजस्वी असून स्वर्गलोकाचे पृष्ठ भागीं संचार करणाऱ्या सूर्यासही प्रकाशित करीत आहे कीं काय! अशी सुशोभित होती.

सर्वेचकामाःप्रचुरायेदिव्यायेचमानुषाः॥रसयु
क्तंप्रभूतंचभक्ष्यभोज्यमनंतकं॥४७॥

अर्थ- आणि त्यासभेंत स्वर्गलोकचे व मनुष्य लोकचे हे सर्व विषय विपुल होते; तसेच षड्रस युक्त चार प्रकारचें बहुत अक्षय्य अन्न होतें.

पुण्यगंधस्रजश्चात्रनित्यपुष्पफलद्रुमाः॥उष्णेशी
तानितोयानिशीतेचोष्णानिसंतिच॥४८॥

अर्थ- तशाच उत्तम सुगंध युक्त माला, निरंतर पुष्पें व फळें यानीं सं-

पन्न वृक्ष, उष्ण कालांत शीतल उदक व शीत कालीं उष्ण उदक हे सर्व पदार्थ त्या सभेंत यथेच्छ अनुकूल होते.

पुष्पिताग्रा महाशाखाः प्रबलांकुरधारिणः ॥ लतावितानसंछन्नानदीषुच सरःसुच ॥ ४९ ॥

अर्थ- तसेंच त्या सभेंतील नद्या व सरोवरें यांचे तीरावरील वृक्षांचीं अग्रें, पुष्पें व दृढ अंकुर यानीं युक्त असून ते वृक्ष वेलींच्या मोठ्या विस्तारानें झांकलेले असून त्यांच्या शाखा (फांद्या) मोठ्या होत्या.

वृक्षान्बहुविधांस्तत्र मृगेंद्रो ददृशे प्रभुः ॥ गंधवंतिच पुष्पाणि रसवंतिफलानिच ॥ ५० ॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या सभेंत बहुत प्रकारचे वृक्ष, सुवासिक पुष्पें व उत्तम मधुर रसाळ फळें हीं त्या नारसिंह प्रभूच्या दृष्टीस पडलीं.

नातिशीतानिनोष्णानि तत्र तत्र सरांसिच ॥ अपश्यत्सर्वतीर्थानि सभायां तस्य सो विभुः ॥ ५१ ॥

अर्थ- आणि त्या प्रभूनें अत्यंत शीतल व अति उष्ण नसणारीं सरोवरें, व सर्व तीर्थें त्या हिरण्यकशिपूच्या सभेंत जागोजाग अवलोकन केलीं.

नलिनैः पुंडरीकैश्च शतपत्रैः सुगंधिभिः ॥ रक्तैः कुवलयैर्नीलैः कुमुदैः संवृतानिच ॥ ५२ ॥

अर्थ- तीं अशीं कीं, सामान्य कमलें, शुभ्र कमलें, शंभर पत्रांचीं सुगंधिक कमलें, तांबडीं कमलें, नील वर्ण कमलें, व चंद्रविकासिक कमलें यानीं युक्त होतीं.

सुकांतैर्धार्तराष्ट्रैश्च राजहंसैश्च सुप्रियैः ॥ कारंडवैश्चक्रवाकैः सारसैः कुररैरपि ॥ ५३ ॥ विमलैः स्फाटिकाभैश्च पांडुरैश्च दनैर्द्विजैः ॥ बहुहंसोपगीतानि सारसाभिरुतानिच ॥ ५४ ॥

अर्थ- उत्तम रमणीय हंस, अतिप्रिय राजहंस, पान कोंबडे, चक्रवाक व सारस हे पक्षी, टिट्वे, स्फटिका सारख्या निर्मळ कांतीनें युक्त असून शुभ्र पंखानीं सुशोभित पक्षी यानीं तीं सरोवरें संपन्न असूनतेथें बहुत हंस व सारस पक्षी यांचे मधुर शब्द चालले होते.

गंधवत्यः शुभास्तत्र पुष्पमंजरिधारिणीः ॥ दृष्टवान्प

र्वताग्रेषुनागपुष्पधरालताः ॥५५॥

अर्थ– आणि नारसिंहानें त्या सभेंतील पर्वतांचे शिखरांवर घोंसदार मंजरी व पुष्पें यानीं शोभणाऱ्या सुगंधयुक्त अशा लांब वेली पाहिल्या.

केतक्यशोकसरलाःपुन्नागतिलकार्जुनाः॥ चूतानी पाग्रस्थपुष्पाः कदंबाबकुलाधवाः॥ ५६॥ प्रियगुपाट लावृक्षाः शाल्मल्यः सहरिद्रकाः॥सालास्तालास्तमा लाश्चचंपकाश्चमनोरमाः॥ ५७॥

अर्थ– तशाच केतकी, अशोक, सुरु, नागचांफे, तिळवे, पांढरेखैर, आम्र, वंजुल, मर्वे, कळंब, बकुल, धावडे, चारोळी, पाडळ, सांवरी, हळदी, साग, ताड, तमाल व रमणीय सोनचांफे हे वृक्ष त्या सभेंत होते.

तथैवान्येव्यराजंतसभायां पुष्पिताद्रुमाः॥ विद्रुमा श्चद्रुमाश्चैवज्वलिताग्निसमप्रभाः॥५८॥ स्कंधवंतः सुशाखाश्च बहुतालसमुच्छ्रयाः॥ अर्जुनाशोकव- र्णाश्चबहवश्चित्रकाद्रुमाः ॥५९॥

अर्थ– त्याच प्रमाणें कांतीनें अग्नीसारखे देदीप्यमान, पुष्पांनीं युक्त, मूळापासून अग्रापर्यंत मोठ्या खोडाचे, उत्तम फांद्यानीं शोभणारे, ताडासमान बहुत उंच, अर्जुन व अशोक यां सारख्या रंगाचे व विचित्र असे लहान मोठे इतर वृक्ष त्या सभेंत शोभत होते.

वरुणीवत्सनाभश्चपनसाःसहचंदनैः॥ नीलाः सुम नसश्चैवनिंबा अश्वत्थतिंदुकाः॥ ६०॥ पारिजाताश्च लोध्राश्चमल्लिकाभद्रदारवः॥ आमलक्यस्तथाजंबु लकुचाःशैलवालुकाः॥ ६१॥ कालीयकाद्रुकालाश्च- हिंगवःपारियात्रकाः॥ मंदारकुंदलताश्चपतंगाः कुटजास्तथा॥ ६२॥ रक्ताः कुरंटकाश्चैवनीलाश्चाग रुभिः सह॥ कदंबा श्चैवभव्याश्चदाडिमाबीजपूर काः॥ ६३॥ सप्तपर्णाश्च बिल्वाश्चमधुपेरावतास्त- था॥ अशोकाश्चतमालाश्चनानागुल्मलतावृताः ॥ ६४॥ मधूकाः सप्तपर्णाश्चबहवस्तीरगाद्रुमाः॥

लताश्च विविधाकाराः पत्रपुष्पफलोपगाः ॥ ६५ ॥
एते चान्ये च बहवस्तत्र काननजा द्रुमाः ॥ नानापुष्प
फलोपेता व्यराजंत समंततः ॥ ६६ ॥

अर्थ- आणि वायवर्णी, बचनाग, फणास, चंदन, व निळीचे वृक्ष, उत्तम फुलझाडें, निंब, अश्वत्थ, टेंबुरणी, ६० पारिजातक, लोध्र, मोगरे, देवदारु, आंवळी, जांबळी, ओंटीचे वृक्ष, पर्वतां वरील कांकडीचे वेल, ६१ दारुहळदीचे, व नीलवर्ण वृक्ष, हिंगाचे वृक्ष, पारियात्र पर्वतावरील वृक्ष, मंदार, कुंद, तांबड्यारंगाचे वृक्ष, पतंग नांवाचें भात, तसेच कुड्याचे, ६२ तांबड्या व काळ्या कोन्हांटीचे वृक्ष, कृष्णागरुचंदन व शिसवा यांचे वृक्ष, मोठे कळंब, दाळिंब, महाळुंगी, ६३ मध्येकीं सात पानांच्या दाळीनीं युक्त सातवणीचे वृक्ष, बिल्व वृक्ष, मोहाचीं झाडें, नारिंग्या, सभोंवतीं अनेक झुडपें व वेली यानीं वेष्टित, शोक दूर करणारे तमाल वृक्ष, ६४ सात पानांच्या दाळीनीं युक्त मोहाचे, असे हे अनेक जातीचे बहुत वृक्ष, त्या सभेंतील सरोवरें व तीर्थें यांच्या तीरीं होते; तशाच तेथें पत्रें, पुष्पें व फळें यानीं युक्त अनेक प्रकारच्या वेली असत; ६५ असे हे वायवरणा आदिकरून वृक्ष व यांहून इतर, नाना प्रकारच्या पुष्प, फळानीं संपन्न असे ते अरण्यां तील वृक्ष त्या सभेंत सभोंवतीं शोभत होते. ६६

चकोराः शतपत्राश्च मत्तकोकिलसारिकाः ॥ पुष्पिताः
पुष्पिताग्रेश्च संपतंति महाद्रुमाः ॥ ६७ ॥

अर्थ- तसेच चकोर, शंभर पंखांचे, उन्मत्त कोकिळा, साळुंक्या हे पक्षी त्या वृक्षांवर बसले असून बहुत पुष्पांनीं युक्त ते मोठमोठे वृक्ष आपल्या पुष्पसहित अग्रानीं परस्परांवर पडत होते.

रक्तपीतारुणास्तत्र पादपाग्रगताः खगाः ॥ परस्परम
वेक्षंते प्रहृष्टा जीवजीवकाः ॥ ६८ ॥

अर्थ- आणि तांबडे, पिंवळे व केशरी या रंगाचे चकोर पक्षी वृक्षांच्या अग्रांवर बसून हर्षानें परस्परांकडे पहात होते.

तस्यां सभायां दैत्येंद्रो हिरण्यकशिपुस्तदा ॥ स्त्रीस
हस्रैः परिवृतो विचित्राभरणांबरः ॥ ६९ ॥ अनर्घ्य

मणिवज्रार्चिशिखाज्वलितकुंडलः॥ आसीनश्चा
सने चित्रे दशनल्वप्रमाणतः॥ ७०॥

अर्थ- अशा त्या सभेंत सर्व दैत्यांचा राजा हिरण्यकशिपु त्या कालीं विचित्र आभरणें, वस्त्रें आणि अमोलिक रत्नें व हिरे यांच्या किरणसमुदायानें देदीप्यमान कुंडलें धारण करून हजारों स्त्रियांसहवर्तमान च्यारशें हात प्रमाणाच्या चमत्कारिक आसनावर बसला होता.

दिवाकरनिभे दिव्ये दिव्यास्तरणसंस्तृते॥ दिव्यगं-
धवहस्तत्र मारुतः सुसुखो ववौ॥ ७१॥ हिरण्यक-
शिपुर्दैत्य आस्तेज्वलितकुंडलः॥

अर्थ- असा लखलखीत कुंडलांनीं सुशोभित तो हिरण्यकशिपु दैत्य वरून उत्तम आच्छादनानें झांकलेल्या सूर्यसमान त्या दिव्य आसनावर बसला असतां तेथें उत्तम सुगंध वायू वाहात होता.

उपचेरुर्महादैत्यं हिरण्यकशिपुं तदा॥ ७२॥ दिव्यता-
नेन गीतानि जगुर्गंधर्वसत्तमाः॥

अर्थ- त्या कालीं श्रेष्ठ गंधर्व उत्कृष्ट स्वरांच्या विस्तारानें गायन करून त्या गायनानें हिरण्यकशिपु महादैत्याची सेवा करीत होते.

विश्वाची सहजन्या च प्रम्लोचेत्यभिविश्रुता॥ ७३॥
दिव्याथसौरभेयी च समीची पुंजिकस्थली॥ मिश्रके-
शी च रंभा च चित्रलेखा शुचिस्मिता॥ ७४॥ चारुके
शी घृताची च मेनका चोर्वशी तथा॥ एताः सहस्रश
श्चान्या नृत्यगीतविशारदाः॥ ७५॥ उपतिष्ठंत राजानं
हिरण्यकशिपुं प्रभुं॥

अर्थ- तशाच ते समयीं विश्वाची, सहजन्या, प्रख्यात प्रम्लोचा, उत्तम सौरभेयी, समीची, पुंजिकस्थली, मिश्रकेशी, रंभा, सुहास्यवदना चित्रलेखा, चारुकेशी, घृताची, मेनका, उर्वशी त्या व यांहून ही इतर हजारों अप्सरा नृत्य व गायन यांत निपुण असून त्या समर्थ दैत्यराज हिरण्यकशिपूची सेवा करीत होत्या.

तत्रासीनं महाबाहुं हिरण्यकशिपुं प्रभुं॥ ७६॥ उ-

पासंतदितेः पुत्राः सर्वेलब्धवरास्तथा ॥ तमप्रति-
मकर्माणंशतशोथ सहस्रशः ॥ ७७॥

अर्थ- आणि तपानें वर संपादन केलेले शेंकडों हजारों सर्व दैत्य त्यास भेंत बसलेला, महाभुज, अप्रतिम पराक्रमी अशा त्या हिरण्यकशिपु राजाची शुश्रुषा करीत असत.

बलिर्विरोचनस्तत्रनरकः पृथिवीसुतः ॥ प्रऱ्हादो-
विप्रचित्तिश्च गविष्ठश्चमहासुरः ॥ ७८॥ सुरहंतादुः
खहंतासुनामासुमतिर्वरः ॥ घटोदरोमहापार्श्वः
क्रथनः कठिनस्तथा ॥ ७९॥ विश्वरूपः सुरूपश्चस्व
बलश्चमहाबलः ॥ दशग्रीवश्चवालीचमेघवासाम
हासुरः ॥ ८०॥ घटास्योकंपनश्चैव प्रजनश्चेंद्रताप
नः ॥ दैत्यदानवसंघास्ते सर्वेज्वलितकुंडलाः ॥ ८१॥
स्त्रग्विणोवाग्मिनः सर्वेसदैवचरितव्रताः ॥ सर्वेल
ब्धवराः शूराः सर्वेविगतमृत्यवः ॥ ८२॥ एतेचान्ये
चबहवो हिरण्यकशिपुंप्रभुं ॥ उपासंतिमहात्मा
नंसर्वे दिव्यपरिच्छदाः ॥ ८३॥

अर्थ- ते असे कीं, बलि, विरोचन, भूमिपुत्र नरकासुर, प्रऱ्हाद, विप्रचित्ति, गविष्ठ नामक महान् असुर, सुरहंता, दुःखहंता, सुनामा, श्रेष्ठ सुमती, घटोदर, महापार्श्व, क्रथन, कठिन, विश्वरूप, सुरूप, स्वबल, महाबल, दशग्रीव, वाली, मेघवासानामें महादैत्य, घटास्य, अकंपन, प्रजन, इंद्रतापन, इत्यादिक दैत्य व दानव यांचे समुदायांतील सर्व असुर, तेजोमय कुंडलें, व-माळा धारण केलेले, भाषणांत चतुर, निरंतर व्रतें करून वर संपादन केल्यामुळें बहुत काळ पर्यंत मृत्युभयांतून मुक्त झालेले शूर असून हे व यांहून इतर बहुत दैत्य, उत्तम आयुधादिकांनीं युक्त असून ते सर्वही महाधैर्यशाली त्या हिरण्यकशिपू राजाची सेवा करीत होते.

विमानैर्विविधाकारैर्भ्राजमानैरिवाग्निभिः ॥ महेंद्र
वपुषः सर्वेविचित्रांगदबाहवः ॥ ८४॥ भूषितांगादि-
तेः पुत्रास्तमुपासंतसर्वशः ॥

अर्थ- अनेक आकृतीनीं युक्त असून अग्नीसारख्या तेजोमय विमानानीं संचार करणारे, इंद्रासारख्या शरीर संपत्तीनें युक्त, चमत्कारिक बाजुबंद युक्त भुज व सर्वांगीं धारण केलेलीं भूषणें यानीं शोभणारे सर्व दैत्य त्या हिरण्य कशिपूची सर्व प्रकारें सेवा करीत असत.

तस्यां सभायां दिव्यायां असुराः पर्वतोपमाः॥८५॥
हिरण्यवपुषः सर्वे दिवाकरसमप्रभाः॥ नश्रुतंनैवदृष्टं
हि हिरण्यकशिपोर्यथा॥८६॥ ऐश्वर्यं दैत्यसिंहस्य-
यथातस्य महात्मनः॥

अर्थ- असें त्या उत्तम सभेंत हिरण्य कशिपूचे सन्निधानीं जे असुर होते, त्यांचीं शरीरें पर्वताकार व वर्णानें सोन्या सारखीं असून कांतीनें सूर्या समान तेजस्वी होतीं, असें त्या महा प्रयत्नशील दैत्यराज हिरण्य कशिपूचें ऐश्वर्य जसें होतें, तसें त्या कालीं कोणासही अनुकूल नव्हतें.

कनकरजतचित्रवेदिकायापरिष्कृतरत्नविचित्रवीथि
कायां॥ सददर्शमृगाधिपः सभातांसुरचितरत्नगवा
क्षशोभितायां॥८७॥

अर्थ- सुवर्ण व रुपें यांच्या विचित्र भूमि, रत्नखचित चमत्कारीक ओटे, मार्ग व उत्तम रीतीचे रत्न जडित झरोके यानीं शोभणारी अशी ती सभा नारसिंहानीं पाहिली.

कनकविमलहारविभूषितांगंदितितनयंसमृगाधिपो
ददर्श॥ दिवसकरमहाप्रभालसंतंदितिजसहस्रश-
तैर्निषेव्यमाणं॥८८

अर्थ- आणि त्या सभेंत बसलेला सुवर्णाच्या निर्मल हारानें सुशोभित, सूर्यासारख्या महा तेजानें दैदीप्य मान व लक्षावधी दैत्यानीं सेवित अशा त्या साक्षात् दितिपुत्र हिरण्य कशिपूस नारसिंहानीं पाहिलें. इतिश्रीमत्स्य पुराणें नारसिंह प्रादुर्भावे षष्ठ्युतर शततमोऽध्यायः॥१६०॥

अध्याय १६१ वा.

सूतउवाच॥ ततोदृष्ट्वामहात्मानं कालचक्रमिवागतं
॥नरसिंहवपुश्छन्नं भस्मच्छन्नमिवानलं॥१॥ हिर

ण्यकशिपोः पुत्रः प्र्ल्हादोनामवीर्यवान्॥ दिव्येनच
क्षुषासिंहमपश्यद्देवमागतं॥२॥

अर्थ:– सूत बोलले ऋषीहो नंतर भस्मानें झांकलेल्या अग्नी सारखा, नरव सिंह या दोहोंचा मिळून आकृतीनें समजण्यांत न येणारा असून कालचक्राप्रमाणें अकस्मात् आलेला अशा त्या महा धैर्यशाली नृसिंहास हिरण्यकशिपूच्या प्र्ल्हाद नामक पराक्रमी पुत्रानें प्रथमतः पाहून पुढें लागलीच त्यानें त्या आलेल्या देवास दिव्य ज्ञान दृष्टीनें अवलोकन केलें.

तंदृष्ट्वारुक्मशैलाभमपूर्वांतनुमाश्रितं॥ विस्मिता
दानवाः सर्वे हिरण्यकशिपुश्चसः॥३॥

अर्थ:– ते समयीं मेरु पर्वतासारख्या कांतीनें युक्त असून अद्भुत रूपधारी अशा त्या पुरुषास पाहून तेथील सर्व दानव व तो हिरण्यकशिपु हे विस्मित झाले.

प्र्ल्हादउवाच॥ महाबाहोमहाराजदैत्यानामादिसं-
भव॥ नश्रुतंनचनोदृष्टं नारसिंहमिदंवपुः॥४॥

अर्थ:– तेव्हां प्र्ल्हाद बोलतो कीं, हे महा भुजा, सार्वभौम राजा, आदिदैत्या हें नारसिंहरूप कोणी ही न पाहिलेलें व ऐकलेलें असें आहे.

अव्यक्तप्रभवंदिव्यंकिमिदंरूपमागतं॥ दैत्यांतकर-
णंघोरंशंसतीवमनोमम॥५॥

अर्थ:– आणि येथें आलेलें हें नारसिंह स्वरूप किती दिव्य असून याचा पराक्रम अद्यापि प्रगट झाला नाहीं; तरीं हें भयंकर प्रकरण सर्व दैत्यांचा नाश करील असें मला मन देवता सांगत्ये.

अस्यदेवाः शरीरस्थाः सागराः सरितश्चयाः॥ हिम-
वान्पारियात्रश्चयेचान्येकुलपर्वताः॥६॥ चंद्रमा-
श्चसनक्षत्रैरादित्यैर्वसुभिःसह॥ धनदोवरुणश्चै-
वयमः शक्रः शचीपतिः॥७॥ मरुतोदेवगंधर्वाऋ-
षयश्चतपोधनाः॥ नागायक्षाः पिशाचाश्चराक्षसा
भीमविक्रमाः॥८॥ ब्रह्मादेवः पशुपतिर्ललाटस्था
भ्रमंतिवै॥ स्थावराणिचसर्वाणिजंगमानितथैव

च ॥ ९ ॥

अर्थ- कारण सर्वदेव या नारसिंहाच्या शरीरांत आहेत; ते असे कीं, सर्व-समुद्र व नद्या, हिमालय, पारियात्र इत्यादिक इतर महापर्वत, ६ अश्विनी आदिकरून संपूर्ण नक्षत्रां सहित चंद्र, द्वादश आदित्य, अष्टवसु, कुबेर, वरुण, यम, शचीपती, इंद्र, ७ एकुणपन्नास मरुद्गण, देवांचे गंधर्व, तपोधन ऋषि, शेष प्रमुख नाग, यक्ष, पिशाच, उग्रपराक्रमी राक्षस, ८ ब्रह्मदेव, शिव, स्थावर (नचालणारे), जगम (चालणारे), हे सर्व प्राणिमात्र या नरहरीच्या ललाट स्थानांत भ्रमण पावतात. ९

भवांश्च सहितोस्माभिः सर्वैर्देवगणैर्वृतः ॥ विमानशतसंकीर्णा तथैव भवतः सभा ॥ १० ॥ सर्वं त्रिभुवनं राजन् लोकधर्माश्च शाश्वताः ॥ दृश्यंते नारसिंहेस्मिंस्तथेदमखिलं जगत् ॥ ११ ॥

अर्थ- तसेच सर्व आह्मी व देवगण यांसहित तूं, शेंकडों विमानांनीं व्याप्त तुझी सभा, १० समग्र त्रैलोक्य, लोकांचे अनादि धर्म व सकल जग हे या नृसिंहाच्या स्वरूपांत दिसत आहेत. ११

प्रजापतिश्चात्र मनुर्महात्मा ग्रहाश्च योगाश्च महीरुहाश्च ॥ उत्पातकालश्च धृतिर्मतिश्च रतिश्च सत्यं च तपो दमश्च ॥ १२ ॥ सनत्कुमारश्च महानुभावो विश्वे च देवा ऋषयश्च सर्वे ॥ क्रोधश्च कामश्च तथैव हर्षो धर्मश्च मोहः पितरश्च सर्वे ॥ १३ ॥

अर्थ- आणि सर्व प्रजा पालक माहात्मा स्वायंभुव मनु, सूर्यादिक ग्रह, सर्व योग, सकल वृक्ष, उत्पात काल, धैर्य, बुद्धि, संतोष, सत्य, तप, दम, १२ महासमर्थ सनत्कुमार, विश्वेदेव, समग्र ऋषि, क्रोध, काम, हर्ष, धर्म, मोह व संपूर्ण पितर हे या नारसिंहाच्या देहांत दिसतात. १३

प्रऱ्हादस्य वचः श्रुत्वा हिरण्यकशिपुः प्रभुः ॥ उवाच दानवान् सर्वान् गणांश्च सगणाधिपः ॥ १४ ॥

अर्थ- असें प्रऱ्हादाचें भाषण ऐकून सर्व दैत्यगणांचा राजा हिरण्यकशिपु त्या समग्र दानव समुदायांस बोलतो.

मृगेंद्रोगृह्यतामेष अपूर्वं सत्वमास्थितः॥ यदिवासंश
यः कश्चिद्‌हन्यतांवनगोचरः॥१५॥

अर्थ- कीं, दानव हो, या अद्भुत रूप सिंहास धरा; आणि याजविषयीं तुम्हांस कांहीं संशय आल्यास तुम्ही या वनचरास मारा.

ते दानवगणाः सर्वे मृगेंद्रं भीमविक्रमं॥ परिक्षिपंतो मु
दितास्त्रासयामासुरोजसा॥१६॥

अर्थ- हें हिरण्यकशिपूनें वाक्य ऐकून ते सर्व दानवगण हर्षानें त्या भयंकर पराक्रमशाली नारसिंहास बलात्कारें करून वाग्बाणानीं त्रास देऊं लागले.

सिंहनादं विमुच्याथ नरसिंहो महाबलः॥ बभंजतां स
भांसर्वांव्यादितास्यइवांतकः॥१७॥

अर्थ- तेव्हां तोंड पसरलेल्या मृत्यू समान महा बलाढ्य नरसिंहानें सिंहनाद करून मग ती सर्व सभा मोडली.

सभायां भज्यमानायां हिरण्यकशिपुः स्वयं॥ चिक्षे
पास्त्राणि सिंहस्य रोषाद्व्याकुललोचनः॥१८॥

अर्थ- अशी ती आपली सभा नारसिंहानें मोडली असतां हिरण्यकशिपूनें रोषें करून नेत्र गरगरां फिरवून त्या नृसिंहावर अनेक शस्त्रास्त्रें टाकिलीं.

सर्वास्त्राणामथज्येष्ठं दंडमस्त्रं सुदारुणं॥ कालचक्रं
तथाघोरं विष्णुचक्रं तथापरं॥१९॥ पैतामहं तथात्यु
ग्रं त्रैलोक्यदहनं महत्॥ विचित्रामशनींचैव शुष्कार्द्रं
चाशनिद्वयं॥२०॥ रौद्रं तथोग्रं शूलंच कंकालं मुस
लं तथा॥ मोहनं शोषणंचैव संतापन विलापनं॥२१॥
वायव्यं मथनंचैव कापालमथ कैंकरं, तथाप्रतिहतां
शक्तिं क्रौंचमस्त्रं तथैवच॥२२॥ अस्त्रं ब्रह्मशिरश्चैव
सोमास्त्रं शिशिरं तथा॥ कंपनं शातनंचैव त्वाष्ट्रंचैव
सुभैरवं॥२३॥ कालमुद्गरमक्षोभ्यं तपनंच महाबलं
॥ संवर्तनं मादनंच तथामायाधरं परं॥२४॥ गांधर्वम
स्त्रं दयितमसिरत्नंच नंदकं॥ प्रस्वापनं प्रमथनं वा
रुणंचास्त्रमुत्तमं॥ अस्त्रं पाशुपतंचैव यस्याप्रतिह

तागतिः ॥२५॥ अस्त्रं हयशिरश्चैव ब्राह्ममस्त्रं तथैव च ॥ नारायणास्त्रमैंद्रं च सार्पमस्त्रं तथाद्भुतं ॥ २६ ॥ पैशाचमस्त्रमजितं शोषदं शामनं तथा ॥ महाबलं भावनं च प्रस्थापनविकंपने ॥२७॥ एतान्यस्त्राणि दिव्यानि हिरण्यकशिपुस्तदा ॥ असृजन्नरसिंहस्य दीप्तस्याग्नेरिवाहुतिं ॥२८॥

अर्थ— तीं अशीं कीं, सर्व अस्त्रांत श्रेष्ठ अतिभयंकर कालदंड नामक अस्त्र, घोर कालचक्र, विष्णुचक्र, १९ त्रैलोक्याचें भस्म करणारें अत्यंत महा उग्र ब्रह्मदेवाचें अस्त्र, विलक्षण उल्कापात, शुष्क व ओलें अशीं दोन प्रकारचीं वज्रें, २० शिवाचा उग्र शूल, कंकाल व मुसल, मोहन, शोषण, संतापन, विलापन, २१ वायव्य, मथन, कापाल, कैंकर हीं अस्त्रें, तशीच अकुंठित शक्ति, क्रौंचास्त्र, २२ ब्रह्मशिर, अतिशीतल चंद्रास्त्र, कंपनास्त्र, छिन्नभिन्न करणारें तें शातन अस्त्र व विश्वकर्म्याचें अत्यंत भयंकर अस्त्र, २३ क्षुब्ध (कोप) करण्याविषयीं अयोग्य काल मुद्गल नांवाचें आयुध, महाबलयुक्त सूर्यास्त्र, संवर्तन, मादन, तसेंच अनेक मोठ्या माया धारण करणारें हीं अस्त्रें, २४ गंधर्वास्त्र, तरवारींत श्रेष्ठ ह्मणून च अतिप्रिय खड्ग, प्रस्वापन, प्रमथन, उत्तम वारुण हीं अस्त्रें, अकुंठित गतियुक्त पाशुपत अस्त्र, २५ हयशिर व ब्रह्मास्त्र, नारायणास्त्र, ऐंद्र व सर्पाचें अद्भुत अस्त्र, २६ पिशाचांचें अजिंक अस्त्र, शोषद, शामन, अनेक भावनानीं युक्त ह्मणून भावन नामानें प्रसिद्ध महा बलिष्ठ अस्त्र, प्रस्थापन व विकंपन, २७ हीं दिव्य अस्त्रें त्याकाळीं हिरण्यकशिपू दैत्यानें "जशा प्रज्वलित अग्नीवर आहुती द्याव्या तशा" त्या नारसिंहावर टाकलीं,

अस्त्रैः प्रज्वलितैः सिंहमावृणोदसुरोत्तमाः ॥ विवस्वान्घर्मसमये हिमवंतमिवांशुभिः ॥२९॥

अर्थ— या प्रमाणें त्या असुर श्रेष्ठ हिरण्यकशिपूनें अनेक तीक्ष्ण अस्त्रांनीं जसा सूर्य उष्णकाळीं आपले किरणानीं हिमालय पर्वतास व्याप्त करितो तसें नृसिंहास झांकिलें.

सत्वमर्षानिलोद्धूतो दैत्यानां सैन्यसागरः ॥ क्षणेनप्ला

वयामासमैनाकमिवसागरः॥ ३०॥ प्रासैः पाशैश्वखड्गैश्वगदाभिर्मुसलैस्तथा॥ वज्रैरशनिभिश्चैवसाग्निभिश्वमहाद्रुमैः॥ ३१॥ मुद्गरैर्भिंदिपालैश्चशिलोलूखलपर्वतैः॥ शतघ्नीभिश्च दीप्ताभिर्दंडैरपिसुदारुणैः॥३२॥

अर्थ- तशाच समुद्रासमान क्रोधान्याच वेगानें खवळलेल्या त्या दैत्यसैन्यानें, जसा सागरानें मैनाक पर्वत बुडविला तसा. प्रास, पाश, खड्ग, गदा, मुसळें, वज्रें, उल्कापात, वणव्यानें पेटलेले मोठमोठे वृक्ष, मुद्गल, गोफिणी, शिळा, उखळें, पर्वत लख लखीत शतघ्नी, अति भयंकर दंड, या आयुधानीं एक क्षणांत नारसिंहास आच्छादित केलें.

तेदानवाः पाशगृहीतहस्तामहेंद्रतुल्याशनिवज्रवेगाः॥ समंततोभ्युद्यतबाहुकायाः स्थितास्त्रिशीर्षाइवनागपाशाः॥ ३३॥

अर्थ- असे ते दानव, वेगानें इंद्र, विजेचा अग्नि व वज्र यांसारखे असून आपले बाहु व देह वर करून हातांत पाश घेऊन उंच केलेल्या तीन मस्तकांच्या नागां सारखे त्या कालीं नृसिंहाचे आसमंतात् भागीं उभे राहिले.

सुवर्णमालाकुलभूषितांगाः पीतांशुकाभोगविभावितांगाः॥ मुक्तावलीदामसनाथकक्षाहंसाइवाभांतिविशालपक्षाः॥ ३४॥

अर्थ- तसेच ते दैत्य गळ्यांत घातलेल्या सुवर्णमालांच्या समुदायानीं भूषित असून परिधान केलेल्या पीतवर्ण लांब, रुंद वस्त्रानीं सुशोभित होते; आणि त्या दानवांच्या कुसी मोत्यांच्या माळानीं ऐश्वर्ययुक्त दिसत आहेत; तेणें करून ते असुर विशाळ पंखानीं युक्त हंसासारखे शोभत असत.

तेषांतुवायुप्रतिमौजसांवैकेयूरमौलीवलयोत्कटानां॥ तान्युत्तमांगान्यभितो विभांति प्रभातसूर्यांशुसमप्रभाणि॥ ३५॥

अर्थ- त्या कालीं वायू समान अप्रतिम तेजस्वी असून बाहुभूषणें, मुगुट व कडि, तोडे, यानीं अतिशयें शोभणाऱ्या त्या दैत्यांचीं मस्तकें प्रातः कालीं

उदयास आलेल्या किरण युक्त बाल सूर्या सारखीं चहूं कडून शोभत होतीं.

क्षिपद्भिरुग्रैर्ज्वलितैर्महाबलैर्महास्त्रपूगैः स्रुसमावृतो बभौ॥ गिरिर्यथा संततवर्षिभिर्घनैः कृतांधकारां तरकंदरोद्रुमैः॥ ३६॥

अर्थ- ते समयीं शस्त्रास्त्रें टाकणाऱ्या त्या महा बलाढ्य दैत्यानीं नृसिंहावर टाकलीं असतां जसा पर्वत निरंतर पर्जन्य वृष्टि करणाऱ्या मेघांच्या योगानें व वृक्षानीं केलेल्या अंधकार युक्त आंतील गुहानीं शोभतो; तसा तो नारसिंह देव शोभला.

तैर्हन्यमानोपि महास्त्र जालैर्महाबलैर्दैत्यगणैः समेतैः॥ नाकंपताजौ भगवान्प्रताप स्थित प्रकृत्या हिमवानिवाचलः॥ ३७॥

अर्थ- या प्रमाणें युद्धार्थ जमलेल्या त्या महा बलिष्ठ दैत्य समुदायांनीं मोठमोठ्या शस्त्रास्त्रांचे समूहानीं नारसिंहास प्रहार केले; तरीं तो भगवान् आपल्या स्वभाव सिद्ध प्रतापा मुळें हिमालय पर्वता सारखा लेशमात्रही न हालतां स्थिर राहिला.

संत्रासितास्तेन नृसिंहरूपिणा दितेः सुताः पावकतुल्यतेजसा॥ भयाद्विचेलुः पवनोद्धुतांगा यथोर्मयः सागर वारिसंभवाः॥ ३८॥

अर्थ- आणि त्या अग्निसमान तेजस्वी नृसिंह रूपी विष्णूनें आपल्या सहज पराक्रमें करून ते सर्व दैत्य त्रस्त केले असतां, जश्या समुद्रांतील उदका पासून उत्पन्न झालेल्या लाटा वायूनें अतिशयें हालतात, तसे ते असुर नृसिंहाच्या भयानें थरथरां कांपूं लागले. इतिश्री मत्स्यपुराणें नृसिंह प्रादुर्भावे एकषष्ठ्युत्तर शततमोऽध्यायः॥ १६१॥

अध्याय १६२वा.

सूतउवाच॥ खराः खरमुखाश्चैव मकराशीविषाननाः॥ ईहा मृग मुखाश्चान्ये वराह मुखसंस्थिताः॥ १
बालसूर्यमुखाश्चान्ये धूमकेतुमुखास्तथा॥ अर्धचंद्रार्धवक्त्राश्च अग्निदीप्तमुखास्तथा॥ २॥ हंसकुक्कुट-

वक्राश्च व्यादितास्या भयावहाः ॥ सिंहास्या लेलिहानाश्च काकगृध्रमुखास्तथा ॥ ३ ॥ द्विजिव्हकावक्रशीर्षास्तथोल्कामुखसंस्थिताः ॥ महाग्राहमुखाश्चान्ये दानवा बलदर्पिताः ४ ॥ शैलसंवर्ष्मणस्तस्य शरीरे शरवृष्टिभिः ॥ अवध्यस्य मृगेंद्रस्य न व्यथां चक्रुराहवे ॥ ५ ॥

अर्थ- नंतर सूत बोलतात कीं, ऋषी हो गर्दभरूपी, गर्दभा सारख्या मुखानें युक्त, मत्स्य व सर्प या समान मुखांचे, लांडग्यां च्या मुखांचे, डुकरांच्या मुखानें युक्त, उदयास आलेल्या बाळ सूर्या समान तेजस्वी मुखानें शोभणारे, धूमकेतू सारख्या मुखांचे, अर्धचंद्रासमान अर्ध्यामुखानें सुशोभित, अग्नी सारख्या तेजस्वी मुखाचे, हंस व कोंबडे यां सारख्या तोंडाचे, पसरलेल्या तोंडाचे, भयंकर, सिंह मुख, कितीएक आपल्या जिभेनें तोंडें चाटणारे, कावळे व गृध्रपक्षी यां सारख्या मुखानें युक्त, दोन जिव्हांचे, कितिएक तोंडावर मस्तक असणारे ज्वाला रहित अग्नी सारख्या मुखानें युक्त, मोठ्या सुसरी सारख्या मुखाचे असे तेपर्वताकार शरीरी व बलानें उन्मत्त झालेले दानव कालत्रयीं अवध्य अशा त्या नृसिंहाच्या देहावर बाणांच्या वृष्टि करीत होते; तथापि त्या संग्रामांत नृसिंहास त्या बाणानीं किमपि व्यथा झाली नाहीं.

एवं भूयोपरान् घोरानसृजन्दानवेश्वराः ॥ मृगेंद्रस्योपरि क्रुद्धा निश्वसंत इवोरगाः ॥ ६

अर्थ- तेव्हां, फूत्कार टाकणाऱ्या सर्पा सारखे क्रुद्ध झालेल्या त्या श्रेष्ठ दानवानीं पुनः तसेच अतिभयंकर दुसरे बाण नारसिंहावर टाकले.

ते दानवशरा घोरा दानवेंद्रसमीरिताः ॥ विलयं जग्मुराकाशे खद्योता इव पर्वते ॥ ७ ॥

अर्थ- ते दानवानीं सोडलेले तीक्ष्ण बाण जसे काजवे पर्वतांत जानात तसे आकाशांत लयास गेले.

ततश्चक्राणि दिव्यानि दैत्याः क्रोधसमन्विताः ॥ मृगेंद्रायासृजन्नाशु ज्वलितानि समंततः ॥ ८ ॥

अर्थ- नंतर त्या दैत्यानीं क्रोधें करून त्वरेनें चहूंकडून प्रज्वलित उत्तम न-

कें नृसिंहास मारिलीं.

तैरासीद्गगनंचक्रैः संपतद्भिरितस्ततः ॥ युगांतेसंप्र
काशद्भिश्चंद्रादित्यग्रहैरिव ॥ ९ ॥

अर्थ- त्या चोहीं कडून येणाऱ्या चक्रांनीं त्या कालीं आकाश, जसें प्रलय कालीं अत्यंत प्रकाशयुक्त चंद्र सूर्यादिक ग्रहानीं शोभतें, तसें दिसलें.

तानिसर्वाणिचक्राणिमृगेंद्रेणाशमात्मना ॥ ग्रस्तान्यु
दीर्णानितदा पावकार्चिःसमानिवै ॥ १०

अर्थ- तेसमयीं अति उग्ररूपी नारसिंहानें अग्नीच्या ज्वाला समान देदीप्य मान तीं सर्व चक्रें गिळून टाकिलीं.

तानिचक्राणिवदनंविशमानानिभांतिवै ॥ मेघोदर
दरीष्वेवचंद्रसूर्यग्रहाइव ॥ ११ ॥

अर्थ- आणि दैत्यानीं टाकलेलीं चक्रें नारसिंहाच्या मुखांत प्रविष्ट होत असतां मेघांच्या जाण्याच्या गुहेंत जाणाऱ्या चंद्र सूर्यादिक ग्रहां सारखीं दिसलीं.

हिरण्यकशिपुर्दैत्योभूयः प्रासृजदूर्जितां ॥ शक्तिं
प्रज्वलितांघोरांधौतशस्त्रतडित्प्रभां ॥ १२ ॥

अर्थ- मग पुनः हिरण्य कशिपु दैत्यानें धार लावलेलीं शस्त्रें व विद्युल्लता यां सारखी प्रखर तेजोमय उग्र शक्ती नृसिंहावर टाकली.

तामापतंतींसंप्रेक्ष्य मृगेंद्रः शक्तिमुज्ज्वलां ॥ हुंका
रेणैवरौद्रेणबभंजभगवांस्तदा ॥ १३ ॥

अर्थ- तेव्हां ती देदीप्यमान शक्ति आपणावर येत आहे असें पाहून षड्गुणैश्वर्य संपन्न नृसिंहानें आपल्या भयंकर हुंकारानें ती शक्ती मोडली.

रराजभग्नासाशक्तिर्मृगेंद्रेणमहीतले ॥ सविष्फुलिं
गाज्वलितामहोल्केवादिवश्च्युता ॥ १४ ॥

अर्थ- त्या कालीं नृसिंहानें मोडून पृथ्वीवर पडलेली ती शक्ति आकाशांतून पडलेली ठिणग्या सहित देदीप्य मान मोठ्या विजे सारखी शोभली.

नाराचपंक्तिः सिंहस्य प्राप्ता रेजे विदूरतः ॥ नीलोत्प
लपलाशानां मालेवोज्ज्वलदर्शना ॥ १५ ॥

अर्थ- नंतर त्या दैत्यानीं सोडलेल्या बाणांची पंक्ति नृसिंहावर आली तेव्हां ती त्या देवांच्या अंगावर काळ्या कमळांच्या पाकळ्यांच्या माळे सारखी शोभली.

सगर्जित्वा यथान्यायं विक्रम्यच यथासुखं ॥ तत्सै न्यमुत्सारितवांस्तृणाग्राणीव मारुतः ॥ १६ ॥

अर्थ- ते समयीं त्या नृसिंहानें देशकालानुरूप गर्जना व यथेच्छ पराक्रम हीं करून वायूनें उडविलेल्या गवताच्या शेंड्या प्रमाणें तें सैन्य दूर केले.

ततोश्मवर्षं दैत्येंद्रा व्यसृजंत नभोगताः ॥ नगमात्रैः शिलाखंडैर्गिरिशृंगैर्महाप्रभैः ॥ १७ ॥

अर्थ- नंतर ते दैत्यश्रेष्ठ आकाशांत जाऊन पर्वतप्राय शिळा समुदाय, पर्वतांचीं महा तेजस्वि शिखरें, यानीं नृसिंहावर दगडाची वृष्टि करूं लागले.

तदश्मवर्षं सिंहस्य महन्मूर्ध्नि निपातितं ॥ दिशोदश विकीर्णाबैः खद्योतप्रकराइव ॥ १८ ॥

अर्थ- तेव्हां ती दगडांची मोठी वृष्टी नृसिंहाच्या मस्तकावर पडली; त्या वेळेस ते दगड दशदिशांत पसरलेल्या काजव्यांच्या समुदायां सारखे दिसूं लागले.

तदाश्मौघैर्दैत्यगणाः पुनः सिंहमरिंदमं ॥ छादयांचक्रिरे मेघा धाराभिरिव पर्वतं ॥ १९ ॥

अर्थ- या प्रमाणें त्या कालीं ते दैत्यगण पुनः पाषाणांच्या समुदायानीं शत्रुनाशक नारसिंहास, जसे मेघ पर्जन्याच्या धारानीं पर्वतास व्यास करितात, तसें आच्छादित केलें.

नचतंचालयामास दैत्यौघादेवसत्तमं ॥ भीमवेगोचलश्रेष्ठं समुद्रइवमंदरं ॥ २० ॥

अर्थ- तथापि ते सर्व दैत्य त्या देवाधिदेव नृसिंहास हालविण्या सही समर्थ झाले नाहींत; यास दृष्टांत जसा भयंकर वेगयुक्त समुद्र, पर्वतश्रेष्ठ मंदराचलास बुडवितो तसें.

ततोश्मवर्षे विहते जलवर्षमनंतरं ॥ धाराभिरक्षमा

त्राभिः प्रादुरासीत्समंततः ॥ २१ ॥

अर्थ- अशी ती दगडांची वृष्टी व्यर्थ झाल्यावर त्या दैत्यानीं नृसिंहावर जल वृष्टि चालविली, तेव्हां रथाच्या कण्या सारख्या पर्जन्य संबंधि मोठ्या धारा नृसिंहाच्या आसमंताद्भागीं पडूं लागल्या.

नभसः प्रच्युता धारा स्तिग्मवेगाः समंततः ॥ आवृत्य सर्वतो व्योम दिशश्चोपदिशस्तथा ॥ २२ ॥ धारादिविच सर्वत्र वसुधायांच सर्वशः ॥ नस्पृशंतिच तादेवं निपतंत्यो निशांक्षवि ॥ २३ ॥

अर्थ- त्या तीव्र वेगानें आकाशांतून नृसिंव्हाच्या सभोंवतीं पडणाऱ्या पर्जन्याच्या धारा चहूंकडून आकाश, पूर्वादिक मुख्य चार दिशा, आग्नेयी आदिकरून चारी कोण दिशा, यांस व्यापून त्या पृथ्वी व आकाश यांनसर्वत्र-व्यापजाहल्या तरी त्या धारा अहोरात्र पडत असून त्यांचा स्पर्शही त्या देवास झाला नाहीं.

बाह्यतोववृषुर्वर्षं नोपरिष्टाच्च ववृषुः ॥ मृगेंद्रप्रतिरूपस्यस्थितस्य युधिमायया ॥ २४ ॥

अर्थ- आणि दैत्यांचा माये पासून उत्पन्न झालेल्या पर्जन्याच्या धारा, त्या युद्धांत सिंहासमान उभाराहिलेल्या नारसिंहाच्या मायेनें त्या नारसिंहावर नपडतां सभोंवतीं पडूं लागल्या.

हते श्मवर्षे तुमुले जलवर्षेच शोषिते ॥ सोसृजद्दानवो मायामग्निवायुसमीरितां ॥ २५ ॥

अर्थ- या प्रमाणें शिळा व उदक यांची ती अतिवृष्टि नरसिंहानें व्यर्थ केली असतां, त्या हिरण्यकशिपूनें अग्नि व वायु यानीं युक्त माया उत्पन्न केली.

महेंद्रस्तोयदैः सार्द्धं सहस्राक्षो महाद्युतिः ॥ महता तोयवर्षेण शमयामास पावकं ॥ २६ ॥

अर्थ- त्या कालीं सहस्त्र नयन महा तेजस्वी इंद्रानें मेघांसहित तेथें येऊन मोठ्या पर्जन्य वृष्टीनें तो अग्नी शांत केला.

तस्यां प्रतिहतायांतु मायायां युधि दानवः ॥ असृजद्घोर संकाशं तमस्तीव्रं समंततः ॥ २७ ॥

अर्थ- अशी ती माया नाशपावली असतां, हिरण्यकशिपूनें त्या युद्धांत नृसिंहाचे सभोंवतीं महा भयंकर तीव्र अंधकार निर्माण केला.

तमसासंवृते लोके दैत्येष्वात्तायुधेषु च ॥ स्वतेजसा परिवृतो दिवाकर इवाबभौ ॥ २८ ॥

अर्थ- तेव्हां त्या अंधकारानें सर्व लोक व्याप्त झाले असून ते दैत्य आयुधें घेऊन त्या रण भूमींत सिद्ध होऊन उभे राहिले असतां तो नारसिंह आपल्या तेजानें सर्वत्र व्यापून सूर्यासारखा शोभला.

त्रिशाखां भ्रुकुटीं चास्य ददृशुर्दानवा रणे ॥ ललाटस्थां त्रिशूलांकां गंगां त्रिपथगामिव ॥ २९ ॥

अर्थ- आणि त्या संग्रामांतील दानवांनीं नृसिंहाची तीन भागानीं युक्त भ्रुकुटी (भोंवई) पाहिली ती अशी कीं, जशी शिवाच्या ललाटावरील त्रिशूला सारखी तीन मार्गानीं जाणारी भागीरथीच काय! तशी दिसली.

ततः सर्वाश्च मायाश्च हतास्तु दितिनंदनाः ॥ हिरण्यकशिपुं दैत्यं विवर्णाः शरणं ययुः ॥ ३० ॥

अर्थ- नंतर अशा त्या आपल्या सर्वमाया कुंठित जाहल्या असतां ते संपूर्ण दैत्य निस्तेज होऊन दितीच्या साक्षात् पुत्रास हिरण्यकशिपूस शरण गेले

ततः प्रज्वलितः क्रोधात्प्रदहन्निव तेजसा ॥ तस्मिन्क्रुद्धे तु दैत्येंद्रे तमोभूतमभूज्जगत् ॥ ३१ ॥

अर्थ- तेव्हां आपल्या तेजानें जाळीलच किंकाय? अशा क्रोधानें तो दैत्यराज हिरण्यकशिपू लाल जाहला असतां त्याच्या कोपामुळें सर्व जग अंधकारानें व्याप्त झालें.

आवहः प्रवहश्चैव विवहोथ उदावहः ॥ परावहः संवहश्च महाबलपराक्रमाः ॥ ३२ ॥ तथा परिवहः श्रीमानुत्पातभयशंसनाः ॥ इत्येवं क्षुभिताः सप्त मरुतो गगनेचराः ॥ ३३ ॥ ये ग्रहाः सर्वलोकस्य क्षये प्रादुर्भवंति वै ॥ ते सर्वे गगने दृष्टा व्यचरंत यथासुखं ॥ ३४ ॥

अर्थ- ते समयीं आवह १, प्रवह २, विवह ३, उदावह ४, परावह ५, संवह ६ व श्रीमान् परिवह ७ हे सात वायु महा बलिष्ठ पराक्रमी आकाशांत संचार-

करणारे, व उत्पातांचें भय सूचविणारे आहेत, ते क्षोभ पावले आणि सर्व लोकांच्या संहार काळीं जे ग्रह प्रगट होणारे ते सर्वही आकाशांत यथेच्छ-संचार करीत आहेत असें लोकांच्या दृष्टीस आलें.

अन्यंगतेचाप्यचरन्मार्गंनिशिनिशाचरः॥सग्रहः स
हनक्षत्रैराकापतिररिंदमः॥३५॥

अर्थ- तसाच शत्रूंचा नाश करणारा पूर्णिमेचा स्वामी चंद्र, ग्रह व नक्षत्रें यां सहवर्तमान आपली गती सोडून दुसऱ्या गतीनें रात्रीं संचार करूं लागला.

विवर्णतांचभगवानातोदिविदिवाकरः॥कृष्णंकबंधं
चतथालक्ष्यतेस्मममहद्दिवि॥३६॥

अर्थ- आणि भगवान् सूर्य निस्तेज दिसूं लागला; व मोठें काळें धड ज्यास केतू ह्मणतात तें आकाशांत दिसूं लागलें.

अमुंचच्चार्चिषांवृंदंभूमिवृत्तिर्विभावसुः॥गगनस्थ
श्चभगवानभीक्ष्णंपरिदृश्यते॥३७॥

अर्थ- त्याच प्रमाणें भगवान् अग्नि हा भूमीवरचा असून तो अनेक ज्वाला सोडित होत्साता वारंवार आकाशांत दिसूं लागला.

सप्तधूम्रनिभाघोराः सूर्यादिविसमुत्थिताः॥सोम-
स्यगगनस्थस्यग्रहास्तिष्ठंतिशृंगगाः॥३८॥

अर्थ- तसेच वर्णानें धुरा सारखे भयंकर सात सूर्य आकाशांत उदयास आले; व सर्व ग्रह आकाशांतील अर्धचंद्राच्या टोंकावर चढूं लागले.

वामेनदक्षिणंचैवस्थितौशुक्रबृहस्पती॥शनैश्च-
रोलोहितांगोज्वलनार्कसमद्युती॥३९॥समंसम-
भिरोहंतः सर्वेतेगगनेचराः॥शृंगाणिशनकैर्घोरा
युगांतावर्तिनोग्रहाः॥४०॥

अर्थ- त्याच प्रमाणें शुक्र व बृहस्पति हे डावी कडून प्रदक्षिणा करूं लागले; आणि शनि व मंगळ हे कांतीनें अग्नि सारखे प्रज्वलित दिसूं लागले, व आकाशांत संचार करीत असून प्रलया पर्यंत असणारे भयंकर सर्व-ग्रह पर्वताचे शिखरांवर मंदगतीनें बरोबर उतरूं लागले.

चंद्रमाश्चसनक्षत्रैर्ग्रहैः सहतमोनुदः॥चराचरविना

शायरोहिणींनाभ्यनंदत ॥ ४१॥

अर्थ— त्या काळीं नक्षत्रें व ग्रह यां सहित चंद्रमा, चराचर जगाचा नाश करविण्या साठीं रोहिणीचा आदर करीना असें जाहलें.

गृह्यतेराहुणाचंद्र उल्काभिरभिहन्यते॥ उल्काःप्रज्वलिताश्चंद्रे विचरंति यथासुखं ॥ ४२॥

अर्थ— तसाच राहू, चंद्रास ग्रासूं लागला; विजांचे प्रहार चंद्रास होऊं लागले व प्रज्वलित विजा चंद्रावर यथेच्छ निरंतर संचार करूं लागल्या.

देवानामपियोदेवः सोप्यवर्षतशोणितं॥ अपतन्नागनादुल्काविद्युद्रूपामहास्वनाः॥ ४३॥

अर्थ— आणि देवांचा देव इंद्र रक्ताची वृष्टी करूं लागला, व मोठ्या शब्दानें युक्त विजा आकाशांतून पृथ्वीवर पडूं लागल्या.

अकालेचद्रुमाःसर्वे पुष्पंतिच फलंतिच॥ लताश्चसफलाः सर्वा येचाहुर्दैत्यनाशनं॥ ४४॥

अर्थ— तसेच सर्व वृक्ष व वेली यांस अकालींच पुष्पें व फलें येऊं लागलीं तेणें करून त्या हिरण्य कशिपूच्या नाशाची सूचना होऊं लागली.

फलैःफलान्यजायंतपुष्पैःपुष्पंतथैवच॥ उन्मीलंतिनिमीलंतिहसंतिचरुदंतिच॥ ४५॥ विक्रोशंतिचगंभीराधूमयंतिज्वलंतिच॥ प्रतिमाःसर्वदेवानां वेदयंतिमहद्भयं॥ ४६॥

अर्थ— त्या काळीं फलांस फलें व फुलांस फुलें येऊं लागलीं; सर्व देवांच्या गंभीर मूर्ति डोळे उघडून मिटूं लागल्या; तसेंच हंसणें, रडणें, आक्रोश करणें, धूर निघणें व ज्वाला निघणें हे प्रकार त्या मूर्तीचे ठिकाणीं दिसूं लागले; त्यावरून लोकांस मोठ्या भयाची शंका आली.

आरण्यैःसहसंसृष्टाग्राम्याश्चमृगपक्षिणः॥ चक्रुःस्वभैरवंतत्रमहायुद्धमुपस्थितं॥ ४७॥

अर्थ— आणि गांवांतील हरिण व पक्षी हे अरण्यांतील पशुपक्ष्यां जवळ जाऊन तेथें त्यांशीं अतिभयंकर मोठें युद्ध करूं लागले.

नद्यश्चप्रतिकूलानिवहंतिकलुषोदकाः॥ नप्रकाशं

तिचदिशोरक्तरेणुसमाकुलाः॥ ४८॥

अर्थ— ते समयीं सर्व नद्या गढुळ पाण्यानें युक्त होत्सात्या उलट्या वाहूं लागल्या; व दशदिशांत रक्त व धुरळा व्याप्त जाहल्या मुळें प्रकाश नाहींसा झाला.

वानस्पत्योनपूज्यंतेपूजनार्हाः कथंचन॥ वायुवेगेन हन्यंतेभज्यंतेप्रणमंतिच॥ ४९॥

अर्थ— त्या वेळेस अश्वत्थादिक पूज्य वृक्षांची ही कोणी पूजा करीनानसे झाले; आणि ते पुण्य वृक्ष वायूच्या वेगानें कांहीं नाश पावूं लागले, मोडूं लागले, व कितीएक वांकूं लागले.

यदाचसर्वभूतानांछाया नपरिवर्तते॥ अपराण्ह गतेसूर्येलोकानांयुगसंक्षये॥ ५०॥

अर्थ— आणि जेव्हां सर्व लोकांचा प्रलय समय येतो तेव्हां अपराण्हाला कर सूर्य गेला तरीं प्राणिमात्रांची छाया मागें फिरेनाशी झाली.

तदा हिरण्यकशिपोर्दैत्यस्योपरिवेश्मनः॥ भांडा- गारेयुधागारेनिविष्टमभवन्मधु॥ ५१॥

अर्थ— त्या कालीं हिरण्यकशिपु दैत्याच्या घरांतील भांड्यांचें स्थल- व युद्ध सामग्रीची जागा त्या दोन स्थानांत मधमाशांचें मोहोळ लागलें.

असुराणांविनाशाय सुराणांविजयायच॥ दृश्यंते विविधोत्पाता घोराघोरनिदर्शनाः॥ ५२॥

अर्थ— तसेंच असुरांचा नाश व देवांचा जय यांचे दर्शक अनेक प्रकारचे महा भय सूचक उग्र उत्पात लोकांस दिसूं लागले.

एतेचान्येचबहवोघोरोत्पाताः समुत्थिताः॥ दैत्येंद्र स्यविनाशाय दृश्यंतेकालनिर्मिताः॥ ५३॥

अर्थ— असे हे व या वांचून दुसरे भयंकर बहुत उत्पात, दैत्यराज हिरण्यकशिपूच्या नाशार्थ कालानें निर्माण केल्यामुळें उत्पन्न झालेले दिसूं लागले.

मेदिन्यांकंपमानायांदैत्येंद्रेणमहात्मना॥ महीधराना गगणानिपेतुरमितौजसः॥ ५४॥

अर्थ— आणि त्या कालीं महा बलाढ्य दैत्यराज हिरण्यकशिपूच्या योगानें

पृथ्वी कंपित झाली असतां पृथ्वीचें धारण करणारे अपरिमित तेजस्वी नागगण खालीं पडले.

विषज्वालाकुलैर्वक्त्रै र्विमुंचंतोहुताशनं॥ चतुःशीर्षाः पंचशीर्षाः सप्तशीर्षाश्चपन्नगाः॥ ५५॥ वासुकिस्तक्षकश्चैव कर्कोटक धनंजयो॥ एलामुखः कालिकश्च महापद्मश्चवीर्यवान्॥ ५६॥

अर्थ— त्याचप्रमाणें कोणी चार मस्तकांचे, कितीएक पांच मस्तकांनीं युक्त व कांहीं सातफणांचे असे वासुकि, तक्षक, कर्कोटक, धनंजय, एलामुख, कालिक व पराक्रमी महापद्म हे नाग आपल्या विषज्वाला युक्त मुखांनी अग्नी ओकूं लागले.

सहस्रशीर्षोनागोवैहेमतालध्वजःप्रभुः॥ शेषोनंतो महाभागोदुष्प्रकंप्यःप्रकंपितः॥ ५७॥

अर्थ— तसाच सुवर्णताल ध्वजानें सुशोभित, सर्वथा कंपित न होणारा, महा भाग्यशाली, सर्वनागांचा राजा, सहस्र मस्तकांनीं शोभायमान व अपार महत्वानें युक्त असा शेष नामक श्रेष्ठ नाग त्या धरणी कंपानें कंपित झाला.

दीप्तान्यंतर्जलस्थानि पृथिवीधरणानिच॥ तदाक्रुद्धेनमहताकंपितानि समंततः॥ ५८॥ नागास्तेजोधराश्चापि पातालतलचारिणः॥

अर्थ— तसेच पृथ्वीवरील उदकांतील जलचर प्राणि, पृथ्वीचें धारण करणारे व पातालाचे तळीं राहणारे महा तेजस्वी नाग हे सर्वही त्याकाळीं हिरण्यकशिपु अति क्रुद्ध झाल्यामुळें कंपित होऊन चहूंकडून जळूं लागले.

हिरण्यकशिपुर्दैत्यस्तदासंस्पृष्टवान्महीं॥ ५९॥ संदष्टोष्ठपुटःक्रोधाद्वाराहइवपूर्वजः॥

अर्थ— आणि तेसमयीं हिरण्यकशिपु दैत्यानें क्रोधेंकरून अतिशयें ओंठ चावून वाराह कल्पांतील हिरण्याक्ष नामक आपल्या पूर्वज बंधूप्रमाणें पृथ्वीस बलात्कारानें धरिलें.

नदीभागीरथीचैव शरयूः कौशिकीतथा॥ ६०॥ यमुनात्वथकावेरी कृष्णावेणीचनिम्नगा॥ सुवेणाच-

महाभागानदीगोदवरीतथा॥ ६१॥ चर्मण्वतीचसिंधु
श्चतथा नदनदीपतिः॥ कमलप्रभवश्चैव शोणोमणि
निभोदकः॥ ६२॥ नर्मदाशुभतोयाच्च तथावेत्रवतीन-
दी॥ गोमती गोकुलाकीर्णा तथापूर्व सरस्वती॥ ६३॥
महीकालमहीचैवतमसा पुष्पवाहिनी॥ जंबुद्वीपंर
त्नवटं सर्वरत्नोपशोभितं॥ ६४॥ सुवर्णप्रकरंचैवसु
वर्णाकरमंडितं॥ महानदंच लौहित्यंशैलकाननशो
भितं॥ ६५॥ पत्तनं कोशकरणं ऋषिवीरजनाकरं-
॥ मागधाश्चमहाग्रामा मुंडाःशुंगास्तथैवच॥ ६६॥ सु
ह्मा मल्ला विदेहाश्च मालवाः काशिकोसलाः॥ भवनं
वैनतेयस्य दैत्येंद्रेणाभि कंपितं॥ ६७॥ कैलासशि-
खराकारं यत्कृतं विश्वकर्मणा॥

अर्थ- तेव्हां भागीरथीनदी, शरयू, कौशिकी, यमुना, कावेरी, कृष्णावेणा, सुवेणा, महाभाग्यवती गोदावरी, चर्मण्वती, सिंधुनदी, तसाच मण्यासारख्या स्वच्छ उदकानें युक्त असून उत्तम कमलांचें उत्पत्तिस्थान व नद, नद्यांतश्रेष्ठ असा शोणनद, कल्याणकारक उदकयुक्त नर्मदा, वेत्रवती, गाईंचा समुदायानीं सुशोभित गोमती, पूर्वसरस्वती, महीनदी, कालमही, पुष्पयुक्त प्रवाहानें वाहणारी तमसानदी, जेथें सर्व रत्नानीं सुशोभित रत्नवट असून सुवर्ण उत्पन्न होत आहे, आणि जें सोन्याच्या खाणींनीं युक्त असून ज्यांत भांडारगृहाच्या साधनांचें मुख्य स्थान भूत मोठें पुराण प्रसिद्ध श्रीरंग पट्टण ऋषि व वीर लोक आहेत असें जंबुद्वीप, सभोंवतीं पर्वत व अरण्य यानीं-शोभायमान महान् लौहित्य नामक नद, मोठमोठ्या गांवानीं युक्त मगध-देश, मुंड, शुंग, सुह्म, मल्ल, विदेह, मालव, काशि, कोसल व कैलास शिखरांसारखें विश्वकर्म्यानें केलेलें गरुडाचें घर हें सर्व त्या हिरण्यकशिपूनें हालविलें.

रक्ततोयोमहाभीमो लौहित्यो नामसागरः॥ ६८॥ उद
यंश्चमहाशैल उच्छ्रितः शतयोजनं॥ सुवर्णवेदिकः
श्रीमान्मेघपंक्तिनिषेवितः॥ ६९॥ भ्राजमानोर्कस

दृशैर्जातरूपमयैर्द्रुमैः॥शालैस्तालैस्तमालैश्च कर्णिकारैश्च पुष्पितैः॥७०॥अयोमुखश्च विख्यातः सर्वतो धातुमंडितः॥तमालवनगंधश्च पर्वतो मलयः शुभः॥७१॥सुराष्ट्राश्च सबाल्हीकाः शूराभीरास्तथैव च॥ भोजाः पांड्याश्च वंगाश्च कलिंगास्ताम्रलिप्तकाः॥७२ तथैवोंड्राश्च पौंड्राश्च वामचूडाः सकेरलाः॥ क्षोभितास्तेन दैत्येन सदेवाश्चाप्सरोगणाः॥७३॥

अर्थ- तसाच तांबड्या पाण्याचा, महा भयंकर लौहित्य नामक समुद्र, शंभर योजनें उंच असून सुवर्णाचे ओटे, व मेघांच्या पंक्ती यांच्या शोभेनें युक्त, सूर्यासमान तेजस्वी सोन्याचे मोठमोठे शाल, ताल,तमाल, पांगारा या प्रफुल्लित फुल झाडानीं सुशोभित असा महान् उदय पर्वत, चहूं कडून गेरिकादि धातूनीं मंडित असून तमाल वना सारख्या सुगंधानें युक्त,प्रसिद्ध अयोमुख पर्वत, कल्याण कारक मलय पर्वत. सुराष्ट्र, बाल्हीक, शूर,आभीर, भोज,पांड्य ,वंग, कलिंग, ताम्रलिप्तक, उंड्र, पौंड्र, वामचूड (सुंदर शेंडीनें युक्त) केरल हे देश, देव व अप्सरा यांचे समुदाय या सर्वांस हिरण्यकशिपु दैत्यानें कंपित केलें.

अगस्त्यभगवनंचैव यदगम्यंकृतं पुरा॥ सिद्धचारणसंघैश्च विप्रकीर्णमनोहरं॥७४॥ विचित्रनानाविहगंसुपुष्पितमहाद्रुमं॥जातरूपमयैः शृंगैर्गगनंविलिखन्निव॥७५॥चंद्रसूर्यांशुसंकाशैः सागरांबुसमावृतैः॥ विद्युत्वान्सर्वतः श्रीमानायतः शतयोजनं॥७६॥विद्युतांयत्रसंघाता निपात्यंते नगोत्तमे॥ऋषभः पर्वतश्चैव श्रीमानृषभसंज्ञितः॥७७॥कुंजरः पर्वतः श्रीमानगस्त्यस्यगृहंशुभं॥ विशालाक्षश्चदुर्धर्षः सर्पाणामालयः पुरी॥७८॥तथा भोगवतीचापि दैत्येंद्रेणाभिकंपिता॥

अर्थ- आणि सिद्ध व चारण यांच्या समुदायांनीं व्याप्त, सुंदर, नाना प्रकारचे चमत्कारिक पक्षी बसलेले उत्तम प्रफुल्लित मोठ्या वृक्षानीं सुशोभित, सभोंवतीं समुद्राच्या उदकानें वेष्टित असून चंद्र, सूर्याचे किरणा समान प्रकाश युक्त

सुवर्णाचे शिखरानीं आकाशास लिहित आहे कीं काय! विजांचे समुदाय ज्या श्रेष्ठ पर्वतावर पडत आहेत; व जो विद्युल्लते सारखा चहूंकडून लखलखीत शोभायमान असून शंभर योजनें लांब अशा सर्व संपत्तिमान् ऋषभ पर्वतास वृषभ पर्वत असेंही ह्मणतात; हा ऋषभ पर्वत व सर्वशोभा संपन्न कुंजर पर्वत हीं दोनीं अगस्त्य ऋषींचीं रहाण्याचीं उत्तम स्थानें हीं पूर्वीं लोकांस जाण्या विषयीं अगम्य होतीं; तसाच विशालाक्ष पर्वत सर्पांच्या रहाण्या मुळें मानवांस अगम्य असे, व सर्पांची भोगवती नामक पुरी हे सर्व प्रदेश त्या काळीं हिरण्यकशिपूनें हालविले.

महासेनो गिरिश्चैव पारियात्रश्च पर्वतः ॥ ७९॥ चक्रवांश्च गिरिश्रेष्ठो वाराहश्चैव पर्वतः ॥ प्राग्ज्योतिषपुरं चापि जातरूपमयं शुभं ॥ ८०॥ यस्मिन्वसति दुष्टात्मा नरको नाम दानवः ॥ विशालाक्षश्च दुर्धर्षो मेघगंभीरनिस्वनः ॥ ८१॥ षष्टिस्तत्र सहस्राणि पर्वतानां द्विजोत्तमाः ॥ तरुणादित्यसंकाशो मेरुस्तत्र महागिरिः ॥ ८२ यक्षराक्षसगंधर्वैर्नित्यसेवितकंदरः ॥ हेमगर्भो महाशैलस्तथा हेमसखो गिरिः ॥ ८३॥ कैलासश्चैव शैलेंद्रो दानवेंद्रेण कंपिताः ॥

अर्थ- त्याच प्रमाणें महा सेन गिरि, पारियात्र पर्वत, पर्वत श्रेष्ठ चक्रवान् व वाराह हे पर्वत, विशाल नेत्र, अजिंक व मेघा सारख्या गंभीर शब्दानें युक्त असा दुष्ट बुद्धि नरकासुर जेथें रहातो; तें प्राग्ज्योतिष पुर सुवर्ण मय असून शुभ कारक आहे. ब्राह्मण हो त्या पुरा समोंवतींल प्रदेशांत साठ हजार पर्वत आहेत; आणि तेथें तरुण सूर्या सारखा तेजोमय महान् मेरु पर्वत आहे; त्याच्या गुहांत यक्ष, राक्षस व गंधर्व हे निरंतर वास करितात; तसाच हेमगर्भ नामें महा पर्वत, हेम सख व पर्वत श्रेष्ठ कैलास हीं सर्व स्थानें त्या दैत्यराज हिरण्य कशिपूनें त्या रागाच्या वेळेस हालविलीं.

हेमपुष्परसस्रोत्रं तेन वैखानसंसरः ॥ ८४॥ कंपितं मानसं चैव हंसकारंडवाकुलं ॥

अर्थ- तसेंच सोन चांफ्याच्या रसाचें स्रोत्र रूप वैखानस नांवाचें सरोव

र व हंस व कारंडव या पक्ष्यांनीं व्याप्त मानस सरोवर हीं दोनी त्या दैत्या-नें हालविलीं.

त्रिशृंगपर्वतश्चैव कुमारी च सरिद्वरा ॥ ८५ ॥ तुषारच यसंछन्ना मंदरश्चापि पर्वतः ॥ उशीर बिंदुश्च गिरिश्चंद्रप्रस्थस्तथाद्रिराट् ॥ ८६ ॥ प्रजापतिगिरिश्चैव तथा पुष्करपर्वतः ॥ देवाभ्र पर्वतश्चैव तथा वै रेणुको गिरिः ॥ ८७ ॥ क्रौंचः सप्तर्षिशैलश्च धूम्रवर्णश्च पर्वतः ॥ एते चान्ये च गिरयो देशा जनपदास्तथा ॥ ८८ ॥ नद्यः ससागराः सर्वाः सोकंपयत दानवः

अर्थ— आणि त्रिशृंगपर्वत, जी पासून सभोंवतीं सर्वत्र तुषारांचे समुदाय उडत आहेत अशी कुमारी महानदी, मंदार उशीर बिंदु, चंद्रप्रस्थ, पर्वतराज प्रजापति गिरि, पुष्कर, देवाभ्र, रेणुक, सात ऋषींचा क्रौंच पर्वत व धूम्र वर्ण हे व यांहून इतर पर्वत, देश, प्रांत, सर्व नद्या व समुद्र या सर्वांस त्या कालीं हिरण्यकशिपूनें हालविले.

कपिलश्च महीपुत्रो व्याघ्रवांश्चैव कंपितः ॥ ८९ ॥ खेचराश्च सतीपुत्राः पातालतलवासिनः ॥ गणस्तथा परो रौद्रो मेघनामांकुशायुधः ॥ ९० ॥ ऊर्ध्वगो भीमवेगश्च सर्व एवाभिकंपिताः ॥

अर्थ— तसेंच कपिल, पृथ्वीपुत्र व्याघ्रवान्, पार्वतीनें पुत्रत्वें करून मानलेले आकाशांत संचार करणारे, पाताळाचे तळीं राहणारे, तसाच अंकुश आयुध धारण करणारा भयंकर मेघ नामा दुसरा गण, ऊर्ध्वभागीं गमन करणारा गण व भयंकर वेगयुक्त गण हे सर्वही त्या हिरण्यकशिपूनें पृथ्वी धरल्यामुळें कंपित जाहले.

गदी शूली करालश्च हिरण्यकशिपुस्तदा ॥ ९१ ॥ जीमूतघनसंकाशो जीमूतघननिस्वनः ॥ जीमूतघननिर्घोषो जीमूत इव वेगवान् ॥ ९२ ॥ देवारिर्दितिजो वीरो नृसिंहं समुपाद्रवत् ॥

अर्थ— नंतर शरीरानें जीमूत नामक मेघासारखा कृष्ण वर्ण असून-

त्याच मेघासमान शब्दानें युक्त, त्या मेघासारखीच गर्जना करणारा व त्या-मेघा प्रमाणेंच वेगवान् असून देवांचा शत्रु असा भयंकर तोवीर हिरण्यकशिपु दैत्य त्या कालीं गदा वशूल हातांत घेऊन नृसिंहावर धांवला.

समुत्पत्य ततस्तीक्ष्णैर्मृगेंद्रेण महानखैः ॥ ९३ ॥ नदीं कार सहायेन विदार्य निहतो युधि ॥

अर्थ- तेव्हां प्रणव देवतेसहित नृसिंहानें त्या युद्धांत उड्डाण करून आपले अति तीक्ष्ण मोठ्या नखांनीं हिरण्यकशिपूचें विदारण करून त्यास मारिलें.

महीच कालश्च शशीनभश्च ग्रहाश्च सूर्यश्च दिशश्च सर्वाः ॥ नद्यश्च शैलाश्च महार्णवाश्च गताः प्रसादं दितिपुत्रनाशात् ॥ ९४ ॥

अर्थ- ते समयीं पृथ्वी, काल, चंद्र, आकाश, गुरु, शुक्रादिक ग्रह, सूर्य, दशदिशा, सर्व नद्या, पर्वत, संपूर्ण महासमुद्र, हे त्या हिरण्यकशिपु दैत्याच्या नाशानें परमानंद पावले.

ततः प्रमुदिता देवा ऋषयश्च तपोधनाः ॥ तुष्टुवुर्नामभिर्दिव्यैरादिदेवं सनातनं ॥ ९५ ॥

अर्थ- नंतर सर्व देव व तपोधन ऋषि हे अत्यंत संतुष्ट होऊन उत्कृष्ट नामांनीं वेदवर्णित आदिदेव नृसिंव्हाची स्तुती करूं लागले.

यत्त्वया विहितं देव नारसिंहमिदं वपुः ॥ एतदेवार्चयिष्यंति परावरविदो जनाः ॥ ९६ ॥

अर्थ- कीं, हे देवा आपण हें नारसिंह अद्भुत रूप प्रगट केलें आहे तर आतां सारासार ज्ञाने सर्व लोक या रूपाची पूजा करितील.

ब्रह्मोवाच ॥ भवान् ब्रह्मा च रुद्रश्च महेंद्रो देवसत्तमः ॥ भवान्कर्ता विकर्ता च लोकानां प्रभवाप्ययः ॥ ९७ ॥

अर्थ- नंतर ब्रह्मदेव नारसिंहाची स्तुति करितात कीं, हे भगवन् देवश्रेष्ठ ब्रह्मदेव, शिव, व इंद्र हे तूंच असून मुख्य स्वतंत्र व विचित्र सर्वरूपांचा कर्ता आहेस आणि सर्व लोकांची उत्पती व प्रलय करणारा तूंच आहेस.

परांचसिद्धिंचपरंचदेवंपरंचमंत्रंपरमंहविश्च ॥ परं चधर्मंपरमंचविश्वंत्वामाहुरग्र्यंपुरुषंपुराणं ॥ ९८

अर्थः- त्याच प्रमाणें उत्तमसिद्धि, श्रेष्ठ देव, उत्कृष्टमंत्र, शुद्ध होमद्रव्य, महान् धर्म व सुंदर चराचर विश्व व श्रेष्ठ पुराण पुरुष असें सर्व देव, ऋषी तुला ह्मणतात.

परंशरीरंपरमंचब्रह्म परंचयोगं परमांचवाणीं ॥ परंरहस्यं परमांगतिंच त्वांमाहुरग्र्यं पुरुषंपुराणं ॥ ९९ ॥

अर्थः- आणि निर्दोष देह, मायातीत ब्रह्म, उत्कृष्ट योग, मधुर वाणी, परम रहस्य, व उत्तम मोक्षादिक गति, प्रमुख अनादि पुरुष असें सर्व साधू योगी हे सर्व तूच आहेस असें तुलाच मानतात.

एवंपरस्यापिपरंपदंयत् परंपरस्यापिपरंचदेवं ॥ परंपरस्यापिपरंचभूतं त्वामाहुरग्र्यंपुरुषंपुराणं ॥ १००

अर्थः- तसेंच मुक्त व महालक्ष्मी यांचें सर्व गुण संपन्न उत्कृष्ट स्थान ब्रह्मदेवाचें उत्कृष्ट दैवत, सर्व जगपालकांचें ही संरक्षण करणारें व महत्-भूत, मुख्य, पुराण पुरुष असें सर्व ज्ञानी तुलाच ह्मणतात.

परंपरस्यापिपरंनिधानंपरंपरस्यापिपरंपवित्रं ॥ परंपरस्यापिपरंचदांतं त्वामाहुरग्र्यंपुरुषंपुराणं ॥ १०१

अर्थः- आणि परंपरेनें चाललेल्या या अनादि जगाचें मूलस्थान, जगांत तीर्थादि पवित्र पदार्थांहून अति पवित्र असून त्यांस ही पवित्र करणारा व साधूंच्या शत्रूंचा निग्रह करणारा असें सर्व ब्रह्मनिष्ठ हे अनादि प्रधान पुरुष तुलाच मानतात.

एवमुक्त्वातुभगवान्सर्वलोकपितामहः ॥ स्तुत्वानारायणंदेवंब्रह्मलोकंगतः प्रभुः ॥ १०२ ॥

अर्थः- अशी त्या नृसिंह रूपी नारायणाची स्तुति करून सर्व लोकांचे पितामह समर्थ ब्रह्मदेव सत्य लोकास गेले.

ततोनदत्सुतूर्येषुनृत्यंतीष्वप्सरस्सुच ॥ क्षीरोदस्योत्तरंकूलंजगामहरिरीश्वरः ॥ १०३ ॥ नारसिंहंवपुर्देवः

स्थापयित्वासुदीप्तिमत्॥ पौराणंरूपमास्थायप्रय
यौगरुडध्वजः॥१०४॥ अष्टचक्रेणयानेनभूतयुक्ते
नभास्वता॥ अव्यक्तप्रकृतिर्देवः स्वस्थानंगतवान्
प्रभुः॥१०५॥

अर्थः– नंतर अनेक वाद्यें वाजत असतां, व अप्सरा नृत्य करीत असतां, गरुड चिन्ह युक्त रथानें सुशोभित, अस्पष्ट स्वभावानें युक्त सर्वेश्वर भक्तांचीं संकटें दूर करणारा प्रभु नारसिंह देव आपलें तें उत्तम देदीप्यमान नरहरी रूप तेथें स्थापन करून पुरातन मूळ रूपानें आठचक्रें व पंचमहाभूतें यानीं युक्त अशा तेजोमय रथांत बसून क्षीर समुद्राच्या उत्तरतीरीं स्वस्थानास गेला. इति श्री मत्स्यपुराणें नारसिंह प्रादुर्भावे द्विषष्ट्युत्तर शततमो ध्यायः ॥१६२॥

अध्याय १६३वा.

ऋषयऊचुः॥ कथितंनरसिंहस्यमाहात्म्यंविस्तरेणच॥
पुनस्तस्यैवमाहात्म्यमन्यद्विस्तरतोवद॥१॥

अर्थः– शौनकादिक ऋषि ह्मणतात हे सूता त्वां नरसिंहाचें माहात्म्य विस्तारानें सांगितलें; तरीं पुनः त्या नृसिंव्हाव तार विष्णूचाच महिमा तूं आह्मास कथन कर.

पद्यरूपमभूदेतत्कथंहेममयंजगत्॥ कथंचवैष्णा
वीसृष्टिः पद्ममध्येभवत्पुरा॥२॥

अर्थः– तो असा कीं, पूर्वीं चवदा लोकांच्याआकृतीनें युक्त असून सोन्याचें हें कमल कसें जाहलें व ही सृष्टी विष्णूपासून या चतुर्दश भुवनरूप कमलांत कशी उत्पन्न जाहली?

सूतउवाच॥ श्रुत्वाचनरसिंहस्यमाहात्म्यंरविनंदनः॥
विस्मयोत्फुल्लनयनः पुनःपप्रच्छकेशवं॥३॥

अर्थः– नंतर सूत बोलतात कीं, मुनीहो सूर्यपुत्र वैवस्वत मनु हें नारसिंहाचें अद्भुत माहात्म्य ऐकून आश्चर्य वाटल्या मुळें नेत्र प्रफुल्लित करून पुनः त्याच देवाचें माहात्म्य मत्स्य रूपी भगवंतास विचारितो.

मनुरुवाच॥ कथंपाद्मेमहाकल्पेतवपद्ममयंजगत्॥

जलार्णवगतस्येह नाभौ जातं जनार्दन ॥ ४ ॥ प्रभावा-
त्पद्मनाभस्य स्वपतः सागरांभसि ॥

अर्थ- कीं हे जनार्दना पूर्वी पाद्मनामक मोठ्या आदिकल्पांत प्रलय समुद्रा च्या उदकावर शयन करणारा पद्मनाभ रूपी जो तूं तुझ्या प्रभावानें सर्वजगास आधार भूत चतुर्दश लोक रूप कमल तुझ्या नाभि स्थानीं कसें उत्पन्न जाहलें.

पुष्करेच कथं भूता देवाः सर्षिगणाः पुरा ॥ ५ ॥ एनमा-
ख्याहि निखिलं योगं योगविदां पते ॥ शृण्वतस्तस्य मे की
र्तिं न तृप्तिरुपजायते ॥ ६ ॥

अर्थ- तसेच ऋषिगणां सहित सर्व देव पूर्वी या लोकरूप कमलांत कसे उत्पन्न जाहले ही समग्र कथा संगती तुह्मीं संपूर्ण योगाचे ज्ञाते आहांत ह्म-णूनच मला सांगा; कारण त्या नारायणाची कीर्ती किती ही श्रवण केली तरीं याविषयीं माझी तृप्ती होत नाहीं.

कियतां चैव कालेन शेते वै पुरुषोत्तमः ॥ कियंतं वा स्वपि
ति च कोऽस्य कालस्य संभवः ॥ ७ ॥

अर्थ- आणि अशी सृष्टी करून मग किती कालानें पुरुष श्रेष्ठ भगवान् निद्रा करितो, तो किती काल पर्यंत निद्रेंत असतो; व या कालाचा नियंता कोण आहे.

कियता वाथ कालेनाप्युत्तिष्ठति महायशाः । कथं चोत्था
य भगवान् सृजते निखिलं जगत् ॥ ८

अर्थ- नंतर तो महायशस्वी भगवान् किती कालानें निद्रेंतून उठतो; आणि उठल्यावर तो नारायण हें सर्व चराचर जग कसें निर्माण करितो.

के प्रजापतयस्तावदासन् पूर्वं महामुने ॥ कथं निर्मित
वांश्चैव चित्रं लोकं सनातनं ॥ ९ ॥

अर्थ- हे महा मनन शीला सूता पूर्वी प्रजापति (प्रजा उत्पन्न करणारे) कोण होते; व ईश्वरानें हें चित्र विचित्र जग कसें निर्माण केलें.

प्रथमेकार्णवे शून्ये नष्टस्थावरजंगमे ॥ दग्धदेवासुरन
रे प्रनष्टोरगराक्षसे ॥ १० ॥ नष्टानिलानले लोके नष्ट-

काशमहीनले ॥ केवलंगव्हरीभूतेमहाभूतविपर्यये॥
११॥ विभ्रुर्महाभूतपतिर्महातेजा महाकृतिः ॥आस्ते-
श्वरवरश्रेष्ठोविधिमास्थाययोगवित्॥ १२॥ शृणुयांप-
रयाभक्त्या ब्रह्मन्नेतदशेषतः॥ वक्तुमर्हसिधर्मिष्ठय-
शोनारायणात्मकं ॥१३॥ श्रद्धयाचोपविष्टानांभगव-
न्वक्तुमर्हसि॥

अर्थ- तसेंच देव, असुर, व मानव हे दग्ध होऊन नाग, राक्षस, वायु, अग्नि, आकाश पृथ्वी पशु, पक्षी व वृक्ष, पाषाणादिक या सर्वांचा नाश होऊन पंचम हा भूतांचा व्यंक्रमानें लय झाल्यावर सर्वत्र केवळ अंधकार मय शून्य व एकच प्रलय समुद्र रूप सर्वलोक जाहला असतां, महाभूतांचा रक्षक, आकृतीनें मोठा, सर्वव्यापक, सर्व श्रेष्ठ देवांत उत्तम, व सृष्ट्या दिकांचे संपूर्ण उपाय जाणणारा असा भगवान् जगदीश्वर सृष्टिकाला दिकांची स्थिती मनांत आणून त्याकाळीं प्रलय समुद्रावर निद्रा करून असतो; त्या नारायणाचें यश मी अतिभक्तीनें श्रवण करण्या विषयीं इच्छितों, तस्मात् हे ऐश्वर्य संपन्ना धार्मिष्ठा ज्ञानादि गुण पूर्णा सूता श्रवणार्थ आस्तिक्यंबुद्धीनें बसलेल्या सर्वऋषींस तूं सर्व सांगण्यास योग्य आहेस.

मत्स्यउवाच ॥ नारायणस्ययशसः श्रवणेयातवस्पृ
हा॥ १४॥ तद्वंश्यान्वयभूतस्यन्याय्यंरविकुलर्षभः॥

अर्थ- तेव्हां मत्स्यरूपी भगवान् बोलले कीं, हे सूर्यवंश श्रेष्ठ मनुराजा तूं सूर्यवंशांतील राजांच्या कुळांत उत्पन्न जाहला आहेस यास्तव तुला नारायणाचें यश श्रवण करण्याची इच्छा झाली हें युक्तच आहे.

शृणुष्वादिपुराणेषुवेदेभ्यश्चयथाश्रुतं॥१५॥ ब्राह्मणा
नांचवदतांश्रुत्वावैसुमहात्मनां॥यथाचतपसादृष्वा-
बृहस्पतिसमद्युतिः॥१६॥ पराशरसुतःश्रीमान्गुरुर्द्वै
पायनोब्रवीत्॥

अर्थ- तर हे राजा आतां आदिपुराणें व वेद यांत जें श्रवण केलें तसेंच ज्ञान वृद्धां पासून श्रवण करून किंवा तपोबलानें स्वतः वेदार्थ पाहून भाषण करणाऱ्या महा बुद्धिमंत ब्राह्मणां पासून ऐकलेलें; आणि बृहस्पती सारख्या बु-

द्धिप्रकाशानें युक्त, पराशर पुत्र, श्रीमान् व जगद्गुरू अशा वेदव्यासानें जें सांगितलें.

ततोहं कथयिष्यामि यथाशक्ति यथाश्रुति ॥ १७ ॥ यद्धि ज्ञातुं मया शक्य मृषिमात्रेण सत्तमाः ॥

अर्थ— तें तुला सांगतों; तसेंच सूत म्हणतात श्रेष्ठ मुनीहो म्या आपल्या ऋषि योग्यतेच्या ज्ञानानुसार जाणण्यास जें योग्य आहे; तें मी तुह्मास श्रवण केल्याप्रमाणें यथाशक्ति सांगतों.

कः समुत्सहते ज्ञातुं परं नारायणात्मकं ॥ १८ ॥ विश्वायनश्चयद्ब्रह्मा न वेदयति तत्वतः ॥

अर्थ— कारण नारायण स्वरूप परब्रह्मास जाणण्या विषयीं कोण समर्थ आहे; यास प्रमाण हेंच कीं, सर्व चराचर विश्वाचा आश्रय ब्रह्मदेव ही त्या नारायणास सर्वांशानें जाणण्यास समर्थ नाहीं.

तत्कर्म विश्ववेदानां तद्रहस्यं महर्षिणां ॥ १९ ॥ तमीज्यं सर्वयज्ञानां तत्तत्वं सर्वदर्शिनां ॥ तदध्यात्मविदांचिंत्यं नरकं च विकर्मिणां ॥ २० ॥ अधिदैवं च यद्दैवमधियज्ञं सुसंज्ञितं ॥ तद्भूतमधिभूतं च तत्परं परमर्षिणां ॥ २१ ॥ स यज्ञो वेदनिर्दिष्टस्तत्तपः कवयो विदुः ॥

अर्थ— तो नारायण असा कीं, सर्व वेदानीं सांगितलेलें कर्म, मोठमोठ्या ऋषींचें रहस्य, संपूर्ण यज्ञांत अग्रपूजेस योग्य, सर्वज्ञांचें मुख्य तत्व, वेदांत ज्ञानसंपन्नांच्या चिंतनास योग्य, शास्त्र विरुद्ध कर्म करणारांस नरकगति देणारें, सर्वदेवांचें मुख्य दैवत, समग्र यज्ञांत प्रमुख यज्ञनामानें प्रसिद्ध, सकल भूतांत महद्भूत, श्रेष्ठ ऋषींचें उत्तम आश्रय स्थान, वेदोक्त शुद्ध सात्विक अहिंसा यज्ञ उत्कृष्ट तप असें सर्व प्रकारें ज्ञानी नारायणासच जाणतात.

यः कर्ता कारको बुद्धिर्मनः क्षेत्रज्ञ एव च ॥ २२ ॥ प्रणवः पुरुषः शास्ता एकश्चेति विभाव्यते ॥ प्राणः पंचविधश्चैव ध्रुव अक्षर एव च ॥ २३ ॥ कालः शाकश्च यंता च द्रष्टा स्वाध्याय एव च ॥ उच्यते विविधैर्देवः स एवायं न तत्परम् ॥ २४ ॥ स एव भगवान् सर्वं करोति विकरोति च ॥

सोऽस्मान्कारयते सर्वान् सोऽत्येति व्याकुलीकृतान् ॥ २५

अर्थ- आणि जो सर्वांचा स्वतंत्र कर्ता, सकल क्रियांस मुख्य कारण, बुद्धि, मन, पिंड व ब्रह्मांड हीं क्षेत्रें जाणणारा, प्रणव देवता, सर्वदेहपुरींत नियंतेपणानें वास करणारा ह्मणूनच सर्वांचा एकच मुख्य शासन करणारा तो नारायणच आहे असें सर्व पूर्वजानीं मानलें आहे; तसेंच प्राण, अपान, व्यान, उदान व समान, हे पांच प्राण, ध्रुव, आदि पुरुष, काल, सर्व कार्यांचें मुख्य कारण, सर्वनियामक, संपूर्णांस साक्षात् पहाणारा, स्वाध्याय इत्यादि अनेक नामानीं वेदांत नारायणच वर्णिला आहे; ह्मणूनच त्यापेक्षां उत्तम कोणीही नाहीं; तस्मात् तो षड्गुणैश्वर्यसंपन्न नारायणच स्वातंत्र्यानें हें नाना प्रकारचें जग उत्पन्न करून आह्मा कडून ही योग्यतानुसार व्यापार करवून तो देव आपले माहात्म्यामुळें कर्म बंधानें व्याकुल होणारे जे आह्मीं त्यांचें अतिक्रमण करून राहतो.

यतामहे तमेवाद्यं तमेवेच्छाम निर्वृताः ॥ यो वक्ता यच्च वक्तव्यं यच्चाहं तद्ब्रवीमि वः ॥ २६ ॥ श्रूयते यच्च वै श्राव्यं यच्चान्यत्परिजल्प्यते ॥ याः कथाश्चैव वर्तन्ते श्रुतयो ऽथाय तत्पराः ॥ २७ ॥ विश्वं विश्वपतिर्यश्च स तु नारायणः स्मृतः ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो वक्ता, जें बोलण्यास योग्य, जें मी तुम्हांस सांगतों, जें श्रोत्यानीं ऐकिलें जातें, जें श्रवण करण्यास योग्य, लोक जें कांहीं अवांतर बोलतात; पुराणादिकांतल्या कथा व सर्व श्रुति ज्या आहेत; त्या नारायणाचेंच मुख्यत्वें वर्णन करितात; आणि संपूर्ण चराचर विश्व व याचें संरक्षण करणारा तो नारायणच आहे; त्यावांचून दुसरा कोणी ही नाहीं.

यत्सत्यं यदमृतमक्षरं परं यद्यद्भूतं परममिदं च यद्भविष्यत् ॥ यत्किंचिच्चरमचरं यदस्ति चान्यत् तत्सर्वं पुरुषवरः प्रभुः पुराणः ॥ २८ ॥

अर्थ- तस्मात् जें सत्य, जें मरण रहित मोक्षस्थान, क्षयं रहित, उत्कृष्ट जें भूत, भविष्य व वर्तमान, आणि जें कांहीं सर्व चराचर जगत् याहून ही जें अवांतर वस्तुमात्र तें सर्वही पुराण पुरुषोत्तम प्रभु नारायणच आहे असें जाणावें. इति श्री मत्स्यपुराणे पद्मोद्भव प्रादुर्भावे त्रिषष्ट्युत्तर शततमोऽध्यायः १६३

अध्याय १६५ वा.

मत्स्यउवाच ॥ चत्वार्याहुः सहस्राणिवर्षाणांतुकृतं
युगं ॥ तस्यतावच्छतीसंध्याद्विगुणारविनंदन ॥ १ ॥

अर्थ— नंतर भगवान् मत्स्य बोलले हे सूर्यपुत्रा मनुराजा कृतयुगाचें मान चार हजार वर्षे असून त्याचा संधिकाल आठशें वर्षे आहे; असें पुरातन ज्ञाने लोक ह्मणतात.

यत्रधर्मश्चतुष्पादस्त्वधर्मः पादविग्रहः स्वधर्मनिरताः
संतोजायंतेयत्रमानवाः ॥ २ ॥

अर्थ— त्या कृतयुगांत धर्म, चार अंशानीं पूर्ण असून अधर्मही एक अंश असतो; आणि त्या कालीं सर्वमानव स्वधर्मांत तत्पर असून साधुवृत्तीनें वर्ततात.

विप्रास्थिताधर्मपराराजवृत्तौस्थितानृपाः ॥ कृष्या-
मभिरतावैश्याः शूद्राः शुश्रूषवस्थिताः ॥ ३ ॥

अर्थ— तें असें कीं, ब्राह्मण स्वधर्मनिष्ठ असून क्षत्रिय राजवृत्तींत असतात तसेच वैश्य शेतकींत आसक्त असून ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य यांची सेवा करून शूद्र वर्ततात.

तदासत्यंचशौचंचधर्मश्चैवविवर्धते ॥ सद्भिराचरि
तंकर्मक्रियतेख्यायतेचवै ॥ ४ ॥

अर्थ— त्या कालांत सत्य, देह व मन यांची शुद्धि तसाच धर्म, हीं उत्तरोत्तर वृद्धिंगत होतात; आणि साधूनींच आचरण केलेलें कर्म इतर लोक करतात; व तेंच लोकांस उपदेश द्वारा सांगण्यांत येतें.

एतत्कार्तयुगंवृत्तंसर्वेषामपिपार्थिव ॥ प्राणिनांध
र्मसंगानामपिवैनीचजन्मनां ॥ ५ ॥

अर्थ— हे राजा, त्या कृतयुगांत कोणी नीच कुलांत उत्पन्न झाले असले तरी त्या धर्मनिष्ठ सर्वप्राणिमात्रांचें असें आचरण असतें.

त्रीणिवर्षसहस्राणित्रेतायुगमिहोच्यते ॥ तस्यताव
च्छतीसंध्याद्विगुणापरिकीर्त्यते ॥ ६ ॥

अर्थ— तसेच त्रेतायुगाचें प्रमाण तीन हजार वर्षे असून त्याचा संधिका

ल सहाशें वर्षे आहे.

द्वाभ्यामधर्मः पादाभ्यांत्रिभिर्धर्मोव्यवस्थितः॥ यत्र
सत्यंचसत्वंच त्रेताधर्मोविधीयते॥ ७

अर्थ- त्रेतायुगांत दोन अंशानीं अधर्म व तीन अंश सहित धर्म असे असे
तात; आणि त्या कालांत सत्य व धैर्य हे धर्म असतात.

त्रेतायांविकृतिंयांतिवर्णास्त्वेतेनसंशयः॥ चतुर्वर्ण
स्यवैकृत्याद्यांतिदौर्बल्यमाश्रमाः॥ ८॥

अर्थ- तसेच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण त्रेतायुगांत कांहीं स्व
धर्म विरुद्ध वागतात त्यामुळें ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास या चा
री आश्रमांतील धर्म दुर्बलपणें चालतात.

एषात्रेतायुगगतिर्विचित्रादेवनिर्मिता॥ द्वापरस्य
तुयाचेष्टातामपिश्रोतुमर्हसि॥ ९॥

अर्थ- हे राजा, त्रेतायुगांतील अशी चमत्कारिक स्थिती देवानें निर्माण के
लेली आहे; आतां तूं द्वापर युगाची स्थिति श्रवण करण्यास योग्य आहेस.

द्वापरंद्वेसहस्त्रेतुवर्षाणांरविनंदन॥ तस्यतावच्छती-
संध्याद्विगुणायुगमुच्यते॥ १०

अर्थ- हे सूर्यनंदना, द्वापर युगाचें प्रमाण दोन हजार वर्षे असून त्याचा सं
धिकाल चारशें वर्षे आहे.

तत्रचार्थपराः सर्वेप्राणिनोरजसाहताः॥ सर्वेनैष्कृ
तिकाः क्षुद्राजायंतेरविनंदन॥ ११

अर्थ- त्या द्वापर युगांतील प्रायः सर्व लोक रजोगुणानें व्याप्त असल्यामु
ळें द्रव्या विषयीं आसक्त असून ते लोक कपटी व स्वभावानें क्षुद्र असे होतात.

द्वाभ्यांधर्मः स्थितः पद्भ्यामधर्मस्त्रिभिरुत्थितः॥ वि
पर्ययाच्छनैर्धर्मः क्षयमेति कलौयुगे॥ १२

अर्थ- द्वापर युगांत दोन अंश सहित धर्म असून अधर्म तीन अंशानीं प्रवृ
त्त होतो; पुढें तो धर्म द्वापर युगाचे अंतीं कलियुगांत विपर्यासानें हळू हळू ना
श पावतो.

ब्राह्मण्यभावस्यततो तथौत्सुक्यंव्यशीर्यते॥ व्रतोप

वासास्त्यज्यंतेद्वापरेयुगपर्यये ॥ १३

अर्थ- असें द्वापर युग समाप्त झालें असतां; नंतर लोकांची ब्राह्मण्या विषयीं उत्सुकता मोडून ते लोक व्रतें व उपवास यांचा त्याग करितात.

तथावर्षसहस्त्रंतुवर्षाणांद्वेशतेअपि ॥ संध्ययासहस्रं ख्यातंक्रूरंकलियुगंस्मृतं ॥ १४

अर्थ- असें हें कलियुग अत्यंत घोर आहे; याची संख्या एक सहस्त्र वर्षें असून याचा संधिकाल दोन शें वर्षें आहे.

यत्राधर्मश्चतुष्पादःस्याद्धर्मःपादविग्रहः ॥ कामिन स्तपसाछन्नाजायंतेतत्रमानवाः ॥ १५

अर्थ- त्या कलियुगांत धर्म, एक अंश असून अधर्म चार अंशानीं पूर्ण असतो; आणि त्याकाळीं कितीएक मानव स्वतः विषयी असून ते बाह्यात्कारें तपस्वि वेषानें झांकलेले असे होतात.

नैवावसानिकः कश्चिन्नसाधुर्नचसत्यवाक् ॥ नास्तिकाब्रह्मभक्तावाजायंतेतत्रमानवाः ॥ १६

अर्थ- आणि कलियुगांत कोणीही सत्कर्माच्या पूर्णतेस पावत नाहीं; तसाच कोणी साधु व सत्यवादी असत नाहीं; आणि नास्तिक व ब्राह्मण भक्ति न करणारे असे मनुष्य प्रायः होतात.

अहंकारगृहीताश्चप्रक्षीणस्नेहबंधनाः विप्राःशूद्रसमाचाराःसंतिसर्वेकलौयुगे ॥ १७

अर्थ- तसेच त्या कलियुगांत बहुत करून सर्व लोक अहंकारानें व्याप्त असून त्याचा स्नेह संबंध ही अतिशयें क्षीणच असतो आणि सर्व ब्राह्मण, आपला सदाचार सोडून शूद्रांच्या आचाराविषयीं तत्पर होतात.

आश्रमाणांविपर्यासः कलौसंपरिवर्तते ॥ वर्णानांचैव संदेहोयुगांतेरविनंदन ॥ १८

अर्थ- हे सूर्यकुमारा, कलियुगांत ब्रह्मचर्यादिक आश्रमांचा व्यत्यास होऊन कलीच्या अंतीं तर ब्राह्मणादिक वर्णांचाहि संदेह होतो.

विद्याद्द्वादशसाहस्त्रीं युगाख्यां पूर्वनिर्मितां ॥ एवंसहस्त्रपर्यंतंतदहोब्राह्ममुच्यते ॥ १९

अर्थः- याप्रमाणें कृतादि चारयुगांचें मिळून बाराहजार वर्षांनें हें एक महायुग पूर्वीपासून चालत आलें; (त्यास लोक चौकडी ह्मणतात) अशा हजार चौकड्या झाल्या ह्मणजे तो ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो.

ततोहनिगते तस्मिन् सर्वेषामेवजीविनां ॥ शरीरनिर्वृत्तिं दृष्ट्वा लोकसंहारबुद्धितः ॥२०॥ देवतानांच सर्वासांब्रह्मादीनां महीपते ॥ दैत्यानां दानवानांच यक्षराक्षसपक्षिणां ॥२१॥ गंधर्वाणामप्सरसां भुजंगानांचपार्थिव ॥ पर्वतानां नदीनांच पशूनां चैवसत्तम ॥२२॥ तिर्यग्योनिगतानांच सत्वानां कृमिणां तथा ॥ महाभूतपतिः पंचत्वाभूतानि भूतकृत् ॥२३॥ जगत्संहरणार्थाय कुरुते वैशसंमहत् ॥

अर्थः- हे पृथ्वीपते नंतर तो ब्रह्मदेवाचा दिवस गेल्यावर ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेले सर्व देव, दैत्य, दानव, यक्ष, राक्षस, पक्षी, गंधर्व, अप्सरा, सर्प, पर्वत, नद्या, गायी आदिकरून पशु, यांहून इतर अज्ञान योनींत उत्पन्न जाहलेले सिंह, व्याघ्रादिक प्राणि व अनेक प्रकारचे कृमि इत्यादिक सर्व प्राणिमात्रांची नश्वर शरीर संबधि क्षणिक सुखाविषयीं आसक्ती पाहून त्या लोकांचा संहार करण्याच्या बुद्धीनें सर्व महाभूतांचा अधिपति असून संपूर्ण चराचर प्राणिमात्रांस उत्पन्न करणारा जगदीश्वर याविश्वाचा प्रलय होण्यासाठीं पृथिवी आदिकरून पंचभूतांचें हरण करून सर्वजगाचा मोठा नाश करितो.

भूत्वासूर्यश्चक्षुषीच्चादृदानो भूत्वावायुः प्राणिनां प्राणजालं ॥ भूत्वावन्हि र्निर्दहन् सर्वलोकान् भूत्वामेघो भूयउग्रोप्यवर्षत् ॥२४॥

अर्थः- तें असें कीं, आपण सूर्य व वायु होऊन प्राणिमात्रांचे नेत्र व प्राणसमुदाय यांचें आकर्षण करून पश्चात् अग्नि रूपानें सर्वलोकांचें भस्म केल्यावर आपणच उग्रमेघाचे रूपानें बहुत पर्जन्यवृष्टि करितो. इतिश्री मत्स्यपुराणे पद्मोद्भव प्रादुर्भावे चतुःषष्ठ्युत्तरशततमो ध्यायः ॥ १६४

अध्याय १६५ ॥

मत्स्यउवाच ॥ भूत्वानारायणोयोगीसत्वमूर्तिर्विभा

वस्कः ॥ गभस्तिभिः प्रदीप्ताभिः संशोषयतिसागरान्
॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् ह्मणतात हे मनुराजा, मग योगिश्रेष्ठ रुद्रस्वरूपी नारायण सूर्य होऊन आपल्या अतितीक्ष्ण किरणानीं सर्व समुद्रांचें शोषण करितो.

ततः पीत्वार्णवान्सर्वान्नदीः कूपांश्चसर्वशः ॥ पर्वतानांच सलिलं सर्वमादाय रश्मिभिः ॥ २ ॥ भित्वागभस्तिभिश्चैव महींगत्वा रसातलात् ॥ पातालजलमादाय पिबन्रसमुत्तमं ॥ ३ ॥ मूत्रासृक्क्लेद मन्यच्च यदस्तिप्राणिषुध्रुवम् ॥ तत्सर्वमरविंदाक्ष आदत्ते पुरुषोत्तमः
॥ ४ ॥

अर्थ- नंतर तो कमलनयन पुरुषश्रेष्ठ विष्णुरूप सूर्य आपले सर्व समुद्र, नद्या, आड, विहिरी, पर्वत यांचें सर्व उदक शोषून पश्चात् त्या किरणानीं पृथ्वीचा भेद करून रसातला खालीं जाऊन पातालांतील उत्तम रसयुक्त उदक प्राशन करितो; आणि मूत्र, रक्त, घाम व यांहून इतर जे धातु, उपधातु प्राणिमात्रांच्या शरीरांत आहेत तें सर्व तो सूर्य नियमानें शोषून घेतो.

वायुश्च भगवान् भूत्वा विधुन्वानोखिलंजगत् ॥ प्राणापानसमानाद्यान् वायूनाकर्षतेहरिः ॥ ५ ॥

अर्थ- तसाच भगवान् विष्णु आपणाच बलाढ्य वायू होऊन त्या रूपानें संपूर्ण चराचर जग कंपित करून सर्व शरीरांतील प्राण, अपान व समान इत्यादिक अनेक वायूंचें आकर्षण करितो.

ततोदेवगणाः सर्वेभूतान्येवचयानितु ॥ गंधोघ्राणंशरीरंच पृथिवींसंश्रिता गुणाः ॥ ६ ॥

अर्थ- नंतर सर्वदेवगण व इतर प्राणिमात्र, पदार्थमात्रांचा सुगंध, नासिकाइंद्रिय व शरीर हे गुण पृथ्वीच्या आश्रयानें राहतात.

जिव्हारसश्चस्नेहश्च संश्रिताः सलिलेगुणाः ॥ रूपंचक्षुर्विपाकश्चज्योतिरेवाश्रितागुणाः ॥ ७

अर्थ- आणि जिव्हा इंद्रिय, पदार्थांतील मधुर आदिकरून रस, तूप, तेल इ-

त्यादिक स्निग्ध पदार्थ हे गुण उदकाचा आश्रय करून रहातात. तसेंच रूप, नेत्र इंद्रिय, सर्व पदार्थांचा परिणाम करणारें तेज, हे गुण महाभूत तेजाच्या आश्रयानें रहातात.

स्पर्शः प्राणश्च चेष्टा च पवने संश्रिता गुणाः ॥ शब्दः श्रोत्रं च खान्येव गगने संश्रिता गुणाः ॥ ८ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें स्पर्श, प्राण व चलन वलनादिक व्यापार हे गुण वायूच्या आश्रयानें असतात; आणि शब्द, कर्णेंद्रिय, व मुखादिक इंद्रियांतील अवकाश हे गुण आकाशाचा आश्रय करून वर्ततात.

लोकमाया भगवता मुहूर्तेन विनाशिता ॥ मनो बुद्धिश्च सर्वेषां क्षेत्रज्ञश्चेति यः श्रुतः ॥ ९ ॥ तं वरेण्यं परमेष्ठिनं हृषीकेशमुपाश्रिताः ॥

अर्थ- अशीही लोकरचना परमेश्वरानें दोन घटिकांत नाहींशी केली; तेव्हां मन बुद्धि, चित्त व अहंकार, यांच्या देवता सर्व इंद्रियाधिपति जो नारायण त्याचा आश्रय करितात;

ततो भगवतस्तस्य रश्मिभिः परिवारितः ॥ १० ॥ वायुनाक्रम्यमाणासु द्रुमशाखासु चाश्रितः ॥ तेषां संघर्षणोद्भूतः पावकः शतधा ज्वलन् ॥ ११ ॥ अदहच्च तदा सर्वं वृतः संवर्तकोनलः ॥ सपर्वतद्रुमान्गुल्मान् लतावल्लीस्तृणानि च ॥ १२ ॥ विमानानि च दिव्यानि पुराणि विविधानि च ॥ यानि चाश्रयणीयानि तानि सर्वाणि सोदहत् ॥ १३ ॥

अर्थ- नंतर त्या सूर्यरूपी नारायणाच्या किरणानीं युक्त असून वायूनें कंपित जाहलेल्या वृक्षांच्या शाखांत राहिलेला अग्नि त्या फांद्यांचे परस्पर संघर्षणानें बाहेर प्रगट होतो आणि तो प्रलय कारक अग्नि शतशः ज्वालानीं सर्वत्र व्याप्त होउन पर्वत, वृक्ष, झुडपें, लहान मोठ्या वेली, सर्व प्रकारचीं गवतें, उत्तम विमानें, लोकांस रहाण्या विषयीं योग्य पुरें या सर्वांस जाळतो.

भस्मीकृत्वा ततः सर्वान् लोकाँल्लोकगुरुर्हरिः ॥ भूयो निर्वापयामास युगांतेनं च कर्मणा ॥ १४

अर्थ- असें सर्वलोकांनें भस्म करून संपूर्ण लोकांचा गुरु विष्णु पुनः सृष्टि कालीं सर्वांस पूर्वी प्रलय कालीं वासनेंत राहिलेल्या बीजरूप कर्मानुसार उत्पन्न करितो.

सहस्रवृष्टिः शतधा भूत्वा कृष्णो महाबलः ॥ दिव्यतोयेन हविषा तर्पयामास मेदिनीं ॥ १५ ॥

अर्थ- या प्रमाणें त्रैलोक्यानें भस्म झाल्यावर भगवान् नारायण स्वतः आपण शेंकडों प्रकारानें अपरिमित वृष्टि करणारा महा बलिष्ठ नीलवर्णी सजलमेघ होऊन त्यानें उत्तम शुद्ध उदकानें पृथ्वीस तृप्त केलें.

ततः क्षीरनिकाशेन स्वादुना परमांभसा ॥ शिवेन पुण्येन मही निर्वाणमगमत्परं ॥ १६ ॥

अर्थ- तेव्हां त्या पवित्र कल्याण कारक व मधुर अशा उत्कृष्ट उदकाच्या समुदायानें ती पृथ्वी त्या प्रलयाग्नीच्या तापांतून अगदीं मुक्त जाहली.

तेन रोधेन संछन्ना पयसां वर्षतो धरा ॥ एकार्णवजलीभूता सर्वसत्वविवर्जिता ॥ १७ ॥ महासत्वान्यपि विभुं प्रविष्टान्यमितौजसं ॥

अर्थ- आणि ती पृथ्वी त्या उदकाच्या वृष्टि मुळें वरून सर्वत्र पाण्याच्या आवरणानें झांकून गेली त्या कालीं ती भूमी केवल प्रलय समुद्रानें जलमय झाली असतां तिजवरील प्राणिमात्र नाहींसे झाले; तेव्हां महा भूतें अपार तेजोमय प्रभूच्या स्वरूपांत प्रविष्ट होऊन राहतात.

नष्टार्कपवनाकाशे सूक्ष्मे जगति संवृते ॥ १८ ॥ संशोषमात्मना कृत्वा समुद्रानपि देहिनः ॥ दग्ध्वा संप्लाव्य च तथा स्वपित्येकः सनातनः ॥ १९ ॥

अर्थ- या प्रमाणें तो सूर्य रूपी आदिनारायण आपल्या अपार तेजानें सर्व देहधारी व समुद्र यांसही प्रलय कालीं पूर्वी अतिशयें शुष्क करून जाळतो; पश्चात् तो नारायण बहुल पर्जन्य वृष्टि करून त्या प्रलय समुद्रांत वट पत्रावर एकटाच शयन करितो.

पौराणं रूपमास्थाय स्वपित्यमितविक्रमः ॥ एकार्णवजलव्यापी योगी योगमुपाश्रितः ॥ २० ॥ अनेकानिस

हस्राणियुगान्येकार्णवांभसि ॥ नचैनं कश्चिदव्यक्तं व्यक्तं वेदितुमर्हति ॥२१॥

अर्थ- तें असें कीं, तो अपरिमित पराक्रमी सर्व योगांचा नियंता नारायण- आपल्या पुरातन मूलरूपानें त्या प्रलय समुद्रास व्यापून योग सामर्थ्यानें अ- नेक सहस्र युग पर्यंत त्या प्रलय समुद्राच्या उदकावर शयन करितो; त्यागुप्त माहात्म्य युक्त प्रभूस स्पष्ट रीतीनें जाणण्यास कोणी समर्थ नाहीं.

कश्चैवपुरुषोनामकिंयोगःकश्चयोगवान् ॥ असौकियं तंकालंच एकार्णवविधिंप्रभुः ॥२२॥ करिष्यतीतिभग वानितिकश्चिन्नबुध्यते ॥

अर्थ- तसाच माया नियंता पुरुष कोण? योग व योगी हे कोण ते? आणि ष ड्गुणैश्वर्य संपन्न हा समर्थ परमेश्वर किती काल पर्यंत हें त्रैलोक्य जलमग्न क सें करितो हें कोणीही जाणत नाहीं.

नद्रष्टानैवगमितानज्ञातानैवपार्श्वगः ॥२३॥ तस्यनज्ञा यतेकिंचित्तमृतेदेवसत्तमं ॥

अर्थ- आणि त्या नारायणास प्रत्यक्ष पहाणारा सर्वांशानें जाणणारा किंवा दुसऱ्यास त्याचें ज्ञान करून देणारा व त्याच्या समीप जाणारा असा कोणीही नाहीं; बहुत काय सांगावें कीं, तो देवश्रेष्ठ ईश्वर स्वतः मात्र आपणास जाणतो; त्या वांचून इतरांस त्याचें किंचित्‌ही ज्ञान होत नाहीं.

नमःक्षितिंपवनमपःप्रकाशंप्रजापतिंभुवनधरंसुरे श्वरं,पितामहंश्रुतिनिलयंमहामुनिंप्रशाम्यभूयःश- यनंह्यरोचयत् ॥२४॥

अर्थ- आतां सूत ह्मणतात ऋषीहो असा प्रलयाग्नी पर्जन्य वृष्टीनें शांत करून त्या उदकावर ज्या प्रभूनें शयन केलें; तो पृथ्वी,वायू,उदक व तेज या रूपानीं चतुर्दश भुवनांचें धारण करून सर्व देवादिक लोकांचें संरक्षण करि तो; आणि तो सर्व देवांचा ईश्वर असून त्या देवादिक संपूर्ण चराचर विश्वा- चा पितामह व समग्र श्रुतींचें स्थान अशाच्या महामुनि स्वरूपी नारायणा- स माझा नमस्कार असो. इतिश्री मत्स्यपुराणे पद्मोद्भव प्रादुर्भावे पंचषष्ट्य त्तर शततमोऽध्यायः १६५

अध्याय १६६.

मत्स्यउवाच ॥ एवमेकार्णवीभूते शेते लोके महाद्युतिः ॥ प्रच्छाद्य सलिलेनोर्वीं हंसो नारायणस्तदा ॥ १ ॥

अर्थ.- नंतर मत्स्यरूपी भगवान् बोलले कीं, हे मनुराजा प्रलया नंतर असें उदकानें पृथ्वीचें आच्छादन होऊन सर्वत्र केवळ समुद्रमय झाल्यावरत्या जलमय लोकांत महा कांति युक्त हंस नामा नारायण त्या काळीं शयन करितो.

महतो रजसो मध्ये महार्णवसरःस्वपे ॥ विरजस्कं महाबाहुमक्षयं ब्रह्म यं विदुः ॥ २ ॥

अर्थ.- जो महाभुज भगवान् स्वतः रजोगुण रहित असून मोठ्या रजो गुणाच्या मध्यभागीं त्या प्रलय समुद्रावर निद्रा करितो, त्यास नाशरहित ब्रह्म ह्मणतात.

आत्मरूपप्रकाशेन तमसा संवृतः प्रभुः ॥ मनः सात्विकमाधाय यत्र तत्सत्यमासत ॥ ३ ॥ याथातथ्यं परं ज्ञानं भूतं तद्ब्रह्मणा पुरा ॥ रहस्यारण्यकोद्दिष्टं यच्चौपनिषदं स्मृतं ॥ ४ ॥

अर्थ.- तो प्रभु आपल्या रूपाच्या प्रकाशामुळें त्या प्रलय रात्रीच्या अंधकारानें झांकला गेला नाहीं, नंतर सृष्टिकालाचे आरंभीं आरण्यकोपनिषदांत सांगितलेलें जें यथार्थ उत्तम रहस्य ज्ञान आहे तें ज्ञान ब्रह्मदेवानें पूर्वीं सत्वाचे स्थितीस योग्य असें आपलें सात्विक मन करून त्या नारायणापासून संपादन केलें.

पुरुषो यज्ञ इत्येतत् यत्परं परिकीर्तितं ॥ यश्चान्यः पुरुषाख्यः स्यात्स एष पुरुषोत्तमः ॥ ५ ॥

अर्थ.- त्या नारायणाचें यज्ञपुरुष असें उत्कृष्ट माहात्म्य वेदांत वर्णिलें आहे तो हा नारायण सर्व नश्वर भूतें व कूटस्थ पुरुष यां पेक्षां श्रेष्ठ आहे ह्मणून त्यास पुरुषोत्तम ह्मणतात.

येच यज्ञकरा विप्रा येचर्त्विज इति स्मृताः ॥ अस्माद्देवपुरा भूता यज्ञेभ्यः श्रूयतां तथा ॥ ६ ॥

अर्थ.- जे यज्ञ करणारे ब्राह्मण व ज्यास ऋत्विज ह्मणतात ते सर्व, यज्ञा

र्थ जसे उत्पन्न झाले; तसें क्रमानें श्रवण कर.

ब्रह्माणं प्रथमं वक्त्रादुद्गातारं च सामगं ॥ होतारमपि चा-
ध्वर्युं बाहुभ्यामसृजत्प्रभुः ॥ ७ ॥

अर्थ- तें असें कीं, त्या प्रभूनें आपले मुखांतून ब्रह्या, उंचस्वरानें गायन करणारा उद्गाता व सामवेद ह्मणणारा यांस उत्पन्न केलें; आणि होता व अध्वर्यु यांस भुजांपासून उत्पन्न केलें.

ब्रह्मणो ब्राह्मणाच्छंसि प्रस्तोतारं च सर्वशः ॥ तौ मित्रावरु
णोपृष्ठात्प्रतिप्रस्तारमेव च ॥ ८ ॥

अर्थ- आणि ब्राह्मणाच्छंसि (यज्ञांत ब्राह्मणांत सांगितलेल्या शस्त्रांचें पठन करणारा) प्रस्तोता (सर्व प्रकारें स्तुति करणारा) मित्र, वरुण व प्रतिप्रस्ता हे त्या ईश्वराच्या पृष्ठ भागापासून उत्पन्न झाले.

उदरात्प्रतिहर्तारं पोतारं चैव पार्थिव ॥ अच्छावाकमथोरु
भ्यां नेष्टारं चैव पार्थिव ॥ ९ ॥

अर्थ- हे पृथ्वीपालका, त्या नारायणानें आपल्या उदरापासून प्रतिहर्ता व पोता यांस निर्माण करून अच्छावाक व नेष्टा यांस मांड्यांपासून उत्पन्न केलें.

पाणिभ्यामथ चाग्नीध्रं सुब्रह्मण्यं च जानुनः ॥ ग्रावस्तुतं
तु पादाभ्यामुन्नेतारं च याजुषं ॥ १० ॥

अर्थ- त्या परमेश्वराच्या हस्तापासून आग्नीध्र, गुडघ्यापासून सुब्रह्मण्य, दोन पायांपासून ग्रावस्तुत् व यजुर्वेद शाखेचा उन्नेता हे क्रमानें उत्पन्न जाहले.

एवमेवैष भगवान् षोडशैव जगत्पतिः ॥ प्रवक्तॄन्सर्वयज्ञा
नामृत्विजोसृजदुत्तमान् ॥ ११ ॥

अर्थ- असें जगपालक भगवंतानें सर्वयज्ञांचे वक्ते सोळाच उत्तम ऋत्विज उत्पन्न केले.

तदेष वै वेदमयः पुरुषो यज्ञसंस्थितः ॥ वेदाश्चैतन्मयाः
सर्वे सांगोपनिषदक्रियाः ॥ १२ ॥ स्वपित्येकार्णवे चैव य-
दाश्चर्यमभूत्पुरा ॥ श्रूयतां तद्यथा विप्रा मार्कंडेय कुतूहल
म् ॥ १३ ॥

अर्थ- तस्मात् हा परम पुरुष वेदमय असून वेदांगें उपनिषदें व कर्म कांड यां

सहित सर्व वेदांत या पुरुषाचें मुख्यत्वें वर्णन केलें आहे; ह्मणूनच हा पुरुष सर्व यज्ञां त प्रमुख आहे. त्यानें सर्व जगाचा संहार करून केवल जलमय समुद्रावर शयन केलें असतां ब्राह्मण हो त्या देवाजवळ मार्कंडेय ऋषीचें आश्चर्य कारक चरित्र झालें तें तुह्मीं श्रवण करा.

गीर्णो भगवतस्तस्य कुक्षावेव महामुनिः॥ बहुवर्षसहस्रायुस्तस्यैव वरतेजसा॥१४॥ अटंस्तीर्थप्रसंगेन पृथिवीतीर्थगोचरान्॥ आश्रमाणिच पुण्यानि देवतायतनानिच॥१५॥ देशान्राष्ट्राणि चित्राणि पुराणि विविधानिच॥ जपहोमपरः शांतस्तपो घोरं समास्थितः॥१६॥ मार्कंडेयस्ततस्तस्य शनैर्वक्त्राद्विनिसृतः॥

अर्थ- तें असें कीं, एके समयीं तो महान् ऋषि मार्कंडेय त्या प्रलय समुद्रावर शयन केलेल्या षड्गुणैश्वर्य संपन्न ईश्वरा समीप गेला, तेव्हां त्या ईश्वरानें मार्कंडेयास गिळिलें त्या कालीं तो बहु सहस्रवर्ष आयुष्यानें युक्त ऋषि त्या नारायणाच्या वर संबंधि तेजानें त्याच्याच कुशींत तीर्थ यात्रेच्या निमित्तानें तेथील पृथ्वीवर तीर्थां समीपचे पुण्यकार आश्रम देवस्थानें, अनेक देश, चमत्कारिक राष्ट्रें, नाना प्रकारचीं नगरें यासर्व प्रदेशांत फिरून नंतर तो मार्कंडेय ऋषि शांत वृत्तीनें जप व होम या कर्मांत तत्पर होऊन उग्र तप करूं लागला तों इतक्यांत तो मुनि पुनः त्या देवाच्या मुखांतून मंदगतीनें बाहेर आला.

सनिष्क्रामन्नचात्मानं जानीते देवमायया॥१७॥ निष्क्रम्याप्य स्यवदनादेकार्णवमथोजगत्॥ सर्वतस्तमसाच्छन्नं मार्कंडेयोन्ववेक्षत॥१८॥

अर्थ- तेव्हां बाहेर पडत असतां मार्कंडेयानें ईश्वरी माये मुळें आपल्यास जाणलें नाहीं, आणि त्याच्या मुखांतून निघाल्यावरही त्यानें चहूंकडून अंधःकारानें व्याप्त झालेलें समुद्रमय जग पाहिलें.

तस्योत्पन्नं भयं तीव्रं संशयश्चात्मजीविते॥ देवदर्शनसंहृष्टो विस्मयं परमं गतः॥१९॥

अर्थ- तें समयीं त्यास तीव्र भय उत्पन्न होऊन आपल्या जीविता विषयीं संशय आला परंतु मग तो मार्कंडेय त्या देवाच्या दर्शनानें संतुष्ट होऊन परम आश्चर्य-

पावला.

चिंतयन्जलमध्यस्थो मार्कंडेयोन्ववेक्षत॥ किन्नुस्यांम-
मचिंतेयंमोहःस्वप्नोनुभूयते॥२०॥

अर्थ- पुढें तसाच पाण्यांत असून तो मार्कंडेय ऋषि आपल्या मनांत विचार करूं लागला कीं, मला ही चिंता किंवा मोह प्राप्त झाला अथवा स्वप्न पडत आहे कीं काय?

व्यक्तमन्यतमो भावस्तेषांसंभावितोमम॥ न हीदृशं ज
गत् क्लेशमयुक्तं सत्यमर्हति॥२१॥

अर्थ- तर या तिहींतून हा एक प्रकार निःसंशय घडला असावा. असें मलावा टतें कारण हें जग, असें अत्यंत घोर क्लेश प्राप्त होण्यास वास्तविकच योग्य नाहीं.

नष्टचंद्रार्कपवने नष्टपर्वतभूतले॥ कतमःस्यादयंलोक
इति चिंतामवस्थितः॥२२॥

अर्थ- व चंद्र, सूर्य, वायू, पर्वत व भूमि यांचा नाश झाला. अशी लोकांची स्थि ती होण्याचा योग कशानें घडला याप्रमाणें तो मार्कंडेय चिंता करीत बसला.

ददर्शचापिपुरुषंस्वपंतंपर्वतोपमं॥ सलिलेर्धमग्नोम
ग्नीभूतमिवसागरे॥२३॥

अर्थ- तों त्यानें समुद्रांत मेघच किंकाय? असा पाण्यांत अर्धा बुडून निद्राके लेला पर्वता सारखा कोणी एक पुरुष ही पाहिला.

ज्वलंतमिवतेजोभिर्गोयुक्तमिवभास्करं॥ शर्वर्यांजा
ग्रतमिवभासंतंस्वेनतेजसा॥२४॥ देवंद्रष्टुमिहायया
तः कोभवानिति विस्मयात्॥ तथैवसमुनिःकुक्षिंपुन
रेवप्रवेशितः॥२५॥

अर्थ- तो असा कीं, रात्रीं जागाच काय! आणि आपल्या तेजानें शोभणा- रा किरण युक्त सूर्यासमान, कांतीनें दैदीप्यमान अशा देवास पाहण्याकरितां- येऊन तूं कोण आहेस असें मार्कंडेय आश्चर्यानें त्यास विचारितों तों पुनः त्या देवानें मार्कंडेयास आपले पोटांत घेतलें.

संप्रविष्टःपुनःकुक्षिंमार्कंडेयोतिविस्मयः॥ तथैवच
पुनर्भूयोविजानन्स्वप्नदर्शनं॥२६॥ सतथैवयथापू

वयोधरामरतेपुरा ॥ पुण्यतीर्थजलोपेतां विविधान्याश्रमाणिच ॥ २७ ॥

अर्थ तेव्हां देवाच्या उदरांत जाऊन मार्कंडेय अत्यंत आश्चर्य पावला आणि तो बहुत विचाराने हें स्वप्नांत दिसलें असें जाणून जसा पूर्वी पृथ्वी पर्यटन करीत होता तसाच तेथें पुनः पृथ्वीवर पुण्यकारक तीर्थे व अनेक आश्रम यांत संचार करूं लागला.

क्रतुभिर्यजमानांश्च समाप्तवरदक्षिणान् ॥ अपश्यद्देवकुक्षिस्थान्याजकान्शतशो द्विजान् ॥ २८ ॥

अर्थ- तसेंच मार्कंडेयानें त्या देवाच्या उदरांत दक्षिणा देऊन यज्ञसमाप्त केलेले यजमान व शेंकडों यज्ञादि कर्में करणारे ब्राह्मण ही पाहिले.

सद्वृत्तमास्थिताः सर्ववर्णाब्राह्मणपूर्वकाः ॥ चत्वारश्चाश्रमाः सम्यग्यथोद्दिष्टामयानव ॥ २९ ॥

अर्थ- ते असे कीं, संपूर्ण ब्राह्मण प्रमुख वर्ण व चारीही आश्रम हे उत्तम स्थितीनें त्या देवाच्या पोटांत जसे वर्तत होते, तसें हें राजा म्या तुला सांगितलें.

एवंवर्षशतंसाग्रंमार्कंडेयस्य धीमतः ॥ चरतः पृथिवीं सर्वांनकुक्ष्यंतः समीक्षितः ॥ ३० ॥

अर्थ- या प्रमाणें तो मार्कंडेय त्या भगवंताच्या उदरांतील सर्व पृथ्वीवर पूर्ण शंभर वर्षे सारखा संचार करीत होता तरीं त्यास देवाच्या कुशीचा अंत लागला नाहीं.

ततः कदाचिदथवैपुनर्वक्त्राद्विनिसृतः ॥ सुसंन्यग्रोधशाखायां बालमेकं निरैक्षत ॥ ३१ ॥

अर्थ- नंतर कोणा एके समयीं असा पुनः मुखांतून बाहेर निघालेला मार्कंडेय ऋषि यानें वटवृक्षाच्या शाखेवर निजलेला बालक पाहिला.

तथैवैकार्णवजलेनीहारेणावृतांबरे ॥ अव्यग्रः क्रीडते लोकेसर्वभूत विवर्जिते ॥ ३२ ॥

अर्थ- त्याप्रमाणेंच धुक्यानें आकाश व्याप्त जाहलें असून व सर्व प्राणिमात्रानीं वर्जित असा लोक जाहला असतां एकार्णव जलामध्यें निर्भय असा बालक क्रीडा करतो आहे.

सपुनिर्विस्मयाविष्टः कौतूहलसमन्वितः ॥ बालमादित्यसंकाशं नाशक्नोदभिवीक्षितुं ॥ ३३ ॥

अर्थ- ते समयीं बहुत कौतुक व परम आश्चर्य यानीं युक्त असा मार्कंडेय ऋषि सूर्या सारिख्या त्या तेजोमय मुलास पाहण्या विषयीं समर्थ जाहला नाहीं.

सचिंतयंस्तथैकांते स्थित्वा सलिलसन्निधौ ॥ पूर्वदृष्टमिदं मन्ये शंकितो देवमायया ॥ ३४ ॥

अर्थ- तेव्हां तो ऋषि, देव मायेनें संशय युक्त होऊन उदका समीप एकांतीं बसून मनांत चिंतन करितो कीं, जें म्यां पूर्वी पाहिलेलें तेंच हें आहे असें मला वाटतें.

अगाधसलिले तस्मिन्मार्कंडेयः सुविस्मयः ॥ पूर्वंस्तथार्तिमगमत् भयात्संत्रस्तलोचनः ॥ ३५ ॥

अर्थ- असा निश्चय करून आश्चर्य पावलेला व त्या अपरंपार जलामध्यें पोहणारा व भयाक्रांत ज्याची दृष्टी जाहली आहे असा तो मार्कंडेय ऋषि मोठ्या दुःखाप्रत प्राप्त होता जाहला.

सतस्मै भगवानाह स्वागतं बालयोगवान् ॥ बभाषे मेघतुल्येन स्वरेण पुरुषोत्तमः ॥ ३६ ॥

अर्थ- तेव्हां सकल पुरुषांत उत्तम, षड्गुणैश्वर्य संपन्न असा तो बाल रूप धारी ईश्वर मेघा सारिख्या गंभीर स्वरानें बोलतो कीं, हे मार्कंडेया तूं आलास हें फार चांगलें झालें.

माभैर्वत्स न भेतव्यमिहैवायाहि मे तिकं ॥ मार्कंडेयो मुनिस्त्वाह बालं श्रमपीडितः ॥ ३७ ॥

अर्थ- तस्मात् हे वत्सा तूं आतां भय मानूं नको आणि येथेंच माझ्याजवळ ये असें देवाचें भाषण ऐकून श्रमानें पीडित झालेला मार्कंडेय मुनि त्या बालकास बोलतो.

मार्कंडेय उवाच ॥ को मां नाम्ना कीर्तयति तपः परिभवन्मम ॥ दिव्यं वर्षसहस्राख्यं धर्षयन्निव मे वयः ॥ ३८

अर्थ- कीं माझ्या तपाचा व देवांच्या सहस्र वर्षें पर्यंत केलेल्या तपाचा तिरस्का

र करीतच कोण मला नामानें हांक मारीत आहे.

नह्येषवः समाचारो देवेष्वपिममोनिलः ॥ मांब्रह्मापि-
हि देवेशोदीर्घायुरिति भाषते ॥ ३९ ॥

अर्थ— आणि मुला मिळूनके या तुमच्या भाषणा प्रमाणें मला देवांत ही कोणी असें ह्मणत नाहीं; कारण देवांचा स्वामी ब्रह्मदेव ही मला तूं दीर्घायु आहेस असें बोलतो.

कस्तपोघोरमासाद्यमामद्यत्यक्तजीवितः ॥ मार्कंडेये-
तिमामुक्त्वामृत्युमीक्षितुमर्हति ॥ ४० ॥

अर्थ— तसाच मी उग्र तपस्वी असून मला मार्कंडेया असें एकवचनानें बोलून कोण आपल्या जीविताचा त्याग करून आज मृत्यूचे मुखांत जाण्या विषयीं योग्य जाहला आहे

एवमाभाष्यतं क्रोधान्मार्कंडेयोमहामुनिः ॥ तथैवभ-
गवान्भूयोबभाषेमधुसूदनः ॥ ४१ ॥

अर्थ— असें क्रोधानें बोलून तो महामुनि मार्कंडेय स्वस्थ राहिल्यावर मधुदैत्याचा नाश करणारे भगवान् विष्णु तसेंच त्या ऋषीस पुनः बोलतात.

भगवानुवाच ॥ अहंतेजनकोवत्सहृषीकेशः पितागुरुः ॥
आयुः प्रदातापौराणः किंमांत्वन्नोपसर्पसि ॥ ४२ ॥

अर्थ— कीं, हे मुला मी अनादि काला पासून तुला उत्पन्न करून तुझ्या सकळ इंद्रियांस चालविणारा असून पोषणही करितो आणि तुझा पिता हितोपदेश करणारा व आयुष्य दाता असें माझें माहात्म्य पुराण प्रसिद्ध असून तूं माझ्या जवळ कां येत नाहींस.

मांपुत्रकामः प्रथमंपितातेंगिरसोमुनिः ॥ पूर्वमाराध-
यामासतपस्तीव्रंसमाश्रितः ॥ ४३ ॥

अर्थ— आणि तुझा पिता आंगिरस ऋषि यानें प्रथमतः पुत्राच्या इच्छेनें तीक्ष्ण तप करून पूर्वी माझें आराधन केलें.

ततस्त्वांघोरतपसाप्रारणोदमितौजसं ॥ उक्तवानहमा
त्मस्थंमहर्षिममितौजसं ॥ ४४ ॥

अर्थ— नंतर त्यानें उग्रतपाच्या अपरमित तेजानें युक्त असा पुत्र मला मागि-

तला; तेव्हां मी आपलेजवळ राहणारा व उत्कृष्ट तेजस्वी अशाल्या महाऋषीस तथास्तु असें बोललों.

कः समुत्सहतेचान्योयोनभूतात्मकात्मजः॥ द्रष्टुमेकार्णवगतंक्रीडंतंयोगवर्त्मना॥ ४५॥

अर्थ- ह्मणूनच तूंया प्रलय समुद्रांत मला पहातोस नाहींतर सर्वभूताधिपतीच्या अंशा वांचून दुसरा कोण आपल्या योग सामर्थ्यानें प्रलय समुद्रांत क्रीडा करणारास मला पाहण्या विषयीं समर्थ होईल.

ततः प्रहृष्टवदनोविस्मयोत्फुल्ललोचनः॥ मूर्ध्निबद्धांजलिपुटोमार्कंडेयोमहातपाः॥ ४६॥ नामगोत्रे ततः प्रोच्यदीर्घायुर्लोकपूजितः॥ तस्मैभगवते भक्त्यानमस्कारमथाकरोत्॥ ४७॥

अर्थ- असें त्या बालरूपी ईश्वराचें भाषण ऐकून दीर्घायु, लोकमान्य व महातपस्वी असा तो मार्कंडेय ऋषि हास्यमुख व आश्चर्या मुळें प्रफुल्लित नेत्र यानीं युक्त होत्सातां, त्यानें हात मस्तकावर जोडून आपल्या नाम, गोत्रांचें उच्चारण करून त्या भगवंतास भक्तीनें नमस्कार केला.

मार्कंडेयउवाच॥ इच्छेयंतत्त्वतोमायामिमांज्ञातुंतवानघ॥ यदेकार्णवमध्यस्थः शेषेत्वंबालरूपवान्॥ ४८॥

अर्थ- नंतर मार्कंडेय ह्मणतात हे निष्पाप देवा तूं बालरूपानें या प्रलयसमुद्राचे मध्यावर कशी निद्रा करितोस ही तुझी माया मी तथ्यपणें समजण्यास इच्छितों.

किंसंज्ञश्चैवभगवन्लोकेविज्ञायसेप्रभो॥ तर्कयेत्वांमहात्मानंकोह्यन्यःस्थातुमर्हति॥ ४९॥

अर्थ- आणि हे प्रभो तुह्मीं षड्गुणैश्वर्य संपन्न असून कोणत्या नामानें लोकांत जाणले जातां व तुम्हीं माहात्मे आहांत असा मी तर्क करितों कारण अशा प्रभावा वांचून दुसरा कोण त्या प्रलय समुद्रावर राहाण्यास योग्य आहे.

श्रीभगवानुवाच॥ अहंनारायणोब्रह्मन्सर्वभूःसर्वनाशनः॥ अहंसहस्रशीर्षाख्यैर्यःपदैरभिसंज्ञितः॥ ५०॥

अर्थ- नंतर त्या ऋषीस भगवान् ह्मणतात हे ब्राह्मणा सर्वचराचर जगां

मजपासून उत्पन्न होऊन माझेच योगानें त्याचा नाशही होतो आणि वेदांत सहस्र शीर्षादिक पदानीं प्रसिद्ध असा नारायण मीच आहे.

आदित्यवर्णः पुरुषोमखेब्रह्ममयोमखः॥ अहमग्नि र्हव्यवाहोयादसांपतिरव्ययः॥५१॥

अर्थ- सूर्यासारखा तेजोमय पुरुष व यज्ञांत ब्रह्मयज्ञ मीच आहें आणि देवांचा भाग पोंचविणारा अग्नि हें माझेंच रूप व जलचर प्राण्यांचा अधिपति वरुण व सर्वत्र नश्वर भूतांत ही नाश रहित असा मीच आहें.

अहमिंद्रपदेशक्रोवर्षाणांपरिवत्सरः॥ अहंयोगीयुगाख्यश्चयुगांतावर्तएवच॥५२॥

अर्थ- तसेंच इंद्रपदावर इंद्र ही माझी विभूति असून सर्व संवत्सरांत परिवत्सर मी व सर्व युगांचा नियंता मीच आहें आणि मी सर्व युगांत प्रसिद्ध असून मजपासूनच युगांची समाप्ती होऊन पुनः पुनः त्या युगांचे पर्याय ही होतात.

अहंसर्वाणिसत्वानिदैवतान्यखिलानितु॥ भुजंगाना महंशेषोतार्क्ष्योवैसर्वपक्षिणां॥५३॥

अर्थ- त्याच प्रमाणें सर्व प्राणिमात्र सकलदैवतें भुजंगांत शेष व संपूर्ण पक्ष्यांत गरुड या समग्र माझ्या विभूति आहेत.

कृतांतः सर्वभूतानांविश्वेषांकालसंज्ञितः॥ अहंधर्म स्तपश्चाहंसर्वाश्रमनिवासिनां॥५४

अर्थ- तसाच सकल प्राण्यांचा नाश कर्ता, संपूर्णांचा काळ, सर्व आश्रमांत रहाणाऱ्या लोकांचा धर्म व तप त्या माझ्या विभूति आहेत.

अहंचैवसरिद्दिव्या क्षीरोदश्च महार्णवः॥ यत्तत्सत्यं चपरममहमेकः प्रजापतिः॥५५॥

अर्थ- देवांची नदी गंगा, क्षीरसमुद्र, सर्वाहून उत्कृष्ट जें सत्य व संपूर्ण प्रजापतींत मुख्य दक्ष त्या माझ्या विभूति जाणाव्या.

अहंसांख्यमहंयोगोप्यहंतत्परमंपदं॥ अहमिज्याक्रियाचाहमहंविद्याधिपःस्मृतः॥५६॥

अर्थ- सांख्यशास्त्रांत प्रतिपाद्य वस्तु अष्टांगादिक योग, योगाभ्यासादिकानें-

प्राप्त होणारा ईश्वर, यज्ञ, सर्व कर्म, व संपूर्ण विद्यांचा स्वामी हीं सर्व स्वरूपें माझींच आहेत.

अहंज्योतिरहंवायुरहंभूमिरहंनभः॥ अहमापःसमुद्राश्चनक्षत्राणिदिशोदश॥ ५७॥

अर्थ- तेज, वायु, भूमि, आकाश, उदक, सप्तसमुद्र नक्षत्रें व दश दिशा हें सर्व मीच आहें.

अहंवर्षमहंसोमः पर्जन्योहमहंरविः॥ क्षीरोदसागरे चाहंसमुद्रेवडवामुखः॥ ५८॥

अर्थ- वृष्टि, चंद्र, इंद्र, सूर्य त्यामाझ्या मूर्ति असून मी क्षीर समुद्रांत आहें- आणि समुद्रांत घोडीच्या मुखानें युक्त अग्नी तो मीच आहें

वन्हिःसंवर्तकोभूत्वा पिबंस्तोयमयंहविः॥ अहंपुराणःपरमं तथैवाहं परायणं॥ ५९॥

अर्थ- प्रलय कालचा अग्नी होऊन मीच उदकरूप हवि प्राशन करतों, आणि मी पुरातनांत उत्कृष्ट असून सर्वांस आश्रय आहें.

अहंभूतस्यभव्यस्य वर्तमानस्यसंभवः॥ यत्किंचित्पश्यसेविप्रयच्छृणोषिच किंचन॥ ६०॥ यल्लोकेचानुभवसितत्सर्वंमामनुस्मर॥

अर्थ- तसेंच पूर्वी झालेलें व पुढें होणारें व सांप्रतजें आहे त्या सर्वांची उत्पत्ती मेजपासुनच होते. आणि तूं या लोकांत जें कांहीं पहातोस, ऐकतोस व- अनुभवतोस, तें सर्व मीच आहें असें सर्वदा स्मरण करीत जा.

विश्वंसृष्टंमयापूर्वं स्रज्यंचाद्यापिपश्यमां॥ ६१॥ युगेयुगेच स्रक्ष्यामि मार्कंडेयाखिलंजगत्॥

अर्थ- हे मार्कंडेया म्यांच पूर्वी विश्वउत्पन्न केलें सांप्रत कालचें उत्पन्न करतों- असेंच पुढें प्रतियुगीं संपूर्ण जग मीच उत्पन्न करीन.

तदेतदखिलंसर्वंमार्कंडेयावधारय॥ ६२॥ शुश्रूषुर्मभधर्मांश्चकुक्षौचरसुखंमम॥

अर्थ- हे मार्कंडेया, तूं हें सर्व या रीतीनें आहें असें जाण आणि माझ्या भागवत धर्माचें श्रवण व सेवन करीत माझ्या कुक्षींत यथेच्छ संचार करून सुख पाव.

ममब्रह्माशरीरस्थोदेवैश्चऋषिभिःसह ६३॥व्यक्तमव्य-
क्तयोगंमामवगच्छाक्षरद्विषं॥

अर्थ- तसेंच माझ्या शरीरांत देव व ऋषि यां सहित ब्रह्मदेव रहातात आणि मी लोकांत प्रगट असून गुप्तरूपें वर्तणारा अक्षरांचा द्वेषी आहें असें तूं जाण.

अहमेकाक्षरोमंत्रस्त्र्यक्षरःश्चैवतारकः॥६४॥परस्त्रि
वर्गादोंकारस्त्रिवर्गार्थनिदर्शनः॥

अर्थ- तसाच एकाक्षरी मंत्र, तीन अक्षरांचा तारक मंत्र, धर्म, अर्थ व काम या त्रिवर्गीच्या सर्व साधनांहून उत्तम ओंकार आणि धर्मार्थकाम त्या तीन पुरुषार्थांस देणारा असा सर्व मीच आहें.

एवमादिपुराणेशोवदन्नेवमहामतिः॥६५॥वक्त्रमात्मन
वानाशुमार्कंडेयंमहामुनिं॥

अर्थ- या प्रमाणें अनादि पुराणांचा नियंता व महा बुद्धिमान् असा तो नारायण मार्कंडेय महामुनीशीं बोलत असतां, त्या देवानें मार्कंडेयास पुनः आपल्या मुखांत घेतलें

ततोभगवतः कुक्षिंप्रविष्टोमुनिसत्तमः॥६६॥सतस्मि
न्सुखमेकांतेशुश्रूषुर्हंसमव्ययं॥

अर्थ- नंतर त्या मुनिश्रेष्ठ मार्कंडेयानें भगवंताच्या उदरांत प्रवेश करून तेथें एकांतीं त्या नाशरहित हंसपरमात्म्यापासून भागवत धर्म श्रवणाच्या इच्छेनें त्या प्रभूची सेवा करीत सुखानें वास केला.

योऽहमेवविविधतनुंपरिश्रितोमहार्णवेव्यपगतचंद्रभा-
स्करे॥शनैश्चरन्प्रभुरपिहंससंज्ञितोसृजंजगद्विरहित
कालपर्यये॥६७॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा या प्रमाणें चंद्र, सूर्याचा लय झाल्यावर त्या प्रलय महा समुद्रांत हंस रूपी मी मंदगतीनें संचार करीत असतों तोच मी पुढें प्रलय काळाच्या समाप्ती नंतर अनेक स्वरूपें प्रगट करून हें जग उत्पन्न करितों. इति श्री मत्स्य पुराणे पद्मोद्भव प्रादुर्भावे षष्ठ्युत्तर शततमोध्यायः॥१६६॥

अध्याय १६७

मत्स्यउवाच ॥ आपवः सविभुर्भूत्वाचारयामासवैतपः ॥
च्छादयित्वात्मनोदेहं यादसांकुलसंभवं ॥१॥

अर्थ- मत्स्य बोलतो हे मनुराजा, जगपालक त्याच भगवंतानें जलचर प्राण्यांच्या कुलांत उत्पन्न झालेल्या आपल्या शरीरास झांकून लोकांत आपव या नामानें प्रसिद्ध होऊन त्यानें प्रथमतः तप केलें.

ततो महात्मातिबलोमतिं लोकस्यसर्जने ॥ महतां पंचभूतानां विश्वोविश्वमचिंतयत् ॥२॥

अर्थ- नंतर संपूर्ण जगांत रहाणारा महा बलाढ्य व अतिबुद्धिमान् अशा त्या आपवानें लोकांस उत्पन्न करण्याच्या इच्छेनें पंच महाभूतांत सर्व जग उत्पन्न करावें असें मनांत आणिलें.

तस्यचिंतयमानस्य निर्वाते संस्थितेर्णवे ॥ निराकाशेतोयमये सूक्ष्मे जगतिगव्हरे ॥३॥ ईषत्संक्षोभयामाससोर्णवं सलिलाश्रयः ॥

अर्थ- असें तो आपव मनांत चिंतन करीत असतां वायु नाहींसा होऊन समुद्राची स्थिति स्थिर झाली आणि सर्वत्र जलमय झालें यामुळें सूक्ष्म जगरूप गुहेंत अवकाश नसल्या कारणानें त्या भगवंतानें उदकाच्या आश्रयानें समुद्रास किंचित् क्षोभ उत्पन्न केला.

अनंतरोर्मिभिः सूक्ष्ममथच्छिद्रमभूत्पुरा ॥४॥ शब्दं प्रति तदोद्भूतो मारुतश्छिद्रसंभवः ॥

अर्थ- नंतर त्या समुद्रांत उत्पन्न झालेल्या लहरींच्या योगानें पूर्वी सूक्ष्म छिद्र झालें तेव्हां त्या छिद्रांत शब्द उत्पन्न होण्या साठीं वायु उत्पन्न जाहला.

सलब्ध्वांतरमक्षोभ्यो व्यवर्धतसमीरणः ॥५॥ विवर्धताबलवता वेगाद्विक्षोभितोर्णवः ॥

अर्थ- तो वायु कधींही क्षोभ न पावणारा असून अवकाश मिळतांच वाढला तेव्हां त्या वृद्धिंगत झालेल्या बलाढ्य वायूच्या वेगानें पुनः तो समुद्र खवळला.

तस्यार्णवस्य क्षुब्धस्य तस्मिन्नंभसि मंथिते ॥६॥ कृष्णवर्त्मासमभवत्प्रभुर्वैश्वानरो महान् ॥

अर्थ- ते समयीं त्या खवळलेल्या समुद्राचें उदक बहुत हालतांच त्या घर्ष

णा पासून महासमर्थ वैश्वानर नामक अग्नि उत्पन्न झाला.

ततः सशोषयामास पावकः सलिलं बहु ॥ ७ ॥ क्षयाज्जल
निधेश्छिद्रमभवद्विस्तृतं नभः ॥

अर्थ- नंतर त्या अग्नीनें बहुत पाण्याचें शोषण केलें त्या योगानें समुद्राचा क्षय होतांच तेथें मोठें छिद्र होऊन आकाश विस्तीर्ण झालें.

आत्मतेजोद्भवाः पुण्या आपोमृतरसोपमाः ॥ ८ ॥ आका
शं छिद्रसंभूतं वायुराकाशसंभवः ॥

अर्थ- पश्चात् परमात्म्याच्या तेजानें अमृतासारखें मधुर पुण्य कारक उदक उत्पन्न झालें आणि पूर्वी झालेल्या छिद्रापासून आकाश, व त्याच्या योगानें वायू हे उत्पन्न झाले.

आभ्यां संघर्षणोद्भूतं पावकं वायुसंभवं ॥ ९ ॥ दृष्ट्वा प्री
तो महादेवो महाभूतविभावनः ॥

अर्थ- मग त्या वायूपासून उत्पन्न झालेला अग्नि उदक व वायू यांच्या संघर्षणानें प्रदिप्त झाला, हें पाहून महाभूतांस उत्पन्न करणारा व सर्व देवांत श्रेष्ठ असातो आपव संतुष्ट जाहला.

दृष्ट्वा भूतानि भगवा लोकसृष्ट्यर्थमुत्तमं ॥ १० ॥ ब्रह्म
णो जन्मसहितं बहुरूपो व्यचिंतयत् ॥

अर्थ- आणि अनंतरूपी परमात्म्यानें त्या पंच महाभूतांस पाहून ब्रह्मदेवाचें जन्म व सर्व लोकांची सृष्टि उत्तम रीतीनें कशी होईल असें चिंतन केलें.

चतुर्युगाभिसंख्याते सहस्रयुगपर्यये ॥ ११ ॥ बहुज
न्मविशुद्धात्म ब्रह्मणोहनि रुच्यते ॥ यत्पृथिव्यां द्विजें
द्राणां तपसा भावितात्मनां ॥ १२ ॥ ज्ञानं दृष्टं तु विश्वार्थे
योगिनां याति मुख्यतां ॥

अर्थ- नंतर चौकडीनें मोजलेल्या हजार युगांच्या फेरीचे दिवसीं बहुत जन्मानीं शुद्ध अंतःकरण झालेल्या ब्रह्मदेवास त्या आपवानें स्वतः विचारानें जाणलेलें संपूर्ण जगांच्या उपयोगि असें ज्ञान सांगितलें त्या ज्ञानानें तो ब्रह्मदेव तपानें शुद्ध अंतःकरण संपन्न सर्व ब्राह्मण व योगी यांत मुख्यत्व पावला.

तंयोगवंतंविज्ञाय संपूर्णैश्वर्यमुत्तमं ॥ १३ ॥ परेब्रह्मणि
विश्वेशंन्ययोजयनयोगवित् ॥

अर्थ:– आणि सर्व विश्वाचा नियंता व पूर्ण ऐश्वर्य युक्त असा ब्रह्मदेव योगसंपन्न झाला हें जाणून त्या योग वेत्त्या प्रभूनें त्यास ब्रह्मपदावर योजिलें.

ततस्तस्मिन्महातोयेमहीशोहरिरच्युतः ॥ १४ ॥ स्वयं-
क्रीडंश्चविधिवन्मोदतेसर्वलोककृत् ॥

अर्थ:– नंतर सर्व लोकांचा कर्ता पृथिवी पति, सर्वांचें दुःख हरण करणारा व नित्यै श्वर्य संपन्न असा तो भगवान् स्वतः त्या महा मलयोदकांत त्या काळा नुरूप क्रीडा करीत आनंदांत निमग्न असतो.

पद्मंनाभ्युद्भवंचैकंसमुत्पादितवांस्तदा ॥ १५ ॥ सहस्र
पर्णंविरजंभास्कराभंहिरण्मयं ॥

अर्थ:– ते समयीं त्या ईश्वरानें आपल्या नाभी पासून सूर्या सारख्या कांतीनें युक्त व निर्मल हजार पाकळ्यांनीं सुशोभित असें सोन्याचें एक कमळ उत्पन्न केलें.

हुताशनज्वलितशिखोज्वलत्प्रभमुपस्थितंशरदम-
लार्कतेजसं ॥ विराजतेकमलमुदारवर्चसंमहात्मन-
स्तनुरुहचारुदर्शनं ॥ १६ ॥

अर्थ:– नंतर त्या महात्म्या आपवाच्या शरीरा पासून उत्पन्न झालेलें सुंदर आकृतीनें युक्त, शरदृतूंतील निर्मल सूर्या प्रमाणें तेजस्वि व अग्नीच्या प्रदीप्त ज्वाले सारख्या कांतीनें शोभणारें असें तें उत्तम तेजःपुंज कमल त्या मलयोदकां तून वर येऊन शोभलें. इतिश्री मत्स्यपुराणे पद्मोद्भव प्रादुर्भावे-सप्त षष्ट्युत्तर शततमोध्यायः ॥ १६७ ॥

अध्याय १६८.

मत्स्यउवाच ॥ अथयोगवतांश्रेष्ठमसृजद्भूरितेजसं
॥ स्रष्टारंसर्वलोकानांब्रह्माणंसर्वतोमुखं ॥ १ ॥ यस्मि
न्हिरण्मये पद्मेबहुयोजनविस्तृते ॥

अर्थ:– मत्स्य बोलतात हे मनुराजा नंतर त्या ईश्वरानें बहुयोजनें विस्तीर्ण- अशा त्या सुवर्णाचे कमलांत तेजस्वी संपूर्ण लोकांच्या सृष्टि विषयीं समर्थ

व योगिजनांत श्रेष्ठ अशा चतुर्मुख ब्रह्मदेवास उत्पन्न केलें

सर्वतेजोगुणमयं पार्थिवैर्लक्षणैर्युतं ॥ २ ॥ तच्च पद्मं पुराणज्ञाः पृथिवीरूपमुत्तमं ॥ नारायणसमुद्भूतं प्रवदंति महर्षयः ॥ ३ ॥

अर्थ- तें नारायणापासून निर्माण झालेलें कमल पूर्ण तेज व गुण यानीं संपन्न असून पृथिवीच्या चिन्हानीं युक्त होतें त्या कमलास पुराणांचे ज्ञाते मोठे ऋषी उत्कृष्ट हें पृथिवीचें रूप आहे असें बोलतात.

यापद्मासा रसादेवी पृथिवीपरिचक्षते ॥ येपद्मसारगुरवस्तान्दिव्यान्पर्वतान्विदुः ॥ ४ ॥

अर्थ- ज्या पृथिवी देवीस पद्मा, रसा असें ह्मणतात, आणि जे या कमलाच्या जडांशानें मोठे गुरुभूत झाले त्यांस देवांचे पर्वत असें ह्मणतात.

हिमवंतंच मेरुंच नीलं निषधमेवच ॥ कैलासं मुंजवंतंच तथान्यंगंधमादनं ॥ ५ ॥ पुण्यंत्रिशिखरंचैवकांतंमंदरमेवच ॥ उदयंपिंजरंचैवविंध्यवंतंच पर्वतं ॥ ६ ॥ एते देवगणानांच सिद्धानांच महात्मनां ॥ आश्रयाः पुण्यशीलानां सर्वकाम फलप्रदाः ॥ ७ ॥

अर्थ- ते असे कीं, हिमालय, मेरु, नील, निषध, कैलास, मुंजवान्, तसाच दुसरा गंधमादन, पुण्यकारक त्रिशिखर सुंदर मंदराचल, उदयाचल, पिंजर, विंध्याद्रि, हे पर्वत सर्व देवगणांस व पुण्यकारक शीलसंपन्न सिद्धांस आश्रय असून सर्वांस इच्छित फळें देणारे आहेत.

एतेषामंतरे देशो जंबुद्वीप इतिस्मृतः ॥ जंबुद्वीपस्य संस्थानं यज्ञियायत्रवैक्रिया ॥ ८ ॥

अर्थ- या पर्वतांच्या मध्यभागीं जो प्रदेश त्यास जंबुद्वीप ह्मणतात. ज्या प्रदेशांत यज्ञादिक कर्में होतात त्या प्रदेशापर्यंतच जंबुद्विपाची मर्यादा आहे.

एभ्योयस्त्रवते तोयं दिव्यामृतरसोपमं ॥ दिव्यास्तीर्थशताधाराः सुरम्याः सरितः स्मृताः ॥ ९ ॥

अर्थ- आणि या पर्वतांपासून सुंदर अमृतासारखें मधुर जें उदकाचे प्रवाह वाहतात त्याच शतावधि तीर्थांस आधारभूत अत्यंत रमणीय अशा

दिव्य नद्या असंख्यात झाल्या आहेत.

स्मृतानि यानि पद्मस्य केसराणि समंततः ॥ असंख्येयाः पृथिव्यास्ते विश्वेवे धातुपर्वताः ॥ १० ॥

अर्थ- तसेच त्या कमलाच्या समोंवतीं चे जे केसर ते सर्व पृथ्वीवर असंख्यात गेरिकादि धातूनीं युक्त असे पर्वत झाले.

यानि पद्मस्य पर्णानि भूरीणि तु नराधिप ॥ ते दुर्गमाः- शैलचिताम्लेंछदेशा विकल्पिताः ॥ ११ ॥

अर्थ- हे राजा जी त्या कमलाचीं बहुत पानें ते इतरांस जाण्या विषयीं अवघड असे डोंगर कठाडीचे म्लेंछ देश झाले.

यान्यधोभागपर्णानि ते निवासास्तु भागशः ॥ दैत्यानामुरगाणांच पतंगानांच पार्थिव ॥ १२ ॥

अर्थ- हे राजा तशीच जी त्या कमलाचीं खालच्या बाजूचीं पानें ती दैत्य सर्प आणि पक्षी यांचीं रहाण्याचीं स्थानें समजावीं.

तेषां महार्णवो यत्र तद्रसेत्यभिसंज्ञितं ॥ महापातककर्माणो मज्जंते यत्र मानवाः ॥ १३ ॥

अर्थ- आणि जेथें महासमुद्र आहे तेथें त्या दैत्यनागादिकांचें जें स्थान तें रसातल या नामानें प्रसिद्ध आहे त्याठिकाणीं महापातकी मानव बुडतात.

पद्मस्यांतरतोयत्तदेकार्णवगतामही ॥ प्रोक्ताथ दिक्षु सर्वासु चत्वारः सलिलाकराः ॥ १४ ॥

अर्थ- पूर्वी प्रलय कालीं कमलाच्या आंतली पृथ्वी प्रलय समुद्रांत बुडालेली होती नंतर सृष्टिकालीं या पृथ्वीच्या चारी दिशांस मिळून चार समुद्र असतात.

एवं नारायणस्यार्थे मही पुष्करसंभवा ॥ प्रादुर्भावोप्ययं तस्मान्नाम्ना पुष्करसंज्ञितः ॥ १५ ॥

अर्थ- या प्रमाणें नारायणाचे सृष्टिरूप कार्या साठीं ही चतुर्दश भुवनाकार पृथ्वी, विष्णूच्या नाभिकमला पासून उत्पन्न झाली ह्मणून त्यास पद्मकल्प असें ह्मणतात.

एतस्मात्कारणात्तज्ञैः पुराणैः परमर्षिभिः ॥ याज्ञियैर्वेददृष्टांतैर्यज्ञे पद्मविधिः स्मृतः ॥ १६ ॥

अर्थ- या कारणास्तव ज्ञाते पुरातन मोठ्या ऋषीनीं यज्ञसंबंधी वेदांतल्या द्द्यांतानीं यज्ञ कांडांत ही लोकरूप कमलाची रचना सांगितली आहे.

एवंभगवतानेन विश्वस्याधरयाविधिः॥ पर्वतानांनदीनां चन्ह्रदानांचैवनिर्मितः॥१७॥

अर्थ- या प्रमाणें त्या भगवंतानें सर्व पृथिवीच्या योगानें पर्वत, नद्या व डोह यांची रचना निर्माण केली.

विभुस्तथैवाप्रतिमप्रभावः प्रभाकराभोवरुणासितद्युतिः॥ शनैःस्वयंभूःशयनंसृजत्तदा जगन्मयंपद्मविधिं महार्णवे॥१८॥

अर्थ- सूर्या सारखा तेजस्वी असून वरुणा समान नीलकांतीनें सुशोभित, अप्रतिम सामर्थ्यानें युक्त व्यापक व स्वयंभू अशा प्रभूनें महासमुद्रांत सर्व जगाचे स्थान होऊन, ज्यांत असें कमल त्या कालीं सहज लीलेनें उत्पन्न केलें. इति श्री मत्स्यपुराणें पद्मोद्भवप्रादुर्भावे अष्टषष्ट्युत्तर शततमो ध्यायः १६८

अध्याय १६९.

मत्स्यउवाच॥ विघ्नस्तपसिसंभूतो मधुर्नाममहासुरः॥ तेनैवचसहोद्भूतोरजसाकैटभःस्ततः॥१॥

अर्थ- मत्स्य बोलतात हे मनुराजा तपास विघ्न करणारा मोठा असुर मधुनामक दैत्य उत्पन्न झाला. त्या कालींच रजो गुणानें युक्त असा त्याच्याच बरोबर कैटभासुर ही उत्पन्न जाहला.

तौरजस्तमसौविघ्नसंभूतौ तामसौगणौ॥ एकार्णवेजगत्सर्वंक्षोभयंतौमहाबलौ॥२॥ दिव्यरक्तांबरधरौश्वेतदीप्ताग्रदंष्ट्रिणौ॥ किरीटकुंडलोदग्रौकेयूरवलयोज्वलौ॥३॥ महाविक्रमतामाक्षौ पीनोरस्कौमहाभुजौ॥ महागिरेःसंहननौजंगमाविवपर्वतौ॥४॥ नगमेघप्रतीकाशावादित्यसदृशाननौ॥ विद्युदाभौगदाग्राभ्यांकराभ्यामतिभीषणौ॥५॥ तौपादयोरत्नविन्यासादुत्क्षिपंताविवार्णवं॥ कंपयंताविवहरिं शयानंमधुसूदनं॥६॥ तौतत्रविचरंतौस्मपुष्करेविश्वतःमुखं॥ योगिनांश्रेष्ठ

मासाद्यदीसंददृशतुस्तदा॥ ७॥ नारायणसमासाज्ञा तं-
सृजंतमखिलाः प्रजाः॥ दैवतानिचविश्वानिमानसानस्क
रानृषीन्॥ ८॥

अर्थ- ते मधुकैटभ दैत्य असे कीं, रज व तम या गुणानीं युक्त असल्यामुळें केवल महा बलाढ्य तामस विग्रमूर्तीनें उत्पन्न झाले असून त्या महा प्रलय समुद्रांतील सर्व जगास क्षोभ उत्पन्न करणारे (त्रास देणारे) होते; आणि उत्तम तांबडे पीतांबर नेसले असून त्यांच्या दाढांचे अग्रभाग शुभ्र व लखलखीत होते; तसेंच उत्कृष्ट मुगुट, कर्णकुंडलें, बाहुभूषणें, व कडीतोडे या भूषणानीं ते शोभत असत. त्याचप्रमाणें ते महापराक्रमी असून त्यांचे नेत्र आरक्त, वक्षस्थलें मोठीं व भुज मोठे होते आणि त्यांचे देह महापर्वतासमान कठिण असून चालणाऱ्या पर्वता सारखे असत; तसेंच ते दैत्य पर्वतावरील मेघाप्रमाणें कृष्णवर्ण दिसत असून सूर्या सारख्या तेजस्वी मुखानें शोभत असत; आणि ते असुर विजे सारिखे देदीप्यमान असून अग्राशीं धरलेल्या गदायुक्त हातानीं अतिभयंकर व आपले पाय उचलून टेवल्या बरोबर समुद्रास उडवूनच देत आहेत कीं काय? आणि त्या उदकांत शयन करणाऱ्या भक्त दुःख निवारक मधुसूदनास कांपवीतच आहेत कीं काय? अशा वेगानें ते मधु, कैटभ दैत्य त्या कमलांत संचारकरीत असतां, त्यानीं तेथें त्या कालीं नारायणाच्या आज्ञेनें सर्व देव, असुर व सनकादिक मानस पुत्र व अवांतर नारद प्रमुख ऋषि इत्यादिक संपूर्ण प्रजा उत्पन्न करणारा योगिश्रेष्ठ महा तेजस्वी अशा चतुर्मुख ब्रह्मदेवासमीप येऊन त्यास पाहिलें.

ततस्तावूचतुस्तत्र ब्रह्माणमसुरोत्तमौ॥ दीप्तौ मुमूर्षू संक्रुद्धौ रोषव्याकुलितेक्षणौ॥ ९॥

अर्थ- नंतर सर्व असुरांत श्रेष्ठ मोठे तेजस्वी असून शीघ्रच मृत्युमुखांत जाणारे ते दैत्य मोठे क्रुद्ध होत्साते रोषानें नेत्र वटारून ते समयीं ब्रह्मदेवास बोलतात.

कस्त्वं पुष्करमध्यस्थः सितोष्णीषश्चतुर्भुजः॥ आधाय-
नियमं मोहादास्ते त्वं विगतज्वरः॥ १०

अर्थ- कीं, हे चतुर्भुज पुरुषा तूं पांढरें पागोटें घालून स्वस्थ चित्त होत्साता अज्ञानानें नियम करून या कमलाच्या मध्यभागीं रहाणारा असा कोण आहेस?

एत्याग च्छावयोर्युद्धं देहि त्वं कमलोद्भव ॥ आवाभ्यां पर मीशाभ्यामशक्तस्त्वमिहार्णवे ॥ ११ ॥

अर्थ- तर हे कमलोत्पन्न पुरुषा आतां तूं आह्माशीं युद्धास ये परंतु या महासमुद्रांत आह्मा अतिबलिष्ठांशीं युद्ध करण्या विषयीं तूं अशक्त आहेस.

तत्र कश्चोद्भवस्तुभ्यं केन वासि नियोजितः ॥ कः स्त्रष्टा कश्च तेगोप्ता केन नाम्ना विधीयसे ॥ १२ ॥

अर्थ- आणि त्या कमळांत तुझें उत्पत्ति स्थान कोणतें याकमळाच्या आधिपत्या विषयीं तुला कोणी योजिलें तुझी उत्पत्ति व रक्षण करणारा कोण आहे? व लोकांत तुझें कोणतें नाम प्रसिद्ध आहे?

ब्रह्मोवाच ॥ एक इत्युच्यते लोके रविर्नित्यः सहस्त्रदृक् ॥ तत्संयोगन भवतोः कर्म नामावगच्छतां ॥ १३ ॥

अर्थ- नंतर ब्रह्मदेव बोलतात कीं, दैत्यहो लोकांनीं चिंतन करण्यास अशक्य व अनंत नेत्राचीं सत्तो भिन असा एकच ईश्वर जो वेदादिकांत वर्णिला आहे त्याच्या संबंधानें तुह्मास कर्म व नाम हीं प्राप्त झालीं आहेत असें समजा.

मधुकैटभावूचतुः ॥ नावयोः परमं लोके किंचिदस्ति महामते ॥ आवाभ्यां छाद्यते विश्वं तमसा रजसाथवै ॥ १४ ॥

अर्थ- पश्चात् मधु, कैटभ बोलतात हे ब्रह्मदेवा तूं मोठा बुद्धिमान् आहेस, यास्तव आमचें वचन ऐक; या लोकांत आह्माहून इतर श्रेष्ठ वस्तु कांहीं एक नाहीं, आणि आह्मीच रज व तम या गुणानीं विश्वाचें आच्छादन करितों.

रजस्तमोमयावावामृषीणामवलंघितौ ॥ छाद्यमानौ धर्मशीलौ दुस्तरौ सर्वदेहिनां ॥ १५ ॥

अर्थ- आणि आह्मीं राजस व तामस यास्वभावानींयुक्त असल्या मुळें ऋषींचा उपमर्द करणारे व संपूर्ण प्राण्यांस अजिंक असें असून आमचा धर्मशीलपणा गुप्त आहे.

आवाभ्यामुह्यते लोको दुष्कराभ्यां युगे युगे ॥ आवामर्थश्च कामश्च यज्ञः स्वर्गपरिग्रहः ॥ १६ ॥

अर्थ- तसेंच आमच्या अद्भुत सामर्थ्यानें प्रति युगीं लोकांची स्थिति चाललें आणि आह्मीच अर्थ, काम, यज्ञ व स्वर्गाचा अंगीकार करणारे असे आहोंत.

सुखंयत्रमुदायुक्तंयत्रश्रीःकीर्तिरेवच ॥ येषांयत्कांक्षि
तंचैवतत्तदावांविचिंतय ॥ १७ ॥

अर्थ— त्याच प्रमाणें जेथें आनंदयुक्त सुख, संपत्ती व कीर्ती त्या गोष्टी आहेत-त्यांतील जें इच्छितफल आहे तें आह्मां पासूनच प्राप्त होतें असें समज.

ब्रह्मोवाच ॥ यत्नाद्योगवतो दृष्ट्या योगः पूर्वमयार्जितः
॥ त्वं समाधाय गुणवत्सत्वंचास्मिसमाश्रितः ॥ १८ ॥

अर्थ— नंतर ब्रह्मदेव बोलले कीं, दैत्यहो योगनियंत्या त्या रूपा दृष्टीनें म्या यत्नें करून पूर्वी योग संपादन केला त्याच्या आश्रयानेंच गुण व धैर्य मलाप्राप्त झालें.

यः परोयोगमतिमान्योगाख्यः सत्वमेवच ॥ रजसस्तम
सश्चैवयस्त्रष्टा विश्वसंभवः ॥ १९ ॥

अर्थ— आणि जो सर्वांत श्रेष्ठ, योग ज्ञान संपन्न योग व सत्व यांची केवळ मूर्ती व रज व तम यांस उत्पन्न करणारा व ज्या पासून विश्व उत्पन्न होतें.

ततो भूतानिजायंते सात्विकानीतराणिच ॥ सएवहियु
वांनाशे वशी देवो हनिष्यति ॥ २०

अर्थ— त्या पासून सर्व सात्विक राजस व तामस भूतें उत्पन्न होतात; तोच स्व तंत्र देव तुमच्या नाशा विषयीं प्रवृत्त होऊन तुह्मास मारील.

स्वपन्नेवततः श्रीमान्बहुयोजनविस्तृतं ॥ बाहुंनाराय-
णोब्रह्मकृतवानात्ममायया ॥ २१ ॥

अर्थ— असें ब्रह्मदेव बोलत आहेतों इतक्यांत सर्व गुण परिपूर्ण श्रीमान् अशा त्या शयन केलेल्या नारायणानें तेथूनच आपल्या मायेनें आपला हात बहुत योजनें लांब केला.

कृष्यमाणौततस्तस्य बाहुना बाहुशालिनः ॥ चेरतुस्तौ
विगलितौ शकुनाविवपीवरौ ॥ २२ ॥

अर्थ— नंतर त्या महाभुजानीं शोभणाऱ्या नारायणाच्या हातानें ओढलेले ते मधु,कैटभ दैत्य झाडा वरून ग्लान होऊन पडलेल्या पक्ष्या प्रमाणें संचार करूं लागले.

ततस्तावाहतुर्गत्वा नदा देवंसनातनं ॥ पद्मनाभंहृषी-

केशंप्रणिपत्यस्थितावुभौ ॥ २३ ॥

अर्थ- नंतर ते दोघे दैत्य कमळासारख्या नाभीनें सुशोभित सकल इंद्रियांचा चालक व अनादि अशा देवाजवळ जाऊन त्यास नमस्कार करून उभे राहून त्यादेवास बोलतात.

जानीवस्त्वां विश्वयोनिं त्वामेकं पुरुषोत्तमं ॥ त्वमावांपाहिहे त्वर्थमिदंनौ बुद्धिकारणं ॥ २४ ॥

अर्थ- कीं, हे देवा तूं सर्व पुरुषांत उत्तम असून चराचर विश्वास उत्पन्न करणारा व आमच्या बुद्धीस ही कारण असें आह्मी तुला जाणतों. यास्तव तूं आमचें संरक्षण कर आणि हें आमचें भाषण कांहीं कारणार्थ आहे.

अमोघदर्शनः सत्वं यतस्त्वां विद्मशाश्वतं ॥ ततस्त्वामागतावावामभितः प्रसमीक्षितुं ॥ २५ ॥

अर्थ- हे देवा तुझें दर्शन कदापि व्यर्थ होत नाहीं तस्मात् आह्मीं तुला अनादि असें जाणतों; आणि त्याच कारणानें आह्मीं तुला पहावें एतदर्थ तुझ्यासमीप आलों

तदिच्छामो वरंदेव त्वत्तोद्भुतमरिंदम ॥ अमोघदर्शनोसि त्वंनमस्ते समितिंजय ॥ २६ ॥

अर्थ- आणि हे देवा आह्मीं तुजपासून निष्फळ अद्भुत वर इच्छितों कारण तूं रणांत शत्रूंस जिंकणारा असून तुझें दर्शन सर्वदा सफळच आहे ह्मणून आह्मीं तुला नमस्कार करितों.

श्रीभगवानुवाच ॥ किमर्थमद्भुतं ब्रूथ वरं त्वसुरसत्तमौ ॥ दत्तायुष्कौ पुनर्भूयो रहो जीवितुमिच्छथः ॥ २७ ॥

अर्थ- तेव्हां भगवान् बोलले कीं, असुरश्रेष्ठहो तुह्मीं अद्भुत वर किमर्थ मागतां आणि तुह्मास आयुष्य दिलें असून तुह्मीं वारंवार एकांतीं जिवंत रहाण्याची इच्छा कां करतां तें सांगा?

मधुकैटभावूचतुः ॥ यस्मिन्न कश्चिन्मृतवान् देवतस्मिन्प्रभो वधं ॥ तमिच्छावो वधं चैव त्वत्तो नोस्तु महाव्रत ॥ २८ ॥

अर्थ- ते समयीं मधुकैटभ बोलले हे देवा तूं भक्त संरक्षण व्रताविषयीं तत्पर-

असून समर्थ आहेस यास्तव ज्या स्थानीं कोणी मृत्यु पावला नाहीं त्या स्थानीं आमचा वध असावा, आणि तो तुझ्यापासूनच व्हावा.

श्रीभगवानुवाच॥ बाढंयुवांतुमवरौभविष्यत्कालसंभवे॥
भविष्यतोनसंदेहःसत्यमेतद्ब्रवीमिवाम्॥ २९॥

अर्थ–त्याकाळीं श्रीभगवान् बोलले दैत्यहो फार सुंदर आहे; तुम्ही भविष्यकाल च्या सृष्टींत मोठे श्रेष्ठ उत्पन्न व्हाल यांत संशय नाहीं हें मी तुम्हांस सत्य सांगतों.

वरंमदायांथमहासुराभ्यांसनातनोविश्ववरःसुरोत्तमः र
जस्तमोवर्गभवायनोयमौममंथतावूरुतलेनवैप्रभुः॥ ३०॥

अर्थ–असें बोलून सर्वांत पुरातन, जगांतश्रेष्ठ देवोत्तम अशा त्या प्रभूनें त्या मोठ्या असुरांसवरदेऊन नंतर राजस व तामस या लोकांचे आश्रयभूत अशा त्या उभयतां मधु व कैटभ दैत्यांस मांडी खालीं दाबून मारिलें.– इतिश्री मत्स्यपुराणे पद्मोद्भवप्रादुर्भावे नवषष्ठ्युत्तरशततमोध्यायः १६९

अध्याय १७०वा.

मत्स्यउवाच स्थिताचतस्मिंस्तुमुखेब्रह्माब्रह्मविदांवरः
ऊर्ध्वबाहुर्महातेजास्तपोघोरंसमाश्रितः १ प्रज्वलन्नि-
वतेजोभिर्भाभिःस्वाभिस्तमोनुदः बभासेसर्वधर्मस्थः
सहस्रांशुरिवांशुभिः २

अर्थ–मत्स्यरूपी भगवान् बोलले हे मनुराजा, किरणांनीं अंधकारास दूरकरणाऱ्या सूर्याप्रमाणें आपल्या कांतीनें सुशोभित असून ब्रह्मज्ञान्यांत श्रेष्ठ महा तेजस्वी त्या विशाल कमलांत राहून वर हात करून उग्रतप करणारा असा ब्रह्मदेव स्वकीय तेजांनीं देदीप्यमान असून सर्व धर्मांत तत्पर अशी आपली स्थिति करून शोभत होता.

अथान्यद्रूपमास्थायशंभुर्नारायणोव्ययः आजगाममहा
तेजायोगाचार्योमहायशाः ३ सांख्याचार्योहिमतिमान्
कपिलोब्राह्मणोवरः उभावपिमहात्मानौस्तुवंतौतत्त्वतत्
परौ ४ तौप्रासावूचतुस्तत्रब्रह्माणममितौजसम् परा
वरविशेषज्ञौपूजितौचमहर्षिभिः ५

अर्थ–नंतर ज्यापासून जगाचें कल्याण होतें असा नारायण दुसरें रूप घेऊन

नाशरहित महा तेजस्वी असून पूर्ण यशस्वी त्या सर्व योगमार्गप्रदर्शक आचार्यांच्या स्वरूपानें आला. तसाच अति बुद्धिमान् व ब्राह्मणांत श्रेष्ठ असा सांख्यमत प्रवर्तकाचार्य कपिलही आला, असे ते उभयतांही मोठाले कारण व कार्य यांतील विशेष जाणणारे म्हणूनच या शरीर क्षेत्राचे ज्ञाते याच कारणावरून सर्व महर्षींनीं पूजित ते योगाचार्य व सांख्याचार्य हे त्या स्थानीं येऊन त्या अपरिमित तेजस्वी ब्रह्मदेवाची स्तुति करीत होत्साते त्यास बोलतातः

ब्रह्मात्मदृढबंधश्चविशालोजगदास्थितः ग्रामणीःसर्व भूतानांब्रह्मात्रैलोक्यपूजितः ६

अर्थ- कीं हे ब्रह्मदेवा तुझें ज्ञान विशाल असल्या मुळें तुझ्या मनाचें प्रेमबंधन ब्रह्मा विषयीं दृढ असून तूंच सर्व जगांत व्यापून राहिला आहेस आणि तूं सर्व प्राणिमात्रांस योग्यतानुरूप ज्ञानादिक साधन देऊन मोक्षादिक गतीस नेतोस. म्हणून त्रैलोक्यांतील लोक तुझी पूजा करितात.

तयोस्तद्वचनंश्रुत्वाविप्रोप्याह्तयोगवित् त्रीनिमान्कृत वान्लोकान्यथेयंब्रह्मणःश्रुतिः ७

अर्थ- असें तें सांख्याचार्य व योगाचार्य यांचें भाषण ऐकून वेदादिकांत सांगितलेल्या योगास जाणणाऱ्या ब्रह्मदेवानें हे तीन लोक उत्पन्न केले ही गोष्ट वेदांत प्रसिद्ध आहे.

पुत्रंचसंभवेच्चैकंसमुत्पादितवानृषिः तस्याग्रेवाग्यत स्तस्थौब्रह्माणमजमव्ययं ८

अर्थ- नंतर ब्रह्मदेवानें सृष्टी साठीं प्रथमतःएक पुत्र उत्पन्न केला. तो पुत्र जन्मनाशरहित अशा ब्रह्मदेवा पुढें मौन धरून उभा राहिला.

सोत्पन्नमात्रोब्रह्माणमुक्तवान्मानसःसुतः किंकुर्मस्त वसाहाय्यंब्रवीतुभगवानृषिः ९

अर्थ- तो ब्रह्मदेवाचा मानसपुत्र उत्पन्न होण्या बरोबर त्यांस बोलला कीं, मी तुमचें कोणतें सांहाय्य करावें? तें मला आपण सांगावें.

ब्रह्मोवाच यएषकपिलोब्रह्म नारायणमयस्तथा वदतेभवतस्तत्वंतत्कुरुष्वमहामते १०

अर्थ- ते समर्थ ब्रह्मदेव बोलले मुला तूं मोठा बुद्धिमान् आहेस यास्तव आतां जो

हा परब्रह्म कपिल रूपी नाराण तुझा जें तत्त्व सांगेल तें तूं कर.

ब्रह्मणास्तु तदर्थं तु तदा भूयः समुत्थितः ॥ शुश्रूषुर स्मि युवयोः किं करोमि कृतांजलिः ॥ ११ ॥

अर्थ- असें तें ब्रह्मदेवाचें भाषण ऐकून तो ब्रह्मपुत्र पुनः त्या काळीं उठला- आणि हात जोडून बोलला कीं, मी सेवा करून तुह्मापासून तत्त्व ज्ञान श्रवण कर- ण्याच्या इच्छेनें आलों आहें; तर आतां मी आपली सेवा काय करूं, त्याविषयीं आ- पण मला आज्ञा करावी.

श्रीभगवानउवाच ॥ यत्सत्यमक्षरं ब्रह्मन् नष्टादशविधं तु तत् ॥ यत्सत्यं यद्दतं तत्तु परं पदमनुस्मर ॥ १२

अर्थ- तेव्हां भगवान् बोलतात हे ब्राह्मणा जें कधींही नाशास न पावणारें सत्य भूत वस्तु तें अठरा प्रकारचें आहे त्यासच सर्वव्यापक ऋत ह्मणतात तेंच स- र्वांहून श्रेष्ठ स्थान आहे यास्तव तूं त्याचें सर्वदा स्मरण कर.

एतद्वचो निशम्यैव ययौ स दिशमुत्तरां ॥ गत्वा च तत्र ब्रह्मत्वमगमत् ज्ञानतेजसा ॥ १३

अर्थ- हें वचन ऐकतांच तो ब्रह्मदेवाचा मानस पुत्र उत्तर दिशेस जाऊन ते- थें ज्ञानाच्या तेजानें ब्रह्मत्व पावला.

ततो ब्रह्मा ऋतं नाम द्वितीयमसृजत्प्रभुः ॥ संकल्पयि त्वा मनसा तमेव च महात्मना ॥ १४ ॥

अर्थ- नंतर समर्थ ब्रह्मदेवानें मोठ्या उदार मनाच्या संकल्पापासून त्या प्र- थम पुत्राचे स्थानीं दुसरा ऋत नामक पुत्र उत्पन्न केला.

ततः सोथ ब्रवीद्वाक्यं किं करोमि पितामह ॥ पितामह- समाज्ञातो ब्रह्माणं समुपस्थितः ॥ १५

अर्थ- नंतर तो ऋतनामक पुत्र ब्रह्मदेवास बोलला हे विश्व पितामहा मी तुमचें कोणतें कार्य करूं; अशी ब्रह्मदेवास विनंती करून तो ब्रह्मपुत्र ऋत त्याच्या आ- ज्ञेनें कपिल महामुनी जवळ आला.

ब्रह्माभ्यासं तु कृतवान् ऋत श्च पृथिवीं गतः ॥ प्राप्तश्च परमं स्थानं सनयोः पार्श्वमागतः ॥ १६

अर्थ- आणि तो ऋतनामक ब्रह्मपुत्र, सांख्याचार्य व योगाचार्य यांच्या समीप

जाऊन तेथें पृथिवीवर वेदाभ्यास करून उत्तम मोक्षस्थानास गेला.

तस्मिन्नपि गते पुत्रे तृतीयमसृजत्प्रभुः ॥ सांख्यप्रवृत्तिकुशलं भूर्भुवं नामतो विभुं ॥ १७ ॥ गोपतित्वं समासाद्य तयोरेवागमद्गतिं ॥

अर्थ- तोहि पुत्र गेल्यानंतर समर्थ ब्रह्मदेवानें सांख्यमताची लोकांत प्रवृत्ति करण्याविषयीं कुशल व सर्व विषयांत व्यापक असा भूर्भुव नांवाचा तिसरा पुत्र उत्पन्न केला त्यानें संपूर्ण वेदाचें अभ्यासानें रक्षण करून आपल्या त्या दोघां बंधूंची गति संपादन केली.

एवं पुत्रास्त्रयो प्येते उक्ताः शंभोर्महात्मनः ॥ १८ ॥ तान् गृहीत्वा सुतांस्तस्य प्रयातः स्वार्जितां गतिं ॥ नारायणश्च भगवान् कपिलश्च यतीश्वरः ॥ १९ ॥

अर्थ- असे हे विश्वकल्याण करणाऱ्या महा तेजस्वी ब्रह्मदेवाचे तिन्ही पुत्र सांगितले. अशाप्रकारच्या संपूर्ण जग कल्याण कारक महाबुद्धिमान् ब्रह्मदेवाच्या तिनी हीसत्पुत्रांस घेऊन भगवान् नारायण यतींचा नियंता कपिल हे उभयतां आपण संपादन केलेल्या गतीस गेले.

यं कालं तौ गतौ मुक्तौ ब्रह्मा तं कालमेव हि ॥ ततो घोरतमं भूयः संश्रितः परमं व्रतं ॥ २० ॥

अर्थ- असे ते उभयतां ज्या काली आपल्या पुत्रांस घेऊन मुक्तिस्थानास गेले, त्याच कालापासून ब्रह्मदेवानें पूर्वीपेक्षां अत्यंत उग्र असून उत्तम अशा व्रताचा पुनः आश्रय केला.

नरेमेथ ततो ब्रह्मा प्रभुरेकस्तपश्चरन् ॥ शरीरात्तां ततो भार्यां समुत्पादितवान्शुभां ॥ २१ ॥ तपसा तेजसा चैव वर्चसा नियमेन च ॥ सदृशीमात्मनो देवीं समर्थां लोकसर्जने ॥ २२ ॥

अर्थ- तरी तो समर्थ ब्रह्मदेव तेथें तप करीत एकाकीच राहिल्यामुळें त्याचें चित्त रमेना, ह्मणून नंतर त्याणें आपल्या देहापासून एक उत्तम स्त्री उत्पन्न केली, ती देवी तप, तीक्ष्ण तेज, सौम्यकांती व नियम इत्यादि गुणानीं आपणासारखी असून सर्वलोकांस उत्पन्न करण्याविषयीं समर्थ होती

तथासमाहितस्तत्ररेमेब्रह्मातपश्चरन् ॥ सृजन्प्रजानां पतयः सागरांश्चासृजद्विभुः ॥ २३

अर्थ- नंतर तो ब्रह्मदेव तसेंच तप करीत असून त्या भार्येशीं रमूं लागला, असतां त्या समर्थ ब्रह्मदेवा पासून सर्व कश्यपादिक प्रजापति व समुद्र उत्पन्न झाले.

ततोऽजगादत्रिपदांगायत्रींवेदपूजितां ॥ अपरांश्चैवचतुरोवेदान्गायत्रिसंभवान् ॥ २४ ॥ आत्मनः सदृशान्पुत्रानसृजद्वैपितामहः ॥ विश्वेप्रजानांपतयोयेभ्योलोकाविनिःसृताः ॥ २५

अर्थ- पश्चात् ब्रह्मदेवानें सर्ववेदपूजित असून तीन चरण युक्त गायत्री व तिज पासून झालेले च्यार वेद यांचें उच्चारण केलें, आणि त्या लोकपितामह ब्रह्मदेवानें आपणा समान कांहीं पुत्र उत्पन्न केले ते प्रजापति असून त्यां पासून संपूर्ण लोक उत्पन्न झाले.

विश्वेशंप्रथमंतावन्महातापसमात्मजं ॥ सर्वमंत्रहितंपुण्यंनाम्नाधर्मंससृष्टवान् २६

अर्थ- त्यांत त्यानें विश्वाचा स्वामी, महातपस्वी सर्व मंत्रास हित कारक व पुण्यरूप असा धर्मनामक पुत्र प्रथमतः उत्पन्न केला.

दक्षंमरीचिमत्रिंच पुलस्त्यं पुलहं क्रतुं ॥ वसिष्ठंगौतमंचैवभृगुमंगिरसंमनुं २७ अथैवाद्भुतमित्येतेज्ञेयाः पैतामहर्षयः ॥ त्रयोदशगुणांधर्ममालभंतमहर्षयः २८

अर्थ- तसेच दक्ष, मरीचि, अत्रि, पुलस्त्य, पुलह, क्रतु, वसिष्ठ, गौतम, भृगु, अंगिरा, स्वायंभुवमनु हे ब्रह्मदेवा पासून उत्पन्न झालेले मोठे ऋषि असून त्यानीं त्रयोदश गुणयुक्त अद्भुत धर्म संपादन केला.

अदितिर्दितिर्दनुः काला अनायुः सिंहिका मुनिः ॥ ताम्रा क्रोधाथसुरसाविनताकद्रुरेवच ॥ २९ ॥ दक्षस्यापत्यमेतावैकन्याद्वादशपार्थिव ॥

अर्थ- आतां हे मनुराजा अदिति, दिति, दनु, काला, अनायु सिंहिका, मुनि, ताम्रा, क्रोधा, सुरसा, विनता, व कद्रु ह्या दक्षप्रजापतीस बारा कन्या झाल्या.

मरीचेः कश्यपः पुत्रस्तपसा निर्मितः किल ॥३०॥ तस्मै
कन्या द्वादशान्याद्दक्षस्ताः प्रददौ तदा ॥

अर्थ- त्या आपल्या बारा कन्या दक्षानें मरीचि ऋषीस तपानें झाले त्या कश्यपास त्या कालीं दिल्या.

नक्षत्राणि च सोमाय तदा वैवस्वतान्नृप ॥३१॥ रोहिण्यादीनि सर्वाणि पुण्यानि रविनंदन ॥

अर्थ- हे सूर्यनंदना मनुराजा आणि तेसमयीं दक्षानें रोहिणी आदिकरून पुण्यवंत नक्षत्र रूप सर्व कन्या चंद्रास दिल्या.

लक्ष्मी मरुत्वती साध्या विश्वेशा च मता शुभा ॥३२॥ देवी सरस्वती चैव ब्रह्मणा निर्मिताः पुरा ॥ एताः पंचवरिष्ठा वै सुरश्रेष्ठाय पार्थिव ॥३३॥ दत्ता भद्राय धर्माय ब्रह्मणा दृष्टकर्मणा ॥

अर्थ- हे राजा तशाच लक्ष्मी, मरुत्वती, साध्या, शुभकारक विश्वेशा व सरस्वती त्या पांच कन्या पूर्वीं ब्रह्मदेवानीं उत्पन्न करून त्या उत्तम कन्या अदृष्ट कर्मानें देवश्रेष्ठ कल्याण कारक अशा धर्मास दिल्या.

या रूपार्थवती पत्नी ब्रह्मणः कामरूपिणी ॥३४॥ सुरभिः सा हिता भूत्वा ब्रह्माणं समुपस्थिता ॥

अर्थ- तशीच इच्छितरूपें धारण करणारी ब्रह्मदेवाची पत्नी, हितकारक सौंदर्य युक्त होऊन ब्रह्मदेवा समीप आली.

ततस्तामगमद्ब्रह्मा मैथुनं लोकपूजितः ॥ ३५॥ लोकसर्जनहेतुज्ञो गवामर्थाय सत्तमः ॥

अर्थ- तेव्हां सर्व लोकानीं पूजित असून लोक उत्पन्न करण्याच्या हेतूचे ज्ञाते श्रेष्ठ ब्रह्मदेव त्या कालीं जीवांच्या कार्यार्थ त्या आपल्या स्त्रीशीं मैथुनार्थ प्रवृत्त झाले.

जज्ञिरे च सुतास्तस्यां विपुला धूमसन्निभाः ॥३६॥ नक्तसंध्याभ्रसंकाशाः प्रादहंस्तिग्मतेजसः ॥

अर्थ- तेणें करून त्या स्त्रीचे उदरीं धूम्रवर्ण बहुत पुत्र झाले; ते सायंकालच्या मेघा समान कांहीं ताम्रवर्ण ही असून आपल्या तीक्ष्ण तेजानें सर्व जगत्रयास जाळूं लागले.

तेरुदंतोद्रवंतश्चगर्हयंतः पितामहं ॥३७॥रोदनाद्द्रवणाच्चै वरुद्रा इतिततः स्मृताः ॥

अर्थ— आणि ते ब्रह्मपुत्र रुदन करीत इतस्ततः धांवत असून ब्रह्मदेवाची निंदा करूं लागले तेव्हां त्यांस रडणें व पळणें यावरून रुद्र हें नाम पडलें.

निर्ऋतिश्चैवशंभश्चैवतृतीयश्चापराजितः॥३८॥ मृगव्याधः कपर्दीचदहनोथखरश्चवै ॥अहिर्बुध्न्यश्चभगवान्कपालीचापि पिंगलः ॥ ३९ ॥सेनानीश्चमहातेजारुद्रास्त्वेकादशस्मृताः॥

अर्थ— ते असे कीं, निर्ऋति १, शंभ २, तिसरा अपराजित ३, मृगव्याध ४, कपर्दी ५, दहन ६, खर ७, अहिर्बुध्न्य ८, भगवान् कपालि ९, पिंगल १०, व महा तेजस्वी सेनानी ११ हे एकादश रुद्र जाणावे.

तस्यामेवसुरभ्यांचगावोयज्ञेश्वराश्चवै ॥४०॥प्रकृष्टाश्चतथामायाः सुरभ्याः पशवोक्षराः ॥ अजाश्चैवतुहंसाश्चतथैवामृतमुत्तमं ॥ ४१॥ ओषध्यः प्रवरायाश्चसुरभ्याः स्ताः समुत्थिताः ॥

अर्थ— त्याच प्रमाणें गायी, यज्ञांतील प्रमुख देव तशाच उत्कृष्टमाया, नाशरहित पशु, शेळ्या, हंस तसेंच उत्तम अमृत, श्रेष्ठ औषधी हे सर्वही त्या सुरभिनामक ब्रह्मदेवाच्यापत्नीस जाहले.

धर्माल्लक्ष्मीस्तथाकामंसाध्यासाध्यान्व्यजायत ॥ ४२॥ भवंचप्रभवंचैवहीशंचासुरहंतथा ॥ अरुणंचारुणिंचैवविश्वावसुबलध्रुवौ ॥ ४३॥ हविष्यंचवितानंचविधानशमितावपि ॥वत्सरंचैवभूतिंचसर्वासुरनिषूदनं॥४४॥ सुपर्वाणंबृहत्कांतिःसाध्यालोकनमस्कृता ॥ तमेवानुगतादेवीजनयामाससेवसुरान् ॥ ४५॥

अर्थ— तसाच धर्मापासून लक्ष्मीदेवीस मदन व साध्यानांवाच्या स्त्रीस साध्यगण असे हे पुत्र उत्पन्न झाले; तसेंच भव, प्रभव असुरांस मारणारा ईश. अरुण्य, अरुणि, विश्वावसु, बल ध्रुव, हविष्य, वितान विधान, शमिता, वत्सर, भूति व सर्व असुरांस मारणारा सुपर्वा देव हे. धर्मापासून तेजःपुंज असूनसर्वलोकानीं-

वंदिले अशा त्या साध्येसच जाहले.

वरंवै प्रथमं देवं द्वितीयं ध्रुवमव्ययं ॥ विश्वावसुं तृतीयंच चतुर्थं सोममीश्वरं ॥ ४६॥ ततोनुरूपमायंच यमस्तस्मादनंतरं सप्तमंच तथा वायुमष्टमं निर्ऋतिं वसुं ॥ ४७॥ धर्मस्यापत्यमेतद्वै सुदेव्यां समजायत ॥

अर्थ — तसाच प्रथम वरनामक देव १, नाशरहित ध्रुव २, विश्वावसु ३, सोम ४, योग्य असा आय ५, यम ६, वायु ७, निर्ऋतिनामक वसु ८ हे पुत्र धर्मापासून त्या साध्येच्या उदरीं जन्मले.

विश्वेदेवाश्च विश्वायां धर्माज्जाता इति श्रुतिः ॥ ४८॥ दक्षश्चैव महाबाहुः पुष्करस्वन एवच ॥ चाक्षुषस्तु मनुश्चैव तथा मधुमहोरगौ ॥ ४९ ॥ विश्वांतश्च वसुर्बालो विष्कंभश्च महायशाः ॥ गरुडश्चातिसत्वोजा भास्करप्रतिमद्युतिः ॥ ५० ॥ विश्वान्देवान्देवमाता विश्वेशाजनयत्सुतान् ॥

अर्थ — तसेच विश्वेदेव हे लोकांच्या धर्मसिध्यर्थ विश्वेशीच्या उदरीं जाहले, असें वेदांत प्रसिद्ध आहे; आणि महाबाहु दक्ष, पुष्करस्वन, चाक्षुषमनु, मधु, महासर्प, विश्वाचा संहार करणारा बालवसु, महायशस्वी विष्कंभ, अतिधैर्य व बल यानीं युक्त असून सूर्यसमान तेजस्वी गरुड व सर्व देव हे पुत्र देवमाताजी विश्वेशा तिला धर्मापासून झाले.

मरुत्वती मरुत्वतो देवानजनयत्सुतान् ॥ ५१॥ अग्निं चक्षुं रविर्ज्योतिः सावित्रं मित्रमेवच ॥ अमरं शरवृष्टिंच सुकर्षञ्च महाभुजं ॥ ५२॥ विराजंचैव वाचंच विश्वावसुमतिं तथा ॥ अश्वमित्रं चित्ररश्मिं तथा निषधनं नृप ॥ ५३॥ हूयंतं वाडवंचैव चारित्रं मंदपन्नगं ॥ बृहंतं वै बृहद्रूपं तथा वै पूतनानुगं ॥ ५४ ॥ मरुत्वती पुरा जज्ञे एतान्वै मरुतां गणान् ॥

अर्थ — हे राजा मरुत्वतीस धर्मापासून मरुत्वंत देव झाले; आणि अग्नि, चक्षु, रवि, ज्योति, सावित्र, मित्र, बाणवृष्टि करणारा अमर, महाभुज सुकर्ष, वि-

राज, वाच, विश्वावसुमति, अश्वमित्र, चित्ररश्मि, निषधन, हूयान्, गाडव, चारित्र, मंदपन्नग, बृहन्, बृहद्रूप व पूतनानुग, हे मरुद्गण पूर्वी धर्मापासून त्याच मरुत्वतीचे उदरीं जन्मले.

अदितिः कश्यपाज्जज्ञे आदित्यान्द्वादशैवहि ॥५५॥
इंद्रोविष्णुर्भगस्त्वष्टावरुणोह्यर्यमारविः ॥ पूषामित्र
श्चधनदोधातापर्जन्य एवच ॥५६॥ इत्येतेद्वादशादि-
त्यावरिष्ठास्त्रिदिवौकसः ॥

अर्थः- आतां कश्यपापासून अदितीस बारांच आदित्य झाले, ते असे कीं, इंद्र, विष्णु, भग, त्वष्टा, वरुण, अर्यमा, रवि, पूषा, मित्र, कुबेर, ब्रह्मदेव व पर्जन्य, हे द्वादश आदित्य स्वर्गांत रहाणारे व देवगणांत श्रेष्ठ आहेत.

आदित्यस्यसरस्वत्यांजज्ञातेद्वौसुतौवरौ ॥५७॥ तपःश्रे
ष्ठौगुणिश्रेष्ठौ त्रिदिवस्यापिसंमतौ ॥

अर्थः- त्या आदित्यांतील ब्रह्मदेवापासून सरस्वतीला दोन उत्तमपुत्र झाले; ते तपानें व गुणानीं श्रेष्ठ असल्यामुळें, स्वर्गवासी सर्वदेवांस मान्य होते.

दनुस्तु दानवान्जज्ञेदितिर्दैत्यान्व्यजायत ॥ ५८॥ काला
तुवैकालकेयानसुरान्राक्षसांस्तवै ॥

अर्थः- तसेच दानव हे कश्यपापासून दनुनामक भार्येस झाले; आणि काला या नांवाच्या कश्यप पत्नीस कालकेय व देहावर आसक्त राक्षस हे पुत्र झाले.

अनायुषायास्तनयाव्याधयः सुमहाबलाः ॥५९॥ सिंहि
काग्रहमातावै गंधर्वजननीमुनिः

अर्थः- तसेच अनायुषा स्त्रीस कश्यपापासून अतिबलिष्ठ सर्व रोग झाले; सिंहिका राक्षसीस राहु व केतु हे पुत्र झाले; व मुनि नांवाचे कश्यप स्त्रीस गंधर्व जाहले.

ताम्रा त्वप्सरसांमाता पुण्यानां भारतोद्भव ॥ ६०॥ क्रोधा
याः सर्वभूतानि पिशाचाश्चैव पार्थिव ॥

अर्थः- हे भरतखंडोत्पन्ना राजा ताम्रानामक कश्यप पत्नीस अप्सरा झाल्या-त्या सर्व पुण्यशील आहेत; आणि कश्यपास क्रोधानांवाच्या स्त्रीस सर्वभूतगण व पिशाचें हे जाहले.

जज्ञे यक्षगणांश्चैव राक्षसांश्च विशांपते ॥ ६१ ॥ चतुष्पदा
निसत्वानि तथा गावस्तु सौरसाः ॥

अर्थ- हे प्रजापालक राजा कश्यपापासून सुरसानामक स्त्रीस यक्षराक्षस यांचे गण चार पायांचे प्राणी व गायी ही प्रजा उत्पन्न झाली.

सुपर्णान्पक्षिणश्चैव विनता चाप्यजायत ॥ ६२ ॥ मही
धरान्सर्वनागान्देवी कद्रूर्व्यजायत ॥

अर्थ- त्याच प्रमाणें कश्यपास विनता स्त्रीचे उदरीं गरुडपक्षी जन्मले; आणि कद्रूनामक कश्यप पत्नीस पृथ्वीला धारण करणारे शेषादिक सर्व नाग झाले

एवं वृद्धिं समगमन् विश्वे लोकाः परंतप ॥ ६३ ॥ तदा वै पौ
ष्करो राजन् प्रादुर्भावो महात्मनः ॥

अर्थ- हे शत्रूंस तापदेणाऱ्या राजा असे सर्वलोक त्या सृष्टिक्रमानें वृद्धिपावले; त्या कालीं महात्मा जो नारायण त्याचा पाद्म कल्प चालू होता.

प्रादुर्भावः पौष्करस्ते मयाद्वैपायने रितः ॥ ६४ ॥ पुराणः पु
रुषश्चैव मया विष्णुर्हरिः प्रभुः ॥ कथितस्तेनुपूर्वेण संस्तु
तः परमर्षिभिः ॥ ६५ ॥

अर्थ- हे राजा असा चतुर्दश लोकरूप कमलाच्या उत्पत्तीचा व त्यांतील सृष्टि आदिकरून सर्व प्रकार म्यां तुला वेदव्यासानीं सांगितलेला कथन केला; आणि मोठ्या ऋषीनीं उत्तम प्रकारें स्तुति केलेला मायानियंता भक्तसंकटें निवारण करणारा पुराण पुरुष समर्थ जो विष्णु, त्यानें माहात्म्य म्या तुला क्रमानें वर्णिलें.

यश्चेदमग्र्यं शृणुयात्पुराणं सदा नरः पर्वसु गौरवेण ॥ अ
वाप्य लोकान्स हि वीतरागः परत्र च स्वर्गफलानि भुंक्ते ॥ ६६

अर्थ- जो मानव निरंतर निष्काम बुद्धीनें पर्वकालीं हें श्रेष्ठ पुराण आदरानें श्रवण करील त्यास इहलोकचीं सर्व सुखें प्राप्त होऊन परलोकीं स्वर्गांतील फलें हीं प्राप्त होतात.

चक्षुषा मनसा वाचा कर्मणा च चतुर्विधं ॥ प्रसादयति यः
कृष्णं तं कृष्णोनुप्रसीदति ॥ ६७ ॥

अर्थ- तसेच नेत्र, मन, वाणी व कर्म या चार प्रकारानीं जो प्राणी कृष्णाचें आराधन करितो; त्यास कृष्ण त्याच्या सेवानुसार प्रसन्न होतो.

राजाचलभतेराज्यमधनश्चोत्तमंधनं ॥ क्षीणायुर्लभते·· चायुः पुत्रकामः सुतंतथा ॥ ६८ ॥

अर्थ:- आणि या पुराणाच्या श्रवण पठनानें राजास राज्य निर्द्व्यास उत्तम धन अल्पायूस पूर्णायुष्य, व पुत्राची इच्छा करणारास पुत्र हीं फलें प्राप्त होतात.

यज्ञावेदास्तथाकामास्तपांसिविविधानिच ॥ प्राप्नोतिवि विधंपुण्यंविष्णुभक्तोधनानिच ॥ ६९ ॥ यद्यत्कामयतेकिं चित्तत्तल्लोकेश्वराद्भवेत् ॥

अर्थ:- त्याचप्रमाणें यज्ञ, वेद, विषय, अनेकतपें, नाना प्रकारचें पुण्य व जें जें कांहीं इच्छील तें तें सर्व विष्णुभक्तास त्या जगदीश्वरापासून प्राप्त होतें.

सर्वंविहाययइमंपठेत्पौष्करकंहरेः ॥ ७० ॥ प्रादुर्भावंनृप- श्रेष्ठनतस्यत्त्वशुभंभवेत् ॥

अर्थ:- हे राजश्रेष्ठा आणि सर्व काम्य कर्मादिक सोडून जो मानव हें हरीचें पुष्कर प्रादुर्भाव आख्यान पठन करील त्यास कांहीं एक अशुभ होणार नाहीं.

एषपौष्करकोनामप्रादुर्भावोमयात्मनः ॥ ॥ कीर्तितस्ते महाभाग व्यासश्रुतिनिदर्शनात् ॥ ७१ ॥

अर्थ:- हे महाभाग्य संपन्ना, नारायणापासून चतुर्दश भुवन रूप कमलाच्या उत्पत्तीचा हा प्रकार म्या वेदव्यासांच्या मुखानें श्रवण केल्या प्रमाणें यथामति तुला सांगितला. इतिश्री मत्स्यपुराणें पद्मोद्भव प्रादुर्भाव समाप्तिर्नाम सप्तसप्तत्तर शततमोऽध्यायः ॥ १७०

अध्याय १७१ वा.

मत्स्यउवाच ॥ विष्णुत्वंशृणुविष्णोश्चहरित्वंचकृतेयुगे ॥ वैकुंठत्वंचदेवेषुकृष्णत्वंमानुषेषुच ॥ १ ॥

अर्थ:- मत्स्यरूपी नारायण बोलले हे राजा, विष्णु सर्व मूर्तीं कसा व्यास आहे; पूर्वीं कृतयुगीं विष्णूनें हरि अवतार घेतला; तसाच त्याचा देवांत वैकुंठ अवतार व मनुष्यांत कृष्ण हे अवतार झाले; हें सर्व कारण सहित यथामति सविस्तर श्रवणकर.

ईश्वरस्यहितस्यैषाकर्मणांगहनागतिः ॥ संप्रत्यतीता न्भव्यांश्चशृणुराजन्यथातथं ॥ २ ॥

अर्थ- कारण त्या ईश्वराच्या सर्वचरित्रांची गति गहन आहे; तस्मात् हे राजा तूं आतां सांप्रत कालीं विद्यमान, पूर्वी झालेले व भविष्य कालीं होणारे जे विष्णूचे अवतार ते यथास्थित ऐक.

अव्यक्तोव्यक्तलिंगस्थोयएषभगवान्प्रभुः॥ नारायणो ह्यनंतात्माप्रभवोव्ययएवच॥ ३॥

अर्थ- तें असें कीं, जो हा भगवान् प्रभु स्वतः प्रकृतींत असून त्या प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या महत्तत्वादिक तत्वांत ही असतो; त्या अनंत रूपी नारायणा पासून हें सर्व चराचर विश्व उत्पन्न होत असून तो सर्वथा नाश रहित आहे.

एषनारायणोभूत्वाहरिरासीत्सनातनः॥ ब्रह्मावायुश्च सोमश्चधर्मःशक्रोबृहस्पतिः॥ ४॥

अर्थ- तो हा आदिनारायण स्वयें हरिअवतार घेऊन ब्रह्मदेव, वायु, चंद्र, धर्म इंद्र व बृहस्पति यारूपानींही आपणच होता.

अदितेरपिपुत्रत्वंसमेत्यरविनंदन॥ एषविष्णुरितिख्यातइंद्रस्यावरजोविभुः॥ ५॥

अर्थ- हे सूर्यनंदना तसाच जगव्यापक हा विष्णु अदितीचा पुत्र होऊन इंद्राचा कनिष्ठ बंधु झाल्यामुळें उपेंद्रनामानें लोकांत प्रख्यात जाहला आहे.

प्रसादजंह्यस्यविभो रदित्याःपुत्रकारणं॥ वधार्थंसुरशत्रूणांदैत्यदानवरक्षसां॥ ६॥

अर्थ- हा प्रभु अदिती स प्रसन्न झाला; याच कारणानें हा तिचा पुत्र झाला; आणि देवांचा द्वेष करणारे दैत्य, दानव व राक्षस यांच्या वधार्थही यानें आपणास अदितीनें पुत्रत्व मानिलें.

प्रधानात्मापुराह्येषब्रह्माणमसृजत्प्रभुः॥ सोसृजत्पूर्वपुरुषःपुराकल्पेप्रजापतीन्॥ ७

अर्थ- असा हा मायानियंता प्रभु पूर्वी विश्वाचे आरंभीं ब्रह्मदेवास उत्पन्न करिता जाहला नंतर त्या आदिपुरुष ब्रह्मदेवानें प्रथमतः पाद्मकल्पांत दक्षादिक प्रजापती उत्पन्न केले.

असृजन्मानवांस्तत्रब्रह्मवंशाननुत्तमान्॥ तेभ्यो,भव-

न्माहात्म्यभ्योबहुधाब्रह्मशाश्वतं॥ ८॥ एतदाश्चर्यभूत
स्यविष्णोःकर्मानुकीर्तनं॥कीर्तनीयस्यलोकेषुकीर्त्य-
मानंनिबोधमे॥ ९॥

अर्थ- नंतर ब्रह्मदेवानें स्वायंभुव आदिकरून मनुवंश उत्पन्न केले; त्यांत पुढें उत्तम ब्राह्मणवंशही झाले; त्याकाळीं त्यामहाबुद्धिमंत ब्राह्मणांपासून अनादिवेदाच्या बहुत प्रकारच्या शाखा झाल्या; त्यांत या आश्चर्यरूपी विष्णू च्या चरित्रांचें वर्णन आहे; अशा त्या लोकोत्तर वर्णनीय विष्णूचें शास्त्रांत-वर्णिलें माहात्म्य मजपासून तूं श्रवण कर.

वृत्तेवृत्रवधेतत्रवर्तमानेकृतेयुगे॥आसीत्त्रैलोक्यवि
ख्यातःसंग्रामस्तारकामयः॥ १०॥

अर्थ- तें असें कीं, पूर्वी कृतयुगांत इंद्राचे हातून वृत्रासुराचा वध झाला असतां, त्रैलोक्यांत तारकामय नामानें प्रख्यात असा महान् संग्राम जाहला.

यत्रतेदानवाघोराःसर्वेसंग्रामदुर्जयाः॥घ्नंतिदेवगणा
न्सर्वान्सयक्षोरगराक्षसान्॥ ११॥

अर्थ- त्यांत ते भयंकर अजिंक सर्वदानव संपूर्ण देवगण व त्यांकडील यक्ष, नाग, राक्षस यांस मारूं लागले.

तेवध्यमानाविमुखाःक्षीणप्रहरणारणे॥त्रातारंमनसा
जग्मुर्देवंनारायणंप्रभुं॥ १२॥

अर्थ- तेव्हां देवसैन्यांतील वीर त्या रणांत आपलीं आयुधें नाश पावलीं यामुळें त्या असुरानीं ताडित झाले असतां ते युद्धांतून मागें फिरून आपला त्राता समर्थ जो देव नारायण त्यास मनःपूर्वक शरण गेले.

एतस्मिन्नंतरेमेघानिर्वाणांगारवर्चसः॥सार्कचंद्रग्रह
गणंछादयंतोनभस्तलं॥ १३॥

अर्थ- तों इतक्यांत त्या असुरानीं माया उत्पन्न केली तेणें करून प्रलयाग्नीसारखे प्रज्वलित मेघ येऊन त्यानीं सूर्य, चंद्र व इतर सर्व ग्रह यांसहित तें आकाश चोहीकडून आच्छादित केलें.

वैद्युविद्युद्गणोपेताघोरनिर्ह्रादकारिणः॥अन्योन्यवेगा
भिहताःप्रववुःससमारुताः॥ १४

अर्थ- आणि परस्परें घर्षणापासून उत्पन्न झालेल्या अग्नीनें पेटलेले वेळू त्याच कोणी एक विजांचे समुदायानीं युक्त असून भयंकर गर्जना करणारे व परस्परें वेगानें एकमेकांस ताडित होणारे असे प्रवह आदिकरून सात वायू वाहूं-लागले.

दीप्ततोयाशनिघनैर्वज्रवेगानलानिलैः॥ रवैःसुघोरैरुत्पातैर्दह्यमानमिवांबरं॥ १५

अर्थ- तसेंच उदक संबंधी प्रदीप्त वीजानीं युक्त मेघ, आणि वज्रा समान वेगसंपन्न अग्नि व वायु, तसेच अति भयंकर शब्द यानीं व्याप्त अशा अनेक उत्पातानीं त्याकाळीं आकाश जळतच आहे कीं काय? असें भासूं लागलें.

ततउल्कासहस्राणि निपेतुस्खगतान्यपि॥ दिव्यानिच विमानानिप्रपतंत्युत्पतंतिच॥ १६॥

अर्थ- नंतर आकाशांतून हजारों उल्कापात होऊं लागले; तेणेंकरून स्वर्गांतील विमानें खालीं पडूं लागलीं व उडूं लागलीं.

चतुर्युगांतपर्याये लोकानांयद्भयंभवेत्॥ अरूपवंतिरूपाणि तस्मिन्नुत्पातलक्षणे॥ १७॥

अर्थ- त्याच प्रमाणें युगांच्या चौकडीचे शेवटील पर्याय समयीं लोकांस जसें भय होतें; तसें त्याउत्पातांचे प्रसंगीं सर्वांस भीति उत्पन्न होऊन त्यांचीं रूपें अगदीं विपरीत होऊन गेलीं.

जातंच निष्प्रभंसर्वंनप्राज्ञायतकिंचन॥ तिमिरौघपरिक्षिप्तानरेजुश्च दिशोदश॥ १८॥

अर्थ- आणि तेसमयीं सर्वजग प्रकाश रहित जाहल्यामुळें कांहीं एक समजेनासें जाहलें व अंधकाराच्या समुदायानें दशदिशा व्याप्त झाल्या असतां त्याशोभेनातशा झाल्या.

विवेशरूपिणीकालीकालमेघावगुंठिता॥ द्यौर्नभात्यभिभूतार्का घोरेणतमसावृता॥ १९॥

अर्थ- तशीच मूर्तिमति कालरात्री प्रलयमेघांसहवर्तमान त्या सैन्यांत शिरली; तेव्हां घोर अंधकारानें सूर्याचें तेज कुंठित झाल्यामुळें आकाश शोभेनासें झालें.

तान्घनौघान्सतिमिरान्दोर्भ्यामाक्षिप्यसप्रभुः॥ व

पुः स्वं दर्शयामास दिव्यं कृष्णावपुर्हरिः ॥ २० ॥

अर्थ- तेव्हां भक्तसंकट निवारक समर्थ विष्णूनें आपल्या भुजांनीं अंधकार-सहित त्या मेघ समुदायांस दूर करून आपलें कृष्णवर्ण दिव्यरूप देवांस दाखविलें.

बलाहकांजननिभं बलाहकतनूरुहं ॥ तेजसा वपुषा चैव कृष्णं कृष्णमिवाचलं ॥ २१ ॥ दीप्तपीतांबरधरं तप्तकांचनभूषणं ॥ धूमांधकारवपुषं युगांताग्निमिवोत्थितं ॥ २२ ॥ चतुर्द्विगुणपीनांसं किरीटच्छन्नमूर्धजं ॥ बभौ चामीकरमख्यै रायुधैरुपशोभितं ॥ २३ ॥

अर्थ- तें विष्णुरूप त्या काळीं अनेक प्रकारानीं शोभलें तें असें किं, सजळ मेघ किंवा काजळ यांसमान नीळवर्ण असून त्याचे हीआसमंताद्भागीं मेघ हे केशांसारखे शोभत आहेत, तसाच कांती व देह यानीं कृष्णवर्ण पर्वता सारखा तो विष्णु दिसत असून त्यानें तेजोमय पिंवळा पीतांबर परिधान करून-आरक्त सुवर्णाचीं भूषणें धारण केलीं होतीं आणि तो नारायण प्रज्वलित प्रलयाग्नी समान दिसत असून वरून धुराच्या समुदायानें आच्छादित जाहल्या प्रमाणें शोभत आहे, तसेंच त्या काळीं विष्णूचे मस्तकावरील केश मुगुटा खालीं झांकलेले असून आठ हातांत सुवर्णाचीं आयुधें सुशोभित दिसत आहेत.

चंद्रार्ककिरणोद्योतं गिरिकूटमिवोच्छ्रितं ॥ नंदकानंदिनकरं शराशीविषधारिणं ॥ २४ ॥ शक्तिचित्रफलोदग्रशंखचक्रगदाधरं ॥ विष्णुशैलं क्षमामूलं श्रीवृक्षं शार्ङ्गधन्विनं ॥ २५ ॥ त्रिदशोदारफलदं स्वर्गस्त्रीचारुपल्लवम् ॥ सर्वलोकमनःकांतं सर्वसत्वमनोहरं ॥ २६ ॥ नानाविमानविटपं तोयदांबुमधुस्रवं ॥ विद्याहंकारसाराढ्यं महाभूतप्ररोहणं ॥ २७ ॥ विशेषपत्रैर्निचितं ग्रहनक्षत्रपुष्पितं ॥ दैत्यलोकमहास्कंधं मर्त्यलोकप्रकाशितं ॥ २८ ॥ सागराकारनिर्ह्रादं रसातलमहाश्रयं ॥ मृगेंद्रपाशैर्विततं पक्षजंतुनिषेवितं ॥ २९ ॥ शीलार्थचारुगंधाढ्यं सर्वलो

कमहाद्रुमं॥

अर्थ- तसाच तो हरि त्यावेळेस चंद्र व सूर्य यांच्या किरणानीं प्रकाशित उंच पर्वत शिखरासारखा दिसत असून त्यानें हातांत नंदक नामा खड्ग घेतला असून भात्यांत सर्पासारखे तीक्ष्ण बाण, विचित्र फाळाची उंच शक्ति, शंख, चक्र, गदा, व शार्ङ्ग धनुष्य हीं आयुधें ज्यानें धारण केलीं होतीं; असा तो विष्णु पर्वतासारखा शोभला, आणि तो देव वृक्षासारखाही दिसला तो असाकीं, क्षमा हें त्याचें मूल असून तो साक्षात् लक्ष्मीचा आश्रय स्थान रूप वृक्ष आहे; हा सर्व देवांस उदार फल देणारा स्वर्गातील स्त्रिया या कोमल सुंदर पानानीं शोभणारा, सर्वलोकांच्या मनास रमणीय दिसत असून इतर प्राणिमात्रांचेंही मन आपणाकडे आकर्षण करणारा अनेक विमानरूप शाखानीं सुशोभित, मेघांचें उदक हेंच कोणी एक मधाचे पाझर यानीं युक्त, विद्या व अविद्या यांस उत्पन्न करणारा पंच महाभूतें हेच कोणी एक अंकुर, महतत्त्वादिक चोवीस तत्वें हींच कांहीं एक पानें, चंद्र सूर्या दिक नवग्रह व नक्षत्रें हींच कोणीएकपुष्पें व दैत्य लोक हेंच कोणी एक मोठें खोड यानें युक्त समुद्रा समान घोष युक्त रसातळास महान् आश्रय भूत, रूप, रसादिक महाविषयानीं अंतरित, सर्वप्राणी हे कोणी पक्षी त्यानीं सेवित, उत्तम स्वभाव व मोक्षादिक चार पुरुषार्थ या उत्कृष्ट सुगंधानें पूर्ण असा हा विष्णुरूपी महा वृक्ष सर्व लोकांस आधार भूत असून भक्तकार्यार्थ कधींकधीं मनुष्य लोकीं प्रगट होत असतो.

अव्यक्तानंतसलिलं व्यक्ताहंकारफेनिलं॥३०॥ महाभूततरंगौघंग्रहनक्षत्रबुद्बुदं॥ विमानगरुतव्याप्तंतोयदाडंबराकुलं॥३१॥ जंतुमत्स्यगणाकीर्णं शैलशंखकुलैर्युतं॥ त्रैगुण्यविषयावर्तं सर्वलोकतिमिंगिलं॥३२॥ वीरवृक्षलताकल्पं भुजगोत्कृष्टशैवलं॥ द्वादशार्कमहाद्वीपं रुद्रैकादशपत्तनं॥३३॥ वस्वष्टपर्वतोपेतं त्रैलोक्यांभोमहोदधिं॥ संध्यासंख्योर्मिसलिलं सुपर्णानिलसेवितं॥३४॥ दैत्यरक्षोगणग्राहं यक्षोरगझषाकुलं॥ पितामहमहावीर्यं सर्वस्त्रीरत्नशोभितं॥३५॥ श्रीकीर्तिकांतिलक्ष्मीभिर्नदीभिरुपशोभितं॥ कालयोगिमहापर्वप्रलयोत्पत्ति

वेगिनं ॥३६॥ नंतुयोगमहापारंनारायणमहार्णवं॥दे
वाधिदेवंवरदंभक्तानांभक्तिवत्सलं॥३७॥अनुग्रहक
रंदेवंप्रशांतिकरणंशुभं॥हर्यश्वरथसंयुक्ते सुपर्ण-
ध्वजसेविते॥३८॥ग्रहचंद्रार्करचितेमंदराक्षवरावृते॥
अनंतरश्मिभिर्युक्तेविस्तीर्णेमेरुगह्वरे॥३९॥तार-
काचित्रकुसुमेग्रहनक्षत्रबंधुरे॥भयेष्वभयदंव्योम्नि
देवादैत्यपराजिताः॥४०॥ददृशुस्तेस्थितंदेवंदिव्ये-
लोकमयेरथे॥

अर्थ.- आणि तो नारायण समुद्रासारिखा शोभला; तो असा कीं, ज्यांत अव्यक्ततत्व (प्रकृति) हेंच कोणीएक अपरिमित उदक परिपूर्ण असून त्यावर स्पष्ट अहंकाराचा फेंस आहे. ३० पंच महाभूत रूप लाटानीं युक्त, नवग्रह व सर्व नक्षत्रें हीं ज्यांत बुडबुड्या सारखीं दिसत आहेत, विमानानीं आकाश मार्गी संचार करणारांच्या शब्दानीं व्यास, वरून मेघांच्या अवडंबरानें आच्छादित ३१ प्राणिमात्र हेंच कोणीएक मत्स्यसमुदाय, पर्वत हेंच कोणीएक शंख, सत्व, रज व तम या तीन गुणांचे अनेक विषय हेच कांहीं एक भोंवरे यां सर्वांनीं युक्त, सत्य लोकादिक सर्वलोक हेच तिमिंगिल नामक मोठमोठ्या मत्स्या साररखे ज्यांत आहेत. ३२ मोठेवीर हेच तीरचे वृक्ष, सुंदर स्त्रिया त्याच वेलींचीं बेटें, मोठे सर्प हेंच शेवाळें यानीं संपन्न, द्वादश आदित्य ज्या समुद्रांत महाद्वीपा साररखे असून एकादश रुद्र या द्वीपांतील राजधानी समान शोभत आहेत. ३३ आणि अष्टवसु हेच पर्वत व त्रैलोक्य हेंच उदक यानीं युक्त असून संधिकाल तेच असंख्यात लाटां साररखे पाण्यांत असून गरुड हाच वायू, त्यानें व्यास ३४ तसेच दैत्य व राक्षस गण हेच सुसरी साररखे, यक्ष व नाग हेच कोणी मत्स्य यानीं व्यास, ब्रह्मदेवच ज्याच्या महा पराक्रम स्थानीं असून सर्व स्त्रिया ज्यांत रत्ना साररख्या शोभत आहेत. ३५ प्रभा, कीर्ति, कांति व लक्ष्मी त्याच नद्या ज्यास मिळाल्या असून कालाच्या योगानें येणारीं महापर्वे प्रलय व सृष्टि हे ज्याचे वेग आहेत ३६ व यज्ञ कर्मच परतीरास नेण्या विषयीं नौकारूप साधन ज्यांत आहे; असा महा समुद्ररूपी देवाधिदेव, भक्तांस त्यांच्या भक्तीनेंच प्रसन्न होऊन वर देणारा ३७ भक्तावर अनुग्रह करून त्यांस शांति देणा-

रा स्वच्छंदानुरूप सृष्ट्यादिक लीला करणारा व भक्तांस संकट समयीं अभय देणारा असा तो मंगलरूपी नारायण त्या कालीं आकाश मार्गांत अनंत किरणांनीं युक्त व लोकमय अशा विशाल दिव्य रथांत बसलेला त्या दैत्यानीं जिंकलेल्या देवानीं पाहिला, तो रथ असा कीं, त्यास हिरवे घोडे व ध्वजस्तंभीं गरुड असून चंद्र, सूर्यादिक ग्रहांच्या योगानें तो रथ निर्माण केला होता; तसाच त्या रथास मंदर पर्वताचा कणा असून तो मेरूसारखा खोल होता; अश्विनी आदीकरून सत्तावीस चांदण्या त्या रथावर विचित्र पुष्पांसारख्या दिसत असून नवग्रह व इतर नक्षत्रें यांनें त्या रथास भोंवतीं बंधन आहे.३८।३९.

तेकृतांजलयः सर्वेदेवाः शक्रपुरोगमाः ॥ ४१ ॥ जय शब्दंपुरस्कृत्यशरण्यंशरणंगताः ॥

अर्थ- आणि ते इंद्रादिक सर्व देव हात जोडून त्या विष्णूचा जय शब्दानें उत्कर्ष वर्णन करून त्या शरणागत वत्सल देवास शरण गेले.

सतेषांतांगिरंश्रुत्वाविष्णुर्दैवतदैवतं ॥ ४२ ॥ मनश्चक्रेविनाशायदानवानांमहामृधे ॥

अर्थ- तेव्हां ती देवांची वाणी ऐकून देवाधिदेव विष्णु त्या महा संग्रामांत दानवांच्या नाशार्थ उद्युक्त जाहला.

आकाशेतुस्थितोविष्णुरुत्तमंवपुरास्थितः ॥ ४३ ॥ उवाचदेवताः सर्वाः सप्रतिज्ञमिदंवचः ॥

अर्थ- आणि त्या आकाशांत उत्तम रूपानें राहिलेला विष्णु त्या सर्व देवांस मतिज्ञेनें हें पुढील भाषण बोलतात.

शांतिंव्रजतभद्रंवोमाभैष्टमरुतांगणाः ॥ ४४ ॥ जितामेदानवाः सर्वेत्रैलोक्यंपरिगृह्यतां ॥

अर्थ- कीं, देवगण हो स्वस्थ व्हा; तुमचें कल्याण असो; तुम्हीं भिऊं नका; कारण म्या हे दानव जिंकलेच असें समजून आपलें त्रैलोक्याचें राज्य घ्या.

तेतस्यसत्यसंधस्यविष्णोर्वाक्येनतोषिताः ॥ ४५ ॥ देवाः प्रीतिंसमाजग्मुः प्राश्यामृतमनुत्तमं ॥

अर्थ- असें त्या सत्यप्रतिज्ञ विष्णूचें तें वाक्य ऐकून ते देव संतोष पावून उत्तम अमृत प्राशन केल्या सारखे हर्षयुक्त झाले.

ततस्तमः संहृतं तद्विनेशश्च बृहाहकाः ॥ ४६ ॥ प्रव
वुश्च शिवावाताः प्रशांताश्च दिशोदश ॥

अर्थ- नंतर तो दैत्य मायेनें उत्पन्न झालेला अंधकार व मेघ यांचा नाश- जाहला; आणि सुखकारक शांत वायु वाहूं लागले व दशदिशा अति शांत झाल्या.

शुद्धप्रभाणिज्योतींषिसोमंचक्रुः प्रदक्षिणं ॥ ४७
नविग्रहं ग्रहाश्चक्रुः प्रशांताश्चापि सिंधवः ॥

अर्थ- तशीच तेसमयीं स्वच्छ तेजःपुंज नक्षत्रें चंद्रास प्रदक्षिणा करूं लागलीं; आणि सर्व ग्रह युद्ध करीनांत, व समुद्रही शांत झाले.

विरजस्काभवन्मार्गानाकवर्गादयस्त्रयः ॥ ४८ ॥ य-
थार्थमूहुः सरितो नापिचक्षुभिरेर्णवाः ॥

अर्थ- तसेच याकालीं स्वर्ग, मृत्यु, पाताळ, या तिन्ही मार्गांतील उडालेलीधूळ खालीं बसली; आणि नद्या यथास्थित वाहूं लागल्या व सर्व समुद्र क्षोभ पावेनातसे जाहले.

आसंश्शुभानींद्रियाणिनराणामंतरात्मसु ॥ ४९ ॥ म
हर्षयोवीतशोकावेदानुच्चैरधीयत ॥

अर्थ- तशीच लोकांचीं मन आदिकरून सर्व इंद्रियें स्वस्थ झालीं आणि- मोठमोठे ऋषि शोकरहित होऊन उच्च स्वरानें वेदाध्ययन करूं लागले.

यज्ञेषुचहविःपाकंशिवमापच्चपावकः ॥ ५० ॥ प्रवृत्त
धर्माः संवृत्ता लोकामुदितमानसाः ॥ विष्णोर्दत्तप्रति
ज्ञस्यश्रुत्वारिनिधनेगिरं ॥ ५१ ॥

अर्थ- याच प्रमाणें सर्व यज्ञांत अग्नी ओदनादिक होम द्रव्यांचें उत्तम रीतीनें पचन करूं लागला. तसेच सर्व प्रवृत्ति धर्म सांग चालू जाहले; व सर्व लोक तें विष्णूनें दैत्य संहाराविषयींचें प्रतिज्ञापूर्वक वचन ऐकून अंतःकरणांत अत्यंत हर्ष पावले. इतिश्री मत्स्य पुराणें तारकामय युद्धे एकसप्तत्युत्तर शततमो ऽध्यायः ॥ १७१ ॥

अध्याय १७२वा.

मत्स्यउवाच ॥ ततोभयं विष्णुवचः श्रुत्वादैत्याश्चदा

नवाः॥ उद्योगविपुलंचक्रुर्युद्धायविजयायच॥ १

अर्थ:- मत्स्यरूपी भगवान् ह्मणतात हे मनुराजा देवांस अभय कारक असें तें विष्णूचें भाषण ऐकून ते दैत्य व दानव आपला जय होण्यासाठीं युद्धार्थ बहुत उद्योग करूं लागले.

मयस्तुकांचनमयं त्रिनल्वायतमक्षयं॥ चतुश्चक्रंसुविपुलंसुकल्पितमहायुगं॥ २॥ किंकिणीजालनिर्घोषंद्वीपिचर्मपरिष्कृतं॥ रुचिरंरत्नजालैश्चहेमजालैश्चशोभितं॥ ३॥ ईहामृगगणाकीर्णंपक्षिपंक्तिविराजितं॥ दिव्यास्त्रतूणिरधरंपयोधरविनादितं॥ ४॥ स्वक्षंरथवरोदारंसूपस्थंगगनोपमं॥ गदापरिघसंपूर्णंमूर्तिमंतमिवार्णवं॥ ५॥ हेमकेयूरवलयंस्वर्णमंडलकूबरं॥ सपताकध्वजोपेतंसादित्यमिवमंदरं॥ ६॥ गजेंद्राभोगवपुषंक्वचित्केसरिवर्चसं॥ युक्तमृक्षसहस्रेणसमृद्धांबुदनादितं॥ ७॥ दीप्तमाकाशगंदिव्यंरथंपररथारुजं॥ अभ्यतिष्ठद्रणाकांक्षीमेरुंदीप्तमिवांशुमान्॥ ८॥

अर्थ:- तो असा कीं, जसा तेजोमय मेरुपर्वतावर सूर्य येतो तसा मयासुर युद्धाच्या इच्छेनें अंतरिक्ष मार्गीं चालणाऱ्या चारचाकांच्या सुवर्णमय उत्तम महा रथांत बसला; तो रथ बाराशें हात लांबीचा व नाशरहित असून त्याचें मोठें जूं उत्तम रीतीनें केलें होतें, आणि लहान अनेक घंटांचा अतिघोष, व्याघ्रचर्म, रत्नें व मोतीं यांचे घोंस यानीं तो रथ सुशोभित होता; तसेच लांडग्यांचे समुदाय व अनेक पक्ष्यांच्या पंक्ति, दिव्य अस्त्रें, बाणांचे भाते, त्या रथावर शोभत असून चालते समयीं त्या रथाचा मेघा सारखा शब्द होत असे; तसाच कणा व रथीं वीरांचें बसण्याचें स्थान हीं त्या रथाचीं उत्तम असून तो रथ आकाशा समान प्रशस्त असल्यामुळें श्रेष्ठ रथांत उत्तम होता, आणि गदाव परिघ इत्यादिक आयुधानीं पूर्ण केवळ मूर्तिमान् समुद्रा प्रमाणें दिसत असे; तशींच सोन्याचीं बाहु भूषणें व कडीं त्या रथांत असून त्याचीं घोडे बांधण्याचीं लांकडें सोन्यानें मढिव केलीं होतीं; त्याच प्रमाणें त्या रथाचा मोठा ध्वज अनेक पताकानीं युक्त होता; तेणें करून तो रथ सूर्य सहित मंदरपर्वता सारखा

दिसत असे; त्या रथास चोहीं कडून मोठीं हत्तीचीं चित्रें काढलेलीं असून त्या रथाची कोठें कोठें सिंहा सारखी कांति दिसत असे; आणि त्या रथास हजार-आस्वलें लावलेलीं असून तो रथ चालते समयीं उदकानें पूर्ण भरलेल्या मे या सारखा शब्द करून शत्रूंच्या रथाचा भंग करण्याविषयीं समर्थ होता.

तारमुल्कोशविस्तारं सर्वहेममयं रथं॥ शैलाकारमसंबाधं नीलांजनचयोपमं॥ ९॥ कार्ष्णायसमयं दिव्यं लोहेषाबद्धकूबरं॥ तिमिरोद्गारिकिरणं गर्जनमिव तोयदं॥ १०॥ लोहजालेन महता सगवाक्षेण दंशितं॥ आयसैः परिघैः पूर्णं क्षेपणीयैः समुद्गरैः॥ ११॥ प्रासैः पाशैश्च विततैर्नरैः संयुक्तकंटकैः॥ शोभितं त्रासयानैश्च तोमरैश्च परश्वधैः॥ १२॥ उद्यंतं द्विषतां हेतोर्द्वितीयमिव मंदरं युक्तं खरसहस्रेण सोऽध्यारोहद्रथोत्तमं॥ १३ विरोचनस्तु संक्रुद्धो गदापाणिरवस्थितः॥ प्रमुखे तस्य सैन्यस्य दीप्तग्रह इवाचलः॥ १४॥

अर्थ- आणि विरोचन दैत्य हातांत गदा घेऊन अति क्रोधानें त्या सैन्याच्या-अग्रभागीं कोपानें लाल होऊन प्रदीप्त ग्रह ज्यावर अशा पर्वता सारखा हजार-गर्दभ जोडलेल्या रथांत बसला. तो रथ अति उंच असून त्याचा विस्तार ऊर्ध्वभागींच एककोशमात्र उंच होता; आणि तो रथ काजळाच्या पर्वता सारखा उत्तम पोलादी असून चहूं कडून सुवर्ण खचित व कोठेंही व्यंग नसल्या मुळें शत्रूंचा तिळमात्रही उपद्रव होण्या सारखा नसे, तशीच त्या रथाचीं लांकडें लोखंडी दांड्याशीं बांधलेलीं असत; तसाच तो रथ अंधकाराचा नाश करणाऱ्या अनेक किरणानीं युक्त असून चालते समयीं मेघा सारखी गर्जना करीत असे-तशाच झरोक्या सहित मोठ्या लोखंडी जाळ्या त्या रथास होत्या; तसेच लोखंडी परिघ, गोफणगुंडे, मुद्गल, फांस, ज्यांच्या कांट्यास मनुष्यें अडकलीं जातात असे मोठे प्रास, केवळ गतीनेंही शत्रूंस त्रास कारक तोमर व परशु (कुऱ्हाड) या आयुधांच्या पूर्णतेनें शोभत असून तो रथ शत्रूंच्या संहारार्थ दुसरा मंदराचल पर्वतच आला आहे कीं काय असा दिसत होता.

युक्तं रथसहस्रेण हयग्रीवस्तु दानवः॥ स्यंदनं वाहयन्

मासस‍पत्नानीकमर्दनः ॥१५॥

अर्थ- तसाच शत्रूंच्या सैन्याचें मर्दन करणारा हयग्रीव नामक दानव सभोंवतीं हजार रथांनीं युक्त अशा आपले रथांत बसून त्या रणभूमीत संचार करूं लागला.

व्यायतं किष्कुसाहस्रं धनुर्विस्फारयन्महत् ॥ वाराहः प्रमुखे तस्थौ सप्ररोह इवाचलः ॥१६॥

अर्थ- आणि वाराह नांवाचा दैत्य आपल्या चारशें हात मोठ्या लांब धनुष्याचा शब्द करीत आपले सैन्याच्या अग्रभागीं वृक्ष सहित पर्वता सारखा उभा राहिला.

खरस्तु विक्षरन्दर्पान्नेत्राभ्यां रोषजं जलं ॥ स्फुरद्दंतो ष्ठनयनं संग्रामे सोभ्यकांक्षत ॥१७

अर्थ- खर नामक दैत्य, गर्वानें आपल्या नेत्रांतील रोषानें आलेलें उदक बाहेर गाळित, व दांत ओंठ चावीत डोळे वटारून संग्रामाची इच्छा करूं लागला.

त्वष्टाष्टगजं घोरं यानमास्थाय दानवः ॥ व्यूहितुं दानवव्यूहं परिचक्राम वीर्यवान् ॥१८

अर्थ- त्याचप्रमाणें त्वष्टा नामक पराक्रमी दानव, आठ हत्तींच्या उग्र रथांत बसून दानव सैन्याचा व्यूह करण्या साठीं त्या सैन्याच्या सभोंवतीं संचार करूं लागला.

विप्रचित्ति वपुश्चैव श्वेत कुंडल भूषणः ॥ श्वेतः श्वेत प्रतीकाशो युद्धाया भिमुखे स्थितः ॥१९

अर्थ- तसाच शरीरानें विप्रचित्तीं समान असून शुभ्र कर्ण कुंडलानीं सुशोभित व हिमालया सारखा महान् श्वेत नामा दैत्य त्या देवांच्या समोर युद्धास उभा राहिला.

अरिष्टो बलिपुत्रश्च वरिष्ठाद्रिशिलायुधः ॥ युद्धाया भिमुखस्तस्थौ धरा धरविकंपनः ॥२०

अर्थ- आणि पर्वतांस कांपविणारा बलिपुत्र अरिष्टासुर मोठमोठ्या पर्वत शिलाच आयुधें घेऊन देवांचे सन्मुख युद्धार्थ उभा राहिला.

किशोरः स्त्वभि संहर्षात् किशोर इति चोदितः ॥ सब

लादानवाश्चैव सन्नद्धं नेयथाक्रमं॥ २१

अर्थ- तसाच अल्प वयाचा कोणी एक दैत्य विचार न करितां हर्षानें युद्धास पुढें जाणारा म्हणून किशोर नामानें प्रसिद्ध तो दैत्य तेथें युद्धार्थ सिद्ध जाहला, असे ते सर्व दानव आपापल्या सैन्या सहवर्तमान क्रमानें युद्धास सिद्ध जाहले.

अभवद्दैत्यसैन्यस्यमध्येरविरिवोदितः॥ लंबरक्तनव मेघाभः प्रलंबांबरभूषणः॥२२

अर्थ- व सजल मेघा समान नीलवर्ण लंबनामा दैत्य लाव वस्त्रें व मोठीं भूषणें धारण करून उदयास आलेल्या सूर्या सारखा त्या दैत्य सैन्याचे मध्यभागीं उभा राहिला.

दैत्यव्यूहगतोभातिसनीहारइवांशुमान्॥स्वर्भानुरास्ययोधीतुदशनोष्ठेक्षणायुधः॥२३॥हसंस्तिष्ठतिदैत्यानांप्रमुखेसमहाग्रहः॥

अर्थ- तसाच मुखानें युद्ध करणारा राहु, दांत, ओंठ व नेत्र या आयुधानीं युक्त असून धुक्यांतील सूर्या सारखा तो महा ग्रह व्यूहांतील दैत्यांचे अग्रभागीं हसत उभा राहिलेला शोभला.

अन्येहयगतास्तत्रगजस्कंधगताःपरे॥ २४॥ सिंहव्याघ्रगताश्चान्येवराहर्क्षेषुचापरे॥ केचित्खरोष्ट्रयातारः केचिच्छ्वापदवाहनाः॥२५॥पत्तिनस्त्वपरेदैत्याभीषणा विकृताननाः॥ एकपादार्धपादाश्चननृतुर्युद्धकांक्षिणः॥ २६॥

अर्थ- तसेच त्या सैन्यांतील इतर कोणी दैत्य अश्वांवर, व कोणी हत्तीच्या स्कंधावर बसले असून कितीएक दैत्य सिंह, व्याघ्रांवर बसले होते; आणि दुसऱ्या असुरानीं डुकर व आस्वल यांजवर आरोहण केलें असून कोणी दैत्य गर्दभ व उंट यानीं गमन करणारे व किती एकांचीं वाहनें श्वापदें होतीं त्याच प्रमाणें अक्राळ विक्राळ मुखाचे भयंकर, एक पायाचे, अर्ध्याच पायांनीं युक्त असे नेपायदळांतील भयंकर अन्य दैत्य युद्धाच्या इच्छेनें नाचूं लागले.

आस्फोटयंतोबहवःक्ष्वेडंतश्चतथापरे॥ हृष्टशार्दूल

निर्घोषानेदुर्दानवपुंगवाः॥ २७॥

अर्थः- ते समयीं त्या सैन्यांतील दुसरे बहुत दैत्य दंड थोपटून सिंहनाद करीत असून हर्ष पावलेल्या व्याघ्रा सारखा अति घोष युक्त शब्द करणारे इतर-दानव श्रेष्ठ गर्जना करूं लागले.

तेगदापरिघैरुग्रैः शिलामुसलपाणयः॥ बाहुभिः परिघाकारैस्तर्जयंतिस्मदेवताः॥ २८॥

अर्थः- आणि ते दैत्य परिघाकार अशा आपले हातांत भयंकर गदा परिघ पाषाण व मुसळें हीं आयुधें घेऊन देवांस भय दाखवूं लागले.

पाशैः प्रासैश्चपरिघेस्तोमरांकुशपट्टिशैः॥ चिक्रीडुस्तेशतघ्नीभिः शतधारैश्चमुद्गरैः॥ २९॥

अर्थः- तसेच पाश, प्रास, परिघ, तोमर, अंकुश, पट्टिश, शंभरांस मारणाऱ्या शक्ति; शंभरधाऱ्यांचे मुद्गल या शस्त्रांनीं ते दैत्य परस्परें खेळूं लागले.

गंडशैलैश्चशैलैश्चपरिघैश्चोत्तमायसैः॥ चक्रैश्चदैत्यप्रवराश्चक्रुरानंदितंबलं॥ ३०॥

अर्थः- त्याच प्रमाणें पर्वत संबंधि मोठे पाषाण, पर्वत, उत्तम पोलादी-परिघ व चक्रें या शस्त्र समुदायें करून त्या दैत्यांनीं आपलें सैन्य आनंदित केलें.

एतद्दानवसैन्यंतत्सर्वंयुद्धमदोत्कटं॥ देवानभिमुखंतस्थौमेघानीकमिवोद्धतं॥ ३१॥

अर्थः- असें तें सर्व दानव सैन्य युद्धाच्या मदानें उत्कट होऊन पूर्ण सजलमेघ समुदाया सारखें देवां समोर युद्धार्थ उभें होतें.

तदद्भुतंदैत्यसहस्रगाढंवाय्वग्निशैलांबुदतोयकल्पं॥ बलंरणौघाभ्युदयेभ्युदीर्णंयुयुत्सयोन्मत्तमिवावभासे॥ ३२॥

अर्थः- ते समयीं हजारों दैत्यानीं व्याप्त असून वायु, अग्नि, पर्वत, मेघ व उदक यां सारखें अनेक प्रकारचें युद्धाच्या इच्छेनें संग्रामास आरंभ होण्याचे प्रसंगीं सिद्ध झालेलें असें तें अद्भुत दैत्य सैन्य उन्मत्ता सारखें दिसूं लागलें. इति श्रीमत्स्यपुराणे तारकामय युद्धे द्विसप्तत्युत्तर शततमो-

ध्यायः ॥ १७२

अध्याय १७३वा.

मत्स्यउवाच ॥ श्रुतस्तेदैत्यसैन्यस्य विस्तरोरविनंदन॥
सुराणामपिसैन्यस्य विस्तरं वैष्णवं शृणु ॥ १॥

अर्थ- नंतर मत्स्यरूपी नारायण बोलले हे सूर्यनंदना मनुराजा तूं दैत्य सैन्याचा विस्तार ऐकलास; आतां देवांच्या ही सैन्यांतील वैष्णव मंडळीचा विस्तार ऐक.

आदित्यावसवोरुद्रा अश्विनौच महाबलौ ॥ सबलाः
सानुगाश्चैवसन्नह्यंत यथाक्रमं ॥ २॥

अर्थ- तो असा कीं, द्वादश आदित्य, अष्टवसु, एकादश रुद्र, महा बलाढ्य अश्विनी कुमार इत्यादिक आपले सेवक व सैन्य यांसहित अनुक्रमानें युद्धार्थ सिद्ध जाहले.

पुरुहूतस्तुपुरतो लोकपालः सहस्रदृक् ॥ ग्रामणीः स
र्वदेवानामारुरोह सुरद्विपं ॥ ३

अर्थ- ते असे कीं, प्रथमतः सहस्रनयन लोकपाल सर्व देव समुदायाचा राजा इंद्र देव सैन्याचे अग्रभागीं ऐरावत गजावर बसला.

मध्येचास्यरथः सर्वपक्षिप्रवररंहसः ॥ सुचारुचक्रच
रणोहेमवज्रपरिष्कृतः ॥ ४॥ देवगंधर्वयक्षौघैरनुया
तः सहस्रशः ॥ दीप्तिमद्भिः सदस्यैश्च ब्रह्मर्षिभिरभि
ष्टुतः॥ ५॥ वज्रविस्फूर्जितोद्भूतैर्विद्युदिंद्रायुधोदितैः
॥ युक्तोबलाहकगणैः पर्वतैरिवकामगैः ॥ ६॥ यमारू
ढः सभगवान्पर्येतिसकलंजगत् ॥

अर्थ- तसाच सर्व पक्षिश्रेष्ठ गरुडा समान वेगवान् अशा त्या इंद्राचा रथ देव सैन्याचे मध्य भागीं होता तो असा कीं; अति सुंदर चक्रें हेच कोणी एक पायत्यानीं युक्त व सुवर्णाचा असून रत्न खचित होता; आणि देव, गंधर्व व यक्ष हे हजारों त्या रथामागून येत असून अति तेजस्वी ब्रह्मर्षी सभासद त्यारथाची स्तुति करीत होते; तसेच वज्राचे भयंकर शब्द विद्युल्लता व इंद्र धनुष्य यां सहित उदयास आलेल्या इच्छागामी पर्वतां सारख्या मेघ समुदायानीं युक्त अशा त्या उंच रथांत बसून भगवान् इंद्र सर्व जगांत पर्यटन करितो.

हविर्धानेषुगायंतिविप्रामखमुखेस्थिताः॥ ७॥ स्वर्गेशक्रानुयातेषु देवतूर्यनिनादिषु॥ सुंदर्यः परिनृत्यंतिशतशोप्सरसांगणे॥ ८॥

अर्थ- त्याचप्रमाणें यज्ञ प्रमुख कर्म करण्या विषयीं होमद्रव्यें ठेवण्याचे स्थलीं बसलेले ब्राह्मण इंद्राच्या प्रयाण समयीं गायन करूं लागले व देवांचीं वाद्यें वाजविणारे इंद्राच्या मागून चालले असतां अप्सरांच्या समुदायांतील शेंकडों सुंदरी नृत्य करूं लागल्या.

केतुनानागराजेनराजमानोयथारविः॥ युक्तोहयसहस्रेणमनोमारुतरंहसा॥ ९॥ सस्यंदनवरोभातियुक्तोमातलिनातदा॥ कृत्स्नः परिवृतोमेरुर्भास्करस्येवतेजसा॥ १०॥

अर्थ- तसाच ऐरावत चिन्हानें सुशोभित असून मन किंवा वायु यां समान वेगवंत सहस्र अश्वानीं युक्त सूर्या समान तेजःपुंज, मातलि सारथीनें रक्षित व सूर्याच्या तेजानें संपूर्ण प्रकाशित मेरू सारखा असा तो दिव्य रथ त्या कालीं शोभला.

यमस्तुदंडमुद्यम्यकालयुक्तश्चमुद्गरं॥ तस्थौसुरगणानीकेदैत्यान्नादेनभीषयन्॥ ११॥

अर्थ- तसेच काल व यम हे आपलीं दंड व मुद्गर हीं आयुधें घेऊन सिंहनादानें दैत्यांस भय प्रदर्शन करीत देव सैन्यांत उभे राहिले.

चतुर्भिःसागरैर्युक्तोलेलिहानैश्चपन्नगैः॥ शंखमुक्तागदधरोबिभ्रत्तोयमयंवपुः॥ १२॥ कालपाशान्समाविध्यन्हयैःशशिकरोपमैः॥ वाय्वीरितैर्जलाकारैःकुर्वन्लीलाःसहस्रशः॥ १३॥ पांडुरोद्धूतवसनःप्रवालरुचिरांगदः॥ मणिश्यामोत्तमवपुर्हारभारार्पितोवरः॥ १४॥ वरुणःपाशधृङ्मध्येदेवानीकस्यतस्थिवान्॥

अर्थ- आणि चारसमुद्र, दंश करणारे सर्प यानीं युक्त असून शंख व मौक्तिकांचीं चंचल सुंदर बाहुभूषणें व कंपित शुभ्र वस्त्रें धारण केलीं असून पाणी-

दार इंद्रनील मण्यासमान उत्तम देहानें शोभायमान, इंद्रानें आपला भार स्थापन केलेला व पाश धारण करणारा असा तो वरुण आपले काल पाश आपदीत आणि वायूच्या योगानें अतिवेग युक्त उदका समान वेगवान् असून चंद्र किरणां सारखे आल्हाद कारक तेजस्वी अशा अश्वानीं अनेक लीला करीत त्या देव सैन्याचे मध्य भागीं उभा राहिला.

युद्धवेलामभिलषन्भिन्नवेलइवार्णवः॥१५॥यक्षराक्षससैन्येनगुह्यकानांगणैरपि॥युक्तश्चशंखपद्माभ्यांनिधीनामधिपःप्रभुः॥१६॥राजराजेश्वरःश्रीमान्गदापाणिरदृश्यत॥विमानयोधीधनदोविमानेपुष्पकेस्थितः॥१७॥सराजराजःशुशुभेयुद्धार्थीनरवाहनः॥उक्षाणमास्थितःसंख्येसाक्षादिवशिवःस्वयं॥१८॥

अर्थ- त्याच प्रमाणें यक्ष व राक्षस यांचें सैन्य सर्व निधींचा स्वामी असून पालखींत बसणारा, गुह्यकगण, शंख व पद्म या मूर्तिमंत निधीं सहित, पृथ्वीवरील, सार्व भौम राजांचाही ईश्वर पुष्पक विमानांत बसून युद्ध करणारा, तो कुबेर हातांत गदा घेऊन युद्धार्थ पुष्पक विमानांत बसून तो राजाधिराज प्रभु, मर्यादेचें उल्लंघन केलेल्या समुद्रा प्रमाणें आवेशानें युद्ध समयाची मार्ग प्रतीक्षा करीत त्या रणाभूमींत नंदीवर आरोहण केलेल्या साक्षात् शिवा सारिखा शोभला.

पूर्वपक्षःसहस्राक्षःपितृराजस्तुदक्षिणः॥वरुणःपश्चिमंपक्षमुत्तरंनरवाहनः॥१९॥चतुर्षुयुक्ताश्चत्वारोलोकपालामहाबलाः॥स्वासुदिक्षुस्वरक्षंततस्यदेवबलस्यते॥२०॥

अर्थ- त्या देवसैन्याच्या पूर्वेस सहस्र नेत्र इंद्र व दक्षिणेस पितरांचा राजा यम असून पश्चिमेस वरुण व उत्तरेस कुबेर हे महा बलिष्ठ चार लोकपाल आपापल्या दिशेस राहून उत्तम रीतीनें रक्षण करीत होते.

सूर्यःसप्ताश्वयुक्तेनरथेनामितगामिना॥श्रियाजाज्वल्यमानेनदीप्यमानेश्चरश्मिभिः॥२१॥उदयास्त

गचक्रेणमेरुपर्वतगामिना॥ त्रिदिवद्वारचक्रेण तपता लोकमव्ययं॥२२॥ सहस्ररश्मियुक्तेन भ्राजमानेन तेजसा॥ चचारमध्ये लोकानां द्वादशात्मा दिनेश्वरः॥२३

अर्थ:- तसाच हजारों किरण युक्त देदीप्यमान तेजानें सुशोभित जो, दिवसाचा स्वामी द्वादश रूपी सूर्य आपल्या देदीप्यमान किरण युक्त कांतीनें जाज्वल्यमान असून मेरुपर्वता वरील देवलोकच्या द्वारांतून उदयाचला पासून अस्ताचलु पर्यंत जाणारें चक्र व सात अश्व यानीं युक्त अशा अपरिमित गमन करणाऱ्या रथांत बसून नित्य लोकांस प्रकाश करितो, तो त्या युद्ध समयीं त्रयीवर लोकांचे मध्यभागीं संचार करीत होता.

सोमः श्वेतहयोभाति स्यंदने शीतरश्मिवान्॥ हिमवत्तोयपूर्णाभिर्भाभिराल्हादयञ्जगत्॥२४॥ तमृक्षपूगानुगतं शिशिरांशुं द्विजेश्वरं॥ शशच्छायांकिततनुं नेशस्य तमसः क्षयं॥२५॥ ज्योतिषामीश्वरं व्योम्नि रसानां रसदं प्रभुं॥ औषधीनां सहस्राणां निधानममृतस्य च॥२६॥ जगतः प्रथमं भागं सौम्यं सत्यमयं रथं॥ ददृशुर्दानवाः सोमं हिमप्रहरणं स्थितं॥२७

अर्थ:- आणि शुभ्र अश्वयुक्त रथांत शीतल किरण युक्त चंद्र हिमालय संबंधि उदका सारख्या पूर्ण आपल्या कांतीनें जगास आल्हाद करीत शोभला. त्या चंद्राचे पृष्ठभागीं सर्व नक्षत्रें असून त्याचा देह सशाच्या छायेनें चिन्हित व शीत किरणयुक्त असल्या मुळें रात्रि संबंधि अंधकाराचा नाश करणारा व आकाशांतील गुरु, शुक्रादिक नक्षत्र गणांचा स्वामी आहे आणि तो अनंत रस युक्त औषधींस रस देणारा प्रभु व अमृतांचें स्थान असल्या कारणानें ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य यांचा राजा जगाचा प्रथम भाग जें अन्न त्याचा नियंता व अति हिमरूप आयुधानें युक्त असा तो चंद्र सत्य स्वरूप सौम्य रथांत बसलेला त्या दानवांनीं पाहिला.

यः प्राणः सर्वभूतानां पंचधाभिद्यते नृषु॥ सप्तधातुगतो लोकांस्त्रीन्दधारचचारच॥२८॥ यमाहुरग्निकर्त्तारं सर्वप्रभवमीश्वरं॥ सप्तस्वरगतो यश्चनित्यं गीर्भिरु

रुदीर्यते ॥ २९ ॥ यंवदंत्यकृतसंभूतं यंवदंत्यशरीरिणं ॥ यमाहुःकारणाशगमंशीघ्रगंशब्दयोगिनं ॥ ३० ॥ सवायुः सर्वभूतायुरुद्भूतः स्वेनतेजसा ॥ ववौप्रव्यथयन्दैत्यान्प्रतिलोमंसतोयदः ॥ ३१ ॥

अर्थ- तसाच जो पंच प्राणरूपानें सर्व प्राणिमात्रांचे देहांतील सप्त धातूंत राहून त्रैलोक्यास धारण करून सर्वत्र अंतर्बाह्य संचार करितो; ज्यापासूनच अग्नि आदिकरून सर्व उत्पन्न होतात ह्मणून त्यास ईश्वर ह्मणतात, जो सप्त स्वरांत असल्या मुळें निरंतर वेदादिक वाणींचा द्वारानें उच्चारला जातो आणि जो दृष्टिगोचर शरीरानें युक्त नसून सर्वांचा चालक असल्यावरून ज्यास पंच महाभूतांत श्रेष्ठ ह्मणतात व आकाशांत असून शीघ्र गमन करणारा व शब्दांच्या उत्पत्तीस कारण असें ज्यास ह्मणतात; तो सर्व प्राणिमात्रांच्या आयुष्याचा नियंता वायु, मेघांसहित त्याकाळीं स्वकीय तेजानें प्रगट होऊन दैत्यांस अतिशयें व्यथा देत त्यांच्या तोंडावर उलटा वाहूं लागला.

मरुतोदिव्यगंधर्वैर्विद्याधरगणैःसह ॥ चिक्रीडुरसिभिः शुभ्रैर्निर्मुक्तैरिवपन्नगैः ॥ ३२ ॥

अर्थ- तसेंच मरुद्गण, देवांचे गंधर्व व विद्याधरगण यांशीं मोकळ्या सर्पासारख्या शुभ्र तरवारीनीं क्रीडा करूं लागले.

सृजंतःसर्पपतयस्तीव्रतोयमयंविषं ॥ शरभूतादिवौकसांचेरुर्व्योम्नानाविदि ॥ ३३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें सर्पांचे अधिपति शेषादिक नाग; मुखांतून तीक्ष्ण उदकमय विष सोडीत स्वर्गपालक देवांच्या बाणासारखे तोंडें पसरून आकाशमार्गें दैत्य सैन्यावर संचार करूं लागले.

पर्वतैश्चशिलाशृंगैःशतशश्चैवपादपैः ॥ उपतस्थुःसुरगणाःप्रहर्तुंदानवेबले ॥ ३४ ॥

अर्थ- आणि इतर देवगण, पर्वत, त्यांच्या शिळा व शिखरें व शेंकडों वृक्ष या युद्ध सामग्री घेऊन, दानव सैन्यावर प्रहार करण्या साठीं आले.

यःसदेवोहृषीकेशःपद्मनाभस्त्रिविक्रमः ॥ युगांते- कृष्णवर्णाभो विश्वस्यजगतःप्रभुः ॥ ३५ ॥ सर्वयो-

निःसमक्षुहाहव्यभकुक्रतुसंस्थितः॥ भूम्यपोव्योमभूतात्माश्यामः शांतिकरोरिहा॥३६॥अरिम्नममरादीनां चक्रंगृह्यगदाधरः॥ अर्कनगादिवोद्यंतमुद्यम्योत्तमतेजसा॥३७॥सव्येनालंब्य महतींसर्वासुरविनाशिनीं॥करेण कालींवपुषा शत्रुकालप्रदांगदां॥३८॥अन्यैर्भुजैः प्रदीप्ताभैर्भुजगारिध्वजःप्रभुः॥दधारायुधजातानिशार्ङ्गादीनिमहाबलः॥३९॥

अर्थ- तसाच जो सर्व इंद्रियांचा स्वामी असून ज्याच्या नाभिकमलांतून चतुर्दश लोकरूप कमल उत्पन्न जाहलें, आणि वामनावतारीं त्रिपद भूमि घेण्याचे प्रसंगीं त्रिभुवनांत पराक्रमानें प्रसिद्ध कलियुगांत कृष्णवर्ण कांतीनें प्रगट होणारा, सर्व चराचर विश्वाचा प्रभु, संपूर्णांचें उत्पत्तिस्थान, मधु व कैटभया दैत्यांचा संहार करणारा, यज्ञांत मुख्यत्वें भाग घेणारा असून त्या कर्मांत प्रमुखत्वें पूज्य पृथ्वी उदक व आकाश इत्यादि पंच महाभूतांचा नियामक, श्यामसुंदर, सर्वशत्रूंचा नाश करून शांति करणारा गरुडध्वज, महा बलाढ्य समर्थ देव असा तो विष्णु देवादिकांच्या शत्रूंचा संहार करणारें असून उदयाचल पर्वतापासून उदय पावणाऱ्या सूर्यासमान उत्तम तेजानें युक्त असें सुदर्शन चक्र उजव्या हातानें उचलून तशीच आकृतीनें कृष्णवर्ण असून सर्व शत्रूंचा रणांत नाश करणारी मोठी गदा डाव्या हातांत घेऊन व इतर अतितेजःपुंज भुजानीं शार्ङ्गधनुष्यादिक आयुधें ग्रहण करून युद्धार्थ सिद्ध झाला.

सकश्यपस्यात्मभुवंद्विजंभुजगभोजनं॥पवनाधिकसंपातंगगनक्षोभणंखगं॥४०॥भुजगेंद्रेणवदने निविष्टेन विराजितं॥ अमृतारंभनिर्मुक्तंमंदराद्रिमिवोच्छ्रितं॥४१॥देवासुरविमर्देषु बहुशोदृष्टविक्रमं॥महेंद्रेणामृतस्यार्थेवज्रेणकृतलक्षणं॥४२॥शिखिनंबलिनंचैवतप्तकुंडलभूषणं॥ विचित्रपत्रवसनंधातुमंतमिवाचलं॥४३॥स्फीतक्रोडावलंबेनशीतांशुसमतेजसा॥ भोगिभोगावसिक्तेन मणिरत्नेन भास्वता॥४४॥पक्षाभ्यांचारुपत्राभ्यामावृत्यदिविलील

या ॥ युगांते सेंद्रचापाभ्यां तोयदाभ्यामिवांबरं ॥ ४५
नीललोहितपीताभिः पताकाभिरलंकृतं ॥ केतुवेष
प्रतिच्छन्नं महाकायनिकेतनं ॥ ४६ ॥ अरुणावरजं
श्रीमानारुह्य समरे विभुः ॥ सुवर्णस्वर्णवपुषा सुप
र्णं खेचरोत्तमं ॥ ४७ ॥ तमन्वयुर्देवगणा मुनयश्च सः
माहिताः ॥ गीर्भिः परममंत्राभिस्तुष्टुवुश्च जनार्दनं
॥ ४८ ॥

अर्थ- आणि तो समर्थ लक्ष्मीकांत विष्णु उत्तम वर्ण युक्त सुवर्णा समान देहानें सुशोभित व देवश्रेष्ठ अरुणाचा कनिष्ठ बंधु अशा गरुडावर आरोहण करून त्या रणांगणीं आला; त्याचे मागून देवगण व ऋषि हे स्वस्थ चित्तानें उत्तम मंत्र युक्त वाणीनीं त्या जनार्दनाची स्तुति करीत आले. तो गरुड असा कीं, कश्यपाचा पक्षिरूपी पुत्र असून नागांचें भक्षण करणारा, वायूपेक्षां-अधिक वेगाने आकाश मार्गें गमन करण्यानें आकाशास क्षोभ उत्पन्न करणारा असून मोठे भुजंग मुखांत असल्यानें विचित्र शोभा युक्त, अमृत मंथन कालीं समुद्रांत सोडलेल्या मंदर पर्वता समान उंच, आणि देव व असुर यांचे परस्परें झालेल्या अनेक संग्रामांत बहुप्रकारें दृढतेनें पराक्रम करणारा, त्याचप्रमाणें तो गरुड, मातेच्या संकट परिहारार्थ स्वर्गलोकीं अमृत हरण करण्यासाठीं गेला असतां त्याच्या अंगावर इंद्राच्या वज्र प्रहारानें चिन्ह जाहलें होतें; उत्तम शिखा व बल यांनीं युक्त असून तेजोमय कर्ण कुंडलानीं सुशोभित, विचित्र पंख हींच कांहीं एक वस्त्रें ज्यानीं तो गरुड सुवर्णादि धातूनीं शोभायमान पर्वता सारखा दिसत असे; तसाच शीतल किरण चंद्रासारखा तेजस्वी असून सर्व प्रकारें पूर्ण इंगित माहात्म्य युक्त वराह रूपी विष्णूच्या आश्रयानें शोभणारा, तसेच अंगावर धारण केलेल्या नागांचे मस्तकां तील देदीप्यमान रत्नमण्यांच्या कांतीनें सुशोभित असून सुंदर पिसांच्या पंखानीं सहज तो गरुड-आकाशांतील प्रदेश व्याप्त करणारा किंवा इंद्र धनुष्य सहित प्रलय कालच्या मेघां सारखेच कीं काय अशा पंखानीं आकाशास व्याप्त करणारा आणि कृष्ण वर्ण आरक्त व पीत वर्ण या पताकानीं सभोंवतीं सुशोभित व ध्वज रूप चिन्हाचे वेषानें आच्छादित असून महाकाय विष्णूचें वाहन असा तो गरुड त्या का-

ठीं शोभला.

तदैश्रवणसंश्लिष्टंवैवस्वतपुरःसरं॥द्विजराजपतिक्षिप्तंदेवराजविराजितं॥४९॥चंद्रप्रभाभिर्विपुलंयुद्धायसमवर्तत॥

अर्थ- नंतर कुबेरानें ब्यूहाचे नियमानुसार सारखें उभें केलेलें असून अग्रभागीं यमधर्म सेनापतीनें युक्त, आणि गरुड नायक विष्णूनें प्रोत्साहित (उत्साह युक्त केलेलें) देवराज इंद्रानें सुशोभित व चंद्रकांतीनें अति आनंदित असें तें देव सैन्य दैत्यांशीं युद्धार्थ प्रवृत्त जाहलें.

स्वस्त्यस्तुदेवेभ्यइतिबृहस्पतिरभाषत॥स्वस्त्यस्तुदानवानीकेउशनावाक्यमाददे॥

अर्थ- ते समयीं तुह्मास जय प्राप्त असो असा बृहस्पतीनें देवांस आशीर्वाद दिला, तसाच शुक्राचार्यानें दानव सैन्यांत कल्याण असो असा त्या दैत्यांस आशीर्वाद दिला. इतिश्री मत्स्यपुराणें तारकामय युद्धे त्रिसप्तत्युत्तर शततमोऽध्यायः॥१७३॥

अध्याय १७४ वा.

मत्स्यउवाच॥ताभ्यांबलाभ्यांसंजज्ञेतुमुलोविग्रहस्तदा॥सुराणामसुराणांचपरस्परजयैषिणां॥१॥

अर्थ- मत्स्य बोलतात ते समयीं एकमेकांस जिंकावयाची इच्छा करणाऱ्या त्या देव दैत्यांचा परस्पर सैन्यांचा दारुण संग्राम चालला.

दानवादैवतैःसार्धंनानाप्रहरणोद्यताः॥समीयुर्युध्यमानावैपर्वताइवपर्वतैः॥२॥

अर्थ- जसें पर्वतांशीं पर्वतांचें घर्षण व्हावें तसे दैत्य अनेक शस्त्रांनीं सज्ज होऊन देवांशीं युद्ध करीतच येऊन भिडले.

तत्सुरासुरसंयुक्तंयुद्धमत्यद्भुतंबभौ॥धर्माधर्मसमायुक्तंदर्पेणविनयेनच॥३॥

अर्थ- आणि ज्यांत कांहीं धर्म, कांहीं अधर्म, कांहीं गर्व, व कांहीं नम्रता यांनीं ने देव दैत्यांचें असें तें परस्परें मोठें अद्भुत युद्ध झालें.

ततोरथैर्विप्रयुक्तैर्वारणैश्चप्रचोदितैः॥उत्पतद्भि-

श्वगगनमसिहस्तैः समंततः ॥ ४ ॥ क्षिप्यमाणैश्चमुस लैः संपतद्भिश्च सायकैः ॥ चापैर्विस्फार्यमाणैश्चपात्य मानैश्चमुद्गरैः ॥ ५ ॥ तद्युद्धमभवद्घोरं देवदानवसंकुलं ॥ जगतस्त्रासजननं युगसंवर्तकोपमं ॥ ६ ॥

अर्थ- तें असें कीं, ज्यांत वीरानीं रथ व हत्ती यांस पुढें घालून हातांत तरवारी घेऊन शूर आकाशांत चहूंकडे उड्यामारीत, मुसळें फेंकीत धनुष्यांचा टणत्कार करून बाण सोडीत व मुद्गर टाकीत असें जगसत्रास देणारें प्रलय काळच्या अग्नी प्रमाणें भयंकर व मोठें दाट तें देव दानवांचें युद्ध झालें.

हस्तमुक्तैश्चपरिघैर्विप्रयुक्तैश्चपर्वतैः ॥ दानवाः समरे जघ्नुर्देवानिंद्रपुरोगमान् ॥ ७ ॥

अर्थ- तसेंच त्या युद्धांत ते दानव स्वहस्तानीं टोणपे व पर्वत फेंकून इंद्र प्रमुख देवांस मारूं लागले.

तेवध्यमानाबलिभिर्दानवैर्जयकांक्षिभिः ॥ विषण्ण वदनादेवाजग्मुरार्तिंपरांमृधे ॥ ८

अर्थ- ते ह्यां जयानें शोभणाऱ्या बलाढ्य दानवांनीं ताडित होत्साते खिन्न मुख होऊन ते देव संग्रामांत अत्यंत पीडा पावले.

तेस्त्रशूलप्रमथिताः परिघैर्भिन्नमस्तकाः ॥ भिन्नो रस्कादितिसुतैर्वेमूरक्तंव्रणैर्बहु ॥ ९ ॥

अर्थ- तें असें कीं, त्या दैत्यांच्या अस्त्र शूलानीं मर्दित झालेल्या देवांचीं मस्तकें व वक्षस्थलें परिघांनीं फुटून त्या व्रणांतून बहुत रक्त प्रवाह वाहूं लागले.

वेष्टिताः शरजालैश्च निर्यत्नाश्चासुरैः कृताः ॥ प्रविष्टा दानवींमायांनशेकुस्तेविचेष्टितुं ॥ १०

अर्थ- आणि दैत्यानीं देवांस बाण जालानीं वेष्टून त्यांचा प्रयत्न कुंठित केला ते समर्थी देव, दानवांच्या मायेंत सांपडल्यामुळें कांहीं एक पराक्रम करण्यास समर्थ झाले नाहींत.

अस्तंगतमिवाभातिनिष्प्राणसदृशाकृति ॥ बलंसुराणामसुरैर्निष्प्रयत्नायुधंकृतं ॥ ११ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें दैत्यांनीं देव सैन्यातील प्रयत्न व आयुधें नाहींशीं केल्यामु

कें ते प्राणहीन झालेल्या आकारानें लयास गेल्या सारखेच भासले.

दैत्यचापच्युतान्घोरांश्छित्वा वज्रेण तांश्छरान् ॥ श
क्रोदैत्यबलंघोरंविवेशबहुलोचनः ॥ १२

अर्थ- नंतर बहुनयन अशा इंद्रानें वज्रें करून घोर अशा दैत्यांच्या धनुष्यां,
पासून सुटलेल्या बाणांस तोडून भयंकर दैत्य सेनेंत प्रवेश केला.

सदैत्यप्रमुखान्हत्वातद्दानवबलंमहत् ॥ तामसेना-
स्त्रजालेनतमोभूतमथाकरोत् ॥ १३

अर्थ- पश्चात् त्या इंद्रानें प्रमुख दैत्यांस मारून तामस अस्त्र जालानें त्यामो
ठ्या दानव सैन्यांत अंधकार उत्पन्न केला.

तेन्योन्यंनावबुध्यंतदेवानांवाहनानिच ॥ घोरेणातम
साविष्टाःपुरुहूतस्यतेजसा ॥ १४ ॥

अर्थ- त्या वेळेस इंद्राच्या तेजानें व घोर अंधकारांत सांपडल्यामुळें त्यांदै
त्यानीं देवांच्या वाहनांस व आपल्या सैन्यांतही एकमेकांस जाणिलें नाहीं.

मायापाशैर्विमुक्तास्तु यत्नवंतःसुरोत्तमाः ॥ वपूंषिदै
त्यसिंहानांतमोभूतान्यपातयन् ॥ १५

अर्थ- त्या संधीस माया पाशांतून सुटलेल्या उत्तम देवानीं यत्नें करून अं-
धकारानें व्यापलेल्या त्या श्रेष्ठ दैत्यांच्या देहपातास आरंभ केला.

अपध्वस्ताविसंज्ञाश्च तमसानीलवर्चसा ॥ पेतुस्तेदा
नवगणाश्छिन्नपक्षाइवाद्रयः ॥ १६ ॥

अर्थ- जसे पंख तोडलेले पर्वत पडतात तसे ते दानव गण कृष्णवर्ण अंध
कारानें पराजित व मूर्च्छित होऊन भूमीवर पडले.

तत्घनीभूतदैत्येंद्रमंधकारइवार्णवे ॥ दानवंदेवकद
नंतमोभूतमिवाभवत् ॥ १७

अर्थ- समुद्रांतील अंधकारा सारखें देवांपासून नाश पावलेलें मोठ्या दैत्यां
चें तें दाट सैन्य अंधकारानें व्याप्त झालें.

तदासृजन्महामायांमयस्तां तामसींदहन् ॥ युगांतोद्यो
तजननींसृष्टामौर्वेणवह्निना ॥ १८

अर्थ- त्या कालीं और्व नामक अग्नीनें उत्पन्न केलेली असून प्रलयाचा प्र-

काश करणारी मोठी माया मयासुरानें उत्पन्न करून ती इंद्राची तामसी माया जाळिली.

सा ददाह ततः सर्वान्मायामयविकल्पिता ॥ दैत्या-
श्चादित्यवपुषः सद्य उत्तस्थुराहवे ॥ १९ ॥

अर्थ- नंतर मय दैत्यानें उत्पन्न केलेल्या त्या मायेनें संपूर्ण देव जळूं लागले. आणि त्याच मायेच्या योगानें रण भूमींतील ते दैत्य, देहानें सूर्या सारखे तेजःपुंज होऊन उठले.

मायामौर्वींसमासाद्य दह्यमानादिवौकसः ॥ भेजि
रेचेंद्रविषयंशीतांशुंसलिलप्रदं ॥ २० ॥

अर्थ- त्या काळीं और्वऋषीच्या त्या मायेनें जळूं लागलेल्या देवांनीं शीत ल किरण युक्त असून उदक देणाऱ्या इंद्राचा आश्रय केला.

ते दह्यमानास्त्वौर्वेण वन्हिना नष्टचेतसः ॥ शशंसु
र्वज्रिणं देवाः संतप्ताः शरणैषिणः ॥ २१ ॥

अर्थ- असे ते देव त्या और्व नामक अग्नीनें जळूं लागले यामुळें बुद्धिनाश होऊन संताप पावले असतां ते आपणास रक्षक मिळावा या इच्छेनें वज्रधारी इंद्राची प्रशंसा करूं लागले.

संतप्ते मायया सैन्ये हन्यमाने च दानवैः ॥ चोदितो देव-
राजेन वरुणो वाक्यमब्रवीत् ॥ २२

अर्थ- या प्रमाणें ते दानव मारीत असून त्या मायेनें देवसेना संताप पावली असतां देव राज यानें भाष्य केल्यावरून वरुण वाक्य बोलूं लागला.

और्वो ब्रह्मर्षिजः शक्र तपस्तेपे सुदारुणं ॥ और्वः सपू-
र्वं तेजस्वी सदृशो ब्रह्मणो गुणैः ॥ २३ ॥

अर्थ- कीं, हे इंद्रा ब्रह्मर्षिपासून उत्पन्न झालेला और्वऋषि तो पूर्वी तेजस्वी असून गुणानीं ब्रह्मदेवा सारखा होता त्याणें अत्यंत दारुण तप केलें.

तं तपंतमिवादित्यं तपसा जगदव्ययं ॥ उपतस्थुर्मुनि-
गणा दिव्या देवर्षिभिः सह ॥ २४

अर्थ- तेव्हां नारदादि देवर्षी सहित उत्तम ऋषिगण नाश रहित असून सूर्या प्रमाणें तपानें जगास ताप करणारा अशा त्या और्व ऋषी जवळ आले.

हिरण्यकशिपुश्चैव दानवो दानवेश्वरः ॥ ऋषिं विज्ञापयामासुः पुरा परमतेजसं ॥२५

अर्थ- नंतर ते ऋषि व दानवराज हिरण्यकशिपु यानीं त्या उत्कृष्ट तेजःपुंज ऋषीची पूर्वी प्रार्थना केली.

ऊचुर्ब्रह्मर्षय स्तं तु वचनं धर्मसंहितं ॥ ऋषिवंशेषु भगवं श्छिन्नमूल मिदं पदं ॥२६

अर्थ- त्याचा प्रकार, ब्रह्मर्षि, धर्मयुक्त वचन त्या और्व ऋषीस बोलतात कीं, हे भगवन् ऋषिवंशांतील त्या स्थानाचा अगदीं मूलोच्छेद होत आला आहे.

एकस्त्वमनपत्यश्च गोत्रायान्यो न वर्तते ॥ कौमारं व्रतमास्थाय क्लेशमेवानुवर्तसे ॥२७॥

अर्थ- कारण या गोत्रांत दुसरा कोणीही पुरुष राहिला नसून एक तूंच आहेस; तो तरीं संततिहीन असून ब्रह्मचर्यव्रताच्या आश्रयानें क्लेशच भोगीत आहेस.

बहूनि विप्रगोत्राणि मुनीनां भावितात्मनां ॥ एकदेहानि तिष्ठंति विविक्तानि विना प्रजाः ॥२८॥

अर्थ- हे ब्राह्मणा आणि एका शरीरमात्र साधनानें च सर्वत्र परमात्म्याची भावना करणाऱ्या ऋषींचीं कुलें, गोत्रें बहुत आहेत; परंतु त्यांस संतती नाहीं.

एवमुच्छिन्नमूलेश्च पुत्रैर्नो नास्ति कारणं ॥ भवांस्तु तपसा श्रेष्ठो प्रजापतिसमद्युतिः ॥२९॥

अर्थ- या प्रमाणें वंशाचा मूलोच्छेद करणाऱ्या पुत्रांचें आह्मांस कारण नाहीं; परंतु तूं तर तपानें श्रेष्ठ असून प्रजापती सारखा तेजस्वी आहेस.

तत्र वर्तस्व वंशाय वर्धयात्मानमात्मना ॥ त्वया धर्मोर्जितस्तेन द्वितीयां कुरुवे तनुं ॥३०॥

अर्थ- यास्तव तूं वंशवृध्यर्थ प्रवृत्त होऊन आपलें ब्रह्मवर्चस (ब्रह्मतेज) वाढवून स्वयें संपादन केलेल्या धर्मानें पत्नी कर.

स एवमुक्तो मुनिभिस्त्वौर्वो मर्मस्व ताडितः ॥ जगर्हे ता-

नृऋषिगणान्वचनंचेदमब्रवीत्॥३१॥

अर्थ- असें ऋषींनीं मर्मभेदी भाषण केल्यानंतर तो ओर्व मुनि, ऋषि समुदायांची निंदा करून त्यांस हें पुढील वचन बोलला.

यथायंविहितोधर्मोमुनीनांशाश्वतस्रुसः॥आर्षंवैसेवतःकर्मवन्यमूलफलाशिनः॥३२॥ब्रह्मयोनौप्रसूतस्यब्राह्मणस्यात्मदर्शिनः॥ब्रह्मचर्यंसुचरितंब्रह्माणमपिचालयेत्॥३३॥

अर्थ- कीं, जसा हा ऋषींस शास्त्र विहित निरंतर करण्याचा धर्म सांगितला आहे तसाच मी तो करीत आहें; कारण ब्रह्मबीजांत उत्पन्न झालेला असून वनांतील मूल फलें भक्षून वेदोक्त ऋषिकर्म करून परमात्म्याचा साक्षात्कार संपादन केलेल्या ब्राह्मणाचें उत्तम रीतीनें केलेलें ब्रह्मचर्य ब्रह्मदेवासही चित्तांत कंपित करील.

जनानांवृत्तयःतिस्रोयद्गृहाश्रमवासिनां॥अस्माकंतुवरंवृत्तिर्वनाश्रमनिवासिनां॥३४॥

अर्थ- आणि ज्या कारणास्तव गृहस्थाश्रमांत वर्तणाऱ्या जनांस तीन प्रकारच्या वृत्ती आहेत व वानप्रस्थाश्रमांत राहणाऱ्या आह्मांस तर हीच उत्तम वृत्ति आहे.

अब्भक्षावायुभक्षाश्चदंतोलूखलिनस्तथा॥अश्मकुट्टादशतथापंचातपसहाश्चये॥३५॥

अर्थ- त्या वानप्रस्थांत कोणी जल प्राशन करणारे, तसेच वायूचा आहार करणारे कोणी दांतांचें उखळ करून भक्षणारे किती एक दगडानें कुटून खाणारे व कांहीं पंचाग्निसाधन करणारे असे दहा प्रकारचे आहेत.

एतेतपसितिष्ठंतिव्रतैरपिसुदुष्करैः॥ब्रह्मचर्यंपुरस्कृत्यप्रार्थयंतिपरांगतिं॥३६॥

अर्थ- हे सर्व ऋषि मोक्ष गतीच्या इच्छेनें ब्रह्मचर्य पूर्वक अति दुर्घट व्रतयुक्त तप करीत असतात.

ब्रह्मचर्याद्ब्राह्मणस्यब्राह्मणत्वंविधीयते॥एवमाहुःपरेलोकेब्रह्मचर्यंविदोजनाः॥३७॥

अर्थः- ब्राह्मणास ब्रह्मचर्यानेंच ब्राह्मणत्व प्राप्त होतें. असें याविषयीं पर लोकचे ब्रह्मचर्याचे ज्ञाते जन बोलतात.

ब्रह्मचर्येस्थितंधैर्यंब्रह्मचर्येस्थितंतपः॥येस्थिता
ब्रह्मचर्येषुब्राह्मणादिविसंस्थिताः॥३८॥

अर्थः- ब्रह्मचर्यांतच धैर्याची स्थिति असते, ब्रह्मचर्यानेच तप राहते जे ब्राह्मण ब्रह्मचर्यानें वर्ततात ते स्वर्गास जातात.

नास्तियोगंविनासिद्धिर्नवासिद्धिंविनायशः॥ना-
स्तिलोकेयशोमूलंब्रह्मचर्यात्परंतपः॥३९॥

अर्थः- योगसाधना वांचून सिद्धी नाहीं; सिद्धीवांचून यश प्राप्ती नाहीं, आणि या लोकांत यशास कारण ब्रह्मचर्या हून दुसरें तप नाहीं.

योनिगृह्येंद्रियग्रामंभूतग्रामंचपंचकं॥ब्रह्मचर्येस
माधत्ते किमतःपरमंतपः॥४०॥

अर्थः- जो इंद्रिय समुदाय, पंचमहाभूतें व त्यांचे विषय या सर्वांचा निग्रह-करून ब्रह्मचर्यानें वर्ततो त्यास याहून उत्तम तप कोणतें आहे.

अयोगेकेशधरणमसंकल्पव्रतक्रिया॥अब्रह्मचर्ये
चर्याचत्रयंस्याद्दंभसंज्ञकं॥४१॥

अर्थः- योगाभ्यासादिक नसून केश धारण करणें संकल्या वांचून व्रतादि-कर्म करणें, ब्रह्मचर्याचा समय नसून तें कारणें या तीन प्रकारांस दंभ ह्मण.

क्वदाराः क्वचसंयोगः क्वच भावविपर्ययः॥नन्वियं-
ब्रह्मणा सृष्टा मनसामानसी प्रजा॥४२॥

अर्थः- दुसरें असें कीं, स्त्रिया व त्यांचा समागम कोठें आहे आणि तुमच्या मनांत हा विपरीत भाव कसा उत्पन्न झाला. ब्रह्मदेवानें तरही प्रजा मनानें निर्माण केली ह्मणून हिला मानसी सृष्टी असें बोलतात.

यद्यस्ति तपसोवीर्यंयुष्माकंविदितात्मनां॥सृजध्वं-
मानसान्पुत्रान्प्राजापत्येन कर्मणा॥४३॥

अर्थः- तस्मात् तुह्मीं परमात्म्यास जाणणारे असून तुमचे अंगीं जर तपानें सामर्थ्य आहे तर ब्रह्मदेवानीं दर्शविलेल्या कर्मानें मानस पुत्र उत्पन्न करा.

मनसानिर्मितायोनिराधातव्यातपस्विभिः॥नदार

योगोबीजंवाव्रतमुक्तंतपस्विनां॥४४॥

अर्थ- कारण तपस्वी लोकांनीं मनानेंच प्रजा उत्पन्न करावी ह्याच विधि त्यां स शास्त्रानें विहित आहे; परंतु त्यांस स्त्री संगानें वीर्य स्थापन करण्याचा प्र कार सांगितला नाहीं,

यदिदंलुप्तधर्मार्थंयुष्माभिरिहनिर्भयैः॥व्याहृतंस द्भिरत्यर्थमसद्भिरिवमेमतं॥४५॥

अर्थ- असें असून या विषयीं तुह्मीं साधूनीं निर्भयपणें धर्मार्थाचा अत्यं त लोप करण्याचें हें भाषण जरीं केलें तरीं तें असाधूनींच केलें असें माझें मत आहे.

वपुर्दीप्तांतरात्मानमेतत्कृत्वामनोमयं॥दारयोगंवि नास्त्रक्ष्ये पुत्रमात्मतनूरुहं॥४६॥

अर्थ- यास्तव मी या शरीरांत अंतरात्म्यास प्रदीप्त करून स्त्री संयोगा वां चून आपले शरीरा पासून होणारा असा मानस पुत्र उत्पन्न करतों.

एवमात्मानमात्मामे द्वितीयंजनयिष्यति॥वन्येना नेनविधिनादिधिक्षंतमिवप्रजाः॥४७॥

अर्थ- अशाया वानप्रस्थ विधीनें माझें मन दुसऱ्या पुत्रास उत्पन्न करील. तो सर्व प्रजेस दग्ध करीलच कीं काय असा अतितेजस्वी होईल.

और्वस्तुतपसाविष्टोनिवेश्योरुंहुताशने॥ममंथैके नदर्भेणसुतस्यप्रभवारणिं॥४८॥

अर्थ- असें बोलून तो और्वऋषि तपानें युक्त होत्साता पुत्र उत्पन्न करण्या ची कोणी एक अरणी सारख्या आपल्या मांडीस अग्नींत ठेवून तिचें एका दर्भा नें मंथन करूं लागला.

तस्योरुंसहसाभित्वाज्वालामालीह्यनिंधनः॥जग तोदहनाकांक्षीपुत्रोग्निः समपद्यत॥४९

अर्थ- नंतर त्याची मांडी फोडून काष्ठ रहित अग्नीच पुत्रलें करून उत्पन्न झाला; तो ज्वालांच्या समुदायानें सुशोभित असून जगास दग्ध करण्याची इच्छा क- रूं लागला.

ऊर्वस्योरुंविनिर्भिद्य और्वोनामांतकोनलः॥दिधक्ष

म्भिवलोकांस्त्रीन्जज्ञेपरम कोप नः॥ ५०॥

अर्थ- तो त्रैलोक्यास जाळतोच काय असा महा कोपिष्ट अग्नि, ऊर्व ऋषी-ची मांडी फोडून निघाला ह्मणून त्यास ओर्व अग्नि ह्मणतात.

उत्पन्नमात्रश्चोवाचपितरंक्षीणयागिरा॥ क्षुधामे बाधतेतातजगद्भक्ष्येत्यजस्वमां॥ ५१

अर्थ- आणि तो अग्नि उत्पन्न होतांचक्षणीं पित्यास दीन वाणीनें बोलला कीं, हे ताता मला क्षुधा पीडा करित्ये यास्तव तुह्मीं मला जग भक्षण कर ण्या विषयीं आज्ञा द्या.

त्रिदिवारोहिभिर्ज्वालैर्जृंभमाणोदिशोदश॥ निर्दहन् सर्वभूतानिववृधेसोंतकोनलः॥ ५२॥

अर्थ- असें बोलून तो सर्व भूतांचा नाश कारक अग्नि जांभयाचदेत आ हे कीं काय अशा स्वर्गा पर्यंत जाणाऱ्या आपल्या ज्वाळानीं दशदिशा जा ळीत वृद्धिंगत जाहला.

एतस्मिन्नंतरेब्रह्मामुनिमूर्वंसभाजयन्॥ उवाचवा र्यतांपुत्रोजगतश्चदयांकुरु॥ ५३॥

अर्थ- इतक्या संधींत ब्रह्मदेव सन्मान पूर्वक ऊर्व ऋषीसं बोलले कीं, हे ऋषे या पुत्राचें निवारण कर आणि या जगावर दया कर.

अस्यापत्यस्यतेविप्रकरिष्येस्थानमुत्तमं॥ तथ्यमेत द्वचः पुत्रशृणत्वंवदतांवर॥ ५४

अर्थ- हे ब्राह्मणा या तुझ्या पुत्रास मी उत्तम स्थान देईन, हे पुत्रा तूं वक्त्यां त श्रेष्ठ आहेस यास्तव माझें हें सत्य वचन श्रवण कर.

ऊर्वउवाच॥ धन्योस्म्यनुगृहीतोस्मियन्मेद्यभगवान्वि भोः॥ मतिमेतांददातीहपरमानुग्रहायवै॥ ५५

अर्थ- नंतर ऊर्व मुनि बोलला हे ब्रह्मदेवा तुमच्या कृपादृष्टीनें आज मी धन्य आहें. कारण भगवान् तुह्मीं बाळकास, मला उत्तम अनुग्रह करण्या साठीं लोक कल्याणा विषयीं ही बुद्धी सांगतां.

प्रभातकालेसंप्राप्तेकांक्षितव्येसमागमे॥ भगवन्त र्पितःपुत्रः कैर्हव्यैः प्राप्स्यतेक्षमं॥ ५६॥

अर्थ- हे भगवन् ब्रह्मदेवा प्रातःकाल झाल्यावर मला पुत्रसमागमाची इच्छा आहे तर माझा पुत्र कोणत्या होम द्रव्यानीं तृप्त केला असतां सुख पावेल.

कुत्रचास्य निवासःस्याद्भोजनंवाकिमात्मकं॥ विधास्यती ह भगवान् वीर्यतुल्यंमहोजसः॥ ५७॥

अर्थ- आणि त्या महा तेजस्वी पुत्रास राहण्याचें स्थान कोणतें होईल व आपण त्याच्या सामर्थ्यानुरूप त्यास कोणत्या पदार्थाचें भोजन या लोकांत उत्पन्न कराल?

ब्रह्मोवाच॥ वडवामुखेस्यवसतिः समुद्रेवै भविष्यति॥ ममयो निर्जलंविप्र तस्यपीत वतःसुखं॥ ५८॥

अर्थ- ते समयीं ब्रह्मदेव बोलले हे ब्राह्मणा समुद्रांत घोडीच्या मुखांत या पुत्राची स्थिति होईल आणि माझें उत्पत्ति स्थान जें उदक तें प्राशन केलें असतां यास सुख होईल.

यत्राह मासनियतं पिबन् वारिमयंहविः॥ तद्धविस्त वपुत्रस्य विसृजाम्यालयंचतत्॥ ५९॥

अर्थ- आणि मी ज्यास्थानीं जलरूप हवीचें प्राशन करीत नियमानें राहतहो तों तेंच उदक मी तुझ्या पुत्रास भोजन व राहण्याचें स्थान करितों.

ततो युगांते भूतानामेषचाहंच पुत्रक॥ सहितौविचरि ष्यावोनिष्पुत्राणामृणापहः॥ ६०

अर्थ- नंतर हे वत्सा पुत्रहीन प्राण्यांच्या ऋणांचा परिहार करणारा हा तुझा पुत्र व मी असे उभयतां प्रलय कालीं संचार करूं.

एषोग्निरंतकालेतुसलिलाशीमयाकृतः॥ दहनः सर्व भूतानांसदेवासुररक्षसां॥ ६१॥

अर्थ- कारण प्रलय कालीं उदक शोषणा विषयीं मी या अग्नीची योजना केली असून तोच देव, असुर व राक्षस इत्यादिक संपूर्ण भूतांचें भस्म करील.

एवमस्त्विति तंसोग्निः संवृतज्वालमंडलः॥ प्रविवेशा र्णवमुखं प्रक्षिप्यपितरिप्रभां॥ ६२॥

अर्थ- असें ब्रह्मदेवाचें भाषण ऐकतांच तथास्तु असें बोलून तो अग्नि आपल्या ज्वालांचें मंडल आवरून तें तेज पित्याचे अंगीं स्थापन करून आप

ण समुद्राच्या मुखांत प्रविष्टझाला.

प्रतियातस्ततोब्रह्मायेनचसर्वेमहर्षयः॥ऊर्वस्याग्नेःप्र
भांज्ञात्वास्वांस्वांगतिमुपाश्रिताः॥ ६३॥

अर्थः- नंतर ब्रह्मदेवसहित संपूर्ण मोठे ऋषि त्या और्व अग्नीच्या तेजाचें सामर्थ्य जाणून स्वस्थानीं गेले.

हिरण्यकशिपुर्दृष्ट्वातदातन्महदद्भुतं॥उच्चैःप्रणतस
र्वांगोवाक्यमेतदुवाचह॥ ६४॥

अर्थः- त्या काळीं हिरण्यकशिपूनें तें महा अद्भुत कृत्य पाहून तो सर्वांगानें नम्र होऊन उंचस्वरानें हें पुढील वाक्य बोलला.

भगवन्नद्भुतमिदंसंवृत्तंलोकसाक्षिकं॥तपसातेमु-
निश्रेष्ठपरितुष्टःपितामहः॥ ६५॥

अर्थः- कीं हे भगवन् ऊर्व ऋषे सर्व लोकांच्या समक्ष ब्रह्मदेव तुला तपानें संतुष्ट झाले हें अद्भुत घडलें.

अहंतुतवपुत्रस्यतवचैवमहाव्रत॥भृत्यइत्यवगंत-
व्यःसाध्योयदिहकर्मणा॥ ६६॥

अर्थः- यास्तव हे ब्रह्मचर्यसंपन्न ऋषे मी तुझा व तुझ्या पुत्राचा तुमच्या अमानुष कर्मामुळें सेवक झालों आहें असें आपण समजावें.

तन्मांपश्यसमापन्नंतवैवाराधनेरतं॥यदिसीदेमुनि
श्रेष्ठतवैवस्यात्पराजयः॥ ६७॥

अर्थः- तस्मात् हे मुनिश्रेष्ठा मी तुझ्याच आराधना विषयीं तत्पर असून तुला अनन्य भावानें शरण आहें हें तूं पहा आणि असें असूनजर मी दुःखी होईन तर तो तुझाच पराजय होईल.

ऊर्वउवाच॥धन्योस्म्यनुगृहीतोस्मियस्यतेहंगुरु
स्थितः॥नास्तिमेतपसानेनभयमद्येहसुव्रत॥ ६८

अर्थः- नंतर ऊर्व ऋषि बोलतोकीं, हे उत्तम व्रतनिष्ठा हिरण्यकशिपो आजतूं मला गुरुत्वें करून मानिलेंस तस्मात् मी धन्य आहें; आणि तुजवर संतुष्ट झालों आतां या माझ्या तपापासून तुला भय नाहीं.

तामेवमायांगृण्हीष्वममपुत्रेणनिर्मितां॥ निरिंध-

नामग्निमयींदुर्धर्षांपावकेरपि ॥ ६९ ॥

अर्थ- आणि हे दानवा अग्नीनीं ही जिंकण्यास अशक्य असून काष्ठादि साधन रहित अशी माझ्या पुत्रानें निर्माण केलेली ही अग्नि स्वरूप माया, तूं ग्रहण कर.

एषातेस्वस्यवंशस्यवशगारिविनिग्रहे ॥ संरक्षत्यात्मपक्षंच विपक्षंच प्रधर्षति ॥ ७० ॥

अर्थ- कारण ही माया तुझ्या स्वकीय वंशाच्या स्वाधीन राहून शत्रूंच्या निग्रहा विषयीं समर्थ आहे; आणि आपल्या पक्षाचें संरक्षण करून शत्रुपक्षाचा नाश करिते.

एवमस्त्विति तांगृह्य प्रणम्य मुनिपुंगवं ॥ जगामत्रिदिवं हृष्टः कृतार्थो दानवेश्वरः ॥ ७१ ॥

अर्थ- असें ऊर्व ऋषीचें भाषण ऐकून तथास्तु असें बोलून तो दानव राज हिरण्य कशिपु ती माया घेऊन कृतकार्य झाल्यामुळें अति हर्षयुक्त होत्साता त्या ऋषिश्रेष्ठास नमस्कार करून स्वर्गास गेला.

एषादुर्विषहामाया देवैरपि दुरासदा ॥ और्वेणनिर्मितापूर्वं पावकेनोर्वसूनुना ॥ ७२ ॥

अर्थ- ही देवांसही दुर्मिळ असून सहन करण्यास अशक्य अशी ती माया पूर्वी ऊर्व ऋषीचा पुत्र और्व नामक अग्नीनें निर्माण केली.

तस्मिंस्तुव्युत्थितेदैत्ये निर्वीर्यैषानसंशयः ॥ शापोह्यस्याः पुरादत्तोसृष्टायेनैवतेजसा ॥ ७३ ॥

अर्थ- परंतु तो मय नामा दैत्य पडला असतां ही माया निर्वीर्य होईल या विषयीं संशय नाहीं कारण ज्यानें आपल्या तेजानें ही माया निर्माण केली त्यानेंच पूर्वी इला शापही दिला आहे.

यद्येषाप्रतिहंतव्या कर्तव्यो भगवान्सुखी ॥ दीयतां मेसखाशक्र तोययोनिर्निशाकरः ॥ ७४ ॥

अर्थ- वरुण बोलला कीं, हे भगवन्इंद्रा जर ह्या मायेचा नाश करून हा सेना समुदाय सुखी करावा अशी इच्छा आहे तर उदक रूपी हा सखा चंद्र माझ्या साह्यार्थ द्यावा.

तेनाहंसहसंगम्ययादोभिश्चसमावृतः॥ मायामेतां हनिष्यामित्वत्प्रसादान्नसंशयः॥ ७५॥

अर्थ- ह्मणजे तो चंद्र व जलचर प्राणी यां सहवर्तमान मी तुझ्या कृपेनें त्या मायेचा नाश करीन यांत संशय नाहीं. इतिश्री मत्स्यपुराणे तारकामय युद्धं नाम एकोत्तर चतुःसप्ततितमो ध्यायः १७४

अध्याय १७५वा.

मत्स्यउवाच॥ एवमस्त्वितिसंहृष्टः शक्रस्त्रिदशवर्धनः॥ संदिदेशाग्रतःसोमंयुद्धायशिशिरायुधं॥ १

अर्थ- भगवान् मत्स्य बोलतात हे मनुराजा वरुणाचें तें भाषण ऐकून देवांची सर्व प्रकारें वृद्धि करणाऱ्या इंद्रानें अत्यंत हर्षकरून अति शीत रूप आयुधयुक्त चंद्रास अग्रभागीं युद्धार्थ जाण्या विषयीं आज्ञा केली.

गच्छसोमसहायत्वंकुरुपाशधरस्यवै॥ असुराणांविनाशायजयार्थंचदिवौकसां॥ २॥

अर्थ- कीं, हे चंद्रा असुरांचा नाश होऊन देवांस जय प्राप्त होण्या साठीं तूं जाऊन वरुणाचें साहाय्य कर.

त्वंमत्तःप्रतिवीर्यश्चज्योतिषांचेश्वरेश्वरः॥ त्वन्मयंसर्वलोकेषुरसंरसविदोविदुः॥ ३॥

अर्थ- कारण तूं माझ्यापेक्षां पराक्रमी असून नक्षत्र गणांतील प्रभुरवांचा नियंता आहेस आणि रसांचे ज्ञाते सर्व लोकां तील रस मात्रांत तूं व्याप्त आहेस असें जाणतात.

क्षयवृद्धीतवव्यक्तेसागरस्येवमंडले॥ परिवर्तस्यहोरात्रंकालंजगतियोजयन्॥ ४॥

अर्थ- आणि तुझ्या मंडलांत समुद्रासारख्या क्षय व वृद्धि त्या स्पष्ट दिसतात व या जगांत लोकहितार्थ काल मानाची योजना करीत तूं रात्रंदिवस भ्रमण करितोस.

लोकच्छायामयंलक्ष्मतवांकःशशसन्निभः॥ नविदुःसोमदेवापियेचनक्षत्रयोनयः॥ ५

अर्थ- हे चंद्रा जे देव नक्षत्रांस उत्पन्न करणारे तेहि तुझें हें सशासारखें लो-

कच्छाया रूप चिन्ह जाणत नाहींत.

त्वमादित्यपथादूर्ध्वे ज्योतिषांचोपरिस्थितः ॥ तमः प्रोत्सार्य सहसा भासयस्यखिलं जगत् ॥ ६

अर्थ- हे चंद्रा तूं सूर्याचे मार्गावर असून नक्षत्र मंडळांवर राहातोस आणि आपल्या उदया बरोबर अकस्मात् अंधकाराचा नाश करून संपूर्ण जगास प्रकाशित करतोस.

अधिकृत् कालयोगात्मा इष्टो यज्ञश्च सोव्ययः ॥ ओषधीशः क्रियायोनिरब्जयोनिरनुष्णभाः ॥ ७ ॥

अर्थ- आणि तूं सर्वाधिकारी कालयोगाचा नियंता असून सर्वांस प्रिय अविनाशी, औषधींचा स्वामी, असल्यामुळें संपूर्ण यज्ञादिक कर्मांस कारण, संपूर्ण क्रियांचें उत्पत्तिस्थान, कमलांचें उत्पत्तिस्थान, व शीतल कांतीनें सुशोभित असा प्रसिद्ध आहेस.

शीतांशुरमृताधारश्चपलः श्वेतवाहनः ॥ त्वं कांतिः कांतिवपुषां त्वं सोमः सोमपायिनां ॥ ८

अर्थ- तसाच तूं शीत किरणयुक्त असून अमृताचा निधि, शीघ्रगामी, शुभ्र वाहनारूढ सुंदर शरीरी लोकांच्या कांतीचा अध्यक्ष व यज्ञांत सोमपान करणारांच्या सोमवल्लीचे रसांचा अधिपति आहेस.

सौम्यस्त्वं सर्वभूतानां तिमिरघ्नस्त्वमृक्षराट् ॥ तद्गच्छ त्वं महासेन वरुणेन वरूथिना ॥ शमय त्वासुरीं मायां ययादह्याम संयुगे ॥ ९ ॥

अर्थ- संपूर्ण भूतांस तूं सौम्य असून अंधकाराचा नाशक, नक्षत्रांचा स्वामी व महत् सैन्याचा अधिपती आहेस; तस्मात् तूं वरुणा सहित युद्धार्थ जा. आणि जिच्या योगानें समरंगणीं आह्मीं दग्ध होत आहों त्या आसुरी मायेचा नाश कर.

सोम उवाच ॥ यन्मां वदसि युद्धार्थे देवराज वरप्रद ॥ एव वर्षामि शिशिरं दैत्यमायापकर्षणं ॥ १० ॥

अर्थ- ते समयीं चंद्र बोलतो कीं, हे वरदायका देवराज इंद्रा तुह्मीं जर मला युद्धाविषयीं आज्ञा करितां तर आतां मी या दैत्यमायेचा नाश करण्या-

त्या बर्फाची वृष्टी करतों.

एतान्मच्छीतनिर्दग्धान्पश्यस्वहिमवेष्टितान्॥ वि
मायान् विमदांश्चैव दैत्यसिंहान्महाहवे॥११

अर्थ- ह्मणजे माझ्या त्या बर्फाच्या तुषारानीं वेष्टित झाल्यामुळें थंडीच्या कडक्यानें या महासंग्रामांतील श्रेष्ठ दैत्य दग्ध होऊन त्यांची माया व गर्व यांचा नाश झालेला तुझ्या दृष्टीस पडेल.

तेषांहिमकरोत्सृष्टाःसपाशाहिमवृष्टयः॥वेष्टयं-
तिस्मतान्घोरान्दैत्यान्मेघगणाइव॥१२॥

अर्थ- असें भाषण करून देवदळांतील त्या चंद्रानें टाकलेल्या वरुण पाशांसहित बर्फाच्या वृष्टीनीं ते भयंकर दैत्य मेघसमुदायांनीं वेष्टित केलेल्या पर्वतां सारखे व्याप्त केले.

तौपाशशीतांशुधरौवरुणेंदूमहाबलौ॥जघ्नतुर्हि
मपातैश्चपाशपातैश्चदानवान्॥१३

अर्थ- असे ते पाश, शीत किरण धारण करणारे महा बलाढ्य वरुण व चंद्र- या उभयतांनीं थंडी आणि पाश या आयुधानीं दानवांस मारिलें.

द्वावंबुनाथौसमरेतौपाशहिमयोधिनौ॥मृधेचेरतु
रंभोभिःक्षुब्धाविवमहार्णवौ॥१४॥

अर्थ- नंतर क्षोभ पावलेले मोठे समुद्र आपल्या उदकानीं जसे पसरतात तसे ते चंद्र व वरुण हे दोघे जलाचे स्वामी पाश व बर्फ या शस्त्रानीं युद्ध करीत त्या रणभूमींत संचार करूं लागले.

ताभ्यामाप्लावितंसैन्यंतद्दानवमदृश्यत॥जगत्संव
र्तकांभोदैःप्रविष्टैरिवसंवृतं॥१५॥

अर्थ- तेव्हां प्रलयकालचे मेघ येऊन वृष्टि करीत असतां, जग जसें आच्छादित होतें तसें त्या उभयतांनीं तें दानव सैन्य पाशसहित बर्फाच्या वृष्टीनें बुडविलेलें दिसूं लागलें.

तावुद्यतांबुनाथौतुशशांकवरुणावुभौ॥शमया-
मासतुर्मायांदेवौदैत्येंद्रनिर्मितां॥१६॥

अर्थ- असे ते संग्रामा विषयीं उद्युक्त झालेले चंद्र व वरुण या उभयतां देवा

नीं दैत्यराज मयासुरानें निर्माण केलेल्या त्या मायेचा नाश केला.

शीतांशुजालनिर्दग्धाःपाशैश्चस्यंदितारणे॥नशेकु
श्चलितुंदैत्याविशिरस्काइवाद्रयः॥१७॥

अर्थः-त्या कालीं शिखर विरहित पर्वत जसे निश्चल दिसतात तसे शीत किरणांच्या समुदायानीं अत्यंत दग्ध झालेले असून वरुण पाशानीं बांधले गेलेले असेते दैत्य चलन वलन करण्यास समर्थ जाहले नाहींत.

शीतांशुनिहृतास्तेतुदैत्यास्तोयहिमार्दिताः॥हिमा-
प्लावितसर्वांगानिरूष्माणइवाग्नयः॥१८

अर्थः-असे सर्वांगीं बर्फानें व्याप्त होऊन पाणी व बर्फ यानीं पीडित झालेले ते दैत्य चंद्रानें उष्म विरहित अग्नी सारखे मारून नाहींसे केले

तेषांतुदिविदैत्यानांविपरीतप्रभाणिवै॥विमानानि-
विचित्राणिप्रपतंत्युत्पतंतिच॥१९

अर्थः-नंतर त्या दैत्यांचीं निस्तेज झालेलीं विचित्र विमानें कितीएक आकाशांत उडतात व कांहीं खालीं पडतात असें झालें.

तान्पाशहस्तग्रथितांश्छादितांश्छीतरश्मिभिः॥
मयोददर्शमायावीदानवान्दिविदानवः॥२०

अर्थः तेसमयीं वरुणानें पाशानीं बांधले असून चंद्राच्या शीतल किरणानीं आच्छादित केलेले असे ते दानव मायावी मयासुरानें आकाशांत पाहिले.

सशिलाजालविततांखड्गचर्माट्टहासिनीं॥पादपो
त्करकूटाग्रां कंदराकीर्णकाननां॥२१॥सिंहव्याघ्र
गणाकीर्णांनदद्भिर्गजयूथपैः॥ ईहामृगगणाकी
र्णांपवनाघूर्णितद्रुमाम्॥२२॥ निर्मितांस्वेनयत्नेन
कूजितांदिविका मगां॥प्रथितांपार्वतींमायाम. सृ
जत्ससमंततः॥ २३॥

अर्थः- आणि त्या कालीं मयासुरानें स्वतः प्रयत्नानें निर्माण केलेली पर्वत-उत्पन्न करणारी प्रख्यात माया देवसैन्यावर चहूं कडे प्रगट केली; ती अशी-कीं, त्या मायेपासून सहस्रावधि पाषाणांची दृष्टि होत असून तरवारी व

टाला या चमकत असत, आणि पर्वत शिखरावर उंच वृक्ष असून त्या पर्वता वरील अरण्यें गुहानीं व्याप्त होतीं तसेंच सिंह व व्याघ्र यांचे समूह तेथें संचार करीत असून हत्तींच्या कळपांतील प्रमुख गजांच्या गर्जना होत आहेत, व लांडग्यांचे समूह त्या पर्वता वरून फिरत असून तेथील वृक्ष वायुवेगानें कंपित होत आहेत अशी ती पर्वत स्वरूप माया महाभयंकर शब्द करीत आकाशमार्गानें इच्छानुसार पाहिजे तिकडे गमन करणारी होती.

सासिशब्दैः शिलावर्षैः संपतद्भिश्चपादपैः ॥ जघान देव संघांश्चदानवांश्चाप्यजीवयत् ॥ २४ ॥

अर्थ- अशा त्या मायेंतील शब्दयुक्त तरवारीं सहित पाषाण वृष्टि व त्या पर्वता वरून पडणारे वृक्ष यानीं मयासुरानें देवांचे समूह मारून दानवांस वांचविलें.

नैशाकरीवारुणीचमायेंनर्दधतुस्ततः ॥ असिभिश्चा-यसगणैःकिरन्देवगणान्रणे ॥ २५ ॥

अर्थ- आणि तो मयासुर रणांगणीं देवांच्या समुदायावर तरवारी व लोखंडी शस्त्रास्त्रें यांची वृष्टी करीत असतां चंद्र व वरुण यांच्या दोन्हीं माया नाश पावल्या.

साश्मयंत्रायुधघना द्रुमपर्वतसंकटा ॥ अभवद्घोरसंचार्यापृथिवीपर्वतैरिव ॥ २६ ॥

अर्थ- नंतर पृथ्वी जशी पर्वतानीं दुर्गम होती, तशी ती रणभूमी त्यावेळेस-पाषाण, यंत्रें, आयुधें, वृक्ष व पर्वत यानीं व्याप्त झाल्या कारणानें संचारास अवघड झाली.

अश्मन्नाप्रहताः केचित्शिलाभिः शकलीकृताः ॥ नानिरुद्धोद्रुमगणैर्देवोदृश्यतकश्चन ॥ २७ ॥

अर्थ- आणि त्यांतील किती एक देव पाषाणानीं सर्वथा नाश पावले कांहीं एकांच्या अंगांचीं शिला प्रहारानीं शकलें झालीं व त्या रणांत कोणीही देव वृक्ष समुदायानें कोंडला गेला नाहीं असें झालेंच नाहीं.

तदपध्वस्तधनुषंभग्नप्रहरणाविलं ॥ निष्प्रयत्नंसुरानीकंवर्जयित्वागदाधरं ॥ २८ ॥

अर्थ- तसेंच संपूर्ण धनुष्यें नाश पावून मोडलेल्या आयुधानीं युक्त व्याप्त

असें तें देवांचें सैन्य गदा धारण करणाऱ्या भगवंता वांचून सामर्थ्य हीन झालें.

सहि युद्धगतः श्रीमानीशानोस्मव्यकंपत ॥ सहिष्णुत्वा
त्तु जगत्स्वामी नचुक्रोधगदाधरः ॥ २९ ॥

अर्थः- आणि श्रीमान्, सर्वनियंता जगांचा स्वामी व गदाधारी असा तो विष्णु आपल्या सहन शक्तीनें स्वस्थाना वरून नचळतां क्रुद्ध हीं झाला नाहीं.

कालज्ञः कालमेघाभः समीक्षन् कालमाहवे ॥ देवासुर
विमर्दंतुद्रष्टुकामस्तदाहरिः ॥ ३० ॥

अर्थः- ते समयीं कालाचा ज्ञाता, प्रलय काळच्या सजल मेघासारख्या नीलवर्ण कांतीनें सुशोभित असा तो हरि त्या रण भूमींत देवांच्या जय कालाची मार्गप्रतीक्षा करीत तें देव दैत्यांचें परस्पर चाललेलें युद्ध पहात उभा राहिला.

ततो भगवतादृष्टौ रणेपावकमारुतौ ॥ चोदितौ विष्णु
वाक्येन तौ मायामपकर्षतां ॥ ३१ ॥

अर्थः- नंतर त्या रणांत भगवंतानीं अग्नि, वायु, या उभयतां कडे पाहिलें तेव्हां विष्णूच्या आज्ञे वरून चंद्र व वरुण यानीं त्या मायेचा नाश केला.

ताभ्यामुद्भ्रांतवेगाभ्यां प्रवृद्धाभ्यां महाहवे ॥ दग्धासा
पार्वती माया भस्मी भूतान नाशह ॥ ३२ ॥

अर्थः- तो असा कीं, त्या महा संग्रामांत शरीर व शस्त्रास्त्रें यानीं अत्यंत वृद्धिंगत झालेल्या चंद्र व वरुण यानीं तीं पर्वत उत्पन्न करणारी माया जाळून भस्म करून समूळ नाहींशी केली.

सोनिलोनलसंधुक्तः सोनलश्चानिलाकुलः ॥ दैत्य-
सेनांददहतुर्युगांतेष्विवमूर्च्छितौ ॥ ३३ ॥

अर्थः- नंतर अग्नि व वायू हे परस्पर साहाय्यानें प्रलय काळच्या स्थिती प्रमाणें वृद्धिंगत होऊन दैत्य सेनेस दग्ध करूं लागले.

वायुः प्रधावितस्तत्र पश्चादग्निस्तुमारुतं ॥ चेरतु-
र्दानवानीके क्रीडंतावनिलानलौ ॥ ३४ ॥

अर्थः- ते समयीं प्रथमतः वायू आणि पश्चात् त्याच्या अनुषंगानें अग्नी-असे हे उभयतां धांवून दानव सेनेंत क्रीडा करीत संचार करूं लागले.

भस्मावयवभूतेषु प्रपतत्सूत्सनत्सुच ॥ दानवानांवि

मानेषुनिपतत्सुसमंततः॥ ३५॥ वातस्कंधापविद्धेषुकृतकर्मणिपावके॥माथावधेनिवृत्तेतुस्तूयमानेगदाधरे॥३६॥निष्प्रयत्नेषुदैत्येषुत्रैलोक्येमुक्तबंधने॥संप्रहृष्टेषुदेवेषुसाधुसाध्विनिसर्वशः॥३७॥जयेदशशताक्षस्यदैत्यानांचपराजये॥दिक्षुसर्वासुशुद्धासुप्रवृत्ते धर्मविस्तरे॥३८॥अपावृतेचंद्रमसिस्वस्थानस्थेदिवाकरे॥प्रकृतिस्थेषुलोकेषुत्रिषुचारित्रबंधुषु॥ ३९यजमानेषुभूतेषुप्रशांतेषुचपाप्मसु॥अभिन्नबंधनेमृत्यौहूयमानेहुताशने॥४०॥यज्ञशोभिषुदेवेषुस्वर्गार्थंदर्शयत्सुच॥लोकपालेषुसर्वेषुदिक्षुसंयानवर्तिषु॥४१॥भावेतपसिसिद्धानामभावेपापकर्मणां॥देवपक्षेप्रमुदितेदैत्यपक्षेविषीदति॥४२॥त्रिपादविग्रहेधर्मेअधर्मेपादविग्रहे॥अपावृत्तेमहाद्वारेवर्तमानेचसत्पथे॥४३॥लोकेप्रवृत्तेधर्मेषुस्वधर्मेष्वाश्रमेषुच॥प्रजारक्षणयुक्तेषुभ्राजमानेषुराजसु॥४४॥प्रशांतकल्मषेलोकेशांततमसिदानवे॥अग्निमारुतयोस्तत्रवृत्तेसंग्रामकर्मणि॥४५॥तन्मयाविपुलालोकास्ताभ्यांतज्जयकृत्क्रिया॥पूर्वदेवभयंश्रुत्वामारुताग्निकृतंमहत्॥४६॥कालनेमीतिविख्यातोदानवःप्रत्यदृश्यत॥

अर्थ- त्या कालीं वायु व अग्नि यां पासून दैत्यांस महद्भय प्राप्त झालें असें श्रवण करून कालनेमि प्रसिद्ध दैत्य त्या रणांत आला; तें भय असें कीं, वायुवेगानें ताडित झाल्यामुळें दानवांचीं विमानें चहूंकडे उडून पडल्यावर अग्नीनें त्यांनीं भस्म केलें, त्याकारणानें मयासुराची माया नाशपावली आणि विष्णूनीं दैत्यांस प्रयत्नहीन करून त्रैलोक्य त्या भयांतून मुक्त केलें असतां संपूर्ण देवांस आनंद होऊन त्यानीं गदाधारी भगवंताची स्तुति केली ती अशी कीं, हे देवा आपण हें बहुत उत्तम केलें; यामुळें आतां इंद्राचा जय होऊन दैत्यांचा पराजय झाला; त्या योगानें धर्म प्रवृत्त होऊन सर्व दिशा निर्मल झाल्या आणि

चंद्र, दैत्य मायेंतून मुक्त होऊन सूर्य, स्वस्थानीं आला; तसेंच त्रैलोक्यांतील संपूर्ण लोक आपापल्या स्वभावसिद्ध शांत प्रकृतीनें वर्तूं लागले आणि त्यांनीं आपलें स्वधर्माचरणच आपणांस हितकारक असें मानलें व समस्त राजे यज्ञ करूं लागले त्या योगानें पापें शांत होऊन लोकांतील अपमृत्यु बंद झाला आणि अग्नींत होम होऊं लागले व यज्ञांत शोभणाऱ्या देवानीं यज्ञ करणारांस स्वर्ग दाखविला. तसेंच सर्व लोकपाल आप आपल्या उत्तम वाहनानें दशदिशांत संचार करूं लागले; तशीच सिद्धांस तपाविषयीं भक्ति उत्पन्न होऊन पाप कर्मांचा नाश झाला; तसाच देवांच्या पक्षास आनंद होऊन दैत्यपक्ष खिन्न जाहला असतां धर्म तीन अंशानीं प्रवृत्त झाला व अधर्म एक अंशानें राहिला; त्याच प्रमाणें सन्मार्गप्रवृत्त झाल्यामुळें स्वर्गाचें महाद्वार उघडलें आणि लोकांस धर्मवासना होऊन चारी आश्रमांतील लोकांस स्वधर्मानें वर्तावें असें वाटलें; तसेंच सर्व राजे प्रजासंरक्षण करण्यानें शोभले; तेव्हां लोकांचीं पापें शांत झालीं असें अग्नि व वायु हे उभयतां दैत्यांशीं युद्ध करूं लागले असतां दानवानीं निर्माण केलेला अंधकार नाहींसा झाला.

भास्कराकारमुकुटः सिंजिताभरणांगदः ॥ ४७ ॥ बाहुभिस्तुलयन् व्योम क्षिपन्पद्भ्यां महीधरान् ॥ ईरयन्मुखनिश्वासैर्वृष्टियुक्तान्बलाहकान् ॥ ४८

अर्थ- त्या काळीं तो कालनेमि दैत्य सूर्यासारख्या तेजोमय मुगुटानें शोभत असून चालते समयीं त्याचे पायांतील अलंकार व बाहुभूषणें यांचे शब्द होत असत; आणि तो पायांनीं पर्वत फेंकित व बाहूंनीं आकाशास व्याप्त करून मुखांतील श्वासानीं वृष्टि करणाऱ्या मेघांस कांपवीत त्या रणभूमींत आला.

तिर्यगायतरक्ताक्षं मंदरोदग्रवर्चसं ॥ दिधक्षंतमिवायांतं सर्वान्देवगणान्मृधे ॥ ४९ ॥ तर्जयंतं सुरगणांश्छादयंतं दिशो दश ॥ संवर्तकाले तृषितं दृष्टं मृत्युमिवोत्थितं ॥ ५० ॥ सुतलेनोच्छ्रयवता विपुलांगुलिपर्वणा ॥ लंबाभरणपूर्णेन किंचिच्चलितवर्मणा ॥ ५१ ॥ उच्छ्रितेनाग्रहस्तेन दक्षिणेन वपुष्मता ॥ दानवान्देव

निहतानुत्तिष्ठध्वमितिब्रुवन् ॥ ५२ तंकालनेमिंसमरे-
द्विषतांकालचेष्टितं ॥ वीक्ष्यंते स्मसुराः सर्वे भयवित्र-
स्तलोचनाः ॥ ५३ ॥

अर्थ- तेव्हां रणांगणीं काळासारिखा पराक्रमी असून शत्रुमंडलांत उभा राहिलेल्या त्या कालनेमीस अवलोकन करून सर्व देवांच्या नेत्रांस भयानें अत्यंत त्रास झाला. तो कालनेमि असा कीं, ज्याचे नेत्र वांकडे असून अत्यंत लांब व आरक्त असत, आणि तो दैत्य मंदर पर्वतासमान उत्कृष्ट तेजःपुंज असून संग्रामांत सर्व देवांस दग्धच करितो कीं काय अशा रीतीनें त्या देवगणांस कांपवीत आपल्या शस्त्रानीं दशदिशा व्याप्त करून प्रलय काळीं तृषाक्रांत झालेल्या मृत्यूसारखा दिसला. त्यानें आपला उजवा हात पुढें उंच करून देवानीं मूर्च्छित केलेल्या दानवांस उठा उठा असें बोलला. त्या हाताचा तळवा उत्तम उंचवट असून बोटांचीं पेरें पुष्ट होतीं आणि तो हात लांब असून अलंकारानीं पूर्ण असल्यामुळें सुशोभित असून त्यावरचें कवच किंचित् हालत होतें असा तो हात उंच व पुष्ट होता.

तंवीक्षंतिस्मभूतानिक्रमंतंकालनेमिनं ॥ त्रिविक्रमाधि
क्रमतंनारायणमिवापरं ॥ ५४ ॥

अर्थ- पूर्वी बलीनें विष्णूस त्रिपाद भूमीचें दान करतांच तो वामन रूपी नारायण आपल्या पायांनीं त्या बळीपासून ती त्रैलोक्य भूमी हरण करण्यासाठीं जसा दृद्धिंगत झाला तसा तो कालनेमी त्या रणभूमींत पाय ठेवित चालला असतां त्यावेळेस त्यास हा दुसरा त्रिविक्रमच कीं काय असें सर्व प्राण्यानीं पाहिलें.

सोत्सृज्यपुरःपादमारुताघूर्णितांबरः ॥ प्रक्राम-
न्नसुरोयुद्धे त्रासयामासदेवताः ॥ ५५ ॥

अर्थ- तेव्हां तो कालनेमि आपल्या अति उंच पुढील पायाच्या वायूनें आकाशास फिरवितच आहे कीं काय अशा वेगानें त्या युद्धांत चालला असतां तेव्हांच देवांच्या मनांत त्रास उत्पन्न झाला.

समयेनासुरेंद्रेणपरिष्वक्तस्ततोरणे ॥ कालनेमिर्ब
भौदैत्यः सविष्णुरिवमंदरः ॥ ५६ ॥

अर्थ- ते समयीं त्या रणांगणांत मयासुरानें कालनेमीस आलिंगन केले त्यानंतर तो समुद्र मंथन कालच्या विष्णु सहित मंदराचलवत् शोभला.

अथविव्यथिरेदेवाः सर्वेशक्रपुरोगमाः॥ कालनेमिं-
समायांतंदृष्ट्वाकालमिवापरं॥ ५७॥

अर्थ- नंतर दुसरा काळच काय अशा येणाऱ्या त्या कालनेमीस पाहून इंद्र प्रमुख सर्वदेव चित्तांत व्यथा पावले. इति श्री मत्स्य पुराणे पद्मोद्भव प्रादुर्भावे तारकामय युद्धं नाम पंच सप्तत्युत्तर शततमो ध्यायः॥ १७५॥

अध्याय १७६वा.

मत्स्यउवाच॥ दानवानामनीकेषु कालनेमिर्महासुरः॥ विवर्धतमहातेजास्तपांतेजलदोयथा॥ १॥

अर्थ- नंतर जसा ग्रीष्मऋतूच्या अंतीं मेघ वृद्धिंगत होतो तसा तो महा तेजस्वी कालनेमि असुर आपले देहानें दानव सैन्यांत अतिशयें वाढला.

तंत्रैलोक्यांतरगतंदृष्ट्वातेदानवेश्वराः॥ उत्तस्थुर
परिश्रांताःपीत्वामृतमनुत्तमं॥ २॥

अर्थ- त्या कालीं ते दानवश्रेष्ठ त्रैलोक्य व्यापून उभाराहिलेल्या त्या दैत्यास पाहतांच अत्युत्तम अमृत प्राशन करून श्रमरहित झाल्या सारखे उठले.

तेवीतभयसंत्रासामयतारपुरोगमाः॥ तारकामय
संग्रामेसततंजितकाशिनः॥ ३॥ रेजुरायोधनगतादा
नवायुद्धकांक्षिणः॥

अर्थ- नंतर निरंतर जयानें शोभणारे ते मय, तार प्रमुख दानव त्या तारकामय संग्रामांत निर्भय झाल्यामुळें त्रासरहित होऊन त्या रणभूमींत - शोभत होत्साते युद्धाची इच्छा करूं लागले.

मंत्रमभ्यसतांतेषांव्यूहंत्वपरिधावतां॥ ४॥ प्रेक्षतां
चाभवत्प्रीतिर्दानवंकालनेमिनं॥

अर्थ- आणि मसलत करून व्यूहांत (कोटांत) धांवणारे ते दैत्य,- कालनेमि दानवास अवलोकन करून अत्यंत हर्ष पावले.

येतुतत्रमयस्यासन्मुख्यायुद्धपुरःसराः॥ ५॥ ते

तुसर्वे भयं त्यक्त्वा हृष्टा योद्धुमुपस्थिताः ॥

अर्थ- तेव्हां जेकोणी मयासुराचे प्रमुख योद्धे होते ते सर्व दानव निर्भय होत्साते हर्षानें युद्धार्थ प्रवृत्त झाले.

मयस्तारो वराहश्च हयग्रीवश्च वीर्यवान् ॥ ६ ॥ विप्रचित्तिसुतः श्वेतः खरलंबावुभावपि ॥ अरिष्टो बलिपुत्रश्च किशोराख्यस्तथैव च ॥ ७ ॥ स्वर्भानुश्चामरप्रख्यो वक्त्रयोधी महासुरः ॥ एतेस्त्रविदिनः सर्वे सर्वे तपसि सुस्थिताः ८ दानवाः कृतिनो जग्मुः कालनेमिं तमुद्धतं ॥

अर्थ- ते असे कीं, मय, तार, वराह, पराक्रमी हयग्रीव, विप्रचित्तीचा पुत्र श्वेत, खर व लंब हे दोघे बंधु तसाच बलीचा पुत्र अरिष्ट व किशोर, मुखानें युद्ध करणारा व देवां सारखा महान् असुर राहु हे सर्व अस्त्रांचे ज्ञाते असून तपानें उत्तम स्थितीस प्राप्त झालेले असेते कुशल दानव त्या उन्मत्त कालनेमीच्या समीप आले.

तेगदाभिर्भुशुंडीभिश्चक्रैरथपरश्वधैः ॥ ९ ॥ कालकल्पैश्च मुसलैः क्षेपणीयैश्च मुद्गरैः ॥ अश्मभिश्चाद्रिसदृशैर्गंडशैलैश्च दारुणैः ॥ १० ॥ पट्टिशैर्भिंदिपालैश्च परिघैश्चोत्तमायसैः ॥ घातनीभिः सुगुर्वीभिः शतघ्नीभिस्तथैव च ॥ ११ ॥ युगैर्यंत्रैश्च निर्मुक्तैर्मार्गणैरुग्रताडितैः ॥ दोर्भिश्चायतदीप्तैश्च प्रासैः पाशैश्च मूर्छनैः ॥ १२ ॥ भुजंगवक्त्रैर्लेलिहानैर्विसर्पद्भिश्च सायकैः ॥ वज्रैः प्रहरणीयैश्च दीप्यमानैश्च तोमरैः ॥ १३ ॥ विकोशैरसिभिस्तीक्ष्णैः शूलैश्च शितनिर्मलैः ॥ दैत्याः संदीप्तमनसः प्रगृहीतशरासनाः ॥ १४ ततः पुरस्कृत्य तदा कालनेमिं महाहवे ॥ सादीप्तशस्त्रप्रवरा दैत्यानां रुरुचे चमूः ॥ १५ ॥ द्यौर्निमीलीनसर्वांगा घनानीलांबुदागमे ॥

अर्थ- ते समयीं जसें नीलवर्ण सजल मेघांच्या दाटीनें सर्वत्र व्याप्त झा-

लेलें आकाश शोभतें तसें उत्तम तेजःपुंज शस्त्रांनीं तें दैत्यांचें सैन्य शोभूं लागलें तें असें कीं, त्या सेनेंतील रुष्ट अंतःकरण युक्त ते दैत्य धनुष्यें घेऊन त्या कालनेमीस पुढें करून त्या मोठ्या संग्रामांत युद्धास प्रवृत्त झाले. त्यांत कोणी हातांत गदा घेतल्या असून कोणी भृशुंडी (गोफणी) घेऊन आले; कोणी चक्रें, परशु (कुऱ्हाडी) काळासारखीं मुसळें, फेंकून मारण्याचे मुद्गर, पर्वतासारखे पाषाण घेतले होते तसेच कोणी डोंगरावरून पडलेले पाषाण, पट्टिश (पट्टे) किती एक भिंदिपाल (गोफणी) घेऊन आले कोणांच्या हस्तांत उत्तम लोखंडाचे परिघ (लोखंडानें बांधलेलें हातभर लांकूड) कांहीं एकानीं प्राणनाश करणाऱ्या मोठाल्या शतघ्नी (शेंकडो लोकांस मारणारीं शक्तिनामक आयुधें) घेतलीं असून कोणाच्या हातांत जोड आयुधांचीं यंत्रें होतीं; आणि कोणी दैत्य तेजःपुंज लांब हातानीं तीक्ष्ण ताडन करीत असून बाण सोडीत असत तसेंच किती एकानीं भाले व पाश घेतले असून कोणी दैत्य जिव्हेनें चाटणाऱ्या सर्प मुखांच्या बाणानीं युद्ध करणारे होते; त्याच प्रमाणें कोणी वज्रें, कोणी तोमर किती एकानीं तरवारी उपसून कांहीं एक दैत्य धार लावलेल्या लखलखीत तीक्ष्ण शूलानीं प्रहार करीतच त्या युद्धांत आले.

देवतानामपिचमूर्मुमुदेशक्रपालिता॥१६॥उपेता-
सितकृष्णाभ्यांताराभ्यांचंद्रसूर्ययोः॥

अर्थ- ते समयीं चंद्रसूर्य संबंधि शुभ्र व कृष्ण वर्ण अशा नक्षत्रानीं युक्त असून इंद्रानें संरक्षित अशी देवांची ही सेना आनंद पावली.

वायुवेगवतीसौम्याताराराणपताकिनी॥१७॥तोय-
दाविद्धवसनाग्रहनक्षत्रहासिनी॥यमेंद्रवरुणैर्गुप्ता
धनदेनचधीमता॥१८॥संप्रदीप्ताग्निनयनानाराय-
णपरायणा॥सासमुद्रौघसदृशीदिव्यादेवमहाचमूः
॥१९॥रराजास्त्रवतीभीमायक्षगंधर्वशालिनी॥

अर्थ- ती अशीकीं, जिचावेग वायू सारखा त्वरित असून ती सौम्य असे आणि तारागण त्याच पताका, मेघ हेंच वस्त्र, ग्रहनक्षत्रें हेंच कोणी एक हास्य यानीं युक्त होती तिच्या संरक्षणार्थ यम, इंद्र, वरुण, व बुद्धिमान् कुबेर

हे असत नसाच अत्यंत प्रज्वलित अग्नीच त्यासेनेस नेणारा असून त्रिला-नारायणाचा उत्तम आश्रय होता अशी ती समुद्राच्या ओघासारखी सुंदर देवांची मोठी सेना अस्त्रानीं संपन्न असल्या मुळें भयंकर व यक्ष, गंधर्वानीं अतिशयें सुशोभित दिसत होती.

तयोश्चम्वोस्तदानींतुबभूवससमागमः॥२०॥ द्यावापृथिव्योः संयोगोयथास्याद्युगपर्यये॥

अर्थ- तेव्हां जसा प्रलय कालीं आकाश व पृथिवी यांचा संयोग होतो तसा त्या दोन्हीं सैन्यांचा समागम झाला.

तद्युद्धमभवद्घोरं देवदानवसंकुलं॥२१॥ क्षमापराक्रमपरं दर्पस्य विनयस्यच॥

अर्थ- त्या वेळेस देव, दानवांचें दाट व भयंकर असें तें युद्ध झालें त्यांत कदाचित् ते परस्परांची क्षमा करीत क्वचित् पराक्रम केव्हां गर्व व तशीच नम्रता यारीतीनें तें युद्ध चाललें होतें.

निश्चक्रमुर्बलाभ्यांतुभीमास्तत्रसुरासुराः॥२२॥ पूर्वापराभ्यांसंरब्धाःसागराभ्यामिवांबुदाः॥

अर्थ- तेव्हां जसे पूर्व, पश्चिम समुद्रां पासून मेघ निघतात; तसे त्या दोन्ही सैन्यांतून भयंकर देव, दैत्य निघाले.

ताभ्यांबलाभ्यांसंहृष्टाश्चेरुस्ते देवदानवाः॥२३॥ वनाभ्यां पार्वतीयाभ्यां पुष्पिताभ्यांयथागजाः॥

अर्थ- आणि पर्वत संबंधि पुष्प युक्त वनांतून निघालेले गज जसे संचार करितात तसे त्या उभय सेनेंतील ते देव, दानव अत्यंत हर्षानें संचार करूं लागले.

समाजघ्नुस्ततोभेरीःशंखान्दध्मुरनेकशः॥२४॥ सशब्दोद्यांभुवंखंच दिशश्चसमपूरयत्॥

अर्थ- नंतर त्या दोन्हीं सैन्यांत सहस्रावधी नौबदी व शंख वाजूं लागले असतां तो शब्द स्वर्ग, भूमी, आकाश व दश दिशा यांत व्याप्त झाला.

ज्याघाततलनिर्घोषोधनुषांकूजितानिच॥२५॥ दुंदुभीनांचनिनदोदैत्यमंतर्दधुःस्वनं॥

अर्थ- त्या काळीं धनुष्यांचे शब्द व त्यांच्या दोरीच्या आकर्षणाचे शब्द दुंदुभी-चे नाद यानीं त्या दैत्यांच्या गर्जना लोपून गेल्या.

तेन्योन्यमभिसंपेतुः पातयंतः परस्परं ॥२६॥ बभंजु-
बाहुभिर्बाहून्द्वंद्वमन्येयुयुत्सवः ॥

अर्थ- नंतर ते देव दैत्य एकमेकांच्या अंगावर जाऊन परस्परांस पाडूं लागले व किती एकानीं एकमेकांचे बाहूनीं बाहू मोडले तसेच इतर कांहीं देव, दानव मनःपूर्वक परस्परें द्वंद्व युद्ध करूं लागले.

देवास्तत्राशनिंघोरां परिघांश्चोत्तमायसान् ॥२७॥ नि-
स्त्रिंशान्ससृजुः संख्ये गदा गुर्वीश्च दानवाः ॥

अर्थ- तें असें कीं, देवानीं भयंकर वज्रें पोलादी परिघ दैत्यांवर टाकले; तसेच दानवानीं त्यारणांत तरवारी व मोठ्या गदा देवांस मारल्या.

गदानिपातैर्भग्नांगा बाणैश्च शकलीकृताः ॥२८॥ परि-
पेतुर्भृशं केचित्पुनः केचित्तु जघ्निरे ॥

अर्थ- तेव्हां त्या गदा प्रहारानीं किती एकांचीं अंगे फुटून बाणानीं तुटलीं असतां ते उभय सैन्यांतील वीर अत्यंत मूर्च्छित होऊन भूमीवर पडले; आणि त्यांतील कांहीं योद्धे पुनः उठून परस्परांस प्रहार करूं लागले.

ततो रथैः सतुरगैर्विमानैश्चाशुगामिभिः ॥२९॥ स-
मीयुस्ते सुसंरब्धा रोषादन्योन्यमाहवे ॥

अर्थ- नंतर अतिक्रुद्ध झालेले ते देव, दैत्य अश्वयुक्त रथ व शीघ्र गति युक्त विमानें यांत बसून त्या संग्रामांत रोषानें परस्परांच्या अंगावर आले.

संवर्तमानाः समरे संदष्टोष्ठपुटाननाः ॥३०॥ रथा रथै-
र्निरुध्यंते पादाताश्च पदातिभिः ॥

अर्थ- आणि ते वीर त्या युद्धांत शस्त्रास्त्रादि सामग्रीनें सिद्ध होत्साते अति रोषानें दांतानीं ओंठ चावून रथानीं परस्परांचे रथ व पायदळानें पायदळ यांस अडविले.

तेषां रथानां तुमुलः सशब्दः शब्दवाहिनां ॥३१॥ नभो
नभश्च हियथा नभस्येर्जलदस्वनैः ॥

अर्थ- आकाशांतील पर्जन्य वृष्टि करणाऱ्या मेघांचे शब्दानीं जशीं अंत-

रिक्ष व पृथ्वी हीं स्थलें व्याप्त होतात; तसे चालते समयीं शब्द करणाऱ्या त्या रथांचे शब्दांनीं पृथ्वी व आकाश हीं व्याप्त झालीं.

बभंजुस्तु रथान् केचित् केचित्संपादिता रथैः॥ ३२॥
संबाधमन्ये संप्राप्य न शेकुश्चलितुं रथान्॥

अर्थ— त्या कालीं कोणी वीर परस्परांचे रथ मोडूं लागले; कांहीं योद्धे रथाखालीं सांपडून मरण पावले; व इतर कित्येक वीर युद्धाच्या गर्दीत सांपडून आपले रथ चालविण्यासही समर्थ झाले नाहींत.

अन्योन्यमन्ये समरे दोर्भ्यामुत्क्षिप्य दंशिताः॥ ३३॥
संह्लादमाना भरणा जघ्नुस्तत्रापि चर्मिणः॥

अर्थ— तसेच त्या रणांतील कवच घातलेले इतर योद्धे आपले ढालांतील अलंकारांचा अतिशयें नाद होत असून परस्परांस त्या ढालानीं उचलून टाकीत असून कोणी अन्य वीर ढाल घेऊन एकमेकांस मारीत होते.

अस्त्रैरन्ये विनिर्भिन्ना वेमू रक्तं हतायुधि॥ ३४॥ क्षरज्ज
लानां सदृशा जलदानां समागमे॥

अर्थ— त्याच प्रमाणें कोणी अन्यवीरांचीं अंगें त्या युद्धांत अस्त्रानीं ताडित होऊन बहुत छिन्नभिन्न झालीं असतां त्यांतून रक्तप्रवाह चालून ते योद्धे पर्जन्य कालीं जलवृष्टि करणाऱ्या मेघां सारखे दिसत होते.

तैरस्त्रशस्त्रग्रथितं क्षिप्तोत्क्षिप्तगदाविलं॥ ३५॥ देव
दानवसंक्षुब्धं संकुलं युद्धमाबभौ॥

अर्थ— आणि ते देव, दानव अत्यंत क्षुब्ध झाल्या मुळें त्यानीं अनेक शस्त्रास्त्रें व गदा यानीं व्याप्त केल्यानें तें युद्ध अतिशयें दाटदिसत होतें.

तद्दानवमहामेघं देवायुधविराजितं॥ ३६॥ अन्योन्य
बाणवर्षेण युद्धदुर्दिनमाबभौ॥

अर्थ— तसेच ते दानव याच कोणी मोठ्या मेघानीं व्याप्त असून देवांच्या आयुधानीं सुशोभित व देव दैत्यांच्या बाणवृष्टीनें आच्छादित असें तें युद्धांत आकाश झांकलेलें शोभत होतें.

एतस्मिन्नंतरे क्रुद्धः कालनेमी स दानवः॥ ३७॥ व्यव
र्धत समुद्रौघैः पूर्यमाण इवांबुदः॥

अर्थ- तों इतक्यांत तो कालनेमि दानव क्रुद्ध होऊन समुद्राच्या उदकानें पूर्ण झालेल्या मेघा सारखा अतिशयें वाढला.

तस्यविद्युच्चलापीडैः प्रदीप्ताशनिवर्षिणः ॥ ३८ ॥ गात्रे
नागगिरिप्रख्या विनिपेतुर्बलाहकाः ॥

अर्थ- तेव्हां प्रज्वलित वज्रांची वृष्टि करणाऱ्या त्या कालनेमीच्या विद्युल्लतेस मान चंचल मुगुट युक्त मस्तकानीं गज व पर्वत यां सारखे आकाशांतील मोठे मेघ खालीं पडूं लागले.

क्रोधान्निश्वसतस्तस्य भ्रूभेदस्वेदवर्षिणः ॥ ३९ ॥ सा
ग्निस्फुलिंगप्रतता मुखान्निष्पेतुरर्चिषः ॥

अर्थ- आणि क्रोधामें श्वासोच्छ्वास टाकीत असून भोंवया वांकड्या करून त्यांतून घामाची वृष्टि करणाऱ्या त्या कालनेमीच्या मुखांतून अग्नीच्या ठिणग्या सहित महा विशाल ज्वाला निघूं लागल्या.

तिर्यगूर्ध्वंच गगने ववृधुस्तस्य बाहवः ॥ ४० ॥ पर्वतादिव
निष्क्रांताः पंचास्या इव पन्नगाः ॥

अर्थ- तसेंच त्या कालनेमीचे हात पर्वतांतून निघालेल्या पंचमुख नागांसारखे वांकडे वर व खालीं असे दश दिशांत पसरले.

सोऽस्त्रजालैर्बहुविधैर्धनुर्भिः परिघैरपि ॥ ४१ ॥ दिव्यमा
काशमावव्रे पर्वतैरुच्छ्रितैरिव ॥

अर्थ- तसेंच त्या कालनेमीनें अनेक अस्त्र समुदाय, नानाप्रकारचीं धनुष्यें व परिघ ईहीं करून तें उत्तम आकाश, उंच पर्वतानीं आच्छादित झाल्या सारखें व्यास केलें.

सोऽनिलोद्धूतवसनस्तस्थौ संग्रामलालसः ॥ ४२ ॥ सं-
ध्यातपग्रस्तशिलः साक्षान्मेरुरिवाचलः ॥

अर्थ- असा तो कालनेमी आपले अंगावरील वस्त्रें उडत असून सायंकाळीं सूर्याच्या तेजानें प्रकाश युक्त झालेल्या शिलानीं सुशोभित अशा साक्षात् मेरु पर्वता सारखा त्या रणभूमींत युद्धाच्या इच्छेनें उभा राहिला होता.

ऊरुवेगप्रमथितैः शैलशृंगाग्रपादपैः ॥ ४३ ॥ अपातय
त्देवगणान्वज्रेणेव महागिरीन् ॥

अर्थ- आणि त्यानें आपल्या मांड्यांचे वेगानें पडलेल्या पर्वत शिखरांचीं अग्रें व वृक्ष यानीं वज्र प्रहारानें पडणाऱ्या महापर्वता प्रमाणें त्या देवगणांस पाडिलें.

बहुभिःशस्त्रनिस्त्रिंशैश्छिन्नभिन्नशिरोरुहाः॥ ४४॥
नशेकुश्चलितुंदेवाः कालनेमिहतायुधि॥

अर्थ- त्या कालीं कालनेमीच्या बहुत खड्गादि शस्त्रानीं ताडित होऊन छिन्न भिन्न केशानीं व्याप्त झालेले देव त्या युद्धांत चलन वलन करण्यासही समर्थ झाले नाहींत.

मुष्टिभिर्निहताः केचित्केचित्तुविदलीकृताः॥ ४५॥ य
क्षगंधर्वपतयः पेतुःसहमहोरगैः॥

अर्थ- तसेंच त्या दैत्यानें कितीएक देवांस मुष्टि प्रहारानीं ताडन केलें आणि कांहीं एक देवांचें विदारण केलें व कितीएक यक्ष, गंधर्व यांचें रक्षण करणारे बहुत सरदार तक्षकादिक महानागां सहवर्तमान भूमीवर पडले.

तेनवित्रासितादेवाः समरेकालनेमिना॥ ४६॥ नशेकु
र्यत्नवंतोपियत्नंकर्तुंविचेतसः॥

अर्थ- याप्रमाणें त्या रणांत कालनेमीनें देवांस त्रास दिला असतां अस्वस्थ चित्त झाल्यामुळें ते देव पराक्रमी असून तिलमात्रही प्रयत्न करण्यास समर्थ जाहले नाहींत.

तेनशक्रःसहस्राक्षः स्यंदितःशरबंधनैः॥ ४७॥ ऐरा
वणगतः संख्येचलितुंनशशाकह॥

अर्थ- तसेंच कालनेमीनें आपल्या बाणसमुदायानीं वेष्टित केलेला ऐरावतारूढ सहस्रनयन इंद्र त्या युद्धांत हालण्यासही समर्थ झाला नाहीं.

निर्जलांभोदसदृशोनिर्जलार्णवसप्रभः॥ ४८॥ निर्व्या
पारःकृतस्तेन विपाशोवरुणोमृधे॥

अर्थ- आणि त्या असुरानें वरुणाचें पाशायुध घेऊन त्यास त्या संग्रामांत निर्जल मेघ किंवा शुष्क समुद्र यां सारखें सामर्थ्यहीन केलें.

रणेवैश्रवणस्तेनपरिघैःकामरूपिणा॥ ४९॥ वित्त-
दोपिकृतःसंख्येनिर्जितःकालनेमिना॥

अर्थ- त्याचप्रमाणें त्या कामरूपी कालनेमी दैत्यानें रणांत विश्रवनंदन कु

बेरास परिघांचे प्रहारानीं जिंकलें.

यमः सर्वहरस्तेन मृत्युप्रहरणो रणे ॥ ५० ॥ याम्यामवस्थां संत्यज्य भीतः स्वां दिशमाविशत् ॥

अर्थ- तसाच मृत्युस्वरूप आयुधानें सर्वांचे प्राणहरण करणारा यमही त्या युद्धांत कालनेमीस भिऊन आपली उग्रस्थिति सोडून स्वकीय दक्षिण दिशेस गेला.

स लोकपालानुत्सार्य कृत्वा तेषां च कर्म तत् ॥ ५१ ॥ दिक्षु सर्वासु देहं स्वं चतुर्धा विदधे तदा ॥

अर्थ- असा तो दैत्य सर्व लोकपालांस युद्धांतून मागें सारून त्या इंद्रादिकांचें कर्मही करून त्यानें आपला देह त्या कालीं सर्व दिशांनच हूं कडे वाढविला.

स नक्षत्रपथं गत्वा दिव्यं स्वर्भानुदर्शनं ॥ ५२ ॥ जहार लक्ष्मीं सोमस्य तं चास्य विषयं महत् ॥

अर्थ- आणि त्यानें त्या देहानें जेथें राहूचें दर्शन होतें त्या दिव्य नक्षत्र मार्गांत जाऊन चंद्राची कांति व महान् प्रदेश यांचें हरण केलें.

चालयामास दीप्तांशुं स्वर्गद्वारात्स भास्करं ॥ ५३ ॥ सायनं चास्य विषयं जहार दिनकर्म च ॥

अर्थ- नंतर त्या असुरानें अति तेजःपुंज किरणयुक्त सूर्यास स्वर्गद्वारांतून घालविलें आणि दक्षिणोत्तर अयन मार्गांसहित त्याचा गमन प्रदेश व त्याचें लोकांस प्रकाश करण्याचें कर्म हीं हरण केलीं.

सोऽग्निं देवमुखं दृष्ट्वा चकारात्ममुखाश्रयं ॥ ५४ ॥ वायुं च तरसा जित्वा चकारात्मवशानुगं ॥

अर्थ- तसाच अग्नि हा देवांचें यज्ञभाग पोंचण्याचें मुख आहे असें पाहून त्यास कालनेमीनें आपले मुखांत ठेविलें; व वायूसही बलात्कारानें जिंकून त्यास त्या दैत्यानें आपल्या स्वाधीन केलें.

स समुद्रान् समानीय सर्वाश्च सरितो बलात् ॥ ५५ ॥ चकारात्ममुखे वीर्याद्देहभूताश्च सिंधवः ॥

अर्थ- तसेंच सप्त समुद्र व सर्व नद्या यांस त्या दानवानें बलात्कारें करून आणून आक्रम शक्तीनें नद्यांस स्वमुखांत व समुद्रांस देहांत ठेविलें.

अपः स्ववशगाः कृत्वा दिविजायाश्च भूमिजाः॥५६
सस्वयंभूरिवाभातिमहाभूतपतिर्यथा॥

अर्थ- तशींच आकाश व पृथ्वी यांतील इतर सर्व उदकें आपल्या स्वाधीन करून तो कालनेमी स्वतः पंचमहाभूताधिपति साक्षात् शंकरासारखा पृथ्वीवर शोभूं लागला.

सर्वलोकमयोदैत्यः सर्वभूतभयावहः॥५७॥सलो
कपालैकवपुश्चंद्रादित्यग्रहात्मवान्॥स्थापयामा-
सजगतीं सुगुप्तां धरणीधरैः॥५८॥

अर्थ- या प्रमाणें सर्व लोकांत व्याप्त झाल्यामुळें संपूर्ण लोकांस भयंकर भासणारा असून सकल लोकपालांच्या देहबलादिक समग्र ऐश्वर्ययुक्त महा अद्भुत शरीरी व चंद्र, सूर्य प्रभृति गृहांचा स्वकीय तेजानें नियंता, अशा त्या कालनेमि दैत्यानें सर्व पर्वतांनीं उत्तम प्रकारें रक्षण केलेल्या पृथ्वीसही आपले देहावर स्थापन केलें.

पावकानिलसंपातोरराजयुधिदानवः॥पारमेष्ठ्ये
स्थितः स्थाने लोकानांप्रभवोपमे॥तंतुष्टुवुर्दैत्य-
गणादेवाइवपितामहं॥५९॥

अर्थ- आणि वायु सहित अग्नि समान वेग व तीक्ष्ण तेज यांनीं युक्त असा तो कालनेमी त्या युद्धभूमींत सर्व लोकांस वस्तुमात्रांचे प्रथम ज्ञानास कारण जो सूर्य त्या सारख्या ज्ञान संपन्न अति तेजःपुंज सत्यलोक नामक स्थानांत विराजमान ब्रह्मदेवां सारखा शोभला, तेव्हां ते सर्व दैत्यगण जसे देव ब्रह्मदेवांची स्तुति करितात तशीच त्या कालनेमीदैत्याचें स्तवन करूं लागले.
इतिश्री मत्स्यपुराणे पद्मोद्भव प्रादुर्भावे तारकामय युद्धे षट्सप्तत्युत्तर शततमोऽध्यायः॥१७६॥

अध्याय १७७.

मत्स्यउवाच॥ पंचतन्नाभ्यवर्ततविपरीतेनकर्मणा
॥वेदोधर्मःक्षमासत्यंश्रीश्चनारायणाश्रया॥१॥

अर्थ- मत्स्य बोलतात हे मनुराजा वेद, धर्म, क्षमा, सत्य नारायणाचा आश्रय करणारी लक्ष्मी हे पांच त्या कालनेमीच्या विपरीत आचरणानें त्यास-

अनुसरले नाहींत.

सतेषामनुपस्थानात्सक्रोधो दानवेश्वरः ॥ वैष्णवंप
दमन्विच्छन्ययौनारायणांतिकं ॥ २॥

अर्थ-त्या कारणानें तो दानवराज कालनेमी क्रुद्ध होऊन विष्णूच्या पदाची इच्छा करीत होत्साता नारायणा समीप गेला.

सददर्शसुपर्णस्थं शंखचक्रगदाधरं ॥ दानवानांवि
नाशायभ्रामयंतंगदांशुभां ॥ ३॥

अर्थ-तेव्हां त्या कालनेमीनें शंखचक्र धारी विष्णु गरुडावर बसून दानवांचे नाशार्थ उत्तम गदेनें भ्रमण करीत आहेत असें पाहिलें.

सजलांभोदसदृशंविद्युत्सदृशवाससं ॥ स्वारूढंस्व
र्णपक्षाढ्यंशिखिनंकाश्यपंखगं ॥ ४ ॥ दृष्ट्वादैत्य
विनाशायरणेस्वस्थमवस्थितं ॥ दानवो विष्णुमक्षो
भ्यंबभाषेलुब्धमानसः ॥ ५

अर्थ-आणि सर्वदा क्षोभरहित व सजलमेघासमान श्याम सुंदर असून विद्युल्लते सारख्या पीतांबरानें सुशोभित असा तो विष्णु सुवर्णा सारखे रमणीय पंख व उत्तम शिखा यानीं शोभायमान अशा त्या कश्यप नंदन गरुडावर बसून दैत्य संहारार्थ उभा राहिला आहे असें पाहून तो कालनेमी लोभाविष्ट अंतःकरणानें विष्णूस बोलूं लागला.

अयंसरिपुरस्माकंपूर्वेषांप्राणनाशनः ॥ अर्णवावा
सिनश्चैवमधोर्वैकैटभस्यच ॥ ६॥

अर्थ-कीं समुद्रांत वास करणारे मधुव कैटभ इत्यादिक आमच्या पूर्वज दैत्यांचा यानें वध केला; तस्मात् हा आमचा निश्चित पुरातन शत्रू आहे.

अयंसविग्रहोस्माकमशाम्यः किलकथ्यते ॥ अने
नसंयुगेष्वद्य दानवाबहवोहताः ॥ ७

अर्थ-आणि यानेंच पूर्वीच्या वत्या युद्धांत सांप्रत बहुत दानवांचा नाश केला तस्मात् आह्मांशीं विरोधकरणारा हा विष्णु आम्हांस अवध्य आहे-असें लोकांचें निश्चित ह्मणणें आहे.

अयंसनिर्घृणोलोकेस्त्रीबालनिरपत्रपः ॥ येन

दानवनारीणांसीमंतोद्धरणंकृतं ॥८

अर्थ- त्याच प्रमाणें यानें दानवांच्या स्त्रियांस वैधव्य आणून त्यांचे केशपाश (बुचडे) काढिले; तस्मात् हा लोकांत निर्दय असून स्त्रिया व बालयांपेक्षांही निर्लज्ज आहे

अयंसविष्णुर्देवानांवैकुंठश्चदिवौकसां॥अनंतोभोगिनामप्सुस्वपन्नाद्यःस्वयंभुवः॥ ९॥

अर्थ- तसाच देवांचा प्रसिद्ध विष्णु तो हाच आणि अंतरिक्ष वासि लोकांत-वैकुंठ वासी तो हाच आहे; त्याच प्रमाणें नागांत यास अनंत ह्मणतात व ब्रह्मदेवांच्या पूर्वी उदकांत शयन करणारा हाच आहे.

अयंसनाथोदेवानामस्माकंव्यथितात्मनां॥अस्यक्रोधंसमासाद्यहिरण्यकशिपुर्हतः॥१०

अर्थ- आणि आह्मा पासून पीडित झालेल्या देवांचा रक्षक हाच आहे व याच्याच क्रोधानें हिरण्य कशिपु मरण पावला.

अस्यच्छायामुपाश्रित्यदेवामखमुखेश्रिताः॥
आज्यंमहर्षिभिर्दत्तमश्नुवंतित्रिधाहुतं॥११

अर्थ- आणि या विष्णूच्या शक्तीच्याच आश्रयानें देव अग्निमुखांत राहून महर्षींनीं त्रिकालीं होमांत अर्पण केलेल्या घृताचें भक्षण करतात.

अयंसनिधनेहेतुःसर्वेषाममरद्विषां॥यस्यचक्रेप्रविष्टानिकुलान्यस्माकमाहवे॥१२॥

अर्थ- व देवांचा द्वेष करणाऱ्या सर्व दैत्यांच्या नाशास कारण हा विष्णूच आहे कारण संग्रामीं याच्या चक्रानें आमचीं कुलें दग्ध झालीं.

अयंसकिलयुद्धेषुसुरार्थेत्यक्तजीवितः॥सवितुःस्तेजसातुल्यंचक्रंक्षिपतिशत्रुषु॥१३

अर्थ- तसाच हा विष्णु सकल युद्धांत देव कार्यार्थ प्राण त्यागही करील; आणि सूर्यासारखें तेजोमय आपलें सुदर्शन शत्रूंवर टाकतो.

अयंसकालोदैत्यानांकालभूतःसमास्थितः॥अतिक्रांतस्यकालस्यफलंप्राप्स्यतिकेशवः॥१४

अर्थ.– आणि काळरूपी तो विष्णु दैत्यांचा वध करण्या साठीं काळ होऊन राहिला आहे तस्मात् आतां हा केशव काळाचा अधिकार घेतल्यानें फल पावेल.

दिष्ट्येदानींसमक्षंमेविष्णुरेषसमागतः॥अद्यमद्बाहुनिष्पिष्टोमामेवप्रणमिष्यति॥१५॥

अर्थ.– आणि माझ्या दैवयोगानें सांप्रत हा विष्णु युद्धार्थ समक्ष आला आहे तर हा आज माझ्या बाहुबलानें पीडित होऊन मलाच नमस्कार करील.

यास्याम्यपचितिंदिष्ट्यापूर्वेषामद्यसंयुगे॥इमंनारायणंहत्वादानवानांभयावहं॥१६

अर्थ.– आणि युद्धांत दानवांस भयदेणाऱ्या या नारायणास मारून दैवयोगानें मी पूर्वजांच्या ऋणांतून आजमुक्तहोईन.

क्षिप्रमेवहनिष्यामिरणेमरगणांस्ततः॥जात्यंतरगतोह्येषबाधतेदानवान्मृधे॥१७॥

अर्थ.– नंतर रणांत मी सर्व देव गणांस त्वरितच मारीन कारण हा विष्णु मत्स्यादिक अन्य जातींच्या वेषानें संग्रामांत दानवांस पीडा करितो.

एषोनंतःपुराभूत्वापद्मनाभइतिश्रुतः॥जघानैकार्णवेघोरेतावुभौमधुकैटभौ॥१८॥

अर्थ.– हाच पूर्वी अनंत असून पुढें पद्मनाभ नामानें प्रख्यात झाला; आणि यानेंच तेदोघे मधुकैटभ दैत्य भयंकर प्रलय समुद्रांत मारिले.

द्विधाभूतंवपुःकृत्वासिंहस्यार्धंनरस्यच॥पितरंमेजघानैकोहिरण्यकशिपुंपुरा॥१९॥

अर्थ.– आणि यानेंच पूर्वी आपलें रूप अर्धें सिंहाकृति व अर्धें नराकार असें दोन प्रकारचें करून एकट्यानेंच मला पित्यासारखा मान्य जो हिरण्यकशिपु-त्यास मारिलें.

शुभंगर्भमधत्तेनमदितिर्देवतारणिः॥त्रीन्लोकानुज्जहारैकोक्रममाणस्त्रिभिःक्रमैः॥२०

अर्थ.– तसेंच देवांस उत्पन्न करणाऱ्या अग्निधारक अरणी सारख्या अदितीनें हा कल्याण कारक विष्णु आपल्या गर्भांत धारण केला; पश्चात् यानें तीन पावलांनीं त्रैलोक्य व्याप्त करून बळी पासून हरण केलें.

भूयस्त्विदानींसंग्रामेसंप्राप्तेतारकामये॥मयासह-
समागम्यसदेवोविनशिष्यति॥२१

अर्थ:- आणि पुनः सांप्रत या तारकामय संग्रामांत आलेला हा विष्णु माझ्याशीं संग्राम केल्यानें देवांसहित नाश पावेल.

एवमुक्त्वाबहुविधंक्षिपन्नारायणंरणे॥वाग्भिरप्रति
रूपाभिर्युद्धमेवाभ्यरोचयत्॥२२॥

अर्थ:- या प्रमाणें त्या रणांत अवाच्य भाषणानीं नारायणाची बहुत निंदा करून तो कालनेमी युद्धाविषयींच प्रवृत्त झाला.

क्षिप्यमाणोसुरेंद्रेणनचुकोपगदाधरः॥क्षमाबलेन
महतासस्मितंचेदमब्रवीत्॥२३

अर्थ:- असें त्या असुर श्रेष्ठानें तिरस्कारानें बहुत भाषण केलें; तथापि गदाधर विष्णु आपल्या मोठ्या सहनशक्तीमुळें क्रुद्ध न होतां आश्चर्य युक्त हें पुढील भाषण करूं लागले.

अल्पंदर्पबलंदैत्यस्थिरमक्रोधजंबलं॥हतस्त्वंदर्प-
जैर्दोषैर्हित्वायद्भाषसेक्षमं॥२४॥

अर्थ:- कीं हे दैत्या गर्वाचें बल अल्प असतें व क्रोधरहित जें बल तें स्थिर असतें तूं तर गर्वाच्या दोषानीं व्याप्त झालास म्हणून असें रीतिविरुद्ध अयोग्य भाषण करतोस.

अधीरस्त्वंममतोधिगेतत्तववाग्बलं॥नयत्रपुरुषाः
संतितत्रगर्जंतियोषितः॥२५॥

अर्थ:- हे दैत्या तुझ्या अंगीं धैर्य नाहीं; असें मी मानतों कारण ज्या स्थानीं पुरुष नाहींत त्या स्थळीं स्त्रिया गर्जना करतात; तसें हें तुझें वाचिकच बल आहे तस्मात् या वृथा वचनास धिक्कार असो.

अहंत्वांदैत्यपश्यामिपूर्वेषांमार्गगामिनं॥प्रजापति
कृतंसेतुंभित्वाकःस्वस्तिमान्व्रजेत्॥२६

अर्थ:- आणि हे दैत्या तूं आपले पूर्वजांच्या यमलोक मार्गास जाशील असें मला भासतें कारण ब्रह्मदेवानें निर्माण केलेल्या मर्यादेचें उल्लंघन केल्यानें कोण कल्याण पावेल.

अद्यत्वांनाशयिष्यामिदेवव्यापारघातकं॥ स्वेषुस्वेषु
चस्थानेषुस्थापयिष्यामिदेवताः॥ २७॥

अर्थ- यास्तव आजमी देवांच्या पराक्रमादिक अधिकारांचा नाश करणा त्यातुला मारून सर्वदेवांस आपापल्या स्थानांवर स्थापन करीन.

एवंब्रुवतिवाक्यंतुमृधेश्रीवत्सधारिणि॥ जहासदा-
नवःक्रोधाद्रक्तांश्चक्रेसहायुधान्॥ २८॥

अर्थ- त्या कालीं संग्रामांत श्रीवत्सलांछन विष्णु असें वाक्य बोलत अस तां त्या कालनेमि दानवानें क्रोधें करून हातांत आयुधें घेऊन हास्य केलें.

सबाहुशतमुद्यम्यसर्वास्त्रग्रहणंरणे॥ क्रोधाद्द्विगु
णरक्ताक्षोविष्णुंवक्षस्यताडयत्॥ २९॥

अर्थ- नंतर त्या रणांत रोषानें द्विगुणित आरक्तनेत्र युक्त तो कालनेमी सर्व अस्त्रें धारण केलेले आपले शंभर भुज वर करून विष्णूस वक्षस्थळीं ताडन करिता जाहला.

दानवाश्चापिसमरेमयतारपुरोगमाः॥ उद्यतायुध-
निस्त्रिंशाविष्णुमभ्यद्रवन्रणे॥ ३०॥

अर्थ- नंतर त्या युद्धांत मयासुर व तार दैत्य इत्यादिक अनेक दानव आपलीं तरवारी आदिकरून आयुधें उगारून विष्णूवर धांवले.

सताड्यमानोतिबलेर्दैत्यैःसर्वोद्यतायुधैः॥ नचचा
लततोयुद्धेकंपमानइवाचलः॥ ३१॥

अर्थ- या प्रमाणें जसा पर्वत अनेक प्रहार केलेतरी हालत नाहीं त्या प्रमाणें सर्व आयुधें धारण केलेल्या त्या अतिबलिष्ठ दैत्यानीं विष्णूस बहुन शस्त्र प्रहार केले तथापि ते कंपित झाले नाहींत.

संसक्तश्चसुपर्णेनकालनेमीमहासुरः॥ सर्वप्राणे
नमहतींगदामुद्यम्यबाहुभिः॥ ३२॥

अर्थ- तेव्हां महान् असुर कालनेमि आपले हातानीं मोठ्याशक्तीनें थोरलीगदा उचलून गरुडाशीं युद्धार्थ प्राप्त जाहला.

घोरांज्वलंतींमुमुचेसंरब्धोगरुडोपरि॥ कर्मणातेन
दैत्यस्यविष्णुर्विस्मयमाविशत्॥ ३३॥

अर्थ— त्या कालनेमीनें अतिक्रोधें करून गरुडावर ती भयंकर प्रज्वलित गदा टाकली त्या वेळेस तें दैत्यांचें कर्म पाहून विष्णूस आश्चर्य वाटलें.

यदा तेन सुपर्णस्य पातिता मूर्ध्नि सा गदा ॥ सुपर्णं व्यथितं दृष्ट्वा कृतं च वपुरात्मनः ॥ ३४ ॥ क्रोधसंरक्तनयनो वैकुंठश्चक्रमाददे ॥ व्यवर्धत स वेगेन सुपर्णेन समं विभुः ॥ ३५ ॥

अर्थ— अशी ज्या वेळेस त्या कालनेमीनें गरुडाच्या मस्तकावर ती गदा टाकली; तेव्हां तो गरुड पीडित होऊन आपलें शरीर ही व्यथित झालें असें पाहून ते व्यापक विष्णु आपले नेत्र क्रोधानें आरक्त करून हातांत चक्र घेऊन वेगानें गरुडा सहवर्तमान आपल्या देहानीं वाढले.

भुजाश्चास्य व्यवर्धंत व्याप्नुवंतो दिशो दश ॥ प्रदिशश्चैव खं गां वै पूरयामास केशवः ॥ ३६ ॥

अर्थ— ते समयीं विष्णूचे भुज पूर्वादिक चार दिशा आग्नेयादिक अवांतर चार कोण दिशा व उर्ध्व अधर यादोन मिळून दशदिशांस व्याप्त करीत वाढिंगत जाहले; या प्रमाणें विष्णूनीं आपले देहानें आकाश स्वर्ग व भूमि हीं सर्व व्याप्त केलीं.

ववृधे च पुनर्लोकान्क्रांतुकाम इवौजसा ॥ तर्जनार्थं सुरेंद्राणां वर्धमानं नभस्तले ॥ ३७ ॥ ऋषयश्चैव गंधर्वास्तुष्टुवुर्मधुसूदनं ॥

अर्थ— आणि पुनः ते भगवान् आपल्या मनापानें वरच्या सर्व लोकांस व्याप्त करून त्या कालनेमि प्रभृति मोठ मोठ्या असुरांच्या नाशार्थ आकाशांत वाढले असतां त्या मधु दैत्य संहार करणाऱ्या विष्णूस पाहून ऋषी व गंधर्व हे त्यांची स्तुति करूं लागले.

सर्वान् किरीटेन लिहन् साभ्रमंबरमंबरैः ॥ ३८ ॥ पद्भ्यामाक्रम्य वसुधां दिशः प्रच्छाद्य बाहुभिः ॥

अर्थ— नंतर त्या विष्णूनीं वरच्या सर्वलोकांस मुगुटानें स्पर्श केला; तसेच वस्त्रानीं मेघमंडला सहित आकाश व्यापलें आणि पायांनीं पृथ्वीचें आक्रमण केलें व बाहूनीं सर्व दिशा आच्छादित केल्या.

सस्सूर्यकरतुल्याभंसहस्रारमरिक्षयं॥३९॥दीप्ताग्नि
सदृशंघोरंदर्शनेनसुदर्शनं॥सुवर्णरेणुपर्यंतंवज्र-
नाभंभयापहं॥४०॥मेदोस्थिमज्जारुधिरैःसिक्तं-
दानवसंभवैः॥अद्वितीयमहरणंक्षुरपर्यंतमंडलं
॥४१॥स्रग्दाममालावितंतंकामगंकामरूपिणं॥
स्वयंस्वयंभुवासृष्टंभयदंसर्वविद्विषां॥४२॥महर्षि
रोषैराविष्टंनित्यमाहवदर्पितं॥क्षेपणाद्यस्यमुह्यं-
तिलोकाःसस्थाणुजंगमाः॥४३॥क्रव्यादानिचभू
तानितृप्तिंयांतिमहामृधे॥तदप्रतिमकर्मोग्रंसमानं
सूर्यवर्चसा॥४४॥चक्रमुद्यम्यसमरेक्रोधदीप्तोग
दाधरः॥समुष्णान्दानवंतेजःसमरेस्वेनतेजसा॥४५
चिच्छेदबाहूश्चक्रेणश्रीधरःकालनेमिनः॥

अर्थ- नंतर गदाधर लक्ष्मीकांत विष्णूनीं क्रोध करून प्रज्वलित होऊन त्या युद्धांत आपल्या तेजानें सर्व दानवांचें तेज हरण करून हातांत चक्र घेऊन त्यानें कालनेमीच्या बाहूंचें छेदन केलें. तें चक्र असें कीं, त्याची सूर्य किरणासारखी कांति व त्यास सहस्र अरा असून तें प्रदीप्त अग्नी समान उग्र असून दिसण्यांत रमणीय असल्यामुळें त्याचें सुदर्शन हें नाम यथार्थ आहे; आणि त्याच्या सर्व बाजूंस सुवर्णाचे रज असून त्याचा मध्यभाग वज्रासारखा असल्यानें तें साधूंच्या भयाचा नाश करणारें आहे. तसेंच तें चक्र दानवांच्या अंगांतून निघालेल्या मेंद (मेंदु) अस्थी, मज्जा, रक्त यानीं भरलेलें असे; आणि त्यासमान दुसरें आयुध नसून त्यानें चहूंबाजूंनें मंडल (घेर) तरवारीच्या धारेसारखें असून तें इच्छितरूपें धारण करणारें व स्वच्छंदगति युक्त असून निरंतर पुष्पमालानीं सुशोभित आहे. त्याप्रमाणें ब्रह्मदेवानीं स्वतः निर्माण केल्यामुळें तें साधूंच्या संपूर्ण शत्रूंस भय देणारें आहे; तसेंच निरंतर श्रेष्ठ ऋषींच्या संरक्षणार्थ दैत्यांवर क्रोधयुक्त असून, युद्धा विषयीं आवेशयुक्त असे आणि त्यास विष्णूनीं सोडलें असतां स्थावर जंगमांसहित संपूर्ण लोक मोह पावतात तसेंच त्याच्या योगानें संग्रामांतील राक्षसादिक मांस भक्षक सर्व प्राणी तृप्त होतात. असें तें अप्रतिमकर्म करणारें असून सू-

यां सारखें तेजस्वि व उग्र होतें.

तच्च वक्त्रशतंघोरं साग्निपूर्णाट्टहासिवै ॥ ४६ ॥ त-
स्य दैत्यस्य चक्रेण प्रममाथ बलाद्धरिः ॥

अर्थ— अशा त्या चक्रानें भगवंतानीं बलात्कारानें अग्निज्वाला सहित भ-
यंकर गर्जना युक्त अशीं त्या कालनेमि दैत्याचीं शंभर तोंडें फोडून टाकिलीं.

संच्छिन्न बाहुर्विशिरा न प्राकंपत दानवः ॥ ४७ ॥ क
बंधोवस्थितः संख्ये विशाखइव पादपः ॥

अर्थ— अशीं त्याचीं मस्तकें व हात तुटून पडले असून ही तो कालनेमी यु-
द्धांतून न हालतां त्यानें धड शाखारहित वृक्षासारखें उभें राहिलें.

संवितत्य महापक्षौ वायोः कृत्वा समं जवं ॥ ४८ ॥ उर
सा पातयामास गरुडः कालनेमिनं ॥

अर्थ— तेव्हां गरुडानें वायूसारखा वेग धारण करून आपले मोठे विशा
ळ पंख पसरून उरस्थळाच्या प्रहारानें त्या कालनेमीस पाडिलें.

सतस्य देहो विमुखो विबाहुश्च परिभ्रमन् ॥ ४९ ॥ नि-
पपात दिवंत्यक्त्वा क्षोभयन् धरणीतलं ॥

अर्थ— त्या कालीं मुख व बाहु यानीं विरहित असा तो कालनेमीचा देह अंत
रिक्षांतून भ्रमण करीत करीत पृथ्वीवर पडला असतां तेणें करून धरणी-
कंपित जाहली

तस्मिन्निपतिते दैत्ये देवाः सर्षिगणास्तदा ॥ ५० ॥ सा
धुसाध्विति वैकुंठं समेताः प्रत्यपूजयन् ॥

अर्थ— असा तो दैत्य पडला असतां ते समयीं तेथें ऋषिगणां सहित दे-
व येऊन हें आपण फार चांगलें केलें अशी विष्णूची प्रशंसा करूं लागले.

अपसर्पंत दैत्याश्च युद्धे दृष्टपराक्रमाः ॥ ५१ ॥ ते सर्वे बा
हुभिर्व्याप्ता न शेकुश्चलितुं रणे ॥

अर्थ— याप्रमाणें त्या युद्धांत विष्णूचा तो पराक्रम पाहून ते दैत्य मागें स
रले तरीं भगवंतानीं त्या सर्वांस आपल्या हातानीं आकर्षण करतांच ते रणां
तून जाण्यास समर्थ झाले नाहींत.

कांश्चित्केशेषु जग्राह कांश्चित्कंठेष्वपीडयन् ॥ ५२ ॥ च

कर्षकस्यनिहृश्रमध्येगृण्हादथापरं॥

अर्थ- त्या काळीं विष्णूनीं किती एकांस केशांस धरून ओढिलें कीं कोका-
च्या गळ्यांस दाबून धरिलें; कोणांचीं तोंडें धरून ओढिलीं व कांहीं एका-
च्या कंबरेस धरून ओढिलें.

तेगदाचक्रनिर्दग्धागतसत्वागतासवः॥५३॥गग-
नात्कृष्टसर्वांगानिपेतुर्धरणीतले॥

अर्थ- तेव्हां ते दैत्य विष्णूच्या गदा व चक्र या आयुधानीं दग्ध झाल्या मु-
ळें शक्ति व प्राण यानींही न होऊन मस्तकादिक सर्व अंगासहित आकाशांतू-
न धरणी वर पडले.

तेषुदैत्येषुसर्वेषुहतेषुपुरुषोत्तमः॥५४॥तस्थौश
क्रप्रियंकृत्वाकृतकर्मागदाधरः॥

अर्थ- असे ते संपूर्ण दैत्य नाश पावले असतां सर्व पुरुष श्रेष्ठ, गदा धारी वि-
ष्णू इंद्राचें प्रिय करून कृत कृत्य होऊन राहिले.

तस्मिन्विमर्देनिर्वृत्तेसंग्रामेतारकामये॥५५॥तं
देशमाजगामाशुब्रह्मालोकपितामहः॥

अर्थ- ते समयीं त्या तारकामय संग्रामांतील तें युद्ध झाल्यानंतर सर्व लो-
कांचे पितामह ब्रह्मदेव त्वरेनें विष्णू उभे राहिलेल्याप्रदेशीं आले.

सर्वैर्ब्रह्मर्षिभिःसार्धंगंधर्वाप्सरसांगणैः॥५६॥देव-
देवोहरिंदेवंपूजयन्वाक्यमब्रवीत्॥

अर्थ- नंतर सर्व ब्रह्मर्षि, गंधर्व, अप्सरा यांच्या समुदायां सहित देवा-
धिदेव ब्रह्मदेव सर्व दुःख हरण करणाऱ्या विष्णूचें पूजन करून त्यांस पु-
ढील वाक्य बोलूं लागले.

कृतंदेवमहत्कर्मसुराणांशल्यमुद्धृतं॥५७॥वधे-
नानेनदैत्यानांवयंचपरितोषिताः॥

अर्थ- कीं हे देवा आपण हा महा पराक्रम करून देवांचें हें शल्य काढून
त्यास स्वस्थ केलें आणि या कालनेमि प्रभृति दैत्यांचा वध केल्यानें आम्हीं फा-
र संतुष्ट झालों.

योयंत्वयाहतोविष्णोकालनेमीमहासुरः॥५८॥

त्वमेकोस्यमृधेहंता नान्यः कश्चनविद्यते॥

अर्थ:- हे विष्णो तुह्मी जो ह्या कालनेमि महादैत्य मारिला यास संग्रामांत-मारणारा तुह्मा वांचून दुसरा कोणी ही नाहीं.

एषदेवान्परिभवन्लोकांश्चसस्फरास्फरान्॥५९
ऋषीणांकदनंकृत्वामामपिप्रतिगर्जति॥

अर्थ:- ह्मणूनच हा कालनेमि,देव,दैत्यांसहित सर्वलोकांचा पराभवक रीत ऋषींचा नाश करून मजवर ही गर्जना करीत असे.

तदनेनतवाग्र्येणपरितुष्टोस्मिकर्मणा ६० यदयंका
लकल्पस्त्वं कालनेमीनिपातितः॥

अर्थ:- हे भगवन् अशा या काळा सारख्या भयंकर कालनेमीचा वध केला या तुमच्या श्रेष्ठ कर्मानें मी संतुष्ट जाहलों.

तदागच्छस्वभद्रंतेगच्छामदिवमुत्तमं॥६१॥ब्रह्म
र्षयस्त्वांतत्रस्थाःप्रतीक्षंतेसदोगताः॥

अर्थ:- हे देवाधिदेवा तुमचें कल्याण असो,,आतां आपण उत्तम स्वर्गास जाऊं कारण तेथील सभासद ब्रह्मर्षि तुमची मार्ग प्रतीक्षा करीत आहेत.

कंचाहंतवदास्यामिवरंवरवतांवर॥६२॥स्फरेष्व-
थचदैत्येषुवराणांवरदोभवान्॥

अर्थ:- आणि हे प्रभो तुह्मीं श्रेष्ठ देव व दैत्य यांस वर दिले आहेत यास्त व तुह्मीच वर देणारांत श्रेष्ठ आहां तेव्हां मी तुह्मास काय वर देऊं.

निर्यातयैतत्त्रैलोक्यंस्फीतंनिहतकंटकं॥६३॥अ
स्मिन्नेवमृधेविष्णोशक्रायस्फमहात्मने॥

अर्थ:- तर आतां हे विश्वव्यापक परमेश्वरा आपण याच संग्रामांत या अति उत्तम बुद्धिमंत इंद्रास हें शत्रुरहित असून सर्व संपत्तीनीं पूर्ण असें त्रैलोक्य द्यावें ही माझी आपणास केवळ प्रार्थनाच आहे.

एवमुक्तोभगवताब्रह्मणाहरिरव्ययः६४देवांश्छक्र
मुखान्सर्वानुवाचशुभयागिरा॥

अर्थ:- असें ऐश्वर्य संपन्न ब्रह्मदेवानीं भाषण केलें असतां अविनाशी-विष्णु,इंद्र प्रमुख सर्व देवांस हितकारक वाणीनें बोलूं लागले.

विष्णुरुवाच ॥ शृण्वंतुत्रिदशाःसर्वेयावंतोत्रसमागताः
॥६५॥ श्रवणावहितैःश्रोत्रैःपुरस्कृत्यपुरंदरं॥
अर्थ- कीं देवहो, या स्थानीं जे सर्व तुह्मीं आलां ते इंद्रास पुढें करून श्रवणा विषयीं एकाग्र चित्त देऊन मी बोलतों तें तुह्मीं ऐका.

अस्माभिःसमरेसर्वेकालनेमिमुखाहताः॥ ६६॥ दा
नवाविक्रमोपेताःशक्रादपिमहत्तराः॥
अर्थ- तें असें कीं, देवहो आह्मीं इंद्रापेक्षांही अत्यंतश्रेष्ठ महापराक्रमी-कालनेमि प्रमुख संपूर्ण दानव मारिले.

अस्मिन्महतिसंग्रामेदैत्येयौद्वौविनिःसृतौ॥६७॥ वि
रोचनश्चदैत्येंद्रःस्वर्भानुश्चमहाग्रहः
अर्थ- त्यांतील दैत्य श्रेष्ठ विरोचन, मोठा ग्रहराहु हे दोघे दैत्य मात्र या महा संग्रामांतून पार पडले.

स्वांदिशंभजतांशक्रो दिशंवरुण एवच॥६८॥ याम्यां
यमःपालयितामुत्तरांचधनाधिपः॥
अर्थ- आतां इंद्र व वरुण हे आपापल्या दिशेस जावोत, तसेंच यमधर्मरा ज दक्षिणदिशेचें व धनस्वामी कुबेर उत्तर दिशेचें संरक्षण करोत.

ऋक्षैःसहयथायोगंगच्छतांचैवचंद्रमाः॥६९॥ अब्दं
ऋतुमुखेसूर्योभजतामयनैःसह॥
अर्थ- आणि चंद्र, सर्व नक्षत्रांशीं यथा पूर्व स्थिती प्रमाणें योग पावो, व सूर्य अयनां सह वर्तमान सर्व ऋतूंचा वर्ष पर्यंत उपभोग करो.

आज्यभागाःप्रवर्तंतांसदस्यैरभिपूजिताः॥७०॥ हू
यंतामग्नयोविप्रैर्वेददृष्टेनकर्मणा॥
अर्थ- तसेंच देवांस यज्ञभाग प्राप्त होण्या साठीं सभासद ब्राह्मणानीं वेदो क्त विधियुक्त कर्मानें पूजित अग्नींत घृतानें होमकरावे.

देवाश्चाप्यग्निहोमेनस्वाध्यायेनमहर्षयः॥७१॥ श्रा
द्धेनपितरश्चैवतृप्तिंयांतुयथासुखं॥
अर्थ- आणि अग्नींत केलेल्या होमानें देव, वेदाध्ययनानें श्रेष्ठ ऋषि श्राद्धानें पितर हे सर्व सुखें करून यथेच्छ तृप्त होवोत.

वायुश्चरतु मार्गस्थस्त्रिधादीप्यतु पावकः ॥ ७२ ॥ त्रीं
स्तु वर्णांश्च लोकांस्त्रीं स्तर्पयंश्चात्मजेर्गुणैः ॥

अर्थ- त्याच प्रमाणें वायु सौम्यरितीनें संचार करो - अग्नि आपल्या आहव नीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नि या अग्निहोत्रांतील तीनरूपानीं त्रिकाळीं प्रदीप्त होवो, आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन वर्णांस व तीन लोकांस आपल्या गुणानीं तृप्त करो.

ऋतवः संप्रवर्ततां दीक्षणीयेर्द्विजातिभिः ॥ ७३ ॥ दक्षि
णाश्चोपपाद्यंतां याज्ञिकेभ्यः पृथक् पृथक् ॥

अर्थ- तसेच ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य यानीं दीक्षा घेण्यास योग्य असे त्यां चे यज्ञ उत्तम रीतीनें प्रवृत्त होवोत आणि त्या त्रिवर्णांनीं याज्ञिक ब्राह्मणांस प्रत्येक कर्मांच्या निरनिराळ्या दक्षिणा द्याव्या.

गांतु सूर्यो रसान् सोमो वायुः प्राणांश्च प्राणिषु ॥ ७४
॥ तर्पयंतः प्रवर्तंतां सर्वएव स्वकर्मभिः ॥

अर्थ- सूर्यानें पृथ्वीची तृप्ती करावी, चंद्र औषधींच्या रसांची वृद्धी करो, व वायू सर्व प्राण्यांच्या प्राणांस तृप्त करीत आंत बाहेर संचार करो असे हे सर्वही आप आपल्या शक्तीनें वर्तत असोत.

यथावदानुपूर्व्येण महेंद्र मलयोद्भवाः ॥ ७५ ॥ त्रैलो-
क्यमातरः सर्वाः समुद्रं यांतु सिंधवः ॥

अर्थ- तश्याच त्रैलोक्यास मातेसमान असून महेंद्राचळ व मलयाचळ यां पर्वतां पासून उत्पन्न झालेल्या सर्व नद्या जशा आल्या तशा क्रमानें समुद्रास जावोत.

दैत्येभ्यस्त्यज्यतां भीश्च शांतिं व्रजत देवताः ॥ ७६ ॥ स्व
स्तिवोस्तु गमिष्यामि ब्रह्मलोकं सनातनं ॥

अर्थ- आणि देवहो तुह्मीं दैत्यां पासून भय मानूं नका, स्वस्थ व्हा तुमचें कल्याण असो आतां मी नाशरहित ब्रह्मलोकास जातों.

स्वगृहे स्वर्गलोके वा संग्रामे वा विशेषतः ॥ ७७ ॥ विश्रं
भो वो न मंतव्यो नित्यं क्षुद्रा हि दानवाः ॥

अर्थ- आणि देवहो तुम्हीं स्वगृहीं किंवा स्वर्गलोकांत व विशेषें करून संग्रा-

मांत त्या दानवांचा विश्वास मानूनये कारण ते क्षुद्र स्वभावा मुळें निरंतर तुम-
चें छिद्र पहात असतात.

छिद्रेषुप्रहरंत्येतेनतेषांसंस्थितिर्ध्रुवा॥ ७८॥ सौम्या
नामृजुभावानांभवतामार्जवंधनं॥

अर्थः- आणि ते दानव संधि सांपडतांच मारतात कारण त्यांची स्थिती एक सा
रखी नाहीं व तुह्मीं तर सरळ भावानें युक्त असून सौम्य रतीनें आहां तस्मात्
सरळपणा हेंच तुमचें धन आहे.

एवमुक्त्वासुरगणान् विष्णुः सत्यपराक्रमः॥ ७९॥ ज
गाम ब्रह्मणा सार्द्धं स्वलोकं तु महायशाः॥

अर्थः- असें देवांशीं भाषण करून सत्य पराक्रमी महा यशस्वी विष्णू ब्र
ह्मदेवासहित आपल्या लोकास गेले.

एतदाश्चर्यमभवत् संग्रामेतारकामये॥ ॥दान-
वानांच विष्णोश्च यन्मांत्वंपरिपृष्टवान्॥ ८०

अर्थः- मत्स्य ह्मणतात हे मनुराजा तारकामय संग्रामांत दानवांशीं विष्णू-
चें हें अद्भुत झालेलें युद्ध तूं मला विचारिलेंस तें मी तुला सांगितलें. इतिश्री
मत्स्यपुराणें पद्मोद्भव प्रादुर्भावे एकशतोत्तर सप्तसप्ततितमोध्यायः १७७.

अध्याय १७८ वा.

ऋषय ऊचुः॥ श्रुतः पद्मोद्भवस्तानविस्तरेण त्वयेरि
तः॥ समासाद्भवमाहात्म्यं भैरवस्य विधीयतां॥ १॥

अर्थः- ऋषी बोलले हे सूता तुह्मीं विस्तारानें सांगितलेला पुष्कर प्रादुर्भाव(च-
तुर्दश लोकरूप कमलाचा उत्पत्ति प्रकार)आह्मीं श्रवण केला. आतां आपण
भैरव नामक शंकरानें माहात्म्य आह्मांस संक्षेपानें सांगा.

सूतउवाच॥ तस्यापि देवदेवस्य श्रृणुध्वंकर्मचोत्तमं॥
आसीद्दैत्योंधकोनाम भिन्नांजनचयोपमः॥ २॥ तप
सामहतायुक्तोऽवध्यस्त्रिदिवौकसां॥ सकदाचिन्म
हादेवंपार्वत्यासहितंप्रभुं॥ ३॥ क्रीडमानंतदादृष्ट्वाह
र्तुंदेवींप्रचक्रमे॥

अर्थः- तेव्हां सूत बोलतात ऋषीहो आतां देवाधिदेव महादेव यांचें उत्तम क

र्म तुह्मीं श्रवण करा तें असें कीं, फुटलेल्या काजळाच्या पर्वता सारखा दिसत अ-
सून उग्र मोठ्या तपानें युक्त असल्या मुळें देवानीं मारण्यास अशक्य असा अंध
क नांवाचा प्रसिद्ध दैत्य होता; त्यानें एके समयीं पार्वती सहित महादेव क्रीडा-
करीत आहेत असें पाहून त्या कालीं तो अंधकासुर पार्वतीस हरण करण्या वि
षयीं उद्युक्त जाहला.

तस्ययुद्धंतदाघोरमभवत्सहशंभुना॥ ४॥आवंत्ये
विषयेघोरेमहाकालवनंप्रति॥

अर्थ- तेसमयीं भयंकर आवंत्य देशांतील महा कालवनांत त्या अंधकासुराचें शंकराशीं घोर युद्ध जाहलें.

तस्मिन्युद्धे तदारुद्रश्चांधकेनातिपीडितः॥ ५॥सृष्टवेबा
णमत्युग्रंनाम्नापाशुपतंहितत्॥

अर्थ- त्या वेळेस युद्धांत अंधकासुरानें शंकरास अत्यंत पीडित केलें असतां त्यानीं एक अति तीक्ष्ण बाण उत्पन्न करून त्याजवर सोडिला त्यास पाशु-पतास्त्र ह्मणतात.

रुद्रबाणविनिर्भेदाद्रुधिरादंधकस्यतु॥ ६॥अंधका
श्चसमुत्पन्नाःशतशोथसहस्रशः॥

अर्थ- त्या शंकराच्या बाणानें अंधकासुराच्या अंगांतील निघालेल्या र-क्त प्रवाहा पासून शतावधि व सहस्त्रावधि अंधकासुर उत्पन्न जाहले.

तेषांविदार्यमाणानांरुधिरादपरेपुनः॥ ७॥बभूवु-
रंधकाघोरायैर्व्याप्तमखिलंजगत्॥

अर्थ- तेव्हां शिवानीं त्यांचेंही विदारण केलें असतां पुनः त्यांच्या रक्ता पासून ही भयंकर बहुत अंधकासुर उत्पन्न झाले. त्यानीं हें संपूर्ण जग व्यापिलें.

एवंमायाविनंदृष्ट्वातंच देवस्तदांधकं॥ ८॥ पानार्थं
मंध कास्रस्य सोसृजन्मातरस्तदा॥

अर्थ- त्या कालीं शंकरानीं त्या मायावी सर्व अंधकासुरांस पाहून त्यांचें रक्त प्राशन करण्या साठीं मातृगण उत्पन्न केले.

माहेश्वरीतथाब्राह्मीकौमारीमालिनीतथा॥ ९॥-
सौपर्णीह्यथवायव्याशाक्रीवैनैर्ऋतीतथा॥ सौरी-

सौम्याशिवादूतीचामुंडाचाथवारुणी ॥ १० ॥ वाराहीना
रसिंहीचवैष्णवीचचलच्छिखा ॥ शतानंदा भगानंदा-
पिच्छिलाभगमालिनी ॥ ११ ॥ बलाचातिबलारक्ता -
सुरभीमुखमंडिका ॥ मातृनंदासुनंदाचबिडालीशकु-
नीतथा ॥ १२ ॥ रेवतीचमहारक्तातथैवपिलपिच्छिका
॥ जयाचविजयाचैवजयंतीचापराजिता ॥ १३ ॥ काली
चैवमहाकालीदूतीचैवतथैवच ॥ सुभगादुर्भगाचैवक-
रालीनंदिनीतथा ॥ १४ ॥ अदितिश्चदितिश्चैवमारीचैमृ
त्युरेवच ॥ कर्णमोटीतथाग्राम्याउलूकीचघटोदरी ॥ १५
कपालीवज्रहस्ताचपिशाचीराक्षसीतथा ॥ भुशुंडीशां
करीचंडालांगलीकुटभीतथा ॥ १६ ॥ खेटासुलोचना
धूम्रा एकवीरा करालिनी ॥ विशालदंष्ट्रिणीश्यामा-
त्रिजटीकुक्कुटीतथा ॥ १७ ॥ वैनायकीचवैतालीउन्मत्तो
दुंबरीतथा ॥ सिद्धिश्चलेलिहानाचकेकरीगर्दभीतथा
१८ ॥ भ्रुकुटीबहुपुत्रीचप्रेतयानाविडंबिनी ॥ क्रौंचाशै
लमुखीचैवविनतासुरसादनुः ॥ १९ ॥ उषारंभामेनका
चसलिलाचित्ररूपिणी ॥ स्वाहास्वधावषट्काराधृ-
तिर्ज्येष्ठाकपर्दिनी ॥ २० ॥ मायाविचित्ररूपाचकामरू
पाचसंगमा ॥ मुखेविलामंगलाचमहानासामहामु
खी ॥ २१ ॥ कुमारीरोचनाभीमासदाहासामदोद्धता
॥ अलंबाक्षीकालपर्णीकुंभकर्णीमहासुरी ॥ २२ ॥ के
शिनीशंखिनीलंबापिंगलालोहितामुखी ॥ घंटारवा
थदंष्ट्रालारोचनाकाकजंघिका ॥ २३ ॥ गोकर्णिकाच
मुखिकामहाग्रीवामहामुखी ॥ उल्कामुखीधूम्रशि
खाकंपिनीपरिकंपिनी ॥ २४ ॥ मोहनाकंपनाक्ष्वेला
निर्भयाबाहुशालिनी ॥ सर्पकर्णीतथैकाक्षीविशो-
कानंदिनीतथा ॥ २५ ॥ ज्योत्स्नामुखीचरभसानिकुं-
भारक्तकंपना ॥ अविकारामहाचित्राचंद्रसेनामनोर-

मा ॥२६॥ अदर्शनाहरत्यापामातंगीलंबमेखला॥
अबालावंचनाकालीप्रमोदालांगलावती॥२७॥ चि
त्ताचित्तजलाकोणाशांतिकाघविनाशिनी॥लंबस्त-
नीलंबसटाविसटावासचूर्णिनी॥२८॥स्खलंतीदी
र्घकेशीचसुचिरासुंदरीशुभा॥अयोमुखीकटुमु
खीक्रोधनीचतथाशनी॥२९॥कुटुंबिकामुक्तिकाच
चंद्रिकाबलमोहिनी॥सामान्याहासिनीलंबाकोवि
दारीसमासवी॥३०॥शंकुकर्णीमहानादामहादेवीम
होदरी॥हुंकारीरुद्रसुसटारुद्रेशीभूतडामरी॥३१
पिंडजिव्हाचलज्ज्वालाशिवाज्वालामुखीतथा॥ए
ताश्चान्याश्चदेवेशःसोसृजन्मातरस्तदा॥३२॥अं
धकानांमहाघोराःपपुस्तद्रुधिरंतदा॥

अर्थ:– त्या अशाकों, पहिली माहेश्वरी, ब्राह्मी, कौमारी, तशीच मालिनी,-सौपर्णी, वायव्या, शाक्री, नैर्ऋती, सौरी, सौम्या, शिवा, दूती, चामुंडा, वारुणी, वाराही, नारसिंही, वैष्णवी, चलच्छिखा, शतानंदा, भगानंदा, पिच्छिला, भगमालिनी, बला, अतिबला, रक्ता, सुरभी, मुखमंडिका, मातृनंदा, सुनंदा, बिडाली, शकुनी, तशीच रेवती, महारक्ता, पिलपिच्छिका, जया, विजया, जयंती, अपराजिता, काली, महाकाली, दूती, सुभगा, दुर्भगा, कराली, नंदिनी, अदिती, दिति, मारी, मृत्यु, कर्णमोटी, ग्राम्या, उलूकी, घटोदरी, कपाली, वज्रहस्ता, पिशाची, राक्षसी, भृशुंडी, शांकरी, चंडा, लांगली, कुटभी, खेटा, सुलोचना, धूम्रा, एकवीरा, करालिनी, विशालदंष्ट्रिणी, श्यामा, त्रिजटी, कुक्कुटी, वैनायकी, वैताली, उन्मत्ता, उदुंबरी, सिद्धि, लेलिहाना, केकरी, गर्दभी, भृकुटी, बहुपुत्री, प्रेतयाना, विलंबिनी, क्रौंचा, शैलमुखी, विनता, सुरसा, दनु, उषा, रंभा, मेनका, सलिला, चित्ररूपिणी, स्वाहा, स्वधा, वषट्कारा, धृति, ज्येष्ठा, कपर्दिनी, माया, विचित्ररूपा, कामरूपा, संगमा, मुखेबिला, मंगला, महानासा, महामुखी, कुमारी, रोचना, भीमा, सदाहासा, मदोद्धता, अलंबाक्षी, कालपर्णी, कुंभकर्णी, महासुरी, केशिनी, शंखिनी, लंबा, पिंगला, लोहिता, मुखी, घंटारवा, दंष्ट्राला, रोचना,

काकजंघिका, गोकर्णिका, मुखिका, महाग्रीवा, महामुखी, उल्कामुखी, धूमशिखा, कंपिनी, परिकंपिनी, मोहना, कंपना, श्वेला, निर्भया, बाहुशालिनी, सर्पकर्णी, तशीच एकाक्षी, विशोका, नंदिनी, ज्योत्स्नामुखी, रभसा, निकुंभा, रक्तकंपना, अविकारा, महाचित्रा, चंद्रसेना, मनोरमा, अदर्शना, हरत्पापा, मातंगी, लंबमेखला, अबाला, वंचना, काली, प्रमोदा, लांगलावती, चित्ता, चित्तजला, कोणा, शांतिका, अघविनाशनी, लंबस्तनी, लंबसटा, विसटा, वासचूर्णिनी, स्खलंती, दीर्घकेशी, सुचिरा, सुंदरी, शुभा, अयोमुखी, कटुमुखी, क्रोधनी, अशनी, कुटुंबिका, मुक्तिका, चंद्रिका, बलमोहिनी, सामान्या, हासिनी, लंबा, कोविदारी, समासवी, शंकुकर्णी, महानादा, महादेवी, महोदरी, हुंकारी, रुद्रसुसटा, रुद्रेशी, भूतडामरी, पिंडजिव्हा, चलज्वाला, शिवा, ज्वालामुखी, ह्या, इतर अशा माता देवस्वामी महादेवानीं उत्पन्न केल्या. ते समयीं त्या महाभयंकर मातानीं अंधकासुरांचें रक्त प्राशन केलें.

ततोंधकासृजः सर्वाः परां तृप्तिमुपागताः ॥ ३३ ॥ तासु तृप्तासु संभूता भूय एवांधकप्रजाः ॥

अर्थ— त्या अंधकांच्या रक्तानें त्या सर्वमाता बहुत तृप्त झाल्या असतां तें रक्त निःशेष न झाल्यामुळें पुनः बहुत अंधकासुर उत्पन्न झाले.

अर्दितस्तैर्महादेवः शूलमुद्गरपाणिभिः ॥ ३४ ॥ ततः स शंकरो देवस्त्वंधकैर्व्याकुलीकृतः ॥

अर्थ— तेव्हां त्या अंधकानीं शूल व मुद्गर हीं आयुधें हातांत घेऊन त्यानीं देवश्रेष्ठ शंकरास अत्यंत पीडित केलें असतां, ते महादेव व्याकुल झाले.

जगाम शरणं देवं वासुदेवमजं विभुं ॥ ३५ ॥ ततस्तु भगवान् विष्णुः सृष्टवान् शुष्करेवतीं ॥

अर्थ— त्या कालीं ते शंकर, जन्मरहित व व्यापक असल्यामुळें सर्व भूतांस आश्रय स्थान अशा देवास शरण गेले; असतां पूर्णैश्वर्यसंपन्न विष्णूनीं शुष्करेवती नामक एकदेवी उत्पन्न केली.

यापपौ सकलं तेषामंधकानामसृक्क्षणात् ॥ ३६ ॥ यथा यथा चरुधिरं पिबत्यंधकसंभवं ॥ तथा तथाधिकं देवीसं

शुष्यतिजनाधिप॥३६॥

अर्थ- हे राजा तेसमयीं त्याशुष्क रेवतीनें क्षणांत त्या अंधकासुरांनें सर्व रक्त जसजसें प्राशन केलें तसतसे ते सर्व अंधक दैत्य शुष्क झाले.

पीयमानेतथातेषामंधकानांतथासृजि॥अंधकासुक्षयंनीताःसर्वेतेत्रिपुरारिणा॥३७॥

अर्थ- असें देवीनें त्या अंधकांचें सर्व रक्त प्राशन केलें; असतां त्रिपुरासुरशत्रु शंकरानीं त्यासर्व अंधक दैत्यांचा संहार केला.

मूलांधकंतुविक्रम्यतदाशर्वस्त्रिलोकधृक्॥चकारवेगाच्छूलाग्रेसचतुष्टावशंकरं॥३८॥

अर्थ- त्या कालीं त्रैलोक्यधारी शिवानीं पराक्रम करून त्या मूलभूत अंधकासुरास वेगानें शूलाच्या अग्रावर चढविलें असतां त्यानें शंकरानें स्तवन केलें.

अंधकस्तुमहावीर्यस्तस्यतुष्टोभवोद्भवः॥सामीप्यंप्रददौनित्यंगणेशत्वंतथैवच॥३९॥

अर्थ- तेव्हां सर्वविश्व उत्पन्न करणाऱ्या शिवानीं प्रसन्न होऊन त्या महापराक्रमी अंधकासुरास गणाचें स्वामित्व,निरंतर आपले सन्निधानीं वास हे दोन वर दिले.

ततोमातृगणाःसर्वेशंकरंवाक्यमब्रुवन्॥भगवन्भक्षयिष्यामःसदेवासुरमानुषान्॥४०॥त्वत्प्रसादाज्जगत्सर्वंतदनुज्ञातुमर्हसि॥

अर्थ- नंतर ते सर्व मातृगण शंकरास बोलले कीं, भगवन् तुमच्या अनुग्रहानें देव, असुर व मनुष्य इत्यादिक सर्वजगास आह्मी भक्षण करितो याविषयीं आपण आह्मांस आज्ञा देण्यास योग्य आहां.

शंकरउवाच॥भवतीभिःप्रजाःसर्वारक्षणीयानसंशयः॥४१॥तस्मात्घोरादभिप्रायान्मनःशीघ्रंनिवर्त्यतां॥

अर्थ- असें त्यांचें भाषण ऐकून शंकर बोलले कीं मातृगणहो तुह्मीं या दुष्ट आचरणापासून आपलें मन त्वरित मागें फिरवून त्या सर्व प्रजांचें रक्षण करावें हेंच युक्त आहे या विषयीं संशय नाहीं.

इत्येवंशंकरेणोक्तमना इत्यवचस्तदा ॥ ४२ ॥ भक्षयामा
स रत्कग्रास्त्रैलोक्यंसचराचरं ॥

अर्थ- असें तें शंकरानीं केलेलें भाषण नमानून ते अत्यंत उग्र मातृगण त्या काळीं स्थावर जंगमांसहित त्रैलोक्याचें भक्षण करूं लागले.

त्रैलोक्ये भक्ष्यमाणेतु तदा मातृगणेनवै ॥ ४३ ॥ नृसिं
हमूर्तिंदेवेशं प्रदध्यौ भगवांच्छिवः ॥

अर्थ- ते समयीं त्या मातृगणानीं त्रैलोक्य भक्षणास आरंभ केला असतां, भगवान् शिव, देवाधिदेव नारसिंहाचें ध्यान करूं लागले.

अनादिनिधनंदेवं सर्वलोकभवोद्भवं ॥ ४४ ॥ दैत्येंद्र
वक्षोरुधिरचर्चिताग्रमहानखं ॥ विद्युतजिव्हंमहा
दंष्ट्रं स्फुरत्केसरकंटकं ॥ कल्पांतमारुतक्षुब्धसप्ता
र्णवसमस्वनं ॥ ४५ ॥ वज्रतीक्ष्णनखंघोरमाकर्णव्या
दिताननं ॥ मेरुशैलप्रतीकाशमुदयार्कसमेक्षणं ॥ ४६ ॥
हिमाद्रिशिखराकारंचारुदंष्ट्रोज्वलाननं ॥ नखनिःसृत
रोषाग्निज्वालाकेसरमालिनं ॥ ४७ ॥ वज्रांगदंसुमुकुटं
हारकेयूरभूषणं ॥ श्रोणीसूत्रेणमहता कांचनेनविरा-
जितं ॥ ४८ ॥ नीलोत्पलदलश्यामं वासोयुगविभूषणं ॥
तेजसाक्रांतसकलब्रह्मांडागारसंकुलं ॥ ४९ ॥ पवन-
भ्राम्यमाणानां हुतहव्यवहार्चिषां ॥ आवर्तसदृशाकारैः
संयुक्तं देहलोमजैः ॥ ५० ॥ सर्वपुष्पविचित्रांचधारयंतं
महास्रजं ॥ सध्यातमात्रोभगवान्प्रददौतस्यदर्शनं ॥ ५१

अर्थ- तेव्हां असें शिवानीं ध्यान करतांच तत्काल षड्गुणैश्वर्यसंपन्न नारसिंहानीं शंकरास दर्शन दिलें. ते नरसिंह असे कीं, त्यांस जन्ममरण नसून ते सहज लीलेनें सर्व लोकांस उत्पन्न करितात; आणि त्यांचीं वज्रासारिखीं तीक्ष्ण मोठीं नखें, दैत्यश्रेष्ठ हिरण्यकशिपूच्या वक्षस्थलांतील रक्तानें भरल्यामुळें त्यावीरश्रीनें शोभतात, तशीच जिव्हा विद्युल्लते सारखी अतितेजोमय असून त्यांच्या मोठ्या दाढा व मानेवरी केश कांट्या सारखे उभे राहिलेले दिसत होते; तसेंच तें नृसिंह रूप प्रलय कालच्या वायूनें क्षोभ पावलेल्या स-

समुद्रासारख्या गंभीर शब्दानें युक्त होतें त्याच प्रमाणें त्यांचें मुख कर्णापर्यंत पसरलेलें असल्यामुळें भयंकर दिसत असून त्यांचे नेत्र मेरुपर्वता सारखे सुवर्णाच्या पीतवर्णानें सुशोभित व उदयाचला समान तेजःपुंज दिसतात आणि त्या नारसिंहाची आकृति हिमालयाच्या शिखरा सारखी उंच व शुभ्र असून त्यांनील अत्यंत कांतियुक्त मुख सुंदर दाढानीं सुशोभित दिसत होतें तश्याच नखांतून निघालेल्या क्रोधाग्नीच्या ज्वालानीं त्यांच्या मानेवरील केश शोभत असत; तशींच रत्नखचित बाहुभूषणें मस्तकीं सुंदर मुकुट, गळ्यांत हार, बोटांत आंगठ्या व उंच सुवर्णाचें कटिसूत्र व उत्कृष्ट दीन पीतांबर वस्त्रें याानीं शोभत असून ते नृसिंह,स्वरूपानें नीलवर्ण कमळाच्या पाकळी सारखे श्याम वर्ण दिसत होते तसेंच त्यांच्या तेजानें संपूर्णब्रह्मांडरूप मंदिर व्याप्त झालें आणि त्यांच्या शरीरावरचे केश होम केलेल्या अग्नीच्या,वायूनें फिरविलेल्या ज्वाळांच्या भोंवऱ्या सारिखे दिसत असून त्यानीं सर्व पुष्पांची विचित्र मोठी माला कंठांत धारण केली होती.

यादृशेनैवरूपेणध्यातेरुद्रेणधीमता ॥ तादृशेनैवरूपेणदुर्निरीक्ष्येणदेवतैः ॥ ५२ ॥ प्रणिपत्यतुदेवेशंतदा तुष्टावशंकरः ॥

अर्थ- असें शिवानीं जशा नृसिंह रूपाचें ध्यान केलें होतें तशा,देवांसही पाहाण्यास अशक्य अशा स्वरूपानें प्रगट झालेल्या त्या देवाधिदेव नारसिंहास,शंकरानीं नमस्कार करून त्यांची स्तुति केली.

शंकरउवाच ॥ नमस्तेस्तुजगन्नाथनरसिंहवपुर्धर ५३ दैत्यनाथासृक्‌पूर्णनखशक्तिविराजित ॥

अर्थ- ती अशी कीं, हे विश्वपालका तुह्मीं नरसिंहरूप धारण करून दैत्यश्रेष्ठ हिरण्यकशिपूच्या रक्तानें भरलेल्या नखांच्या प्रतापानें शोभतां तस्मात् तुह्मास आमचा नमस्कार असो.

नतःसकलसंलग्नहेमपिंगलविग्रह ॥ ५४ ॥ नतोस्मिपद्मनाभत्वांसुरशक्रजगद्गुरो ॥

अर्थ- हे पद्मनाभा सर्वलोक तुमच्या आधारानें असून तुमचें स्वरूप सुवर्णासारखें पीत वर्णानें शोभत आहे आणि तुम्हीं इंद्रादिक देव आदिकरून सर्व

चराचर जगाचे गुरु आहां यास्तव आह्मी आपणास नमस्कार करितों.

कल्पांतांभोदनिर्घोषसूर्यकोटिसमप्रभ ॥ ५५ ॥ सहस्त्रयमसंक्रोधसहस्त्रेंद्रपराक्रम ॥

अर्थ:- हे देवा तुमचा शब्द प्रळय काळच्या मेघासारखा असून तुह्मीं कोटि सूर्यांप्रमाणें कांतीनें सुशोभित आहां व सहस्त्र यमांसमान तुमचा क्रोध असून आपण सहस्त्र इंद्रां सारखे महा पराक्रमी आहां.

सहस्त्रधनदस्फीतसहस्त्रवरुणात्मक ॥ ५६ ॥ सहस्त्रकालरचितसहस्त्रनियतेंद्रिय ॥

अर्थ:- आणि तुह्मी सहस्त्र कुबेरांसारखे ऐश्वर्य संपन्न असून सहस्त्र वरुणांचे नियंते आहां तशीच अनंत काळांची रचना करणारे तुह्मीच असून सर्व इंद्रियांचें नियमन करणाऱ्या सहस्त्रावधी देवांचे स्वामी आपणच आहांत

सहस्त्रभूमिसद्धैर्यसहस्त्रानंतमूर्तिमन् ॥ ५७ ॥ सहस्त्रचंद्रप्रतिमसहस्त्रग्रहविक्रम ॥

अर्थ:- तसेंच या भूमीवर सहस्त्रावधि सत्पुरुषांस धैर्य तुह्मा पासूनच प्राप्त झालें आणि तुमच्या अनंत मूर्ती नाशरहित असून सहस्त्र चंद्रासारखी तुमची शोभा व सहस्त्रावधि ग्रहां समान तुमचा पराक्रम आहे.

सहस्त्ररुद्रतेजस्कसहस्त्रब्रह्मसंस्तुत ॥ ५८ ॥ सहस्त्रबाहुवगोग्रसहस्त्रास्यनिरीक्षण ॥

अर्थ:- तसेच तुह्मी सहस्त्र रुद्रां प्रमाणें अति उग्र तेजस्वी असून सहस्त्रावधि ब्रह्मदेव तुमची स्तुति करीत आहेत आणि आपला वेग कार्तवीर्यार्जुना सारखा उग्र असून तुह्मांस अनंत मुखें व नेत्र आहेत.

सहस्त्रयंत्रमथनसहस्त्रवधमोचन ॥ ५९ ॥ अंधकस्य विनाशाय याः सृष्टा मातरो मया ॥ अनादृत्य तु मद्वाक्यं भक्षयंत्यद्भुताः प्रजाः ॥ ६० ॥

अर्थ:- त्याच प्रमाणें हे नृसिंहा आपणच शत्रूंच्या हजारों यंत्रांचा नाश करणारे असून दुष्टां पासून होणाऱ्या सहस्त्रावधि वधांचे प्रसंगांतून सज्जनांस मुक्त करणारे आहां; तस्मात् म्या अंधकासुराच्या नाशार्थ जे मातृगण उत्पन्न केले आहेत ते माझ्या भाषणाचा अनादर करून प्रजांस बलात्कारानें भक्ष-

ण करीत आहेत.

कृत्वातांश्चनशक्तोहंसंहर्तुमपराजित॥स्वयंकृत्वाक-
थंतासांविनाशमभिकारये॥६१॥

अर्थ- हे अपराजित देवा या मातृगणांस उत्पन्न केल्यावर यांचा संहार कर-ण्यास मी समर्थ नाहीं, कारण मी स्वतः त्यांस उत्पन्न करून मीच त्यांचा प्राण नाश कसा करूं.

एवमुक्तःसरुद्रेणनरसिंहवपुर्धरः॥ससर्जदेवोजि
व्हायास्तदावागीश्वरींहरिः॥६२॥

अर्थ- असें शिवानीं भाषण केलें असतां नृसिंह रूप धारण करून भक्तसंकटें निवारण करणाऱ्या त्या देवानें त्या कालीं आपल्या जिव्हे पासून वागीश्वरी-नामें एक देवी उत्पन्न केली.

हृदयाच्चतथामायागुह्याच्चभवमालिनी॥अस्थि-
भ्यश्चतथाकालीसृष्टापूर्वंमहात्मना॥६३॥यया-
तद्रुधिरंपीतमंधकानांमहात्मनां॥याचास्मिन्कथिता-
लोकेनामतःशुष्करेवती॥६४॥

अर्थ- तसेंच त्या महात्म्या नृसिंहानें आपले वक्षस्थळा पासून माया व गुह्यस्थाना पासून भवमालिनी त्या उत्पन्न केल्या व त्यानीं अस्थींतून पूर्वींच काली देवी उत्पन्न केली होतीती या लोकांत शुष्क रेवती या नामानें प्रसिद्ध-आहे; तिणें पूर्वी महाशरीरी अनेक अंधकासुरांचें रक्त प्राशन केलें होतें.

द्वात्रिंशन्मातरःसृष्टागात्रेभ्यश्चक्रिणाततः॥तासां
नामानिवक्ष्यामितानिमेगदतःशृणु॥६५॥

अर्थ- नंतर चक्रधारी विष्णूनीं आपले अवयवां पासूनबत्तीसमाता उत्पन्न केल्या; त्यांचीं नामें मी सांगतों तीं तूं मजपासून श्रवण कर.

सर्वास्तास्तुमहाभागाघंटाकर्णीतथैवच॥त्रैलो-
क्यमोहिनीपुण्यासर्वसत्त्ववशंकरी॥६६॥तथाच
चक्रहृदयापंचमीव्योमचारिणी॥शंखिनीलेखि
नीचैवकालसंकर्षणीतथा॥६७॥इत्येताःपृष्ठगा-
राजन्वागीशानुचराःस्मृताः॥

अर्थ- तीं अशीं कीं, हे राजा घंटाकर्णी पुण्य कारक त्रैलोक्य मोहिनी सर्व सत्व व शांकरी चक्रहृदया, पांचवी व्योमचारिणी, शंखिनी लेखिनी व काल संकर्षणी ह्या आठही महा भाग्य संपन्न असून वागीश्वरी देवीच्या अनुलक्षें करून संचार करणाऱ्या आहेत.

संकर्षणीतथाश्वत्थाबीजभावापराजिता ॥ ६८॥ कल्याणीमधुदंष्ट्रीचकमलोत्पलहस्तिका ॥ इतिदेव्यष्टकंराजन्मायानुचरमुच्यते ॥ ६९॥

अर्थ- हे राजेंद्रा संकर्षणी १, अश्वत्था २, बीजभावा ३, अपराजिता ४, कल्याणी ५, मधुदंष्ट्री ६, कमलहस्तिका ७, व उत्पलहस्तिका, ८ या आठ देवी मायादेवीची सेवा करणाऱ्या आहेत.

अजितासूक्ष्महृदयावृद्धावेशाश्मदंशना ॥ नृसिंहभैरवाबिल्वागरुत्मत्हृदयाजया ॥ ७०॥ भवमालिन्यनुचराइत्यष्टौनृपमातरः ॥

अर्थ- हे राजन् अजिता १, सूक्ष्महृदया २, वृद्धावेशा ३, अश्मदंशना ४, नृसिंहभैरवा, ५ बिल्वा ६, गरुत्मत्हृदया, ७ व जया ८, ह्या आठ माता भवमालिनी देवीच्या दासी आहेत.

आकर्णनीसंभटाचतथैवोत्तरमालिका ॥ ७१॥ ज्वालामुखीभीषणिकाकामधेनुश्चबालिका ॥ तथापद्मकराराजन्रेवत्यनुचरास्मृताः ॥ ७२॥

अर्थ- आकर्णनी १, संभटा २, उत्तर मालिका ३, ज्वालामुखी ४, भीषणिका ५, कामधेनु ६, बालिका, ७ व पद्मकरा ८, या आठ देवता शकुष्करेवती नामक देवीची सेवा करीत असतात.

अष्टौमहाबलाःसर्वादेवगात्रसमुद्भवाः ॥ त्रैलोक्यसृष्टिसंहारसमर्थाःसर्वदेवताः ॥ ७३॥

अर्थ- ह्या प्रत्येक गणांतील आठ देवता महा बलाढ्य असून नृसिंहाच्या अंगां पासून उत्पन्न झाल्यामुळें त्रैलोक्याची सृष्टि किंवा संहार यां विषयीं समर्थ आहेत.

ताःसृष्टमात्रादेवेनक्रुद्धामातृगणास्यतु ॥ प्रधाविता-

महाराजक्रोधविस्फारितेक्षणाः ॥ ७४ ॥

अर्थ- हे महाराज नारसिंहानीं अशा माता उत्पन्न करतांच क्रोधावेशानें डोळे वटारून शिवानीं उत्पन्न केलेल्या त्या मातृगणांवर धांवल्या.

अविषह्यतमंतासांदृष्टितेजःसुदारुणं ॥ तमेवशरणंप्राप्तानृसिंहोवाक्यमब्रवीत् ॥ ७५

अर्थ- तेसमयीं त्या नृसिंहानीं उत्पन्न केलेल्या मातांचें दृष्टितेज आपणांस सहन होणार नाहीं असें मानून त्या शैवमाता नारसिंहासच शरण आल्या तेव्हां ते नरहरी त्यांस बोलतात.

यथामनुष्याःपशवःपालयंतिचिरात्सुतान् ॥ जयंतितेतथैवाशुयथावैदेवतागणाः ॥ ७६ ॥

अर्थ- कीं मातृगणहो जसे देवगण सर्वांचें संरक्षण करून उत्कर्ष पावतात; तसेच मनुष्य व पशु हे जसे आपल्या पुत्रांचें पालन करून जसें महत्व पावतात.

भवत्यस्तु तथालोकान्पालयंतुमयेरिताः ॥ मनुजैश्चतथादेवैर्यजध्वंत्रिपुरांतकं ॥ ७७ ॥

अर्थ- तसेंच तुह्मी ही माझ्या आज्ञेवरून सर्वलोकांचें रक्षणच करावें आणि देव व मानव यां सह वर्तमान तुह्मीं त्रिपुरासुरसंहार करणाऱ्या शिवाचें पूजन करावें.

नचबाधाप्रकर्तव्यायेभक्तास्त्रिपुरांतके ॥ येचमांसंस्मरंतीह तेचरक्ष्याःसदानराः ॥ ७८

अर्थ- तसेंच जे त्रिपुर नाशक शंकरांचे भक्त आहेत; त्यांस तुह्मीं पीडा करूं नये, व जे लोक उत्तम रीतीनें माझें स्मरण करितात, त्यांसहीतुह्मीं सर्वदां रक्षावें.

बलिकर्मकरिष्यंतियुष्माकंयेसदानराः ॥ सर्वकामप्रदास्तेषांभविष्यध्वंतथैवच ॥ ७९ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें जे लोक निरंतर तुह्मांस बलिअर्पण करितात; त्यांचे मनोरथ तुह्मीं पूर्ण करीत असावें.

उच्छासनादिकंयेचकथयंतिमयेरितं ॥ तेचरक्ष्याः

सदालोकारक्षितव्यंमदासनं ॥ ८० ॥

अर्थ- आणि मी सांगितलेलें उत्कृष्ट शास्त्रादिक जे लोकांस कथन करितात त्यांचें तुह्मीं निरंतर संरक्षण करावें व तुह्मीं माझें हें आसन ही रक्षावें.

रौद्रींचैवपरांमूर्त्तिंमहादेवःप्रदास्यति ॥ युष्मन्मुख्या महादेव्यस्तदुक्तंपरिरस्यथ ॥ ८१ ॥

अर्थ- तशीच माझी उत्तम उग्र मूर्ति, हे महादेव तुह्मांस देतील; आणि मुख्य देवता हो तुह्मीं शंकराची आज्ञा मान्य करा.

मयामातृगणाःसृष्टायोयंविगतसाध्वसः ॥ एष-नित्यंविशालाक्ष्योमयैवसहरंस्यते ॥ ८२ ॥

अर्थ- आणि विशालनयन हो ज्यांज्या माता उत्पन्न केल्या आहेत त्या मज सहवर्तमान निरंतर रममाण होतील.

मयासार्द्धंतथापूजांनरेभ्यश्चैवलप्स्यथ ॥ पृथक्सु-पूजितालोकैःसर्वान्कामान्प्रदास्यथ ॥ ८३ ॥

अर्थ- तश्याच तुह्मींही मनुष्यांपासून मज सहवर्तमान पूजा पावाल; व-लोकानीं तुमची निरनिराळी सुंदर पूजा केली असतां, तुह्मी त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण करावे.

शुष्कांसंपूजयिष्यंतियेचपुत्रार्थिनोजनाः ॥ तेषांपुत्रप्रदादेवीभविष्यतिनसंशयः ॥ ८४ ॥

अर्थ- तसेच जे पुत्रार्थी लोक शुष्क रेवतीची उत्तमपूजा करतील, त्यांस ती देवी पुत्र देईल यांत संशयनाहीं.

एवमुक्त्वातुभगवान्सहमातृगणेनतु ॥ ज्वालामालाकुलवपुस्तत्रैवांतरधीयत ॥ ८५ ॥

अर्थ- असें त्या मातृगणांशीं भाषण करून तेजांच्या ज्वालारूप माळानींसुशोभित असे भगवान् नृसिंह तेथेंच गुप्त जाहले.

तत्रतीर्थंसमुत्पन्नंकृतशौचेतियज्जगुः ॥ तत्रापिपूर्वजोदेवोजगदार्तिहरोहरः ॥ ८६ ॥ रौद्रस्यमातृवर्गस्यदत्वारुद्रंरक्तपार्थिव ॥ रौद्रांदिव्यांतनुंतत्रमातृमध्येव्यवस्थितः ॥ ८७ ॥

अर्थ- त्या स्थानीं एकतीर्थ उत्तम रीतीनें उत्पन्न झालें; त्यास लोक रुत शौच असें ह्मणतात, त्या स्थळीं जगाची पीडा दूर करणारे सर्वांचे पूर्वज महादेव-ही नृसिंहाची दिव्य उग्र मूर्ती त्या भयंकर मातृगणास देऊन आपण त्यांचे मध्यभागीं च राहिले.

सप्त तामातरोदेव्यः सार्धनारीनरः शिवः॥ निवेश्यरो द्रंतत्स्थानं तत्रैवांतरधीयत॥८८॥

अर्थ- आणि ते पार्वती सहित अर्धनारी नरस्वरूपी शिव, ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, शाक्री व चामुंडा यासात मुख्यमातांस त्या नृसिंह-स्थानीं स्थापन करून आपण गुप्त जाहले.

समातृवर्गस्यहरस्यमूर्तिर्यदायदायातिच्वतत्समीपे ॥देवेश्वरस्यापिनृसिंहमूर्तेः पूजांविधत्तेत्रिपुरांधका-रिः॥८९॥

अर्थ- असे ते मातृगण सहित शंकर मूर्ति ज्याज्या कालीं त्या नृसिंह प्रतिमे जवळ येतात त्या कालीं ते त्रिपुरासुर व अंधक दैत्य यांचा संहार करणारे सदाशिव त्या देवाधिदेव नृसिंह मूर्तीची पूजा करीत असतात. इतिश्री मत्स्य पुराणे तारकामय संग्रामे अंधक वधो नामाष्ट सप्त त्यत्तर शततमो ध्यायः१७८

अध्याय १७९ वा.

ऋषयऊचुः॥ श्रुतोंधकवधः सूत यथा वत्त्वदुदीरितः ॥ वाराणस्यास्तु माहात्म्यं श्रोतुमिच्छाम सांप्रतं॥१॥

अर्थ- शौनकादिक ऋषि बोलले हे सूता त्वां सांगितलेला अंधकासुराचा-वध आह्मीं श्रवण केला, सांप्रत कालीं आह्मीं काशि क्षेत्राचें माहात्म्य ऐकण्या विषयीं इच्छितों.

भगवान्पिंगलः केनगणत्वंसमुपागतः अन्नदत्वं च संप्राप्तो वाराणस्यां महाद्युतिः॥२॥

अर्थ- तसाच ऐश्वर्य संपन्न महा तेजस्वी पिंगल, शिवाचा गण कोणत्या साधनानें झाला. आणि तो काशींत अन्न दाता कशानें जाहला;

क्षेत्रपालः कथंजातः प्रियत्वंच कथंगतः॥ एतदिच्छामकथितंश्रोतुंब्रह्मसूनत्वया॥३॥

अर्थ:- त्याच प्रमाणें हा पिंगलनामा गण शिवास प्रिय होऊन काशींत क्षेत्रपाल कसा झाला; हा सर्व विषय हे ब्राह्मण पुत्रा सूता तुझे मुखानें आह्मीं श्रवण करण्यास इच्छितो १

सूतउवाच ॥ शृणुध्वंवैयथालेभेगणेशत्वंसपिंगलः ॥
अन्नदत्वंचलोकानांस्थानंवाराणसीत्विह ॥ ४ ॥

अर्थ:- नंतर सूत बोलले ऋषीहो त्या पिंगलास शिवगणांचें स्वामित्व, लोकांस अन्नदातृत्व (अन्न देण्याचें सामर्थ्य) व या लोकीं स्थान काशिक्षेत्र हीं ज्या प्रकारानें प्राप्त झालीं तें सर्व यथास्थित श्रवण करा.

पूर्णभद्रसुतः श्रीमानासीद्यक्षः प्रतापवान् ॥ हरिकेश इतिख्यातोब्रह्मण्योधार्मिकश्चह ॥ ५ ॥

अर्थ:- तें असें कीं, पूर्वी पूर्णभद्रनामक यक्षाचा तेजस्वी व प्रतापी यक्षनामक पुत्र होता; त्यास लोकांत हरिकेश असें ही ह्मणत होते; तो ब्राह्मणां विषयीं दयालु व धार्मिक ही असे

तस्यजन्मप्रभृत्येवशर्वेभक्तिरनुत्तमा ॥ तदासीत्तन्नमस्कारस्तन्निष्ठस्तत्परायणः ॥ ६ ॥

अर्थ:- त्याची जन्मा पासून शंकरावर उत्तम भक्ति असून तो शिवास नमस्कार करणें व शिवव्रतें यां विषयीं तत्पर असून त्या शिवासच परम दैवत मानीत होता.

आसीनश्चशयानश्चगच्छंस्तिष्ठन्ननुव्रजन् ॥ भुंजानोथपिबन्वापिरुद्रमेवान्वचिंतयत् ॥ ७ ॥

अर्थ:- आणि कोठें ही बसणें, निद्रा करणें, जाणें, उभें रहाणें, कोणाच्याही मागें जाणें, भोजन व उदकप्राशन या सर्व कर्मांत तो हरिकेश, सदाशिवाचेंच प्रीतीनें चिंतन करीत असे.

तमेवंयुक्तमनसंपूर्णभद्रःपिताब्रवीत् ॥ नत्वांपुत्रमहंमन्येदुर्जातोयस्त्वमन्यथा ॥ ८ ॥

अर्थ:- असा तो आपला पुत्र हरिकेश मनःपूर्वक योगनिष्ठ झाला असें पाहून त्याचा पिता पूर्णभद्र त्यास बोलला कीं, मुला तूं दुराचारी झालास; यास्तव मी तुला पुत्र असें मानीत नाहीं.

\+ सूताच्या लोमहर्षण नामक पित्यास ऋषींनीं ब्रह्मासन दिल्यामुळें सूतास ब्राह्मण पुत्र ह्मटलें आहे.

नहियक्षकुलीनानामेतद्वृत्तंभवत्युत॥गुह्यकाबतयूयं वैस्वभावात्क्रूरचेतसः॥९॥क्रव्यादाश्चैवकिंभक्षाहिंसा शीलाश्चपुत्रक॥

अर्थः— कारण यक्षकुलोत्पन्न पुरुषांस हें आचरण उचितनाहीं तरहे पुत्रा तुह्मीं यक्ष, स्वभावतः क्रूरबुद्धि असून मांसादिक निंद्य पदार्थ भक्षण करणारे व प्राणि हिंसा करणारे आहां.

मैवंकार्षीर्नितेवृत्तिरेवंदृष्टामहात्मना॥१०॥स्वयंभुवा यथादिष्टात्यक्त्वायदिनोभवेत्॥आश्रमांतरजंकर्मन कुर्युर्गृहिणस्तुतत्॥११॥हित्वामनुष्यभावंचकर्मभि र्विविधैश्चर॥

अर्थः— तस्मात् हे वत्सा तूं असें करूंनको; कारण अशी तुझी वृत्ति महासमर्थ स्वयंभू ब्रह्मदेवांच्या ही पहाण्यांत कोठें वेदशास्त्रांत आली नाहीं तेव्हां त्या ब्रह्मदेवानींच ज्यांस जी वृत्ति सांगितली आहे; तिचा त्याग करणें त्यांस योग्य नाहीं ह्मणूनच गृहस्थाश्रमी आदिकरून लोक स्वकर्म सोडून इतर आश्रमांतील कर्म करीत नाहींत; तस्मात् तूं हा मनुष्यस्वभाव टाकून आपल्या यक्ष जातींचीं नाना प्रकारचीं कर्में कर.

यत्त्वमेवंविमार्गस्थोमनुष्याजा तएवच॥ १२॥यथा वद्विविधंतेषांकर्मतज्जातिसंश्रयं॥मयापिविहितंपश्यकर्मैतन्नात्रसंशयः॥१३॥

अर्थः— कारण तूं मनुष्य जातींत उत्पन्न झालेला नसून असा विरुद्ध मार्गानें वर्ततोस हें तुला योग्य नाहीं; तर तूं त्या मनुष्यादिकांचें त्यात्या जातीचें स्वकर्म व म्याही आचरण केलेलें हें यक्ष जातीचें कर्म अवलोकन कर; याविषयीं लेशमात्र ही संशय नाहीं.

सूतउवाच॥एवमुक्त्वासतंपुत्रंपूर्णभद्रःप्रतापवान्॥ उवाचनिष्क्रमक्षिप्रंगच्छपुत्रयथेच्छसि॥१४॥

अर्थः— सूत ह्मणतात असें पुत्रास सांगून तो प्रतापी पूर्णभद्र बोलला हे पुत्रा तूं आतां लौकर घराबाहेर निघ, आणि पाहिजे तिकडे जा.

ततःसनिर्गतस्त्यक्त्वागृहंसंबंधिनस्तथा॥वाराण

सीं समासाद्य तपस्तेपे सुदुश्चरं ॥ १५ ॥

अर्थ- असें पित्याचें भाषण ऐकून तत्काल तो हरिकेश आपलें घर व सर्व संबंधी यांचा त्याग करून काशीस जाऊन तेथें अति दुष्कर तप करूं लागला.

स्थाणुभूतो ह्यनिमिषः शुष्ककाष्ठोपलोपमः ॥ सन्निय म्येंद्रियग्राममवातिष्ठत निश्चलः ॥ १६ ॥

अर्थ- तें असें कीं, तो हरिकेश आपलीं चित्तादिक सर्व इंद्रियें स्वाधीन करून नेत्रांच्या पांपण्या लवूं न देतां. शुष्क काष्ठ, किंवा दगड यां सारख्या निश्चल स्थितीनें उभा राहिला.

अथ तस्यैवमनिशं तत्परस्य तदाशिषः ॥ सहस्रमेकं वर्षाणां दिव्यमप्यभ्यवर्तत ॥ १७ ॥

अर्थ- नंतर या प्रमाणें अहोरात्र तो हरिकेश शंकरा पासून वर प्रदान संपादनार्थ शिवचरणीं निष्ठा धारण करून तप करीत असतां देवांचीं एक सहस्र वर्षें झालीं.

वल्मीकेन समाक्रांतो भक्ष्यमाणः पिपीलिकैः ॥ वज्रसूचीमुखैस्तीक्ष्णैर्विध्यमानस्तथैव च ॥ १८ ॥ निर्मांसरुधिरत्वक्च कुंदशंखेंदुसप्रभः ॥ अस्थिशेषोऽभवच्छंभुं देवं चिंतयन्नपि ॥ १९ ॥ एतस्मिन्नंतरे देवी विज्ञापयत शंकरं ॥

अर्थ- तेव्हां त्या हरिकेश यक्षावर वारुळ वाढून मुंग्या व वज्र किंवा सुया यां समान तीक्ष्ण मुख युक्त प्राण्यानीं दंश करून त्याचा देह भक्षिला असतां तो मांस, रक्त व त्वचा यानीं रहित झाल्यामुळें केवल अस्थिमात्र शेष राहिल्या तरीं तो हरिकेश त्या तपोबलानें कुंदपुष्प शंख अथवा चंद्र यां सारख्या कांतीनें शोभत असून तसाच शिवाचें ध्यान करीत होता, तों त्या संधीस पार्वती शंकरास विज्ञापना करूं लागली.

देव्युवाच ॥ उद्यानं पुनरेवेहद्रष्टुमिच्छामि सर्वदा ॥ २० क्षेत्रस्य देव माहात्म्यं श्रोतुं कौतूहलं हि मे ॥

अर्थ- कीं, हे महादेवा मी पुनः तुमचें या काशींतील क्रीडावन पहाण्यास इच्छितें तसेंच या काशी क्षेत्राचें तर बहुत आश्चर्यकारक माहात्म्य ऐकण्या विष-

यीं मला सर्वदा इच्छा आहे.

यतश्चप्रियमेतत्तेतथास्यफलमुत्तम ॥ २१ ॥ इतिविज्ञापितोदेवः शर्वाण्या परमेश्वरः ॥ शर्वः पृष्टोयथातथ्यमाख्यातुमुपचक्रमे ॥ २२ ॥

अर्थ.- कारण हें क्षेत्र तुह्मांस अतिप्रिय असून यानें फलही उत्तम आहे; असा पार्वतीनें विनंति पूर्वक प्रश्न केला असतां परमेश्वर शंकरानीं संतुष्ट होऊन तें यथार्थ काशी माहात्म्य पार्वतीला सांगण्यास आरंभ केला.

निर्जगामचदेवेशः पार्वत्यासहशंकरः ॥ उद्यानंदर्शयामासदेव्यादेवः पिनाकधृक् ॥ २३ ॥

अर्थ.- आणि पिनाक धनुर्धारी देवाधिदेव शंकरानीं पार्वतीसहवर्तमान जाऊन आपलें तें क्रीडावन पार्वतीला दाखविलें.

देवदेवउवाच ॥ प्रोत्फुल्लनानाविधगुल्मशोभितंलताप्रतानावनतंमनोहरं ॥ विरूढपुष्पैः परितः प्रियंगुभिः-सुपुष्पितैः कंटकितैश्चकेतकैः ॥ २४ ॥

अर्थ.- आणि ते देवाधिदेव शंकर त्या आपले क्रीडा वनाची शोभा पार्वतीस कथन करितात कीं, हे प्रिये अत्यंत प्रफुल्लित नाना प्रकारच्या झुडपानीं हें उपवन सुशोभित असून वेलींचे वांकडे तंतु खालीं लोंबत असल्यामुळें रमणीय दिसत आहे; तसेंच हें उपवन सभोंवतीं पुष्पयुक्त राळ्यांचे वृक्ष व उत्तम कणसें आलेल्या-कांट्यांचे केतकी वृक्षानीं युक्त आहे.

तमालगुल्मैर्निचितंसुगंधिभिः सकर्णिकारैर्बकुलैश्च सर्वशः ॥ अशोकपुन्नागवरैः सुपुष्पितैर्द्विरेफमालाकुलपुष्पसंचयैः ॥ २५ ॥

अर्थ.- आणि मूळापासून फुटलेल्या फांद्यांचे सुगंधयुक्त तमाल वृक्ष, फणस, बकुळी, अशोक व उंडणीचे वृक्ष या वृक्षानीं हें वन आसमंताद्भागीं सर्वत्र व्याप्त-असून ते वृक्ष उत्तम पुष्पानीं युक्त असल्यामुळें त्या पुष्पसमुदायावर भ्रमरांच्या पंक्ती बसल्यानें शोभत आहेत.

क्वचित्प्रफुल्लांबुजरेणुरूषितैर्विहंगमैश्चारुकलप्रणादिभिः ॥ विनादितंसारसमंडनादिभिः प्रमत्तदात्यूहरुतै

श्चवल्गुभिः ॥ २६ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें तेथील क्वचित्स्थळीं प्रफुल्लित कमळांनें रज उडालेल्यापरवानीं शोभणारे पक्षी अस्पष्टाक्षर युक्त मधुर असे सुंदर शब्द करीत आहेत; तसेंच उत्तम शोभायुक्त सारस आदिकरून पक्षी व उन्मत्तपान कोंबडे यांच्या मंजुल शब्दानीं हें क्रीडावन नादित आहे.

क्वचिच्चचक्राव्हरवोपनादितं क्वचिच्चकादंब कदंबकैर्युतं ॥ क्वचिच्चकारंडवनादनादितं क्वचिच्चमत्तालिकुलाकुलीकृतं ॥ २७ ॥

अर्थ- तसेंच क्वचित् स्थळीं चक्रवाक पक्ष्यांचे शब्द, कोठें बदक पक्ष्यांचे समूह, कांहीं जागीं कारंडवपक्ष्यांचे नाद व कांहीं ठिकाणीं उन्मत्त भ्रमरांचे समुदाय या सर्व प्रकारानीं हें अरण्य व्याप्त आहे.

मदाकुलाभिस्त्वमरांगनाभिर्निषेवितंचारुसुगंधिपुष्पं॥ क्वचित्सुपुष्पैः सहकार वृक्षैर्लतोपगूढैस्तिलकद्रुमैश्च ॥ २८ ॥

अर्थ- आणि कांहीं स्थानीं सुंदर सुगंधिपुष्पें, तसेंच उत्तम पुष्प युक्त आम्रवृक्ष व वेलीनीं वेष्टित तिळल्याचे वृक्ष यानीं हें अरण्य सुशोभित असल्यामुळें येथें काम मद युक्त देवांगना निरंतर वास करितात.

प्रगीतविद्याधरसिद्धचारणंप्रवृत्तनृत्याप्सरसांगणाकुलं॥ प्रहृष्टनानाविधपक्षिसेवितंप्रमत्तहारीतकुलोपनादितं ॥ २९ ॥

अर्थ- तसेंच विद्याधर, सिद्ध व चारण यांचें गायन, अप्सरांच्या समुदायाचें चाललेलें नृत्य, हर्षपावलेले अनेक प्रकारचे पक्षी व मदोन्मत्त हारिल पक्ष्यांच्या कुळांचे शब्द या सर्व प्रकारानीं हें उपवन युक्त आहे.

मृगेंद्रनादाकुलसत्वमानसैः क्वचित्क्वचित् द्वंद्वकदंबकैर्मृगैः ॥ प्रफुल्लनानाविधचारुपंकजैः सरस्तटाकैरुपशोभितंक्वचित् ॥ ३० ॥

अर्थ- त्याच प्रमाणें या वनांत क्वचित् स्थळीं चित्तास व्याकुळ करणाऱ्या सिंहांच्या गर्जना होत असूनही हरिण आपले जातीच्या स्त्री पुरुषांच्या समुदायानें धे-

र्ये युक्त अंतःकरणें करून संचार करीत आहेत; आणि प्रफुल्लित अनेक प्रकारच्या सुंदर कमलयुक्त सरोवराच्या तीरानीं हें उपवन कोठें कोठें शोभायमान दिसत आहे.

निबिडनिचुलनीलंनीलकंठाभिरामंमदमुदितविहंगव्रातनादाभिरामं॥ कुसुमिततरुशाखालीनमत्तद्विरेफंनवकिसलयशोभाशोभितप्रांतशाखं॥३१॥

अर्थ- तसेच अत्यंत दाट उगवलेल्या उदकांतील वेतानीं हें वन नीलवर्ण असल्यामुळें कृष्णवर्ण कंठानें शोभणाऱ्या मयूरांस अतिप्रिय असून हत्तींच्या गंडस्थलांतून पाझरणाऱ्या मदानें हर्षयुक्त झालेल्या पक्षिसमुदायांचे शब्दानीं अत्यंतरमणीय दिसत आहे; आणि पुष्पयुक्त वृक्षशाखांचे मध्यभागीं पुष्परस प्राशनकरून उन्मत्त झालेले भ्रमर दडाले असून नूतन कोमल पल्लवांच्या शोभेनें फांद्यांच्या दोहीं बाजूंचे भाग शोभत आहेत.

क्वचिच्चदंतिक्षतचारुवीरुधंक्वचिल्लतालिंगितचारुवृक्षकं॥ क्वचिद्विलासालसगामिबर्हिणंनिषेवितंकिंपुरुषव्रजैः क्वचित्॥३२॥

अर्थ- तसेंच यावनांत कोठें कोठें हत्तींच्या दांतानीं क्षतयुक्त झालेल्या विस्तीर्ण वेली असून क्वचित् स्थलीं वेलीनीं वेष्टित सुंदर वृक्ष शोभत आहेत. आणि कांहीं जागीं विलासानें मंदगमन करणारे मयूर पक्षी शोभत असून कांहीं ठिकाणीं वानरांचे कळप संचार करीत आहेत.

पारावतध्वनिविकूजितचारुशृंगैरभ्रंकषैःसितमनोहरचारुरूपैः॥ आकीर्णपुष्पनिकुरंबविमुक्तहासैर्विभ्राजितंत्रिदशदेवकुलैरनेकैः॥ ३३॥

अर्थ- त्याचप्रमाणें पारव्यांचे शब्दानीं नादित, मेघमंडलास लागणारीं, मनास हरण करणाऱ्या सुंदर शुभ्र आकृतीनें युक्त असून पसरलेल्या पुष्पसमुदायाचे रूपानें हास्य केल्या सारख्या आकारानें शोभणारीं अशा पर्वतशिखरानीं हें उपवनयुक्त असून त्या शिखरांवर देवांतील श्रेष्ठ इंद्रादिक लोकपालांचीं अनेक कुळें क्रीडा करीत आहेत.

फुल्लोत्पलागरुसहस्रवितानयुक्तैस्तोयाशयैस्तमनु-

शोभितदेवमार्गं ॥ मार्गांतरागलितपुष्पविचित्रभक्ति
संबद्धगुल्मविटपैर्विहगैरुपेतं ॥ ३४ ॥

अर्थ- तसेंच हजारों प्रफुल्लित कमलें व कृष्णागरु वृक्ष यांच्या विस्तारानें यु-क्त सरोवरादिक जलाशयांवर देवांच्या येण्याचे मार्ग शोभायुक्त दिसत आहेत; व मार्गांचे मध्यभागीं नगळणाऱ्या पुष्पांच्या अतिप्रीतीनें बहुत पक्षी मूळापासू-न फुटलेल्या फांद्यांचे फुलझाडांच्या शाखांवर बसले आहेत.

तुंगाग्रैर्नीलपुष्पस्तबकभरनतप्रांतशाखैरशोकैर्मत्ता-
लिव्रातगीतश्रुतिसुखजननैर्भासितांतर्मनोज्ञैः ॥ रात्रौ
चंद्रस्यभासाकुसुमिततिलकैरेकतांसंप्रयातं छायासु
प्रप्रबुद्धस्थितहरिणकुलालुप्तदर्भांकुराग्रं ॥ ३५ ॥

अर्थ- तसेंच उंच अग्रांनीं युक्त असून नीलवर्ण पुष्पांचे घोंसांच्या भारानें ल-वलेल्या शाखांचे दोन्ही बाजूंच्या भागांनीं युक्त आणि त्या फांद्यांवर बसून पुष्पां-तील रस प्राशन करून उन्मत्त झालेल्या भ्रमरांच्या समुदायांचे गायनानें सर्वां-च्या कर्णांस सुखकारक व त्यांतील सुगंध बाहेर येत आहे असे अशोक वृक्ष शो-भत असून तिळ्याचे पुष्पयुक्त वृक्ष चंद्रकांतीनें रात्रीं एकसारखे दिसत आहेत व वृक्षांदिकांचे छाये खालीं निजून उठून बसलेल्या हरिणांच्या समुदायानीं अ-ग्रभाग भक्षण केलेल्या दर्भांकुरांचीं बेटें या वनांत शोभत आहेत.

हंसानांपक्षपातप्रचलितकमलस्वच्छविस्तीर्णतोयंतो-
यानांतीरजातप्रविकचकदलीवाटनृत्यन्मयूरं ॥ मायू-
रैःपक्षचंद्रैःक्वचिदपिपतितैरंजितक्ष्माप्रदेशंदेशोदेशे ।
विकीर्णप्रमुदितविलसन्मत्तहारीतवृंदं ॥ ३६ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें या उपवनांत हंसपक्ष्यांचे पंखांनीं चंचल झालेलीं कम-लयुक्त स्वच्छ विशाल उदक असून त्या जलाच्या तीरीं उत्पन्न झालेल्या प्रफुल्लित केळींच्या वनांत मयूर पक्षी नृत्य करीत आहेत; आणि क्वचित् स्थलीं त्या मो-रांचे चंद्राकृति चिन्हयुक्त पडलेल्या पंखांनीं या वनभूमीचे प्रदेश विचित्र दिस-त असून अति हर्षयुक्त, तेजस्वी व उन्मत्त अशा हारिल पक्ष्यांनीं व्याप्त असे बहुत वृक्ष या अरण्यभूमींत जागोजाग पसरले आहेत.

सारंगैःक्वचिदपिसेवितप्रदेशंसंछन्नंकुसुमचयैः क्व

विहङ्गचित्रैः॥ दृष्टाभिः क्वचिदपि किन्नरांगनाभिः स्त्रीबाभिः समधुरगीत वृक्षखंडं॥ ३७॥

अर्थः- तसेच हत्ती, हरिण व चातकपक्षी यानीं या वनांतील कांहीं प्रदेश सुशोभित असून कोठें कोठें विचित्र पुष्पसमुदायानीं क्रीडाभूमी आच्छादित आहेत आणि कांहीं स्थानीं विषयमदानें व्याप्त झालेल्या किन्नरस्त्रिया वृक्षसमूहांत बसून हर्षानें अति मधुर स्वरांवर गायन करीत आहेत.

संसृष्टैः क्वचिदुपलिप्तकीर्णपुष्पैरावासैः परिगृतपादपं मुनीनां॥ आमूलात्फलनिचितैः क्वचिद्विशालैरुत्तुंगैः पनसमहीरुहैरुपेतं॥ ३८॥

अर्थः- आणि या अरण्यांत क्वचित् स्थलीं परस्परांस लागलेले असून सारविलेले व वरून चोंहींकडे पडलेल्या पुष्पांनीं सुशोभित असे ऋषींचे आश्रम तेथील वृक्षांच्या सभोंवतीं वर्तुलाकार आहेत; व कांहीं स्थानीं मूळापासून अग्रापर्यंत फलानीं व्याप्त अशा अति उंच फणसाचे विस्तीर्ण वृक्षानीं हें वन युक्त आहे.

फुल्लातिमुक्तकलतागृहसिद्धलीलंसिद्धांगनाकनकनूपुरनादरम्यं॥ रम्यप्रियंगुतरुमंजरिसक्तभृंगभृंगावलीषुस्खलितांबुकदंबपुष्पं॥ ३९॥

अर्थः- तसेंच प्रफुल्लित कस्तुरी मोगऱ्यांच्या वेलीनीं सभोंवतीं वेष्टित गृहांत सिद्धगणांच्या अनेक लीला व त्या सिद्धांच्या स्त्रियांचे पायांतील सोन्याच्या पैंजणांचे मंजुळ नादानीं हें उपवन रमणीय दिसत असून येथील रम्य राळ्यांच्या वृक्ष संबंधि तुऱ्यांवर भ्रमर बसले असून त्या भ्रमरांच्या पंक्तीवर वरून कळंबाच्या पुष्पांतून उदकाचे बिंदु पडत आहेत.

पुष्पोत्करानिलविघूर्णितपादपाग्रमग्रेसरोभुविनिपातितवंशगुल्मं॥ गुल्मांतरप्रभृतिलीनमृगीसमूहंसंमुच्यतां तनुभृतामपवर्गदातृ॥ ४०॥

अर्थः- त्याच प्रमाणें पुष्प समुदाया वरील वायूनें वारंवार चंचल होणाऱ्या वृक्षांचे अग्रानीं शोभायमान सरोवर आपले अग्रभागीं दिसत असून त्या सभोंवतीं भूमीवर वायूनें वेळूंचीं झुडपें पडलीं आहेत, आणि झुडपें आ-

दिकरून सर्व वृक्ष समुदायांचे मध्यभागाच्या आश्रयानें अनेक हरिणांचे कळप राहिले आहेत; व अशाया काशीक्षेत्रांतील उपवनांत अति प्रीतीनें जे देहधारी वास करितात त्या प्राण्यांस हें वन मोक्षदायक आहे.

चंद्रांशुजालधवलैस्तिलकैर्मनोज्ञैः सिंदूरकुंकुमकुसुंभनिभैरशोकैः ॥ चामीकराभनिचयैरथ कर्णिकारैः फुल्लारविंदरचितं सुविशालशाखैः ॥ ४१ ॥

अर्थ- तसेच चंद्रकिरणांच्या समुदायानें शुभ्रवर्ण दिसणारे तिळ्याचे सुंदर वृक्ष, शेंदूर, केंशर, व कुसुंबा या तीहीं सारखे आरक्तवर्ण अशोक वृक्ष, सुवर्णा समान तेजःपुंज पीतवर्ण असून विशाळ शाखायुक्त कणासाचे वृक्ष व प्रफुल्लित कमळें या सर्व वृक्षांदिकांच्या शोभेनें हें क्रीडावन युक्त आहे.

क्वचिद्रजतपर्णाभैः क्वचिद्विद्रुमसन्निभैः ॥ क्वचित्कांचनसंकाशैः पुष्पैराचितभूतलं ॥ ४२ ॥

अर्थ- आणि क्वचित् स्थलीं रुप्याचे पाना सारखीं शुभ्रवर्णानें युक्त, कोठें-कोठें पोंवळ्यां सारखीं आरक्तवर्ण व कांहीं ठिकाणीं सुवर्णा समान पीतवर्ण अशा पुष्पानीं या अरण्यांतील सर्व प्रदेश व्याप्त आहेत.

पुन्नागेषु द्विजगणविरुतं रक्ताशोकस्तबकभरनमितं ॥ रम्योपांतश्रमहरपवनं फुल्लाब्जेषु भ्रमरविलसितं ॥ ४३

अर्थ- त्याच प्रमाणें उंडणीचे वृक्षांवर अनेक पक्षि समुदायांचे शब्द, आरक्तवर्ण अशोक वृक्षांच्या फुलांचे घोसांनीं लवलेल्या डाळ्या, श्रमहारक मंदसुगंध वायूच्या योगानें आसमंताद्भागचे रमणीय प्रदेश व प्रफुल्लित कमळांवर क्रीडा करणारे भ्रमर या सर्वांनीं हें उपवन सुशोभित आहे.

सकलभुवनभर्ता लोकनाथस्तदानीं तुहिनशिखरिपुत्र्याः सार्द्धमिष्टैर्गणेशैः ॥ विविधतरुविशालं मत्तहृष्टान्यपुष्टमुपवनतरुरम्यं दर्शयामास देव्याः ॥ ४४ ॥

अर्थ- याप्रमाणें त्याकाळीं सर्व भुवनांस आश्रय असून चराचर लोकांचे नाथ ते-शंकरानीं आपले प्रिय नंदिकेश्वरादिक गणनायकांसहित त्या महा तेजःपुंज पार्वती नामक हिमालय कन्येस अनेक प्रकारचे वृक्ष, हर्षयुक्त उन्मत्त कोकिल पक्षी व-समीपच्या अरण्यांतील वृक्ष यानीं रम्य असें तें आपलें क्रीडावन दाखविलें.

देव्युवाच ॥ उद्यानंदर्शितंदेवशोभयापरयायुतं ॥ क्षेत्र
स्यतुगुणान्सर्वान्पुनर्वक्तुमिहार्हसि ॥ ४५

अर्थ- ते समयीं पार्वती बोलली हे देवा तुह्मीं उत्तम शोभायुक्त उपवन मला-दाखविलें आतां पुनः या काशिक्षेत्राचे सर्व गुण सांगण्यास आपण योग्य आहांत.

अस्यक्षेत्रस्यमाहात्म्यमविमुक्तस्यतत्तथा ॥ श्रुत्वापि
हिनमेतृप्तिरतोभूयोवदस्वमे ॥ ४६ ॥

अर्थ- आणि तुह्मीं या अविमुक्त (काशी) क्षेत्राचें माहात्म्य जसें असेल तसें मलासांगा; कारण हें काशी माहात्म्य ऐकून ही माझी तृप्ती होत नाहीं. ह्मणून पुनः तें मला कथन करा.

देवदेवउवाच ॥ इदंगुह्यतमंक्षेत्रंसदावाराणसीमम ॥
सर्वेषामेवभूतानांहेतुर्मोक्षस्यसर्वदा ॥ ४७ ॥

अर्थ- असें देवीचें भाषण श्रवण करून महादेव सांगतात हे पार्वती हें माझें वाराणसी क्षेत्र माहात्म्यानें अत्यंत गुप्त आहे; आणि हेंच सर्व काळीं सकल प्राणिमात्रांस मोक्ष होण्यास कारण आहे.

अस्मिन्सिद्धाःसदादेविमदीयंव्रतमास्थिताः ॥ ना
नालिंगधरानित्यंममलोकाभिकांक्षिणः ॥ ४८ ॥ अ-
भ्यसंतिपरंयोगंमुक्तात्मानोजितेंद्रियाः ॥

अर्थ- हे देवी या क्षेत्रांत सिद्ध सर्वदा माझ्या लोकाची प्राप्ती व्हावी या इच्छेनें नाना प्रकारचीं चिन्हें धारण करून माझीं व्रतें करतात; आणि जितेंद्रिय होऊन सर्वविषयांचा त्याग करून उत्तम योगाभ्यास करितात.

नानावृक्षसमाकीर्णेनानाविहगकूजिते ॥ ४९ ॥ कमलो
त्पलपुष्पाढ्यैःसरोभिःसमलंकृते ॥ अप्सरोगणगंध
र्वैःसदासंसेवितेशुभे ॥ ५० ॥ रोचतेमेसदावासोयेन
कार्येणतच्छृणु ॥

अर्थ- हे देवि आणि या क्षेत्रांत अनेक प्रकारचे वृक्ष असून त्यांवर नाना प्रकारचे पक्षी शब्द करितात तशींच सहस्र पाकळ्यांचीं कमलें, सूर्य विकासि कमलें व अनेक जातींचीं पुष्पें यांहीं युक्त अशा सरोवरांनीं हें काशिक्षेत्र सुशोभित दिसतें यामुळें या क्षेत्रांत अप्सरांचे समूह नृत्य करतात व गंधर्व निरंतर गाय

न करितात. अशा या क्षेत्रांत ज्या कारणानें सर्वदा मला वास करावा असें वा टतें तें तूं श्रवण कर.

मन्मनाममभक्तश्चमय्यर्पितसर्वक्रियः॥५१॥यथा मोक्षमिहाप्नोतिह्यन्यत्रनतथाक्वचित्॥

अर्थ- तसेंच माझे ठिकाणीं मन ठेवून सर्व कर्मे मला समर्पण करणारा माझा भक्त या क्षेत्रांत वास केल्यानें जसा मोक्षास जातो; तशी त्यास अन्यत्र कोठेंही मोक्ष प्राप्ति होत नाहीं.

एतन्ममपरंदिव्यंगुह्याद्गुह्यतरंमहत्॥५२॥ब्रह्मादयस्तुजानंतियेपिसिद्धामुमुक्षवः॥

अर्थ- असें हें माझें मोठें अत्यंत दिव्य क्षेत्र गुह्याहून अति गुह्य आहे; यास ब्रह्मादिक देव व मोक्षाची इच्छा करणारे सिद्ध हे मात्र जाणतात.

अतः प्रियतमंक्षेत्रंतस्माच्चेहरतिर्मम॥५३॥विमुक्तंनमयायस्मान्मोक्ष्यतेवाकदाचन॥महत्क्षेत्रमिदंतस्मादविमुक्तमिदंस्मृतं॥५४॥

अर्थ- या हेतूनें हें क्षेत्र मला अत्यंत प्रिय असल्यामुळें या स्थानीं माझी रहाण्याची इच्छा आहे; यास्तव हें महत्क्षेत्र म्या कधींच सोडिलें नाहीं; व पुढेंही मी या स्थानाचा त्याग करणार नाहीं ह्मणून यास अविमुक्त क्षेत्र ह्मणतात.

नैमिषेथकुरुक्षेत्रेगंगाद्वारेचपुष्करे॥स्नानात्संसेविताद्वापिनमोक्षः प्राप्यतेयतः॥५५

अर्थ- हे देवि नैमिषारण्य, कुरुक्षेत्र, गंगाद्वार, पुष्कर क्षेत्र या सर्व क्षेत्रांत स्नान दानादिक सेवा करून वास केला तरी तेथें मोक्ष प्राप्त होत नाहीं.

इहसंप्राप्यतेयेनततएतद्विशिष्यते॥प्रयागेचभवेन्मोक्षइहवामत्परिग्रहात्॥५६॥

अर्थ- आणि या क्षेत्रांत मोक्ष प्राप्त होतो ह्मणून हें सर्वांहून श्रेष्ठ आहे; आणि प्रयागांत किंवा या क्षेत्रांत माझ्या अनुग्रहानेंच मोक्ष प्राप्त होतो.

प्रयागादपितीर्थाग्र्यादिदमेवमहत्स्मृतं॥जैगीषव्यः परांसिद्धिंयोगतः समहातपाः॥५७॥

अर्थ- आणि तीर्थ श्रेष्ठ प्रयागापेक्षाही हेंच क्षेत्र मोठें आहे ह्मणूनच येथं-

महातपस्वी जैगीषव्य ऋषि योगसाधनानें उत्तमसिद्धि पावला.

अस्यक्षेत्रस्यमाहात्म्याद्भक्त्याचममभावनात्॥ जैगीषव्योमहाश्रेष्ठोयोगिनांस्थानमिष्यते॥५८॥

अर्थ- तसेंच या क्षेत्राच्या माहात्म्यानें व मजवर भक्तियुक्त उत्तम भावना ठेविल्यामुळें महाश्रेष्ठ जैगीषव्य मुनि सर्वयोग्यांत मुख्य जाहला.

ध्यायतस्तत्रमांनित्यंयोगाग्निर्दीप्यतेभृशं॥ कैवल्यं परमंयातिदेवानामपिदुर्लभं॥ ५९॥

अर्थ- आणि काशींत निरंतर माझें ध्यान करणाराचा योगरूप अग्नि प्रदीप्त होऊन तो देवांसही दुर्लभ अशा उत्तम मोक्ष स्थानास जातो.

अव्यक्तलिंगैर्मुनिभिः सर्वसिद्धांतवेदिभिः॥ इहसंप्राप्यतेमोक्षोदुर्लभोदेवदानवैः॥ ६०॥

अर्थ- तसेंच लोकांत स्पष्ट चिन्हांनें न वर्तणारे असून सर्वशास्त्रांचा सिद्धांत जाणणारे ऋषी या क्षेत्रांत राहून देवदानवांस दुर्लभ अशा मोक्षास जातात.

तेभ्यश्चाहंप्रयच्छामि भोगैश्वर्यमनुत्तमं॥ आत्मनश्चैवसायुज्यमीप्सितंस्थानमेवच॥ ६१॥

अर्थ- आणि मी या क्षेत्रांत राहणारांस उत्तम भोग योग्य ऐश्वर्य, इच्छितस्थान व आपलें सायुज्य हीं फळें देतों.

कुबेरस्तुमहायक्षस्तथाशर्वार्पितक्रियः॥ क्षेत्रसंवसनाद्देवगणेशत्वमवापह॥ ६२॥

अर्थ- तसाच महायक्ष कुबेर या क्षेत्रांत राहून शंकरास सर्वकर्में अर्पण करून गणांचें स्वामित्व पावला.

संवर्तोभवितायश्चसोपिभक्त्याममैवतु॥ इहैवाराध्यमांदेवि सिद्धिंयास्यत्यनुत्तमां॥ ६३॥

अर्थ- आणि हे देवि जो संवर्त ऋषिपुढें उत्पन्न होणारा आहे तोही माझ्याच भक्तीनें या क्षेत्रांत माझें आराधन करून अत्युत्तम सिद्धि पावेल.

पराशरसुतोयोगीऋषिर्व्यासोमहातपाः॥ धर्मकर्ता भविष्यश्चवेदसंस्थाप्रवर्तकः॥ ६४॥ रंस्यतेसोपिपद्मा

क्षिक्षेत्रेस्मिन्मुनिपुंगवः॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे कमल नेत्रे देवि लोकांत वेदस्थितीचे प्रवर्तक महातपस्वी, धर्म कर्ते, योगी मुनिश्रेष्ठ असे पुढें होणारे पराशर ऋषीचे पुत्र वेदव्यास तेही या क्षेत्रांतच रममाण होतील.

ब्रह्मादेवर्षिभिःसार्धंविष्णुर्वायुर्दिवाकरः॥६५॥देवराजस्तथाशक्रोयेपिचान्येदिवौकसः॥उपासंतेमहात्मानःसर्वेमामेवसुव्रते॥६६॥

अर्थ- तसेंच उत्तम व्रत करणाऱ्ये हे पार्वति देवर्षी सहित ब्रह्मदेव, विष्णु, वायु, सूर्य, देवराज इंद्र व स्वर्गवासी इतर महात्मे सर्व देवही या क्षेत्रांत राहून माझीच उपासना करतात.

अन्येपियोगिनः सिद्धाश्छन्नरूपामहाव्रताः॥ अनन्यमनसोभूत्वामामिहोपासतेसदा॥६७॥

अर्थ- आणि दुसरेही मोठीं व्रतें करणारे योगी, सिद्ध एकाग्रचित्त होऊन सर्वदा या क्षेत्रांत माझी उपासना करीत गुप्तरूपानें राहतात.

अलर्कश्चपुरीमेतांमत्प्रसादादवाप्स्यति॥सचैनांपूर्ववत्कृत्वाचातुर्वर्ण्याश्रमाकुलां॥६८॥स्फीतांजनसमाकीर्णांभक्त्याचसुचिरंनृपः॥मयिसर्वार्पितप्राणोमामेवप्रतिपत्स्यते॥६९॥

अर्थ- तसाच अलर्कराजाही माझ्या प्रसादानें या नगरीस येईल. आणितो राजा या काशी नगरीला पूर्वी प्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चारवर्ण त्यांचे आश्रम सर्व इतर जन व ऐश्वर्य यानीं युक्त करून भक्तीनें मला सर्वप्राण चिरकाल अर्पण करून मजकडेच प्राप्त होईल.

ततःप्रभृतिचार्वंगियेपिक्षेत्रनिवासिनः॥गृहिणोलिंगिनोवापिमद्भक्तामत्परायणाः॥७० मत्प्रसादाद्भजिष्यंतिमोक्षंपरमदुर्लभं॥

अर्थ- हे सुंदरांगि नंतर त्या दिवसा पासून जे कोणी या क्षेत्रांत राहणारे गृहस्थाश्रमी किंवा संन्यासी माझी भक्तिकरून मला शरण येतील ते माझ्या प्रसादानें अत्यंत दुर्लभ मोक्षास जातील.

विषयासक्तचित्तोपित्यक्तधर्मरतिर्नरः ॥७१॥ इहक्षे
त्रेमृतःसोपिसंसारंनपुनर्विशेत् ॥

अर्थ- आणि मनःपूर्वक विषयासक्त किंवा धर्मत्याग केलेला मनुष्य या क्षेत्रांत मरण पावला असतां तोही पुनः जन्ममरणरूप संसारांत न येतां मुक्त होतो.

येपुनर्निर्ममाधीराःसत्वस्थाविजितेंद्रियाः ॥७२॥ व्र
तिनश्चनिरारंभाःसर्वेतेमयिभाविनाः ॥ देहभंगंसमा
साद्यधीमंतःसंगवर्जिताः ॥ गताएवपरंमोक्षंप्रसादा
न्ममसुव्रते ॥७३॥

अर्थ- हे उत्तम व्रतनिष्ठे जे कोणी सर्व विषयांवर ममता न ठेवणारे, गंभीर बुद्धियुक्त, सात्विक असून जितेंद्रिय, महाव्रतनिष्ठ, काम्य किंवा निषिद्ध अशा कर्मां विषयीं आरंभही न करणारे हे सर्वही माझी भक्तीकरून अहंकाररहित ज्ञानसंपन्न होऊन देहत्याग केला असतां ते माझ्या प्रसादानें उत्तम मोक्षास जातात.

जन्मांतरसहस्रेषुयुंजन्योगमवाप्नुयात् ॥ तमिहैवप
रंमोक्षंमरणादधिगच्छति ॥७४॥

अर्थ- आणि सहस्रावधि जन्मपर्यंत योगाभ्यास केल्यानें प्राणी ज्यामोक्षास जातात तो उत्तममोक्ष या क्षेत्रांत मरणानेंच प्राप्त होतो.

एतत्संक्षेपतोदेविक्षेत्रस्यास्यमहत्फलं ॥ अविमुक्तस्य
कथितंमयातेगुह्यमुत्तमं ॥७५॥

अर्थ- हे देवि या काशीक्षेत्राचें उत्तम व गुह्य असें हें महत्फल म्या तुला संक्षेपानें सांगितलें.

अंतःपरतरंनास्तिसिद्धिगुह्यंमहेश्वरि ॥ एतद्बुध्यं
तियोगज्ञायेचयोगेश्वराभुवि ॥७६॥

अर्थ- हे महदैश्वर्यपूर्णे याहून अतिश्रेष्ठ व गुह्य सिद्धि देणारें असें दुसरें साधन कोणतेंही नाहीं. असें भूमीवर योगांचें ज्ञाते मोठे योगी जाणतात.

एतदेवपरंस्थानमेतदेवपरंशिवं ॥ एतदेवपरंब्रह्म
एतदेवपरंपदं ॥७७॥

अर्थ- आणि हेंच क्षेत्र सर्वांहून उत्तम असून उत्तम कल्याण दायक स्थान- आहे; व हेंच परब्रह्म प्राप्तीचें कारण असल्यामुळें हेंच उत्तम स्थळ आहे.

वाराणसी तु भुवनत्रयसारभूतारम्यासदाममपुरीगि रिराजपुत्रि॥ अत्रागताविविधदुष्कृतकारिणोपिपाप क्षयाद्विरजसः प्रतिभांतिमर्त्याः॥ ७८॥

अर्थ- हे पर्वतराज हिमालयकन्ये ही माझी वाराणसी नगरी सर्वदा रमणीय असून त्रिभुवनांत श्रेष्ठ आहे ह्मणूनच अनेक प्रकारचीं पापें करणारे ही मनुष्य या पुरींत आले असतां त्यांच्या पापांचा नाश होऊन ते पुण्यो दयानें शुद्ध होत्साते शोभतात.

एतत्स्मृतंप्रियतमंममदेविनित्यंक्षेत्रंविचित्रतरुगु- ल्मलतासुपुष्पं॥ अस्मिन्मृतास्तनुभृतः पदमाप्नुवंति मूर्खागमेनरहितापिनसंशयोत्र॥ ७९॥

अर्थ- हे देवि आणिया काशींत विचित्र वृक्ष, झुडपें, वेली व उत्तम पुष्पें असून येथें जे देहधारी मरण पावतात ते प्राणी वेदोक्त ज्ञानहीन मूढ असले तरी मोक्ष पदास जातात; ह्मणून हें क्षेत्र मलानिरंतर प्रिय आहे; याविषयीं संशय नाहीं.

सूतउवाच॥ एतस्मिन्नंतरेदेवोदेवींप्राहगिरींद्रजा॥ दातुंप्रसादाद्यक्षायवरंभक्तायभामिनि॥ ८०॥

अर्थ- सूत बोलले ऋषी हो त्या काळीं महादेव पर्वतश्रेष्ठ हिमालय कन्या जी- पार्वती देवी तिला बोलले कीं, हे सुंदरी या प्रदेशांत जवळच आपला भक्त एक यक्ष आहे; त्यास प्रसन्न होऊन वर देण्यासाठीं तेथें जावयाचें आहे.

भक्तोममवरारोहेतपसाहतकिल्बिषः॥ अहोवरम- सौलब्धुमस्मत्तोभुवनेश्वरि॥ ८१॥

अर्थ- कारण हे गुणवति तो यक्ष माझा भक्त असून तपानें निष्पाप झाला- आहे; तस्मात् हे भुवनेश्वरी हा यक्ष आह्मा पासून वर प्राप्त होण्यास योग्य- आहे.

एवमुक्त्वाततोदेवः सहदेव्याजगत्पतिः॥ जगामयक्षो यत्रास्तेकृशोधमनिसंततः॥ ८२॥

अर्थ- असें भाषण करून ते विश्वपालक महादेव तो यक्ष तपानें कृश-झाल्यामुळें सर्व शरीरावर नाड्यांचे वेष्टनानेंच व्याप्त असून जेथें तप करीत-होता तेथें पार्वती सहित गेले.

ततस्तंगुह्यकंदेवीदृष्टिपातैर्निरीक्षती॥श्वेतवर्णवि-चर्माणंस्नायुबद्धास्थिपंजरं॥८३॥देवीप्राहतदा देवंदर्शयंतीचगुह्यकं॥

अर्थ- नंतर केवळ कृष्णवर्ण झाल्यानें तेजोहीन त्वचायुक्त असून शिरा नीं वेष्टित अस्थींच्या पांजऱ्यांचे अवशेष शरीरानें राहिलेल्या अशा त्या य-क्षास कृपा कटाक्षानीं पाहून ती पार्वती त्या यक्षास शिवाच्या दृष्टीखालीं घा लून त्या काळीं शंकरास बोलल्ये.

सत्यंनामभवानुग्रोदेवैरुक्तस्तुशंकर॥८४॥ईदृशे-चास्यतपसिनप्रयच्छसियद्वरं॥

अर्थ- कीं हे शंकरा देव तुह्यास उग्र ह्मणतात हें सत्यच आहे; कारण या यक्षानें असें उत्कृष्ट तप झालें असून आपण यास वर कां देत नाहीं.

अत्रक्षेत्रेमहादेवपुण्येसम्यगुपासिते॥८५॥कथ-मेवंपरिक्लेशंप्राप्तोयक्षकुमारकः॥शीघ्रमस्यवरंयच्छ प्रसादात्परमेश्वर॥८६॥

अर्थ- हे महादेवा हा यक्ष कुमार या महा पुण्यकारक काशी क्षेत्रांत तुमचीउ-पासना करीत असून असे क्लेश कां पावला; तस्मात् हे परमेश्वरा आपण कृ पा करून यास शीघ्र वर द्यावा.

एवंमन्वादयोदेववदंतिपरमर्षयः॥रुष्टाद्वाचाथतुष्टा द्वासिद्धिरत्नूभयतोभवेत्॥८७॥भोगप्राप्तिस्तथारा ज्यमंतेमोक्षःसदाशिवात्॥

अर्थ- कारण स्वायंभव मनु आदिकरून सर्वश्रेष्ठ ऋषीही असें ह्मणतात; कीं सदाशिव प्रसन्न झाले अथवा रुष्ट झाले तरीं त्यांचा संतोष व रोष या दो ही प्रकारानीं लोकांची कार्य सिद्धीच होते. ती अशी कीं, या लोकीं अनेक सु ख प्राप्ती व राज्य व अंतीं मोक्ष हीं फळें प्राप्त होतात.

एवमुक्तस्ततोदेवःसहदेव्याजगत्पतिः॥८८॥जगा

मयक्षोयत्रास्तेकृशोधमनिसंततः ॥

अर्थ— असें पार्वतीनें भाषण केलें असतां तिज सहवर्तमान जगपालक शंकर तो कृश झाल्यामुळें सर्व शरीरावर स्पष्ट झालेल्या शिरानीं वेष्टित यक्ष जेथें तप करीत होता तेथें त्याच्या समीप गेले.

तंदृष्ट्वाप्रणतंभक्त्याहरिकेशंवृषध्वजः ॥ ८९ ॥ दिव्यंच क्षुरदात्तस्मैयेनापश्यत्सशंकरं ॥

अर्थ— तेव्हां नंदी बसलेल्या ध्वजयुक्त रथांत आरोहण करणाऱ्या शिवानीं आपणांस भक्तीनें निरंतर नम्र झालेल्या त्या हरिकेशनामक यक्षास अवलोकन करून त्यास दिव्य ज्ञान दिलें; तेणें करून त्यानें आपले हृदयांत शंकरास ज्ञान दृष्टीनें पाहिलें.

अथयक्षस्तदादेशाच्छनैरुन्मील्यचक्षुषी ॥ ९० ॥ अपश्यत्सगणंदेवंवृषध्वजमुपस्थितं ॥

अर्थ— नंतर त्या यक्षानें शिवांच्या आज्ञेवरून हळूच नेत्र उघडून बाणादिक गणां सहित आलेल्या त्या शंकरास अवलोकन केलें.

देवदेवउवाच ॥ वरंददामितेपूर्वंत्रैलोक्यदर्शनंतथा ॥ ९१ सावर्ण्यंचशरीरस्यपश्यमांविगतज्वरः ॥

अर्थ— त्या कालीं देवाधिदेव शिव बोलले हे यक्षनंदना मी तुला अद्भुत वर देतों; तो असाकीं, तुला त्रैलोक्यांतील ज्ञान व मजसारिखें शरीरास तेज हीं प्राप्त होतील, आणि तूं सर्व दुःखरहित होऊन मला सर्वदा अवलोकन कर.

सूतउवाच ॥ ततःसलब्ध्वातुवरंशरीरेणाक्षतेनच ॥ ९२ ॥ पादयोःप्रणतस्तस्थौकृत्वाशिरसिसांजलिं ॥

अर्थ— सूत बोलले ऋषीहो तो हरिकेशयक्ष शिवापासून असा वर प्राप्त झाल्यावर आपल्या सांग देहानें शिवाचे चरण कमलांवर साष्टांग नमस्कार करून मस्तकावर अंजलिपुट जोडून तो शिवाचे अग्रभागीं उभा राहिला.

उवाचाथनदातेनवरदोस्मीतिचोदितः ॥ ९३ ॥ भगवन्भक्तिमव्यग्रांत्वय्यनन्यांविधत्स्वमे ॥ अन्नदत्वंचलोकानांगाणपत्यंतथाक्षयं ॥ ९४ ॥

अर्थ— ते समयीं पुनः मी वर देतों असें शंकरानीं भाषण केल्यानंतर त्या हरिके-

शानें वर मागितले कीं, हे भगवन् माझी अनन्य भक्ति तुह्मा विषयीं होईल असें करून लोकांस अन्न देणें व निरंतर आपल्या गणांचें स्वामित्व हे अधिकार मला प्राप्त व्हावे.

अविमुक्तंच तेस्थानं पश्येयंसर्वदा यथा ॥ एतदिच्छा-
मिदेवेशत्वत्तोवरमनुत्तमं ॥ ९५ ॥

अर्थ- हे देवाधिदेवा आणि मी तुमचें हें काशीक्षेत्र सर्वकाळीं पाहीन हा उत्तम वर तुह्मापासून मिळावा असें मी इच्छितो.

देवदेवउवाच ॥ जरामरणसंत्यक्तः सर्वरोगविवर्जितः ॥
भविष्यसिगणाध्यक्षोधनदः सर्वपूजितः ॥ ९६ ॥

अर्थ- नंतर महादेव बोलले कीं, हे हरिकेशा तूं जरा व मरण यांतून मुक्त होऊन सर्व रोग रहित होत्साता गणांचा अध्यक्ष, लोकांस द्रव्य देणारा व सर्वांस पूज्य असा होशील.

अजेयश्चापिसर्वेषांयोगेश्वर्यसमाश्रितः ॥ अन्नदश्चा
पिलोकेभ्यः क्षेत्रपालो भविष्यसि ॥ ९७ ॥

अर्थ- तसाच तूं सर्वांस अजिंक होऊन समग्रयोगांचें ऐश्वर्य पावशील. आणि लोकांस अन्न दाता व या काशीचा क्षेत्रपाल हीहो शील.

महाबलोमहासत्वोब्रह्मण्योममचप्रियः ॥ त्र्यक्षश्चदंड
पाणिश्चमहायोगीतथैवच ॥ ९८ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें तूं महाबलाढ्य, अति धैर्यवान्, ब्राह्मणा विषयीं दयाळू, मला अत्यंत प्रिय, तीन नेत्रांनीं युक्त, हातांत दंड धारण करणारा व महा योगी असा होशील.

उद्भ्रमः संभ्रमश्चैवगणौतेपरिचारकौ ॥ तवाज्ञांचकरि
ष्येते लोकस्योद्भ्रमसंभ्रमौ ॥ ९९ ॥

अर्थ- आणि लोकांच्या चित्तास अतिभ्रम व हर्षयुक्त त्वरा उत्पन्न करणारे उद्भ्रम व संभ्रम नामक हे माझे गण तुझे सेवक होऊन तुझी आज्ञा मान्य करतील.

सूतउवाच ॥ एवंसभगवांस्तत्र यक्षंकृत्वागणेश्वरं ॥
जगामभवामदेवेशः सहतेनामरेश्वरः ॥ १०० ॥

अर्थ- सूत ह्मणतात ऋषीहो या प्रमाणें त्या काशींत ऐश्वर्य संपन्न शिवानीं-

त्या यक्षास गणांनें स्वामित्व देऊन सर्व देव व वामदेव यांचे नियामक ते शं कर त्या हरिकेश यक्षा सहवर्तमान स्वस्थानास गेले. इतिश्री मत्स्य पुराणे वाराणसी माहात्म्ये दंडपाणि वरप्रदानं नामैकोनाशीत्युत्तर शततमोध्यायः १७९.

अध्याय १८० वा.

सूतउवाच ॥ इमांपुण्योद्भवांस्निग्धांकथांपापप्रणाशिनीं ॥ शृण्वंतुऋषयःसर्वेसुविशुद्धास्तपोधनाः ॥ १ ॥

अर्थ:- सूत बोलले ऋषीहो तुह्मी सर्वही अत्यंत पवित्र असून केवल तपाच स्वकीयधन मानणारे आहां यास्तव आपण पापनाशक असून पुण्योदय करणारी अशीही कथा श्रवण करावी.

गणेश्वरपतिंदिव्यंरुद्रतुल्यपराक्रमं ॥ सनत्कुमारोभगवानपृच्छन्नंदिकेश्वरम् ॥ २ ॥

अर्थ:- ती अशीकीं, एके समयीं योगैश्वर्यसंपन्न सनत्कुमार ऋषीनें प्रमथादि गणनायकांचा उत्तम स्वामी असून शिवासमान पराक्रमी अशा नंदिकेश्वरास प्रश्न केला.

ब्रूहिगुह्यंयथातत्वंयत्रनित्यंभवस्थितः ॥ माहात्म्यंसर्वभूतानांपरमात्मामहेश्वरः ॥ ३ ॥ घोररूपंसमास्थायदुष्करंदेवदानवैः ॥ आभूतसंप्लवंयावत्स्थाणुभूतोमहेश्वरः ॥ ४ ॥

अर्थ:- कीं, हे शिव प्रिया, सर्व प्राणिमात्रांचे परम प्रिय आत्माव स्वतः मह्या समर्थ असून लोकपूज्यांचे ईश्वर शंकर, इतर देव, दानवांस धारण करण्या विषयीं अशक्य असें उग्ररूप धारण करून निश्चल स्थितीनें प्रलय काल पर्यंत ज्या स्थानीं सर्वदा वास करितात त्या स्थलाचा महिमा गुप्त असला तरीं तो तूं आह्मांस यथास्थित श्रवण करीव.

नंदिकेश्वरउवाच ॥ पुरादेवेनयत्प्रोक्तं पुराणंपुण्यमुत्तमं ॥ तत्सर्वंसंप्रवक्ष्यामिनमस्कृत्यमहेश्वरं ॥ ५ ॥

अर्थ:- तेव्हां नंदिकेश्वर बोलला कीं, हे ऋषिवर्या पूर्वी महादेवानीं पार्वतीला जें पुण्य कारक उत्तम पुराण सांगितलें तें मी शिवास नमस्कार करून-

तुह्मास उत्तम प्रकारें सर्व निवेदन करितों.

ततोदेवेनतुष्टेनउमायाःप्रियकाम्यया॥ कथितंक्षवि
विख्यातंयत्रनित्यंस्वयंस्थितः॥६॥

अर्थ- पूर्वी पार्वतीस प्रसन्न झालेल्या शिवानीं आपली जेथें निरंतर स्थिति आहे; त्या आपले भूमी वरील प्रख्यात स्थानाचें माहात्म्य तिला कथन केलें.

रुद्रस्यार्धासनगतामेरुशृंगेयशस्विनी॥ महादेवंत-
तोदेवीप्रणतापरिपृच्छति॥७॥

अर्थ- तें असें कीं, पूर्वी एके समयीं मेरुशिखरावर महा कीर्ति संपन्न पार्वती सदा शिवाच्या अर्धासनावर बसली असतां ती महादेवास नमस्कार करून प्रश्न करिते.

भगवन्देवदेवेशचंद्रार्धकृतशेखर॥ धर्मंप्रब्रूहिमर्त्या
नांक्षविनेवोर्ध्वरेतसां॥८॥

अर्थ- कीं, हे भगवन् अर्धचंद्र शेखरा देवाधिदेवा आपण मला पृथ्वीवर ब्रह्मचर्यानें वर्तणाऱ्या ऋषि प्रभृति लोकांचा धर्म विस्तारानें सांगा.

जप्तंदत्तंहुतंचेष्टंतपस्तप्तंकृतंचयत्॥ ध्यानाध्ययन
संपन्नंकथंभवतिचाक्षयं॥९॥

अर्थ- आणि जप, दान, होम, यज्ञ, तपाचरण, ध्यान व अध्ययन यानीं युक्त इतर सर्व सत्कर्मे हीं कोणत्या रीतीनें केलीं असतां मोक्षास कारण होतात.

जन्मांतरसहस्रेणयत्पापंपूर्वसंचितं॥ कथंतत्क्षय-
मायातितन्ममाचक्ष्वशंकर॥१०॥

अर्थ- हे शंकरा तसेंच हजारों जन्मांत केलेलें जें पूर्व संचित संपूर्ण पाप तें कोणत्या उपायानें नाश पावतें हें मला कथन करा.

यस्मिन्व्यवस्थितोभक्त्यातुष्यसेपरमेश्वर॥ व्रता-
निनियमाश्चैवआचारोधर्मएवच॥११॥ सर्वसिद्धिक
रंयत्रंत्वक्षय्यगतिदायकं॥ वक्तुमर्हसितत्सर्वंपरं-
कौतूहलंहिमे॥१२॥

अर्थ- त्याचप्रमाणें हे परमेश्वरा आपण ज्या स्थानीं राहून लोकांच्या भक्तीनें आंवर संतुष्ट होतां, आणि व्रतें, नियम, आचार व धर्म हे सर्व कर्मे ज्यास्था

नीं संपूर्ण ऐहिक सिद्धि देणारें असून अंनीं मोक्ष दायक होतें, हा समग्र विषय आपण मला सांगण्यास योग्य आहां कारण या स्थान महिमा श्रवणाची मला अति उत्कंठा आहे.

महेश्वरउवाच ॥ शृणुदेविप्रवक्ष्यामि गुह्यानांगुह्यमुत्तमं ॥ सर्वक्षेत्रेषुविख्यातमविमुक्तंप्रियंमम ॥ १३ ॥

अर्थ- त्या काळीं शंकर बोलले हे स्वच्छंदानुसार क्रीडा करणाऱ्ये पार्वति मी सर्व गुह्यां पेक्षांही गुप्त असें स्थान माहात्म्य सांगतों, तूं श्रवण कर तें असें कीं, हें काशि क्षेत्र मला सर्व क्षेत्रांहून अति प्रिय आहे.

अष्टषष्टिः पुराप्रोक्तास्थानानांस्थानमुत्तमं ॥ यत्रसाक्षात्स्वयंरुद्रः कृत्तिवासाः स्वयंस्थितः ॥ १४ ॥

अर्थ- या काशी क्षेत्रांत अडुसष्ट स्थानें असून तें सर्व स्थानांत उत्तम आहे; कारण येथें गजचर्म परिधान करणारे साक्षात् सदाशिव स्वतः निरंतर वास करितात.

यत्रसन्निहितो नित्यमविमुक्ते निरंतरं ॥ तत्क्षेत्रंनमयामुक्तमविमुक्तंततःस्मृतं ॥ १५ ॥

अर्थ- आणि या काशी क्षेत्रांत सर्वत्र निरंतर माझी स्थिति असून मी या स्थलाचा कधींच त्याग करीत नाहीं, ह्मणून यास अविमुक्त क्षेत्र ह्मणतात.

अविमुक्तेपरासिद्धिरविमुक्तेपरागतिः ॥ जप्तंदत्तंहुतंचेष्टंतपस्तप्तंकृतंचयत् ॥ १६ ॥ ध्यानमध्ययनंदानंसर्वंभवतिचाक्षयं ॥

अर्थ- या अविमुक्त स्थानांत तपादिक सर्व कर्मां पासून उत्तम सिद्धि व उत्कृष्ट गति लोकांस प्राप्त होते; तसेंच जप, दान, होम, यज्ञ, तप, याहून ही जें केलेलें इतर सर्व कर्म, ध्यान अध्ययन व दान हीं सर्व कर्में या क्षेत्रांत अक्षय्य फल दायक होतात.

जन्मांतसहस्रेणयत्पापंपूर्वसंचितं ॥ १७ ॥ अविमुक्तंप्रविष्टस्यतत्सर्वंव्रजतिक्षयं ॥ अविमुक्ताग्निनादग्धमग्नौतूलमिवाहितं ॥ १८ ॥

अर्थ- त्याचे प्रमाणें हजारों जन्मानीं केलेलें जें पूर्व संचित पाप असतें तें-

त्याचें काशींत प्रवेश केल्या बरोबर सर्व या काशी क्षेत्रांतील पुण्यरूप अग्नीनें अग्नीवर ठेवलेल्या कापुसा सारखें नाश पावतें.

ब्राह्मणाः क्षत्रियावैश्याः शूद्रावेवर्णसंकराः॥ कृमिम्लेच्छाश्चयेचान्येसंकीर्णाःपापयोनयः॥१९॥ कीटाः पिपीलिकाश्चैवयेचान्येमृगपक्षिणः॥ कालेननिधनंप्राप्ता अविमुक्तेशृणुप्रिये॥२०॥

अर्थ:— तसेच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र वर्णसंकर (याचार वर्णांच्या परस्पर व्यभिचारा पासून झालेले) कृमि, यवन यांहून इतर भिन्न जातीचे असून शरीरादि संबंधानें परस्परें मिश्र झालेले पापयोनीतील लोक किडे, मुंग्या, हरिण व पक्षी इत्यादिक सर्व प्राणी कालयोगानें काशींत मरण पावले असतां त्यांस कशी स्थिति व गति प्राप्त होते; ती हे प्रिये तूं श्रवण कर.

चंद्रार्धमौलिनःसर्वेललाटाक्षावृषध्वजाः॥ शिवेमम्पुरेदेविजायंतेतत्रमानवाः॥२१॥

अर्थ:— हे देवि ते सर्वही प्राणी मस्तकीं अर्धचंद्र कपाळावर तृतीयनेत्र व ध्वजस्थानीं नंदी यानीं सुशोभित होऊन माझ्या कल्याण कारक कैलास पुरांत यथेच्छ क्रीडा करितात.

अकामोवासकामोवा ह्यपितिर्यग्गतोपिवा॥ अविमुक्तेत्यजन्प्राणान्ममलोकेमहीयते॥२२॥

अर्थ:— तसाच कोणी सकाम अथवा निष्काम किंवा पशु पक्ष्या दिक अज्ञान योनींत उत्पन्न झालेला हे सर्वही प्राणी काशींत प्राणत्याग केल्यानें माझ्या कैलास लोकीं मान्य होतात.

अविमुक्तं यदागच्छेत्कदाचित्कालपर्ययात्॥ अश्मनाचरणौबध्वातत्रैवनिधनंव्रजेत्॥२३॥ अविमुक्तंगतोदेविननिर्गच्छेत्ततःपुनः॥ सोपिमत्पदमाप्नोतिनात्रकार्याविचारणा॥२४॥

अर्थ:— हे देवि कदाचित् कालक्रमानें जो मानव आपले पायांस दगड बांधून ज्या कालीं काशीस जाईल; आणि तो या क्षेत्रांतून पुनः बाहेर न निघतां येथें मरण पावेल; तर त्यास माझें पद प्राप्त होतें. यांत संदेह नाहीं.

वस्त्रापदंरुद्रकोटिंसिद्धेश्वरमहालयं॥गोकर्णंरुद्रकर्णंचसुवर्णाक्षंतथैवच॥२५॥अमरंचमहाकालंतथाकायावरोहणं॥एतानिहिपवित्राणिसान्निध्यात्संध्ययोर्द्वयोः॥२६॥

अर्थ- तसेंच वस्त्रापद, रुद्रकोटि, महास्थान सिद्धेश्वर, गोकर्ण, रुद्रकर्ण, सुवर्णाक्ष, अमर, महाकाल व कायावरोहण हीं काशींतील स्थानें माझें सान्निध्य सायं, प्रातः या दोन कालीं असल्यानें पवित्र आहेत.

कालिंजरवनंचैवशंकुकर्णंस्थलेश्वरं॥एतानिचपवित्राणिसान्निध्याद्धिममप्रिये॥अविमुक्तेवरारोहेत्रिसंध्यंनात्रसंशयः॥२७॥

अर्थ- हे उत्कृष्ट गुणवति प्रिये, कालिंजरवन, शंकुकर्ण व स्थलेश्वर हीं काशींतील स्थानें माझ्या त्रिकाल सान्निध्यानें अति पवित्र आहेत; यांत संशय नाहीं.

हरिश्चंद्रंपरंगुह्यंगुह्यमाम्रातकेश्वरं॥जलेश्वरंपरंगुह्यंगुह्यंश्रीपर्वतंतथा॥२८॥महालयंतथागुह्यंकृमिचंडेश्वरंशुभं॥गुह्यातिगुह्यंकेदारंमहाभैरवमेवच॥२९॥अष्टावेतानिस्थानानि सान्निध्याद्धिममप्रिये॥अविमुक्तेवरारोहेत्रिसंध्यंनात्रसंशयः॥३०॥

अर्थ- त्याच प्रमाणें हरिश्चंद्र १, आम्रातकेश्वर २, जलेश्वर ३, श्रीपर्वत ४, महालय ५, कल्याणकारक कृमिचंडेश्वर ६, केदार ७, व महाभैरव ८ या आठ स्थानांत कांहीं गुह्य कांहीं अतिगुप्त व कांहीं गुह्यांपेक्षांही अतिगुह्य अशीं असून हे उत्तम गुणसंपन्न प्रिये या काशींतील स्थानांत माझें त्रिकाल सान्निध्य असल्यामुळें हीं अत्यंत पवित्र आहेत.

यानिस्थानानिश्रूयंतेत्रिषुलोकेषुसुव्रते॥अविमुक्तस्यपादेषुनित्यंसन्निहितानिवै॥३१॥

अर्थ- हे उत्तम व्रतनिष्ठे त्रैलोक्यांत जीं तीर्थक्षेत्रादिक स्थानें प्रसिद्ध आहेत; तीं या काशीक्षेत्राचे चरणीं निरंतर सन्निहित आहेत.

अथोत्तरांकथांदिव्यामविमुक्तस्यशोभने॥स्कंदोव-
क्ष्यतिमाहात्म्यमृषीणांभावितात्मनां॥३२॥

अर्थ- हे स्कंदरि कार्तिकस्वामी या काशी क्षेत्राचे माहात्म्याची पुढील उत्तम कथा इत उत्तर शुद्धांतःकरण युक्त ऋषींस कथन करील.

इतिश्री मत्स्यपुराणे अविमुक्तमाहात्म्ये अशीत्युत्तर शततमोध्यायः१८०

अध्याय१८१वा.

सूतउवाच॥कैलासपृष्ठमासीनंस्कंदंब्रह्मविदांव
रं॥पृच्छंतिऋषयःसर्वेसनकाद्याःस्तपोधनाः॥
१॥ तथाराजर्षयःसर्वेयेभक्तास्तुमहेश्वरे॥ब्रू-
हित्वंस्कंदभूलोकेयत्रनित्यंभवस्थितः॥२॥

अर्थ- सूत बोलतात शौनकादिकऋषी हो ब्रह्मवेत्यांतील श्रेष्ठ कार्तिकस्वामी कैलास पर्वतावर बसले असतां त्यांस तपच धन असें मानणारे सनकादिकसंपूर्ण ऋषी व शंकराची भक्तिकरणारे इतर सर्व राजर्षी हे-प्रश्न करतात अहो स्कंदा भूलोकांत शंकर नित्यज्यास्थानांत राहतातनें स्थान कोणतें हें तुह्मी आह्मास सांगा.

स्कंदउवाच॥महात्मासर्वभूतात्मादेवदेवःसनातनः
॥घोररूपंसमास्थायदुष्करंदेवदानवैः॥३॥आभू
तसंप्लवंयावत्स्थाणुभूतस्थितःप्रभुः॥गुह्यानां
परमंगुह्यमविमुक्तमितिस्मृतं॥४॥

अर्थ- असा सनकादिक ऋषींनीं प्रश्न केला असतां कार्तिकस्वामी बोलले कीं, ऋषी हो सर्व भूतांचे नियंते देवांचे देव, माहात्मे अनादि समर्थ असे शंकर देव,दानवानीं ग्रहण करण्यास अशक्य असें भयंकर रूप धारण करून प्रलयकाळ पर्यंत ज्यास्थानीं स्थैर्यानें राहिले आहेत त्यास अविमुक्त क्षेत्र ह्मणतात; असें तें काशी क्षेत्र अत्यंत गुप्त आहे.

अविमुक्तेसदासिद्धिर्यत्रनित्यंभवस्थितः॥अस्य-
क्षेत्रस्यमाहात्म्यंयदुक्तंवीश्वरेणतु॥५॥

अर्थ- आणि अविमुक्तनामक या काशी क्षेत्रांत शंकर निरंतर वास क-

रिताल ह्मणून या स्थानीं सर्वदा सिद्धि प्राप्त होते असें या क्षेत्राचें माहात्म्य साक्षात् शंकरानीं सांगितलें आहे.

स्थानांतरं पवित्रं च तीर्थमायतनं तथा ॥ श्मशानसंस्थितं वेश्म दिव्यमंतर्हितं च यत् ॥ ६ ॥ भूर्लोके नैव संयुक्तमंतरिक्षे शिवालयं ॥ अयुक्तास्तन्न पश्यंति युक्ताः पश्यंति चेतसा ॥ ७ ॥ ब्रह्मचर्यव्रतोपेताः सिद्धा वेदांतकोविदाः ॥

अर्थ- तसेंच या क्षेत्रांत मणिकर्णिके समीप स्मशान भूमींतील प्रदेशावर अंतरिक्षांत असून, भूमीस लागलेलें एक तीर्था सारखें पवित्र गुप्त उत्तम मोठें शिवमंदिर आहे, तें योगाभ्यासादिक सत्कर्में न करणाराचे दृष्टीस पडत नसून योगी, ब्रह्मचर्यव्रतनिष्ठ व वेदांत निष्णात सिद्ध, हे आपल्या ज्ञानबलानें त्या शिवालय स्थानास पहातात.

आदेहपतनाद्यावत् तत्क्षेत्रं यो न मुंचति ॥ ८ ॥ ब्रह्मचर्यव्रतैः सम्यक् सम्यगिष्टं मखैर्भवेत् ॥ अपापात्मा गतिः सर्वा या नूक्ता च क्रियावतां ॥ ९ ॥

अर्थ- जो मनुष्य काशी क्षेत्रास गेल्यावर आदेहपात (देहपतन होई पर्यंत) तेथेंच वास करितो, त्यास ब्रह्मचर्य संबंधि व्रतें व यज्ञ हीं कर्में केल्यानें जें इष्ट फलप्राप्त होणारें तें फल प्राप्त होतें. आणि तो पापरहित होऊन सत्कर्म करणारांच्या उत्तम गतीस जातो.

यस्तत्र निवसेद्विप्रो संयुक्तात्मा समाहितः ॥ त्रिकालमपि भुंजानो वायुभक्षसमो भवेत् ॥ १० ॥

अर्थ- आणि जो ब्राह्मण त्रिकाल भोजन करून ही एकाग्र चित्तानें योगाभ्यासा विषयीं तत्पर होऊन त्या काशि क्षेत्रांत वास करील तो वायूचा आहार करणारानें साम्य पावेल.

निमेषमात्रमपि यो ह्यविमुक्ते तु भक्तिमान् ॥ ब्रह्मचर्यसमायुक्तः परमं प्राप्नुयात्तपः ॥ ११ ॥

अर्थ- तसाच जो मनुष्य काशी क्षेत्रांत भक्तीनें एक निमेषमात्र काल पर्यंत ब्रह्मचर्यानें राहील त्यास उत्तम तपाचें फल प्राप्त होईल.

तत्रमासंवसेद्धीरो लघ्वाहारोजितेंद्रियः॥सम्यक्कृतेन
व्रतंचीर्णं दिव्यंपाशुपतंमहत्॥१२॥जन्ममृत्युभयं
तीर्त्वासयातिपरमांगतिम्॥नैश्रेयसींगतिंपुण्यांत-
थायोगगतिंव्रजेत्॥१३॥

अर्थ- तसेंच धैर्य धरून अल्पाहारानें इंद्रियें जिंकून जो मानव काशिक्षेत्रांत एकमास पर्यंत राहतो; तो उत्तम पाशुपत नामक महा शिवव्रत केल्याचें फळ पावतो; आणि तो जन्म मरणाच्या भयांतून तरून मोक्षरूप उत्तमगतीस जातो; तशीच त्यास या लोकीं कल्याण कारक पुण्य वृद्धि करणारी व योगाभ्यासानें प्राप्त होणारी गति प्राप्त होते

नहियोगगतिर्दिव्याजन्मांतरशतैरपि॥प्राप्यतेक्षेत्र
माहात्म्यात्प्रभावाच्छंकरस्यतु॥१४

अर्थ- आणि शतावधि जन्मानीं ही ज्या योगगतीचा लाभ होत नाहीं, ती शंकराच्या प्रतापामुळें या क्षेत्र माहात्म्यानें प्राप्त होते.

ब्रह्महायोभिगच्छेतुअविमुक्तंकदाचन॥तस्यक्षेत्र
स्यमाहात्म्याद्ब्रह्महत्यानिवर्तते॥१५॥

अर्थ- जो ब्रह्म हत्या करणारा मनुष्य या अविमुक्त क्षेत्रास येतो त्याची ब्रह्म हत्या या क्षेत्राच्या महिम्यानें जाते.

आदेहपतनाद्यावत्क्षेत्रंयोनविमुंचति॥नकेवलंब्र-
ह्महत्याप्राकृतानिवर्तते॥१६॥

अर्थ- जो मानव देहपात होई तों पर्यंत या क्षेत्रास सोडीत नाहीं, त्यानें पूर्वी केलेली ब्रह्म हत्याच केवल जाते असें नाहीं.

प्राप्यविश्वेश्वरंदेवंनसाभूयोभिजायते॥अनन्य-
मानसोभूत्वायोविमुक्तंनमुंचति॥१७॥तस्यदेवःस
दातुष्टोसर्वान्कामान्प्रयच्छति॥

अर्थ- तर विश्वेश्वर देवास आल्यानंतर ती ब्रह्महत्या पुनः त्यापासून होत नाहीं आणि जो मनुष्य अन्यविषयादिकांवर चित्त न ठेवतां या अविमुक्त क्षेत्रांतच वास करितो; त्यास सर्वदा शिव संतुष्ट होऊन त्याचे सर्व मनोरथ पूर्ण करतात.

द्वारं यत्सांख्ययोगानां स तत्र वसति प्रभुः ॥१८॥ स गणो हि भवो देवो भक्तानामनुकंपया ॥

अर्थ- तसेच सांख्य व योग यांचे द्वारभूत प्रभु महादेव भक्तांवर कृपा करण्या साठीं आपल्या गणां सहित त्या काशिक्षेत्रांत राहतात.

अविमुक्तं परं क्षेत्रमविमुक्ते परा गतिः ॥१९॥ अविमुक्ते परा सिद्धिरविमुक्ते परं पदं ॥

अर्थ- त्याच प्रमाणें हें अविमुक्त नामक क्षेत्र सर्व क्षेत्रांत श्रेष्ठ असल्या मुळें येथें उत्तम गति प्राप्त होऊन उत्तम अणिमादिक अष्ट सिद्धींचा लाभ होतो; तस्मात् हें क्षेत्र सर्वस्थानांत उत्तम आहे.

अविमुक्तं निषेवेत देवर्षिगणसेवितं ॥२०॥ यदीच्छे न्मानवो धीमान् न पुनर्जायते क्वचित् ॥

अर्थ- यास्तव बुद्धिमान् मनुष्यानें देव, ऋषींच्या समुदायानीं सेवन केलेल्या काशि क्षेत्राचें सेवन करावें कारण तेथें वास करून जो मोक्ष इच्छितो; तो पुनः कदापि जन्मास येत नाहीं.

मेरोः शक्यो गुणान् वक्तुं द्वीपानां च तथैव च ॥२१॥ स मुद्राणां च सर्वेषां नाविमुक्तस्य शक्यते ॥

अर्थ- आणि कोणी एकादा ज्ञानसंपन्न, मेरु पर्वत, सप्त द्वीपें व सर्व स मुद्र यांचे गुण कथन करील; परंतु या अविमुक्त स्थानाचे गुण वर्णन- करण्यास कोणी ही समर्थ नाहीं.

अंतकाले मनुष्याणां छिद्यमानेषु मर्मसु ॥२२॥ वायुना प्रेर्यमाणानां स्मृतिर्नैवोपजायते ॥

अर्थ- तसेच सर्वत्र मरण कालीं वायु झालेल्या मनुष्यांचीं मर्मस्था नें तुटूं लागलीं असतां त्यांची स्मृति नाहींशी होते.

अविमुक्ते ह्यंतकाले भक्तानामीश्वरः स्वयं ॥२३॥ कर्मभिः प्रेर्यमाणानां कर्णजापं प्रयच्छति ॥

अर्थ- आणि या अविमुक्त क्षेत्रांतील स्वकर्मानुसार वर्तणाऱ्या भ क्तांचे कानांत अंतकालीं स्वतः शिव येऊन तारक मंत्राचा उपदेश क रितात.

मणिकर्ण्योस्त्यजन्देहंगतिमिष्टांव्रजेन्नरः॥२४॥ईश्वरप्रेरितोयातिदुष्प्रापामकृतात्मभिः॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो नर मणिकर्णिकेंत देहत्याग करील तो शिवाच्या आज्ञेनें ज्या इच्छित उत्तम गतीस जाईल; ती गति आपलें मन न जिंकणारास सर्वथा दुर्लभ आहे.

अशाश्वतमिदंज्ञात्वामानुष्यंबहुकिल्बिषं॥२५॥ अविमुक्तंनिषेवेतसंसारभयमोचनं॥

अर्थ- आणि हें मनुष्य जन्म बहुपातकानें युक्त असल्यामुळें अशाश्वत असें जाणून मनुष्यानीं संसार भयापासून मुक्त करणाऱ्या या अविमुक्त क्षेत्रांत आदेह पात पर्यंत वास करावा.

योगक्षेमप्रदंदिव्यंबहुविघ्नविनाशनं॥२६॥विघ्नैश्चालोड्यमानोपियोविमुक्तंनमुंचति॥समुंचतिजरांमृत्युंजन्मचैतदशाश्वतं॥२७॥अविमुक्तेप्रसादात्तुशिवसायुज्यमाप्नुयात्॥

अर्थ- तसाच जो मानव विघ्नानीं पीडित झाला असून ही अप्राप्त ऐश्वर्यदायक असून प्राप्त ऐश्वर्याचें रक्षण करणारें, बहुविघ्नांचा नाशक अशा या दिव्य अविमुक्तक्षेत्राचा त्याग करीत नाही तो मनुष्य जरा, मृत्यु व हें अशाश्वत जन्म यांतून मुक्त होऊन काशींत शंकरांच्या प्रसादानें त्यांचें सायुज्य पावतो. इतिश्री मत्स्यपुराणे अविमुक्त माहात्म्ये एकाशीत्युत्तर शततमोऽध्यायः॥१८१॥

अध्याय १८२ वा.

देव्युवाच॥ हिमवंतंगिरिंत्यक्त्वामंदरंगंधमादनं॥कैलासंनिषधंचैवमेरुपृष्ठंमहाद्युति॥१॥ रम्यंत्रिशिखरंचैवमानसंस्कमहागिरिं॥देवोद्यानानिरम्याणिनंदनंवनमेवच॥२॥ सुरस्थानानिमुख्यानितीर्थान्यायतनानिच॥ तानिसर्वाणिसंत्यज्य अविमुक्तेरतिःकथं॥३

अर्थ- असें शंकराचें भाषण ऐकून पार्वती बोलली अहो शंकरा हिमालय पर्वत, मंदराचल, गंधमादन, कैलास, निषध महा तेजस्वी मेरूचा पृष्ठभा-

ग, रमणीय त्रिशिखर पर्वत, मानस नामक महा पर्वत, देवांचीं रम्यक्रीडावनें, नंदन वन, मुख्यमुख्य देवस्थानें तीर्थें व इतर स्थानें यासर्वी पेक्षां हें काशी क्षेत्रच तुह्मांस प्रिय होण्याचें असें महत् कारण काय आहे.

किमत्रस्मृमहत्पुण्यंपरंगुह्यंवदस्वमे ॥ येनत्वंरमसेनित्यंभूतसंपद्गुणैर्युतः ॥ ४ ॥

अर्थ- अशा या अविमुक्त क्षेत्रांत अत्यंत महा पुण्य कारक परम गुह्य कोणतें आहे; कीं, ज्या कारणानें तुह्मीं भूतें ऐश्वर्य व गुण यानीं युक्त असून निरंतर त्या क्षेत्रांत रमतां तें कारण मला कथन करा.

क्षेत्रस्यप्रवरत्वंच येचतत्रनिवासिनः ॥ तेषामनुग्रहः कश्चित्तत्सर्वंब्रूहिशंकर ॥ ५ ॥

अर्थ- हे शंकरा या काशि क्षेत्रास श्रेष्ठत्व, काशी वास करणारावर आपला अनुग्रह कोणत्या रीतीचा होतो, हें सर्व तुह्मीं मला सांगावें.

शंकरउवाच ॥ अत्यद्भुतमिमंप्रश्नंयत्त्वंपृच्छसिभामिनि ॥ तत्सर्वंसंप्रवक्ष्यामि तन्मेनिगदतःशृणु ॥ ६ ॥

अर्थ- तेव्हां शंकर सांगतात हे प्रिये तूं हा अत्यद्भुत प्रश्न केलास तस्मात् मी तें सर्व तुला सांगतों परंतु मी सांगत असतां तूं स्वस्थ चित्तानें श्रवण कर.

वाराणस्यांनदीपुण्यासिद्धगंधर्वसेविता ॥ प्रविष्टात्रिपथागंगातस्मिन्क्षेत्रेममप्रिये ॥ ७ ॥

अर्थ- तें असें कीं, हे प्रिये त्या माझ्या वाराणसी क्षेत्रांत पुण्यकारक असल्या मुळें सिद्ध, गंधर्वानीं सेवित व स्वर्ग, मृत्यु, पाताळ या तीन मार्गानीं गमन करणारी भागीरथी नदी त्या माझ्याकाशी क्षेत्रांत आहे.

मामेवप्रीतिसंतुष्टाकृत्तिवासश्चसुंदरि ॥ सर्वेषांचैवस्थानानांस्थानंतत्तुयथाधिकं ॥ ८ ॥

अर्थ- ती गंगा मजवर प्रीतीनें संतुष्ट होऊन येथें राहिली यास्तव गज चर्म धारण करणाऱ्या, हे सुंदरि सर्व स्थानांत हेंच क्षेत्र श्रेष्ठ आहे.

तेनकार्येणसुश्रोणितस्मिन्स्थानेरतिर्मम ॥ तस्मिन्लिंगेचसान्निध्यंममदेविसुरेश्वरि ॥ ९ ॥

अर्थ- या कारणामुळें हे सुंदर कटि त्या स्थानावर माझी मीती आहे ह्मणून हे देवस्वामिनी देवि काशि क्षेत्रांतील त्या लिंगांत माझें सान्निध्य आहे.

क्षेत्रस्यच प्रवक्ष्यामि गुणान्गुणवतांवरे॥ यान्श्रुत्वा सर्वपापेभ्यो मुच्यते नात्र संशयः॥१०॥

अर्थ- हे श्रेष्ठ गुणवनि आतां तुला या काशि क्षेत्राचे गुण सांगतों ते असे कीं, जे ऐकले असतां मानव सर्व पापां पासून मुक्त होतो याविषयीं संशय नाहीं.

यदि पापो यदि शठो यदि वा धार्मिको नरः॥ मुच्यते सर्वपापेभ्यो ह्यविमुक्तं व्रजेद्यदि॥११॥

अर्थ- आणि कोणी मनुष्य पापी, शठ, अथवा अधार्मिक असून तो त्या अविमुक्त क्षेत्रास गेला असतां सर्व पापांतून मुक्त होतो.

प्रलये सर्वभूतानां लोके स्थावरजंगमे॥ नहि त्यक्ष्यामि तत्स्थानं महागणशतैर्वृतः॥१२॥

अर्थ- तसाच सर्व भूतांचा प्रलय झाला तरीं शतावधि महागणांसहित वृक्ष पाषाणादिक व मनुष्य पशुपक्ष्यांदिक यानीं व्यास अशा या लोकांतील त्या काशि क्षेत्राचा त्याग करीत नाहीं.

यत्र देवाः सगंधर्वाः सयक्षोरगराक्षसाः॥ वक्त्रं मम महाभागे प्रविशंति युगक्षये॥१३॥

अर्थ- हे महाभाग्यशालिनि पार्वति गंधर्वासहित देव, यक्ष, सर्प व राक्षस हे सर्व प्रलयकालीं या अविमुक्त क्षेत्रांत येऊन माझ्या मुखांत प्रवेश करतात.

तेषां साक्षादहं पूजां प्रतिगृण्हामि पार्वति॥ सर्वगुह्योत्तमं स्थानं मम प्रियतमं शुभं॥१४॥

अर्थ- हे पार्वति आणि हें काशिक्षेत्र सर्वांपेक्षां अति गुप्त असून कल्याण कारक असल्यामुळें मला अत्यंत प्रिय आहे; ह्मणून त्या देवादिकानीं या स्थानीं येऊन माझी पूजा केली असतां ती पूजा मी येथें साक्षात् स्वतः ग्रहण करतों.

धन्याः प्रविष्टाः सुश्रोणि मम भक्ता द्विजातयः॥ म

द्भक्तिपरमानित्यंयेमद्भक्तास्ततेनराः ॥१५॥ तस्मिन्प्राणान्परित्यज्यगच्छंतिपरमांगतिं ॥

अर्थ- हे सुंदर कटि पार्वति जे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादिक माझे भक्त या क्षेत्रांत प्रवेश करतात ते या जगांत धन्य होतात आणि-माझी भक्ति करणें हेंच उत्तम असें मानून जे मजवर भक्ति ठेवून या क्षेत्रांत प्राण त्याग करितात ते उत्तम गतीस जातात.

सदायजतिरुद्रेणसदादानंप्रयच्छति ॥१६॥ सदातपस्वीभवतिअविमुक्तस्थितोनरः ॥ योमांपूजयतेनित्यंतस्यतुष्याम्यहंप्रिये ॥१७॥

अर्थ- हे प्रिये अविमुक्त क्षेत्रांत राहून जो मनुष्य सर्वदा रुद्रानें माझें यजन करितो; सर्व काळ दानें देतो आणि नित्य तप करितो व निरंतर माझें पूजन करतो त्यास मी संतुष्ट होतों.

सर्वदानानियोदद्यात्सर्वयज्ञेषुदीक्षितः ॥ सर्वतीर्थाभिषिक्तश्चसम्प्रपद्येतमामिह ॥१८॥

अर्थ- आणि या क्षेत्रांत असून जो सर्व यज्ञांची दीक्षा घेऊन सकल-तीर्थांत स्नानें करून संपूर्ण दानें देतो तो मनुष्य माझे लोकास येतो.

अविमुक्तंसदादेवियेव्रजंतिसुनिश्चिताः ॥ तेतिष्ठंतीहसुश्रोणि त्वद्भक्ताश्चत्रिविष्टपे ॥१९॥

अर्थ- तसेंच हे सुंदरकटि देवि या लोकांतील जे कोणी मानव या अविमुक्त क्षेत्रास उत्तम निश्चयें करून वारंवार जाऊन तुझी भक्ति करितात ते स्वर्गांत राहतात.

मत्प्रसादात्तुतेदेविदीव्यंतिशुभलोचने ॥ दुर्धराश्चैवदुर्धर्षाभवंतिविगतज्वराः ॥२०॥

अर्थ- हे सुंदर नयने देवि ते तुझे भक्त माझ्या प्रसादानें सर्वांस अजिंक असून तिरस्कार करण्यास अशक्य व संताप रहित असे होऊन सर्व लोकांत क्रीडा करितात.

अविमुक्तंशुभंप्राप्यमद्भक्ताः कृतनिश्चयाः ॥ निर्धूतपापविमलाभवंतिविगतज्वराः ॥२१

अर्थ- हे देवि दृढनिश्चय युक्त माझे भक्त या कल्याण कारक अविमुक्त क्षेत्रास आले असतां निष्पाप निर्मळ व संताप रहित असे होतात.

पार्वत्युवाच ॥ दक्षयज्ञस्त्वयादेवमत्प्रियार्थे निषूदितः ॥ अविमुक्तगुणानां तु न तृप्तिरिह जायते ॥ २२ ॥

अर्थ- पार्वती बोलते हे देवा तुम्ही माझ्या प्रीत्यर्थ दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस केला, यावरून तुमचें प्रेम मजवर निश्चित आहे तरया अविमुक्त क्षेत्राचे गुण ऐकून माझे मनाची तृप्ती होत नाहीं, यास्तव आपण या काशी क्षेत्राचे गुण आणखी मला सांगावे.

ईश्वरउवाच ॥ क्रोधेनदक्षयज्ञस्तु मत्प्रियार्थे विनाशितः ॥ महाप्रिये महाभागे नाशितोवरवरानने ॥ २३ ॥

अर्थ- तेव्हां शंकर बोलले हे अति प्रिये महा भाग्य शालिनि सुंदर मुखि पार्वति, मी क्रोधानें दक्ष प्रजापतीच्या यज्ञाचा नाश तुझ्या प्रीत्यर्थ केला हें सत्यच आहे. तस्मात् आतां त्या क्षेत्राचें माहात्म्य मी तुला सांगतों.

अविमुक्ते यजंते तु मद्भक्ताः कृतनिश्चयाः ॥ न तेषां पुनरावृत्तिः कल्पकोटिशतैरपि ॥ २४ ॥

अर्थ- तें असें कीं, जे माझे भक्त या अविमुक्त क्षेत्रांत निश्चयानें माझें पूजन करतात त्यांस शंभर कोटी कल्पानीं ही पुनः गर्भवास प्राप्त होत नाहीं.

देव्युवाच ॥ दुर्लभास्तु गुणा देव अविमुक्ते तु कीर्तिताः ॥ सर्वांस्तान्मम तत्त्वेन कथयस्व महेश्वर ॥ २५ ॥

अर्थ- नंतर देवी बोलली हे देवा महेश्वरा अन्य स्थानीं दुर्लभ असे या अविमुक्त क्षेत्रांतील जे गुण वर्णिले आहेत ते सर्व मला यथास्थित सांगा.

कौतूहलं महादेव हृदिस्थं मम वर्तते ॥ तत्सर्वं मम तत्त्वेन आख्याहि परमेश्वर ॥ २६ ॥

अर्थ- हे महादेवा परमेश्वरा काशी क्षेत्राचें आश्चर्य कारक माहात्म्य माझ्या अंतःकरणांत ऐकण्या विषयीं अति उत्कंठा आहे यास्तव आपण तें संपूर्ण मला यथार्थ कथन करा.

ईश्वरउवाच ॥ असंख्या ह्यमराश्चैव ह्यदेहाश्च भवंति ते ॥ मत्प्रसादाद्वरारोहे मामेव प्रविशंति वै ॥ २७ ॥ ब्रूहि ब्रूहि

विशालाक्षि किमन्यच्छ्रोतुमर्हसि ॥

अर्थ- ते समयीं शंकर काशी क्षेत्राचें वर्णन करितात कीं, हे सुंदरांगे या अविमुक्त क्षेत्रांत माझ्या प्रसादानें सर्व लोक क्षय, मृत्यु व नाशवंत देह यानीं रहित होऊन माझ्या स्वरूपांत प्रवेशकरितात. हे विशाल नेत्रे आणीक तुला काय ऐकण्याची इच्छा असेल तो प्रश्न करण्या विषयीं योग्य आहेस.

देव्युवाच ॥ अविमुक्ते महाक्षेत्रे अहोपुण्य महोगुणाः ॥२८॥ न तृप्तिमधिगच्छामि ब्रूहि देव पुनर्गुणान् ॥

अर्थ- त्या कालीं पार्वती बोलली हे देवा या अविमुक्त महाक्षेत्रांत केवढें पुण्य व किती गुण आहेत यामुळें हें महत् आश्चर्य कारक काशी माहात्म्य- श्रवणा विषयीं माझी तृप्ति होत नाहीं; यास्तव या अविमुक्त क्षेत्राचे गुण पुनः मला सांगण्यास योग्य आहां.

ईश्वरउवाच ॥ महेश्वरि वरारोहे शृणु तांस्तु मम प्रिये ॥२९॥ अविमुक्ते गुणा ये तु तथान्यानपि तच्छृणु ॥

अर्थ- पश्चात् ईश्वर बोलतात हे सुंदरांगे महेश्वरि प्रिये अविमुक्त क्षेत्रांतील याहून जे इतर गुण आहेत ते सर्वही तूं मजपासून श्रवणकर.

शाकपर्णाशिनो दांताः संप्रक्षाल्या मरीचिपाः ॥३०॥ दंतोलूखलिनश्चान्ये अश्मकुट्टास्तथापरे ॥ मासि मासि कुशाग्रेण जलमास्वादयंति वै ॥३१॥ वृक्षमूलनिकेताश्च शिलाशय्यास्तथापरे ॥ आदित्यवपुषः सर्वे जितक्रोधा जितेंद्रियाः ॥३२॥ एवं बहुविधैर्धर्मैरन्यत्र चरितव्रताः ॥ त्रिकालमपि भुंजाना येविमुक्तनिवासिनः ॥३३॥ तपश्चरंति वान्यत्र कलां नार्हंति षोडशीं ॥

अर्थ- तें असें कीं, शाक (भाज्या) व पत्रें भक्षिणारे, इंद्रिय निग्रह करणारे, रोमरंध्र द्वारानें जलसेवन करणारे, सूर्य किरणांस प्राशन करणारे, दांतानें उखळ करून भक्षण करणारे, तसेच पाषाण भस्माचा आहार करणारे, प्रति मासीं एकवार दर्भाच्या अग्रानें जलाचा स्वाद घेणारे, वृक्षमूलावर राहणारे तसेच दुसरे शिळेवर शयन करणारे, देहानें सूर्यासमान तेजस्वी, क्रोध जिंकणारे जितेंद्रिय अशा बहुत प्रकारच्या धर्मानीं वर्तणारे

सून अन्यस्थलीं जे व्रतें व तप इत्यादिकांचें आचरण करणारे आहेत ते सर्वही त्रिकाल भोजन करून या अविमुक्तक्षेत्रांत वास करणारांची षोडशांशाही योग्यता पावत नाहींत.

येविमुक्तेवसंतीहस्वर्गेप्रतिवसंतिते ॥३४॥ मत्समः
पुरुषोनास्तित्वत्समानास्तियोषितां ॥

अर्थ- हे पार्वति जे कोणी या लोकीं अविमुक्त क्षेत्रीं वास करितात ते देहपातानंतर स्वर्गी राहतात; कारण पुरुषांत मजसारिखा व स्त्रियांत तुज सारिखी कोणी ही नसून आपलें सान्निध्य या क्षेत्रांत आहे.

अविमुक्तसमंक्षेत्रंनभूतंनभविष्यति ॥३५॥ अविमुक्तेपरोयोगोह्यविमुक्तेपरागतिः॥

अर्थ- तसेंच या अविमुक्त क्षेत्रा समान दुसरें स्थान पूर्वी नसून पुढेंही होणार नाहीं आणि या काशींत उत्तम योग व गति हीं प्राप्त होतात.

अविमुक्तेपरोमोक्षः क्षेत्रंनैवास्तितादृशं ॥३६॥परं
गुह्यंप्रवक्ष्यामि तत्वेन वर वर्णिनि ॥

अर्थ- हे उत्तम वर्ण संपन्न पार्वति या अविमुक्त क्षेत्रवासी लोकांस उत्कृष्ट मोक्ष प्राप्त होतो तस्मात् त्यासमान श्रेष्ठ दुसरें क्षेत्रच नाहीं; आणि आतां मी या क्षेत्राचें अतिगुह्य यथार्थ माहात्म्य तुला सांगतों.

अविमुक्तेमहाक्षेत्रे यदुक्तंहिमयापुरा ॥३७॥ जन्मां
तरशतैर्देवियोगोयंयदिलभ्यते ॥

अर्थ- तें असें कीं, हे देवि पूर्वी मी या अविमुक्तनामक महाक्षेत्रांतील सांगितलेल्या स्नान दाना दिकांचा हा योग मनुष्यास शतावधि जन्मानीं घडला तर घडतो.

मोक्षः शतसहस्रेणजन्मनालभ्यतेनवा ॥३८॥ अवि
मुक्तेनसंदेहोमद्भक्तः कृतनिश्चयः॥ एकेन जन्मनासोपि
योगंमोक्षंचविंदति ॥३९॥

अर्थ- आणि अन्यत्र लक्षावधि जन्मानीं ही मोक्षाविषयीं विचारच आहे परंतु माझा भक्त निश्चय युक्त बुद्धीनें या अविमुक्त क्षेत्रांत राहिला असतां त्यास मोक्षप्राप्त होण्या विषयीं संशयच नाहीं कारण एका जन्मानेंच अविमु-

त्त क्षेत्रवासी प्राणी योग व मोक्ष हीं फळें पावतात.

अविमुक्तेनरादेवियेव्रजंतिकृतनिश्चिताः॥तेविशंति-
परंस्थानंमोक्षंपरमदुर्लभं॥ ४०॥

अर्थ— हे देवि जे नर निश्चय युक्त मनानें अविमुक्त क्षेत्रीं गमन करितात ते अत्यंत दुर्लभ उत्तम मोक्ष स्थानांत प्रवेश करितात.

पृथिव्यामीदृशंक्षेत्रंनभूतंनभविष्यति॥चतुर्मूर्तिः
सदाधर्मोतस्मिन्सन्निहितःप्रिये॥ ४१॥चतुर्णामपिव
र्णानांगतिस्तुपरमास्मृता॥

अर्थ— हे प्रिये पृथ्वीवर काशी समान क्षेत्र पूर्वी नसून पुढें ही होणार नाहीं कारण त्या स्थानीं चार अंशानीं पूर्ण मूर्तिमान् धर्म निरंतर सन्निहित आहे त्या मुळें तेथें चारी वर्णांस उत्तम गति प्राप्त होते.

देव्युवाच॥श्रुताग़ुणास्ते क्षेत्रस्यइहचान्यत्रयेप्रभो॥
४२॥वदस्वक्रविविप्रेंद्राःकंवायज्ञैर्यजंतिते॥

अर्थ— नंतर पार्वती प्रश्न करिल्येकीं, हे प्रभो मी तुह्मा पासून या क्षेत्राचे- इहलोकीं व परलोकीं सुख कारक असे बहुत गुण ऐकले.आतां पृथ्वीवर ब्राह्मण श्रेष्ठ यज्ञानीं कोणाचें पूजन करितात तें मला सांगा.

ईश्वरउवाच॥इष्ट्यावैतुमंत्रेण मामेवहिजयंतिये॥
४३॥नतेषांभयमस्तीतिभवंरुद्रंयजंतियत्॥

अर्थ— ईश्वर सांगतात हे देवि जे ब्राह्मण मंत्र युक्त यज्ञानीं माझेंच यजन करतात त्यांस जगउत्पन्न करणाऱ्या रुद्राचें पूजन करण्याच्या प्रभावानें कोणाचें ही भय नाहीं.

अमंत्रोमंत्रकोदेवि द्विविधोविधिरुच्यते॥ ४४ ॥सां
ख्यंचैवाथयोगश्च द्विविधोयोगउच्यते॥

अर्थ— हे देवि शास्त्रांत समंत्रक व अमंत्रक असा दोन प्रकारचा विधि- असून सांख्य व योग असे दोन प्रकारचे योग सांगितले आहेत.

सर्वभूतस्थितंयोमांभजत्येकत्वमास्थितः॥४५॥स-
र्वथावर्तमानोपिसयोगीमयिवर्तते॥

अर्थ— जो योगी सर्व भूतांत माझी मुख्यतें स्थिति आहे असें सर्वका-

रु जाणून कोणत्याही प्रकारानें भजन करीत कोठेंही असला तरी तो योगी मा झ्या स्वरूपींच आहे असें समजावें.

आत्मौपम्येन सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ॥ ४६ ॥ तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥

अर्थ— जो आपणा सारखेंच सर्वांवर मन ठेवून ते सर्व माझे आधारानें आहेत असें जाणतो त्यास माझा व मला त्याचा किमपि वियोग नाहीं.

निर्गुणः सगुणो वापि योगश्च कथितो भुवि ॥ ४७ ॥ सगुणश्चैव विज्ञेयो निर्गुणो मनसः परः ॥ एतत्ते कथितं देवि यन्मां त्वं परिपृच्छसि ॥ ४८ ॥

अर्थ— हे देवि पृथ्वींतील लोकांस निर्गुण व सगुण असा दोन प्रकारचा योग सांगितला आहे त्यांत सगुण योग विशेषें करून जाणण्यास शक्य असून निर्गुण योग मनास दुर्बोध आहे असें हें तूं विचारलेलें सर्व मी तुला कथन केलें.

देव्युवाच ॥ या भक्तिस्त्रिविधा प्रोक्ता भक्तानां बहुधा त्वया ॥ तामहं श्रोतुमिच्छामि तत्त्वतः कथयस्व मे ॥ ४९

अर्थ— देवि बोलली हे देवा तुह्मीं बहु भक्तांस मागः जी तीन प्रकारची भक्ति सांगितली ती ऐकण्या विषयी मी इच्छितें तर आपण ती भक्ति यथार्थ रीतीनें मला सांगा.

ईश्वर उवाच ॥ शृणु पार्वति देवेशि भक्तानां भक्तिवत्सले ॥ प्राप्य सांख्यं च योगं च दुःखांतं च नियच्छति ॥ ५०

अर्थ— तेव्हां शंकर बोलतात हे पार्वति देवांची स्वामिनी असून भक्तां विषयीं त्यांच्या सेवेनुसार दया करणारी आहेस यास्तव तूं भक्तीचा प्रकार श्रवण कर; तो असा कीं; भगवद्भक्ति, सांख्य व योग यांचा अभ्यास घडवून जीवांस दुःखांतून मुक्त करिते.

सदा यः सेवते भिक्षां ततो भवति रंजितः ॥ रंजनात्तन्मयो भूत्वा लीयते स तु भक्तिमान् ॥ ५१ ॥

अर्थ— आणि जो भक्तिमान् सर्वदा भिक्षावृत्तीनें मनांत संतोष पावून त्या योगानें तन्मय चित्त होऊन तोच भगवत्स्वरूपीं लीन होतो.

शास्त्राणांतुवरारोहे बहुकारणदर्शिनः ॥ नमांपश्यंति तेदेवि ज्ञानवाक्यविवादिनः ॥ ५२ ॥

अर्थ- परंतु हे उत्तमांकेदेवि जे शास्त्रांतील बहुत मोक्ष कारणें जाणून-अनेक ज्ञान वाक्यां विषयीं वाद करतात त्यांस माझें दर्शन होत नाहीं.

परमार्थज्ञानतृप्तायुक्ताजानंतियोगिनः ॥ विद्ययाविदितात्मानोयोगस्यचद्विजातयः ॥ ५३ ॥

अर्थ- आणि जे योगाभ्यास करून परमार्थ ज्ञानांनें पूर्ण झाले ते उत्तम-योगी मला जाणतात आणि भक्ति योगानें प्राप्त झालेल्या विद्येनें आत्म स्वरूप जाणणारे जें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, तेहि मला जाणतात.

प्रत्याहारेणशुद्धात्मानान्यथाचिंतयेच्चनत् ॥ तुष्टिंच परमा प्राप्य योगं मोक्षंपरं तथा ॥ ५४ ॥

अर्थ- तसेंच विषयांवरून मागें फिरविलेल्या शुद्धांतःकरण युक्त भक्तानें भगवत्स्वरूपाचें विपरीत चिंतन न करितां यथास्थित चिंतन केलें असतां तो अत्यंत संतुष्ट होऊन उत्तम योग व मोक्ष हीं फलें पावतो.

त्रिभिर्गुणैः समायुक्तोज्ञानवान्पश्यतीहमां ॥ एतत्ते कथितंदेवि किमन्यच्छ्रोतुमर्हसि ॥ ५५ ॥

अर्थ- आणि हे देवि असा ज्ञानवान् सत्व,रज व तम यातीनं गुणानीं युक्त असला तरी तो याच लोकीं मला पाहातो हें मीं तुला सर्व कथन केलें; आतां दुसरें काय श्रवण करण्याची इच्छा आहे.

भूय एववरारोहेकथयिष्यामिसुव्रते ॥ गुह्यंपवित्रमथवायच्चापित्हृदिवर्तते ॥ ५६ ॥ तत्सर्वंकथयिष्यामिशृणुष्वेकमनाःप्रिये ॥

अर्थ- हे सुंदरांके प्रिये तूं उत्कृष्ट नियमानें वर्तणारी आहेस यास्तव गुह्य व पवित्र जें तुझ्या मनांत श्रवण कर्तव्य असेल तें सर्व मी सांगतों; तूं एकाग्र चित्तानें ऐक.

देव्युवाच ॥ त्वद्रूपंकीदृशंदेवयुक्ताःपश्यंतियोगिनः ॥ ५७ ॥ पश्यन्मेसंशयंब्रूहिनमस्तेसुरसत्तम ॥

अर्थ- असें शंकरांचें भाषण ऐकून देवी बोलली कीं हे देवाधिदेवा योगा

भ्यास करणारे योगी तुमचें कोणतें स्वरूप पहातात त्या स्वकीय रूपास अवलोकन करणारे तुह्मींच माझा संशय दूर होण्या साठीं मला सांगा; कारण मी तुह्मास नमस्कार करतें.

श्रीभगवानुवाच ॥ अमूर्तंचैवमूर्तंचज्योतीरूपंहित-त्स्मृतं। तस्योपलब्धिमन्विच्छन्यत्नःकार्योविजानता॥

अर्थ— नंतर भगवान् शिव बोलतात हे देवि अमूर्त आणि मूर्त असें-तें माझें स्वरूप ज्योतिरूप यानामानेंच प्रसिद्ध आहे यास्तव ज्ञात्यानें त्या रूपाचें ज्ञान होण्या विषयीं यत्न करावा.

गुणैर्वियुक्तोभूतात्माएवंवक्तुंनशक्यते॥५९॥शक्यतेयदिवक्तुंवैदिव्यैर्वर्षशतैर्नवा॥

अर्थ— हे पार्वति सर्व भूतांचा आत्मा निर्गुण रूपी भगवान् असाच आहे हें ही बोलावयास कोणी समर्थ नाहीं आणि जरी कोणी बोलण्या विषयीं प्रवृत्त झाला; तरी तो देवांच्या शंभर वर्षांनीं ही बोलण्यास समर्थ होणार नाहीं.

देव्युवाच॥ किंप्रमाणंतुतत्क्षेत्रंसमंतात्सर्वतोदिशं॥६०॥ यत्रनित्यंस्थितोदेवोमहादेवोगणैर्युतः॥

अर्थ— नंतर पार्वती भाषण करते कीं, हे महादेवा ज्या क्षेत्रांत आपण स्वतः सर्व गणां सहवर्तमान निरंतर वास करतां त्या क्षेत्रांतील आसमंता द्भागीं चहूं दिशेच्या लांबी, रुंदीचें प्रमाण किती आहे.

ईश्वरउवाच॥ द्वियोजनंतुतत्क्षेत्रंपूर्वपश्चिमतः-स्मृतं॥६१॥ अर्धयोजनविस्तीर्णंतत्क्षेत्रंदक्षिणोत्तरं॥

अर्थ— त्या कालीं ईश्वर सांगतात कीं, या क्षेत्राची लांबी पूर्व पश्चिम दोन योजनें असून रुंदी दक्षिणोत्तर अर्धयोजन आहे.

वाराणसीतदीयाचयावच्छुष्कनदीतुवै॥६२॥ भीष्मचंडिकमारभ्यपर्वतेश्वरमंतिके॥

अर्थ— आणि त्या क्षेत्रांत भीष्मचंडिकेश्वरा पासून पर्वतेश्वरा पर्यंत-

जो भागीरथीचे तीरीं प्रदेश आहे त्या भागास वाराणसी ह्मणतात.

गणायत्रावतिष्ठंति सन्नियुक्ता विनायकाः ॥ ६३ ॥ कूष्मांडराजः शंभोश्च जयंतश्च मदोत्कटाः ॥

अर्थ- तसेच त्या स्थानांत शंकरानीं विनायक, कूष्मांडराज, जयंत व मदोत्कट हे गण योजिले आहेत.

सिंहव्याघ्रमुखाः केचिद्विकटाः कुब्जवामनाः ॥ ६४ यत्र नंदी महाकालश्चंडघंटो महेश्वरः ॥ दंडचंडेश्वरश्चैव घंटाकर्णो महाबलः ॥ ६५ ॥ एते चान्ये च बहवो गणाश्चैव गणेश्वराः ॥ महोदरा महाकाया वज्रशक्तिधरास्तथा ॥ ६६ ॥ रक्षंति सततं देवि ह्यविमुक्तं तपोवनं ॥ द्वारे द्वारे च तिष्ठंति शूलमुद्गरपाणयः ॥ ६७

अर्थ- हे देवि कितीएक सिंहमुख, व्याघ्रमुख, कांहीं विकट (भयंकर स्वरूपी), कुब्ज (कुबडे) कितीएक ठेंगणे, नंदी, महाकाल, चंडघंट, महेश्वर, दंडी, चंडेश्वर, घंटाकर्ण, महाबल, आणि दुसरेही बहुत गण व त्यांचे नायक, महोदर, महाकाय, वज्र धारण करणारे, शक्तिनामक आयुध धारण करणारे हे सर्व गण हातांत शूल व मुद्गल हीं शस्त्रें घेऊन काशी क्षेत्राचे प्रतिद्वारांत उभे राहून तपश्चर्या योग्य वनानीं युक्त अशाया अविमुक्त नामक क्षेत्राचें संरक्षण करतात.

रुक्मवर्णशृंगीं रौप्यखुरां चैलाजिनपयस्विनीं ॥ वाराणस्यां तु यो दद्यात्त्रिवर्णां कंजलोचने ॥ ६८ ॥ गां दत्वा तु वरारोहे ब्राह्मणे वेदपारगे ॥ आसप्तमं कुलं तेन तारितं नात्र संशयः ॥ ६९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे कमल नयने पार्वति या वाराणसी क्षेत्रांत रुक्मवर्णाचीं शिंगें, रुप्याचे खुर, वस्त्रें व कृष्णाजिन यानीं युक्त असून बहुत उत्तम दुग्ध संपन्न अशी तीन वर्णाची गाय, जो मानव वेदपारंगत ब्राह्मणास देतो त्यानें सप्तपुरुषां पर्यंत आपलें कुल तारलेंच असें समजावें. यांत कांहीं एक संशय नाहीं.

यो दद्याद्ब्राह्मणे किंचित्तस्मिन्क्षेत्रे वरानने ॥ कनकं

जतंवस्त्रमन्नाद्यं बहुविस्तरं ॥ अक्षयंचाव्ययंचैवस्या
तांतस्यसुलोचने ॥

अर्थः- तसेंच हे उत्तम नयन युक्त मुख सुशोभित प्रिये जो मनुष्य या काशी क्षेत्रांत सुवर्ण, रुपें, वस्त्र व अन्नादिक पदार्थ यांतील कांहीं एक वस्तु बहुत किंवा किंचित् असें ब्राह्मणास देईल तर त्यानें तें नाशरहित अक्षय्य फल त्यास प्राप्त होतें.

शृणुतत्वेनतीर्थस्य विभूतिंसुप्रियेवच ॥ ७१ ॥ तत्र-
स्नात्वा महाभागे भवंतिनिरुजानराः ॥ दशानामश्वमेधा
नांफलं प्राप्नोतिमानवः ॥ ७२ ॥ तदवाप्नोतिधर्मात्मा
तत्रस्नात्वावरानने ॥

अर्थः- आतां तेथील तीर्थाचें माहात्म्य व फल श्रवण कर; तें असें कीं, हे महाभाग्यशालिनि जे मानव त्या क्षेत्रांतील तीर्थांत स्नान करतात; ते सर्व रोगांतून मुक्त होतात; आणि हे सुंदर मुखि तेथें स्नान करणाऱ्या धर्मनिष्ठ मनुष्यास दहा अश्वमेधांचें फल प्राप्त होतें.

बहुस्वल्पंच योदद्या ब्राह्मणे वेदपारगे ॥ ७३ ॥ शु-
भांगतिमवाप्नोति अग्निवच्चैवदीप्यते ॥

अर्थः- आणि त्या तीर्थीं जो नर स्वशक्त्यनुसार बहुत किंवा अल्प, वेदपारंगत ब्राह्मणास देतो तो अग्नी सारखा तेजस्वी होऊन परलोकीं उत्तम गतीस जातो.

वाराणसीजान्हवीभ्यां संगमेलोकविश्रुते ॥ ७४ ॥
दत्वान्नंच विधानेन नसभूयोभिजायते ॥ एतत्ते क-
थितंदेवितीर्थस्य फलमुत्तमं ॥ ७५ ॥

अर्थः- तसेंच काशी व भागीरथी यांच्या लोकप्रसिद्ध संगम प्रदेशीं विधीनें ब्राह्मणास अन्नदान केलें असतां तो प्राणी पुनः गर्भवासांत येत नाहीं. हे पार्वति असें हें या तीर्थाचें उत्कृष्ट माहात्म्य तुला सांगितलें.

उपवासंतु यः कृत्वा विप्रान्संतर्पयन्नरः ॥ सौत्रामणे
श्चयज्ञस्य फलंप्राप्नोतिमानवः ॥ ७६ ॥

अर्थः- आणि जो मनुष्य स्वतः उपवास करून त्या तीर्थीं अन्नदानादि

कानीं ब्राह्मणांस अत्यंत तृप्त करितो; तो मानव सौत्रामणि यज्ञाचें फल पावतो.

एकाहारस्तुयस्तिष्ठेन्मासंतत्र वरानने॥ यावज्जीव कृतं पापंसहसातस्यनश्यति॥७७॥

अर्थ:- त्याच प्रमाणें हे सुंदर मुखि जो मनुष्य एकभक्ताचे नियमानें त्या काशि क्षेत्रांतील तीर्थ तिरीं एक मास पर्यंत वास करील त्याचें त्या जन्मांत केलेलें सर्व पाप तत्काल अकस्मात नाश पावतें.

अग्निप्रवशंयेकुर्युरविमुक्ते विधानतः॥ प्रविशंति मुखंतेमेनिःसंदिग्धंवरानने॥७८॥

अर्थ:- भक्तांस वर देणांऱ्ये हे प्रिये या काशि क्षेत्रांत जे प्राणी विधीनें अग्नींत प्रवेश करतात; ते अंत कालीं निश्चयें करून माझ्या मुखांत प्रवेश करितात.

दशसौवर्णिकंपुष्पंयोविमुक्ते प्रयच्छति॥ अग्निहोत्र फलंधूपेगंधदानेतथाशृणु॥७९॥

अर्थ:- तशींच काशींत दहा सुवर्ण पुष्पें ब्राह्मणास जो देतो त्यास अग्निहोत्राचें फल प्राप्त होतें; तसेंच धूप व गंध हीं दानें केलीं असतां काय फल प्राप्त होतें तें सांगतों.

भूमिदानेनतत्तुल्यंगंधदानफलंस्मृतं॥ संमार्जने पंचशतं सहस्रमनुलेपने॥८०॥ मालयाशतसाहस्रंमनंतंगीतवाद्यतः॥

अर्थ:- गंध व धूपाचा सुगंध यांच्या दानानें भूमि दानासमान फल आहे; आणि देव मंदिरांत चंदनादिक सुगंधि पदार्थांचा सडा घातला असतां,- गंधदाना पेक्षां पांचशें पट फल असून देव ब्राह्मणांस उटी लाव ल्यानें त्याहून सहस्र गुणित अधिक फल आहे; तसेंच माला दानाचें फल लक्ष गुणित अधिक असून गायन व वाद्य यांचें या काशींत इतर क्षेत्रा पेक्षां अनंत फल प्राप्त होतें.

देव्युवाच॥ अत्यद्भुतमिदंदेव स्थानमेतत्प्रकीर्तितं॥८१॥ रहस्यंश्रोतुमिच्छामियदर्थंत्वंनमुंच-

सि ॥

अर्थ- नंतर पार्वती बोलली कीं, हे देवा, तुह्मीं या क्षेत्राचें हें अति अद्भुत स्थान माहात्म्य वर्णिलें; परंतु आपण या क्षेत्राचा त्याग करीत नाहीं; याचें गुह्य कारण काय तें आतां मी श्रवण करण्यास इच्छितें.

ईश्वरउवाच ॥ आसीत्पूर्वंवरारोहेब्रह्मणस्तुशिरोवरं ॥ ८२ ॥ पंचमंश्रृणुसुश्रोणिजातंकांचनसप्रभं ॥

अर्थ- तेव्हां ईश्वर बोलले हे सिंहकटि पार्वति तें गुप्त कारण ऐकतें असें कीं, पूर्वी ब्रह्मदेवास एक पांचवें उत्तम मस्तक उत्पन्न झालें; तें सुवर्णा साररव्या कांतीनें युक्त होतें.

ज्वलत्तत्पंचमंशीर्षंजातंतस्यमहात्मनः ॥ ८३ ॥ तदेवमब्रवीद्देविजन्मजानामितेह्यहं ॥

अर्थ- हे पार्वति असें तें त्या उदारबुद्धि ब्रह्मदेवास उत्पन्न झालेलें तेजःपुंज पांचवें शिर मला असें बोललें कीं, मी तुझा जन्म जाणत आहें.

ततः क्रोधपरीतेनसंरक्तनयनेनच ॥ ८४ ॥ वामांगुष्ठनरवाग्रेणछिन्नंतस्यशिरोमया ॥

अर्थ- या भाषणानें मी क्रोधाविष्ट झालों आणि नेत्र आरक्त करून मी आपल्या डाव्या अंगठ्याच्या नरवाचे अग्रानें तें ब्रह्मदेवांचें पांचवें मस्तक तोडलें.

ब्रह्मोवाच ॥ यदानिरपराधस्यशिरश्छिन्नंत्वयामम ॥ ८५ ॥ तस्माच्छापसमायुक्तः कपालीत्वंभविष्यसि ॥ ब्रह्महत्याकुलोभूत्वाचरतीर्थानिभूतले ॥ ८६ ॥

अर्थ- तेव्हां ब्रह्मदेव बोलले कीं, तूं अपराधावांचून माझा शिरच्छेद केलास तस्मात् माझ्या शापानें तूं या कपालानें युक्त होशील; आणि या ब्रह्महत्येनें व्याकुल होऊन पृथ्वीवर सर्वत्र तीर्थयात्रा करीत संचार कर.

ततोहंगतवान्देविहिमवंतंशिलोच्चयं ॥ तत्रनारायणः श्रीमान्मयाभिक्षांगयाचितः ॥ ८७ ॥

अर्थ- हे देवि नंतर मी हिमालय पर्वतावर गेलों; आणि तेथें मी ऐश्वर्य संपन्न नारायणास भिक्षे विषयीं याचना केली.

ततस्तेनस्वकंपार्श्वंनखाग्रेणविदारितं॥स्रवतोम-
हतीधारातस्यरक्तस्यनिःसृता॥८८॥

अर्थ- तेव्हां त्या नारायणानें आपल्या कुशीस नखाच्या अग्रानें छिद्र पाडलें; असतां त्यांतून मोठी रक्ताची धार निघाली.

प्रयातासातिविस्तीर्णायोजनार्धशतंतदा॥नसंपू
र्णंकपालंतुघोरमद्भुतदर्शनं॥८९॥ दिव्यंवर्षसह
स्रंतुसाचधाराप्रवाहिनी॥

अर्थ- ती अति विशाल धार पन्नास योजनें लांब गेली; ती देवांच्या शंभर वर्षे पर्यंत वाहात होती तरी त्याकाळीं तें अद्भुत उग्र ब्रह्म कपाल पूर्ण भरलें नाहीं.

प्रोवाचभगवान्विष्णुःकपालंकुतईदृशं॥९०॥आ
श्चर्यभूतंदेवेशसंशयोहृदिवर्तते॥कुतश्चसंभ
वोदेवसर्वंमेब्रूहिपृच्छतः॥९१॥

अर्थ- तें समयीं भगवान् विष्णु मला विचारूं लागले कीं, हे देवश्रेष्ठा हें कपाल कशानें असें आश्चर्यकारक असून कोठून उत्पन्न झालें; याविषयीं माझे मनांत संशय आला आहे, यास्तव पृच्छकास मला याचा सर्व सविस्तर वृत्तांत कथन करा.

देवदेवउवाच॥ श्रूयतामस्य हे देव कपालस्यतुसंभ
वः॥शतंवर्षसहस्राणांतपस्तप्त्वासुदारुणं॥९२
ब्रह्मासृजद्वपुर्दिव्यमद्भुतंलोमहर्षणं॥

अर्थ- तेव्हां देवाधिदेव शिव बोलले हे नारायणा या कपालाची उत्पत्ति श्रवण करा; ती अशी कीं, पूर्वी ब्रह्मदेवानीं लक्ष वर्षें अति दुर्धर तप करून सर्वांस दर्शन मात्रानें हर्षयुक्त रोमांच उत्पन्न करणारें असें अत्यंत अद्भुत दिव्य शरीर उत्पन्न केलें.

तपसश्चप्रभावेनदिव्यंकांचनसन्निभं॥९३॥ज्व
लत्तत्वैसंशीर्षंजाततस्यमहात्मनः॥निकृत्तं

मयादेवतदिदंपश्यदुर्जयं॥ ९४॥

अर्थ- तें उत्तम सुवर्णा सारिखें तपोबलानें देदीप्यमान असें ज्या महा तेजस्वी ब्रह्मदेवाचें पांचवें मस्तक उत्पन्न झालेलें म्या तोडलें तें हें हे देवा तुह्मीं पहा; यास दूर करण्याविषयीं मी समर्थ नाहीं.

यत्रयत्रचगच्छामिकपालंतत्रगच्छति॥एवमुक्तस्ततोदेवः प्रोवाचपुरुषोत्तमः॥ ९५

अर्थ- आणि मी जेथें जेथें जातों तेथें तथें हें कपाल मजबरोबर येतें;- असें माझें भाषण ऐकून ते पुरुषश्रेष्ठ भगवान् नारायण बोलले.

श्रीभगवानुवाच॥ गच्छगच्छ स्वकंस्थानंब्रह्मणस्त्वंप्रियंकुरु॥ तस्मिन्स्थास्यति भद्रंतेकपालंतस्यतेजसा॥ ९६॥

अर्थ- कीं, हे शंकरा तुह्मीं आपले स्थानास जाऊन ब्रह्मदेवाचें प्रिय करावें ह्मणजे त्याच्या तेजानें हें कपाल तेथें राहून तुमचें कल्याण होईल.

ततः सर्वाणि तीर्थानि पुण्यान्यायतनानिच॥ गतोस्मि पृथुलश्रोणिनक्कचित्प्रत्यतिष्ठत॥ ९७॥

अर्थ- नंतर मी सर्व तीर्थें व पुण्य क्षेत्रें या स्थानीं फिरलों; तथापि हे विशाल कटि पार्वति हें ब्रह्म कपाल कोठें ही राहिलें नाहीं.

ततोहंसमनुप्राप्तो ह्यविमुक्तेमहाशये॥ अवस्थितः स्वकेस्थानेशापश्चविगतोमम॥ ९८॥

अर्थ- पश्चात् मी या महा विस्तीर्ण अविमुक्त क्षेत्रांत येऊन आपले स्थानीं राहिलों असतां, तो ब्रह्मशाप दूर होऊन तें कपाल ही काशि क्षेत्रा बाहेर राहिलें.

विष्णुप्रसादात्सुश्रोणिकपालंतत्सहस्रधा॥ स्फुटितंबहुधाजातंस्वप्नलब्धंधनंयथा॥ ९९॥

अर्थ- आणि तें ब्रह्म कपाल फुटून त्याचे बहुत प्रकारानीं सहस्रावधि तुकडे झाले; यास दृष्टांत हे सिंहकटि स्वप्नांत मिळालेलें धन जसें नाहींसें होतें तसें.

ब्रह्महत्यापहंतीर्थंक्षेत्रमेतन्मयाकृतं॥ श्मशान

मेतद्रुद्रंमेदेवानांवरवर्णिनि ॥ १००

अर्थ- असें हें ब्रह्महत्या नाशक पवित्र क्षेत्र मी संपादन केलें; हे उत्तम वर्ण शोभित सुंदरि हें स्मशान देवांचें स्थान असून मला कल्याण कारक जाहलें.

कालोभूत्वाजगत्सर्वंसंहरामिसृजामिच ॥ देवेशि सर्व गुह्यानांस्थानंप्रियतरंमम ॥ १०१ ॥

अर्थ- आणि हे देवस्वामिनि मी कालरूपानें या काशींत राहून सर्व जग उत्पन्न करून त्याचा संहार ही करितों; यामुळें हें स्थान मला सर्व गुह्यांत अत्यंत प्रिय आहे.

मद्भक्तास्तत्रगच्छंतिविष्णुभक्तास्तथैवच ॥ येभक्ताभास्करेदेवि लोकनाथेदिवाकरे ॥ १०२ ॥ तत्रस्थोयस्त्यजेद्देहंमामेवप्रविशेत्तुसः ॥

अर्थ- हे देवि तसेच माझे भक्त, विष्णुभक्त, व जे दिवसकारक लोकनाथ सूर्याचे भक्त आहेत ते सर्वही त्या काशि क्षेत्रास जातात, आणि त्यांत तेथें वास करून जो देहत्याग करितो तो माझ्या स्वरूपीं प्रविष्ट होतो.

देव्युवाच ॥ अत्यद्भुतमिदंदेव यदुक्तंपद्मयोनिना ॥ १०३ ॥ त्रिपुरांतकरस्थानंगुह्यमेतन्महाद्युते ॥ सन्निधानात्तुतेसर्वेकलांनार्हंतिषोडशीं ॥ १०४ ॥

अर्थ- नंतर पार्वती बोलली हे महादेवा जें ब्रह्मदेवानीं स्थान सांगितलें, तें हें अति अद्भुत यथार्थ आहे; हे त्रिपुरासुर नाशका महा तेजस्विन् तुमच्या सान्निध्यामुळें या तुमच्या गुह्य क्षेत्राच्या षोडशांशाचे तुलने सही इतर स्थानें योग्य नाहींत.

यत्रतिष्ठतिदेवेशोयत्रतिष्ठतिशंकरः ॥ गंगातीर्थसहस्राणांतुल्याभवतिवानवा ॥ १०५ ॥

अर्थ- आणि ज्यास्थानीं देवश्रेष्ठ विष्णु व तुह्मी शंकर हे उभयतां वास करतां ती गंगा हजारों इतर तीर्थांशीं समान किंबहुना त्यापेक्षां अधीकही होईल.

त्वमेवभक्तिर्देवेश त्वमेवगतिरुत्तमा ॥ ब्रह्मादीनांतुते

देवगतिरुक्तासनातनी॥ आव्यनेयद्विजातीनांभक्ता नामनुकंपया ॥१०६॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे देवनायका आपणच सर्वांस भक्ति व उत्तम गति- आहां; आणि हे देवा तुमच्या भक्तांस ब्राह्मणानीं कृपाकरून जी तुमची- नाशरहित अक्षय्य गति सांगितली; तीच ब्रह्मादिकांस प्राप्त होते. इतिश्री मत्स्य पुराणे वाराणसी माहात्म्ये द्व्यशीत्युत्तर शततमोध्यायः॥१८२॥

अध्याय १८३ वा.

महेश्वरउवाच॥ सेवितंबहुभिःसिद्धैरपुनर्भवकांक्षि भिः॥ विदित्वातुपरंक्षेत्रमविमुक्तनिवासिनां॥१॥

अर्थ- नंतर शंकर बोलले हे पार्वति काशीवास करणारांचें हें उत्तम क्षेत्र जाणून मोक्षाची इच्छा करणारे बहुत सिद्ध अविमुक्त स्थानांत येऊन वा- स करितात.

तद्गुह्यंदेवदेवस्यतत्तीर्थंतत्तपोवनं॥ परंस्थानंतुते यांतिसंभवंतिनतेपुनः॥२॥

अर्थ- तें देवाधिदेव परमेश्वराचें अतिपवित्र तपोवनरूप अति गुह्य उत्तमस्थान आहे; अशा या क्षेत्रास जे येतात ते पुनः गर्भवास संबंधि दुःख भोगित नाहींत.

ज्ञानेविहितनिष्ठानांपरमानंदमिच्छतां॥ यागतिर्वि हितासद्भिःसाविमुक्तेमृतस्यतु॥३॥

अर्थ- आणि ज्ञाना विषयीं निष्ठा धारण करून मुक्तींतील परमानंदाची इच्छा करणाऱ्या लोकांस प्राप्त होणारी गति सज्जनानीं काशीवास करणा रांस प्राप्त होते असें मानलें आहे.

भवस्यप्रीतिरतुलात्वविमुक्तेत्वनुत्तमा॥ असंख्ये यंफलंतत्रत्वक्षयाच्चगतिर्भवेत्॥४॥

अर्थ- तशीच शिवाची प्रीति काशिक्षेत्रावर अति अद्भुत आहे; म्हणू न या स्थानीं स्नान दाना दिकांचें असंख्यात फल असून मोक्ष गति प्रा प्त होते.

परंगुह्यंसमाख्यातंश्मशानमितिसंज्ञितं॥ अविमु

त्यंनसेवंतेवंचितास्तेनराभुवि॥ ५॥

अर्थः- याच प्रमाणें हें अतिगुह्य स्थान असून यास महा स्मशान असें ह्मणतात; अशा या अविमुक्त नामक क्षेत्रांत जे येत नाहींत किंवा वास करीत नाहींत ते मानव या पृथ्वीवर जन्मास येऊन फसले असें समजावें.

अविमुक्ते स्थितैः पुण्यैः पांसुभिर्वायुनेरितैः॥ अपि
दुष्कृतकर्माणो यास्यंति परमांगतिं॥ ६॥

अर्थः- तसेंच वायूनें उडालेले काशी क्षेत्रांतील भूमीचे पुण्यकारक रजःकण अंगावर आले असतां त्यांचे योगानें दुष्ट कर्मे करणारे ही उत्तम मोक्ष गतीस जातात.

मेरुमंदरमात्रोपिराशिः पापस्य कर्मणः॥ अविमुक्तं
समासाद्य तत्सर्वंव्रजतिक्षयं॥ ७॥

अर्थः- तसाच मेरु किंवा मंदर या पर्वतांसमान जरी पाप कर्मांचा राशि असल्या तरीं तो काशींत येतांच सर्व नाश पावतात.

श्मशानमितिविख्यातमविमुक्तं शिवालयं॥ तद्गुह्यं
देव देवस्य तत्तीर्थंतत्तपोवनं॥ ८॥

अर्थः- हें काशिक्षेत्र शिवाचें वसति स्थान असून लोकांत महा स्मशान या नामानें प्रसिद्ध आहे; हेंच त्या देवाधिदेवाचें एकांत स्थान, तीर्थ व तपोवन ही आहे.

तत्रब्रह्मादयोदेवा नारायणपुरोगमाः॥ योगिनश्च
तथासाध्या भगवंतंसनातनं॥ ९॥ उपासंते शिवंमु
क्तामद्भक्तामत्परायणाः॥

अर्थः- तसेंच ब्रह्मादिक देव, नरनारायण प्रभृति योगी साध्यगण मुक्त व माझे अनन्य भक्त हे सर्वही काशिक्षेत्रांत पूर्ण ऐश्वर्य संपन्न अनादि शिवाची उपासना करतात.

यागतिर्ज्ञानतपसां यागतिर्यज्ञयाजिनां॥ १०॥ अवि
मुक्ते मृतानांतु सागतिर्विहिता शुभा॥ संहर्तारश्च
कर्त्तारस्तस्मिन् ब्रह्मादयः सुराः॥ ११॥

अर्थ- तशीच जी गति ज्ञानी, तपस्वी व यज्ञ करणारे यांस प्राप्त होत्ये, तीच कल्याण कारक गति काशिक्षेत्रांत मरण पावणारांस प्राप्त होत्ये; कारण सर्व लोकांचा संहार व उत्पत्ति हीं कार्यें करणारे ब्रह्मादिक समग्र देव त्या काशींत निरंतर वास करीत आहेत.

सम्प्राड्ङ्गिरापमयालोकाजायंतेत्यपुनर्भवाः॥ महर्ज नंस्तपश्चैवसत्यलोकस्तथैवच ॥ १२॥

अर्थ- ती अशी कीं, ब्रह्मदेव व शंकर हे जेथें प्रमुख आहेत असे जे महर, जन, तप व सत्य हे लोक काशींत मृत्यु पावणारांस प्राप्त होऊन ते प्राणी पुनः जन्म मरण प्रवाहांत येत नाहींत.

मनसः परमोयोगोभूतभव्य भवस्यच ॥ ब्रह्मादिस्था वरांतस्ययोनौसांख्यादि मोक्षयोः ॥ १३ ॥ येविमुक्तंन मुचंतिनरास्तेनेव चिंतिताः ॥

अर्थ- तसेंच भूत, भविष्य व वर्तमान असें जें ब्रह्मादि स्थावरांत चराचर जग, सांख्य (ज्ञान) योग व मोक्ष या सर्वांस कारण जो परमेश्वर त्या विषयीं मनाचा एकाग्रता योग काशी वास करणारांस प्राप्त होतो, कारण जे मानव काशी वास सोडीत नाहींत त्यांची चिंता ईश्वरच करीत आहे.

उत्तमंसर्वतीर्थानां स्थानानामुत्तमंचयत् ॥ १४॥ क्षेत्राणामुत्तमंचैवश्मशानानांतथैवच ॥ तटाकानांचसर्वेषांकूपानांस्त्रोतसांतथा ॥ १५॥ शैलानामुत्तमं चैतत्तडागानां तथोत्तमं ॥ पुण्यकृद्भवभक्तैश्चत्यविमुक्तं तुसेव्यते ॥ १६॥

अर्थ- आणि सर्व तीर्थें, स्थानें, क्षेत्रें, स्मशानें, पुण्य तीर्थांचीं तीरें, कूप, प्रवाह मात्र, पुण्य कारक पर्वत, सरोवरें, या सर्वां पेक्षां हें काशिक्षेत्र श्रेष्ठ असून तें पुण्य कर्माचरण करणाऱ्या शिव भक्तांस प्राप्त होतें.

ब्रह्मणः परमं स्थानंब्रह्मणाध्यासितंचयत् ॥ ब्रह्मणासेवितंनित्यंब्रह्मणाचैवरक्षितं ॥ १७॥

अर्थ- हें काशिक्षेत्र ब्रह्मदेवाचें उत्तम स्थान असल्या मुळें ते या स्थानीं वास करीत असून या क्षेत्राचें सेवन व संरक्षण ही करितात.

अत्रैवसप्तफणवनंकांचनोमेरुपर्वतः॥मनसः परमो-
योगः प्रीत्यर्थंब्रह्मणः सतु॥१८॥

अर्थ— त्याच प्रमाणें सप्त फणवनें, सुवर्णाचा मेरु पर्वत यांचें काशींत सान्निध्य आहे ह्मणून या अविमुक्त क्षेत्रांत ब्रह्मदेवही परमेश्वर प्रीत्यर्थ आपले मनानें उत्तम एकाग्रता युक्त योगाभ्यास करितात.

ब्रह्मातुतत्रभगवांस्त्रिसंध्यंचेश्वरेस्थितः॥पुण्या-
त्पुण्यतमंक्षेत्रंपुण्यकृद्भिर्निषेवितं॥१९॥

अर्थ— ते ऐश्वर्य संपन्न ब्रह्मदेव या ईश्वराच्या क्षेत्रांत त्रिकाल वास करितात. कारण सर्वपुण्य क्षेत्रा पेक्षां हें काशिक्षेत्र अतिपुण्य कारक आहे; म्हणूनच संपूर्ण पुण्यात्मे लोकांची येथें स्थिति आहे.

आदित्योपासनंकृत्वाविप्राश्चामरतांगताः॥अन्ये-
पियेत्रयोवर्णाभवभक्त्यासमाहिताः॥२०॥अविमु
क्तेतनुंत्यक्त्वागच्छंतिपरमांगतिं॥

अर्थ— तसेंच ब्राह्मण या अविमुक्त क्षेत्रांत सूर्याची उपासना करून अमर झाले; व क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे इतर तीन वर्ण ही एकाग्र चित्तानें शिवभक्ति युक्त होऊन या क्षेत्रांत देहत्याग केल्यानें मोक्षास जातात.

अष्टौमासान्विहारस्स्याद्यतीनांसंयतात्मनां॥२१॥ए-
कत्रचतुरोमासान्मासौवानिवसेत्पुनः॥अविमुक्तेप्र
विष्टानांविहारस्तुनविद्यते॥२२॥

अर्थ— आणि जितेंद्रिय संन्यासी लोकांस आठ महिने संचारास उक्त असून त्यानीं पर्जन्य कालीं चातुर्मास्य किंवा दोन महिने एकत्रच वास करावा; असा नियम शास्त्रांत सत्य आहे परंतु तो आठ महिने संचार करण्याचा नियम काशींत आलेल्या संन्यासी लोकांस अवश्यक नाहीं तर त्यानीं तेथें एकत्र बारामहिने राहिलें तरीं चिंता नाहीं.

नदेहोभवितातत्रदृष्टंशास्त्रेपुरातने॥मोक्षोह्यसंश
यस्तत्रपंचत्वंतुगतस्यवै॥२३॥

अर्थ— तसाच हा प्राणी काशींत मरण पावला असतां तो पुनः जन्मास न येतां निःसंशय मुक्त होतो, असें वेदादिक पुरातन शास्त्रांत पाहि-

लें आहे.

स्त्रियः पतिव्रतायाश्च भवभक्ताः समाहिताः ॥ अवि
मुक्ते विमुक्तास्तायास्यंतिपरमांगतिं ॥ २४ ॥

अर्थ:- तशाच ज्या एकाग्र अंतःकरणानें शिवभक्ति करणाऱ्या पतिव्रता स्त्रिया काशीवास करतात त्या संसारांतून (जन्ममरणांतून) मुक्त होऊन मोक्षगतीस जातात.

अन्यायाः कामचारिण्यः स्त्रियोभोगपरायणाः ॥
कालेननिधनंप्राप्ता गच्छंतिपरमांगतिं ॥ २५ ॥

अर्थ:- व ज्या यथेच्छाचरण करणाऱ्या विषयासक्त स्त्रिया काशीवास करतात, त्याही कालानें तेथें मरण पावल्या असतां, उत्तम गतीस जातात.

यत्रयोगश्च मोक्षश्च प्राप्यते दुर्लभोनरैः ॥ अविमुक्तं
समासाद्य नान्यद्गच्छेत्तपोवनं ॥ २६ ॥

अर्थ:- आणि योग व मोक्ष हे दुर्लभ असून ते या काशिक्षेत्रास आलेल्या मानवांस सुलभ रीतीनें प्राप्त होतात; तेव्हां मनुष्यांस काशीक्षेत्रावांचून इतर तपोवनांत जाणें नको.

सर्वात्मनातपः सेव्यं ब्राह्मणैर्नात्रसंशयः ॥ अविमु
क्तेवसेद्यस्तु ममतुल्योभवेन्नरः ॥ २७ ॥

अर्थ:- तसेंच इतर स्थळीं रहाणाऱ्या ब्राह्मणांस स्वहितार्थ सर्वभावें तप केलेंच पाहिजे यांत संदेह नाहीं; आणि या अविमुक्त क्षेत्रांत जो वास करील, तो तावन्मात्रानेंच माझ्या सारखा होतो.

यतोमयानमुक्तंहि ह्यविमुक्तंततः स्मृतं ॥ अविमुक्तं
नसेवंते मूढायेतमसावृताः ॥ २८ ॥ विण्मूत्ररेतसांम
ध्येतेवसंतिपुनः पुनः ॥

अर्थ:- त्याच प्रमाणें मी या काशि क्षेत्राचा त्याग करीत नाहीं; ह्मणून या स्थानास अविमुक्त क्षेत्र ह्मणतात. अशाच्या स्थळाचें सेवन जे अज्ञानानें व्याप्त झालेले लोक करीत नाहींत ते मूर्ख, विष्ठा, मूत्र, व रेत (धातु) यांत वारंवार पडतात.

कामः क्रोधश्च लोभश्च दंभस्तंभोतिमत्सरः ॥ २९ ॥

निद्रानंद्रातथालस्यंपैशून्य मितितेदश॥ अविमुक्ते स्थिताविघ्नाः शक्रेणविहितास्वयं॥३०॥ विनायको पसर्गाश्चसततंमूर्ध्नितिष्ठति॥ पुण्यमेतद्भवेत्सर्वंभ क्तानामनुकंपया॥३१॥

अर्थ:- तसेच काम १, क्रोध २, लोभ ३, दंभ ४, स्तंभ ५, अतिमत्सर ६, निद्रा ७, तंद्रा ८, आलस्य, ९ दुर्जनत्व १०, हे दहा दोष इतर विघ्नें व अनेक उपद्रव, यांस इंद्रानें स्वतः उत्पन्न केलें असून ते काशींत आहेत तरीं-तेथें शिव भक्तांवर कृपा करण्या साठीं निरंतर त्या विघ्नादिकांच्या मस्तकांवर पाय देऊन राहिले आहेत; या मुळें तेथील भक्तांचें सर्व कर्म निर्विघ्न-स्थितीनें पुण्य कारक होतें.

परंगुह्यमितिज्ञात्वाततःशास्त्रानुदर्शनात्॥ व्याप्त तंदेवदेवैस्तुमुनिभिस्तत्वदर्शिभिः॥३२॥

अर्थ:- हें काशिक्षेत्र अतिगुह्य माहात्म्यानें युक्त आहे असें शास्त्र प्रमाणा वरून जाणून यथार्थ ज्ञाते ब्रह्मादिक देव व सर्व ऋषि यानीं काशि क्षेत्राचें असें वर्णन केलें आहे.

मेदसाविप्लुताभूमिरविमुक्तेतुवर्जिता॥ पूतासम-मवत्सर्वामहादेवेनरक्षिता॥३३॥ संस्कारस्तेनक्रियते भूमेरन्यत्रसूरिभिः॥

अर्थ:- कीं, ही संपूर्ण पृथ्वी मधु व कैटभ या दैत्यांच्या ज्या मेदानें निर्माण केली आहे परंतु त्या मेदाचा संबंध काशी क्षेत्रास नसल्या मुळें हें-स्थान पवित्र असून याचें संरक्षण महादेव करितात. ह्मणून ज्ञाते लोक त्या काशी क्षेत्रा वांचून इतर भूमीस मात्र संस्कार करतात.

येभक्तावरदंदेवमक्षरंपरमंपदं॥३४॥ देवदानवगंधर्वयक्षरक्षोमहोरगाः॥ अविमुक्तउपासंतेतन्निष्ठास्त त्परायणाः॥३५॥

अर्थ:- आणि जे शिवभक्ति करणारे देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस, व वासुकि प्रभृति महानाग हे सर्वही काशी वास करून एक निष्ठेनें या नाश रहित उत्तम आश्रय रूप वरदायक शंकरांची उपासना करतात.

तेविशंतिमहादेवमाज्याहुतिरिवानलं ॥ तंवैप्राप्य
महादेवमीश्वराध्युषितंशुभं ॥ ३६ ॥ अविमुक्तंकृता
र्थोस्मीत्यात्मानमुपलभ्यते ॥

अर्थ- ते देवादिक अंतीं अग्नींत अर्पण केलेल्या घृताहुति प्रमाणें शिवाचे स्वरूपांत प्रवेश करितात; आणि ते सर्वही ईश्वर सान्निध्य युक्त कल्याण कारक काशि क्षेत्रांत येऊन महादेवांचे अग्रभागीं प्राप्त होऊन आपणांस कृतार्थ असें मानितात.

ऋषिदेवासुरगणैर्जपहोमपरायणैः ॥ ३७ ॥ यति-
भिर्मोक्षकामैश्चत्वविमुक्तं निषेव्यते ॥

अर्थ- ऋषि, देव, व असुर यांचे समुदाय, मुमुक्षु, संन्यासी हे सर्वही आपापल्या अधिकारानुसार जप व होम करीत या अविमुक्त क्षेत्रांत वास करितात.

नाविमुक्ते मृतः कश्चिन्नरकं याति किल्बिषी ॥ ३८
॥ ईश्वरानुगृहीताहिसर्वेयांतिपरांगतिं ॥

अर्थ- आणि कोणताही पातकी या अविमुक्त क्षेत्रांत मृत झाला असतां तो नरकास न जातां ईश्वराच्या अनुग्रहानें तेथील सर्व लोक उत्तम गतीस जातात.

द्वियोजनमथार्धंचतत्क्षेत्रंपूर्वपश्चिमं ॥ ३९ ॥ अर्ध
योजनविस्तीर्णंदक्षिणोत्तरतः स्मृतं ॥

अर्थ- असें हें काशिक्षेत्र पूर्व पश्चिम अडीच योजनें लांब असून दक्षिणोत्तर अर्ध योजन रुंद आहे.

वाराणसीतदीयाचयावच्छुक्लनदीतुवै ॥ ४० ॥ ए
तत्क्षेत्रस्यविस्तारः प्रोक्तोदेवेनधीमता ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ज्या प्रदेशा पर्यंत भागीरथी आहे, त्या स्थाना पर्यंत या शंकराच्या वाराणसी क्षेत्राची मर्यादा आहे असा महाबुद्धिमंत शंकरानीं या क्षेत्राचा विस्तार वर्णिला आहे.

लब्ध्वायोगंचमोक्षंचकांक्षंतोज्ञानमुत्तमं ॥ ४१ ॥
अविमुक्तंनमुंचंतितन्निष्ठास्तत्परायणाः ॥

अर्थ- तसेच एकनिष्ठेनें काशीवास करणारे लोक योग प्राप्त झाला तरीं उत्तम ज्ञान साध्यमोक्ष प्राप्त होण्याच्या इच्छे मुळें या अविमुक्त क्षेत्राचा त्याग करीत नाहींत.

तस्मिन् वसंति येमर्त्या नतेशोच्याः कदाचन॥४२
योगक्षेत्रंतपः क्षेत्रंसिद्धगंधर्वसेवितं॥

अर्थ- आणि योगाभ्यास व तप करण्यास योग्य असून सिद्ध, गंधर्वांनीं सेवित अशा या अविमुक्त क्षेत्रांत जे मानव राहातात ते कधींही शोक करण्यास योग्य होत नाहींत.

सरितः सागराः शैलानाविमुक्तसमाः क्वचि॥४३
भूर्लोकेचांतरिक्षेच दिवितीर्थानियानिच॥

अर्थ- तसेच भूमी वरील नद्या, समुद्र व पर्वत हे कोणी ही योग्यतेनें या अविमुक्त क्षेत्रा समान नसून भूलोक, अंतरिक्ष लोक, व स्वर्ग यांत जीं तीर्थें आहेत तीं सर्वही या काशीच्या साम्यतेस समर्थ नाहींत.

अतीत्यवर्ततेचान्यदविमुक्तंप्रभावतः॥४४॥येतु
ध्यानंसमासाद्यमुक्तात्मानः समाहिताः॥

अर्थ- तसेंच हें अविमुक्तक्षेत्र आपल्या माहात्म्यानें इतर क्षेत्रां पेक्षां अधिक आहे यामुळें जे या अविमुक्त क्षेत्रांत एकाग्र चित्तानें ईश्वराचें ध्यान करतात ते मुक्त होतात.

सन्नियम्येंद्रियग्रामंजपंतिशतरुद्रियं॥४५॥अवि
मुक्तेस्थितानित्यंकृतार्थास्तेद्विजातयः॥

अर्थ- आणिजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे या अविमुक्त क्षेत्रांत राहून इंद्रिय समुदायाचा निग्रह करून शत रुद्रिय नामक सूक्ताचा जप करतात ते कृतार्थ होतात.

भवभक्तिंसमासाद्यरमंतेतुकृतनिश्चिताः॥४६॥सं
हृत्यशक्तितः कामान्विषयेभ्यो बहिस्थिताः॥

अर्थ- तसेच जे मानव आपल्या मनाच्या इच्छा विषयां पासून यथाशक्ति निवृत्त करून अंतर्निष्ठेनें भक्ति करीत या अविमुक्त क्षेत्रांत रमतात ते उत्कृष्ट ज्ञानी होतात.

शक्तितः सर्वतोमुक्ताः शक्तितस्तपसि स्थिताः॥ ४७
करणानीह चात्मानमपुनर्भव भाविताः॥ तं वै प्रा-
प्य महात्मानमीश्वरं निर्भया स्थिताः॥ ४८॥ न ते-
षां पुनरावृत्तिः कल्पकोटिशतैरपि॥

अर्थ:- तसेंच जे यथाशक्ति सर्व संगपरित्याग करून आपलीं इंद्रियें व अंतःकरण यांचा निग्रह करून मोक्षार्थ निष्काम भावनेनें यथाशक्ति तप करीत या अविमुक्त क्षेत्रांत त्या महात्म्या शंकरा समीप निर्भय मनानें राहतात ते शतकोटि कल्पानींही पुनः गर्भवासास येत नाहींत.

अविमुक्ते तु गृह्यं तं नेभवेन विभ्रमास्वयं॥ ४९॥ उत्पा
दितं महाक्षेत्रं सिध्यंते यत्र मानवाः॥

अर्थ:- आणि शंकरानीं तें महाक्षेत्र उत्पन्न केलें आहे ह्मणून या अविमुक्त क्षेत्रांत प्रभु शंकर तेथें सर्वांचा स्वीकार करतात या मुळें तेथील मानव सिद्धि पावतात.

उद्देशमात्रं कथिता अविमुक्तगुणास्तथा॥ ५०॥ समु
द्रस्येव रत्नानामविमुक्तस्य विस्तरं॥

अर्थ:- तसेंच हे अविमुक्त क्षेत्राचे गुण उदाहरण परत्वें सांगितले; कारण समुद्रांत जशीं रत्नें असतात तसा त्या अविमुक्त क्षेत्राच्या गुणांचा अपार विस्तार आहे.

मोहनं तद भक्तानां भक्तानां भक्तिवर्धनं॥ ५१॥ मूढा
स्ते तु न पश्यंति श्मशानमिति मोहिताः॥

अर्थ:- परंतु हें अविमुक्त क्षेत्र अभक्तांस मोह उत्पन्न करणारें असून भक्तांची भक्ति वाढविणारें आहे आणि मूढ लोक तर काशिक्षेत्राच्या गुणांकडे लक्ष्य न देतां मोहित होत्साते त्यास स्मशान ह्मणतात.

हन्यमानोपियो विद्वान्वसेद्विघ्नशतैरपि॥ ५२॥
सयाति परमं स्थानं यत्र गत्वा न शोचति॥ जन्ममृत्यु
जरामुक्तः परंयाति शिवालयं॥ ५३॥

अर्थ:- आणि जो मानव विद्वान् शेकडों विघ्नानीं व्याप्त झाला असून ही अविमुक्त क्षेत्रांतच वास करितो त्यास सर्व शोकरहित उत्कृष्ट स्थान मा

म होतें आणि तो जन्म, मृत्यु व जरा यांपासून मुक्त होऊन उत्तम कैलास स्थानास जातो.

अपुनर्मरणानांहि सागतिर्मोक्षकांक्षिणां॥ यांप्रा प्यकृतकृत्यः स्यादितिमन्येतपंडितः॥५४॥

अर्थ- आणि ब्रह्मनिष्ठ जी गति प्राप्त झाली असतां आपणास कृतकृत्यत्व मानतो; ती पुनर्मरण रहित मुमुक्षु जनांची मोक्ष गति काशी वास करणारांस सहज प्राप्त होत्ये.

नदानैर्नतपोभिर्वानयज्ञैर्नापिविद्यया॥ प्राप्यतेग तिरिष्टाया ह्यविमुक्तेतुलभ्यते॥ ५५

अर्थ- त्याच प्रमाणें दान, तप, यज्ञ व विद्या या साधनानीं जी इष्ट गति अन्यत्र प्राप्त होत नाहीं ती गति या अविमुक्त क्षेत्रांत अनायासानें मिळते.

नानावर्णा विवर्णाश्च चंडालाये जुगुप्सिताः॥ कि ल्बिषैः पूर्णदेहाश्च प्रकृष्टैः पातकैस्तथा॥५६॥ भे षजंपरमंतेषामविमुक्तं विदुर्बुधाः॥

अर्थ- आणि नाना प्रकारचे ब्राह्मणादिक वर्ण, नीच वर्ण, चांडाल, त सेच इतर जाति हीन सामान्य पातकें व महा पातकें यानीं जे नख शि खांत व्याप्त झाले आहेत त्या सर्वांस हें अविमुक्त क्षेत्र महत् औषध- आहे असें ज्ञाते ह्मणतात.

जात्यंतर सहस्रेषु ह्यविमुक्ते म्रियेतयः॥ ५७॥ भ- क्तोविश्वेश्वरे देवनसभूयो भिजायते॥

अर्थ- तसाच सहस्रावधि जातींतील जो कोणी या अविमुक्त क्षेत्रांत मरण पावतो तो प्राणी काशी विश्वेश्वर देवाचा भक्त होऊन पुनः जन्मास येत नाहीं.

यत्रचेष्टं हुतंदत्तंतपस्तप्तंकृतंचयत्॥ ५८॥ सर्वम क्षयमेतस्मिन्नविमुक्तेनसंशयः॥

अर्थ- तसेंच यज्ञ, होम, दानें तप व इतर सत्कर्म हीं काशिक्षेत्रां- त केलीं असतां त्या सर्वांचें अक्षय्य फल प्राप्त होतें या विषयीं संशय

नाहीं.

कालेनोपरतायांतिभवेसायुज्यमक्षयं॥ ५९॥ कृत्वा
पापसहस्त्राणि पश्चात्संतापमेत्यवै॥

अर्थ- तसेच जे पूर्वी सहस्त्रावधि पापें केल्यावर कालें करून पश्चात्तापा नें या अविमुक्त क्षेत्रांत उपरति पावतात ते शंकराचे स्वरूपीं अक्षय्य सायुज्यास जातात.

योविमुक्तेवियुज्येतसयातिपरमांगतिं॥ ६०॥ उत्त
रंदक्षिणंचापिअयनंनविकल्पयेत्॥

अर्थ- आणि जो मानव अविमुक्त क्षेत्रांत मरण पावतो तो उत्तम गती स च जातो कारण तेथें उत्तरायण किंवा दक्षिणायन हा कांहीं एक विचार प्रतिबंधक नाहीं.

सर्वस्तेषांशुभः कालोह्यविमुक्तेम्रियंतिये॥ ६१॥
नतत्रकालोमीमांस्योशुभोवायदिवाशुभः॥

अर्थ- कारण त्या अविमुक्त क्षेत्रांत जे मृत्यु पावतात; त्यांस सर्व काल- शुभ कारकच आहे; तस्मात् तेथें शुभाशुभ काला विषयीं विचारच कर्तव्य नाहीं.

तस्यदेवस्यमाहात्म्यस्थानमद्भुतकर्मणः॥ ६२॥ स
र्वेषामेवनाथस्यसर्वेषांविभुनास्वयं॥

अर्थ- कारण सर्वांचे नाथ असून अद्भुत कर्मशाली अशा महादेवांच्या माहात्म्याचें केवल स्थानच असें हें काशी क्षेत्र सर्वेश्वर शंकरानीं स्वतः निर्माण केलें आहे.

श्रुत्वेदंऋषयः सर्वेस्कंदेनकथितंपुरा॥ अविमुक्ता
श्रमंपुण्यंभावयेत्करणैः शुभैः॥

अर्थ- ऋषीहो असें पूर्वी स्कंदानें पुण्य कारक काशी क्षेत्र माहात्म्य कथन केलें हें तुह्मीं सर्वांनीं श्रवण करून आपले शुभकारक चित्तादिक इंद्रिय साधनानीं क्षेत्र माहात्म्य चिंतन करावें. इतिश्री मत्स्य पुराणे अविमुक्तो पाख्याने त्र्यशीत्युत्तर शततमो ध्याय: १८३.

अध्याय १८४वा.

मत्स्यपुराण.

भाग २रा.

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
२	१५	न्से.	न्सें
२	१८	वों.	वो
२	२३	षां.	षा
५	१७	ब.	व
६	२५	र्‍	शी
७	१२	ल्ह.	र्ह्व
७	१६	दा	दां
८	१०	वं.	कं
९	१९	के.	कः
९	२३	य्य	ज्या
१०	८	र्णा	र्णाः
११	२७	ष	व
१३	८	ल्का	क्ता
१४	५	र	रु
१५	२५	र	रं
१५	२७	व	वा
१७	१८	य्र	प
१९	१	बोलतो	करतो
२०	१९	हे	है
२२	२२	शु	शु

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
२४	२१	ला	लो
२४	२४	टे	टें
२६	२१	सो	को
२६	२६	मा	चा
२७	१०	क्रो	क्री
२७	२३	घ्र	घ्न
३०	१३	ह	हृ
३१	२२	रां	रा
३२	१	रं	र
३२	२८	दु	दुः
३३	४	वा	वां
३३	२८	ज	जा
३६	६	क्यां	कां
४१	४	ने	नें
४२	९	विहीर	हीविहीर
४२	१४	आज	आज आपण
४३	२०	दै	दे
४५	१३	असतां	असतांने
४६	१०	वांचवीत	जिवंत करीन
४९	५	ची	चीं
४९	१४	जा	ज्ञा
५०	३	श्रे	श्रे
५२	५	नी	नीं
५२	२०	वे	व
५३	३	ली	लें
५३	४	.. ..	असें नाहीं.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
५३	२२	गें	बे
५५	२६	व	ब
५७	१५	न्य	न्य
५९	५	बी	पी
६०	६	ने	नें
६०	१९	ज	जे
६२	७	ती	ति
६३	९	ग	गं
६४	११	नजातांना अनासानें	नजातां अनायासानें
६४	१८	ले	ने
६४।६५	१८।१	वरवर	वर
६५	२१	व्य	ध्य
६६	३	स्थः	स्थं
६७	१९	धि	घि
७०	४	रा	रां
७१	८	ष्णू	ष्णू
७२	३	वो	वे
७३	३	. .. .	न
७३	४	बू	बू
७३	११	बं	लं
७३	१४	र्के	के
७४	५	गें	ये
७४	२४	ब	बा
७५	२५	व	ब
७६	२२	यु	प
७७	१९	षाणां	षांहि

पृष्ठ	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
७८	३	ती	ति
७८	२८	व	ब
७९	२२	त्या	त्यां
७९	२७	झालेल्या	झालेल्या स्त्रियांच्या
८८	२६	ष्ठ	ष्ट
९२	२२	ड्	ड्ं
९६	२४	ष्ठ	ष्ट
९७	२०	र्त	र्ते
९७	२६	र्ते	र्ते
९९	६	एकके	एकेक
९९	२०	सत्येरा	पंधरा
१००	९	दि	नी
१००	११	जसे वेळू सर्वदिशांत सभोंवतीं व्याप्त आहेत..	जशा वेळू किंवा उंस यांस मुळापासून अग्रापर्यंत ओळीनें एका पुढें एक पेऱ्यांच्या संधि व्याप्त आहेत.
१००	२१	ह्निं	ष्णिह्
१००	२७	न्हां	ण्हां
१०१	१८	न	नें ..
१०३	२	व	न
१०५	४	त्यो	ह्यो
१०६	१५	धेर्म	धर्मे
१११	८	वें	चे
११३	२१	ने	नें
११६	२८	षे	वे
१२०	२१	र्थे	र्धे

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
१२३	१३	हो	हा
१२३	२५	शीं	शी
१२४	२१	द्दी	द्दि
१२४	२४	बी	बीं
१२५	४	स	ज
१२८	१५	बी	बीं
१२९	१३	वे	वें
१२९	१८	वा	बा
१३०	१९	म्ये	म्बे
१३०	२६	ॐ	ऊ
१३१	६	ने	नें
१३१	२१	र्नि	र्निं
१३१	२६	र्नि	र्निं
१३३	१२	चो	चे
१३६	११	जा	जां
१३७	१०	ला	लां
१३९	६	के	मे
१३९	८	से	सो
१३९	१२	च्छा	च्छां
१४०	२३	लि	लीं
१४१	९	स	सं
१४१	११	ना:	ना
१४१	२५	वि	विं
१४१	२६	र्ती	र्तीं
१४५	२१	र्णा	र्णां
१५६	१०।११	मनतर	मन्वंतर

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
१४७	११	ह्री	ह्रीं
१४७	२२	म्म	न्म
१४८	४	स्य	स्यु
१५२	९	ट्टु	ट्ट
१५२	१६	मै	मैं
१५२	१६	णे	णें
१५६	१९	र्ते	ते
१५७	२४	त्वं	न्वं
१६३	७	श्रै	श्री
१६३	११	स्त	स्त्र
१६५	१२	र्ते	ते
१६६	२	त्या	त्यां
१६७	२	ती	तो
१७०	२३	त्सर	वत्सर
१७०	२८	प्राय:	प्रायो
१७१	२५	बा	वा
१७३	२७	तसें	तसें त्यानें
१७६	८	जू	जूं
१८१	१०	त्या	त्यां
१८४	४	दे	हे
१८६	१७	जू	जूं
१८८	६	र्तो	तो
१८९	४	येऊन	सर्वप्रमुख दैत्य येऊन
१८९	१७	असुराने	त्या असुराने
१९१	२६	त्या	त्यां
१९३	१२	आहे	होता

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
१९८	३	ता	तां
१९८	१९	र्ते	र्ते
१९९	४	त्तो	तो
१९९	९	श्वि	श्वि
२०१	१२	या	यां
२०१	२०	ग	गं
२०१	२८	सं	सं
२०२	१	म	ग
२०२	२	यु	यू
२०३	५	न	नं
२०३	१७।१८	युद्ध करूं लागली	व्युत्क्रमानें युद्ध करूं.
२०४	११	या बाणानीं	यांची
२०४	२०	दो	दो
२०५	४	वां	वा
२०५	५	कोणत्या	कांहीं
२०५	२४	रि	रिं
२०६	४	प	पं
२०७	२१	रवा	रवां
२०७	२३	क्षा	क्षां
२०८	२०	र्हो	र्हो
२०९	७	हरण करून	हरण होऊन
२१०	६	व्होवो	होवो
२१०	७	या	वा
२१०	२६	ब्य	प्य
२११	५	व्यथित	चूर्णित
२११	१९	मागें फिरवून	अडवून

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
२११	२२	सि	ति
२१२	१४	मुष्टिप्रहारानीं	मुष्टीनीं
२१२	१६	असतां त्याने	असतां अतिक्रुद्ध होऊन त्यानें
२१३	५	रथाचे व्याघ्रांस	रथाचे अग्रेसर व्याघ्रांस
२१३	८	यः	यैः
२१३	८	थं	थः
२१३	११	त्या देखाचें त्या रथाविषयीं चित्त पुरुषाच्या संशयासाररवें झालें	त्या देखाचा रथ, संशयी पुरुषाच्या चित्तासाररवा कुंठित झाला.
२१४	१३	मनगटानीं	टांचानीं व हातानीं
२१६	१५	अ	आ
२१६	२४	स	सं
२१७	१५	शूलनामक आयुध	शूलनामक भयंकर आयुध
२१७	२३	त्यौ	त्यो
२१८	६	धनाध्यक्ष कुबेरानें	पादचारि धनाध्यक्ष कुबेरानें
२१८	२४	बाहुभूषणानीं	बाहूनीं
२१९	५	दा	द
२१९	५	भ्मि	भ्य
२१९	७	ता	त
२१९	८	घोडा बांधण्याचे लाकडावर ..	जोखडावर
२१९	९	मूर्छा नाहीं आली	मूर्छा आली
२१९	२४	य	यू
२२०	२२	से	सा
२२१	११	राक्षसाधिपतीस निर्ऋतीस ..	राक्षसाधिपतीस.
२२१	२६	अ	आ
२२२	८	ति	ती
२२३	२३	नां	ना

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
२२७	१०।११	कुजंभदानवाचे	देवशत्रु कुजंभदानवाच्या
२३०	१७	जि	जी
२३१	११	दे	दै
२३२	३	नासें झालें	नाशीं झालीं
२३२	९	देहानें पूर्वादिक	देहानें आकाशव पूर्वादिक
२३२	१७	र	ह्य
२३२	२३	ती	तें
२३२	२४	ली	लें
२३३	६	मि	मी
२३४	१६	ला	ल
२३६	३	च	चा
२३७	२	द्दे	द्द
२३७	२४	आ	अ
२३९	११	देव आपापले	देव त्रासानें आपापले
२३९	२२	रथ्या संगा	रथ्यांगानि
२४३	२	र	रा
२४५	२	उत्श्रृंख	उच्छृंख
२४५	२८	क	कु
२४८	१५	तीक्ष्ण बाण	तीक्ष्णसत्रा बाण
२५४	५	करास मारली	करावर सोडली
२५४	१३	मोठे धनुष्य	मोठें दृढ धनुष्य
२५५	२२	रूत्र त्या	रूत्र घेऊन त्या
२५६	१७	स	न
२५७	४	उ	अ
२५७	१६	शले	लिशे
२५९	६	त्यों	त्यें

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
२५९	८	दैत्य	दैत्यश्रेष्ठ
२५९	११	अग्निसमान	अग्निसमानतेजस्वि
२६०	२६	चे	चें
२६१	२१	रे	रें
२६२	९	मे	में
२६२	११	मे	में
२६४	२१	धनुष्य तुटलें	धनुष्य व ध्वज हीं तुटलीं
२६४	२६	यां	या
२६४	२८	से	सें
२६५	१२	बलिष्ठता	बलिष्ठ
२६५	१६	त्याचप्रमाणें	आणि
२६५	२४	ते	ती
२६६	२३	दैत्यमहा पराक्रमानेंही	दैत्य सातदिवसांच्याशिशू वांचून महा पराक्रमानेंही
२६७	२२	ली	ला
२६७	२४	नः	णः
२६८	२५	तशींच	तसेंच
२६९	२४	असे समुदाय	असे कोटिकोटीचे समुदाय
२७२	१६	मू	शू
२७२	१६	दि	र्दि
२७३	४	फे	पे
२७५	१	वः	यः
२७६	९	र	रे
२७६	२७	सं	स
२७९	७	नो	ना
२७९	११।१२	द्रंस्त	द्रेत

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
२७९	१४	गा	वां
२७९	२७	क्ष	क्षा
२८०	११	तान्	तम्
२८१	४	ग	गं
२८३	२४	नीं	निं
२८४	७	ज्ञा	ज्ञे
२८५	६	त्मं	त्म
२८७	२७	मु	मुं
२८८	४	ले	लो
२८८	२६	ह	हु
२८९	३	न	ते
२९१	१५	ह	हा
२९२	४	रां	से
२९२	१२	सा	सां
२९२	१८	संहारकरण्यामुळें	संहारक असल्यामुळें
२९४	९	ती	त्ती
२९५	१	सिं	सि
२९५	१६	ता	त
२९६	२७	य	यु
२९८	१८	षिं	षि
२९९	१४	बु	हु
२९९	१६	नः	न
३०५	१९	कु	कुं
३०६	५	से	लें
३०७	९	लं	ल
३१०	११	ता	ते

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
३१५	१५	चीं	चीं
३१७	४	वा	रा
३१७	७	श	शं
३१८	१	तावत्काल	अल्पकाल
३२०	११	र्स	र्ल
३२२	७	झे	झें
३२२	२०	री	रि
३२३	२५	न	न्
३२४	११	दी	दि
३२४	१६	स्क	स्कं
३२४	२६	त्प	त्य
३२६	२१	गं	र्गं
३२७	१३	नि	नी
३२८	१९	सा	सां
३२९	८	द	द्र
३२९	२४	ला	ह्ला
३३०	१७	सा	स
३३३	२६	श्रु	श्रु
३३७	८	ना	र्नो
३४५	४	दा	द्रा
३४६	७	र्ख्या	ख्या
३४९	११	पु	पुं
३४९	२८	येऊन लागला	येऊं लागला
३५०	३	नेसयीं	नेसमयीं
३५१	९	कं	कां
३५६	२०	भक्तामत	भक्ताभिमत

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध.
३६०	१२	सती	सवसंतासहित ती
३६१	२०	गिरि	गिरिं
३६७	४	स	सं
३६७	६	त्या पूज्य	त्या यथाविधिपूज्य
३६९	१८	बि	बी
३७०	३	णें	नें
३७०	४	कु	कू
३७०	२०	न	नः
३७२	४	रि	री
३७२	२४	जृ	जृं
३७२	२७	ल	ले
३७२	२८	म	मा
३७३	१३	तूं	तुम्हीं
३७३	१३	हींस	हीं
३७३	१५	जातां	ज्जाता
३७३	२८	वा	र्वा
३७४	१०	र्य	र्ये
३७४	१०	तृ	र्तृ
३७४	१२	तृ	र्तृ
३७४	१३	म	मा
३७४	२१	न्मर	न्मम्र
३७५	२२	स्थे	श्ये
३७५	२७	सु	सुः
३७६	१३	ह	हं
३७८	१५	पि	पिं
३८२	१९	वं	व

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
३८३	११	ष्य ष्य	ष्य
३८४	१३	मा माण्या	माण्या
३८५	५	ष	षः
३८५	१०	यन्	य
३८५	२७	त्या	या
३८७	३	य	र्य
३८९	१	म	मे
३९०	१	ध्य	र्ध्य
३९०	२३	श्र	स्र
३९२	१७	का	कां
३९४	२	मान्	मं
३९४	७	थमा	मथा
३९७	२	स	स्र
३९८	१६	व	वे
३९९	२०	बा	बो
४०१	७	ह्र	ह्र
४०३	२३	दि	द
४०३	२७	महादेवपर्वत	महादेवउमेसहितपर्वत
४०४	७	वयाकुल	व्याकुल
४०५	१	र्द	र्द्र
४०५	२२	वि	र्वि
४०६	६	त्रे	त्रै
४१६	२३	एव	एक
४०७	१	०	हीच माझी नियमित मर्यादा लोक संपादक आहे
४०८	८	बि	बिं

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
४०८	१३	शा	शं
४०८	१५	की	क्री
४०९	६	न	म
४११	२०	म	र्म
४१४	१	त्याल	त्यान्त
४१४	१२	वि	नि
४१५	५	का	को
४१६	१३	सि	सिं
४१६	२४	तसाच वाद्य	तसाच हा वाद्य
४१६	२६	म	प
४१८	१९	शृ	शृं
४२१	१७	नान्छ	नान्छा
४२३	९	का	क
४२६	२२	मागें धावले	मागें रोदन करीत धांवले
४२७	१४	नि	निं
४२७	२८	नंतर करीन	नंतर त्वरितच करीन
४२९	२२	पर्जकाळीं	पर्जन्य काळीं
४३६	२	गौं	गो
४३७	१८	विध्य	विंध्य
४३७	२०	विध्य	विंध्य
४३८	५	तु	तुं
४४०	२७	दिस असून	दिसत असून
४४७	१७	इद्र उपेंद	इंद्र उपेंद्र
४४७	१८	कार्तीक	कार्तिक
४४८	२	कक्कुटं	कुक्कुटं
४४९	१९	क्रा	क्र

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
४५०	१४	ठी	ठि
४५०	१८	आह्मस	आह्मांस
४५०	२२	म्हणून जगाचा	म्हणून सकलदेवांच्या पदानुरोधानें गमन करणारा जगाचा नाथ
४५३	१०	आसा	असा
४५७	२५	ताडिने	ताडित
४५८	१	गदाया	गदया
४६१	१२	गंधवा	गंधर्वा
४६३	५	दिललें	दिलेले
४६८	२२	श्रदनें	श्रंदनें
४६८	२६	सपन्न	संपन्न
४६९	५	प्रियगु	प्रियंगु
४६९	१२	स्कध	स्कंध
४७१	१२	सगंध	सुगंध
४७२	७	विप्रचिति	विप्रचित्ति
४७२	१८	विप्रचिति	विप्रचित्ति
४७३	२५	उतर	उत्तर
४७५	७	जगम	जंगम
४७६	१५	असंसा	असतां
४८०	१८	दानवेश्वरा:	दानवेश्वरा:
४८५	२०	देक्षिणे	दक्षिणे
४८८	१५	महत्म्यानें	माहात्म्यानें
४८९	१	गोदवरी	गोदावरी
४९०	१४	सुदर	सुंदर
४९०	१६	भगवनं	भवनं

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
४९०	२२	कुजर	कुंजर
४९०	२४	ग्र	य
४९४	७	लांमाहु	लामाहु
४९४	२१	पुरष	पुरुष
४९५	२४	प्रप्रच्छ	पप्रच्छ
४९६	१९	स्युतष्ठति	स्फुत्तिष्ठति
४९७	१८	रविकुलर्षभः	रविकुलर्षभ
५००	१२	शुश्रूषवांस्थिताः	शुश्रूषवःस्थिताः
५०३	४	निरर्वृतिं	निर्वृतिं
५०३	२१	र्त्तिर्दहन्	निर्दहन्
५०५	१३	पत्तिजो	पतिश्रेष्ठसर्वजगाचा गुरूजो
५०६	१४	प्रष्टानि	प्रविष्टानि
५०७	१४	सतमं	सत्तमं
५०७	१८	किंचित्	किंचित्
५०९	३	जंप्रभुः	जत्प्रभुः
५१०	१९	शनैव	शनैर्व
५१०	१५	कार	कारक
५१०	२४	झाललें	झालेलें
५१२	११	सहृत	सहृत्त
५१२	२०	गुर्मं	रुमं
५१३	३	मरम	परम
५१६	८	भिद्र	भिंद्र
५१७	१	इश्वर	ईश्वर
५१७	२४	सपूर्ण	संपूर्ण
५१९	२७	वैश्वानरो	वैश्वानरो
५२०	१६	भगवाल्लोक	भगवांल्लोक

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
५२०	२२	भविता	भाविता
५२२	१७	मुजवान्	मुंजवान्
५२२	२१	षांमंतरे	षामंतरे
५२२	२१	टेशो .. .. .. - ..	देशो
५२२	२४	द्विपाची	द्वीपाची
५२५	१	समासाज्ञातं	समाज्ञातं
५२६	११	संयोगन	संयोगेन
५२७	६	सं	तं
५२७	११	यस्त्रष्टा	यः स्त्रष्टा
५२७	२६	केठभ	कैठभ
५२८	२	इंदियांचा	इंद्रियांचा
५३१	१	नाराण	नारायण
५३१	८	भगवानउवाच	भगवानुवाच
५३१	८	ब्रम्हन्नष्टादश	ब्रह्मन्नष्टादश
५३१	२६	गनः	गतः
५३५	१२	यज्ञेश्वराः	यज्ञेश्वराः
५३६	११	बाळां	बाळो
५४२	७	वीजानिं	विजानीं
५४२	१०	निपेतु	न्निपेतुः
५४३	६	तत्प	तप्त
५४३	२७	निर्हाद	निऱ्हाद
५४६	१९	राहिलेला	राहिलेले
५४७	११	चक्षुभिरे	चुक्षुभिरे
५४८	१	उद्योग	उद्योगं
५४८	९	तूणिर	तूणीर
५४९	१८	कोश	कोस

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध.
५५३	२५	बह्मर्षी	ब्रह्मर्षी
५५५	१५	पृश्वीवरील	पृथ्वीवरील
५५५	२६	रीतीनें रक्षण	रीतीनें त्या देव सैन्याचें रक्षण.
५५६	२१	रसयुक्त औषधींस	रसयुक्त सहस्त्रावधी औषधींस
५५७	२	काराश	राकाश
५५७	१९	दिवी द्राणां	दिवींद्राणां
५५७	२३	शृगैः	शृंगैः
५५८	१५	करणारें असून	करणारा असून
५६०	२४	सगायुक्तं	समायुक्तं
५६१	१५	स्विन्न	खिन्न
५६१	२६	निश्राण	निष्प्राण
५६३	१३	संतप्ता	संतप्ताः
५६४	२१	श्रेष्टो	श्रेष्ठो
५६५	२	ओर्वमुनि	और्वमुनि
५६६	१८	कारणें	करणें
५६७	१०	दीप्तांनरात्मातं	दीप्तांनरात्मानं
५७१	१८	अगीन	अग्नीनें
५७२	२४	लाक	लोक
५७३	२६	एव	एवं
५७४	९	दळींतील	दळांतील
५७७	१४	चंद्र व वरुण	अग्नि व वायु
५७७	१८	चंद्र व वरुणयानीं	अग्नि व वायुयानीं
५७८	९	मृत्यों	मृत्यौ
५८१	२०	काक्षिणः	कांक्षिणः
५८२	२६	मीलीत	मीलित
५८५	४	बभंजका	बभंजुर्वा

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
५८६	२७	कालनेमी	कालनेमिः
५९१	४	कालनमी	कालनेमी
५९३	१९	सिहस्यार्धं	सिंहस्यार्धं
५९४	२८	केलयान	केल्यानें
६००	३	काणीही	कोणीही
६०१	१३	स्वादिशं	स्वां दिशं
६०१	१४	मुत्तरां	ल्युत्तरां
६०५	२७	जोत्मा	जोत्स्ना
६०९	१८	पवंन	पवन
६०९	२७	मानेवरी	मानेवर
६१०	२	त्यांचेंनेत्र	त्यांचें शरीरव नेत्र
६१०	३	उदयाचला समान	उदयाचला वरील सूर्या समान
६११	१८	बाहुवगो	बाहुवेगो
६१३	१९	अनुचरा	अनुचराः
६२०	२	मुत्तम	मुत्तमं
६२०	२४	सवत्र	सर्वत्र
६२०	२६	पत्की	पंक्ती
६२३	२२	झालेल्यों	झालेल्या
६२४	८	रुत्तुगेः	रुत्तुंगेः
६२४	९	महीरहेः	महीरुहेः
६२५	१४	आरक्तं	आरक्त
६२७	२८	येथं	येथें
६३१	१७	गिरींद्रजा	गिरींद्रजां
६३८	२५	वक्त	वक्तु
६३९	२५	जन्मांतसहस्त्र	जन्मांतर सहस्त्रेण
६४०	१८	स्थाणुभूत	स्थाणुभूतः

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
६४०	२६	भवस्थितः	भवः स्थितः
६४२	१४	गच्छेतु	गच्छेत्तु
६४४	१८	सायज्य	सायुज्य
६४७	२३	ज्यराः	ज्वराः
६४८	३	पार्वत्यउवाच	पार्वत्युवाच
६४८	९	त्वप्रियार्थे	त्वत्प्रियार्थे
६४८	१२	यक्षाचा	यज्ञाचा
६५३	१६	च्छोतु	च्छ्रोतु
६५४	८	चें	जें
६५७	८	प्रवशां	प्रवेशां
६५७	२०	साहस्त्रं	साहस्त्र
६५८	५	ऊवाच	उवाच
६६०	१०	करु	कुरु
६६४	१८	तटांकानां	तटाकानां
६६५	२३	अंवश्यक	अवश्यक
६६६	२२	मदा	मृदा
६६९	१	लेक	लोक
६७०	३	निर्मया	निर्भयाः

भाग २ रा.

समाप्त.